श्रीमदाद्यशंकराचार्यकृत

सुबोधस्तोत्रसंग्रह

मराठी अनुवाद आणि विवेचन

भाग - २

लेखक :

महामहोपाध्याय

पं. पांडुरंगशास्त्री गणेशशास्त्री गोस्वामी

न्यायाचार्य, आयुर्वेदाचार्य, साहित्यविशारद

सीनिअर शास्त्री – डेक्कन कॉलेज, पुणे.



मूल्य दहा रुपये

स्तोत्रानुक्रम

१ गणेशभुजङ्गमस्तोत्र	४१	१९ उमामहेश्वरस्तोत्र	३१५
२ गङ्गाष्टकस्तोत्र	५४	२० अर्धनारीश्वरस्तोत्र	३२१
३ गङ्गास्तोत्र	६३	२१ शिवभुजङ्गमस्तोत्र	३३०
४ यमुनाष्टक	६७	२२ वर्णमालाशिवस्तुति	३६२
५ यमुनाष्टकस्तोत्र	७३	२३ मृत्युंजयमानसपूजास्तोत्र	३७९
६ मणिकर्णिकाष्टक	७९	२४ शिवानन्दलहरी	४०३
७ नर्मदाष्टक	८८	२५ दक्षिणामूर्तिस्तोत्र	४७९
८ नारायण नारायण जय गोविंद	१०२	२६ भवानीभुजङ्गमस्तोत्र	४९९
९ जगन्नाथाष्टक	११३	२७ देवीभुजङ्गमस्तोत्र	५०७
१० भगवन्मानसपूजास्तोत्र	१२३	२८ कनकधारास्तोत्र	५५१
११ विष्णुभुजङ्गमस्तोत्र	१३५	२९ कल्याणवृष्टिस्तोत्र	५६५
१२ विष्णुपादादिकेशान्तवर्णन	१५३	३० मन्त्रमातृकापुष्पमालास्तोत्र	५७५
१३ (राममानसपूजा)	२४७	३१ त्रिपुरसुन्दरीस्तोत्र	५८५
१४ लक्ष्मीनृसिंहकरावलम्बन	२५७	३२ ललितापञ्चरत्नस्तोत्र	५९०
१५ लक्ष्मीनृसिंहपञ्चरत्न	२७४	३३ सौन्दर्यलहरीस्तोत्र	५९५
१६ लक्ष्म्योतिर्लिङ्गस्तोत्र	२८६	३४ योगतारावली	७७६
१७ दशश्लोकी साम्बस्तुति	२९८	३५ दशश्लोकी	८५७
१८ शिवनामाक्षराष्टक	३०५		

विषयानुक्रम

ा :

श्वराची स्तुति कां करावी ? ७, ईश्वर आहे काय ? ९, ईश्वरसाक्षा-मार्ग १०, ईश्वराचें तात्त्विक स्वरूप १०, ईश्वराविषयीं कांहीं शंका व माधान १२, भक्ति हें ईश्वरसाक्षात्काराचें उत्कृष्ट साधन १३, ईश्वरा-माण विचार १४, जगाचा कर्ता ईश्वरच १५ ते २०, ईश्वराच्या ठिकाणीं नैर्घृण्याची शंका व तिचा परिहार २१ ते २४ या स्तोत्रांचा कर्ता सौंदर्यलहरीविषयीं दोन शब्द २६ ते ३२, स्तोत्रवाङ्मयाची उपयुक्तता ोकाचें समाधान ३१, ऋणनिर्देश, श्रीगुरुदत्तात्रेयजपपद्धति ३७, पपद्धति ३७.

व तीर्थक्षेत्रें :

गजाननाचें प्रातःस्मरण ४२, गजाननाचें वर्णन आणि स्तवन ४४, ला व बिंदु ४६, गणेशोपासनापद्धति ४९. गंगा, यमुना, मणिकर्णिका हिमावर्णन आणि स्तवन ५४ ते ७९, भगवान् भृगु – लांछन कसें झालें ? र्गाचें विनाशित्व ८२, मणिकर्णिकावर्णन आणि स्तवन ७९–८७, नर्मदेचें । ८८, नर्मदाउपासनापद्धति ९१, नर्मदेचें वर्णन व स्तवन ९३.

ोत्रें :

भजनाचा महिमा १०२, नारायणाचें स्तवन १०४, पुरीचें जगन्नाथ जगन्नाथाचें वर्णन आणि स्तवन ११५, मानसपूजेचें महत्त्व १२३, विष्णु । व्युत्पत्ति व विष्णूचा महिमा १३५, देहरूपी योगपीठ १४२, विष्णूचें आणि स्तवन १४६, नामसंकीर्तन व चिंतन १५३, विष्णूची आयुधें, शेष, भूदेवी आणि लक्ष्मीदेवी त्याचप्रमाणें विष्णूचें नखशिखान्तवर्णन -२४०, विष्णुउपासनापद्धति २४०, राममानसपूजा आणि उपासनापद्धति नृसिंहावतारकथा, स्तवन आणि वर्णन २५७, नृसिंहमंत्रजपविधि २७४.

वीं स्तोत्रें :

द्वादशज्योतिर्लिंगांचें वर्णन २८६, सांबवर्णन .२९८, शिवनाममहिमा शिववर्णन ३०८, शिवतत्त्व आणि शैवदर्शनांतील ३६ तत्त्वांचा विचार

३२३, शिवाच्या पांच मूर्तींचे मंत्र ३२७, शिवपंचाक्षरमंत्र जपविधि ३६१, मृत्युंजयाची उपासना ३७९, शिवशक्तितत्त्वविचार ४०३, शंकराविषयीं विविध मनोरम कल्पना ४१०–३८, मल्लिका आणि अर्जुन यांचे गुणधर्म ४३९, दक्षिणामूर्तिस्तवन, मंत्रजपविधि ४७९.

देवीची स्तोत्रें :

दुर्गेचा महिमा ५०७, पंचकोशविवरण ५११, पांच कलांचें पंचीकरण ५१८, गणेश, ग्रह, नक्षत्रें, योगिनी, राशि आणि देवी यांचें तादात्म्य ५२२, महामंत्रराजान्तबीजाचें स्वरूप ५३०, बिंदुत्रयाचें स्वरूप ५४१, दुर्गामंत्रजपपद्धति ५५०, लक्ष्मीस्तवन आणि मंत्रजपपद्धति ५५१, ललिताप्रातःस्मरण ५९०.

सौंदर्यलहरी :

सौंदर्यलहरीचें साहित्य, तंत्र व योगशास्त्रदृष्टीनें मतत्व ५९४, अनुष्ठान-पद्धति ५९८, शक्तीचें सर्वश्रेष्ठत्व ५९९, शिव आणि शक्ति यांचा संबंध ६०२, देवीच्या चरणधूलीचा महिमा ६०५, विष्णु व कामदेव यांच्यावर शक्तीची कृपा ६११, त्रिपुरसुंदरीचें सगुणस्वरूप, ऐश्वर्य, श्रीचक्रांतील व देहांतील वास्तव्य ६१६–२३, कुंडलिनी शक्तीचा षट्चक्रांतून प्रवास ६२४, सहस्रदल-कमलांतील चंद्रमंडलांतून अमृतवृष्टि ६३०, सहस्रदलकमल आणि श्रीचक्र यांची एकता, शिवचक्रें आणि शक्तिचक्रें यांची रचना, सुषुम्नामार्गातील षट्चक्रांशीं त्यांची एकता, मूलाधारचक्रामध्यें कुंडलिनीची निद्रा ६३१ ते ३५, श्रीचक्राचें अंतरंग व बहिरंग, श्रीचक्रांतील ९ आवरणांचें विवेचन ६३६ ते ४३, श्रीचक्रांतील देवता आणि तत्त्वें ६४६, अरुणाभगवती, मातृका (वर्ण), ई बीज, अमृतेश्वरी या रूपानें ध्यान ६४९, सादकलेचें स्वरूप, सायुज्यपदवी व मोक्ष ६५८–६३, त्रिपुरसुंदरीच्या सायुज्यतेंत शिवसायुज्ता, त्रिपुरसुंदरीच्या आज्ञेनें सृष्टिप्रलय, रसुंदरीच्या पूजेंत अन्य देवांची पूजा, समयाचारपूजा, देवीचा महिमा व द्वे, ६६४–७५, चौसष्ट तंत्रें व श्रीविद्यातंत्र ६७६, पंचदशाक्षरी श्रीविद्यामंत्राचें डत्व ६८०; चतुर्थखंड अथवा सोळावी कला ६८४, त्रिखंडमंत्र हा वर्ण-त्राचें अधिष्ठान, श्रीविद्येची फलश्रुति, कादिविद्या व हादिविद्या ६८४–९१, भक्तांचा अंतर्योग, शिवशक्तीचें एकरूपत्व, देवीचें विश्वरूपत्व ६९२–९७, त्रिपुरसुंदरीचें षट्चक्रांतील वास्तव्य ६९७ ते ७०६, त्रिपुरसुंदरीच्या आठ

दृष्टिरूपनगरी ७१३, त्रिपुरसुंदरीच्या कंठामध्यें संगीताचें वास्तव्य ७३१, त्रिपुरसुंदरीची उपासना व फल ७६६–७७०, षट्चक्रांचें श्रीचक्राशीं तादात्म्य, श्रीचक्राच्या आकृतीचें स्पष्टीकरण आणि स्तुतिसमर्पण ७७१–७५.

योगतारावली :

योगतारावलीचा हेतु, योगाभ्यासानें आत्मकल्याण, योगाभ्यास साधा आहे ७७६, बुद्धीच्या शुद्धीसाठी योगाची आवश्यकता ७७७, ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया म्हणजे योग, ज्ञानास योगाची व योगासनाची जोड आवश्यक ७७८, गुरूची आवश्यकता व संसाराचें वर्णन ७८३, लय म्हणजे काय ? दोन प्रकारची समाधि, नादानुसंधान आणि चित्तलय ७८७–९१, नादाची उत्पत्ति ७९२, अनाहतनाद ७९३–९९, नाडीशुद्धि आणि अनाहतध्वनि ८००, योगमंदिर, यम, नियम आणि १६ आसनें ८०१–९, प्राणायाम ८१०, नादानुसंधान व प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि ८१४–१८, उड्डियानबंधन, जालंधरबंध आणि मूलबंध, कुंडलिनीची जागृति, कुंडलिनीवर्णन, प्राणवायूचा रोध ८१९–२९, केवलकुंभक व त्याचे सुपरिणाम ८३०–५६.

दशश्लोकी :

देहात्मवाद, इंद्रियात्मवाद, क्षणिक विज्ञानात्मवाद इत्यादि विरोधि मतांचें खंडण आणि यथार्थ आत्मस्वरूपाचा निर्णय ८५८–८८८.

♣ ♣ ♣

लेखकाचें हृद्‌गत

आदरेण यथा स्तौति धनवन्तं धनेच्छया ।
तथा चेत्परमात्मानं को न मुच्येत बन्धनात् ॥

मानवी जीवनामध्यें अपूर्णता असणें हें स्वाभाविक आहे. ही अपूर्णता कोणत्या न कोणत्या तरी रूपानें पदोपदीं प्रतीतीला येत असते. आपल्या प्रयत्नानेंच ती अपूर्णता घालवून पूर्णतेचें समाधान आपल्याला मिळवावें लागतें. आपण त्या-प्रमाणें प्रयत्न करीत असतों व कमीअधिक प्रमाणांत आपल्याला यशहि येत असतें. अपूर्णतेच्या प्रतीतीचेंच दुसरें नांव गरज असें आहे. अपूर्णतेच्या प्रतीतींतूनच गरज निर्माण होत असते. आपली गरज भागविण्याकरितां जेथें आपला प्रयत्न हतबल होतो तेथें आपण दुसऱ्याचें साहाय्य घेण्याचा प्रयत्न करीत असतों. दुसऱ्याचें साहाय्य मिळविण्यासाठीं आपल्याला त्याची विनंती अथवा प्रार्थना करावी लागते, त्याची मनधरणीहि करावी लागते. ही मनधरणी करतांना आप-ल्याला त्याची प्रशंसा करावी लागते, त्याच्या गुणांचें वर्णन करावें लागतें, त्याला संतुष्ट करावें लागतें व त्याच्या संतोषांतूनच आपले मनोरथ पूर्ण करून घ्यावे लागतात. आपले मनोरथ पूर्ण करून घेण्याकरितां दुसऱ्याच्या गुणांची प्रशंसा करणें, त्याची विनंती करणें, प्रार्थना करणें, त्याचे गोडवे गाणें याच क्रियेला स्तुति असें म्हणतात. स्तुति आणि स्तोत्र हे दोन्ही शब्द एकाच अर्थाचे आहेत.

मनुष्य आपल्या गरजा भागविण्यासाठीं पैसा मिळावा म्हणून श्रीमंत लोकांची मोठ्या आदरानें स्तुति करीत असतो. त्याचप्रमाणें तो जर परमेश्वराची स्तुति करील तर कोण बरे बंधनांतून मुक्त होणार नाहीं ? मन लावून जो कोणी ईश्वराचीं स्तुतिस्तोत्रें म्हणेल, गाईल, तो कोणीहि असो, संसारबंधनांतून मुक्त होईल हें निश्चित. असा वरील श्लोकाचा अभिप्रेत अर्थ आहे. यावर कोणी अशी शंका घेईल कीं, एखाद्या श्रीमंताची स्तुति केली तर तो प्रसन्न होऊन आपल्याला कांहीं पैसा देतो; त्यांतून आपल्या गरजा भागतात व आपण सुखी होतों, हा आपला प्रत्यक्ष अनुभव आहे. ईश्वराची स्तुति केल्यानें ईश्वर पैसा देतो असा कांहीं अनुभव येत नाहीं, मग ईश्वराची स्तुति करण्यांत काय अर्थ आहे ? ही शंका आपाततः रमणीय वाटते, पण तत्त्वतः ती निरर्थक आहे.

ईश्वर आपल्याला दिसत नाहीं व तो कांहीं आपल्या हातावर पैसे ठेवून आपल्याला साहाय्य करीत नाहीं म्हणून ईश्वर हा कोणी नाहींच व त्याची स्तुति-प्रार्थना करण्यांतहि कांहीं अर्थ नाहीं. ईश्वर मानणें किंवा त्याची पूजा-अर्चा आणि स्तुति-प्रार्थना करणें हा केवळ भोळ्या-भाबड्या लोकांचा मूर्खपणाचा खेळ आहे. असा आक्षेप अनेक वेळां स्वतःला अधिक शहाणे समजणारे लोक करीत असतात. पण ईश्वराच्या स्वरूपाचा पूर्णपणें विचार न करतांच त्याच्यापासून पराङ्मुख राहून ते स्वतःच एक प्रकारें अविचाराची सीमा गाठीत असतात. त्यांच्या दृष्टीनें भोळा-भाबडा भाव हा जसा त्याज्य आहे त्याचप्रमाणें ईश्वरप्रवण असलेल्या लोकांच्या दृष्टीनेंहि निरीश्वरवाद्यांप्रमाणें योग्य मार्गानें सूक्ष्म विचार न करतां ईश्वरपराङ्मुख होऊन राहाणें हें अधिकच त्याज्य आहे. ईश्वरविषयक भोळा-भाबडा भाव हा अयोग्य असला तरी तो हानिकारक नाहीं, पण निरीश्वरवादाचा पुरस्कार करून ईश्वर-पराङ्मुख होणें यांत फार मोठी हानि आहे. एखाद्या हानीची जाणीव झाली नाहीं तरी तिचे दुष्परिणाम हे अटळ असतात. लहान मूल हें माती खात असतें. मोठ्या आवडीनें खात असतें. त्या बिचाऱ्याला माती खाणें हें हानिकारक आहे याची जाणीवहि नसतें. कोणी त्याला माती खाण्यापासून परावृत्त केलें तर तें रडत बसेल पण माती खाण्याचें सोडणार नाहीं. मातीबरोबर आंतड्यांत गेलेले खडे त्याचा पचनमार्ग बिघडवितात व मातीहि पचनमार्गांत चिकटून बसते. त्याच्या अन्नरसाचें अभिसरण बरोबर होत नाहीं. रक्त बिघडतें, यकृत् बिघडतें, शेवटीं यकृत् सुजतें. मूत्रवह स्रोतसें व स्वेदवाहक स्रोतसें यांचा अवरोध होतो व अखेर त्यांतच त्या बालकाचा अंत होतो.

श्रुति व संतमहात्मे यांच्या मार्गदर्शनाची अवहेलना करून स्वतःच्या बुद्धीनेंच स्वच्छंदपणें वागणाऱ्या निरीश्वरवाद्यांचीहि अशीच अवस्था झालेली असते. स्वतःला नीट कळावयाचें नाहीं व दुसऱ्यानें सांगितलेलें पटायचें नाहीं अशीच त्यांच्या बुद्धीची ठेवण असतें. कित्येक वेळेला आम्हांला वाटतें तेंच बरोबर आहे व आम्ही सांगतों तेंच खरें आहे असा विपरीत अभिनिवेशहि बलवत्तर असतो. श्रद्धाभक्ति-विरहित नास्तिकांचें जीवन शेवटीं याच अभिनिवेशानें नाश पावत असतें. याकरितां शहाण्या लोकांनीं ईश्वरपराङ्मुख होऊन रहाण्याचा अविचार कधींहि करूं नये.

यावर कोणी अशी शंका घेईल कीं, अहो, ज्याची स्तुतिस्तोत्रें गाइलीं असतां, जीव सर्व संसारदुःखांतून मुक्त होतो असें तुम्ही म्हणतां तो ईश्वर आहे तरी का ? तो कोठें आहे ? तो कसा आहे ? तो कधीं दिसतो का ? तो जर कधीं कोणाला दिसत नाहीं तर मग तो आहे असें कसें मानावें ? त्याची स्तुति तरी कशी करावी ? आणि काय त्या स्तुतीचा उपयोग ? इत्यादि शंका मनांमध्यें येणें हें स्वाभाविक आहे. या सर्व शंकांचें निरसन करण्याकरितां आपण संतांचे ग्रंथ वाचा. संतांचीं दर्शनें घ्या. त्यांच्या सांन्निध्यांत कांहीं काळ बसा. आपल्या मनांतील शंकाकुशंका नम्रतेनें त्यांच्यापुढें मांडा. त्यांचे उपदेश श्रवण करा. त्यांनीं दाखविलेला मार्ग धरा. आणि मग पहा अंतःकरणांत कांहीं शंकाकुशंका रहातात का तें. हाच ईश्वराला पहाण्याचा राजमार्ग आहे.

एक राजा होता. नेहमीं विलासांत दंग होऊन तो अंतःपुरांतच रहात असे. कधीं कधीं आपण ईश्वराला पहावें, ईश्वराचें आपल्याला दर्शन घडावें असें त्याला वाटत होतें. कधीं काळीं एखादा संत-महात्मा राजधानींत आला कीं त्याला मोठ्या आदरानें राजमहालांत बोलावून घेई व ईश्वराविषयीं त्याला प्रश्न करी. पण कांहीं केल्या चित्तवृत्ति विषयपराङ्‌मुख होईना. तो अंतःपुरांतच पडून रहावयाचा. कांहीं अवलिया संत साधकाची मनोभूमिका लक्षांत घेऊन मोठ्या गमतीनें उपदेश करीत असतात. असेच एक परम विरक्त महात्मा एकदां त्याच्या राजधानींत आले. राजानें त्यांना राजमंदिरांत बोलावलें, पण ते राजाकडे गेलेच नाहींत. शेवटीं राजाच त्यांच्याकडे जाऊं लागला. त्यांनीं राजाची मनोभूमिका लक्षांत घेऊन राजाशीं बोलायचेंच टाळलें. त्यांच्या विरक्तपणाबद्दल राजाच्या अंतःकरणांत त्यांच्याविषयीं अत्यंत आदर होता.

एके दिवशीं ते सत्पुरुष अकस्मात् राजवाड्यांत आले व इतस्ततः धांवत सुटले. राजा आदरानें त्यांच्याकडे जात असल्याचें शिपायांना माहित असल्यामुळें कोणी त्यांना प्रतिबंध केला नाहीं. शेवटीं ते साधुबाबा राजाच्या अंतःपुरांत शिरले ! राजा आदरानें त्यांच्यापुढें आला आणि नम्रतेनें म्हणाला, महाराज ! आपण असें कां धांवतां ? आपणांस काय पाहिजे ? बाबा म्हणाले, अरे, गच्चीचा रस्ता कोठें आहे ? मला चटकन् दाखव. राजा म्हणाला, महाराज, आपणांस काय पाहिजे आहे ! तें आपण मला सांगा. मी व्यवस्था करतों. तेव्हां बाबा म्हणाले, अरे ! माझा उंट काल रात्रीपासून पळून

गेला आहे. मी त्याचा सारखा शोध करीत आहें. राजवाड्यांतील सभागृह, दिवाणखाने, कचेऱ्या वगैरे सर्व मीं शोधून पाहिलें. आतां गच्चीवर जाऊन पहातों. राजा आदरानें म्हणाला, महाराज ! राजवाड्यांतील सभागृहें, कचेऱ्या व दिवाणखाने, तसेंच गच्ची आणि स्वयंपाकगृह ही का उंट शोधण्याची ठिकाणें आहेत ? उंट शोधण्याचा हा मार्ग नव्हे. उंट शोधावयाचा असेल तर त्याला मैदानांत, जंगलांत अथवा अरण्यांत गेलें पाहिजे. थांबा. येथें बसा आपण. मी माणसें पाठवितों आणि उंटाचा शोध करतों. हें राजाच्या तोंडचें वाक्य ऐकतांच ते सत्पुरुष म्हणाले, राजा ! उंटाला शोधण्याचा हा जसा मार्ग नव्हे तसाच ईश्वराला शोधण्याचाहि कांहीं विशिष्ट मार्ग आहे. तो मार्ग सोडून तूं जर अन्तःपुरांतच विषयासक्त होऊन बसशील तर तुला ईश्वराचें दर्शन कसें घडेल ? खाण्यापिण्याच्या चैनींत आणि ऐषआरामांत दिवस काढून परमेश्वराच्या साक्षात्काराची इच्छा करणें म्हणजे, हा लाकडाचा ओंडका आहे अशा बुद्धीनें सुसरीच्या पाठीवर हात ठेवून एखादा प्रचंड नदीचा पैलतीर गांठण्यासारखेंच होय. " शरीरपोषणार्थी सन् य आत्मानं दिदृक्षति । ग्राहं दारुधिया धृत्वा नदीं तर्तुं स इच्छति ॥ " या एका वाक्यांतच राजानें काय ओळखावयाचें तें ओळखलें आणि योग्य मार्गानेंच ईश्वराचा साक्षात्कार करून घेण्याचा प्रयत्न केला.

आचार्यांनीं स्तोत्रवाङ्मयाच्या रूपानें ईश्वरसाक्षात्काराचें मार्गदर्शन केलेलें आहे.

आचार्यांचा ईश्वर हा "अणोरणीयान्" आणि " महतो महीयान् " अशा स्वरूपाचा आहे. अणोरणीयान् म्हणजे सूक्ष्मापेक्षांहि सूक्ष्म. परम सूक्ष्म. आणि महतो महीयान् म्हणजे मोठ्यापेक्षांहि मोठा अर्थात् परब्रह्म अशा थाटांत तो विराजमान आहे. अतिसूक्ष्म आणि परम महान् अशीं हीं परस्पर विरुद्ध दोन टोकें स्वीकारल्यानंतर तदन्तःपाति मध्यमपरिमाणाचा सारा विश्वप्रपंच परमात्मस्वरूपांतच सामावलेला असणें हेंहि स्वाभाविकच आहे. परमात्मस्वरूपाला सोडून विश्वांतील कोणता पदार्थ कोठें असूं शकेल व कसा असूं शकेल असणेंच शक्य नाहीं. म्हणून आचार्यांचा परमेश्वर हा अखंड, अनंत, अपरिच्छिन्न, अपरिमित आणि अद्वैत स्वरूपाचा आहे. हे शब्द कांहीसे नीरस वाटतात म्हणून आचार्यांनीं सरसशब्दांनीं त्याची ओळख करून देतांना " चिदानन्दसान्द्राय शान्ताय तुभ्यं " (पृ. ४८), " जगज्जीवनं ज्योतिरानन्दरूपम् " (पृ. १४१); " प्रसन्नं सदानन्द-

संवित्स्वरूपम् " (पृ. १४६), " नित्यानन्दं स्वसंवित् सुखयति यमिनो यत्तद-व्यान्महो नः " (पृ. २३४) " आनन्दकन्दं हतपापवृन्दं " (पृ. २९५), " स कर्मादिहीनः स्वयं ज्योतिरात्मा " (पृ. ३६०), " सुधामूर्तिमीडे चिदानन्दरूपाम् " (पृ. ५००), याप्रयाणें चिद्घन, आनंदघन, परम शान्त, शिव, सुंदर, सदानंद, चिदानंद, आनंदकंद, स्वयंज्योति, स्वयंप्रकाश इत्यादि उपनिषदांतर्गत परब्रह्म तत्त्वाच्या स्वरूपलक्षणांत समाविष्ट असलेल्या अत्यंत गोड शब्दांचा ठिकठिकाणीं उपास्यदेवतेला उद्देशून प्रयोग केलेला दिसून येत आहे.

परमेश्वराचें परमसूक्ष्म स्वरूप अथवा परब्रह्मस्वरूप हें मानवी दृष्टीच्या टप्प्यांत समाविष्ट होण्यासारखें नसलें तरी भगवान् श्रीहरि हे मध्यम परिमाणानें नयनमनोहर अशा रमणीय रूपानें क्वचित् शंख, चक्र, गदा आणि पद्म हातांत घेऊन श्रीविष्णूच्या रूपानें तर क्वचित् अर्धनारीनटेश्वराच्या रूपानें, क्वचित् धवलवर्ण नंदिकेश्वराच्या सानिध्यांत त्रिशूल धारण करून उभें असलेलें फणिभूषण भगवान् शंकर, गळ्यांत रुद्राक्षमाळा, मस्तकीं गंगा, कमरेभोंवतालीं व्याघ्रांबर, सर्वांगीं विभूति चर्चिलेली अशा थाटांत दर्शन देत आहेत, तर क्वचित् राजराजेश्वरी श्रीललितांबा महात्रिपुरसुंदरीच्या रूपानें प्रकट होत आहेत. विविध रूपानें परमात्मा आचार्यांना प्रत्यक्ष दर्शन देत असल्याचें आचार्यांच्या शब्दांतूनच पहावयास सांपडत आहे. पहा : " यतिवरनिकटे श्रीयुक्त आविर्बभूव, स्वगुणवृत उदारः शङ्खचक्राब्जहस्तः " (सु. स्तो. सं., भाग १ ला, पृ. ५०).

एक शंका वरचेवर मनांत येत असते व कांहीं केल्या तिचें निरसन होत नाहीं. ती शंका अशी : ईश्वर असता तर तो आम्हांला दिसला असता. त्याच्यावर आमची श्रद्धा असो अथवा नसो. तो आम्हाला दिसावयास काय हरकत आहे ? एखाद्या राजाबद्दल आमच्या मनांत आदर असो वा नसो, कोणत्या न कोणत्या प्रसंगीं आम्ही त्याला राजधानींतून हिंडत फिरत असतांना पाहूं शकतों. त्याचप्रमाणें ईश्वर जर असता तर तोहि आम्हांला दिसूं शकला असता. पण ज्याअर्थीं तो कधीच दिसत नाहीं त्या अर्थीं तो आहे असें मानतां येत नाहीं.

ही शंका जरी वरचेवर मनांत येत असली तरी ती फारशी युक्तिसंगत नाहीं. सूक्ष्म विचाराअंतीं तिचें निरसन होऊं शकतें. जे पदार्थ आपल्याला दिसत नाहींत

ते नाहींत असें म्हणतां येत नाहीं. दिवसा आकाशामध्यें आपल्याला तारे दिसत नसतात, म्हणून ते दिवसा आकाशांत नाहींत असें कसें म्हणतां येईल ? अहो ! दिवसा सूर्यप्रकाशानें डोळ्यांची शक्ति पराभूत होत असते म्हणून आकाशांतील तारे दिसत नाहींत. रात्रीच्या वेळेला ते दिसतात. पण ईश्वर मात्र कधींच दिसत नाहीं. असें जर आपण म्हणाल तर यावर आमचें उत्तर असें आहे कीं ज्याप्रमाणें दिवसा सूर्याच्या तेजानें डोळ्याची शक्ति कुंठित होते व त्यामुळें आकाशांत तारे असूनहि दिसत नाहींत त्याचप्रमाणें अज्ञान आणि मोह, माया आणि अहंकार यांच्या योगानें ज्यांची बुद्धि हतबल झालेली असते त्यांना ईश्वर त्यांच्यापुढें विराजमान असूनहि दिसत नाहीं. त्यांना तो दिसत नाहीं म्हणून तो नाहींच असें कसें म्हणतां येईल ? भूमिगत असलेलें धन सामान्य दृष्टीला दिसत नाहीं, पण एखादें प्रभावी अंजन डोळ्यांत घातलें कीं त्याच डोळ्यांना भूमिगत धन दिसूं लागतें. त्याचप्रमाणें सामान्य-दृष्टीला शास्त्राचें, सद्गुरूकृपेचें आणि विवेकाचें अंजन लाभलें असेल तर त्याला ईश्वर सर्वत्र विराजमान असलेला दृष्टीस पडतो. तेव्हां ईश्वर आपल्याला दिसत नाहीं म्हणून तो नाहींच असें म्हणणें योग्य होणार नाहीं.

" नहि अयं स्थाणोरपराधः, यदेनं अन्धो न पश्यति " असें उदयनाचार्यांनीं म्हटलेलें आहे. आंधळ्या मनुष्याला खांब दिसत नाहीं हा कांहीं त्या खांबाचा अपराध नव्हे. स्थाणु शब्दाचा अर्थ भगवान् शंकर किंवा कूटस्थ परमात्मा असाहि आहे. अंध शब्दाचा अर्थ अविवेकी. मूर्ख लोकांना परमात्मस्वरूप कळलें नाहीं, तर हा कांहीं परमेश्वराचा दोष होऊं शकत नाहीं. परमेश्वराला पहाण्याकरितां वैराग्ययुक्त विवेकाचा व भक्तीचा डोळा असणें आवश्यक आहे.

दुधांत तूप असतें. काष्ठांत अग्नि असतो आपल्याला आपाततः तें तूप दिसत नाहीं व तो अग्नीहि दिसत नाहीं. आपल्याला दिसलें नाहीं म्हणून दुधांत तूप नाहीं असें म्हणतां येईल का ? काष्ठांत अग्नि नाहीं असें म्हणतां येईल का ? दुधाला विरजण लावलें, दहीं केलें, तें घुसळलें, लोणी काढलें आणि तें कढविलें कीं आपण तूप पाहूं शकतों. तसेंच काष्ठांच्या घर्षणांतून किंवा अरणीच्या मंथनांतून अग्नि निष्पन्न झाल्याचें आपण प्रत्यक्ष पहातों. याच न्यायानें गुरुकृपा, शास्त्रश्रवण, साधक आणि बाधक प्रमाणांनीं केला जाणारा विचार, तसेंच निदिध्यासन यांच्या योगानें बुद्धि शुद्ध झाली कीं त्याच शुद्धबुद्धीनें आपल्याला ईश्वराचा साक्षात्कार होऊं शकतो. याच अभिप्रायानें " श्रोतव्यः श्रुतिवाक्येभ्यः मन्तव्य-

श्रोपपत्तिभिः । मत्वा च सततं ध्येयः एते दर्शनहेतवः ॥" हीं ईश्वरदर्शनाचीं साधनें निर्दिष्ट केलेलीं आहेत.

भक्ति हेंहि एक ईश्वरसाक्षात्काराचें अत्यंत सोपें व उत्कृष्ट साधन होय असाहि तत्त्ववेत्त्यांचा व भक्तांचा स्वानुभवपूर्ण अभिप्राय आहेच. ज्या जीवनांत भक्तीचा आविष्कार नाहीं तें जीवन अत्यंत शुष्क, नीरस आणि म्हणूनच त्याज्य होय असेंहि त्यांचें म्हणणें आहे. यावर कोणी असें विचारील कीं, अहो ! भक्ति करा कोणाची ? ज्याची भक्ति करावयाची तो तर मुळीं कधीं दिसतच नाहीं ! मग त्याची भक्ति काय करणार ? ईश्वराविषयीं अंतःकरणांत असलेल्या उत्कृष्ट प्रेमालाच भक्ति असें नांव आहे. " सा परानुरक्तिरीश्वरे " अशी भक्तीची व्याख्या आहे. ज्याच्यावर उत्कृष्ट प्रेम करावयाचें तोच मुळीं आहे कीं नाहीं असा संशय. असता तर दिसला असता. दिसत नाहीं म्हणून नसावाच तो, असा मनाचा कल. अशा स्थितींत त्याच्यावर प्रेम कसें करणार ? यावर उत्तर :—

" **तस्माद्वेकेन मनसा भगवान् सात्वतां पतिः ।**
श्रोतव्यः कीर्तितव्यश्च ध्येयः पूज्यश्च नित्यदा ॥ "
(भागवत, १ । २ । १४).

भक्तीवांचून जीवन हें नीरस आणि निष्फल होत असतें म्हणून एकाग्र चित्तानें भक्तवत्सल भगवान् श्रीहरि याच्या गुणांचें श्रवण करावें. त्याचें नामसंकीर्तन करावें. गुणसंकीर्तन करावें. त्याचें नित्य ध्यान करावें व पूजनहि करावें. त्याचीं परम पावन चरित्रें भक्तियुक्त अंतःकरणानें आपण श्रवण करूं लागलों म्हणजे हळूहळू तो भगवान् श्रीहरि भक्तांच्या अंतःकरणांतील कामक्रोधादि विकारांचें जाळें तोडून टाकतो. सर्व दुर्वासनांचें निर्मूलन करतो. जसें जसें अंतःकरण शुद्ध होत जाईल तशी तशी त्या अंतःकरणांत परमेश्वराविषयीं शुद्ध भक्ति दृढावत जाईल, मन प्रसन्न होईल. शेवटीं तो भक्त सर्वसंगविनिर्मुक्त होऊन त्याला भगवत्तत्त्वाचा साक्षात्कार होईल. परमात्मतत्त्वाचा साक्षात्कार झाल्याबरोबर हृदयांतील चिदचिद्ग्रंथींचा उलगडा होतो. अविद्यामूलक अहंकार मावळतो. मी कोण आहें ? कोठून आलों आहें ? मला कोठें जावयाचें आहे ? माझें स्वरूप काय आहे ? इत्यादि सर्व संशय पार मावळतात. अनंत जन्मींचीं पर्वतप्राय पापें पण तीं पूर्णपणें निरस्त होऊन जातात. जीवनाच्या साफल्याचा

निरवधिक आनंद प्रतीतीला येतो व मनाला पूर्ण समाधान वाटतें. असा हा भक्तिमार्ग सर्वानुभवसिद्ध असून तो रुळलेला आहे. अगदीं डोळे झांकून निःशंकपणें या मार्गानें जा. यांत तुमचें कल्याणच होईल. नाशाची शंकाहि मनांत आणूं नका. " एष निष्कण्टकः पन्था यत्र सम्पूज्यते हरिः । धावन्निमील्य वा नेत्रे न स्खलेन्न पतेदिह ॥ " (भागवत).

अहो ! त्या परमेश्वराच्या परमपावन मंगलमय कथा श्रवण करा असें तुम्ही सांगतां, पण त्या कथांवर आमचा विश्वासच बसत नाहीं. त्या सर्व काल्पनिक भाकडकथा आहेत असें वाटतें. याला काय करावें ? बरोबर आहे. परमेश्वराच्या सामर्थ्याची व स्वरूपाची यथार्थ कल्पना नसल्यामुळें असें वाटणें स्वाभाविक आहे. स्वभावतःच हार्दिक प्रेमानें मन परमेश्वराचीं चरित्रें श्रवण करण्याकडे प्रवृत्त होईल तर तें एक महाभाग्याचें लक्षण ठरेल. असें भाग्य लाभलें तर उत्तमच. पण तें नच लाभलें तर मनाला थोडेंसें मारूनमुटकून आणि बरेंचसें आंजारून गोंजारून का होईना पण श्रीहरीच्या चरित्रश्रवणाकडे गुंतवा. जशी जशी श्रीहरीच्या सामर्थ्याची प्रतीति येईल तशी तशी चरित्र-श्रवणाची अभिरुची वाढत जाईल. जशी जशी अभिरुची वाढेल तसें तसें मन त्यामध्यें तन्मय होईल. जशी जशी तन्मयता वाढेल तसा तसा चित्तामध्यें भगवत्स्वरूपाचा आविष्कार अधिक होईल. शेवटीं आपल्याला भगवत्स्वरूपाचा साक्षात्कार झाल्याचें पूर्ण समाधानहि लाभेल.

ईश्वराला कसें पहावें ? कोणत्याहि प्रमेयाचें ज्ञान हें प्रमाणांनींच व्हावयाचें असतें. ज्याला कांहीं प्रमाण नाहीं असें कोणतेंहि प्रमेय शास्त्रज्ञ मानीत नसतात. सामान्य लोक देखील नित्याच्या व्यवहारांत प्रमाणांची अपेक्षा करीतच असतात. कां आणि कसें ? हे प्रश्न बुद्धीमध्यें स्वाभाविकपणेंच निर्माण होत असतात. त्यांचें बरोबर उत्तर मिळाल्याशिवाय बुद्धीचें कधींच समाधान होत नसतें. वादविवादाच्या प्रसंगीं एखाद्या वेळेला बुद्धि निरुत्तर होईल. पण ती शांत किंवा समाहित होणार नाहीं. ती बुद्धि जिज्ञास्य-तत्त्वाच्या यथार्थ स्वरूपाशीं जेव्हां जाऊन भिडते तेव्हांच तिला समाधान होत असते. याच अभिप्रायानें " तत्त्वपक्षपातो हि धियां स्वभावः " असें शास्त्रज्ञांनीं बुद्धीचें वर्णन केलेलें आहे. तत्त्व म्हणजे सत्य. कोणत्याहि सिद्धान्ताची सत्य बाजू उचलून धरणें किंवा त्या सिद्धान्ताच्या सत्यस्वरूपापर्यंत जाऊन पोहोंचणें

हा बुद्धीचा स्वभाव होय. या दृष्टीनें पहातां परमेश्वराच्या तात्त्विक स्वरूपापर्यंत जाऊन पोहोंचल्याशिवाय बुद्धीला खरें समाधान मिळणार नाहीं. प्रकृतस्थलीं ईश्वराला कोणत्या प्रमाणानें जाणावें आणि कसें पहावें याचा आपल्याला विचार करावयाचा आहे.

ईश्वराला अनेक प्रमाणांनीं पहातां येतें. श्रुति आणि अनुभवी संतमहात्मे यांचीं वचनें हें सर्वांत मोठें प्रमाण होय. वेदांना सर्व प्रमाणांचा राजा असें म्हटलें जातें. यद्यपि प्रत्यक्ष प्रमाण हें सर्व प्रमाणांत अत्यंत श्रेष्ठ मानलें जातें. " चक्षुर्वै सत्यं " हें वाक्य प्रसिद्धच आहे. तथापि प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलेली वस्तु देखील कालांतरानें बाधित होते असें आपल्या अनुभवास येत असते. " मला असें दिसलें, वाटलें, पण तें चुकीचें होतें, " असें आपण पुष्कळ वेळेला म्हणत असतों. यावरून जें डोळ्यांनीं दिसतें तें सर्वच खरें असतें असें म्हणतां येत नाहीं.

वेदांच्या बाबतींत मात्र अनुभव निराळा आहे. वेदांनीं सांगितलेले सिद्धान्त अद्यापि निराबाध आहेत. वैज्ञानिक संशोधनाचीं साधनें विपुल प्रमाणांत उपलब्ध आहेत. त्या साधनांच्या बळावर मानव नित्य नवे, नवे शोध लावीत आहे. आधिभौतिक जगांत झपाट्यानें क्रांति होत चाललेली आहे. तथापि वेदांनीं प्रतिपादिलेल्या सिद्धान्तांना अद्यापि कोठेंहि बाध आलेला नाहीं. उलट आधिभौतिक संशोधनांनी वेदांनीं सांगितलेल्या सिद्धान्तांचेंच दृढीकरण होत असल्याचें दृष्टीस पडत आहे. क्वचित्प्रसंगीं तर्क देखील बलवत्तर विरोधी तर्कानें बाधित होतो, पण वेदांचा सिद्धान्त मात्र बाधित होत नाहीं. म्हणूनच वेदांना सर्व प्रमाणांचा राजा म्हटलें जातें.

वेदांनीं ईश्वराचें अस्तित्व ठिकठिकाणीं प्रतिपादन केलेलें आहे. " यो ब्रह्माणं विदधाति पूर्वं यो वै वेदांश्च प्रहिणोति तस्मै । तं ह देवमात्मबुद्धिप्रकाशं मुमुक्षुर्वै शरणमहं प्रपद्ये ॥ " सृष्टीच्या आरंभीं जो प्रथम ब्रह्मदेवाला निर्माण करतो, विश्वाच्या कल्याणाकरितां उपयुक्त असलेल्या वेदांचाहि जो उपदेश करतो, तो आत्मबुद्धीला प्रकाशित करणारा परमात्मा, तो स्वतः स्वयंप्रकाश आहे. सर्व संसारदुःखांतून मुक्त होण्याच्या इच्छेनें मी त्याला शरण जात आहें. असा या मंत्राचा अर्थ आहे. " यः सर्वज्ञः सर्वविद्यस्य ज्ञानमयं तपः " तो परमात्मा सर्व विश्वाला सामान्य रूपानेंहि जाणतो आणि विशेष रूपानेंहि जाणतो. " विश्वस्य

कर्ता भुवनस्य गोप्ता " तो सर्व विश्वाचा जनक असून त्रिभुवनाचेंच नव्हे तर चतुर्दशभुवनात्मक ब्रह्मांडाचें संरक्षणहि करतो. " नित्यो नित्यानां चेतनश्चेतनानाम् " तो नित्य म्हणून समजल्या जाणाऱ्या पदार्थांपेक्षांहि नित्य आहे व चेतनांनाहि चैतन्य देणारा आहे. " द्यावाभूमी जनयन्देव एकः " द्युलोक, भूलोक इत्यादि सर्व लोकांना निर्माण करणारा तो एकच देव आहे इत्यादि असंख्य वचनें परमेश्वराचें अस्तित्व निःसंदिग्धपणानें प्रतिपादन करीत आहेत.

अहो ! वेद सांगतात तें सर्व खरें आहे कशावरून ? आत्तांपर्यंत वेदांनीं सांगितलेलें कांहींहि खोटें ठरलें नाहीं त्यावरून. वेदांनीं सांगितलेले आत्तांपर्यंतचे सिद्धान्त खोटे ठरले नसले तरी यापुढें ते खोटे ठरणार नाहींत कशावरून ? अहो, वेद हे सर्वज्ञ ईश्वरप्रणीत आहेत. सर्वज्ञानें पुरस्कारलेले सिद्धान्त खोटे ठरत नसतात. ते खोटे ठरले तर ईश्वराला सर्वज्ञ म्हणतां येणार नाहीं. ईश्वर हा तर सर्वज्ञ आहे. अर्थात् त्यानें पुरस्कारलेले अथवा तत्प्रणीत वेदांत प्रतिपादिलेले सिद्धान्त हे सत्यच असले पाहिजेत. शिवाय ईश्वर हा परम दयाळु आहे. केवळ लोककल्याणाकरितांच तो प्रवृत्त झालेला आहे. मग तो खोटें कसा सांगू शकेल ?

यावर कोणी अशी शंका घेईल की, अहो ! ईश्वरच जेथें आहे कीं नाहीं असा संशय आहे तेथें तो सर्वज्ञ आहे आणि अत्यंत दयाळु आहे हें तरी कसें सिद्ध होणार ? उत्तर : वेदांत सांगितलेल्या सिद्धान्ताला अनुलक्षून ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करणारे असे किती तरी बलवत्तर अनुकूल तर्क आहेत कीं, त्या तर्कांचें खंडण होऊं शकत नाहीं. ज्यांना ईश्वराविषयीं अनुकूल असलेल्या तर्कांचें खंडणहि करावयाचें नाहीं आणि ईश्वराचें अस्तित्वहि मानावयाचें नाहीं त्यांच्याशीं काय बोलावें ? पण यथार्थ जिज्ञासेनें अंतःकरणपूर्वक विचार करावयास जे प्रवृत्त होतील त्यांच्यासाठीं आम्ही थोडे विचारांचें दिग्दर्शन करीत आहोंत.

उपनिषदें, गीता आणि ब्रह्मसूत्रें, हे ईश्वराला पहाण्याचे तीन मार्ग आहेत. या तीन मार्गांना प्रस्थानत्रय असें म्हणतात. " प्रस्थीयते अनेन इति प्रस्थानम् " अशी प्रस्थान शब्दाची व्युत्पत्ति आहे. प्रस्थान म्हणजे जाण्याचें अथवा जाणण्याचें साधन. या प्रस्थानत्रयावर आचार्यांचें भाष्य असलेलें प्रसिद्धच आहे. भाष्याची भाषा अत्यंत प्रसन्न, गंभीर, सुललित, मधुर आणि गंगेच्या प्रवाहाप्रमाणें ओघयुक्त आहे. संस्कृत वाङ्मयांत त्याला तोड नाहीं. आचार्यांचा युक्तिवादहि असाच बिनतोड आहे. संप्रदायाच्या अभिनिवेशानें कांहींनीं आचार्यांच्या युक्ति-

वादाचें खंडण करण्याचा प्रयत्न केला आहे, पण वाऱ्याशीं टक्कर घेणारा ढग हा जसा स्वतःच वितळतो त्याचप्रमाणें त्यांच्या त्या प्रयत्नाची अवस्था झालेली दृष्टीस पडते.

आचार्य म्हणतात, ईश्वराविषयीं व त्याच्या सर्वज्ञत्वाविषयीं मनांत तिळमात्रहि शंका आणूं नका. "तत्सिद्धिर्जगतो नियतप्रवृत्तेः" अत्यंत नियमबद्ध पद्धतीनें चाललेली विश्वाची प्रवृत्ति हीच ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करण्याला पूर्ण समर्थ आहे. सूर्य वेळच्या वेळेलाच रोज उदयाला येतो. ठराविक वेळेलाच तो अस्ताला जातो. चंद्राचे उदयास्त अगदीं ठरलेले आहेत. ग्रहणांचे स्पर्श आणि मोक्ष गणिताच्या आधारें कित्येक वर्षें अगोदरच ठरवितां येतात. ग्रहनक्षत्रें आणि यांची गति अगदीं नियमित स्वरूपाची असते. हिवाळा, उन्हाळा आणि पावसाळा हें ऋतुमान साधारणपणें नियमित चाललेले असतें. आषाढ-श्रावणांतच नद्यांना महापूर येतात. मार्गशीर्ष आणि पौष या महिन्यांतच शेकोटीजवळ बसून शेकावेंसें वाटतें. अथवा ऊबदार लोकरीचे कपडे अंगावर घ्यावेसे वाटतात. ग्रीष्म ऋतूंतच ऊष्म्याची तीव्रता जाणवते. वसंत आणि शरद्‌ऋतूंतच फुलाफळांचा बहर येतो. हा सर्व सृष्टींतील नियमितपणा पाहिला म्हणजे याच्या मुळाशीं कोणी तरी नियामक असलाच पाहिजे. कर्तृत्वप्रवण प्रशासकाच्या अभावीं ऑफिसांतील कामें नियमितपणानें व व्यवस्थितपणानें होत नसतात. राजाचा धाक नसेल तर प्रजा व्यवस्थित वागत नाहीं. राज्यांत गोंधळ माजतो. हें सर्वानुभवसिद्ध आहे. ज्या अर्थीं सृष्टींतील कार्यें नियमितपणें चाललेलीं असतात त्या अर्थीं सृष्टीच्या मुळाशीं कोणी तरी कार्यक्षम असा नियामक असलाच पाहिजे. त्याच नियामकाला ईश्वर असें म्हणतात. वैचित्र्यपूर्ण विश्वाच्या रचनेची अनुपपत्ति हाहि एक ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करणारा प्रबल तर्क आहे. विश्वाची रचना ही वैचित्र्यपूर्ण आहे यांत कोणाचेंहि दुमत नाहीं. रचनेचें वैचित्र्य हें कोणी तरी कुशल रचनाकार असल्याशिवाय उपपन्न होत नाहीं. अर्थात् वैचित्र्यपूर्ण जगाची रचना करणारा कोणी तरी कुशल कारागीर असलाच पाहिजे. जो जगाची रचना करतो तोच परमेश्वर होय. मोराच्या पंखांत हिरवा, निळा, जांभळा, सोनेरी इत्यादि विविध रंग कोणी भरले? पोपटाला कोणी रंगविलें? अनंत प्रकारचीं नयनमनोहर फुलें कोणीं रंगविलीं? त्यांत विविध प्रकारचें सौगंध्य कोणीं भरलें? कोकिळेला मधुर कंठ कोणीं दिला? हें प्रचंड पर्वत, नद्या,

सरोवरें आणि सागर कोणीं बनविले ? हीं प्रचंड अरण्यें कोणीं निर्मिलीं ? ही पृथ्वी, हें जल, हें तेज आणि हा वायु कोठून आला ? हें सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्रें, तारका आणि आकाशगंगा हें सर्व कोणीं निर्माण केलें ? या सर्व प्रश्नांचें परमात्मा हें एकच उत्तर आहे.

यावर कोणी असें म्हणेल कीं, अहो ! विश्वाचें वैचित्र्य निसर्गसिद्ध आहे. त्याला परमात्मा कशाला पाहिजे ? पण हें म्हणणें बरोबर नाहीं. निसर्ग जर हें सर्व करीत असेल तर निसर्गाचें स्वरूप तरी काय आहे हें अवश्य पाहिलें पाहिजे. निसर्ग म्हणजे काय ? अहो ! निसर्ग शब्दाचा अर्थ स्वभाव असा आहे. स्वभाव म्हणजे तरी काय ? स्वभाव या शब्दांतील स्व शब्द हा कोणाचा वाचक आहे ? स्व म्हणजे निर्माण होणारा प्रत्येक पदार्थ ? जन्माला येणारा प्रत्येक प्राणी ? हाच जर स्व शब्दाचा अर्थ असेल तर कोणत्याहि पदार्थाच्या निर्मितीला तोच पदार्थ कारण मानतां येत नाहीं. निर्माण होणाऱ्या पदार्थाचा निर्माता हा त्या पदार्थाच्या पूर्वकाळांत असावा लागतो. कोणताहि प्राणी जन्माला येण्याच्या पूर्वी त्याला जन्म देणारा हा असावा लागतो. निर्माण करणारा आणि निर्माण होणारा हे एकच असूं शकत नाहींत. जन्माला येणारा आणि जन्म देणारा हे एकच असूं शकत नाहींत. यावर प्रतिवादी असें म्हणेल कीं, अहो ! स्वभाव शब्दांतील स्व शब्दाचा अर्थ सृष्टि असा आहे. स्व-भाव म्हणजे सृष्टीचा धर्म. अहो ! सृष्टि म्हणजे तरी काय ? सृष्टींत निर्माण होणारे पदार्थ, जन्माला येणारे प्राणी आणि घडून येणाऱ्या घटना हाच ना सृष्टि शब्दाचा अर्थ ? तर मग सृष्टीच सृष्टीचें कारण आहे असें म्हणावें लागेल. कार्य आणि कारण हे एक असूं शकत नाहींत. निर्माता आणि निर्माण होणारा पदार्थ तसेंच जन्य आणि जनक हे एक असूं शकत नाहींत. जी आपत्ति टाळण्याचा तुम्ही प्रयत्न केला त्याच आपत्तीजवळ पुन्हां येऊन उभे राहिलांत. यालाच वटकुटीप्रभातन्याय असें म्हणतात. जकात चुकविण्याकरितां जकातनाकें टाळावें म्हणून रात्रभर डोंगरांत भटकावें आणि ऐन सूर्योदयाच्या वेळीं जकातनाक्या-वरच येऊन पोहोंचावें. असा वरील न्यायाचा अर्थ होय.

यावर निसर्गवादी असें म्हणेल कीं, अहो ! सृष्टींतूनच सृष्टि निर्माण होत असलेली दृष्टीस पडते. यावरून सृष्टीच सृष्टीचें कारण आहे असें म्हणणें भाग पडतें. पण हेंहि म्हणणें बरोबर नाहीं. सृष्टींतून सृष्टि जेथें निर्माण होतें तेथें जनक-

सृष्टि निराळी व जन्यसृष्टि निराळी असा भेद असतोच. तेव्हां मूळ जनकसृष्टीचा निर्माता त्या सृष्टीहून निराळाच मानावा लागतो. तो जो आदिसृष्टीचा जनक आहे त्यालाच परमात्मा असें म्हणतात. अहो ! सृष्टि ही अनादि आहे ना ? होय. सृष्टि ही अनादि आहे याचा अर्थ सृष्टिपरंपरा अनादि आहे. या परंपरेंतील प्रत्येक सृष्टीला आदि आणि अंत हा आहेच. पूर्वपूर्व सृष्टीच्या अनुरोधानेंच उत्तरोत्तरकालीन सृष्टि निर्माण केली जाते. याच अभिप्रायानें " धाता यथापूर्वम् अकल्पयत् " हें वेदवाक्य प्रसिद्ध आहे. सृष्टि निर्माण होण्याच्या पूर्वकाळांत त्या परमेश्वराशिवाय दुसरें कांहींच नव्हतें. " तस्माद्धान्यन्न परः किंचनास " असें नासदीयसूक्तांत वर्णन केलेलें आहे. अशा रीतीनें अनुकूल तर्कांनीं व वेद-वचनांनीं सृष्टीचा कर्ता ईश्वर असल्याचें सिद्ध होत आहे.

जो जें कार्य करीत असतो त्याला त्या कार्याचें सांगोपांग ज्ञान असावें लागतें. तें ज्ञान असेल तरच तो तें कार्य करूं शकतो. नसेल तर कांहीं करतां येत नाहीं. असा सर्वसामान्य नियम आपल्या दृष्टीस पडतो. या नियमाप्रमाणें पहातां मनानेंहि ज्याची कल्पना करतां येत नाहीं अशा अवाढव्य विश्वाची रचना करणाऱ्या परमेश्वराचें ज्ञानहि किती विशाल असलें पाहिजे याची कल्पनाच करतां येत नाहीं. याच अभिप्रायानें त्याला सर्वज्ञ असें म्हणतात. अफाट विश्व निर्माण करण्याचें त्याचें सामर्थ्यहि तसेंच असल्यामुळें त्याला सर्वसमर्थ असें म्हणतात.

आतां मीमांसकांचा असा एक पक्ष पुढें येतो कीं, जीवांनी जीं विहित आणि निषिद्ध कर्में केलेलीं असतात तींच त्यांनीं आचरलेलीं सत्कर्में व असत्कर्में त्यांना सुखदुःखात्मक फलें देत असतात. जीवांना त्यांच्या कर्माप्रमाणें सुखदुःखात्मक फलें देण्याकरितांच तीं कर्में अनुकूल व प्रतिकूल स्वरूपाची सृष्टि निर्माण करीत असतात. याप्रमाणें सृष्टीच्या उत्पत्तीची उपपत्ति लागते. त्याला ईश्वर मानण्याची काय आवश्यकता आहे ? पण हें मीमांसकांचें म्हणणेंहि युक्तिसंगत नाहीं. कर्में हीं स्वभावतः अचेतन आहेत. अचेतन पदार्थांना प्रेरणा देणारा कोणी तरी चेतन असल्याशिवाय अचेतन पदार्थांकडून कांहींच कार्य घडून येऊं शकत नसतें. यंत्रें कामें करतात पण त्या यंत्रांना गति देणारा कोणी तरी चेतन असावाच लागतो. कर्में हीं सुखदुःखात्मक फलें देणारीं असलीं तरी कर्मांना फलोन्मुख करणारा कोणी तरी प्रवर्तक पाहिजेच. कर्में हीं अदृष्टद्वारा

सुखदुःखांची निमित्तमात्र असतात. ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणें जीवांना सुख-दुःखात्मक फळें देणारा कोणी तरी निराळाच असला पाहिजे खास. जो जीवांना कर्मानुरूप फळें देतो तोच परमात्मा होय.

मीमांसकांच्या कर्मकारणवादाप्रमाणेंच सांख्यांचा प्रधानकारणवाद हाहि खंडित होतो. प्रधान म्हणजे मूलप्रकृति. ही देखील स्वभावतः जड – अचेतन असल्यामुळें तिच्या ठिकाणीं स्वतःप्रवृत्ति मानतां येत नाहीं. तिला कार्यप्रवण करणारा कोणी तरी चेतन मानावाच लागतो. तो जो चेतन, सर्वज्ञ आणि सर्वसमर्थ आत्मा तोच परमात्मा होय. निसर्गवादाप्रमाणेंच काळाचीहि विल्हेवाट लागत असल्यामुळें काळ हाच सर्व जगाचा कर्ता आहे असेंहि मानतां येत नाहीं. तात्पर्य, प्रधान, काल, कर्म, स्वभाव इत्यादि हे कोणीहि जगाचे कर्ते नसून जगाचा कर्ता एकच सच्चिदानंदघन परिपूर्ण प्रभु परमात्मा आहे ही गोष्ट निर्विवाद आहे.

आतां अशी एक शंका येते कीं, अलंकार घडविणाऱ्या सोनाराला शरीर असतें. गाडगीं मडकीं तयार करणाऱ्या कुंभाराला शरीर असतें. त्याप्रमाणें विश्व निर्माण करणाऱ्या परमेश्वरालाहि शरीर असलें पाहिजे. शरीर असल्याशिवाय कोणतेंहि कार्य करतां येत नाहीं. बरें, ईश्वराला शरीर मानलें तर तें कोणीं निर्माण केलें ? त्याचें शरीर निर्माण करणारा दुसरा ईश्वर मानला तर त्याचें शरीर निर्माण करणारा तिसरा, अशी ही अनवस्थापत्ति येते. तिचा परिहार कसा करणार ? यावर आमचें उत्तर असें आहे कीं, विश्वाचा कर्ता परमेश्वर आहे आणि तो सर्वज्ञ व सर्वसमर्थ आहे. असें मानल्यानंतर त्याला सृष्टि निर्माण करण्याकरितां एखाद्या सोनाराप्रमाणें किंवा कुंभाराप्रमाणें शरीर मानलेंच पाहिजे असा नियम नाहीं. सोनार, कुंभार वगैरे हे सामान्य जीव आहेत. त्यांचें ज्ञान, कर्तृत्व आणि सामर्थ्य अत्यंत परिमित आहे. त्यांना आपआपलीं कामें करण्याकरितां शरीर व इतर साधनांची अपेक्षा असली तरी सर्वसमर्थ असलेल्या भगवंताला सृष्टि निर्माण करतांना शरीराची अथवा इतर साधनांची अपेक्षा लागत नाहीं. तो स्वतःच्या संकल्पबलानें व इच्छाशक्तीनेंच सर्व विश्व निर्माण करतो. हेंच त्याचें वैशिष्ट्य असल्यामुळें त्याला शरीर आहे कीं नाहीं ? असल्यास तें आमच्या शरीराप्रमाणें नाशिवंत असेल. नसल्यास त्याला सृष्टि निर्माण करतां येणार नाहीं इत्यादि सर्व आक्षेप निरर्थक आहेत.

ईश्वर हा सर्वसमर्थ आणि सत्यसंकल्प असल्यामुळें त्याला कोणत्याहि वेळीं आवश्यकता वाटल्यास आवश्यक त्या कार्यासाठीं आवश्यक तें रूप धारण करतां येतें. सृष्टीच्या इतिहासांत आत्तांपर्यंत त्यानें धारण केलेल्या विविध अवतारांचें हेंच रहस्य आहे. वस्तुतः ज्याचें संकल्पसामर्थ्य अपरिमित आहे त्याला अवतार घेण्याचेंहि कांहीं कारण नाहीं. तथापि, तो केवळ भक्तजनांच्या मनाला रमविण्याकरितां दिव्य विग्रह (शरीर) धारण करून अलौकिक लीला करीत असतो. त्याचीं दिव्य रूपें भक्तांच्या मनाला रमवितात व अलौकिक चरित्रें भक्तांना पावन करीत असतात. मानवांचे देह जसे कर्माधीन आहेत त्याप्रमाणें ईश्वराचे दिव्य विग्रह कर्माधीन नसतात. म्हणूनच परमात्मा भक्तांसाठीं अनेक रूपें धारण करूनहि स्वस्वरूपांतून तिळमात्रहि ढळत नाहीं. मानवाचीं कर्माधीन शरीरें व ईश्वराचीं स्वसंकल्पाधीन रूपें यांतील फरक श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं आपल्या 'घोंगडी' या पद्यांत स्पष्टच केलेला आहे :

कान्होबा तुझी घोंगडी चांगली आम्हांसि कां दिली वांगली रे ॥ ध्रु. ॥

स्वगत सच्चिदानंदें मिळोनि शुद्ध-सत्त्वगुणें विणली रे ।
षड्गुण गोंडे रत्नजडित तुज श्यामसुंदरा शोभली रे ॥ १ ॥
काम कर्म अविद्या त्रिगुण पंचभुतांनी विणली रे ।
रक्त रेत दुर्गंधि जंतु नरक मुतानें भरली रे ॥ २ ॥
षड्विकार षड्वैरि मिळोनि तापत्रयानें विणली रे ।
नवा ठिकाणीं फाडुनि गेली ती त्वां आम्हांसि दिधली रे ॥ ३ ॥
ऋषि मुनि ध्यातां मुखें नाम गातां संदेहवृत्ति विरली रे ।
बापरखुमादेविवर विठ्ठलें त्वत्पदीं वृत्ति मुरली रे ॥ ४ ॥

परमात्मा हा सर्वज्ञ आणि सर्वसमर्थ आहे असें म्हटल्यानंतर एक शंका येतें कीं, तो परमात्मा मोठा निष्ठुर, अत्यंत निर्दय आणि विषम म्हणजे अत्यंत भेदभावानें वागणारा असला पाहिजे. त्यानें निर्माण केलेल्या सृष्टींत कोणी अत्यंत दरिद्री आहेत तर कोणी अत्यंत श्रीमंत आहेत. कोणी अत्यंत बुद्धिमान् आहेत तर कोणी अत्यंत निर्बुद्ध आहेत. कोणी अत्यंत बलवान् आहेत तर कोणी अत्यंत दुर्बल आहेत. कोणी अत्यंत रोगी आहेत तर कोणी दगडासारखे ठणठणीत प्रकृतीचे आहेत. कोणी कोणाचे भक्ष्य आहेत तर कोणी कोणाचे भक्षक आहेत.

चोर चोऱ्या करतात. गुंड लूटमार आणि जाळपोळ करतात. प्रत्यहीं अपघात घडून निरपराध्याचे प्राण जातात. कोणाहि सहृदय माणसाला दया यावी असे प्रसंग घडून येतात. ईश्वर सर्व कांहीं पहातो, पण त्याला मात्र दया येत नाहीं. दया येत असेल तर तो कांहीं करीत असल्याचें दिसून येत नाहीं. एक तर तो सामान्य जीवाप्रमाणें असमर्थ तरी असला पाहिजे किंवा अत्यंत निष्ठुर तरी असला पाहिजे, असेंच म्हणावें लागतें.

वर वर केल्या जाणाऱ्या विचारानें पहातां ही शंका रमणीय वाटते; पण सूक्ष्म विचार केल्यास या शंकेलाहि कांहीं वाव उरत नाहीं. शंका घेणाऱ्याला आम्हीच असा प्रश्न विचारतों कीं, ईश्वराच्या ठिकाणीं निष्ठुरतेची व वैषम्याची कल्पना करावयास तुमच्याजवळ पुरावा तरी काय आहे ? वर वर्णन केलेली परिस्थिति हाच पुरावा म्हणत असाल तर हा तुमचा परिस्थितिजन्य पुरावा अगदीं दुर्बळ आहे. खरोखर ईश्वर कशाला जीवांना दुःखी करील ? जीवांना दुःखी करून त्याला काय मिळवावयाचें आहे ? उलट ईश्वराला स्वतःचें कांहीं कर्तव्य नसतांनाहि केवळ अज्ञ जीवांच्या कल्याणासाठींच त्याचे सर्व प्रयत्न चाललेले आहेत. जीव केवळ अज्ञानामुळेंच या संसारांत अनेक प्रकारचीं दुःखें भोगीत असतो. तें त्याचें अज्ञान घालविण्याकरितांच परमेश्वरानें कपिल, दत्तात्रेय, व्यास इत्यादि रूपानें अवतार घेतले व अज्ञ जनांना तत्त्वज्ञानाचा उपदेश केला. आत्मस्वरूपाचें यथार्थ ज्ञान करून देण्याकरितां आचार्यांच्या रूपानें अवतार घेतला. अद्वैत तत्त्वज्ञानाचा दीप उजळला. श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज, श्रीएकनाथ महाराज, श्रीतुकाराम महाराज इत्यादि रूपांनी अवतीर्ण होऊन अज्ञ जीवांचा उद्धार करण्याची परंपरा चालू ठेवली. ईश्वराची आराधना करण्याकरितां ईश्वरानें अत्यंत उत्तम देह दिला. त्या देहामध्यें मन, बुद्धि, ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें यांची योजना केली. देहाच्या निर्वाहाकरितां वृक्ष, लता, वेली, वनस्पति, अन्न, जल इत्यादि सर्व कांहीं निर्माण केलें. देवांनींहि हेवा करावा अशी उत्तम परिस्थिति परमेश्वरानें दिलेली असूनहि अज्ञानानें व मिथ्या अभिनिवेशानें मानव जर दुःखच भोगीत राहील तर त्यांत परमेश्वराचा काय दोष आहे ? पदोपदीं परमेश्वराची दया अभिव्यक्त होत असतांना त्याला निर्दय समजणें हें किती कृतघ्नतेचें लक्षण आहे ? पाहील त्याला दिसेल. जो पहाणारच नाहीं त्याला काय कळणार ?

आतां गरीब, श्रीमंत, रोगी, निरोगी, सुखी, दुःखी इत्यादि भेद हे सर्व मानवनिर्मितच आहेत. मानवाच्या प्रमादानें निर्माण झालेल्या दोषांचा आरोप ईश्वरावर करण्यांत काय अर्थ आहे? अहो! कित्येकांना जन्मापासूनच सुखदुःखें भोगावीं लागतात. श्रीमंती आणि दारिद्र्य, आरोग्य आणि निरोगीपणा इत्यादि गोष्टी जन्मापासूनच प्राप्त होतात. त्यांत त्या जीवांचा काय दोष आहे? यावर उत्तर : आम्हीं पूर्वी सांगितलेंच आहे कीं, ईश्वराला अकारण कोणालाहि दुःख देण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. झालेंच तर तो कोणालाहि दुःखांतून सोडविण्याचाच प्रयत्न करील. अहो! तुमचा ईश्वर हा तर सर्वसमर्थ आहे, मग सर्व जीवांना तो दुःखांतून कां सोडवीत नाहीं? बरोबर आहे. तो सर्वसमर्थ आहे. यांत शंकाच नाहीं. पण जीवांचींच कर्में जीवांना दुःखांतून सोडविण्याच्या आड येतात. त्याला त्यानें काय करावें? जीव हा आपल्या कर्माप्रमाणेंच सुखें आणि दुःखें भोगीत असतो. अपराध्याला त्याच्या अपराधाप्रमाणें दंड देणारा न्यायाधीश हा कधीं दोषी मानला जातो का? निरपराध्याला दोषमुक्त म्हणून सोडून देण्यांत न्यायाधीशावर कोणी पक्षपातीपणाचा आरोप करील का? अपराधी कितीहि आपुलकीतला असला आणि निरपराधी हा कितीहि परकीय असला तरी अपराध्याला दंड करणारा आणि निरपराध्याला दोषमुक्त करणारा न्यायाधीश हा निःपक्षपाती म्हणून प्रशंसिलाच जात असतो. त्याचप्रमाणें निरपेक्षबुद्धीनें व निःपक्षपातीपणानें न्याय देणारा ईश्वर हा नेहमीच प्रशंसार्ह आहे.

लौकिक व्यवहारामध्यें कांहीं वेळेला न्यायाधीशावर सत्तेचें दडपण येतें व न्यायदानामध्यें गडबड अथवा विपर्यास होतो, पण ईश्वर हा सर्व सत्ताधीश असल्यामुळें त्याच्या न्यायदानांत कधींच गडबड अथवा विपर्यास होऊं शकत नाहीं. लौकिक व्यवहारामध्यें आरोपीचे वकील हे आपल्या युक्तिवादांतील चातुर्यानें न्यायाधीशाची फसवणूक करूं शकतात, पण ईश्वर हा सर्वज्ञ आणि सर्वसाक्षी असल्यामुळें त्याची फसवणूक कोणी करूं शकत नाहीं. यावर कोणी असें विचारील कीं, अहो! जीवांना बरीं, वाईट कर्में करण्याची बुद्धि ईश्वरच देतो ना? पण हाहि आक्षेप बरोबर नाहीं. ईश्वर बुद्धि देतो. हें खरें असलें तरी ज्याची जशी वासना असेल तशीच त्याला तो बुद्धि देतो. जशी वासना तशी बुद्धि, जशी बुद्धि तशीं कर्में आणि जशीं कर्में तशीं फळें अशी ही कार्यकारणभावांची शृंखला आहे. वासना म्हणजे संस्कार. तो आपल्या कर्मानेंच जीव आपल्या

ठिकाणीं निर्माण करून घेत असतो. तात्पर्य, कर्मानुरूप फळें देणाऱ्या ईश्वराच्या ठिकाणीं कोणत्याहि प्रकारें वैषम्याचा लेशहि स्पर्श करूं शकत नाहीं.

तो परमात्मा निष्ठुर आहे कां हो ? छेः, मुळींच नाहीं. उलट तो दयेचा अथांग सागर आहे. संत जनाबाईबरोबर त्यानें दळण-कांडण केलें. भांडीं वासलीं. सांवता माळ्याबरोबर भाजी उखडली. गोरा कुंभाराबरोबर माती तुडविली. दामाजीपंताकरितां आमचा विठु महार बनला आणि " गुन्हेगारी धन्यांची कांहीं नाहीं जी " अशा अर्थाचें वाक्य म्हणत बादशहापुढें नम्रतेनें धांवला. संत सखुबाईसाठीं कजाक सासूचा सासुर्वास भोगला आणि सासूच्या चिथावणीनें तिच्या मूर्ख पतीच्या हातचा त्यानें मारहि खाल्ला. संत एकनाथांच्या घरीं पैठणास कावडीनें पाणी भरलें व आवडीनें गंधहि उगाळलें. आमच्या बीड येथील श्रीजनीजनार्दन स्वामींना बादशहानें हत्तीच्या पायाखालीं तुडवून देहान्ताची शिक्षा दिली असतांना त्या हत्तीला शांत केलें. संत मिराबाईनें विषाचा प्याला घटाघटा घेतला असतांना तिला वांचविलें. अशा या भक्तवात्सल्याच्या किती तरी घटना प्रसिद्ध आहेत. त्या खऱ्या कशावरून असें कोणी विचारल्यास "इतिहास" हेंच त्याला उत्तर आहे. इतिहास खरा कशावरून ? कांहीं बाधक प्रमाण उपलब्ध होत नाहीं त्यावरून. बाधक प्रमाण उपलब्ध होत नसतांना वरील इतिहास खोटा मानावयाचा असेल तर मग सर्वच इतिहासाला तिलांजलि द्यावी लागेल ! प्रत्यक्ष या लेखकानेंहि स्वतःच्या जीवनांत ईश्वरानुग्रहाच्या घटना अनुभविलेल्या आहेत. तात्पर्य, ईश्वराच्या भक्तवात्सल्याविषयीं यत्किंचितहि शंका घेण्याचें कांहीं कारण नाहीं.

लौकिक व्यवहारांतहि दयेचा अर्ज केल्यानंतर राष्ट्राध्यक्ष देखील वाटल्यास फांशीची शिक्षा रद्द करूं शकतात. मग अखिल ब्रह्मांडनायक जो परमात्मा, आपण त्याच्या चरणीं अनन्यभावानें शरण गेल्यानंतर तो आपल्या सर्व अपराधांची क्षमा करील यांत संशय कशाला घेतां ? तेव्हां आतां चला आपण त्याच श्रीहरीच्या चरणीं अनन्यभावानें शरण जाऊं या. श्रीहरीचें तात्त्विक स्वरूप अखंड, अनंत, सत्य, ज्ञान, नित्य, विज्ञान, स्वयंज्योति, स्वयंप्रकाश, निर्गुण, निराकार, निर्विकार, अपरिच्छिन्न, अपरिमेय, कूटस्थ, अचल, अलक्ष्य, निरंजन, सद्घन, चिद्घन, आनंदघन इत्यादि अर्थपूर्ण व मधुर शब्दांनीं उपनिषदांत वर्णन केलेलें आहे. याच एकमेव अद्वितीय विश्वव्यापी तत्त्वाचा आचार्यांनीं प्रामुख्यानें

पुरस्कार केला. आचार्य हें सर्व विश्व तत्त्वतः एकजिनसी एकरूप मानतात. तथापि, प्रतीतीला येणाऱ्या सर्व व्यावहारिक भेदाचीहि ते मोठ्या कुशलतेनें उपपत्ति लावतात. अद्वैत तत्त्वाला धक्का न लावतां विश्वप्रपंचांतील कार्यकारणभावाची उपपत्ति अधिकांत अधिक निर्दोष स्वरूपानें भगवत्पूज्यपाद आद्य शंकराचार्य यांनी जितकी उत्तम लावली आहे तितकी ती इतर कोणत्याहि तत्त्ववेत्त्यानें लावलेली नाहीं. आचार्यांच्या मतानें जीव तत्त्वतः शुद्ध परब्रह्मस्वरूप आहे, पण अज्ञानानें तो स्वस्वरूपापासून इतका ढळला आहे कीं, पुन्हां त्याला स्वस्वरूपापर्यंत नेऊन पोहोंचविणें, स्वस्वरूपाशीं त्याचें तादात्म्य घडवून आणणें हें एक बुद्धीचें मोठेंच कार्य होऊन बसलेलें आहे. तें परमेश्वराच्या कृपेशिवाय पूर्ण होत नाहीं. " यावन्नानुग्रहः साक्षाज्जायते परमेश्वरात् । तावन्न सद्गुरुः काश्चित्सच्छास्त्रं न प्रवर्तते ॥ " असें वसिष्ठ महामुनींनीं म्हटलेलें आहे. याच अभिप्रायानें आचार्यांनीं स्तोत्रवाङ्मयाच्या द्वारां परमेश्वराची करुणा भाकलेली आहे. फुलाला धक्का न लावतां भ्रमर जसा फुलांतील मकरंदाचा आस्वाद घेत असतो त्याचप्रमाणें अद्वैताला तिळमात्रहि धक्का न लावतां परमेश्वराच्या विविध प्रकारच्या सगुण स्वरूपाचा रसास्वाद आचार्यांनीं घेतलेला आहे. बुद्धींतील भेदभाव मावळलेला असला तरी हे परमेश्वरा, मी तुमचा आहे. समुद्र आणि तरंग तत्त्वतः एक असले तरी व्यवहारामध्यें लोक समुद्राचे तरंग असें म्हणतात. तरंगांचा समुद्र असें कोणी म्हणत नाहींत. (सुबोधस्तोत्रसंग्रह, भाग १ षट्पदीस्तोत्र पहा).

प्रस्तुत ग्रंथांत अगदीं शेवटच्या स्तोत्रामध्यें आचार्यांनीं जीवाचें सच्चिदानंदरूपत्व मोठ्या बहारीनें वर्णिलेलें आहे. तें आम्ही सुविस्तृत विवेचनानें वाचकांच्या निदर्शनास आणलेलें आहे. तें वाचकांनीं अवश्य वाचावें. त्याचें वरचेवर मनन करावें. त्या स्तोत्रांतील विषय हा जीवनांतील ध्येयभूत विषय आहे. त्या ध्येयाच्या प्राप्तीकरितां जीवांना कोणत्या ना कोणत्या तरी इष्टदेवतेची उपासना करणें आवश्यक असतें. देवतांचीं रूपें अनेक आहेत. रुचिवैचित्र्याप्रमाणें आपल्याला रुचेल त्या कोणत्याहि इष्टदेवतेची उपासना करावी. आचार्यांच्या मतानें तत्त्वतः सर्व देवता एकरूपच आहेत, हें कोणत्याहि स्तोत्राच्या अर्थाचें मनन करतांना आपल्या सहज लक्षांत येईल. प्रायः प्रत्येक स्तोत्रांत त्या त्या देवतेचें सगुण स्वरूप आणि पारमार्थिक स्वरूप अशा उभयविध स्वरूपाचें वर्णन केलेलें दृष्टोत्पत्तीस येतें.

आतां असा एक महत्त्वाचा आक्षेप पुढें येतो कीं, हीं सर्व स्तोत्रें मूळ शंकराचार्यांचीं नव्हेतच. आचार्यांच्या मागून कोणी तरी त्यांच्या गादीवर बसलेल्या दुसऱ्याच शंकराचार्यांनीं तीं स्तोत्रें केलीं असावींत आणि आद्य शंकराचार्यांच्या नांवावर तीं लिहून ठेवलेलीं असावींत. आम्ही या आक्षेपाची शहानिशा करण्यासाठीं अनेक नव्या जुन्या विद्वानांच्या गांठीभेटी घेतल्या. त्यांच्याशीं चर्चा केली पण कोणालाहि निश्चित स्वरूपाचें समाधानकारक उत्तर देतां आलें नाहीं. केवळ "आम्हांला असें वाटतें, आम्हांला तसें वाटतें" इत्याकारक संभावनात्मक तर्कस्वरूपाचीं उत्तरें असतात. आम्हीं निवडलेल्या स्तोत्रांपैकीं अमुक एक स्तोत्र आद्य शंकराचार्यांचें नाहीं असें म्हणण्याइतका प्रबळ पुरावा आम्हांला उपलब्ध झालाच नाहीं. केवळ भाषेंतील थोड्याबहुत फरकावरून कांहीं स्तोत्रें आद्य शंकराचार्यांचीं नाहींत असा कांहीं लोक तर्क करतात, पण हा तर्कहि तितकासा सुदृढ नाहीं. गीताभाष्य आणि ब्रह्मसूत्रभाष्य यांच्या भाषेंत तरी साम्य कोठें आहे? मग गीताभाष्य आचार्यांचें नाहीं असें का म्हणावयाचें? केवळ भाषाशैलीच्या थोड्याबहुत फरकावरून अमुक एक स्तोत्र आचार्यांचें नाहीं असें निश्चितपणें म्हणतां येत नाहीं. आतां क्वचित् ठिकाणीं "मया पञ्चाशीतेरधिकमपनीते तु वयसि" असा वयाचा निर्देश आढळतो तो आचार्यांच्या वयाशीं विसंगत आहे. क्वचित् प्रसंगीं इष्टदेवतेपुढें करुणा भाकीत असतांना स्वतःच्या सांसारिक दुःखांचें व प्रापंचिक दैन्याचें केलेलें वर्णन हेंहि आचार्यांच्या जीवनाशीं विसंगत वाटतें म्हणून हीं स्तोत्रें आचार्यांनीं केलेलीं नसावीं अशी कल्पना येते; पण हेंहि कारण तितकेसें प्रबळ मानतां येत नाहीं. आचार्यांनीं केलेलीं स्तोत्रें ही भक्तजनांच्या कल्याणासाठीं असल्यामुळें भक्तजनांनीं इष्टदेवतेपुढें आपल्या परिस्थितीचें गाऱ्हाणें गातांना तें कोणत्या शब्दानीं कसें सांगावें याचा तो केवल अनुवाद आहे. त्या सर्व शब्दांचा अथवा शब्दांत दर्शविलेल्या परिस्थितीचा आचार्यांच्या जीवनाशीं प्रत्यक्ष संबंध मानलाच पाहिजे असें कांहीं नाहीं. इष्टदेवतेला अनन्यभावानें शरण गेल्यानंतर करुणा भाकतांना किती दैन्य व्यक्त करावें व शब्द कसे योजावेत याचें तें एक निदर्शन आहे. तात्पर्य, हाहि तर्क अमुक एक स्तोत्र शंकराचार्यांचें नाहीं हें सिद्ध करूं शकत नाहीं.

कांहीं लोक अशी कल्पना करतात कीं, ज्या स्तोत्रांच्या शेवटीं आचार्यांना 'इतिश्रीमद्भगवत्पूज्यपाद' असें विशेषण दिलेलें असतें, तें तें स्तोत्र आद्य

शंकराचार्यांचें समजावें व तें विशेषण जेथें नसेल तें स्तोत्र इतर कोणा तरी आचार्यांचें आहे असें समजावें. पण हीहि कल्पना तितकीशी बरोबर नाहीं. संस्कृत भाषेमध्यें कोणताहि शिष्य अथवा भक्त आपल्या गुरूबद्दल आदराची पराकाष्ठा व्यक्त करतांना आपल्या गुरूंना 'भगवत्पूज्यपाद' हें विशेषण लावूं शकतो व तसें तें कांहीं ठिकाणीं लावल्याचें दिसतेंहि. यावरून 'भगवत्पूज्यपाद' हें विशेषण कांहीं व्यावर्तक विशेषण नव्हे. म्हणून हाहि तर्क बरोबर नाहीं.

आतां कोणी असा प्रश्न करील कीं, तुम्हीं निवडलेलीं हीं सर्व स्तोत्रें आद्य शंकराचार्यांचीं आहेत असें म्हणावयास तुमच्याजवळ तरी काय पुरावा आहे? यावर उत्तर : शृंगेरी कांचीकामकोटि इत्यादि मठांनीं पुरस्कारलेलें व श्रीरंगं येथील वाणीविलास मुद्रणालयानें मुद्रित केलेलें आद्य शंकराचार्यांचें कार्य प्रसिद्ध आहे. त्यांत प्रसिद्ध झालेलीं स्तोत्रें आणि प्रकरणग्रंथ हें सर्व आद्यशंकराचार्यांचेंच कार्य आहे. ज्या हस्तलिखित पोथ्यांवरून हें मुद्रण झालेलें आहे त्या सर्व पोथ्यांतून स्तोत्रांच्या अथवा प्रकरणग्रंथांच्या शेवटीं आद्य आचार्यांचा उल्लेख आहे. इतर कोणत्याहि आचार्यांच्या नांवांवर यांतील स्तोत्रें किंवा प्रकरणग्रंथ उल्लिखित असल्याचें दिसून येत नाहीं. आद्य शंकराचार्यांच्या नंतर त्यांच्या पीठांवर अधिष्ठित झालेल्या थोर व्यक्तींनाहि शंकराचार्य म्हणण्याचा प्रघात असला तरी अधिकृत उल्लेख करतांना त्या त्या आचार्यांचीं श्रीविद्याशंकर-भारती, श्रीनृसिंहभारती इत्यादि जीं पृथक् नांवें असतात त्याच नांवाचा उल्लेख केला जातो. कोणत्याहि स्तोत्रावर अथवा प्रकरणग्रंथावर अशा पृथक् नांवांचा जोंपर्यंत उल्लेख उपलब्ध होत नाहीं तोंपर्यंत तें स्तोत्र किंवा तो ग्रंथ विद्वत्परंपरेला संमत असलेल्या वहिवाटीवरून आद्य आचार्यांचाच आहे असेंच मानावें लागेल. बलवत्तर विरुद्ध पुरावा पुढें येईपर्यंत वहिवाटीचा अधिकार हा निराबाध मानला जातो ही गोष्ट सर्वमान्य आहे. ग्रंथाच्या शेवटीं केल्या जाणाऱ्या ग्रंथकर्त्याच्या उल्लेखाला आणि विद्वत्संमत असलेल्या परंपरागत वहिवाटीला मान्यता द्यावयाची नसेल, तर मग प्रस्थानत्रयांवरील भाष्यें हीं तरी आद्य शंकराचार्यांचीं आहेत कशावरून? असा प्रश्न केल्यास त्याला काय उत्तर देणार? तात्पर्य, ज्याप्रमाणें प्रस्थानत्रयावरील भाष्यें हीं आचार्यांचीं आहेत त्याचप्रमाणें त्यांच्या नांवानें प्रसिद्ध असलेलीं स्तोत्रें आणि प्रकरणग्रंथ हे त्यांचेच आहेत असेंच मानणें योग्य आहे.

सौंदर्यलहरीविषयीं दोन शब्द :— सौंदर्यलहरी हें एक अपूर्व स्तोत्र आहे. साहित्यशास्त्राच्या दृष्टीनें, मंत्रशास्त्राच्या दृष्टीनें आणि तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें याच्या-इतकें उत्कृष्ट स्तोत्र दृष्टीस पडत नाहीं. जगज्जननीच्या कृपेनेंच या स्तोत्राचें विवेचन होऊं शकलें. प्रस्तुत लेखकाला निमित्त करून तिनेंच तें करून घेतलें आहे. सर्व कर्तृत्व तिचेंच आहे यांत तिळमात्र आम्हांला संशय वाटत नाहीं.

या स्तोत्रावर संस्कृत भाषेंत छत्तीस टीका उपलब्ध असल्याचें कळतें. दोन टीकाकार सोडून बाकीचे सर्व या स्तोत्राचे कर्ते आचार्यच आहेत असें मानतात. दोन टीकाकारांपैकीं एकजण संशय व्यक्त करीत आहे व दुसरा मात्र विरोध दर्शवीत आहे.

" **स्तोत्रमेतद्वदन्त्येके शिवेन परिभाषितम् ।**
तस्यैवांशावतारेण शंकरेणेति केचन ॥
केचिद्वदन्त्याद्यशक्तेर्ललिताया महौजसः ।
दशनेभ्यः समुद्भूतमिति नानाविधश्रुतिः ॥ "

असें डिंडिम टीकाकारानें म्हटलेलें आहे. प्रत्यक्ष भगवान् सदाशिव काय किंवा श्रीललिताम्बा महात्रिपुरसुंदरी काय ? यांनीं हें स्तोत्र केलें असें म्हटलें तरी ते कोणाला तरी निमित्त करूनच स्तोत्र प्रकट करणार. तेव्हां शंकरांचाच अंशावतार असलेले भगवान् श्रीशंकराचार्य यांच्याच रूपानें त्यांनीं तें रचलें असा हा दुसऱ्या चरणांत सांगितलेलाच पक्ष सत्य ठरतो. आमच्याजवळ असेंहि एक पत्र उपलब्ध आहे कीं, त्या पत्रावरून या स्तोत्राची मूळ रचना आचार्यांचे गुरु भगवत्पूज्यपाद श्रीगोविंदयति यांनीं केली व तें स्तोत्र अनुष्टुभ् वृत्तांतलें होतें असें कळतें. पुढें आचार्यांनीं त्या स्तोत्राचें शिखरिणी वृत्तांत परिवर्तन केलें. ते इतकें सुंदर झालें कीं, त्यामुळें श्रीगोविंदयतींचें स्तोत्र मागें पडलें व आतां तर तें कोठें उपलब्ध असल्याचेंहि दिसत नाहीं. वरील विधानाला आणखी एक उपोद्बलक प्रमाण असें आहे कीं, या स्तोत्राचा ऋषि, छन्द वगैरे यांचा उल्लेख करतांना अस्य श्रीसौंदर्यलहरीस्तोत्रमन्त्रस्य गोविंदऋषिः अनुष्टुभ् छन्दः असें म्हणणारा एक संप्रदाय असल्याचें दृष्टीस पडतें.

दुसरे सद्गृहस्थ सुधाविद्योतिनीटीकाकार हे स्वतः आपणच सौंदर्य-लहरीचे कर्ते आहोंत असें म्हणत आहेत. हे दक्षिणेकडील द्रविड राजाचे आपण

चिरंजीव असून आपलें नांव प्रवरसेन असल्याचें सांगतात. यांनीं केलेले कांहीं अनुष्टुभ् वृत्तांतले श्लोक लक्ष्मीधर व्याख्येच्या पीठिकेंत उद्धृत केलेले आहेत. ते श्लोक वाचले म्हणजे या गृहस्थानें सौंदर्यलहरीची रचना केली असेल असें कोणीहि म्हणावयास तयार होणार नाहीं.

कांहीं लोक द्रविड देशांतील प्रसिद्ध संत श्रीसंबंधस्वामी हेच सौंदर्यलहरीचें कर्ते आहेत असें मानतात, पण हाहि पक्ष बरोबर असल्याचें दिसत नाहीं. संबंधस्वामींची द्रविड भाषेंतील पद्यरचना अद्यापि लोकप्रिय असल्याचें कळतें; पण संबंधस्वामींची संस्कृत भाषेंतील कोणतीहि रचना उपलब्ध असल्याचें दिसून येत नाहीं व सौंदर्यलहरीच्या कोणत्याहि जुन्या पोथींतून " इतिश्रीसंबंधस्वामिविरचितं " असा उल्लेख असल्याचेंहि आढळत नाहीं. म्हणून हाहि पक्ष विद्वानांनीं उपेक्षिलेलाच आहे.

आचार्य हे श्रीविद्येचे अनन्योपासक होते. अखंड परंपरेनें आजपावेतों आचार्यांच्या सर्व मठांतून श्रीविद्येची उपासना चालू आहे. सौंदर्यलहरी हें श्रीविद्येचेंच स्तोत्र होय. या स्तोत्राला एक स्वतंत्र तंत्राचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. या स्तोत्रांत शिवशक्तिस्वरूप विश्वाच्या मातापितरांचा एक मोठा थाटाचा दरबारच आचार्यांनीं श्रीचक्राच्या रूपानें आपल्या निदर्शनास आणून दिलेला आहे. जीवाला शिवशक्तिस्वरूप अद्वैततत्त्वापर्यंत जाऊन पोहोंचण्याकरितां या श्रीचक्रस्वरूप श्रीविद्यामंदिरांतील नऊ आवरणांतून क्रमशः वर जावें लागतें. या श्रीचक्राच्या चारी दिशेला चार द्वारें आहेत. तीनरंगी श्रीचक्र पहा. हीं द्वारें संप्रदायभेदानें क्वचित् आवृत असतात तर क्वचित् अनावृत असतात. साधक या श्रीविद्येच्या दारांजवळ आला कीं त्याला प्रथम चतुष्कोणाकार पहिलें आवरण दिसेल. यालाच भूपुरचक्र असें म्हणतात. हें तीन रेषांचें आहे. या भूपुरचक्रांत १० मुद्राशक्ति, १० दिक्पाल, ८ मातृका आणि १० सिद्धि यांचें आपल्याला दर्शन घडेल. सर्वसंक्षोभिणी, सर्वविद्राविणी, सर्वाकर्षिणी, सर्ववशंकारिणी, सर्वोन्मादिनी, महांकुशा, खेचरी, बीजमुद्रा, महायोनि आणि त्रिखंडा या दहा मुद्राशक्ति बाहेरून आंत या क्रमानें तिसऱ्या रेषेवर सर्व बाजूंनीं विराजमान आहेत. दुसऱ्या रेषेवर अष्टमातृका आहेत. ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, माहेन्द्री, चामुंडा आणि महालक्ष्मी अशीं त्यांचीं नांवें आहेत. पहिल्या रेषेवर अणिमासिद्धि, महिमासिद्धि, लघिमासिद्धि, ईशित्वसिद्धि, वशित्वसिद्धि,

प्राकाम्यसिद्धि, भुक्तिसिद्धि, इच्छासिद्धि, प्राप्तिसिद्धि आणि सर्वकामसिद्धि अशा दहा प्रकारच्या सिद्धि विराजत आहेत. दहा दिशांचे अधिपति दश दिक्पाल दाही दिशांना विराजत आहेत. इंद्र, वरुण, कुबेर, यम, अग्नि, निर्ऋति, वायु, ईशान, ब्रह्मा आणि अनंत हीं दिक्पालांचीं नांवें प्रसिद्धच आहेत. साधकानें सिद्धीच्या मोहांत न गुंततां काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, पाप आणि पुण्य या सर्वांवर विजय मिळवून द्वितीय आवरणांत प्रवेश करावा.

द्वितीय आवरणांत प्रवेश करण्याच्या पूर्वी आपल्याला वर्तुळाकार तीन वलयें दिसतील. तीं तमोगुण, रजोगुण आणि सत्त्वगुण या तिन्ही गुणांचीं द्योतक आहेत. त्रिपुटी अथवा तीन अवस्था जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति यांची तीं ज्ञापक आहेत. अथवा विष्णु-ग्रंथि रुद्र-ग्रंथि आणि ब्रह्म-ग्रंथि किंवा सोम, सूर्य, अग्नि यांची तीं बोधक आहेत. हीं तीन वलयें ओलांडून आपण वर गेलों म्हणजे आपल्याला षोडशदलकमल दिसेल. हीं सोळा दलें मन, बुद्धि, चित्त, अहंकार, धैर्य, स्मृति, शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, नाम, वार्धक्य, स्थूल शरीर, सूक्ष्म शरीर आणि जीवन या स्वरूपाचीं असून त्यांच्यांतील अधिष्ठात्री देवता कामाकर्षिणी, बुद्ध्याकर्षिणी, अहंकाराकर्षिणी, शब्दाकर्षिणी, स्पर्शाकर्षिणी, रूपाकर्षिणी, रसाकर्षिणी, गंधाकर्षिणी, चित्ताकर्षिणी, धैर्याकर्षिणी, स्मृत्याकर्षिणी, नामाकर्षिणी, बीजाकर्षिणी, आत्माकर्षिणी, अमृताकर्षिणी आणि शरीराकर्षिणी या नांवांनीं ओळखल्या जातात. अं आं इं ई इत्यादि सोळा स्वर हीं त्यांचीं बीजें होत. या आवरणांतून आपण वर गेलों म्हणजे आपल्याला आठ दलांचें कमळ दिसेल. हें श्रीयंत्रांतील तिसरें आवरण होय. यांतील दलें बुद्धीच्या सर्व संवेदनाशक्तीवर आधारलेलीं आहेत. वचन, आदान, गमन, विसर्ग, आनंद, दान, उपादान आणि उपेक्षा अशीं त्यांचीं नावें आहेत. त्यांच्या अधिष्ठात्री देवता अनंगकुसुमा, अनंगमेखला, अनंगमदना, अनंगमदनातुरा, अनंगरेखा, अनंगवेगिनी, अनंगांकुशा आणि अनंगमालिनी अशा आहेत. या देवता बुद्धीच्या प्रेरक असल्यामुळें यांच्या उपासनेनें बुद्धीचे तरंग आवरले जातात. कवर्ग, चवर्ग, टवर्ग, तवर्ग, पवर्ग, यवर्ग, शवर्ग; तसेंच ळं आणि क्षं हीं त्या देवतांचीं बीजाक्षरें होत. पूजेच्या वेळीं त्यांचा उच्चार केला जातो. या आवरणांतून आपण वर गेलों म्हणजे आपल्याला चौथें आवरण लागेल. या आवरणांत चौदा त्रिकोण आहेत. हे चौदा भुवनांचे अथवा आपल्या देहांतील चौदा नाड्यांचे द्योतक आहेत. देहांतील

मुख्य चौदा नाड्या म्हणजे अलंबुसा, कुहू, विश्वोदरी, वारणा, हस्तिजिह्वा, यशोवती, पयस्विनी, गांधारी, पूषा, शंखिनी, सरस्वती, इडा, पिंगला आणि सुषुम्ना या नांवांनीं योगशिखोपनिषदांत वर्णिलेल्या आहेत. त्यांच्या देवता म्हणजे सर्वसंक्षोभिणी, सर्वविद्राविणी, सर्वाकर्षिणी, सर्वाह्लादिनी, सर्वसंमोहिनी, सर्वस्तंभिनी, सर्वजृंभिणी, सर्ववशंकरी, सर्वरञ्जिनी, सर्वोन्मादिनी, सर्वार्थसाधिनी, सर्वसंपत्तिपूरणी, सर्वमंत्रमयी आणि सर्वद्वन्द्वक्षयकरी या नांवांनीं ओळखल्या जातात. त्यांच्या नांवाप्रमाणेंच त्यांचें कार्यहि समजावें. क पासून ढ पर्यंत त्यांचीं बीजाक्षरें आहेत. नांवाप्रमाणें भावना ठेवून उपासना केल्यास साधकाला अनुरूप फलप्राप्ति होते. हें आवरण पूर्ण करून आपण वर गेलों म्हणजे आपल्याला पांचवें आवरण लागेल. या आवरणांत दहा त्रिकोण आहेत. याला बहिर्दशारचक्र असें म्हणतात. यांतील देवता या दशविध प्राणशक्तीच्या अधिष्ठात्री देवता आहेत. सर्वसिद्धिप्रदा, सर्वसंपत्प्रदा, सर्वप्रियंकरी, सर्वमंगलकारिणी, सर्वकामप्रदा, सर्वदुःखविमोचिनी, सर्वमृत्युप्रशमनी, सर्वविघ्ननिवारिणी, सर्वांगसुंदरी आणि सर्वसौभाग्यदायिनी अशीं त्यांचीं नांवें आहेत. नांवाप्रमाणेंच त्यांचे गुणधर्म लक्षांत घेऊन उपासना करावी. णं पासून भं पर्यंत यांचीं बीजाक्षरें आहेत.

सहाव्या आवरणांत आपण गेलों म्हणजे तथेंहि दहा त्रिकोण असलेलें चक्र दृष्टीस पडेल. याला अंतर्दशारचक्र म्हणतात. या त्रिकोणांत सर्वज्ञा, सर्वशक्तिप्रदा, सर्वैश्वर्यप्रदा, सर्वज्ञानमयी, सर्वव्याधिनाशिनी सर्वाधारस्वरूपा, सर्वपापहरा, सर्वानंदमयी, सर्वरक्षास्वरूपिणी आणि सर्वेप्सितफलप्रदा अशीं नावें असलेल्या दहा देवता आहेत. त्या वैश्वानरात्मक अग्नीच्या दहा कलांच्या अधिष्ठात्री आहेत. अग्नीच्या दहा कला म्हणजे रेचक, पाचक, शोषक, वाहक, प्लावक, क्षारक, उद्धारक, क्षोभक, जृंभक आणि मोहक या नांवांनीं प्रसिद्ध आहेत. मं पासून क्षं पर्यंत यांचीं बीजाक्षरें आहेत. येथून आपण वरच्या सातव्या आवरणांत गेलों म्हणजे आपल्याला आठ त्रिकोण असलेलें चक्र दिसेल. याला अष्टारचक्र असें म्हणतात. यांतील देवतांचीं नांवें वशिनी, कामेश्वरी, मोहिनी, विमला, अरुणा, जयिनी, सर्वेश्वरी आणि कौलिनी अशीं आहेत. या देवता शीत, उष्ण, सुख, दुःख, इच्छा, सत्त्व, रज आणि तम यांच्या स्वामिनी आहेत. या चक्राचें ध्यान करणारा साधक या आठहि गुणांवर विजय मिळवूं शकतो. शंकराच्या अष्ट मूर्ति हेंच या आवरणाचें स्वरूप असल्याचेंहि वर्णन केलेलें आहे.

आठव्या आवरणांत आपण आलों म्हणजे तेथें केवळ एक अधोमुखी त्रिकोण दिसेल. याच्या तीन कोणांना कामरूपपीठ, पूर्णगिरिपीठ आणि जालंधर-पीठ अशीं नांवें आहेत. कामेश्वरी, वज्रेश्वरी आणि भगमालिनी अशा त्यांच्या देवता आहेत. तेथें प्रकृतितत्त्वाची, महत्तत्त्वाची आणि अहंकारतत्त्वाची भावना केली जाते. याच ठिकाणीं बाण, धनुष्य, पाश आणि अंकुश या आपल्या इष्ट देवतेच्या आयुध शक्तींचीहि पूजा केली जाते. मधल्या भागाला ओड्याणपीठ असें म्हणतात. याच पीठावर बिंदुस्वरूप नववें आवरण आहे. हा बिंदु पोकळ दाखविण्याची पद्धति आहे. यालाच नववें आवरण म्हणतात. याच ठिकाणीं विश्वाची मातापितरें महाभट्टारक भगवान् सदाशिव आणि पराभट्टारिका राजराजेश्वरी श्रीललितांचा महात्रिपुरसुंदरी अभिन्न शिवशक्तिस्वरूप पूर्ण अद्वैतभावानें विराजमान झालेलीं आहेत. येथील आनंदाचें स्वरूप अनिर्वचनीय आहे. त्या आनंदाला पारावार नाहीं. येथें येऊन पोहोंचल्यानंतर साधकाला जिकडे-तिकडे प्रेमच प्रेम आणि आनंदच आनंद ओतप्रोत भरलेला प्रतीतीस येतो. साधकाचें जीवन धन्य होतें. शिवानंदलहरींतील विविध कल्पना वाचकांच्या चित्ताला भक्तिरसानें द्रवितील आणि आनंदवितील. विष्णुपादादिकेशान्तवर्णनस्तोत्र हें तर महामहाकवींनाहि माना तुकवावयास लावील. योगतारावली तर अपूर्वच आहे. आत्मस्वरूपाच्या चिंतनाला दशश्लोकी फारच उपयुक्त आहे. यंत्रें व विविध मंत्रोपासना यांचा समावेश वाचकांच्या कल्याणासाठीं हेतुपूर्वक केलेला आहे. यानें वाचकांचें जीवन समृद्ध व आनंदमय होईल असा विश्वास आहे.

समाधानाचे दोन शब्द

ईशकृपेची साउली । गुरुकृपें फळा आली ।
कीं कामधेनु वर्षली । तृप्त करी चित्तातें ॥ १ ॥
होतें तिमिर दाटलें । अन्तःकरण कोंदाटलें ।
चित्त चैतन्या मुकलें । कांहींच नेणें ॥ २ ॥
दाही दिशा शून्य दिसतां । चित्त भांबावलें सर्वथा ।
शान्ति समाधानाचिया पंथा । कांहीं केल्या तें नेणें ॥ ३ ॥
झाली गुरुकृपा उदंड । प्रकाश फाकला प्रचंड ।
नवल उदेला मार्तंड । तिमिर लोपलें क्षणार्धीं ॥ ४ ॥

झालें आचार्य दर्शन । देती मज अभयदान ।
तयांच्या हस्तांचें आलंबन । भाग्यें मजसि लाभलें ॥ ५ ॥
प्रस्थानत्रयाचें अधिष्ठान । ज्ञानबीज अंकुरलें जाण ।
तोचि झाला वृक्ष महान । भाष्य नाम जयातें ॥ ६ ॥
टीका वार्तिकें शाखा पल्लव । प्रकरण ग्रंथांचें वैभव ।
हेंच सुमनांचें सौष्ठव । गंध दरवळला चहुंकडे ॥ ७ ॥
स्तोत्रवाङ्मयाचा थाट । फलसमृद्धीच कीं अफाट ।
आनंदरस घनदाट । भरला दिसें तया माजीं ॥ ८ ॥
म्हणती आचार्य बैस येथें । सार काढूनि निश्चितें ।
सेवी तूं स्वस्थ चित्तें । होई तृप्त निरंतर ॥ ९ ॥
स्वयें आपण तृप्त व्हावें । दुजियांहि तृप्त करावें ।
तेणें साम्राज्य बरवें । दिसेल कीं तृप्तीचें ॥ १० ॥
शांति तृप्ति समाधान । होईल धन्य जीवन ।
ऐसें या स्तोत्रांचें महिमान । स्वानुभवेंचि जाणावें ॥ ११ ॥
स्तोत्रवाङ्मयाचें चिंतन । करितां माताचि भेटली जाण ।
स्मित हास्यें करी वरदान । माता त्रिपुरसुंदरी ॥ १२ ॥
तिचा महिमा अपार । काय वर्णू मी पामर ।
शब्दराशी खरोखर । अपूर्णाचि भासे मजलागीं ॥ १३ ॥
वाणी तेथें मौनावली । कीं लेखनी कुंठित झाली ।
मति माझी विसरली । नेणें कांहीं तिळमात्र ॥ १४ ॥
देहभान हरपलें । चित्त चैतन्यामाजीं रमलें ।
मग तिनेंचि सावध केलें । स्वमहिमान वर्णावया ॥ १५ ॥
जगन्मातेच्या सान्निध्यांत । विश्वपिता असे विराजत ।
परम सदाशिवनामें विख्यात । पूर्ण ब्रह्म सनातन ॥ १६ ॥
एकरूप दिसती निश्चितीं । परी वर्णावया नाहीं शक्ति ।
वैभव तयांचें पहातां मतीं । द्वैतभाव हरपला ॥ १७ ॥
मग कवणें काय वर्णावें । काय कोणातें सांगावें ?
प्रतिपादन हें आघवें । जागींच ठेलें निश्चल ॥ १८ ॥

माता त्रिपुरसुंदरी । आणी व्युत्थानदशेमाझारीं ।
देई प्रकाश सत्वरी । वर्ण्यतत्त्व वर्णावया ॥ १९ ॥
यथामति झालें निरूपण । तेंचि सौंदर्यलहरी व्याख्यान ।
तिचेंचि हें पसायदान । अर्पिलें मी भक्तजनां ॥ २० ॥
जीवानन्द आमुची मूळ वल्ली । पांडुरंगरूपें फळा आली ।
निजानन्दामृतें भरली । स्थिरावली ती जनार्दनीं ॥ २१ ॥

ऋणनिर्देश

पुणें हें विद्येचें माहेरघर म्हटलें तर आमचें डेक्कन कॉलेज हें त्या माहेरघरांतील देवघर आहे. येथील नितान्त, शांत व रमणीय वातावरणांत विद्यादेवी ही मोठ्या गांभीर्यानें विराजत आहे. आमच्या डेक्कन कॉलेजची परंपरा फार उज्ज्वल आहे. लोकमान्य टिळकांसारख्या विश्वविख्यात विद्वान् मंडळींनीं या संस्थेस भूषविलेलें आहे. पेशव्यांच्या दक्षिणाफंडांतून सुमारें १८२२ मध्यें विश्रामबागवाड्यांत संस्कृत पाठशाळेची स्थापना झाली. पूना हायस्कूल पूना कॉलेज या रूपानें परिणत होत होत तीच पुढे डेक्कन कॉलेज या स्वरूपाला आली. चालू वर्ष हें डेक्कन कॉलेजचें शताब्दपूर्तीचें वर्ष आहे. डॉ. सुमित्र मंगेश कत्रेसाहेब डायरेक्टर, आणि डॉ. हसमुख धीरजमल सांकलियासाहेब जॉइंट डायरेक्टर, या उभयतांनीं माझें हें वाङ्मयपुष्प संस्थेस अर्पण करण्यास अनुमति दिली याबद्दल मी त्यांना हार्दिक धन्यवाद देत आहें. येथील ग्रंथालयाचा व विद्वान् मंडळींच्या साहचर्याचा मला फार मोठा उपयोग झाला.

श्रीवामनरावजी गुळवणी महाराज यांनीं तीनरंगी श्रीचक्र व श्रीदत्तयंत्र देऊन मला या कामीं आशीर्वादच दिला आहे. श्री. दादासाहेब आंबेकर यांचेहि आशीर्वाद आणि प्रोत्साहन अविस्मरणीय आहे. परमपूज्य श्रीमेहेरबाबा यांनीं तर आशीर्वादपूर्वक 'दी मास्टर्स प्रेयर' या नांवाचें परमेश्वराचें उपनिषदांतील शब्दाप्रमाणें अत्यंत गंभीर, प्रसन्न, अर्थपूर्ण व मधुर असलेलें स्तवन या ग्रंथांत समाविष्ट करण्याची अनुमति दिली. त्यांच्या ऋणाचें कोणत्या शब्दांनीं वर्णन करावें ?

केसरी-मराठा संस्थेचे विश्वस्त श्री. जयंतराव टिळक व श्री. भाऊसाहेब मोडक यांच्या औदार्याचें व आत्मीयतेचें अधिष्ठान नसतें तर सुबोधस्तोत्रसंग्रहाचे दोन्ही भाग अज्ञातवासांतच राहिले असते. या ग्रंथांना जनतेच्या हातीं

पोहोंचविण्याचें श्रेय त्यांनाच आहे. अक्षररचना कार्याचे प्रमुख श्री. भास्करराव कुलकर्णी यांचें अक्षररचनाकौशल्य व सुबक जुळवणी याबद्दल त्यांना हार्दिक धन्यवाद. मुद्रण विभागाचे व्यवस्थापक श्री. क. वि. पित्रे यांनीं आपल्या सौजन्यानें मला ऋणी करून ठेवलेलें आहे. नेर्लेकर बुकडेपोच्या मालकांनीं कागदाच्या अडचणीची कोंडी फोडून आमचे हें लोण कडेस पोहोंचविलें. त्यांना धन्यवाद. पाप्युलर बाइंडिंग वर्क्सचे मालक श्री. महादेवराव ताटके यांनीहि कागदाचा पुरवठा केला याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

राजा असावा तर तो असा असावा असा ज्यांच्याबद्दल निर्देश केल्यास तो अर्थपूर्ण होईल ते हिज् हायनेस श्रीमंत राजेसाहेब चिंतामणराव पटवर्धन हे डेक्कन कॉलेजचेच विद्यार्थी. हा ग्रंथ डेक्कन कॉलेज या संस्थेस अर्पण करण्याची विनंती त्यांनीं मान्य केली याबद्दल मी त्यांना हार्दिक धन्यवाद देत आहें व त्यांचें अभीष्ट चिंतीत आहें. या ग्रंथाबद्दल अथवा त्याच्यांतील अंशाबद्दलहि अधिकाराची अपेक्षा न ठेवतां या ग्रंथास अध्यात्मपरिषद्-ग्रंथमालेचें १४ वें पुष्प म्हणून मान्यता दिली याबद्दल सदरहू संस्थेचे संचालक श्री. ग. वि. तुळपुळे व श्री. विठ्ठलराव जोशी यांना धन्यवाद.

भारत सरकारच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनच्या महाराष्ट्र विभागाचे प्रमुख श्री. श्रीपादराव सप्रे, श्री. लक्ष्मणराव बर्वे आणि श्री. बाळासाहेब बर्वे मुंबई, यांनीं या कामीं आत्मीयतेनें केलेल्या साहाय्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. डेक्कन कॉलेजमधील आर्टिस्ट श्री. अनंतराव दळवी यांनीं आत्मीयतेनें रेखाचित्रें काढून डेक्कन कॉलेजमधील विद्वत्परंपरेचें व पुरातन वास्तूचें वाचकांस दर्शन घडविलें याबद्दल त्यांना धन्यवाद. तसेंच आर्टिस्ट दीक्षित, श्री. घोरपडे, श्री. केशवराव देशपांडे आणि चि. सुरेश्वर गोस्वामी यांनी चित्रें व यंत्रें काढून दिलीं याबद्दल त्यांनाहि धन्यवाद. ब्लॉकमेकर श्री. बळवंतराव दाते यांनाहि मी मनःपूर्वक धन्यवाद देत आहें. अडचार ग्रंथालयांतील कार्यकर्त्यांनीं केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांनाहि धन्यवाद देत आहें. डेक्कन कॉलेज ग्रंथालयाचे प्रमुख डॉ. व. भी. बेलसरे व केसरी ग्रंथशालेचे प्रमुख श्री. शं. ना. बर्वे यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांनाहि धन्यवाद. पुराणवस्तु-संशोधक श्री. श्रीनिवासराव सुपेकर यांनीं श्रीगोविंदयतींची गुहा व नर्मदेचे फोटो दिले याबद्दल त्यांना धन्यवाद.

मुखपृष्ठावरील आचार्य पंचायतनाचें चित्र कै. श्री. य. गो. जोशी यांनीं मृत्युपूर्वी दोनच दिवस अगोदर आठवण ठेवून दिलें याबद्दल त्यांना आदरपूर्वक श्रद्धांजलि. त्यांचे सुपुत्र श्री. बापूसाहेब जोशी यांनीं आवश्यक ते ब्लॉक देऊन आम्हांला साहाय्य केलें याबद्दल त्यांना धन्यवाद. 'योगासनें' पुस्तकाचे लेखक श्री. वसंतराव देवकुळे यांनीं आसनांचे ब्लॉक देऊन या कामीं साहाय्य केल्याबद्दल त्यांनाहि धन्यवाद.

माझे विद्यागुरु व अध्यात्मगुरु अनंतश्रीविभूषित स्वामी करपात्रीजी महाराज यांचा ऋणनिर्देश मी मौनभावानेंच करीत आहें. सौंदर्यलहरींतील प्रमेय-तत्त्वावर त्यांच्याकडूनच प्रकाश मिळाला. श्रीशंकराचार्य स्वामी योगेश्वरानंद यांनीं श्रीविद्येकडे माझें मन वळविलें याबद्दल मी त्यांचा पूर्ण ऋणी आहें. पं. शिवरामकृष्णशास्त्री, डेक्कन कॉलेज, पं. भालचंद्रशास्त्री, धारवाड, श्रीमार्कण्डेयजी काशी यांनीं केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतों. शेवटीं सर्व गुरुजन माता, पिता व मातामह पं. गंगारामदेव जोशी ज्योतिषाचार्य आणि परमात्मा यांचें पुण्यस्मरण करून हें हृद्गत मी पूर्ण करीत आहें.

— पांडुरंगशास्त्री गोरवानी

श्रीलोकमान्य टिळक प्रभृति
विश्वविख्यात विभूतींनी
आणि विद्वान् मंडळींनी
मंडित केलेल्या व असाधारण
उज्ज्वल परंपरेनें विराजत
असलेल्या डेक्कन कॉलेज
या संस्थेस शताब्दपूर्तीच्या
मंगलमय निमित्तानें हा ग्रंथ
अर्पण.

डेक्कन कॉलेजच्या उज्ज्वल परंपरेतील कांही थोर व्यक्ति



१. लोकमान्य टिळक



२. पूज्य मेहेरबाबा



३. प्रिं. डॉ. फ्रॅन्सिस किलहॉर्न



४. मेजर प्रिं. कँडी



५. प्रो. बेनसाहेब



६. श्री. कृष्णशास्त्री चिपळूणकर



७. श्री. विष्णुशास्त्री चिपळूणकर



८. केरूनाना छत्रे



९. ब्रह्मर्षि अण्णासाहेब पटवर्धन

डेक्कन कॉलेजच्या उज्ज्वल परंपरेतील कांही थोर व्यक्ति



१०. श्री. श्री. ग. जिन्सीवाले



११. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे



श्री. वै. का. राजवाडे



१३. गुरुवर्य रा. द. रानडे



१४. सेनापति बापट



१५. म. म. श्रीधरशास्त्री पाठक



१६. श्री. दादासाहेब खापर्डे



१७. डॉ. सु. मं. कत्रे



१८. डॉ. रा. गो. भांडारकर

डेक्कन कॉलेजच्या उज्ज्वल परंपरेतील कांही थोर व्यक्ति



१९. श्री. वा. शि. आपटे



२०. डॉ. सांकलिया



२१. प्रो. शि. म. परांजपे



२२. श्री. कृ. प. खाडिलकर



२३. श्री. न. चिं. केळकर



२४. श्री. गं. ना. मुजुमदार



डेक्कन कॉलेज (शके १८८६)

श्रीदत्तात्रेय



अवधूतं परं ब्रह्म संसारार्णवतारकम् ।
दत्तात्रेयमहं वन्दे भक्त्याऽऽनन्दविवर्धनम् ॥



श्रीवासुदेवानन्दसरस्वती यांच्या पूजापरंपरेतील श्रीदत्तात्रेय सिद्धियंत्र

श्रीगुरुदत्तात्रेयजपपद्धति

[ज्ञानास गुरूंची उपासना आवश्यक आहे म्हणून आम्ही गुरुदत्तात्रेय-त्र व मंत्रजपपद्धति खालीं देत आहोंत.]

आचमन, प्राणायाम आणि देशकाल-संकीर्तन झाल्यानंतर मम आत्मनः कलाभीष्टसिद्ध्यर्थं श्रीगुरुदत्तात्रेयदेवताप्रीत्यर्थं श्रीगुरुदत्तात्रेयमन्त्रजपाख्यं र्म करिष्ये। अस्य श्रीगुरुदत्तात्रेयमन्त्रस्य सदाशिव ऋषिः गायत्री छन्दः। ीगुरुदत्तात्रेयो देवता। मम अभीष्टसिद्ध्यर्थं जपे विनियोगः। सदाशिवऋषये मः शिरसि। गायत्रीच्छन्दसे नमो मुखे श्रीगुरुदत्तात्रेयदेवतायै नमो हृदये। भीष्टसिद्ध्यर्थं जपे विनियोगाय नमः सर्वाङ्गेषु। ॐ द्रां अङ्गुष्ठाभ्यां नमः ॐ द्रीं तर्जनीभ्यां नमः याप्रमाणें सहा अक्षरांनीं करन्यास आणि षडङ्गन्यास रावेत. अथ ध्यानम् – " मालाकमण्डलुरधःकरपद्मयुग्मे मध्यस्थपाणियुगले मरुत्रिशूले। यस्य स्त ऊर्ध्वकरयोः शुभशङ्खचक्रे वन्दे तमत्रिवरदं भुजषट्क-युक्तम् ॥ " नमस्कार करावा. मां माले या मंत्रानें मालेचें प्रोक्षण करावें. मालेला मस्कार करून " द्रां दत्तात्रेयाय नमः " या मंत्राचा जप करावा. त्वं माले या त्रानें माला मस्तकीं ठेवून नमस्कार करावा आणि मंत्रजपाचें निवेदन करावें. अनेन न्त्रजपाख्येन कर्मणा भगवान् श्रीगुरुदत्तात्रेयस्वरूपी परमेश्वरः प्रीयतां न मम ॥

■ ■ ■

अजपाजपपद्धति

मानसिक स्नान : इडा भगवती गङ्गा पिङ्गला यमुना नदी। तयोर्मध्यगता ाडी सुषुम्णाख्या सरस्वती ॥ ध्यानह्रदे ज्ञानजले रागद्वेषमलापहे। यः स्नाति मानसे ीर्थे स वै मुक्तो न संशयः ॥ सूर्योदयात्पूर्वमाचम्य, गतदिनसूर्योदयमारभ्य अद्य सूर्योदयपर्यन्तं जाग्रत्स्वप्नसुषुप्त्याद्यवस्थासु श्वासोच्छ्वासरूपेण संजात-षट्शताधि-कैकविंशति-सहस्रसङ्ख्याकाजपाजपं मूलाधारादिचक्रस्थ-गणपत्यादिस्वरूपिपरमे-श्वराय निवेदयामि। पुनराचम्य। अद्य सूर्योदयमारभ्य श्वः सूर्योदयपर्यन्तं जाग्रत्स्वप्न-सुषुप्त्याद्यवस्थासु श्वासोच्छ्वासरूपेण जायमान-षट् शताधिकैकविंशतिसहस्र-सङ्ख्याकाजपाजपं मूलाधारादिचक्रस्थ-गणपत्यादिरूपि-परमेश्वरोद्देशेन करिष्ये।

अस्य श्रीअजपामन्त्रस्य ब्रह्मा ऋषिः। अव्यक्तगायत्री छन्दः। परमात्मा देवता। हं बीजं सः शक्तिः हंसः सोहं कीलकम्। परमेश्वरप्रीत्यर्थे जपे विनियोगः। ॐ हं सां गणेशाय अङ्गुष्ठाभ्यां नमः। ॐ हं सीं ब्रह्मणे तर्जनीभ्यां नमः। ॐ हं सूं विष्णवे मध्यमाभ्यां नमः। ॐ हं सैं शंभवे अनामिकाभ्यां नमः। ॐ हं सौं जीवात्मने कनिष्ठिकाभ्यां नमः। ॐ हं सः परमात्मने करतलकरपृष्ठाभ्यां नमः। ॐ हं सां गणेशाय हृदयाय नमः। ॐ हं सीं ब्रह्मणे शिरसे स्वाहा। ॐ हं सूं विष्णवे शिखायै वषट्। ॐ हं सैं कवचाय हुं। ॐ हं सौं नेत्रत्रयाय वौषट्। ॐ हं सः अस्त्राय फट्। अथ ध्यानम्। गमागमस्थं गमनादिशून्यं चिद्दीपदीपं तिमिरान्धनाशम्। पश्यामि तं सर्वजनान्तरस्थं नमामि हंसं परमात्मसंज्ञम्॥ आधारे लिङ्गनाभौ प्रकटितहृदये तालुमूले ललाटे द्वेपत्रे षोडशारे द्विदशदशदले द्वादशार्धे चतुष्के। वासान्ते बालमध्ये डफकठसहिते कन्ठदेशे स्वराणां हंक्षं तत्त्वार्थयुक्तं सकलदलगतं वर्णरूपं नमामि॥ ॐ परमात्मने नमः लं पृथिव्यात्मकं गन्धं परिकल्पयामि। यं वाय्वात्मकं धूपं परिकल्पयामि। रं वह्न्यात्मकं दीपं परिकल्पयामि। वं अमृतात्मकं नैवेद्यं परिकल्पयामि। सं सर्वात्मकसर्वशेषोपचारान्परिकल्पयामि। नमस्कारं करोमि। षट् शतं गणनाथाय ब्रह्मणे षट्—सहस्रकम्! विष्णवे षट्सहस्रं च षट्सहस्रं च शम्भवे॥ जीवात्मने सहस्रं च सहस्रं गुरवे तथा। परमात्मने सहस्रं च जपसङ्ख्या निवेदये॥ शान्त चित्तानें सोऽहं सोऽहं असा जप करावा. तो श्वासोच्छ्वासांच्या बरोबरच करावा. श्वास घेतांना सो व सोडताना हं अशी भावना करावी. याच जपांत प्रणवाचाहि जप केल्याचें श्रेय पदरांत पडतें. "हंसः सोहं" असाहि अजपागायत्रीमन्त्राचा आकार कांहीं पोथ्यांतून दिलेला आढळतो. गुरुसंप्रदायाप्रमाणें इष्ट तें करावें. एकवीस वेळां अथवा यथाशक्ति अधिक जप करून देवास नमस्कार करावा व मग इतर व्यवहाराला लागावें. (श्रीवासुदेवानन्द सरस्वतीस्वामी).

■ ■ ■

अर्पणपत्रिकेंतील डेक्कन कॉलेजच्या व्यक्तिविशेषांचा परिचय

(१) **लोकमान्य टिळक** :— डे. कॉलेजचे विद्यार्थी. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे" या मंत्राचे द्रष्टे, राष्ट्रनेत्यांचेहि नेते. डेक्कन एज्युकेशन सोसायटी, केसरी-मराठा इत्यादि संस्थांचें संस्थापक. संपादक व लेखक. ब्रह्मसूत्र-

वृत्ति, गीतारहस्य, ओरायन, दी आर्क्टिक होम इन् दी वेदाज् इत्यादि अनेक ग्रंथांचे लेखक. असामान्य व अलौकिक पुरुष. (२) **पूज्य मेहेरबाबा** :– डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी. विश्वविख्यात अलौकिक विभूति. ४० वर्षे मौनव्रत. जगभर भक्तवर्ग. जणुं कांहीं मूर्तिमंत अद्वैततत्त्व. गॉड् – स्पीक्ससारख्या उत्कृष्ट ग्रंथाचे लेखक. (३) **प्रिन्सिपाल डॉ. फ्रॅन्झ कीलहॉर्न** :– प्रसिद्ध जर्मन संस्कृत पंडित. भाष्यविद्यानिष्णात. ऋग्वेदाचे व्यासंगी. शान्तनवाचार्यकृत फिट्सूत्रें नांवाचा व्याकरण-ग्रंथ यांनीं प्रसिद्ध केला. पातंजल महाभाष्यहि प्रसिद्ध केलें. परिभाषेंदुशेखराचें इंग्रजी भाषांतर केलें. चेदिसंवतचें आरंभस्थान यांनींच शोधून काढलें. अनेक ग्रंथांचें लेखन केलें. (४) **मेजर प्रिन्सिपॉल कँडी** :– मराठीचे गाढ व्यासंगी, मराठीवर असाधारण प्रभुत्व, अनेक इंग्रजी ग्रंथांचीं मराठींत भाषांतरें केलीं. प्रचंड मराठी-इंग्रजी व इंग्रजी-मराठी शब्दकोशांची रचना. मराठींत व्याकरणावर स्वतंत्र ग्रंथरचना. कायदा व हिंदुस्थानचा भूगोल यावर ग्रंथरचना. ५० वर्षें मराठी भाषेची व वाङ्मयाची सेवा करून कँडींनीं आपलें नांव चिरस्मरणीय केलेलें आहे. (५) **प्रो. बेनसाहेब** :– हे अत्यंत हुशार, व्यासंगी व बाणेदार म्हणून ओळखले जात. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीचे प्रथमश्रेणींतील एम्. ए. इतिहास आणि तत्त्वज्ञान हा यांचा आवडता विषय. यांवर त्यांनीं अनेक ग्रंथ लिहिलेले आहेत. कादंबऱ्याहि लिहिल्या आहेत. डॉ. के. एम्. मुतालिक यांनीं पीएच्. डी.करितां प्रो. बेन हाच विषय घेतला व तो निबंध मुंबई विद्यापीठानें मान्यहि केला यावरून यांचें महत्त्व लक्षांत येतें. क्रांतिकारक विद्यार्थ्यांचे पाठीराखे. गणपतिभक्त. (६) **श्रीकृष्णशास्त्री चिपळूणकर** :– अलंकार, न्याय व धर्मशास्त्र या विषयांचा खोल अभ्यास. इंग्रजीचाहि उत्तम अभ्यास. पूना कॉलेजचे असिस्टंट प्रोफेसर. पूना ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल. संस्कृत, इंग्रजी, अरबी इत्यादि भाषेंतील ग्रंथांचे सुरस भाषांतरकार. अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी, साक्रेटिसाचें चरित्र, रासेलस इत्यादि ग्रंथांचे लेखक. (७) **श्रीविष्णुशास्त्री चिपळूणकर** :– मराठींतील युगप्रवर्तक लेखक. यांना मराठी भाषेचे शिवाजी असें म्हणतात. डेक्कन कॉलेजचे बी. ए., पूना हायस्कूलचे शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूलचे संस्थापक. चित्रशाळा व काव्येतिहाससंग्रहाचे जनक. 'केसरी' व 'मराठा'चे लेखक आणि आर्यभूषण प्रेसचे निर्माते. (८) **श्री. केरूनाना छत्रे** :– गणित व सृष्टिशास्त्र यांवर असामान्य अधिकार. कुलाब्याच्या वेधशाळेंतील कार्यकर्ते. पुणें येथील ट्रेनिंग

कॉलेज, डेक्कन कॉलेज व इंजिनियरिंग कॉलेज यांमध्यें प्राध्यापकाचें काम केलें. ग्रहसाधनाचीं कोष्टकें, तिथिचिंतामणि इत्यादि ग्रंथांचे लेखक. (९) **ब्रह्मर्षि अण्णासाहेब पटवर्धन**:—डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी. बी. ए. नंतर मेडिकल कॉलेजमध्यें व लॉ-क्लासमध्ये अध्ययन. आयुर्वेदावर विशेष अधिकार. किरण व डेक्कन स्टार हीं मराठी व इंग्रजी पत्रें काढावयास महादेवराव नामजोशी यांना प्रवृत्त केलें. हींच पत्रें पुढें केसरी व मराठा या पत्रांत रूपांतरित झालीं. हे गरिबांचे वाली. क्रांतिवीरांचे पाठीराखे व आळंदी येथील श्रीनृसिंहसरस्वती स्वामींचे शिष्य होते. निजामाकडून वऱ्हाड विकत घ्यावा, स्वतंत्र राज्य स्थापावें व तेथून भारत स्वतंत्र करावा ही महत्त्वाकांक्षा! (१०) **श्री. श्री. ग. जिन्सीवाले**:—डेक्कन कॉलेजमधून एम्. ए. झाले. सुप्रसिद्ध पंडित, नामांकित वक्ते, कर्मनिष्ठ प्राध्यापक. करारीपणा, सत्यप्रीति, स्वाभिमान, स्वधर्म व ज्वलंत देशभक्ति, अल्पसंतोष व मानधनता हे यांचे विशेष गुण होत. (११) इतिहासाचार्य **वि. का. राजवाडे**:—प्रसिद्ध इतिहाससंशोधक, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें या संस्थेचे संस्थापक. "मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें" २२ खंड प्रसिद्ध केले. इंग्रजीतील ज्ञान मराठींत आणण्याकरितां "भाषांतर" मासिकाचें संपादन. संस्कृत भाषेचा ज्वलंत अभिमान. (१२) **श्री. वे. का. राजवाडे**:—डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी. इंग्रजी व संस्कृत भाषेवर असाधारण प्रभुत्व. व्युत्पत्तिशास्त्राची आवड. वैदिक शब्दांचें ऐतिहासिक संशोधन. निरुक्ताचें मराठी व इंग्रजी भाषांतर केलें. दुर्गाचार्यकृत निरुक्त—विवृतीचें संपादन केलें. (१३) **गुरु. रा. द. रानडे**:—जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति, भाऊदाजी पारितोषिक, चॅन्सेलर मेडल यांचे विजेते. फर्ग्युसन कॉलेज व विलिंग्डन कॉलेजचे प्राध्यापक. "Constructive Survey of Upanishadic Philosophy" या सुप्रसिद्ध ग्रंथाचे लेखक. अलाहाबाद विद्यापीठांत तत्त्वज्ञानाचे प्रमुख प्राध्यापक. डीन ऑफ दि फॅकल्टि ऑफ् आर्टस् व शेवटीं उपकुलगुरु अशी उत्कर्षाची परंपरा. संतवाङ्मयाचा गाढ अभ्यास. अनेक ग्रंथांचें लेखन. (१४) **सेनापति बापट**:—प्रो. वेनसाहेबांचे आवडते विद्यार्थी. सुप्रसिद्ध क्रांतिकारक. क्रांतीच्या साधनांचे निर्माते. माणिकतोळा बाँब-प्रकरणाचें अधिष्ठान. चित्रशाळा, केसरी, ज्ञानकोश यांचे कार्यकर्ते. ज्वलंत देशाभिमान. मुळशी सत्याग्रहाचे सेनापति, गोवामुक्ति संग्रामांतहि भाग. (१५) **म. म. श्रीधरशास्त्री पाठक**:—प्रसिद्ध संस्कृत पंडित. व्याकरण, वेदान्त, धर्मशास्त्र वगैरे विषयांवर यांचें चांगलें प्रभुत्व होतें. ईश, केन, कठ, मुंडक

इत्यादि उपनिषदांवर यांची बालबोधिनी टीका प्रसिद्ध आहे महाभाष्य शब्दकोष, शुक्लयजुर्वेदाचें मराठी भाषांतर इत्यादि ग्रंथांचे लेखक. डेक्कन कॉलेजचे शास्त्री. (१६) **श्री. दादासाहेब खापर्डे** :— यांना लोक वऱ्हाडाचे नबाब म्हणून ओळखत असत. इंग्रजी, मराठी, संस्कृत, गुजराथी इत्यादि अनेक भाषांवर असाधारण प्रभुत्व. असामान्य वकील. अत्यंत उदार व लोकप्रिय. लोकमान्य टिळकांचे एकनिष्ठ भक्त. असाधारण कार्यकर्ते व देशभक्त. स्वतःला डेक्कन कॉलेजचा लाभ घेतां आला नाहीं तरी थोरल्या चिरंजीवांना (श्रीबाबासाहेब) डेक्कन कॉलेजमध्यें शिक्षण देऊन कॉलेजवरील आपला स्नेह प्रकट केला. (१७) **डॉ. सु. मं. कत्रे** :— एम्. ए., पीएच्. डी., लंडन. १९४२ पासून डेक्कन कॉलेजच्या कार्याची धुरा स्वीकारली. भारतांतील भाषाशास्त्राचें पुनरुज्जीवन केलें. १८ भाषांचा अभ्यास केला. भाषा-शास्त्र विभागाचे आधार. संस्कृत कोष विभागाचे संस्थापक. ऐतिहासिक तत्त्वांवर आधारलेला हा संस्कृत इनटु इंग्लिश कोष जगांतील कोणत्याहि कोषापेक्षां आकृतीनें व प्रकृतीनें श्रेष्ठ ठरेल. भाषेच्या व भाषाशास्त्राच्या अध्ययनाचें तो एक उत्कृष्ट साधन ठरेल. या सर्व कल्पनांचें व कार्याचें श्रेय सर्वस्वी डॉ. कत्रे यांनाच द्यावें लागेल. डॉ. कत्रे हे अत्यंत सात्विक व मूर्तिमंत सौजन्यच होत. यांनीं भाषाशास्त्रविषयक अनेक ग्रंथ लिहिलेले आहेत. (१८) **डॉ. रा. गो. भांडारकर** :— आन्तर-राष्ट्रीय कीर्तीचे संस्कृत पंडित. प्राच्यविद्यासंशोधक. डेक्कनकॉलेजचे प्राध्यापक. यांचें पातंजलमहाभाष्य, जैनवाङ्मय व विविधतत्त्वज्ञानावरील संशोधन प्रसिद्ध आहे. पुण्यांतील भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिटचूट यांच्याच नांवानें स्थापन झालेली आहे. (१९) **श्री. वामन शिवराम आपटे** :— अत्यंत बुद्धिमान्, विद्वान्, त्यागी व शिस्तीचे भोक्ते. पुणें न्यू इंग्लिश स्कूलचे सुपरिंटेंडेंट. फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल. संस्कृत भाषेचे गाढ व्यासंगी. यांच्या संस्कृत कोषाचे तीन भाग प्रसिद्धच आहेत. संस्कृत शिक्षणोपयोगी अनेक पुस्तकांचे लेखक. (२०) **डॉ. हसमुख धीरजलाल सांकलिया** :— अत्यंत बुद्धिमान्. डेक्कन कॉलेजचे एक आधारस्तंभ. पुराणवस्तुसंशोधन शास्त्रांतील महर्षि. युनिव्हर्सिटी ऑफ नालंदा, प्रागैतिहासिक व प्राचीन गुजराथचा इतिहास, इंडियन आर्किऑलॉजी टु डे, अश्वयुगांतील हत्यारें इत्यादि अनेक विश्वमान्य ग्रंथांचे लेखक. अद्वैत तत्त्वाचे भोक्ते. यांच्या निवासस्थानाचें नांवहि 'सच्चिदानन्द' असेंच आहे. (२१) **प्रो. शिवराम महादेव परांजपे** :— जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति, झालावेदान्त प्राईझ,

भगवानदास प्राईझ इत्यादिकांचे मानकरी. मराठींतील प्रतिभाशाली लेखक आणि वक्ते. 'काळ' आणि 'स्वराज्य' यांचे जनक व संपादक. न्यायमीमांसादि दर्शनशास्त्रांचे व्यासंगी. नाटकें, कादंबऱ्या व अनेक निबंधांचे लेखक. अन्योक्ति व खोचकपणा फार. जन्मानें महाडचें व गुणांनीं महाराष्ट्राचें भूषण. (२२) **श्री. कृ. प्र. खाडिलकर** :— डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी. केसरी, मराठा, लोकमान्य आणि नवाकाळ यांचे संपादक. गद्य रंगभूमीचे प्रस्थापक. वैदिकवाङ्मयाचे अभ्यासक. मानापमान, भाऊबंदकी, कीचकवध इत्यादि चौदा नाटकांचे व अनेक ग्रंथांचे लेखक. (२३) **श्री. न. चिं. केळकर** :— कांहीं काळ डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी. साहित्यसम्राट्. केसरी व मराठाचे संपादक. केसरी संस्थेचे आधारस्तंभ. लोकमान्यांचे उजवे हात. थोर मुत्सद्दी. मोठे लेखक. १२०४ सभांचे अध्यक्ष. विविध विषयांवरील यांचे ग्रंथ व लेख 'समग्र केळकर वाङ्मय' या नांवानें १२ खंडांत प्रसिद्ध आहे. (२४) **श्री. गं. ना. ऊर्फ आबासाहेब मुजुमदार** :— पहिल्या श्रेणीतील सरदार. डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी. १०५ सार्वजनिक संस्थांशीं संलग्न. अनेक देवस्थानचे अन्वर्थ विश्वस्त. भारत इतिहास संशोधक मंडळाचे कार्यवाह, कोषाध्यक्ष इत्यादि नात्यानें ५५ वर्षें कार्यकर्ते. फारशी-इंग्रजी पत्रव्यवहार. मोरया गोसावी-चिंचवड संस्थानचा इतिहास या ग्रंथांचे लेखक. संगीत व वाद्यकलांचे मर्मज्ञ विद्वान्.

■ ■ ■

अध्यात्मविद्यामंदिराचे दोन शब्द

ईश्वरप्राप्ति हेंच मनुष्याचें उच्चतम ध्येय आहे. त्यांतच त्याच्या जीवनाची कृतार्थता आहे. प्रपंच व परमार्थ या दोहोंनाहि तें उपकारक आहे. अभ्युदय व निश्रेयस यांची प्राप्ति ईश्वराच्या भक्तीनें होते असें सर्व धर्म, पुरातन ऋषि व आधुनिक संत सांगत आले आहेत. भक्ति आणि तत्त्वज्ञान हेंच व्यक्तीच्या व समाजाच्या सद्भावना जागृत करण्याचें उत्तम साधन होय. असें आजहि तत्त्वज्ञानी व सामाजिक कार्यकर्ते मानीत आहेत व त्याप्रमाणें प्रयत्नहि करीत आहेत. श्रीमंत राजेसाहेब, सांगली यांची परमार्थावरील भक्ति, समाजांतील सद्भावना वाढाव्या याबद्दलची तळमळ सर्वश्रुतच आहे. सन १९४७ सालीं त्यांनी उदार देणगी देऊन अध्यात्म-विद्यामंदिर ही संस्था स्थापन केली. त्याचाच एक भाग म्हणून सांगलीस नव्या मुरलीधराच्या मंदिरांत दर बुधवारीं प्रवचनें होत असतात. या शाखेस 'अध्यात्म परिषद्' असें नांव देण्यांत आलें आहे. स्त्री व पुरुष मिळून श्रोतृवर्ग सुमारें ४०० पर्यंत असतो. श्रीमंत राजेसाहेब यांच्या इच्छेवरून यांतील महत्त्वाचीं प्रवचनें पुस्तकरूपानें प्रकाशित होत असतात. त्यांतील हें अध्यात्मविद्यामंदिराचें १४ वें प्रकाशन होय.

म. म. न्यायाचार्य पं. पांडुरंगशास्त्री गास्वामी यांचीं १९६१ मध्यें आचार्यांच्या स्तोत्रवाङ्मयावर दहाबारा प्रवचनें झालीं. फूल नाहीं फुलाची पाकळी म्हणून संस्थेनें ३०० रुपये देऊन शास्त्रीबुवांची संभावना केली. शास्त्रीबुवांनीं या संस्थेचें नववें पुष्प म्हणून श्रीशंकराचार्यकृत सुबोधस्तोत्रसंग्रह, भाग १ ला प्रकाशित केला. 'ही संस्था मी माझी समजतों' अशा आत्मीय भावनेनें या संस्थेचें १४ वें पुष्प म्हणून आज शास्त्रीबुवा या दुसऱ्या भागाचें प्रकाशन करीत आहेत. या वेळेला संस्थेला त्यांची कांहीच संभवना करतां आली नाहीं. तथापि त्यांनीं आत्मीयतेनें हें कार्य केलें. संस्था त्यांची ऋणी आहे. शास्त्रीबुवांच्या जीवन-चरित्राचा अल्प परिचय त्यांनीं लिहिलेल्या 'योगवासिष्ठाचें हृद्गत' या पुस्तकांत मीं दिलाच आहे. शास्त्रीबुवांनीं आपल्या भाष्यासह हा ग्रंथ मराठी वाचकांना सादर केला याबद्दल त्यांना अनेकशः धन्यवाद.

विठ्ठल कृष्ण जोशी,
कार्यवाह, अध्यात्मपरिषद्

The Master's Prayer

O PARVARDIGAR, the Preserver and Protector of All,
You are without Beginning and without End;
Non-dual, beyond Comparison; and none can measure You.
You are without color, without expression,
without form and without attributes.
You are unlimited and unfathomable, beyond imagination
and conception; eternal and imperishable.
You are indivisible; and none can see you, but with eyes Divine.
You always were, You always are, and You always will be;
You are everywhere, You are in everything;
and You are also beyond everywhere and beyond everything.
You are in the firmament and in the depths,
You are manifest and unmanifest; on all
planes and beyond all planes.
You are in the three worlds, and also beyond the three worlds;
You are imperceptible and independent.
You are the Creator, the Lord of Lords,
the Knower of all minds and hearts; You
are Omnipotent and Omnipresent.
You are Knowledge Infinite, Power Infinite, and Bliss Infinite.
You are the Ocean of Knowledge, All-Knowing,
infinitely-Knowing; the Knower of the
past, the present and the future, and
You are Knowledge itself.
You are All-merciful and eternally benevolent;
You are the Soul of souls, the One with infinite attributes;
You are the Trinity of Truth, Knowledge, and Bliss;
You are the Source of Truth, the Ocean of Love.
You are the Ancient One, the Highest of the High;
You are Prabhu and Parameshwar;
You are the Beyond-God and
Beyond-Beyond-God also;
You are Parabrahma; Allah; Elahi; Yezdan;
Ahuramazda; and God the Beloved.
You are named Ezad : i. e. the only One worthy of worship.

- Meher Baba

श्रीशंकराचार्यकृत

सुबोधस्तोत्रसंग्रह

(भाग दुसरा)

॥ श्रीमन्महागणाधिपतये नमः ॥



श्रीगणेशभुजङ्गस्तोत्रम् ।

[कोणत्याहि मंगल कार्याला आरंभ करतांना मंगलमूर्ति श्रीगजाननाचें मंगलमय स्मरण करणें ही सज्जनांची परंपरागत पद्धति आहे. कारण तो विघ्नहर्ता आहे. तो विघ्नराजहि आहे. तो आपल्या सामर्थ्यानें विघ्नांना प्रेरणाहि देऊं शकतो व विघ्नांचें दमन आणि शमनहि करूं शकतो. ब्रह्मदेवानेंहि विश्वरचनेच्या आरंभीं श्रीगजाननाचें ध्यान केलेलें होतें. शंकरानें त्रिपुरासुराचा व पार्वतीनें महिषासुराचा वध करतांना गणपतीचें ध्यान केलेलेंच होतें. केवळ आरंभिलेलें कार्य निर्विघ्नपणें कडेस जावें याच हेतूनें गणपतीचें ध्यान करावयाचें नसून भुक्ति आणि मुक्तीहि गणेशापासून आपल्याला मिळवावयाची असते. कारण तो भुक्तिमुक्तीचा नायक आहे. तो शारदेचाहि अधिपति असल्यामुळें आपली बुद्धि विद्येच्या क्षेत्रांत विशारद होण्यासाठीं आपण त्याचें ध्यान करणें आवश्यक आहे.

रात्रीची विश्रांति पूर्ण होऊन आपण जागे झालों कीं, सामान्यतः त्याच क्षणीं आपल्या दैनंदिन जीवनव्यवहाराला आरंभ होत असतो. हा व्यवहार प्रथम मानसिक स्वरूपांतच असतो. त्यानंतर मनःसंकल्पांना अनुलक्षून शरिराच्या हालचाली अथवा शारीरिक व्यवहार सुरू होत असतात. आपले मानसिक संकल्प

शुद्ध स्वरूपाचे असावेत व संकल्पिलेलीं कार्यें निर्विघ्नपणें पार पडावींत म्हणून आपण रोज पहांटेच उठल्याबरोबर विघ्नहर्त्या श्रीगजाननाचें स्मरण करावें. तो जसा विघ्नहर्ता आहे तसाच बुद्धिदाताहि पण आहे. वाचकांच्या सोईसाठी आम्ही प्रथम श्रीगजाननाचें सार्थ प्रातःस्मरण स्तोत्र देऊन नंतरच भगवत्पूज्यपाद आचार्य यांच्या गणेशभुजंगप्रयात या स्तोत्रानें प्रस्तुत ग्रंथाला आरंभ करीत आहोंत.

प्रातः स्मरामि गणनाथमनाथबन्धुं
सिन्दूरपूरपरिशोभितगण्डयुग्मम् ।
उद्दण्डविघ्नपरिखण्डनचण्डदण्ड-
माखण्डलादिसुरनायकवृन्दवन्द्यम् ॥ १ ॥

मी प्रातःकाळच्या वेळीं अनाथांचे बंधु म्हणजे हितकर्ते अनाथांचे नाथ असे जे गणनाथ म्हणजे सर्व विघ्नांच्या गणांचे अथवा जीवसमूहाचे अधिपति श्रीगणेश भगवान् त्यांचें स्मरण करीत आहें. ज्यांचीं दोन्ही गंडस्थलें भरपूर शेंदूर लावल्यामुळें अत्यंत उत्तम शोभत आहेत. उद्दण्ड-उच्छृंखल अशा विघ्नांचें खंडण करणारे जणुं कांहीं ते मूर्तिमंत प्रचंड दंडच आहेत. देवराज इंद्र आणि इतरहि मोठमोठ्या देवांचे समुदाय त्यांच्या चरणीं आदरानें वंदन करीत आहेत. त्यांचें मी या मंगलमय प्रभातकाळीं स्मरण करीत आहें.

प्रातर्नमामि चतुराननवन्द्यमान-
मिच्छानुकूलमखिलं च वरं ददानम् ।
तुं तुन्दिलं द्विरसनाधिपयज्ञसूत्रं
पुत्रं विलासचतुरं शिवयोः शिवाय ॥ २ ॥

ब्रह्मदेवहि ज्यांच्या चरणीं वंदन करीत आहेत. जे भक्तजनांना त्यांच्या त्यांच्या इच्छेप्रमाणें संपूर्ण अनुकूल वर देण्यांत तत्पर आहेत. ज्यांची मूर्ति 'तुन्दिल' म्हणजे पुष्ट आणि गुटगुटीत दिसत आहे. 'द्विरसनाधिप' म्हणजे नागराज, द्विरसन म्हणजे दोन जिभा असलेलें प्राणी—सर्प त्यांचा अधिप म्हणजे राजा अर्थात् नागराज हाच ज्यांचें यज्ञोपवीत आहे. शिव म्हणजे शंकर आणि शिवा म्हणजे पार्वती यांच्या उदरीं ज्यांनीं पुत्ररूपानें अवतार घेतला असून जे भक्तजनांना रमविण्याकरितां चतुर व भक्तांच्या कल्याणाकरितां विविध लीला

करण्यामध्यें अत्यंत निष्णात आहेत. अशा ह्या भगवान् श्रीगणेशाच्या चरणारविंदीं मी प्रातःकाळीं भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहें.

प्रातर्भजाम्यभयदं खलु भक्तशोक-
दावानलं गणविभुं वरकुञ्जरास्यम् ।
अज्ञानकाननविनाशनहव्यवाह-
मुत्साहवर्धनमहं सुतमीश्वरस्य ॥ ३ ॥

अनन्यभावानें शरण आलेल्यांना जे अभयदान करतात, भक्तजनांच्या शोक, दुःख आणि दैन्यरूपी अरण्याला जे दावानलाप्रमाणें – वणव्याप्रमाणें भस्म करून टाकतात, जे सर्व गणांचे विभु म्हणजे स्वामी आहेत, एखाद्या देखण्या हत्तीसारखें ज्यांचे मुख अत्यंत सुंदर दिसत आहे, अज्ञानरूपी अरण्याचा नाशकरण्याकरितां जे मूर्तिमान् अग्नीच आहेत, ज्यांच्याकडे पाहिलें असतांना अत्यंत आनंद वाटतो अथवा भक्तजनांच्या उत्साहशक्तीला जे वाढवितात अशा त्या पार्वतीपरमेश्वराच्या पुत्राला – श्रीगणेशदेवाला मी प्रातःकाळीं भक्तियुक्त अन्तःकरणानें भजत आहें.

श्लोकत्रयमिदं पुण्यं सदा साम्राज्यदायकम् ।
प्रातरुत्थाय सततं यः पठेत्प्रयतः पुमान् ॥ ४ ॥

हे तीन श्लोक अत्यंत पुण्यकारक आहेत. पहांटेच उठून एकाग्र अन्तःकरणानें जो कोणी या तीन श्लोकांचें सतत पठण करील त्याला श्रीगणेशाच्या कृपेनें स्वानन्दसाम्राज्यसौख्याचा लाभ होईल.

आचार्यांचेंहि हें खालीं दिलेलें श्रीगणेशभुजंगस्तोत्र अत्यंत मनोरम असून तें फार प्रभावी आहे. याहि स्तोत्राचा पाठ पहांटेच करावयाचा आहे. या स्तोत्राच्या पाठानें भक्त श्रीगणपतीच्या कृपेला पात्र होऊन त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होतील असे आचार्यांचें आश्वासन आहे. या स्तोत्राच्या पाठानें वाचासिद्धीहि प्राप्त होते.

आचार्यांनीं या स्तोत्रांत श्रीगजाननाचें सगुण आणि निर्गुण स्वरूपहि मोठ्या प्रसन्न शब्दांनीं वर्णन केलेलें आहे. 'भवध्वंसहेतुं', 'कृपाकोमल' हीं आचार्यांनीं गणपतीला दिलेलीं विशेषणें मोठीं मार्मिक आहेत. तत्त्वज्ञानाशिवाय सांसारिक दुःखांचा पूर्णपणें निरास होत नसतो. तत्त्वज्ञानाचा लाभ श्रीगजाननाच्याच कृपेनें व्हावयाचा असतो, म्हणून त्याला 'भवध्वंसहेतु' असें म्हटलें आहे. 'कृपाकोमल' या विशेषणानें गणपतीचा स्वभाव व्यक्त केला आहे. पहिल्या सहा श्लोकांत

गणपतीच्या सगुण स्वरूपाचें सुंदर वर्णन करून सातव्या व आठव्या श्लोकांनीं श्रीगणपतीच्या निर्गुण स्वरूपाची ओळख करून दिलेली आहे. गणपतीचें सगुण व निर्गुण स्वरूप चित्तामध्यें ठेवून हें स्तोत्र रोज म्हणावें. या श्लोकांचें वृत्त भुजंगप्रयात असल्यामुळें याला गणेशभुजंगस्तोत्र असें नांव दिलें आहे.]

* * *

श्रीगणेशभुजङ्गस्तोत्रम् ।

रणत्क्षुद्रघण्टानिनादाभिरामं
चलत्ताण्डवोद्दण्डवत्पद्मतालम् ।
लसत्तुन्दिलाङ्गोपरिव्यालहारं
गणाधीशमीशानसूनुं तमीडे ॥ १ ॥

रुणु झुणु रुणु झुणु आवाज करणाऱ्या घुंगरांच्या मंजुळ नादानें इकडे तिकडे धांवत फिरत असतां ज्याची मूर्ति मोठी रमणीय दिसत आहे. पद्मतालावर ज्याचें तांडव नृत्य सुरू झालें असतां त्या नृत्याला मर्यादा रहात नाहीं. त्रिताल, चौताल, झप्ताल असे प्रचलित कालांत तालांचे जसे अनेक प्रकार आहेत तसेच प्राचीन काळीं तालांचे आदिताल, ब्रह्मताल, विष्णुताल, रुद्रताल, गणेशताल इत्यादि अनेक प्रकार होते त्यांतच पद्मताल हाहि एक ताल आहे. तो गणेशाला तांडवनृत्याच्या वेळीं फार प्रिय आहे. नृत्य आणि ताल यांचा अत्यंत निकट संबंध आहे. तालावांचून केलें जाणारें नृत्य हें मंत्रावांचून दिल्या जाणाऱ्या आहुतीप्रमाणें व्यर्थ होय. श्रीगजाननाच्या रमणीय आणि तुंदिल म्हणजे गुबगुबीत शरीरावर नागराज हा हाराप्रमाणें शोभत आहे, त्या शिवशंकराच्या तनयाची श्रीगणाधीशाची मी भक्तिपूर्वक स्तुति करीत आहें.

ध्वनिध्वंसवीणालयोल्लासिवक्त्रं
स्फुरच्छुण्डदण्डोल्लसद्बीजपूरम् ।
गलद्दर्पसौगन्ध्यलोलालिमालं
गणाधीशमीशानसूनुं तमीडे ॥ २ ॥

विविध स्वरांच्या नादांची अभिव्यक्ति आणि लय ज्याच्यामध्यें होत रहातो अशा एखाद्या वाजत असलेल्या तंबोऱ्याच्या नादाप्रमाणें अथवा नृत्य,

वाद्य आणि संगीत यांच्या एककालीन क्रियेप्रमाणें ज्याचें मुख आनंददायक आहे. ज्याच्या रमणीय शुंडादंडाच्या अग्रभागीं महाळुंगाचें फळ शोभत आहे. त्याच्याप्रमाणें गंडस्थलांतून पाझरणाऱ्या मदजलाच्या मस्त सुगंधानें भ्रमरांच्या झुंडीच्या झुंडी जेथें लोलायमान झालेल्या आहेत. अशा त्या शिवपुत्राचें श्रीगणपतिरायाचें मी स्तवन करीत आहें.

प्रकाशज्जपारक्तरत्नप्रसून-
प्रवालप्रभातारुणज्योतिरेकम् ।
प्रलम्बोदरं वक्रतुण्डैकदन्तं
गणाधीशमीशानसूनुं तमीडे ॥ ३ ॥

तेजस्वी व देदीप्यमान अशा जास्वंदीच्या फुलाप्रमाणें अथवा माणिकाच्या खड्याप्रमाणें किंवा तांबड्या दुपारीच्या फुलाप्रमाणें अथवा प्रभातकालीन अरुणाच्या वर्णाप्रमाणें ज्याचें तेज झळकत आहे. ज्याला जगांत दुसरी तुलना नाहीं असा एकमेव अद्वितीय लंबोदर वक्रतुंड आणि एकदंत असलेला, शंकराचा पुत्र जो गणाधीश त्याचें मी प्रेमपूर्वक स्तवन करीत आहें.

विचित्रस्फुरद्रत्नमालाकिरीटं
किरीटोल्लसच्चन्द्ररेखाविभूषम् ।
विभूषैकभूषं भवध्वंसहेतुं
गणाधीशमीशानसूनुं तमीडे ॥ ४ ॥

ज्याच्या गळ्यामध्यें नाना प्रकारच्या चित्रविचित्र रत्नांच्या माळा झळकत आहेत. मस्तकावर रत्नजडित मुकुट शोभत आहे. त्या मुकुटावर चंद्राची कोर अलंकाराप्रमाणें शोभून दिसत आहे. 'विभूष' म्हणजे अलंकारादि वैभवविरहित असलेले परम विरक्त भक्तजन. त्यांचा जो एकमेव अलंकार आहे. अर्थात् त्यांच्या मनाला रमविणारा आहे. अनन्यचित्तानें ज्याची उपासना केली असतां संसारदुःखांचा नाश होतो म्हणून त्याला 'भवध्वंसहेतु' असें म्हटलें आहे. संसारतापाचें शमन करणारा असा जो शिवपुत्र गणाधीश त्याची मी भक्तिपूर्वक स्तुति करतों.

उदञ्चद्भुजावल्लरीदृश्यमूलो-
ज्ज्वलद्भ्रूलताविभ्रमभ्राजदक्षम् ।

मरुत्सुन्दरीचामरैः सेव्यमानं
गणाधीशमीशानसूनुं तमीडे ॥ ५ ॥

भक्तजनांना अभयदान आणि वरदान देण्याकरितां वर उचललेल्या भुजारूपी वल्लरींच्या अर्थात् लतेच्या दर्शनीय मुळाशीं चंचल अशा ज्या धनुराकार म्हणजे कुटिल असलेल्या भ्रूलता, त्यांचा जो विभ्रम म्हणजे विलास अर्थात् खेळ, त्या विलासामुळें ज्याचे नेत्र अत्यंत खुलून दिसत आहेत, शोभत आहेत. देवांच्या अप्सरा हातात चामरें घेऊन ज्याच्यावर ढाळीत आहेत. चवऱ्या ढाळून ज्याची सेवा करीत आहेत. अशा त्या शंकराच्या पुत्राची श्रीगणरायाची मी स्तुति करीत आहें.

स्फुरन्निष्ठुरालोलपिङ्गाक्षितारं
कृपाकोमलोदारलीलावतारम् ।
कलाबिन्दुगं गीयते योगिवर्यै-
र्गणाधीशमीशानसूनुं तमीडे ॥ ६ ॥

ज्याच्या डोळ्यांतील कनीनिका म्हणजे कृष्णतारा अर्थात् बुबळें हीं पिंगट वर्णाचीं आहेत. ज्याचे डोळे तेजस्वी, चंचल आणि शत्रूंचे निर्दालन करण्याच्या बाबतींत अत्यंत निष्ठुर दिसत आहेत. ते तुम्ही गणराज हे प्रभो गणराया ! तुमची दृष्टि शत्रूंच्या निर्दलनासाठीं अत्यंत निष्ठुर असली तरी तुम्ही आपल्या भक्तजनाकरितां कृपेनें अत्यंत कोमल आहां. भक्तजनांच्या कल्याणासाठीं तुम्ही अवतार घेऊन अत्यंत उदार म्हणजे अनुपम अशा थोर लीला केलेल्या आहेत. कला आणि बिंदु या ठिकाणीं मोठमोठ्या योगी लोकांकडून तुमच्या रूपाचें वर्णन केलें जातें.

संपूर्ण वाक्प्रपंचाच्या मुळांशीं असलेला जो नाद, त्या नादामध्यें, त्या नादाच्या कलेमध्यें आणि नादबिंदूमध्यें श्रीगणेशाची मूर्ति प्रतीतीला येते. ईशप्रेरणेनें प्रवृत्त झालेलें चित्त देहामध्यें अग्नीला प्रवृत्त करतें. तो अग्नि ब्रह्मग्रंथीमध्यें स्थित असलेल्या प्राणाला प्रवृत्त करतो. तो प्राणवायु शरिरांतील सूक्ष्म विवरांतून ऊर्ध्वदिशेनें प्रवृत्त होतो. ही क्रिया मूलाधार चक्राच्या ठिकाणीं घडत असते. वायूच्या आघातानें मूलाधार चक्रांतील दलांचें स्पंदन सुरू होतें. या स्पंदनांतून नाद अभिव्यक्त होतो. नादांतूनच कला आणि बिंदु यांचाहि आविर्भाव होत असतो. कांहीं तत्त्ववेत्ते तर या सूक्ष्म नादालाच 'कला' असें म्हणतात.

'नादरूपा महेशानी चिद्रूपा परमा कला' नादरूपकला ही अत्यंत श्रेष्ठ व चिद्रूप असून सर्व वाङ्मयाचें ती अधिष्ठान आहे म्हणून तिला महेशानी असें म्हटलें आहे.

नाद हा कलाराशिस्वरूप आहे. नादांतून व्यक्त होणाऱ्या कलांनाच 'बीजवर्ण' असें म्हणतात. या वर्णसमुच्चयांत प्रथम प्रणवाचा आविष्कार होतो. हा प्रणवच श्रीगणेशाचें प्रकट होणारें आद्य रूप होय. म्हणूनच श्रीज्ञानेश्वर माउलीनेंहि श्रीज्ञानदेवेच्या आरंभीं 'ॐ नमोजी आद्या' असें श्रीगणेशाचें वर्णन केलेलें आहे. अ, उ आणि म या वर्णांचा समुच्चय म्हणजेच प्रणव होय. ॐ हें त्याचे स्वरूप आहे. याप्रमाणें नाद, कला आणि बिंदु यांचें उगमस्थान मूलाधार चक्र आहे. मूलाधारचक्राची अधिष्ठात्री देवता गणेश आहे. म्हणून योगीलोकांना नाद, कला आणि बिंदु यांमध्यें गणेशाचें रूप दिसतें व ते त्याप्रमाणें त्याचें वर्णन करतात.

सर्व वाक्प्रपंचाचा मूळ आधार श्रीगणेशच आहे. शब्दांना अनुलक्षून अर्थप्रपंचाचाहि आविष्कार होत असल्यामुळें अर्थप्रपंचाचेंहि मूळ श्रीगणपतीच आहे. जें पिंडी ते ब्रह्मांडी या न्यायानें समस्त ब्रह्मांडांतील शब्दप्रपंच आणि अर्थ-प्रपंच यांचेंहि मूळ श्रीगणेशच आहे. याच अभिप्रायानें श्रीसमर्थांनींहि मनोबोधाच्या आरंभीं 'मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा' असें गणेशाचें वर्णन केलें आहे.

अथवा कला शब्दाचा अर्थ सुषुम्ना नाडी असा समजावा. 'कलयति इति कला' आत्मस्वरूपामध्यें सर्व विश्वाचें ती आकलन करते. सर्व विश्वाचें ती अधिष्ठान आहे. सर्व विश्व मनांत समावलेलें असतें व समाधिकाळीं तें मन सुषुम्ना नाडींत सामावलेलें असतें. याप्रमाणें विश्वाचें अधिष्ठान असलेल्या तेजःस्वरूप सुषुम्ना नाडीचें उगमस्थान मूलाधार चक्रच आहे. या मूलाधारचक्रांत ज्या बिंदुस्थानापासून सुषुम्ना नाडीचा आविर्भाव होतो तें स्थान गणेशदेवतेचें अधिष्ठान होय. म्हणून योगीजनांना कला आणि बिंदु यांमध्यें श्रीगणेशाचें रूप दिसतें व त्याप्रमाणें ते त्याचें वर्णन करतात.

अथवा कला शब्दानें वर्णसमूहात्मक कलाराशींतील ग हें अक्षर घ्यावें. यद्यपि इतरहि अक्षरें कलाराशींत आहेत. तथापि प्रकृतस्थलीं श्रीगणपतीचें वर्णन चालू असल्यामुळें संदर्भबलानें 'ग' हेंच अक्षर घेणें इष्ट आहे. बिंदु म्हणजे अनुस्वार बिंदुसहित गकार. हा श्रीगणेश देवतेचा एकाक्षरी बीजमंत्रच होय. मंत्र हा देवतेचेंच स्वरूप असल्यामुळें मंत्रतत्त्वज्ञ योगी श्रीगणेशदेवाला कला आणि बिंदु यांमध्यें पहातात व ते त्याप्रमाणें त्याचें वर्णनहि करतात. अशा अभिप्रायानें आचार्यांनीं

"कलाबिन्दुगं गीयते योगिवर्यैः" असें म्हटलें आहे. हे प्रभो गणराया! श्रीशंकराचे चिरंजीव असलेले सर्व गणांचे म्हणजे देवसैन्यांचे अथवा विघ्नगणांचे अथवा जीवसमूहांचे अधिपति असे जे तुम्ही, त्या तुम्हांला मी भक्तिपूर्वक स्तवीत आहें.

यमेकाक्षरं निर्मलं निर्विकल्पं
गुणातीतमानन्दमाकारशून्यम् ।
परं पारमोङ्कारमाम्नायगर्भं
वदन्ति प्रगल्भं पुराणं नमीडे ॥ ७ ॥

प्रणव म्हणजे ओंकार. हें अक्षर ज्याचें वाचक आहे म्हणून ज्याला एकाक्षर असें म्हटलें आहे. जो निर्मल म्हणजे शुद्ध अर्थात् सर्व उपाधींतून मुक्त आहे. जो निर्विकल्प म्हणजे भेदरहित अर्थात् स्वगत, सजातीय आणि विजातीय अशा तिन्ही प्रकारच्या भेदानें विरहित किंवा दिक्कृत, कालकृत आणि वस्तुकृत अशा त्रिविध परिच्छेदानें शून्य म्हणजे विरहित आहे. (सु. स्तो. सं. भाग १ ला पान १८३ पहा) जो तिन्ही गुणांच्या पलीकडचा असल्यामुळें ज्याला गुणत्रयातीत किंवा गुणातीत असें म्हणतात. जो स्वरूपतः आनन्दकन्द असून आकारशून्य म्हणजे वास्तविकदृष्ट्या निराकार आहे. जो सर्वश्रेष्ठ असून सर्वांच्या पलीकडचा आहे म्हणजे सर्वांचा आदिकारण अर्थात् मूलकारण आहे. जो ओंकारस्वरूप असून सर्व वेदांचा तात्पर्यरूपानें प्रतिपाद्य आहे, अथवा सर्व वेद ज्याच्या स्वरूपांत समावलेले आहेत. जो सर्व वेदांना स्वस्वरूपांतून प्रकट करतो म्हणून ज्याला 'आम्नायगर्भ' म्हटलें आहे. आम्नायगर्भ म्हणजे वेदांच्या गर्भांत असलेला, वेदांच्या तात्पर्याचा विषयभूत अथवा वेदांना आपल्या गर्भांत ठेवणारा. सृष्टिकाली स्वस्वरूपांतून वेदांना प्रकट करणारा, जो प्रगल्भ म्हणजे अत्यंत प्रौढ असून ज्याला पुराण म्हणजे सर्वांत जुना असें म्हणतात. 'पुराऽपि नव एव' म्हणजे कितीहि मागच्या कालांत जाऊन पाहिलें, विचार केला तरी तो नवाच दिसतो म्हणून त्याला 'पुराण' असें म्हणतात. त्या श्रीगजाननाची मी भक्तिपूर्वक स्तुति करीत आहें.

चिदानन्दसान्द्राय शान्ताय तुभ्यं
नमो विश्वकर्त्रे च हर्त्रे च तुभ्यम् ।
नमोऽनन्तलीलाय कैवल्यभासे
नमो विश्वबीज प्रमोदेशसूनो ॥ ८ ॥

हे गजानना ! चिदानन्द हेंच एक तुमचें स्वरूप आहे. 'सान्द्र' म्हणजे घन अर्थात् तुम्ही चिद्घन आनन्दघन आहां. तुम्ही अत्यंत शांत आहां. तुम्हांला मी नमस्कार करतों. तुम्ही सर्व विश्वाचे कर्ते म्हणजे उत्पादक आणि हर्ते म्हणजे संहारकहि आहां. तुम्हाला मी वंदन करतों. हे गणराया ! तुमच्या लीला अनंत आहेत. तुम्ही केवळ तेजःस्वरूप आहां. स्वयंप्रकाश ब्रह्मस्वरूप आहां. हे शिवनंदना मंगलमूर्ते ! तुम्ही सर्व विश्वाचें आदिबीज म्हणजे मूल कारण आहां. मी तुम्हांला अनन्यप्रेमानें वंदन करीत आहें. मला आपण प्रसन्न व्हा.

इमं सुस्तवं प्रातरुत्थाय भक्त्या
पठेद्यस्तु मर्त्यो लभेत्सर्वकामान् ।
गणेशप्रसादेन सिध्यन्ति वाचो
गणेशे विभौ दुर्लभं किं प्रसन्ने ॥ ९ ॥

या उत्तम स्तोत्राचें पहांटेच उठून जो मनुष्य भक्तियुक्त अन्तःकरणानें पठण करील त्याच्या सर्व कामना श्रीगणरायाच्या कृपेनें पूर्ण होतील. श्रीगणेशाच्या कृपेनें त्याची वाणी सिद्ध होईल. अर्थात् तो जें बोलेल तें खरें होईल. समर्थ मंगलमूर्ति श्रीगणराय प्रसन्न झाले असतां या त्रैलोक्यांत दुर्लभ असें काय आहे ?

कोणत्याहि इष्ट देवतेची उपासना करावयाची झाली तरी उपासनेच्या आरंभीं श्रीगणेशदेवाचें स्मरण आणि चिंतन करून अनन्यभावानें नमस्कार करणें आवश्यक असतें. स्वतंत्रपणें श्रीगणेशाची उपासना करणेंहि अत्यंत हितावह आहे. म्हणून आम्ही जिज्ञासु भक्तजनांच्या हिताकरितां अत्यंत संक्षेपानें श्रीगणेशोपासनापद्धतीचा निर्देश करीत आहोंत. अधिकारी जिज्ञासु भक्तांनीं त्याचा अवश्य लाभ घ्यावा.

पहांटेच उठावें. प्रातःस्मरण करावें. शौचमुखमार्जन करून सूर्योदयाच्या आंतच स्नान करावें. स्नान करतांना देशकालसंकीर्तन करून हरगंगे हरगोदावरी हरनर्मदे असा तीर्थनामांचा घोष करावा. शक्य तर गंगेचीं स्तोत्रें म्हणावींत. तीं या स्तोत्रानंतर पुढें दिलेलींच आहेत. स्नान केल्यानंतर पृथक् पवित्र जागीं दर्भासन घालावें. त्याच्यावर लोकरीचें आसन घालून वर मृदु वस्त्राचें आसन घालावें. आसनावर बसून भस्म अथवा कुंकुमतिलक धारण करावा. संध्या करावी. संध्या झाल्यानंतर पुन्हां आचमन करून प्राणायाम करावा. नंतर

'अथपूर्वोच्चरितैवंगुणविशेषणविशिष्टायां शुभपुण्यतिथौ' असें म्हणून सप्रवरगोत्रोच्चारपूर्वक आपलें नांव उच्चारावें. 'अमुकशर्माऽहं मम आत्मनः सकलाभीष्टसिध्यर्थं श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं च श्रीगणेशाजपाख्यं कर्म करिष्ये' असा संकल्प करून उदक सोडावें.

अस्य श्रीगणेशैकाक्षरमन्त्रस्य गणक ऋषिः निचृद्गायत्रीच्छन्दः श्रीगणपतिर्देवता गं बीजं ॐ शक्तिः श्रीगणपतिप्रीत्यर्थे सकलाभीष्टसिद्धयर्थे च जपे विनियोगः। गणकर्षये नमः शिरसि। निचृद्गायत्रीच्छन्दसे नमो मुखे। गणपतिदेवतायै नमो हृदये। गं बीजाय नमो गुह्ये। ॐ शक्तये नमः पादयोः। अथ करन्यासः। ॐ गां अङ्गुष्ठाभ्यां नमः। ॐ गीं तर्जनीभ्यां नमः। ॐ गूं मध्यमाभ्यां नमः। ॐ गैं अनामिकाभ्यां नमः। ॐ गौं कनिष्ठिकाभ्यां नमः। ॐ गः करतलकरपृष्ठाभ्यां नमः। अथ षडङ्गन्यासः। ॐ गां नमः हृदये। ॐ गीं नमः शिरसि। ॐ गूं नमः शिखायै वषट्। ॐ गैं नमः कवचाय हुं। ॐ गौं नमः नेत्रत्रयाय वौषट्। ॐ गः नमः अस्त्राय फट्। अथ ध्यानम्।

एकदन्तं चतुर्हस्तं पाशमङ्कुशधारिणम्।
रदं च वरदं हस्तैर्विभ्राणं मूषकध्वजम्॥
रक्तं लम्बोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससम्।
रक्तगन्धानुलिप्ताङ्गं रक्तपुष्पैः सुपूजितम्।
भक्तानुकम्पिनं देवं जगत्कारणमच्युतम्।
आविर्भूतं च सृष्ट्यादौ प्रकृतेः पुरुषात्परम्॥
'ध्यायेदनन्यया भक्त्या गणेशं सर्वसिद्धिदम्'

हे श्लोक म्हणून श्रीगणेशदेवाचें ध्यान करावें.

भगवान् गणेश हे एकदन्त आहेत. 'एक' शब्दाचा अर्थ मायाशक्ति असा आहे व दन्त शब्दाचा अर्थ मायेचा अधिपति असा आहे. गणेश हे मायाशक्तिस्वरूप असून ते मायाशक्तीचे अधिपतीहि पण आहेत. लौकिकदृष्ट्या श्रीगजाननाचा डावीकडचा दांत भग्न असून उजवीकडचा एक दांत पूर्ण स्वरूपानें दिसत आहे म्हणून त्यांना एकदन्त असें म्हटलें आहे. भक्तांना धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांची प्राप्ति करून देणारा अथवा चारी वेदांची अर्थात् वेदोक्त धर्मांची स्थापना करणारा म्हणून त्यास 'चतुर्हस्त' असें म्हटलेलें आहे. उजवीकडील वरच्या हातांत पाश धारण केलेला आहे. तो गणेशाची

अनन्यचित्तानें भक्ति करणाऱ्यांच्या अन्तःकरणांतील मोहाचा नाश करीत असतो. डाव्या बाजूच्या वरच्या हातांत अंकुश धारण केलेला आहे. दुष्ट प्रवृत्तींचे अथवा दुर्दान्त इंद्रियवृत्तींचें नियंत्रण करणें हें त्याचें कार्य आहे. डावीकडील खालच्या हातांत दांत धारण केलेला आहे. तो दुष्टांचा दुर्जनांचा नाश करण्यासाठीं आहे. उजव्या बाजूच्या खालच्या हातानें वरमुद्रा धारण केलेली आहे. तळहातांचीं बोटें सरळ ठेवून हात उताणा व किंचित् निमूळता असणें याला वरमुद्रा म्हणतात. ही वरमुद्रा भक्तजनांना अभीष्ट वर देण्याचा स्वभाव सुचवीत आहे. गणेशदेवाचीं आयुधें ब्रह्मस्वरूप आहेत.

गणपतीच्या ध्वजावर मूषकाचें चिह्न असून त्याचें वाहनहि पण मूषकच आहे. मूषक म्हणजे उंदीर. प्रत्यक्ष परमात्माच प्राणिमात्रांच्या बुद्धिरूपी बिळांत जीवरूपानें वास्तव्य करून इंद्रियांचे विषय चोरून खात असतो. जीव मात्र अहंकारानें व अभिनिवेशानें अज्ञानाच्या गाढ अंधकारांत झोंपलेला असतो त्यामुळें त्याच्या हें लक्षात येत नाहीं. तात्पर्य, जीवात्मा आणि परमात्मा हे दोन्ही तत्त्वतः एकच असून त्यांच्यावर श्रीगणेशाचें आधिपत्य आहे, असा अभिप्राय 'मूषकध्वज' आणि 'मूषकवाहन' यांत अभिप्रेत आहे.

गणेशाची शरीरकांति तांबड्या जास्वंदीच्या, कण्हेरीच्या अथवा कमळाच्या फुलाप्रमाणें रक्तवर्ण आहे. हा रक्तिमा गणेशाचा स्वभाव अत्यंत प्रेमळ असल्याचें सुचवीत आहे. त्याचें उदर विशाल आहे कारण त्यांत सर्व विश्व सामावलेलें आहे म्हणून त्याला लंबोदर म्हणतात. त्याचे कान सुपासारखे आहेत. सूप ज्याप्रमाणें धान्यांतील खडा, माती, कोंडा वगैरे काढून टाकतें त्याचप्रमाणें गणेशाची उपासना भक्तजनांच्या चित्तांतील मलांना झाडून फटकून चित्ताला स्वच्छ करते. हें सूचित करण्याकरितांच गजानन हे शूर्पकर्ण झाले आहेत. त्यांनीं रक्तवस्त्र परिधान केलेलें आहे. कंठ, वक्षःस्थल, बाहु आणि भालप्रदेश या ठिकाणीं रक्तगंध लावलेलें आहे. तांबड्या फुलांनींच त्यांची पूजा केलेली दिसत आहे. "माझ्या ठिकाणीं अनुरक्त असलेल्या भक्तजनांवर मीहि अनुरक्त असतों" हाच अभिप्राय या सर्व रक्तवर्ण उपचारांत सूचित झालेला आहे. म्हणूनच त्यांना 'भक्तानुकम्पिन्' असें म्हटलें आहे. ते देव म्हणजे नित्य प्रकाशमान आहेत. ते सर्व जगाचें कारण असूनहि स्वतःच्या सत्, चित् आणि आनंद या स्वरूपांतून तिळमात्रहि ढळलेले नाहींत म्हणून त्यांना 'अच्युत' म्हटलेलें

आहे. सृष्टीच्या आरंभकाळीं तेंच प्रथम प्रकट झालें. तें प्रकृतीच्या आणि सोपाधिक ब्रह्मस्वरूप असलेल्या पुरुषाच्याहि पलीकडे असलेलें जें शुद्ध सद्घन, चिद्घन, आनन्दघन आणि परिपूर्ण परब्रह्म, तेंच ते आहेत. अशा तऱ्हेनें सर्व सिद्धिदायक असलेल्या गणेशदेवाचें अनन्यभक्तीनें ध्यान करावें.

याप्रमाणें ध्यान केल्यानंतर गणेशदेवाची पंचमानसोपचारांनीं पूजा करावी. तीं अशीं :— ॐ गं गणेशाय नमः लं पृथिव्यात्मकं गन्धं परिकल्पयामि । ॐ गं गणेशाय नमः हं आकाशात्मकं पुष्पं परिकल्पयामि । ॐ गं गणेशाय नमः यं वाय्वात्मकं धूपं परिकल्पयामि । ॐ गं गणेशाय नमः रं वह्न्यात्मकं दीपं परिकल्पयामि । ॐ गं गणेशाय नमः वं अमृतात्मकं नैवेद्यं परिकल्पयामि । ॐ गं गणेशाय नमः सं सर्वात्मक—सर्वोपोपचारान परिकल्पयामि । ॐ गं गणेशाय नमः नमस्कारं करोमि । गणेशाय याच्याएवजीं गणपतये असें म्हटलें तरी हरकत नाहीं. याप्रमाणें पंचभूत बीजात्मक गंध, पुष्प, धूप, दीप आणि नैवेद्य या पंचोपचारांनीं इष्टदेवतेची पूजा करणें याला मानसोपचारपूजा असें म्हणतात. बाह्योपचारांनीं केल्या जाणाऱ्या पूजेपेक्षां मानसोपचारपूजा ही शास्त्रामध्यें श्रेष्ठ मानली आहे. ॐ गं यामध्यें पांच देवतांचा समावेश आहे. ग-कार हा ब्रह्मदेवाचें रूप असून अ-कार हा विष्णूचें रूप होय. अनुस्वार हा शंकराचें रूप असून अनुनासिक हा सूर्यरूप होय. ॐकार हा शक्तिस्वरूप असून प्रणवसहित बीजमंत्र हा देवतापंचायतनच होय असें मुद्गल पुराणांत वर्णन केलेलें आहे.

याप्रमाणें मानसोपचारपूजा झाल्यानंतर पोवळ्याची, स्फटिकाची, रुद्राक्षांची अथवा इतर पवित्र मण्यांची माळ घेऊन 'मां माले महामाये सर्वशक्तिस्वरूपिणि । चतुर्वर्गस्त्वयि न्यस्तस्तस्मान्मां सिद्धिदा भव' इति मालां प्रोक्ष्य नत्वा मन्त्रं जपेत् ! याप्रमाणें हा श्लोक म्हणून उजव्या हातानें माळेवर जलप्रोक्षण करावें आणि अधिकारी, सदाचारसंपन्न आणि तपस्वी अशा गुरूंच्या मुखानें घेतलेल्या प्रणवसहित श्रीगणेशाच्या एकाक्षरी बीजमंत्राचा यथाशक्ति जप करावा. जप झाल्यानंतर 'त्वं माले सर्व देवानां प्रीतिदा शुभदा भव । शुभं कुरुष्व मे भद्रे यशो वीर्यं च सर्वदा ।' इति मालां शिरसि धृत्वा नत्वा मन्त्रजपं निवेदयेत् । हा मंत्र म्हणून माळ मस्तकावर धारण करावी. नंतर कपाळाला लावून किंचित् मस्तक लववून नमस्कार करावा. 'अनेन मन्त्रजपाख्येन कर्मणा भगवान् श्रीपरमेश्वरः प्रीयतां न मम' असें म्हणून संध्येचें पळीभर पाणी

ताम्हणांत सोडावें. याप्रमाणें इष्टदेवतेला मन्त्रजप निवेदन करून 'यस्य स्मृत्या च नामोक्त्या तपोयज्ञक्रियादिषु। न्यूनं संपूर्णतां याति सद्यो वन्दे तमच्युतम्।' हा मंत्र म्हणून विष्णवे नमो विष्णवे नमो विष्णवे नमः असें म्हणून इष्टदेवतेला नमस्कार करावा. आसनाखालची मृत्तिका उजव्या हाताच्या अनामिकेनें कपाळीं लावावी. अशी ही सामान्य अनुष्ठान पद्धति आहे.

भक्तजनांच्या कल्याणासाठीं आम्ही दोन गणेशयंत्रें देत आहों. यंत्र हें मंत्रात्मक देवतेचें मंदिरच असतें. लक्ष लावून दर्शन घ्यावें व यंत्राच्या मध्यस्थानीं असलेल्या बीजात्मक श्रीगणेश मंत्राचा जप करावा. हीं यंत्रें अत्यंत महत्त्वाचीं आहेत. तीं कल्याणप्रद आहेत. यांतील पहिलें यंत्र आम्हांला पुणें येथील त्रिशुण्ड गणपतीच्या मंदिरांत भगवत्कृपेनें अकल्पित उपलब्ध झालें असून दुसरें यंत्र मन्त्रमहोदधिकारांनीं दर्शविलेलें आहे.



श्रीगणेशयंत्र : १



श्रीगणेशयंत्र : २

■ ■ ■

गङ्गाष्टकस्तोत्रम् ।

[भारतीय संस्कृतींत गंगेचें स्थान अत्यंत श्रेष्ठ आहे. आपल्या प्रत्येक धर्मकृत्यांत आपण ज्या जलाचा उपयोग करतो त्या जलांत ज्या ज्या तीर्थांचें आवाहन केलेलें असतें त्यांत गंगेचा क्रमांक पहिला आहे. धर्मकृत्यांत आरंभीं कलशावर हात ठेवून ' गङ्गे च यमुने चैव ' या मंत्रानें प्रथम गंगेचेंच आवाहन केलें जातें. आपण रोज स्नानाकरितां गंगाळांत किंवा बादलींत पाणी घेतों त्या वेळीं देखील –

गङ्गे च यमुने चैव गोदावरि सरस्वति ।
नर्मदे सिन्धुकावेरी जलेऽस्मिन्सन्निधिं कुरु ॥

नमामि गङ्गे तव पादपङ्कजं सुरासुरैर्वन्दितदिव्यरूपम् ।
भुक्तिं च मुक्तिं च ददासि नित्यं भावानुसारेण सदा नराणाम् ॥
गङ्गागङ्गेति यो ब्रूयाद्योजनानां शतैरपि ।
मुच्यते सर्वपापेभ्यो विष्णुलोकं स गच्छति ॥
भर्जनं भववीजानामर्जनं सुखसंपदाम् ।
तर्जनं यमदूतानां गङ्गागङ्गेति गर्जनम् ॥

हे श्लोक म्हणून 'हरगंगे हरगंगे' अशी गर्जना करीतच स्नान करीत असतों. अलीकडचा तरुण मात्र बाथरूममध्यें कांहीं तरी सिनेमांतील गाणें गुणगुणत स्नान करीत असतो. त्या बिचाऱ्याला भारतीय संस्कृतीची कल्पनाहि नसते. मग तो कसली संध्या करणार आणि कसली पूजा करणार ?

वेदांनींहि गंगेचा महिमा वर्णन केलेला आहे. आदि कवि श्रीवाल्मीकि महर्षींनींहि गंगेची मोठी सुंदर स्तुति केली आहे. आई गंगे ! शंकराच्या मस्तकीं विराजमान होऊन तूं पार्वतीची सवत बनलीस. भूमातेच्या गळ्यांतील तूं अलंकार आहेस. स्वर्गारोहणाची तूं जणुं कांहीं पताका आहेस. माझी तुला एकच विनंती आहे कीं, तुझ्या तीरावर माझें वास्तव्य असावें. तुझें जल नित्य सेवनांत असावें. तुझ्या तरंगांत माझी जलक्रीडा होत असावी. तुझें नामस्मरण होत असावें आणि हें सर्व होत असतांना तुझें अवलोकन करीतच माझा देहपात व्हावा. तुझ्या कांठीं असलेल्या वृक्षांच्या ढोलींत पक्षी होऊन रहाणें मी उत्तम समजतों. या तुझ्या नरकयातनांचा निरास करणाऱ्या पाण्यांत मासा अथवा कासव होऊन राहणें देखील श्रेष्ठ आहे, पण शोकग्रस्त झालेल्या सर्व शत्रूंच्या स्त्रियांकडून ज्याची स्तुति केली जात आहे, असा एखादा गजान्तलक्ष्मीचें वैभव भोगीत असलेला महापराक्रमी सम्राट् होऊन तुला सोडून दुसरीकडे रहाणें मला रुचत नाहीं.

मातः शैलसुतासपत्नि वसुधाशृङ्गारहारावलि
स्वर्गारोहणवैजयन्ति भवतीं भागीरथि प्रार्थये ।
त्वत्तीरे वसतस्त्वदम्बु पिबतस्त्वद्वीचिषु प्रेङ्खतः
त्वन्नाम स्मरतस्त्वदर्पितदृशः स्यान्मे शरीरव्ययः ॥
त्वत्तीरे तरुकोटरान्तरगतो गङ्गे विहङ्गो वरं
त्वत्तीरे नरकान्तकारिणि वरं मत्स्योऽथवा कच्छपः ।

नैवान्यत्र मदान्धसिन्धुरघटासंघट्टघण्टारण-
त्कारत्रस्तसमस्तवैरिवनितालब्धस्तुतिर्भूपतिः ॥

जगन्नाथ पंडितांचें पीयूषलहरी अथवा गंगालहरी हें एक गंगेचें माहात्म्य वर्णन करणारें अद्वितीय काव्यमय स्तोत्र आहे. वाचकांनीं त्याचा रसास्वाद अवश्य घ्यावा. वैज्ञानिक संशोधनाच्या दृष्टीनेंहि गंगाजल हें सर्वश्रेष्ठच ठरतें. 'गायन्तं गमयति प्रापयति ज्ञापयति वा भगवत्पदं इति गङ्गा' अशी गंगा या पदाची व्युत्पत्ति आहे. नामस्मरण करणाऱ्याला ती भगवत्पदाचा आणि ब्रह्म-स्वरूपाचाहि साक्षात्कार करून देते म्हणून तिला 'गंगा' असें म्हणतात. गंगेच्या कांठीं तत्त्वचिंतन करून अनेक ऋषिमुनि आणि राजे महाराजे यांनीं स्वतःचें जीवन धन्य करून घेतलेलें आहे. आचार्यांनीं देखील काशींत व हिमाचल प्रदेशांत गंगेच्या कांठींच वास्तव्य करून प्रस्थानत्रयावरील भाष्याची व विविध वेदान्त-प्रकरणांची रचना केलेली आहे.

वामन अवतारांत श्रीहरीनें बलिराजास तीन पावलें भूमि मागितली, हातांवर दानाचें उदक पडतांच त्रिविक्रमरूप धारण करून एका पावलानें भूमंडल व्यापिलें आणि दुसऱ्या पावलानें संपूर्ण नभोमंडळ व्यापिलें. दुसरें पाऊल उचल-तांना श्रीहरीच्या उजव्या पावलाच्या आंगठ्याच्या नखाचा धक्का लागून ब्रह्मांडाचें कवच फुटलें त्यावरोबर गर्भोदकाप्रमाणें ब्रह्मांडाच्या बाहेर असलेलें जल विष्णूच्या पायाला स्पर्श करून ब्रह्मांडांत प्रविष्ट झालें, तींच ही गंगा होय. विष्णुपदाला स्पर्श करून गंगा भूमंडलावर आली म्हणून तिला 'विष्णुपदी' असें नांव पडलें. भूमंडलावरून ती देवलोकीं आली. देवांना अत्यंत आनंद झाला. देवलोकीं राहिल्यामुळें तिला 'सुरधुनी' अथवा 'सुरनदी' असें म्हणतात.

एकदां जन्हु ऋषींचा यज्ञ गंगेच्या प्रवाहांत सांपडला. जन्हु ऋषींनीं आपल्या तपोबलानें तो प्रवाह आटविला. त्यानंतर ती जन्हु ऋषींची कन्या म्हणून प्रकट झाली. तेव्हांपासून तिला 'जाह्नवी' असें नांव पडलें. स्वर्ग, मृत्युलोक आणि पाताळ या तिन्ही लोकांत गंगेची गति असल्यामुळें तिला त्रिपथगा अथवा त्रिपथगामिनी असें नांव पडलें. आपल्या पूर्वजांचा उद्धार करण्याकरितां भगीरथ राजानें प्रयत्नांची पराकाष्ठा करून गंगेला भरतखंडांत आणलें म्हणून तिला 'भागीरथी' असें नांव पडलें. गंगा ही दशविध पापांचें हरण करणारी आहे म्हणून तिचें 'दशहरा' असेंहे नांव आहे. पापें असंख्य असलीं तरी त्यांचें वर्गवारीनें

दहा प्रकार मानलेले आहेत. दुसऱ्यानें न दिलेली वस्तु घेणें (अर्थात् चोऱ्या करणें, लुबाडणें वगैरे), दुसऱ्याची हिंसा करणें आणि परदारगमन हीं तीन प्रकारचीं शारीरिक पापें होत. कठोर बोलणें, खोटें बोलणें, चहाड्या करणें आणि असंबद्ध बडबड करणें ही चार प्रकारचीं वाचिक पापें होत. त्याचप्रमाणें दुसऱ्याचें धन गिळंकृत करण्याचा विचार करणें, मनानें दुसऱ्याचें अनिष्ट चिंतणें आणि खोटा अभिनिवेश धारण करणें हीं तीन प्रकारचीं मानसिक पापें होत. अशा रीतीनें पापांचे दहा प्रकार आहेत. या दाही प्रकारच्या पापांचें निरसन गंगा करतें म्हणून तिला दशहरा म्हणतात. ज्येष्ठ महिन्याच्या शुक्लपक्षांत हस्तनक्षत्रावर मंगळवारीं दशमीच्या दिवशीं गंगा ही स्वर्गलोकांतून भूमंडलावर अवतरली म्हणून ज्येष्ठ शुक्ल दशमीलाहि दशहरा हें नांव पडलें व या तिथीला पर्वकालाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. 'ॐ नमः शिवायै नारायण्यै दशहरायै गङ्गायै नमो नमः' या मंत्राचा या पर्वकालांत जप करण्याचें सांगितलेलें आहे. एरवीहि या मंत्रानें गंगेची उपासना करण्यास हरकत नाहीं. 'ज्येष्ठे मासि क्षितिसुतदिने शुक्लपक्षे दशम्यां, हस्ते स्वर्गान्निरगमदियं जाह्नवी मर्त्यलोकम्। पापान्यस्यां हरति च तिथौ सा दशेत्याहुरार्याः, पुण्यं दद्यादपि शतगुणं वाजिमेधायुतस्य' जपकर्त्याला दशलक्ष अश्वमेधांच्या पुण्याचाहि लाभ होतो. असा गंगेचा महिमा आहे. (शब्दकल्पद्रुम दशहरा शब्द पहा.)

गंगा ही विश्वव्यापिनी आहे. आड, विहिरी, नद, नद्या, सरोवर आणि सागर या सर्व जलाशयांतून गंगाजलाचें वाष्पीभवन होऊन तें मेघांच्या रूपानें परिणत होतें आणि नंतर पर्जन्यरूपानें भूमंडलावर अवतरतें. आयुर्वेदांत अंतरिक्षजलाला 'गंगाजल' असेंच म्हटलेलें आहे. भूप्रदेशावरील जलाला प्रादेशिक उपाधिभेदानें विविध नांवें पडलेलीं असलीं तरी तें सर्व गंगाजलच होय, यांत संशय नाहीं.

गंगा ही तत्त्वतः निरुपाधिकरूपानें ब्रह्मस्वरूपच आहे. आचार्यांनींहि तिला 'पूर्णब्रह्मस्वरूपे' असें संबोधिलें आहे तें अगदीं योग्यच आहे. गंगा ही तत्त्वतः निर्गुण ब्रह्मस्वरूप असली तरी तिनें लोककल्याणाकरितां सगुणरूपहि धारण केलेलें आहे. शरदृतूंतील चंद्राप्रमाणें गंगेची अंगकांति शुभ्र आहे. रत्नजडित आणि सुवर्णाचें नक्षीकाम असलेला चांदीचा मुकुट मस्तकावर धारण केलेला आहे. त्या मुकुटावर चंद्राची कोर शोभत आहे. मस्तकावर काळेभोर केश असून कपाळीं कस्तुरीमिश्रित कुंकुमतिलक धारण केलेला आहे. तिचें मुख प्रसन्न असून ती स्मित हास्य करीत आहे. तिला चार हात असून उजव्या बाजूच्या वरच्या हातांत

अमृतकलश आहे. डाव्या बाजूच्या वरच्या हातांत कमल घेतलेलें आहे. डावीकडील खालच्या हातानें वरमुद्रा आणि उजवीकडील खालच्या हातानें अभयमुद्रा धारण केलेली आहे. अमृताच्या धारेप्रमाणें शुभ्र वस्त्र तिनें परिधान केलेलें असून गळ्यांत मौक्तिकांच्या माळा धारण केलेल्या आहेत. पांढरी शुभ्र सुंदर हें तिचें वाहन आहे. गंगामातेच्या या सगुण स्वरूपाची जे उपासना करतात त्यांचा कधींहि व कोठेंहि पराभव होणार नाहीं. वाचकांनी गंगेचें हें स्तोत्र पाठ करावें व स्नानाच्या वेळीं नित्य म्हणावें.]

भगवति भवलीलामौलिमाले तवाम्भः-
कणमणुपरिमाणं प्राणिनो ये स्पृशन्ति ।
अमरनगरनारीचामरग्राहिणीनां
विगतकलिकलङ्कातङ्कमङ्के लुठन्ति ॥ १ ॥

हे सर्वैश्वर्यसंपन्न माते गंगे ! शंकरांनीं लीलेनें धारण केलेली जणुं कांहीं त्यांच्या मस्तकांवरील तूं मालाच आहेस. परमाणुयेवढ्याहि तुझ्या जलाच्या कणाला जे कोणी प्राणी स्पर्श करतात अथवा प्राशन करतात ते कलिकालाच्या दोषांतून मुक्त होऊन निर्भयपणें देवनगरींतील चवऱ्या ढाळणाऱ्या – वारा घालणाऱ्या स्त्रियांच्या अर्थात् अप्सरांच्या अंकावर मस्तक ठेवून आनंदानें विश्रांति घेतात. सुखानें झोंपतात.

ब्रह्माण्डं खण्डयन्ती हरशिरसि जटावल्लिमुल्लासयन्ती
स्वर्लोकादापतन्ती कनकगिरिगुहागण्डशैलात्स्खलन्ती ।
क्षोणीपृष्ठे लुठन्ती दुरितचयचमूर्निर्भरं भर्त्सयन्ती
पाथोधिं पूरयन्ती सुरनगरसरित्पावनी नः पुनातु ॥ २ ॥

आपल्या प्रचंड प्रवाहाच्या जोरानें ब्रह्मांडालाहि फोडून बाहेर पडणारी शंकरांच्या मस्तकावरील जटारूपी लतांना उल्हासित करणारी, स्वर्गलोकांतून मृत्युलोकामध्यें धांव घेणारी आणि सुवर्णमय सुमेरुपर्वताच्या गुहांजवळून टेकड्यांवर धो धो वहाणारी, सपाट मैदानांतील भूपृष्ठावर विश्रांति घेणारी, आपल्या गर्जनेनें पापसमूहांच्या सैन्याला जणुं कांहीं दर्डावून धाक घालणारी, देवनगरांतील पावन नदी ही गंगा आम्हांला पवित्र करो.

मज्जन्मातङ्गकुम्भच्युतमदमदिरामोदमत्तालिजालं
स्नानैः सिद्धाङ्गनानां कुचयुगविगलत्कुङ्कुमासङ्गपिङ्गम् ।
सायं प्रातर्मुनीनां कुशकुसुमचयैश्छन्नतीरस्थनीरं
पायाच्चो गाङ्गमम्भः करिकलभकराक्रान्तरंहस्तरङ्गम् ॥ ३ ॥

आई गंगे ! तुझ्या जलाचें मी किती आणि काय वर्णन करूं ? हत्तींचे समूह जलक्रीडा करीत असतांना त्यांच्या गंडस्थलांतून स्रवणाऱ्या दानोदकरूपी मदिरेच्या सुगंधानें मस्त झालेले भ्रमरांचे समूह तुझ्या प्रवाहावर गुंजारव करीत विरट्या घालीत आहेत. सिद्ध चारण, गंधर्व इत्यादिकांच्या स्त्रिया तुझ्यामध्यें स्नान करीत असल्यामुळें त्या स्नानाच्या योगानें त्यांच्या वक्षःस्थळीं लावलेली केशरकस्तुरीची उटी पाण्यांत मिसळून तें पाणी पिंगट वर्णाचें दिसत आहे. तसेंच सायंकाळीं आणि प्रातःकाळीं ऋषिमुनींनीं अर्पण केलेल्या दर्भाच्या आणि फुलांच्या समूहानें कांठावरचें पाणी झांकलें गेलेलें आहे आणि हत्तींचे छावे सोंडांनीं पाण्याशीं खेळत असल्यामुळें तुझ्या पाण्यावरील तरंगांचा वेग कुंठित झालेला आहे. ('करिकरमकराक्रान्त' असा पाठ घेतल्यास हत्तींच्या सोंडा आणि सुसरी असा अर्थ करावा.) आई गंगे ! असें हें सर्वांना प्रिय असलेलें तुझें जल आमचें – आम्हां भक्तजनांचें रक्षण करो.

आदावादिपितामहस्य नियमव्यापारपात्रे जलं
पश्चात्पन्नगशायिनो भगवतः पादोदकं पावनम् ।
भूयः शम्भुजटाविभूषणमणिर्जह्नोर्महर्षेरियं
कन्या कल्मषनाशिनी भगवती भागीरथी पातु माम् ॥ ४ ॥

जिचें जल सृष्टीच्या आरंभीं आदिपितामह म्हणजे भगवान् ब्रह्मदेव यांच्या संध्या-पूजा वगैरे नियमांसाठीं उपयुक्त असलेल्या कमंडलूंत सामावलेलें होतें. त्यानंतर तेंच जल शेषशायी भगवान् विष्णु यांचें पावन म्हणजे पवित्र असें पादोदक (पायाचें तीर्थ) झालें. तेंच गंगाजल पुन्हां शंकरांच्या जटेमध्यें चूडामणीप्रमाणें शोभूं लागलें. तेंच जल पुढें जह्नुमहर्षींच्या उदरीं कन्यारूपानें प्रकट झालें. ती ही जह्नुमुनींची कन्या जाह्नवी, सर्वपातकांचा नाश करणारी सर्वैश्वर्यसंपन्न असलेली भागीरथी माझें रक्षण करो.

**शैलेन्द्रादवतारिणी निजजले मज्जज्जनोत्तारिणी
पारावारविहारिणी भवभयश्रेणीसमुत्सारिणी ।
शेषाहेरनुकारिणी हरशिरोवल्लीदलाकारिणी
काशीमान्तविहारिणी विजयते गङ्गा मनोहारिणी ॥ ५ ॥**

पर्वतांचा राजा असलेल्या हिमालयापासून खालीं उतणारी, आपल्या जलामध्यें स्नान करणाऱ्या लोकांचा उद्धार करणारी, तसेंच महासागरामध्यें विहार करणारी आणि भवभयांच्या म्हणजे संसार संकटांच्या परंपरेचा समूल उच्छेद करणारी, त्याचप्रमाणें गति आणि विस्तार या बाबतींत नागराज शेषाचें अनुकरण करणारी तसेंच शंकरांच्या मस्तकावर लतापत्राप्रमाणें शोभणारी आणि काशी प्रदेशांत काशीक्षेत्रापासून वहात जाणारी अशी मनोहर गंगा, हिचा विजय असो. तिचा आम्ही भक्तियुक्त अंतःकरणानें जयजयकार करीत आहों.

**कुतोऽर्वाची वीचिस्तव यदि गता लोचनपथं
त्वमार्यांता पीताम्बरपुरनिवासं वितरसि ।
त्वदङ्गस्पङ्गे गङ्गे पतति यदि कायस्तनुभृतां
तदा मातः शातक्रतवपदलाभोऽप्यतिलघुः ॥ ६ ॥**

आई गंगे ! तुझा तरंग दृष्टीस पडला तर 'अवीची' म्हणजे अधःपात अथवा अवनति यांची भीति कसली ? ' गङ्गे त्वदर्शनान्मुक्तिर्न जाने स्नानजं फलम् ' असे उद्गार श्रीनारदमहर्षीनींहि काढलेले आहेत. गंगेच्या केवळ दर्शनानेंहि मुक्ति मिळते, मग स्नानाचें फल काय सांगावें ?

आई गंगे ! तुझें जल प्राशन केलें असतां तूं पीतांबर म्हणजे भगवान् विष्णु यांचें नगर म्हणजे वैकुंठ, या वैकुंठनगरीमध्यें वास्तव्य करण्याचेंहि अर्थात् 'विष्णुसालोक्य' मुक्तीचेंहि भाग्य प्राप्त करून देतेस. हे गंगे ! अंतकाळीं जीवाचा देह जर तुझ्या अंकावर पडेल तर त्याला इंद्रपदाचाहि लाभ अत्यंत तुच्छ वाटेल. येवढें उत्तमपद तूं त्याला प्राप्त करून देतेस. धन्य आहे आई तुझा महिमा!

**भगवति तव तीरे नीरमात्राशनोऽहं
विगतविषयतृष्णः कृष्णमाराधयामि ।**

सकलकलुषभङ्गे स्वर्गसोपानसङ्गे
तरलतरतरङ्गे देवि गङ्गे प्रसीद ॥ ७ ॥

हे सर्ववैभवशालिनी आई गंगे ! माझ्या सर्व विषयतृष्णा मावळलेल्या आहेत. केवळ जल प्राशन करून मी तुझ्या कांठीं श्रीकृष्णाची आराधना करीत आहें. तूं सर्व कल्मषांचा म्हणजे पापांचा नाश करणारी आहेस. भक्तजनांना तुझ्या संगतीनें स्वर्गसोपानांचा लाभ होतो. तुझे तरंग अत्यंत तरल – चंचल – मनाला आकर्षण करून घेणारे आहेत. हे देवी गंगे ! प्रसन्न हो कृपा कर .

गङ्गे त्रैलोक्यसारे सकलसुरवधू-धौतविस्तीर्णतोये
पूर्णब्रह्मस्वरूपे हरिचरणरजोहारिणि स्वर्गमार्गे ।
प्रायश्चित्तं यदि स्यात्तव जलकणिका ब्रह्महत्यादिपापे
कर्त्वां स्तोतुं समर्थस्त्रिजगदघहरे देवि गङ्गे प्रसीद ॥ ८ ॥

प्रसन्न हो, कृपा कर असें म्हटल्यानंतर स्वाभाविकच कृपेचें स्वरूप काय असावें ? असा प्रश्न पुढें येतो. हाच अभिप्राय लक्षांत घेऊन आचार्य या श्लोकांत आपली मनीषा प्रकट करीत आहेत.

हे आई गंगे ! तूं त्रैलोक्यांतील सार आहेस. या त्रैलोक्यांत सेवन करण्याला योग्य जर कांहीं असेल तर तें तुझें जलच आहे. तुझ्या विस्तीर्ण जलामध्यें अवगाहन करून सर्व देवांगनाहि पावन होतात. तूं पूर्ण ब्रह्मस्वरूप आहेस. सच्चिदानन्दस्वरूप आहेस. तूं श्रीहरीच्या चरणकमलांच्या रजःकणांचें परिमार्जन केलेलें आहेस. तूं श्रीहरीच्या चरणकमलांचें प्रक्षालन केलेलें आहेस. तूं स्वर्गाचा मार्ग आहेस, अथवा मानवांना स्वर्गमार्गाचा लाभ तुझ्यामुळेंच होतो. ज्या सुखाचा कधीं नाश होत नाहीं अशा अविनाशी सुखालाच खरें स्वर्ग हें नांव आहे. या परब्रह्मरूपी अविनाशी सुखाचा मार्ग मानवांना तुझ्यामुळेंच लाभतो. या विश्वांत ब्रह्महत्यादि पातकांचा निरास करण्याला समर्थ असें जर कांहीं प्रायश्चित्त असेल तर तें एकमात्र तुझ्या जलाचा कण सेवन करणें हेंच होय.

हे देवि गंगे ! तूं समस्त त्रैलोक्याचें पाप निर्दालन करून टाकण्यास समर्थ आहेस. तुझी साकल्यानें स्तुति करण्याला कोण बरें समर्थ आहे ? तुझ्या सामर्थ्याचें व गुणांचें कोणालाहि संपूर्णपणें आकलन होणार नाहीं. तूंच कृपा कर आणि प्रसन्न होऊन माझे सकल मनोरथ पूर्ण कर.

मातर्जाह्नवि शंभुसङ्गमिलिते मौलौ निधायाञ्जलिं
त्वत्तीरे वपुषोऽवसानसमये नारायणाङ्घ्रिद्वयम् ।
सानन्दं स्मरतो भविष्यति मम प्राणप्रयाणोत्सवे
भूयाद्भक्तिरविच्युता हरिहराद्वैतात्मिका शाश्वती ॥ ९ ॥

हे आई जह्नुतनये ! तुला शंभूचा – शंकरांचा सहवास लाभलेला आहे. शंकरानीं तुला आपल्या मस्तकावर धारण केलेलें आहे. मी आपल्या मस्तकीं दोन्ही हात जोडून तुझी प्रार्थना करीत आहे कीं, तुझ्या कांठीं वास्तव्य करीत असतांना ज्या वेळीं माझ्या शरीराचा अंतकाळ येईल आणि प्राणप्रयाणाचा उत्सव होऊं लागेल त्यावेळीं श्रीहरीच्या – नारायणाच्या चरणयुगलाचें आनंदानें मला स्मरण होत रहावें. आणि स्मरण करीत असतांना माझ्या अंतःकरणांत श्रीहरि आणि भगवान् शंकर यांच्या अद्वैत स्वरूपाची निरंतर अखंड भक्ति मला लाभावी. येवढी माझी मनीषा पूर्ण कर.

या श्लोकांत अखंड भक्तीचें मागणें मागितलें असून त्या भक्तीला 'हरिहराद्वैतात्मिका' हें मोठें मार्मिक विशेषण दिलेलें आहे. हरि आणि हर हें एक उदाहरण मात्र आहे. सर्व देवतांचें अद्वैतात्मकत्व – सर्व विश्वाचें एकरूपत्व माझ्या बुद्धींत दृढ ठसावें हाच आचार्यांचा अभिप्राय आहे. सर्व देवतांचें अद्वैतात्मकत्व – सर्व विश्वाचें एकरूपत्व बुद्धींत ठसणें म्हणजेच आत्मतत्त्वाचा साक्षात्कार होय. या अवस्थेंत जीवात्मा हा परमात्मरूपाशीं समरस होतो, एकरूप होतो. परमात्मस्वरूपाशीं एकरूप होऊन रहाणें हींच खरी भक्ति होय. या भक्तीला फलस्वरूप भक्ति असें म्हणतात. या भक्तीचा लाभ झाल्यानंतर इतर कांहीं मिळविण्याचें शिल्लक रहात नाहीं. म्हणूनच आचार्यांनीं गंगेला हें मागणें मागीतलें आहे.

गङ्गाष्टकमिदं पुण्यं यः पठेत्प्रयतो नरः ।
सर्वपापविनिर्मुक्तो विष्णुलोकं स गच्छति ॥ १० ॥

हें पुण्यकारक गंगाष्टक शांत चित्तानें जो कोणी रोज म्हणेल तो सर्व पापांतून मुक्त होऊन विष्णुलोकाला जाईल. त्याला विष्णुपदाचा लाभ होईल.

■ ■ ■

गङ्गास्तोत्रम्

['भज गोविन्दं भज गोविन्दं' या चर्पटपंजरी स्तोत्राच्या चालीवर रचलेलें हें गंगास्तोत्र म्हणावयास अत्यंत उत्तम असून त्याचा अर्थहि रम्य व मननीय आहे. हें आचार्यांनी केलेलें स्तोत्र आम्ही गीताप्रेस गोरखपूरच्या स्तोत्र-रत्नावलींतून घेतलें आहे. वाचकांनी याचा लाभ अवश्य घ्यावा. या स्तोत्राला पालुपद या स्वरूपांत " जय जय गङ्गे मातर्गङ्गे जय जय जाह्नवि करुणा-पाङ्गे " अशीं अक्षरें प्रत्येक कडव्याच्या शेवटीं म्हणावींत.]

देवि सुरेश्वरि भगवति गङ्गे त्रिभुवनतारिणि तरलतरङ्गे ।
शङ्करमौलिविहारिणि विमले मम मतिरास्तां तव पदकमले ॥ १ ॥

हे देवि गंगे ! तूं सर्व देवांची अधिनायक आहेस. तूं सर्व ऐश्वर्यानें संपन्न आहेस. त्रिभुवनाला तूं दुरितांतून तारणारी आहेस. तुझे तरंग अत्यंत तरल म्हणजे चंचल आहेत. शंकरांच्या मस्तकावर तूं विहार करतेस. हे माते, तुझ्या चरणकमलीं माझी बुद्धि स्थिर राहो.

भागीरथि सुखदायिनि मातस्तव जलमहिमा निगमे ख्यातः ।
नाहं जाने तव महिमानं पाहि कृपामयि मामज्ञानम् ॥ २ ॥

हे आई भागीरथि ! तूं सर्वांना सुख देणारी आहेस. तुझ्या जलाचा महिमा वेदांत आणि शास्त्रांतहि वर्णन केलेला आहे. मी तुझा महिमा जाणूं शकत नाहीं. मग मी त्याचें वर्णन काय करणार ? हे दयाळु माते ! मी अज्ञानी आहें. माझें तूं रक्षण कर.

हरिपदपाद्यतरङ्गिणि गङ्गे हिम-विधु-मुक्ता-धवलतरङ्गे ।
दूरीकुरु मम दुष्कृतिभारं कुरु कृपया भवसागरपारम् ॥ ३ ॥

हे आई गंगे ! तूं श्रीहरीच्या – श्रीविष्णूच्या चरणकमलांचें प्रक्षालन करून नदीचें रूप धारण केलेलें आहेस. तुझे तरंग बर्फाप्रमाणें, चंद्राप्रमाणें अथवा मोत्याप्रमाणें अत्यंत धवल म्हणजे शुभ्र स्वच्छ असे आहेत. तूं माझ्या दुरितांचा भार दूर कर आणि कृपा करून मला या भवसागरांतून पार कर.

तव जलममलं येन निपीतं परमपदं खलु तेन गृहीतम् ।
मातर्गङ्गे त्वयि यो भक्तः किल तं द्रष्टुं न यमः शक्तः ॥ ४ ॥

हे आई गंगे ! तुझें निर्मल जल ज्यानें सेवन केलें, खरोखर त्यानें परमपद – ब्रह्मपदच प्राप्त करून घेतलें असें समजावें. आई गंगे ! जो तुझा भक्त झाला, खरोखर यम देखील त्याच्याकडे पहाण्याला समर्थ होऊं शकत नाहीं. मग इतरांची कथा काय !

पतितोद्धारिणि जाह्नवि गङ्गे खण्डितगिरिवरमण्डितभङ्गे ।
भीष्मजननि हे मुनिवरकन्ये पतितनिवारिणि त्रिभुवन धन्ये ॥५॥

हे जह्नुमुनिकन्यके माते गंगे ! तूं पतितांचा उद्धार करणारी आहेस. तुझे शोभायमान 'भंग' म्हणजे तरंग हे असे आहेत कीं, त्यांनीं पर्वतांचा राजा जो हिमालय त्यालाहि खंडित करून टाकलें आहे. गंगेच्या तरंगांच्या आघातानें हिमालयाचे कडे फुटून तेथे कपारी निर्माण झालेल्या आहेत. आई गंगे ! तूं भीष्मांची जननी असून जह्नुऋषींची कन्या आहेस. तूं पतितांची पातकें निवारण करतेस. खरोखर तूं त्रिभुवनामध्यें धन्य आहेस.

कल्पलतामिव फलदां लोके प्रणमति यस्त्वां पतति न शोके ।
पारावारविहारिणि गङ्गे विमुखयुवतिकृततरलापाङ्गे ॥ ६ ॥

आई गंगे ! या मृत्युलोकामध्यें तूं कल्पलतेप्रमाणें इष्ट फल देणारी आहेस. जो तुला नमस्कार करतो तो संकटांत सांपडत नाहीं. आई गंगे, तूं महासागरामध्यें विहार करणारी आहेस. एखाद्या विमुख युवतीचें नेत्र जसे चंचल असावेत त्याप्रमाणें तुझेहि नेत्रकटाक्ष चंचल आहेत. अपांग म्हणजे कटाक्ष – दृष्टिकोण. आई गंगे ! तरंगांच्या रूपानें तुझे कटाक्ष अत्यंत चंचल दिसत आहेत.

तव चेन्मातः स्रोतःस्नातः पुनरपि जठरे सोऽपि न जातः ।
नरकनिवारिणि जाह्नवि गङ्गे कलुषविनाशिनि महिमोत्तुङ्गे ॥७॥

आई गंगे ! एखाद्यानें जर तुझ्या प्रवाहामध्यें स्नान केलें तर त्याला पुनः गर्भवास स्वीकारावा लागत नाहीं. हे जाह्नवि गंगे ! तूं नरकयातनांचें निवारण करणारी आहेस. तूं सर्व पापांचा नाश करतेस. तुझा महिमा अत्यंत उच्च म्हणजे श्रेष्ठ आहे. हे माते गंगे ! तुझा जयजयकार असो.

पुनरसदङ्गे पुण्यतरङ्गे जय जय जाह्नवि करुणापाङ्गे ।
इन्द्रमुकुटमणिराजितचरणे सुखदे शुभदे भृत्यशरण्ये ॥ ८ ॥

आई गंगे ! तुझा येवढा महिमा असतांना पुन्हां तूं माझ्यासारख्यांच्या 'असत्' म्हणजे तुच्छ, नाशवंत, अपवित्र अशा देहाच्या ठिकाणीं आपल्या पुण्यकारक तरंगांचा स्पर्श करुन आम्हांला पावन करतेस. आई ! केवढी ही तुझी दृष्टि कृपापूर्ण आहे ! तुझा जयजयकार असो. इंद्राच्या मस्तकावर असलेल्या मुकुटांतील रत्नांनीं तुझें चरणकमल अत्यंत शोभत आहेत..(इंद्रादि देव आपल्या मस्तकांवर मुकुट घालून जेव्हां गंगामातेच्या चरणीं वंदन करतात तेव्हां त्यांच्या मुकुटांतील रत्नांच्या प्रकाशानें गंगेचे चरणकमल प्रकाशित होतात आणि अत्यंत शोभतात असा याचा अर्थ समजावा.) अर्थात् आई गंगे ! इंद्रादि देवहि तुझ्या चरणीं मस्तक ठेवून नमस्कार करीत आहेत. तूं सर्वांना सुख देणारी आहेस सर्वांचें कल्याण करणारी आहेस. शरण आलेल्या भक्तजनांना आश्रय देऊन तूं त्यांचें संरक्षण करतेस. आई धन्य आहेस तूं.

रोगं शोकं तापं पापं हर मे भगवति कुमतिकलापम् ।
त्रिभुवनसारे वसुधाहारे त्वमसि गतिर्मम खलु संसारे ॥ ९ ॥

हे सकलैश्वर्यशालिनी गंगे ! तूं माझे रोग, शोक, पाप, ताप आणि सर्व दुर्वासनांचा कलाप म्हणजे समूह यांचा नाश कर. हे आई, तूं त्रिभुवनाचें सार म्हणजे बल आहेस. भूमातेच्या गळ्यांतील हार आहेस. खरोखर संसारामध्यें तूंच माझी गति म्हणजे आधार आहेस.

अलकानन्दे परमानन्दे कुरु करुणामयि कातरवन्द्ये ।
तव तटनिकटे यस्य निवासः खलु वैकुण्ठे तस्य निवासः ॥ १० ॥

हे आई गंगे ! तूं अलका नगरीला आनंदित करणारी असून स्वतः पूर्ण आनंदस्वरूप आहेस. ' अयि कातरवन्द्ये ! करुणां कुरु ' हे गंगे ! संसारतापाला भ्यालेल्या लोकांनीं वंदन करण्याला योग्य असलेली तूं माझ्यावर करुणा कर. ज्याला तुझ्या कांठीं वास्तव्य करण्याचें लाभलें तो खरोखर वैकुंठलोकींच वास्तव्य करीत आहे.

वरमिह नीरे कमठो मीनः किंवा तीरे शरटः क्षीणः
अथवा श्वपचो मलिनो दीनस्तव न हि दूरे नृपतिकुलीनः ॥११॥

आई गंगे ! तुझ्या जलामध्ये कासव अथवा मासा होऊन रहाणें बरें, किंवा तुझ्या कांठीं क्षीण, दुर्बल सरडा होऊन रहाणें बरें. अथवा तुझ्या तीरावर घाणेरडा दीन चांडाळ होऊन रहाणें बरें. पण तुझ्यापासून दूर असलेल्या स्थितींत कुलीन घरंदाज राजामहाराजाहि होऊन रहाणें मला इष्ट वाटत नाहीं.

भो भुवनेश्वरि पुण्ये धन्ये देवि द्रवमयि मुनिवरकन्ये ।
गङ्गास्तवमिममयलं नित्यं पठति नरो यः स जयति सत्यम् ॥१२॥

हे देवी गंगे ! तूं त्रिभुवनांची अधिष्ठात्री आहेस. तूं जह्नुमुनींची कन्या आहेस. तूं द्रवमय म्हणजे जलस्वरूप – रसस्वरूप आहेस. धन्य आहेस तूं. या निर्मल गंगास्तोत्राचा जो नित्य पाठ करील तो खरोखर सर्वत्र विजयी होईल.

येषां हृदये गङ्गाभक्तिस्तेषां भवति सदा सुखमुक्तिः ।
मधुरा कान्ता पञ्झटिकाभिः परमानन्दकलितललिताभिः ॥१३॥

ज्यांच्या अंतःकरणांत गंगेविषयीं अनन्यभक्ति आहे. त्यांना सर्वकाळ आनंदाचा आणि मुक्तीचा लाभ होतो. ही गंगेची स्तुति श्रेष्ठ आनंदाला प्राप्त करून देणाऱ्या ललित म्हणजे सुंदर अशा शब्दसमूहानें रचलेली आहे. ती शब्दांनीं मधुर आणि अर्थानें मनोहर आहे. ही सर्व स्तुति 'पञ्झटिका' वृत्तानें रचलेली आहे.

पञ्झटिका हें एका वृत्ताचें नांव असून हें वृत्त म्हणावयास अत्यंत गोड आहे. सुबोधस्तोत्रसंग्रहाच्या पहिल्या भागांत दिलेलें चर्पटपंजरीस्तोत्र आणि द्वादशपंजरिकास्तोत्र हीं दोन्हीं स्तोत्रें याच वृत्तांतील आहेत. वाचकांच्या माहिती-साठीं आम्ही थोडक्यांत या वृत्ताची कल्पना देत आहों. या वृत्तांत चार चरण असून प्रत्येक चरणांत सोळा मात्रा असतात. प्रत्येक चरणांतील नवव्या मात्रेच्या ठिकाणचें अक्षर बहुधा गुरु म्हणजे दोन मात्रांचें असतें. तें तसें असलेंच पाहिजे असा नियम मात्र नाहीं. असल्यास श्लोकाला शोभा येते. या श्लोकांत कोठेंहि मध्यगुरु म्हणजे जगण नसतो. 'नवीन' 'धुरीण' 'जनास' इत्यादि शब्द जगणाचीं उदाहरणें होत. हा या वृत्तांतील विशेष लक्षांत घ्यावा. सोळा मात्रांच्या प्रत्येक चरणांत दोन दोन मात्रांनीं विराम घेतां येतो. या वृत्ताला पञ्झटिका म्हणतात.

असें छन्दोमंजरीकारानें या वृत्ताचें वर्णन केलेलें आहे. " प्रतिपदयमकितषोडश-मात्रा नवमगुरुत्वविभूषितगात्रा। पज्झटिका पुनरत्र विवेकः क्वापि न मध्यगुरुर्गणः एकः " उदाहरणार्थ :—

S S I I S I I S S S
अ ङ्गं ग लि तं प लि तं मु ण्ड म्
I I I I S S S S S S
दृ श न वि ही नं जा तं तु ण्ड म् ।
S S S I I S S S S
वृ द्धो या ति गृ ही त्वा द ण्ड म्
I I I I S S S S S S
त दृ पि न मु ञ्च त्या शा पि ण्ड म् ॥

उभी रेघ हें एका मात्रेचें चिन्ह असून अवग्रह (S) हा दोन मात्रा दर्शवितो. पज्झटिका हें एका विशिष्ट चालीचें नांव आहे. हें वृत्त त्याच चालीवर असल्या-मुळें या वृत्तालाहि तेंच नांव दिलें.

गङ्गास्तोत्रमिदं भवसारं वाञ्छितफलदं विमलं सारम् ।
शंकरसेवकशंकररचितं पठति सुखी स्तव इति च समाप्तः ॥

स्वभावतः सर्वच संसार असार आहे. पण त्यांतल्या त्यांत जर कांहीं या संसारांत सार असेल तर हें गंगास्तोत्र या संसारांतील सार आहे. अर्थात् तें सेवन करण्यास योग्य आहे. तें इच्छिलेलें फल देणारें असून तें एक निर्मल सार म्हणजे तत्त्वच आहे. आचार्य म्हणतात, शंकराचा भक्त असलेल्या या शंकरानें रचलेलें हें स्तोत्र जो म्हणत राहील तो सुखी होईल. अशा रीतीनें हें गंगास्तोत्र समाप्त झालें आहे.

■ ■ ■

यमुनाष्टकम् ।

[भारताच्या पावन तीर्थांत गंगेनंतर यमुनेचाच दुसरा क्रमांक आहे. 'गंगायमुना' हा शब्दप्रयोग सर्वतोमुखी आहे. भगवान् श्रीकृष्णप्रभु यांच्या सर्व बाललीला यमुनेच्या कांठीं व वाळवंटींच झालेल्या असल्यामुळें यमुनेच्या माहात्म्याला कांहीं आगळेंच स्वरूप प्राप्त झालेलें आहे. संतांच्या गौळणी घ्या

किंवा गवयांच्या चिजा घ्या. ख्याल, टप्पा, ठुमरी, ध्रुपद, धमार अथवा साधी पदें घ्या, श्रीकृष्णाचें वर्णन आलें कीं, त्यांत यमुना ही आलीच पाहिजे. इतका वृंदावनविहारी गोपाल श्रीकृष्णप्रभु यांच्या चरित्राचा यमुनेशीं संबंध आहे. आपल्या बाळवंटीं झालेल्या बाळकृष्णाच्या लीला व त्यानिमित्तानें प्राप्त झालेली श्रीकृष्णाची संगति तिला अपुरी वाटली म्हणूनच कीं काय, कलिंद राजाच्या पोटीं जन्म घेऊन हिनें द्वारकाधीश भगवान् श्रीकृष्ण यांना वरलें.

श्रीकृष्णाच्या आठ पट्टराण्यांमध्यें अंतर्भूत होऊन ती सर्वकाळ श्रीकृष्णाच्या सांनिध्यांत राहिली. ' यम् उपरमे ' या धातूवरून यमुना शब्द निष्पन्न झाला आहे. श्रीकृष्णाच्या प्राप्तीकरितां हिनें इंद्रियांना आपआपल्या विषयापासून परावृत्त करून अत्यंत खडतर तपश्चर्या केली आहे म्हणून हिला यमुना असें नांव पडलें. ही विवस्वान् मनूची कन्या आणि यमाची बहीण आहे. हिने कार्तिक शुद्ध द्वितीयेला यमास ओवाळून भोजन घातलें म्हणून यम प्रसन्न झाला व त्यानें " आजच्या दिवशीं जे बहिणीकडून ओवाळून घेतील व बहिणीच्या हातचें भोजन घेतील ते सुखी होतील " असा यमुनेस वर दिला. म्हणून तेव्हांपासून भाऊबीजेची प्रथा पडली.

यमुना ही कलिंद पर्वतावर उगम पावली म्हणून हिला कालिंदी असें म्हणतात. पांडवांच्या कालापासून बड्या बड्या सम्राटांची राजधानी यमुनेच्याच कांठीं होती व आजहि स्वतंत्र भारताची मुख्य राजधानी दिल्ली यमुनेच्याच कांठीं आहे. आचार्यांनीं यमुनेची दोन स्तोत्रांनीं फारच उत्तम स्तुति केली आहे. तीं दोन्ही स्तोत्रें आम्ही वाचकांना सादर करीत आहोंत. पहिले स्तोत्र पंचचामर वृत्तांतलें असून तें सुबोधस्तोत्रसंग्रहाच्या पहिल्या भागांत दिलेल्या गणेशपञ्चरत्नाप्रमाणें म्हणावें.]

मुरारिकायकालिमाललामवारिधारिणी
तृणीकृतत्रिविष्टपा त्रिलोकशोकहारिणी ।
मनोऽनुकूलकूलकुञ्जपुञ्जधूतदुर्मदा
धुनोतु मे मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा ॥ १ ॥

श्रीकृष्ण प्रभूच्या अंगकांतीला सर्वतोपरी ललामभूत म्हणजे भूषणास्पद असें जल धारण करणारी, श्रीकृष्णहि काळा आणि यमुनाहि काळी. दोघांची समान कांति लक्षांत घेऊन आचार्यांनीं हें वर्णन केलेलें आहे. जिनें आपल्या सामर्थ्यानें स्वर्गालाहि कस्पटाप्रमाणें तुच्छ करून टाकलेलें आहे. अर्थात् स्वर्गा-

पेक्षांहि अधिक उत्तम सुख देण्याचें सामर्थ्य यमुनेमध्यें आहे हें लक्षांत घेऊनच आचार्यांनीं यमुनेला 'तृणीकृतत्रिविष्टपा' असें विशेषण दिलेलें आहे. यमुना ही त्रैलोक्याचा शोक हरण करणारी आहे. म्हणून तिला त्रिलोक-शोक-हारिणी असें म्हटलें आहे. भक्तजनांच्या मनाला रमविणारे असे जे आपल्या तीरावरील दाट वृक्षांचे समूह अथवा लतामंडप यांच्या योगानें ही भक्तजनांच्या अंतःकरणातील दुष्ट मदमोहादि विकारांना नाहींसें करते ती कलिंदराजतनया कालिंदी माझ्या मनांतील पापांचें सदासर्वकाळ प्रक्षालन करो. कांहीं पुस्तकांतून चौथ्या चरणांत 'धुनोतु मे' याच्याऐवजीं 'धुनोतु नो' असा पाठ आहे. या ठिकाणीं 'नो'चा अर्थ आमच्या असा करावा.

मलापहारिवारिपूरभूरिमण्डिताऽमृता
भृशं प्रपातकप्रवञ्चनातिपण्डिताऽनिशम् ।
सुनन्दनन्दनाङ्गसङ्गरागरञ्जिता हिता
धुनोतु मे मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा ॥ २ ॥

आपल्या प्रवाहामध्यें अवगाहन करणाऱ्या भक्तजनांच्या पातकांचा अपहार म्हणजे निरास करणारा जो वारिपूर म्हणजे जलांचा समूह त्याच्या योगानें जी अत्यंत सुशोभित दिसत आहे. अमृताप्रमाणें जिचें जल मधुर आहे. किंवा भक्तजनांना ती अमृताची म्हणजे मोक्षाची प्राप्ति करून देणारी आहे म्हणून तिला 'अमृता' असें म्हणतात.

गात्रेंदिवस मोठमोठ्या पातकांना फसवून त्यांचा फडशा पाडण्यांत जी अत्यंत निष्णात आहे. या ठिकाणीं 'प्रवञ्चन' याऐवजीं 'प्रपञ्चन' असा पाठ घेतल्यास त्याचा अर्थ 'खंडण' असा करावा. नंदनंदन भगवान् गोपालकृष्ण यांच्या सुकोमल गात्रांच्या संपर्कामुळें श्रीकृष्णाची अंगकांति तिच्यांत मिसळली आणि त्यामुळें जणुं कांहीं तिलाहि कृष्णवर्ण प्राप्त झाला आहे. जी 'हिता' म्हणजे भक्तजनांचें हित करणारी आहे ती कलिंदनंदिनी यमुना माझ्या मनांतील कामक्रोधादि सर्व मलांचें निरंतर प्रक्षालन करो.

लसत्तरङ्गसङ्गधूतभूतजातपातका
नवीनमाधुरीधुरीणभक्तिजातचातका ।

तटान्तवासदासहंससंवृता हि कामदा
धुनोतु मे मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा ॥ ३ ॥

जी आपल्या प्रवाहावरील शोभायमान असलेल्या तरंगांच्या संस्पर्शानें प्राणिमात्रांच्या पातकांचें प्रक्षालन करीत आहे. नव्या नव्या माधुर्याचा, आनंदाचा आस्वाद घेण्यांत धुरंधर असलेले बहुविध भक्तिसंपन्न असे जे भक्तजन तेच जिच्या कांठचे चातकपक्षी आहेत. आपल्या कांठीं वास्तव्य करणारे भक्तगण हेच कोणी हंसपक्षी यांनीं जी सर्वकाळ 'संवृता' म्हणजे व्यापलेली अथवा आश्रयिलेली आहे. येथें 'संसृता' असा पाठ घेतला तरी हाच अर्थ जाणावा. जी कामदा म्हणजे भक्तजनांचे सकल मनोरथ पूर्ण करणारी आहे. अशी ती कलिंदनंदिनी माता यमुना माझ्या मनांतील सकल पातकांचें सर्वकाळ प्रक्षालन करीत राहो, अशी माझी प्रार्थना आहे.

विहार-रास-स्वेद-भेद-धीर-तीर-मारुता
गता निरामगोचरे यदीयनीरचारुता ।
प्रवाह-साहचर्य-पूत-मेदिनी-नदी-नदा
धुनोतु मे मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा ॥ ४ ॥

जिच्या कांठावरील मंद शीतल आणि सुगंध वायु वाळवंटामध्यें विहार करीत असतांना किंवा रासक्रीडा करीत असतांना होणाऱ्या परिश्रमांचा परिहार करण्यांत मोठा धीर म्हणजे समर्थ आहे. जिच्या जलाचें सौंदर्य वाणीनें वर्णन करण्याच्या विषयाच्या पलीकडे गेलेले आहे. ते विरामाचा विषय झालेलें आहे. अर्थात् जिचें वर्णन करतांना वाणी विराम पावते. वाणीला तें वर्णन करतां येत नाहीं. जिच्या प्रवाहाच्या साहचर्यानें पृथ्वी व पृथ्वीवरील लहानमोठ्या नद्या 'पूत' म्हणजे पावन होत आहेत. ती कलिंदनंदिनी म्हणजे कलिंद प्रदेशाला आनंदित करणारी कलिंद पर्वतावर उगम पावणारी अथवा कलिंद राजाची कन्या असलेली देवी यमुना सदासर्वकाळ माझ्या मनांतील मलांचें — कामक्रोधादि विकारांचें — परिमार्जन करो.

तरङ्गसङ्गसैकताञ्चितान्तरा सदाऽसिता
शरन्निशाकरांशुमञ्जुमञ्जरीसभाजिता ।
भवार्चनाय चारुणाम्बुनाऽधुना विशारदा
धुनोतु मे मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा ॥ ५ ॥

प्रवाहावर लहरत असलेल्या तरंगांच्या संपर्कानें जिच्या वाळवंटांतील प्रदेश अत्यंत 'अञ्चित' म्हणजे शोभायमान दिसत आहेत. या ठिकाणीं कांहीं पुस्तकांत 'सैकतान्तराञ्चिता' असाहि पाठ आढळतो. अर्थ एकच आहे. जी सदासर्वकाळ (श्रीकृष्णाप्रमाणें) 'असिता' म्हणजे श्यामल वर्ण दिसत आहे. शरद्तूंतील चंद्राचीं प्रसन्न किरणें ह्याच कोणी सुंदर मंजरी, या मंजरींनीं ती सुशोभित दिसत आहे. अथवा शरद्तूंतील चंद्राच्या किरणांनीं मोहक दिसणाऱ्या वृक्षांच्या मंजरींनीं ती सुशोभित दिसत आहे.

आपल्या सुंदर जलानें सृष्टीचा सत्कार करण्याकरितां जणूं कांहीं अजूनहि ती निपुण आहे. अजूनहि सर्व सृष्टीला ती आपल्या जलानें संतोष देण्यांत निष्णात आहे. अथवा ज्याच्यापासून सर्व सृष्टि उद्भूत होते तो 'भव' म्हणजे परमात्मा भगवान् श्रीहरि याचें आपल्या निर्मल जलानें पूजन करण्याकरितां अजूनहि ती निष्णात आहे. अशा तऱ्हेची ती कलिंदराजकन्या यमुना सदासर्वकाळ माझ्या मनोमलांचा मनांतील दुष्ट विकारांचा निरास करो.

जलान्तकेलिकारिचारुराधिकाङ्गरागिणी
स्वभर्तुरन्यदुर्लभाङ्गसङ्गतांशभागिनी ।
स्वदत्तसुप्तसप्तसिन्धुभेदनाऽतिकोविदा
धुनोतु मे मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा ॥ ६ ॥

जी आपल्या प्रवाहामध्यें जलक्रीडा करणाऱ्या परम सुंदर अशा राधिकेच्या अंगरागानें युक्त झालेली आहे. अर्थात् श्रीराधिकेच्या अंगाला लावलेली उटी जिच्या पाण्यांत मिसळलेली आहे. त्याचप्रमाणें इतर जनांना अत्यंत दुर्लभ असा जो आपल्या भर्त्याचा अर्थात् आनंदकंद भगवान् श्रीकृष्णप्रभु यांचा गात्रसंस्पर्श म्हणजे पाण्यांत खेळणें, स्नान करणें, पोहणें इत्यादि प्रसंगीं होणारा जो अंगसंस्पर्श म्हणजे अंगस्पर्शानें होणारे सुख हें जिच्या भाग्याला सहजच लाभलेलें आहे. जी 'स्वदत्त' म्हणजे स्वतः अर्पण केलेल्या जलानें, सुप्त म्हणजे प्रशान्त असल्या सप्त सागरांचें भेदन करण्यांत अर्थात् सागरांमध्यें प्रक्षोभ म्हणजे खळबळाट निर्माण करण्यांत 'अतिकोविद' म्हणजे अत्यंत निष्णात आहे. ती कलिंदनंदिनी यमुना माझ्या आंतरिक मलांचें बुद्धींतील दोषांचें सर्वकाळ प्रक्षालन करो.

जलच्युताच्युताङ्गरागलम्पटालिशालिनी
विलोलराधिकाकचान्तचम्पकालिमालिनी ।
सदावगाहनावतीर्णभर्तृभृत्यनारदा
धुनोतु मे मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा ॥ ७ ॥

श्रीकृष्णप्रभु यमुनेमध्यें स्नान करीत आहेत. त्यांच्या अंगाचें उटणें पाण्यांत मिसळून प्रवाहांत वहात आहे. त्याच्या सुगंधानें सुग्ध झालेल्या भ्रमरांच्या झुंडीच्या झुंडी यमुनेच्या प्रवाहावर गुंजारव करीत गिरट्या घालीत आहेत आणि त्यामुळें यमुनेच्या प्रवाहाची शोभा अपूर्व दिसत आहे. हें दृश्य लक्षांत घेऊन आचार्य या सातव्या श्लोकानें वर्णन करीत आहेत.

पाण्यामध्यें मिसळलेली अच्युताच्या – श्रीकृष्णाच्या देहाची जी उटी तिच्या सुगंधानें लंपट म्हणजे मुग्ध झालेले 'अलि' म्हणजे भ्रमर त्यांच्या योगानें शालिनी शोभणारी अथवा यमुनेमध्यें स्नान करीत असतांना यमुनेच्या जलांत मिसळलेल्या श्रीकृष्णाच्या अंगाला लावलेल्या उटण्याच्या सुवासानें मोहित झालेल्या ज्या अलि म्हणजे गोपसख्या गौळणी त्यांच्या योगानें शालिनी म्हणजे शोभणारी, त्याचप्रमाणें वाळवंटांत अथवा पाण्यांत खेळत असतांना हालणाऱ्या राधिकेच्या वेणींतून गळून पडणाऱ्या चाफ्याच्या फुलांच्या माळांनीं जणुं कांहीं यमुनाच माळांना धारण करीत आहे असें दिसत आहे.

आपल्या पतीचे सेवक, भक्त, नाम्नादि रूपि हे जिच्यामध्यें सदासर्वकाळ स्नान करण्याकरितां येत असतात ती कलिंदराजतनया यमुना माझ्या मानसिक मालिन्याला दूर करो.

सदैव नन्दनन्दकेलिशालिकुञ्जमञ्जुला
तटोत्थफुल्लमल्लिकाकदम्बरेणुसोज्ज्वला ।
जलावगाहिनां नृणां भवाब्धिसिन्धुपारदा
धुनोतु मे मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा ॥ ८ ॥

जिच्या कांठचे रम्य लतामंडप नंदाला आनंदविणाऱ्या श्रीकृष्णाच्या विविध क्रीडेमुळें सदासर्वकाळ शोभायमान दिसत आहेत, अथवा नंदनंदन गोपाल श्रीकृष्णप्रभु यांच्या अलौकिक लीलांनीं युक्त असलेल्या लतामंडपामुळें जी

सर्वकाळ रम्य दिसत आहे. त्याचप्रमाणें आपल्या कांठीं वाढलेल्या आणि प्रफुल्लित झालेल्या मालतीलता आणि कदंब वृक्ष – कळंबाचीं झाडें यांच्या फुलांतील परागांनीं जी अत्यंत उज्ज्वल म्हणजे सुशोभित दिसत आहे, जी आपल्या जलामध्यें अवगाहन म्हणजे स्नान करणाऱ्या लोकांना भवसागराच्या दुस्तर असलेल्या संसाररूपी महानदीच्या पैलतीराला पोहोंचवितें ती कलिंदकन्या यमुना सर्वकाळ माझ्या मनाला निर्मळ ठेवो, हीच माझी नम्र प्रार्थना आहे.

■ ■ ■

यमुनाष्टकस्तोत्रम् ।

[हें दुसरें यमुनाष्टकहि आचार्यांनीं रचलेलें अत्यंत उत्तम स्तोत्र आहे. यांतील पहिल्या व शेवटच्या श्लोकांची रचना शिखरिणी वृत्तांतील असून बाकीचे सात श्लोक हंसगति वृत्तांत लिहिलेले आहेत. यमुनेचें वर्णन अत्यंत उत्तम आहे. भक्तजनांनीं यमुनेची प्रार्थना करतांना हें स्तोत्र अवश्य म्हणावें. श्लोकांत मधून मधून घातलेल्या आडव्या रेघा म्हणावयास सोपें जावें म्हणून दिल्या आहेत.]

कृपापारावारां तपनतनयां तापशमनीं
मुरारिप्रेयस्कां भवभयदवां भक्तवरदाम् ।
वियज्जालाल्मुक्तां श्रियमपि सुखातेः प्रतिदिनं
सदा धीरो नूनं भजति यमुनां नित्यफलदाम् ॥ १ ॥

पारावार म्हणजे समुद्र. यमुना ही मूर्तिमंत कृपेचा सागर आहे. ती तपनतनया म्हणजे सूर्याची कन्या असूनहि स्वतः मात्र भक्तजनांचा ताप शमन करणारी आहे. सुर दैत्याचा वध करणारे भगवान् श्रीकृष्ण यांची ती अत्यंत आवडती आहे. 'दव' म्हणजे दावाग्नि वणवा हा जसा जंगलांतील वाळलेल्या गवताला चुटकीसरसे भस्म करून टाकतो त्याप्रमाणें यमुनाहि भक्तजनांच्या मनांत असलेल्या संसारभयाला क्षणांत नाहींशी करते. यमुना ही भक्तांना अभीष्ट वर देणारी आहे. 'वियज्जाल' म्हणजे नभोमंडल. अर्थात् आकाशमंडलांतून अवतीर्ण झालेली जणुं कांहीं मूर्तिमंत 'श्री' म्हणजे लक्ष्मीच आहे. नित्य सुखाचा लाभ होण्यासाठीं शहाणा मनुष्य रोजच्या रोज निरंतर नित्य फल देणाऱ्या अशा त्या यमुना मातेला खरोखर सदासर्वकाळ भजत रहातो. कांहीं पुस्तकांतून

"विपज्जालोन्मुक्तां श्रियमपि सुखाप्तेः प्रददतीं" असा तिसऱ्या चरणाचा पाठ आढळतो. हा पाठ घेतल्यास भक्तजनांना निर्मळ निरुपाधिक सुखाचा लाभ होण्यासाठीं विपज्जालांतून मुक्त झालेल्या अर्थात् विपज्जालानें विरहित असलेल्या 'श्रियं' म्हणजे वैभवाला 'प्रददतीं' प्राप्त करून देणारी असा अर्थ करावा.

मधुवनचारिणि भास्करवाहिनि जाह्नविसङ्गिनि सिन्धुसुते
मधुरिपुभूषिणि माधवतोषिणि गोकुळभीति-विनाशकृते ।
जगदघमोचिनि मानसदायिनि केशवकेलिनिदानगते
जय यमुने जय भीतिनिवारिणि सङ्कटनाशिनि पावय माम् ॥२॥

यमुना नदी ही मधुवनांतून अर्थात् गोकुळवृन्दावनाच्या परिसरांतून संचार करते, वहाते. म्हणून तिला तिच्या अधिष्ठात्री देवतेला 'मधुवनचारिणी' असें म्हटलें आहे. यमुना नदी ही सूर्याची कन्या असल्यामुळें तिला 'भास्करवाहिनी' असें म्हटलें आहे. यमुना नदी ही प्रयागराज त्रिवेणीसंगमापासून गंगेशीं एकरूप होऊन चाललेली आहे म्हणून तिला 'जाह्नविसंगिनि' या शब्दानें संबोधिलें आहे. हे माते यमुने ! तूं सिंधुसुता म्हणजे सागरकन्या अर्थात् प्रत्यक्ष लक्ष्मीच आहेस. मधुदैत्याचा वध करणारे भगवान् श्रीमधुसूदन अर्थात् श्रीकृष्ण यांचें तूं भूषण आहेस. माधव म्हणजे लक्ष्मीकांत भगवान् श्रीकृष्णप्रभु यांना तुझ्या कांठीं फारच आनंद वाटतो म्हणून तुला माधवतोषिणी असें म्हटलें आहे. गोकुळांत रहाणाऱ्या गोपगोपीजनांच्या — भक्तजनांच्या अंतःकरणांतील भयाचा तूं नाश करतेस. आई यमुने ! तूं जगाच्या पापाचा नाश करून जगाला दुःखांतून सोडवितेस. हे यमुने ! तूं मनांतील इष्ट फलें भक्तांना अर्पण करतेस म्हणून तुला 'मानसदायिनी' असें म्हणतात. केशवाच्या — श्रीहरीच्या ज्या अनंत आणि अवर्णनीय अशा बाललीला त्यांचें निदान म्हणजे मूळ आश्रयस्थान तूंच आहेस. हे यमुने माते ! तुझा जयजयकार असो. तूं सर्व भीतींचें निवारण करणारी आणि संकटांचा नाश करणारी आहेस. आई यमुने ! तुझा विजय असो. तूं मला पावन कर. पवित्र कर.

अयि मधुरे मधुमोदविलासिनि शैलविदारिणि वेगभरे
परिजनपालिनि दुष्टनिषूदिनि वाञ्छितकामविलासधरे ।
व्रजपुरवासि-जनार्जितपातक-हारिणि विश्वजनोद्धरिके
जय यमुने जय भीतिनिवारिणि सङ्कटनाशिनि पावय माम् ॥३॥

हे माते यमुने ! तुझें जल अत्यंत मधुर आहे. तुझ्या कांठीं गोड अर्थात् मनोहर सुगंध सारखा दरवळत असतो. जणुं कांहीं सुगंधाचा विलासच तुझ्या कांठीं चालला आहे. तूं हिमाचलामध्यें विहार करतेस. यमुनेचा उगम 'जमनोत्री' या ठिकाणीं होतो व तेथून ती अलकनंदेच्या मंदाकिनीच्या अथवा गंगेच्या प्रवाहाप्रमाणें हिमाचल प्रदेशांतून अतिशय वेगानें धो धो वहात खालीं येते व तीर्थराज प्रयाग क्षेत्रामध्यें गंगेशीं येऊन मिळते. येथेंच सूक्ष्मरूपानें सरस्वतीचाहि समागम होत असल्यामुळें या ठिकाणाला त्रिवेणीसंगम असें म्हणतात.

हिमाचल प्रदेशांत यमुना अत्यंत जोरानें वहात असल्यामुळें आचार्यांनीं 'वेगभरे' या शब्दानें तिला संबोधिलेले आहे. हे माते यमुने ! तूं भक्तजनांचें परिपालन करणारी आणि दुष्टजनांचा नाश करणारी आहेस. तूं भक्तजनांना अभीष्ट असलेल्या सुखाची जणुं कांहीं विलासभूमि आहेस. अर्थात् भक्तजनांच्या सकल मनकामना तुझ्या कांठीं पूर्ण होतात. वृंदावन नगरीमध्यें वास्तव्य करणाऱ्या भक्तजनांचीं, त्यांच्या हातून घडलेलीं सर्व पापें तूं नाहिशीं करतेस. तूं सर्व जनांचा उद्धार करणारी आहेस. हे यमुने माते ! तुझा जयजयकार असो. तूं मला पावन कर.

अतिविपदाम्बुधिमग्नजनं भवतापशताकुलमानसकं
गतिमतिहीनमशेषभयाकुलमागतपादसरोजयुगम् ।
ऋणभयभीतिमनिष्कृतिपातक-कोटिशतायुतपुञ्जतरं
जय यमुने जय भीतिनिवारिणि सङ्कटनाशिनि पावय माम् ॥४॥

आई यमुने ! हा तुझा सेवकजन म्हणजे मी अतिशय आपत्तींच्या सागरांत बुडून गेलों आहें. संसारांतील शेकडों दुःखांनीं माझें मन अत्यंत व्याकुळ झालें आहे. मला कांहीं गति आणि मति उरली नाहीं. गति म्हणजे आश्रय आधार, अर्थात् तुझ्याशिवाय मला कोणाचाहि आधार नाहीं. मति म्हणजे बुद्धि सुविचार, अर्थात् सांसारिक दुःखांनीं गांजल्यामुळें मला कांहीं सुचत नाहीं. सर्व प्रकारच्या भयानें मी घाबरून गेलों आहें. आई, तुझ्या चरणकमलीं मी शरण आलों आहे. देवऋण, ऋषिऋण (धर्मऋण, देशऋण) इत्यादि ऋणांच्या भयानें मी अगदी घाबरलों आहें. अर्थात् या सर्व ऋणांतून मला मुक्त होतां आलें नाहीं. ज्या पातकांचें निरसन करण्यास कांहीं उपाय नाहीं अशा शेंकडों हजारों कोट्यवधि

पातकांचा मी एक भला मोठा राशीच आहें. आई यमुने ! तूं मला पावनः कर. तुझा जयजयकार असो.

नवजलदद्युति-कोटिलसत्तनु-हेयमयाभर-रञ्जितके
बडिदवहेलि-पदाञ्चलचञ्चल-शोभितपीतसुचेलधरे ।
मणिमयभूषण-चित्रपटासन-रञ्जितगञ्जितभानुकरे
जय यमुने जय भीतिनिवारिणि सङ्कटनाशिनि पावय माम् ॥५॥

आई यमुने ! 'नवजलद' म्हणजे पाण्यानें पूर्णपणें भरलेला ढग. अशा ढगांच्या ज्या कोट्यवधि अर्थात् असंख्य नीलवर्ण कांतीच्या छट्टा, त्या कांतीच्या समूहाप्रमाणें तुझी मूर्ति फारच सुंदर शोभत आहे. तात्पर्य, पाण्यानें भरलेल्या असंख्य ढगांच्या समुदायाप्रमाणें कृष्णवर्ण असलेली तुझी मूर्ति फारच सुंदर दिसत आहे. तूं धारण केलेल्या सुवर्णमय आभरणांनीं -- अलंकारांनींहि पण अत्यंत शोभायमान दिसत आहेस.

ज्याचा चंचल पदर चपलपणांत विद्युल्लतेलाहि तिरस्कृत करीत आहे. अर्थात् विद्युल्लतेपेक्षांहि तो अत्यंत चंचल आहे अशा भरजरी पदरानें सुशोभित असलेलें सुंदर वस्त्र तूं परिधान केलेलें आहे. रत्ननडित अलंकार, विविध रंगांचीं वस्त्रें आणि रंगीबेरंगी सिंहासन यांच्या योगानें सुशोभित असलेली तूं आपल्या तेजानें सूर्यकिरणांनाहि पराभूत केलें आहेस. अर्थात् सूर्यापेक्षांहि तूं अधिक तेजस्वी दिसत आहेस. आई यमुने ! सर्व संकटांचा आणि भीतींचा नाश करणारी तूं मला पावन कर. तुझा जयजयकार असो.

शुभपुलिने मधुमत्तयदूद्वव-रासमहोत्सव-केलिभरे
उच्चकुलाचल-राजितमौक्तिक-हारमयाभर-रोदसिके ।
नवमणिकोटिक-भास्करकञ्चुक-शोभिततारक-हारयुते
जय यमुने जय भीतिनिवारिणि सङ्कटनाशिनि पावय माम् ॥६॥

आई यमुने ! तुझीं पुलिनें म्हणजे वाळवंटें हीं अत्यंत शुभ म्हणजे रमणीय आहेत. नेत्रांना आणि मनाला तीं आकर्षक वाटतात. मधुपान करून आनंदांत निमग्न झालेले यदुकुलोत्पन्न श्रीबलराम आणि भगवान् श्रीकृष्ण प्रभु यांच्या रास-लीलामहोत्सवांचा भर तुझ्याच या परम पावन तटाकीं ठिकठिकाणीं

झालेला आहे. तुझ्याच कांठीं श्रीकृष्ण प्रभूंनीं रास-लीलामहोत्सव आनंदाच्या भरांत मोठ्या संख्येनें पार पाडलेले आहेत.

अत्यंत उंच उंच असलेल्या कुलपर्वताच्या ठिकाठीं तूं जणुं कांहीं मौक्तिकांच्या हाराप्रमाणें शोभून दिसतेस. मोत्यांच्या हाराप्रमाणें असलेल्या तुझ्या निर्मल प्रवाहानें भूमंडळाला आणि नभोमंडळाला अद्वितीय शोभा प्राप्त झालेली आहे. कोटिसूर्याप्रमाणें तेजस्वी असलेल्या नवीन रत्नांनी जडविलेली कंचुकी म्हणजे चोळी परिधान केलेली असल्यामुळें तूं फारच शोभायमान दिसत आहेस. तूं आपल्या गळ्यांत जणुं कांहीं आकाशांतील नक्षत्रांचे हारच घातलेले आहेस. आई यमुने ! सर्व भयांचें निवारण करणारी आणि संकटांचें हरण करणारी तूं मला पावन कर. तुझा जयजयकार असो.

करिवरमौक्तिक-नासिकभूषण-वातचमत्कृत-चञ्चलके
मुखकमलामल-सौरभचञ्चल-मत्तमधुव्रत-लोचनिके ।
मणिगणकुण्डल-लोलपरिस्फुरदाकुल-गण्डयुगामलके
जय यमुने जय भीतिनिवारिणि सङ्कटनाशिनि पावय माम् ॥७॥

हत्तीच्या गंडस्थलांतून निर्माण होणाऱ्या मोत्यांना गजमौक्तिक म्हणतात. हे मोतीं सर्व मोत्यांत श्रेष्ठ मानले जातात. सर्वश्रेष्ठ लोक भूषण म्हणून ते अंगावर धारण करतात. आई यमुने ! तुझ्या नाकांतील भूषणभूत असले मोती अत्यंत श्रेष्ठ असलेल्या हत्तींच्या गंडस्थळांतून निर्माण झालेले आहेत. ते वाऱ्यानें फारच लकलक हालत आहेत. त्यांची चंचलता पाहून आमच्या अंतःकरणांत मोठें कुतूहल आणि आनंद वाटत आहे. माते यमुने ! तुझे दोन नेत्र म्हणजे जणुं कांहीं मुखकमलाच्या निर्मल सौरभाचा लाभ घेण्यासाठीं प्राप्त झालेले चंचल आणि मस्त असे ते दोन भ्रमरच आहेत. आई यमुने ! तुझ्या कानांतील तेजस्वी रत्नांच्या समूहानें युक्त असलेलीं कुंडलें हालूं लागलीं म्हणजे त्यांची लकाकणारी कांति दोन्ही गालांवर पसरते. त्यामुळें स्वाभाविकच अत्यंत तेजस्वी असलेले तुझे गाल – नव्हे संपूर्ण मुखकमलच अत्यंत निर्मल दिसत आहे. तें फारच उत्तम रीतीनें शोभत आहे. आई यमुने ! तूं संसारभयाचें निवारण करणारी आणि संकटांचा नाश करणारी आहेस. तुझा जयजयकार असो. तुझा विजय असो. तूं मला पावन कर. तूं मला पवित्र कर. हीच माझी तुझ्या चरणीं प्रार्थना आहे.

कल-रव-नूपुर-हेमसयाचित-पादसरोरुह-सारुणिके
धिमिधिमिधिमिधिमि-तालविनोदित-मानसमञ्जुल-पादगते ।
तव पदपङ्कजमाश्रित-मानवचित्त-सदाखिल-तापहरे
जय यमुने जय भीतिनिवारिणि सङ्कटनाशिनि पावय माम् ॥८॥

हे आई यमुने ! तुझे 'सारुणिक' म्हणजे अरुण वर्णानें युक्त अर्थात् आरक्तवर्ण असलेले दोन्ही चरणकमल मधुर नाद करणाऱ्या सोन्याच्या नूपुरांनीं युक्त आहेत. तुझ्या चरणकमलांची गति 'मानसमञ्जुल' म्हणजे मनाला आकृष्ट करणारी अर्थात् अत्यंत मनोहर आहे. त्याचप्रमाणें तुझ्या धिमिधिमि अशा तालाच्या गतीनें भक्तांचीं मनें विनोदित होतात, रमतात. तुझ्या चरणकमलाचा जे मानव भक्तियुक्त अंतःकरणाने आश्रय घेतील त्या मानवांच्या चित्तांतील अखिल तापांना तूं सदासर्वकाळ दूर करतेस. हे आई ! सर्व भयांचें निरसन करणारी आणि संकटांचा नाश करणारी तूं धन्य आहेस. तुझा जयजयकार असो. तूं मला पवित्र कर.

भवोत्तापाम्भोधौ निपतितजनो दुर्गतियुतो
यदि स्तौति प्रातः प्रतिदिनमनन्याश्रयतया ।
हयाहेवैः कामं करकुसुमपुञ्जै रविसुतां
सदा भोक्ता भोगान्मरणसमये याति हरिताम् ॥ ९ ॥

संसारतापांच्या अर्थात् सांसारिक दुःखांच्या सागरांत गटांगळ्या खात असलेला मानव, जेव्हां दुर्गति भोगीत असतो, तेव्हा जर तो रोजच्या रोज प्रातःकाळीं अनन्यचित्तानें तुझ्या चरणीं शरण येऊन तुझी या स्तोत्रानें स्तुति करील, तर त्याचीं सर्व दुःखें नाहींशीं होतील. त्याला सर्व वैभव प्राप्त होईल. त्याच्या दारीं घोडे खिंकाळतील. हत्ती झुलतील. गायी हंबरतील. गळ्यांत फुलांच्या माळा आणि हातांत गजरे पडतील. याप्रमाणें इहलोकीं तो सदासर्वकाळ सर्व सुखांना भोगून अंतीं मरणसमयीं, आई यमुने ! तुझ्या कृपेनें तो हरिस्वरूपाला विष्णुस्वरूपाला प्राप्त होईल. त्याला सारूप्यमुक्तीचा लाभ होईल.

■ ■ ■

मणिकर्णिकाष्टकम् ।

[मणिकर्णिका हें काशी क्षेत्रांतील अत्यंत महत्त्वाचें तीर्थस्थान आहे. माळेमध्यें मेरुमणि, हारामध्यें पुष्पगुच्छ किंवा कंठ्यामध्यें जसें रत्नजडित पदक असावें त्याप्रमाणें काशी क्षेत्रांत असलेलें मणिकर्णिका तीर्थ हें स्थानिक लोकांच्या मनाला व यात्रेकरूंच्या मनाला आपल्याकडे आकृष्ट करून घेत असतें. चंद्रकलेप्रमाणें अर्धवर्तुलाकार वहाणाऱ्या गंगेच्या कांठीं वसलेल्या काशी क्षेत्रांत अगदीं ठळकपणें मणिकर्णिका तीर्थ विराजत आहे. मणिकर्णिका ही काशी क्षेत्रांतील स्मशानभूमि आहे; तरी पण स्मशानांतील उद्विग्नता किंवा भयानकपणा येथें मुळींच आढळून येत नाहीं. दशाश्वमेध घाटाप्रमाणें मणिकर्णिका घाटहि यात्रेकरूंनीं व स्नानसंध्या, पूजाअर्चा करणाऱ्या लोकांनीं गजबजलेला असतो. ठिकठिकाणीं कीर्तनें, भजनें, पुराणें, प्रवचनें चालू असतात. खुद्द आद्य शंकराचार्य यांनींहि मणिकर्णिका घाटावर भाष्याचे पाठ सांगितलेले आहेत व प्रवचनें केलेलीं आहेत.

' मणिमयी कर्णिका विद्यते यत्र सा मणिकर्णिका ' असा या शब्दाचा विग्रह आहे. भगवान् श्रीविष्णु यांनीं मणिकर्णिकेच्या कांठीं फार खडतर तपश्चर्या केली होती. ती त्यांची तपश्चर्या पाहून शंकरांनाहि अत्यंत आश्चर्य वाटलें. आश्चर्यचकित होऊन शंकरांनीं मान डोलविली तोंच त्यांच्या कानांतील रत्नजडित वर्तुलाकार असलेलें कर्णभूषण – कुंडल अर्थात् मणिकर्णिका खालीं पडली तेव्हांपासून या स्थानाला मणिकर्णिका हें नांव पडलें. पूर्वी या स्थानाला ' चक्रपुष्करिणी तीर्थ ' असें नांव होतें. श्रीविष्णूंनीं स्वतः आपल्या सुदर्शनचक्रानें खणून हें तीर्थ तयार केलेलें आहे. मणिकर्णिका घाटावर आजहि पुष्करिणी तीर्थाचें कुंड उपलब्ध आहे.

" चक्रपुष्करिणीतीर्थं पुरा ख्यातमिदं शुभम् ।
त्वया चक्रेण खननात् शङ्खचक्रगदाधर ॥
मम कर्णात्पपातेयं यदा च मणिकर्णिका ।
तदा प्रभृति लोके च ख्याताऽस्तु मणिकर्णिका ॥ "

असें प्रत्यक्ष शंकरांचेंच वचन काशीखंडांत दिललें आहे. (मणिकर्णिकाख्यान अध्याय २६.)

काशीच्या पंचक्रोशी यात्रेचा आरंभ मणिकर्णिकेपासूनच होतो. संगम, पंचगंगा, मणिकर्णिका, दशाश्वमेध आणि अस्सीघाट या पंचतीर्थांमध्येंहि मणिकर्णिकेलाच प्राधान्य आहे. मणिकर्णिकेश्वराचें दर्शन घेऊनच श्रीविश्वेश्वराची पूजा करावी असें सांगितलेलें आहे. आचार्यांनीं या स्तोत्रांत मणिकर्णिका तीर्थाचा महिमा मोठ्या बहारीनें वर्णन केलेला आहे.]

त्वत्तीरे मणिकर्णिके हरिहरौ सायुज्यमुक्तिप्रदौ
वादं नौ कुरुतः परस्परमुभौ जन्तोः प्रयाणोत्सवे ।
मद्रूपो मनुजोऽयमस्तु हरिणा प्रोक्तः शिवस्तत्क्षणा-
त्तन्मध्याद्भृगुलाञ्छनो गरुडगः पीताम्बरो निर्गतः ॥१॥

हे माते मणिकर्णिके गंगे ! तुझ्या कांठीं भगवान् श्रीहरि आणि भगवान् श्रीशंकर हे दोघेहि मनुष्यांना अहमहमिकेनें सायुज्य मुक्ति देण्यास सदासर्वकाळ तत्पर असतात. एकदां एका व्यक्तीच्या प्राणप्रयाण-महोत्सवकाळीं म्हणजे मरणसमयीं भगवान् विष्णु आणि भगवान् शंकर हे दोघे एकमेकांमध्यें वाद करूं लागले. विष्णु म्हणाले, हा मनुष्य मरणोत्तरकालीं माझ्या स्वरूपाला प्राप्त होईल. शंकर म्हणाले, छेः ह्याला मृत्यूनंतर माझें स्वरूप प्राप्त व्हावें असा मी प्रयत्न करणार. याप्रमाणें शंकर बोलत आहेत तोंच त्या मनुष्याच्या देहांतून 'भृगुलांछन' म्हणजे श्रीवत्सचिन्ह धारण करणारा गरुडवाहन व पीतवस्त्र परिधान केलेला भगवान् विष्णु प्रगट झाला असें सर्वांच्या निदर्शनास आलें ! तात्पर्य, मणिकर्णिकेचा महिमा एवढा मोठा आहे कीं, मणिकर्णिकेच्या कांठीं मृत्यु येतांक्षणींच मानव हा विष्णुस्वरूप अथवा शिवस्वरूप होतो.

एकदां सर्व देवांत श्रेष्ठ देव कोण ? अशी चर्चा ऋषिसमुदायांत सुरू झाली. भृगुऋषींनीं निर्णय देण्याचें ठरविलें. भृगुऋषि सत्यलोकाला गेले. तेथें ब्रह्मदेव आपल्या आसनावर विराजमान होते. भृगुऋषि हे ब्रह्मदेवाचे पुत्र; पण ब्रह्मदेवाला हात न जोडतां, नमस्कार न करतां तसेच उभे राहिले. याचा ब्रह्मदेवाला मोठा राग आला परंतु ब्रह्मदेवानें तो राग विवेकानें मनांतल्या मनांतच शमविला.

भृगुऋषि तेथून निघाले ते कैलास पर्वतावर शंकरांना भेटले. शंकर त्यांचे स्वागत करण्याकरितां उठून उभे राहिले. शंकरांचें आणि भृगुऋषींचें भावाभावाचें नातें. शंकर प्रेमानें आलिंगन द्यावयास निघाले तोंच भृगुऋषि म्हणाले, मला स्पर्श

करूं नका. तुम्ही स्मशानांत रहातां, चिताभस्म लावतां, अमंगल आहे तुमचें वागणें. हें ऐकून शंकरांना मोठा राग आला. ते त्रिशूल उगारून भृगुऋषींना मारावयास धांवले ! इतक्यांत पार्वतीनें शंकरांचें पाय धरले व आपल्या गोड आणि प्रेमळ शब्दांनीं त्यांचें सांत्वन केलें !

भृगुऋषि तेथून निघाले ते वैकुंठलोकीं विष्णूंच्या मंदिरांत आले. तेथे भगवान् श्रीविष्णु विश्रांति घेत होते. भृगुऋषींनीं त्यांच्या वक्षःस्थलावर लाथ मारली ! विष्णु जागे झाले. पहातात तर भृगुऋषि जवळ उभे आहेत ! खडबडून उठले. अंथरुणांतून बाहेर आले. भृगुऋषींचे पाय धरले ! प्रार्थना केली. महाराज ! क्षमा करा. आपल्यासारखी थोर विभूति घरीं आली असतां मी अंथरुणांतच पडून रहावें; हा माझा मोठा अपराध आहे. माझ्या हृदयावर आपण लाथ मारलीत. आपलें चरण-कमल अत्यंत कोमल आहेत. माझें हृदय लक्ष्मीच्या नित्य-सान्निध्यानें अत्यंत कठोर झालेलें आहे. माझ्या कठोर हृदयाचा आघात आपल्या कोमल चरणाला झाला. आपणांस कष्ट झाले. मला खेद वाटतो. आपण क्षमा करा. आपल्या चरण-कमलाच्या कृपेनेंच मी त्रैलोक्याचा पालनकर्ता झालों. आपल्या आशीर्वादानेंच मी लक्ष्मीवान् बनलों. मी आपल्या चरणकमलाचें चिन्ह माझ्या वक्षःस्थलावर नित्य धारण करीन असें म्हणून विष्णूनें तेव्हांपासून भृगु ऋषींच्या चरणाचें चिन्ह आपल्या वक्षःस्थलीं धारण केलें ! यांच चिन्हाला 'भृगुपद' किंवा 'श्रीवत्स' असें म्हणतात. या चिन्हामुळेंच विष्णूला 'भृगुलांछन' किंवा 'श्रीवत्सलांछन' असें नांव पडलें. केवढी ही सहिष्णुता ! किती ही शांति ! केवढा हा सत्त्वगुणाचा प्रकर्ष ! किती ही नम्रता ! केवढी ही आदरातिथ्यशीलता !

भृगुऋषींनीं हा वृत्तान्त ऋषि-समाजांत येऊन सांगितला व यावरून सर्वांनीं सर्वांत श्रेष्ठ देव कोणता या प्रश्नाचें उत्तर लक्षांत घेतलें ! विष्णूचें 'भृगुलांछन' किंवा 'श्रीवत्सलांछन' हें विशेषण वाचतांना वाचकांनीं हा इतिहास अवश्य लक्षांत द्यावा.

इन्द्राद्याखिदशाः पतन्ति नियतं भोगक्षये ते पुन-
र्जायन्ते मनुजास्ततोऽपि पशवः कीटाः पतङ्गादयः ।
ये मातर्मणिकर्णिके तव जले मज्जन्ति निष्कल्मषाः
सायुज्येऽपि किरीटकौस्तुभधरा नारायणाः स्युर्नराः ॥२॥

'इन्द्राद्याः' म्हणजे इन्द्र ज्यांच्यामध्यें प्रमुख आहे असे अर्थात् इन्द्र, चन्द्र, वरुण, कुबेर, अग्नि, वायु इत्यादि, 'त्रिदशाः' म्हणजे देव. इन्द्र देवांचा राजा व अग्नि, वायु, वरुण, कुबेर, सूर्य, चन्द्र इत्यादि सर्व देव पदरीं पुण्याचें गांठोडें आहे तोंपर्यंत स्वर्गलोकामध्यें स्वर्गीय सुखें भोगीत रहातात. पुण्याचें गांठोडे संपलें कीं, त्यांना स्वर्गलोकांतून खालीं मर्त्यलोकांत यावें लागतें, मनुष्यरूपानें जन्म घ्यावा लागतो. मनुष्यलोकांतूनहि खालीं खालीं पशु, पक्षी, कीट, पतंग इत्यादि योनींमध्यें जन्म घ्यावा लागतो. तात्पर्य, पुण्य संपलें कीं, इन्द्रादि देवांचाहि अधःपात होतो, त्यांनाहि आपआपल्या स्थानांतून भ्रष्ट व्हावें लागतें व मनुष्य, पशु, पक्षी कीट, पतंग यांचे देह धारण करावें लागतात. जेथें स्वर्गीय देवांनाहि स्थानभ्रष्ट व्हावें लागतें तेथें मानवांची कथा काय ? यावर कोणी अशी शंका घेईल कीं, एकदां स्वर्गलोकाची प्राप्ति झाली म्हणजे पुन्हां अधःपात होत नाहीं. यज्ञयागादि कर्मांचें व स्वधर्मांचें आचरण करून मनुष्य एकदां देवरूपाला प्राप्त झाला कीं त्याचा पुन्हां अधःपात होत नाहीं ' अपाम सोममम्रता अभूम ', ' यन्न दुःखेन सम्भिन्नं न च ग्रस्तमनन्तरम् ' (आम्ही सोमपान केलें व 'अमृत' झालों, अमर झालों. ज्याची प्राप्ति झाली असतां दुःखें भोगावीं लागत नाहींत व ज्याचा लाभ झाला असतां पुन्हां नाश होत नाहीं.) असें स्वर्गाचें वर्णन केलेलें आहे. तर मग स्वर्गाचा नाश होतो व देवहि खालीं येतात, मनुष्य पशु-पक्षी होतात हें म्हणणें बरोबर नाहीं.

यावर उत्तर असें कीं, ही शंकाच चुकीची आहे. ' तद्यथेह कर्मचितो लोकः क्षीयते एवमेवामुत्र पुण्यचितो लोकः क्षीयते ' या श्रुतिवाक्यानें स्पष्टच सांगितलें आहे कीं, ज्याप्रमाणें प्रयत्नानें संपादन केलेलें इहलोकींचें वैभव नाश पावतें त्याचप्रमाणें प्रयत्नानें संपादन केलेलें परलोकींचें वैभव अर्थात् स्वर्गीय सुखेंहि पण नाश पावतात. ' क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ' पुण्य संपलें कीं स्वर्गीतील देव मृत्युलोकांत येतात, असें भगवद्गीतेंत स्वतः श्रीकृष्णानेंच सांगितलें आहे. ' स्वर्गीं देव अमृत-पान करिती परि ते कल्पांतीं नाश पावती ' असें संतांनींहि वर्णन केलेलें आहे. ' यद्यज्जन्यं तत्तद्विनाशि ' जें जें निर्माण होत असतें तें तें नाश पावत असतें, अस हा सर्वांच्या अनुभवानें सिद्ध होत असलेला नियमहि पण अबाधित अस-लेला दृष्टीस पडतो. यावरून आम्हीं सांगितलेलें श्रुतिवचन, गीतावचन, संतवचन आणि सर्वानुभवसिद्ध तर्क हाच सत्य आहे. तुम्हीं सांगितलेलें श्रुतिवचन हें

लाक्षणिक आहे. इहलोकींच्या सुखापेक्षां स्वर्गीय सुखें अधिक काल टिकतात आणि अधिक श्रेष्ठ असतात, एवढाच त्या तुम्हीं सांगितलेल्या वचनांचा अर्थ आहे. तात्पर्य, पुण्याचा क्षय झाल्यानंतर देवहि स्वर्गलोकांतून खालीं येतात व मनुष्य, पशु, पक्षी इत्यादिकांचा जन्म घेतात हें जें म्हटलें आहे तें सत्य आहे.

हे आई मणिकर्णिके ! जे तुझ्यामध्यें अवगाहन करतात, स्नान करतात ते 'निष्कल्मष' म्हणजे सर्वस्वीं पापविरहित होतात. कोणतेंहि पाप शिल्लक न राहिल्यामुळें त्यांना सायुज्य मुक्ति मिळते. ते भगवान् श्रीविष्णु यांच्याशीं एकरूप होऊन रहातात. सायुज्य मुक्तीचा लाभ झाला असतां ते देखील श्रीहरीप्रमाणें किरीट-कौस्तुभ इत्यादि आभूषणें आणि शंख-चक्र इत्यादि आयुधें धारण करून प्रत्यक्ष नारायणच होतात ! हे माते मणिकर्णिके, केवढा हा तुझ्या स्नानाचा महिमा आहे !

काशी धन्यतमा विमुक्तिनगरी सालंकृता गङ्गया
तत्रेयं मणिकर्णिका सुखकरी मुक्तिर्हि तत्किंकरी ।
स्वर्लोकस्तुलितः सहैव विबुधैः काश्या समं ब्रह्मणा
काशी क्षोणितले स्थिता गुरुतरा स्वर्गो लघुः खं गतः ॥३॥

या त्रैलोक्यांत काशी ही एक अत्यंत धन्य नगरी आहे. या नगरींत जीवाला मृत्यु आला तर अंतकालीं भगवान् शंकर तारकमंत्राचा उपदेश करतात व जीवाला अनायासे मुक्तीचा लाभ होतो म्हणून या नगरीला विमुक्तिनगरी असें म्हटलें आहे. ही नगरी गंगेमुळें सालंकृत झालेली आहे. गंगा ही अलंकाराप्रमाणें या नगरीला शोभा देत आहे. त्याच काशीमध्यें ही मणिकर्णिका-काशी नगरीचा विशिष्ट भाग व त्याच्याशीं संलग्न असलेला गंगाप्रवाह हाच मणिकर्णिकातीर्थ म्हणून ओळखला जातो. ही मणिकर्णिका स्नान, दान, पूजन करणाऱ्या भक्तजनांना सुख देते. मुक्ति ही तिची दासी आहे. तिच्यामध्यें स्नान करणाऱ्या भक्तांना सर्व विषयसुखें सेवकाप्रमाणें सेवीत असतात.

एकदां ब्रह्मदेवानें काशीबरोबर स्वर्गलोकाची सर्व देवांसह तुलना केली. तराजूच्या एका पारड्यांत काशी घातली व दुसऱ्या पारड्यांत इन्द्रादि सर्व देवांसह स्वर्ग घातला. तुलना केली तों काय चमत्कार झाला पहा. काशी ही भूतलावर राहिली. कारण ती 'गुरुतरा' अधिक वजनदार ठरली. ती श्रेष्ठ ठरली. तिच्या मानानें स्वर्ग हा 'लघु' म्हणजे कनिष्ठ अर्थात् हलका झाला. तो हलका

झालें म्हणूनच वर आकाशांत गेला ! भक्तांना भुक्ति आणि मुक्ति देणें या गुणांच्या दृष्टीनें काशी ही स्वर्गापेक्षांहि अत्यंत श्रेष्ठ आहे असा या वर्णनाचा अभिप्राय आहे.

गङ्गातीरमनुत्तमं हि सकलं तत्रापि काश्युत्तमा
तस्यां सा मणिकर्णिकोत्तमतमा यत्रेश्वरो मुक्तिदः ।
देवानामपि दुर्लभं स्थलमिदं पापौघनाशक्षमं
पूर्वोपार्जितपुण्यपुञ्जगमकं पुण्यैर्जनैः प्राप्यते ॥ ४ ॥

गंगोत्रीच्या वर अठरा मैल असलेल्या गोमुखापासून तों बंगालच्या उपसागरा पर्यंत कोठेंहि जा, गंगेच्या कांठीं आपल्याला अतिशय आनंद वाटेल. इतका आनंद इतकी रमणीयता दुसरीकडे क्वचितच असेल म्हणून आचार्य म्हणतात, गंगातीर हें सगळेंच अत्यंत उत्तम आहे. त्यांतहि काशी अधिक उत्तम आहे आणि त्यांतहि ती मणिकर्णिका उत्तमोत्तम आहे. कारण तेथें प्रत्यक्ष भगवान् शंकर स्वतःच मुक्तिदानाचें कार्य करीत आहेत.

वस्तुस्थिति अशी आहे कीं, आत्मस्वरूपाच्या यथार्थ ज्ञानावांचून मोक्ष मिळत नाहीं. 'ऋते ज्ञानान्न मोक्षः' असें श्रुतिवचन आहे. पण तीच श्रुति दुसरीकडे असेंहि सांगते कीं, काशीमध्यें मरण आल्यानें मोक्ष मिळतो. 'काश्यां मरणान्मुक्तिः' तेव्हां या दोन वचनांची संगति कशी लावावयाची ? असा प्रश्न पुढें येतो. यावर उत्तर असें कीं, यथार्थ आत्मस्वरूपाचा साक्षात्कार झाल्याशिवाय मोक्ष मिळत नाहीं. हें विधान पूर्ण सत्य आहे. काशीमध्यें मरण आल्यानें मुक्ति मिळते याचा अर्थ असा आहे कीं, काशीमध्यें मृत्यु आला असतां भगवान् शंकर त्या जीवाला श्रीराम-तारक-मंत्राचा उपदेश करतात. त्या उपदेशानें जीवाला ज्ञानप्राप्ति होते. त्याचें सर्व अज्ञान नाहींसें होतें. त्याला यथार्थ आत्म-स्वरूपाचा साक्षात्कार होतो. या साक्षात्कारानेंच तो सर्व संसारदुःखांतून मुक्त होतो. अशा रीतीनें परस्परविरुद्ध वाटणारीं वर सांगितलेलीं दोन्ही श्रुतिवचनें विरुद्ध नसून तीं सत्यच असल्याचें सिद्ध होतें. तात्पर्य, गंगेच्या कांठीं काशी क्षेत्रामध्यें मणिकर्णिकेच्या तीरावर भगवान् शंकर प्राणिमात्रांना मुक्ति देण्याचें कार्य अविरत करीत आहेत. म्हणून हें स्थल अर्थात् मणिकर्णिकेचें तीर देवांनाहि दुर्लभ आहे. 'पापौघनाशक्षमं' हें स्थल पापांच्या समूहाचा नाश

करण्याला समर्थ आहे. अशा स्थलाचा लाभ होणें हें पूर्वजन्मीं संपादन केलेल्या पुण्यसमूहाचेंच द्योतक आहे. पुण्यवान् असलेल्या लोकांनाच या स्थलाचा लाभ होतो.

दुःखाम्भोधिगतो हि जन्तुनिवहस्तेषां कथं निष्कृतिः
ज्ञात्वा तद्धि विरञ्चिना विरचिता वाराणसी शर्मदा ।
लोकाः स्वर्गमुखास्ततोऽपि लघवो भोगान्तपातप्रदाः
काशी मुक्तिपुरी सदा शिवकरी धर्मार्थमोक्षप्रदा ॥ ५ ॥

ब्रह्मदेवानें सृष्टि निर्माण केल्यावर आपण जन्माला घातलेलें प्राणी दुःख-सागरामध्यें गटांगळ्या खात आहेत असें त्यांना दिसून आलें. तेव्हां त्यांनीं त्या सर्व प्राण्यांची दुःखसागरांतून कशी सुटका होईल याचा विचार केला. त्यांनीं सर्व उपाय लक्षांत घेऊन शेवटीं ब्रह्मदेवांनीं सर्वांना सुख देणारी अशी 'वाराणसी' नगरी निर्माण केली. ती वाराणसी नगरी इतकी उत्तम आणि श्रेष्ठ:दर्जाची उत्पन्न झाली कीं, तिच्यापुढें स्वर्गादि सर्व लोक तुच्छ—हलके ठरले. कारण ते स्वर्गीय सुखें भोगून पूर्ण झाल्यानंतर त्या जीवाला खालीं ढकलतात. काशी मात्र कोणाहि जीवाचा अधःपात होऊं न देतां सर्वांचा उद्धार करते. सर्वांना मुक्ति देते. मुक्तिपुरी हें तिचें नांव अन्वर्थ आहे.

काशी क्षेत्र सदासर्वकाळ सर्वांचें कल्याण करणारें आहे म्हणूनच काशीला 'शिवकरी' म्हणजे सर्वांचे कल्याण करणारी असें म्हटलें आहे. काशी ही धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष देणारी आहे. ती धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांची प्राप्ति करून देणारी आहे. काम म्हणजे इष्ट सुखाचीं साधनें पुत्र, मित्र, कान्ता, गृह, क्षेत्र इत्यादि या सर्वांची प्राप्ति 'अर्थ' या पुरुषार्थाच्या आधीन असल्यामुळें 'अर्थ' या पुरुषार्थांतच 'काम' पुरुषार्थाचा अंतर्भाव होतो. त्याचा या ठिकाणीं निराळा उल्लेख न करतां काशीला 'धर्म-अर्थ-मोक्षप्रदा' असें म्हटलें आहे.

एको वेणुधरो धराधरधरः श्रीवत्सभूषाधरः
योऽप्येकः किल शङ्करो विषधरो गङ्गाधरोमाधरः ।
ये मातर्मणिकर्णिके तव जले मज्जन्ति ते मानवाः
रुद्रा वा हरयो भवन्ति बहवस्तेषां बहुत्वं कथम् ॥ ६ ॥

धराधर म्हणजे पर्वत अर्थात् गोवर्धन पर्वत, त्याला धारण करणारा, श्रीवत्स कौस्तुभमणि इत्यादि भूषणें धारण करणारा आणि त्याचप्रमाणें वेणुधर म्हणजे मुरली धारण करणारा असा जो भगवान् श्रीकृष्ण, भगवान् विष्णु तो एकच आहे. त्याचप्रमाणें कंठामध्यें विष धारण करणारा जटेमध्यें, गंगाधारण करणारा आणि उमाधर म्हणजे वामांगीं पार्वतीला धारण करणारा असा जो कोणी तोहि खरोखर एकच शंकर आहे. पण हे माते मणिकर्णिके गंगे ! जे मानव तुझ्यामध्यें अवगाहन करतात, स्नान करतात ते सर्वच शंकर-स्वरूप अथवा विष्णु-स्वरूप होतात. अशा रीतीनें असंख्य शंकर आणि असंख्य विष्णु दृष्टीस पडतात. हा कशाचा प्रभाव बरें ? हा तुझ्यामध्यें केलेल्या स्नानाचाच प्रभाव होय. नाहीं तर शिव आणि विष्णु यांचें बहुत्व कसें उपपन्न होणार !

त्वत्तीरे मरणं तु मङ्गलकरं देवैरपि श्लाघ्यते
शक्रस्तं मनुजं सहस्रनयनैर्द्रष्टुं सदा तत्परः ।
आयान्तं सविता सहस्रकिरणैः प्रत्युद्गतोऽभूत्मदा
पुण्योऽसौ वृषगोऽथवा गरुडगः किं मन्दिरं यास्यति ॥ ७ ॥

आई मणिकर्णिके गंगे ! तुझ्या काठीं मरण प्राप्त होणें हे मोठें मंगलकारक आहे. देवाकडून देखील त्या मरणाची श्लाघा केली जाते. देव देखील तुझ्या कांठीं प्राप्त झालेल्या मरणाची स्तुति करतात. तुझ्या कांठीं ज्याला मरण आलेलें आहे त्या मनुष्याला आपल्या हजार नेत्रांनीं पहाण्याकरितां देवांचा राजा इन्द्र सर्व काळ उत्कंठित असतो. तो मनुष्य येऊं लागला असतां सूर्य तर आपल्या सहस्र करांनीं जणुं कांहीं त्याचें स्वागत करण्याकरितां उत्कंठितच झालेला होता असें दिसतें. सूर्य आपल्या सहस्र किरणांनी जणूं कांहीं त्याचें स्वागत करण्याकरितां 'प्रत्युद्गत' म्हणजे सामोरा गेला होता असें वाटतें. आई मणिकर्णिके ! खरोखरच तुझ्या कांठीं ज्याला मरण आलें तो मोठा पुण्यवान् होय. मरणानंतर तो नंदीवर बसून कैलासलोकाला जाणार का गरुडावर आरूढ होऊन वैकुंठलोकाला जाणार ? या दोहोंपैकीं कोठें तरी एका ठिकाणीं तो जाणार हें निश्चित. कारण तुझ्या कांठीं प्राप्त होणाऱ्या मरणाचें हें फल निश्चित आहे. आई ! केवढें हें तुझें माहात्म्य आहे ! धन्य आहेस तूं !

मध्याह्ने मणिकर्णिकास्नपनजं पुण्यं न वक्तुं क्षमः
स्वीयैरब्दशतैश्चतुर्मुखधरो वेदार्थदीक्षागुरुः ।
योगाभ्यासबलेन चन्द्रशिखरस्तत्पुण्यपारं गत-
स्त्वत्तीरे प्रकरोति सप्तपुरुषं नारायणं वा शिवम् ॥ ८ ॥

मध्याह्नकाळीं मणिकर्णिकेमध्यें स्नान केलें असतां जें पुण्य प्राप्त होतें तें वेद आणि वेदार्थांचा उपदेश देण्याचें नित्यव्रत धारण करण्याचा वेदार्थदीक्षागुरु असलेल्या त्या चार मुखें धारण करणाऱ्या ब्रह्मदेवानें स्वतःच्या आयुष्याची शेंकडों वर्षे खर्च करूनहि साकल्यानें वर्णन करण्याचा प्रयत्न केला तरी तो देखील त्या पुण्याचें पूर्णपणें वर्णन करूं शकणार नाहीं. मग इतरांची कथा काय ? पण मस्तकावर चन्द्र धारण करणारे भगवान् शंकर मात्र योगाभ्यासाच्या बलानें कसें तरी त्या पुण्याच्या – पुण्यप्रभावाच्या पैलतीराला पोहोंचले ! आई मणिकर्णिके ! तुझें तीर भक्तियुक्त अंतःकरणानें तुझ्यामध्यें स्नान करणाऱ्या भक्तांच्या सात पिढ्यांना अर्थात् सात पिढ्यांतील लोकांना नारायणाचें अथवा शंकराचें स्वरूप प्राप्त करून देतें. तात्पर्य, तुझा आणि तुझ्या तीराचा महिमा अगाध आहे. (कांहीं पुस्तकांतून 'सप्तपुरुषं'च्या ऐवजीं 'सुप्तपुरुषं' असा पाठ आढळतो. तेथें सुप्त शब्दाचा अर्थ झोपलेला, देहत्याग केलेला अर्थात् मृत झालेला असा समजावा.

कृच्छ्रैः कोटिशतैः स्वपापनिधनं यच्चाश्वमेधैः फलं
तत्सर्वं मणिकर्णिकास्नपनजे पुण्ये प्रविष्टं भवेत् ।
स्नात्वा स्तोत्रमिदं नरः पठति चेत्संसारपाथोनिधिं
तीर्त्वा पल्वलवत्प्रयाति सदनं तेजोमयं ब्रह्मणः ॥ ९ ॥

कोट्यवधि अथवा अब्जावधि कृच्छ्रचान्द्रायण इत्यादि प्रायश्चित्तें घेऊन जें आपल्या पापाचें निरसन होईल किंवा अनेक अश्वमेध यज्ञ करून जें फल पदरांत पडेल तें सर्व श्रीमणिकर्णिका गंगेंत स्नान केल्यानंतर प्राप्त होणाऱ्या पुण्यांत अंतर्भूत होईल. अर्थात् अब्जावधि खडतर प्रायश्चित्तें घेऊनहि ज्या पातकांचा निरास होत नाहीं, त्या पातकांचा निरास करण्याचें सामर्थ्य मणिकर्णिकेच्या स्नानानें प्राप्त होणाऱ्या पुण्यांत आहे. त्याचप्रमाणें अनेक अश्वमेध यज्ञ करून प्राप्त होणाऱ्या पुण्यापेक्षांहि अधिक पुण्य मणिकर्णिमध्यें स्नान

केल्यानें प्राप्त होतें. असा महिमा श्रीमणिकर्णिकेच्या स्नानाचा आहे. मणिकर्णिकेचें स्वरूप मनांत आणून स्नान केल्यानंतर मनुष्य जर या स्तोत्राचें पठण करील, तर तो संसारसागराला एखाद्या छोट्या डबक्याप्रमाणें सहज पार करून तेजोमय अशा सच्चिदानंदघन परिपूर्ण परब्रह्माच्या सदनाला — धामाला अर्थात् त्या पदाला परब्रह्मस्वरूपाला प्राप्त होतो. असा हा श्रीमणिकर्णिका गंगेचा महिमा आहे.

■ ■ ■

नर्मदाष्टकम् ।

[गंगा, यमुना, नर्मदा, गोदावरी आणि कृष्णा या पंचगंगा म्हणजे भारत-मातेच्या गळ्यांतील पांच सर असलेला भव्य मौक्तिकांचा हारच होय. मेखला म्हणजे कंबरपट्टा हा ज्याप्रमाणें शरिराच्या मध्यप्रदेशाची मानमर्यादा दाखवितो त्याचप्रमाणें भारताच्या उत्तर आणि दक्षिण भागाची मानमर्यादा श्रीनर्मदामातेच्याच प्रवाहानें दाखविलेली आहे. नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेश उत्तर भारत आणि दक्षिणे-कडील प्रदेश दक्षिण भारत म्हणून ओळखला जातो. मंडला, हुशंगाबाद, हर्दा हंडिया, महेश्वर, भडोच, सिनोर, कर्नाली, गरुडेश्वर हापेश्वर, नेमावर इत्यादि प्रसिद्ध शहरें व गांवें नर्मदेच्या कांठीं असून, कोटितीर्थ, कपिलधारातीर्थ, ओंकारमांधाता सहस्रधारातीर्थ, (ब्राह्मणगांव) शूलपाणि, विमलेश्वर, कोरलघाट इत्यादि अनेक रम्य व दर्शनीय तीर्थक्षेत्रें नर्मदेच्या दोन्ही कांठांवर विराजत असलेलीं आपणांस पहावयास सांपडतील.

पुराणांतरीं केलेल्या वर्णनावरून आणि विद्यमानकालीं प्रचलित असलेल्या असंख्य तीर्थक्षेत्रांच्या नांवांवरून सृष्टीच्या आरंभ कालापासून तों विद्यमानकाला-पर्यंतचा सांस्कृतिक धागादोरा नर्मदाकांठीं अखंडित असलेला आपल्या दृष्टीस पडतो. भगवान् विष्णु श्रीशंकर आणि ब्रह्मदेव तसेच इंद्र, सूर्य, अग्नि, कुबेर, श्रीरामचंद्र व मारुतिराय इत्यादि देवांनींहि नर्मदेच्या कांठीं तपश्चर्या केलेली आहे. रावण, कुंभकर्ण, मेघनाद, हिरण्याक्ष, बलि इत्यादि राक्षसांनीं व दैत्यांनींहि नर्मदेच्या कांठीं तपश्चर्या करून आपले मनोरथ पूर्ण करून घेतले आहेत. सनक, सनन्दन, सनातन आणि सनत्कुमार, तसेच नारद, भृगु, अत्रि, मार्कण्डेय, वसिष्ठ, विश्वामित्र, भरद्वाज, जमदग्नि, शांडिल्य, व्यास इत्यादि बड्या बड्या ऋषिजनांनींहि



महेश्वर येथील नर्मदाकाठीं असलेला अहल्यादेवी घाट



कपिलधारातीर्थ (नर्मदा)



अमरकंटक येथील नर्मदेचे उगमस्थान (कोटितीर्थ)



अमरकंटक येथील कोटितीर्थाचें दृश्य



नादब्रह्मोपासक तपस्वी
श्रीगुरुवर्य हरहरमहाराज कोपरगांवकर

(पृ. ८९ पहा)



आचार्यांचे गुरु गोविंदयति यांची सांकलग्राम येथील गुहा

(पान ९२ पहा)

नर्मदेच्या कांठीं वास्तव्य करून तपश्चर्या केलेली आहे. मनु आणि मनुपुत्र त्याच-प्रमाणें राजा रन्तिदेव, राजा हरिश्चंद्र इत्यादि पौराणिक काळांतील राजेमहाराजे यांनीं नर्मदेच्या कांठीं अनेक यज्ञयाग केलेले आहेत. मध्ययुगीन कालांत आणि अर्वाचीन कालांतहि अनेक राजेलोकांनीं नर्मदेच्या कांठीं विपुल राज्यवैभवें भोगलेलीं आहेत.

पुरातत्त्ववेत्त्यांच्या मतानेंहि नर्मदेच्या कांठीं चार-पांच लाख वर्षांपासून मानवांची वसति असल्याचीं चिन्हें उपलब्ध होत आहेत. अश्मयुगाच्या पहिल्या कालखंडापासून मानवानें उपयोगांत आणलेल्या वस्तु नर्मदेच्या कांठीं सांपड-लेल्या आहेत. इसवी सनापूर्वीच्या दोन हजार वर्षांच्याहि पूर्वी नर्मदेच्या कांठीं वसति करून रहाणारा मानव समाज हा पूर्णपणें संपन्न अवस्थेला पोहोंचलेला होता असें उत्खननांत उपलब्ध झालेल्या पुराव्यांवरून सिद्ध होत आहे.

"नर्मदासदृशी लोके न गङ्गापि वरानने!" गंगेची देखील नर्मदेशीं तुलना करतां येणार नाहीं मग इतर तीर्थांची कथा काय? असें प्रत्यक्ष शंकरा-नींच पार्वतीला सांगितलेलें आहे. "कलौ तु नर्मदा देवी कल्पवृक्षो जनार्तिहा" नर्मदा देवी हा एक या कलियुगांत लोकांचीं सर्व दुःखें निवारण करणारा प्रत्यक्ष कल्पवृक्षच होय. 'नर्म ददातीति नर्मदा' अशी नर्मदा या शब्दाची व्युत्पत्ति आहे. 'नर्म' म्हणजे सुख. ऐहिक आणि पारलौकिक, भोग आणि मोक्ष या सर्व प्रकारच्या सुखांना ती देते म्हणून तिला 'नर्मदा' असें म्हटलेलें आहे. ही मेकलराजाची कन्या असल्यामुळें हिला 'मेकलकन्यका' असेंहि म्हटलेलें आहे. ही अमरकंटक पर्वतापासून उगम पावते म्हणून हिला 'अमरजा' असेंहि म्हणतात. तिचें 'रेवा' असेंहि एक नांव सुप्रसिद्ध आहे. 'रेव्' या धातुपासून रेवा हा शब्द निष्पन्न झाला. रेव् म्हणजे उधळणें, उडत्या मारीत धांवणें, नर्मदेचा प्रवाह हा दऱ्याखोऱ्यांतून आणि खडकाळ प्रदेशांतून सारखा उडत्या मारीतच सागराकडे धांव घेत आहे म्हणून तिला 'रेवा' असें म्हटलेलें आहे. "रेवा रेवा बोल तुझे नहीं लगेगा मोल" असें आमचे एक गुरुजी नेहमीं भजन करीत असत. "नर्मदे हर नर्मदे हर" असा घोष नेहमीं ते करीत असत म्हणून लोक त्यांना हरहर महाराज याच नांवानें ओळखीत असत. त्यांचें छायाचित्र या ग्रंथांत दुसरीकडे दिलेलें आहे.

कपिलधारा, दूधधारा, सहस्रधारा, भेडाघाट, धुआंधार, हरणफाल इत्यादि किती तरी अशीं ठिकाणें आहेत कीं, तेथें नर्मदेच्या प्रवाहाकडे पहात असतांना

दृष्टि नेथून हालतच नाहीं. मन तल्लीन होतें. संसारचा विसर पडतो. नर्मदेच्या कांठीं कित्येक अशीं रम्य स्थळें आहेत कीं, तीं सोडतांना मनाला खेदच होतो. नर्मदेच्या कांठींच ज्यांना वास्तव्य करण्याचें भाग्य लाभलें ते खरोखर धन्य होत असें वाटूं लागतें.

जबलपूरजवळ नर्मदा जेव्हां संगमरवरी खडकांतून आपला मार्ग काढते तेव्हां तर तिचें दृश्य अपूर्वच दिसतें. अरुंद दरींतून प्रचंड वेगानें वाहणारा तिचा प्रवाह फारच मनोवेधक दिसतो. हरणफाल या ठिकाणीं तिचे कडे इतके उंच आणि अरुंद आहेत कीं, हरीणहि नेथून उड्या मारून पलीकडे जाऊं शकतात. नर्मदेच्या कांठीं अनेक घनदाट अरण्यें आहेत. मंडला ते रामनगर यांमधला मैल दोन्ही कांठीं अत्यंत घनदाट झाडी असून या ठिकाणीं नर्मदेचा प्रवाह नीलवर्ण दिसतो. जणुं कांहीं नील गंगेचेंच रूप तिनें धारण केलें आहे असें वाटतें. याप्रमाणें नर्मदेच्या उगमस्थानापासून सागरसंगमापर्यंत दोन्ही कांठीं असंख्य तीर्थे, क्षेत्रें, तपोवनें आणि मंदिरें यांची गर्दीच गर्दी दिसते. ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या नर्मदामातेला जें वैभव लाभलेलें आहे तें जगांतील इतर कोणत्याहि नदीच्या वांट्याला आलेलें नाहीं.

कृष्णा जशी महाबळेश्वर क्षेत्रांत उगम पावते त्याचप्रमाणें नर्मदा ही अमरकंटक क्षेत्रांत उगम पावत आहे. अमरकंटक क्षेत्र ज्या पर्वतावर आहे त्या पर्वतासहि अमरकंटकच म्हणतात. मेकल पर्वत असेंहि याचें दुसरें नांव आहे. मेकल नांवाचा राजा येथें राज्य करीत होता. हा पर्वत विंध्य पर्वताचाच एक भाग असून समुद्रसपाटीपासून सुमारें तीन हजार पांचशें फूट उंच आहे. या पर्वतावर नर्मदा जेथें प्रकट झाली तेथें एक मोठें एकादशकोनी भव्य कुंड आहे. यालाच कोटितीर्थ असें म्हणतात. येथून उगम पावलेली नर्मदा ही भडोचजवळ अर्थात् भृगुक्षेत्रीं पश्चिम सागराम खंबायतच्या आखातांत जाऊन मिळते.

नर्मदेची प्रदक्षिणा हा एक मोठा शास्त्रविहित आणि अव्याहत शिष्टपरंपरेनें चालत आलेला धार्मिक विधि समजला जातो. या विधीला 'नर्मदापरिक्रमा' असें म्हणतात. या विधीमध्यें प्रवास घडतो. असंख्य तीर्थक्षेत्रें दृष्टीस पडतात. रम्य स्थळें आणि मनोहर दृश्यें पहावयास सांपडतात. मनाला समाधान लाभतें. सत्संगति घडते. ज्ञान मिळतें. अत्यंत आनंद वाटतो. नर्मदेचा नाममहिमाहि मोठा आहे. नर्मदेच्या नाममंत्रानें सर्पविषाची बाधा नाहींशी होते. शास्त्रविहित

पद्धतीनें सिद्ध केलेल्या नर्मदा नाममंत्रानें सर्पविष उतरेल असा वर नर्मदेला अनन्तादि सर्व पन्नगपतींनी दिलेला आहे.

गणेशमंत्रविधानांत सांगितलेल्या पद्धतीप्रमाणें संकल्प करून ॐ ह्रां अङ्गुष्ठाभ्यां नमः इत्यादि पद्धतीनें करन्यास व हृदयादि षडङ्गन्यास करावेत. ॐ ह्रीं श्रीं नर्मदायै नमः लं पृथिव्यात्मकं गन्धं परिकल्पयामि इत्यादि पूर्वी सांगितलेल्या पद्धतीनें श्रीनर्मदामातेची पंचमानसोपचारपूजा करावी. नंतर हात जोडून अथ ध्यानं –

ललितसितदुकूलां मञ्जुमूलां महेशीं
करकलितकुटाक्षाऽभीत्यभीष्टां सुकेशीम् ।
मणिखचितविभूषां भालबालेन्दुभूषां
शिरसि धृतकिरीटां नर्मदां चिन्तयामि ॥

हा श्लोक म्हणून ॐ ह्रीं श्रीं नर्मदायै नमः असें म्हणावें व श्रीनर्मदामातेला नमस्कार करावा. जिनें सुंदर पांढरीं शुभ्र रेशमी वस्त्रें परिधान केलेलीं आहेत. 'मञ्जुमूला' म्हणजे जिचे चरणकमल अत्यंत सुंदर आहेत अथवा मूलउगमस्थान जिचें अत्यंत रमणीय आहे. जी महेशी म्हणजे सर्वसत्तेची अधिष्ठात्री आहे. जी चतुर्भुज असून डावीकडील वरच्या हातांत जिनें अमृतकलश धारण केलेला आहे. उजवीकडील वरच्या हातानें रुद्राक्षमाला धारण केलेली आहे. उजव्या खालच्या हातानें 'अभीति' म्हणजे अभयमुद्रा धारण केलेली असून डावीकडील खालच्या हातानें अभीष्ट म्हणजे वरमुद्रा जिनें धारण केलेली आहे. जिच्या मस्तकावरील केश काळेकुळकुळीत व अत्यंत सुंदर आहेत. अंगांवर रत्नजडित सुवर्णाचे अलंकार घातलेले असून जिनें आपल्या भव्य कपाळीं चंद्रकला भूषण म्हणून धारण केलेली आहे. त्याचप्रमाणें जिनें आपल्या मस्तकावर सुंदर मुकुट धारण केलेला आहे अशा नर्मदादेवीचें मी अनन्यचित्तानें चिंतन करीत आहें. असा वरील ध्यानाच्या श्लोकाचा अर्थ आहे. याप्रमाणें ध्यान करून –

नर्मदायै नमः प्रातर्नर्मदायै नमो निशि ।
नमोऽस्तु नर्मदे तुभ्यं त्राहि मां विषसर्पतः ॥

अशी प्रार्थना करून गणेशमंत्रपद्धतीनें जप करावा. प्रणवासह नऊ अक्षरांचा मंत्र ध्यानाच्या श्लोकानंतर दिलेलाच आहे. प्रणवाचा ज्यांना अधिकार नाहीं त्यांनीं प्रणवरहित अष्टाक्षर मंत्राचाच जप करावा. जितकीं मंत्रांत अक्षरें असतील

तितक्या लाख संख्येनें पुरश्चरण पूर्ण होत असतें. पुरश्चरणानें मंत्र सिद्ध होतो. संकल्पित मंत्राच्या प्रयोगानें इष्टकार्य सिद्धीस जातें. प्रस्तुत मंत्रानें सर्पविष उतरतें.

नमः पुण्यजले आद्ये ! नमः सागरगामिनि ! ।
नमस्ते पापशमनि ! नमो देवि वरानने ! ॥
नमोऽस्तुते ऋषिगणसिद्धसेविते !
नमोऽस्तु ते शंकर देहनिःसृते ! ।
नमोऽस्तु ते धर्मभृतां वरप्रदे !
नमोऽस्तु ते सर्व पवित्रपावने ! ॥

— मत्स्यपुराण, अध्याय ६५

हे श्लोक दोनच असले तरी यांची फलश्रुति फारच मोठी आहे. नर्मदा-भक्तांनीं ते नेहमीं म्हणावेत.

भगवत्पूज्यपाद श्रीमत् आद्य शंकराचार्य यांचा नर्मदेच्या कांठीं बराच संचार झालेला आहे. पिपरियावाटापासून सहा मैल अंतरावर नर्मदेच्या उत्तर तीरावर हरणीसंगम नांवाचें तीर्थ आहे. येथें संगमेश्वर आणि हरणेश्वर नांवांचीं शिवमंदिरें असून हें स्थान फारच रमणीय आहे. येथें शंकराचार्यांनीं वास्तव्य केलेलें होतें. येथें असलेलें साँकलग्राम हें खऱ्या अर्थानें शांकरग्रामच होय. बेलथारीग्राम — बलिराजाची यज्ञभूमि, येथें नर्मदेशीं संगम पावणाऱ्या एका नदीला शांकरी-गंगा असेंच नांव आहे. या संगमावरहि श्रीशंकराचार्यांनीं वास्तव्य केलेलें होतें. श्रीशंकराचार्य यांचे गुरु गोविंदयति यांची गुहा नर्मदेच्या कांठीं आजहि उपलब्ध असलेली दिसत आहे. नर्मदेला महापूर येऊन नर्मदेचें पाणी जेव्हां गुरुजींच्या गुहेत शिरूं लागलें तेव्हां आचार्यांनीं नर्मदेची स्तुति केली. आपला कमंडलु नर्मदे-जवळ ठेवतांच नर्मदामातेनें कमंडलूंत प्रवेश केला व क्षणांतच महापूर ओसरला ! पंचचामर वृत्तांत केलेलें आचार्यांचें हें स्तोत्र फारच उत्तम आहे, पहा.]

सविन्दु-सिन्धु-सुस्खलत्तरङ्ग-भङ्ग-रञ्जितं
द्विषत्सु पापजात-जातकारि-वारि-संयुतम् ।
कृतान्तदूत-कालभूत-भीतिहारि-वर्मदे
त्वदीय-पादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ १ ॥

हे देवी नर्मदे ! मी तुझ्या चरणकमलांना नमस्कार करतों. तुझ्या चरण-कमलांचें मी काय वर्णन करूं ? 'सबिन्दु' म्हणजे कारंज्याप्रमाणें ज्यांच्यांतून फोवारे उडत आहेत असे 'सिन्धु-सुस्खलत्' म्हणजे समुद्राकडे वेगानें धांव घेणाऱ्या तुझ्या प्रवाहावरील 'तरङ्गभङ्ग' म्हणजे तरंगांच्या परंपरा अर्थात् असंख्य लाटा त्या लाटांनीं तुझे चरणकमल 'रञ्जित' म्हणजे अत्यंत सुशोभित दिसत आहेत. ' सबिन्दु-सिन्धुर-स्खलत् ' असाहि पाठ कांहीं पुस्तकांतून आढळतो. त्याचा अर्थ असा :—

आई नर्मदे ! तुझ्या चरणकमलीं अवगाहन करण्याकरितां अर्थात् स्नान करण्याकरितां येणारे जे 'सिन्धुर' म्हणजे हत्ती ते 'सबिन्दु' म्हणजे गंडस्थलांतून पाझरणाऱ्या दानोदकाच्या अर्थात् मदजलाच्या कणांनीं युक्त असतात. हत्तींच्या गंडस्थलांतून स्रवणाऱ्या द्रवाला दानोदक म्हणतात. गंडस्थलावर दानोदकाचे बिंदु निर्माण होणें हे त्या हत्तीच्या तारुण्यमदाचें द्योतक असतें.

अथवा 'सबिन्दु' शब्दाचा अर्थ ज्यांच्या सोंडेवर अनेक रंगांचीं चित्र-विचित्र वेलबुट्टी काढलेली आहे असे 'सिन्धुर' म्हणजे हत्ती नर्मदेच्या प्रवाहांत स्नान करण्याकरितां आलेले जे राजेमहाराजे लोकांचे हत्ती हे जेव्हां नर्मदेच्या प्रवाहांत प्रवेश करतात तेव्हां प्रवाहावरील तरंग कुंठित होतात. याप्रमाणें कुंठित होणाऱ्या तरंगांचे भंग म्हणजे असंख्य परंपरा-मालिका त्यांच्या योगानें हे आई नर्मदे ! तुझे चरणकमल मोठें सुशोभित दिसत आहे.

'द्विषत्सु' म्हणजे शत्रूंच्या ठिकाणीं अर्थात् धर्मद्रोही, देशद्रोही, देवद्रोही आणि समाजकंटक अशा लोकांच्या ठिकाणीं ' पापजात-जात-कारि ' म्हणजे पापांच्या समूहाची उत्पत्ति करणारें असें जें तुझें जल त्या जलानें तुझें चरण-कमल 'संयुत' म्हणजे नटलेलें आहे. यांतील गर्भितार्थ असा आहे कीं, भक्त-जनांनीं भक्तिपूर्वक तीर्थामध्यें अवगाहन केलें म्हणजे तीं तीर्थें भक्तजनांच्या पापांचें प्रक्षालन करतात आणि प्रक्षालन केलेल्या त्या पापांना भक्तद्रोही, देवद्रोही अशा दुष्टजनांच्या ठिकाणीं उत्पन्न करतात. हा तीर्थांचा स्वभाव लक्षांत घेऊन हें वर्णन केलेलें आहे.

अथवा हे आई नर्मदे ! तुझें जल 'द्विषत्' म्हणजे आमचे शत्रु असलेलीं आम्हांला शत्रूप्रमाणें छळणारीं, आम्हांला अत्यंत दुःखें देणारीं अशीं जीं आमचीं 'सुपाप' म्हणजे मोठमोठीं पातकें — महापातकें त्यांच्या 'जातजातक' म्हणजे

समुदायांचे समूह, त्यांना 'अरि' म्हणजे शत्रूप्रमाणें असलेलें अर्थात त्या पातकांचें निरसन करणारें असें जें तुझें 'वारि' म्हणजे जल त्या जलानें तुझें चरणकमल 'संयुत' म्हणजे भूषित झालेलें आहे.

आई नर्मदे ! 'वर्म' म्हणजे चिलखत. चिलखत हें जसें मनिकांचें संरक्षण करतें त्याचप्रमाणें तूं देखील कृतान्तदूतांप्रमाणें अर्थात् यमदूतांप्रमाणें अत्यंत भयंकर असलेले 'कालभूत' म्हणजे काळासारखे प्राणघातक असे जे दुष्ट शत्रु अथवा भूतप्रेतपिशाच राक्षस त्यांच्या भीतीपासून आपल्या भक्तजनांचें संरक्षण करतेस. भक्तांच्या भीतीचें निवारण करून त्यांना संरक्षण देतेस. आश्रय देतेस. अशी तूं समर्थ आणि दयाळु आहेस. आई देवी नर्मदे ! तुझ्या चरणकमलाला मी नमस्कार करतों.

त्वदम्बुलीन-दीन-मीन-दिव्य-संप्रदायकं
कलौ मलौघ-भार-हारि सर्वतीर्थनायकम् ।
सुमच्छ-कच्छ-नक्र-चक्र-चक्रवाक-शर्मदे
त्वदीय-पादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ २ ॥

हे देवी नर्मदे ! तुझ्या जलामध्यें 'लीन' म्हणजे दडून राहिलेले अथवा आश्रय करून राहिलेले जे 'दीन' म्हणजे करुणार्ह जलचर योनींत जन्माला आलेले जीव मासे, कांसव वगैरे त्यांना 'दिव्यसंप्रदायकं' म्हणजे स्वर्गीय सुखाला देणारें अर्थात् नर्मदेच्या जलांत वास्तव्य करणारे जलचर प्राणी देखील स्वर्गीय सुखें भोगतात व त्यांना अंतीं उत्तम गति मिळते. आई नर्मदे ! तुझें पाणी या कलियुगामध्यें संपूर्ण पातकांच्या समूहांचा भार नाहींसा करणारें आहे. अर्थात् सर्व पातकांचें ओझें तुझ्या जलानें नाहींसें होतें. त्याचप्रमाणें तुझें जल या जगांतील सर्व तीर्थांचें नायक म्हणजे अधिपति आहे अर्थात् सर्व तीर्थांत नें श्रेष्ठ आहे.

भाग्यवंत असलेले मोठमोठे मासे, कांसव आणि सुसरी वगैरे जलचर प्राण्यांचे समुदाय, तसेंच चक्रवाक, भारद्वाज, मयूर आणि शुक इत्यादि पक्ष्यांचे समुदाय यांना तूं 'शर्मदा' म्हणजे सुख देणारी आहेस. हे देवी नर्मदे ! तुझ्या चरणकमलाला मी नमस्कार करतों.

महा-गभीर-नीर-पूर-पात-धूत-भूतलं
नमत्समस्तपातकारि दारितापदाचलम् ।

जगल्लये महाभये मृकण्डु-सूनु-हर्म्यदे ।
त्वदीय-पादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ३ ॥

आई नर्मदे ! तुझें पाणी 'महागभीर' म्हणजे अत्यंत खोल आहे. तसेंच तें भरपूर आहे. त्या पाण्याच्या पुरानें तूं संपूर्ण भूतलाचें पाप धुवून टाकलें आहेस अर्थात् तूं आपल्या पावन आणि निर्मल जलप्रवाहानें संपूर्ण भूतलाच्या पापांचें प्रक्षालन केलें आहेस. त्याचप्रमाणें तुझें जल 'नमत्' म्हणजे तुझ्या चरणीं भक्तिभावानें नमस्कार करणारे जे भक्तजन त्यांच्या समस्त पातकांचा तें 'अरि' म्हणजे शत्रु आहे. शत्रूप्रमाणें नर्मदेचें जल लहानमोठ्या सर्व पातकांचा नाश करतें असा याचा अर्थ समजावा.

'नमत्' याच्याऐवजीं कांहीं पुस्तकांतून 'ध्वनत्' असा पाठ आढळतो. 'ध्वनत्' म्हणजे गर्जना करणारें. गोकाक गिरसप्पा वगैरे ठिकाणच्या धबधब्याप्रमाणें पुष्कळ ठिकाणीं नर्मदेच्या प्रवाहाची प्रचंड गर्जना नर्मदा प्रदक्षिणा करणाऱ्यांच्या कानीं पडते. कपिलधारा, दूधधारा, सहस्रधारा, धुआंधार इत्यादि ठिकाणें अवश्य पहावींत. 'समस्त-पातकारि' म्हणजे सर्व पापांचा वैरी. अर्थात् हे आई नर्मदे ! तुझे चरणकमल प्रवाहरूपानें प्रचंड गर्जना करीत असून तें भक्तजनांच्या सर्व पातकांचा नाश करीत असतें. अथवा 'ध्वनत्' हें पादपंकजाचें विशेषण न करतां पातकांचेंच विशेषण करावें. मानवाला दुःखें देण्याकरितां मी मी म्हणून गर्जना करीत मानवांकडे धांव घेणारीं जीं समस्त पातकें त्यांचा तुझें जल शत्रूप्रमाणें नायनाट करून टाकतें.

'दारितापदाचलम्' म्हणजे भक्तजनांच्या संकटांचे पर्वत तें फोडून टाकतें. अर्थात् आई नर्मदे ! तुझें जल भक्तांच्या आपदांचें निरसन करतें. महाभयंकर असा जगाचा प्रलयकाळ ओढवला असतां मृकण्ड ऋषींच्या पुत्राला मार्कण्डेय ऋषींना आश्रय देणारी तूं हे देवी नर्मदे ! मी तुझ्या चरणकमलाला नमस्कार करतों.

गतं तदैव मे भयं त्वदम्बु वीक्षितं यदा
मृकण्डु-सूनु-शौनकासुरारिसेवितं सदा ।
पुनर्भवाब्धि-जन्मजं भवाब्धि-दुःख-वर्मदे
त्वदीय-पादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ४ ॥

हे आई नर्मदे ! मी ज्या वेळेला तुझ्या मंगलमय जलाचें अवलोकन केलें तेव्हांच माझें सर्व भय पार नाहींसें होऊन गेलें. आई ! तूं विचारशील कीं, तुला कसलें भय होतें ? तर सांगतों ऐक. 'पुनर्भवाब्धिजन्मजं' पुनर्भव म्हणजे संसार. कारण संसारांत या जीवाला पुनःपुन्हां जन्म घ्यावे लागतात. ' पुनरपि जननं पुनरपि मरणं, पुनरपि जननीजठरे शयनम् " असा हा संसारांतला क्रम अव्याहत चालू आहे. संसाराला अंत नाहीं व पारहि नाहीं. म्हणून त्याला सागराची उपमा देतात. 'अब्धि' म्हणजे सागर. पुनर्भवाब्धि म्हणजे संसारसागर. पुनः पुन्हां जन्म घेऊन या संसारसागरांत जीवाला अपरिमित दुःखेंच भोगावीं लागतात. म्हणूनच संसारसागरांत घ्याव्या लागणाऱ्या जन्मांचें मोठें भय वाटतें. तें संसारसागरांत घ्याव्या लागणाऱ्या जन्मामुळें वाटणारें भय आई नर्मदे ! तुझें दर्शन घडल्याबरोबर पार मावळलें !

आई नर्मदे ! तुझ्या चरणकमलाची सेवा मोठमोठ्या ऋषींनीं व देवांनींहि केलेली आहे. 'मृकण्डुसूनु' म्हणजे मृकंड ऋषींचे पुत्र मार्कंडेय ऋषि तसेंच शौनकादि ऋषि आणि 'असुरारि' म्हणजे दैत्यांचे, राक्षसांचे शत्रु अर्थात् इंद्र, चंद्र, वरुण, कुबेर इत्यादि देव या सर्वांनीं तुझ्या जलाचें सर्वकाळ सेवन केलेलें आहे. आई नर्मदे ! तूं कशी आहेस ? 'भवाब्धिदुःखवर्मदे' तूं संसारसागरांतील दुःखांपासून भक्तजनांचें संरक्षण करतेस. त्यांना आश्रय देतेस. मोठी दयाळु आहेस तूं. आई नर्मदे ! मी तुझ्या चरणकमलांना नमस्कार करतों.

अलक्षलक्ष-किन्नरामरासुरादि-पूजितं
सुलक्ष-नीर-तीर-धीर-पक्षि-लक्ष-कूजितम् ।
वसिष्ठ-शिष्ट-पिप्पलादि-कर्दमादि-शर्मदे
त्वदीय-पादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ५ ॥

हे आई नर्मदे ! अलक्ष म्हणजे कधीं दृग्गोचर न होणारे अर्थात् प्रत्यक्ष डोळ्यानें न दिसणारे असे जे 'लक्ष' म्हणजे लक्षावधि यक्ष-किन्नर, गंधर्व, देव आणि असुरादि म्हणजे दैत्य-राक्षस वगैरे या सर्वांनीं 'पूजित' म्हणजे भक्तिपूर्वक आदरिलेलें, पूजा सत्कार केलेलें असें, तसेंच दिसण्यांत अत्यंत सुंदर असें जें तुझें नीर म्हणजे पाणी अर्थात् पाण्याचा प्रवाह त्या प्रवाहाच्या दोन्ही बाजूला कांठांवर असलेल्या वृक्षराजीमध्यें वास्तव्य करीत असलेले, धीर

म्हणजे धैर्यशालि अथवा बुद्धिमान् किंवा स्वच्छंद असे जे लक्षावधि पक्षी त्यांच्या मधुर शब्दांनीं तुझें चरणकमल 'कूजित' म्हणजे जणूं कांहीं निनादत आहे. अथवा तुझ्या कांठीं लक्षावधि पक्ष्यांचे मधुर शब्द सारखे कानांवर येत असतात. त्यासुळें तुझे कांठ अत्यंत रमणीय वाटतात असा याचा अर्थ समजावा. 'शिष्ट' म्हणजे वेदविहित कर्मांचें आचरण करणारे असे जे तपस्वी आणि ज्ञानी वसिष्ठ पिप्पलादि आणि कर्दमादि ऋषि महर्षि यांना आई नर्मदे ! तूं 'शर्मदा' म्हणजे सुख देणारी आहेस. आई ! तुझ्या चरणकमलीं मी नमस्कार करतों.

सनत्कुमार-नाचिकेत-कश्यपात्रि-षट्पदै-
र्धृतं स्वकीयमानसेषु नारदादि-षट्पदैः ।
रवीन्दु-रन्तिदेव-देवराज-कर्म-शर्मदे
त्वदीय-पादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ६ ॥

हे आई नर्मदे ! तुझें चरणकमल अनादि कालापासून अनेक ऋषि-मुनींनीं सेविलेलें आहे. सनत्कुमार हें एक उदाहरण आहे. सनक, सनंदन, सनातन आणि सनत्कुमार हे चारीहि ब्रह्मदेवाचे मानसपुत्र प्रत्यक्ष ईश्वराचे अवतार, परम विरक्त महान् तत्त्ववेत्ते, तसेंच नाचिकेत, कश्यप अत्रि आणि नारदादि महर्षि यांनीं भ्रमराप्रमाणें लुब्ध होऊन तुझ्या मधुर जलाचें सेवन केलेलें आहे. त्याचें आपल्या मनामध्यें सतत धारण-चिंतन केलेलें आहे.

सृष्टीमध्यें जन्माला येणाऱ्या मानवांना आत्मकल्याणाचा मार्ग दाखविण्या-करितां सृष्टीच्या आरंभकालींच सनक, सनंदन, सनातन आणि सनत्कुमार यांनीं ब्रह्मदेवापासून जन्म घेतला. हा प्रत्यक्ष परमेश्वराचाच अवतार मानला जातो. हे चारीहि महर्षि सनत्कुमार या एकाच नांवानें ओळखले जातात. यांनीं नर्मदेच्या कांठीं तप करून साऱ्या विश्वाला मानवधर्माचा उपदेश केलेला आहे. साऱ्या विश्वाला आत्महिताचा मार्ग दाखविलेला आहे. हें स्थान नर्मदानाभिमंडल सिद्धनाथतीर्थ म्हणून आजहि नर्मदेच्या कांठीं पहावयास सांपडतें.

नाचिकेत म्हणजे उद्दालकी ऋषींचे चिरंजीव यांनाच अरुणि किंवा नचिकेता असेंहि म्हटलेलें आहे. यांची गोष्ट कठोपनिषदांत फारच सुंदर वर्णिलेली आहे. वाचकांनी ती अवश्य वाचावी. फारच बोधप्रद आहे. यांनीं बालपणींच आपल्या वाक्चातुर्याने यमाला संतुष्ट करून प्रत्यक्ष यमदेवाकडूनच

अध्यात्मविद्या संपादन केली होती. यांनींहि नर्मदेच्या कांठीं वास्तव्य करून मोठी तपश्चर्या केलेली आहे. त्याचप्रमाणें महर्षि कश्यप अत्रि ऋषि इत्यादि सर्व ऋषींनीं भ्रमर जसे कमलाच्या सभोंवार रमतात त्याचप्रमाणें नर्मदेच्या काठीं अत्यंत प्रेमानें वास्तव्य केलेलें आहे. याच अभिप्रायानें आचार्यांनीं ऋषींच्या नांवापुढें 'षट्पद' शब्द योजला आहे.

तन्मयता आणि अनन्य प्रेम या बाबतींत भ्रमरासारखें दुसरें उदाहरण या जगांत सांपडावयाचें नाहीं. शिसव्यासारख्या कठीण काष्ठाचा चक्काचूर करण्याचें सामर्थ्य अंगीं असूनहि कमळांत गुंतून पडलेला भुंगा कमळ मिटल्यानंतर त्या कमल-कलिकेंत आपल्या प्राणालाहि मुकेल, मरण पत्करील पण आपल्याला प्रिय असलेल्या त्या कोमल कमलदलांचा छेद करून तो कमळांतून बाहेर पडणार नाहीं. जगांत अनेक प्रकारचीं बंधनें असतात पण प्रेमबंधनाचा प्रकार कांहीं. निराळाच आहे हा सिद्धान्त भ्रमर आपल्या उदाहरणानें सिद्ध करीत आहेत. " बन्धनानि खलु सन्ति बहूनि प्रेमरज्जुदृढबन्धनमाहुः । दारुभेदनिपुणोऽपि षडङ्घ्रिर्निष्क्रियो भवति पङ्कजकोषे " असेंच परमेश्वराविषयीं अनन्य प्रेम आपल्या अंतःकरणांत असावें, याच अभिप्रायानें नर्मदेच्या कांठीं तन्मयतेनें व प्रेमानें वास्तव्य करणाऱ्या ऋषींना उद्देशून आचार्यांनीं या श्लोकाच्या दोन्ही चरणांत 'षट्पद' या शब्दाची योजना केलेली आहे.

आई नर्मदे ! नारदादि ऋषींनीं देखील स्वकीय मानसामध्यें – आपल्या हृदयामध्यें तुझ्याच चरणकमलाला धारण केलेलें आहे. तुझाच त्यांनीं ध्यास घेतलेला आहे. तुझ्याच कांठीं अनन्य भक्तीनें वास्तव्य करून तपश्चर्या केलेल्या आहेत. 'रवीन्दु' म्हणजे सूर्य आणि चंद्र यांनींहि आपआपल्या दुरितांचें निरसन करण्याकरितां नर्मदेच्याच कांठीं तपश्चर्या केलेली आहे. सुप्रसिद्ध राजा रन्तिदेव हा मोठा दयेचा सागर होता. तो मोठा समदर्शी होता. प्राणिमात्रांच्या ठिकाणी परमात्मस्वरूपाला तो पहात असे. सर्वांच्या सुखांतच तो स्वतःचें सुख मानीत होता. सर्वांचीं दुःखें मी भोगीन पण सर्वांनीं सुखी असावें अशी त्याची तळमळ होती. " न कामयेऽहं साम्राज्यं न स्वर्गं नापुनर्भवम् । कामये दुःखतप्तानां प्राणिनामार्तिनाशनम् " मला साम्राज्य नको स्वर्ग नको व मोक्षहि नको. केवळ दुःखानें व्याकुळ झालेल्या लोकांचीं दुःखें नाहींशीं व्हावींत हीच माझी इच्छा आहे. असाच त्यानें परमेश्वराजवळ

वर मागितला होता ! त्या रंतिदेव राजानेंहि पण नर्मदेच्या कांठीं वास्तव्य आणि तपश्चर्या केलेली आहे. 'देवराज' म्हणजे सर्व देवांचा राजा इंद्र त्यानेंहि पण नर्मदेच्या कांठीं तपश्चर्या केलेली आहे. हीं सर्व ठिकाणें आजहि नर्मदेच्या कांठीं पहावयास सांपडतात.

तात्पर्य, हे आई नर्मदे ! सूर्यचंद्र, रन्तिदेव आणि इंद्र या सर्वांना त्यांच्या तपश्चर्यारूपी कर्मामुळें त्यांना तूं 'शर्मदा' म्हणजे सुख देणारी झालेली आहेस. आई ! मलाहि तूं सुखी कर. मी तुझ्या चरणकमलीं नमस्कार करीत आहें.

अलक्ष-लक्ष-लक्ष-पाप-लक्षसार-सायुधं
ततस्तु जीवजन्तु-तन्तु-भुक्ति-मुक्ति-दायकम् ।
विरिञ्चि-विष्णु-शङ्कर-स्वकीय-धाम-वर्मदे
त्वदीय-पादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ७ ॥

हे माते नर्मदे ! 'अलक्ष' म्हणजे डोळ्यास न दिसणारीं अर्थात् अदृश्य अशीं जीं आमचीं 'लक्ष लक्ष' म्हणजे लाख लाख अर्थात् असंख्य पापें त्या पापांचें निरसन करण्याकरितां तूं आपल्या हातामध्यें 'लक्षसार' म्हणजे वज्र अर्थात् वज्र नांवाचें आयुध धारण केलेलें आहेस. त्या आयुधामुळेंच तुझें स्वरूप 'सायुध' म्हणजे आयुधानें युक्त असें दिसत आहे. अथवा हें पादपंकजाचें विशेषण समजावें. श्रीनर्मदादेवीच्या तळपायावर वज्राचें चिह्न आहे. भक्तजनांच्या असंख्य पातकांचें निरसन करणारें तें जणुं कांहीं आयुधच आहे. त्या 'लक्षसार' अर्थात् वज्ररूपी आयुधामुळें तुझें चरणकमल सायुध दिसत आहे.

श्रीहरीच्या चरणीं वज्र आणि अंकुश हीं आयुधें असल्याचा निर्देश श्रीमद्भागवतांत केलेला आहे. अशा तऱ्हेचें चिह्न तळपायावर असणें हें सामुद्रिक शास्त्राच्या दृष्टीनें देवतेचें लक्षण होय. तात्पर्य, आई नर्मदे ! 'लक्षसार' आयुधामुळें तुझें चरणकमल 'सायुध' झालें आहे. या ठिकाणीं वज्र हें एक उपलक्षण म्हणजे उदाहरण मात्र आहे. वज्राप्रमाणेंच अंकुश ध्वज, कमल, कलश, इत्यादि अनेक शुभसूचक चिह्नें श्रीनर्मदामातेच्या चरणीं विराजमान आहेत.

'ततस्तु' म्हणजे म्हणूनच तर हे आई नर्मदे ! 'जीवजन्तु-तन्तु' म्हणजे जीवजंतूंच्या ज्या अनंत परंपरा त्यांना तुझें चरणकमल भुक्ति आणि मुक्ति देणारें आहे. भुक्ति म्हणजे भोग अर्थात् सर्व प्रकारच्या सुखांचीं साधनें आणि

तीं सुखें भोगण्याचें सामर्थ्य तसेंच मुक्ति म्हणजे मोक्ष अर्थात् सर्व प्रकारच्या सांसारिक दुःखांचा आत्यंतिक निरास.

'विरिञ्चि-विष्णु-शंकर-स्वकीय-धाम-वर्मदे' याचा अर्थ असा :— विरिञ्चि-धाम म्हणजे ब्रह्मदेवाचा लोक अर्थात् सत्यलोक, 'विष्णुधाम' म्हणजे विष्णूचा लोक अर्थात् वैकुंठलोक तसेंच 'शंकरधाम' म्हणजे शिवलोक अर्थात् कैलासभुवन आणि 'स्वकीयधाम' म्हणजे निजधाम अर्थात् सच्चिदानन्दघन परिपूर्ण परब्रह्म हें सर्वकांहीं आई नर्मदे ! तूं आपल्या भक्तांना अर्पण करून त्यांचें तूं संरक्षण करतेस. वर्मदा म्हणजे आश्रय किंवा संरक्षण देणारी. आई नर्मदे ! मी तुझ्या चरणकमलीं नमस्कार करतों.

अहो मृतं स्वनं श्रुतं महेश-केशजा-तटे
किरात-सूत-वाडवेषु पण्डिते शठे नटे ।
दुरन्त-पाप-ताप-हारि सर्वजन्तुशर्मदे
त्वदीय-पादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ८ ॥

श्रीशंकराच्या केशसमूहांतून — जटाजूटांतून नर्मदेची उत्पत्ति झालेली असल्यामुळें तिला 'महेशकेशजा' असें म्हटलेलें आहे. नर्मदेचा जन्मवृत्तान्त थोडक्यांत असा आहे कीं, कृतयुगाच्या आरंभकालीं भगवान् शंकर हे तपश्चर्या करण्याकरितां ऋष्य पर्वतावर बसले. या ऋष्य-पर्वतालाच अमरकंटक, त्रिकूटाचल आणि मेकल असेंहि म्हणतात. शंकराचें खडतर तप चालू असतां त्यांच्या जटेंतून शुभ्र जलाचा प्रवाह प्रकट झाला व तो त्या पर्वतावर चोहोंकडें वाहूं लागला. पाहातां पाहातां त्या प्रवाहाची एक मूर्तिमंत कन्या बनली ! त्या कन्येनेंहि शंकरांच्या पुढें एका पायावर उभें राहून घोर तप केलें. शंकर प्रसन्न झाले. तिला म्हणाले, तुला पाहिजे तो वर मागून घे." ती म्हणाली, "मी अमर व्हावें, माझ्यामध्यें स्नान करणारें निष्पाप व्हावेंत. त्यांना पृथ्वावरील सर्व तीर्थांचें स्नान केल्याचें फल मिळावें, गंगेसारखा माझा महिमा वाढावा. माझ्या दर्शनानें जीवांना मुक्तीचा लाभ व्हावा. त्याचप्रमाणें हे प्रभो शंकरा ! श्रीपार्वतीसह तुम्ही माझ्या प्रवाहांत व माझ्या कांठांवर नेहमीं वास्तव्य करावें. ज्या दगडाला माझ्या जलाचा स्पर्श होईल तो दगड शिवस्वरूप व्हावा. त्याची सर्वत्र पूजा व्हावी." शंकरांनीं "तथास्तु" म्हणून तिचें हें सर्व मागणें मान्य केलें. शंकर

म्हणाले, "या भूतलावर तूं सर्वांना सुख देणारी होशील म्हणून लोक तुला 'नर्मदा' म्हणतील. तूं आतां सागराला जाऊन वर. आणखीहि कितीतरी वर शंकरांनीं तिला दिले. याप्रमाणें नर्मदेचा महिमा उत्तरोत्तर वाढूं लागला.' नर्मदाके कंकर सब शंकर' बनले! असा हा नर्मदेच्या जन्माचा वृत्तान्त आहे. याच अभिप्रायानें नर्मदेला 'महेशकेशजा' असें म्हटलें आहे.

गंगा ही स्वर्गातून अवतरली तेव्हां शंकरांनीं तिला आपल्या मस्तकावर धारण केलें व तेथून ती भूतलावर आली. नर्मदा ही शंकरांच्याच जटेंतून उत्पन्न झाली व भूतलीं आली असा या दोहोंमध्यें फरक आहे. तात्पर्य, 'महेशकेशजा' म्हणजे नर्मदा. तिच्या 'तटे' म्हणजे कांठांवर 'स्वनं श्रुतं सत्' म्हणजे शब्द श्रवण करीत असतांना प्राप्त झालेलें 'मृतं' म्हणजे मरण 'अहो' म्हणजे आश्चर्यकारक अर्थात् भाग्याचें द्योतक होय. नर्मदेच्या कांठीं नर्मदेच्या प्रवाहाचा मंजुल ध्वनि श्रवण करीत मरण प्राप्त होणें हें एक मोठें भाग्याचें लक्षण आहे. 'अहो' या शब्दाचा अर्थ आश्चर्य असा आहे. नर्मदेचा कलकल ध्वनि श्रवण करीत नर्मदेच्या कांठीं येणारें मरण ही एक पूर्वार्जित पुण्यप्रभावानें प्राप्त होणारी आश्चर्यकारक घटना होय.

'दुरन्त-पाप-ताप-हारि' नर्मदेचें चरणकमल हें दुरन्तपापांचें व त्या पापापासून प्राप्त होणाऱ्या तापांचें दुःखांचें हरण-करणारें आहे. ज्या पापांचा अंत इतर ठिकाणीं होणें कठीण आहे अशीं खडतर पापेंहि नर्मदेच्या कांठीं वास्तव्य केल्यानें नाहींशीं होतात. तीं पापें ज्यांच्या ठिकाणीं आहेत ते कोणीहि असोत, 'किरात' म्हणजे भिल्ल, 'सूत' म्हणजे संकरोत्पन्न आणि 'वाडव' म्हणजे ब्राह्मण. त्याचप्रमाणें 'पण्डित' म्हणजे विद्वान् आत्मवेत्ता, 'शठ' म्हणजे धूर्त लबाड आणि 'नट' म्हणजे बहुरूपी सोंगाड्या, हा कोणताहि भेदभाव न ठेवतां नर्मदादेवी ही सर्वांची दुर्धर पापें दूर करते. आई नर्मदे! तूं तर 'सर्वजन्तुशर्मदा' म्हणजे सर्व प्राण्यांना सुख देणारी आहेस. हे देवी नर्मदे! मी तुझ्या चरणकमलीं अनन्यप्रेमानें नमस्कार करतों.

इदं तु नर्मदाष्टकं त्रिकालमेव ये सदा
पठन्ति ते निरन्तरं न यान्ति दुर्गतिं कदा।
सुलभ्य देवदुर्लभं महेशधाम-गौरवं
पुनर्भवा नरा न वै विलोकयन्ति रौरवम् ॥ ९ ॥

हें नर्मदेचें अष्टक जे कोणी सदासर्वकाळ – तिन्ही त्रिकाळ निरंतर भक्तियुक्त अन्तःकरणानें पठण करतात ते कधींहि दुर्गतीला जात नाहींत. त्यांना कधींहि दुर्गति प्राप्त होत नाहीं. दुर्गति म्हणजे दुःख, संकटें, अधःपात, अपकीर्ति, रोग, पीडा, भूत, प्रेत, पिशाचबाधा आणि नरकलोक. नर्मदेच्या भक्तांना नर्मदेच्या काठीं वास्तव्य करून तप करणाऱ्यांना ही दुर्गति कधीं प्राप्त होत नाहीं. 'देव-दुर्लभ' म्हणजे देवादिकांनाहि मिळविण्यास अत्यंत कठीण असें कैलास लोकांतील गौरवाचें स्थान त्यांना प्राप्त होतें. कैलासलोकीचें गौरव त्यांना प्राप्त झाल्यामुळें (सुलभ्य) ते लोक पुन्हां गर्भवासाला येऊन, पुन्हां जन्म घेऊन कधींहि गौरवनरक अवलोकन करीत नाहींत. 'देहदुर्लभ' असा पाठ घेतल्यास देहाभिमान असेतोंपर्यंत दुर्लभ असलेलें शिवलोकांतील गौरव असा अर्थ करावा. तात्पर्य, नर्मदेच्या कृपेनें दुःख यातना टळतात. मोठेंपणा मिळतो व मोक्षसुखाचा सहज लाभ होतो.

■ ■ ■

नारायण नारायण जय गोविन्द हरे स्तोत्रम्।

[आचार्यांनीं केलेलें हें 'नारायण नारायण जय गोविन्द हरे' स्तोत्र हें एक स्तोत्ररूपानें केलें जाणारें परमेश्वराचें भजनच आहे. 'भज्' भजणें भक्ति करणें या धातूवरून निष्पन्न झालेला भजन शब्द जरी भक्ति या अर्थानें संस्कृत भाषेंत रूढ असला तरी लौकिक भाषेंत भजन या शब्दाला कांहीं निराळाच अर्थ आहे. वीणा, टाळ, मृदंग इत्यादि वाद्यांच्या साहाय्यानें व्यक्तिशः अथवा सामुदायिक रूपानें जें तालबद्ध आणि स्वरबद्ध असें श्रीहरीचें नामसंकीर्तन अथवा गुणसंकीर्तन केलें जातें त्याम भजन असें म्हणतात. भजनामध्यें जी गोडी आहे ती केवळ ग्रंथवाचनांत किंवा व्याख्यान, पुराण, प्रवचन यांच्या श्रवणांत मिळणार नाहीं. भजनानें मन लवकर तन्मय होतें. क्षणभर का होईना पण संसाराचा विसर पडतो. भजनाचा छंद जीवनाला अत्यंत उपकारक आहे. तो आरंभीं आरंभीं अल्प स्वरूपांत असला तरी परिणामीं जीवाला पूर्ण ब्रह्म-स्वरूपांत नेऊन सोडणारा आहे. " म्हणा गोविंद गोविंद मना लागलिया छंद । मग गोविंद ते काया भेद नाहीं देवा तया " हा संतांचा इषारा मोठा मार्मिक आहे.

श्रीसमर्थ सद्गुरूंनीं रामाजवळ जें बहुविध मागणें मागितलें आहे त्यांतच " संगितगायन देरे राम, नृत्यकला मज देरे राम " असेंहि एक मागणें मागितलेलें आहे. कोणी म्हणेल कीं, लोकसंग्रहाकरितां समर्थांनीं हें मागणें मागितलें आहे; पण हें म्हणणें बरोबर नाहीं. समर्थ हे स्वतःच्या प्रभावानेंच लोकसंग्रह करण्यास समर्थ होते. त्यांना त्याकरितां देवाजवळ कांही मागणें मागण्याची आवश्यकता नव्हती. पण मनाला श्रीहरिस्वरूपीं चटकन् तन्मय करण्याला भजन हेंच एक उत्कृष्ट आणि प्रभावी साधन आहे. त्या भजनाला संगीत गायनाची व नृत्य-कलेची जोड मिळाल्यास तें भजन मनाला समाधिसौख्याचा लाभ करून देतें. हा भजनाचा प्रभाव लक्षांत घेऊनच श्रीसमर्थांनीं श्रीरामचन्द्रप्रभूजवळ वरील मागणें मागितलें आहे.

नारदादि ऋषि हे भजनप्रिय होते. प्रह्लादानें तर आपल्याबरोबर दैत्य पुत्रांनाहि हरिभजनाचें वेड लावलें होतें. हातांत वीणा आणि चिपळ्या घेऊन " बसो मेरे नयननमें नन्दलाला " म्हणत म्हणत प्रेमानें भजन करतांना मीराबाईनें तर श्रीकृष्णप्रभूलाहि आपल्याबरोबर नाचावयास लावलेलें आहे ! विठ्ठल विठ्ठल गजरानें जेव्हां अवघी पंढरी दुमदुमून जाते तेव्हां तिच्यापुढें स्वर्ग आणि मोक्षहि तुच्छ वाटूं लागतो ! रहिमतपूरचे राधाकृष्णस्वामी हे तर आपल्याला अत्यंत प्रिय असलेल्या " गोपालकृष्ण राधाकृष्ण " या भजनांत तन्मय झाले म्हणजे आपल्या बरोबर जंगली वाघालाहि नाचावयास लावीत होते !

आचार्यांच्या कांहीं स्तोत्रांवरून आचार्यांनाहि भजनाचा मोठा छन्द होता असें स्पष्ट दिसत आहे. प्रस्तुत स्तोत्र हें एक त्याचेंच गमक होय. ' सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची । नुर्वी पुरवी प्रेम कृपा जयाची ' या चाली-वरच हें भजन अथवा स्तोत्र म्हणावयाचें आहे. धा धिं धा धा ती ना धा धिं धा धा ती ना या सहा मात्रांच्या दादरा तालावर हें भजन म्हणतांना मनाला फारच आनंद वाटतो. या स्तोत्रांतील प्रत्येक संबोधन श्रीहरीच्या गुणांचें व चरित्राचें द्योतक आहे दशावतारांतील सर्वगुणसंपन्न प्रधान अवतार श्रीरामचन्द्र व भगवान् श्रीकृष्ण यांचेंच या स्तोत्रांत प्राधान्यानें स्मरण केलेलें आहे. हें स्तोत्र म्हणतांना विरामाच्या ठिकाणीं आणि चरणाच्या शेवटीं असलेला 'अ' हा स्वर कांहीं ठिकाणीं दीर्घ करावा लागतो. उदाहरणार्थ, 'करुणापारावारा' 'वरुणालयगम्भीरा' 'घननीरदसंकाशा' इत्यादि. क्वचित् पुस्तकांतून असाच पाठ आढळतो. वाचकांनीं

आपल्या सोईप्रमाणें म्हणावें. प्रथम सलग स्तोत्र देऊन नंतर त्याचा अर्थ आंकडेवारीनें दिलेला आहे.]

नारायण नारायण जय गोविन्द हरे ।
नारायण नारायण जय गोपाल हरे ॥ ध्रु०॥

करुणापारावार वरुणालयगम्भीर ॥ १ ॥
घननीरदसंकाश कलकलिकल्मषनाश ॥ २ ॥
यमुनातीरविहार धृतकौस्तुभमणिहार ॥ ३ ॥
पीताम्बरपरिधान सुरकल्याणनिधान ॥ ४ ॥
मञ्जुलगुञ्जाभूष मायामानुषवेष ॥ ५ ॥
राधाऽधरमधुरसिक रजनीकरकुलतिलक ॥ ६ ॥
मुरलीगानविनोद वेदस्तुतभूपाद ॥ ७ ॥
बर्हि-बिबर्हापीड नटनाटकफणिक्रीड ॥ ८ ॥
वारिजभूषाभरण राजीव-रुक्मिणी-रमण ॥ ९ ॥
जलरुह-दल-निभ-नेत्र जगदारम्भक-सूत्र ॥ १० ॥
पावक-रजनी-संहर करुणालय मामुद्धर ॥ ११ ॥
अघ-बक-क्षयकंसारे केशव कृष्ण मुरारे ॥१२॥
हाटकनिभपीताम्बर अभयं कुरु मे मावर ॥ १३ ॥
दशरथराजकुमार दानवमदसंहार ॥ १४ ॥
गोवर्धनगिरिरमण गोपीमानसहरण ॥ १५ ॥
शरयूतीर-विहार सज्जनऋषिमन्दार ॥ १६ ॥
विश्वामित्रमखत्र विविधपरामुचरित्र ॥ १७ ॥
ध्वजवज्राङ्कुशपाद धरणीसुतसहमोद ॥ १८ ॥
जनकसुताप्रतिपाल जय जय संस्मृतिलील ॥ १९ ॥
दशरथवाग्धृतिभार दण्डकवन-संचार ॥ २० ॥
मुष्टिक-चाणूर-संहार मुनिमानसविहार ॥ २१ ॥
वालिविनिग्रह-शौर्य वरसुग्रीवहितार्य ॥ २२ ॥

मां मुरलीकर धीवर पालय पालय श्रीधर ॥ २३ ॥
जलनिधि-बन्धन-धीर रावणकण्ठविदार ॥ २४ ॥
ताटीमद-दलनाढ्य नट-गुण-विविध-धनाढ्य ॥ २५ ॥
गौतमपत्नी-पूजन करुणाघनावलोकन ॥ २६ ॥
संभ्रम-सीताहार साकेत-पुर-विहार ॥ २७ ॥
अचलोद्धृति-चञ्चत्कर भक्तानुग्रहतत्पर ॥ २८ ॥
नैगम-गान-विनोद रक्षःसुत-प्रह्लाद ॥ २९ ॥
भारति-यतिवर-शंकर नामामृतमखिलान्तर ॥ ३० ॥
नारायण नारायण जय गोविन्द हरे
नारायण नारायण जय गोपाल हरे ॥

नारायणा नारायणा ! गोविंदा श्रीहरे ! तुमचा जयजयकार असो. हे नारायणा, हे गोपाला तुमचा जयजयकार असो. मी पुनः पुन्हां तुमचा जय-जयकार करीत आहें ॥ ध्रु० ॥

आपण करुणेचे 'पारावार' म्हणजे सागर आहां. वरुणालय म्हणजे वरुण देवाचें वसतिस्थान अर्थात् महासागर त्याच्याप्रमाणें आपण अत्यंत गंभीर आहां. सागराला जसा अंत आणि पार नाहीं व त्याची खोलीहि कोणाला कळत नाहीं त्याचप्रमाणें हे परमेश्वरा ! आपल्या यथार्थ स्वरूपाचें आकलन कोणालाहि होत नाहीं. ॥ १ ॥

हे प्रभो ! आपली कांति, आपलें रूप पाण्यानें भरून आलेल्या दाट ढगाप्रमाणें श्यामवर्ण आहे. आपण घनश्याम आहां. आपलें स्मरण केल्याबरोबर या कलियुगामध्यें मानवाच्या हातून घडलेल्या सर्व 'कल्मषां'चा म्हणजे पातकांचा नाश होतो. म्हटलेंच आहे कीं, कृतयुगामध्यें श्रीहरीचें ध्यान केलें असतां जें फल प्राप्त होतें, त्रेतायुगामध्यें यज्ञयागादि कर्मांच्या अनुष्ठानानें जें फल मिळतें तसेंच द्वापरयुगामध्यें श्रीहरीची यथासांग पूजा-अर्चा केली असतांना जें फल मिळतें तेंच कलियुगामध्यें केवळ श्रीहरीच्या गुणसंकीर्तनानें व नामसंकीर्तनानेंहि मिळतें. ' कृते यद्ध्यायतो विष्णुं त्रेतायां यजतो मखैः ! द्वापरे परिचर्यायां कलौ तद्धरिकीर्तनात् ' (भागवत). यो कलियुगांत केवळ श्रीहरीच्या गुणसंकीर्तनानें

व नामसंकीर्तनानें भक्तांचीं सर्व दुःखांतून सुटका होते म्हणून श्रीहरीला 'कृत-कलि-कल्मष-नाश' असें संबोधन दिलेलें आहे. ॥ २ ॥

'यमुना-तीर-विहार' हे प्रभो भक्तवत्सला ! आपण भक्तजनांच्या मनाला रमविण्याकरितां श्रीकृष्णाचें रूप घेऊन यमुनेच्या कांठीं गाई-वासरांना चारीत फिरणें, गोपबालकांमध्यें लपंडाव, शिवणापाणी, आट्यापाट्या, हुतुतू, सूरपारंबा, विटीदांडू, चेंडू वगैरे अनेक खेळ खेळलांत. गोपालकाला, काळियमर्दन, सहज लीलेनें गोवर्धन पर्वत करंगळीवर धारण करणें इत्यादि किती तरी अनेक प्रकारच्या अलौकिक लीला केल्यात. यमुनेच्या कांठीं होणाऱ्या आपल्या रासलीला अर्थात् लोकनाट्य, सामूहिक नृत्य आणि गाणें, मुरली वाजविणें इत्यादि क्रीडा कोणाच्या बरें मनाला आकृष्ट करीत नाहींत ? 'विहार' म्हणजे लीला, संचार इत्यादि. 'धृत-कौस्तुभ-मणिहार' हे प्रभो ! आपण कंठामध्यें कौस्तुभमणि आणि विविध रत्नांचे हार धारण केलेले आहेत. ॥ ३ ॥

'पीताम्बरपरिधान' हे परमेश्वरा ! आपण पीतांबर अर्थात् रेशमी जरीकांठी पिवळ्या रंगाचें तलम वस्त्र परिधान केलेलें आहे. पीतांबर आपण नेसलेले आहांत. 'सुर-कल्याण-निधान' म्हणजे सर्व देवांच्या कल्याणाचें आपण निधान म्हणजे मूल आधारस्तंभ आहां. देवांच्याच काय, सर्व मानवांच्या व सर्व विश्वाच्याहि कल्याणाचें आपण 'निधान' म्हणजे आश्रयस्थान आहां. ॥ ४ ॥

'मञ्जुलगुञ्जाभूष' हे प्रभो श्रीकृष्णा ! मृदु आणि सुंदर गुंजांचे अलंकार आपण घातलेले आहेत. वस्तुतः आपल्याला आकार, वेष वगैरे कांहीं नाहीं तरी पण 'माया-मानुषवेष' आपण भक्तजनांच्या कल्याणाकरितां मायेनें मनुष्यवेष धारण केलेला आहे. लोककल्याणाकरितां आपण श्रीकृष्णरूपानें व रामचंद्राच्या रूपानें मानवांमध्यें अवतरलांत. ॥ ५ ॥

'राधाधर-मधु-रसिक' आपण राधाधरसुधारसाचा आस्वाद घेण्यांत मोठे रसिक आहां. 'रजनीकर-कुल-तिलक' रजनीकर म्हणजे चंद्र. त्याचें कुल म्हणजे वंश. या चंद्रवंशांत अर्थात् सोमवंशांत आपण अवतार घेऊन सोमवंशाला ललाटीच्या टिळ्याप्रमाणें भूषित केलेलें आहे. ॥ ६ ॥

'मुरली-गान-विनोद' मुरलीच्या मधुर नादामध्यें गायन करण्यास आपल्याला अत्यंत आनंद वाटतो अथवा आपण मधुर मुरलीच्या नादानें व संगीत गायनानें भक्तजनांचा 'विनोद' म्हणजे मनोरंजन करतां, आपण स्वतः

त्यांत रमतां व इतरांनाहि रमवितां. 'वेद-स्तुत-भूपाद' वेदानें फक्त आपल्या एका अंशाचें स्तवन केलेलें आहे. वेद फक्त आपल्या एका अंशाचें म्हणजे अत्यंत थोड्या स्वरूपाचें वर्णन करूं शकतो.

वस्तुतः भगवान विष्णु हे विश्वव्यापी अनंत व अपरिच्छिन्न आहेत. तेथें अंशांशिभाव संभवत नाहीं. तथापि परमेश्वराच्या स्वरूपाची मानवी बुद्धीला आपाततः कल्पना यावी म्हणून वेदानें अंशांशिभाव गृहीत धरून परमेश्वराच्या स्वरूपाचें वर्णन केलेलें आहे. " पादोऽस्य विश्वा भूतानि, त्रिपादस्यामृतं दिवि " हीं अनंतकोटि ब्रह्मांडें म्हणजे परमेश्वराचें एकचतुर्थांश स्वरूप आहे असें समजा. त्याचें तीनचतुर्थांश स्वरूप या विश्वाच्या पलीकडे आहे ! तें विश्वाच्या बाहेर आहे असें समजा. विश्वाच्या पलीकडे अंतरिक्षांत तें अमृतरूपानें विराजमान आहे. अशा शब्दांनीं वेदानें परमेश्वराच्या विश्वरूपी एका अंशाचें स्तवन केलेलें आहे. ॥ ७ ॥

'बर्हि-निबर्हापीड' बर्हि म्हणजे मोर, 'निबर्ह' म्हणजे पंख आणि 'आपीड' म्हणजे शिरोभूषण अर्थात् मुकुट. देवा ! आपण आपल्या मस्तकावर मोरांच्या पंखांचा मुकुट धारण केलेला आहे. हे मोरांचे पंख हें आपलें शिरोभूषण झालेलें आहे. लोकमान्य तर श्रीकृष्णाला मोरमुकुट वन्सीवाला असेंच म्हणतात. 'नट-नाटक-फणिक्रीड ' आपण मोठें नट आहां. नटवर, नटनागर हीं तर आपलीं नांवेंच आहेत. नाट्यकलेंत आपण पूर्ण निष्णात आहां. नाटकांतल्या नृत्याप्रमाणें आपण कालियनागाच्या फणावर – अतिभयंकर असलेल्या कालियसर्पाच्या मस्तकावर नृत्यक्रीडा केलेली आहे ! आपलें रासनृत्य पाहून तर देवांनींहि स्वर्गांतून आपणावर पुष्पवृष्टि केलेली आहे ! ॥ ८ ॥

'वारिज-भूषाभरण' वारिज म्हणजे कमळ. कमळांच्या माळा आपण अलंकाराप्रमाणें गळ्यांत धारण केलेल्या आहेत. 'राजीव-रुक्मिणीरमण' 'राजीव' म्हणजे कमल. अर्थात् कमलाप्रमाणें अत्यंत कोमल असलेल्या रुक्मिणीचे आपण ' रमण म्हणजे कान्त आहां. हे परमेश्वरा ! आपला जयजयकार असो. ॥ ९ ॥

'जलरुह-दल-निभ-नेत्र' जलरुह म्हणजे कमल. हे भगवन् श्रीहरे ! आपले नेत्र कमलदलाप्रमाणें अत्यंत कोमल, रमणीय, आरक्तवर्ण आणि विशाल आहेत. 'जगदारम्भकसूत्र' हे प्रभो ! आपण विश्वाच्या आरंभाचें सूत्र आहां (आणि सूत्राधारहि पण आहां), 'सूत्र' शब्दाचा अर्थ निमित्त असा आहे

अर्थात् जगाच्या आरंभाचें निमित्तकारण आपणच आहां. आपणच हें सर्व जग निर्मिलें आणि आपणच त्याचें प्रतिपालन करीत आहां हे प्रभो आपला जय-जयकार असो. ॥ १० ॥

'पातक-रजनीसंहर' हे परमेश्वरा ! आपण भक्तजनांच्या पातकरूपी रात्रींचा नाश करणारे आहां. अथवा रजनीप्रमाणें म्हणजे रात्रीच्या गाढ अंधकाराप्रमाणें असलेल्या अज्ञानरूपी पातकांचा आपण 'संहार' म्हणजे नाश करणारे आहां. 'करुणालय' म्हणजे आपण करुणेचे निधान आहां. करुणानिधि-करुणासागर आहां. हे प्रभो ! आपण माझा उद्धार करा. ॥ ११ ॥

हे केशवा ! हे श्रीकृष्णा ! आपण अघासुर बकासुर, यांचा 'क्षय' म्हणजे नाश केला आहे. शिशुपाल, वक्रदन्त, भौमासुर अथवा नरकासुर इत्यादि दुष्टांचाहि वध केलेला आहे. आपण मुरदैत्यालाहि मारलें आणि सर्व जगाला सुखी केलें ! हे मुरारे नारायणा ! आपला जयजयकार असो. ॥ १२ ॥

'हाटक-निभ-पीताम्बर' हे प्रभो श्रीहरे ! आपला पीतांबर सोन्यासारखा उज्ज्वल पिवळ्या रंगाचा आहे. हे 'मावर' म्हणजे लक्ष्मीकान्ता ! (मी संसारभयानें अत्यंत घाबरलों आहें) आपण मला निर्भय करा. आपला जयजयकार असो. ॥ १३ ॥

हे भगवन् आपण दशरथराजाच्या येथें त्याचे पुत्र म्हणून अवतरला. हे दशरथनंदना ! 'दानव-मद-संहार' म्हणजे आपण सर्व दानवांच्या गर्वाचा व दुष्ट दानवांचाहि संहार केलेला आहे. नारायणा आपला जयजयकार असो ॥ १४ ॥

हे नारायणा ! आपण गोवर्धन पर्वतावर रमलांत. सर्व गायी, वांसरें, गोप, गोपी व गोपालबालकें यांनाहि रमविलें ! आपण आपल्या अद्भुत लीलांनीं सर्व गोप व गोपीजनांच्या मनांचें हरण केलें. सर्वांचीं मनें आपण आपल्याकडे आकर्षून घेतलीं. जणुं कांहीं सर्वांचीं मनें आपण हिरावूनच घेतलीं ! परमेश्वरा ! आपले गुणवैभव अद्वितीय आहे. आपला जयजयकार असो. हे गोविंदा गोपाळा ! आपला जयजयकार असो. ॥ १५ ॥

'शरयू-तीर-विहार' हे प्रभो नारायणा ! आपण कृष्णावतारामध्यें जसें यमुनेच्या कांठीं खेळलांत त्याचप्रमाणें रामावतारामध्यें शरयूच्या कांठींहि क्रीडा केलेली आहे. 'सज्जनऋषिमन्दार' संतजन आणि ऋषिजन यांना आपण कल्पवृक्षासारखें आहां. अर्थात् ऋषिमुनि, संत आणि भगवद्भक्त यांच्या सर्व कामना आपण तृप्त करतां. ॥ १६ ॥

हे भगवन् ! आपण विश्वामित्र मुनींच्या यज्ञाचें संरक्षण केलेलें आहे. 'विविधपरासुचरित्र' 'विविध' म्हणजे अनेक 'पर' म्हणजे शत्रु हिरण्याक्ष, हिरण्यकशिपु, शिशुपाल, वक्रदंत वगैरे, यांना आपल्या सुचरित्राचें अवगाहन न झाल्यामुळें आपण 'असुचरित्र' भासलां अथवा जे लोक 'विविधपर' म्हणजे विषयोन्मुख आहेत, बहिर्मुख आहेत त्यांना तुमचें सुचरित्र लक्षांत येत नाहीं. अन्तर्मुख भक्तजनांनाच तुमच्या सुचरित्राची प्रतीति येते. बहिर्मुख मूर्खजनांना मात्र तुम्ही 'असुचरित्र' असेंच भासतां हें त्यांचें दुर्दैव होय. पुष्पदन्तांनीं देखील " यतो मन्दास्त्वां प्रत्यमरवर संशेरत इमे " हे अमरवर म्हणजे सर्व देवांमध्यें श्रेष्ठ असलेले तुम्ही तुमच्यावांचून या विश्वाची घडामोड करण्यास दुसरा कोण बरें समर्थ आहे ? पण मूर्ख लोकांना तुमच्या सामर्थ्याचें आकलन होत नाहीं. कारण ते 'मन्द' म्हणजे मूर्खच असतात. ते व्यर्थच संशय घेत रहातात ! नारायणा ! तुमचा जयजयकार असो. ॥ १७ ॥

'ध्वजवज्राङ्कुश-पाद' हे प्रभो नारायणा ! आपल्या चरणकमलांवर ध्वज, वज्र आणि अंकुश इत्यादि सुचिह्नें विराजमान आहेत. 'धरणीसुतसहमोद' म्हणजे आपण पृथ्वीची कन्या जी सीता तिच्या सान्निध्यांत आनंदांत असतां अर्थात् तीहिपण आपल्या सांनिध्यांत आनंदांत असते. हे गोविंदा गोपाला ! श्रीहरे नारायणा ! तुमचा जयजयकार असो. ॥ १८ ॥

'जनकसुता–प्रतिपाल' हे प्रभो नारायणा ! आपण जनकसुता जी जानकी तिचें रामचन्द्ररूपानें प्रतिपालन केलेलें आहे. आपण जानकीचे पालनकर्ते, संरक्षणकर्ते आहां. 'संस्मृतिलील' हे परमेश्वरा ! आपल्या लीला अशा कांहीं अभ्दुत आहेत कीं, मनाला सारखी त्यांची आठवणच होत रहाते. कधींहि त्यांचें विस्मरण होत नाहीं. तात्पर्य, आपल्या लीला मोठ्या मनोहर आहेत. प्रभो ! आपला जयजयकार असो. ॥ १९ ॥

'दशरथवाग्धृतिभार' हे नारायणा ! आपण दशरथराजाच्या वाणीचा भार मोठ्या धैर्यानें धारण केलेला आहे. दशरथाच्या वाणीचें सत्यत्व राखलें. चौदा वर्षे वनवासाचें निमित्त करून दुष्ट राक्षसांचा संहार करण्याकरितां दंडकारण्यांतील वनामध्यें पायीं अनवाणी संचार केला ! सर्व दुष्टांचा संहार केला. ऋषि, मुनि व भक्तजनांच्या आश्रमांना भेटी देऊन त्यांना कृतार्थ केलें. त्यांचें

संरक्षण केलें. धर्माची स्थापना केली. हे मर्यादापुरुषोत्तमा प्रभो ! मी आपला जयजयकार करीत आहें. ॥ २० ॥

'मुष्टिक-चाणूर-संहार' हे प्रभो ! आपला मुष्टिक, चाणूर, शल, तोशल इत्यादि दुष्ट आणि प्रबल मल्लांचा संहार केला. 'मुनिजन-मानस-विहार' मुनिजनांचें भक्तजनांचें मानस म्हणजे अंतःकरण हीच आपली विहारभूमि होय. मुनिजनांच्या भक्तजनांच्या, हृदयांत नेहमींच आपलें वास्तव्य असतें. भक्तवत्सला रामा ! मी आपला जयजयकार करीत आहें. ॥ २१ ॥

'वालिविनिग्रह-शौर्य' हे प्रभो ! आपण अत्यंत उन्मत्त असलेल्या वालीचा निग्रह करण्यांत मोठें शौर्य दाखविलें आहे ! (तुला समरभूमीवर समोरासमोर कोणी मारूं शकणार नाहीं. जो कोणी वालीला मारण्यासाठीं वालीच्या समोर उभा राहील. त्याचें सर्व बल वालीमध्यें प्रविष्ट होईल असा वालीला वर होता. तो शब्द सत्य राखण्याकरितांच श्रीरामचन्द्रप्रभूंना वृक्षाचा आडोसा घेऊन वालीवर बाण टाकावा लागला. सुग्रीव आणि वालि हे दोघे सारखे बंधू. अगदीं तंतोतंत सारखे दिसणारे, त्यांच्या द्वन्द्वयुद्धांत दुरून नेमका वालीवर बाण टाकून वालीचा निग्रह करणें हें मोठें शौर्याचेंच कार्य आहे यांत संशय नाहीं.) हा अभिप्राय लक्षांत घेऊन आचार्यांनीं श्रीरामाला 'वालि-विनिग्रह-शौर्य' असें विशेषण दिलेलें आहे. 'वरसुग्रीवहितार्य' वानरांचा राजा श्रेष्ठ सुग्रीव त्याचें आपण हे परमेश्वरा ! 'हित' म्हणजे परममित्र आहां. सुग्रीवाशीं मैत्री जोडून त्याचें आपण अत्यंत हित केलें. हे भगवन ! आर्यांचें संरक्षण करणारे आपणहि निःसंशय परम आर्यच आहां. श्रीहरे नारायणा ! आपला जयजयकार असो. ॥ २२ ॥

'मुरलीकर' म्हणजे ज्यानें आपल्या हातांत मुरली धारण केलेली आहे असा. हे मुरलीधरा श्रीकृष्णा ! आपण मोठे 'धीवर' म्हणजे बुद्धिमान् – बुद्धीनें अत्यंत श्रेष्ठ – सर्वश्रेष्ठ आहां. अनंतकोटि ब्रह्मांडांची घडामोड हीच परमेश्वराच्या सर्वश्रेष्ठ बुद्धिमत्तेची द्योतक आहे. हे श्रीधरा परमेश्वरा ! आपण सर्व विश्वाचे पालक आहां. आपण माझें पालन करा. रक्षण करा. आपला जयजयकार असो. ॥ २३ ॥

'जलनिधि-बन्धनधीर' हे प्रभो ! आपण लंकेवर स्वारी करतांना जलनिधीचें म्हणजे समुद्राचें बंधन केलेलें आहे. समुद्रावर सेतु बांधला आहे. त्यांत आपलें धैर्य व बुद्धिमत्ता प्रकट झाली आहे. म्हणून आपण मोठे धीर आहां. धीर म्हणजे धैर्यशाली. धीर म्हणजे बुद्धिमान असा धीर शब्दाचा अर्थ

आहे. 'रावण कण्ठ-विदार' हे प्रभो वानरसेनेसह समुद्राचें उल्लंघन करून आपण लंकेच्या समरभूमीवर परदारांचें अपहरण करणाऱ्या त्या दुष्ट रावणाशीं युद्ध केलें आणि त्याच्या कंठांचें विदारण केलें ! प्रभो नारायणा ! आपला जयजयकार असो. ॥ २४ ॥

'ताटी-मद-दलनाढ्य' दंडकारण्यांतील ऋषिजनांचा अहोरात्र छळ करणाऱ्या त्या दुष्ट ताटका राक्षसीचा, प्रभो रामराया ! आपण सद्गुरु श्रीविश्वामित्र महर्षि यांच्या आज्ञेनें समूळ गर्वपरिहार करून वध केला आणि सर्व ऋषि-मुनींना संकटांतुन मुक्त केलें ! या कृतीनें आपण दयाधर्मादि गुणांनी 'आढ्य' म्हणजे संपन्न असल्याचेंच प्रतीतीला येतें. याच अभिप्रायानें आपणांस 'ताटीमद-दलन' आणि 'आढ्य' अशीं दोन् विशेषणें दिलीं आहेत. 'नट-गुण-विविध-धनाढ्य' हे भगवंता ! आपण उत्तम नटाच्या ठिकाणीं असलेल्या गुणांनीं आणि विविध वैभवांनीं संपन्न आहां. ॥ २५ ॥

हे परमेश्वरा ! आपण गौतम मुनींची पत्नी श्रीअहल्या हिला शापमुक्त करून तिचें अत्यंत आदरानें पूजन केलेलें आहे. म्हणून आपणांस 'गौतम-पत्नी-पूजन' असें म्हटलें जातें. प्रभो आपण 'करुणाघनावलोकन' आहां. आपलें अवलोकन म्हणजे पहाणें अर्थात् दृष्टि ही 'करुणाघन' म्हणजे करुणापूर्ण आहे. आपला जयजयकार असो. ॥ २६ ॥

'संभ्रमसीताहार' संभ्रम म्हणजे चित्ताचा क्षोभ. भिक्षुवेष धारण करून रावणानें जानकीचें अपहरण केलें. या घटनेनें आपल्या चित्ताचा क्षोभ होऊन ऐश्वर्यमदानें – सत्तामदानें उन्मत्त झालेल्या दुष्ट रावणाचा आपण वध केला आणि जानकीला सोडविलें. अथवा 'संभ्रम' म्हणजे धामधुम. सुग्रीवाशीं सख्य जोडून अठरा पद्मं वानरसेना संघटित केली व मोठ्या धामधुमीनें समुद्रावर सेतु बांधून लंकेवर आक्रमण केलें आणि लोककंटक बनलेल्या रावणाचा वध करून सर्व देवांना आणि मानवांना संकटांतून सोडविलें. याला निमित्त केवळ सीताहरण हेंच होय. साकेतपुर म्हणजे 'कोसल देशाची राजधानी अयोध्यानगरी, ही आपली लीलाभूमि आहे. तेथें आपण विहार केला. यास्तव आपणांस 'साकेत-पुर-विहार' असें म्हणतात. ॥ २७ ॥

'अचलोद्धृति-चञ्चत्कर' हे प्रभो नारायणा ! श्रीकृष्ण अवतारामध्यें आपण गोवर्धन पर्वत एका हातांवर – करंगळीवर – तोलून धरला आणि सर्व गोकुल-

वृंदावनवासि जनांचें संरक्षण केलें. त्या वेळीं आपल्या हाताची शोभा खरोखर मोठी अवर्णनीय होती ! श्रीकृष्णानें नंदाचा इंद्रयागाचा संकल्प फिरविला. इंद्रयागा-ऐवजीं गोवर्धन पर्वताची पूजा करविली. याचा इंद्राला मोठा राग आला. इंद्राला आपल्या सत्तेचा ऐश्वर्याचा मोठा गर्व होता. त्यानें ढगांना गोकुल-वृंदावनावर मुसळधार पाऊस पाडण्याची आज्ञा केली. पर्जन्याचा अधिपतिच तो. मेघांनीं मुसळधार पाऊस पाडण्यास आरंभ केला. गोकुळ-वृंदावनांतील लोक घाबरले. श्रीकृष्णाला शरण गेले तेव्हां श्रीकृष्णानें इंद्राच्या गर्वाचा परिहार करण्याकरितां गोवर्धन पर्वतच आपल्या हातावर उचलून धरला आणि त्याच्या आश्रयानें सर्वांचें संरक्षण केलें. त्या वेळीं श्रीकृष्णाचें वय अवघें सात-आठ वर्षांचें होतें ! ! चेंडूप्रमाणें गोवर्धन पर्वताला हातावर झेलीत असतां त्या हाताची हालचाल मोठी रमणीय दिसत होती म्हणून 'अचलोध्दृतिचञ्चत्करं' असें श्रीकृष्णाला संबोधिलें आहे. परमेश्वरा ! इंद्राच्या गर्वाचा परिहार होऊन इन्द्र आपल्याला शरण आला. याप्रमाणें आपण मोठे 'भक्तानुग्रह-तत्पर' आहां. नारायणा श्रीहरे ! मी आपला जयजयकार करीत आहें. ॥ २८ ॥

'नैगमगानविनोद' निगमांतील सामवेदांतील गायनानें व संगीतानें आपलें चित्त रमतें. देवाला संगीत अत्यंत प्रिय आहे " मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद " असें परमेश्वरानें स्वतःच म्हटलेलें आहे. 'रक्षःसुतप्रह्लाद' हिरण्यकशिपु राक्षसाचा पुत्र जो प्रह्लाद त्याला आपण प्रसन्न होऊन आनंदी केलें. आपल्या कृपेनें प्रह्लाद पूर्ण सुखी झाला. प्रभो आपला जयजयकार असो. ॥२९॥

शेवटच्या कडव्यानें आचार्य श्रीहरीची प्रार्थना करीत आहेत कीं, हे प्रभो ! 'अखिलान्तर' म्हणजे सर्वांच्या अंतर्यामीं वास्तव्य करणारे तुम्ही, ज्याला यतिवर शंकरभारति म्हणतात असा जो तुमचा हा भक्त त्यानें केलेलें हें नामामृत अर्थात् अमृततुल्य आपलीं नांवें यांचें सर्वांना आपण 'वितर' म्हणजे वितरण करा. (वितर हें क्रियापद अध्याहृत घ्यावें) अथवा 'भारति-यतिवर-शंकर-नामामृत-महितान्तर' असा पाठ घ्यावा. यतिवर श्रीशंकरभारति अर्थात् श्रीशंकराचार्य यांनीं रचलेल्या या नामामृतानें ज्याचें अंतर म्हणजे मन-अंतःकरण हें महित म्हणजे पूजित झालेलें आहे, सत्कृत झालेलें आहे, असे तुम्ही हे प्रभो परमेश्वरा ! तुमचा सदासर्वकाळ जयजयकार असो. ॥ ३० ॥

■ ■ ■

श्रीजगन्नाथाष्टकम्।

[भारत हा भगवन्ताचा अत्यंत आवडता देश आहे. भारतामध्यें भगवन्ताचे जितके अवतार आणि जितक्या लीला झाल्या इतक्या इतर ठिकाणीं झाल्या नाहींत. भगवत्स्वरूपाचा साक्षात्कार करून देणारीं जितकीं तीर्थें आणि क्षेत्रें भारतांत आहेत तितकीं तीं इतर ठिकाणीं नाहींत. भारताचें हें तात्त्विक महत्त्व लक्षांत घेऊनच "दुर्लभं भारते जन्म" भारतामध्यें जन्म मिळणें हें तात्त्विकदृष्ट्या महाभाग्याचें लक्षण मानलें जातें. वास्तविकदृष्ट्या मानवजन्माचें पूर्ण साफल्य हें भारतांत जितक्या सुगम रीतीनें संपादन करतां येतें तितकें तें इतर ठिकाणीं संपादन करतां येत नाहीं. तीर्थें, क्षेत्रें, संतांची परंपरा आणि तत्त्वज्ञानाचा अविच्छिन्न प्रवाह हा भारतांतच पहावयास सांपडतो. भारतांतील वाङ्मय आणि मानवजातीचा सांस्कृतिक इतिहास या गोष्टीची साक्ष पटवून देत आहे. आम्ही केवळ अंधश्रद्धेनें हें लिहीत नसून त्या श्रद्धेला सत्तर्काचा व इतिहासाचा डोळा जोडलेला आहे. अमेरिका, युरोप, राशिया, चीन, इजिप्त इत्यादि देशांना सांस्कृतिकदृष्ट्या भारताचें वैभव प्राप्त झालेलें नाहीं. त्याचप्रमाणें टेम्स, व्होल्गा, यांगत्सी, नाइल किंवा मिसिसिपी इत्यादि भारताबाहेरील कोणत्याहि नद्यांना गंगा, यमुना, नर्मदा, गोदावरी, कृष्णा किंवा तुंगभद्रा इत्यादि नद्यांचें माहात्म्य लाभलेलें नाहीं. काशी, पंढरपूर, हरिद्वार, रामेश्वर इत्यादि क्षेत्रांचा महिमा इतर देशांतील शहरांच्या भाग्याला आलेला नाहीं. ही गोष्ट वारकाईनें लक्षांत घेण्यासारखी आहे.

भारताच्या चारी दिशांना चार प्रमुख क्षेत्रें आहेत. यांना चार धाम असें म्हणतात. पूर्वेकडे श्रीजगन्नाथपुरी, दक्षिणेकडे श्रीरामेश्वर, पश्चिमेकडे श्रीद्वारका आणि उत्तरेकडे श्रीबदरीनाथ हींच तीं चारी धामें होत. प्रत्येकाचें वैशिष्ट्य कांहीं अपूर्वच आहे. जगन्नाथपुरीमध्यें अनेक भक्तांना श्रीजगन्नथाच्या सगुण-स्वरूपाचा साक्षात्कार झालेला आहे. पंडित आणि अशिक्षित श्रीमंत आणि दरिद्री, हिंदु आणि मुसलमान, वृद्ध आणि बालक तसेंच स्त्री आणि पुरुष हे परमेश्वराला सारखेच आहेत. तेथे भेदबुद्धीला वाव नाहीं. फक्त अंतःकरणांतील भाव मात्र पाहिला जातो.

असें सांगतांत कीं, उदयनाचार्य हे एक महान् पंडित, जगन्नाथपुरीला श्रीजगन्नाथाच्या दर्शनाला गेले. तेथें त्यांना देवाचें दर्शन कांहीं होईना व मनाला

समाधान वाटेना, अशी त्यांची स्थिति झाली. शेवटीं त्यांनीं देवाजवळ धरणें धरलें व देवाशीं भांडावयास आरंभ केला –

ऐश्वर्यमदमत्तोऽसि मामविज्ञाय वर्तसे ।
संप्राप्ते बौद्धकलहे मद्धीना तव स्थितिः ॥

परमेश्वरा ! तुम्हांला आपल्या ऐश्वर्याचा फार गर्व झालेला आहे. मी इतक्या लांबून तुमच्या दर्शनाकरितां येथें आलों पण येथें तुमचें मला कोणी दर्शन घडूं देत नाहीं व तुम्हीहि मला दर्शन देत नाहीं. पण हे देवा ! लक्षांत ठेवा कीं, बडे बडे दिग्गज बौद्ध पंडित जेव्हां तुमचें – तुमच्या अस्तित्वाचें खंडण करण्याकरितां कंबर बांधून सभेमध्यें येतात तेव्हां तुमची स्थिति, तुमचें अस्तित्व (सिद्ध करणें) हें माझ्या स्वाधीन आहे. तात्पर्य, परमेश्वरा ! अहोरात्र बौद्ध पंडितांशीं झगडा करून तुमचें अस्तित्व सिद्ध करणारा मी – तुम्ही मला दर्शन कां देत नाहीं ? तुमच्या दर्शनाशिवाय मी येथून हालणार नाहीं. हा उदयनाचार्यांचा दृढनिश्चय पाहून शेवटीं जगन्नाथानें त्यांना दर्शन दिलें व कृतार्थ केलें !

एकदां एक मुसलमान भक्त जगन्नाथपुरीस श्रीहरीच्या दर्शनाकरितां आले. त्यांना कोण गांवाच्यापर्यंत जाऊं देणार ! मज्जाव झाला. अखेर त्यांनींहि धरणें धरलें. ते देवाशीं भांडले – " अगर होता हिंदूओंका नाथ तो कोई उज्र नहीं। जगन्नाथ नाम है तिहारो।" हे देवा, तुला जगन्नाथ म्हणतात. तूं केवळ हिंदूंचाच नाथ असतास, 'हिंदुनाथ' हेंच तुझें जर नांव असतें तर मग माझी कांहींच तक्रार नव्हती, माझा कांहींच आक्षेप नव्हता, पण परमेश्वरा ! लोक तुला जगन्नाथ म्हणतात. जगन्नाथ हें तुझें नांव आहे. तेव्हां आपल्या नांवाचें बीद राखण्याकरितां तरी तूं मला दर्शन दिलेंच पाहिजे. शेवटीं परमेश्वरानें त्याला आपल्या सोपाधिक सगुणस्वरूपाचा व निरुपाधिक परब्रह्मस्वरूपाचाहि साक्षात्कार करून देऊन कृतार्थ केलें !

ओरिसांतील कांहीं डोंगराळ भाग 'नील' नांवानें ओळखला जातो. यांतील एका प्रमुख पर्वताला नील पर्वत असें नांव होतें. तें विष्णुक्षेत्र म्हणून ओळखलें जात होतें. तेथें असलेल्या श्रीविष्णूला नीलमाधव असें नांव होतें. एकदां मालव देशचा राजा इंद्रद्युम्न देवदर्शनाकरितां आला तोंच भगवान् नीलमाधव गुप्त झाले. राजाला अत्यंत दुःख झालें. राजानें देवदर्शनासाठीं घोर तपश्चर्या

केली. दृष्टान्त झाला. समुद्रकांठीं दारूरूपानें म्हणजे काष्ठरूपानें तुला माझें दर्शन होईल. पुढें कांहीं दिवसांनीं समुद्राच्या कांठीं तरंगत असलेला एक भला मोठा लाकडाचा ओंडका राजाच्या दृष्टीस पडला. त्यांतच त्याला जगन्नाथाचें रूप दिसलें. याप्रमाणें जगन्नाथाचा साक्षात्कार होतांच त्यानें त्याच काष्टाची श्रीजगन्नाथाची मूर्ति बनविली आणि समुद्रकांठींच एक विशाल मंदिर बांधून तेथें त्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. तेंच क्षेत्र पुढें जगन्नाथपुरी म्हणून प्रसिद्धीस आलें. यालाच पुरुषोत्तमपुरी अथवा शंखक्षेत्र असेंहि म्हणतात. येथेंच इंद्रद्युम्न नांवाचें सरोवर प्रसिद्ध आहे. याच्या स्नानानें कोटि गोदानाचें पुण्य मिळतें असें वर्णन केलेलें आहे.

सिंह-दरवाजानें श्रीजगन्नाथाच्या मंदिरांत प्रवेश केल्यानंतर भोगमंडप, श्रीगणपति, वटवृक्ष (कल्पवृक्ष), श्रीनृसिंह, रोहिणीकुंड, श्रीलक्ष्मी, श्रीशंकराचार्य, मुक्तिमंडप, श्रीविश्वनाथ, श्रीपातालेश्वर, गरुडखांब इ. अनेक ठिकाणांचें व देवतांचें अवलोकन करीत करीत व दर्शन घेत घेत मुख्य देवता श्रीजगन्नाथ यांचें दर्शन घ्यावें. मनाला अत्यंत समाधान वाटतें. आषाढ शुक्ल द्वितीयेचा येथील रथयात्रामहोत्सव फारच मोठा प्रेक्षणीय असतो. त्याला जगांत तुलना नाहीं. तो पहातांना जन्म सफल झाल्याची प्रतीति येते. येथील महाप्रसादाचाहि महिमा कांहीं अपूर्व आहे. जगन्नाथाचा महिमा आणि मूर्ति डोळ्यांपुढें ठेवून आचार्यांनीं केलेलें हें जगन्नाथाष्टक म्हणण्याचा परिपाठ ठेवावा. जगन्नाथाचें प्रत्यक्ष दर्शन घडण्याकरितां आचार्यांचें अन्तःकरण किती आतुरलेलें होतें हें या अष्टकांतील प्रत्येक श्लोकाच्या चौथ्या चरणांत पहावयास सांपडतें. अशीच तळमळ आपल्याहि अंतःकरणाला लागली पाहिजे.]

कदाचित्कालिन्दी-तटविपिन-सङ्गीतकवरो
मुदा गोपीनारीवदनकमलास्वादमधुपः।
रमा-शंभु-ब्रह्माऽमरपति-गणेशार्चितपदो
जगन्नाथः स्वामी नयनपथगामी भवतु मे ॥ १ ॥

आनंदकंद भगवान् श्रीकृष्णप्रभु जगन्नाथ हे कधीं कधीं यमुना नदीच्या कांठीं वाळवंटांत वृंदावनामध्यें विविध प्रकारचीं गाणीं गाण्यांत तत्पर झालेले आहेत. संगीतकवर म्हणजे गाण्याचा छंद घेऊन फिरणारा. सतत गाणीं गाणारा. भगवान् श्रीहरि हे यमुनेच्या कांठीं कधीं कधीं गाण्यांत गुंग झालेले आहेत तर

कधीं कधीं आनंदाच्या भरांत गोपीजनांच्या मुखकमलांचा रसास्वाद घेण्यांत एखाद्या भ्रमराप्रमाणें तन्मय झालेले दिसत आहेत. लक्ष्मी, शंकर, ब्रह्मदेव, अमरपति इंद्र त्याचप्रमाणें श्रीगणपति इत्यादि देवतांनीं ज्याच्या चरणकमलांची आराधना म्हणजे पूजा केली आहे तो सर्व जगाचा स्वामी श्रीजगन्नाथ माझ्या केव्हां बरें दृष्टीस पडेल ? मी त्याला केव्हां बरें पाहीन ? त्याचें मला प्रत्यक्ष दर्शन केव्हां होईल ? तो मला प्रत्यक्ष दिसावा अशी माझी मनांतून उत्कट इच्छा आहे.

तात्पर्य, जगन्नाथ म्हणजे भगवान् श्रीहरि हे श्रीकृष्णरूपानें अवतरले आणि यमुनेच्या कांठीं वृंदावनांत त्यांनीं लोकोत्तर अशा अनेक बाललीला केल्या. वयाच्या सहाव्या दिवशींच पूतना राक्षसीचे प्राण घेऊन तिला मोक्षपदाला पोहोंचविलें. तिसऱ्या-चौथ्या महिन्याच्या वयांतच शकटासुर आणि तृणावर्त दैत्य यांचा वध केला. वृंदावनाच्या परिसरांत गाई-वासरांना चारतां चारतां व रानावनांत गोपबालकांबरोबर विविध खेळ खेळतां खेळतां बालवयांतच त्यांनीं अघासुर, बकासुर इत्यादि लोकोपद्रवी दुष्ट असुरांना यमसदनांत पाठविलें ! अवघ्या अकरा वर्षांच्या सुमारास कुवलयापीडासारख्या मदोन्मत्त हत्तीशीं झुंज घेऊन त्यासहि ठार केलें ! चाणूरमुष्टिक यांच्यासारख्या अप्रतिम समजल्या जाणाऱ्या मल्लांना द्वंद्वयुद्धांत चारीमुंड्या चित् करून टाकलें ! सर्व प्रकारच्या संरक्षणांनीं सुसज्ज असलेल्या आणि स्वतःस मारावयास टपलेल्या अशा कंसाचा नाश करणें कांहीं सोपें नव्हतें. समरभूमीवरहि मोठमोठ्या लढाया ते सहज जिंकीत असत. सीमा नव्हती पराक्रमाला त्या !

श्रीकृष्णप्रभूंनीं केवळ पराक्रमांतच अद्वितीयता दाखविली असें नाहीं, तर बालवयांतच त्यांनीं आपल्या अंगच्या विविध ललित कलांनीं विश्वाला मोहून टाकलें होतें ! त्यांच्या मुरलीचा मधुर नाद ऐकून पशु-पक्षी आणि वृक्ष-वनस्पति देखील तन्मय होऊन जणुं कांहीं समाधिसौख्याचा आनंद लुटीत असत, मग मानवांची कथा काय ? संगीतकलेमध्यें ते अत्यंत निष्णात होते. म्हणूनच आचार्यांनीं " कालिन्दी-तट-विपिन-संगीतक-वरः " यमुनेच्या कांठीं गाणीं गाण्यात तत्पर असलेला असें श्रीकृष्णाला विशेषण दिलेलें आहे.

भगवान् श्रीकृष्णप्रभु नृत्यकलेंतहि अत्यंत निपुण होते. यमुनेच्या डोहांत उडी घेऊन कालिय नागाच्या फणांवर त्यांनीं केलेलें नृत्य हें त्यांच्या चरित्रांत ठळकपणें दिसत आहे. ते स्वतःच नृत्यकलेंत निपुण होते असें नसून त्यांनीं

आपल्यांबरोबर अनेक गोप-गोपीजनांना व गोपालबालकांनाहि नृत्यकलेंत निपुण केलेलें होतें. त्यांच्या बालपणींच्या जीवनांत तर रासलीलेंतील सामुदायिक नृत्याला विशेषच स्थान होतें. देवहि त्यांच्या रासनृत्यावर स्वर्गातून आनंदानें पुष्पवृष्टि करीत असत.

श्रीकृष्णप्रभूंच्या स्वरूपांत सौंदर्य, माधुर्य, लावण्य इत्यादि गुणांचा अलौकिक आविष्कार झालेला होता. कोटि कोटि कंदर्पांचाहि दर्प वितळून जाईल असें अलौकिकरूप होतें त्यांचें ! चोहोंकडून पाण्यानें भरून आलेल्या ढगाप्रमाणें त्यांची अंगकांति श्यामल आणि सरस होती. विद्युल्लतेप्रमाणें चमकणारें रेशमी-पीतवस्त्र, क्वचित् खांद्यावर टाकलेली काळी कांबळी, हातांत धरलेली मुरली, बगलेंत असलेली काठी, मोरांच्या पंखांनीं भूषविलेला डोक्यावरील मुकुट, भालप्रदेशीं वाऱ्यानें हालणारे काळे आणि कुरळे केश, अंगीं चर्चिलेली केशराची उटी, भाळीं लावलेला कस्तूरीचा टिळा, धनुराकार भुवया, मीनाकार नेत्र, कानीं लकलकणारीं मकराकार कुंडलें, गालीं झळकणारें स्मित हास्य, तोंडलीच्या पिकलेल्या फळाप्रमाणें असलेले आरक्त ओंठ, त्याचप्रमाणें हास्यप्रसंगीं व्यक्त होणारी कुंदाच्या कळ्या-प्रमाणें शुभ्र असलेली दंतपंक्ति, कंठीं असलेली वनमाला आणि कौस्तुभमणि, सरल बाहु, विशाल वक्षःस्थल, किंचित् तुंदिल उदर, गंभीर नाभि, जिला बारीक बारीक घुंगरें बसविलेलीं आहेत अशी ती कमरेवरील मेखला, केळीच्या खुंटांतील गाभ्याप्रमाणें मृदु, सरस आणि सरळ असलेल्या मांड्या, संपुटाप्रमाणें वर्तुलाकार असलेले गुडघे, पायीं असलेलीं पैंजणें, कमलाप्रमाणें कोमल व आरक्त चरणकमल, अशी ही सर्वांगसुंदर प्रत्यक्ष प्रभूची मूर्ति डोळ्यांपुढें इकडे तिकडे फिरत असलेली पाहून कोणाच्या मनाला मोह निर्माण होणार नाहीं बरें ? श्रीकृष्णप्रभूंना पाहिल्या-बरोबर लोक संसाराला विसरत असत. असा हा आनंदाचा कंद पाहिल्याबरोबर त्यास जवळ करावें, दृढ आलिंगन द्यावें, गळ्यास गळा लावावा, त्याचें चुंबन घ्यावें, अशा अनेक वृत्ति ज्याच्या हृदयांत उसळणार नाहींत असा मानव असूं शकेल काय ? असल्यास तो आकृतीनें मानव पण प्रकृतीनें पाषाण असेंच त्याचें वर्णन करावें लागेल ! श्रीकृष्णप्रभूकडे पाहून सहज हृदयांत अभिव्यक्त होणाऱ्या वृत्ति आणि देहेन्द्रियांच्या प्रवृत्ति यांना जर कोणी मलिन म्हणेल तर त्याचें मनोमालिन्यच दयनीय आहे असें समजावें. अशा या श्रीहरीकडे त्याचे भक्त जितक्या प्रेमानें लुब्ध होतात तितक्याच प्रेमानें तोहि आपल्या भक्तजनांकडे

लुब्ध होतो. "ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्" हाच अभिप्राय लक्षांत घेऊन आचार्यांनीं या श्लोकांतील दुसऱ्या चरणांत श्रीकृष्णप्रभूचें वर्णन केलेलें आहे.

अशा श्रीहरीच्या दर्शनासाठीं आचार्यांचें लोचन लोभावलेलें असतील यांत नवल काय आहे ? यथार्थ आत्मस्वरूपाच्या साक्षात्कारानें ज्यांचे सर्व संशय फिटले आणि जे आत्मस्वरूपीं पूर्णब्रह्मस्वरूपीं रमले ते परमविरक्त सनकसनंदनादि ऋषि देखील श्रीहरीच्या रमणीय स्वरूपाकडे पाहून त्याच्यावर निर्हेतुक प्रेम करतात, मग इतरांची कथा काय ?

आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रन्था अप्युरुक्रमे ।
कुर्वन्त्यहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणो हरिः ॥

— भागवत, १।७।१०

आचार्य म्हणतात, असा श्रीहरिप्रभु जगन्नाथ केव्हां बरें माझ्या दृष्टीस पडेल ? मी केव्हां बरें त्याला पाहीन ?

भुजे सव्ये वेणुं शिरसि शिखिपिच्छं कटितटे
दुकूलं नेत्रान्ते सहचरकटाक्षं विदधते ।
सदा श्रीमद्वृन्दावनवसतिलीलापरिचयो
जगन्नाथः स्वामी नयनपथगामी भवतु मे ॥ २ ॥

ज्यानें आपल्या उजव्या हातांत वेणु म्हणजे मुरली धारण केलेली आहे. मस्तकांवर मोराचे पंख धारण केलेलें आहेत. ज्याच्या कमरेभोंवतालीं रेशमाचें पिंवळें वस्त्र शोभत आहे. नेत्राच्या अंत्यभागानें मित्रजनांवर 'कटाक्ष' म्हणजे दृष्टिक्षेप अर्थात् दृष्टि टाकण्याचें कार्य ज्यानें चालविलेलें आहे. जो सदासर्वकाळ सर्व प्रकारच्या शोभेनें संपन्न असलेल्या वृंदावनामध्यें वास्तव्य करून आपल्या विविध लीलांचा परिचय भक्तजनांना करून देत आहे. असा हा जगन्नाथपुरीमध्यें वास्तव्य करणारा सर्व जगाचा स्वामी श्रीजगन्नाथ हा माझ्या दृष्टीस पडावा. त्याला पहाण्याकरितां माझें मन अत्यंत आतुरलेलें आहे.

महाम्भोधेस्तीरे कनकरुचिरे नीलशिखरे
वसन्प्रासादान्तः सहजबलभद्रेण बलिना ।

सुभद्रामध्यस्थः सकलसुरसेवाऽवसरदो
जगन्नाथः स्वामी नयनपथगामी भवतु मे ॥ ३ ॥

भारताच्या पूर्वेकडे असलेल्या महासागराच्या कांठीं अत्यंत भव्य विशाल मंदिर असून त्या मंदिराचें शिखर भव्य चक्रांकित नीलवर्ण आहे. तसेंच तें शिखर सोन्यानें मढविलेलें असल्यामुळें अत्यंत सुंदर दिसत आहे. मंदिर कसलें तें ? खऱ्या अर्थानें पहातां तो 'प्रासाद' म्हणजे राजांचा राजा सर्व विश्वाचा अधिपति अनंतकोटिब्रह्माण्डांचा नायक भगवान् श्रीजगन्नाथप्रभु यांचें तें निवास-स्थान ! त्या भव्य प्रासादामध्यें 'बली' म्हणजे अत्यंत बलवान् असलेले आपले सहोदर बंधु श्रीबलभद्र म्हणजे बलराम यांच्यासहवर्तमान भगवान् श्रीकृष्णप्रभु आपली सख्खी बहिण जी सुभद्रा, तिला मध्यभागीं उभें करून विराजमान झालेले आहेत.

कांहीं लोक 'नीलशिखरे' याचा अर्थ जगन्नाथक्षेत्र असाच करतात. प्राचीन काळीं जगन्नाथक्षेत्राचा उल्लेख 'नीलाद्रि', 'नीलाचल', 'नीलशिखर' अशा शब्दांनीं केला जात असे. पुराणान्तरीं तर येथेंच पूर्वी नील पर्वत होता असें म्हटलेलें आहे. सोन्याप्रमाणें देदीप्यमान असलेल्या नीलाचल प्रदेशांतील भव्य राजमंदिरांत विराजमान असलेले भगवान् श्रीकृष्णप्रभु यांनीं या ठिकाणीं सर्व देवांना सेवा करण्याचा अवसर दिलेला आहे; म्हणून त्यांना "सकल-सुर-सेवा-ऽवसरदः" असें विशेषण दिलेलें आहे. असें हें श्रीक्षेत्र जगन्नाथपुरीमध्यें वास्तव्य करणारे सर्व लोकांचे स्वामी – अधिपति भगवान् श्रीजगन्नाथ श्रीकृष्णप्रभु मला केव्हां बरें भेट देतील ? ते मला प्रत्यक्ष दिसावेत. 'नयनपथगामी' म्हणजे ते माझ्या दृष्टीच्या मार्गाचा विषय व्हावेत. त्यांना मी प्रत्यक्ष पहावें असें मला वाटत आहे. त्यांना प्रत्यक्ष पहाण्याकरितां माझें मन अत्यंत उत्कंठित झालेलें आहे.

कृपापारावारः सजल-जलद-श्रेणि-रुचिरो
रमा-वाणी-सोम-स्फुरदमल-पद्मोद्भवमुखैः ।
सुरेन्द्रैराराध्यः श्रुति-गण-शिखा-गीतचरितो
जगन्नाथः स्वामी नयनपथगामी भवतु मे ॥ ४ ॥

आनंदकंद भगवान् श्रीकृष्णप्रभु हे कृपेचे अथांग महासागर आहेत. जलानें भरलेल्या ढगांच्या समूहाप्रमाणें – मेघपंक्तीप्रमाणें ज्यांची अंगकांति अत्यंत

रुचिर म्हणजे सुंदर दिसत आहे. रमा म्हणजे श्रीलक्ष्मीदेवी, सर्व वनस्पतींचा व नक्षत्रांचा राजा असा जो सोम म्हणजे चन्द्र, त्याचप्रमाणें अत्यंत देदीप्यमान अशा श्रीहरींच्या नाभिकमलांतून ज्यांची उत्पत्ति झालेली आहे असे ब्रह्मदेव इत्यादि सर्व श्रेष्ठ श्रेष्ठ देवांकडून ज्याची आराधना केली जात आहे, अर्थात् त्यांनीं आराधना करण्यास योग्य असलेला आणि त्याचप्रमाणें वेदसमुदायाच्या शिरोभागीं विराजमान असलेल्या उपनिषद् ग्रंथांतून ज्याचीं चरित्रें व महिमा गायिला जात आहे तो भगवान् श्रीकृष्णप्रभु जगन्नाथपुरीचा रहिवासी आणि विश्वाचा स्वामी श्रीजगन्नाथ मला केव्हां बरें दिसेल ? तो माझ्या दृष्टीस पडावा, त्याचा मला प्रत्यक्ष साक्षात्कार व्हावा, हीच माझी मनीषा आहे.

रथारूढो गच्छन्पथि मिलित-भूदेवपटलैः
स्तुतिप्रादुर्भावं प्रतिपदमुपाकर्ण्य सदयः ।
दयासिन्धुर्बन्धुः सकलजगतां सिन्धुसुतया
जगन्नाथः स्वामी नयनपथगामी भवतु मे ॥ ५ ॥

भगवान् श्रीकृष्णप्रभु युद्धामध्यें विजय मिळवून आणि रथावर आरूढ होऊन जेव्हां द्वारकेला जात असत तेव्हां मार्गांत त्यांचा ठिकठिकाणीं सत्कार होत असे. मार्गामध्यें भेटणाऱ्या ब्राह्मणांच्या समुदायानें त्यांचें गुणवर्णन करीत स्तवन करावें, त्यांना आशीर्वाद द्यावेंत. ब्राह्मणांनीं केलेलें गुणवर्णन व दिलेले आशीर्वाद पावलोंपावलीं ऐकून श्रीकृष्णप्रभूंचें अन्तःकरण दयेनें भरून यावयाचें आणि सदय होऊन त्यांनीं त्या ब्राह्मणांवर पूर्ण कृपा करावयाची. असा हा आनंदकंद भगवान् श्रीकृष्णप्रभु प्रत्यक्ष दयासिंधुच आहे. जगन्नाथपुरीला आषाढ शुद्ध द्वितीयेला फारच मोठा रथयात्रा-महोत्सव होत असतो. त्या प्रसंगाला उद्देशूनहि वरील वर्णन केलेलें आहे असेंहि समजण्यास हरकत नाहीं.

सर्व जगाचा बन्धु म्हणजे हितकर्ता असलेला तो भगवान् श्रीकृष्णप्रभु, सिन्धुसुता म्हणजे लक्ष्मीच असलेली अशी जी श्रीरुक्मिणीदेवी तिच्यासहवर्तमान सर्व जगाचा स्वामी असलेला तो जगन्नाथ मला केव्हां बरें दर्शन देईल ? श्रीकृष्ण-प्रभूनें मला दर्शन द्यावें, भेटावें, हीच माझी मनीषा आहे.

परब्रह्मापीडः कुवलयदलोत्फुल्ल-नयनो
निवासी नीलाद्रौ निहितचरणोऽनन्तशिरसि ।

रसानन्दो राधासरसवपुरालिङ्गनसुखो
जगन्नाथः स्वामी नयनपथगामी भवतु मे ॥ ६ ॥

आनन्दकन्द भगवान् श्रीकृष्णप्रभु साक्षात् परब्रह्मस्वरूपच आहेत, पण केवळ भक्तजनांवर अनुग्रह करण्याकरितां त्यांनीं आपल्या निर्गुण, निराकार आणि परिपूर्ण अशा स्वरूपांतून सगुण आणि साकार असें मंगलमय मूर्तरूप धारण केलें. ते श्रीकृष्णरूपानें अवतरले. अर्थात् परब्रह्म आणि भगवान् श्रीकृष्ण यांच्यांत फारसें अंतर नाहीं. हें सूचित करण्याकरितांच आचार्यांनीं "परब्रह्मापीडः" हें विशेषण श्रीकृष्णाला दिलेलें आहे. सर्वतोपरि श्रेष्ठ असलेलें परब्रह्म हाच त्याचा मुकुट आहे, "आपीड" म्हणजे मुकुट. श्रीकृष्णाच्या पलीकडे परब्रह्मतत्त्वाशिवाय दुसरें कांहींच नसल्यामुळें परब्रह्माशीं नित्य संलग्न असलेलें श्रीकृष्णाचें स्वरूपहि परब्रह्मच होय, असा याचा अर्थ आहे.

श्रीकृष्णप्रभूंचें नेत्र कमलदलाप्रमाणें प्रफुल्लित दिसत आहेत. भगवान् श्रीकृष्णप्रभु हे नील पर्वतावर वास्तव्य करीत असून अनंताच्या वंशांत जन्माला आलेल्या कालिय नागाच्या मस्तकांवर त्यांनीं नृत्य करतांना आपलीं पावलें ठेवलेलीं आहेत. भगवान् श्रीहरि हे 'रसानन्द' म्हणजे प्रत्यक्ष ब्रह्मानन्दस्वरूपच आहेत. "रसो वै सः". तो आत्मा परमात्मा म्हणजे परब्रह्म रसस्वरूप आहे. असें श्रुति त्याचें वर्णन करीत आहे. "सरस" म्हणजे भक्तीनें अनन्यप्रेमानें परिपूर्ण असलेल्या श्रीराधिकेच्या देहाला आलिंगन देण्यांत ज्याला आनंद वाटत आहे असा हा भगवान् श्रीकृष्णप्रभु सर्व विश्वाचा अधिपति, जगन्नाथपुरीचा रहिवासी तो जगन्नाथ मला केव्हां बरें भेटेल ? त्यानें मला दर्शन द्यावें, तो माझ्या दृष्टीस पडावा, अशी माझी उत्कट इच्छा आहे प्रभो ! मला आपण दर्शन द्या.

न वै प्रार्थ्यं राज्यं न च कनकता भोगविभवे
न याचेऽहं रम्यां निखिलजनकाम्यां वरवधूम् ।
सदा काले काले प्रमथपतिना गीतचरितो
जगन्नाथः स्वामी नयनपथगामी भवतु मे ॥ ७ ॥

हे प्रभो जगन्नाथा ! मी कांहीं आपल्याला राज्याची प्रार्थना करीत नाहीं. त्याचप्रमाणें भोगवैभवाला उपयुक्त असलेलें, विविध सुखांचें व वैभवाचेंहि साधन

असलेलें सोनेंहि पण मी आपणांस मागत नाहीं. हे प्रभो ! सर्वसाधारणपणें सर्व लोकांनीं जिची कामना करावी अशी एखादी रमणीय, सुंदर, उत्कृष्ट वधूहि पण मी आपणांस मागत नाहीं. मग काय पाहिजे तुला ? असें जर आपण मला विचाराल तर सांगतों ऐका. सदासर्वकाळ क्षणोक्षणीं प्रमथगणांचा अधिपति जो भगवान् शंकर प्रभु विश्वनाथ यानें ज्याचें चरित्र गाइलेलें आहे, वर्णिलेलें आहे, असा तूं सर्व विश्वाचा स्वामी जगन्नाथ भगवान् तो तूं मला प्रत्यक्ष दर्शन दे. तुझ्या दर्शनासाठीं जीव तळमळत आहे. तूं माझ्या केव्हां दृष्टीस पडशील ! तुझें मला दर्शन व्हावें हीच माझी इच्छा आहे.

हर त्वं संसारं द्रुततरमसारं सुरपते
हर त्वं पापानां विततिमपरां यादवपते ।
अहो दीनानाथं निहितमचलं पातुमनिशं
जगन्नाथः स्वामी नयनपथगामी भवतु मे ॥ ८ ॥

हे भगवन् 'सुरपते' म्हणजे देवाधिदेवा ! हा संसार असार आहे अशी माझी खात्री झालेली आहे. आपण माझ्या या असार संसाराचा त्वरित निरास करा. हे यादवपते गोपालकृष्णा ! या असार संसाराबरोबरच ही दुसरी माझ्या हातून घडलेली व घडत असलेली पापांची परंपरा हिचेंहि पण आपण निरसन करा. देवा ! तुम्ही करुणासागर आहां. मी तुम्हालाच दुःख सांगणार, इतरांना सांगून त्याचा काय उपयोग ? दीनांचें व अनाथांचें संरक्षण करण्याकरितां आपण रात्रंदिवस बद्धपरिकर आहां. 'अहो' याच कारणास्तव हे परमेश्वरा ! रात्रंदिवस संरक्षण करण्याकरितां मी स्वतःला दीन अनाथ समजून एखाद्या दगडाप्रमाणें तुमच्याजवळ स्थापन करून घेतलेलें आहे. मी दीन आहें, अनाथ आहें आणि आपण जगन्नाथ आहां. आपण माझें रक्षण करा. प्रभो ! आपण केव्हां बरें माझ्या दृष्टीस पडाल ? आपण केव्हां मला भेटाल ? आपण मला भेटावें, प्रत्यक्ष दर्शन द्यावें, हीच माझी आपल्या चरणीं नम्र प्रार्थना आहे.

■ ■ ■

भगवन्मानसपूजास्तोत्रम् ।

[बाह्यपूजेपेक्षां मानसपूजेचें तात्त्विक दृष्टीनें फार महत्त्व आहे. मनुष्याचे सर्व प्रयत्न सुखाकरितां चाललेले असतात. दुःखाचें पूर्णपणें निरसन झाल्याशिवाय खऱ्या सुखाचा साक्षात्कार होत नाहीं. दुःखें हीं अज्ञानमूलक आणि अभिनिवेशमूलक असल्यामुळें, अज्ञानाचें व अज्ञानमूलक अभिनिवेशाचें निरसन झाल्याशिवाय दुःखांचाहि निरास होत नाहीं. अज्ञानाचें निरसन तत्त्वज्ञानाशिवाय होत नाहीं. तत्त्वज्ञानाच्या प्राप्तीकरितां मनाची एकाग्रता आवश्यक असते. शास्त्रामध्यें मनाला एकाग्र करण्याचे अनेक उपाय सांगितलेले आहेत. त्या सर्व उपायांत भक्ति हा अत्यंत श्रेष्ठ उपाय आहे. तो सोपा असून सर्वांच्या उपयोगी पडणारा आहे.

भक्तीचे अनेक प्रकार आहेत. त्यांतच 'अर्चन' म्हणजे पूजा हाहि एक भक्तीचा प्रकार आहे. बाह्यपूजा व मानसपूजा असे पूजेचे दोन प्रकार आहेत. बाह्यपूजेची साधनें संगृहीत करण्याकरितां धनाची व प्रयत्नांची मोठी अपेक्षा असते. प्रथम इष्टदेवतेची मूर्ति, चित्र, फोटो, तसबीर, यंत्र वगैरे संपादन करून त्याची यथासांग पूजा करण्याकरितां पूजेची साधनसामग्री मोठ्या प्रयत्नानें जुळवावी लागते. विविध प्रकारचीं उपकरणीं, जल, वस्त्र, गंध, अक्षता, फुलें, तुळशी, बेल, दूर्वा, हळदकुंकू, अष्टगंध, बुक्का इत्यादि अनेक प्रकारचीं सौभाग्य द्रव्यें आणि सुगंधि द्रव्यें संपादन करावीं लागतात. धूप, दीप, नैवेद्य त्याचप्रमाणें छत्र, चामर इत्यादि राजोपचार या सर्वांची जुळवाजुळव करावी लागते. ही सर्व सामग्री संपादन करतांना धनाची आवश्यकता असते. प्रयत्नांचीहि पराकाष्ठा करावी लागते.

बाह्योपचार पूजेची सुव्यवस्थित मांडणी करतांना स्वाभाविकच मन भगवन्मय होत रहातें. देवाकरितां गंध, देवाकरितां फुलें, देवाकरितां तुळशी, देवाकरितां दूर्वा असा हा मनाला देवाचा ध्यास लागत असतो. देहाची हालचाल व इंद्रियांच्या प्रवृत्ति याहि इष्टदेवतेला अनुलक्षून होत असतात. हें सर्व होत असतांना स्वाभाविकच मन आणि इंद्रियें हीं बाह्य विषयापासून परावृत्त होऊन अंतर्मुख होत असतात. इंद्रियांच्या अंतर्मुखतेंत तपश्चर्या घडते व मनाच्या अंतर्मुखतेंतून मनाची एकाग्रता सिद्ध होते. मनाच्या एकाग्रतेंतूनच तत्त्वाचा साक्षात्कार होतो व सर्व अज्ञान मावळतें. अज्ञान मावळलें कीं अज्ञानमूलक

दुःखांचाहि निरास होतो. दुःखांचा निरास झाला कीं आनंदच शिल्लक उरतो. हा आनंद निरुपाधिक अर्थात् निर्विषय असल्यामुळें या आनंदाला निजानंद असें म्हणतात. निजानंदाचा लाभ झाल्यानंतर दुसरें मिळविण्याचें कांहींच शिल्लक रहात नाहीं. याप्रमाणें साधक कृतकृत्य होतो, धन्य होतो.

बाह्यपूजा ही कष्टसाध्य आहे तर मानसपूजा ही सहज सुसाध्य आहे. तिला धनाची व बाह्य साधनसामग्रीची अपेक्षा असत नाहीं. तेथें मनानेंच सर्व उपचार कल्पावें लागतात. त्यामुळें ती मनाला लवकर एकाग्र करूं शकते. तीच खरी पूजा होय. याच अभिप्रायानें आचार्यांनीं केलेली ही भगवन्मानसपूजा अत्यंत उपयुक्त आणि मननीय आहे. अर्थाकडे पूर्ण लक्ष देऊन या स्तोत्राचें नित्य पठण केल्यास परमेश्वराची पूजा केल्यासारखें होईल व मनाला समाधानहि लाभेल. या दृष्टीनें फारच सुंदर आहे हें स्तोत्र.]

हृदम्भोजे कृष्णः सजल-जलद-श्यामलतनुः
सरोजाक्षः स्रग्वी मुकुटकटकाद्याभरणवान् ।
शरद्राका-नाथ-प्रतिम-वदनः श्रीमुरलिकां
वहन् ध्येयो गोपीगणपरिवृतः कुङ्कुमार्चितः ॥ १ ॥

आपल्या हृत्कमलामध्यें भगवान् श्रीकृष्णप्रभु यांचें ध्यान करावें. तो भगवान् श्रीकृष्णप्रभु पाण्यानें भरलेल्या ढगाप्रमाणें 'श्यामलतनु' म्हणजे श्याम-वर्ण देहाचा आहे. त्याची अंगकांति श्यामल वर्णाची आहे. त्याचे नेत्र कमळाप्रमाणें सुंदर आहेत. 'स्रग्वी' म्हणजे त्यानें गळ्यांत वनमाला धारण केलेली आहे. मस्तकावर रत्नजडित सुवर्णाचा मुकुट आणि हातामध्यें सोन्याचीं कडीं घातलेलीं आहेत. इतरहि अलंकार त्याच्या अंगांवर शोभत आहेत. श्रीकृष्णाचें मुखकमल हें शरदृतूंतील पूर्णिमेच्या चंद्राप्रमाणें आह्लाददायक आहे. त्यानें हातामध्यें मुरली धारण केलेली आहे. सर्वांगांना केशराची उटी लावलेली आहे. त्याचप्रमाणें तो गोपींच्या समुदायानें वेष्टिलेला आहे. अशा तऱ्हेच्या या आनंदकंद श्रीकृष्णप्रभूचें भक्तजनांनीं आपल्या हृत्कमलामध्यें ध्यान करावें.

पयोऽम्भोधेर्द्वीपान्मम हृदयमायाहि भगवन्
मणिव्रातभ्राजत्कनकवर-पीठं भज हरे ।

सुचिह्नौ ते पादौ यदुकुलज नेनेज्मि सुजलै-
र्गृहाणेदं दूर्वाफलजलवदर्घ्यं मुरारिपो ॥ २ ॥

या दुसऱ्या श्लोकानें आचार्य श्रीकृष्णप्रभूला आवाहन करीत आहेत. हे भगवन् आनंदकंदा प्रभो श्रीकृष्णा, क्षीरसागरांतील द्वीपामधून आपण माझ्या हृत्कमलामध्यें आगमन करावें. माझ्या हृत्कमलामध्यें मी आपल्याकरितां सोन्याचें उत्तम सिंहासन तयार केलेलें आहे. त्या सिंहासनाला हिरे, मोतीं, माणिकें, पाचू, पद्मराग, नीलमणि आणि पोवळीं, वैडूर्य इत्यादि अनेक रत्नांचे समूह जडविलेले आहेत. त्या रत्नांच्या कांतीनें माझ्या हृत्कमलांतील सुवर्णाचें सिंहासन अत्यंत उज्ज्वल दिसत आहे. हे हरे श्रीकृष्णा ! आपण या सिंहासनावर विराजमान व्हावें. वज्र, अंकुश, ध्वज, कमल इत्यादि उत्तम चिन्हें ज्यांच्यावर आहेत अशा आपल्या दोन्ही चरण कमलांचें मी या उत्तम जलानें प्रक्षालन करीत आहें. हे यदुकुलोत्पन्ना मुरारे ! दूर्वा, फल, जल, कुंकुम, अक्षता, चंदन, तुलशी वगैरे घालून तयार केलेला हा अर्घ्य मी आपणांस अर्पण करीत आहें, याचा आपण स्वीकार करावा.

त्वमाचामोपेन्द्र त्रिदशसरिदम्भोऽतिशिशिरं
भजस्वेमं पञ्चामृतफलरसाप्लावमघहन् ।
द्युनद्याः कालिन्द्या अपि कनककुम्भस्थितमिदं
जलं तेन स्नानं कुरु कुरु कुरुष्वाचमनकम् ॥३॥

हे श्रीकृष्णा ! दैत्यांनीं हिरावून नेलेलें देवांचें वैभव देवांना मिळवून देण्याकरितां देवमाता जी अदिति तिच्या प्रार्थनेवरून तुम्ही तिच्या उदरीं वामन-रूपानें अवतरला आणि बळिराजाकडून देवांचें वैभव मिळवून तें देवांना अर्पण केलें. या वेळीं तुम्ही इंद्राचे धाकटे बंधु झाला म्हणून तुम्हांला 'उपेंद्र' असें म्हणतात. हे उपेंद्रा ! आपल्याला आचमन करण्याकरितां हें मी गंगेचें अतिशीतल जल आणलेलें आहे. आपण आचमन करा. भगवान् श्रीकृष्ण भक्तजनांच्या पातकांचा नाश करतात म्हणून त्यांना 'अघहा' असें म्हटलें आहे. 'अघ' म्हणजे पातक. अथवा 'अघ' म्हणजे अघासुर, त्याचा श्रीकृष्णानें वध केलेला आहे म्हणूनहि श्रीकृष्णाला 'अघहा' असें म्हणतात. हे अघहन् – पापांचा आणि अघासुराचा नाश करणाऱ्या देवा ! मी आपल्याला पंचामृताचें स्नान घालण्या-

करितां हें पंचामृत आणलेलें आहें. त्याचप्रमाणें केळें, संत्रें, आंबा, नारळ इत्यादि विविध फलांचा रसहि पण भरपूर आणलेला आहे. त्याचा आपण अंगीकार करा. हे श्रीकृष्णा मी आपल्याला स्नान करण्याकरितां हें गंगेचें पाणी आणि आपल्याला अत्यंत प्रिय असलेल्या यमुनेचेंहि पण पाणी सोन्याच्या चागरींत भरून ठेवलेलें आहे. त्यानें आपण स्नान करावें. अगदीं भरपूर स्नान करावें. स्नानानंतर मी आपणांस आचमन करण्याकरितां हें गंगाजल देत आहें. आपण या जलानें आचमन करावें.

तडिद्वर्णं वस्त्रे भज विजय कान्ताधिहरण
प्रलम्बारिभ्रातर्मृदुलमुपवीतं कुरु गले ।
ललाटे पार्टीरं मृगमदयुतं धारय हरे
गृहाणेदं माल्यं शतदल-तुलस्यादिरचितम् ॥ ४ ॥

हे आनंदकंदा श्रीकृष्णा ! विद्युल्लतेप्रमाणें देदीप्यमान पीतवर्ण अशीं हीं दोन वस्त्रें, नेसण्याकरितां एक व अंगावर घेण्याकरितां एक मी आपल्याकरितां आणलेलीं आहेत. आपण त्यांचा स्वीकार करावा. भज् धातूचा अर्थ स्वीकार करणें असा आहे. हे श्रीकृष्णा ! आपण सज्जनांचें संरक्षण, दुर्जनांचें निर्दलन आणि धर्माची स्थापना या उद्देशानें भूमंडलावर अवतार घेतला. दुष्टांचें निर्दलन करून सर्वत्र विजय संपादन केला. म्हणून आपणांस 'विजय' असें म्हणतात. त्याचप्रमाणें आपण आपली कांता जी रुक्मिणी तिचें स्वयंवरप्रसंगीं अधिहरण केलें. (श्रीकृष्ण चरित्रांत रुक्मिणीहरणाचा प्रसंग प्रसिद्धच आहे.) याच अभिप्रायानें श्रीकृष्णाला 'कांताधिहरण' असें संबोधन दिलेलें आहे. अथवा 'विजय' आणि 'कांताधिहरण' अशीं दोन पृथक् संबोधनें न काढतां 'विजयकांताधिहरण' हें एकच संबोधन समजावें. विजय म्हणजे अर्जुन. त्याची कांता म्हणजे पत्नी – द्रौपदी. तिच्या 'आधीं'चें म्हणजे मानसिक दुःखांचें हरण करणारा श्रीकृष्णच आहे. द्रौपदीच्या वस्त्रहरणाच्या प्रसंगीं तिचा धांवा ऐकून तिला संकटांतून सोडविण्यासाठीं भगवान श्रीकृष्णच धांवत आले आणि अपरिमित वस्त्रें पुरवून भरसभेंत तिची श्रीकृष्णप्रभूनीं लाज राखली. वेळोवेळीं तिचें सांत्वन करून तिच्या सर्व मानसिक दुःखांचा परिहार श्रीकृष्णप्रभूनींच केला. या अभिप्रायानेंहि श्रीकृष्णाला 'विजयकान्ताधिहरण' हें विशेषण देणें योग्यच आहे.

'प्रलम्बारिभ्रातः' हे श्रीकृष्णा ! प्रलंबासुराचा वध करणारे जे भगवान् बलराम त्यांचे तुम्ही बंधु आहां. हे प्रभो ! हें मृदु म्हणजे मऊ असलेलें यज्ञोपवीत मी तुमच्यासाठीं आणलेलें आहे. हें तुम्ही आपल्या गळ्यांत धारण करावें. हे हरे श्रीकृष्णा ! हें कस्तूरीमिश्रित चंदन मी आपणांस समर्पण करीत आहें. हें आपण आपल्या भालप्रदेशीं धारण करावें. त्याचप्रमाणें ही माळा, जिच्यामध्यें 'शतदल' म्हणजे कमळें आणि तुळशीच्या मंजुळा तसेंच इतरहि सुवासिक फुलें घातलेलीं आहेत. ही आपण आपल्या गळ्यामध्यें धारण करा.

दशाङ्गं धूपं सद्वरद चरणाग्रेऽर्पितमिदं
मुखं दीपेनेन्दुप्रभ-विरजसं देव कलये ।
इमौ पाणी वाणीपतिनुत सकर्पूररजसा
विशोध्याग्रे दत्तं सलिलमिदमाचाम नृहरे ॥ ५ ॥

हे श्रीकृष्णा ! आपण सज्जनांना अभीष्ट वर देणारे आहां. आपण सज्जनांच्या सर्व कामना पूर्ण करणारे आहां म्हणून आपणांस 'सद्वरद' असें म्हटलेलें आहे. अथवा 'सद्वरद' म्हणजे उत्तम वर देणारा. इतरांकडून पूर्ण न होणाऱ्या कामनाहि श्रीकृष्णप्रभूकडून पूर्ण होऊं शकतात. म्हणूनच ' अकामः सर्वकामो वा वासुदेवं हरिं भजेत् ' तुम्ही निष्काम असा अथवा सकाम असा श्रीकृष्णप्रभूला भजा. तो तुमचे सकल मनोरथ पूर्ण करील असें भागवतांत सांगितलें आहे.

परमेश्वरा ! हा पहा मी आपल्या चरणापुढें दशांगधूप अर्पण केलेला आहे. याचा आपण स्वीकार करावा. आचार्यांनीं देवाला धूप समर्पण करतांना दशांग-धूपाचा अनेक ठिकाणीं उल्लेख केलेला आहे. दशांगधूप हा देवांना तर प्रिय आहेच पण लौकिक दृष्टीनेंहि तो अत्यंत उपयुक्त आहे. यानें ग्रहबाधा भूतबाधा इत्यादि अनेक पीडा टळतात. उन्माद, अपस्मार इत्यादि रोगांचा परिहार होतो. अनेक विकारांना कारणीभूत असलेल्या जंतूंचा नाश होतो. घरांतील हवा शुद्ध होते व मन प्रसन्न रहातें. " पञ्चाशद्गन्धपाषाणात् तावान्माहिषगुग्गुलुः । चतुरंशं चन्दनं च जटामांसी च तावती ॥ त्रिभागः सार्जकः सारः तावदेव हि वालकम् । उशीरं तु द्विभागं स्याद् घृतभृष्टनखं समम् ॥ कर्पूरो मृगनाभिश्च एकभागौ प्रकीर्तितौ । " पन्नास भाग गंधपाषाण घ्यावा. गंधपाषाण म्हणजे गंधक. गंधकाचें अनेक प्रकार आहेत. तांबडा, पिवळा, पांढरा आणि काळा.

यांत काळा गंधक सर्वांत श्रेष्ठ म्हणून सांगितलेला आहे. तो अत्यंत दुर्मिळ असतो. 'कृष्णः श्रेष्ठः सुदुर्लभः' असें त्याचें वर्णन केलेलें आहे. बाजारांत पिंवळसर गंधक मिळतो. त्याचा सुगंधि द्रव्यांत समावेश करतां येत नाहीं. 'पूतिगंधोऽतिगंधश्च सुगंधो दिव्यगंधकः' अशीं गंधकाचीं नांवें आहेत. आपल्याला बाजारांत जो गंधक मिळतो तो पूतिगंध म्हणजे असुरभि अर्थात् उग्र घाण वास असलेला मिळतो. दशांगधूपांत – सुगंधि धूपांत त्याचा उपयोग होत नाहीं. सुगंध किंवा दिव्यगंधक अशीं नांवें ज्याला आहेत तोच गंधक घ्यावा. अथवा गंधपाषाण याचा अर्थ निघण्टुकारांनी 'श्रीगंध' असा दिलेला आहे. श्रीगंधाचा पर्याय 'दिव्यचंदन' असा आहे. दिव्यचंदन हें अत्यंत सुगंधि असतें. 'महागन्धम्' असें त्याचें दुसरें नांव आहे. यालाच हरिचंदन असेंहि म्हणतात. पण हें चंदनहि अत्यंत दुर्मिळ असतें. "हरिचंदनं तु दिव्यं तिक्तहिमं तदिह दुर्लभं मनुजैः" असें त्याचें वर्णन केलेलें आहे.

मुख्य द्रव्य न मिळाल्यास त्याच्याऐवजीं प्रतिनिधि द्रव्य घेण्याची पद्धति शास्त्रसंमत आहे. सुगंधी गंधक किंवा हरिचंदन न मिळाल्यास त्याच्या ऐवजी कृष्णागरुसारखें सुगंधि द्रव्य पन्नास भाग घ्यावें. त्यांत तितक्याच प्रमाणांत माहिम गुग्गुळ अर्थात् चांगल्या जातीचा – म्हणजे गुग्गुळ घालावा. चार भाग उत्तम चंदनाचा चुरा व चार भाग जटामांसी घालावी. तीन भाग सर्जक वृक्षाच्या गाभ्याचें चूर्ण घालावें. सर्जकाला गंधवृक्ष किंवा यक्षधूप असेंहि म्हटलेलें आहे. अथवा सार म्हणजे निर्यास अर्थात् डिंकासारखें सारभूत द्रव्य तें तीन भाग, तीन भाग वाळ्याचें चूर्ण, दोन भाग वीरणमूळ. (वाळ्याच्याच जातीचें एक प्रकारचें सुगंधि द्रव्य), आणि दोन भाग तुपांत परतलेला नखला. शुद्ध कापूर एक भाग आणि कस्तूरी एक भाग. या सर्वांचें मिश्रण करून तयार केलेल्या धूपास 'दशांगधूप' असें म्हणतात.

हे देवाधिदेवा ! आपलें मुखकमल हें चंद्राप्रमाणें आह्लाददायक आहे. 'इन्दुप्रभविरजस्' म्हणजे चंद्राच्या कांतीप्रमाणें स्वच्छ निर्मळ आहे. प्रसन्न आहे. त्या आपल्या मुखकमलाला मी दीप दाखवून अथवा आपल्या मुखावरून दीप ओवाळून तें मी आपल्या हृदयांत आकलन करीत आहें. नीराजनविधीनें मी तुमचें मुखकमल स्वतःच्या हृदयांत ठसवीत आहें.

हे 'वाणीपतिनुत' म्हणजे बृहस्पतीकडून स्तविल्या गेलेल्या श्रीकृष्णा वाणीपति, वाचस्पति आणि बृहस्पति हे एकाच अर्थाचे शब्द आहेत. बृहस्पतीनें श्रीकृष्णाची स्तुति निरनिराळ्या प्रसंगीं केलेली आहे. या अभिप्रायानें श्रीकृष्णाला 'वाणीपतिनुत' असें संबोधन दिलेलें आहे. अथवा वाणीपति म्हणजे ब्रह्मदेव. ब्रह्मदेवानें श्रीकृष्णप्रभूंची केलेली स्तुति श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधांत प्रसिद्ध आहे. या अभिप्रायानें श्रीकृष्णाला 'वाणीपतिनुत' असें म्हटलेलें आहे. हे प्रभो नरहरे ! कापराचें चूर्ण घालून सुवासिक केलेलें हें जल मी आपणांस अर्पण करीत आहें. प्रथम आपण आपल्या हा दोन्ही करकमलांना या जलानें निर्मल करून आचमन करावें.

सदातृप्तार्हं षड्रसवदखिलव्यञ्जनयुतं
सुवर्णाम्रे गोघृतचषकयुक्ते स्थितमिदम् ।
यशोदासूनो ! तत्परमदयया ऽशान सखिभिः
प्रसादं वाञ्छद्भिः सह तदनु नीरं पिब विभो ॥ ६ ॥

हे विभो नारायणा ! आपण 'सदा तृप्त' आहां. परमेश्वर हा "आप्तकाम" "पूर्णकाम" असल्यामुळें सदातृप्तच आहे. त्याची तृप्ति कधींहि खंडित होत नाहीं. म्हणून त्याला आचार्यांनीं "सदातृप्त" या शब्दानें संबोधिलेलें आहे. परमेश्वर हा सदातृप्त असला तरी तो भावाचा भुकेला आहेच म्हणून भक्तजन त्याला भक्तियुक्त अंतःकरणानें नैवेद्य अर्पण करीत असतात. आचार्य म्हणतात, हें परमेश्वरा ! मी तुमच्यासाठीं हा षड्रसयुक्त पंचपक्वान्नाचा नैवेद्य आणलेला आहे. तोंडीं लावण्यासाठीं अनेक पदार्थ, चटण्या, कोशिंबिरी, भाज्या, रायतीं, कढी, आमटी वगैरे त्यांत ठेवलेले आहेत. हा नैवेद्य सोन्याच्या ताटांत वाढलेला आहे. गाईच्या साजूक ताज्या तुपाची वाटी त्यांत भरून ठेवलेली आहे. हे यशोदानंदना प्रभो ! माझ्यावर मोठी कृपा करून हें सर्व सेवन करा. आपण एकटेच नव्हे तर "प्रसादं वाञ्छद्भिः सह" आपला प्रसाद सेवन करण्याची इच्छा करणाऱ्या आपल्या सर्व श्रीदामा, सुदामा, वडज्या, वाकुड्या, पेंद्या इत्यादि मित्रमंडळीसह हा नैवेद्य आपण सेवन करा. त्यानंतर मधून मधून हें शीतल आणि सुवासिक जलहि आपण प्राशन करा.

सचूर्णं ताम्बूलं मुखशुचिकरं भक्षय हरे !
फलं स्वादु प्रीत्या परिमलवदास्वादय चिरम् ।
सपर्यापर्याप्त्यै कनकमणिजातं स्थितमिदं
प्रदीपैरारार्तिं जलधितनयाश्लिष्ट रचये ॥ ७ ॥

हे प्रभो श्रीहरे ! भोजनोत्तर मुखशुद्धीसाठीं हीं उत्तम स्वादिष्ट फळें, ज्यांचा वासहि उत्तम येत आहे. आंबे, फणस, केळीं, पेरु, डाळिंबें, जांभळें, बोरें हीं सर्व फळें आपण अगदीं शांतपणें सावकाश सेवन करा. तसेंच मुखशुद्धिकारक तांबूल आणलेला आहे. चुना, कात, सुपारी, वेलदोडा, लवंग, जायपत्री इत्यादि मुखशुद्धिकारक आणि सुगंधी द्रव्यांनीं युक्त असा नागवेलीच्या पिकलेल्या पानांचा हा तांबूल मी आपणांस अर्पण करीत आहें. आपण तो भक्षण करावा. मी केलेली ही 'सपर्या' म्हणजे पूजा, तिची 'पर्याप्ति' म्हणजे पूर्णता मागता ती होण्यासाठीं हें सोनें आणि अनेक प्रकारचीं रत्नें अर्थात् सोन्याचे व रत्नांचे अलंकार मीं आपल्यापुढें ठेवले आहेत. त्यांचा आपण अंगीकार करावा. हे जलधितनयाश्लिष्ट ! जलधि म्हणजे समुद्र, त्याची तनया म्हणजे कन्या लक्ष्मी, तिनें आश्लिष्ट म्हणजे आलिंगिलेला, अर्थात् हें लक्ष्मीकान्ता प्रभो ! साजुक तुपाच्या वाती लावून तयार केलेल्या या प्रदीपांनीं दिव्यांनीं मी आपली आरती करीत आहें. आपण माझ्या या मंगल दीपांचा – मंगलार्तीचा स्वीकार करावा.

विजातीयैः पुष्पैरतिसुरभिभिर्बिल्वतुलसी-
युतैश्चेमं पुष्पाञ्जलिमजित ते मूर्ध्नि निदधे ।
तव प्रादक्षिण्यक्रमणमघविध्वंसि रचितं
चतुर्वारं विष्णो ! जनि-पथ-गतेश्चान्तविदुषा ॥ ८ ॥

कोणत्याहि शत्रूकडून ज्याचा कधींहि पराभव होत नाहीं त्याला अजित म्हणतात. या जगांत 'अजित' या शब्दानें संबोधण्यास योग्य असा एक परमात्माच आहे. हे अजिता परमेश्वरा ! जाई, जुई, शेवंती, मोगरा, गुलाब, कुंद, चांफा बकुळ, पारिजातक गुलाब आणि कमळ इत्यादि विविध जातींचीं अत्यंत सुवासिक फुलें मीं आणलेलीं आहेत. त्यांतच बिल्वदलें आणि तुळशीच्या

मंजुळाहि ठेवलेल्या आहेत. अशा तऱ्हेचा हा पत्रपुष्पांनीं पूर्ण असलेला पुष्पांजलि मी आपल्या मस्तकावर अर्पण करीत आहें. या पुष्पांजलीचा स्वीकार करावा. देवा ! तुमच्या प्रदक्षिणेंतील प्रत्येक पाऊल पापांचा नाश करणारें आहे. म्हटलेलेंच आहे कीं, " यानि कानि च पापानि जन्मान्तरकृतानि च । तानि तानि विनश्यन्ति प्रदक्षिणपदे पदे " या जन्मीं व अन्य जन्मींहि जीं कांहीं पातकें घडलीं असतील तीं सर्व भक्तियुक्त अन्तःकरणानें श्रीहरीला प्रदक्षिणा घालीत असतां प्रदक्षिणेंतील पावला-पावलाला नष्ट होत असतात. असा हा 'अघ-विध्वंसी' म्हणजे पातकांचा नाश करणारा प्रदक्षिणाक्रम म्हणजे परिक्रमा अर्थात् प्रदक्षिणा घालणें हा विधि मी करीत आहें. संसारमार्गातील परिभ्रमणाचा शेवट हा दुःखांतच होत असतो हें जाणणाऱ्या माझ्याकडून आपणांस चार वेळ प्रदक्षिणा केली जात आहे. प्रदक्षिणाविधीसह आपली केलेली ही षोडशोपचार मानसपूजा मला सर्व संसारदुःखांतून मुक्त करील असा माझा विश्वास आहे. श्रीविष्णूला चार प्रदक्षिणा घालाव्यात हा शास्त्रविधि लक्षांत घेऊन या ठिकाणीं आचार्यांनीं 'चार' हा शब्द मुद्दाम योजिलेला आहे. तात्पर्य, हे विष्णो भगवंता ! आपण माझा हा प्रदक्षिणाविधि स्वीकारावा. माझ्या सर्व दुरितांचा नाश व्हावा व या संसारचक्रांतून माझी सुटका व्हावी हीच माझी आपल्या चरणीं नम्र प्रार्थना आहे.

नमस्कारोऽष्टाङ्गः सकलदुरितध्वंसनपटुः
कृतं नृत्यं गीतं स्तुतिरपि रमाकान्त त इयम् ।
तव प्रीत्यै भूयादहमपि च दासस्तव विभो
कृतं छिद्रं पूर्णं कुरु कुरु नमस्तेऽस्तु भगवन् ॥ ९ ॥

आचार्य या नवव्या श्लोकानें नमस्कार, नृत्य, गीत, स्तुति आणि क्षमाप्रार्थना करीत आहेत. हे प्रभो ! आपल्या चरणीं मी साष्टांग प्रणिपात करीत आहें. आपल्या चरणीं भक्तिभावानें घातलेला साष्टांग प्रणिपात हा सकल दुरितांचा विनाश करण्यामध्यें अत्यंत पटु म्हणजे दक्ष आहे. समर्थ आहे.

उर, शिर, दृष्टि, मन, वाणी, हात, पाय आणि गुडघे हीं प्रणामाचीं आठ अंगें होत. या आठ अंगांनीं केल्या जाणाऱ्या प्रणामाला 'अष्टांग प्रणाम' किंवा साष्टांग प्रमाम' असें म्हणतात. जमिनीवर हात, पाय, गुडघे, मस्तक आणि वक्षःस्थल टेकवावें. दृष्टि श्रीहरीच्या स्वरूपाकडे लावावी. अर्थात् दृष्टीपुढें श्रीहरीचें

स्वरूप असावें. मनानें श्रीहरीच्या स्वरूपाचें चिंतन करावें आणि वाणीनें देवाचें नांव घेऊन 'नमः' असें म्हणावें. अर्थात् श्रीकृष्णाय नमः, श्रीरामचन्द्राय नमः, विष्णवे नमः, हरये नमः, गुरवे नमः, दत्तात्रेयाय नमः, जगदम्बायै नमः, गणपतये नमः, श्रीलक्ष्मीनरसिंहाय नमः, शिवाय नमः, अशा रीतीनें इष्ट देवतेचें नांव घेऊन नमस्कार करावा. या प्रणामाला साष्टांग नमस्कार असें म्हणतात. " उरसा शिरसा दृष्ट्या मनसा वचसा तथा । पद्भ्यां कराभ्यां जानुभ्यां प्रणामोऽष्टाङ्ग उच्यते ॥ " शरीर दंडासारखें जमिनीवर ठेवून देवाला प्रणाम करणें याला दण्डवत्प्रणाम असें म्हणतात. 'दंडवत' हा शब्द या अर्थानें रूढच आहे. हा कायावाचामनेंकरून होणारा प्रणामच सकल दुरितांचा ध्वंस करूं शकतो.

हे प्रभो ! मी तुम्हांला साष्टांग नमस्कार करतों. हे रमाकान्ता ! मी आपणांस नृत्य, गीत आणि स्तुतीहि समर्पण करीत आहें. प्रभो ! तुम्हांला समर्पण केलेले हे सर्व उपचार तुमच्या संतोषाला कारणीभूत होवोत. माझ्या या सर्व मानसोपचारांनीं आपण संतुष्ट व्हावें. हे दयावना ! मी आपला दास आहें. माझ्या हातून जें कांहीं उणें झालें असेल तें आपण पूर्ण करून घ्यावें. या ठिकाणीं 'छिद्र' शब्दाचा अर्थ न्यून अथवा उणें असा करावा. हे भगवन् ! मी पुनः पुन्हां आपली प्रार्थना करीत आहें कीं, आपण माझें सर्व उणें पूर्ण करून घ्यावें. मी आपल्या चरणीं भक्तिभावें नमस्कार करीत आहें.

सदा सेव्यः कृष्णः सजलघननीलः करतले
दधानो दध्यन्नं तदनु नवनीतं मुरलिकाम् ।
कदाचित्कान्तानां कुचकलशपत्रालिरचना-
समासक्तः स्निग्धैः सह शिशुविहारं विरचयन् ॥ १० ॥

वर दिलेल्या नऊ श्लोकांनी आचार्यांनी श्रीकृष्ण प्रभूची मानस पूजा पूर्ण केली आहे. आचार्यांचें ध्येयतत्त्व परब्रह्म आहे. उपास्यदैवत जगज्जननी श्रीललिता-महात्रिपुरसुंदरी आहे, तर इष्टदैवत आनंदकंद भगवान् श्रीकृष्ण प्रभु आहे. (मु. स्तो. सं. भाग १ ला, आचार्य चरित्रांतील पान ५७–५८ पहा) स्वाभाविकच आचार्यांच्या मनाची ओढ श्रीकृष्ण प्रभूंकडे असल्यामुळें स्तोत्र पूर्ण झालेलें असलें तरी या दहाव्या श्लोकांत पुन्हां श्रीकृष्णाचें वर्णन करून श्रीकृष्णाला सर्वकाळ भजा असा ते उपदेश करीत आहेत.

" सदा सेव्यः कृष्णः " श्रीकृष्णाला निरंतर भजा. कसा आहे तो श्रीकृष्ण ? असें विचाराल तर सांगतों : तो लहानांत लहान, मोठ्यांत मोठा, प्रौढांत प्रौढ व वृद्धांत वृद्ध. सदासर्वकाळ सर्व कांहीं करीत असूनहि तो सर्वांतून मुक्त आहे. त्याला अनन्यचित्तानें भजा म्हणजे तुम्हीहि सर्व संसारतापांतून मुक्त व्हाल.

तो भगवान् श्रीकृष्णप्रभु पाण्यानें भरलेल्या ढगाप्रमाणें श्यामवर्ण आहे. मेघश्याम, घनश्याम, घननीळ असें त्याला म्हणतात. क्वचित् दूर्वादलांची, जवसांच्या फुलांची, नीलकमलाची अथवा इंद्रनील मण्याचीहि उपमा त्याच्या कांतीला देतात. कमळासारखें सुंदर मुख, विशाल नेत्र, भव्य भाल, कुटिल केश, धनुराकार भुंवया, प्रशस्त कान, आरक्त ओंठ, सरळ नाक, गालांतल्या गालांत हंसणें, मस्तकावर मुकुट, हातांत मुरली, बगलेंत काठी, खांद्यावर घोंगडी अथवा पिंवळा रेशमी दुपट्टा, गळ्यामध्यें वैजयंती माळ, कौस्तुभ-मणि, कोमल हात, कमरेभोंवतीं पीतांबर, ध्वज, वज्र, अंकुश इत्यादि चिन्हांनीं युक्त असलेलें चरणकमल, अशा रीतीनें शास्त्रोपदिष्ट व गुरूपदिष्ट स्वरूपानें श्रीकृष्णाचें ध्यान करावें. श्रीकृष्णप्रभूचें सर्व स्वरूप मंगलमय आणि मधुर आहे. या बाबतींत वाचकांनीं श्रीवल्लभाचार्यांनीं केलेलें मधुराष्टक अवश्य पहावें.

श्रीकृष्णप्रभूंच्या विविध लीलाहि अत्यंत मधुर आहेत. त्यांचें चिंतन करावें. आचार्यांनीं या श्लोकांत एका लीलेचें दिग्दर्शन केलेलें आहे. " करतले मुरलिकां दध्यन्नं तदनु नवनीतं दधानः " एका हातांत मुरली धारण केलेली आहे आणि दुसऱ्या हातांत कालविलेला दहींभात आणि लोणी येवढेंच नव्हे तर गोपाळ-बालकांनीं आणलेल्या शिदोऱ्या एकत्र करून त्यांचा केलेला तो 'गोपाळकाला' भगवान् श्रीकृष्णप्रभु सर्व गोपाळ-बालकांना वाटीत आहेत. याचप्रमाणें गोवर्धन पर्वत हातावर उचलून धरणें, कालिय सर्पाच्या मस्तकांवर नृत्य करणें, खेळतां खेळतां सहजच अघासुर, बकासुर इत्यादि दुष्ट दैत्यांचा नाश करणें, यमुनेच्या कांठीं कदंबाच्या झाडाखालीं बसून मुरली वाजविणें, समवयस्क मित्रमंडळीबरोबर आट्यापाट्या, सुरपारंबा, हुतुतु, हमामा इत्यादि खेळ खेळणें, गोपीजनांच्या रासमंडलांमध्यें नृत्य करणें इत्यादि श्रीकृष्णप्रभूच्या मधुर लीलांचें चिंतन करावें.

" कदाचित्कान्तानां कुचकलशपत्रालिरचना – समासक्तः " क्वचित्प्रसंगीं भगवान् श्रीकृष्ण गृहस्थाश्रमांतील उचित कर्तव्यें करीत असतांना आपल्या स्त्रिया रुक्मिणी, सत्यभामा, कालिंदी, मित्रविंदा, इत्यादि त्यांच्या स्तनमंडलावर

केशर, चंदन वगैरे द्रव्यांनीं विविध चित्ररचना रेखाटण्यांत तन्मय झालेले आहेत. या क्रियेला संस्कृतमध्यें भक्तिरचना असें म्हणतात. तर क्वचित्प्रसंगीं ते जरासंध, कालयवन, शाल्व, दन्तवक्र, भौमासुर, इत्यादि दुष्ट राजलोकांशीं व दैत्यांशीं युद्ध करून त्यांच्या तावडींतून त्रस्त झालेल्या अनाथ जनांना मुक्त करीत आहेत.

"कदाचित्तन्निगूढैः सह शिशुविहारं विरचयन्" कधीं कधीं भगवान् श्रीकृष्ण आपल्या इष्टमित्रांसह लहान मुलांचे खेळ विटी-दांडू चेंडू, गोट्या, लगोऱ्या इत्यादि विविध खेळ खेळत आहेत, तर क्वचित् उद्धव, बलराम यांच्यासह गंभीर विचार करण्यांत निमग्न झाल्यासारखे दिसत आहेत. याप्रमाणें श्रीहरीच्या परम पवित्र असलेल्या सगुणचरित्राचें नित्य चिंतन करावें.

अधिकारपरत्वें श्रीहरीच्या निर्गुण स्वरूपाचेंहि चिंतन करणें आचार्यांना विवक्षित आहेच. श्रीकृष्णाच्या निर्गुण स्वरूपाचें वर्णन करतांना "सत्यं ज्ञानमनन्तं नित्यमनाकाशं परमाकाशम्" अशीं विशेषणें श्रीकृष्ण प्रभूला दिलेलीं आहेत, तीं अवश्य लक्षांत घ्यावींत. (सु. स्तो. सं. भाग १ ला गोविंदाष्टक पहा). अशा रीतीनें सगुण अथवा निर्गुण कोणत्याहि रूपानें का होईना, पण "सदा सेव्यः कृष्णः" सर्वकाळ श्रीकृष्णाचें चिंतन करीत रहा, असें आचार्यांचें अत्यंत कळकळीचें व प्रेमळपणाचें सांगणें आहे. निर्णयसागर मुद्रणालयांतील स्तोत्रग्रंथांत –

मणिकर्णीच्छया जातमिदं मानसपूजनम् ।
यः कुर्वीतोषसि प्राज्ञस्तस्य कृष्णः प्रसीदति ॥ ११ ॥

हा एक अधिक श्लोक आढळतो. श्रीमणिकर्णी देवीच्या इच्छेनें हें भगवन्मानसपूजनस्तोत्र झालेलें आहे. जो कोणी प्राज्ञ म्हणजे बुद्धिमान्, शहाणा अर्थात् आत्महितदक्ष मनुष्य पहांटेंच उठून भगवन्मानसपूजन करील त्याच्यावर भगवान् श्रीकृष्ण प्रसन्न होतील, असा याचा अर्थ आहे. या श्लोकावरून या स्तोत्राची रचना आचार्यांचें वास्तव्य काशीक्षेत्रीं मणिकर्णिकेच्या सान्निध्यांत असतांना झालेली आहे हें अर्थातच सिद्ध होत आहे.

■ ■ ■

विष्णुभुजङ्गमस्तोत्रम् ।

[विश्वाच्या कणाकणांत व्यापून राहिलेल्या आणि विश्वरूपानें नटलेल्या तत्त्वालाच विष्णु असें म्हणतात. विष् – व्यापणें, वश् – इच्छा करणें अथवा प्रकाशणें, विश् – प्रवेश करणें आणि इष् – इच्छिणें. इतक्या धातूंवरून विष्णु शब्द निष्पन्न झालेला आहे. धात्वर्थ भिन्न भिन्न असले तरी त्या सर्व धातूंपासून बनलेल्या विष्णु शब्दाचा अर्थ मात्र सर्वोत्कृष्ट सद्घन, चिद्घन आनन्दघन, परमात्मतत्त्व असाच आहे.

'वेवेष्टि' तो परमात्मा सर्व विश्वाला व्यापून टाकतो म्हणून त्याला विष्णु असें म्हणतात. " इदं विष्णुर्विचक्रमे " या वेदमंत्रांतहि त्याचें विश्वव्यापित्वच व्यक्त केलेलें आहे. 'वश्' या धातूचा इच्छा करणें अर्थ घेतल्यास या सर्व विश्वाच्या मुळाशीं त्याचीच इच्छा कारणीभूत आहे. " तदैक्षत बहु स्यां प्रजायेय " सृष्टीच्या आरंभकालीं त्या अव्यक्त परब्रह्मस्वरूप असलेल्या आदि विष्णुनेंच ईक्षण केलें, पाहिलें. मीं बहुरूपानें नटावें, मीं बहुरूपें धारण करावींत, मीं अभिव्यक्त व्हावें, जन्मावें असा संकल्प केला, असें उपनिषदांत विष्णुरूप परब्रह्माचें वर्णन केलेलें आहे. तात्पर्य, 'वष्टि' म्हणजे सर्व विश्व निर्माण करण्याची इच्छा करतो. विश्वरूपानें नटण्याची इच्छा करतो. म्हणून त्याला विष्णु असें म्हणतात.

'वश कान्तौ' या ठिकाणीं कान्ति शब्दाचा अर्थ प्रकाशणें, चकाकणें असा घेतल्यास या सर्व विश्वाला तो परमात्माच प्रकाशित करतो. त्याच्याच प्रकाशानें सूर्य, चंद्र, अग्नि इत्यादि सर्व तेजस्वी पदार्थ प्रकाशत असतात आणि सर्व जगालाहि प्रकाशित करीत असतात. " यद्भासा सर्वमिदं विभाति ", " यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् । यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥ " असें उपनिषदांत आणि भगवद्गीतेंत त्याचें वर्णन केलेलें आहे. " परमं यो महत्तेजः " तो सर्वोत्कृष्ट महान् तेजःस्वरूप आहे. असें विष्णुसहस्रनामांतहि त्याचें वर्णन केलेलें आहे. अशा रीतीनें तें परब्रह्मतत्त्व सर्व विश्वाला प्रकाशित करीत असल्यामुळें आणि तें स्वतःच स्वयंप्रकाश असल्यामुळें " वष्टि इति विष्णुः " त्याला विष्णु असें म्हणतात.

'विश्' म्हणजे प्रवेश करणें. श्रीहरीनें सर्व विश्व अर्थात् विश्वांतील स्थावर, जंगम प्राणिमात्रांचे देह निर्माण केले व त्यानंतर त्या सर्व देहांत जीवरूपानें तोच

प्रविष्ट झाला ! " तत्सृष्ट्वा तदेवानु प्राविशत् " असें उपनिषद् त्याचें वर्णन करीत आहे. तात्पर्य, सर्व विश्वांत तो प्रवेश करून रहातो अथवा सर्व विश्व प्रलयकाळीं त्याच्याच स्वरूपांत प्रवेश करतें म्हणूनहि त्या परब्रह्माला 'विष्णु' असें म्हणतात. 'इष्' इच्छिणें या धातूवरूनहि विष्णु शब्दाची व्युत्पत्ति मानली तरी " ईश्वरेच्छायाः कार्यमात्रं प्रति कारणत्वम् " ईश्वराची इच्छा ही विश्वांतील सर्व कार्यांचें कारण आहे असा नैयायिकांचा सिद्धान्त आहे व तो सर्व ईश्वरवाद्यांना मान्य आहे. यांप्रमाणें विश्वांतील सर्व कार्याच्या मुळाशीं त्या परमेश्वराचीच इच्छा कारणीभूत असल्यामुळें त्याला विष्णु असें म्हणतात.

सोडविणें, शिथिल करणें अशा अर्थानेंहि एक 'विष्' धातु आहे. तो परमात्मा भक्तजनांना मायापाशांतून सोडवितो. सर्व संसारदुःखांतून मुक्त करतो म्हणूनहि त्याला विष्णु असें म्हणतात. (विष्णाति इति विष्णुः) 'विष्' धातूचा अर्थ शिंपडणें, पोसणें असाहि आहे. 'वेषति' सर्व जगाचें तो पोषण करतो म्हणूनहि त्याला विष्णु असें म्हणतात. " कारे नाठवीसि कृपाळू देवासी । पोसितो जगासी एकलाचि ॥ फुटे तरुवर उष्णकाळमासीं । जीवन तयासि कोण घाली ? ॥ कोणें केली बाळा दुग्धाची उत्पत्ति । वाढवि श्रीपति सवें दोन्ही ॥ " हें संत तुकारामांचें वचन प्रसिद्धच आहे.

तात्पर्य, सर्व विश्वाला व्यापणें, सर्व विश्व निर्माण करण्याचा संकल्प करून विश्व निर्माण करणें, सर्व विश्वाला प्रकाशित करणें किंवा प्रकाश देणें, विश्वामध्यें जीवरूपानें प्रवेश करून रहाणें, विश्वाचें संगोपन करणें, प्रलयकाळीं विश्वाला आत्मस्वरूपांत लीन करून घेणें, हें सर्व करण्याला समर्थ एक भगवान् श्रीविष्णूच आहे. " व्याप्तिकान्तिप्रवेशेच्छास्तत्तद्धातुनिबन्धनाः । परत्वेऽभ्यधिका विष्णोर्देवस्य परमात्मनः ॥ " व्याप्ति, कान्ति, प्रवेश आणि इच्छा हे अर्थ जरी निरनिराळ्या धातूंचे असले तरी त्या धातूंवरून निष्पन्न होणारा 'विष्णु' शब्द भगवान् श्रीविष्णु यांचेंच सर्वाधिकत्व, सर्वश्रेष्ठत्व सिद्ध करीत आहे. असा हा भगवान् श्रीविष्णु परिपूर्ण परब्रह्मच आहे.

एकच एक अनादि अनंत पण सर्वांच्या आदीं व अंतीं असलेला भगवान् विष्णु हाच सृष्टीच्या आरंभीं आपल्या आदिशक्ति मायेच्या ठिकाणीं असलेल्या रजोगुणामुळें ब्रह्मदेवाचें रूप धारण करून सृष्टि उत्पन्न करतो. सत्वगुणानें तोच

विष्णु बनून सर्व विश्वाचें पालन-पोषण करतो. त्याचप्रमाणें तमोगुणाच्या आश्रयानें तोच महेश अथवा शंकर बनून सृष्टीच्या संहाराचें कार्य करतो. "एको विष्णुस्त्रिधा भूत्वा सृजत्यत्ति च पाति च। तस्माद्भेदो न कर्तव्यस्त्रिषु देवेषु सत्तमैः॥" तत्त्वतः ब्रह्मदेव, विष्णु आणि शंकर हे एकच आहेत. सुजनांनीं त्यांच्यामध्यें भेद मानूं नये, असें पद्मपुराणांत वर्णन केलेलें आहे (प. पु. २–६). त्याचप्रमाणें जसे शिव तसेच विष्णु आणि जसे विष्णु तसेच शिव, शिव आणि विष्णु यांच्यामध्यें तत्त्वतः तिळमात्रहि भेद नाहीं. "यथा शिवस्तथा विष्णुर्यथा विष्णुस्तथा शिवः। अन्तरं शिवविष्ण्वोश्च मनागपि न विद्यते" (काशीखण्ड २३–४१) हाच अभिप्राय लक्षांत घेऊन "हरि हरा भेद नाहीं। नका करूं वाद॥" असा संतांनींहि मोठा मार्मिक इषारा दिलेला आहे.

आदि विष्णु भगवान् सृष्टीच्या स्थितिकालामध्यें कार्यपरत्वें अनेक रूपें धारण करतात. ही रूपें क्वचित् व्यक्तीच्या निमित्तानें असतात तर क्वचित् समष्टीच्या अर्थात् समाजाच्या, राष्ट्राच्या उद्धाराकरितां असतात. गजेंद्राला संकटांतून सोडविण्याकरितां, ध्रुवाचे मनोरथ पूर्ण करण्याकरितां व प्रह्लादाला हिरण्यकशिपूच्या तावडींतून वाचविण्याकरितां धारण केलेलीं रूपें हीं व्यक्तिनिमित्तक आहेत तर राम, कृष्ण इत्यादि रूपें हीं समष्टिनिमित्तक आहेत. परमेश्वरानें धारण केलेलें रूप तें व्यक्तीच्या निमित्तानें असो अथवा समष्टीच्या निमित्तानें असो, त्याचें कोणींहि चिंतन केलें तरी ते चिंतन करणाऱ्याला मंगलकारकच आहे. निमित्तभेदानें परमेश्वरानें कोणतेंहि रूप धारण केलेलें असलें तरी तें तत्त्वतः परब्रह्मस्वरूपच आहे.

निर्गुण आणि सगुण हीं दोन्हीं रूपें एकाच परमेश्वराचीं आहेत. अवस्थाभेद येवढाच त्यांत फरक आहे. अवस्थाभेदानें स्वरूपांत भेद होत नाहीं. सोनें आणि अलंकार, माती आणि मातीचीं चित्रें, चंदन आणि चंदनाच्या बाहुल्या, सागर आणि तरंग, साखर आणि साखरेचीं चित्रें, बर्फ आणि पाणी, स्फटिक आणि स्फटिकाचा मणि, हे जसे तत्त्वतः एकच आहेत त्याचप्रमाणें निर्गुण आणि सगुण स्वरूपांत असलेला परमात्मा तत्त्वतः एकच आहे. सगुण आणि निर्गुण रूपांतहि परमेश्वराचें एकत्व दाखविण्याकरितां श्रीज्ञानेश्वरमाऊलींनीं तर फारच बहारीचे दृष्टान्त दिलेले आहेत.

अलंकारांतें आलें । तरी सोनेपण काइ गेलें ? ।
कीं कमळ फांकलें । कमळत्वा मुकें ? ॥
वह्नि आणि ज्वाळ । दोन्ही वह्नीच केवळ ।
घृताचें थिजलेंपण । न मोडितां घृतचि जाण ।
का नाटितां कांकण । सोनेचि तें ॥

तात्पर्य, आनंदकंद परिपूर्ण परब्रह्म हे गणेश, विष्णु, शंकर, दुर्गा, दत्त, श्रीकृष्ण, श्रीराम, नरहरि इत्यादि कोणत्याहि देवतेच्या रूपानें नटलें तरी त्याच्या शुद्ध चित्स्वरूपाला परब्रह्मस्वरूपाला तिळमात्रहि बाध येत नाहीं. याच अभिप्रायानें आचार्यांनीं प्रत्येक देवतेच्या स्तोत्रांत ती ती देवता परब्रह्मस्वरूप असल्याचें ठामपणानें वर्णन केलेलें आहे.

हें विष्णुभुजंगमस्तोत्र या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें व मननीय आहे. या स्तोत्रांतील पहिल्या दोन श्लोकांनीं भगवान् विष्णु यांच्या शुद्ध निर्गुण स्वरूपाची अत्यंत सुंदर व स्पष्ट कल्पना दिलेली असून तिसऱ्या श्लोकांत परमेश्वराचें ध्यान कोठें व कसें करावें याचा निर्देश केलेला आहे. पुढील पांच श्लोकांनीं श्रीविष्णूच्या सगुण स्वरूपाचें मोठ्या गोड शब्दांनीं अत्यंत मनोहर चित्र रेखाटलें असून शेवटच्या सहा श्लोकांनीं शरणागति व अनन्यगति प्रगट करीत परमेश्वराचा अत्यंत आतुरतेनें धांवा केलेला आहे, करुणा भाकलेली आहे. आचार्यांची दयायाचना मोठी मननीय आहे. हें स्तोत्र 'भुजंगप्रयात' या वृत्तांतलें असल्यामुळें यास 'विष्णुभुजंगमस्तोत्र' असें म्हटलेलें आहे. फारच सुंदर आहे हें स्तोत्र.]

चिदंशं विभुं निर्मलं निर्विकल्पं
निरीहं निराकारमोंकारगम्यम् ।
गुणातीतमव्यक्तमेकं तुरीयं
परं ब्रह्म यं वेद तस्मै नमस्ते ॥ १ ॥

भगवान् श्रीविष्णु हे जरी परिच्छिन्न परिमित, सगुण साकार रूपानें आमच्या-पुढें विराजमान असले तरी ते तत्त्वतः 'चिदंश' म्हणजे चित्स्वरूपच आहेत. या ठिकाणीं अंश शब्दाचा अर्थ भाग असा न करतां 'स्वरूप' असाच अर्थ करावा. अथवा जड आणि चेतन या दोन प्रकारांनीं प्रतीतीला येणाऱ्या विश्वांत चैतन्याचा जो अंश आहे तें विष्णूचेंच स्वरूप होय म्हणून विष्णूला 'चिदंश' असें

म्हटलें आहे. भगवान् विष्णु विभु म्हणजे सर्वव्यापक आहेत. सर्व विश्वाला त्यांनीं व्यापून टाकलेलें आहे. 'ईशा वास्यमिदं सर्वम्' हें सर्व जग ईश्वरानें आच्छादन करून टाकण्यास योग्य आहे. आच्छादिलेलें आहे. व्यापलेलें आहे असें ईशोपनिषदांत म्हटलेलें आहे. 'निर्मल' म्हणजे शुद्ध अर्थात् अविद्या, अहंकार, राग, द्वेष इत्यादि दोषांचा ज्यांच्याशीं कांहीं संबंध नाहीं असे ते आहेत. तसेंच भगवान श्रीविष्णु हे 'निर्विकल्प' म्हणजे भेदरहित आहेत. मी, तूं, माझें, तुझें, लहान मोठा, गरीब, श्रीमंत, सदाचारी, दुराचारी किंवा शत्रु, मित्र असा कोणताच भेदभाव त्यांच्या ठिकाणीं नाहीं. " समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः " " अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक्। साधुरेव स मन्तव्यः " इत्यादि श्रीहरींचीं वचनें त्यांच्या ठिकाणीं भेदभाव नसल्याचींच द्योतक आहेत. अथवा भगवान् श्रीविष्णु हे सर्वत्र सर्वकाळ सर्वरूपानें विराजमान असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं 'विकल्प' म्हणजे भेद हा तिळमात्रहि नाहीं. अर्थात् परिच्छिन्नता अल्पता, न्यूनता यांचा श्रीहरीशीं संबंध नसल्यामुळें श्रीहरीला 'निर्विकल्प' असें विशेषण दिलेलें आहे.

भगवान् श्रीविष्णु हे 'निरीह' म्हणजे इच्छारहित आहेत. अथवा 'ईहा' या शब्दाचा अर्थ कृत्य किंवा हालचाल, प्रयत्न असाहि आहे. ईश्वर हा 'आप्त-काम' 'पूर्णकाम' असल्यामुळें त्याला स्वभावतः कशाचीहि इच्छा असणें शक्य नाहीं व त्याला कांहीं कृत्यहि तत्त्वतः शिल्लक उरलेलें नाहीं. मुळांतच नव्हतें तें. तें त्यांच्या ठिकाणीं मग शिल्लक कोठून रहाणार ? 'नानवाप्तमवाप्तव्यम्' मी कांहीं मिळवावयाचें आहें किंवा करावयाचें आहें असें नाहींच कांहीं मला, असें परमेश्वरानें स्वतःच गीतेंत सांगितलेलें आहे. यावर कोणी अशी शंका घेईल कीं, अहो, या जगाच्या मुळाशीं त्याचाच संकल्प, त्याचीच इच्छा आणि त्याचीच कृति म्हणजे प्रयत्न कारणीभूत आहेत, तर मग त्याला निरिच्छ किंवा निरीह कसें म्हणावें ? यावर उत्तर असें कीं, शंका बरोबर आहे कारण वेदांनी देखील " विश्वस्य कर्ता भुवनस्य गोप्ता " सर्व जगाचा निर्माता व पालनकर्ता अशा शब्दानें परमेश्वराचें वर्णन केलेलें आहे. तथापि या ठिकाणीं भगवान् श्रीविष्णु यांच्या मूळ शुद्ध व निरुपा-धिक स्वरूपाचें वर्णन करणें चाललें आहे. श्रीहरीच्या मूळ निर्गुण शुद्ध स्वरूपांत त्याच्या ठिकाणीं कोणतीहि इच्छा किंवा प्रयत्न असूं शकणार नाहीं. कारण तो स्वरूपतः निर्विकार आहे. पण असें असूनहि ज्या वेळेला तोच परमात्मा कांहीं

अनिर्वचनीय कारणांनीं सगुण सोपाधिक किंवा शबल बनतो तेव्हां त्यालाहि संकल्प करणें, प्रयत्न करणें हें अपरिहार्य होऊन बसतें. आपल्या अनिर्वचनीय शक्तिवैभवानें तो विश्वाच्या उत्पत्तीचा व स्थितीचा संकल्प आणि प्रयत्न करीत असतो. अशा रीतीनें भगवान् श्रीविष्णु हे सगुण स्वरूपांत जरी इच्छाशील आणि कृतिशील असले, तरी ते आपल्या स्वतःसिद्ध निर्गुण स्वरूपांत इच्छा आणि कृति यांनीं विरहितच आहेत म्हणून त्यांना 'निरीह' म्हटलें आहे तें योग्यच आहे.

भगवान् सूर्यनारायण उदयाला आल्यानंतर त्यांच्या प्रकाशांत सर्व विश्वाची हालचाल सुरू होत असते. स्वतः सूर्य कोणालाहि कोणत्याहि कार्यांत प्रवृत्त करीत नाहीं म्हणून सूर्य जसा 'निरीह' आहे त्याचप्रमाणें भगवान् श्रीविष्णु देखील आपल्या चिच्छक्तीनें प्रकृतीच्या व सर्व विश्वाच्या हालचालीला निमित्त होत असले तरी ते स्वतः 'निरीह'च आहेत.

सगुण स्वरूपांतहि भगवान् श्रीविष्णु विश्वाचें पालन-पोषण करीत असले तरी त्यांचें तें सर्व कार्य लोकसंग्रहाच्या उद्देशानेंच चाललेलें असतें. लोककल्याणाच्या हेतूनें केल्या जाणाऱ्या कार्याच्या कर्तृत्वाचा लेप कार्यकर्त्याला लागत नसतो. लोककल्याणाची उत्कंठा जितकी अधिक तीव्र असेल तितकी निरपेक्षता, निष्कामता, निरीहता ही शोभूनच दिसत असते. याच न्यायानें भगवान् श्रीहरि लोककल्याणाकरितां सर्व कांहीं करीत असले तरी ते स्वतः 'निरीह'च आहेत.

भगवान् श्रीविष्णु यांना स्वभावतः कोणताच आकार नाहीं म्हणून त्यांना 'निराकार' असें म्हटलेलें आहे. ते तत्त्वतः निराकार असले तरी ओंकार म्हणजे प्रणव हा त्यांच्या यथार्थ स्वरूपाचें ज्ञान करून देतो म्हणून त्यांना 'ओंकार-गम्य' असें म्हटलें आहे. प्रणवानेंच परमात्मस्वरूपाची स्पष्ट कल्पना येते. "तद्वाचकः प्रणवः" ओंकार हाच परमेश्वराच्या स्वरूपाचें स्पष्ट प्रतिपादन करूं शकतो. (सु. स्तो. सं. भाग १ ला, पान १९४ पहा). "मी प्रणवस्वरूप आहें" "मी ओंकार आहें" असें गीतेंतहि श्रीहरीनें सांगितलेलें आहे. या अभिप्रायानें आचार्यांनीं भगवान् विष्णु यांना 'ओंकारगम्य' असें म्हटलें आहे.

भगवान् विष्णु हे 'गुणातीत' म्हणजे सत्त्व, रज आणि तम या तिन्ही गुणांच्या पलीकडचे आहेत. 'अव्यक्त' म्हणजे स्थूल दृष्टीनें चर्मचक्षूनें त्यांचें यथार्थ ज्ञान होत नाहीं. ते एकमेव अद्वितीय स्वरूप आहेत. ते 'तुरीय' म्हणजे जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तिन्ही अवस्थांच्या पलीकडचे आहेत.

भगवान् श्रीविष्णु हे सर्वश्रेष्ठ ब्रह्मस्वरूप आहेत. अशा रीतीनें श्लोकांतील तीन चरणांनी वर्णन केल्याप्रमाणें ज्याचें स्वरूप वेद जाणतो अथवा तत्त्व-वेत्यांचा समुदाय जाणतो, त्याचप्रमाणें मीहि जाणतों, त्या आदि विष्णुस्वरूप असलेल्या परमेश्वरा ! तुम्हांला माझा नमस्कार असो. प्रभो ! मी तुम्हांला नमस्कार करीत आहें.

विशुद्धं शिवं शान्तमाद्यन्तशून्यं
जगज्जीवनं ज्योतिरानन्दरूपम् ।
अदिग्देशकालव्यवच्छेदनीयं
त्रयी वक्ति यं वेद तस्मै नमस्ते ॥ २ ॥

भगवान् विष्णु हे परब्रह्मस्वरूप असल्यामुळें 'विशुद्ध' म्हणजे निर्मळ आहेत. कोणत्याहि कर्माचा लेप पापपुण्याच्या रूपानें त्यांना स्पर्श करूं शकत नाहीं. ते 'शिव' म्हणजे निश्चल, निर्विकार आहेत. ते आदि आणि अंत यांनीं विरहित आहेत. त्यांना उत्पत्ति, विनाश अथवा जन्ममृत्यु कांहीं नाहीं. ते 'जगज्जीवन' म्हणजे जगाच्या जीवनाचे आधार आहेत. त्यांच्यामुळेंच सर्व जगाचें जीवन आणि जीवनांतील व्यवहार चालू आहेत. श्रीहरि भगवान् विष्णु हे ज्योतिःस्वरूप आहेत, ते प्रकाशस्वरूप आहेत, ते आनन्दरूप आहेत.

दिशा, देश आणि काल यांनीं त्यांचा व्यवच्छेद म्हणजे भेद होत नाहीं. ते दाही दिशांना व्यापून असल्यामुळें अमुक दिशेला आहेत आणि अमुक दिशेला नाहींत असें त्यांच्याबद्दल म्हणतां येत नाहीं. ते सर्व प्रदेशांत विराजमान असल्यामुळें अमक्या देशांत आहेत आणि अमक्या देशांत नाहींत असें म्हणतां येत नाहीं. ते सर्वकाळीं स्वस्वरूपानें विराजत असल्यामुळें ते अमक्या काळीं आहेत आणि अमक्या काळीं नाहींत असेंहि म्हणतां येत नाहीं. तात्पर्य, दिशा, देश आणि काल यांनीं त्यांचा परिच्छेद म्हणजे भेद होत नाहीं म्हणून त्या भगवान विष्णूला 'अ-दिग्-देश-काल-व्यवच्छेदनीय' अर्थात् दिशा, देश आणि काल यांनीं व्यवच्छेद करण्यास – भेद करण्यास अयोग्य असें म्हटलें आहे. अशा रीतीनें त्रयी म्हणजे वेद ज्याचें वर्णन करीत आहेत. तत्त्ववेत्यांचा समुदाय याप्रमाणें ज्याला जाणीत आहे आणि मीहि

पण याप्रमाणें ज्याचें स्वरूप जाणीत आहें तो आदिनारायण भगवान् विष्णु. हे विष्णो भगवन्ता ! तुम्हाला माझा नमस्कार असो.

महायोगपीठे परिभ्राजमाने
धरण्यादितत्त्वात्मके शक्तियुक्ते ।
गुणाहस्करे वह्निविम्बार्धमध्ये
समासीनमोंकर्णिकेऽष्टाक्षराब्जे ॥ ३ ॥

पहिल्या आणि दुसऱ्या श्लोकानें भगवान् श्रीविष्णु यांच्या निर्गुण स्वरूपाचें प्रतिपादन करून आतां तिसऱ्या श्लोकापासून आठव्या श्लोकापर्यंत श्रीहरीचें ध्यान कोठें व कसें करावें हें सांगत आहेत व हें सांगतां सांगतांच श्रीहरीच्या सगुण स्वरूपाचें वर्णन करून आचार्य श्रीहरीला नमस्कार करीत आहेत. तिसऱ्या श्लोकापासून आठव्या श्लोकापर्यंत जितकीं द्वितीयान्त पदें आहेत त्या सर्वांचा आठव्या श्लोकांतील 'भावयन्' या प्रथमान्त पदाशीं अन्वय करावा. "एवंभूतं त्वां सदा भावयन् नरः संसारपारं याति तस्मै ते नमः अस्तु" असा या तिसऱ्या श्लोकापासून आठव्या श्लोकापर्यंत असलेल्या सहा श्लोकांचा मुख्य अन्वय समजावा.

आतां आपण तिसऱ्या श्लोकाच्या अर्थाचा विचार करूं. श्रीहरीचें ध्यान कोठें करावें ? असा कोणी प्रश्न केल्यास आपल्या हृदयांतच श्रीहरीचें ध्यान करावें असा आचार्यांचा अभिप्राय आहे. आपलें निर्मल हृदय हेंच ईश्वराच्या साक्षात्काराचें उत्कृष्ट स्थान आहे. ईश्वर हा सर्वव्यापी असला तरी – जळीं, स्थळीं, काष्ठीं पाषाणीं – सर्वत्र तो ओतप्रोत भरलेला असला तरी, त्याचा साक्षात्कार हृदयांतच होऊं शकतो. "हृदयते त्वग्र्यया बुद्धया" ईश्वराचा साक्षात्कार शुद्ध, निर्मल, अत्यंत सूक्ष्म व कुशाग्र बुद्धीनेंच होत असतो. बुद्धीचें स्थान हृदयच असल्यामुळें हृदयांतच ईश्वराचा साक्षात्कार होणें हें क्रमप्राप्तच आहे. हृदयाचेंहि स्थान शरीर असल्यामुळें आपलें शरीर हेंच पर्यायानें ईश्वराच्या साक्षात्काराचें साधन ठरतें. म्हणून साधकानें आपलें शरीर हें साधेसुधें शरीर नसून तें एक महायोगपीठ आहे असें समजावें.

शुद्ध भावनेबरोबरच कांहीं विशिष्ट अनुष्ठान-पद्धतीचाहि अवलंब करावा. ही विशिष्ट मंत्रजपाची अनुष्ठानपद्धति अधिकारी तज्ज्ञ गुरूंकडून समजून घ्यावी. शास्त्रोक्त पद्धतीनें अनुष्ठानविधि समजून घेणें आणि मंत्रोपदेश घेणें यालाच

दीक्षा असें म्हणतात. साधकानें दीक्षा घेतल्यानंतर रोज शुचिर्भूत होऊन इष्ट मंत्राचा जप करावा. " देवो भूत्वा देवं यजेत् " देवाची आराधना देवाप्रमाणें शुद्ध होऊनच करावयाची असते. आचमनपूर्वक प्राणायाम करून मन स्थिर करावें. भूशुद्धि भूतशुद्धि कर-न्यास अंग-न्यास आणि मंत्राक्षर-न्यास हे देहाला शुद्ध करीत असतात. अशा रीतीनें देहशुद्ध करणें म्हणजे आपल्या देहाला आराध्य-देवतेचें योगपीठच बनविणें होय. पीठ शब्दाचा अर्थ आसन किंवा देव्हारा असा आहे. योग म्हणजे जीवात्म्याचें परमात्मस्वरूपाशीं सामीप्य व सायुज्य घडवून आणणें. ही गोष्ट या मानवदेहांतच घडूं शकते म्हणून या मानवदेहाला 'योगपीठ' असें म्हटलेलें आहे.अंग-न्यास,कर-न्यास, सृष्टि-स्थिति-संहार-न्यास,मन्त्राक्षर-न्यास, मातृका-न्यास, तत्त्व-न्यास इत्यादि विविध शास्त्रोक्त न्यासांनीं या मानवदेहाला महायोगपीठाचें स्वरूप प्राप्त होत असतें. " संदीक्षितो मनुमिमं प्रतिजप्तुमिच्छन् कुर्यान्निजेन वपुषैव तु योगपीठम् " मंत्रदीक्षा घेतलेल्या साधकानें जपानुष्ठानाच्या वेळीं आपल्या देहाचेंच योगपीठ – महायोगपीठ तयार करावें, असें तंत्र-ग्रंथांत सांगितलेलें आहे. खांदे, मांड्या, पाय, मुख आणि नाभिप्रदेश इत्यादि अंगांनीं युक्त असलेल्या या देहाच्या ठिकाणीं पृथ्वी, जल, तेज, वायु, आकाश, अहंकार, महत्तत्त्व आणि प्रकृतितत्त्व या अष्टतत्त्वांचा यथायोग्य न्यास करून या देहरूपी योगपीठाला अत्यंत उज्ज्वल करावयाचें असतें. शरीरांतील भिन्नभिन्न अवयवांच्या ठिकाणीं त्या त्या तत्त्वांचा न्यास केला असतां संपूर्ण देहालाच तत्त्वात्मकता प्राप्त होत असते. एरवी आपला देह पंचमहाभूतें, अहंकारतत्त्व, महत्तत्त्व आणि प्रकृतितत्त्व यांचाच विकार आहे पण न्यासांच्या प्रभावानें तो तत्त्वात्मक बनतो म्हणूनच आचार्यांनीं देहरूपी या 'महायोगपीठाला' 'धरण्यादितत्त्वात्मके' आणि 'परिभ्राजमाने' अशीं दोन विशेषणें दिलेलीं आहेत. परिभ्राजमान म्हणजे उज्ज्वल देदीप्यमान. आणि ' धरण्यादितत्त्वात्मक म्हणजे पृथ्वीतत्त्व, जलतत्त्व इत्यादि सुक्ष्म अष्टतत्त्वरूप असा याचा अर्थ समजावा.

'शक्तियुक्ते' शरीररूपी महायोग पीठाच्या ठिकाणीं भगवान् श्रीमहाविष्णु यांच्या; विमला, उत्कर्षिणी, ज्ञाना, क्रिया, योगा तसेंच प्रह्वी, सत्या, ईशाना आणि अनुग्रहा अशा ज्या नऊ शक्ति आहेत त्यांची महायोगपीठामध्यें यथा-योग्य स्थापना करून पूजा करावी. अशा रीतीनें योगपीठाला शक्तियुक्त करावें. त्यानंतर पुन्हां उपासनेच्या अंगभूत ज्या वारा आदित्यदेवता धाता, अर्यमा,

मित्र, वरुण इत्यादि त्यांचीं नांवें आहेत त्यांच्यासह केशव, नारायण, माधव, गोविन्द इत्यादि द्वादश मूर्तींची देहरूपी योगपीठामध्यें शास्त्रोक्त पद्धतीनें " ॐ अं धातृसहिताय केशवाय नमः ललाटे " इत्यादि मंत्रबीजोच्चारपूर्वक स्थापना करावी. याप्रमाणें गुणभूत म्हणजे अंगभूत असलेल्या द्वादश आदित्यासह केशवादि द्वादश मूर्तींची देहरूपी योगपीठामध्यें स्थापना केल्यामुळें या देहाला उद्देशून 'गुणाहस्करे' हें विशेषण दिलेलें आहे. गुण म्हणजे अंग आणि अहस्कर म्हणजे सूर्य – आदित्य; अर्थात् अंगभूत द्वादश आदित्यांनीं युक्त असा याचा अर्थ समजावा. या ठिकाणीं भगवान् महाविष्णु ही प्रधानदेवता असून द्वादश आदित्य ह्या अंगभूत देवता आहेत.

" वह्निबिम्बार्धमध्ये " वर वर्णन केलेल्या देहरूपी योगपीठामध्यें असलेलें हृदय हेंच या ठिकाणीं वह्निबिम्बार्ध शब्दानें घ्यावयाचें आहे. " अग्नीषोमात्मको देहः " असा तान्त्रिकांचा सिद्धान्त आहे. आयुर्वेदांत तर सर्व जगच अग्नीषोमात्मक असल्याचें वर्णन केलेलें आहे. नाभिस्थानापासून हृदयापर्यंतचा प्रदेश वह्निमण्डल म्हणून समजला जातो. वह्निबिम्बरूप देहाचा अर्धा भाग म्हणजे प्रकृतस्थलीं हृदयच समजावा. कारण हृदय हेंच परमेश्वराचें निवासस्थान आहे व परमेश्वराचा साक्षात्कारहि हृदयांतच होत असतो. वह्निबिम्बार्धस्वरूप असलेल्या हृदयांत अर्थात् आपल्या हृत्कमलांत, यद्यपि हृत्कमल हें मिटलेल्या कमळाच्या कळीप्रमाणें असून तें देहांत अधोमुख असतें, तथापि या ठिकाणीं भावनेनें तें ऊर्ध्वमुख करून विकसित करावें. याप्रमाणें ऊर्ध्वमुख आणि विकसित असलेल्या आपल्या हृत्कमलांत ॐकाररूप कर्णिकेमध्यें अर्थात् ॐकाररूप कमलकोशांत अष्टदल यंत्राची भावना करावी. अथवा अष्टदल कमलाची कर्णिका म्हणजे कोश हा ओंकार म्हणजे प्रणव आहे असें समजावें. त्यानंतर प्रत्येक दलांत श्रीविष्णूच्या अष्टाक्षर मंत्रांतील अक्षरें योजावींत. यंत्र हें एक उपास्यदेवतेचें मंदिरच असतें. यंत्रांतील मंत्र किंवा मंत्राक्षरें हें प्रत्यक्ष देवतेचें स्वरूप होय. अशा भावनेनें पहावें. यंत्रांतील मध्यभागांत भगवान् महाविष्णु 'समासीन' म्हणजे विराजमान झालेले आहेत अशी भावना करावी. याप्रमाणें ज्याचें चिंतन केलें असतां साधक हा अत्यंत दुर्लंघ्य असलेल्या संसारसागराच्या पैलतीराला सहजच पोहोंचूं शकतो. तो भगवान् महाविष्णु – आचार्य म्हणतात हे भगवन् महाविष्णो ! त्या तुम्हांला मी भक्तिपूर्वक प्रणाम करीत आहें.

कांहीं विद्वान् महायोगपीठ शब्दानें श्रीहरीचें अष्टदलयुक्त यंत्रच घेतात. (यंत्र क्रमांक ३ पहा). यंत्रामध्यें पृथिव्यादि तत्त्वांचीं बीजें असतातच. बीज हें शक्तीसह देवतेचें अधिष्ठान असतें. उदाहरणार्थ, ' लंबीजे स्थिताय सिद्धिबुद्धि-सहिताय महागणपतये ' त्याचप्रमाणें ' रं बीजे स्थिताय महालक्ष्मीसहिताय विष्णवे ' असा उल्लेख आराधनेच्या वेळीं केला जातो. प्रकृतस्थलीं अष्टदल असलेल्या कमलस्वरूपीं यंत्रांतील कर्णिकेमध्यें म्हणजे कमलांतील कोशाच्या ठिकाणीं अर्थात् यंत्राच्या मध्यवर्तुलांत काढलेल्या ऊर्ध्वमुख आणि अधोमुख त्रिकोणांत जो षट्-कोण तयार होतो त्या ठिकाणीं केवळ प्रणवाची स्थापना करावी. त्याचप्रमाणें वर्तुलाच्या बाहेर असलेल्या अष्टदलांत श्रीविष्णूच्या अष्टाक्षर मंत्रांतील प्रणवा-सहित आठहि अक्षरांची योजना करावी. अष्टदलांपैकीं पांच दलें पंचमहाभूतात्मक आणि तीन दलें त्रिगुणात्मक असल्यामुळें त्या ठिकाणीं त्यांच्या त्यांच्या देवता शक्तीसह कल्पाव्यात. अशा या अष्टदल कमलांत असलेला 'गुणाहस्कर' म्हणजे प्रणव अर्थात् ओंकार, कारण तो सर्व गुणांना प्रकाशित करणारा आहे. त्या ओंकारामध्यें जो अनुस्वार आहे तोच 'वह्निबिम्बार्ध' या शब्दाचा अर्थ समजावा. 'वह्निबिम्ब' या शब्दानें वह्निबीज असलेलें 'रं' हें अक्षर व त्याचा अर्धभाग म्हणजे अनुस्वार असा अर्थ केला जातो. त्या ऊर्ध्वगामी बिन्दुस्वरूप असलेल्या अनुस्वारामध्यें 'समासीन' म्हणजे जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तिन्ही अवस्थांच्या पलीकडे स्थित असलेला तुरीयतत्त्वस्वरूप जो परमात्मा. स्वस्वरूपीं विराजमान असलेल्या त्या श्रीविष्णूला माझा नमस्कार असो असा एकंदर या श्लोकाचा अर्थ समजावा.

भगवान् श्रीविष्णु यांच्या षडक्षर मंत्राचा अष्टाक्षर मंत्राचा किंवा यंत्रांतील द्वादश दलामध्यें दिलेल्या द्वादशाक्षर मंत्राचा महिमा फार मोठा आहे. " यस्य संस्मरणात् सन्तो भवाब्धेः पारमाश्रिताः " या मंत्रांच्या द्वारां श्रीविष्णूचें चिंतन करून मोठमोठे संतजन संसारसागराच्या पैलतीराला पोहोंचलेले आहेत. सकाम बुद्धीनेंहि या मंत्राचा विधिपूर्वक जप केल्यास उन्नतीच्या आड येणारीं सर्व विघ्नें दूर होऊन साधकानें ऐहिक उन्नतीसाठीं केलेले प्रयत्न यशस्वी होतील व साधक सुखी होईल असा या मंत्राचा प्रभाव आहे. भगवद्भक्त ध्रुव या अष्टाक्षर मंत्रानेंच कृतार्थ झाला.

समानोदितानेक-सूर्येन्दु-कोटि-
प्रभापुञ्जतुल्यद्युतिं दुर्निरीक्षम् ।
न शीतं नचोष्णं सुवर्णावदात-
प्रसन्नं सदानन्दमंवित्स्वरूपम् ॥ ४ ॥

हे भगवन् श्रीविष्णो ! समान स्वरूपानें उदयाला आलेले कोटिकोटि सूर्य आणि चंद्र यांची प्रभा एकत्र झाली असतां त्या प्रभेच्या समुच्चयाचीच जिला उपमा देतां येईल अशी तुमची 'द्युति' म्हणजे अंगकांति आहे. हे प्रभो ! आपण आपल्या अलौकिक दिव्य तेजानें 'दुर्निरीक्ष' म्हणजे अवलोकन करण्यास कठीण आहां. आपल्या कृपेवांचून आपलें निरीक्षण करतां येणें अशक्य आहे. हे परमेश्वरा ! आपण कोटिकोटि सूर्यप्रमाणें तेजस्वी असूनहि आपला स्पर्श 'उष्ण' म्हणजे तापदायक नाहीं. त्याचप्रमाणें कोटिकोटि चंद्रप्रमाणें आपण शीतल असूनहि आपला स्पर्श बर्फासारखा असह्यहि नाहीं. म्हणून आपण उष्णहि नाहीं आणि शीतहि नाहीं. आपण अत्यंत आह्लाददायक आहां. आपण सोन्यासारखें अत्यंत शुद्ध आणि प्रसन्न आहां, निर्मल आहां, तसेंच आपण सदासर्वकाळ आनंदस्वरूप आहां. प्रभो ! तुम्हांला माझा नमस्कार असो.

सुनासापुटं सुन्दरभ्रूललाटं
किरीटोचिताऽऽकुञ्चितस्निग्धकेशम् ।
स्फुरत्पुण्डरीकाभिरामायताक्षं
समुत्फुल्ल-रत्नप्रसूनावतंसम् ॥ ५ ॥

हे प्रभो ! आपलें नाक आणि नासापुटें हीं अत्यंत सुंदर दिसत आहेत. धनुष्याकार सुंदर भुवया आणि विशाल भालप्रदेश हेहि पण अत्यंत सुंदर दिसत आहेत. आपल्या मस्तकावर रत्नमंडित मुकुट झळकत असून त्याच्या खालीं काळे कुरळे आणि स्निग्ध केशहि अत्यंत योग्य – सुंदर दिसत आहेत. हे परमेश्वरा ! आपले नेत्र प्रफुल्लित झालेल्या कमळाप्रमाणें किंचित् रक्तवर्ण, सुंदर आणि विशाल दिसत आहेत. त्याचप्रमाणें प्रफुल्लित झालेलीं आणि रत्नाप्रमाणें देदीप्यमान असलेलीं अशीं हीं विविध वर्णांचीं फुलेंहि पण आपल्या मस्तकावर अपूर्व शोभा देत आहेत. अत्यंत उत्तम प्रफुल्लित आणि रत्नाप्रमाणें तेजस्वी अशा

फुलांचे तुरे आपण आपल्या मस्तकीं धारण केलेले आहेत. प्रभो ! तुम्हांला मी नमस्कार करतों.

लसत्कुण्डलामृष्टगण्डस्थलान्तं
जपारागचोराधरं चारुहासम् ।
अलिव्याकुलामोदि-मन्दारमालं
महोरस्स्फुरत्कौस्तुभोदारहारम् ॥ ६ ॥

हे भगवन् विष्णो ! तुमच्या सुकोमल गंडस्थलांवर – गालांवर कानांतील मकराकार कुंडलांची कांति झकळत आहे. तसेंच अधर – ओष्ठ यांनी जणुं कांहीं जास्वंदीच्या फुलांचा आरक्त वर्ण चोरूनच आणला आहे असें वाटतें. अर्थात् तुमचे अधर – ओष्ठ हे जास्वंदीच्या फुलाप्रमाणें आरक्तवर्ण दिसत आहेत. आणि प्रभो ! आपलें तें स्मित हास्य (गालांतल्या गालांत हंसणें) हेंहि पण अत्यंत सुंदर दिसत आहे ! हे परमेश्वरा ! आपण आपल्या गळ्यांत जी मंदारमाला म्हणजे कल्पवृक्षाच्या फुलांची माळ धारण केलेली आहे तिचा आमोद म्हणजे सुगंध इतका दरवळत आहे कीं, त्या सुगंधाचा आस्वाद घेण्याकरितां भ्रमरांचे समूह माळेभोंवतीं विरव्या वालण्यांत 'व्याकुल' म्हणजे दंग झालेले दिसत आहेत. आपल्या विशाल वक्षःस्थलावर कौस्तुभमणि आणि दिव्य रत्नांचे हार शोभत आहेत. हे भगवन् ! तुम्हांला मी भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहें.

सुरत्नाङ्गदैरन्वितं बाहुदण्डै-
श्चतुर्भिश्चलत्कङ्कणालंकृताग्रैः ।
उदारोदरालंकृतं पीतवस्त्रं
पदद्वन्द्वनिर्धूत-पद्माभिरामम् ॥ ७ ॥

हे भगवन् महाविष्णो ! ज्यांना उत्तम रत्नें जडविलेलीं आहेत अशा अंगद नांवाच्या बाहुभूषणांनीं शोभायमान असलेल्या भुजदंडांनीं तुम्ही युक्त आहां. अग्रभागीं अर्थात् मनगटांमध्यें रत्नजडित सुवर्णाचीं कंकणें – कडीं शोभत आहेत. अत्यंत उदार म्हणजे श्रेष्ठ – रमणीय – दर्शनीय अशा उदरानें आपण अलंकृत झालेले आहां. हे परमेश्वरा ! आपण पिंवळें वस्त्र परिधान केलेलें आहे. अर्थात् आपण पीतांबर नेसलेले आहां. आपले दोन्ही चरणकमल इतके

'अभिराम' म्हणजे कोमल आणि सुंदर आहेत कीं, जणुं कांहीं त्यांनीं आपल्या या गुणांनीं कमलांनाहि पराभूत करून टाकलें आहे ! हे प्रभो ! अशा सर्व सौंदर्य, माधुर्य आणि लावण्य इत्यादि गुणांनीं संपन्न असलेल्या तुम्हांला माझा भक्तिपूर्वक नमस्कार असो.

स्वभक्तेषु संदर्शिताकारमेवं
सदा भावयन्सन्निरुद्धेन्द्रियाश्वः ।
दुरापं नरो याति संसारपारं
परस्मै परेभ्योऽपि तस्मै नमस्ते ॥ ८ ॥

हे प्रभो नारायणा ! वरील पांच श्लोकांनीं वर्णन केलेला तुमचा हा असा, सर्व प्रकारच्या सौन्दर्य, माधुर्य, लावण्य, सौस्वर्य आणि मांगल्य इत्यादि गुणांनीं संपन्न असलेला आकार तुम्ही फक्त आपल्या भक्तजनांनाच दाखविलेला आहे व दाखवितांहि. इतरांना अर्थात् अभक्तांना तो पहाण्याचें भाग्य कोठलें ? ज्यांना तुमची कृपा व्हावी अशी इच्छा असेल त्यांनीं तुमच्या या स्वरूपाचें ध्यान मात्र अवश्य करावें.

जो मनुष्य स्वभावतःच आडदांड असलेल्या आणि विषय दृष्टीस पडले कीं, स्वैरपणें धांवत सुटणाऱ्या या इंद्रियरूपी घोड्यांना आपल्या सुसंस्कृत मनाचा लगाम लावून आणि तेथें बुद्धिरूपी सारथ्याची योजना करून त्यांना विषयांपासून आवरतो. अर्थात् अंतर्मुख होऊन मनानें सतत श्रीहरीचें चिंतन करतो, वर सांगितल्याप्रमाणें श्रीहरीचें ध्यान करतो, तो संसारसागराला सहज तरून जातो. मग तो संसारसागर कितीहि अफाट असला, त्याचा पार म्हणजे पैलतीर गांठणें कितीहि अवघड असलें, तरी भगवद्भक्ताला भगवत्कृपेनें तें सहज गांठतां येतें. भगवद्भक्त संसाररसागराच्या पैलतीराला सहज जातो. परमेश्वरा ! असा हा तुमचा प्रभाव आहे. म्हणून तुम्ही श्रेष्ठांपेक्षांहि श्रेष्ठ आहां. त्या तुम्हांला मी भक्तियुक्त अंतःकरणानें प्रणाम करतों.

श्रिया शातकुम्भ-द्युति-स्निग्धकान्त्या
धरण्या च दूर्वादलश्यामलाङ्ग्या ।
कलत्रद्वयेनामुना तोषिताय
त्रिलोकी-गृहस्थाय विष्णो नमस्ते ॥ ९ ॥

हे प्रभो श्रीहरे ! जिची अंगकांति सुवर्णाप्रमाणें देदीप्यमान आणि स्निग्ध आहे अशी श्री म्हणजे लक्ष्मी ही एक आपली पत्नी आहे आणि दूर्वांकुराप्रमाणें श्यामलवर्ण असलेली लोकमाता श्रीधरणीदेवी अर्थात् पृथ्वी ही आपली दुसरी पत्नी आहे. या दोघींच्या सान्निध्यांत विराजमान असलेले आपण आनंदपूर्ण – परम संतुष्ट दिसत आहां. त्रैलोक्यरूपी गृहामध्यें वास्तव्य करणारे आपण हे श्रीविष्णो ! आपणांस मी भक्तिपूर्वक नमस्कार करतों.

शरीरं कलत्रं सुतं बन्धुवर्गं
वयस्यं धनं सद्म भृत्यं भुवं च ।
समस्तं परित्यज्य हा ! कष्टमेको
गमिष्यामि दुःखेन दूरं किलाहम् ॥ १० ॥

हे देवा ! माझा अन्तकाल आतां जवळ आलेला आहे. हें शरीर – ज्या शरीरानें मी आतांपर्यंत या संसारांत विविध सुखें अनुभवलीं तें मला आतां सोडावें लागणार ! ही पत्नी – जिच्या सान्निध्यांत मी एवढें आयुष्य काढलें. सुखानें संसार केला. तिला मला आतां सोडावें लागणार ! हे पुत्र – ज्यांना मी जन्म दिला, लहानाचे मोठे केलें, शिकविलें, संवरलें. त्यांचे आतां सुखाचे संसार पहाण्याचा काळ आला असतां, मला त्यांनाहि सोडून जावें लागणार ! भाऊ, बहिणी आणि त्यांचे परिवार तसेंच आप्त, इष्ट, सोयरे धायरे आणि मित्र या सर्वांना मला सोडून जावें लागणार ! हें परिश्रम करून मिळविलेलें आणि राखलेलें धन तसेंच हा मेणा, ही बग्गी, हे घोडे, हे हत्ती, ह्या मोटारी व जमीन-जुमले, माड्या, हवेल्या, वाडे, बंगले आणि नोकर-चाकर हे सर्व कांहीं मला सोडून जावें लागणार ! अरेरे ! मला मोठें दुःख वाटत आहे कीं, यांतलें कांहींएक माझ्याबरोबर येणार नाहीं आणि कोणीहि मला या मृत्यूच्या तावडींतून सोडविणार नाहीं. खरोखर मी एकटा दूर कोठें तरी मोठ्या दुःखानें जाणार ! देवा ! कोण आहे तुमच्यावांचून दुसरा मला या कष्टांतून सोडविणारा ? हे दयार्णवा प्रभो ! कृपा करा आणि मला या संकटांतून सोडवा. (या श्लोकांत आचार्यांनीं वर्णन केलेली परिस्थिति ही स्वतःविषयींची नाहीं हें निश्चित. ज्याच्या वियोगाबद्दल अंतकाळीं खेद वाटेल असा एकहि विषय त्यांच्याजवळ नव्हता. कोणत्याहि सांसारिक विषयावर त्यांचें चित्त आसक्त नव्हतें. सर्वसामान्य

संसारी जीवांचीच ही अवस्था असते. आचार्यांनीं या श्लोकांत तिचा अनुवाद केला आहे एवढेंच. आपण मात्र या शब्दांनीं परमेश्वराची प्रार्थना करणें हें उचितच आहे.)

जरेयं पिशाचीव हा ! जीवतो मे
वसामांसि रक्तं च मांसं बलं च ।
अहो ! देव सीदामि दीनानुकम्पिन्
किमद्यापि हन्त ! त्वयोदासितव्यम् ? ॥ ११ ॥

हे नारायणा ! ही जरा म्हणजे वार्धक्य. ही जणुं कांहीं एखाद्या पिशाचाप्रमाणें माझ्या मागें लागली आहे. अरेरे ! ही जिवंतपणींच माझ्या अंगांतील रक्त, मांस आणि वसा म्हणजे मेद-मांस-स्नेह अर्थात् शरीरांतील स्निग्धांश खाऊन टाकीत आहे आणि माझ्या सर्व शक्तीचाहि ती नाश करीत आहे. हे दीनदयाळा परमेश्वरा ! मला मोठे कष्ट होत आहेत. आपण का बरें अजूनहि माझ्याबद्दल औदासीन्य धारण करावें ? हें औदासीन्य टाकून मला या कष्टांतून सोडविण्याकरितां आपण सत्वर धावत या. मोरोपंतांनींहि परमेश्वराचा असाच कळवळून धांवा केलेला आहे.

यमराजाच्या सैन्याची जणुं कांहीं धवल पताकाच अशी ही जरा म्हणजे म्हातारपण डोळ्यांपुढें दिसत आहे. जणुं कांहीं यमदेवाचे सैनिकच असलेले अशा तऱ्हेचे हे विविध रोग, यांच्याशीं झगडतां झगडतां मी जेरीस आलों आहें. देह शिणला माझा. प्रभो ! अशा वेळीं तुमच्याशिवाय साहाय्य करण्याला दुसरा कोण समर्थ आहे ? तुम्ही जर तातडी केली नाहीं तर हा माझा मृत्युरूपी शत्रु गळा कापील ! " कृतान्त-कटकामल-ध्वज जरा दिसों लागली, पुरःसर गदांसवें झगडतां तनू भागली ! सहाय दुसरा नसे तुजविणें बळें आगळा न हों जरि उताविळा स्वरिपु कापितो हा गळा!! " श्रीसमर्थांनीं देखील " तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां " या शब्दांनीं प्रभु रामचंद्रांचा मोठा कळवळून धांवा केलेला आहे. आपणहि याच तळमळीनें श्रीहरीचा धांवा करणें आवश्यक आहे.

कफव्याहतोष्णोल्बण-श्वास-वेग-
व्यथा-विस्फुरत्सर्व-मर्मास्थिबन्धनाम् ।

विचिन्त्याहमन्त्यामसंख्यामवस्थां
विभेमि प्रभो किं करोमि प्रसीद ॥ १२ ॥

हे प्रभो ! माझी अवस्था मोठी दयनीय झाली आहे. 'असंख्या' म्हणजे जिचें संख्यान अर्थात् वर्णन करतां येत नाहीं अशी ही 'अंत्या' म्हणजे अंतकाळची अवस्था मोठी कठीण आहे. कफ वाढला. कफानें पित्ताचा अवरोध झाला. त्यामुळें पित्ताचाहि प्रकोप झाला. पित्ताच्या आघातानें वातहि प्रक्षुब्ध झाला. दमा, श्वास इत्यादि विकार बळावले. सन्निपात झाला. असह्य यातना होऊं लागल्या. सर्व मर्मस्थानें व अस्थिबंधनें त्या वेदनांनीं व्यापून टाकलीं आहेत. अशी ही अवर्णनीय अंतकाळची अवस्था प्राप्त झाली आहे. हे दयावना ! " विचिंत्य अहं विभेमि " एकंदर विचार करून मी अगदीं घाबरून गेलों आहें. मी काय करूं ? मला कांहीं सुचत नाहीं. 'प्रसीद' आपणच प्रसन्न व्हा आणि हे दीनदयाळा ! आपण या दीनाचा उद्धार करा.

त्वन्नच्युतानन्त गोविन्द विष्णो
मुरारे हरे नाथ नारायणेति ।
यथाऽनुस्मरिष्यामि भक्त्या भवन्तं
तथा मे दयाशील देव प्रसीद ॥ १३ ॥

हे प्रभो ! आपण दयाशील आहां. दया करणें हा आपला स्वभाव आहे. हे करुणासागरा देवा ! मजवर आपण प्रसन्न व्हा आणि माझें एवढें मागणें आपण मला द्या. हे अच्युता अनन्ता ! हे गोविन्दा विष्णो ! हे मुरारे श्रीहरे ! हे नाथा जगन्नाथा नारायणा ! अशा रीतीनें भक्तियुक्त अन्तःकरणानें जेणेंकरून मला तुमचें सतत स्मरण होत राहील असा माझ्यावर अनुग्रह करावा. हे देवा ! प्रसन्न व्हा आणि एवढें माझे मनोरथ पूर्ण करा.

भुजङ्गप्रयातं पठेद्यस्तु भक्त्या
समाधाय चित्ते भवन्तं मुरारे ।
स मोहं विहायाऽऽशु युष्मत्प्रसादात्
समाश्रित्य योगं व्रजत्यच्युतं त्वाम् ॥ १४ ॥

हे मुरारे श्रीकृष्णा ! जो कोणी तुमचें स्वरूप चित्तामध्यें ठेवून, भक्तियुक्त अन्तःकरणानें तुमची आठवण करून मोठ्या प्रेमानें हें विष्णुभुजंगप्रयातस्तोत्र म्हणत राहील त्याच्यावर तुमची कृपा होईल आणि तुमच्या कृपेनें तो मोह म्हणजे अज्ञान बाजूला सारून -- टाकून ज्ञानाचा आश्रय करील. ईशकृपेनें व गुरुकृपेनें प्राप्त होणाऱ्या ज्ञानालाहि 'योग' म्हणतात. ज्याच्या योगानें जीवात्म्याचा परमात्मरूपाशीं योग घडून येतो त्या ज्ञानालाहि योगच म्हणतात. " साधने साध्योपचारः " साध्यवाचक शब्द लक्षणेनें साधनाच्या ठिकाणीं योजतात. " कुठारो मम जीवनम् " एखादा लाकुडफोड्या 'कुऱ्हाड हें माझें जीवन आहे' असें म्हणतो. या ठिकाणीं जीवन हें साध्य आहे व कुऱ्हाड हें जीवनाचें साधन आहे. तरी पण कुऱ्हाडीला उद्देशून 'जीवन' हा शब्द योजला गेला. त्याचप्रमाणें जीवात्मपरमात्मयोग हा साध्य आहे व ज्ञान हें साधन आहे. तथापि योग हा शब्द ज्ञानाला उद्देशून योजला आहे. हे प्रभो ! या स्तोत्राच्या पठणानें तुमचा भक्त तुमच्या कृपेनें ज्ञानाचा आश्रय करून तुमच्या 'अच्युत' स्वरूपाला तो प्राप्त होईल. तोहि तुमच्याप्रमाणें सच्चिदानन्द परिपूर्ण परब्रह्मस्वरूप होईल.



श्रीविष्णु-नारायण-वासुदेव यंत्र : २

श्रीअष्टभुजमहाविष्णु



वन्दे महापुरुषं तं चरणारविन्दम् ।

विष्णुपादादिकेशान्तवर्णनस्तोत्रम् ।

[संसारामध्यें चित्ताचा विक्षेप होईल असेंच प्रसंग वारंवार आपल्यापुढें येऊन उभे रहात असतात. जीव अगदीं भांवावून जातो. कांहीं सुचत नाहीं. तशांत उत्तरोत्तर प्राप्त होणाऱ्या विकट परिस्थितीनें जीवनकलहतर अत्यंत तीव्र होत चालला आहे. कितीहि मिळवा तें पुरवठ्याला येतच नाहीं. दोन हात मिळविण्यास अपुरे पडतात. स्वभावतःच गृहकृत्याची जबाबदारी जिच्यावर असते त्या गृहिणीला सुद्धां मिळविण्यासाठीं घराबाहेर पडण्याची पाळी आली आहे. दोन हातांच्या ऐवजीं चार हातानें मिळविलें तरी देखील तें पुरेसें होत नाहीं. आम्ही चाललों आहोंत आमच्या कल्पनेप्रमाणें समतेच्या—साम्याच्या मार्गानें, पण प्रत्यक्षांत वैषम्यच अधिक वाढत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येत आहे. कितीहि प्रयत्न करा मनाला स्वास्थ्याचा लाभ होत नाहीं. विक्षेपांचेच प्रसंग फार. अशा स्थितींत कसली संध्या नि कसलें जपतप ? कसली पूजा नि कसला देवधर्म ? कसला योग आणि कसली ध्यानधारणा ? दिवसभर मरमर कष्ट करावेत, रात्रीं क्षणभर मुलांबाळांत अथवा आप्तेष्टांत रमावें व अंथरुणांत मेल्या-सारखें पडावें. असाच आयुष्यक्रम सर्वसाधारण मानवाला कंठावा लागतो. अशाहि स्थितींत कांहीं सात्विक समाधानाचा अंश मिळवावयाचा असेल तर आचार्यांनीं केलेलीं ही भक्तिपर स्तोत्रेंच क्षणभर म्हटलीं असतां चार-दोन क्षण यथावसर त्यांच्या अर्थाचा विचार केला असतां मनाला समाधान देतील यांत संशय नाहीं. असें समाधान देण्याचें सामर्थ्य या स्तोत्रांत आहे असा अनेकांचा अनुभव आहे. प्रस्तुत श्रीविष्णुपादादिकेशान्तवर्णनस्तोत्र हें असेंच मनाला अत्यंत समाधान देणारें आहे.

मृगजळानें जशी कधींहि तहान भागत नाहीं त्याचप्रमाणें सांसारिक विषय सुखानें कधींहि मनाचें आत्यंतिक समाधान होणार नाहीं. सुखासाठीं खरोखर अन्तःकरण तळमळत असेल तर तुम्हांला संतांनीं व आचार्यांनीं दाखविलेल्या मार्गानेंच जावें लागेल. श्रीहरीचें नामसंकीर्तन, गुणसंकीर्तन आणि स्वरूपचिंतन हेंच खऱ्या सुखाचें खरें साधन आहे. कारण तो परमात्मा नित्य आणि निरतिशय आनंदस्वरूप आहे. त्याचें क्षणभर का होईना मन लावून चिंतन केलें, नाम-संकीर्तन केलें तर यज्ञ, दान, जप, तप आणि योग इत्यादि सर्व साधनांनीं जें उत्तम

फल मिळवावयाचें असतें तें सर्व मिळतें, म्हणून भल्या माणसा ! त्या श्रीहरीलाच भज, त्यालाच शरण जा, त्याचेच पाय धर, त्यालाच नमस्कार कर आणि त्याचेंच चिंतन कर. असा श्रीधरस्वामींनी खात्रीचा आणि स्वानुभवाचा निर्वाळा दिलेला आहे. " यन्नामकीर्तनं दानतपोयोगादिसत्फलम् । तं नित्यं परमानन्दं हरिं नर ! नम स्मर ॥ " श्रीभागवत-टीका, २।१।१.

आतां कोणी म्हणेल, या तीव्र जीवनकलहांत हरि हरि करावयाला वेळ तरी कोठें आहे ? यावर उत्तर असें कीं, हरिचिंतनाला कांहीं काळवेळ लागत नाहीं. फक्त जाणीवेची अपेक्षा असते. श्रीहरीच्या स्वरूपाची व स्वभावाची चित्तांत जाणीव ठेवून त्याच्या चरणारविंदाचें चिंतन करीत राहिलें म्हणजे पुरें. संसारांच्या सेवेंत तर सर्व आयुष्य चाललेंच आहे, पण त्यांतल्या त्यांत वेळ काढून श्रीहरीचीं स्तोत्रें म्हणावींत, त्यांच्या अर्थाचें मनांतल्या मनांत चिंतन करावें. श्रीहरीचे गुण स्वतः आठवावेत, दुसऱ्याला सांगावेत. आपणहि दुसऱ्याच्या मुखांतून ऐकावेत. त्याचें नामसंकीर्तन आणि स्वरूपचिंतन हें तर नेहमींच करतां येण्यासारखें आहे. कोणत्याहि कामाची त्याला आडकाठी येऊं शकत नाहीं. काम करीत असतांना मधून मधून विश्रांति घेणें हा तर प्रकृतिधर्मच आहे. त्याच विश्रांतीच्या क्षणांत श्रीहरीचें नामस्मरण करावें. आपण पडलों, अडखळलों, ठेच लागली, जांभई आली, शिंक आली, खोकला आला किंवा कांहीं दुखुंखपूं लागलें तरी देवा वें नांव तोंडीं आलें पाहिजे. ' हरये नमः ' ' श्रीहरिः शरणम् ' ' हे हरे ! ' असे उच्चार सहजच आपल्या वैखरी वाणीनें होत रहावेत. सहजच श्रीहरीचें नांव मुखांतून आलें तरी देखील सर्व पापांचा नाश होईल. " पतितः स्खलितश्चार्तः क्षुत्त्वा वा विवशो ब्रुवन् । हरये नम इत्युच्चैर्मुच्यते सर्वपातकात् ॥ " भागवत, १२।१२।४६. अशा रीतीनें श्रीहरीच्या चरणकमलाची श्रीहरीची जाणीव जर ठेवली तर त्या जाणिवेनेंच सर्व अशुभांचा उपशम होतो. समाधान वाढतें, अंतःकरण शुद्ध होतें, ईश्वरभक्तीचा लाभ होतो. शुद्ध वैराग्य आणि निर्मल ज्ञान प्राप्त होऊन शेवटीं स्वस्वरूपाचा — परमात्मस्वरूपाचा साक्षात्कारहि होतो ! केवढा हा श्रीहरीच्या जाणीवेचा प्रभाव आहे ! पहा. " अविस्मृतिः कृष्णपदारविन्दयोः क्षिणोत्यभद्राणि शमं तनोति च । सत्त्वस्य शुद्धिं परमात्मभक्तिं ज्ञानं च विज्ञानविरागयुक्तम् ॥ " भागवत, १२।१२।५४.

श्रीहरीच्या स्वरूपीं मनाची धारणा कशी करावी ? असें कोणी विचारल्यास, जणुं कांहीं या प्रश्नाचें उत्तर देण्यासाठींच आचार्यांनीं या विष्णुपादादि केशान्त-वर्णनस्तोत्राची रचना केली आहे. श्रीहरीच्या समग्र स्वरूपाचें मनाला एकदम आकलन होणार नाहीं याकरितां मागच्या विष्णुभुजंगमस्तोत्रांतील श्लोक तीन ते नऊ या सात श्लोकांनीं केलेल्या वर्णनाप्रमाणें श्रीहरीच्या परम रमणीय मंगलमय सगुण स्वरूपाचें चिंतन करावें. त्यानंतर या स्तोत्रांत सांगितलेल्या रीतीनें श्रीहरीच्या आयुधांचें, परिवाराचें आणि नखशिखान्त भिन्न भिन्न अवयवांचें व्यष्टि व समष्टि रूपानें चिंतन करावें. परमेश्वराच्या एका एका अवयवाच्या ठिकाणीं आपल्या मनाची धारणा करीत करीत तळपायापासून मस्तकापर्यंत श्रीहरीच्या विराट् स्वरूपाच्या ठिकाणीं मन स्थिर करावें. अशा रीतीनें मन श्रीहरीच्या विराट् स्वरूपीं स्थिरावलें किंवा परमेश्वराचें विराट् स्वरूप आपल्या मनांत बिंबलें म्हणजे मग त्या मनाला त्या विराट् स्वरूपाच्याहि पलीकडे असलेलें भगवान् श्रीमहाविष्णु यांचें, परम सूक्ष्म शुद्ध सद्घन, चिद्घन व आनन्दघन तसेंच निर्गुण आणि निर्विकार असें जें मूळरूप आहे त्याच रूपाचें दर्शन घडवावें. अर्थात् त्याच स्वरूपाचें मनानें सतत चिंतन करावें. जसें जसें मन त्या स्वरूपाच्या जवळ जाईल तसें तसें त्याचें स्वतःचें भान हरपेल आणि मग तें मन आणि तें रूप हीं दोन्ही एकरूप होऊन जातील अशी अवस्था निर्माण होईल. अशी अवस्था निर्माण होणें हीच या मानव-देहाच्या मूल्यमापनाची अंतिम मर्यादा होय. येथेंच मानव देहाचें मूल्य पूर्णपणें पदरांत पडतें. या दृष्टीनें आचार्यांनीं केलेलें हें स्तोत्र फारच महत्त्वाचें आहे.

या स्तोत्रांतील श्लोकांची रचना स्रग्धरा वृत्तांत आहे. या वृत्तांत सात सात अक्षरांनीं विराम घ्यावा लागतो. स्रग्धरा वृत्त हें स्वाभाविकच प्रौढ, गंभीर आणि संथ असल्यामुळें या स्तोत्रालाहि प्रौढपणा, गांभीर्य आणि संथपणा प्राप्त झालेला आहे. या स्तोत्रांत सर्वत्र शांतरस गंभीरपणें स्थिरावलेला दृष्टीस पडतो. राजाप्रमाणें थाटांत असलेल्या शांतरसाच्या पंक्तीला शृंगार, वीर, करुण, अद्भुत आणि रौद्र इत्यादि रसहि आपआपली वर्णी लावीत असल्याचें दिसत आहे. या स्तोत्रांतील प्रत्येक श्लोक, यमक, अनुप्रास त्याचप्रमाणें उपमा, दृष्टान्त, रूपक स्वभावोक्ति, अतिशयोक्ति आणि संदेह इत्यादि अलंकारांपैकीं कोणत्या ना कोणत्या तरी अलंकारानें नटलेला असल्याचें पहावयास सांपडेल. या स्तोत्राच्या मननानें आपल्या मनालाहि प्रौढी, गांभीर्य

आणि शांति यांचा निश्चित लाभ होईल. वाचकांच्या मननासाठीं आम्ही यथामति या स्तोत्राचें विवेचन वाचकांना सादर करीत आहोंत.]

लक्ष्मीभर्तुर्भुजाग्रे कृतवसति मितं यस्य रूपं विशालं
नीलाद्रेस्तुङ्ग-शृङ्ग-स्थितमिव रजनीनाथबिम्बं विभाति ।
पायान्नः पाञ्चजन्यः स दितिसुतकुलत्रासनैः पूरयन्स्वै-
र्निध्वानैर्नीरदौघ-ध्वनि-परिभवदैरम्बरं कम्बुराजः ॥ १ ॥

जीवांचें स्वरूप जसें प्रारब्धकर्माच्या अधीन असतें तसें ईश्वराचें नसतें. भक्तजनांवर अनुग्रह करण्याकरितां परमेश्वराला कोणतेंहि रूप धारण करतां येतें. कारण तो सर्व शक्तींचें अधिष्ठान आहे. भक्तजनांना ध्यान करण्याकरितां व भक्तजनांवर अनुग्रह करण्याकरितां परमेश्वरानें आपल्या स्वतःसिद्ध निर्गुण आणि निर्विकार असलेल्या सच्चिदानंद स्वरूपांतून पहिल्या प्रथम ज्या स्वरूपाचा आविष्कार केला त्याच रूपाला भगवान महाविष्णु, आदिनारायण किंवा महापुरुष असें म्हणतात. हेंच रूप, सर्व अवतारांचें बीजभूत आहे. घृताचें काठिण्य हा जसा अवस्थाभेद होय त्याचप्रमाणें आदिविष्णु हा शुद्ध परब्रह्मस्वरूपाचा अवस्थाभेदच आहे त्यामुळें परब्रह्माच्या निर्विकारत्वाला तिळमात्रहि बाध येत नाहीं. ईश्वराचा साक्षात्कार होण्यासाठीं त्याच्या स्वरूपाचा सारखा निदिध्यास घडावा लागतो. या निदिध्यासनालाच ध्यान असें म्हणतात. या ध्यानांतूनच समाधिसौख्याचा लाभ घ्यावयाचा असतो. ध्यान हें धारणामूलक असतें. धारणा सिद्ध झाल्याशिवाय ध्यान घडत नाहीं. मनाची श्रीहरीच्या स्वरूपीं धारणा सिद्ध होण्यासाठींच आचार्य या स्तोत्रांत श्रीहरीच्या सांगोपांग स्वरूपाचें मोठ्या कौशल्यानें वर्णन करीत आहेत. मनाचा निर्भयपणानें परमेश्वराच्या स्वरूपांत प्रवेश व्हावा म्हणून प्रथम श्रीहरीच्या आयुधांचेंच वर्णन आणि स्तवन करीत आहेत. राजाचें दर्शन घेण्यापूर्वी राजाच्या सेवकांची कृपा संपादन करावी लागतेंच. अथवा बहिरंगांतून अंतरंगांत प्रवेश करावयाचा असल्यामुळें आपाततः बहिरंगस्वरूप दिसणाऱ्या आयुधांची प्रथम स्तुति करीत आहेत. वस्तुतः श्रीहरीचीं आयुधें ही श्रीहरिस्वरूपच आहेत.

श्रीहरीच्या हातांतील शंख आणि शार्ङ्गधनुष्य हीं दोन्ही अहंकारस्वरूप आहेत. सांख्यशास्त्राच्या दृष्टीनें अहंकार दोन प्रकारचा आहे. एक भूतादि आणि

दुसरा इंद्रियादि. आकाशादि पंचमहाभूतांना कारणीभूत असलेल्या शब्दादि तन्मात्रा ज्या अहंकारांतून अभिव्यक्त होतात त्या अहंकाराला भूतादि अहंकार असें म्हणतात आणि पंचज्ञानेन्द्रियें पंचकर्मेंद्रियें आणि मन ज्याच्यांतून अभिव्यक्त होतें, त्या अहंकाराला इन्द्रियादि अहंकार असें म्हणतात. कार्य आणि कारण यांच्यांत तत्त्वतः अभेद मानला जात असल्यामुळें शब्दतन्मात्रांचा कारणीभूत असलेला अहंकार हा शब्दब्रह्मस्वरूपच ठरतो. या दृष्टीनेंहि आचार्यांनीं प्रथम श्रीहरीच्या हातांत असलेल्या शब्दब्रह्मात्मक शंखाची स्तुति केलेली आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, श्रीहरीच्या हातांतील शंख हा समस्त अज्ञानाचें निरसन करून पूर्ण ज्ञानाची प्राप्ति करून देणारा आहे. ध्रुवाला श्रीहरीनें दर्शन दिल्याबरोबर प्रथम तो दिङ्मूढ झाला. कोणत्या शब्दानें श्रीहरीची स्तुति करावी व श्रीहरीशीं काय बोलावें हें कांहीं त्याला सुचेना. तो हात जोडून स्वस्थ बसला. तेव्हां "शङ्खप्रान्तेन गोविन्दस्तं पस्पर्श कृताञ्जलिम्" श्रीहरीनें आपल्या हातांतील शंखानें ध्रुवाच्या गालाला स्पर्श केला. श्रीहरीच्या हातांतील शंखाचा स्पर्श होतांच ध्रुवाचें सर्व अज्ञान मावळलें आणि त्याच्या बुद्धींत पूर्णतत्त्वाचा प्रकाश पडला! असा हा श्रीहरीच्या हातांतील शंखाचा महिमा लक्षांत घेऊन आचार्य श्रीहरीच्या करकमलीं विराजमान असलेल्या सर्वश्रेष्ठ पांचजन्य शंखाचें स्तवन करीत आहेत.

"लक्ष्मीभर्तुः सः पाञ्चजन्यः कम्बुराजः नः पायात्" श्रीहरीचा तो सर्वश्रेष्ठ असलेला 'पाञ्चजन्य' शंख आमचें रक्षण करो. असा या श्लोकांतील मुख्य अन्वय आणि त्याचा अर्थ आहे. श्रीहरीनें हातांत घेतलेला शंख वर्णानें शुभ्र असून तो मोठा विशाल म्हणजे भव्य आहे. तो नील पर्वताच्या उच्च शिखरावर विराजत असलेल्या रजनीनाथाच्या अर्थात् चंद्राच्या बिंबाप्रमाणें शोभत आहे. श्रीहरीची अंगकांति ही नीलवर्ण असून त्यांचा तळहात रक्तकमलाप्रमाणें आरक्तवर्ण आहे. त्या हातांत धारण केलेला पांढराशुभ्र शंख जणुं कांहीं नीलपर्वताच्या रक्तवर्ण शिखरावर आह्लाददायक आणि शुभ्रवर्ण असलेल्या शरदृतूंतील पूर्णिमेच्या पूर्णचंद्राप्रमाणेंच दिसत आहे. पर्वतांचीं शिखरें गैरिक अर्थात् गेरु वगैरे धातूंच्या संपर्कानें तांबूस दिसत असतात. भगवान् श्रीविष्णु यांचा तळहातहि स्वाभाविकच आरक्तवर्ण आहे. त्यांत असलेल्या पांढऱ्या शुभ्र शंखांत तळहाताचा आरक्तवर्ण प्रतिबिंबित झाल्यामुळें तो शंख उदयाला आलेल्या

पूर्णिमेच्या पूर्णचंद्रामाणें स्वाभाविकच दिसत आहे. या ठिकाणीं आचार्यांनीं दिलेली ही उपमा किंवा केलेली उत्प्रेक्षा किती सुंदर आहे !

आणखी कसा आहे तो पांचजन्य शंख ? पहा : दितिसुत म्हणजे दैत्य त्यांच्या समुदायाला त्रस्त करून सोडणाऱ्या आणि मेघसमूहाच्या गर्जनांचाहि पराभव करणाऱ्या अशा आपल्या गंभीर निनादांनीं ज्यानें आकाशाला दुमदुमून टाकलें आहे, असा हा श्रीहरीचा पाञ्चजन्य शंखराज आमचें रक्षण करो. पञ्चजन म्हणजे मनुष्य. मनुष्यांचें अज्ञान नाहींसें करून मानवांना हितप्रद होतो म्हणून श्रीहरीच्या शंखाला 'पाञ्चजन्य' असें म्हणतात. पंचजन नांवाच्या असुराला मारून त्याचें आश्रयस्थान असलेला शंख श्रीहरीनें आपल्या हातांत घेतला. पंचजनाचें आश्रयस्थान म्हणूनहि या शंखाला 'पाञ्चजन्य' असें म्हणतात. शंखाचा शब्द ऐकून सर्प दूर जातात. भूत, प्रेत, पिशाचेंहि पळतात. अनेक रोगांचें निरसन होतें. शंखोदकानें प्रोक्षण करणें आणि शंखोदक प्राशन करणें हे पूजेंतील विधि या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त आहेत. साहित्यशास्त्राच्या दृष्टीनें या श्लोकाच्या पूर्वार्धांत उपमा अलंकार आहे तर उत्तरार्धांत 'व्यतिरेक' आणि 'अधिक' या अलंकारांचेंहि दर्शन होत आहे. तात्पर्य, उपमानापेक्षां उपमेयाचें श्रेष्ठत्व दाखविणें हें व्यतिरेक अलंकाराचें स्वरूप आहे. प्रकृतस्थलीं मेघगर्जनेपेक्षां श्रीहरीच्या शंखाचा नाद श्रेष्ठ दाखविला आहे. त्याचप्रमाणें ध्वनीचा आश्रय असलेल्या आकाशापेक्षां आश्रित असलेल्या ध्वनीचें आधिक्य प्रतिपादन केलेलें आहे. अशा या श्रीहरीच्या श्रेष्ठ शंखाला आम्ही भक्तिपूर्वक प्रणाम करतों. तो आमचें रक्षण करो.

आहुर्यस्य स्वरूपं क्षणमुखमखिलं सूरयः कालमेतं
ध्वान्तस्यैकान्तमन्तं यदपि च परमं सर्वधाम्नां च धाम ।
चक्रं तच्चक्रपाणेर्दितिज-तनु-गलद्रक्तधाराक्तधारं
शश्वन्नो विश्ववन्द्यं वितरतु विपुलं शर्म घर्मांशुशोभम् ॥२॥

आचार्य या दुसऱ्या श्लोकानें श्रीहरीच्या हातांत असलेल्या सुदर्शन-चक्राची स्तुति करीत आहेत. "चक्रपाणेः घर्मांशुशोभं तत् चक्रं नः शश्वत् विपुलं शर्म वितरतु" श्रीहरीच्या हातांत सूर्याप्रमाणें शोभत असलेलें तें सुदर्शनचक्र आम्हांला निरंतर पूर्ण सुख देवो. असा या श्लोकाचा मुख्य

अन्वयार्थ आहे. आतां त्या सुदर्शनचक्राचें स्वरूप कसें आहे तें पहा. लव, क्षण, निमेष, दिन, पक्ष, मास, ऋतु, अयन आणि वर्ष इत्यादि रूपांनीं हा जो काळ जगाला आत्मसात् करीत चालला आहे तो सर्व या श्रीहरीच्या सुदर्शनचक्राचेंच स्वरूप होय. याप्रमाणें विद्वान् लोक त्याचें वर्णन करतात. हें सुदर्शनचक्र अंधकाराचा (व अज्ञानरूपी तिमिराचाहि) खात्रीनें नाश करणारें आहे. त्याचप्रमाणें जें सर्व तेजाचें तेज म्हणून समजलें जातें तेंच हें सुदर्शनचक्र होय. तें अत्यंत श्रेष्ठ आहे. या सुदर्शनचक्राच्या धारा दैत्यांच्या देहांतून गळणाऱ्या रक्तानें माखलेल्या आहेत. तसेंच हें सुदर्शनचक्र 'विश्ववंद्य' म्हणजे सर्व जगानें वंदन करण्याला योग्य आहे. या सुदर्शन चक्राची शोभा सूर्याप्रमाणें दिसत आहे. सूर्य जसा सर्व पदार्थांना प्रकाशित करतो त्याचप्रमाणें श्रीहरीचें सुदर्शनचक्रहि सर्वप्रकाशक आहे. अथवा शोभा शब्दाचा भक्ताविषयीं असलेली प्रसन्नावस्था असाहि अर्थ करावा. सुदर्शनचक्र हें कितीहि तेजस्वी असलें तरी तें भक्तजनांना प्रसन्न व आह्लाददायकच वाटतें. आपल्या असह्य तेजानेंहि भक्तजनांवर अनुग्रह करण्याचेंच तें कार्य करीत असतें. जिज्ञासूजनांनीं भागवतांतील नवमस्कन्धांतले चौथा व पांचवा हे दोन अध्याय अवश्य पहावेत. अम्बरीष राजानें सुदर्शनचक्राचें केलेलें स्तवन आणि सुदर्शनचक्रानें अंबरीष राजावर केलेला अनुग्रह वाचनीय आहे.

सुदर्शनचक्र हें श्रीहरीचें मनस्तत्त्व म्हणजे मनच होय. "चक्रस्वरूपं च मनो विष्णुर्धत्ते करे स्थितम्" श्रीहरीनें हातांत धारण केलेलें सुदर्शनचक्र हें श्रीहरीचें चक्रस्वरूपी मनच होय. "तेजस्तत्त्वं सुदर्शनम्" श्रीमद्भागवतामध्यें सुदर्शनचक्र हें तेजस्तत्त्वस्वरूप असल्याचें सांगितलें आहे. अंबरीष राजानें तर या सुदर्शनचक्राचें स्तवन करतांना "त्वं धर्मस्त्वमृतं सत्यं त्वं यज्ञोऽखिलयज्ञ-भुक्। त्वं लोकपालः सर्वात्मा त्वं तेजो पौरुषं परम्" भागवत, ९।५।१५. हे सुदर्शना! तूंच धर्म म्हणजे सर्व विश्वाची धारणा करणारा आहेस. सर्व प्रकारचें सत्य हें तुझेंच स्वरूप आहे. यज्ञ आणि यज्ञभोक्ताहि पण तूंच आहेस. तूं सर्व लोकांचा पालनकर्ता आहेस. तूं सर्वात्मा – सर्वस्वरूप आहेस. आदिनारायणाचें दिव्य तेज तूंच आहेस. तात्पर्य, सुदर्शनचक्र हे श्रीहरिस्वरूपच आहे. "भगवतः शोभनं दर्शनम्" अर्थात् 'तदैक्षत' इत्यादि श्रुतीनें वर्णन केलेलें परमेश्वराचें ईक्षण, परमेश्वराचा संकल्प हेंच सुदर्शनचक्राचें स्वरूप होय. संकल्प हेंच मनाचें

स्वरूप असल्यामुळें सुदर्शनचक्राचें स्वरूप हें श्रीहरीचें मनच होय असें जें म्हटलें आहे तें अगदीं योग्यच आहे. तात्पर्य, आपलें मन शुद्ध, प्रसन्न होण्याकरितां मनस्तत्त्वस्वरूप असलेल्या सुदर्शनचक्राची उपासना करणें इष्टच आहे. म्हणून आचार्य म्हणतात, विश्ववन्द्य असलेलें हें सुदर्शनचक्र आम्हांला पूर्ण सुखी करो.

सुदर्शनचक्राच्या आरा ह्या दुष्ट दैत्यांच्या रक्तानें माखलेल्या आहेत ह्या वर्णनांत हें सुदर्शनचक्र विजयी असल्याचें पर्यायानें सांगितल्यामुळें येथें पर्यायोक्ति अलंकार प्रतीतीस येतो. पूर्वार्धांत स्वभावोक्ति आणि 'घर्मांशुशोभम्' या पदानें उपमाहि सूचित होत आहे.

अव्यान्निर्वातघोरो हरिभुजपवनामर्शनाध्मातमूर्ते-
रस्मान्विस्मेरनेत्र-त्रिदश-नुति-वचःसाधुकारैः सुतारः ।
सर्वं संहर्तुमिच्छोररि-कुल-भुवनं स्फार-विस्फार-नादः
संयत्कल्पान्तसिन्धौ शर-सलिल-घटा-वार्मुचः कार्मुकस्य ॥ ३ ॥

पहिल्या आणि दुसऱ्या श्लोकांत श्रीहरीचे शंख आणि चक्र हे अहंकार-स्वरूप आणि मनःस्वरूप आहेत अशा भावनेनें त्यांची उपासना करावी असें सांगितलें. आतां या तिसऱ्या श्लोकानें श्रीहरीच्या शार्ङ्ग धनुष्याची – तेंहि पण श्रीहरीच्या एक प्रकारच्या अहंकाराचेंच स्वरूप आहे अशा भावनेनें त्याचीहि उपासना करावी या हेतूनें आचार्य भगवान् श्रीविष्णु यांच्या शार्ङ्ग धनुष्याचें वर्णन करीत आहेत. कर्मेन्द्रियें, ज्ञानेन्द्रियें आणि मन यांना जन्म देणारा इन्द्रियादि अहंकार हाच शार्ङ्ग धनुष्य या रूपानें नटलेला आहे. 'अशी जर भावना केली तर उपासकाचीं इंद्रियें सुदृढ आणि प्रसन्न होतील. उपासक आणि तत्त्वजिज्ञासु यांना इंद्रियांची दृढता आणि प्रसन्नता अपेक्षित असतेच. त्याशिवाय उपासना अथवा तत्त्वविचार होऊं शकत नाहीं.

श्रीहरीच्या हातांत शृंगाचें धनुष्य आहे म्हणून श्रीहरीला शार्ङ्गपाणि किंवा शार्ङ्गधर असें म्हणतात. शारंगपाणी शारंगधर हे याच शब्दांचे अपभ्रंश आहेत. "श्रीहरेः कार्मुकस्य स्फारविस्फारनादः अस्मान् अव्यात्" श्रीहरीच्या शार्ङ्ग धनुष्याचा प्रचंड टणत्कार आमचें सर्वकाळ रक्षण करो. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. आतां कसें आहे तें श्रीहरीचें शार्ङ्ग धनुष्य तें पहा : भगवान् श्रीविष्णु यांचे हात हाच कोणी वायु – वायूप्रमाणें पवित्र

आणि अप्रतिम सामर्थ्यानें संपन्न असल्यामुळें श्रीहरीच्या भुजांच्या ठिकाणीं वायूची कल्पना केली. तात्पर्य, श्रीहरीच्या हस्तरूपी वायूचा स्पर्श झाल्यामुळें ज्याचें स्वरूप – आकार प्रफुल्लित झालेला दिसत आहे. श्रीहरीच्या हातामुळें धनुष्य आकाशांत विस्तारणें, त्याला दोरी बांधणें (टणत्कार करणें), कानांपर्यंत दोरी खेचून धनुष्याला लवविणें, बाण जोडणें व सोडणें इत्यादि सर्व क्रिया घडत असतात. श्रीहरीच्या हस्तस्पर्शानेंच या सर्व गोष्टी घडत असल्यामुळें शार्ङ्गधनुष्याला 'हरिभुजपवनामर्शनाध्मातमूर्ति' असें विशेषण दिलेलें आहे.

सर्व शत्रुसमूहांचा व शत्रूंच्या स्थानांचा समूळ नायनाट करण्याची जेव्हां या शार्ङ्ग धनुष्याला इच्छा होते अर्थात् भगवान् श्रीविष्णु जेव्हां दुष्ट दैत्यांचा समूळ उच्छेद करण्याचा संकल्प करतात तेव्हां या धनुष्याच्या दोरीचा टणत्कार फारच मोठ्यानें होऊं लागतो. देवदानवांचें 'संयत्' म्हणजे युद्ध, तें युद्ध सुरू झालें कीं जणुं कांहीं 'कल्पान्त' म्हणजे प्रलयकाळ ओढवला असें वाटतें. दैत्यदानवांच्या रक्ताचा 'सिन्धु' म्हणजे महासागर निर्माण करण्यांत तें धनुष्य मोठें कुशल आहे. अथवा 'संयत्कल्पान्तसिन्धु' म्हणजे युद्धप्रसंगीं समरभूमीवर प्रलयकाळाप्रमाणें निर्माण झालेला शत्रुसैन्यरूपी महासागर, या महासागरांत अविच्छिन्न बाणांचा पाऊस पाडणारा प्रलयकालीन मेघासारखा – हें शार्ङ्ग धनुष्य – हा एक मेघच आहे असें वाटतें. 'शर-सलिल-घटा-वार्मुक्' शर म्हणजे बाण, सलिल म्हणजे जलधारा आणि घटा म्हणजे अविच्छिन्न वृष्टि. अर्थात् बाणरूपी जलधारांची अविच्छिन्न वृष्टि करणारा 'वार्मुक्' म्हणजे ढग. प्रलयकाळीं सांवर्तक मेघाच्या जलधारा जशा सागरांत प्रवेश करतात त्याचप्रमाणें श्रीहरीच्या शार्ङ्ग धनुष्यांतून सुटणारे बाण दुष्ट दैत्यांच्या व राक्षसांच्या सैन्यसमूहांत प्रवेश करून त्याला रक्ताच्या सागराचें भीषण स्वरूप आणतात. असें हें धनुष्य प्रलयकाळच्या मेघाप्रमाणें मोठें भयंकर आहे, असा याचा गर्भितार्थ समजावा.

श्रीहरीच्या अशा या धनुष्याचा 'स्फारविस्फार-नाद' म्हणजे अतिशय जोरांत होणारा टणत्कार, अर्थात् धनुष्याच्या दोरीचें आस्फालन करीत असतांना होणारा आवाज. हा आवाज इतका भयंकर असतो कीं, त्याच्या भयंकरपणाला प्रचंड वादळाचीच उपमा देणें शोभेल म्हणून आचार्यांनीं त्याला 'निर्घातघोरः' असें विशेषण दिलेलें आहे. निर्घात म्हणजे तुफानी वादळ. अंतरिक्षांत वाऱ्यांचें द्वन्द्व सुरू होऊन ते वारे एकमेकांच्या आघातानें खालीं पडतात. पृथ्वीवर खेचले

जातात आणि मग ते जोरानें शब्द करीत पृथ्वीवर वाहूं लागतात. यालाच आपण वादळ म्हणतों. याला संस्कृतमध्यें 'निर्घात' म्हणतात. " वातपातस्तु निर्घातः " " पवनः पवनाभिहतो गगनादवनीं यदा समापतति। भवति तदा निर्घातः ॥ " अशी निर्घाताची वराहमिहिरानें व्याख्या केलेली आहे. हा निर्घात अत्यंत घोर म्हणजे भयंकर असतो. वीज पडतांना ढगांचा जो प्रचंड गडगडाट होतो त्यालाहि 'निर्घात' असें म्हणतात. तोहि मोठा भयंकर असतो. 'निर्घात' शब्दाचा अर्थ भूकंप असाहि आहे. धरणीकंपाच्या वेळींहि एक प्रकारचा भयप्रद आवाज होतच असतो. तात्पर्य, भगवान् श्रीविष्णु यांच्या शार्ङ्ग धनुष्याचाहि आवाज मोठा घोर म्हणजे भयंकर क्रूर आहे. तो दुष्ट दैत्यांना भयंकर आणि क्रूर असला तरी भक्तजनांना मात्र अभय देणारा आहे म्हणूनच इंद्रादि देव त्याचा जयजयकार करतात.

" विस्मेर-नेत्र-त्रिदश-नुति-वचःसाधु-कारैः सुतारः " याचा अर्थ असा :— भगवान् श्रीविष्णु यांच्या शार्ङ्ग धनुष्याचा प्रभाव पाहून इंद्रादि देवांचेंहि नेत्र आश्चर्यानें चकित होतात. 'त्रिदश' म्हणजे देव. दहा दहा वर्षांचा एक वर्ग कल्पिल्यास देव हे नेहमीं तिसऱ्या दशकांत (त्रि + दश) म्हणजे पंचविशींत असल्यासारखे दिसतात म्हणून देवांना त्रिदश म्हणतात. अथवा बाल्य, वार्धक्य आणि तारुण्य यांपैकीं तिसरी म्हणजे तारुण्यदशा हीच नेहमीं देवांची असते म्हणूनहि देवांना 'त्रिदश' असें म्हणतात. तात्पर्य, ज्यांचे नेत्र आश्चर्यानें चकित झालेले आहेत असे इंद्र, चंद्र, वरुण, कुबेर, अग्नि आणि सूर्य इत्यादि सर्व देव महाविष्णूची व त्यांच्या शार्ङ्ग धनुष्याची स्तुति करतात. 'नुति' म्हणजे स्तुति स्तवन. श्रीहरीची व त्यांच्या धनुष्याची स्तुति करतांना असंख्य देवांच्या मुखांतून बाहेर पडणारे 'साधुकार' म्हणजे जयजयकारयुक्त धन्यवादाचे शब्द. या शब्दांनीं शार्ङ्ग धनुष्याचा नाद अधिक दुणावतो व अत्यंत उंच स्वरांत ऐकूं येतो. अत्यंत उच्च ध्वनीला 'सु-तार' असें म्हणतात. गायनामध्यें स्वरांच्या मधल्या सप्तकाला ओलांडलें कीं, पुढच्या सप्तकाला तार-सप्तक असें म्हणतात. असा हा श्रीहरीच्या धनुष्याचा तारसप्तकांतील नाद आम्हां सर्वांचें रक्षण करो. आमच्या सर्व इंद्रियांना बलसंपन्न करो, असा एकंदर या श्लोकाचा अर्थ आहे. या श्लोकांत अनेक उपमा असून अद्भुत वीर आणि भयानक या रसांचाहि आविष्कार झालेला आहे.

जीमूत-श्यामभासा मुहुरपि भगवद्बाहुना मोहयन्ती
युद्धेषूद्धूयमाना झटिति तडिदिवाऽऽलक्ष्यते यस्य मूर्तिः ।
सोऽसिस्त्रासाकुलाक्ष-त्रिदश-रिपु-वपुःशोणितास्वादतृप्तो
नित्यानन्दाय भूयान्मधुमथनमनोनन्दनो नन्दको नः ॥ ४ ॥

आचार्य या चौथ्या श्लोकानें श्रीहरीच्या हातांत असलेल्या खड्गाचें – तलवारीचें वर्णन करीत आहेत. भगवान् श्रीविष्णु यांच्या हातांतील खड्गाचें नन्दक असें नांव आहे. " मधुमथनमनोनन्दनः नन्दकः नः नित्यानन्दाय भूयात् " मधुदैत्याचा नाश करणाऱ्या भगवान् श्रीविष्णु यांच्या मनाला आनंद देणारा नंदक नांवाचा खड्ग आमच्या नित्य आनंदाला कारणीभूत होवो. श्रीविष्णूच्या नंदक खड्गापासून आम्हांला नित्यानंदाचा लाभ होवो. असा या मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. कसा आहे हा श्रीहरीचा नंदक नांवाचा खड्ग ? तें पहा : ज्याची मूर्ति म्हणजे आकार मेघमंडलाप्रमाणें असलेल्या आपल्या श्यामल कांतीनें आणि त्यांतच पुन्हां श्रीहरीच्या हाताचा संपर्क आल्यामुळें अधिकच मोहक झालेल्या नीलवर्णानें पहाणाऱ्यांच्या मनाला मोह निर्माण करीत आहे. तात्पर्य, श्रीहरीच्या हातांतील खड्गाकडे पुनः पुन्हां पहावेंसें वाटतें असा तो खड्ग मोठा मोहक आहे.

युद्धामध्यें भगवान् श्रीविष्णु हे आपल्या खड्गाला जोरांत भराभर फिरवूं लागले म्हणजे तो खड्ग आपल्या तेजानें विद्युल्लतेप्रमाणें दिसूं लागतो. तो खड्ग भयानें ज्यांचे नेत्र व्याकुळ झालेले आहेत अशा, देवांचे शत्रु असलेल्या दुष्ट दैत्यांच्या आणि राक्षसांच्या शरीरांतील रक्ताचा आस्वाद घेऊन तृप्त झालेला आहे. असा हा श्रीहरीचा खड्ग आम्हांला सच्चिदानंदस्वरूप असलेल्या परिपूर्ण परब्रह्माचा – नित्यानंदाचा लाभ करून देण्यास कारणीभूत होवो. या श्लोकाच्या पूर्वार्धांत उपमा आणि उत्प्रेक्षा हे अलंकार लक्षांत घेण्यासारखे असून, उत्तरार्धांतील वीर आणि भयानक रसहि मनाला चकित करणारे आहेत.

श्रीहरीच्या खड्गाचें ध्यान अथवा चिंतन करतांना श्रीहरीचें खड्ग निरभ्र आकाशासारखें अत्यंत निर्मल असून तें आकाशतत्त्वस्वरूपच आहे अशा भावनेनें त्याच्याकडे पहावें. " यादृशी भावना कुर्यात् सिद्धिर्भवति तादृशी " या न्यायानें भक्ताचें अंतःकरणहि आकाशाप्रमाणें निर्मल आणि विशाल होईल.

श्रीहरीच्या खड्गाची म्यान ही तमोमय म्हणजे अज्ञानस्वरूप आहे. " नभोनिभं नभस्तत्त्वमसिं चर्म तमोमयम् " असें श्रीमद्भागवतांत वर्णन केलेलें आहे (भागवत, १२।११।१५.). भगवान् श्रीहरि कार्यपरत्वें स्वेच्छेनेंच अज्ञानरूपी आच्छादन बाजूला करून ज्ञानरूपी निर्मल खड्ग प्रकट करतात. या ज्ञानानेंच भक्तांच्या अन्तःकरणांतील सर्व संशयग्रंथींचा उच्छेद होत असतो. याच अभिप्रायानें आचार्यांनीं अविद्यारूपी कोशानें आच्छादित असलेल्या विशुद्ध अद्वैत ज्ञानस्वरूपी श्रीहरीच्या खड्गाची स्तुति केली आहे. " विभर्ति यच्चासिरत्नमच्युतोऽत्यन्तनिर्मलम् । विद्यामयं तु तज्ज्ञानमविद्याचर्मसंस्थितम् ॥ " श्रीहरीनें आपल्या हातांत अविद्यारूपी चर्मानें अर्थात् म्यान अथवा कोश याच्या योगानें झांकलेलें असें जें अत्युत्तम खड्ग धारण केलेलें आहे तें अत्यंत निर्मल ज्ञानस्वरूप विद्यातत्त्वच आहे अशी भावना करावी असें विष्णुपुराणांत सांगितलेलें आहे.

कञ्चाकारा मुरारेः करकमल-तलेनानुरागाद् गृहीता
सम्यग्वृत्ता स्थिताग्रे सपदि न सहते दर्शनं या परेषाम् ।
राजन्ती दैत्य-जीवासव-मद-मुदिता लोहितालेपनार्द्रा
कामं दीप्तांशुकान्ता प्रदिशतु दयितेवास्य कौमोदकी नः ॥ ५ ॥

भगवान् श्रीशंकराचार्य या पांचव्या श्लोकानें श्रीहरीच्या हातांत असलेल्या गदेची स्तुति करीत आहेत. भगवान् श्रीविष्णु यांच्या गदेचें नांव कौमोदकी असें आहे. 'कु' म्हणजे पृथ्वी तिला 'मोदक' म्हणजे आनंदविणारा तिचा पति भगवान् श्रीविष्णु म्हणून विष्णूला 'कुमोदक' असें म्हणतात. कुमोदकानें अर्थात् श्रीविष्णूनें धारण केलेली व त्याला अत्यंत प्रिय असलेली जी गदा तिला कौमोदकी असें नांव पडलें. श्रीहरीच्या हातांत असलेली गदा ही मुख्य तत्त्व म्हणजे प्राणस्वरूप आहे. आपल्या देहांतहि प्राणालाच मुख्यत्व आहे. प्राण आहे तर सर्व कांहीं आहे. प्राण गेला कीं देह काष्ठपाषाणासारखा अचेतन होतो ! " प्राणो वै मुख्यः " याप्रमाणें वेदहि प्राणाचें मुख्यत्व वर्णन करीत आहेत. या भावनेनें श्रीहरीच्या गदेचें चिंतन केलें तर भक्ताला ओजस्विता, सहिष्णुता आणि शक्ति यांचा लाभ होतो. " ओजः सहोबलयुतं मुख्यत्त्वं गदां दधत् " ओज म्हणजे तेज, सहस् म्हणजे उत्साहशक्ति आणि बल म्हणजे सामर्थ्य या गुणांनीं संपन्न असलेल्या ' मुख्य तत्त्वरूपी ' गदेला श्रीहरीनें भक्तजनांच्या

कल्याणासाठीं आपल्या हातांत धारण केलेलें आहे. श्रीहरीची गदा ही बुद्धि-तत्त्वस्वरूप आहे असेंहि दुसरीकडे वर्णन केलेलें आहे. " बुद्धिरस्यास्ते गदारूपेण माधवम् " श्रीहरीच्या गदेचें बुद्धितत्त्वरूपानें चिंतन केल्यास भक्ताला शुद्ध निर्मल बुद्धीचा लाभ होतो. या जगांत उत्तम बुद्धीच्या लाभापेक्षां श्रेष्ठ असा दुसरा कोणताहि लाभ असूं शकत नाहीं. " सर्वेषामेव लाभानां प्रज्ञालाभः परः स्मृतः " " शुद्ध हि बुद्धिः किल कामधेनुः " विशुद्ध बुद्धि ही कामधेनूच आहे. शुद्ध बुद्धीनेंच अध्यात्मविद्येचा लाभ होऊन मानवाला नित्य आणि निरतिशय आनंदाची प्राप्ति होत असते.

" दयिता इव अस्य कौमोदकी नः कामं प्रदिशतु " दयितेप्रमाणें अत्यंत प्रिय असलेली श्रीहरीची ही कौमोदकी गदा आमचे सकल मनोरथ पूर्ण करो. असा या श्लोकांतील मुख्य अन्वय व त्याचा अर्थ आहे. कशी आहे परमेश्वराची ही कौमोदकी गदा तें पहा : मुरदैत्याचा वध करणाऱ्या भगवान् श्रीविष्णु यांच्या गदेचा आकार मोठा 'कम्र' म्हणजे सुंदर आहे. कमलाप्रमाणें कोमल असलेल्या आपल्या करतलानें श्रीहरीनें तिला मोठ्या प्रेमानें धारण केलेलें आहे. ती अग्रभागीं अत्यंत उत्तम वर्तुलाकार आहे. शत्रूंनीं युद्ध करण्याच्या बुद्धीनें अवलोकन केलेलें तिला मुळींच सहन होत नाहीं. युद्ध करण्याच्या विचारानें दैत्यांनीं निरीक्षण करण्यापूर्वीच त्यांचा ती नाश करून टाकते ! दुष्ट दैत्य आणि राक्षस यांच्या जीवरूपी मद्याचें प्राशन करून ती अत्यंत उल्लसित आणि संतुष्ट झालेली दिसत आहे. ती रक्तानें माखलेली आणि ओली आहे. 'राजन्ती' म्हणजे आपल्या तेजानें झळकणारी. त्याचप्रमाणें 'दीप्तांशुकान्ता' म्हणजे सूर्यासारखी तेजस्वी पण मनोहर – रमणीय अथवा देदीप्यमान किरणांनीं सुंदर दिसणारी. अशी ही श्रीहरीची कौमोदकी गदा आमचे सकल मनोरथ पूर्ण करो. कामशब्दाचा अर्थ मनोरथ असा आहे. प्रकृत स्थलीं जीवात्म्याचें परब्रह्म-स्वरूपाशीं ऐक्य होणें हाच मनोरथ आचार्यांना विवक्षित आहे. इतर सर्व सुखें नाशिवंत असल्यामुळें त्यांची कामना कोण करणार ?

या श्लोकांत आचार्यांनीं गदेला दयितेची उपमा दिलेली आहे. दयिता म्हणजे प्रियतमा, कान्ता. अर्थात् या ठिकाणीं लक्ष्मी असा त्याचा अर्थ होतो. या ठिकाणीं गदेला दिलेलीं सर्व विशेषणें लक्ष्मीलाहि लागू पडतील अशा खुबीनें दिलेलीं आहेत. युद्धप्रसंगीं शत्रूंचें निर्दलन करण्याच्या बाबतींत गदा ही मना-

सारखें काम करते म्हणून श्रीहरीचा तिच्यावर 'अनुराग' म्हणजे स्नेह आहे तर लक्ष्मी ही अनन्यचित्तानें श्रीहरीची भक्तिपूर्वक सेवा करते म्हणून तिच्यावर श्रीहरीचा 'अनुराग' म्हणजे निरतिशय प्रेम आहे. 'गृहीता' श्रीहरीनें गदा ही हातांत धारण केलेली आहे, तर लक्ष्मी ही पाणिग्रहण करून परिणिलेली आहे. गदा ही 'सम्यग्वृत्ता' म्हणजे उत्तम वर्तुलाकार आहे तर लक्ष्मी ही उत्तम आचारसंपन्न आहे. वृत्त म्हणजे वर्तन, आचार. 'अग्रे स्थिता' गदा ही युद्धाच्या हेतूनें पुढें केलेली आहे तर लक्ष्मी ही 'मला आज्ञा करावी, मी आपली कोणती सेवा करूं ? असें म्हणत हात जोडून पुढें उभी आहे. 'पर' म्हणजे शत्रु. गदेला शत्रूचें दर्शन सहन होत नाही तर लक्ष्मीला 'पर' म्हणजे परकीय पुरुष अन्य पुरुष त्याचें दर्शन सहन होत नाहीं. गदेच्या बाजूनें 'दैत्यजीवासव' म्हणजे दैत्यांचे प्राण-रूपी मद्य, त्याचें प्राशन करणारी असा अर्थ होतो तर लक्ष्मीच्या बाजूनें, दैत्यांना प्राणाप्रमाणें प्रिय असलेल्या आसवाचें – अमृताचें प्राशन करणारी असा अर्थ होतो. 'लोहित' शब्दाचे अर्थ रक्त, केशर, रक्तचंदन, पीतचंदन इत्यादि अनेक आहेत. गदा ही रक्तानें माखलेली आहे तर श्रीलक्ष्मी विष्णुदयिता हिने आपल्या अंगाला केशर-चंदनाची उटी लावलेली आहे असा 'लोहितालेपनार्द्रा' या शब्दाचा अर्थ होतो. 'दीप्तांशुकांता' या विशेषणाचा गदेच्या बाजूनें अर्थ करतांना उज्ज्वल किरणांनीं सुंदर दिसणारी असा अर्थ होतो तर लक्ष्मीच्या बाजूनें अर्थ करतांना दीप्त+अंशुक+अंत असे शब्द तोडून जिच्या अंशुकाचा म्हणजे रेशमी जरतारी शालूचा 'अंत' म्हणजे कांठ आणि पदर हा 'दीप्त' म्हणजे हंस, मोर इत्यादि चित्रें आणि विविध वेलबुट्टी यांनीं उज्ज्वल देदीप्यमान दिसत आहे अशी श्रीलक्ष्मी, असा अर्थ करतात. 'दयिता' या शब्दाचे अर्थ अत्यंत आवडती आणि पत्नी असे दोन्ही आहेत. गदेच्या बाजूनें अर्थ करतांना अत्यंत प्रिय असा अर्थ घ्यावा, तर लक्ष्मीच्या बाजूनें ती भगवान् श्रीविष्णु यांची पत्नीच आहे ! जशा रीतीनें या श्लोकांत श्लेष अथवा श्लेषानुगृहीत उत्प्रेक्षा आणि उपमा इत्यादि अलंकार दृष्टीस पडतात. तात्पर्य, लक्ष्मीप्रमाणें श्रीहरीला प्रिय असलेल्या कौमोदकी गदेला आमचा भक्तिपूर्वक नमस्कार असो. ती आमचे सकल मनोरथ पूर्ण करो.

यो विश्वप्राणभूतस्तनुरपि च हरेर्यान-केतुस्वरूपो
यं संचिन्त्यैव सद्यः स्वयमुरगवधू-वर्ग-गर्भाः पतन्ति ।

चञ्चत्-चण्डोरु-तुण्ड-त्रुटित-फणि-वसा-रक्त-पङ्काङ्कितास्यं
वन्दे छन्दोमयं तं खगपतिममल-स्वर्णवर्णं सुपर्णम् ॥ ६ ॥

आचार्य या सहाव्या श्लोकानें श्रीहरीच्या गरुडाचें वर्णन करून त्याला वंदन करीत आहेत. भगवान् श्रीविष्णु यांचें वाहन असलेला गरुड हा साक्षात् भगवत्स्वरूपच आहे. सर्व विश्वाचा आधार असलेल्या भगवंताचा, भगवंताशिवाय दुसरा कोण आधार होऊं शकेल? "स्वे महिम्नि प्रतिष्ठितः" तो परमात्मा स्वस्वरूपांतच प्रतिष्ठित आहे असें उपनिषदांनीं त्याचें वर्णन केलेलें आहे. "वैनतेयश्च पक्षिणाम्" सर्व पक्ष्यांमध्यें श्रेष्ठ असलेला गरुड तो मीच आहें असें श्रीकृष्णांनींहि गीतेंत म्हटलेलें आहे. "त्रिवृद् वेदः सुपर्णाख्यो यज्ञं वहति पुरुषम्" (भागवत, १२।११।१९). सुपर्ण म्हणजे गरुड. ऋग्यजुःसामरूप मूर्तिमंत वेदच गरुडाच्या रूपानें श्रीविष्णूला आपल्या पाठीवर वाहत आहे. वेदानेंच श्रीहरीच्या स्वरूपाचा बोध होत असतो. संतांनीं वेदांचाच अनुवाद केलेला असल्यामुळें संतवाङ्मयानें श्रीहरीच्या स्वरूपाचा साक्षात्कार झाला तरी या विधानाला बाध येत नाहीं. "तं त्वौपनिषदं पुरुषं पृच्छामि" या उपनिषद्वाक्यांत श्रीहरीला जें 'औपनिषद' असें विशेषण दिलेलें आहे तें याच अभिप्रायानें होय. "सुपर्णोऽसि गरुत्मांस्त्रिवृत्ते शिरः" असें वेदांतहि गरुडाचें वर्णन केलेलें आहे. या बुद्धीनें गरुडाचें चिंतन केल्यास गरुडदेवाच्या कृपेनें बुद्धीमध्यें वेदप्रतिपाद्य परमात्मतत्त्वाचा आविष्कार होईल.

"अहं तं खगपतिं सुपर्णं वन्दे" सर्व पक्ष्यांचा राजा असलेल्या त्या श्रीहरीच्या गरुडाला मी वंदन करीत आहें. असा या श्लोकाचा मुख्य अन्वय आणि त्याचा अर्थ आहे. भगवान् श्रीविष्णु यांचा गरुड कसा आहे पहा. हा गरुड साऱ्या विश्वाचा मूर्तिमंत प्राणच आहे. "प्राणयति – जीवयति इति प्राणः" जीवनाची धारणा ज्याच्यामुळें होतें त्याला प्राण असें म्हणतात. प्राण शब्दाचा अर्थ परब्रह्म परमात्मा असा आहे. तो प्राणाचाहि प्राण आहे. गरुड हा भगवत्स्वरूप असल्यामुळें त्यालाहि येथें 'विश्वप्राण' असें म्हटलेलें आहे. सर्व विश्वाचा आधार असलेला जो परमात्मा त्यालाहि गरुडानें आधार दिलेला आहे. आपल्या पाठीवर धारण केलेलें आहे म्हणून गरुडाला विश्वप्राण म्हटलेलें आहे. "धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा" धर्म हा सर्व विश्वाचा आधार आहे. तो सर्व विश्वाची धारणा करणारा आहे. त्या धर्माचाहि आधार वेद आहे.

"वेदोऽखिलो धर्ममूलम्" वेद हा सर्व धर्मांचा आधार आहे असें स्मृति सांगते. अशा रीतीनें वेद हेच सर्वाधार ठरतात. भगवान् श्रीविष्णु यांचें वाहन असलेला गरुड हा वेदस्वरूप आहे याहि अभिप्रायानें गरुडाला 'विश्वप्राण' म्हणणें योग्यच आहे. 'तनु' म्हणजे मूर्ति. हा गरुड श्रीहरीची प्रत्यक्ष मूर्तिच आहे. श्रीहरीचें तो 'यान' म्हणजे वाहन असून 'केतु' म्हणजे ध्वज-स्वरूपहि आहे. म्हणूनच श्रीहरीला 'गरुड-वाहन आणि गरुड-ध्वज' अशीं नांवें आहेत. श्रीहरीच्या ध्वजावरहि गरुडाचेंच चिन्ह आहे. गरुडाचा विचार मनांत आल्यावरोवर अथवा गरुडाचें स्मरण झाल्यावरोवर नागिणी घावरतात. त्यांच्या उदरांतील गर्भांचें पाणी पाणी होतें व ते गर्भ त्यांच्या उदरांतून आपोआप तत्काळ गळून पडतात!

घास गिळण्याकरितां प्रयत्नशील असल्यामुळें गरुडाची चोंच अत्यंत चंचल दिसत आहे. त्याचप्रमाणें ती अत्यंत तीक्ष्ण आणि भयंकर दिसत आहे. असल्या तीक्ष्ण चोंचीमुळें सर्पांच्या फणांचे तुकडे तुकडे होऊन त्या सर्पांच्या शरीरांतील वसा, रक्त आणि मांस यांच्या योगानें गरुडाचें तोंड अगदीं माखलेलें दिसत आहे. असा हा भगवान् श्रीविष्णु यांचा गरुड 'छन्दोमय' म्हणजे वेदस्वरूप आहे. याची कांति निर्मल — शुद्ध सोन्यासारखी देदीप्यमान असून तो सर्व पक्ष्यांचा राजा आहे. त्याचे पंख अत्यंत सुंदर असल्यामुळें त्याला 'सुपर्ण' असें म्हणतात. त्या सुपर्णाला — गरुड देवाला मी नमस्कार करतों. गरुड हा वेदस्वरूप असल्यामुळें त्यानें आमच्या बुद्धींत वेदांनीं वर्णिलेल्या परब्रह्मस्वरूपाचा आविष्कार करावा अशी या स्तुतींत गर्भित प्रार्थना आहे. हा श्लोक सूक्ष्मार्थांचें प्रकाशन करीत असल्यामुळें यांत साहित्यशास्त्रदृष्ट्या सूक्ष्मालंकार प्रतीत होत आहे. द्वितीय चरणांत अप्रस्तुत प्रशंसा असून तृतीय चरणांत पर्यायानें सर्पकुलाशीं गरुडाचें वैर प्रकट केल्यामुळें पर्यायालंकार साधला आहे. तृतीय चरणांत 'रौद्र' रसहि ध्वनित केला गेला आहे.

विष्णोर्विश्वेश्वरस्य प्रवरशयनकृत्सर्वलोकैकधर्ता
सोऽनन्तः सर्वभूतः पृथुविमलयशाः सर्ववेदैश्च वेद्यः।
पाता विश्वस्य शश्वत्सकलसुररिपु-ध्वंसनः पापहन्ता
सर्वज्ञः सर्वसाक्षी सकलविपभयात्पातु भोगीश्वरो नः ॥ ७ ॥

या सातव्या श्लोकांत आचार्य श्रीहरीच्या शय्यास्वरूपानें विराजमान असलेल्या शेषाचें स्तवन करीत आहेत. "भोगीश्वरः नः सकलविषभयात् पातु" सर्व नागांचा अधिपति असलेला भगवान् शेष हा आमचें सर्व विषांच्या भयापासून रक्षण करो, असा या श्लोकांतील मुख्य अन्वयार्थ आहे. भगवान् श्रीविष्णु यांची शय्या असलेला तो शेष कसा आहे पहा.: सर्व विश्वाचा सत्ताधारी आणि विश्वव्यापक असलेला असा जो भगवान् श्रीविष्णु, त्याला ज्यानें आपल्या शरीराची अत्युत्तम शय्या केलेली आहे. आपलें शरीरच त्यानें श्रीहरीचें उत्कृष्ट अंथरूण बनविलेलें आहे. 'शयन' शब्दाचा अर्थ शय्या आणि निद्रा असे दोन्ही आहेत. निद्रा असा अर्थ घेतल्यास शेष हा श्रीहरीला प्रशस्त सुखाची निद्रा प्राप्त करून देणारा आहे असा 'प्रवर-शयन-कृत्' या विशेषणाचा अर्थ समजावा. वस्तुतः श्रीहरीला निद्रा नाहीं. तो परमात्मा सदासर्वकाळ जागृतच आहे. तथापि निजस्वरूपानुसंधान हीच परमेश्वराची निद्रा होय. "एकार्णवे ततस्तस्मिन् शेषशय्यास्तृते प्रभुः। ब्रह्मरूपधरः शेते भगवानादिकृद्धरिः॥ आत्ममायामयीं दिव्यां योगनिद्रां समाश्रितः। आत्मानं वासुदेवाख्यं चिंतयन्परमेश्वरम्॥" प्रलयकाळीं जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें असतां त्या महासागरांत शेषरूपी शय्येवर आदिकर्ता भगवान् श्रीहरि स्वतःच्या मायारूपी दिव्य शक्तीचा आश्रय करून शयन करतात. त्यांच्या त्या निद्रेला 'योगनिद्रा' असें म्हणतात. निद्रा कसली ती? तें श्रीहरीचें स्वरूपानुसंधानच होय. "आपण विश्वव्यापी वासुदेव सच्चिदानंदघन परिपूर्ण परब्रह्मस्वरूप परमात्मा आहों" असेंच त्यांचें त्या काळीं चिंतन चाललेलें असतें असें विष्णुपुराणांत वर्णन केलेलें आहे.

यावर कोणी कदाचित् अशी शंका घेईल कीं, श्रीहरीला स्वरूपानुसंधान करण्याची काय आवश्यकता आहे? पण ही शंका घेणें बरोबर नाहीं. कारण यांत लोकशिक्षण हाच परमेश्वराचा हेतु आहे. "नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि" मला कांहीं मिळवावयाचें आहे अशांतला भाग नाहीं, पण मी योग्य तीं कामें करीतच असतों. कारण लोकांनीं माझ्या मार्गाचें अनुसरण करावें. "मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः" हाच माझा हेतु आहे. यावर कोणी असें विचारील कीं, अहो! तो प्रलयाचा काल असल्यामुळें त्या वेळेला लोक आहेत कोठें? यावर उत्तर असें कीं, श्रीहरीचा हेतु हा वेदशास्त्रांनीं प्रकट करावयाचा असतो व सृष्टिकालीं लोकांनीं त्याप्रमाणें वागावयाचें असतें.

"सर्वलोकैकधर्ता" तो शेष सर्व लोकांचा, चौदा भुवनें असलेल्या या अखिल ब्रह्मांडाचा एकच एक मुख्य आधार आहे. सर्व विश्वाचा आधार असलेल्या प्रत्यक्ष परमेश्वरालाच ज्यानें आधार दिला आहे त्याचें सर्व लोक धारण करण्याचें सामर्थ्य हें कैमुतिकन्यायानेंच सिद्ध होत आहे. हें भूमंडल तर त्याच्या मस्तकावर मोहरी धारण केल्याप्रमाणें दिसत आहे. विश्वेश्वराचें शयन होऊन रहाणें आणि सर्व लोकांचें धारण करणें हीं दोन्हीं कार्यें एकाच वेळेला होत असल्यामुळें शेषाला त्यांत कांहीं आयास वाटत नाहींत ही गोष्ट आचार्यांनीं मोठ्या खुबीनें ध्वनित केली आहे. "सोऽनन्तः" अंत म्हणजे परिच्छेद – परिमितपणा तो ज्याला नाहीं त्याला अनंत म्हणतात. श्रीहरीची शय्या असलेला शेष हा श्रीहरीप्रमाणेंच अनंत म्हणजे त्रिविध परिच्छेदशून्य आहे. (सु. स्तो. सं. भाग १ ला पान १९८ पहा) श्रीहरीच्या शेषाचें नांवहि पण 'अनंत'च आहे "अनंतश्चाऽस्मि नागानाम्" असें गीतेंत श्रीहरीनें म्हटलेलें आहे. नागांमध्यें सर्वश्रेष्ठ असलेला अनंत हें माझेंच रूप होय. श्रीहरि आणि त्यांचा शेष हे दोघेहि नांवानें आणि स्वरूपानें अनंतच आहेत. याच कारणामुळें आचार्यांनीं शेषाला "सर्वभूतः" असें म्हटलेलें आहे. स्वतः अपरिच्छिन्न-अपरिमित असूनहि परिच्छिन्न-परिमित विश्वरूपानें तोच नटलेला आहे. स्वरूपसाक्षात्कारानें अज्ञानाचा, मायेचा निरास झाला कीं नामरूपात्मक विश्वाची कल्पना मावळते व शेवटीं अधिष्ठानरूपानें तोच शिल्लक रहातो म्हणूनच त्याला 'शेष' असें म्हणतात.

"पृथुविमलयशाः" त्याची कीर्ति अत्यंत विशाल आणि निर्मल आहे. तसेंच सर्व वेदांच्या साहाय्यानेंच तो वेद्य म्हणजे जाणण्यास योग्य आहे. वेदांचें साहाय्य घेतल्यावांचून त्याच्या यथार्थ स्वरूपाचें आकलन होत नाहीं असा याचा अर्थ समजावा. तो शेष सर्व विश्वाचा 'पाता' म्हणजे संरक्षण करणारा आहे. "शश्वत् सकल-सुर-रिपु-ध्वंसन" म्हणजे निरंतर सर्व देवांच्या शत्रूंचा अर्थात् दुष्ट दैत्य-दानवांचा तो नाश करीत असतो. तो भक्तजनांच्या सर्व पापांचा निरास करणारा आहे. तो सर्व कांहीं जाणतो म्हणूनच त्याला "सर्वज्ञ" आणि "सर्वसाक्षी" असें म्हणतात. सर्वज्ञ म्हणजे सामान्य रूपानें सर्व जाणणारा व सर्वसाक्षी म्हणजे विशेष रूपानें सर्व जाणणारा. असा हा 'भोगीश्वर' म्हणजे सर्व नागांचा अधिपति. भोगी शब्दाचा अर्थ सर्व सुखें भोगणारा असाहि आहे. शेष हा नित्य निरतिशय आनंदाचा अनुभव घेणारा आणि परिपूर्ण परब्रह्मस्वरूप

ल्यामुळें त्याला अशाहि अभिप्रायानें भोगीश्वर म्हटलेलें आहे. असा हा वेष्णूचें शयन असलेला शेष आमचें सर्व विषांच्या भयापासून रक्षण करो. उपसर्गपूर्वक 'षो' धातूचा अर्थ नाश करणें असा आहे. याच धातूपासून ष' शब्द निष्पन्न होतो. कालकूट हालाहल इत्यादि स्थावर विषें आणि सर्प, वू इत्यादिकांचीं जंगम विषें हीं तर जीवांचा नाश करतातच, पण जन्मोजन्मीं वाचा नाश करणारें 'अज्ञान' हें अति भयंकर विष आहे. श्रीहरीचा शेष हा ब्रह्मस्वरूप असल्यामुळें इतर विषांचाच काय, पण अज्ञानाचाहि समूळ नाश न भक्तजनांचें तो संसारभयापासून रक्षण करतो. याच अभिप्रायानें आपणहि शेषाचें चिंतन करावें. हा श्लोक मंत्राप्रमाणें सिद्ध केल्यास याच्या योगानें दुर्धर र्पाचेंहि विष उतरेल. हा श्लोक सर्पविषाचा मंत्रच आहे.

वाग्भूगौर्यादिभेदैर्विदुरिह मुनयो यां यदीयैश्च पुंसां
कारुण्यार्द्रैः कटाक्षैः सकृदपि पतितैः संपदः स्युः प्रमद्याः ।
कुन्देन्दु-स्वच्छ-मन्द-स्मित-मधुर-मुखाम्भोरुहां सुन्दराङ्गीं
वन्दे वन्द्यामशेषैरपि सुरभिदुरो-मन्दिरामिन्दिरां ताम् ॥ ८ ॥

भगवान् श्रीशंकराचार्य या आठव्या श्लोकानें श्रीविष्णूच्या पत्नीचें — ीलक्ष्मीचें स्तवन करून तिला वंदन करीत आहेत. " अशेषैः अपि वन्द्यां तां न्दिरां अहं वन्दे " देव, दानव, मानव, यक्ष, किन्नर, गंधर्व इत्यादि सर्वांनीं ान्दन करण्याला उपासना करण्याला योग्य असलेल्या त्या इंदिरादेवीला — श्रीलक्ष्मीला मी नमस्कार करीत आहें, असा या श्लोकाचा मुख्य अन्वयार्थ आहे. कशी आहे ती लक्ष्मी तें पहा : वाक् म्हणजे शब्दब्रह्मस्वरूप असलेली श्रीसरस्वतीदेवी. 'भू' म्हणजे सर्वभूतांची मूलप्रकृति असलेली पृथ्वीदेवी आणि गौरी म्हणजे परशक्तिस्वरूप श्रीपार्वतीदेवी. त्याचप्रमाणें 'आदि' शब्दानें रति, तुष्टि, पुष्टि, कांति, स्वाहा आणि स्वधा इत्यादि सर्व देवता विवक्षित आहेत. 'इह' म्हणजे या त्रैलोक्यांत या सर्वांच्या रूपानें लक्ष्मीच नटलेली आहे, असें जिचें स्वरूप तत्त्ववेत्ते ऋषि-मुनि जाणतात. " देवतिर्यङ्मनुष्येषु पुंनामा भगवान् हरिः । स्त्रीनाम्नी लक्ष्मीर्मैत्रेय नानयोर्विद्यते परम् ॥ " या विश्वांत पुरुषवाचक जें जें कांहीं आहे तें सर्व विष्णूच होय आणि स्त्रीवाचक जें जें कांहीं आहे तें सर्व लक्ष्मीच होय. श्रीविष्णु आणि श्रीलक्ष्मी यांशिवाय या जगांत निराळें असें कांहींच

नाहीं. पुरुषतत्त्व आणि प्रकृतितत्त्व यांचाच विलास म्हणजे हें सर्व विश्व होय. प्रकृति म्हणजे माया आदिशक्ति आणि पुरुष म्हणजे परमात्मा. शक्ति आणि शक्तिमान् यांचा अभेद असल्यामुळें शेवटीं दोंवेहि एकरूपच ठरतात. एवंच, अशा रीतीनें सर्व विश्वच चिद्विलास आहे असेंच म्हणावें लागतें. असो. दयेनें आर्द्र असलेल्या तिच्या कटाक्षांचा एकदां जरी लाभ झाला तरी तिच्या भक्तांना सर्व प्रकारच्या समग्र संपत्तींचा लाभ होतो. ती स्वभावतःच दयासागर असल्यामुळें कोणत्याहि प्रकारें प्रत्युपकाराची अपेक्षा न ठेवतांच भक्तजनांचें कल्याण करते असा भाव "कारुण्यार्द्रे" या शब्दानें ध्वनित केलेला आहे. त्याचप्रमाणें 'सकृदपि' म्हणजे एकवार. हा शब्द योजून आचार्यांनीं लक्ष्मीच्या ठिकाणीं असलेलें विलक्षण सामर्थ्यहि प्रकट केलें आहे.

"संपदः" म्हणजे केवळ संपत्तीच नव्हे तर कुलीनता, बुद्धिमत्ता, विद्वत्ता, शौर्य आणि पराक्रम इत्यादि सर्व गुण असा या ठिकाणीं संपदः या शब्दाचा अर्थ समजावा. "स श्लाघ्यः स गुणी धन्यः स कुलीनः स बुद्धिमान । स शूरः स च विक्रान्तो यं त्वं देवि निरीक्षसे ॥" इत्यादि पुराणवचनांवरून ज्याच्यावर लक्ष्मीची कृपादृष्टि होते तो सर्वगुणसंपन्न होतो हें सर्वमान्य आहे. म्हणूनच श्रीलक्ष्मीला सकल-पुरुषार्थ-कल्पवल्ली, जगन्माता, महामाया, भगवती, मंगलदेवता इत्यादि शब्दांनीं संबोधिलें जातें. लक्ष्मीचा महिमा अवर्णनीय आहे असा याचा भावार्थ होय.

तिसऱ्या चरणाचा अर्थ, जिचें मन्दस्मित म्हणजे गालांतल्या गालांत हळूच आणि गोड हसणें हें कुंदाच्या फुलांप्रमाणें अत्यंत स्वच्छ अशा दन्तपंक्तींना प्रकट करीत असून मुखकमल हें चंद्राप्रमाणें मधुर म्हणजे आह्लाददायक आहे. त्याचप्रमाणें ती सर्वांगांनीं अत्यंत सुंदर आहे. शरीरांतील अंगें, प्रत्यंगें आणि उपांगें यांची ठेवण सुस्पष्ट आणि प्रमाणबद्ध रेखीव असणें तसेंच सर्व सन्धि-बन्धनें सुदृढ आणि शोभिवंत असणें याला शरीरसौष्ठव किंवा सौंदर्य असें म्हणतात. "अन्यूनानतिरिक्तं यद्, अङ्ग-प्रत्यङ्ग-सौष्ठवम् । सुश्लिष्टसन्धिबन्धं च तत्सौन्दर्यमिति स्मृतम ॥" अशी भावप्रकाशकारांनीं सौंदर्याची व्याख्या केलेली आहे. मस्तक, वक्षःस्थल, उदर, कटिभाग आणि पाय यांना अंग म्हणतात. पोटऱ्या, मांड्या, हात आणि गळा इत्यादिकांना प्रत्यंग म्हणतात आणि नाक, कान, डोळे, भुवया, गाल, ओठ आणि हनुवटी इत्यादि अवयवांना उपांग असें म्हणतात. श्रीलक्ष्मीदेवी ही सर्वांगसुंदर असल्यामुळें तिला सुन्दराङ्गी

हें विशेषण दिलेलें आहे. त्याचप्रमाणें ती लक्ष्मी श्रीहरीच्या हृदय-मंदिरामध्यें नित्य वास्तव्य करीत आहे. मुरभिद् म्हणजे मुरारि भगवान् श्रीविष्णु यांचें वक्षःस्थल हेंच तिचें मंदिर म्हणजे गृह आहे. अशा त्या इन्दिरेला म्हणजे लक्ष्मीला मी वंदन करीत आहें. सर्व संपत्तीमध्यें ज्ञानसंपत्ति हीच अत्यंत श्रेष्ठ आहे. ज्ञान-संपत्तीनेंच नित्यानंदाची प्राप्ति होऊं शकते. हे माते लक्ष्मी! आम्हांला नित्यानंदाची प्राप्ति होईल अशी ज्ञानसंपत्ति देऊन कृतार्थ कर. अशी प्रार्थना या श्लोकांत विवक्षित आहे. या श्लोकांत स्वभावोक्ति, अतिशयोक्ति, उपमा इत्यादि अनेक अलंकार आहेत.

या सूते सत्त्वजालं सकलमपि सदा सन्निधानेन पुंसो
धत्ते या तत्त्वयोगाच्चरमचरमिदं भूतये भूतजातम् ।
धात्रीं स्थात्रीं जनित्रीं प्रकृतिमविकृतिं विभ्वशक्तिं विधात्रीं
विष्णोर्विश्वात्मनस्तां विपुलगुणमयीं प्राणनाथां प्रणौमि ॥९॥

भगवान् श्रीविष्णु यांची दुसरी पत्नी पृथ्वी आहे. " विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे " असें म्हणून आपण नित्य प्रातःस्मरणाच्या वेळीं पृथ्वीला नमस्कार करीतच असतों. आचार्य या नवव्या श्लोकानें पृथ्वीचें स्तवन करीत आहेत.

" विष्णोः तां प्राणनाथां अहं प्रणौमि " भगवान् श्रीविष्णु यांची ती प्राणनाथा म्हणजे पत्नी असलेली जी पृथ्वी तिचें मी (भक्तियुक्त अंतःकरणानें) स्तवन करीत आहें. असा या श्लोकाचा मुख्य अन्वयार्थ आहे. "या" म्हणजे जी " सत्त्वजालं सूते " म्हणजे सर्व द्रव्यसमूहाला व प्राण्यांनाहि जन्म देते. वृक्ष, लता, वेली, पशु, पक्षी, कीटपतंग आणि मानव इत्यादिकांचीं शरीरें आणि घटपटादि सर्व पदार्थ यांचा जन्म पृथ्वीपासूनच होत असतो. 'सदा' म्हणजे सर्वकाळ प्रवाहरूपानें तिचें हें कार्य नित्य चाललेलेंच आहे. कोणी म्हणेल कीं, शरीरें आणि घटादि पदार्थ हे पांचभौतिक आहेत. पृथ्वीच त्यांना जन्म देते असें कसें म्हणतां ? यावर उत्तर असें कीं, आकाशादि पंचमहाभूतांमध्यें पृथ्वीलाच प्राधान्य असल्यामुळें आणि आकाश, वायु इत्यादि भूतें अवकाश देणें, प्रेरणा देणें इत्यादि रूपानें केवळ सहकार्य करीत असल्यामुळें पृथ्वीच प्राधान्यानें सर्वांची जनक आहे असें म्हटलें आहे. " इयं हि भूमिर्भूतानां

शाश्वती योनिरुच्यते" पृथ्वी हेंच भूतमात्रांचें निरंतर कारण आहे असें मनूनेंहि म्हटलेलें आहे. पृथ्वीचें हें कार्य 'पुंसः' म्हणजे पुरुषाच्या – परमात्म्याच्या सान्निध्यानें चाललेलें आहे. परमात्मा स्वयं निर्विकार आहे. लोहचुंबकाच्या सान्निध्यांत सुया, टाचण्या यांची जशी हालचाल सुरू होते किंवा मेघांच्या सान्निध्यांत बगळ्याची मादी ज्याप्रमाणें गर्भ धारण करते त्याचप्रमाणें केवळ ईश्वराच्या सान्निध्यामुळें प्रकृतीची हालचाल चालू असते. सांख्यशास्त्रवेत्ते देखील प्रकृतीच्याच ठिकाणीं कर्तृत्व मानतात. "प्रकृतिः कर्त्री" पुरुषमात्र "साक्षी चेता केवलो निर्गुणश्च" असाच असतो.

प्राणिमात्रांच्या कल्याणासाठीं पृथ्वी ही या सर्व चराचर – स्थावरजंगम भूतमात्रांचें धारण व पोषण करते. शरीराचें धारण व पोषण करून मानवांना भोग आणि मोक्षरूपफल प्राप्त करून देण्याचें कार्य पृथ्वीच करीत असते. शरीर हें स्वरूपतः अनृत मिथ्या आणि मर्त्य म्हणजे नाशिवंत असलें तरी सत्य आणि अविनाशी अशा आनंदाचा परमात्मस्वरूपाचा लाभ शरीरानेंच होत असतो. त्या शरीराचें भरण-पोषण करणाऱ्या या पृथ्वीचे केवढे आपल्यावर उपकार आहेत ! पृथ्वीचें हें कार्य 'तत्त्वयोगात्' म्हणजे परमेश्वराच्याच साहचर्यानें चाललेलें असतें. 'तत्त्व' म्हणजे ब्रह्म, परमात्मा आणि योग म्हणजे साहचर्य. परमेश्वराच्या अनुप्रवेशानेंच पृथ्वी ही लोकधारणेचें कार्य करीत आहे. पृथ्वीच्या द्वारां श्रीहरीचेंच हें कार्य चाललेलें आहे. "गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा" पृथ्वीमध्यें प्रवेश करून मीच आपल्या प्रभावानें सर्व भूतांची धारणा करतों असें श्रीकृष्णप्रभूंनी गीतेंत सांगितलें आहे.

'धात्री' म्हणजे पृथ्वी. सर्व विश्वाचें धारण-पोषण करण्याला ती समर्थ असल्यामुळें तिला धात्री असें म्हटलें आहे. 'स्थात्री' म्हणजे स्थितिशील. घटादि कार्यें व शरीरें उत्पन्न होतात व नष्ट होतात पण पृथ्वी ही कारणरूपानें शिल्लक असतेच म्हणून तिला स्थात्री म्हणजे स्थितिशील असें म्हटलेलें आहे. याच अभिप्रायानें संस्कृत भाषेंत पृथ्वीला 'स्थिरा' असें म्हणतात. 'जनित्री' म्हणजे कार्यरूपानें नटणारी. "त्वं चन्द्रिका शशिनि तिग्मरुचौ रुचिस्त्वं त्वं चेतनाऽसि पुरुषे पवने बलं त्वम् ॥ त्वं स्वादुताऽसि सलिले शिखिनि त्वमूष्मा निःसारमेतदखिलं त्वदृते यदि स्यात्" हे आई जगज्जननि ! चन्द्रामध्यें चंद्रिका, सूर्यामध्यें प्रभा, पुरुषामध्यें चैतन्यशक्ति आणि वायुमध्यें बल तूंच आहेस.

पाण्यामध्यें माधुर्य आणि अग्रीमध्यें औष्ण्य हें सर्व कांहीं तूंच आहेस. असें श्रीविष्णूच्या प्रकृतितत्त्वाचें वर्णन केलेलें आहे. (अम्बास्तव), पृथ्वी ही भगवान् श्रीविष्णु यांची प्रकृतीच आहे. त्याचप्रमाणें सर्व विश्वाचें मूळ कारणहि तीच आहे. याच अभिप्रायानें आचार्यांनीं तिला या श्लोकाच्या तिसऱ्या चरणांत 'प्रकृति' असें म्हटलेलें आहे. ती सर्व विश्वाची मूळ प्रकृति म्हणजे आदिकारण आहे, पण तिचें मात्र कोणीच कारण नाहीं. ती सर्वांना जन्म देते पण स्वतः मात्र कोणापासूनहि जन्म घेत नाहीं म्हणून तिला 'अविकृति' म्हणजे आदिकारणाविरहित असें म्हटलेलें आहे. तात्पर्य, ती अनादि आणि अनंत आहे. अर्थात् या ठिकाणीं पृथ्वी म्हणजे ही स्थूल पृथ्वी तर नव्हेच, पण पृथ्वीची अभिमानी देवताहि नव्हे, तर तिच्याहि अंतर्यामी असलेली चिच्छक्ति हाच अर्थ लक्षांत घ्यावा. याच अभिप्रायानें तिला 'विश्वशक्ति' आणि 'विधात्री' अशीं दोन विशेषणें दिलेलीं आहेत. " निःसारमेतदखिलं त्वदृते यदि स्यात् " आई जगदंबे ! तूं जर या विश्वाला सोडलेंस तर हें सारें विश्व निःसार – सारहीन – शक्तिहीन होईल. विधात्री म्हणजे नियमनकर्त्री. सर्वांच्या अंतर्यामामध्यें राहून ती सर्वांचें नियमन करते. कोणी तिला ओळखत नाहींत पण सर्वांचीं कार्यें तिच्यामुळेंच चाललेलीं असतात. तिलाच आत्मशक्ति – परमात्मशक्ति असें म्हणतात. तात्पर्य, भगवत्स्वरूप असलेली विश्वरूपी श्रीविष्णूची आत्मशक्ति अशी जी पृथ्वी, ती सर्वगुणसंपन्न असून श्रीहरीची 'प्राणनाथा' म्हणजे प्रियपत्नी आहे. तिची मी अनन्यचित्तानें स्तुति करीत आहें. तिच्या स्तवनानें मला आत्मस्वरूपाचा लाभ होऊन मी सर्वगुणसंपन्न व्हावें. या श्लोकांत पृथ्वीला दिलेली सर्व विशेषणें साभिप्राय असल्यामुळें साहित्यशास्त्रदृष्टीनें परिकरालंकार सिद्ध होतो.

येभ्योऽसूयाभिरुच्चैः सपदि पदभुवः त्यज्यते दैत्यवर्गै-
र्येभ्यो धर्तुं च मूर्ध्ना स्पृहयति सततं सर्वगीर्वाणवर्गः ।
नित्यं निर्मूलयेयुर्नीचिततरमनो भक्तिनिघ्नात्मनां नः
पद्माक्षस्याङ्घ्रि-पद्म-द्वय-तल-निलयाः पांसवः पापपङ्कम् ॥१०॥

आचार्य या दहाव्या श्लोकानें श्रीहरीच्या चरणकमलांच्या रजःकणांचा महिमा वर्णन करीत आहेत. आतांपर्यंत नऊ श्लोकांनीं श्रीहरीच्या परिवाराचें वर्णन करून त्यांच्याच अनुग्रहानें घासूनपुसून स्वच्छ केलेल्या आरशाप्रमाणें निर्मल

झालेल्या अंतःकरणांत प्रतिबिंबित झालेल्या श्रीहरीची उपासना करण्याकरितां भक्तजनांचे सकल मनोरथ पूर्ण करणारा प्रत्यक्ष कल्पद्रुमच अशीं जीं श्रीहरीचीं चरणकमलें त्यांच्या रजःकणांचा महिमा वर्णन करणें क्रमप्राप्तच आहे.

"पद्माक्षस्य अङ्घ्रिपद्मद्वय-तल-निलयाः अमी पांसवः नः पापपङ्कं नित्यं निर्मूलयेयुः" श्रीहरीच्या दोन्ही चरणकमलांच्या तळाशीं संलग्न असलेले हे रजःकण आमच्या पापरूपी पंकाचें – चिखलाचें निरंतर निर्मूलन करोत. असा या श्लोकांतील मुख्य अन्वय आणि त्याचा अर्थ आहे. दैत्यवर्ग हा श्रीहरीचा शत्रु असल्यामुळें त्यानें नेहमींच श्रीहरीचा द्वेष केलेला आहे. श्रीहरीच्या चरण-कमळाची धूळ जेथें पडते तें स्थान कितीहि श्रेष्ठ असलें तरी आपला त्या स्थानाशीं संबंधहि येतां कामा नये म्हणून दैत्यवर्गाकडून, सर्व लोकांमध्यें अत्यंत श्रेष्ठ असलेल्या वैकुंठलोकाचाहि तत्काळ त्याग केला जातो. श्रीहरीशीं ते अत्यंत 'असूया' करीत असतात. अंतःकरणांत द्वेष निर्माण झाला कीं द्वेषाच्या पोटीं असूया निर्माण होते. असूयेमुळें ज्याच्याविषयीं द्वेष असेल, त्याच्या गुणाचें ग्रहण तर होतच नाहीं, उलट गुण हे दोषासारखेच भासतात व गुणांच्या ठिकाणीं दोषांचें आविष्करण केलें जातें. दुष्टजनांना "सर्वस्वीं मंगलप्रद असलेल्या श्रीहरीच्या चरणांना भजा" असें कितीहि जीव तोडून सांगितलें तरी ते श्रीहरीची अवधीरणाच करतात. या बाबतींत वेन, हिरण्यकशिपु, रावण, कंस इत्यादि अनेक उदाहरणें आहेत.

दुष्ट दैत्यांच्या अंतःकरणांत श्रीहरीविषयीं नेहमींच पराकोटीची असूया असल्यामुळें त्यानीं 'उरुपद' म्हणजे अत्यंत श्रेष्ठ स्थान असलेल्या वैकुंठ लोकाचाहि त्याग केलेला आहे. 'उरुपद' याचा अर्थ सार्वभौमपदाचा अधिकार असाहि कोणी करतात. असा अर्थ केला तरी दैत्यवर्गानें श्रीहरीच्या द्वेषामुळें आपला सार्व-भौमपदाचा अधिकारहि उपेक्षिलेला आहे. श्रीहरीचें नांव काढलें कीं दैत्य घाबर-तात आणि उच्चपदाचा अथवा सार्वभौमपदाचा त्याग करून कोठें तरी दडून रहातात. असा श्रीहरीच्या चरणकमलांच्या रजःकणांचा प्रभाव आहे, असाहि भाव यांत ध्वनित केला जातो. श्रीहरीच्या चरणकमलांच्या रजःकणांना दैत्यांचे समुदाय जरी घाबरत असले तरी सर्व देवांचे समुदाय मात्र त्यांना सतत आपल्या मस्तकांवर धारण करण्याची उत्कट इच्छा करीत असतात. त्या श्रीहरीच्या चरणकमलांच्या रजःकणांचा महिमा आचार्य म्हणतात, मी काय वर्णन करणार?

श्रीहरीच्या दोन्ही चरणकमलांच्या तळाशीं संलग्न असलेलें अर्थात् श्रीहरीच्या कोमल चरणकमलांचे तळ हेच ज्यांचें 'निलय' म्हणजे आश्रयस्थान आहे असे हे कमलनयन भगवान् श्रीविष्णु यांच्या चरणकमलांचे रजःकण हरिभक्तीच्या अधीन होऊन रहाणाऱ्या आमच्या अंतःकरणांत अतिशय संचित झालेल्या – साठलेल्या – दृढ होऊन बसलेल्या पापरूपी पंकाचें – चिखलाचें नित्य निर्मूलन करोत हीच माझी श्रीहरींच्या चरणारविंदीं नम्र प्रार्थना आहे. या ठिकाणीं पृथ्वीची धूळ श्रीहरीच्या चरणांना लागणें शक्य नाहीं. यःकश्चित् सामान्य सार्वभौम राजाच्याहि पायाला ती लागू शकत नाहीं, तर मग अनंतकोटिब्रह्माण्डांचा नायक असलेल्या श्रीहरीच्या तळपायाला पृथ्वीची धूळ कशी लागेल ? याकरितां श्रीहरीच्या चरणीं मस्तक ठेवून नमस्कार करणाऱ्या इंद्रादि देवांच्या मस्तकीं असलेल्या तुऱ्यांतील फुलांचे पराग हेच श्रीहरीच्या चरणकमलांचे रजःकण समजावेत. या श्लोकांत 'भक्तिनिघ्नात्मनाम्' हें विशेषण अत्यंत मार्मिक आहे. अंतःकरण सर्वस्वीं भक्तीच्या अधीन होणें यालाच 'भक्तिनिघ्नता' म्हणतात. " नित्यं त्वच्चरणारविन्द-युगल-ध्यानामृताऽऽस्वादिनामस्माकं सरसीरुहाक्ष ! सततं सम्पद्यतां जीवितम् " हे परमेश्वरा ! नित्य निरंतर आमचें जीवित तुमच्या चरण-कमलाच्या ध्यानामृताचा आस्वाद घेण्यांतच गढून जावो. आमच्या जीविताचा शेवट त्यांतच होवो. अशी अंतःकरणांत तळमळ निर्माण होणें याला म्हणतात 'भक्तिनिघ्नता'. भक्तिनिघ्न याचा अर्थ भक्तिपरवश असा आहे. वरील श्लोकार्ध मुकुंदमालेंतला आहे. अंतःकरणांत भक्तीची उत्कंठा कशी असावी या बाबतींत श्रीमद्भागवतांतील तीन श्लोक आम्ही वाचकांना सादर करीत आहोंत. वाचकांनीं ते पाठ करावेत आणि रोज अवश्य म्हणावेत. वृत्रासुराचें इंद्राशीं अत्यंत घनघोर युद्ध चालू असतां त्या युद्धांत वृत्रासूर अनन्य-चित्तानें श्रीहरीची प्रार्थना करीत आहे. तो श्रीहरीचा मोठा भक्त होता.

अहं हरे ! तव पादैकमूल-दासानुदासो भवितास्मि भूयः ।
मनः स्मरेतासुपतेर्गुणांस्ते गृणीत वाक् कर्म करोतु कायः ॥ १ ॥
न नाकपृष्ठं नच पारमेष्ठ्यं न सार्वभौमं न रसाधिपत्यम् ।
न योगसिद्धीरपुनर्भवं वा समञ्जस त्वा विरहय्य काङ्क्षे ॥ २ ॥
अजातपक्षा इव मातरं खगाः स्तन्यं यथा वत्सतराः क्षुधार्ताः ।
प्रियं प्रियेव व्युषितं विषण्णा मनोरविन्दाक्ष ! दिदृक्षते त्वाम् ॥ ३ ॥

हे प्रभो श्रीहरे ! तुझे चरणकमल हाच ज्यांनी आपला एकमेव आधार मानला आहे, मी त्यांच्या दासांचाहि दास आहें; आणि पुन्हां पुढच्या जन्मीं पण असाच होईन. हे प्रभो ! तूं माझा 'असुपति' म्हणजे प्राणनाथ आहेस. हे प्राणनाथा ! माझ्या मनानें नेहमीं तुलच्याच गुणांचें स्मरण करावें. वाणीनें तुमचेच गुण गावेत आणि शरीरानें तुमचीच सेवा करावी.

'समञ्जस' म्हणजे सुयोग्य. हे सुयोग्या दयावना ! मला राज्य नको. सार्वभौमपद नको. स्वर्ग नको व ब्रह्मपदहि नको. मला योगाभ्यासानें प्राप्त होणाऱ्या अणिमादि सिद्धि नकोत व मोक्षहि नको. मला तुमच्यावांचून दुसरें कांहीं नको. तुमच्यावांचून मी दुसऱ्या कशाचीहि इच्छा करीत नाहीं.

पंख न फुटलेलीं पक्ष्यांचीं पिलें हीं जशीं घरट्यामध्यें आईची मार्गप्रतीक्षा करीत असतात किंवा भुकेनें व्याकुळ झालेलीं वांसरें ज्याप्रमाणें रानांत गेलेल्या गायींची वाट पहातात अथवा भुकेलेलीं लहान लहान अर्भकें हीं जशी आईच्या स्तनांतील दुधाची अपेक्षा करतात अथवा प्रियतमाच्या विरहानें दुःखीकष्टी असलेली पतिव्रता परगांवीं गेलेल्या आपल्या पतीची जशी आतुरतेनें मार्गप्रतीक्षा करीत असते त्याचप्रमाणें हे राजीवनयना ! माझें मन तुला पहाण्याकरितां अत्यंत आतुरलेलें आहे. याला म्हणतात भक्तिपरवशता. अशी आपल्या मनाची स्थिति झाली पाहिजे. या श्लोकांत पापाच्या ठिकाणीं पंकत्वाचा आरोप केल्यामुळें रूपक अलंकार मानतात.

रेखा लेख्यादिवन्द्याश्चरणतलगताश्चक्रमत्स्यादिरूपाः
स्निग्धाः सूक्ष्माः सुजाता मृदु-ललिततर-क्षौमसूत्रायमाणाः ।
दद्युर्नो मङ्गलानि भ्रमरभरजुषा कोमलेनाब्जजायाः
कञ्जेनाब्जेडयमानाः किसलयमृदुना पाणिना चक्रपाणेः ॥ ११ ॥

या अकराव्या श्लोकानें आचार्य श्रीहरीच्या चरणकमलीं विराजमान असलेल्या रेखांचें स्तवन करीत आहेत. तळपायाशीं संलग्न असलेल्या रजःकणांपेक्षां तळपायांवरील रेषा श्रीहरीशीं अधिक अंतरंग आहेत. "चक्रपाणेः चरणतलगताः रेखाः नः मङ्गलानि दधुः" चक्रपाणि भगवान् श्रीविष्णु यांच्या तळपायांवर असलेल्या रेषा म्हणजे सामुद्रिक शास्त्रांत वर्णन केलेलीं ध्वज, वज्र, अंकुश

चक्र, मत्स्य कलश आणि धनुष्य इत्यादि अनेक चिन्हें हीं आम्हाला मंगलांचें-आनंदाचें प्रदान करोत. आत्मस्वरूपाचा लाभ करून देऊन तीं आम्हाला सुखी ठेवोत, असा हा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. आतां श्रीहरीच्या कमलाप्रमाणें कोमल आणि आरक्तवर्ण असलेल्या तळपायांवरील रेखा कशा आहेत ते पहा : त्या 'स्निग्ध' म्हणजे तुळतुळित, चकाकणाऱ्या अथवा अत्यंत रम्य आहेत. 'सूक्ष्म' म्हणजे अगदी बारीक आहेत. त्याचप्रमाणें त्या 'सुजात' म्हणजे सुंदर, सुकुमार आणि सुस्पष्ट दिसत आहेत. तांबड्या रेशमाच्या दोऱ्याप्रमाणें त्या मृदु आणि अत्यंत सुंदर दिसत आहेत. त्यांचे आकार भिन्न भिन्न आहेत. " दण्डाङ्कुशौ चक्रचापौ श्रीवासं कुलिशं तथा। मत्स्यश्चैतानि चिह्नानि कल्प्यन्ते चक्रवर्तिनाम्॥ " तळपायावर दंड, अंकुश, चक्र, धनुष्य, कमल, वज्र आणि मत्स्य हीं किंवा यांपैकीं कोणतेंहि चिह्न असणें हें सामुद्रिक शास्त्राच्या दृष्टीनें चक्रवर्ती म्हणजे सार्वभौम राजाचें लक्षण समजलें जातें. राजाधिराज अनन्तकोटिब्रह्माण्डनायक असलेल्या भगवान् श्रीविष्णु यांच्या चरणीं हीं सर्व चिह्नें विराजमान असणें स्वभाविकच आहे. श्रीहरीच्यातळपायांवरील रेखा चक्र, मत्स्य इत्यादि शुभसूचक आकाराच्या दिसत आहेत. 'लेख्यादिवन्द्याः' म्हणजे त्या देवादिकांनाहि वंदनीय आहेत.

'अब्धिजा' म्हणजे सागराची कन्या जी लक्ष्मी, तिच्या नव-पल्लवाप्रमाणें मृदु म्हणजे सुकुमार, आरक्तवर्ण आणि मनोहर असलेल्या कोमल हातांनीं पुनः पुन्हां पाय चेपले जात असल्यामुळें त्या रेखाहि चेपल्या जात आहेत. यद्यपि 'आम्रेडन' शब्दाचा अर्थ पुनः पुन्हां उच्चार करणें असा आहे. तथापि या ठिकाणीं लक्षणेनें पुनः पुन्हां चेपणें असा अर्थ करावा. अरुणिमा, सौरभ्य आणि सौकुमार्य या समान गुणधर्मामुळें लक्ष्मीचे हात अगदीं कमळाप्रमाणें दिसत असल्यामुळें त्या हातांच्या सभोंवार हीं कमळेंच आहेत अशा भ्रांतीनें भ्रमरांचे समूह गुंजारव करीत चिरट्या घालीत आहेत. याच अभिप्रायानें आचार्यांनीं लक्ष्मीच्या हाताला 'भ्रमरभरजुषा' हें विशेषण दिलेलें आहे. भ्रमरांच्या समूहानें सेवन केलेला, भ्रमरांच्या समूहानें युक्त असलेला असा त्याचा अर्थ समजावा. तात्पर्य अशा या श्रीहरीच्या पायांवरील शुभचिह्नस्वरूप असलेल्या रेखा आमचें कल्याण करोत. उपमा, अतिशयोक्ति, रूपक आणि संदेह असे अनेक अलंकार या श्लोकांत पहावयास सांपडतात.

यस्मादाक्रामतो द्यां गरुडमणिशिला-केतुदण्डायमाना-
दाप्च्योतन्ती बभासे सुरसरिदमला वैजयन्तीव कान्ता ।
भूमिष्ठो यस्तथाऽन्यो भुवनगृह-बृहत्स्तम्भ-शोभां दधौ नः
पातामेतौ पयोजोदर-ललिततलौ पङ्कजाक्षस्य पादौ ॥ १२ ॥

बारा, तेरा आणि चौदा या तीन श्लोकांनीं आचार्य श्रीहरीच्या चरणकमलांचें स्तवन करीत आहेत. भक्तजनांचें संरक्षण करण्याच्या बाबतींत भगवान् श्रीविष्णु यांच्या चरणकमलांनाच प्राधान्य आहे. भक्तांनीं आत्मकल्याणाकरितां श्रीहरीच्या चरणांचें शरण जावयाचें असतें. याच अभिप्रायानें इतर विषय एका एका श्लोकानें वर्णिलेले असले तरी परमेश्वराच्या चरणकमलांचें वर्णन करण्याकरितां आचार्यांनीं तीन श्लोकांची योजना केली आहे. " पंकजाक्षस्य एतौ पादौ नः पाताम् " कमलनयन भगवान् श्रीविष्णु यांचे हे दोन्ही चरणकमल आमचें रक्षण करोत असा या श्लोकांतील मुख्य अन्वय आणि त्याचा अर्थ आहे.

श्रीहरीनें बलिराजाच्या गर्वाचा परिहार करण्यासाठीं आणि बळीनें हिरावून घेतलेलें देवांचें वैभव देवांना परत मिळवून देण्यासाठीं अदितीच्या पोटीं वामन-रूपानें अवतार घेतला. बटुरूपानें बलिराजाच्या यज्ञमंडपांत गेले. तेथे बलीला तीन पावले भूमीचें दान मागितलें. दानाचें उदक हातावर पडतांच भगवान् श्रीविष्णु यांनीं त्रिविक्रमरूप धारण केलें. एका पावलानें संपूर्ण भूमंडळ व्यापून टाकलें व दुसऱ्या पावलानें द्युमंडल अर्थात् अंतरिक्षलोक व्यापून टाकला ! केवढें विलक्षण रूप प्रभूचें ! हें परमेश्वराचें विराट् रूप लक्षांत घेऊनच आचार्य प्रभूच्या चरणांचें वर्णन करीत आहेत.

श्रीहरीची अंगकांति हरितवर्णमिश्रित श्यामवर्ण आहे. त्या कांतीला 'गारुत्मत' रत्नाच्या म्हणजे पाच किंवा पाचू यानांवानें प्रसिद्ध असलेल्या रत्नाच्या कांतीची उपमा देतात. अर्थात् श्रीहरीचा पाय हा गारुत्मत रत्नासारखा म्हणजे पाचू-सारखा आहे. 'द्याम्' म्हणजे द्युलोकाला अर्थात् अंतरिक्ष लोकाला आक्रमण करीत असतांना श्रीहरीनें जेव्हां आपला एक पाय वर उचलला तेव्हां तो गारुत्मत-रत्न-शिलेचा अर्थात् पाचूचा 'केतुदंड' म्हणजे पताका फडकविण्याकरितां उभा केलेला ध्वजस्तंभच आहे कीं काय असें दिसलें ! आणि या ध्वजस्तंभावर फडकणारी पताका कोणती ? असें विचाराल तर सांगतात, श्रीहरीनें जो पाय वर उचलला

ा पायाच्या आंगठ्याच्या नखाचा धक्का लागून ब्रह्मांडकवच फुटलें. गर्भोदका-
माणें ब्रह्मांडाच्या बाहेर जें जलाचें आवरण होतें तेंच जल ब्रह्मांडामध्यें प्रविष्ट
ालें. 'आश्चयोतंती' म्हणजे ब्रह्मांडामध्यें स्रवणारी ती जलधारा, तीच 'सुरसरित्'
हणजे देवनदी गंगा बनली आणि एखाद्या निर्मल पताकेप्रमाणें अत्यंत मनोहर
वरूपांत ती स्वर्गलोकांमध्यें शोभू लागली! वैजयन्ती म्हणजे पताका असा
थें अर्थ समजावा. असें हें परमेश्वराच्या एका पायाचें स्वरूप झालें.

आतां भगवान् श्रीविष्णु यांचा दुसरा पाय कसा दिसत होता तें पहा :
भूलोकामध्यें उभा असलेला परमेश्वराचा दुसरा पाय हा जणुं कांहीं या भूलोकाचा
भुवनरूपी गृहाचा एक मोठा आधारस्तंभच आहे कीं काय अशा थाटांत उभा
असलेला तो दिसत होता. अर्थात् त्यानें भूलोकाच्या आधारस्तंभाची शोभा
धारण केलेली होती. ज्यांचे तळभाग कमळाच्या गाभ्याप्रमाणें अत्यंत सुंदर
अर्थात् कोमल आणि आरक्तवर्ण दिसत आहेत, असे हे कमलनयन भगवान्
श्रीविष्णु यांचे दोन्ही पाय आमचें रक्षण करोत. या श्लोकांत निदर्शनालंकार
आणि उत्प्रेक्षालंकार स्पष्टच दिसत आहेत.

आक्रामद्भ्यां त्रिलोकीमसुर-सुरपती तत्क्षणादेव नीतौ
याभ्यां वैरोचनीन्द्रौ युगपदपि विपत्संपदोरेकधाम ।
ताभ्यां ताम्रोदराभ्यां मुहुरहमजितस्याञ्चिताभ्यामुभाभ्यां
प्राज्यैश्वर्यप्रदाभ्यां प्रणतिमुपगतः पादपङ्केरुहाभ्याम् ॥१३॥

"अहं अजितस्य ताभ्यां उभाभ्यां पादपङ्केरुहाभ्यां प्रणतिं उपगतः
अस्मि" मी अजित म्हणजे भगवान् श्रीविष्णु यांच्या त्या दोन्ही चरणकमलांना
(भक्तिभावानें) प्रणाम करीत आहें. कसे आहेत श्रीहरीचे ते दोन्ही चरणकमल
तें पहा :

बलिनिग्रहाच्या वेळीं त्रिविक्रमरूप धारण करून त्रैलोक्याचें आक्रमण करीत
असतांना एकाच क्षणांत ज्यांनीं असुरांचा राजा विरोचनाचा पुत्र जो वैरोचनी
म्हणजे बली त्यास आणि देवांचा राजा जो इंद्र त्यास अनुक्रमें विपत्तीच्या आणि
संपत्तीच्या उच्च स्थानाला एकदमच पोहोंचविलें! बळिराजाला सुतलांत — पाताळांत
घातलें आणि इंद्राला स्वर्गाचें वैभव प्राप्त करून दिलें. त्या अजिताच्या म्हणजे
श्रीहरीच्या 'अञ्चित' म्हणजे सर्वांनीं पूजिलेल्या अर्थात् अत्यंत पूज्य असलेल्या

आणि 'प्राज्य' म्हणजे विपुल अशा ऐश्वर्याला देणाऱ्या आणि तसेंच ज्यांचे तळवे आरक्तवर्ण आहेत अशा श्रीहरीच्या दोन्ही चरणकमलांना मी वारंवार भक्तियुक्त अंतःकरणानें नमस्कार करीत आहें.

या श्लोकांत 'वैरोचनीन्द्र' असा शब्द आलेला आहे. वस्तुतः या सामासिक शब्दांत इंद्र शब्द 'अल्पाच्' म्हणजे थोड्या स्वरांचा अर्थात् लहान असल्यामुळें तो वैरोचनी या शब्दाच्या अगोदर योजावयास पाहिजे होता. यावर कोणी म्हणेल कीं, छन्दोभंगाच्या भीतीनें आचार्यांनीं तशी योजना केली नाहीं, पण हें उत्तर बरोबर नाहीं, आचार्यांची काव्यरचना गंगेच्या प्रवाहाप्रमाणें सहज, सुगम, प्रसन्न आणि निर्दोष आहे. त्यांना कोणत्याहि निमित्तानें ओढाताण करण्याची आवश्यकता नाहीं. या ठिकाणीं संस्कृत भाषेंतील सामान्य नियम हेतुपूर्वक बाजूला करून वैरोचनी शब्दाची त्यांनी आगोदर योजना केली आहे. वैरोचनी म्हणजे बलि. तो जात्या असुर असला तरी इंद्रापेक्षांहि परम धार्मिक आहे. तो परमेश्वराचा परम भक्त आहे. निष्कपटी आहे. अत्यंत उदार आहे. ज्ञानी आहे. या सर्व गुणांमुळें भगवान् श्रीहरि हे सुतलामध्यें बलीचे शरीररक्षक (Body-Guard) बनलेले आहेत. " त्वच्छासनातिगान् दैत्यान्, चक्रं मे सूदयिष्यति । रक्षिष्ये सर्वतोऽहं त्वां सानुगं सपरिच्छदम् ॥ " असें भागवतांत म्हटलें आहे. याप्रमाणें आपल्या गुणांनीं व अनन्यभावानें परमेश्वराला आपल्या अधीन करून ठेवणारा बलि हा इंद्रापेक्षां निश्चित श्रेष्ठ आहे. इंद्र हा केवळ त्रैलोक्याच्या ऐश्वर्यानें संपन्न आहे तर बलि हा समग्र ऐश्वर्यानें संपन्न आहे. अशा रीतीनें इंद्रापेक्षां बलि हा अभ्यर्हित म्हणजे अत्यंत पूज्य आहे म्हणूनच आचार्यांनीं 'वैरोचनीन्द्रौ' या शब्दांत इंद्रापेक्षां आदरानें बलीचा प्रथम निर्देश करण्याकरितां 'वैरोचनि' हा शब्द अगोदर योजला आहे. त्याचप्रमाणें 'प्रणति' या शब्दांत असलेला 'प्र' हा उपसर्ग भक्तीचा प्रकर्ष प्रकट करीत आहे. मी केवळ देहानेंच नव्हे तर वाणीनें आणि मनानेंहि भगवत्प्रवण म्हणजे श्रीहरीच्या सेवेस तत्पर आहें हेंच आचार्यांना सांगावयाचें आहे. आपणहि असेंच नित्य 'भगवत्प्रवण' म्हणजे वाणीनें श्रीहरीचें गुण गाण्यांत, मनानें श्रीहरीच्या स्वरूपाचें चिंतन करण्यांत आणि शरीरानें श्रीहरीची सेवा करण्यांत तत्पर असावें. या श्लोकांत एकाच वेळीं विपत्ति आणि संपत्तिरूप परस्परविरुद्ध कार्यांचा निर्देश केलेला असल्यामुळें विरोधाभास अलंकारहि दृग्गोचर होत आहे.

येभ्यो वर्णश्चतुर्थश्चरमत उदभूदादिसर्गे प्रजानां
साहस्री चापि संख्या प्रकटमभिहिता सर्ववेदेषु येषाम् ।
व्याप्ता विश्वंभरा यैरतिविततनोर्विश्वमूर्तेर्विराजो
विष्णोस्तेभ्यो महद्भ्यः सततमपि नमोऽस्त्वङ्घ्रिपङ्केरुहेभ्यः ॥१४॥

" विष्णोः अङ्घ्रिपङ्केरुहेभ्यः मम सततं नमः अस्तु " भगवान् श्रीविष्णु यांच्या चरणकमलांना माझा निरंतर नमस्कार असो. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. काय वर्णन करावें श्रीहरीच्या पायांचें ? श्रीहरीपेक्षांहि ते थोर आहेत. श्रीहरि भक्तांवर अनुग्रह करतात पण त्यांची अनुग्राहकता सापेक्ष आहे. श्रीहरीला भक्तानें आपल्या चरणीं नमावें अशी अपेक्षा असते. 'पत्रं पुष्पं' कांहीं का असेना, पण श्रीहरीला त्याची अपेक्षा आहे. श्रीहरीचे चरण मात्र भक्त-कामकल्प-द्रुमच आहेत. पुराणान्तरीं वर्णिलेला कल्पवृक्ष जसा आश्रितांकडून कशाचीहि अपेक्षा न करतां आश्रितांचे मनोरथ पूर्ण करतो त्याचप्रमाणें श्रीहरीचे चरणकमल निरपेक्षपणें भक्तांचे सकल मनोरथ पूर्ण करतात. याच अभिप्रायानें आचार्यांनीं 'महद्भ्यः' हें भगवान् श्रीविष्णु यांच्या चरणकमलांना विशेषण दिलेलें आहे. श्रीहरीचे चरण फार मोठे म्हणजे अत्यंत उदार आहेत. जो स्वतःकरितां कांहीं एक मिळविण्याचा प्रयत्न न करतां रात्रंदिवस परोपकारासाठीं झटत असतो, परोपकाराचें जणुं कांहीं त्याला व्यसनच असतें अशा थोर व्यक्तीला महात्मा असें म्हणतात. " अवाप्तव्यान्यपास्तानि यस्य सर्वाणि देहिनः । परोपकारव्यसनी स महात्माभिधीयते ॥ " (भावप्रकाश) ही व्याख्या श्रीहरीच्या चरणाला जुळत असल्यामुळें श्रीहरीचे चरण हे खरोखर अत्यंत 'महान' आहेत. जे कोणी त्यांच्या आश्रयाला येतील, जे कोणी अनन्यचित्तानें त्यांचें चिंतन करतील त्यांच्या सर्व सांसारिक दुःखांचा निरास होईल. त्यांचें सर्व इष्टकाम पूर्ण होतील. श्रीहरीचे चरण हे सर्व तीर्थांचे तीर्थ आहेत. भगवान् श्रीविष्णु यांच्या चरण-कमलाच्या स्पर्शामुळेच विश्वाला पावन करण्याचें सामर्थ्य गंगेला प्राप्त झालें आहे. प्रत्यक्ष भगवान् शंकर आणि ब्रह्मदेव यांनींहि त्यांचें स्तवन केलेलें आहे. श्रीहरीचे चरण हे सर्वस्वीं शरण जाण्याला योग्य आहेत. ते सेवकाच्या सर्व पीडांचा परिहार करतात. ते संसार-सागरांतील जणुं जहाजच आहेत. ते आपल्या देदीप्यमान

नखकांतीनें भक्तांच्या अंतःकरणांतील अज्ञानरूपी निबिड अंधकाराचा नाश करतात. केवढा हा श्रीहरीच्या चरणकमलांचा महिमा आहे !

ध्येयं सदा परिभवघ्नमभीष्टदोहं
तीर्थास्पदं शिवविरिञ्चिनुतं शरण्यम् ।
भृत्यार्तिहं प्रणतपाल ! भवाब्धिपोतं
वन्दे महापुरुष ! ते चरणारविन्दम् ॥

– भागवत, ११।५।३३

सञ्चिन्तयेद्भगवतश्चरणारविन्दं
वज्राङ्कुशध्वजसरोरुहलाञ्छनाढ्यम् ।
उत्तुङ्गरक्तविलसन्नखचक्रवाल-
ज्योत्स्नाभिराहतमहद्धृदयान्धकारम् ॥

– भागवत, ३।२८।२१

आतां आपण अन्वयाच्या अनुरोधानें श्लोकाचा अर्थ पाहूं. सृष्टीच्या आरंभकाळीं प्रजाजनांची उत्पत्ति होत असतांना ज्यांच्यापासून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार वर्णांपैकीं शेवटचा वर्ण उत्पन्न झाला. सर्व वेदांमध्यें ज्यांच्या संख्येचा निर्देश 'सहस्र' म्हणजे हजार या शब्दानें स्पष्टच सांगितला आहे. " सहस्रशीर्षः पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् " असें श्रीहरीचें वर्णन वेदांनीं केलेलें आहे. " नमोऽस्त्वनन्ताय सहस्रमूर्तये सहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे " यामाणें पुराणांतहि श्रीहरीला सहस्रपाद म्हटलेलें आहे. अशा रीतीनें ज्यांची संख्या 'सहस्र' या शब्दानें प्रकट झाली आहे. त्याचप्रमाणें ज्यांनीं सर्व विश्वाचें भरण-पोषण करणारी 'विश्वंभरा' म्हणजे पृथ्वी, ती संपूर्ण व्यापून टाकलेली आहे. त्या अति-विशाल देह धारण करणाऱ्या विश्वमूर्ति विराट् स्वरूप असलेल्या श्रीविष्णूच्या अत्यंत पूज्य अशा चरणकमलांना माझा सतत नमस्कार असो. विधिनिषेधांच्या कचाट्यांत न सांपडतां केवळ सेवाधर्माचें प्रतिपालन करूनहि शूद्राला पारमार्थिकदृष्ट्या जन्माचें सार्थक्य संपादितां येतें हा केवळ श्रीहरीच्या चरणकमलांच्या संपर्काचाच प्रभाव होय. या श्लोकांत स्वभावोक्ति अलंकाराचें चित्रण उत्तम केलेलें आहे.

विष्णोः पादद्वयाग्रे विमल-नख-मणि-भ्राजिता राजते या
राजीवस्येव रम्या हिमजल-कणिकालंकृताग्रा दलाली ।

अस्माकं विस्मयार्हाण्यखिल-जनमनःप्रार्थनीयानि सेयं
दद्यादाद्याऽनवद्या ततिरतिरुचिरा मङ्गलान्यङ्गुलीनाम् ॥ १५ ॥

श्रीहरीच्या विराट् स्वरूपाचें चिंतन करतांना पाताल लोक हे श्रीहरीचे पाय आहेत अशी भावना करावी. "पादौ पातालरूपौ" असे शास्त्रज्ञ वर्णन करतात. जिज्ञासूजनांनीं श्रीहरीच्या विराट् स्वरूपाचें ध्यान कसें करावें हा विषय श्रीमद्भागवताच्या द्वितीय स्कंधांतील पहिल्या अध्यायांत अवश्य पहावा.

आचार्य या पंधराव्या श्लोकानें श्रीहरीच्या पायांच्या बोटांचें वर्णन करीत आहेत. "विष्णोः पादद्वयाग्रे या राजते सा इयं अङ्गुलीनां ततिः अस्माकं मङ्गलानि दद्यात्" श्रीहरीच्या दोन्ही चरणकमलांच्या अग्रभागीं जी विराजत आहे ती ही बोटांची रांग – मालिका – पंक्ति अर्थात् श्रीहरीच्या पायांचीं बोटें आम्हांला मंगलांची म्हणजे सुखांची प्राप्ति करून देवोत. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. कशीं दिसत आहेत श्रीहरीच्या पायांचीं बोटें तें पहा : श्रीहरीच्या दोन्ही चरणकमलांच्या अग्रभागीं निर्मल रत्नाप्रमाणें असलेल्या नखांनीं तेजस्वी दिसणारी अंगुलींची पंक्ति अर्थात् बोटांची रांग दवबिंदूंनीं ज्यांचा अग्रभाग अलंकृत झालेला आहे – सुशोभित झालेला आहे, अशा एखाद्या कमलाच्या दलांप्रमाणें म्हणजे पाकळ्याप्रमाणें शोभत आहे. तात्पर्य, श्रीहरीच्या पायाचीं बोटें रम्य दिसत आहेत. तीं हीं अत्यंत श्रेष्ठ निर्मल आणि सुंदर असलेलीं श्रीहरीच्या पायाचीं बोटें आमचें कल्याण करोत. सर्व लोकांच्या मनाला स्पृहणीय वाटतील अशीं आश्चर्यजनक सुखें तीं आम्हांला देवोत. या श्लोकांत दोन्ही पायांचीं बोटें आणि रत्नाप्रमाणें तेजस्वी असलेलीं नखें त्याचप्रमाणें कमलांचीं दलें आणि दवबिंदु यांच्यांत बिंब-प्रतिबिंबभाव दाखवून दृष्टान्तालंकार साधलेला आहे.

यस्यां दृष्ट्वाऽमलायां प्रतिकृतिमभराः सम्भवन्त्यानमन्तः
सेन्द्राः सान्द्रीकृतेर्ष्यास्त्वपरसुरकुलाऽऽशङ्कयाऽऽनङ्कवन्तः ।
सा नद्यः सातिरेकां सकलसुखकरीं सम्पदं साधयेन्न-
श्चञ्चच्चार्वंशुचक्रा चरणनलिनयोश्चक्रपाणेर्नखाली ॥ १६ ॥

आचार्य या सोळाव्या श्लोकानें श्रीहरीच्या चरणकमलांच्या नखांचें वर्णन करीत आहेत. " चक्रपाणेः चरणनलिनयोः नखाली नः सकलसुखकरीं सम्पदं साधयेत " श्रीहरीच्या चरणकमलांची नखपंक्ति आम्हांला सर्व प्रकारचें सुख देणाऱ्या संपत्तीला प्राप्त करून देवो. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. कशी आहेत तीं श्रीहरीच्या चरणकमलांचीं नखें तें पहा : इंद्रासहित सर्व देव अर्थात् वसु, रुद्र, आदित्य, अश्विनीकुमार, अग्नि, वायु आणि कुबेर इत्यादि सर्व देव जेव्हां नमस्कार करण्याकरितां भगवान श्रीविष्णु यांच्या चरणकमलांजवळ येतात आणि पायांवर डोकें ठेवून नमस्कार करतात तेव्हां स्फटिकाच्या आरशाप्रमाणें स्वच्छ असलेल्या श्रीहरीच्या पायांच्या नखांत त्यांना आपलीं व भोंवतालीं जवळ बसलेल्या इतर देवांचीं प्रतिबिंबें दिसतात. तीं प्रतिबिंबें आहेत असें त्यांना ओळखूं येत नाहीं. आपल्याहि अगोदर हा दुसरा देवांचाच समुदाय येथें जमला आहे, अशी त्यांना शंका येते आणि त्या शंकेमुळें ते भयग्रस्त होतात. आम्ही येण्याच्या पूर्वीच यांनीं आमचीं स्थानें पटकाविलीं. आतां आमच्यावर श्रीहरीची कृपा कशी होणार आणि आम्हांला आमचें अभीष्ट फल कसें मिळवतां येईल ? आमच्या अगोदर हेच श्रीहरीच्या कृपाप्रसादाला पात्र होतील आणि आम्ही मात्र श्रीहरीच्या कृपेला मुकल्यामुळें अभागी ठरणार ! अशी त्यांना भीति वाटते. त्यांचीं मनें अस्वस्थ होतात. देवांना दुसऱ्यांचें सुख पहावत नाहीं हें प्रसिद्धच आहे. " अस्त्येतदन्यसमाधिभीरुत्वं देवानाम् " असें कविश्रेष्ठ कालिदासानेंहि शाकुंतलांत म्हटलेलें आहे. भीतीमुळें देवांच्या मनांत तीव्र ईर्ष्या निर्माण होते. याच अभिप्रायानें 'सान्द्रीकृतेर्ष्याः' असें विशेषण देवांना दिलेलें आहे. तात्पर्य, आपलीं पडलेलीं प्रतिबिंबें पाहून इंद्रादि देवांनाहि असा भ्रम व्हावा इतकीं श्रीहरीच्या पायांचीं नखें स्वच्छ आहेत.

'चञ्चच्चार्वंशुचक्रा' श्रीहरीच्या पायांच्या नखाभोंवतालीं अत्यंत सुंदर प्रकाशकिरणांचा समुदाय लकाकत आहे. जिच्या 'अंशु' म्हणजे किरणांचा 'चक्र' म्हणजे समुदाय 'चञ्चत्' म्हणजे लकाकत आहे अशी ती श्रीहरीच्या पायांचीं नखपंक्ति. ती आम्हांला सर्व प्रकारच्या सुखांना देणारी, लोकोत्तर भरपूर संपत्ति प्राप्त करून देवो, असा या श्लोकाचा अर्थ आहे. या ठिकाणीं ही गोष्ट लक्षांत घ्यावयाची आहे कीं, आचार्यांनीं कोणत्याहि लौकिक संपत्तीची अपेक्षा केलेली नाहीं. " सर्वे पदा हस्तिपदे निमग्नाः " सर्व पावलें हत्तीच्या पावलांत समावतात. या न्यायानें

सर्व संपत्तींच्या सुखांचा ज्याच्यांत अंतर्भाव होतो तो परिपूर्ण परब्रह्मस्वरूप असलेला नित्य निरतिशय आनंद तोच आचार्यांना या ठिकाणीं विवक्षित आहे. या आनंदाचा लाभ लौकिक संपत्तीनें होत नसतो. " अमृतत्वस्य तु नाशास्ति वित्तेन " अविनाशी आनंदाची आशा पैशानें पूर्ण होणार नाहीं. असें याज्ञवल्क्यांनीं स्पष्टच सांगितलें आहे. मग हा अविनाशी आनंद कशानें मिळणार ? असें कोणीं विचारल्यास " विद्यया विन्दतेऽमृतम् " विद्या हेंच पूर्ण आनंदाचें साधन आहे हेंच तत्त्ववेत्त्यांचें उत्तर आहे. म्हणून आचार्य प्रकृतस्थलीं अध्यात्मविद्यारूपी संपत्तीची याचना करीत आहेत. इतर संपत्ति या दुःखमिश्रित सुखाचाच लाभ करून देऊं शकतात. निःशेष दुःखनिवृत्तिपूर्वक निरतिशय आनंदाचा लाभ यथार्थ आत्मस्वरूपाच्या साक्षात्कारावांचून होणार नाहीं. तात्पर्य, ' सकलसुखकरी संपत् ' म्हणजे आत्मज्ञानच होय. ही संपत्ति पराकाष्ठेची म्हणजे आत्मसाक्षात्कार करून देण्याला समर्थ असावी, या अभिप्रायानें तिला 'सातिरेकाम्' हें विशेषण दिलेलें आहे. श्रीहरीच्या चरणकमलांची नखकान्ति जशी स्वच्छ, निर्मल आहे त्याचप्रमाणें तिनें आमचें अंतःकरणहि अत्यंत स्वच्छ निर्मल करावें असा या प्रार्थनेंतला गर्भितार्थ आहे. ज्या अर्थीं हीं नखें शुद्ध ब्रह्मस्वरूप असलेल्या परमेश्वराचीं आहेत त्या अर्थीं त्यांच्यामध्यें आमचे मनोरथ पूर्ण करण्याचें सामर्थ्य आहे असा तर्क येथें अभिप्रेत असल्यामुळें या श्लोकांत साहित्यशास्त्रदृष्ट्या अनुमानालंकार मानला जातो. पूर्वार्धांत देवांचा भ्रम मोठ्या गमतीनें दाखविलेला असल्यामुळें भ्रांतिमत् अथवा संदेह अलंकारहि उत्तम साधला आहे.

पादाम्भोजन्म-सेवा-समवनत-सुर-व्रात-भास्वत्किरीट-
प्रत्युप्तोच्चावचाश्म-प्र-वर-कर-गणैश्चित्रितं यद्विभाति ।
नम्राङ्गानां हरेर्नो हरिदुपल-महा-कूर्म-सौन्दर्य-हारि-
च्छायं श्रेयःप्रदायि प्रपदयुगमिदं प्रापयेत्पापमन्तम् ॥ १७ ॥

या श्लोकानें आचार्य श्रीहरीच्या पायाच्या अग्रभागाचें वर्णन करीत आहेत. " हरेः श्रेयःप्रदायि इदं प्रपदयुगं नः पापं अन्तं प्रापयेत् " कल्याणप्रद असलेले श्रीहरीच्या दोन्ही चरणकमलांचे पुढचे भाग – चवडे – हे आमच्या पापांचा नाश करोत, अशी माझी प्रार्थना आहे. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. कसे आहेत श्रीहरीच्या पायांचे अग्रभाग ते पहा : भगवान् श्रीविष्णु

यांच्या चरणकमलांची सेवा करीत असतांना भक्तिभावानें नम्र झालेल्या देवांच्या समुदायाच्या मस्तकांवर असलेले जे देदीप्यमान किरीट, त्या किरिटांत जडविलेलीं जीं लहानमोठीं -- हिरे, माणकें, पाच, मोतीं आणि पोवळें इत्यादि श्रेष्ठ रत्नें आहेत त्या रत्नांच्या फाकलेल्या किरणांच्या समूहांनीं श्रीहरीच्या दोन्ही पायांचे अग्रभाग विविध प्रकारच्या रंगांनीं रंगविल्याप्रमाणें शोभत आहेत.

श्रीहरीच्या पायांच्या चवड्यांचा उंचवटा गारुत्मत रत्नाच्या अर्थात् पाचूच्या कासवापेक्षांहि आधिक उत्तम शोभत असल्यामुळें जणुं कांहीं त्या कासवांच्या शोभेलाहि ते मागे टाकीत आहेत असें वाटतें ! तात्पर्य भगवान् श्रीविष्णु यांच्या पायाचे चवडे कृष्णवर्ण मिश्रित हरितवर्णाच्या-हिरव्या पाचूच्या कासवापेक्षांहि अधिक शोभत आहेत. पाचूच्या कासवाप्रमाणें त्यांची कांति व आकृति दिसत आहे. ते भक्तजनांना 'श्रेयःप्रदायि' म्हणजे कल्याण प्राप्त करून देणारे आहेत. असे हे श्रीहरीच्या दोन्ही पायांचे अग्रभाग भक्तिभावानें नम्र झालेल्या आम्हां सर्व भक्तांच्या पातकांचा अंत करोत. या श्लोकांत पूर्वार्धांत उत्प्रेक्षालंकार असून उत्तरार्धांत निदर्शनालंकाराचें स्वरूप पहावयास सांपडतें.

श्रीमत्यौ चारुवृत्ते कर-परिमलनानन्द-हृष्टे-रमायाः
सौन्दर्याढ्येन्द्रनीलोपल-रचित-महादण्डयोः कान्ति-चोरे ।
सूरीन्द्रैः स्तूयमाने सुरकुलसुखदे सूदितारति-सङ्घे
जङ्घे नारायणीये मुहुरपि जयतामस्मदंहो हरन्त्यौ ॥ १८ ॥

आचार्य या अठराव्या श्लोकानें श्रीहरीच्या पिंढऱ्यांचें वर्णन करीत आहेत. घोट्यापासून गुडघ्यापर्यंतच्या भागाला पिंढरी किंवा पोटरी असें म्हणतात. "अस्मदंहो हरन्त्यौ नारायणीये ,जङ्घे जयताम्" आमच्या पातकांचें निरसन करणाऱ्या नारायणाच्या पोटऱ्यांचा विजय असो. सदासर्वकाळ त्यांच्या उत्कर्ष असो. असा या श्लोकाचा मुख्य अन्वयार्थ आहे. कशा आहेत श्रीहरीच्या पिंढऱ्या तें पहा : 'श्रीमत्यौ' म्हणजे लक्ष्मीनें युक्त. भगवान् श्रीविष्णु यांचे पाय आणि पिंढऱ्या चुरण्यासाठीं श्री म्हणजे लक्ष्मी त्यांच्या सान्निध्यांत नित्य विराजमान आहे. अथवा श्री म्हणजे शोभा, सर्व प्रकारचें सौंदर्य, त्यानें त्या युक्त आहेत. प्रत्यक्ष लक्ष्मी आपल्या सुकोमल करकमलांनीं त्यांचें संवाहन करीत असल्यामुळें, त्या पिंढऱ्यांना ती चुरीत दाबीत असल्यामुळें होत असलेल्या

आनंदानें त्या पोटऱ्यांच्या ठिकाणीं रोमांच उभे राहिलेले दिसत आहेत. 'हृष्ट' म्हणजे आनंदित आणि रोमांचित. त्याचप्रमाणें त्या पिंढऱ्या आकारानें वर्तुल, दीर्घ, टवटवीत, स्थूल, नील आणि तुळतुळीत दिसत असल्यामुळें जणुं कांहीं त्यांनीं अत्युत्कृष्ट इंद्रनील रत्नांच्या दंडांची कान्ति चोरून आणलेली आहे कीं काय असें वाटतें ! तात्पर्य, इंद्रनीलरत्नशिलेपासून तयार केलेल्या दंडांच्या कांतीपेक्षांहि श्रीहरीच्या पिंढऱ्यांची कांति ही अधिक उठावदार दिसत आहे.

'सूरि' म्हणजे सूर्य आणि 'इंद्र' म्हणजे देवांचा राजा, त्याचप्रमाणें इतरहि देव ज्यांची स्तुति करीत आहेत, अथवा 'सूरींद्र' म्हणजे बडेबडे तत्त्ववेत्ते शुक-सनकादिक ऋषि यांच्याकडून ज्यांची स्तुति केली जात आहे अशा, त्याचप्रमाणें 'सुरकुल-सुखदे' म्हणजे देवसमुदायाला सुख देणाऱ्या आणि ज्यांनीं शत्रूंच्या समुदायाचा नाश करून टाकलेला आहे अशा श्रीनारायणाच्या 'जंघा' म्हणजे पिंढऱ्या त्या आमच्या पापांचा नाश करणाऱ्या आहेत. त्यांचा सर्वकाळ विजय असो. आम्ही त्यांचा वारंवार जयजयकार करीत आहों. भगवान् श्रीविष्णु हे पाण्यामध्यें -- क्षीरसागरामध्यें वास्तव्य करतात. पाण्याला संस्कृत भाषेंत 'नार' असें नांव आहे. नार म्हणजे पाणी हें त्याचें अयन म्हणजे स्थान, रहाण्याचें ठिकाण आहे म्हणून त्याला नारायण असें म्हणतात. नारायण म्हणजे क्षीराब्धिनिवासी भगवान् श्रीहरि. अथवा ' नराणां समूहो नारम् ' 'नार' म्हणजे जीवसमूह. या जीवसमूहाचें तो भगवान् श्रीहरि अयन म्हणजे आश्रयस्थान आहे म्हणूनहि त्याला नारायण असें म्हणतात. तात्पर्य, नारायण म्हणजे सर्व जीवांचें आश्रयस्थान असलेला भगवान् श्रीविष्णु. अथवा 'नार' म्हणजे भूतमात्र. भूतमात्रांचें हृदय हें त्याचें 'अयन' म्हणजे वसतिस्थान आहे म्हणूनहि त्यास नारायण असें म्हणतात. " ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति " असें गीतेंत म्हटलेलेंच आहे. अशा नारायणाच्या त्या पिंढऱ्या आहेत म्हणून त्यांना 'नारायणीय' असें म्हटलेलें आहे. असो. या श्लोकांत स्वभावोक्ति आणि निदर्शन हें दोन अलंकार मोठ्या डौलानें विराजत आहेत.

सम्यक् साह्यं विधातुं समभिव सुरतं जङ्घयोः स्निग्धयोर्ये
भारीभूतोरुदण्ड-द्वय-भरण-कृतोत्तम्भ-भावं भजेते ।
चित्तादर्शं विधातुं महितमिव सतां ते समुद्गायमाने
वृत्ताकारे विधत्तां हृदि मुदमजितस्यानिशं जानुनी नः॥ १९ ॥

आचार्य या एकोणिसाव्या श्लोकानें श्रीहरीच्या दोन्ही गुडघ्यांचें स्तवन करीत आहेत. " अजितस्य जानुनी नः हृदि अनिशं मुदं विधत्ताम् " 'अजित' म्हणजे कधींहि कोणाकडूनहि ईर्ष्येनें जिंकला न जाणारा सच्चिदानन्द श्रीहरि त्या श्रीहरीचे दोन्ही गुडघे आमच्या हृदयामध्यें अहर्निश आनंदाला प्रकट करोत. असा हा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. मागच्या श्लोकांत पिंढऱ्यांचें वर्णन करून झाल्यानंतर पिंढऱ्यांच्यावरच गुडघ्यांची ठेवण असल्यामुळें ओघानेंच गुडघ्यांचें वर्णन करणें प्राप्त आहे. कसे आहेत श्रीहरीचे गुडघे तें पहा : पिंढऱ्यावर परमेश्वराच्या विराट् स्वरूपाचा भार असल्यामुळें त्या भारानें जणुं कांहीं श्रान्त झालेल्या दोन्ही पिंढऱ्यांना एकदमच तिरंतर उत्तम रीतीनें साहाय्य करण्याकरितां हे दोन्ही गुडघे प्रवृत्त झालेले दिसत आहेत. त्या दोन्ही गुडघ्यांनीं परमेश्वराच्या अत्यंत जड असलेल्या — भारदस्त असलेल्या दोन्ही ऊरुदंडांचा अर्थात् मांड्यांचा भार तोलून धरण्याकरितां 'उत्तम्भभाव' म्हणजे आधार देण्याचें कार्य — अर्थात् मांड्यांना उचलून धरण्याचें कार्य ते करीत आहेत. मस्तकावरचा भार मस्तकाला पीडादायक होऊं नये म्हणून मस्तक आणि भार यांच्यामध्यें जशी चुंचळ असावी त्याचप्रमाणें पिंढऱ्या आणि मांड्या यांच्यामध्यें श्रीहरीचे गुडघे हे चुंबळीचें कार्य करीत आहेत. आणि श्रीहरीच्या दोन्ही मांड्यांना ते तोलून धरीत आहेत.

श्रीहरीचे गुडघे गोल गरगरीत दिसत आहेत. पेढेघाटी डब्याप्रमाणें किंवा हस्तिदंताच्या संपुटाप्रमाणें त्यांचा आकार किंचित् वर वर्तुलाकृति उचलून दिसत आहे. जणुं कांहीं भक्तजनांना -- सज्जनांना आपला चित्तरूपी आरसा ठेवण्याचे ते करंडकच आहेत. समुद्ग शब्दाचा अर्थ डबा, करंडा किंवा संपुट असा आहे. असे हे श्रीहरीचे दोन्ही गुडघे आमच्या हृदयामध्यें निरंतर आनंद निर्माण करोत. या श्लोकांत उत्प्रेक्षालंकार चांगलाच साधला आहे.

देवो भीतिं विधातुः सपदि विदधतौ कैटभाख्यं मधुं चा-
प्यारोप्यारूढगर्वावधिजलधि ययोरादिदैत्यौ जघान ।
वृत्तावन्योन्यतुल्यौ चतुरुपचयं बिभ्रतावभ्रनीला-
वूरू चारू हरेस्तौ मुदमनिशायिनीं मानसे नो विधत्ताम् ॥२०॥

आचार्य या विसाव्या श्लोकानें भगवान् श्रीविष्णु यांच्या दोन्ही मांड्यांचें वर्णन करीत आहेत. श्रीहरीच्या विराट् स्वरूपांत अतल आणि वितल हे दोन्ही

लोक श्रीहरींच्या मांड्या आहेत अशी भावना करावी. " हरेः चारू तौ ऊरू नः मानसे अतिशयिनीं मुदं विधत्ताम् " श्रीहरीच्या त्या सुंदर मांड्या आमच्या अंतःकरणांत अत्यंत आनंद प्रकट करोत. असा या श्लोकाचा मुख्य अन्वयार्थ आहे.

या श्लोकाचा अर्थ लक्षांत घेण्यासाठीं एक अतिप्राचीन पौराणिक इतिहास लक्षांत घेणें आवश्यक आहे. तो असा आदिदेव भगवान् श्रीहरि यांनीं प्रलयकाळीं विश्रांतीसाठीं योगनिद्रेचा अंगीकार केलेला होता. झोंपेंतच कान गुदगुदला. तो त्यांनीं बोटानें टोकरला. बोटाला कानांतला मळ लागला. तो त्यांनीं झाडला. त्याच मळांतून मधु आणि कैटभ हे दोन दैत्य निर्माण झाले. प्रलयाचा शेवट आणि सृष्टीचा आरंभ असा संधिकाल होता तो. मधु आणि कैटभ हे सृष्टीच्या आरंभीं जन्माला आले म्हणून त्यांना आदिदैत्य असें म्हणतात. ते श्रीविष्णूच्या कानांतील मळांतून जन्मलेले असल्यामुळें स्वभावतःच मलिन अर्थात् आसुरी प्रकृतीचे होते. याच अभिप्रायानें त्यांना दत्यै असा लाक्षणिक शब्द लावला आहे. ते कांहीं हिरण्याक्ष हिरण्यकशिपु यांच्याप्रमाणें दितीच्या पोटीं जन्माला आलेले किंवा त्यांच्या वंशांतलेहि नव्हते. असो. ते जन्माला आल्याबरोबर त्यांनीं इकडे तिकडे पाहिलें. चोहोंकडे पाणीच पाणी होतें. भगवान् श्रीविष्णु आपल्या शेषशयनावर झोंपलेले आहेत. त्यांच्या नाभिस्थानांतून वर आलेल्या कमळांत ब्रह्मदेव जागे असल्याचें त्यांना दिसलें ! ते दोघेहि दैत्य भुकेनें व्याकुळ झालेले होते. ते ब्रह्मदेवालाच खावयाला उठले ! ब्रह्मदेव त्यांना पाहून घाबरले. त्यांनीं श्रीहरीच्या योगनिद्रेची स्तुति केली. ती योगनिद्रा श्रीहरीच्या देहांतून निघाली व ब्रह्मदेवाच्या पुढें प्रकट झाली. तीच ही श्रीहरीची योगमाया – महामाया – जगद्धात्री जगदंबा होय. दुर्गा, भवानी, देवी, चंडी, गौरी इत्यादि अनेक नांवें तिला प्राप्त झालेलीं आहेत. शुंभ, निशुंभ, चंड, मुंड इत्यादि अनेक उन्मत्त दैत्यांशीं घनघोर युद्ध करून त्यांचा तिनें फडशा पाडला !

योगनिद्रा श्रीहरीच्या देहांतून बाहेर पडल्यावरोबर श्रीहरि जागे झाले. त्यांना जागे झाल्याचें पाहिल्याबरोबर मधुकैटभांनीं ब्रह्मदेवाला सोडून भगवान श्रीविष्णु यांच्यावरच हल्ला केला ! मधु आणि कैटभ यांचें श्रीविष्णूशीं अत्यंत तुमुल युद्ध झालें ! मधु आणि कैटभ यांना आपल्या शक्तीचा अहंकार दांडगा होता. ते गर्वानें श्रीहरीला म्हणाले, तुम्हांला पाहिजे असेल तो वर तुम्ही आमच्याकडून मागून घ्या आणि युद्ध करण्याचें सोडून द्या. श्रीहरि त्यांना म्हणाले कीं,

माझ्या हातून तुम्हांला मृत्यु यावा हाच वर तुम्ही मला द्या. श्रीहरीचें तें म्हणणें ऐकून मधु-कैटभांनीं विचार केला. जिकडे तिकडे पाणीच पाणी आहे. जमिनीचा कोठें थांगपत्ताहि नाहीं. ही स्थिति पाहून ते श्रीहरीला म्हणले, " जेथें पाणी नसेल तेथें तुम्हीं आम्हांला मारावें म्हणजे तुमच्या हातून आम्हांला मृत्यु येईल. " हें ऐकतांच भगवान् श्रीविष्णु यांनीं विराट् स्वरूप धारण केलें ! तो प्रचंड प्रलयकालचा महासागर श्रीहरीच्या गुडघ्याइतकाच झाला ! श्रीहरीनें त्या मधु-कैटभांना पाण्याच्या बाहेर काढले व आपल्या मांडीवर घेतलें. नंतर त्या दोन्ही दैत्यांचा क्रमानें आपल्या हातांतील सुदर्शनचक्रानें शिरच्छेद केला ! अशा रीतीनें ब्रह्मदेव सृष्टीच्या आरंभींच प्राप्त झालेल्या संकटांतून मुक्त झाले ! हा सप्तशतीच्या पहिल्या अध्यायांतील इतिहास लक्षांत घेऊन आचार्य श्रीहरीच्या मांड्यांचें वर्णन करीत आहेत.

या कथानकाला अनुलक्षून असलेले सप्तशतींतील श्लोक पहा :

तदा द्वावसुरौ घोरौ विख्यातौ मधुकैटभौ ।
विष्णुकर्णमलोद्भूतौ हन्तुं ब्रह्माणमुद्यतौ ॥
आवां जहि न यत्रोर्वी सलिलेन परिप्लुता ।
तथेत्युक्त्वा भगवता शङ्खचक्रगदाभृता ॥
कृत्वा चक्रेण वै च्छिन्ने ऊरुस्थे शिरसी तयोः ॥

आतां आचार्यांच्या श्लोकाचा संपूर्ण अर्थ आपण पाहूं या. 'देव' म्हणजे सर्वकाळ स्वतःच्या प्रकाशानें देदीप्यमान असलेला, सर्वांना अभयाचें दान देणारा अथवा सर्वांचीं दुःखें खंडित करणारा. तसेंच स्वच्छंदपणें क्रीडा करणारा. (द्योतते, ददाति, द्यति अथवा दीव्यति इति देवः अशी देव शब्दाची व्युत्पत्ति आहे.) कोणताहि अर्थ घेतला तरी सच्चिदानंद श्रीहरि परमात्मा हाच त्याचा अर्थ होतो. या श्रीहरीनें 'विधातुः' म्हणजे ब्रह्मदेवाच्या अंतःकरणांत ' भीतिं विदधतौ ' म्हणजे भयाला निर्माण करणारे असे जे मधु आणि कैटभ या नांवाचे दोन दैत्य, त्यांना ते अत्यंत गर्विष्ठ झाले असतां, प्रलयकालच्या महासागरांत आपल्या दोन्ही मांड्यांवर घेऊन ठार केलें. त्या श्रीहरीच्या दोन्ही मांड्या अगदीं उत्तम वर्तुलाकार एकमेकींशीं सारख्या दिसणाऱ्या, 'चतुर' म्हणजे सुंदर अशा 'उपचयाला' म्हणजे पुष्टीला 'बिभ्रतौ' म्हणजे धारण करणाऱ्या दिसत आहेत. त्या 'अभ्रनील'

म्हणजे आकाशासारख्या श्यामवर्ण आहेत. त्या श्रीहरीच्या दोन्ही मांड्या आमच्या अंत:करणांत अतिशय आनंद निर्माण करोत, हीच माझी मनीषा आहे. हीच माझी प्रार्थना आहे. या श्लोकाच्या पूर्वार्धीतील विशेषणें साभिप्राय असल्यामुळें परिकरालंकार आणि उत्तरार्धीतील श्रीहरीच्या दोन्ही मांड्यांचा उपमानोपमेयभाव परस्परांतच असल्यामुळें अन्योन्यालंकार असे दोन अलंकार या श्लोकांत दिसत आहेत. घटनेचा अद्भुतपणा हा अद्भुत रसाचाहि आविष्कार करीत आहे.

पीतेन द्योतते यच्चतुरपरिहितेनाम्बरेणात्युदारं
जातालंकारयोगं जलमिव जलधेर्वाडवाग्निप्रभाभिः ।
एतत्पातित्यदान्नो जघनमतिघनादेनसो माननीयं
सातत्येनैव चेतोविषयमवतरत्यातु पीताम्बरस्य ॥ २१ ॥

आचार्य या एकविसाव्या श्लोकानें श्रीहरीच्या कटिप्रदेशाचें वर्णन करीत आहेत. " महीतलं तज्जघनं महीपते ! " " वासस्तु सन्ध्या नृपवर्य भूम्नः " या भागवतातील वचनांवरून भूतल हा भगवान् श्रीविष्णु यांचा कटिभाग आहे तर अरुणवर्ण असलेला उष:काल अथवा संधिकाल हा परमेश्वरानें परिधान केलेलें देदीप्यमान पीतवस्त्र होय, अशा भावनेनें श्रीविष्णूच्या विराट् स्वरूपाचें चिंतन करावें अशी उपासनातत्त्व-वेत्त्यांची परिपाटी आहे.

" पीताम्बररय एतत् जघनं चेतोविषयं
अवतरत् अतिघनात् एनसः नः पातु । "

पीतांबरधारी असलेल्या श्रीहरीचा कटिभाग आमच्या अंत:करणांत प्रकट होऊन अत्यंत प्रबल असलेल्या पातकापासून तो आमचें रक्षण करो, असा या श्लोकाचा मुख्य अन्वय आणि त्याचा अर्थ आहे.

अत्यंत सुंदर रीतीनें परिधान केलेला पीतांबर म्हणजे सुवर्णासारखें देदीप्यमान असलेलें जरीकांठी नेसण्याचें रेशमी वस्त्र. या वस्त्रानें श्रीहरीचा कटिभाग फारच उत्तम रीतीनें शोभत आहे. त्या कटिभागावर सुवर्णाचे अलंकार घातलेले असल्यामुळें वडवाग्नीच्या तेजानें समुद्राचें जल जसें शोभावें त्याप्रमाणें श्रीहरीच्या कटिभागाची शोभा दिसत आहे. असा श्रीहरीच्या कमरेचा भाग मोठा 'माननीय' म्हणजे प्रशंसा करण्यास योग्य आहे. तो आम्हांला अत्यंत पतित बनविणाऱ्या

प्रबल पातकापासून आमचें सतत रक्षण करो. आमच्या अंतःकरणांत श्रीहरीच्या कटिभागाचा साक्षात्कार होऊन त्यानें आमचें घोर पातकांपासून रक्षण करावें हींच माझी मनीषा आहे.

वर्णाश्रमानुरूप अशीं जीं श्रुतिस्मृतिविहित कर्तव्यकर्मे त्यांचें विधिपूर्वक आचरण करणें आणि निषिद्ध कर्मांपासून परावृत्त असणें या दोन्ही गोष्टी ज्याच्या हातून घडत नाहींत तो निरयरूपी घोर अंधकारांत पडतो म्हणून त्याला 'पतित' असें म्हणतात. या पतिताच्या कपाळीं उत्तरोत्तर घोर अधःपातच असतो. बुडत्याचा पाय खोलांत या म्हणीप्रमाणें त्याच्या हातून सतत उपपातकें व महापातकें घडत रहातात आणि त्यांतच तो बुडत रहातो. या सर्व अनर्थांतून मुक्त व्हावयाचें असेल तर रोज रात्रीचा एकचतुर्थांश भाग शिल्लक राहिला असतां अर्थात् पहाटेच सुमारे चार साडेचार वाजतां 'ब्राह्म' मुहूर्तावर उठून या स्तोत्रांत आचार्यांनीं वर्णन केल्याप्रमाणें भगवान् श्रीविष्णु यांच्या नखशिखान्त विश्वव्यापी विराट् स्वरूपाचें चिंतन करावें. विष्णुस्वरूपी परब्रह्माचें चिंतन करावें. याच उद्देशानें येथे श्रीहरीला उद्देशून 'पीतांबर' हा शब्द योजला आहे. 'पीतं अम्बरं यस्य सः' असा षष्ठीबहुव्रीहि समास मानला तर पीतांबर शब्दाचा अर्थ पीतवस्त्र परिधान केलेला भगवान् श्रीविष्णु असा होतो, तर 'पीतं अम्बरं येन सः' असा तृतीयाबहुव्रीहि समास मानल्यास आकाशाला पिऊन टाकणारा अर्थात् आकाशाचाहि आत्मस्वरूपांत लय करून घेणारा सच्चिदानंद परिपूर्णपरब्रह्मस्वरूप असलेला परमात्मा असा त्याचा अर्थ होतो. या परब्रह्मरूपी आदिविष्णूचें — महाविष्णूचें पहाटेच्या वेळीं चिंतन केल्यास सर्व पापांचा समूळ नाश होतो व चिंतन करणारा पूर्ण शुद्धस्वरूप होतो. "उपपातकेषु सर्वेषु पातकेषु महत्सु च। रजन्याः पादमेकं तु ब्रह्मध्यानं समाचरेत्॥ अतिपापप्रसक्तोऽपि ध्याय-न्निर्विषयोऽच्युतम्। भूयस्तपस्वी भवति पङ्क्तिपावन-पावनः॥" सर्व उपपातकें व महापातकें असलीं तरी रात्रीचा एकचतुर्थांश अर्थात् पहाटेच्या प्रहरीं ब्रह्म-चिंतन करावें. इंद्रियांना अंतर्मुख करून — सर्व विषयांपासून परावृत्त करून एकाग्र चित्तानें पहाटे ब्रह्मचिंतन केल्यास तो अतिपातकी असला तरी अच्युताच्या — श्रीमहाविष्णूच्या ध्यानानें पुन्हां तो तपस्वी होतो. शुद्ध होतो. पंक्तिपावन असलेल्या परम पवित्र महात्म्यालाहि तो पावन करतो! "यथाग्निरुद्धतशिखः कक्षं दहति सानिलः। तथा चित्तस्थितो विष्णुर्योगिनां सर्वकिल्बिषम्॥" प्रदीप्त झालेला

वाऱ्यानें भडकलेला अग्नि हा जसा वाळलेल्या गवताच्या राशींना क्षणांत भस्मसात् करून टाकतो त्याचप्रमाणें योगीजनांच्या अंतःकरणांत स्थिरावलेला आदिपुरुष महाविष्णु हा योगीजनांच्या सर्व पातकांना नष्ट करून टाकतो. पहांटेच्या वेळीं निवान्त स्थळीं एकान्तांत दिव्याच्या मंद प्रकाशामध्यें एकाग्र चित्तानें श्रीहरीचें ध्यान करणें हा योगच होय आणि या योगाचें आचरण करणारे भक्तजन ते योगीच होत. या श्लोकाच्या पूर्वार्धांत दृष्टान्तालंकार असून उत्तरार्धांत स्वभावोक्ति अलंकार साधला आहे.

यस्या दाम्ना त्रिधाम्नो जघनकलितया भ्राजतेऽङ्गं यथाब्धे-
र्मध्यस्थो मन्दराद्रिर्भुजग-पति-महा-भोग-सन्नद्ध-मध्यः ।
काञ्ची सा काञ्चनाभा मणिवरकिरणैरुल्लसद्भिः प्रदीप्ता
कल्यां कल्याणदात्री मम मनिमनिशं कम्ररूपा करोतु ॥ २२ ॥

आचार्य या बाविसाव्या श्लोकानें श्रीहरीच्या कंबरेवर असलेल्या कंबरपट्ट्याचें वर्णन करीत आहेत. " कम्ररूपा कल्याणदात्री सा त्रिधाम्नः काञ्ची मम मतिं अनिशं कल्यां करोतु " 'कम्ररूपा' म्हणजे विविध प्रकारच्या शिल्पकलांनीं जिची रचना अत्यंत सुंदर व शोभायमान दिसत आहे अशी अत्यंत मनोहर आणि कल्याणदायक असलेली श्रीहरीची 'काञ्ची' म्हणजे कंबरपट्टा, माझ्या बुद्धीला निरंतर 'कल्या' म्हणजे निर्मल, शुभ आणि भगवत्स्वरूपाला व तत्त्वाला जाणण्यांत दक्ष-कुशल अशी करो. असा या श्लोकांतील मुख्य अन्वय आणि त्याचा अर्थ समजावा. कसा आहे श्रीहरीचा कंबरपट्टा तें पहा :

सोन्याचीं बारीक घुंगरें अथवा घागऱ्या ज्यांच्यामध्यें विशिष्ट प्रकारच्या आकारांनीं बसविलेल्या आहेत अशा सोन्याच्या बारीक सांखळ्यांनीं कमरेभोंवतीं घालण्यासाठीं तयार केलेल्या विशिष्ट प्रकारच्या अलंकारास कांची, मेखला अथवा कंबरपट्टा असें म्हणतात. स्त्रियांचा कंबरपट्टा सोन्याच्या पट्ट्यानें तयार करतात तर पुरुषांचा कंबरपट्टा हा सोन्याच्या सांखळ्यांनीं बनवितात. हा दोहोंतला फरक आहे. सर्व सर्पांचा अधिनायक असलेल्या वासुकि सर्पाचा लांबलचक असलेला विशाल देह ज्याच्या मध्यभागीं गुंडाळलेला आहे असा मंदर पर्वत समुद्रामध्यें ठेवला असतांना जशी शोभा दिसावी त्याप्रमाणें 'त्रिधामा' म्हणजे भगवान् श्रीविष्णु यांची कंबरपट्ट्यानें गुंडाळली गेलेली कंबर अथवा कंबरेजवळचा भाग

किंवा सर्वच देह अत्यंत सुंदर शोभत आहे. तो श्रीहरीचा कंबरपट्टा सोन्यासारखा (तापवून शुद्ध केलेल्या सोन्याप्रमाणें) देदीप्यमान असून त्याच्यावर अनेक प्रकारच्या हिरे, माणिक, पाचू, इंद्रनील इत्यादि उत्तमोत्तम रत्नांच्या किरणांच्या छटा झळकत असल्यामुळें तो अधिकच लकाकत आहे. तो श्रीहरीचा कंबरपट्टा माझ्या बुद्धीला निरंतर निर्मल करो.

या श्लोकांत श्रीहरीला 'त्रिधामा' असें म्हटलेलें आहे. यांतला अभिप्राय असा : 'त्रीणि धामानि यस्य सः त्रिधामा' जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तिन्ही अवस्थांचा साक्षी म्हणून तिन्ही अवस्थेंत विराजमान असल्यामुळें आदि-पुरुष परमात्मा भगवान् श्रीविष्णु यांना त्रिधामा असें म्हणतात. अथवा ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद हे वेद ज्यांचें धाम म्हणजे स्थान आहेत. प्रतिपाद्य रूपानें श्रीहरि हे वेदत्रयींतच विराजमान आहेत. 'वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यः' 'सर्वे वेदा यत्पदमामनन्ति' 'तं त्वौपनिषदं पुरुषं पृच्छामि' इत्यादि वचनांवरून श्रीहरीचें यथार्थ स्वरूप वेदच प्रतिपादन करूं शकतात ही गोष्ट सिद्ध होते. इतर ग्रंथ हे वेदांचाच अनुवाद करून श्रीहरीचें स्वरूप प्रतिपादन करीत असल्यामुळें वरच्या विधानाला बाध येत नाहीं. अथवा भूलोक, भुवर्लोक आणि स्वर्लोक या तिन्ही लोकांना श्रीहरीनें व्यापलेलें असल्यामुळें त्याला त्रिधामा असें म्हणतात. अथवा 'धाम' शब्दाचा अर्थ तेज असा केल्यास सूर्य, चंद्र आणि अग्नि या तिन्ही ठिकाणीं असलेलें तेज हें महाप्रभु भगवान् श्रीविष्णु यांचेंच तेज होय. "यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम्। यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम्॥" असें गीतेंत भगवान् श्रीकृष्ण स्वतःच सांगत आहेत. याहि अभिप्रायानें श्रीहरीला 'त्रिधामा' असें म्हटलेलें आहे. तात्पर्य वेदप्रतिपाद्य, सर्वसाक्षी, सर्वव्यापी आणि सर्वप्रकाशक असा परब्रह्म परमात्मा हा त्रिधामा या शब्दाचा अर्थ आहे.

देव हे गुराख्याप्रमाणें हातांत काठी घेऊन भक्तांचें रक्षण करीत नसतात. ज्यांचें रक्षण करावें अशी देवांना इच्छा असते, त्यांना ते उत्तम बुद्धि देऊनच त्यांचें रक्षण करीत असतात. "न देवा दण्डमादाय रक्षन्ति पशुपालवत्। यं हि रक्षितुमिच्छन्ति बुद्ध्या संयोजयन्ति तम्॥" (महाभारत) सर्व लाभापेक्षां बुद्धिलाभ श्रेष्ठ असल्यामुळें आचार्यांनीं या श्लोकांत निर्मल आणि समर्थ अशा बुद्धीची मागणी केलेली आहे. या श्लोकांत दृष्टान्तालंकार मोठा बहारीचा आहे.

उन्नम्रं कम्रमुच्चैरुपचितमुदभूद्यत्र पद्मैर्विचित्रैः
पुण्यं गीर्वाणपूज्यं कमलजमधुपस्यास्पदं तत्पयोजम् ।
तस्मिन्नीलाश्मनीलैस्तरल-रुचि-जलैः पूरिते केलिबुद्ध्या
नालीकाक्षस्य नाभीसरसि वसतु नश्चित्तहंसश्चिराय ॥ २३ ॥

या तेविसाव्या श्लोकानें आचार्य श्रीहरीच्या नाभिस्थानाचें वर्णन करीत आहेत. "नः चित्तहंसः नालीकाक्षस्य नाभीसरसि केलिबुद्ध्या चिराय वसतु" आमचें चित्त हाच कोणी एक राजहंस आहे. तो 'नालीकाक्ष' म्हणजे कमल-नयन अशा श्रीहरीच्या नाभीरूपी सरोवरामध्यें हें आपलें क्रीडास्थान आहे अशा भावनेनें नित्य वास्तव्य करो असा या श्लोकाचा मुख्य अन्वयार्थ आहे. श्रीहरीचें नाभिकमल कसें आहे तें पहा :

'उन्नम्र' म्हणजे अत्यंत वर आलेलें, उमें असलेलें 'कम्र' म्हणजे रमणीय मनोहर अशा तऱ्हेचें एक सप्तद्वीप-नवखंड-रूपी चित्रविचित्र पाकळ्यांनीं युक्त असलेलें अत्यंत भव्य कमल जेथून सृष्टीच्या आरंभींच उदयाला आलें – उद्भवलें तेंच तें श्रीहरीचें नाभिसरोवर होय. या सरोवरांतून निर्माण झालेलें कमल सर्व देवांना अत्यंत पूज्य – वंदनीय आहे. प्रशंसनीय आहे. 'कमलज' म्हणजे ब्रह्मदेव हाच कोणी मधुप म्हणजे भ्रमर, त्याचें तें वसतिस्थान आहे. श्रीहरीचें नाभि-स्थान सरोवराप्रमाणें गंभीर असल्यामुळें त्याला नाभिसरोवर असें म्हणतात. तें श्रीहरीचें नाभिसरोवर जणुं कांहीं इंद्रनीलरत्नांच्या कांतीप्रमाणें नीलवर्ण असलेल्या श्रीहरीच्या लकाकणाऱ्या अंगकांतिरूपी जलानें पूर्ण भरलेलें आहे. अशा त्या श्रीहरीच्या नाभिसरोवरामध्यें आमचा हा मानसराजहंस आनंदानें चिरकाल वसति करून राहो.

उमललेल्या कमलांनीं युक्त असलेलें सरोवर हें हंसांचें आवडतें स्थान होय. विशेषेंकरून मानससरोवर हें हंसांचें व राजहंसांचें अधिक आवडतें स्थान आहे. यद्यपि मानससरोवरांत कमळें नाहींत. कारण तें समुद्रसपाटीपासून सोळा हजार फूट उंचावर आहे व तेथें नेहमींच बर्फ असतें. बर्फ हें कमळांना अत्यंत प्रतिकूल असल्यामुळें तेथें कमळें असूं शकत नाहींत. तथापि मानससरोवराचें पाणीच इतकें आकर्षक आहे कीं, तें पाहिल्याबरोबर मन तेथें सहजच रमतें. स्वभावतःच अत्यंत स्वच्छ असलेल्या

मानससरोवराच्या जलांत जेव्हां निरभ्र आकाश प्रतिबिंबित होतें तेव्हां तें जल श्रीहरीच्या अंगकांतीप्रमाणेंच नीलवर्ण दिसूं लागतें. सुवर्ण, पुष्परज, हिरा, पाचू आणि माणिक इत्यादि रत्नांच्या चूर्णांप्रमाणें सभोंवार पसरलेल्या आणि पाण्यांत असलेल्या वाळूवंरांची व खडुकाकणांची छटा त्यांत संमिश्र झाल्यामुळें तर मानससरोवराचें जल मनाला फारच फार आकर्षक वाटतें! असें वाटतें कीं, बेधून हलूंच नये! अशा या अद्वितीय सौंदर्याचा लाभ घेण्यासाठींच राजहंस मानससरोवरांत विहार करीत असतात.

श्रीहरीचें नाभिसरोवर असेंच आहे. स्वाभाविकच अत्यंत देदीप्यमान असलेली नीलवर्ण श्रीहरीची अंगकांति त्यांत समावलेली आहे. त्यांत श्रीहरीच्या कमरेभोंवतीं विराजत असलेल्या शुद्ध सुवर्णाच्या कंबरपट्ट्याची पीतछटा प्रतिबिंबित झालेली आहे. कंबरपट्ट्यावर जडविलेल्या विविध रत्नांच्या — विविध वर्णांच्या छटाहि पण त्यांतच संमिश्रित झाल्यामुळें श्रीहरीच्या नाभिसरोवराची शोभा कांहीं अलौकिकच दिसत आहे. तशांतच तेथें श्रीहरीच्या गळ्यांतील वैजयंतीमाळाहि संलग्न झाल्यामुळें माळेंतील पुष्पांचें आणि तुलसीमंजरींचें सौगंध्यहि मनाला अत्यंत आनंद देत आहे! ब्रह्मदेवाचें आसन असलेल्या विश्ववंद्य कमलाची त्यांतूनच उत्पत्ति झालेली असल्यामुळें त्याच्या अलौकिकतेंत अनिर्वचनीय भरच पडलेली आहे! असें हें श्रीहरीचें अद्वितीय नाभिसरोवर कोणत्या वेड्या भक्ताच्या मानसराजहंसाला रुचणार नाहीं?

आचार्यांनीं या ठिकाणीं मन किंवा मानस शब्द न योजतां 'चित्त' शब्द योजला आहे त्यांतहि त्यांचा सूक्ष्म अभिप्राय आहे. केवळ संकल्प-विकल्प करीत राहणें हेंच मनाचें स्वरूप आहे तर संकल्पित विषयांचा निश्चय करणें हा बुद्धीचा स्वभाव किंवा कार्य आहे. अहंकार हा केवळ अभिमान व्यक्त करीत असतो तर या तिन्ही शक्तींचा आविष्कार चित्तांत होत असतो. मनाचा संकल्प, बुद्धीचा निश्चय आणि अहंकाराचा अभिमान या तिन्ही वृत्तींना आकलन करण्याची शक्ति चित्तांत असल्यामुळें मन, बुद्धि आणि अहंकार या अंतःकरणाच्या अंशापेक्षां चित्तरूपी अंतःकरणाचा चौथा अंश अत्यंत सूक्ष्म आणि श्रेष्ठ आहे. "मनस्तु संकल्पविकल्पकारि बुद्धिस्तु संकल्पितनिश्चयात्मा। अहंकृतिर्नाम स योऽभिमानः, चित्तं तु तद् यत् त्रयमप्यवैति॥" असें स्वतः आचार्यांनींच सांगितलेलें आहे. हाच सूक्ष्म भेद लक्षांत घेऊन आचार्यांनीं मनोहंस किंवा मानसहंस असा

शब्दप्रयोग न करतां 'चित्तहंस' हा शब्द योजला आहे. 'चिराय वसतु' या शब्दांनीं धारणासिद्धीची प्रार्थना आचार्यांनीं ध्वनित केलेली आहे. प्रत्यक्ष शब्दांनीं अर्थ प्रकट न करतां शब्दांच्या अथवा वाक्याच्या गर्भातून अभिमत अर्थ प्रकट करणें याला साहित्यांत ध्वनि अथवा व्यञ्जना असें म्हणतात. व्यवहारांत आपण त्याला गर्भितार्थ असें म्हणतो. या श्लोकांत रूपक अलंकार फारच सुंदर साधला आहे. तो समस्त वस्तुविषयक असल्यामुळें त्याला सावयवरूपक असें म्हणतात.

पातालं यस्य नालं वलयमपि दिशां पत्रपङ्क्तीर्नगेन्द्रा-
न्विद्मः केसरालीर्विदुरिह विपुलां कर्णिकां स्वर्णशैलम् ।
भूयाद्गायत्स्वयंभूमधुकरभवनं भूमयं कामदं नो
नालीकं नाभिपद्माकरभवमुरु तन्नागशय्यस्य शौरेः ॥ २४ ॥

आचार्य या चोविसाव्या श्लोकानें श्रीहरीच्या नाभिस्थानांतून निर्माण झालेल्या कमलाची स्तुति करीत आहेत. " नागशय्यस्य शौरेः नाभिपद्माकरभवं तत् भूमयं नालीकं नः कामदं भूयात " असा या श्लोकाचा मुख्य अन्वय आहे. शेषशायी भगवान् श्रीविष्णु हे शूरवंशांत श्रीकृष्ण रूपानें अवतीर्ण झाले म्हणून त्यांना शौरि असें म्हणतात. त्यांच्या नाभिसरोवरांतून निर्माण झालेलें तें भूलोकरूपी कमल आमच्या मनांतील सर्व कामना पूर्ण करणारें होवो. असा या मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. श्रीहरीच्या नाभिस्थानांतून निर्माण झालेलें तें कमल कसें आहे तें पहा :

पातालललोक हा श्रीहरीच्या नाभिस्थानांतून प्रकट झालेल्या कमलाचा नाल आहे. नाल म्हणजे कमलाखालची पोकळ नळी. दाही दिशांचें मंडल अर्थात् दाही दिशांना असलेले प्रदेश ह्याच त्या कमळाच्या पाकळ्या समजाव्यात. " भारताः केतुमालाश्च भद्राश्वाः कुरवस्तथा । पत्राणि लोकपद्मस्य " भारतवर्ष, केतुमालवर्ष इत्यादि देश हीं त्या कमलाचीं दलें आहेत. या विविध देशांना विभक्त करणारे निषध, हेमकूट, हिमालय, माल्यवान्, गंधमादन, मंदर, मेरुमंदर, नील आणि श्वेत इत्यादि प्रचंड मर्यादापर्वत हेच त्या कमलांतील 'केसराली' म्हणजे कमलतंतु समजावेत. प्रचंड पर्वतांचा समुदाय ह्याच त्या कमलांतील तंतूंचा समुदाय होय असा याचा अर्थ आहे. त्याचप्रमाणें विपुल म्हणजे विशाल लक्ष-योजनें उंच असलेला विस्तीर्ण सुवर्णाचा सुमेरुपर्वत हाच त्या कमलाचा मध्यकोश समजावा. कोश म्हणजे फुलाफळांतील देठापासून निमुळता होत वर जाणारा

टणक भाग. यालाच संस्कृतमध्यें 'कर्णिका' असेंहि म्हणतात. यालाच 'बीजकोष' असेंहि म्हणतात. " भूपद्मस्यास्य शैलोऽसौ कर्णिकाकारसंस्थितः " असें त्याचें वर्णन केलेलें आहे. त्या कमळामध्यें श्रीहरीचें गुणगान करीत बसलेले ब्रह्मदेव हाच त्या कमळांतील गुंजारव करणारा 'मधुकर' म्हणजे भुंगा होय. ब्रह्मदेवरूपी भ्रमराचें तें कमळ 'भवन' म्हणजे वसतिस्थानच आहे. असें ज्या कमळाचें स्वरूप मनु, याज्ञवल्क्य, व्यास, वाल्मीकि वगैरे विद्वान् विद्वान् लोकच जाणतात. कारण त्यांनीं आपल्या दिव्य दृष्टीनें भगवत्तत्वाचा साक्षात्कार करून घेतलेला असतो. तात्पर्य, असें हें पन्नास कोटि योजनें विस्तीर्ण असलेलें भूमंडलरूपी भगवान् श्रीविष्णु यांच्या नाभिस्थानांतून निर्माण झालेलें 'नालीक' म्हणजे कमळ, तें 'उरु' म्हणजे अत्यंत श्रेष्ठ आहे. तें आमच्या मनांतील सर्व कामना पूर्ण करो. या श्लोकांत समस्त वस्तूंचें रूपकानें वर्णन केलेलें असल्यामुळें याला साहित्यिक विद्वान् सावयवरूपक अलंकार असें म्हणतात.

आदौ कल्पस्य यस्मात्प्रभवति विततं विश्वमेतद्विकल्पैः
कल्पान्ते यस्य चान्तः प्रविशति सकलं स्थावरं जङ्गमं च ।
अत्यन्ताचिन्त्यमूर्तेश्चिरतरमजितस्यान्तरिक्षस्वरूपे
तस्मिन्नस्माकमन्तःकरणमतिमुदा क्रीडतात्क्रोडभागे ॥ २५ ॥

पंचविसाव्या आणि सव्वीसाव्या श्लोकांनीं आचार्य श्रीहरीच्या उदराचें वर्णन करीत आहेत. " अत्यन्ताचिन्त्यमूर्तेः अजितस्य अन्तरिक्षस्वरूपे क्रोडभागे अस्माकं अन्तःकरणं अतिमुदा चिरतरं क्रीडतात् " ज्याचें स्वरूप अत्यंत अचिन्त्य आहे असा जो अजित म्हणजे परमात्मा भगवान् श्रीविष्णु त्याच्या अंतरिक्षस्वरूप असलेल्या – आकाशस्वरूप असलेल्या उदराच्या ठिकाणीं आमचें अंतःकरण अत्यंत आनंदानें निरंतर खेळत राहो, असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. कसें आहे श्रीहरीचें उदर तें पहा :

सृष्टीच्या आरंभकाळीं हें नामरूपात्मक विविध भेदांनीं नटलेलें विशाल विश्व ज्याच्यापासून जन्माला येतें आणि तसेंच सृष्टीच्या अंतीं अर्थात् प्रलयकाळीं हें सर्व स्थावर आणि जंगम विश्व ज्याच्यामध्यें प्रविष्ट होतें त्या श्रीहरीच्या अंतरिक्षस्वरूप असलेल्या विशाल उदराच्या ठिकाणीं आमचें मन सर्वकाळ रमत राहो. लहान मूल जसें आईच्या कडेवर आनंदांत असतें त्याचप्रमाणें आमचें मन

श्रीहरीच्या क्रोडभागीं अत्यंत आनंदानें रमत राहो हीच श्रीहरीच्या चरणीं आमची प्रार्थना आहे असा या श्लोकाचा अर्थ आहे. " यतो वा इमानि भूतानि जायन्ते " इत्यादि श्रुतिवचनांवरून विश्वाच्या उत्पत्तीचें, प्रलयाचें व स्थितीचेंहि अधिष्ठान असलेलें श्रीहरीचें उदर हें परब्रह्मच होय. या परब्रह्मस्वरूपीं आपल्या मनानें रमावें असा अभिप्राय अत्यंत सूक्ष्म रीतीनें या श्लोकांत सूचित केलेला असल्यामुळें याला सूक्ष्मालंकार म्हणतात. त्याचप्रमाणें रूपकहि आहेच.

कान्त्यम्भःपूरपूर्णे लसदलित-वली-भङ्ग-भास्वत्तरङ्गे
गम्भीराकार-नाभी-चतुर-तर-महाऽऽवर्तशोभिन्युदारे ।
क्रीडत्वानन्द-हेमोदर-नहन-महा-वाडवाग्नि-प्रभाढ्ये
कामं दामोदरीयोदर-सलिल-निधौ चित्त-मत्स्यश्चिरं नः ॥२६॥

" दामोदरीयोदर-सलिल-निधौ नः चित्तमत्स्यः चिरं कामं क्रीडतु " दामोदराच्या -- श्रीहरीच्या उदररूपी सागरामध्यें आमचें चित्त हाच कोणी एक मासा तो चिरकाल यथेच्छ विहार करीत राहो. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. आदि पुरुष भगवान् श्रीमहाविष्णु हे दामोदर कसे बनले तो इतिहास मोठा गमतीचा आहे. पहा : भगवान् श्रीविष्णु हे श्रीकृष्णरूपानें अवतरले असतां त्यांनीं बालपणीं नंद-यशोदा यांच्या घरीं फार खोड्या केल्या ! एकदां यशोदा सूर्योदयाच्या वेळीं दधिमंथन करूं लागली. श्रीकृष्णाला त्या वेळीं पिण्याची लहर आली. तो यशोदेला कांही दहीं घुसळूं देईना. अगदी खळीस आला. यशोदेनें त्याला घेतलें. ती त्याला पाजूं लागली. समोर चुलाण्यावर मोठ्या पातेल्यांत दूध तापत ठेवलें होतें. तें वर आलें. दूध उतूं जाऊं नये म्हणून चुलाण्यांतील जाळ कमी करण्याकरितां यशोदेनें श्रीकृष्णाला खालीं ठेवलें व धांवतच ती चुलाण्याकडे गेली ! इकडे श्रीकृष्णानें रागारागानें दह्याचा डेरा फोडून टाकला ! जमा झालेले लोणी घेऊन स्वारी मागील दारीं पळाली ! तेथें एक दगडाची उखळी पालथी घातलेली होती. तिच्यावर बसून तें लोणी त्यानें स्वतः खाल्लें आणि उरलेलें माकडांना चारूं लागला ! यशोदा परत येऊन पहाते तो डेरा फुटलेला व लोणीहि नाहींसें झालेलें ! कृष्णाचाच हा खेळ होय हें जाणून ती रागावली. हातांत छपाटी घेऊन कृष्णाला शोधूं लागली. परसदारीं श्रीकृष्णाला तिनें पाहिलें. कृष्णाला चाहूल लागतांच

क्षणदिशी उडी मारून तो पळाला ! यशोदा मागें धांवत आहे व तो पुढें पळत आहे असा कांहीं वेळ जणुं कांहीं शिवणाट्याणीचा खेळ झाला ! यशोदा थकली. शेवटीं श्रीकृष्णानें आपण होऊन स्वतःला यशोदेच्या स्वाधीन करून घेतलें ! यशोदेला वाटलें कीं, मीच त्याला पकडलें ! लबाडा ! आतां कोठें जाशील ? थांब तुला मी दोरानें बांधून टाकतें असें म्हणून ती घरांतील दावें त्याच्या पोटाला गुंडाळूं लागली. तें अपुरें पडलें ! दुसरें आणलें. तेंहि पुरेना ! तिसरें आणलें. तेंहि कमीच पडलें. श्रीकृष्णानें तिचा शीण पाहून स्वतः होऊनच बांधून घेतलें ! तिला वाटलें मीच कृष्णाला बांधलें ! कृष्णाला उखळीस बांधून ती घरांत निघून गेली ! इकडे कृष्णानें ती प्रचंड दगडाची उखळी आडवी पाडली आणि गाडागाडा करीत तो त्या उखळीला ओढूं लागला ! जवळच दोन मोठे जुळे वृक्ष उभे होते. त्यांच्या फटींतून श्रीकृष्ण पुढे गेला ! उखळी झाडांच्या मुळाशीं अडली. श्रीकृष्णानें जोरांत उखळी ओढण्याचा प्रयत्न केला त्यासरशी ते दोन्ही वृक्ष काड्काड् आवाज करीत उन्मळून पडले ! सारे गोप दचकले. नंद दचकला. गोपाल-बालकें श्रीमंगल, मधुमंगल, जयमंगल, विल्वमंगल तसेंच श्रीदामा, सुदामा इत्यादि सर्वांनीं झालेला प्रकार नंदास सांगितला. कोणालाहि खरेंच वाटेना ! सर्वजण श्रीकृष्णाजवळ जमले. पहातात तर श्रीकृष्णाच्या पोटाला दावें बांधलेलें. तें दावें उखळीस बांधलेलें आहे. ती उखळी त्या दोन झाडांच्या मुळांशीं अडलेली आहे व झाडें उन्मळून पडलेलीं आहेत ! नंद धांवतच श्रीकृष्णाजवळ गेला आणि श्रीकृष्णाच्या पोटाला बांधलेलें दावें सोडलें ! झालें. तेव्हांपासूनच श्रीकृष्णाला दामोदर हें नांव पडलें ! दाम म्हणजे दावें आणि उदर म्हणजे पोट. अशा रीतीनें आदिपुरुष भगवान् महाविष्णु हे दामोदर झाले !

आतां दामोदराच्या या उदररूपी विशाल सागरांत पाणी कोणतें आहे ? तरंग कोणते आहेत ? पाण्यांतला भोंवरा कोणता आहे ? इत्यादि गोष्टींचें आचार्य वर्णन करीत आहेत. पाण्यानें भरलेल्या ढगाप्रमाणें श्यामवर्ण असलेली परमेश्वराची अंगकान्ति हेंच एक प्रकारचें जल होय. या कान्तिरूपी जलाच्या पुरानें हा भगवंताचा उदररूपी सागर पूर्ण भरलेला आहे. त्या उदराच्या ठिकाणीं शोभून दिसणाऱ्या ज्या नीलवर्ण अशा निरनिराळ्या तीन वळ्या आहेत त्या जणुं कांहीं या सागरावर उसळणारे सुंदर तरंगच होत. गंभीर आकाराची जी श्रीहरीची नाभी आहे ती जणुं कांहीं या सागरावरील अत्यंत सुंदर असा एक मोठा भोंवराच

होय. या भोंवऱ्यानें श्रीहरीच्या उदररूपी सागराला फारच शोभा आलेली आहे. अशा या 'उदार' म्हणजे भव्य असलेल्या आणि त्याचप्रमाणें कमरेभोंवतीं परिधान केलेल्या भरजरी पिंवळ्या वस्त्राची आणि रत्नजडित सुवर्णाच्या कंबरपट्याची पिंवळी छटा मिसळल्यामुळें श्रीहरीचा उदररूपी सागर विशाल अशा वडवाग्नीच्या तेजानें सुशोभित झालेला दिसत आहे. अशा या श्रीदामोदराच्या उदररूपी सागरांत आमचा हा अंतःकरणरूपी मासा यथेच्छ चिरकाल क्रीडा करीत राहो. तात्पर्य, श्रीहरीच्या विशाल आणि रमणीय उदराच्या ठिकाणीं माझ्या मनानें नित्य रमावें हीच माझी मनीषा आहे. ज्याप्रमाणें पाण्यांतून बाहेर काढलेला मासा प्राणान्तिक वेदनांनीं व्याकुळ होतो आणि पाणी मिळाल्याबरोबर त्यांत आनंदानें रमतो त्याचप्रमाणें माझ्या जीवानें श्रीहरीच्या स्वरूपचिंतनावांचून कष्टी व्हावें व श्रीहरीच्या स्वरूप साक्षात्कारांत सदा रमावें हीच माझी इच्छा आहे. आपल्याहि जीवाची अशीच अवस्था होणें अत्यंत श्रेयस्कर आहे. याहि श्लोकाला तेविसाव्या श्लोकाप्रमाणें समस्तवस्तु-विषयक सावयवरूपक अलंकारानें उत्तम शोभा प्राप्त झालेली आहे.

नाभी-नालीक-मूलादधिक-परिमलोन्मोहितानामलीनां
माला नीलेव यान्ती स्फुरति रुचिमती वक्त्रपद्मोन्मुखी या ।
रम्या सा रोमराजिर्महित-रुचिकरी मध्यभागस्य विष्णो-
श्चित्तस्था मा विरंसीच्चिरतरमुचितां साधयन्ती श्रियं नः ॥२७॥

आचार्य या सत्ताविसाव्या श्लोकानें श्रीहरीच्या उदरस्थलीं असलेल्या आणि नाभिस्थानापासून वर जाणाऱ्या रोमराजीचें वर्णन करीत आहेत. " नः चित्तस्था सा विष्णोः मध्यभागस्य रोमराजिः उचितां श्रियं चिरतरं साधयन्ती मा विरंसीत् " आमच्या अंतःकरणांत असलेली भगवान् श्रीविष्णु यांच्या उदराच्या मध्यभागीं असलेली रोमपंक्ति आम्हांला योग्य अशा वैभवाला चिरकाल प्राप्त करून देत असतांना कधींहि विराम न पावो. ती आम्हांला अभीष्ट असलेल्या वैभवाची सतत प्राप्ति करून देत राहो. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. कशी आहे ती श्रीहरीच्या उदरभागीं विराजमान असलेली रोमराजी तें पहा : श्रीहरीच्या नाभिस्थानीं असलेल्या कमळाच्या मूळप्रदेशांतून श्रीहरीच्या मुखकमलाकडे निघालेल्या भ्रमरांची जणूं कांहीं ती मालाच आहे. कोणी

म्हणेल कीं, श्रीहरीच्या नाभिकमळाला सोडून ते भ्रमर मुखकमळाकडे कां बरें निघाले ? याच प्रश्नाचें उत्तर देण्याकरितां आचार्यांनीं त्या भ्रमरांना 'अधिक-परिमलोन्मोहित' असें विशेषण दिलेलें आहे. नाभिकमळापेक्षां मुखकमळाचें सौगन्ध्य अधिक असल्यामुळें त्या अधिक परिमलाला मोहित होऊन ते भ्रमर नाभिकमलाला सोडून श्रीहरीच्या मुखकमलाकडे निघाले ! ती मुखकमलाकडे जाण्यास उन्मुख झालेली अत्यंत सुंदर दिसणारी, नीलवर्ण अशा भ्रमरांची मालाच जणुं कांहीं रोमराजीच्या रूपानें भगवान् श्रीविष्णु यांच्या उदरभागीं शोभत आहे. ती अत्यंत रम्य असून श्रीहरीच्या उदरप्रदेशाला फारच उत्कृष्ट रीतीनें सुशोभित करीत आहे. अशी ही भगवान् श्रीविष्णु यांच्या उदराच्या ठिकाणीं असलेली मंगलमय रोम-राजि आमच्या चित्तांत ठसलेली आहे. आम्हांला चिरकाल योग्य अशा वैभवाला प्राप्त करून देणारी ती रोमराजि आपल्या कार्यांत कधींहि विराम न पावो. केवल ऐश्वर्यभोगाची इच्छा करणाऱ्याला ऐश्वर्य देऊन, मोक्षाची इच्छा करणाऱ्याला मोक्ष देऊन आणि उभयविध फलांची इच्छा करणाऱ्याला भुक्ति आणि मुक्ति देऊन सर्वांचे सर्व मनोरथ ती सतत पूर्ण करीत राहो हीच आमची मनीषा आहे. या श्लोकांत उपमेय असलेली श्रीहरीच्या उदरावरील रोमराजि ही जणुं कांहीं उपमानरूप म्हणजे भ्रमरांचा समूहच आहे असें वर्णन केल्यामुळें उत्प्रेक्षालंकार अत्यंत उत्कृष्ट साधला आहे.

संस्तीर्णं कौस्तुभांशु-प्रसर-किसलयैर्मुग्ध-मुक्ताफलाढ्यं
श्रीवासोल्लासि फुल्ल-प्रतिनव-वनमालाङ्कि राजद्भुजान्तम् ।
वक्षः श्रीवत्स-कान्तं मधुकर-निकर-श्यामलं शार्ङ्गपाणेः
संसाराध्व-श्रमार्तैरुपवनमिव यत् सेवितं तत्प्रपद्ये ॥ २८ ॥

आचार्य या अठ्ठाविसाव्या श्लोकानें भगवान् श्रीविष्णु यांच्या वक्षःस्थळाचें वर्णन करून स्तुति करीत आहेत. " संसाराध्वश्रमार्तैः उपवनं इव यत् सेवितं तत् शार्ङ्गपाणेः वक्षः अहं प्रपद्ये " संसारमार्गांत परिभ्रमण करीत असतांना थकल्या-भागलेल्या लोकांनीं उपवनाप्रमाणें ज्याचा आश्रय घेऊन सुखी व्हावें त्या, श्री-वत्स चिह्नानें रमणीय दिसणाऱ्या शार्ङ्गपाणी भगवान् श्रीविष्णु यांच्या वक्षःस्थलाला मी शरण आलेलों आहें. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. कसें आहे श्रीहरीचें वक्षःस्थल तें पहा : कंठीं विराजत

असलेल्या कौस्तुभ रत्नाच्या किरणांच्या समूहानें तें आच्छादिलेलें दिसत आहे. किंवा कौस्तुभरत्नाच्या किरणांचा समूह त्याच्यावर पसरला असल्यामुळें तें जणुं कांहीं नव्या कोमल पालवीनें आच्छादिलेलें दिसत आहे. तसेंच टपोऱ्या सुंदर मोत्यांच्या माळांनीं तें सुशोभित दिसत आहे. लक्ष्मीच्या वास्तव्यामुळें तें 'उल्लासि' म्हणजे आनंदी अथवा समृद्ध दिसत आहे. प्रफुल्लित म्हणजे विकसलेल्या ताज्या टवटवीत फुलांनीं गुंफलेल्या वनमाला त्या वक्षःस्थलावर शोभत आहेत. तसेंच तें वक्षःस्थल भगवान् श्रीविष्णु यांच्या दोन्ही भुजांच्यामध्यें फारच सुंदर दिसत आहे. अथवा 'भुजान्त' शब्दाचा अर्थ खांदे असा घेतल्यास त्या वक्षःस्थळाजवळ श्रीहरीचे खांदेहि अत्यंत उत्तम रीतीनें शोभत आहेत असा अर्थ करावा.

भगवान् श्रीविष्णु यांचें वक्षःस्थल श्रीवत्स नांवाच्या चिह्नानें अत्यंत मनोहर दिसत आहे. त्याचप्रमाणें श्रीहरीच्या वक्षःस्थलाची कान्ति भ्रमरांच्या समूहाप्रमाणें श्यामल म्हणजे नीलवर्ण दिसत आहे. असें हें श्रीहरीचें वक्षःस्थल संसारतापानें तप्त झालेल्या लोकांचें विश्रामधाम असलेलें जणूं कांहीं तें उपवनच आहे! संसारतापानें तप्त झालेले लोक त्याच्या आश्रयानें सुखी होतात. त्या आदिपुरुष भगवान् श्रीविष्णु यांच्या वक्षःस्थलाला मी शरण आलेलों आहें. श्रीमद्भागवतामध्यें ग्रह, नक्षत्रें व तारा इत्यादि ज्योतिर्गणानें उपलक्षित असलेला स्वर्गलोक हेंच श्रीहरीचें वक्षःस्थल होय अशा भावनेनें श्रीहरीच्या वक्षःस्थलाचें ध्यान करावें असें सांगीतलेलें आहे. "उरःस्थलं ज्योतिरनीकमस्य" (भागवत: २–१–२८ पहा.) श्रीहरीचें हृदय हें भक्तजनांवर समस्त अभीष्ट फलांची वृष्टि करणारें असल्यामुळें 'हृदयं पर्जन्यः' पर्जन्य हाच श्रीहरीचें हृदय आहे अशा भावनेनें श्रीहरीच्या हृदयाची उपासना कांहीं लोक करतात तर कांहीं तत्त्ववेत्ते अव्यक्ततत्त्व हेंच श्रीहरीचें वक्षःस्थल समजतात. याहि श्लोकांत श्रीहरीचें वक्षःस्थल हें संसारमार्गांत चालून चालून थकलेल्या वाटसरूंचें विश्रांतिस्थान असलेलें जणुं कांहीं उपवनच आहे ही कल्पना अत्यंत रम्य व अन्वर्थ असल्यामुळें उत्प्रेक्षा म्हणा अथवा स्वभावोक्ति म्हणा हे अलंकार आहेतच.

कान्तं वक्षो नितान्तं विदधदिव गलं कालिमा कालशत्रो-
रिन्दोर्बिम्बं यथाङ्को मधुप इव तरोर्मञ्जरीं राजते यः।

श्रीमान्नित्यं विधेयादविरलमिलितः कौस्तुभ-श्री-प्रतानैः
श्रीवत्सः श्रीपतेः स श्रिय इव दयितो वत्स उच्चैः श्रियं नः ॥२९॥

भगवान् श्रीविष्णु हे श्रीवत्सलाञ्छन आहेत. त्यांच्या वक्षःस्थलावर विराजमान असलेल्या भृगुपदचिह्नाला श्रीवत्स असें म्हणतात. (या चिह्नाचा इतिहास पान ८०–८१ पहा). कौस्तुभरत्न हें श्रीहरीचें आत्मतेज आहे तर 'श्रीवत्स' हें त्या तेजाची फांकलेली प्रभा होय. " कौस्तुभव्यपदेशेन स्वात्मज्योतिर्बिभर्त्यजः । तत्प्रभा व्यापिनी साक्षात् श्रीवत्समुरसा विभुः ॥ " (भागवत १२।११।१०). अशा भावनेनें श्रीहरीच्या वक्षःस्थलीं असलेल्या श्रीवत्सचिह्नाची उपासना केली जाते. आचार्यांनीं केलेलें श्रीवत्साचें वर्णनहि मोठें बहारीचें आहे.

" श्रीपतेः यः श्रीवत्सः वक्षः नितान्तं कान्तं विदधत् राजते सः नः श्रियं उच्चैः विधेयात् " श्रीपति भगवान् विष्णु यांचें जें श्रीवत्सचिह्न आहे तें श्रीहरीच्या वक्षःस्थलाची अत्यंत शोभा वाढवीत त्यांच्या वक्षःस्थलीं शोभत आहे तें आमच्या वैभवाला अत्यंत श्रेष्ठ स्वरूपांत वाढवो असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. श्रीहरीच्या वक्षःस्थलीं विराजमान असलेलें तें श्रीवत्सचिह्न कसें आहे तें पहा : कालशत्रु म्हणजे महामृत्युंजय भगवान् शंकर यांच्या गळ्याच्या ठिकाणीं असलेला 'कालिमा' म्हणजे काळा डाग हा जसा शंकरांच्या गळ्याची शोभा वाढवितो किंवा चंद्राचा कलंक हा जसा चंद्रबिंबाची शोभा वाढवितो अथवा भ्रमर जसा वृक्षाच्या मंजरीला शोभवितो त्याचप्रमाणें श्रीविष्णूच्या वक्षःस्थलावरील श्रीवत्सचिह्नहि त्या वक्षःस्थलाला अत्यंत 'कान्त' म्हणजे रमणीय बनवीत तें तेथें विराजमान झालेलें आहे. तें श्रीहरीच्या वक्षःस्थलाची अत्यंत शोभा वाढवीत तेथें विराजमान झालेलें आहे. श्रीहरीच्या कंठीं विराजत असलेल्या कौस्तुभरत्नाच्या मनोहर छटा निरंतर त्या श्रीवत्सचिह्नाशीं संलग्न झालेल्या आहेत. असें तें श्रीहरीचें शोभासंपन्न असलेलें श्रीवत्सचिह्न जणुंकांहीं तें लक्ष्मीचें अत्यंत आवडतें 'वत्स' म्हणजे अपत्यच आहे. तें आमचें निरंतर कल्याण करो. आमच्या सर्वश्रेष्ठ समृद्धीला तें कारणीभूत होवो. सामुद्रिकशास्त्राच्या दृष्टीनें छातीवर असलेल्या रोमावर्ताला 'श्रीवत्स' असें म्हणतात. हें चिह्न सर्व ऐश्वर्याचें व असाधारण दर्येचें लक्षण आहे. असें चिह्न ज्याच्या छातीवर असेल तो साक्षात् ईश्वराचा अवतारच होय. आदिपुरुष भगवान् श्रीविष्णु यांच्या उजव्या-

स्तनावर हें चिह्न आहे. " श्रीवत्सेनोरसि श्रीमान् रोमावर्तेन राजते " (हरिवंश). श्रीहरीच्या उजव्या स्तनापासून धर्माचाहि आविर्भाव झालेला आहे. " दक्षिण-स्तनाद्धर्मः " (भागवत). तेथेंच लक्ष्मीचेंहि पण वास्तव्य आहे. " वक्षोऽधिवास-मृषभस्य महाविभूतेः " " यतो धर्मस्ततो जयः " हा तर सिद्धान्तच आहे. तात्पर्य, श्रीहरीचें वक्षःस्थल आणि श्रीवत्सचिह्न यांची या भावनेनें उपासना केल्यास उपासकाला धर्माचा, लक्ष्मीचा अर्थात् ऐश्वर्याचा आणि जयाचा लाभ होईल यांत शंकाच नाहीं. " यादृशीं भावनां कुर्यात् सिद्धिर्भवति तादृशी ". या श्लोकांत दृष्टान्त, उत्प्रेक्षा इत्यादि अर्थालंकार असून शब्दरचनेंत अनुप्रासाचीहि छटा आहे.

सम्भूयाम्भोधिमध्यात्सपदि महजया यः श्रिया सन्निधत्ते
नीले नारायणोरःस्थल-गगनतले हारतारोपसेव्ये ।
आशाः सर्वाः प्रकाशा विदधदपिदधच्चात्मभासाऽन्यतेजां-
व्याश्चर्यस्याकरो नो द्युमणिरिव मणिः कौस्तुभः सोऽस्तु भूत्यै ॥३०॥

आचार्य या तिसाव्या श्लोकानें श्रीहरीच्या कंठीं विराजत असलेल्या कौस्तुभ रत्नाचें वर्णन करीत आहेत. श्रीहरीच्या कंठांतील कौस्तुभमणि हा प्रत्यक्ष श्रीहरीचें आत्मतेजच होय. " कौस्तुभव्यपदेशेन स्वात्मज्योतिर्बिभर्त्यजः " कौस्तुभ रत्नाच्या मिषानें त्या आदिपुरुषानें आत्मतेजच कंठामध्यें धारण केलेलें आहे. जे कोणी कौस्तुभमणीचें या बुद्धीनें चिंतन करतील त्यांच्या अंतःकरणांत श्रीहरीचें आत्मतेज प्रकट होईल. परमात्मस्वरूपाचा साक्षात्कार हीच ऐश्वर्याची पराकाष्ठा होय. आचार्य याच भावनेनें कौस्तुभरत्नाचें वर्णन करीत आहेत.

" सः कौस्तुभः मणिः नः भूत्यै अस्तु " तो कौस्तुभमणि आमच्या ऐश्वर्याला — कल्याणाला कारणीभूत होवो. कसा आहे तो श्रीहरीचा कौस्तुभमणि तें पहा : अमृतप्राप्तीकरितां समुद्राचें मंथन करीत असतां समुद्रांतून कौस्तुभरत्न प्रकट झालें आहे. प्रकट झाल्यावरोबरच तें आपली सख्खी बहीण असलेली जी लक्ष्मी तिच्या सान्निध्यांत जाऊन बसलें ! श्रीहरीनें आपल्या कंठांत त्याला धारण केलें ! श्रीहरीचें स्वभावतःच नीलवर्ण असलेलें वक्षःस्थल हें जणुं कांहीं स्वच्छ आकाश असून त्या आकाशांत श्रीहरीनें गळ्यांत घातलेल्या हारांतील टपोरे मोतीं नक्षत्राप्रमाणें विराजत असलेले दिसत आहेत. जणुं कांहीं त्या नक्षत्रांना श्रीहरीचें

वक्षःस्थलरूपी गगनतलच निवास करण्यास योग्य वाटलें. त्याच ठिकाणीं श्रीलक्ष्मीनेंहि वास्तव्य केलेलें असून कौस्तुभमणीहि पण तेथेंच विराजमान झालेला आहे.

श्रीहरीच्या कंठांतील कौस्तुभमणि आपल्या कांतीनें दाही दिशांना प्रकाशित करीत असून इतर सर्व तेजांना तो आपल्या तेजानें झांकून टाकीत आहे. सर्व तेजांना तो आत्मतेजानें पराभूत करून टाकीत आहे. तो आश्चर्यांची जणुं कांहीं खाणच आहे. सूर्यांप्रमाणें तेजस्वी असलेला तो कौस्तुभमणि आमच्या पूर्ण वैभवाला कारणीभूत होवो. साहित्यशास्त्रवेत्ते या श्लोकांत अर्थश्लेष, सूक्ष्मालंकार, उत्प्रेक्षा आणि उपमा असे अलंकार मानतात.

या वायावानुकूल्यात्सरति मणिरुचा भासमानाऽसमाना
साकं साकम्पमंसे वसति विदधती वासुभद्रं सुभद्रम् ।
साऽरं सारङ्गसङ्घैर्मुखरितकुसुमा मेचकान्ता च कान्ता
माला मालालितास्मान्न विरमतु सुखैर्योजयन्ती जयन्ती ॥३१॥

आचार्य या एकतिसाव्या श्लोकानें श्रीहरीच्या गळ्यांतील वैजयंतीमालेचें, वर्णन करीत आहेत. "सा जयंती माला अस्मान् सुखैः अरं योजयंती न विरमतु' श्रीहरीच्या गळ्यांतील ती वैजयंतीमाला आम्हांला सत्वर सुखाशीं समरस करीत असतांना कधींहि विराम न पावो. आम्हांला ती अविरत सुख देत राहो. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. कशी आहे ती श्रीहरीची वैजयंतीमाला तें पहा : वारा अनुकूल होऊन वाहूं लागला असतां श्रीहरीच्या गळ्यांतील वैजयंती-मालाहि हलूं लागते. त्या वेळीं कौस्तुभ रत्नाच्या कांतीसह श्रीहरीच्या गळ्यांत 'भासमाना' म्हणजे शोभणारी ती वैजयंतीमाला अगदी 'असमाना' म्हणजे अनुपम दिसते ! तिच्याशीं ज्याची तुलना करावी असें या जगांत दुसरें कांहींच नाहीं. कांहीं लोक या ठिकाणीं 'समाना' असेंच पद कल्पून – श्रीहरीच्या गळ्यांत निरंतर वास्तव्य करणारी मी, माझ्यासारखें या जगांत दुसरें कोण आहे ? अशा मानाला म्हणजे गर्वाला धारण करणारी ती वैजयंतीमाला असाहि अर्थ करतात. आमच्या मतें 'समाना' असें पद कल्पिल्यास मान शब्दाचा गर्व असा अर्थ न करतां मान म्हणजे आदर, सत्कार, गौरव असा अर्थ करावा. लोकांनीं तिचा आदर-सत्कार केलेला आहे. तिला मान दिलेला आहे म्हणून तिला 'समाना' असें

म्हणावें असा अर्थ करणें योग्य होय. कारण: परमेश्वराच्या सान्निध्यांत गर्वाला, अहंकाराला वाव नाहीं.

ही वैजयंतीमाला 'सुभद्रं' म्हणजे भगवान् श्रीविष्णु यांना 'वासुभद्रं' म्हणजे पूर्ण संतुष्ट करणारी आहे. 'वासु' म्हणजे आत्मा आणि भद्र म्हणजे सुखी. 'वासुभद्र' म्हणजे ज्याचा आत्मा सुखी आहे तो. विदधती म्हणजे करणारी. तात्पर्य, वैजयंतीमाला ही श्रीहरीला पूर्ण आनंदी करीत असून श्रीहरीच्या खांद्यांवर ती सारखी हलत (स + आकम्प) रहाते. अथवा 'वासुभद्र' म्हणजे भगवान् श्रीकृष्ण ' वसति इति वासुः ' सर्वांच्या अंतर्यामीं वास करणारा म्हणून त्याला 'वासु' असें म्हणतात. किंवा ' वासयति इति वासुः ' सर्वांना स्वस्वरूपीं वसवितो म्हणूनहि त्याला 'वासु' असें म्हणतात. त्याचप्रमाणें ' दीव्यति इति देवः ' स्वस्वरूपीं रमतो अथवा स्वप्रकाशानें प्रकाशतो म्हणून त्याला देव असें म्हणतात. वासु आणि देव मिळून तो वासुदेव झाला. " भूतेषु वसते सोऽन्तर्वसन्त्यत्र च तानि यत् । धाता विधाता जगतां वासुदेवस्ततः स्मृतः ॥ " देव या शब्दाच्या-ऐवजीं कल्याणप्रद या अर्थाचा 'भद्र' शब्द जोडल्यास 'वासुभद्र' हें नांव तयार होतें. वासुभद्र म्हणजे विश्वकल्याणकर्ता भगवान् श्रीमहाविष्णु. या विष्णूला ' सुभद्रं विदधती ' म्हणजे अत्यंत सुखी करणारी. सुभद्र शब्दाचा अर्थ शोभासंपन्न असाहि करतात.

सारंग म्हणजे भ्रमर भुंगे, भुंग्यांचे समुदाय वैजयंतीमाळेभोंवतीं गुंजारव करीत असल्यामुळें जणुं कांहीं माळेंतली फुलेंच गुंजारव करीत आहेत असें वाटतें. श्रीहरीच्या वैजयंतीमाळेला खालच्या भागीं शेवटीं नीलकमलाचे गुच्छ लावलेले आहेत त्यामुळें ती माळा 'मेचकान्ता' म्हणजे शेवटच्या भागीं नीलवर्ण दिसत आहे. अथवा मेचक म्हणजे मोराच्या पंखांतील डोळा. श्रीहरीच्या गळ्यां-तील वैजयंतीमाळेच्या खालीं असलेले गुच्छ हे मोराच्या पंखांतील डोळ्याप्रमाणें शोभत असल्यामुळें जणुं कांहीं तेथें मोरपंखाचें डोळेच लावले आहेत असा भास होतो. ती वैजयंतीमाळा 'कान्ता' म्हणजे दिसावयास अत्यंत सुंदर आहे. मनोहर आहे. ती 'मा-लालिता' म्हणजे श्रीलक्ष्मीदेवीनें जोपासिलेली आहे. मोठ्या प्रेमानें आदरानें संगोपिलेली आहे. ती जयंती म्हणजे विजयशाली असलेली माला आम्हांला सर्वसुखानें संपन्न करीत असतांना कधींहि विराम न पावो हीच आमची मनीषा आहे. या श्लोकांतील प्रत्येक चरणांत यमक आणि अनुप्रास साध्या गोड शब्दात

पण फारच सुंदर दिसत आहेत. प्रत्येक चरणाच्या आरंभी आणि शेवटी अवश्य दृष्टि टाकावी. शब्दालंकाराबरोबरच सहोक्ति उत्प्रेक्षा इत्यादि अर्थालंकारहि आहेत

हारस्योरुप्रभाभिः प्रतिनव-वनमालांशुभिः प्रांशुरूपैः
श्रीभिश्चाऽप्यङ्गदानां कवलितरुचि यन्निष्कभाभिश्च भाति ।
बाहुल्येनैव बद्धाऽञ्जलिपुटमजिनस्याभियाचामहे तद्-
बन्धार्तिं बाधतां नो बहु-विहति-करीं बन्धुरं बाहुमूलम् ॥ ३२ ॥

आचार्य या बत्तिसाव्या श्लोकानें श्रीहरीच्या खांद्यांचें वर्णन करीत आहेत. "अजिनस्य तत् बन्धुरं बाहुमूलं नः बहुविहतिकरीं बन्धार्तिं बाधताम् इति बद्धाञ्जलिपुटं अभियाचामहे" श्रीहरीचे ते मनोरम असलेले दोन्ही खांदे आमचा सर्व प्रकारें नाश करणाऱ्या या संसारबंधाच्या दुःखाला नाहींसें करून टाकोत अशी हात जोडून आम्ही त्यांची प्रार्थना करीत आहोंत. असा या श्लोकांतील मुख्य अन्वय आणि त्याचा अर्थ आहे. कसे आहेत श्रीहरीचे दोन्ही खांदे तें पहा :

श्रीहरीच्या कंठांत असलेल्या टपोऱ्या मोत्यांच्या माळेंतील मोत्यांची किंचित् रक्तवर्णमिश्रित शुभ्र आणि भव्य छटा त्या इंद्रनीलमण्याप्रमाणें नीलवर्ण असलेल्या श्रीहरीच्या खांद्यांवर पसरलेली दिसत आहे. तसेंच प्रतिक्षण ताज्या टवटवीत दिसणाऱ्या श्रीहरीच्या गळ्यांतील वनमालेच्या फुलांचीं किरणें लांबच लांब पसरलेलीं दिसत आहेत. त्यांतच श्रीहरीच्या दंडावर असलेल्या अंगदांतील रत्नांचीहि कांति मिसळलेली दिसत आहे. त्याचप्रमाणें श्रीहरीच्या गळ्यांत असलेला 'निष्क' म्हणजे सोन्याचा कंठा अथवा त्या कंठ्यांतील वक्षःस्थळीं असलेलें रत्नजडित पदक, त्या पदकांत जडविलेल्या विविध रत्नांच्या कांतीनेंहि श्रीहरीचे दोन्ही खांदे 'कवलितरुचि' म्हणजे अत्यंत सुंदर शोभायमान दिसत आहेत. आम्ही वारंवार हात जोडून प्रार्थना करीत आहोंत कीं, श्रीहरीचे हे दोन्ही खांदे आमची अतिशय हानि करणाऱ्या या संसारबंधनाच्या दुःखाला पार नाहींसें करून टाकोत. या श्लोकांत वर्ण्य वस्तु श्रीहरीचे खांदे असून त्यांची स्वाभाविक कांति गळ्यांतील मोत्यांच्या कांतीनें, माळेंतील ताज्या फुलांच्या कांतीनें, छातीवरील पदकांतल्या रत्नांच्या कांतीनें आणि अंगदांतील रत्नांच्या कांतीनें जणुं कांहीं झांकून गेलेली आहे असें बहारीचें वर्णन करून आचार्यांनीं 'तद्गुण' अलंकाराचें एक उदाहरणच दाखविलें आहे. अत्युज्ज्वल

वस्तूच्या संसर्गानें वर्ण्य वस्तूचा गुण झांकला जाऊन ती तद्रूप दिसणें याला तद्गुणालंकार म्हणतात. श्लोकाच्या उत्तरार्धातहि स्वभावोक्ति अलंकार आहे.

विश्वत्राणैकदीक्षास्तदनुगुणगुणक्षत्रनिर्माणदक्षाः
कर्तारो दुर्निरूपाः स्फुटगुणयशसां कर्मणामद्भुतानाम् ।
शार्ङ्गं बाणं कृपाणं फलकमरिगदे पद्मशङ्खौ महस्रं
बिभ्राणाः शस्त्रजालं मम दधतु हरेर्बाहवो मोहहानिम् ॥३३॥

आचार्य या तेहतिसाव्या श्लोकानें श्रीहरीच्या बाहूंचें वर्णन करीत आहेत. भगवान् श्रीहरि हे चतुर्भुज आहेत. अष्टभुज आहेत. ते सहस्रभुजहि आहेत. अशा अभिप्रायानें 'बाहवः' या बहुवचनाची योजना आहे. " हरेः बाहवः नः मोहहानिं दधतु " श्रीहरीचे बाहु आमच्या मोहाचा – अज्ञानाचा नाश करोत. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. कसे आहेत श्रीहरीचे बाहु तें पहा :

सर्व विश्वाचें संरक्षण करण्याची जणुं कांहीं त्यांनीं दीक्षाच घेतलेली आहे. विश्वाचें संरक्षण करण्याला 'अनुगुण' म्हणजे अनुरूप असलेल्या शौर्य, धैर्य इत्यादि क्षात्रगुणांनीं संपन्न अशा क्षत्रियांचेंहि निर्माण करण्यांत श्रीहरीचे बाहु दक्ष आहेत. क्षत्रियवर्ग हा श्रीहरीच्या बाहूंपासून उत्पन्न झाला आहे. क्षत्रिय हे श्रीहरीचे बाहूच आहेत. " बाहू राजन्यः कृतः " असें वेदानें वर्णन केलेलें आहे. ज्यांच्यामुळें दया, दाक्षिण्य, वात्सल्य, उपकार इत्यादि अनेक उत्तम गुण अभिव्यक्त होतील आणि कीर्तीहि वाढेल अशीं अद्भुत कार्यें श्रीहरीचे बाहु वरचेवर करीत असतात. त्या बाहूंचें वाणीनें वर्णन करणें हें अत्यंत अवघड आहे.

श्रीहरीनें आपल्या हातांत शार्ङ्ग धनुष्य, बाण, कृपाण म्हणजे खड्ग (तलवार) त्याचप्रमाणें फलक म्हणजे ढाल, तसेंच 'अरि' म्हणजे चक्र. चक्राला अरा असतात म्हणून 'अरि' असें म्हणतात. त्याचप्रमाणें गदा, पद्म आणि शंख अशीं आयुधें प्रामुख्यानें धारण केलेलीं आहेत. श्रीहरि हे सहस्रबाहु असल्यामुळें त्यांच्या हातांत शक्ति, मुसळ, परशु म्हणजे कुऱ्हाड त्याचप्रमाणें मुद्गर म्हणजे हातोडा अथवा घन तसेंच भिण्डिपाल म्हणजे गोफण इत्यादि हजारों आयुधें आहेत. 'शस्त्रजाल' म्हणजे शस्त्रांचा समूहच त्यांनीं धारण केलेला आहे.

"दिव्यानेकोद्यतायुधम्" असेंच गीतेनें त्यांचें वर्णन केलेले आहे. "अनन्तबाहुं शशिसूर्यनेत्रम्" अशीहि विशेषणें श्रीहरीला गीतेनें दिलेलीं आहेत. असे हे श्रीहरीचे बाहु 'मोहहानिं' माझ्या मोहरूपी -- अज्ञानरूपी शत्रूचा नाश करोत.

आचार्यांना अष्टभुज श्रीविष्णूचेंच स्वरूप येथें ध्यानासाठीं विवक्षित आहे. याच अभिप्रायानें आठ हातांतील आठ आयुधांचा शब्दानें उल्लेख केलेला आहे. भगवान् श्रीमहाविष्णु यांचें आतांपर्यंत वर्णन केलेलें व यापुढें वर्णन केलें जाणारें रूप लक्षांत घेऊन त्यांच्या उजव्या बाजूकडील चार हातांत वरून क्रमानें चक्र, बाण, खड्ग आणि पद्म त्याचप्रमाणें डाव्या बाजूकडील चार हातांत वरून क्रमानें शंख, शार्ङ्ग धनुष्य, ढाल आणि गदा अशीं आयुधें त्यांनीं धारण केलेलीं आहेत. वस्तुतः कमल हें आयुध नव्हे. भक्तजनांना केल्या जाणाऱ्या 'पसायदानाचें' प्रसादाचें सूचक असें तें एक अनुरूप चिह्न आहे. अथवा भक्तजनांच्या इकडे तिकडे भटकणाऱ्या मनाला वश करून घेण्याचें तें एक आयुधच आहे असें म्हटलें तरी चालेल. अशी ही भगवान् श्रीमहाविष्णु यांची दिव्य आणि भव्य मूर्ति आपल्या मनश्चक्षूपुढें उभी करावी. भगवान् श्रीविष्णु यांच्या डाव्या हाताला नवव्या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें परम रमणीय श्यामलवर्ण अशा श्रीभूदेवीची कल्पना करावी आणि उजव्या हाताला जगज्जननी श्रीलक्ष्मीदेवीची कल्पना करावी. याप्रमाणें श्रीभूदेवी आणि श्रीलक्ष्मीदेवी यांच्यासमवेत श्रीमहाविष्णूचें एकाग्र मनानें ध्यान करावें.

एकूणपन्नास मरुद्गण म्हणजे वायुदेव हे त्या आदिनारायणाचे बाहु आहेत. "मरुतो बाहुः" असें सावित्रीहृदयांत वर्णन केलेलें आहे. श्रीमद्भागवतांत तर संपूर्ण इंद्रादि देवगणच श्रीहरीचे बाहु आहेत, असें वर्णन केलेलें आहे. "इन्द्रादयो बाहव आहुरस्य" अशा उदात्त भावनेनें श्रीहरीच्या विराट् स्वरूपाची उपासना करावी. या श्लोकांत वीररस आणि अद्भुतरस यांची अभिव्यक्ति होत असून त्यांच्या जोडीला स्वभावोक्ति अलंकारहि पण चांगला साधला आहे.

कण्ठाकल्पोद्गतैर्यः कनकमय-लसत्कुण्डलोत्थैरुदारै-
रद्योतैः कौस्तुभस्याप्युरुभिरुपचितश्चित्रवर्णो विभाति ।
कण्ठाश्लेषे रमायाः करवलयपदैर्मुद्रिते भद्ररूपे
वैकुण्ठीयेऽत्र कण्ठे वसतु मम मतिः कुण्ठभावं विहाय ॥३४॥

आचार्य या चौतिसाव्या श्लोकानें श्रीहरीच्या कंठप्रदेशाचें वर्णन करीत आहेत. "भद्ररूपे वैकुण्ठीये कण्ठे मम मतिः कुण्ठभावं विहाय वसतु" असा या श्लोकांतील मुख्य अन्वय आहे. विकुण्ठा हें श्रीहरीच्या मातेचें नांव आहे. विकुण्ठेच्या पोटीं भगवान् श्रीविष्णु अवतरले म्हणून त्यांना वैकुंठ असें म्हणतात. वैकुंठ हें परमेश्वराचें नांव आहे. वैकुंठ म्हणजे भगवान् श्रीविष्णु. त्यांच्या रमणीय आनंदमय कंठाच्या ठिकाणीं माझी मति निश्चलपणें वास करो. असा या मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. कसा आहे भगवान् श्रीविष्णु यांचा कंठप्रदेश तें पहा : (स्वभावतःच इंद्रनील रत्नाप्रमाणें देदीप्यमान असलेल्या) कंठामध्यें धारण केलेले 'आकल्प' म्हणजे अलंकार. त्या अलंकारांत जडविलेल्या विविध रत्नांतून बाहेर पडलेलीं किरणें कंठप्रदेशावर पसरलेलीं असल्यामुळें तो कंठप्रदेश अत्यंत शोभून दिसत आहे. कानांत असलेल्या अत्युत्तम रत्नजडित सुवर्णमय कुंडलांचीहि प्रभा त्यांत मिसळलेली आहे. त्यांतच कंठीं विराजत असलेल्या कौस्तुभरत्नाचीहि कांति मिश्रण पावलेली असल्यामुळें श्रीहरीचा कंठ अत्युत्तम विविध किरणांच्या संगमानें फारच उत्तम चित्रविचित्र वर्णांनी युक्त असल्यासारखा शोभून दिसत आहे. श्रीहरीच्या कंठावर ज्या वलयाकार रेषा दिसत आहेत त्या जणुं कांहीं लक्ष्मीनें दृढ आलिंगन दिलें असतां लक्ष्मीच्या हातांतील कंकणांचीं चिह्नेंच कंठावर उमटलेलीं आहेत असें वाटतें. अशा रीतीनें श्रीलक्ष्मीच्या हातांतील कंकणांच्या चिह्नांनीं मुद्रित झालेल्या श्रीहरीच्या 'भद्ररूप' म्हणजे कल्याणकारक असलेल्या अथवा जगाला मोहून टाकणाऱ्या सौंदर्यानें संपन्न असलेल्या कंठाच्या ठिकाणीं माझी बुद्धि अस्खलितपणें – कुंठितभाव सोडून देऊन निश्चलपणें वास्तव्य करो. श्रीहरीच्या मंगलमय सुंदर कंठाच्या ठिकाणीं माझी बुद्धि स्थिर राहो. याहि श्लोकांत तद्गुण उत्प्रेक्षा स्वभावोक्ति इत्यादि अलंकार आहेतच. "ग्रीवा महर्वदनं वै जनोऽस्य" श्रीहरीचा कंठ हा महर्लोक आहे तर मुख हें जनलोक आहे असें त्याचें ध्यान करावें. याप्रमाणें श्रीमद्-भागवतांतील द्वितीय स्कंधाच्या पहिल्या अध्यायांत वर्णन केलेलें आहे.

पद्मानन्दप्रदाता परिलसदरुणश्रीपरीताग्रभागः
काले काले च कम्बुप्रवरशशधरापूरणे यः प्रवीणः ।
वक्त्राकाशान्तरस्थस्तिरयति नितरां दन्ततारौघशोभां
श्रीभर्तुर्दन्तवासो-द्युमणिरघतमोनाशनायास्त्वसौ नः ॥ ३५ ॥

आचार्य या पस्तिसाव्या श्लोकानें श्रीहरीच्या ओठांचें वर्णन करीत आहेत. 'असौ श्रीभर्तुः दन्तवासोद्युमणिः नः अवतमोनाशाय अस्तु" हा दंतांचें आच्छादन असलेला श्रीहरीचा अधर-ओष्ठरूपी सूर्य आमच्या संपूर्ण पापरूपी अंधकाराचा नाश करण्यास कारणीभूत होवो. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. कसा आहे श्रीहरीचा अधरोष्ठ तें पहा –

पद्मा म्हणजे लक्ष्मी तिला तो अत्यंत आनंद देणारा आहे. श्रीहरीच्या अधररसाचा आस्वाद आदिमाया जगज्जननी श्रीमहालक्ष्मी हिच्याशिवाय अन्य कोणाच्या भाग्यांत आहे ? ज्याचा अग्रभाग परम रमणीय देदीप्यमान अरुणकांतीनें व्यापलेला आहे. श्रीहरीच्या अधरोष्ठावरील अरुणकांतीची शोभा अवर्णनीय आहे. त्याचप्रमाणें वेळोवेळीं (दाही दिशांना दुमदुमवून सोडणारा नाद उमटविण्याकरितां) पांचजन्य शंखरूपी चंद्राला पूर्ण करण्यामध्यें जो अत्यंत प्रवीण आहे. चंद्राची वृद्धि ही सूर्याच्याच अधीन असते. श्रीहरीच्या मुखकमल-रूपी आकाशामध्यें वास्तव्य करणारा हा अधरोष्ठरूपी सूर्य दंतरूपी नक्षत्र-समूहाची शोभा पूर्णपणें झांकून टाकतो. असा हा लक्ष्मीकांत भगवान् श्रीविष्णु यांचा अधरोष्ठरूपी सूर्य आमच्या संपूर्ण पापरूपी तिमिराचा नाश करो. तात्पर्य, श्रीहरीच्या मंगलमय अधरोष्ठांच्या अवलोकनानें आमचीं सर्व पापें नाहींशीं होवोत. या श्लोकांत पद्म म्हणजे कमल, पद्मा म्हणजे लक्ष्मी, अरुण म्हणजे लालिमा आणि सूर्याचा सारथी इत्यादि श्लेष आणि सूर्य, चंद्र, आकाश त्याचप्रमाणें नक्षत्रराजि इत्यादि रूपकें फारच सुंदर आहेत.

नित्यं स्नेहातिरेकान्निज-कमितुरलं विप्रयोगक्षमा या
वक्त्रेन्दोरन्तराले कृतवसतिरिवाभाति नक्षत्रराजिः ।
लक्ष्मीकान्तस्य कान्ताकृतिरतिविलसन्मुग्धमुक्तावलिश्री-
र्दन्तालीं सन्ततं सा नति-नुति-निरतानक्षतान्रक्षताच्चः ॥३६॥

आचार्य या छत्तिसाव्या श्लोकानें श्रीहरीच्या दंतपंक्तीचें वर्णन करीत आहेत. "लक्ष्मीकान्तस्य कान्ताकृतिः दन्तालीं नतिनुतिनिरतान् नः सन्ततं रक्षताम्" लक्ष्मी-रमण भगवान् श्रीविष्णु यांची रमणीय दंतपंक्ति निरंतर नमन आणि स्तवन करण्या-मध्यें तत्पर असलेल्या आम्हांला सतत सुरक्षित ठेवो. असा या श्लोकांतील मुख्य अन्वय व त्याचा अर्थ आहे. कशी आहे श्रीहरीची दंतपंक्ति तें पहा :

श्रीहरीची दंतपंक्ति ही जणुं कांहीं नक्षत्रराजि म्हणजे नक्षत्रमालाच आहे. श्रीहरीविषयीं असलेल्या निरवधिक स्नेहामुळें आपल्याला परमप्रिय असलेल्या आपल्या अत्यंत आवडत्या अशा श्रीहरीचा वियोग सहन करण्यास पूर्णपणें असमर्थ असलेली ती श्रीहरीची दंतपंक्तिरूपी नक्षत्रमाला श्रीहरीच्या मुखचंद्राच्या अंतर्भागांत जणुं कांहीं सदासर्वकाळ वसतीच करून राहिलेली आहे असें वाटतें. तिची आकृति अत्यंत कान्त म्हणजे मनोहर आहे, जणुं कांहीं अत्यंत सुंदर तेजस्वी मोत्यांच्या माळेचीच शोभा तिनें धारण केलेली आहे. अशी ही श्रीहरीची दंतपंक्ति सदासर्वकाळ श्रीहरीचें स्तवन करण्यांत आणि श्रीहरीच्या चरणीं नमन करण्यांत रत असलेल्या आम्हांला आम्ही निरंतर 'अक्षत' राहूं अर्थात् कोणत्याहि दुःखानें पीडित होणार नाहीं अशा रीतीनें ती आमचें सतत रक्षण करो. या श्लोकांत उत्प्रेक्षा अलंकार फारच उत्तम साधला आहे.

ब्रह्मन् ! ब्रह्मण्यजिह्मां मतिमपि कुरुषे ? देव ! सम्भावये त्वां
शम्भो ! शक्र ! त्रिलोकीमवसि किममरैर्नारदाद्याः ! सुखं वः ?
इत्थं सेवावनम्रं सुरमुनि-निकरं वीक्ष्य विष्णोः प्रसन्न-
स्यास्येन्दोरास्रवन्ती वरवचनसुधा ह्लादयेन्मानसं नः ॥ ३७ ॥

आचार्य या सदतिसाव्या श्लोकानें श्रीहरीच्या संभाषण पद्धतीचें वर्णन करीत आहेत. "विष्णोः वरवचनसुधा नः मानसं ह्लादयेत्" भगवान् श्रीविष्णु यांचें अत्युत्तम वचनामृत अर्थात् अमृतासारखे गोड शब्द आमच्या मनाला आह्लाद देवोत. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. श्रीहरीची बोलण्याची पद्धति कशी आहे तें पहा :

"हे ब्रह्मदेवा ! तुमचा ब्रह्म विचार म्हणजे आत्मचिंतन अथवा वेद आणि वैदिकधर्माची समृद्धि यासंबंधींचे विचार नीट सुरळीतपणें चालू आहेत ना ?" "देव शम्भो त्वां सम्भावये" हे महादेवा शंभो ! मी तुमचें अभिनंदन करतों. अर्थात् तुम्ही त्रैलोक्याचे गुरु आहां, तुमचें ज्ञानदानाचें कार्य समाधानकारक चाललें आहे. "हे शक्र अमरैः सह त्रिलोकीं अवसि किम् ?" हे इंद्रा ! सर्व देवांसह तुमचें त्रैलोक्याच्या रक्षणाचें कार्य ठीक चाललें आहे ना ? तुम्ही त्रैलोक्याचें रक्षण करतां ना ? "हे नारदाद्याः ! वः सुखं अस्ति किम् ?" हे नारदादि

ऋषिजन हो ! तुम्ही सर्व सुखी आहां ना ? "इत्थं" म्हणजे याप्रमाणें सेवेच्या निमित्तानें नम्र झालेल्या देव आणि नारदादि ऋषि यांच्या समुदायाकडे पाहून प्रसन्न अर्थात् आनंदित होणाऱ्या भगवान् श्रीविष्णु यांच्या मुखकमलरूपी चंद्रमंडलांतून स्रवणारी वाक्सुधा आमच्या हृदयाला आनंदित करो. या श्लोकांत श्रीहरीचा स्वभाव, दयाळु अंतःकरण आणि वात्सल्यभाव श्रीहरीच्या शब्दांत प्रतिबिंबित झालेला असून परंपरितरूपकहि अत्यंत उत्तम दृग्गोचर होत आहे.

कर्णस्थ-स्वर्ण-कक्षोज्ज्वल-मकर-महाकुण्डल-प्रोत-दीप्य-
न्माणिक्य-श्री-प्रतानैः परिमिलितमलि-श्यामलं कोमलं यत् ।
प्रोद्यत्सूर्यांशु-राजन्मरकत-मुकुराकार-चोरं मुरारे-
र्गंडाभागांगिनीं नः शमयतु विपदं गण्डयोर्मण्डलं तत् ॥३८॥

या अडतिसाव्या श्लोकानें आचार्य श्रीहरीच्या गालांचें वर्णन करीत आहेत. "मुरारेः तत् गण्डयोः मण्डलं नः विपदं शमयतु" गण्डयोः मण्डलं म्हणजे गालांचा वर्तुलाकार भाग. श्रीहरीचे ते दोन्ही वर्तुलाकार गाल आमच्या सर्व आपत्तींचें निरसन करोत. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. कसे आहेत श्रीहरीचे गाल तें पहा :

(स्वभावतःच ते किंचित् रक्तवर्णमिश्रित इंद्रनीलमण्याप्रमाणें नीलवर्ण आहेत.) मरकत रत्नाच्या म्हणजे पाचूच्या आरशावर उदयाला येणाऱ्या सूर्याचे आरक्त किरण पडले असतां तो आरसा जसा चमकावा, शोभावा त्याचप्रमाणें श्रीहरीच्या गालांची शोभा दिसत असल्यामुळें जणुं कांहीं त्यांनीं ती त्या आरशाकडून चोरूनच आणलेली आहे कीं काय असें वाटतें ! श्रीहरीचे गाल अत्यंत कोमल आणि भ्रमराप्रमाणें श्यामल आहेत. श्रीहरीच्या गालांची स्वाभाविक असलेली जी आरक्त नीलकांति, त्यांतच कानांतील सोन्याची अत्यंत रम्य आणि देदीप्यमान असलेलीं मकराकार भव्य कुडलें, त्या कुंडलांत जडविलेल्या पैलूदार आणि म्हणूनच लकाकणाऱ्या माणिकांची श्वेतवर्णमिश्रित रक्तप्रभा मिसळलेली. त्यांत शुद्ध सोन्याच्या रक्तपीत छटाहि पण मिश्रण पावलेल्या आहेत. अशा या विविध वर्णांच्या छटांचा जणुं कांहीं भगवान् श्रीविष्णु यांच्या कपोलांवर मनोहर संगमच झालेला आहे ! अत्यंत रमणीय दिसणारे असे हे मुरारि भगवान् श्रीविष्णु यांचे गाल ते आमच्या सर्व विपत्तींचें – अत्यंत भयंकर असलेल्या

वर्तमानकाळच्या व भविष्यकाळच्या सर्व संकटांचें परिमार्जन करोत. शरिराच्या ठिकाणीं ममत्वाचा अभिनिवेश असणें हीच मोठी आपत्ति आचार्यांना या ठिकाणीं विवक्षित आहे. जोंपर्यंत शरिराच्या ठिकाणीं गाढ अभिनिवेश आहे तोंपर्यंत दुःखांच्या कचाट्यांतून मनुष्याची सुटका होत नाहीं. "न ह वै सशरीरस्य सतः प्रियाप्रिययोरपहतिरस्ति" जोंपर्यंत शरिराच्या ठिकाणीं अहंता आणि ममता आहे, जोंपर्यंत देहाविषयीं तादात्म्याभिनिवेश आहे, "देहच मी आहें, देहाच्या सुखानें मी सुखी व देहाच्या कष्टानें मी कष्टी" असा अभिनिवेश जोंपर्यंत आहे तोंपर्यंत अज्ञान हें आहेच आणि अज्ञान असेपर्यंत दुःखें हीं पूर्णपणें मावळूं शकत नाहींत. अज्ञान हेंच सर्व दुःखांचें मूळ कारण आहे. अज्ञान असणें हीच मोठी आपत्ति आहे. या आपत्तीचा नाश व्हावा अशी इच्छा असेल तर खोटा अभिनिवेश सुटला पाहिजे. "अशरीरं वाव सन्तं प्रियाप्रिये न स्पृशतः" शरिराविषयींचा खोटा अभिनिवेश ज्याचा निमाला त्यालाच सांसारिक सुखदुःखें स्पर्श करूं शकत नाहींत. मोह अहंकार आणि खोटा अभिनिवेश ज्याचा मावळतो तोच सांसारिक सुखदुःखांच्या शृंखलांतून सुटतो. सांसारिक सुखें देखील परिणामीं दुःखाला कारणीभूत असल्यामुळें आणि कालांतरानें नाश पावत असल्यामुळें दुःखरूपच होत. तात्पर्य, खोटा अभिनिवेश आणि अज्ञान हेंच खरें संकट आहे. आत्मस्वरूपाविषयीं यथार्थ ज्ञानाचा लाभ झाल्याशिवाय या संकटांचा निरास होत नाहीं. सूर्यमंडल हें जसें अंधकाराचा नाश करतें त्याचप्रमाणें भगवान् श्रीमहाविष्णु यांच्या कपोलमंडलाच्या ध्यानानें आमच्या अज्ञानतिमिराचा नाश व्हावा व आमचीं सर्व सांसारिक संकटांतून सुटका व्हावी हीच मनीषा आचार्यांचा अभिप्राय लक्षांत घेऊन आम्हीं आपल्या अंतःकरणांत ठेवली पाहिजे व श्रीहरीच्या मंगलमय स्वरूपाचें ध्यान केलें पाहिजे.

वक्त्राम्भोजे लसन्तं मुहुरधरमणिं पक्वबिम्बाभिरामं
दृष्ट्वा दष्टुं शुकस्य स्फुटमवतरतस्तुण्डदण्डायते यः।
घोणः शोणीकृतात्मा श्रवणयुग-लसत्कुण्डलोल्लैर्मुरारेः
प्राणाख्यस्यानिलस्य प्रसरण-सरणिः प्राणदानाय नः स्तात्॥३९॥

आचार्य या एकूणचाळिसाव्या श्लोकानें श्रीहरीच्या नासापुटांचें व नाकाचें वर्णन करीत आहेत. "मुरारेः घोणः नः प्राणदानाय स्तात्" – मुर नांवाचा एक

दैत्य नरकासुराचा मित्र होता. त्यानें श्रीकृष्णाचा द्वेष केला आणि लोकांना छळलें म्हणून श्रीकृष्णप्रभूंनीं त्याचा वध केला. तेव्हांपासून श्रीकृष्णाला मुरारि असें नांव पडलें. भगवान् श्रीकृष्ण हे महाविष्णूचाच अवतार असल्यामुळें श्रीविष्णूलाहि मुरारि असें म्हटलें आहे. मुरारि भगवान् श्रीमहाविष्णु यांचा घोण म्हणजे नासादंड अर्थात् नाक "नः" म्हणजे आम्हांला प्राणांचें म्हणजे बलाचें अथवा जीवनसामर्थ्याचें दान करण्याला कारणीभूत होवो. असा या मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. श्रीहरीचा तो सरल नासादंड कसा आहे तें पहा –

श्रीहरीच्या मुखकमलीं विराजमान असलेलें अधरबिंब इतकें आरक्तवर्ण आहे कीं, जणुं कांहीं तें पिकलेलें तोंडलीचें फळच आहे असें वाटतें ! त्या अधरबिंबाच्या वरच्या बाजूस अगदीं जवळ पोपटाच्या चोंचीप्रमाणें अणकुचीदार असलेला नाकाचा शेंडा पाहून असें वाटतें कीं, तें अधरबिंबरूपी पिकलेलें तोंडलीचें फळ खाण्याकरितां प्रयत्न करीत असलेला एखादा पोपटच तेथें बसलेला असून तो नाकाचा शेंडा म्हणजे त्या पोपटाची ती चोंचच आहे !

भगवान् श्रीविष्णु यांच्या दोन्ही कानांत लक्लक् हलणाऱ्या मकराकार रत्नजडित सुवर्णकुंडलांच्या किरणांनीं ज्याचें स्वरूप नील, पीत, हरित व विशेषेंकरून रक्तवर्ण दिसत आहे असा तो श्रीहरीचा "घोण" म्हणजे नासादंड अर्थात् नाक. निळा पिवळा हिरवा आणि तांबडा असे अनेक रंग पोपटाच्या ठिकाणीं जसे पहावयास सांपडतात व तो सुंदर दिसतो त्याचप्रमाणें भगवान् श्रीविष्णु यांचें नाक देखील श्रीहरीच्या स्वाभाविक अंगकांतीचा निळा वर्ण, कुंडलातील सोन्याचा पिवळा वर्ण, पाचूंचा हिरवा वर्ण आणि माणिकांचा तांबडा वर्ण अशा अनेक वर्णांच्या छटांनीं युक्त असलेलें मोठें सुंदर दिसत आहे. तें श्रीहरीचें नाक म्हणजे प्राण नांवाच्या वायूच्या संचाराचा तो एक मार्गच आहे.

परमेश्वराच्या विराट् देहाचें वर्णन करतांना आधिभौतिक वायुतत्त्व हेंच श्रीहरीचें आध्यात्मिक प्राणतत्त्व असल्याचें वर्णन केलेलें आहे. "नासिके निरभिद्येताम् । नासिकाभ्यां प्राणः । प्राणाद्वायुः । प्राणो भूत्वा नासिके प्राविशत् ।" सृष्टिरचनेच्या आरंभीं श्रीहरीच्या विराट् देहामध्यें नासापुटें अभिव्यक्त झालीं. नासापुटांतून प्राणतत्त्व प्रकट झालें. प्राणापासून वायु निर्माण झाला. तोच वायु प्राणस्वरूपानें नासापुटांमध्यें प्रविष्ट झाला. याप्रमाणें आधिभौतिक वायुतत्त्व आणि श्रीहरीचें आध्यात्मिक प्राणतत्त्व एकच असल्याचें श्रुतीनें वर्णन केलेलें

आहे. "अनन्तवीर्यश्वसितं मातरिश्वा" अनंतवीर्य म्हणजे अमित पराक्रमी अथवा महातेजस्वी असा जो भगवान् आदिविष्णु त्याचे श्वासोच्छ्वास म्हणजेच हा अंतरिक्षांत संचार करणारा व सर्व विश्वाचें जीवन असलेला वायु होय, असेंहि वर्णन केलेलें आहे. तात्पर्य, हें सर्व तत्त्व लक्षांत घेऊनच श्रीहरीची उपासना करावी. प्राणिमात्रांचे प्राण हे श्रीहरीचेच प्राण आहेत अशा भावनेनें सर्वांच्या प्राणांची जपणूक करावी. प्रत्येक व्यष्टि ही श्रीहरीच्या समष्टि स्वरूपाची घटक आहे अशा भावनेनेंच श्रीहरीची भक्ति करावी. आचार्यांनीं केलेलें श्रीहरीचें नखशिखान्त वर्णन लक्षांत घेतलें असतां आदिविष्णु भगवान् श्रीहरि हे अखिलस्वरूप आहेत. अखिल चराचर विश्व हें श्रीहरीचेंच स्वरूप होय, हें लक्षांत घ्यावें. सर्व लोकांच्या सुखांतच आपण सुखी आहोंत असें मानावें आणि सर्व लोकांच्या दुःखानें आपणहि दुःखी व्हावें. तसेंच शक्य तोंपर्यंत सर्वांचीं दुःखें दूर करण्याचा प्रयत्न करावा. हीच श्रीहरीची अत्यंत श्रेष्ठ आराधना होय. कारण सर्वभूतस्वरूपानें तोच नटलेला आहे. "तप्यन्ते लोकतापेन साधवः प्रायशो जनाः। परमाराधनं तद्धि पुरुषस्याखिलात्मनः" भागवत (८।७।४४). "तं सत्यमानन्दनिधिं भजेत नान्यत्र सज्जेद्यत आत्मपातः" तो भगवान् श्रीमहाविष्णु पूर्ण सत्यस्वरूप असून आनंदाचा निधि आहे. त्याचीच भक्ति करावी. मनाला दुसरीकडे आसक्त होऊं देऊं नये. त्याला सोडून दुसरीकडे आसक्त होण्यांत आपला अधःपात आहे हें लक्षांत घ्यावें.

सर्व विश्वाचा प्राणभूत वायु हाच श्रीहरीचा प्राण आहे अशी बुद्धि ठेवूनच श्रीहरीची भक्ति करावी. श्रीहरीच्या प्राणवायूचें संचारस्थान असलेलीं हीं नासापुटें व हें श्रीहरीचें नाक आम्हांला प्राणदान करो. आम्हांला त्याच्यापासून शक्तीचा आणि पारमार्थिक जीवनाचा लाभ होवो हीच आमची मनीषा आहे. भक्तीवांचून मानवाचें जीवन हें जिवंत प्रेताचें लक्षण होय. म्हणून भक्ति हाच खरा प्राण आहे. हाहि अभिप्राय लक्षांत घेऊन आचार्यांनीं प्राणदान शब्दानें भक्तीचीच मागणी केली आहे. या श्लोकांतहि रूपक भ्रान्तिमत् आणि उत्प्रेक्षा असे अनेक अलंकार आहेतच.

दिक्कालौ वेदयन्तौ जगति मुहुरिमौ संचरन्तौ रवीन्दू
त्रैलोक्यालोकदीपावभिदधति ययोरेव रूपं मुनीन्द्राः।

अस्मानब्जप्रभे ते प्रचुरतर-कृपा-निर्भरं प्रेक्षमाणे
पातामाताम्र-शुक्लासितरुचि-रुचिरे पद्मनेत्रस्य नेत्रे ॥४०॥

पूज्यपाद श्रीमान् आचार्य या चाळिसाव्या श्लोकानें श्रीहरीच्या नेत्र-कमलांचें वर्णन करीत आहेत. " आताम्रशुक्लासितरुचिरुचिरे पद्मनेत्रस्य नेत्रे अस्मान् पाताम् " अरुणवर्ण, शुक्लवर्ण आणि कृष्णवर्ण अशा विविध वर्णांनीं अत्यंत सुंदर दिसणारे कमलनयन भगवान श्रीमहाविष्णु यांचे दोन्ही नेत्र आमचें रक्षण करोत. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. आतां कसे आहेत श्रीहरीचे दोन्ही नेत्र तें पहा :

दिक् म्हणजे दिशा अर्थात पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर इत्यादि शब्दांनीं व्यवहारिले जाणारे प्रदेश. आणि काल म्हणजे वर्तमान, भूत, भविष्य अथवा क्षण लव घटका मुहूर्त इत्यादि शब्दांनीं व्यवहारिला जाणारा समय – वेळ यांचा साक्षात्कार अर्थात प्रत्यक्षज्ञान हें जननेला सूर्य आणि चंद्र यांच्याच साहाय्यानें होत असतें. जगांत अहोरात्र वारंवार संचार करून जनतेला पुनः पुन्हां दिशा आणि काल यांचा साक्षात्कार करून देणारे हे सूर्य आणि चंद्र भगवान श्रीमहाविष्णु यांचे नेत्रच आहेत. ते जणुं कांहीं त्रैलोक्याला मार्गदर्शन करणारे दीपस्तंभच आहेत. याप्रमाणें ज्यांचें वर्णन अत्यंत थोर ऋषिमुनि आणि तत्त्ववेत्ते करीत असतात. ते श्रीहरीचे नेत्र 'अब्जप्रभ' म्हणजे कमलासारखे सरस देदीप्यमान प्रफुल्लित आणि आनंददायक आहेत. अत्यंत – अत्यंत कृपापूर्ण स्वरूपानें आमच्याकडे पहात असलेल्या कमलनयन श्रीहरीचीं दोन्ही नेत्रकमलें आमचें रक्षण करोत.

भगवान श्रीमहाविष्णु यांचे नेत्र म्हणजे प्रत्यक्ष सूर्य आणि चंद्रच आहेत अशा भावनेनें त्यांची उपासना करावी. सूर्य आणि चंद्र यांचे जगावर फारच फार उपकार आहेत. त्यांच्यामुळेंच जगाची जीवनयात्रा चालू आहे. " चक्षुषी चन्द्रादित्यौ ", " अनन्तबाहुं शशिसूर्यनेत्रम् " इत्यादि श्रुतिस्मृति या विषयाचें प्रतिपादन करीत आहेत. या श्लोकांत रूपक आणि उपमा असे दोन अलंकार आहेत.

पातात्पातालपातात्पतग-पति-गतेर्भ्रूयुगं भुग्नमध्यं
येनेषच्चालितेन स्वपद-नियमिताः सासुरा देवसंघाः ।

नृत्यल्ललाटरङ्गे रजनिकरतनोरर्धखण्डावदाते
कालव्यालद्वयं वा विलसति समया वालिकामातरं नः ॥४१॥

एकेचाळिसाव्या आणि बेचाळिसाव्या श्लोकांनीं आचार्य भगवान् श्रीमहाविष्णु यांच्या दोन्ही भुवयांचें वर्णन करीत आहेत. " पतगपतिगतेः भ्रूयुगं नः पातालपातात् पातात् " पतगपति म्हणजे गरुड त्याच्यायोगानें ज्याची गति म्हणजे गमन असते तो अर्थात् गरुडावर बसून भ्रमण करणारा गरुडवाहन भगवान् श्रीमहाविष्णु यांच्या दोन्ही भुवया पातालाप्रमाणें गंभीर असलेल्या अधःपातापासून अर्थात् दुष्कर्ममूलक अधोगतीपासून आमचें संरक्षण करोत. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. कशा आहेत श्रीहरीच्या त्या दोन्ही भुवया ते पहा –

त्या मध्यभागीं "भुग्न" म्हणजे वाकलेल्या – अर्थात् वक्राकार दिसत आहेत. त्या थोड्या जरी श्रीहरीनें हलविल्या – वर चढविल्या तरी देखील असुर दैत्य आणि राक्षस यांच्यासह सर्व देवांचे समुदाय आपआपल्या स्थानीं नियंत्रित केले जातात. आपआपल्या अधिकृत कार्यामध्यें ते नियोजित केले जातात. श्रीहरीचा दराराच असा कांहीं आहे कीं, त्यांनीं जरा भुवई वाकडी करण्याचा अवकाश कीं, तावडतोब इंद्रादि देव आणि विरोचनादि दैत्य यांचे समुदाय धावरतात आणि आपआपलीं कामें नियमितपणें सुव्यवस्थित पार पाडतात. " भीषाऽस्माद्वातः पवते भीषोदेति सूर्यः । भीषा इन्द्रश्चाग्निश्च मृत्युर्धावति पञ्चमः " याच्याच भयानें वायु सर्वत्र संचार करून लोकांना जीवनदान देत आहे. प्राणदानाचें कार्य करीत आहे. याच्याच भयानें सूर्य वेळच्या वेळीं उदयाला येऊन प्रकाश आणि उष्णता देण्याचें कार्य करीत आहे. इंद्र, अग्नि आणि यम याच्याच भयानें आपआपलीं कार्यें करीत असतात. याप्रमाणें तैत्तिरीयोपनिषदांत परमेश्वराच्या धाकाचें वर्णन केलेलें आहे.

त्या भुवया चंद्रबिंबाच्या अर्धखंडाप्रमाणें अवदात म्हणजे शुद्ध, निर्मल अथवा भव्य आणि सुंदर असलेल्या श्रीहरीच्या ललाटरूपी रंगभूमीवर अर्थात् भालप्रदेशावर नृत्य करणारे जणुं कांहीं दोन काळेभोर कालसर्पच आहेत असें वाटतें. हे दोन कृष्णसर्प त्या ठिकाणीं कां बरें नृत्य करीत आहेत ? असें कदाचित् कोणी विचारील म्हणून आचार्यांनीं " समया वालिकामातरं " या शब्दांनीं त्याचें उत्तर

दिलें आहे. वालिका म्हणजे बाळी – बिंबाळी अर्थात् बकुळाच्या फळाप्रमाणें टपोरे तीन मोतीं असलेला वर्तुलाकार कानांतील एक अलंकार. हींच कोणी माता. त्या मातेच्या "समया" म्हणजे सांन्निध्यांत असल्यामुळें ते दोन कालसर्प आनंदानें नृत्य करीत आहेत. नृत्य करीत असल्याप्रमाणें शोभत आहेत. मातेचें सांन्निध्य कोणत्या बालकांना आनंदास्पद वाटत नाहीं ? तात्पर्य, श्रीहरीच्या भव्य भालप्रदेशीं दिसणाऱ्या दोन्ही भ्रूलता आम्हांला प्राप्त होणाऱ्या गंभीर अवनतीपासून आमचें रक्षण करोत. या श्लोकांत उपमा, उत्प्रेक्षा आणि स्वभावोक्ति हे अलंकार उत्तम शोभत आहेत.

लक्ष्माकारालकालिस्फुरदलिक-शशाङ्कार्ध-संदर्श-मील-
नेत्राम्भोज-प्रबोधोत्सुक-निभृततरालीन-भृङ्गच्छटाभे ।
लक्ष्मीनाथस्य लक्ष्मीकृत-विबुधगणापाङ्ग-बाणासनार्ध-
च्छाये नो भूरिभूति-प्रसव-कुशलते भ्रूलते पालयेताम् ॥४२॥

" लक्ष्मीनाथस्य भ्रूलते नः पालयेताम् " लक्ष्मीनाथ भगवान् श्रीमहाविष्णु यांच्या दोन्ही भ्रूलता – भुवया आमचें संरक्षण करोत. असा या श्लोकाचा मुख्य अन्वयार्थ आहे. कशा आहेत श्रीहरीच्या दोन्ही भ्रूलता तें पहा –

लक्ष्म म्हणजे चंद्रावर दिसणारें चिह्न. ज्याला चंद्राचा कलंक किंवा डाग असें म्हणतात. त्या चिह्नाच्या आकाराप्रमाणें दिसणारी श्रीहरीच्या भालप्रदेशावर असलेली 'अलकालि' म्हणजे काळेभोर असलेल्या कुरळ्या केसांचा समूह. त्या केशसमूहानें शोभायमान असलेलें श्रीहरीचें 'अलिक' म्हणजे कपाळ अर्थात् भव्य भालप्रदेश. हा भालप्रदेश उदयाला येणाऱ्या पूर्ण चंद्राचें तें जणुं कांहीं अर्धबिंबच आहे कीं काय असें वाटतें. तात्पर्य, श्रीहरीचें ललाट हा जणुं कांहीं अष्टमीचा अर्धा चंद्रच आहे कीं काय असा भास होतो. त्या चंद्राच्या दर्शनानें श्रीहरीचे नेत्र हींच कोणी कमलें, तीं कमलें मिटूं लागतात, चंद्रदर्शनानें कमलें मिटतात हें प्रसिद्धच आहे. त्या निर्मीलित होऊं पहाणाऱ्या श्रीहरीच्या नेत्ररूपी कमलांना तीं केव्हां विकसित होतील याप्रमाणें विचार करीत त्यांच्याकडे निश्चलपणें अत्यंत उत्सुकतेनें पहात बसलेले जणुं कांहीं भ्रमरांचे समूहच आहेत कीं काय असा त्या श्रीहरीच्या भुवयांकडे पाहून भास होतो. श्रीहरीच्या नेत्ररूपी कमलांचा विकास होण्यासाठीं अत्यंत उत्सुक असलेल्या आणि त्याच

ठिकाणीं निश्चलपणें तन्मय होऊन राहिलेल्या भ्रमरांच्या समूहाप्रमाणें श्रीहरीच्या कपाळावरील दोन्ही भुवया शोभत आहेत. चंद्रदर्शनानें कमलें मिटतात व मकरंद-सेवनासाठीं उत्सुक असलेले भ्रमर कमळाभोंवतीं निश्चलपणें कमळाच्या विकासाची प्रतीक्षा करीत स्थिरावलेले असतात असें हें नमोहर दृश्य सरोवराच्या कांठीं आपण पहात असतों. हीच कल्पना आचार्यांनीं या श्लोकाच्या पूर्वार्धांत रेखाटलेली आहे.

श्लोकाच्या उत्तरार्धांत दुसरी कल्पना प्रकट करीत आहेत. श्रीहरीच्या धनुष्याकार भुवया ह्या जणुं कांहीं आपआपल्या कार्यांत शैथिल्य दाखविणाऱ्या देवगणावर टाकल्या जाणाऱ्या अपाङ्ग म्हणजे कटाक्षरूपी बाणांचें तें अर्धाकृति धनुष्यच आहे असें वाटतें. किंवा सेवाभावानें नम्र झालेल्या देवगणावर टाकल्या जाणाऱ्या अपाङ्ग म्हणजे कृपाकटाक्ष, त्यांचें साधन असलेलें तें एक जणुं कांहीं अर्धाकृति धनुष्यच आहे असें वाटतें! श्रीहरीच्या भालप्रदेशीं विराजमान असलेल्या या दोन्ही भ्रूलता भक्तजनांना अभीष्ट असलेल्या विपुल वैभवांचीं अनंत फळें देण्यास अत्यंत कुशल आहेत. या कामीं त्यांची कुशलता नित्यच प्रतीतीला येत असते. अशा या लक्ष्मीकांत भगवान् श्रीविष्णु यांच्या दोन्ही भ्रूलता भक्तिभावानें शरण आलेल्या आम्हां भक्तजनांचें परिपालन करोत हीच नम्र प्रार्थना आहे. साहित्यशास्त्राच्या दृष्टीनें याहि श्लोकांत रूपक, उत्प्रेक्षा, अपह्नुति आणि भ्रान्तिमान् इत्यादि अनेक अलंकार आहेत.

रूक्ष-स्मारेक्षु-चाप-च्युत-शर-निकर-क्षीण-लक्ष्मी-कटाक्ष-
प्रोत्फुल्लत्पद्म-माला-विलसित-महित-स्फाटिकैशान-लिङ्गम् ।
भूयाद् भूयो विभूत्यै मम भुवनपतेर्भ्रूलता-द्वन्द्वमध्या-
दुत्थं तत्पुण्ड्रमूर्ध्वं जनि-मरण-तमःखण्डनं मण्डनं च ॥४३॥

आचार्य या त्रेचाळिसाव्या श्लोकानें श्रीहरीच्या भालप्रदेशीं शोभत असलेल्या चंदनतिलकाचें वर्णन करीत आहेत. श्रीहरीच्या कपाळीं असलेला चंदनाचा टिळा हा सावित्रीस्वरूपच आहे असें त्याचें वर्णन केलेलें आहे. "भुवनपतेः तत् ऊर्ध्वं पुण्ड्रं मम विभूत्यै भूयात्" ब्रह्मदेवापासून तो गवताच्या काडीपर्यंत अखिल विश्वाचा नियन्ता असलेला त्रिभुवनपति जो भगवान् श्रीमहा-विष्णु, त्याचें तें ऊर्ध्व पुंड्र म्हणजे उभें लावलेलें गंध अथवा चंदनाचा टिळा तो आमच्या कैवल्य-सुखरूपी विशिष्ट वैभवाला कारणीभूत होवो. श्रीहरीच्या कपाळीं

असलेला चंदनाचा टिळा आम्हांला ब्रह्मानंदाचा लाभ करून देवो. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. कसा आहे तो चंदनाचा टिळा तें पहा :

'महित' म्हणजे सर्व लोकांना पूज्य असलेल्या स्फटिकाच्या शिवलिंगाप्रमाणेंच तो टिळा श्रीहरीच्या कपाळीं शोभत आहे. तो जणुं कांहीं स्फटिकाचें शिवलिंगच आहे असें वाटतें. अत्यंत 'रूक्ष' म्हणजे कठोर अर्थात् निर्दय असें जें 'स्मारेक्षुचाप' म्हणजे कामदेवाचें उंसाचें धनुष्य, त्या धनुष्यापासून सुटणाऱ्या पुष्परूपी बाणांच्या समूहाच्या प्रहारानें क्षीण म्हणजे पीडित झालेली लक्ष्मी ही श्रीहरीच्या मुखकमलाकडे मोठ्या आतुरतेनें पहात आहे. श्रीहरीच्या ठिकाणीं असलेले अलौकिक गुण हेंच तिच्या मनाला श्रीहरीकडे आकृष्ट करीत आहेत. भगवान् श्रीहरि हे आत्माराम असल्यामुळें ते त्या लक्ष्मीकडे ढुंकूनहि पहात नाहींत. त्याचें तिला मोठें दुःख वाटतें. तिला विष्णूचा राग येतो. स्त्रीस्वभाव-सुलभ अशा कोपयुक्त दृष्टीनें जेव्हां ती श्रीहरीच्या मुखाकडे पहाते तेव्हां तिचे ते आरक्त असलेले कटाक्ष कमळाच्या माळेप्रमाणें चंदनाच्या टिळ्याभोंवतीं दिसतात. त्यामुळें तो चंदनाचा तिलक कमळांची माळ घातलेल्या स्फटिकाच्या शिवलिंगाप्रमाणें शोभून दिसतो. जणुं कांहीं तांबड्या कमळांची माळ घातलेलें तें महादेवाचें लिंगच आहे असें वाटतें.

श्रीहरीच्या कपाळीं असलेला चंदनाचा तिलक ध्यान करणाऱ्या भक्तांच्या जन्ममरणरूपी अंधकाराचा नाश करणारा आहे. जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडलेल्या जीवांना स्वस्वरूपाचें भान होत नाहीं म्हणून जन्ममरणाचा फेरा हा अंधकारासारखाच आहे. या अंधकाराचा नाश श्रीहरीच्या ललाटीं असलेल्या तिलकाच्या ध्यानानें होतो. त्याचप्रमाणें तो तिलक श्रीहरीच्या मुखकमलाचें अत्यंत उत्कृष्ट भूषणहि आहे. याच अभिप्रायानें त्या तिलकाला जनि-मरण-तमःखण्डनं आणि मण्डनं हीं दोन विशेषणें दिलेलीं आहेत. तो तिलक दोन्ही भुवयांच्या मध्यभागांतून आरंभ होऊन वर भालप्रदेशीं गेलेला आहे. तो श्रीहरीचा चंदनाचा तिलक आमचें विपुल कल्याण करो. तो आम्हांला आत्मज्ञानानें समृद्ध करो. या श्लोकांत रूपक, उत्प्रेक्षा आणि अतिशयोक्ति हे अलंकार उत्तम शोभत आहेत.

पीठीभूतालकान्तं कृत-मुकुट-महादेव-लिङ्ग-प्रतिष्ठे
लालाटे नाट्यरङ्गे विकटतर-तटे कैटभारेश्चिराय ।

प्रोद्घाटयैवात्म-तन्द्री-प्रकट-पट-कुटीं प्रस्फुरन्ती स्फुटाङ्गं
पट्वीयं भावनाख्यां चटुल-मति-नटी नाटिकां नाटयेन्नः ॥४४॥

श्रीहरीचें ललाट म्हणजे भालप्रदेश हा तपोलोकच आहे अशा भावनेनें त्याचें ध्यान करावें, असें सांगितलेलें आहे. आचार्य या श्लोकांत श्रीहरीच्या ललाटाचें फारच बहारीनें वर्णन करीत आहेत. "नः चटुल-मति-नटी कैटभारेः लालाटे नाट्यरङ्गे भावनाख्यां नाटिकां नाटयेत्" आमची ही सुंदर बुद्धिरूपी नटी कैटभदैत्याचा वध करणारे भगवान् श्रीमहाविष्णु यांच्या ललाटरूपी रंगभूमीवर सदानुसंधानरूपी अखंडध्यानरूपी नाटकाचा प्रयोग करून दाखवो. आमच्या बुद्धीनें श्रीहरीच्या ललाट प्रदेशाचें अखंड ध्यान करावें असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. कसें आहे श्रीहरीचें ललाटस्थान तें पहा :

'अलकान्त' म्हणजे कुरळ्या केसांचें उगमस्थान असलेला मस्तकाचा भाग. तो जणुं कांहीं श्रीहरीनें मस्तकीं धारण केलेल्या मुकुटरूपी शिवलिंगाचें भव्य पीठ म्हणजे आसन सिंहासनच आहे असें दिसतें ! श्रीहरीनें मस्तकावर धारण केलेला मुकुट हा भव्य, वर्तुलाकार आणि उंच असल्यामुळें तो महादेवाच्या लिंगाप्रमाणें दिसत आहे. विविध रत्नांनीं जडविलेला सोन्या-चांदीचा तो मुकुट म्हणजे श्रीहरीच्या भालप्रदेशावर असलेल्या मस्तकाचें सिंहासन करून त्यावर जणुं कांहीं महादेवाच्या ज्योतिर्लिंगाचीच स्थापना केली आहे असें वाटतें ! त्या ज्योतिर्लिंगाजवळच खालच्या बाजूला असलेला अत्यंत विशाल भालप्रदेश हा भव्य रंगभूमीप्रमाणें दिसत आहे.

आमची बुद्धि ही एक चतुर आणि सुंदर नटीच आहे. तिनें आत्मतंद्रीला म्हणजे स्वतःच्या आळसाला बाजूला सारावें. तिनें विहित गोष्टींचें तत्परतेनें आचरण करणें आणि निषिद्ध गोष्टींपासून परावृत्त होणें या बाबतींतला आळस सोडून द्यावा. आळसाचा स्पष्ट पडदा बाजूला सारून तिनें आपलें भक्ति, वैराग्य इत्यादि सर्व गुण प्रकट करीत (प्रस्फुरन्ती) व रजोगुण आणि तमोगुण यांना बाजूला सारून (स्फुटाङ्गं) सांगोपांग सुस्पष्टपणें या रंगभूमीवर नृत्य करावें. आणि अनन्यभक्तीनें स्वरूपानुसंधानाचें – आत्मध्यानाचें छोटेसें नाटकहि करून दाखवावें.

तात्पर्य, एखादी नटी शंकरापुढें असलेल्या विशाल सभामंडपांत जशी अभिनयपूर्वक नृत्य करते अथवा नाट्यप्रयोग करते त्याचप्रमाणें माझ्या बुद्धीनेंहि श्रीहरीच्या विशाल भालप्रदेशीं आळस सोडून तसेंच रजोगुण व तमोगुण हे दोष बाजूला सारून, भक्ति आणि वैराग्य इत्यादि गुणांचा आविष्कार करीत यथेच्छ नृत्य करावें. स्वरूपानुसंधान करीत तेथेंच रमावें हीच माझी इच्छा आहे. या श्लोकांत बुद्धि आणि नटी या दोन्ही पक्षांना लागू पडेल अशाच खुबीनें वर्णन केलेलें असल्यामुळें समस्त वस्तुविषयक सावयव रूपक आणि त्याच्या जोडीला श्लेष व उत्प्रेक्षा हे अलंकार आहेतच.

मालालीवालिधाम्नः कुवलयकलिता श्रीपतेः कुन्तलाली
कालिन्द्यारुह्य मूर्ध्नो गलति हरशिरःस्वर्धुनीस्पर्धया नु ।
राहुर्वा याति वक्त्रं सकल-शशि-कला-भ्रान्ति-लोलान्तरात्मा
लोकैरालोक्यते या प्रदिशतु सततं साऽखिलं मङ्गलं नः ॥४५॥

आचार्य या पंचेचाळिसाव्या श्लोकानें श्रीहरीच्या मस्तकीं शोभणाऱ्या काळ्याभोर कुटिल केसांचें वर्णन करीत आहेत. " श्रीपतेः सा कुन्तलाली नः अखिलं मङ्गलं सततं प्रदिशतु " श्रीहरीच्या मस्तकावरील तो कुरळ्या केसांचा समूह आम्हांला सर्व प्रकारचें मंगल म्हणजे सुख, कल्याण प्राप्त करून देत राहो. श्रीहरीचे कुरळे केस कसे आहेत तें पहा :

श्रीहरि हे स्वतः 'अलिधामा' भ्रमराप्रमाणें कृष्ण-श्यामल वर्णानें युक्त आहेत. त्यांतच त्यांच्या खांद्यांवर दोन्ही बाजूंनीं पसरलेला केशसमूह हा जणुं कांहीं कृष्णकमळांनीं अथवा नीलकमलांनीं गुंफलेल्या माळांचा समूहच आहे कीं काय असें वाटतें. कुंतलाली म्हणजे केशपंक्ति अथवा केशसमूह.

मस्तकावरून खालीं पसरलेल्या श्रीहरीच्या केशसमूहाकडे पाहिलें म्हणजे असें वाटतें कीं, हा जणुं कांहीं यमुनेचा प्रवाहच श्रीहरीच्या मस्तकांवरून खालीं वहात आहे ! कोणी असें विचारील कीं, यमुना ही श्रीहरीच्या मस्तकावर कां गेली ? त्याला उत्तर देत आहेत – " हरशिरःस्वर्धुनी-स्पर्धया नु " गंगा ही शंकरांच्या मस्तकावर विराजमान झाली. तिला मोठेपणा मिळाला ! यमुनेला वाटलें, मी कांहीं गंगेपेक्षां कमी नाहीं. " गंगे च यमुने चैव " असा आम्हां दोघींच्या नांवांचा सारखाच उल्लेख होत असतो. अशा स्थितींत गंगा मात्र त्रिभुवनामध्यें

दुर्लभ असलेल्या महत्पदावर आरूढ झाली. शंकरांच्या जटाजुटांत ती विराजमान झाली. तर आतां मी त्याहिपेक्षां श्रेष्ठ असलेल्या पदावर आरूढ होईन. अशा स्पर्धेनें यमुनेनें भगवान् श्रीविष्णु यांच्या मस्तकावर आरोहण केलें ! श्रीहरीच्या मस्तकावरून तोच यमुनेचा प्रवाह जणुं कांहीं खालीं उतरत आहे, असा श्रीहरीच्या केशसमूहाकडे पाहून भास होतो ! तोच प्रवाह नीलकमळांची माळा आहे कीं काय असेंहि वाटतें ! नीलकमळांच्या माळेप्रमाणें यमुनेचेंहि पाणी काळेंच असतें ! नु शब्दाचा अर्थ कल्पना, तर्क असा आहे.

श्रीहरीच्या मस्तकावरील केशकलापाकडे पाहून असेंहि वाटतें कीं, श्रीहरीचें मुखकमल हें सर्व कलांनीं संपूर्ण असलेला पौर्णिमेचा पूर्ण चंद्रच आहे असें समजून त्याला ग्रासण्याकरितां ज्याचें मन भ्रांतीनें उत्सुक झालेलें आहे असा हा स्वर्गीचा राहूच त्या ठिकाणीं आला आहे असें वाटतें ! राहूचाहि वर्ण काळाच असतो. असा हा श्रीहरीच्या मस्तकावरील केसांचा समूह फक्त भक्तजनांनाच दिसूं शकतो. " लोकैः आलोक्यते अथवा लोकयन्ति, दिव्यचक्षुषा भगवन्मूर्तिं पश्यन्ति ते लोकाः " आपल्या दिव्य दृष्टीनें परमेश्वराच्या विराट् स्वरूपाचें जे अवलोकन करतात तेच खरे लोक होत. त्यांनाच महायोगी असें म्हणतात. तेच श्रीहरीच्या मस्तकावरील दिव्य असलेल्या केशकलापाला पाहूं शकतात. असा हा श्रीहरीचा केशसमूह मंगलकारक असलेल्या भक्ति, ज्ञान आणि वैराग्य या सद्गुणांचें निरंतर प्रदान करून आमचें कल्याण करो. या श्लोकांत उपमा, उत्प्रेक्षा आणि संदेह असे तीन अलंकार पहावयास सांपडतात.

सुताकाराः प्रसुते भगवति विबुधैरप्यदृष्टस्वरूपा
व्याप्त-व्योमान्तरालास्तरल-मणि-रुचा रञ्जिताः स्पष्टभासः।
देह-च्छायोद्गमाभा रिपु-वपुरगुरु-धूप-रोषाग्निधूम्याः
केशाः केशिद्विषो नो विदधतु विपुल-क्लेश-पाश-प्रणाशम् ॥४६॥

" केशिद्विषः केशाः नः विपुल-क्लेशपाशप्रणाशं विदधतु " कपटानें घोड्याचें रूप धारण केलेल्या केशिदैत्याचा कृष्णरूपानें वध करणाऱ्या श्रीहरीचे केस आमच्या विपुल असलेल्या क्लेशरूपी पाशांचा विनाश करोत. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. कसे आहेत श्रीहरीचे केश ते पहा :

योगनिद्रेचा अंगीकार करून श्रीहरि झोपले असतां श्रीहरीचे केसहि "सुप्ताकाराः" म्हणजे जेटच्या आकारप्रमाणें दिसतात. त्यांचें स्वरूप देवांनाहि दिसत नाहीं. विबुध म्हणजे देव. "विशेषेण सर्वं बुध्यन्ते इति विबुधाः" विशेषरूपानें ते सर्व कांहीं जाणातात म्हणून त्यांना विबुध असें म्हणतात. सर्वज्ञ असलेल्या देवांनाहि जें कळत नाहीं, जें दिसत नाहीं तें इतरांना कसें दिसणार? ही गोष्ट 'अपि' या शब्दानें सूचित केली आहे.

श्रीहरीच्या केसांनीं आकाशांतील 'अंतराल' म्हणजे मध्यप्रदेश व्यापून टाकला आहे. कपाळावरील दोन्ही बाजूकडे शोभणाऱ्या अलंकारांतील मधल्या पदकांत असलेल्या नीलरत्नाच्या तरलकांतीनें श्रीहरीच्या मस्तकावरील केश रंजित म्हणजे व्यापलेले, भूषित झालेले आहेत. त्यांची चकाकी अधिक खुलून दिसत आहे.

श्रीहरीच्या नीलवर्ण असलेल्या अंगकांतींतून बाहेर पडणाऱ्या जणुं कांहीं त्या छटाच आहेत असें वाटतें. असुर, दैत्य, राक्षस इत्यादि दुष्ट शत्रूंच्या शरीर-रूपी 'अगरु' म्हणजे एका विशिष्ट प्रकारच्या चंदनासारख्या धूपवृक्षांचा निर्यास (डिंक) त्याला जाळून टाकणारा जो श्रीहरीचा क्रोधाग्नि, त्याच्या धुराचे जणुं कांहीं ते लोटच आहेत असा भास होतो. धूम्य म्हणजे धुराचे लोट. अशा तऱ्हेचे श्रीहरीचे केशपाश आमच्या सर्व क्लेशांचा विनाश करोत.

या ठिकाणीं क्लेश शब्दानें संसारांत सर्वसामान्यपणें अनुभवली जाणारीं दुःखें किंवा संकटें नव्हेत. तर त्या सर्वांच्या मुळाशीं असलेले अविद्या, अस्मिता, राग, द्वेष आणि अभिनिवेश हेच खरे क्लेश आहेत असें समजावें. यांनाच तम, मोह, महामोह, तामिस्र आणि अंधतामिस्र असें म्हणतात. प्रकृतितत्त्व, महत्तत्त्व, अहंकारतत्त्व, आणि शब्दस्पर्शादि पंचतन्मात्रा यांच्यापासून उत्पन्न होणाऱ्या देह आणि इंद्रियें यांच्या समूहाला तो आत्मा नसतांना त्याला आत्मा समजणें याला अविद्या किंवा तम असें म्हणतात. ही अविद्याच सर्व दुःखाचें कारण असल्यामुळें ही असणें हाच खरा या जीवाला क्लेश आहे. अणिमादि अष्टविध ऐश्वर्यें आणि वैभव सुदैवानें प्राप्त झालें असतां त्यांच्याबद्दल ममत्वबुद्धि निर्माण होणें यालाच अस्मिता किंवा मोह असें म्हणतात. यांतूनच दुःखांचें अंकुर निर्माण होत असतात. स्वर्गादि अलौकिक सुखें आणि स्त्रीपुत्रादि लौकिक सुखें यांच्याबद्दल आसक्ति निर्माण

होणें यालाच राग किंवा महामोह असें म्हणतात. संस्कृत भाषेमध्यें राग शब्दाचा अर्थ विषयासक्ति असा आहे. या विषयासक्तीमुळेंच मनुष्याला संसारांत अनेक क्लेश भोगावें लागतात. ही विषयासक्तीच सांसारिक जीवनांत दुःखांचें पोषण करते. आपल्या ऐश्वर्याच्या अथवा वैभवाच्या आड कोणी आल्यास त्याच्याविषयीं मनांत जी प्रतिकूल भावना निर्माण होते तिला द्वेष किंवा तामिस्र असें म्हणतात. या द्वेषानेंच मनुष्य विवेकान्ध बनतो. ऐश्वर्याचीं अथवा वैभवाचीं सुखें भोगीत असतांना त्यांचा नाश होण्याची अथवा मरणाची जी भीति वाटते तें अभिनिवेशाचें अथवा अंधतामिस्राचें लक्षण होय. ही भीति जीवाला फारच क्लेश देते म्हणून तीहि क्लेशस्वरूपच आहे. हे सर्व क्लेश जीवाला पाशासारखे – फासासारखे बंधनकारक असतात. म्हणूनच आचार्यांनीं या सर्व क्लेशपाशांतून आपली सुटका व्हावी अशी या श्लोकांत प्रार्थना केलेली आहे. जे कोणी श्रीहरीच्या केशपाशाची या भावनेनें उपासना करतात, ध्यान करतात, त्यांचे सर्व क्लेशपाश श्रीहरीच्या कृपेनें नाश पावतात.

" पुण्यरज्ज्वा व्रजेदूर्ध्वं पापरज्ज्वा व्रजेदधः। द्वयं ज्ञानासिना च्छित्त्वा विदेहः शान्तिमृच्छति " ॥ रज्जु म्हणजे दोरी. बंधन, पुण्याच्या दोरानें मनुष्य स्वर्गलोकाला जातो. पापाच्या दोरानें तो अधोगतीला जातो. याकरितां शहाण्या मनुष्यानें वैराग्ययुक्त विवेकाचें खड्ग हातीं घेऊन हीं दोन्ही बंधनें तोडावींत. या दोन्ही बंधनांना जो तोडील तोच संसारबंधनांतून मुक्त होईल. तोच विदेहमुक्त होऊन श्रीहरीच्या कृपेनें शाश्वत शांतीचा अनुभव घेईल. विवेकयुक्त वैराग्याचें बळ मिळविण्याकरितां श्रीहरीची उपासना ही अत्यंत उपयुक्त आहे.

संस्कृत भाषेंत 'क' शब्दाचा अर्थ पाणी असा आहे. त्याचा ईश म्हणजे स्वामी अर्थात् मेघ असा केश शब्दाचा अर्थ करून हा सर्व श्लोक मेघाकडेहि लावतां येतो. याप्रमाणें या श्लोकांत श्लेष, उत्प्रेक्षा आणि परंपरितरूपक असे अनेक अलंकार असल्याचें पहावयास सांपडतें.

यत्र प्रत्युप्त-रत्न-प्रवर-परिलसद्भूरि-रोचिष्प्रतान-
स्फूर्त्या मूर्तिर्मुरारेर्द्यु-मणि-शत-चित-व्योमवद् दुर्निरीक्ष्या ।
कुर्वत्पारेपयोधि ज्वलदकृश-शिखा-भास्वदौर्वाग्नि-शङ्कां
शश्वन्नः शर्म दिश्यात्कलि-कलुष-तमःपाटनं तत्किरीटम् ॥४७॥

" कलिकलुषतमःपाटनं तत्किरीटं नः शश्वत् शर्म दिश्यात् " रागद्वेषादिरूप कलिमल हाच कोणी अंधकार. त्याचा नाश करणारा श्रीहरीचा मुकुट आम्हांला अविनाशी सुख प्राप्त करून देवो. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. कसा आहे श्रीहरीचा मुकुट तें पहा :

त्या मुकुटामध्यें अनेक उत्तमोत्तम रत्नें जडविलेलीं आहेत. त्या रत्नांचीं सुंदर आणि विपुल किरणें श्रीहरीच्या मुखावर पसरलेलीं आहेत. त्या किरणांच्या समूहांत मुरारि भगवान् श्रीविष्णु यांची मूर्ति, आकाशांत शेंकडों सूर्य उदयाला आले असतां तें आकाश जसें दुर्निरीक्ष्य होतें त्याचप्रमाणें तीहि अवलोकन करण्यास कठीण आहे.

'पारेपयोधि' म्हणजे समुद्राच्या पैल तीरावर शाकद्वीपामध्यें असलेल्या श्रीहरीच्या मस्तकावर शोभणारा तो मुकुट पाहिला म्हणजे असें वाटते कीं, समुद्रांतील प्रदीप्त झालेला तो देदीप्यमान वाडवाग्नीच आहे कीं काय ? याप्रमाणें समुद्रांतील प्रदीप्त असलेल्या वाडवाग्नीची शंका निर्माण करणारा तो श्रीहरीचा मुकुट आम्हांला शाश्वत सुखाचा – आत्मानंदाचा अनुभव प्राप्त करून देवो. हीच त्या श्रीहरीच्या रत्नजडित दिव्य आणि भव्य मुकुटाची आम्ही प्रार्थना करीत आहों. यांत अतिशयोक्ति आणि उत्प्रेक्षा हे दोन अलंकार आहेत.

भ्रान्त्वा भ्रान्त्वा यदन्तस्त्रिभुवनगुरुरप्यब्दकोटीरनेका
गन्तुं-नान्तं समर्थो भ्रमर इव पुनर्नाभिनालीक-नालात् ।
उन्मज्जन्नूर्जितश्रीस्त्रिभुवनमपरं निर्ममे तत्सदृक्षं
देहाम्भोधिः स देयान्निरवधिरमृतं दैत्य-विद्वेषिणो नः ॥ ४८॥

" दैत्यविद्वेषिणः सः निरवधिः देहाम्भोधिः नः अमृतं देयात् " दुष्ट दैत्यांचा नाश करणाऱ्या भगवान् श्रीविष्णु यांचा तो अपरंपार असलेला देहरूपी महासागर आम्हांला अमृताचा म्हणजे जन्म आणि मरण यांचा जेथें संबंध नाहीं अशा मोक्षाचा लाभ करून देवो. असा या श्लोकांतील मुख्य अन्वयाचा अर्थ आहे. आतां तो श्रीहरीचा देहरूपी पयोधि कसा आहे तें पहा :

त्रिभुवनगुरु म्हणजे ब्रह्मदेव सृष्टीच्या आरंभकालीं श्रीहरीच्या नाभिस्थानांतून उत्पन्न झालेल्या कमलांत ब्रह्मदेव जन्माला आले. आपण ज्या कमलांत जन्माला आलों त्या कमळाचें उत्पत्तिस्थान तरी कोठें आहे ? तें आपण पाहूं अशी त्यांना

इच्छा झाली. ते त्या कमलनालाच्या साहाय्यानें खालीं उतरले. ते श्रीहरीच्या विशाल देहरूपी सागरांत इकडे तिकडे फिरूं लागले ! ते स्वतः त्रैलोक्याचे गुरु असूनहि कोट्यवधि वर्षें फिरले ! फिरून फिरून दमले ! पण त्यांना कांहीं त्या अथांग असलेल्या श्रीहरीच्या देहरूपी सागराचा थांगपत्ता लागला नाहीं. अपरंपार असलेल्या त्या सागराच्या अंताला पोहोंचण्यास ते असमर्थ झाले ! शेवटीं पुन्हां श्रीहरीच्या नाभिकमळीं असलेल्या कमलनालांतून एखाद्या भ्रमराप्रमाणें ते स्वतःचें जन्मस्थान असलेल्या कमळांत आले ! तेथें त्यांनीं तपश्चर्या केली ! श्रीहरीच्या कृपेनें त्यांना ज्ञान प्राप्त झालें व ते 'ऊर्जितश्री' म्हणजे समर्थहि झाले ! नंतर त्यांनीं श्रीहरीच्या देहसागरांत फिरतां फिरतां त्यांना जे त्रिभुवन दिसलें त्यासारखेंच दुसरें त्रिभुवन निर्माण केलें. तात्पर्य, ब्रह्मदेवालाहि ज्याचा अंत लागला नाहीं, तो अपरंपार असलेला श्रीहरीचा देहरूपी महासागर तो आम्हांला अमृताचा – नित्यानंदाचा लाभ करून देवो हीच माझी मनीषा आहे.

मत्स्यः कूर्मो वराहो नरहरिणपतिर्वामनो जामदग्न्यः
काकुत्स्थः कंसघाती मनसिजविजयी यश्च कल्किर्भविष्यन् ।
विष्णोरंशावतारा भुवनहितकरा धर्मसंस्थापनार्थाः
पायासुर्मां त एते गुरुतर-करुणा-भार-खिन्नाशया ये ॥४९॥

श्रीहरीच्या मंगलमय विराट् स्वरूपाचें नखशिखान्त सगुणरूपानें येथपर्यंत वर्णन केलें. भगवान् श्रीहरि हे स्वयंज्योति परिपूर्ण परब्रह्मस्वरूप आहेत. एकाच प्रदीपांतून असंख्य दीप जसे प्रज्वलित व्हावेत त्याचप्रमाणें आदिपुरुष भगवान् श्रीहरि यांच्या स्वरूपांतून अंशावतार, अंशांशावतार, आवेशावतार इत्यादि अनेक अवतार झाले आहेत व होत असतात. त्यामध्यें दशावतारांना प्राधान्य आहे. आचार्य या श्लोकांत दशावतारांचा उल्लेख करून प्रार्थना करीत आहेत.

मत्स्य, कूर्म, वराह, हरिणपति म्हणजे मृगेंद्र अर्थात् सिंह. नर-हरिणपति म्हणजे नृसिंह, वामन, जामदग्न्य म्हणजे जमदग्नीचे पुत्र श्रीपरशुराम, काकुत्स्थ म्हणजे श्रीराम. ककुत्स्थ राजाच्या वंशांत ते अवतरले म्हणून त्यांना काकुत्स्थ असें म्हणतात. कंसघाती म्हणजे कंसाचा आणि कंसाच्या निमित्तानें चाणूर मुष्टिक इत्यादि दुष्टांचा वध करणारे भगवान् श्रीकृष्ण. त्याचप्रमाणें 'मनसिजविजयी' म्हणजे बुद्ध आणि पुढे होणारा कल्कि हा अवतार. हे श्रीहरीचे

प्रमुख दहा अवतार मानले जातात. हे सर्व अवतार 'भुवनहितकरा': म्हणजे लोकांच्या कल्याणाकरितां धारण केलेले आहेत. परोपकार आणि कैवल्य म्हणजे मुक्ति यांची परमेश्वरानें तुलना केली. त्यांत परोपकार श्रेष्ठ ठरला आणि कैवल्य म्हणजे मोक्षावस्था अर्थात् स्वस्वरूपींच रहाणें हें निकृष्ट ठरलें! म्हणून श्रीहरीनें दहा अवतार घेतले. "परोपकृति-कैवल्ये तोलयित्वा जनार्दनः। गुर्वीमुपकृतिं मत्वा, अवतारान्दशाग्रहीत्" दहा हे एक दिग्दर्शन मात्र आहे. दहापेक्षां श्रीहरीनें किती तरी अधिक अवतार घेतलेले आहेत. तात्पर्य, श्रीहरीचे सर्व अवतार लोककल्याणाकरितांच आहेत. त्याचप्रमाणें ते अवतार 'धर्मसंस्थापनार्थाः' धर्मस्थापनेकरितां आहेत. धर्माची संस्थापना करणें हेंहि एक अवतारांतील मुख्य प्रयोजन आहेच.

या ठिकाणीं प्रसंगसंगतीनें एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे. ती म्हणजे बौद्धावतारासंबंधीं होय. दशावतारामध्यें परिगणित असलेले भगवान् बुद्ध हे गौतमबुद्धच होत अशी पुष्कळांची कल्पना असते. गौतमबुद्धांचें लोकोत्तर विलक्षण वैराग्य, अलौकिक त्याग, दया, शांति आणि संघटन-चातुर्य हें अपूर्व होतें. 'यद्यद्विभूतिमत्सत्त्वं' या न्यायानें ते श्रीहरीचे अंशच होत ही गोष्ट खरी आहे, पण दशावतारांतील बुद्ध शब्दानें मात्र गौतमबुद्ध मानतां येत नाहींत. या श्लोकामध्यें बुद्धाचा उल्लेख 'मनसिजविजयी' या शब्दानें केलेला आहे. हा शब्द विशेषणवाचक आहे. विशेषणाच्या साहाय्यानें विशिष्टाचें ऐक्य सिद्ध होत नसतें. नरनारायणालाहि मनसिजविजयी हें विशेषण लागू पडतें! भगवान् शंकरहि मनसिजविजयी आहेत, पण हे कोणी बुद्ध नव्हेत. गौतमबुद्ध हेहि मनसिजविजयी आहेत, पण ते दशावतारांतील बुद्ध नव्हेत. श्रीमद्भागवतांत बुद्धावताराचें प्रयोजन वर्णन करतांना दिलेला एक श्लोक मोठा मननीय आहे. सुप्रसिद्ध गौतमबुद्धाच्याहि पूर्वकालांत समाजांत अशी एक परिस्थिति निर्माण झालेली होती कीं, त्रिपुरासुरादि दैत्य, मयानें निर्माण करून दिलेल्या पुरांच्या नगरांच्या नगरतुल्य असलेल्या विमानाच्या साहाय्यानें धर्मनिष्ठ लोकांचा छळ करीत होते. तीं नगरें सोनें, चांदी आणि पोलाद या धातूंनीं व विशिष्ट कलाकृतींनीं निर्माण केलेलीं असल्यामुळें अभेद्य होतीं. त्यांचा वेगहि अदृश्य होता. अशा त्या पुरांच्या – विमानांच्या साहाय्यानें त्या दैत्यांनीं देवाधर्माचा अत्यंत छळ सुरू केला. ते दैत्य स्वतः वेदानुयायी होते. वेदमार्गाचें ते तत्परतेनें आचरण करीत होते. "देवद्विषां निगमवर्त्मनि निष्ठितानां" अशा

शब्दांनीं त्यांचें वर्णन केलेलें आहे. वैदिककर्मांच्या बलानें आणि मयानें निर्माण करून दिलेल्या पुरींच्या – विमानांच्या साहाय्यानें त्यांनीं लोकांचा उच्छेद मांडला. त्या वेळेला त्या दैत्यांच्या बुद्धीला व्यामोह निर्माण होईल असा मोठा लोभनीय वेष धारण करून भगवान् श्रीहरि अवतरले आणि त्यांनीं त्या असुरांना पाखंडमताचा उपदेश करून त्यांचा बुद्धिभेद केला. वेदमार्गापासून भ्रष्ट झालेल्या त्या असुरांचा पुढें देवांनीं पराभव केला व सर्व लोकांना त्यांच्या संकटांतून मुक्त केलें. याप्रमाणें लोकहिताचें व तद्द्वारां धर्मसंस्थापनेचें कार्य करणारा भगवान् बुद्ध हा गौतमबुद्धाहून निराळा असून तो गौतमबुद्धाच्या पूर्व काळांतला आहे असें म्हणावें लागतें. येरवी " पूर्भिर्मयेन विहिताभिरदृश्यतूर्भिः । लोकान् घ्नताम् " या भागवतांतील वाक्याला कांहीं अर्थच रहात नाहीं. गौतमबुद्धाच्या जन्मकालीन इतिहासांवरून त्या काळीं मय दैत्यानें निर्माण केलेल्या पुरांचा आश्रय करून लोकांचा नाश करणारे असे कोणी असल्याचें दिसून येत नाहीं. हाच अभिप्राय लक्षांत घेऊन " त्रिपुरासुरविप्रलम्भादिकं बौद्धे " त्रिपुरासुरांदिकांना व्यामोह निर्माण करण्याचें कार्य बौद्धावतारांत केलें असा बुद्धाच्या अवतारकार्याचा निर्देश कांहीं विद्वान् करतात तोच योग्य दिसतो. आचार्यांनाहि अवतार म्हणून तोच बुद्ध विवक्षित आहे. " देवद्विषां निगमवर्त्मनि निष्ठितानां पूर्भिर्मयेन विहिताभिरदृश्यतूर्भिः । लोकान् घ्नतां मतिविमोहमतिप्रलोभं वेषं विधाय बहुभाष्यत औपधर्म्यम् ॥ " (भागवत २–७–३७).

दानवांनीं हिरावून नेलेल्या वेदांना परत मिळवून धर्मस्थापनेचें कार्य श्रीहरीनें मत्स्यावतारांत केलें. समुद्रमंथनाच्या वेळीं रवि म्हणून कल्पिलेला मंदर पर्वत समुद्रांत बुडूं लागला असतां त्याला आपल्या पाठीवर धारण करून धन्वन्तरी, चंद्र, कामधेनु आणि अमृत इत्यादि लोकोपयोगी विविध रत्नांचें संपादन करणें व त्याद्वारां धर्मस्थापनेला साहाय्य करणें हीं कामें कूर्मावतारांत केलीं. वराह अवतार धारण करून हिरण्याक्ष दैत्याचा वध आणि भूमंडलाचा उद्धार हीं कार्यें केलीं. नरसिंहरूप धारण करून प्रल्हादाला हिरण्यकशिपूपासून वांचविलें आणि देवाधर्माचा द्वेष करणाऱ्या त्या हिरण्यकशिपूचा वध करून लोकांना उपकृत केलें.

वामन अवतारामध्यें बलीचा निग्रह करून देवांचें नष्ट झालेलें वैभव देवांना पुन्हां प्राप्त करून दिलें आणि इंद्रादि देवांच्या सुखानें सर्व मानवांनाहि सुखी केलें. परशुराम अवतार घेऊन दुष्ट आणि गर्विष्ठ क्षत्रियांचा

वध केला आणि पृथ्वीचा भार हलका केला. दाशरथी रामाच्या रूपानें अवतरून जनतेला छळणाऱ्या दुष्ट राक्षसांचा व त्यांचा राजा असलेल्या रावणाचा वध केला. कृष्ण अवतारामध्यें कंस, चाणूर, मुष्टिक, शल, तोशल, अघासुर, बकासुर, शाल्व, वक्रदंत, कालयवन इत्यादि असंख्य दुष्टांचा नाश करून धर्मस्थापनेचें आणि संतांच्या व भक्तांच्या संरक्षणाचें कार्य केलें. बुद्धावतारांतील कार्याचा वर निर्देश केलाच आहे. पुढेंहि कल्कि अवतार घेऊन कलिकल्मषांचा – दुष्टांचा नाश करतील, अशा रीतीनें श्रीहरीचे सर्व अवतार जगाच्या कल्याणासाठींच असलेले दृष्टीस पडतात. " गुरुतरकरुणाभार खिन्नाशयाः " सर्व अवतारांतील 'आशय' म्हणजे अन्तःकरणें हीं अत्यंतात्यंत करुणाभारानें द्रवलेलींच दृष्टीस पडतील. ते हे श्रीहरीचे अंशावतार ' मां पायासुः ' म्हणजे माझें रक्षण करोत.

यस्मादाचो निवृत्ताः समममपि मनसा लक्षणामीक्षमाणाः
स्वार्थालाभात्परार्थं-व्यपगम-कथन-श्लाघिनो वेदवादाः ।
नित्यानन्दं स्वसंविच्चिरवधि-विमल-स्वान्त-संक्रान्त-बिम्ब-
च्छायापन्नाऽपि नित्यं सुखयति यमिनो यत्तदव्यान्महो नः ॥५०॥

वर्णन करावयास प्रवृत्त झालेली वाणी ज्याचे शब्दांनी वर्णन करतां येत नाहीं म्हणून मनासह ज्याच्यापासून परावृत्त होते. लक्षणेनें वर्णन करावयास प्रवृत्त झालेलीं उपनिषदांतील वाक्यें देखील अभिप्रेत अर्थाचा लाभ न झाल्यामुळें अतद्व्यावृत्तीनेंच ज्याचें प्रतिपादन करतात. (तत् म्हणजे तें परब्रह्मस्वरूप शुद्ध चैतन्य. अ-तत् म्हणजे त्याच्याहून भिन्नरूपानें भासणारे नामरूपात्मक विश्वप्रपंचांतील पदार्थ. त्यांची व्यावृत्ति म्हणजे निषेध किंवा निरास. हें तें नव्हे. तें तें नव्हे. याप्रमाणें दृश्य वस्तूंचा निरास करूनच उपनिषदें शुद्ध तत्त्वाचें प्रतिपादन करतात.) जें नित्यानंदस्वरूप आहे. स्वसंवेद्य आहे. पराकोटीच्या अत्यंत निर्मल अन्तःकरणांत प्रतिबिंबित होऊनच जें योगीजनांना नित्य आनंद देतें तें स्वयंप्रकाश ब्रह्मस्वरूप असलेलें तेज आमचें रक्षण करो. असा या श्लोकाचा सरळ अन्वयानुसारी अर्थ आहे.

मागच्या श्लोकांत श्रीहरीच्या अंशावतारांचें स्वरूप व कार्य लक्षांत घेऊन त्यांचें वर्णन आणि स्तवन केलें. त्याच्यापूर्वी आदि पुरुषाच्या विराट् स्वरूपाचें

वर्णन केलें. तत्त्वतः पाहूं गेलें असतां आदि पुरुषाचें स्वरूप हा वर्णनाचा विषयच होऊं शकत नाहीं. तें तत्त्व पूर्ण एकजिनसी असल्यामुळें तेथें विकल्पाला, भेदाला वावच नाहीं. जें अनिर्वचनीय आहे त्याचें वर्णन काय करणार ? तें सत्य, ज्ञान, नित्य आणि आनंदस्वरूप आहे असा वेद त्याचा उल्लेख करतात, पण तें फक्त स्वसंवेद्य आहे. मग अशा तत्त्वांचें वर्णन काय करणार ? तरी पण अशाहि स्थितींत वर्णन करण्याचा जो प्रयत्न केला गेला तो केवळ " उपायः सोऽवताराय " मानवी बुद्धीला कसें तरी त्या तत्त्वाच्या जवळ नेऊन पोहोंचविणें याच हेतूनें केला. तत्त्वतः " नास्ति भेदः कथंचन " तेथें तिळमात्रहि भेदाला वाव नाहीं. हाच खरा सिद्धान्त आहे. तेथें जाति आणि व्यक्ति हा भाव नाहीं. तेथें गुण आणि गुणी हा भाव नाहीं. तेथें अवयव आणि अवयवी हाहि भाव नाहीं. तेथें क्रिया आणि क्रियावान् हेंहि स्वरूप नाहीं. मग त्याचें प्रतिपादन काय करणार ? अशाहि स्थितींत वेदांनीं – उपनिषदांनीं परमेश्वराच्या अमूर्त स्वरूपांत बुद्धीचा प्रवेश घडवून आणण्याकरितां मूर्तोपासनेची कल्पना विविध प्रकारांनीं मांडलेली आहे.

अग्नीचें स्वरूप दाखवावयाचें झाल्यास अग्नीनें प्रदीप्त असलेलीं लाकडें, कोळसे अथवा गोवरीचीं खांडेंच दाखवावीं लागतात. त्या शिवाय अग्नीची कल्पना येतच नाहीं. याच न्यायानें परमेश्वराच्या यथार्थ स्वरूपाची कल्पना येण्याकरितां परमेश्वराच्या सोपाधिक सगुण स्वरूपाचा अंगीकार करावाच लागतो. परिच्छिन्न परिमित पण परम रमणीय अशा श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण, श्रीगजानन, श्रीनगज्जननी ललितांबा महात्रिपुरसुंदरी, श्रीलक्ष्मी, श्रीनृसिंह, श्रीमारुति, श्रीदत्त इत्यादि अनेक सगुण स्वरूपांची कल्पना पुढें मांडून त्यांचे अवतार व त्या अवतारांतील अलौकिक चरित्रें वर्णन करून सांगितलीं.

कल्पना या शब्दाला मात्र कोणीं घाबरूं नये व गैरसमजहि करून घेऊं नये. शुद्ध चित्स्वरूपाच्या ठिकाणीं अधिष्ठित असलेलें अखिल विश्वच जेथें कल्पनामय आहे, तेथें ईश्वराचीं सगुण साकार स्वरूपेंहि कल्पनामय असणें स्वाभाविकच आहे. तथापि व्यवहारदशेंत व्यवहाराच्या भूमिकेवर माता, पिता, पति, पत्नी, पुत्र, मित्र इत्यादि सर्व व्यवहार जसे सोपपत्तिक व सुव्यवस्थित मानले जातात व पाळले जातात आणि व्यवहाराच्या भूमिकेवरून पहातां ते सत्यच असतात, त्याचप्रमाणें परमेश्वराचीं सगुण रूपें आणि चरित्रें हीं ऐतिहासिक दृष्ट्या पूर्ण सत्य असून उपासनेच्या दृष्टीनें तीं अत्यंत उपयुक्त आहेत, म्हणून

त्यांचा कोणीहि अव्हेर करूं नये. परिपक्व दशेला पोहोंचलेलीं फळें हीं जशीं देठापासून आपोआप सुटतात त्याचप्रमाणें साधनावस्थेंतील कर्मांचा परिपाक म्हणजेच सिद्धावस्था असल्यामुळें सिद्धावस्थेंत पोहोंचल्यानंतर साधनावस्थेंतील कर्में आपोआप सुटतात. तीं सोडावीं लागत नाहींत. अपरिपक्व अवस्थेंत उपयुक्त साधनांचा त्याग करणें हें एक आत्मनाशाचेंच लक्षण होय. सर्व कल्पनांचें अधिष्ठान असलेल्या शुद्ध चित्तत्त्वाचा अर्थात् आत्मस्वरूपाचा अपरोक्ष साक्षात्कार झाल्याशिवाय सर्व खोटें आहे असें म्हणणें हाहि एक प्रकारचा मिथ्याचारच होय.

श्रीहरीच्या या नयनमनोहर परिच्छिन्न परिमित सगुण स्वरूपांतूनच विश्वव्यापी विराट् स्वरूपाचेंहि आचार्यांनी वर्णन केलें. परमेश्वराच्या विराट् स्वरूपाचें बुद्धीनें आकलन केल्यानंतर त्या विराट्स्वरूपाच्याहि पलीकडे असलेलें शुद्ध अनिर्वचनीय चिन्मय परब्रह्म तेंच पूर्ण सत्य आणि आनंदमय आहे. तथेंच बुद्धीनें पोहोंचलें पाहिजे असाच वेदांचा व उपनिषदांचा अभिप्राय आहे. आचार्यांनीं तोच अभिप्राय लक्षांत घेऊन या पन्नासाव्या श्लोकांत अखिल विश्वाचें अधिष्ठान असलेल्या परमेश्वराच्या शुद्ध चिन्मय स्वरूपाची कल्पना स्पष्ट केली आहे.

अखिल विश्वाच्या मुळाशीं अधिष्ठानरूपानें विराजमान असलेलें चित्तत्त्व म्हणजेच परमात्मा परब्रह्म. त्याचें वर्णन वाणीला करतां येत नाहीं. वर्णन करतां करतां वाणी थकते. आणि तेथून ती परावृत्त होते. वाणीवरोवरच मनहि पण त्या तत्त्वाचें साकल्यानें आकलन करूं शकत नाहीं. म्हणून मनालाहि तेथून निवृत्त व्हावें लागतें. " यतो वाचो निवर्तन्ते, अप्राप्य मनसा सह " या श्रुतिवचनांतहि हाच अभिप्राय व्यक्त केलेला आहे.

वेद देखील त्या तत्त्वाचें प्रतिपादन करावयास प्रवृत्त होतात पण त्या परमात्मतत्त्वाच्या ठिकाणीं गुण, क्रिया, जाति अथवा संस्कार किंवा यांसारखे शब्दानें प्रतिपादन करण्याला योग्य असे कोणतेच धर्म नाहींत म्हणून शब्दानें त्या तत्त्वाचें वेदालाहि प्रतिपादन करतां येत नाहीं. शुद्ध चित्तत्त्वाचा वाचक शब्दच उपलब्ध नाहीं. लक्षणेनेंहि पण शुद्ध चैतन्याचा बोध शब्द करून देऊं शकत नाहीं. लक्षणेमध्यें देखील अगोदर मुख्य शब्दाचा अर्थ लक्षांत घ्यावा लागतोच. तो अर्थ वाक्यार्थांत जुळला नाहीं म्हणजे त्याच्याशीं संबद्ध असलेला दुसरा अर्थ घेऊन वाक्यार्थाची उपपत्ति लावावी लागते. उदाहणार्थ,

हा रस्ता राजवाड्यावरून जातो " असें म्हटल्यानंतर राजवाड्यावरून या ब्दाचा मुख्य अर्थ आधीं लक्षांत येतो. नंतर राजवाड्यावरून रस्ता जाणें क्य नाहीं ही गोष्ट लक्षांत येते आणि मग राजवाड्यावरून याचा अर्थ जवाड्याजवळून असा लक्षणेनें केला जातो. लक्षणेमध्यें देखील शब्दाच्या लक्षित र्थाचा मुख्य अर्थाशीं संबंध असावा लागतोच.

शुद्ध चैतन्यतत्त्व हें असंग म्हणजे संसर्गविरहित आहे. त्याचा कोणाशींच संबंध नाहीं. " असङ्गो न हि पज्जते " असें त्याचें वर्णन केलेलें आहे. याप्रमाणें शुद्ध परमात्मतत्त्वाचा बोध करून देण्याला लक्षणाहि उपयोगी पडत नाहीं. " लक्षणां ईक्षमाणाः वेदवादाः स्वार्थालाभात् परार्थ-व्यपगम-कथन-श्लाघिनः भवन्ति " लक्षणेकडे दृष्टि टाकीत टाकीत शेवटीं वेदवचनें अतद्व्यावृत्तीनें परमात्म-तत्त्वाचें निरूपण करतात (मु. स्तो. सं. भाग १ पान १३३ पहा.). परार्थ म्हणजे परमात्मस्वरूपाहून भिन्नरूपानें प्रतीतीला येणारे देह, इंद्रियें, पुत्र, कलत्र, वित्त, वैभव इत्यादि अनात्मस्वरूप पदार्थ. त्या सर्वांचा 'व्यपगम' म्हणजे निरास अर्थात् व्यावृत्ति म्हणजे निराकरण केलें जातें. ते आत्मा नव्हेत. ते शुद्ध परब्रह्म-स्वरूप नव्हेत. 'अरूपं', 'अस्पर्शं', 'अस्थूलं', 'अनणु' इत्यादि वाक्यांनीं सर्व दृश्य वस्तूंचा निरास केला जातो. सर्व दृश्य कल्पनांचा निरास करीत करीत शेवटीं सर्व निषेधांचें अधिष्ठान म्हणून जें शिल्लक रहातें तेंच तें शुद्ध परमात्म-तत्त्व होय.

रत्नागिरीच्या परिपक्व हापुस आंब्याची फोड चाखावयास देऊन एखाद्याला विचारावें, का हो कसा आहे आंबा ? तो म्हणतो फारच उत्तम आहे. अगदीं गोड आहे. काय हो, तो उसाच्या रसासारखा गोड आहे का ? नाहीं. मग मधा-सारखा गोड आहे का ? नाहीं. मग ताज्या धारोष्ण दुधासारखा गोड आहे का ? नाहीं. मग काय तो किसमिस-बेदाण्यासारखा गोड आहे ? नाहीं. मग काय गुळासारखा, खडीसाखरेसारखा ? छेः छेः, त्याची गोडी सांगतांच येत नाहीं. अरे मग, भल्या माणसा तो गोड नाहीं असें तरी म्हण. छे तसें कसें म्हणूं ? गोड आहे हें निश्चित. हीच स्थिति शुद्ध चित्स्वरूपाच्या – स्वस्वरूपाच्या साक्षात्कारानंतर होत असतें. " इक्षु-क्षीर-गुडादीनां माधुर्यस्यान्तरं महत् । तथापि न तदाख्यातुं सरस्वत्याऽपि शक्यते " प्रत्येक गोड पदार्थातील गोडींत फरक असतो. पण तो फरक प्रत्यक्ष सरस्वतीला शब्दानें बोलून दाखवितां येत नाहीं !

तीच स्थिति स्वस्वरूपाची आहे. निजानन्द फक्त जाणला जातो तो बोलून दाखवितां येत नाहीं. याच अभिप्रायानें त्याला तत्त्ववेत्त्यांनीं "स्वसंवेद्य" असें म्हटलेलें आहे. तात्पर्य, देहाचे अवयव मी नव्हे. देह मी नव्हे. इंद्रियें मी नव्हे मन बुद्धि मी नव्हे, अशा रीतीनें निषेध करीत करीत शेवटीं जें शिल्लक रहातें अर्थात् निषेध करणाराच शेवटीं शिल्लक रहातो – तेंच मीचें तात्त्विक रूप होय. त्यालाच आत्मा, परमात्मा अथवा शुद्ध चैतन्य असें म्हणतात.

कसें आहे तें परमात्मस्वरूप ? पहा : "नित्यानंद" तें नित्य म्हणजे अविनाशी आहे. अथवा सत्यस्वरूप आहे. नामरूपात्मक सर्व दृश्य प्रपंचाचा बाध झाला तरी त्याचा कधींहि बाध होत नाहीं म्हणून त्याला सत्य असें म्हणतात. ज्ञानांतील सर्व विषयांचा लोप झाला तरी निर्विषय ज्ञानस्वरूपानें तें शिल्लक असतेंच. म्हणून याला "ज्ञानं" अथवा "विज्ञानं" असें म्हटलेलें आहे. तें परमप्रिय असल्यामुळें आनंदस्वरूप आहे. तें अपरिच्छिन्न असल्यामुळें अनंत आहे. " सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म " " नित्यं विज्ञानमानंदं ब्रह्म " याप्रमाणें वेद त्याचें वर्णन करतात.

यावर कोणी अशी शंका घेईल कीं, अहो ! हीं उपनिषदांतील वाक्यें आहेत. संहिता, ब्राह्मण हाच वेदांचा मुख्य भाग आहे. उपनिषदें हीं गौण आहेत. उपनिषदें हीं गौण असल्यामुळें उपनिषदांतील सिद्धान्तहि पण गौणच आहे. पण ही शंका बरोबर नाहीं. वेदांतील संहिता आणि ब्राह्मणरूप पूर्वभाग हा कर्मप्रतिपादक आहे तर उपनिषद्रूपी उत्तर भाग हा ज्ञानप्रतिपादक आहे. कर्में हीं चित्तशुद्धिद्वारां ज्ञानाला उपयुक्त असल्यामुळें कर्माचे प्रतिपादन करणारा वेदाचा भाग हा ज्ञानाचें प्रतिपादन करणाऱ्या उपनिषद्भागाचें अंग होऊं शकतो व उपनिषद्भाग हाच अंगी म्हणजे मुख्य होऊं शकतो. याच अभिप्रायानें आचार्यांनीं उपनिषदांतील वाक्यांना उद्देशून "वेदवादाः" असा शब्दप्रयोग केलेला आहे.

तो आत्मा किंवा तें ब्रह्मचैतन्य "स्वसंवित्" म्हणजे स्वसंवेद्य अर्थात् स्वतःच्याच अनुभवानें कळण्यास योग्य असें आहे. शुद्ध परमात्मतत्त्वाचें स्वसंवेद्यत्व वर वर्णिलेलेंच आहे. स्वसंविद् याचा अर्थ स्वयंप्रकाश असाहि होतो. तात्पर्य, नित्य आनंदमय आणि स्वयंप्रकाश असें जें परमेश्वराचें "महः" म्हणजे तेज आहे. तें तेज, तें परमात्मतत्त्व जगावर अनुग्रह करण्याकरितां विविध दिव्यरूपें धारण करून "यमी" म्हणजे संयमशील असलेल्या योगीजनांना

व भक्तजनांना संतोषवीत असतें. " निरवधि-विमल-स्वान्त-संक्रान्त-बिम्ब-छायापत्त्या अपि यत् नित्यं यमिनः सुखयति " नितान्त निर्मल अशा आपल्या अंतःकरणांत पडलेल्या ज्या तेजाच्या प्रतिबिंबानेंहि शुकसनकादिक बडेबडे तत्त्ववेत्ते परम विरक्त संयमी भगवद्भक्त नित्य सुखी होतात, त्यांना जें तेज नित्य सुखी करतें तें परब्रह्मस्वरूप असलेलें दिव्य तेज " तत् महः नः अव्यात् " तें तेज आमचें रक्षण करो. या श्लोकांत "यमिनः" हा शब्दप्रयोग करून आचार्यांनीं परमात्मतत्त्वाच्या साक्षात्काराकरितां ज्ञान, वैराग्य आणि भक्ति यांच्याबरोबरच योगाभ्यासाचीहि आवश्यकता सूचित केलेली आहे. तो आचार्यांना विवक्षित असलेला योग आम्ही श्रीआचार्यांच्याच " योग तारावलि " या स्तुतिवजा असलेल्या योग प्रकरणांत विस्तृत रीतीनें मांडणार आहोंत. वाचकांनी त्याचा अभ्यास अवश्य करावा.

आ पादादा च शीर्षाद्पुरिदमनघं वैष्णवं यः स्वचित्ते
धत्ते नित्यं निरस्ताऽखिलकलिकलुषे संतताऽन्तःप्रमोदः ।
जुह्वज्जिह्वाकृशानौ हरिचरित-हविः स्तोत्रमन्त्रानुपाठै-
स्तत्पादाम्भोरुहाभ्यां सततमपि नमस्कुर्महे निर्मलाभ्याम् ॥५१॥

पायापासून तें मस्तकापर्यंत श्रीमहाविष्णूचें वर्णन केलेलें हें मंगलमय शुद्ध स्वरूप जो कोणी आपल्या चित्तामध्यें नित्य धारण करील त्याच्या अन्तःकरणांतील सर्व कलिमल म्हणजे कामक्रोधादि विकार व अन्य पातकें नाहींशीं होऊन तो निरंतर आनंदानें परिपूर्ण होईल. त्याचें अंतःकरण आनंदानें भरून जाईल.

या स्त्रोत्ररूपी मंत्राचा निरंतर पाठ करीत जो कोणी श्रीहरिचरित्ररूपी हविर्द्रव्यांचें आपल्या जिह्वारूपी अग्नीमध्यें हवन करील तोहि आम्हाला अत्यंत पूज्य असून आम्ही त्याच्या निर्मल चरणकमलांना सतत नमस्कारहि करतों. श्रीहरीप्रमाणेंच श्रीहरीचे अनन्य भक्तहि अत्यंत पूज्य असतात. एका भगवद्भक्तानें म्हटलें आहे कीं, हे जगन्नाथा परमेश्वरा ! तुमच्या भक्ताची सेवा करणारे जे सेवक असतील त्यांच्या सेवकांचे जे सेवक आहेत त्या सेवकांचाहि मी सेवक आहें. आपण माझी आठवण ठेवा. " त्वद्भृत्य-भक्त-परिचारक-भृत्य-भृत्य-भृत्यस्य भृत्य इति मां स्मर लोकनाथ ! "

तात्पर्य, श्रीहरीच्या भक्तांच्या भक्तांचीहि उपासना केली तरी देखील लोक कृतार्थ होतात. तर मग साक्षात श्रीहरीची उपासना केल्यानंतर कृतार्थ होतील हें काय सांगावयास पाहिजे ? तें कैमुतिकन्यायानेंच सिद्ध होतें.

मोदात्पादादि-केश-स्तुतिमतिरचितां कीर्तयित्वा त्रिधाम्नः
पादाब्ज-द्वन्द्व-सेवा-समय-नतमतिर्मस्तकेनानमद्यः ।
उन्मुच्यैवात्मनैनो-निचय-कवचकं पञ्चतामेत्य भानो-
र्बिम्बान्तर्गोचरं स प्रविशति परमानन्दमात्म-स्वरूपम् ॥५२॥

श्रीहरीच्या चरणकमलांची उपासना करीत असतांना नम्रबुद्धीनें श्रीहरीच्या चरणीं मस्तक ठेवून जो कोणी श्रीहरीचें आम्ही रचलेलें हें पादादि-केशान्त-वर्णनस्तोत्र आनंदानें म्हणेल तो या स्तोत्रपाठानें आपल्या सर्व पातकांच्या समूहाचें कवच फोडून त्यांतून मुक्त होईल आणि शेवटीं देह ठेवल्यानंतर तो सूर्यबिंबामध्यें प्रत्यक्ष होणाऱ्या परमानंदस्वरूप असलेल्या आत्मस्वरूपामध्यें प्रविष्ट होईल. सर्व संसारबंधनांतून तो मुक्त होईल. अशी या विष्णुपादादि-केशान्तवर्णन-स्तोत्राची फलश्रुति आहे. ॐ तत्सत्.

उपासनापद्धति

अन्तःकरणाला सात्त्विक समाधानाचा लाभ होण्यासाठीं भगवान् श्रीमहा-विष्णु यांची उपासना ही अत्यंत उपयुक्त आहे. पृष्ठसंख्या १५२ मध्यें दिलेल्या श्रीविष्णुयंत्राची आकृति लक्षांत घ्यावी. या यंत्राचें एकाग्रचित्तानें ध्यान करावें. षट्कोणांतील मध्यभागांत असलेला प्रणव म्हणजे ओंकार हा एक श्रीविष्णूचा महामंत्रच आहे. "तद्वाचकः प्रणवः" प्रणव हा परमेश्वराचा वाचक आहे. (सु. स्तो. सं. भाग १ ला पान १९४ ते १९६ अवश्य पहा). शक्ति आणि शक्तिमान् यांच्यांत जसा अभेद असतो त्याचप्रमाणें वाच्य आणि वाचक यांच्यामध्येंहि अभेद असतो. याच अभिप्रायानें देवता आणि देवतांचे वाचक असलेले मंत्र हे एकरूपच मानले जातात. "मन्त्रमयी देवता" हा तर मीमांसकांचा सिद्धान्तच आहे. यंत्र हें एक मंत्रमय देवतेचें अधिष्ठान आहे. तें देवतेचें मंदिर आहे. या मंदिरांत षट्कोणाच्या मध्यभागीं प्रणवरूपी महाविष्णूच विराजमान झालेले आहेत. षट्कोणाच्या बाहेर असलेल्या सहा त्रिकोणांत भगवान् श्रीविष्णु यांचा षडाक्षरी मंत्र दिलेला आहे. या मंत्राची गणना महामंत्रांत

केलेली आहे. हा मंत्र सर्व पातकांचें एकमेव दिव्य प्रायश्चित आहे. सिंहाचा शब्द ऐकला कीं, इतर श्वापदें जशीं हतबल होतात, त्याचप्रमाणें या मंत्राच्या शब्दालाहि सर्व पातकें वावरतात. हा मंत्र सर्व पातकांचा निरास करतो असा याचा महिमा आहे. यंत्रांतील तिसऱ्या अष्टदल कमलांत श्रीनारायणाचा अष्टाक्षरी मंत्र आहे. याच मंत्राच्या प्रभावानें देवांचा राजा इंद्र हा विजयी झाला. चित्ताला शुद्ध सात्विक समाधानांचा लाभ याच मंत्रानें होतो. हा मंत्र सकल कामना सिद्ध करणारा कल्पद्रुमच आहे. चौथ्या द्वादशदल कमलांत श्रीहरीचा सुप्रसिद्ध द्वादशाक्षरी मंत्र आहे. हा मंत्र श्रीनारदमुनींचा अत्यंत आवडता उपासना-मंत्र आहे. या मंत्राच्या प्रभावानेंच नारदमुनि हे देवर्षि झाले ! भगवद्भक्त ध्रुव याच मंत्राच्या प्रभावानें ध्रुवपदीं विराजमान झाला ! असे हे श्रीविष्णूंचे चारहि मंत्र अत्यंत महत्त्वाचे आहेत. यांपैकीं कोणत्याहि एखाद्या मंत्राचा नित्य जप करून अन्तःसमाधानाचा लाभ घ्यावा.

जपानुष्ठानपद्धति

पूर्वी श्रीगणेशमंत्राच्या जपानुष्ठानाची जी पद्धति सांगितली आहे तीच सर्वसाधारणपणें सर्व मंत्रांच्या जपानुष्ठानाला योजावी. प्रत्येक मंत्राचे ऋषि, छंद आणि देवता भिन्न असतात. करन्यास आणि अंगन्यासहि मंत्रांतील अक्षरांच्या अनुरोधानें भिन्नच असतात. हा आवश्यक तो भेद लक्षांत घेऊन रोज नियमानें जपानुष्ठान करावें. पहांटेंच उठावें. इष्टदेवतेचें प्रातःस्मरण करावें. स्नानसंध्या झाल्यानंतर देशकाल-संकीर्तन-पूर्वक इष्ट देवतेच्या जपाचा संकल्प करून उदक सोडावें.

अङ्गुष्ठाग्रे तु गोविन्दं तर्जन्यां च महीधरम् ।
मध्यमायां हृषीकेशमनामिक्यां त्रिविक्रमम् ॥
कनिष्ठिक्यां न्यसेद्विष्णुं करमध्ये तु माधवम् ।
एवं च करविन्यासं सर्वपापप्रणाशनम् ॥

हे श्लोक म्हणत म्हणत दोन्ही हाताच्या आंगठ्यांना तर्जनीनें व तर्जनी, मध्यमा, अनामिका आणि कनिष्ठिका यांना अंगुष्ठाच्या अग्रभागानें स्पर्श करावा. शेवटीं डाव्या हाताच्या तळाला उजव्या हाताच्या पृष्ठभागानें आणि उजव्या हाताच्या तळाला डाव्या हाताच्या पृष्ठभागानें स्पर्श करावा. नंतर बीजाक्षरांनीं अथवा मंत्राक्षरांनीं करन्यास व हृदयादि षडंगन्यास करावा. ऋषि, छन्द आणि देवता यांचा

अनुक्रमें मस्तकाच्या ठिकाणीं, मुखाच्या ठिकाणीं आणि हृदयाच्या ठिकाणीं न्यास करावा. या न्यासांनीं साधकाचा देह शुद्ध होतो, पवित्र होतो. पवित्र देहानें जप केल्यास मंत्राची सिद्धि लवकर होते. जप सफल होतो व मनाला समाधान मिळतें.

न्यास झाल्यानंतर इष्टदेवतेचें ध्यान करून पंचोपचारात्मक मानसपूजा करावी. नंतर "मां माले महामाये" हा मंत्र म्हणून (पान ५२ पहा) मालेला प्रोक्षण आणि नमस्कार करावा. नंतर अगदीं मनांतल्या मनांत जप करावा. याला मानसिक जप म्हणतात. हा सर्व जपांत उत्कृष्ट गणला जातो. दुसरा प्रकार ओठांतल्या ओठांत दुसऱ्याला ऐकूं न जाईल अशा रीतीनें जप करणें हा आहे. याला उपांशु जप असें म्हणतात. जपाचा हाहि प्रकार चांगलाच आहे. हेंहि न जुळल्यास अगदीं हळूहळू अक्षरें उच्चारीत जप करावा. याप्रमाणें जपसंख्या पूर्ण झाल्यानंतर उजव्या हातांत माळ गोळा करून "त्वं माले सर्व देवानां" हा मंत्र म्हणत म्हणत माळ मस्तकावर धारण करावी. नंतर माळेला नमस्कार करून केलेला जप इष्टदेवतेला अर्पण करावा. "अनेन मन्त्रजपाख्येन कर्मणा भगवान् श्रीपरमेश्वरः प्रीयतां न मम" असें म्हणून संध्येचें पळीभर पाणी ताम्हणांत सोडावें. शेवटीं "यस्य स्मृत्या च नामोक्त्या" हा श्लोक म्हणून "विष्णवे नमो विष्णवे नमो विष्णवे नमः" असें म्हणून आसनाखालची मृत्तिका अनामिकेनें भ्रूमध्यभागीं लावावी. अशी ही जपानुष्ठानाची पद्धति आहे.

श्रीवासुदेवद्वादशाक्षरमन्त्रजपविधि

आचम्य प्राणानायम्य। अद्य पूर्वोच्चरितैवंगुणविशेषणविशिष्टायां शुभ-पुण्यतिथौ अमुकप्रवरान्वित – अमुकगोत्रोत्पन्नः अमुकशर्माऽहं मम आत्मनः सकलाभीष्टसिद्धिद्वारा श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं श्रीवासुदेवद्वादशाक्षरमन्त्रजपाख्यं कर्म करिष्ये। तत्रादौ निर्विघ्नतासिद्ध्यर्थं श्रीगणपतिपूजनं करिष्ये। श्रीमन्महागणाधि-पतये नमः। गन्धाक्षतपुष्पधूपदीपाद्युपचारान् समर्पयामि। नमस्कारं करोमि। अस्य श्रीवासुदेवद्वादशाक्षरमन्त्रस्य प्रजापतिर्ऋषिः गायत्रीच्छन्दः वासुदेवः परमात्मा देवता मम सकलाभीष्टसिध्यर्थे जपे विनियोगः। ॐ प्रजापति-ऋषये नमः शिरसि। ॐ गायत्रीच्छन्दसे नमः मुखे। ॐ वासुदेवपरमात्मदेवतायै नमः हृदये। ॐ विनियोगाय नमः सर्वांगेषु। ॐ ॐ अङ्गुष्ठाभ्यां नमः। ॐ नमः तर्जनीभ्यां

नमः । ॐ भगवते मध्यमाभ्यां नमः । ॐ वासुदेवाय अनामिकाभ्यां नमः । ॐ ॐ नमो भगवते वासुदेवाय कनिष्ठिकाभ्यां नमः । ॐ ॐ नमो भगवते वासुदेवाय करतलकरपृष्ठाभ्यां नमः । ॐ ॐ हृदयाय नमः । ॐ नमः शिरसे स्वाहा । ॐ भगवते शिखायै वषट् । ॐ वासुदेवाय कवचाय हुम् । ॐ ॐ नमो भगवते वासुदेवाय नेत्रत्रयाय वौषट् । ॐ ॐ नमो भगवते वासुदेवाय अस्त्राय फट् । ॐ ॐ नमः मूर्ध्नि । ॐ नं नमः ललाटे । ॐ मों नमः नेत्रयोः । ॐ भं नमः मुखे । ॐ गं नमः कण्ठे । ॐ वं नमः बाह्वोः । ॐ तें नमः हृदये । ॐ वां नमः कुक्षौ (पोट) । ॐ सुं नमः नाभौ । ॐ दें नमः गुह्ये (हस्तं प्रक्षाल्य) । ॐ वां नमः जान्वोः (गुडघे) । ॐ यं नमः पादयोः । कमरेखालील अंगांचा स्पर्श डाव्या हातानें करण्याची पद्धति आहे. अथ ध्यानम् ।

विष्णुं शारदचन्द्रकोटिसदृशं शङ्खं रथाङ्गं गदा-
मम्भोजं दधतं सिताब्जनिलयं कान्त्या जगन्मोहनम् ।
आबद्धाङ्गदहारकुण्डल-महामौलिं स्फुरत्कङ्कणं
श्रीवत्साङ्कमुदारकौस्तुभधरं वन्दे मुनीन्द्रैः स्तुतम् ॥

मी श्रीविष्णूला नमस्कार करतों. त्यांचें स्वरूप शरदृतूंतील कोटिचंद्राप्रमाणें अत्यंत आल्हाददायक आहे. त्यांनीं आपल्या हातामध्यें शंख, चक्र, गदा आणि पद्म धारण केलेलें आहे. श्वेतकमलावर ते अधिष्ठित आहेत. ते आपल्या अंगकांतीनें सर्व जगाला मोहून टाकीत आहेत. त्यांच्या दंडामध्यें अंगदादि बाहुभूषणें शोभत आहेत. गळयामध्यें मोत्यांचा कंठा आणि वैजयंतीमाळा शोभत आहे. कानांत मकराकार कुंडलें झळकत आहेत. मस्तकावर रत्नजडित भव्य मुकुट शोभत आहे. हातांत सुवर्णाची कंकणें आहेत. वक्षःस्थलीं श्रीवत्स-चिह्न आहे. कंठीं कौस्तुभमणि विराजत आहे. शुकसनकादिक बडेबडे मुनि ज्यांची स्तुति करीत आहेत त्या श्रीविष्णूला मी नमस्कार करतों. असा या श्लोकाचा अर्थ आहे. हा श्लोक म्हणून ध्यान करावें. अथवा " शान्ताकारं भुजगशयनं " या श्लोकानेंहि ध्यान केलें तरी चालेल. याप्रमाणें ध्यान करून नमस्कार करावा.

अथ मानसोपचारपूजा । ॐ श्रीवासुदेवाय नमः अथवा विष्णवे नमः लं पृथिव्यात्मकं गन्धं परिकल्पयामि । ॐ श्रीवासुदेवाय नमः हं आकाशात्मकं पुष्पं परिकल्पयामि । ॐ श्रीवासुदेवाय नमः यं वाय्वात्मकं धूपं परिकल्पयामि । ॐ

श्रीवासुदेवाय नमः रं वह्न्यात्मकं दीपं परिकल्पयामि । ॐ श्रीवासुदेवाय नमः वं अमृतात्मकं नैवेद्यं परिकल्पयामि । ॐ श्रीवासुदेवाय नमः सं सर्वात्मकसर्वशोपोपचारान्परिकल्पयामि । ॐ श्रीवासुदेवाय नमः नमस्कारं करोमि । ततः 'मां माले' इति मन्त्रेण मालां प्रोक्ष्य नत्वा मन्त्रं जपेत् अन्ते मालां शिरसि धृत्वा नत्वा मन्त्रजपं निवेदयेत् । यस्य स्मृत्येति पठित्वा विष्णव नम इति त्रिवारं वदेत् । आसनाधःस्थमृत्तिकां ललाटे धारयेत इति शम् ।

श्रीनारायणाष्टाक्षरमंत्रजपविधि

अस्य श्रीनारायणाष्टाक्षरमन्त्रस्य अन्तर्यामी ऋषिः दैवी गायत्री च्छन्दः श्रीविष्णुर्देवता मम सकलाभीष्टसिद्ध्यर्थे जपे विनियोगः । " अङ्गुष्ठाग्रे तु गोविन्दं " इत्यादिन्यासः । ॐ ॐ नमः अङ्गुष्ठाभ्यां नमः । ॐ नमो नमः तर्जनीभ्यां नमः । ॐ नारायणाय नमः मध्यमाभ्यां नमः । ॐ नारायणाय नमः अनामिकाभ्यां नमः । ॐ नमो नमः कनिष्ठिकाभ्यां नमः । ॐ ॐ नमः करतलकरपृष्ठाभ्यां नमः । ॐ ॐ नमः हृदयाय नमः । ॐ नमो नमः शिरसे स्वाहा । ॐ नारायणाय नमः शिखायै वषट् । ॐ नारायणाय नमः कवचाय हुम् । ॐ नमो नमः नेत्रत्रयाय वौषट् । ॐ ॐ नमः अस्त्राय फट् । ॐ नमो नारायणाय इति दिग्बन्धः । ॐ अन्तर्याम्यृषये नमः शिरसि । ॐ दैवीगायत्रीच्छन्दसे नमो मुखे । ॐ श्रीविष्णुदेवतायै नमः हृदये । ॐ विनियोगाय नमः सर्वाङ्गेषु । ततः पूर्ववद्ध्यानं कृत्वा मानसोपचारैः संपूज्य मन्त्रं जपेत् । मन्त्रस्तु श्रीविष्णुयन्त्रेऽष्टदलान्तर्गतो ज्ञेयः । विसर्जनादिकं पूर्ववत् इति शम् ॥

श्रीविष्णुषडक्षरमन्त्रजपविधि

अस्य श्रीविष्णुषडक्षरमन्त्रस्य अन्तार्यामी ऋषिः । दैवी गायत्री च्छन्दः । श्रीविष्णुर्देवता । मम सकलाभीष्टसिद्धिद्वारा श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थे जपे विनियोगः । ततः " अङ्गुष्ठाग्रे तु गोविन्दं " इत्यादिन्यासः । ॐ विं विश्वाय नमः अङ्गुष्ठाभ्यां नमः ॐ षं तैजसाय नमः । तर्जनीभ्यां नमः । ॐ णं प्राज्ञाय नमः मध्यमाभ्यां नमः । ॐ वें तुर्याय नमः अनामिकाभ्यां नमः । ॐ नं आत्मने नमः कनिष्ठिकाभ्यां नमः । ॐ मः अन्तरात्मने नमः करतलकरपृष्ठाभ्यां नमः । ॐ विं विश्वाय नमः हृदयाय नमः ॐ षं तैजसाय नमः शिरसे स्वाहा । ॐ नं प्राज्ञाय नमः शिखायै वषट् । ॐ वें तुर्याय नमः कवचाय हुम् । ॐ नं आत्मने नमः नेत्रत्रयाय वौषट् ।

ॐ मः अन्तरात्मने नमः अस्त्राय फट् । ॐ विष्णवे नमः इति दिग्बन्धः । (दाही दिशांना चुटक्या वाजवीत उजवा हात उजव्या बाजूनें आपल्या शरीराभोंवतीं फिरवावा.) ॐ विं नमः शिरसि । ॐ षं नमः नासायाम् । ॐ णं नमः हृदये । ॐ वें नमः पादयोः । ॐ नं नमः जान्वोः । ॐ मः नमः नाभौ । इति अक्षरन्यासः । ॐ अन्तर्याम्यृषये नमः शिरसि । ॐ दैवीगायत्रीच्छन्दसे नमः मुखे । ॐ श्रीविष्णु-देवतायै नमः हृदये । ॐ विनियोगाय नमः सर्वाङ्गेषु । ततः पूर्ववद्ध्यानं कृत्वा मानसोपचारैः संपूज्य मन्त्रं जपेत् । मन्त्रस्तु श्रीविष्णुयन्त्रे षट्सु त्रिकोणेषु द्रष्टव्यः । विसर्जनादिकं पूर्ववत् ॥ इति शम् ॥

प्रणवात्मकैकाक्षरमंत्रजपविधि

अस्य श्रीप्रणवात्मकैकाक्षरविष्णुमन्त्रस्य ब्रह्मा ऋषिः दैवी गायत्रीच्छन्दः श्रीविष्णुः परमात्मा देवता मम सकलाभीष्टसिद्ध्यर्थे जपे विनियोगः । अथ न्यासः । ॐ अङ्गुष्ठाग्रे तु गोविंदम् ॐ तर्जन्यां तु महीधरम् । ॐ मध्यमायां हृषीकेशम् ॐ अनामिक्यां त्रिविक्रमम् । ॐ कनिष्ठिक्यां न्यसेद्विष्णुम् ॐ करमध्ये तु माधवम् । ॐ करपृष्ठे हरिं विद्यात् ॐ मणिबन्धे जनार्दनम् । एवंच करविन्यासं सर्वपाप-प्रणाशनम् ॥ ॐ ब्रह्मर्षये नमः शिरसि । ॐ दैवीगायत्रीच्छन्दसे नमो मुखे । ॐ श्रीविष्णुपरमात्मदेवतायै नमः हृदये । ॐ विनियोगाय नमः सर्वाङ्गेषु । ततः ध्यानपूजनादिकं सर्वं पूर्ववत् । इति शम् ॥

श्रीकृष्णषडक्षरमन्त्रजपविधि

अस्य श्रीकृष्णषडक्षरमन्त्रस्य नारदऋषिः गायत्री छन्दः श्रीकृष्णः परमात्मा देवता क्लीं बीजं नमः शक्तिः मम सकलमनोरथसिद्धिद्वारा श्रीकृष्णप्रीत्यर्थे जपे विनियोगः । ॐ क्लां नमः अङ्गुष्ठाभ्यां नमः ॐ क्लीं नमः तर्जनीभ्यां नमः । ॐ क्लूं नमः मध्यमाभ्यां नमः । ॐ क्लैं नमः अनामिकाभ्यां नमः । ॐ क्लौं नमः कनिष्ठिकाभ्यां नमः । ॐ क्लः नमः करतलकरपृष्ठाभ्यां नमः । ॐ क्लां नमः हृदयाय नमः । ॐ क्लीं नमः शिरसे स्वाहा । ॐ क्लूं नमः शिखायै वषट् । ॐ क्लैं नमः कवचाय हुम् । ॐ क्लौं नमः नेत्रत्रयाय वौषट् । ॐ क्लः नमः अस्त्राय फट् । ॐ नारदर्षये नमः शिरसि ॐ गायत्रीच्छन्दसे नमो मुखे । ॐ श्रीकृष्ण-परमात्म-देवतायै नमः हृदये । ॐ क्लीं बीजाय नमः गुह्ये । ॐ नमः शक्तये नमः पादयोः । अथ ध्यानम् । वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् । देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ॥ कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने । प्रणतक्लेशनाशाय गोविन्दाय नमो नमः ॥ ॐ गोपाल-

कृष्णाय नमः लं पृथिव्यात्मकं गन्धं परिकल्पयामि इत्येवं पंचमानसोपचारैः संपूज्य क्लीं कृष्णाय नम इति मन्त्रं जपेत् । शेषं सर्वं पूर्ववत् !

श्रीराममन्त्रजपविधि

भगवान् श्रीरामचंद्रप्रभु हेहि श्रीमहाविष्णूचेच अवतार आहेत. त्यांच्या उपासनेचाहि महिमा फार मोठा आहे. त्यांच्या नामस्मरणाचाहि पण महिमा फार मोठा आहे. त्यांच्या स्मरणानें सर्व पातकांचा तत्काळ निश्चित नाश होतो. "मानसं वाचिकं पापं कर्मणा समुपार्जितम् । श्रीरामस्मरणेनैव तत्क्षणान्नश्यति ध्रुवम्" असा श्रीरामस्मरणाचा महिमा सनत्कुमारसंहितेंत वर्णिलेला आहे. "श्रीराम" हा एक महामंत्रच आहे. याला तारकब्रह्म असें म्हणतात. याच्या जपानें जीव सर्व पापांतून मुक्त होऊन तो ब्रह्मरूप होतो. भगवान् शंकर काशीक्षेत्रामध्यें अंतकाळीं याच मंत्राचा उपदेश करतात त्यामुळें जीवांना मुक्ति मिळते व "काशीमरणान्मुक्तिः" हें वेदवाक्य सत्य ठरतें. " श्रीरामेति परं जाप्यं तारकं ब्रह्मसंज्ञकम् । ब्रह्महत्यादिपापघ्नमिति वेदविदो विदुः " केवळ राम नाममंत्रहि अत्यंत महत्त्वाचा आहे. श्रीवाल्मीकि महर्षि याच नाम मंत्रानें धन्य झाले.

असें सांगतात कीं, श्रीरामचरित्र हें संख्येनें शतकोटि विस्तृत होतें. शंकरांनीं तें तिन्ही लोकांत समसंख्येनें विभागून दिलें. बत्तीस अक्षरांचा एक श्लोक. या हिशेबानें सर्व रामचरित्राची सारखी वांटणी करतां करतां शेवटीं एक श्लोक उरला. त्यांतीलहि दहा दहा अक्षरें तिन्ही लोकांत विभागून दिलीं. शेवटीं दोन अक्षरें उरलीं. तीं म्हणजे "राम". सर्वानुमतें शंकरांनीं त्यांचा स्वीकार केला. शंकर हे मोठे रामभक्त आहेत. राममंत्राचें आद्याक्षर 'रा' तें सानुस्वार केलें कीं, बीजमंत्र तयार होतो. या बीजमंत्राचाहि महिमा अगाध आहे. रा हें अक्षर उच्चारल्याबरोबर देहाचें मुखरूपी द्वार उघडलें जातें. त्या क्षणीं देहांतील पातकें धावरून बाहेर पडतात. नंतर अनुस्वार अर्थात् अर्धा मकार उच्चारल्याबरोबर आपले ओठ मिटतात. ते एकमेकांशीं संलग्न होतात. याप्रमाणें देहाचें द्वार त्या पातकांना पुन्हां प्रवेश करण्यास बंद होतें ! यांत अतिशयोक्ति, अर्थवाद आणि विनोद हें गृहीत धरलें तरी श्रीराममंत्राचा महिमा अगाध आहे ही गोष्ट निर्विवाद होय.

श्रीरामचंद्रप्रभूंची उपासना करतांना प्रथम मंत्रजपाचा संकल्प करून श्रीरामाची मानसोपचार पूजा करावी. शक्य असल्यास यथाशक्ति बाह्योपचार पूजाहि करावी.

श्रीराममानसपूजा

श्रीमन्नुज्ज्वल-कोटिभानु-सदृशं मन्दस्मितं श्यामलं
श्रीसीतासहितं वराभयकरं वामे सुमित्रासुतम् ।
श्रीवत्साङ्क-धनुःशरादि-लसितं वातात्मजाभिष्टुतं
श्रीरामेति-पदद्वयान्वितमहं ध्याये मनोमन्दिरे ॥ १ ॥

रामेत्येकरस-स्वरूपममलं लीलावताराव्ययं
राजेन्द्रं रघुनन्दनं रविकुलोद्भूतं समावाहये ।
राजेन्द्रं रमणीयमर्पितमिदं माणिक्य-सिंहासनं
पाद्यं साचमनीयमर्घ्यममृतं राम स्वयं स्वीकुरु ॥ २ ॥

मध्वक्तं मधुपर्कमन्त्रपठितं पञ्चामृतं कल्पितं
मन्दाकिन्यमिदं सुरत्नकलशैः स्नानार्थमप्याहृतम् ।
मन्दारामर-पारिजात-तलगे सौवर्णपीठे स्थितं
मन्त्रैस्त्वाभिषेचयामि विविधैः सूक्तः सुतीर्थोदकैः ॥ ३ ॥

जलधर-निभगात्रे स्वर्णयज्ञोपवीतं
नवगुण-गुणितं तत् पावनं पावनानाम् ।
तडिदिव खलु पीतं वस्त्रमच्छोत्तरीयं
जय रघुवर दास्ये त्वं गृहाण स्वमेव ॥ ४ ॥

किरीट-हाराङ्गद-चारु-मेखला-
मुद्राद्यनेकाकृति-भूषणानि ।
मही-सुगन्धं प्रगृहाण चाक्षतान्
पुष्पेषु खं राम मया समर्पितम् ॥ ५ ॥

राष्ट्रोपप्लवनाशकं सुललितं वायुं सुधूपं तथा
रामेमं परमं दिवाकरमहो तेजोमयीं दीपिकाम् ।
राजीवारुणलोचनामृतमयं षट्स्वादुलोलै रसैः
संपन्नं विनिवेदितं सुमनसा नैवेद्यमङ्गीकुरु ॥ ६ ॥

मध्ये पानमिदं सुशीतलजलं वानीरगन्धामृतं
राम स्वीकुरु मत्समर्पितामिदं हस्तोदकं निर्मलम् ।

ताम्बूलं सफलं त्रयोदशगुणं स्वात्मैकरागान्वितं
श्रद्धारत्न-सुवर्णपुष्पसहितां गृह्णातु तां दक्षिणाम् ॥ ७ ॥

जयति जयति विष्णु रामनामाभिधेयो
जयति जयति पूर्णः कोटिकन्दर्पभासः ।
जयति जयति वाद्यैर्नाटकैर्गीतनृत्यै-
र्जय जय तिमिरारे गृह्ण नीराजनं त्वम् ॥ ८ ॥

साम्राज्यभौज्यादि-सुपारमेष्ठ्या-
न्तमत्र यच्चाखिलवस्तुजातम् ।
एकाक्षरं ब्रह्ममयं प्रसिद्ध-
मेवार्पयामीति सुमन्त्रपुष्पम् ॥ ९ ॥

जय जय करुणाब्धेऽनन्तभानुप्रकाश
जय जय जगदीशाव्यक्त मायाधिदेव ।
जय जय धरणीजावल्लभानन्तवीर्य
जय जय रघुनाथानाथनाथ प्रसीद ॥ १० ॥

यज्ञेश यज्ञाधिप यज्ञपाल
यशःप्रदाधोक्षज रामचन्द्र ।
प्रदक्षिणां ते प्रकरोमि नित्यं
पदे पदेऽनन्तमखादिदात्रीम् ॥ ११ ॥

राजाधिराजाय रमावराय
रात्रिंचराणामभि (धि) संहराय ।
राज्याभिषिक्ताय रघूत्तमाय
श्यामाय रामाय नमो नमस्ते ॥ १२ ॥

प्रभो चामरादर्श छत्रादिकान्वै
महाराज राजोपचारान् गृहाण ।
सुहृत्दद्मपीठं मुरारे प्रविश्य
ममेशापराधान् हि सर्वान् क्षमस्व ॥ १३ ॥

इत्येव साङ्गामुपचार-युक्तां
श्रीरामपूजां हृदये बहिर्वा ।

कुर्वन्ति ये धर्ममथार्थकामान्
मोक्षादिकां सम्पदमाप्नुवन्ति ॥ १४ ॥

श्रीवर्णपूर्वं सकलार्थदं वै
रामेतिवर्णद्वयमेव पूर्वम् ।
जयेति रामेति जयद्वयेति
रामेति जप्त्वा तु पुनर्न जन्म ॥ १५ ॥

याचा थोडक्यांत अर्थ असा : हे श्रीमन् प्रभो रामचंद्रा ! आपण कोटि सूर्यांप्रमाणें तेजस्वी आहां. आपलें मंदहास्य मोठें सुंदर दिसतें. आपली अंगकांति श्यामल आहे. जगज्जननी श्रीजानकी आपल्या सांनिध्यांत आहे. आपल्या वाम म्हणजे सुंदर मनोहर अशा दक्षिण भागीं सुमित्रानंदन—लक्ष्मण शोभत आहे. आपण वरमुद्रा आणि अभयमुद्रा धारण केलेली आहे. श्रीवत्सचिह्न, धनुष्य आणि बाण हे आपणांस शोभून दिसत आहेत. मारुतिराय हात जोडून नम्रपणें आपली स्तुति करीत आहेत. श्री आणि राम या दोन संयुक्त शब्दांनीं आपला नामोच्चार केला जातो. हे प्रभो ! मी आपल्या मनोमंदिरामध्यें तुमचें ध्यान करीत आहें या श्लोकांत " ध्याये मनोमन्दिरे " या ऐवजी " ध्यायामि हृन्मन्दिरे " असा पाठ घातल्यास अधिक बरा दिसेल. अथवा 'ध्याये' हा आर्षप्रयोग समजावा (१). राम म्हणजे मुनिजनांना रमविणारा. सर्वांना रमविणारें असेंच आपलें आनंदमय स्वरूप आहे. परम विरक्त ज्ञानी मुनि आणि भक्त यांना रमविणारे असे आपण अमल म्हणजे शुद्ध संसारधर्मविरहित परब्रह्मस्वरूप आहां. आपण केवळ लीलेनें अवतार धारण करतां. आपण अव्यय म्हणजे अविनाशी आहां. हे रघुकुलोत्पन्ना रघुनंदना राजेंद्रा ! मी आपलें हृदयांत आवाहन करीत आहें. हे रामा ! राजेलोकांना आवडणारें हें रमणीय माणिकांचें सिंहासन मी आपणांस अर्पण करीत आहें. त्याचप्रमाणें पाद्य म्हणजे पादप्रक्षालनाकरितां अर्पण केलेलें आणि आचमनीय म्हणजे आचमनाकरितां अर्पण केलेलें हें जल आणि अर्घ्य म्हणजे गंध-पुष्प-इत्यादिकांनीं मिश्रित असलेलें हें जल मी आणलें आहे याचा आपण स्वीकार करा (२) मधुपर्क मंत्रांचा पाठ करीत मधुमिश्रित दहि, दूध, तूप, साखर असलेलें हें पंचामृत तयार केलेलें आहे, हें आपण घ्या. रत्नजडित सुवर्णकलशांतून हें स्नानाकरितां मंदाकिनीचें जलहि आणलेलें आहे. मंदार, पारिजात, कल्पतरू इत्यादि

देववृक्षांच्या छायेंत मांडलेल्या सोन्याच्या चौरंगावर आपणांस बसवून पुरुषसूक्त-पवमानसूक्त इत्यादि नाना प्रकारचीं सूक्तें म्हणत उत्तमोत्तम तीर्थोदकांनीं मी आपणांस अभिषेक करीत आहें (३). प्रत्येक तंतूंत तीन तीन तंतु असलेलें, पावनांनाहि पावन करणारें असें हें स्वर्णयज्ञोपवीत मी आपल्या पाण्यानें भरलेल्या ढगाप्रमाणें श्यामवर्ण असलेल्या गळ्यामध्यें घालीत आहें. विद्युल्लतेप्रमाणें पिवळा देदीप्यमान असलेला हा दुपट्टा आणलेला आहे. रामा ! याचा आपण अंगीकार करा. हें सर्व तुमचेंच मी तुम्हांला अर्पण करीत आहें. रघुवरा ! तुमचा जयजयकार असो ! (४). मस्तकावरील मुकुट, गळ्यांतला कंठा, दंडांत घालावयाचें अंगद, कमरेवरील सुंदर मेखळा, बोटांतील अंगठ्या इत्यादि अनेक आकारांचे अलंकार आणलेले आहेत. प्रभो ! यांचा स्वीकार करा. हे रामा ! हें लं बीजात्मक पृथ्वीरूपी उत्तम गंध घ्या. मी आपणांस अक्षता वहात आहें. फुलांमध्यें तर हें हं बीजात्मक आकाशरूपी पुष्पच मी समर्पण केलें आहे (५). रोगराई निर्माण करून राष्ट्राला ताप देणाऱ्या दूषित वातावरणाचा नाश करणारा हा यं बीजात्मक वायुरूपी सुंदर धूप आणि त्याचप्रमाणें हा रं बीजात्मक सूर्यरूपी तेजोमय दीपहि मी आपणांस समर्पण करीत आहें. कमला-प्रमाणें आरक्तवर्ण नेत्र असलेल्या राजीवनयना रामा ! हा वं बीजात्मक रुचकर षड्रससंपन्न अमृतमय नैवेद्य मी तुम्हाला भक्तियुक्त अंतःकरणानें निवेदन करीत आहें. त्याचा अंगीकार करा (६). वाळा घालून सुगंधी केलेलें हें थंडगार पाणी जेवणामध्यें मधून मधून पिण्याकरितां आणलेलें आहे. रामा ! त्याचा स्वीकार करा. हे हात धुण्याकरितां पाणी घ्या. लवंग, वेलदोडा, सुपारी, कात, मोत्यांचा चुना, जायफळ, जायपत्री, कंकोळ, बडिशेप, ज्येष्ठमध, नारळाचा चव, ओवा आणि पुदीना वगैरेंचा अर्क घालून तयार केलेला हा त्रयोदशगुणी तांबूल घ्या. हा आत्मस्वरूपी प्रेमानें युक्त आहे. ही श्रद्धारूपी रत्नयुक्त सुवर्णपुष्प दक्षणा घ्या (७). भगवान् श्रीमहाविष्णूच रामरूपानें माझ्यापुढें उभे आहेत त्यांचा जयजयकार असो. रामा ! आपली कांति कोटिकोटि कंदर्पाचाहि दर्प हरण करणारी आहे. आपला जयजयकार असो. आपण पूर्ण परब्रह्मस्वरूप आहां. विविध वाद्यें नाटकें संगीत आणि नृत्य यांनीं मी आपली सेवा करीत आहें. ही सेवा स्वीकारा. आपला जयजयकार असो. अज्ञानरूपी अंधकाराचा नाश करणाऱ्या प्रभो रामचंद्रा ! मी आपल्याला नीराजन करीत आहें. आरती करीत आहें. आपला जयजयकार असो.

(८). साम्राज्य भोज्यादिकांपासून पारमेष्ठ्य पदापर्यंत जें कांहीं वस्तुवैभव आहे तें सर्व ॐ पदवाच्य परब्रह्म स्वरूपच आहे. तेंच मी मंत्रपुष्पांजलिम्हणून समर्पण करीत आहें (९). हे अनंतसूर्यप्रकाशा करुणासागरा रामा ! तुमचा जयजयकार असो. रामा ! आपण सर्व जगाचे अधिपति आहां. आपलें यथार्थ स्वरूप कोणी जाणत नाहीं. म्हणून आपणांस अव्यक्त म्हणतात. आपण मायेचे अधिदेव म्हणजे अधिपति अधिष्ठाते आहां. आपला जयजयकार असो. धरणीसुता जी जानकी तिचे आपण वल्लभ म्हणजे परमप्रिय अधिपति आहां. आपल्या पराक्रमाला अंत नाहीं. हे अनाथनाथा रघुनाथा तुमचा जयजयकार असो. आपण मजवर प्रसन्न व्हा. कृपा करा (१०). हे यज्ञेशा यज्ञाधिपा यज्ञरक्षका ! अयोध्याप्रजा रामचंद्रा ! आपण उत्तम यश देणारे आहां. मी आपल्याला प्रदक्षिणा घालीत आहें. आपली प्रदक्षिणा भक्तजनांना नित्य पावला पावलाला अनंत यज्ञादिकांचें फल देणारी आहे (११). हे घनश्यामा रामा ! आपण राजाधिराज आहां. रमावर आहां. राक्षसांचा सर्वस्वी नाश करणारे आहां. आपण रघुकुलामध्यें श्रेष्ठ असून राज्याभिषिक्त आहां. आपल्याला मी पुनः पुन्हां नमस्कार करीत आहें (१२). हे महाराजा प्रभो रामचंद्रा ! हे छत्रचामर आणि आरसा इत्यादि राजोपचारांचा आपण स्वीकार करा. हे मुरारे परमेशा ! माझ्या प्रसन्न हृत्कमलरूपी आसनावर अधिष्ठित होऊन माझ्या सर्व अपराधांची क्षमा करा. मला कृतार्थ करा (१३). याप्रमाणें जे कोणी श्रीरामचंद्रप्रभूंची बाह्योपचारांनीं अथवा मानसोपचारांनीं सांगोपांग पूजा करतील ते धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष तसेंच आदिशब्दानें अनन्यभक्ति या संपत्तीला प्राप्त होऊन कृतार्थ होतील (१४). श्री या अक्षराला राम हीं दोन अक्षरें जोडावींत. त्याच्या पुढे जय शब्दाला जोडून राम शब्द योजावा. त्याच्यापुढें जयजय असा दोन वेळ जय शब्द उच्चारून त्याच्यापुढें राम शब्द योजावा. याप्रमाणें योजना केल्यास " श्रीराम जयराम जयजय राम " असा त्रयोदशाक्षरी श्रीराममंत्र तयार होतो. हा सकल मनोरथ पूर्ण करणारा आहे. याच्या जपानें मानवाला मुक्ति मिळते. प्रारब्धकर्माच्या अधीन होऊन त्याला पुन्हां जन्म घ्यावा लागत नाहीं. या मंत्राचा रोज सारखा जप करावा. याला विधि-विधानाची आवश्यकता नाहीं. या मंत्राचें तंबोऱ्याच्या नादांत सुस्वर संकीर्तन करावें. " श्रीशब्दपूर्वं जयशब्दमध्यं जयद्वयेनाऽपि पुनः प्रयुक्तम् । त्रिसप्त कृत्वा रघुनाथनामजपो निहन्याद् द्विजकोटिहत्याः ॥ त्रयोदशाक्षरश्चायं राममन्त्रः

शुभावहः । जपनीयः कीर्तनीयः सर्वदाऽयं मुहुर्मुहुः ॥ अयं मन्त्रः सुस्वरेण तथा वीणास्वरादिना । कीर्तनीयो मुदा मर्त्यैर्मन्त्रशास्त्रेऽप्ययं स्मृतः ॥ (आनंदरामायण, मनोहरकांड, सर्ग १५.

त्रयोदशाक्षर मंत्राचें अधिकारपरत्वें विधिपूर्वक अनुष्ठानच करावयाचें असेल तर पुढे दिलेल्या षडक्षरमंत्राप्रमाणें संकल्प करून कर-न्यास व अंग-न्यास करावेत. ते असे – श्रीराम अङ्गुष्ठाभ्यां नमः । जयराम तर्जनीभ्यां नमः । जयजय राम मध्यमाभ्यां नमः । श्रीराम अनामिकाभ्यां नमः । जयराम कनिष्ठिकाभ्यां नमः । जयजय राम करतलकरपृष्ठाभ्यां नमः । श्रीराम हृदयाय नमः । जयराम शिरसे स्वाहा । जयजय राम शिखायै वषट् । श्रीराम कवचाय हुं । जय राम नेत्रत्रयाय वौषट् । जयजय राम अस्त्राय फट् । श्रीराम जय राम जयजय राम इति दिग्बन्धः ।

अस्य श्रीरामत्रयोदशाक्षरमन्त्रस्य ब्रह्मा ऋषिः । विराट् छन्दः । श्रीरामचन्द्रो देवता सकलाभीष्टसिद्धयर्थे जपे विनियोगः । ब्रह्मर्षये नमः शिरसि । विराट् छन्दसे नमो मुखे । श्रीरामचन्द्रदेवतायै नमो हृदये । अभीष्ट सिद्धयर्थं जपे विनियोगाय नमः सर्वाङ्गेषु । बाकी सर्व विधान श्रीरामषडक्षर मंत्राप्रमाणेंच समजावें. "श्रीपूर्वं जयपूर्वं च तद्द्विधा रामनाम च । त्रयोदशाक्षरो मन्त्रो मुनिर्ब्रह्मा विराट् स्मृतम् । छन्दस्तु देवता प्रोक्तो रामः पापौघनाशनः ॥" नारदपुराण पूर्वखण्ड (अ. ७२). विधिविधानाची अपेक्षा न करतां या मंत्राचा तर सर्वांनाच अधिकार असून कोणालाहि या मंत्राच्या जपाच्या प्रभावानें सर्व संसारबंधनांतून मुक्त होऊन परब्रह्मस्वरूप होतां येते ! जटायु पक्षीदेखील या मंत्रानें श्रीरामरूप परब्रह्मपदाला पोहोंचला ! मग मानवाबद्दल शंका कसली ? " श्रीराम जयराम जयजय राम । जटायु स्मरे रामनाम । माझा छेदावया देहभ्रम । अन्तीं श्रीराम पावला ॥" भावार्थरामायण, अरण्यकांड पहा. श्रीरामरहस्योपनिषदांत तर प्रत्यक्ष श्रीराम हेच या त्रयोदशाक्षर मंत्राचे ऋषि असल्याचें सांगितलें आहे. तसेंच छंद जगती असून श्रीराम हेच देवता आहेत असें वर्णन केलेलें आहे. या मतानें पहातां " अस्य श्रीरामत्रयोदशाक्षरमन्त्रस्य श्रीराम ऋषिः । जगतीच्छन्दः । श्रीरामो देवता । ममाभीष्टसिद्ध्यर्थे जपे विनियोगः । श्रीरामर्षये नमः शिरसि । जगतीच्छन्दसे नमो मुखे । श्रीरामदेवतायै नमो हृदये । अभीष्टसिद्धयर्थं जपे विनियोगाय नमः सर्वाङ्गेषु " असा मंत्रन्यास करावा. अथ ध्यानं म्हणून श्रीरामषडाक्षरमंत्रांतील ध्यान म्हणावें अथवा "ध्यायेदाजानुबाहुं" या सुप्रसिद्ध श्लोकानेंहि ध्यान करावें.

असो. वरील श्रीराममानसपूजा श्रीजनार्दन बाळकृष्ण तारे नागपूर यांच्या कडून उपलब्ध झाली. ती त्यांच्या आजोबांना अयोध्यानगरींत एका महात्म्याकडून मिळाल्याचें समजलें. मुखपरंपरेनें चालत आलेले हे श्लोक आम्ही वाचकांना सादर केले आहेत. या श्लोकांच्या शेवटी इति श्रीरुद्रयामले ईश्वरपार्वती संवादे श्रीराममानसपूजा समाप्ता अशीं अक्षरें त्यांच्यामुखांतून ऐकावयास सांपडलीं. आनंदरामायणांतील व नारदपुराणांतील वचनें तपोनिधि पं. धरणीधरशास्त्री गुर्जर पुणें यांच्याकडून मिळालीं. उभयतांना कृतज्ञतापूर्वक धन्यवाद.

श्रीरामषडक्षरमंत्रजपविधि

आचमन व प्राणायाम करून देशकालसंकीर्तन करावें. सप्रवर गोत्रोच्चार-पूर्वक संकल्प करावा. त्यानंतर ॐ अस्य श्रीरामषडक्षरमन्त्रस्य ब्रह्मा ऋषिः गायत्री छन्दः श्रीरामचन्द्रो देवता, रां बीजं, मां शक्तिः यं कीलकम्। मम चतुर्विधपुरुषार्थ-सिद्धिद्वारा श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं जपे विनियोगः। ॐ रां अगुष्ठाभ्यां नमः। ॐ रीं तर्जनीभ्यां नमः ॐ रूं मध्यमाभ्यां नमः। ॐ रैं अनामिकाभ्यां नमः ॐ रौं कनिष्ठिकाभ्यां नमः। ॐ रः करतलकरपृष्ठाभ्यां नमः। ॐ रां हृदयाय नमः। ॐ रीं शिरसे स्वाहा। ॐ रूं शिखायै वषट्। ॐ रैं कवचाय हुम्। ॐ रौं नेत्रत्रयाय वौषट्। ॐ रः अस्त्राय फट्। ॐ रां नमः शिरसि। ॐ रां नमः भ्रुवोर्मध्ये। ॐ मां नमः मुखे। ॐ यं नमः नाभौ। ॐ नं नमः जान्वोः। ॐ मः नमः पादयोः। ॐ ब्रह्मर्षये नमः शिरसि। ॐ गायत्री च्छन्दसे नमो मुखे। ॐ श्रीराम-चन्द्रपरमात्मदेवतायै नमः हृदये। रां बीजाय नमः दक्षिणस्तने। मां शक्तये नमः वामस्तने। यं कीलकाय नमः स्तनमध्ये। विनियोगाय नमः सर्वाङ्गेषु। अथ ध्यानम्। सिंहासनसमारूढं पुष्पकोपरि राघवम्। सीतालक्षितवामाङ्कं लक्ष्मणेनोप-शोभितम्॥ श्यामं प्रसन्नवदनं सर्वाभरणभूषितम्। रामं ध्याये जगन्नाथं मम वाञ्छितसिद्धये॥ ॐ रां रामाय नमः लं पृथिव्यात्मकं गन्धं परिकल्पयामि। ॐ रां रामाय नमः हं आकाशात्मकं पुष्पं परिकल्पयामि। ॐ रां रामाय नमः यं वाय्वात्मकं धूपं परिकल्पयामि। ॐ रां रामाय नमः रं वह्न्यात्मकं दीपं परिकल्पयामि। ॐ रां रामाय नमः वं अमृतात्मकं नैवेद्यं परिकल्पयामि। ॐ रां रामाय नमः सं सर्वात्मकसर्वशोपचारान् परिकल्पयामि। ॐ रां रामाय नमः नमस्कारं करोमि। ततः "मां माले" इति मन्त्रेण मालां प्रोक्ष्य, नत्वा, रां रामाय नमः इति मन्त्रं

जपेत्। जपानन्तरं " त्वं माले " इति मन्त्रेण मालां शिरसि धृत्वा नत्वा मन्त्रजपं निवेदयेत्। अर्थात " अनेन श्रीरामषडक्षरमन्त्रजपाख्येन कर्मणा भगवान् श्रीरामचन्द्रः प्रीयताम्, न मम " असे म्हणून संध्येचें पळीभर पाणी ताम्हणांत सोडावें.

श्रीसीतापडक्षरमंत्रजपविधि

अस्य श्रीसीतापडक्षरमन्त्रस्य जनकः ऋषिः गायत्री छन्दः श्रीसीतादेवता श्रीं बीजं स्वाहा शक्तिः इष्टसिद्ध्यर्थे जपे विनियोगः ॐ शां अङ्गुष्ठाभ्यां नमः। ॐ शीं तर्जनीभ्यां नमः इत्यवं कर--न्यासः। तथैव ॐ पूर्वकं शां शीं शूं शैं शौं शः इत्यक्षरैः हृदयादिन्यासः। जनकर्षये नमः शिरसि। गायत्री च्छन्दसे नमो मुखे। श्रीसीतादेवतायै नमः हृदये। श्रीं बीजाय नमः मूलाधारे। स्वाहा शक्तये नमः पादयोः। अथ ध्यानम्। " स्वर्णाभां पद्महस्तां च रामालोकनतत्पराम्। ध्याये रावणयुक्तां तां सीतां धर्मादिसिद्धये ॥ " ततः श्रीसीतादेवीं मानसोपचारैः संपूज्य नमस्कृत्य " श्रीं सीतायै स्वाहा " इति मन्त्रं जपेत्। ततो जपनिवेदनम्।

श्रीलक्ष्मणमंत्रजपविधि

अस्य श्रीलक्ष्मणमन्त्रस्य अगस्तिर्ऋषिः। गायत्री छन्दः। श्रीलक्ष्मणो देवता, लं बीजम्, नमः शक्तिः, चतुर्विधपुरुषार्थसिद्ध्यर्थे जपे विनियोगः। ॐ लां अङ्गुष्ठाभ्यां नमः। ॐ लीं तर्जनीभ्यां नमः अनया रीत्या करन्यासः। ॐ लां हृदयाय नमः इत्यवं हृदयादिषडङ्गन्यासः। ॐ अगस्त्यर्षये नमः शिरसि। गायत्रीच्छन्दसे नमो मुखे। श्रीलक्ष्मणदेवतायै नमः हृदये। लं बीजाय नमः गुह्ये। नमः शक्तये नमः पादयोः। विनियोगाय नमः सर्वाङ्गेषु। अथ ध्यानम्। " द्विभुजं स्वर्णरुचिरतनुं पद्मनिभेक्षणम्। धनुर्बाणकरं रामसेवासंसक्त-मानसम्। ध्यायेऽहं लक्ष्मणं मन्त्रसिद्ध्यै शेषं महीधरम् " नत्वा मानसोपचारैः संपूज्य लं लक्ष्मणाय नमः इति मन्त्रं जपेत्। सर्वं पूर्ववत्।

श्रीभरतमन्त्रजपविधि

" भं भरताय नमः " इति मन्त्रः। ऋष्यादिकं सर्वं लक्ष्मणमन्त्रवद्बोध्यम्। लां लीं इति स्थाने भां भीं इति शब्दप्रयोगः। सर्वत्र लक्ष्मणस्थाने भरतशब्दप्रयोगश्च। अथ ध्यानम्। " भरतं श्यामलं शान्तं रामसेवापरायणम्। धनुर्बाणधरं वीरं कैकेयीतनयं भजे " इति ध्यात्वा नत्वा संपूज्य च मन्त्रं जपेत्। सर्वं पूर्ववत्।

श्रीशत्रुघ्नमंत्रजपविधि

"शं शत्रुघ्नाय नमः" इति मन्त्रः। ऋष्यादिकं सर्वं लक्ष्मणमन्त्रवद्बोध्यम्। ॐ शां शीं इत्याद्यक्षरैः करन्यासः हृदयादिषडङ्गन्यासः ऋष्यादिन्यासश्च। अथ ध्यानम्। द्विभुजं स्वर्णवर्णाभं रामसेवापरायणम्। लवणासुरहन्तारं सुमित्रा-तनयं भजे" इति ध्यात्वा नत्वा संपूज्य च मन्त्रं जपेत्। सर्वं पूर्ववत्। विशेषें करून शत्रुघ्नमंत्राचें अनुष्ठान शत्रुनिरसनाकरितां करावयाचें सांगितलें आहे. त्याप्रमाणें संकल्पांत "मम शत्रुनिरसनार्थं" असा शब्दप्रयोग करावा. विनियोगाचा उल्लेख करतांना "मम शत्रुनिरसनार्थे जपे विनियोगः" असें म्हणावें.

हनूमन्मंत्रजपानुष्ठानविधि

अस्य श्रीमद्धनूमदष्टादशाक्षरमन्त्रस्य ईश्वर ऋषिः अनुष्टुप्छन्दः श्रीमद्धनूमान देवता हं बीजं स्वाहा शक्तिः मम सकलाभीष्टसिद्ध्यर्थे जपे विनियोगः। ॐ नमो भगवत आञ्जनेयाय अङ्गुष्ठाभ्यां नमः। ॐ रुद्रमूर्तये तर्जनीभ्यां नमः। ॐ वायुपुत्राय मध्यमाभ्यां नमः। ॐ अग्नेर्गर्भाय अनामिकाभ्यां नमः ॐ रामहिताय कनिष्टिकाभ्यां नमः ॐ ब्रह्मास्त्रनिवारणाय करतलकरपृष्ठाभ्यां नमः। एवं क्रमशः हृदयादिषडङ्गन्यासः। ॐ ईश्वरर्षये नमः शिरसि। ॐ अनुष्टुप्-छन्दसे नमो मुखे। श्रीमद्धनूमद्देवतायै नमः हृदये। हं बीजाय नमः गुह्ये। स्वाहा शक्तये नमः पादयोः। मम सकलाभीष्टसिद्ध्यर्थे जपे विनियोगाय नमः सर्वाङ्गेषु। अथ ध्यानम्। "स्फटिकाभं स्वर्णकान्ति द्विभुजं च कृताञ्जलिम्। कुण्डलद्वयसंशोभि मुखाम्भोजं हरिं भजे" इति ध्यात्वा, पञ्चमानसोपचारैः संपूज्य, नत्वा "ॐ नमो भगवत आञ्जनेयाय महाबलाय स्वाहा" इति मन्त्रं जपेत्। मालाप्रोक्षणादिकं जपनिवेदनं च सर्वं पूर्ववत् कर्तव्यम्।

सर्व अनुष्ठानांच्या शेवटीं ॐ तत्सद् ब्रह्मार्पणमस्तु असें म्हणण्याची पद्धति आहे. ती अत्यंत उत्तम आहे. आपल्या हातून जें कांहीं घडेल, जें कांहीं होईल तें सर्व कृष्णार्पण करणें, तें सर्व ब्रह्मार्पण करणें ही निरपेक्षतेची भूमिका आहे. निरपेक्षतेच्या भूमिकेंतूनच चित्तामध्यें सात्विक समाधानाचे अंकुर निर्माण होत असतात. या ग्रंथांत दिलेले सर्व मंत्र साधकांना सात्विक समाधान देण्याच्या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त व महत्वाचे आहेत. पारमार्थिक फलकामनें बरोबरच ऐहिक फलकामनांचीहि पूर्ति या मंत्रांच्या साहाय्यानें होऊं शकते. मात्र ऐहिक फलकामना पूर्ण होण्यास लौकिक प्रयत्नांचीहि आवश्यकता असतेच. लौकिक प्रयत्नांना यश येण्यासाठीं

आवश्यक असलेलें भगवंताचें अधिष्ठान प्राप्त करून देण्याकरितां मंत्रोपासनांचा उपयोग होत असतो. लौकिक प्रयत्नांचें वैयर्थ्य कोणीच मानीत नाहीं. पण ज्या वेळेला लौकिक प्रयत्न हतबल होतो त्या वेळेला दैवी बलाचें साहाय्य उपयोगास येते असा अनेक लोकांचा अनुभव आहे. या दृष्टीनें उपयुक्त असलेल्या मंत्रोपासनांचा कोणी उपहास करूं नये. ज्या वेळेला मंत्रोपासनेचा कांहीं उपयोग झाला नाहीं असा अनुभव येतो, त्या वेळेला मंत्रोपासनेंतील वैगुण्य हेंच त्याला कारणीभूत असतें, शिवाय प्रारब्धकर्मांची बलवत्तरता हीहि अटळ असते हेंहि विसरून चालणार नाहीं. प्रारब्धकर्म जर अटळ आहे तर मग प्रयत्न तरी कशाला ? हेंहि म्हणणें बरोबर नाहीं. तत्त्ववेत्त्यांनीं प्रारब्धाचे अठरा प्रकार मानलेले आहेत. त्यांतील शेवटच्या प्रकारचें प्रारब्ध कर्म अटळ असलें तरी बाकीचीं सतरा प्रकारचीं प्रारब्ध कर्मे प्रयत्नांनीं टाळतां येतात. त्या अनेक प्रकारच्या प्रयत्नांतच मंत्रोपासनेचें बल संपादन करणें हाहि एक प्रयत्नच आहे. या दृष्टीनें पहातां मंत्रोपासना ही अत्यंत उपयुक्त आहे यांत शंका नाहीं.

श्रीरामचंद्रप्रभु हे महाविष्णूचाच अवतार असल्यामुळें आम्ही या ठिकाणीं त्यांचा व त्यांच्या परिवारांतील देवतांचा मंत्रोपासनाविधि दिलेला आहे. राममंत्राचा महिमा अगाध आहे. रामभक्तांमध्यें प्रत्यक्ष भगवान् शंकर यांनींहि आपला अंतर्भाव करून घेतलेला आहे ! हीच एक गोष्ट श्रीरामचंद्रप्रभूंचा महिमा लक्षांत घेण्यास पुरें आहे. आचार्यांनीं लिहिलेलें श्रीरामचंद्रप्रभूंचें स्तोत्र सु. स्तो. सं. भाग १ मध्यें पहावें. बाजूस दिलेलें श्रीरामचंद्रप्रभूंचें हें यंत्र नीट निरीक्षण करून लक्षांत घ्यावें. हें यंत्र श्रीरामचंद्रप्रभूंचें मंदिरच असून त्यांतील मंत्र म्हणजे प्रत्यक्ष भगवान् श्रीरामचंद्रप्रभूच होत असें चिंतन करावें.



श्रीलक्ष्मीनृसिंहकरावलम्बनस्तोत्रम् ।

[भगवान् श्रीमहाविष्णु यांच्या विविध अवतारांमध्यें नरसिंह अवताराचें वैशिष्ट्य कांहीं आगळें आहे. यांत भगवंताच्या भक्तवात्सल्याची पराकाष्ठा दिसून येते. आदि विष्णूनें वराह अवतार घेऊन हिरण्याक्षाचा वध केला. तेव्हांपासून हिरण्याक्षाचा थोरला बंधु हिरण्यकशिपु हा परमेश्वराचा द्वेष करूं लागला. परमेश्वराला ज्या ज्या गोष्टी प्रिय असतील त्या त्या सर्व गोष्टींचा हिरण्यकशिपूनें उच्छेद मांडला. परमेश्वराला साधु, संत, महात्मे व भक्तजन प्रिय असतात. त्या सर्वांचा त्यानें अतोनात छळ सुरू केला. देवांना यज्ञयागादि धर्मकर्में आवडतात. हिरण्यकशिपूनें त्यांचा नाश करायला आरंभ केला. सारें त्रैलोक्य पादाक्रांत करून आपण सर्वश्रेष्ठ बनावें अशी त्याची महत्वाकांक्षा होती. त्यानें अत्यंत खडतर तपश्चर्या केली. पायाच्या आंगठ्यावर उभा राहिला. दोन्ही हात वर करून दृष्टि आकाशाकडे लावली. कांहीं न खातांपितां तप करूं लागला ! अंगावर वारूळ वाढलें. झाडाझुडपांनीं वारूळहि झांकलें गेलें ! मुंग्यांनीं त्याच्या देहांतील रक्त, मेद व मांस खाऊन टाकलें ! केवळ हाडें शिलक राहिलीं ! त्या हाडांच्याच आश्रयानें त्याचे प्राण जगले होते. केवढी उग्र तपश्चर्या ही ! या तपश्चर्येतहि त्यानें देवांच्या नाशाकरितां देवांचीच आराधना केली असली पाहिजे. तपश्चर्येच्या मुळाशीं जो सत्त्वगुण असावा लागतो त्याचा लेशहि हिरण्यकशिपूच्या ठिकाणीं शिलक राहिलेला नव्हता. रजोगुणानें आणि तमोगुणानें त्याचें अन्तःकरण पूर्णपणें भारलेलें होतें. आसुरी वृत्ति पराकाष्ठेला पोहोंचलेली होती ! देवांचा नाश, देवभक्तांचा नाश, साधु-संतांचा नाश, धर्माचा, नीतिन्यायाचा नाश, दया, माया, परोपकार इत्यादि सर्व सत्प्रवृत्तींचा नाश, असा हा सर्व नाशच नाश त्याच्या डोळ्यांपुढे होता ! त्या तपश्चर्येतून चांगलें काय निष्पन्न होणार ? पण वाईटांतूनहि कधीं कधीं चांगलें निर्माण होत असतेंच. यांतूनच श्रीहरीनें नरहरीचा अवतार घेतला व जगाचें कल्याण केलें ही गोष्ट निराळी.

हिरण्यकशिपूच्या त्या उग्र तपाचाहि जगावर अनिष्ट परिणाम होऊं लागला. धरणीकंप होऊं लागले ! समुद्र खवळूं लागले ! आकाशांतून तारका निखळूं लागल्या ! दाही दिशा पेटल्याप्रमाणें उग्र दिसूं लागल्या ! देव घाबरले.

ब्रह्मदेवाला शरण गेले. त्यांनीं जगाचें दुःख ब्रह्मदेवापुढे मांडलें. ब्रह्मदेवाला दया आली. ते हिरण्यकशिपूच्या आश्रमांत आले. आपल्या कमंडलूंतील जलानें त्याच्या देहावर प्रोक्षण केलें. त्याचा देह पूर्ववत् ताजातवाना झाला! ब्रह्मदेव म्हणाले, बाबा धन्य आहेस तूं. अशी तपश्चर्या कोणी केली नाहीं व कोणी करणारहि नाहीं. मी तुझ्यावर प्रसन्न आहें. काय पाहिजे तें माग. पण हें उग्र तप सोडून दे.

हिरण्यकशिपूनें हात जोडले. ब्रह्मदेवाला नमस्कार केला. स्तुति केली. त्यानें नम्रपणानें वर मागितला. देवा! आपण निर्माण केलेल्या कोणत्याहि प्राण्यापासून मला मृत्यु न यावा. मला दिवसा मरण नसावें. रात्रीं मरण नसावें. आंत, बाहेर, पृथ्वीवर किंवा आकाशांत मला मृत्यु न यावा. तुम्ही निर्माण केलेल्या सृष्टींत माझ्याशीं युद्ध करण्याला कोणी प्रतिस्पर्धी नसावा. मलाच त्रैलोक्याचें आधिपत्य मिळावें. सर्व त्रैलोक्यावर माझें एकछत्री राज्य असावें इत्यादि इत्यादि.

ब्रह्मदेव पेचांत पडले. पण वचनच दिलेलें असल्यामुळें निरुपायानें "तथास्तु" म्हणाले. त्याला तपश्चर्येपासून परावृत्त करून निघून गेले. क्षणभर लोकांना व देवांना आपण सुखी आहों असें वाटलें. हिरण्यकशिपु त्रैलोक्याचें अधिराज्य भोगूं लागला. त्याच्या ऐहिक सुखोपभोगांना व ऐषआरामाला पारावार राहिला नाहीं. अगोदरच उन्मत्त होता तो. आतां तर आपल्याला मृत्यूचें भय नाहीं अशी समजूत झाल्यामुळें तो अधिकच उन्मत्त झाला. त्यानें देवांना जिंकलें. मानवांना जिंकलें. गंधर्वांना जिंकलें. यक्ष-राक्षसांना जिंकलें. सर्वांना जिंकलें! मीच सर्वांचा मालक आहे. मीच सर्वांचा पालक आहें. सर्वांनीं मलाच भजावें. माझीच पूजा करावी. काय द्यावयाचें असेल तें मलाच द्यावें, असें तो सर्वांना सांगूं लागला! सर्वांचा त्यानें अनन्वित छळ सुरू केला. सारें त्रैलोक्य त्याच्या या वागण्यानें दुःखी झालें. ब्रह्मदेवासह सर्व देव आदिनारायणाला शरण गेले! आदिनारायण भगवान् श्रीविष्णु म्हणाले, चिंता करूं नका. त्याच्या पोटीं जन्माला आलेला त्याचा धाकटा मुलगा माझा अनन्यभक्त प्रह्लाद हा मोठा शांत आहे. प्राणिमात्रांशीं तो समबुद्धीनें वागणारा आहे. तो कोणाशींहि वैर करीत नाहीं. तो अन्तःकरणानें मोठा उदार आहे. साधु, संत, महात्मे व विद्वान् यांचा तो मोठा आदर करतो. त्यांच्याशीं नम्रपणानें वागतो.

तो जितेंद्रिय आहे. सत्यवक्ता आहे. दीनवत्सल आहे. सर्व प्राण्यांवर तो आपल्या जीवाप्रमाणें प्रेम करतो. मोठा शहाणा आहे. गुणी आहे, पण त्याचा त्याला तिळ-मात्रहि गर्व नाहीं. अहोरात्र माझ्यास्वरूपीं तो तन्मय झालेला आहे. तो माझा अत्यंत प्रिय आहे. त्याचा जेव्हां हिरण्यकशिपु छळ करील तेव्हां, तुम्ही त्याला कितीहि उत्कृष्ट वर दिलेले असले आणि तो स्वतःला त्यामुळें "अमर" समजत असला तरी, मी त्याला मारीन आणि तुमच्यासह साऱ्या त्रैलोक्याला सुखी करीन. हें ऐकून देवांना आनंद झाला व सारे देव आपआपल्या स्थानाला निघून गेले.

हिरण्यकशिपु हा जनतेला तर छळत होताच. आतां त्यानें प्रह्लादाचाहि छळ सुरू केला ! प्रह्लाद सुमारें पांच-सहा वर्षांचा होता. त्याला शाळेंत घातलें होतें. दैत्यांचे गुरु शुक्राचार्य. त्यांचे दोन चिरंजीव शंड आणि अमर्क हे त्या शाळेचे प्रधानाध्यापक होते. प्रह्लाद शाळेंत गेला कीं दैत्यांचीं मुलें त्याच्या भोंवतालीं जमत असत. तो मोठा देखणा होता. सद्गुणी होता. सुस्वभावी होता. गोड भाषण करणारा होता. दैत्यांचीं मुलें जवळ आलीं कीं त्यानें श्रीहरीचा महिमा वर्णावा व भक्तीचा महिमा वर्णन करावा. मुलांना उपदेश करावा. श्रीहरीच्या नामसंकीर्तनांत तो तन्मय होऊन नाचूं लागला कीं, सर्व दैत्यांचीं मुलेंहि त्याच्याबरोबर नाचूं लागत. गाऊं लागत. हरिभजन करूं लागत. असा हा प्रकार पाहून शंडामर्क घाबरले. त्यांनी प्रह्लादाला हिरण्यकशिपूकडे पोहोंचविलें. सारा वृत्तान्त सांगितला. महाराज ! संभाळा आपल्या मुलाला. याचीं लक्षणें कांहीं चांगलीं दिसत नाहींत.

हिरण्यकशिपूनें प्रह्लादाला जवळ घेतलें. विचारलें, बाळा काय शिकलास ? प्रह्लादानें शांतपणें व गंभीरपणें उत्तर दिलें. महाराज ! "श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्। अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम्" या नवविध भक्तींत रंगून जाणें यांतच जन्माचें खरें साफल्य आहे. हेंच खरें शिक्षणाचें सार आहे. हेंच मी शिकलों. हें उत्तर ऐकतांच हिरण्यकशिपु खवळला ! त्याला आपला हा धाकटा मुलगा कांट्यासारखा सलूं लागला. चंदनाच्या वनांत बाभळीचा वृक्ष जसा असावा तसा त्याला दैत्यकुलांत आपला धाकटा मुलगा प्रह्लाद हा कुलांगार वाटूं लागला ! संतापानें त्याचे डोळे लाल झाले. ओठ थरथर कांपूं लागले. त्यानें प्रह्लादाला आपल्या मांडीवरून खालीं ढकलून दिलें !

हिरण्यकशिपूनें प्रधानजीला बोलावलें. संरक्षण खात्यांतील अधिकारी दैत्यांना बोलावलें ! हुकूम फर्मावला. " वध्यतामाश्वयं वध्यः " याला ठार करा. लवकर ठार करा ! "सर्वैरुपायैर्हन्तव्यः" वाटेल त्या उपायांनीं याचा कांटा काढा. मग काय विचारतां ? ते सारे दैत्य. आकाळविकाळ चेहरे. तीक्ष्ण दाढा. काळेकभिन्न देह. तांबडे भुरटे डोळ्यांवरील केस आणि दाढीमिशा. इंगळासारखे डोळे. हातांत भाले, बरच्या, तलवारी आणि त्रिशूळ. सांपडतील तीं शस्त्रें घेऊन धांवले प्रह्लादाच्या अंगावर ! पांच वर्षांचा प्रह्लाद कोणीकडे आणि हत्तीप्रमाणें प्रचंड देह असलेले ते दैत्य कोणीकडे ? पित्याच्या आज्ञेप्रमाणें आपल्याला ठार करण्याकरितां अंगावर धांवून आलेल्या त्या दैत्यांच्या समुदायांत प्रह्लाद शांतपणें उभा आहे. वृत्ति हरिस्वरूपीं तन्मय झालेली आहे ! मुखानें नारायणाचें सारखें नामस्मरण करीत आहे. काय चमत्कार आहे पहा ! त्याच्या अंगावर फेकून मारलेलीं शस्त्रें पारिजातकाच्या फुलाप्रमाणें मृदु बनलीं ! नरनारायणाला जिंकण्याकरितां मदनानें केलेले प्रयत्न जसे विफल झाले त्याचप्रमाणें दैत्यांनीं प्रह्लादाला शस्त्रांनीं मारण्याचे केलेले प्रयत्न वाया गेले ! पापी मनुष्याचीं सत्कर्में जशीं फुकट जातात त्याचप्रमाणें दैत्यांनीं प्रह्लादाला मारण्यासाठीं केलेले प्रयत्न व्यर्थ होऊं लागले. प्रह्लाद शांतपणें उभा आहे. प्रचंड होळी पेटवून त्यांत प्रह्लादाला जाळण्याचा प्रयत्न केला, पण अग्निनारायणानें प्रह्लादाच्या केसालाहि धक्का लावला नाहीं ! गगनाला भिडणाऱ्या त्या अग्नीच्या प्रचंड ज्वाला, पण प्रह्लादाच्या स्पर्शानें शांत झाल्या ! " अरे ! याला कड्यावरून लोटा आणि मारा ! " शब्द कानीं पडताच दैत्यांनीं प्रह्लादाला पर्वताच्या शिखरावर नेलें आणि कडेलोट केला ! पण काय चमत्कार आहे पहा ! आपल्या तान्ह्या बाळाला आई जशी हळुवारपणें झेलते त्याचप्रमाणें धरणीमातेनें बाळ प्रह्लादाला आपल्या पदरांत अगदीं हळुवारपणें झेलून घेतलें ! प्रह्लाद शांतपणें नारायणाचें स्मरण करतो आहे ! हातपाय बांधून समुद्रांत फेकलें तरी तेथें तो सर्व बंधनांतून मुक्त होऊन नारायण नारायण म्हणत तरंगत आहे ! भयंकर विषारी सर्प त्याच्या अंगावर सोडले, पण गरुडाला पहातांच नागांनीं माना खालीं टाकाव्यात त्याप्रमाणें सर्पांनीं आपल्या फणा आवरल्या आणि ते नतमस्तक होऊन प्रह्लादाच्या चरणीं स्थिरावले ! विषानें भरलेला प्याला त्याला प्यावयास दिला, पण तो त्यानें नारायणा ! नारायणा ! करीत [illegible] घेतला ! जणुं कांहीं अमृतच तें !

" विषमप्यमृतं क्वचिद्भवेद्, अमृतं वा विषमीश्वरेच्छया ". प्रह्लाद नारायणाच्या नामस्मरणांत तन्मय होऊन आनंदानें नाचत आहे. मदोन्मत्त असलेल्या प्रचंड हत्तींना यथेच्छ मद्य पाजून प्रक्षुब्ध केले व प्रह्लादाच्या अंगावर घातले ! पण ते हत्ती प्रह्लादाच्या जवळ येतांच गजतालामध्यें त्याच्या भोंवतालीं नृत्य करूं लागले ! श्रीहरीचें नामस्मरण करीत प्रह्लाद मध्यें नाचत आहे तर सर्व हत्ती त्याच्याभोंवतीं नाचून त्याला साथ करीत आहेत ! श्रीकृष्ण प्रभूंच्या रासनृत्यालाहि या प्रसंगानें मागें टाकावें असें ते मनोवेधक दृश्य पाहून ज्याचें हृदय द्रवलें नाहीं तो पाषाणहृदयी विरळाच असेल !

ईश्वर तारी त्याला कोण मारी ? मुंबईस चौथ्या मजल्यावरून एका मनुष्याला खून करण्याच्या बुद्धीनें ढकललें पण काय मौज पहा, खालून गवताची गाडी चालली होती. त्या गाडींतील गवतावर तो नेमका पडला व सुखरूप राहिला ! पुण्यांतील जोगीश्वरीजवळ एक मुलगी खेळतां खेळतां तिसऱ्या मजल्यावरून खालीं पडली. आई-बाप घाबरले. लोक घाबरले. पण मुलगी उठून बसली व चालूं लागली ! पालकांनीं एक्सरेनीं तपासण्याकरितां तिला ससूनमध्यें नेलें. डॉक्टरनीं सांगितलें, हिला कांहीं झालें नाहीं ! पुण्यांतील एका वाड्यांत तिसऱ्या मजल्यावरील पत्र्याचें दुपाकें उडालें. बाशाला पाळणा टांगलेला होता. पाळण्यांत बाळ झोपलेलें होतें. पुढें तें दुपाकें अंतराळांत उडून जेथें पडलें तेथें ते जमिनीवर त्रिकोणाकृति झोंपडीप्रमाणें अज्जात पडलें ! बाळ पाळण्यांत आनंदानें खेळत होतें ! १९६१ सालच्या पुण्यांतील पानशेतच्या जलप्रलयांत एक मूल पाळण्यासह वाहवलें. नदीचें तें अकांडतांडव पाहून लोकांच्या तोंडचें पाणी पळालें ! पण थोड्याच वेळांत तो पाळणा सुरक्षितपणें एका ठिकाणीं लागला व पाळण्यातील मूल जिवंतपणें सुरक्षित हातीं लागलें ! सुमारें ३० वर्षांपूर्वी १४ जानेवारीस झालेल्या उत्तर भारतांतील भूकंपात मोंघीर शहर अर्धेअधिक उद्ध्वस्त झालें. साडेतीन मिनिटांच्या अवधीत पंचवीस हजार लोक त्या शहरांत मृत्युमुखीं पडले ! प्रलयासारखें तें भीषण दृश्य पाहून भयानें मांड्या थरथर कांपत होत्या. पण त्याहि अवस्थेंत एका पडक्या घराच्या प्रचंड ढिगाऱ्यांत फळ्याप्रमाणें लांबरुंद असलेल्या दोन शिळांच्या त्रिकोणांत एक तान्हें मूल जिवंत सांपडलें ! हें कसें घडतें सांगतां येत नाहीं. तेथें तर्काची गति कुंठित होते. कांहीं लोक त्याला योगायोग म्हणतात. कांहीं लोक

भगवंताची माया म्हणतात. भगवद्भक्त त्यालाच ईश्वरेच्छा किंवा ईश्वरकृपा म्हणतात.

प्रह्लादाला मारण्याचे सर्व प्रयत्न विफल झाल्यानंतर मात्र हिरण्यकशिपु चवताळला ! प्रह्लादाला त्यानें जवळ घेतलें. दरडावून विचारलें. अरे ! कोणाच्या बळावर तूं माझ्या आज्ञेचें उल्लंघन करीत आहेस ? थांब, तुला आत्ता पाठवतों यमसदनाला ! प्रह्लादानें शांतपणें उत्तर दिलें. महाराज ! तो केवळ तुमचा किंवा माझाच आधार नसून साऱ्या विश्वाचा तो आधार आहे ! ब्रह्मदेव किंवा इंद्रादि दे। देवसुद्धा त्याच्याच नियंत्रणावर आपआपलीं कामें करूं शकतात. हिरण्यकशिपु संतापानें म्हणाला, अरे ! कोठें आहे तुझा तो आधार ? दाखव मला. असा दाखव मला. नाहीं तर या माझ्या हातांतील खड्गाच्या तीक्ष्ण धारेनें उडवितों तुझें मस्तक ! पाहूं तुझें कोण संरक्षण करतो तें ? प्रह्लादानें शांतपणें उत्तर दिलें. महाराज ! तो नाहीं कोठें ? असाच मी आपणांस प्रश्न विचारतों. तो तुमच्यांत आहे. तो माझ्यांत आहे. तो भूतभौतिक सर्व विश्वप्रपंचांत ओतप्रोत भरलेला आहे. हें ऐकतांच प्रह्लादाला मारण्यासाठीं हिरण्यकशिपूनें सिंहासारखी गर्जना करीत सिंहासनावरून खालीं उडी घेतली ! बरोबर संध्याकाळची वेळ होती ती ! ना दिवस ना रात्र. दांतओठ खाऊन त्यानें जोरांत खांबावर मुष्टिप्रहार केला ! कोणी लत्ताप्रहार केला असें म्हणतात. वीज कडाडावी त्याप्रमाणें खांब कडाडला ! तो उभा दुभंगला ! त्या खांबांतून ना नर ना पशु अशा अपूर्व नि अलौकिक रूपानें प्रत्यक्ष आदिविष्णु भगवान् नारायण नरसिंहरूपानें अवतरले. कंठापासून खालचा देह नराकृति व मुख सिंहाच्या मुखासारखें ! संस्कृत भाषेंत हरि शब्दाचा अर्थ सिंह असा आहे म्हणून या रूपाला नरहरि किंवा नरसिंह असे म्हणतात. श्रीहरि नरहसिंरूपानें अवतरल्याबरोबर देवांना आनंद झाला ! स्वर्गातून देवांनीं पुष्पवृष्टि केली. साधुसंत, मरात्मे, ऋषि, मुनि सर्वांना आनंद झाला ! सर्वांनीं देवांवर फुलें उधळलीं.

नरहरीनें हिरण्यकशिपूला आपल्या मांडीवर घेतलें. दोन्ही हातांच्या तीक्ष्ण नखांनीं त्याचें पोट फाडलें ! पोटच कां फाडलें ? कंठाला नख कां नाहीं लावलें ? असें कोणी विचारल्यास एका संतकवीनें उत्तम उत्तर दिलें आहे. " काढुनि अन्तरमाळ काळिज फोडोनि शोधिला काय। कीं या पेटींत दुसरा भक्तमणी दडुनि राहिला काय। " प्रह्लादासारखें भक्तरत्न ज्या खाणींतून जन्माला आलें त्या

आणीत अथवा न्या पेटींत आणखी एखादें भक्तरत्न दडून राहिलें आहे काय ?

पहाण्याकरितांच की काय नरसिंहानें हिरण्यकशिपूचें पोट फाडलें ! असो. हिरण्यकशिपूला उत्तम गति दिली. त्याच्या देहांतील तेज – अन्तर्ज्योत पहातां पहातां सर्वांच्या देखत महाज्योतिस्वरूप असलेल्या परमेश्वरांत – नरसिंहरूपांत वेलीन होऊन गेली ! नरहरीचें तें भीषणरूप इतरांना पहावतहि नव्हतें. नित्य सान्निध्यांत असलेली लक्ष्मीहि पण घाबरून गेली होती ! शेवटीं ब्रह्मदेवाच्या सांगेवरून भक्तवर प्रल्हादानेंच नरहरीला शांत केलें ! केवढें हें भक्तवात्सल्य आहे श्रीहरीचें ?

श्रीलक्ष्मीनृसिंहाची उपासना ही अत्यंत कल्याणप्रद आहे. श्रीलक्ष्मी-नृसिंहाच्या उपासनेनें भक्त सर्व संकटांतून मुक्त होतो. त्याच्या इष्ट कामना पूर्ण होतात. त्याचें सर्व जीवन आनंदमय बनतें. नित्यनियमानें श्रीलक्ष्मीनृसिंहाचा मंत्रजप करणारा उपासक श्रीलक्ष्मीनृसिंहाचें स्मरण करीत समरभूमीवर पाऊल ठेवील तर तो निश्चित विजयी होईल. खालीं दिलेलें स्तोत्र या दृष्टीनें फारच महत्त्वाचें आहे. या स्तोत्रानें पिशाचबाधाहि लवकर दूर होते असा अनेकांचा अनुभव आहे. जिज्ञासूजनांनीं याचा अवश्य लाभ घ्यावा.]



श्रीलक्ष्मीनृसिंहकरावलम्बनस्तोत्रम् ।

श्रीमत्पयोनिधिनिकेतन चक्रपाणे
भोगीन्द्रभोगमणिराजितपुण्यमूर्ते ।
योगीश शाश्वत शरण्य भवाब्धिपोत
लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलम्बम् ॥ १ ॥

हे लक्ष्मीनृसिंहा लक्ष्मीकान्ता नरहरे ! आपण मला आपल्या हाताचा आधार द्या. श्रीमान् म्हणजे सर्व ऐश्वर्यानें संपन्न असलेला असा जो पयोनिधि म्हणजे महासागर तो आपला 'निकेतन' म्हणजे वास्तव्यस्थान आहे. हे भगवन् आपण चक्रपाणि आहां. भक्तजनांच्या संरक्षणाकरितां आपण हातांत चक्र धारण केलेलें आहे. 'भोगीन्द्र' म्हणजे सर्व सर्पांचा अधिराज जो शेष त्याचा 'भोगमणि' म्हणजे श्रेष्ठ देह, उत्तम भव्य देह, त्या देहावर आपली पुण्यकारक मंगलमय मूर्ति विराजमान झालेली आहे. आपण योगीश म्हणजे सर्व योग्यांचे अधिपति आहां. योगीश्वर आहां. तसेंच शाश्वत म्हणजे अविनाशी आहां. 'शरण्य' म्हणजे शरणागतांचें संरक्षण करणारे शरणागत – भक्तवत्सल आहां हे भगवन् नरहरे आपण 'भवाब्धिपोत' म्हणजे भवसागर तरून जाण्याचें उत्तम साधन अर्थात् जणुं कांहीं जहाजच आहां. हे लक्ष्मीनरसिंहा ! आपण मला आपल्या हाताचा आधार द्या.

ब्रह्मेन्द्र-रुद्र-मरुदर्क-किरीट-कोटि-
संघट्टिताङ्घ्रिकमलामल-कान्ति-कान्त ।
लक्ष्मीलसत्कुच-सरोरुह-राजहंस
लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलम्बम् ॥ २ ॥

ब्रह्मदेव इंद्र रुद्र त्याचप्रमाणें मरुद्गण म्हणजे वायुदेवतांचा समुदाय, अर्क म्हणजे सूर्य इत्यादि देव आपल्या चरणकमलीं मस्तक ठेवून प्रणाम करीत असतांना त्यांच्या मस्तकांवरील मुकुटांच्या टोकांचें संघर्षण आपल्या पदकमलांना सारखें होत आहे. अर्थात् सर्व देव आपल्या चरकमलावर मस्तक ठेवून प्रणाम करीत आहेत. आपल्या देहाची कांति म्हणजे तेज हें अत्यंत अमल म्हणजे

श्रीलक्ष्मीनृसिंह



लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलम्बम् ।

स्वच्छ आहे. त्यामुळें आपण अत्यंत मनोहर दिसत आहां. आपलें स्वरूप रमणीय आहे. श्रीलक्ष्मीदेवीच्या वक्षःस्थलीं कमलाप्रमाणें शोभायमान असलेल्या स्तनमंडलाच्या सान्निध्यांत आपण राजहंसाप्रमाणेंच दिसत आहां. हे लक्ष्मीनृसिंहा ! आपण मला आपल्या हाताचा आधार द्या. परमेश्वरा ! आपण माझें रक्षण करा

संसारदावदहनाकुल-भीकरोरु-
ज्वालावलीभिरतिदग्धतनूरुहस्य ।
त्वत्पादपद्मसरसीं शरणागतस्य
लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलम्बम् ॥ ३ ॥

हे प्रभो नरहरे ! माझ्या भोंवतालीं भडकलेला हा संसाररूपी दावानल म्हणजे वणवा याच्या चोहोंकडून व्यापणाऱ्या अत्यंत भयंकर आणि प्रचंड ज्वाला, या ज्वालांच्या समूहानें माझ्या अंगावरील केस जळून गेले आहेत. मी या भडकलेल्या संसाराच्या वणव्यांत अगदीं होरपळून निघालों आहे. माझ्या सर्व अंगाचा दाह झाला आहे. मला शांति मिळावी म्हणून मी तुमच्या चरण-कमलरूपी सरसीचा म्हणजे सरोवराचा आश्रय घेतला आहे. हे लक्ष्मीनृसिंहा ! आपण मला आपल्या हाताचा आधार द्या. नरहरे ! आपण माझें रक्षण करा.

संसारजालपतितस्य जगन्निवास
सर्वेन्द्रियार्थबडिशाग्रझषोपमस्य ।
प्रोत्कम्पित-प्रचुर-तालुक-मस्तकस्य
लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलम्बम् ॥ ४ ॥

हे प्रभो नरहरे ! जसा एखादा मासा जाळ्यांत सांपडावा किंवा गळाला लावलेल्या आमिषाला भुलून गळाला लागावा. टाळूमध्यें गळाचा कांटा घुसून त्याच्या टाळूला आणि मस्तकाला जशा असह्य वेदना व्हाव्यात आणि त्या वेदनांनी तो जसा तडफडत असावा, अगदीं तशी माझी स्थिति झाली आहे. मी या संसाररूपी जाळ्यांत पडलों आहें, सांपडलों आहें. हे जगन्निवासा नरहरे ! इंद्रियांचे विषय शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या आमिषाला बळी पडून संसाराच्या गळाला – गळाच्या अग्रभागाला लागलेला जणुं कांहीं मी एक मासाच बनलों आहे. "झष" म्हणजे मासा. या माशाचीच मला उपमा द्यावी अशी मा[झी]

स्थिति झाली आहे. टाळु आणि मस्तक फाटावें याप्रमाणें मला या संसारांत खूप असह्य वेदना होत आहेत. त्या वेदनांनीं मी अगदीं 'प्रोत्कंपित' झालों आहें. त्या दुःखांनीं मी अगदीं तडफडत आहें. हे नरहरे ! दयाघना परमेश्वरा ! आपण मला आपल्या हाताचा आधार द्या.

संसारकूपमतिघोरमगाधमूलं
सम्प्राप्य दुःख-शत-सर्प-समाकुलस्य ।
दीनस्य देव कृपया पदमागतस्य
लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलम्बम् ॥ ५ ॥

हे प्रभो नरहरे ! हा संसाररूपी कूप म्हणजे लहान तोंडाची आणि अत्यंत खोल असलेली विहीर किंवा आड, हा अत्यंत भयंकर आहे. याचें मूळ फारें खोल आहे. त्याचा कांहीं थांगपत्ता लागत नाहीं. या संसाररूपी अति भयंकर असलेल्या आडांत विहिरींत मी पडलों आहें. दुर्दैवानें या संसारकूपांत पडून मला शेंकडों दुःखें भोगावीं लागत आहेत. सापांनीं जसें चोहोंकडून वेरावें त्याप्रमाणें या सांसारिक दुःखांनीं मला व्यापून टाकलें आहें. त्या दुःखांनीं मी अगदीं व्याकुळ झालों आहें. हे दीनदयाळा देवा ! मी अगदीं दीन झालों आहें. मी तुमच्या चरणीं दीन होऊन शरण आलों आहें. हे प्रभो श्रीलक्ष्मीनृसिंहा ! कृपा करून आपण मला आपल्या हाताचा आधार द्या.

संसार-भीकर-करीन्द्र-कराभिघात-
निष्पीड्यमान-वपुषः सकलार्तिनाश ।
प्राण-प्रयाण-भव-भीति-समाकुलस्य
लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलम्बम् ॥ ६ ॥

हे भगवन् नरहरे ! आपण "सकलार्ति-नाश" म्हणजे सर्वांच्या दुःखांचा परिहार करणारे आहां. अथवा भक्तजनांच्या सर्व दुःखांचा परिहार करणारे आहां. प्रभो ! मी अति दुःखी आहें. अत्यंत भयंकर असा हा संसाररूपी प्रचंड हत्ती माझ्यामागें लागलेला आहे. तो मला सोंडेनें पकडून सारखा आदळीत आहे. त्यामुळें माझें शरीर अगदीं "निष्पीड्यमान" म्हणजे जर्जर झालें आहे. पिळून निघत आहे. माझे प्राण जाण्याची पाळी आली आहे. या संसाराच्या

भयानें मी व्याकुळ झालों आहें. हे प्रभो लक्ष्मीनरसिंहा ! मला आपण आपल्या हाताचा आधार द्या.

संसार-सर्प-विष-दिग्ध-महोग्र-तीव्र-
दंष्ट्राग्र-कोटि-परिदष्ट-विनष्ट-मूर्तेः ।
नागारि-वाहन सुधाब्धिनिवास शौरे
लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलम्बम् ॥ ७ ॥

हे प्रभो ! आपण नागारिवाहन आहां. नाग म्हणजे फणा असलेले सर्प. त्यांचा अरि म्हणजे शत्रु. सर्पांचा शत्रु गरुड असल्यामुळें गरुडाला नागारि म्हणतात. हा गरुड नरसिंहस्वरूप असलेल्या श्रीविष्णूचें वाहन आहे. म्हणून या ठिकाणीं श्रीविष्णुस्वरूप असलेल्या नरसिंहाला नागारिवाहन असें म्हटलें आहे. हे गरुडवाहना प्रभो ! आपण 'सुधाब्धिनिवास' आहां. सुधा म्हणजे अमृत. अमृतानें पूर्ण असलेल्या महासागरामध्यें आपलें वास्तव्य आहे. हे प्रभो ! आपण शूरकुलामध्यें अवतरलेले आहां आपण माझ्याकडे लक्ष द्या. मला संसार रूपी सर्पानें दंश केला आहे. विषानें माखलेल्या अथवा भरलेल्या अशा अत्यंत भयंकर आणि तीक्ष्ण असलेल्या दाढा आणि त्या दाढांच्या अग्रभागीं असलेलीं तीक्ष्ण टोकें, तीं तीक्ष्ण दाढांचीं टोकें या संसाररूपी सर्पानें माझ्या शरिरांत रोविलेलीं आहेत. या संसारसर्पाच्या दंशानें माझा देह नष्ट झाल्यासारखा झाला आहे. त्यांत कांहीं त्राण उरलेलें नाहीं. प्रभो ! आपण माझ्याकडे लक्ष द्या. देवा, आपण म्हणाल कीं, मी तरी काय करणार ? पण आपलें हें म्हणणें बरोबर नाहीं. आपण नागारिवाहन म्हणजे गरुडवाहन आहां. गरुड हा नागांचा शत्रु आहे. आपण गरुडाला सांगून हा मला गांजीत असलेला संसाररूपी नाग एकदांचा नष्ट करून टाका. आपण 'सुधाब्धिनिवास' आहां, तर मग माझ्यावर अमृताचें सिंचन करा. मला अमृत पाजा आणि या संसारसर्पाच्या विषबाधेंतून वाचवा. आपण शौरि म्हणजे शूरकुलोत्पन्न आहां. शूरराजाच्या वंशांत आपण अवतार घेतलेला आहे. तेव्हां आपणाला मला या संकटांतून वाचवितांना मागें पाऊल घेणें शोभणार नाहीं. हे प्रभो नरहरे श्रीलक्ष्मीनृसिंहा ! आपण मला आपल्या हाताचा आधार द्या. आपण माझें संरक्षण करा.

संसारवृक्षमघबीजमनन्तकर्म-
शाखायुतं करण-पत्रमनङ्गपुष्पम् ।
आरुह्य दुःखफलितं पतितो दयालो
लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलम्बम् ॥ ८ ॥

हे प्रभो दयाघना ! या अत्यंत जटिल अशा संसाररूपी वृक्षावर मी अज्ञानानें चढलों आहें. खूप वर चढलों आहें. आतां मी पडूं पहात आहें. आपण कृपा करून आपल्या हाताचा मला आधार द्या. कसा आहे हा संसारवृक्ष ? असें विचाराल तर सांगतों. ऐका.

'अघबीज' म्हणजे पाप हेंच या संसारवृक्षाचें बीज आहे. या जन्मांतील आणि पूर्वपूर्व जन्मांतील अनंत कर्में, ह्याच या संसारवृक्षाच्या शाखा आहेत. या अनंत कर्मरूपी शाखांनीं व फांद्यांनीं तो युक्त आहे. विषयांकडे धाव घेणारीं इंद्रियें हींच या संसारवृक्षाचीं पानें आहेत 'अनङ्गपुष्प' म्हणजे कामवृत्तिरूपी फुलांनीं तो बहरलेला आहे. तात्पर्य, विविध प्रकारच्या कामवृत्ति हींच या संसारवृक्षाचीं फुलें होत. आणि कोटी नानाप्रकारचीं दुःखें हींच या संसाररूपी वृक्षाला फळें लागतात. 'दुःखफलितं' म्हणजे दुःखरूपी फळांनीं हा संसारवृक्ष फलवान झालेला आहे. अशा या दुःखपर्यवसायी असलेल्या संसाररूपी वृक्षावर आरोहण करून मी पस्तावलों आहें. आतां मला माझा तोल संभाळण्याची शक्ति राहिलेली नाहीं. मी पडत आहें. माझा अधःपात होऊं पहात आहे. हे प्रभो दयासागरा ! मला आपण सावरून धरा. हे लक्ष्मीनृसिंहा ! मला आपण आपल्या हाताचा आधार द्या. माझें आपण रक्षण करा.

संसार-सागर-विशाल-कराल-काल-
नक्र-ग्रह-ग्रसित-निग्रह-विग्रहस्य ।
व्यग्रस्य राग-निचयोर्मि-निपीडितस्य
लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलम्बम् ॥ ९ ॥

हे प्रभो नरहरे ! हा संसारसागर अत्यंत विशाल आहे. यांत राहणाऱ्या व कराल काळाप्रमाणें अत्यंत भयंकर असलेल्या सुसरी आणि मानवांना पकडणारे इतर जलचर प्राणी यांनीं माझा मनोनिग्रह आणि विग्रह म्हणजे देह

हा जणुं कांहीं गिळून टाकला आहे. मी अगदीं व्यग्र झालों आहें. गोंधळलों आहें. मला कांहीं सुचत नाहीं. 'रागनिचयोर्मि' म्हणजे चित्तांत निर्माण होणाऱ्या निरनिराळ्या विषयांच्या वासना ह्याच कोणी लाटा. या लाटांच्या थपडांनीं मी अगदीं पीडलों आहें. हे भगवंता लक्ष्मीनृसिंहा ! मला कृपा करून आपण आपल्या हाताचा आधार द्या.

संसार-सागर-निमज्जन-मुह्यमानं
दीनं विलोकय विभो करुणानिधे माम् ।
प्रह्लाद-खेद-परिहार-कृतावतार
लक्ष्मीनृसिंह मम देहि कृपावलम्बम् ॥ १० ॥

हे विभो विश्वव्यापका परमेश्वरा ! मी या संसाररूपी सागरामध्यें सारख्या गटांगळ्या खात आहें. जणुं कांहीं या संसारसागरांत गटांगळ्या खाण्याचेंच काम मीं पत्करलें आहे ! हे करुणासागरा नरहरे ! मी अगदीं दीन झालों आहें. आपण माझ्याकडे पहा. आपण प्रह्लादाच्या दुःखाचा परिहार करण्याकरितां नरसिंहाचा अवतार घेतला व त्याच्या सर्व दुःखांचा परिहार केला ! माझ्या दुःखाचा नाहीं का आपण परिहार करणार ? आपल्याशिवाय मला कोणाचा आधार आहे ? हे प्रभो लक्ष्मीनृसिंहा ! आपण मला आपल्या हाताचा आधार द्या. आपण माझें रक्षण करा.

संसार-घोर-गहने चरतो मुरारे
मारोग्र-भीकर-मृग-प्रचुरार्दितस्य ।
आर्तस्य मत्सर-निदाघ-सु-दुःखितस्य
लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलम्बम् ॥ ११ ॥

हे मुरारे प्रभो नरसिंहा ! " अटव्यां नारसिंहश्च " या वचनाच्या अनुरोधानें पहातां अरण्यामध्यें संरक्षण करणारी देवता म्हणजे तुम्हीच आहां. मी संसाररूपी जंगलांत भटकत असतांना हा कामरूपी अत्यंत उग्र-भयंकर ढाण्या वाघ माझ्या पाठीमागें लागला आहे. त्यानें मी अत्यंत पीडित झालों आहें.

मी अत्यंत आर्त म्हणजे संत्रस्त झालों आहें. या संसाररूपी गहन अरण्यांत फिरतां फिरतां द्वेषमत्सररूपी उन्हाच्या तापानें मी अत्यंत तप्त झालों आहें. दुःखी झालों आहें.

हे प्रभो दीनदयाळा! या घोर संसाररूपी अरण्यांत माझें रक्षण करण्याला तुमच्यावांचून दुसरा कोण बरें समर्थ आहे? हे भगवन् लक्ष्मीनृसिंहा! आपण मला आपल्या हाताचा आधार द्या आणि या संसाररूपी घोर अरण्यांतून माझें रक्षण करा.

बद्ध्वा गले यमभटा बहु तर्जयन्तः
कर्षन्ति यत्र भवपाशशतैर्युतं माम् ।
एकाकिनं परवशं चकितं दयालो
लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलम्बम् ॥ १३ ॥

हे दयाळो लक्ष्मीनृसिंहा! या संसारामध्यें यमाचे दूत मला फार भीति घालीत आहेत. अगोदरच शेंकडों संसारपाशांनीं युक्त असलेलों मी, त्यांत पुन्हां हे यमदूत माझ्या गळ्याला आपल्या पाशांनीं गच्च बांधून, माझ्या गळ्याला गळफांस लावून ओढीत आहेत. मी अगदीं एकाकी म्हणजे एकटा आणि परवश म्हणजे सर्वस्वीं यमदूतांच्या अधीन झालों आहें. हे दयाघना श्रीलक्ष्मीनृसिंहा! अशी माझी ज्या संसारांत स्थिति झाली आहे तेथें मला तुमच्याशिवाय दुसरा कोण त्राता आहे बरे? हे प्रभो! आपण मला आपल्या हाताचा आधार द्या.

लक्ष्मीपते! कमलनाभ! सुरेश! विष्णो!
यज्ञेश! यज्ञ मधुसूदन विश्वरूप!।
ब्रह्मण्य! केशव जनार्दन! वासुदेव!
लक्ष्मीनृसिंह! मम देहि करावलम्बम् ॥ १४ ॥

हे लक्ष्मीपते! कमलनाभा! देवाधिदेवा श्रीविष्णो! आपण यज्ञ आहां आणि यज्ञेश्वरहि आहां. मनुमहर्षींची कन्या जी आकूति तिच्या उदरीं रुचि नांवाच्या ऋषीपासून आपण 'यज्ञ' नांवाचा अवतार धारण केलांत. आपण मधु नांवाच्या दैत्याचा वध केला म्हणून आपणांस मधुसूदन असें म्हणतात. आपण विश्वरूप आहां. 'ब्रह्म' म्हणजे वेद. या वेदांचें आपण संरक्षण करतां आणि वेदनिष्णात असलेल्या सदाचारसंपन्न वैदिक ब्राह्मणांचे आपण हितचिंतक आहां. म्हणून आपणांस 'ब्रह्मण्य' असें म्हणतात. हे केशवा! जनार्दना! हे वासुदेवा श्रीलक्ष्मी-नृसिंहा! आपण मला आपल्या हाताचा आधार द्या. आपण माझें रक्षण करा!

एकेन चक्रमपरेण करेण शङ्ख-
मन्येन सिन्धुतनयामवलम्ब्य तिष्ठन् ।
वामेतरेण वरदाभय-पद्म-चिन्हं
लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलम्बम् ॥ १४ ॥

हे भगवन् श्रीलक्ष्मीनृसिंहा ! आपण डाव्या बाजूच्या वरच्या हातांत चक्र धारण केलेलें आहे. या सुदर्शनचक्रानें आपण दुष्ट-दुर्जनांचा नाश करतां. मधल्या हातांत शंख धारण केलेला आहे. या शंखानें आपण भक्तांना व सज्जनांना छळणाऱ्या दुष्टांना आह्वान देतां. तिसऱ्या हाताचा श्रीलक्ष्मीला आधार देऊन आपण सिंहासनावर विराजमान झालेले आहां. उजव्या बाजूकडील एका हातानें आपण वरमुद्रा धारण केलेली आहे. ही मुद्रा भक्तांना अभीष्ट वर देऊन त्यांच्या सकल मनोरथांना पूर्ण करण्याचा आपला स्वभाव दाखवीत आहे. दुसऱ्या हातानें आपण अभयमुद्रा धारण केलेली आहे. चरणी अनन्यभक्तीनें शरण आलेल्यांना आपण अभयदान देत असल्याचें ती सुचवीत आहे. तिसऱ्या हातांमध्यें आपण कमल धारण केलेलें आहे. तें आपलें लीलाकमल आहे. कमलाप्रमाणें आपला स्वभाव कोमल असल्याचें तें सुचवीत आहे. हे प्रभो श्रीलक्ष्मीनृसिंहा ! आपण मला आपल्या हाताचा आधार द्या.

अन्धस्य मे हृत-विवेक-महाधनस्य
चोरैर्महाबलिभिरिन्द्रिय-नामधेयैः ।
मोहान्धकार-कुहरे विनिपातितस्य
लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलम्बम् ॥ १५ ॥

हे प्रभो श्रीलक्ष्मीनृसिंहा ! मी अंध म्हणजे अविचारी आहें. मला कर्तव्याकर्तव्याचा विवेक नाहीं. ज्यांना इंद्रिय हें नांव आहे अशा अत्यंत बलवान् असलेल्या चोरांनीं माझें विवेकरूपी विपुल धन हिरावून नेलें आहे. या इंद्रियरूपी चोरांनीं मला सर्वस्वी लुबाडून मोहरूपी अंधकारानें व्यापलेल्या दरींत ढकलून दिलेलें आहे. हे शरणागत वत्सला ! मी आपल्या चरणीं अनन्यभावानें शरण आलों आहें. हे लक्ष्मीनृसिंहा ! आपण मला आपल्या हाताचा आधार द्या. आपण माझें रक्षण करा.

प्रह्लाद-नारद-पराशर-पुण्डरीक-
व्यासादि-भागवत-पुङ्गवहृन्निवास ।
भक्तानुरक्त-परिपालन-पारिजात
लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलम्बम् ॥ १६ ॥

प्रह्लाद, नारद, पराशर आणि पुंडरीक तसेच श्रीव्यासमहर्षि त्याचप्रमाणें आदिशब्दानें अंबरीष, शुक, शौनक शांण्डिल्य, इत्यादि सर्व भगवद्भक्तामध्यें 'पुङ्गव' म्हणजे श्रेष्ठ असलेले बडेबडे भगवद्भक्त, त्यांच्या हृदयांमध्यें तुम्ही निरंतर निवास करतां. त्यांच्या अंतःकरणांत तुमचें निरंतर वास्तव्य असतें. तत्त्वतः तुम्ही सर्वांच्याच हृदयांत वास्तव्य करीत आहांत. तथापि, इतरेजनांना तुमचें स्वरूप आकलन होत नाहीं, पण वर निर्दिष्ट केलेले परम भागवत अर्थात् महाभागवत असलेले जे प्रह्लाद, नारद इत्यादि अत्यंत श्रेष्ठ भक्त त्यांना मात्र आपल्या हृदयांत नित्य तुमचा साक्षात्कार होत असतो. म्हणून त्यांच्या हृदयांत तुम्ही निवास करीत आहां असें म्हटलें आहे. हे प्रभो ! जे तुमचे भक्त आहेत, 'अनुरक्त' म्हणजे तुमच्या ठिकाणीं सतत अन्तःकरणपूर्वक प्रेम करतात त्यांचें परिपालन करण्याकरितां तुम्ही प्रत्यक्ष पारिजात म्हणजे कल्पवृक्षच आहां. हे लक्ष्मीनृसिंहा ! आपण मला आपल्या हाताचा आधार द्या. आचार्यांना विवक्षित असलेल्या संस्मरणीय श्रेष्ठ भगवद्भक्तांचा ज्याच्यामध्यें संग्रह केलेला आहे असा एक श्लोक आम्ही वाचकांना सादर करीत आहोंत, तो वाचकांनीं रोज आपल्या पाठांत ठेवावा. "प्रह्लाद-नारद-पराशर-पुण्डरीक-व्यासाम्बरीष-शुक-शौनक-भीष्म-दाल्भ्यान् । रुक्मांङ्गदार्जुन-वसिष्ठ-विभीषणादीन् पुण्यानिमान् परमभागवतान् स्मरामि ॥" स्मरामि याच्याऐवजीं 'नमामि' अथवा 'नतोऽस्मि' असेंहि म्हणतात. भागवत म्हणजे भगवद्भक्त. परमभागवत म्हणजे महाभागवत अर्थात् अत्यंत उत्तम कोटीचे भगवद्भक्त. त्यांच्या स्मरणानें केवळ पुण्यच लाभणार नाहीं तर अंतःकरणांत भक्तीचा अंकुर निर्माण होईल व मनाला आत्यंतिक समाधान मिळेल.

लक्ष्मीनृसिंह-चरणाब्ज-मधुव्रतेन
स्तोत्रं कृतं शुभकरं भुवि शंकरेण ।

ये तत्पठन्ति मनुजा हरिभक्तियुक्ता-
स्ते यान्ति तत्पद-सरोजमखण्डरूपम् ॥ १७ ॥

श्रीलक्ष्मीनृसिंहाच्या चरणकमलांतील मकरंद सेवन करणें हेंच ज्यानें व्रत धारण केलेलें आहे अर्थात् श्रीलक्ष्मीनृसिंहाच्या चरणकमलीं रमलेला भ्रमरच असा जो मी शंकर (श्रीशंकराचार्य) त्या मी हें स्तोत्र या भूलोकांत सर्वांच्या कल्याणाकरितां केलेलें आहे. तें शुभकर म्हणजे कल्याणकारक आहे. जे कोणी मानव भक्तियुक्त अन्तःकरणानें या स्तोत्राचें पठण करतील त्यांच्या अंतःकरणांत उत्तरोत्तर भक्तीचा उत्कर्ष होईल. तें हरिभक्तीनें युक्त होऊन श्रीहरीच्या कृपेनें अखंड अनंत आणि सच्चिदानंदघन अशा श्रीहरीच्या चरण कमलाला प्राप्त होतील. अर्थात् त्यांच्या सर्व दुःखांचा परिहार होऊन त्यांचें जीवन आनंदमय होईल. याप्रमाणें हें स्तोत्र येथें पूर्ण झालें आहे.

या ठिकाणीं जिज्ञासू जनांनीं एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. या स्तोत्राला 'संकष्टनाशन श्रीलक्ष्मीनृसिंह स्तोत्र' असेंहि म्हणतात. या स्तोत्राच्या पाठानें सर्व संकटें दूर होतात. सर्व प्रकारच्या पीडा आणि बाधा यांचा परिहार होतो. इष्ट मनोरथ सफल होतात. निष्कामबुद्धीनें केवळ परमेश्वरप्रीत्यर्थ पाठ करावयाचा झाल्यास तो यथासुख सरळ पाठ करावा. पण इष्ट कामना पूर्ण होण्याच्या दृष्टीनें पाठ करावयाचा झाल्यास त्याची एक विशिष्ट पद्धति आहे. त्या पद्धतीनें या स्तोत्राचा पाठ केल्यास लवकर सिद्धि मिळते. ही पद्धति अवश्य लक्षांत ठेवावी. हें अनुष्ठान सूर्योदयाच्या आंतच करावयाचें असतें. पहाटेंच उठावें. शौच मुखमार्जन आणि स्नानसंध्या उरकल्यानंतर त्याच शुचिर्भूत आसनावर बसून पुन्हां आचमन करावें. देशकाल-संकीर्तन व सप्रवर गोत्रोच्चार करावा. स्वतःचें नांव घेऊन इष्टसंकल्प करावा. श्रीगणपतीचें स्मरण आणि वंदन करावें. नंतर इष्टदेवता श्रीलक्ष्मीनृसिंह यांचें चिंतन करून मानसोपचार पूजा करावी. नमस्कार करून स्तोत्रपाठ करावा. आरंभापासून सोळा श्लोकांपर्यंत स्तोत्र सरळ म्हणत जावें. नंतर पुन्हां सोळावा श्लोक म्हणून उलट्या क्रमानें पंधरावा चौदावा असे श्लोक म्हणत पहिल्या श्लोकापर्यंत यावें. पहिला श्लोक म्हणून झाल्यानंतर मग शेवटचा सतरावा श्लोक म्हणावा. याप्रमाणें या स्तोत्राचा एक पाठ पूर्ण झाला असें समजावें. एकच पाठ करण्याची पद्धति आहे. पाठ मध्यमस्वरानें स्पष्ट व सावकाश करावा. पाठ करतांना उत्तम उदबत्ती

लावलेली असावी. शक्य असल्यास नीरांजन दीपहि लावावा. पाठ म्हणून झाल्यानंतर " अनेन श्रीलक्ष्मीनृसिंहस्तोत्रपाठाख्येन कर्मणा भगवान् श्रीलक्ष्मीनृसिंहः प्रीयतां न मम " असें म्हणून संध्येचें पळीभर पाणी सोडावें. याला पाठनिवेदन किंवा समर्पण असें म्हणतात. ही पाठपद्धति मंत्रशास्त्रज्ञ प्रो. रा. दा. करमरकर यांनीं गुरूपदिष्ट म्हणून निर्दिष्ट केलेली आहे. या पद्धतीनें पाठ केल्यास भूतप्रेतपिशाचबाधा, करणीदोष, वास्तुदोष, रोगपीडा, दृष्ट लागणें व व्यावहारिक अडीअडचणी या सर्वांचें निरसन होतें. असा अनेकांचा अनुभव आहे. लहान मुलांनाहि हें स्तोत्र अवश्य शिकवावें. कांहीं पुस्तकांतून या स्तोत्राचे तेराच श्लोक आढळतात. श्रीरंगम् येथील वाणीविलास मुद्रणालयांत छापलेल्या शृंगेरीमठानुसारी शांकर ग्रंथावलींत आम्हाला या स्तोत्राचे १७ श्लोक दिसले ते सर्व आम्हीं येथें दिलेले आहेत. याच स्तोत्रपाठाच्या पद्धतीनें कालभैरवाच्या स्तोत्राचाहि पाठ करण्याचा प्रघात आहे. मात्र कालभैरव स्तोत्रांतील श्लोक उलट्या क्रमानें म्हणावयाचें नाहींत. सरळ क्रमानेंच त्या स्तोत्रांतील श्लोक म्हणावयाचें असतात. हें स्तोत्र सु. स्तो. सं. भाग १, पृ. ४१ वर आम्ही दिलेलें आहे. हेंहि स्तोत्र अत्यंत प्रभावी असून त्याची फलश्रुति देखील वर वर्णन केल्याप्रमाणेंच आहे. वाचकांनीं त्याचाहि लाभ अवश्य घ्यावा.

■ ■ ■

लक्ष्मीनृसिंहपञ्चरत्नम् ।

[समर्थांनी आपल्या मनाला बोध केला तो मनोबोध म्हणून प्रसिद्धच आहे. शुकसनकादिकांप्रमाणें ज्यांचें ज्ञान आणि वैराग्य स्वतःसिद्ध असून भक्तीच्या क्षेत्रांतहि ज्यांचा अधिकार असाधारण, त्यांना वास्तविक आपल्या मनाला बोध करण्याची काय आवश्यकता आहे ? तथापि, " सांगावें तें आपणाला आपणु करितां बरें " हाच ज्यांचा दंडक ते दुसऱ्याला उपदेश कसा करतील ? दुसऱ्यांनीं त्यांच्या शब्दांतून उपदेश घ्यावयाचा असतो. आचार्यांनीहि या स्तोत्रांत हीच रीत अवलंबिली आहे. वस्तुतः आचार्यांना स्वतःच्या मनाला उपदेश करण्याची आवश्यकता नाहीं. तथापि आचार्यांनी या स्तोत्रांत आपल्या मनाला वैराग्याचा,

तत्त्वज्ञानाचा व श्रीनरहरीच्या भक्तीचा फारच उत्तम उपदेश केलेला आहे. असाच उपदेश नित्य आपण आपल्या मनाला करावयास पाहिजे. पांचच श्लोकांचें हें स्तोत्र आहे; पण हे पांच श्लोक रत्नासारखे बहुमोलाचे आहेत. म्हणून या स्तोत्राला 'लक्ष्मीनृसिंहपञ्चरत्न' असेंच नांव दिलेलें आहे. हें स्तोत्र म्हणावयास फार सुंदर आहे. घुमाळी तालाच्या ठेक्यांत तें म्हणतांना कानाला फार गोड लागतें व मनालाहि प्रिय वाटतें. सर्व श्लोकांचा उत्तरार्ध सारखाच आहे. त्यामुळें हें स्त्रोत्र पाठ करावयास अगदीं सोपें आहे. ओज, प्रसाद आणि माधुर्य या गुणांनीं संपन्न असलेल्या काव्यमय शब्दांतून तत्त्वज्ञानांतील गूढ सिद्धान्त मनाला सहजच पटतील अशा थाटांत मांडलेले आहेत. नरहरि-पूजेची उपयुक्तता, जीवात्मा आणि परमात्मा यांचा बिम्बप्रतिबिम्बभाव, संसाराचें स्वरूप, विषयसुखाचे परिणाम, विविध नामरूपानें प्रतीतीला येणाऱ्या विश्वाचें स्वप्नतुल्य मिथ्यात्व आणि ते मिथ्यात्व मनाला पटल्यानंतर भ्रमाचें अधिष्ठान म्हणून शिल्लक रहाणाऱ्या एकजिनसी सद्घन आणि आनंदघन असलेल्या चैतन्यतत्त्वाचें सत्यत्व हे सर्व विषय या स्तोत्रांत अगदीं गोड शब्दांनीं मनांवर ठसविलेले आहेत. आचार्यांनीं मनाला भ्रमर कल्पून केलेला हा उपदेश फारच सुंदर आहे.]

त्वत्प्रभुजीव-प्रियमिच्छसि चेन्नरहरि-पूजां कुरु सततं
प्रतिबिम्बालंकृति-धृति-कुशलो बिम्बालंकृतिमातनुते ।
चेतोभृङ्ग भ्रमसि वृथा भवमरुभूमौ विरसायां
भज भज लक्ष्मीनरसिंहानघ-पद-सरसिज-मकरन्दम् ॥ १ ॥

पुष्परसाच्या लोभानें भ्रमर जसा गुंजारव करीत फुलांच्या भोंवतालीं घिरट्या घालीत असतो, त्याप्रमाणें आपलें मनहि सुखाच्या लोभानें विषयांच्या भोंवतालीं सतत घिरट्या घालीत असतें. हा मनाचा स्वभाव लक्षांत घेऊन आचार्यांनीं मनालाच भ्रमर कल्पिलें आहे व या स्तोत्रांत उपदेश केला आहे. आचार्य श्रीलक्ष्मी-नरसिंहाचें स्तवन करीत करीत मनाला विनंती करीत आहेत कीं, हे माझ्या मना! मनोरूपी भ्रमरा! या नीरस असलेल्या संसाररूपी मरुप्रदेशांत कां बरें इकडून तिकडे आणि तिकडून इकडे व्यर्थ परिभ्रमण करीत आहेस? मरुप्रदेश म्हणजे मारवाड देश. हा जसा रूक्ष आणि शुष्क असतो. तेथें कांहीं आस्वाद घ्यावयास मिळत नाहीं.

त्याचप्रमाणें हा संसार देखील अत्यंत रूक्ष आणि नीरस आहे. तेथेंहि रमण्यासारखें व आस्वाद घेण्यासारखें कांहीं नाहीं. मग कां वरें संसारांत व्यर्थ भटकत आहेस ? ही संसाररूपी मरुभूमि अत्यंत विरस आहे. येथें तुला कांहीं लाभ होणार नाहीं. तुला खऱ्या सुखाचा आस्वाद घ्यावयाचा असेल तर मी सांगतों तें ऐक. भगवान् श्रीलक्ष्मीनृसिंह यांच्या शुद्ध आणि निर्मल चरणारविंदाच्या मकरंदाचा आस्वाद घे. श्रीलक्ष्मीनरसिंहाच्या चरणकमलांची सेवा कर. श्रीलक्ष्मीनरसिंहाला भज. पुन्हां पुन्हां मी तुला सांगतों ऐक. श्रीलक्ष्मीनृसिंहाच्या कृपेनेंच तुला खरें समाधान लाभेल. तूं सुखी होशील.

हे मना ! श्रीलक्ष्मीनृसिंहाच्या उपासनेनें तूं तर सुखी होशीलच पण तुझा प्रभु जो जीव म्हणजे जीवात्मा त्यालाहि पूर्ण सुख व्हावें, संतोष व्हावा अशी इच्छा असेल तर तूं जीवाच्या समाधानासाठीं देखील सतत श्रीनरहरीची पूजा कर. पूजा शब्दाचा अर्थ उपासना व अनन्यप्रेमानें केला जाणारा आदर व सत्कार असाहि आहे. इष्टदेवतेचें भक्तिपूर्वक स्मरण करणें हीहि पण पूजाच होय. मन लावून केलेली श्रीलक्ष्मीनृसिंहाची उपासना अंतःकरणाला निश्चित समाधान देईल. श्रीलक्ष्मीनृसिंहाच्या उपासनेनें जीव पूर्ण सुखी होईल.

भगवान् श्रीलक्ष्मीनरसिंह हे परिपूर्ण परब्रह्मस्वरूप असल्यामुळें त्यांचेंच अंतःकरणांत पडलेलें प्रतिबिंब म्हणजे हा जीव होय. अंतःकरणांत पडलेल्या चैतन्याच्या प्रतिबिंबालाच जीव असें म्हणतात. अंतःकरण हा जीवाचा उपाधि. उपाधि शब्दाचा अर्थ कारण असा आहे. शुद्ध चैतन्याला जीवभाव प्राप्त करून देण्याला अंतःकरण हेंच कारण आहे. बिंबाला प्रतिबिंबत्व आरशामुळेंच येत असतें. उपाधीचा निरास झाला कीं प्रतिबिंबाचें प्रतिबिंबत्व मावळतें. प्रतिबिंब हें बिंबरूप होऊन जातें. हीच जीवाची खरी समाधानाची अवस्था होय. तथापि, आपलें प्रतिबिंबहि नीटनेटकें दिसावें याची आपण खबरदारी घेतच असतों. फोटो काढतांना आपण आपल्या देहाला नटवीत असतों. नीट-नेटके करीत असतों. ही गोष्ट प्रसिद्धच आहे. प्रतिबिंबाला नटवावयाचें असेल, प्रतिबिंबाच्या ठिकाणीं उत्तमोत्तम अलंकार घालावयाचे असतील तर 'कुशल' म्हणजे चतुर शहाणा मनुष्य बिंबालाच नटवीत असतो. बिंबाच्याच ठिकाणीं उत्तमोत्तम अलंकार घालीत असतो. बिंबाला जसें नटवावें,

अलंकृत करावें तसेंच प्रतिबिंब नटलेलें अलंकृत झालेलें दिसतें. प्रकृतस्थलीं भगवान् श्रीलक्ष्मीनरसिंह हे बिंबस्वरूप आहेत. त्यांचें जितकें शुद्ध, निर्मल व निरुपाधिक स्वरूप पहातां येईल तितकेंच जीवात्म्याचेंहि शुद्ध, निर्मल व निरुपाधिक स्वरूप आपल्या प्रचीतीला येईल. ध्याता जसेंजसें ध्येयस्वरूपाचें ध्यान करीत राहील तसातसा तो ध्येयस्वरूपाशीं एकरूप होईल. ध्येयतत्त्व हें तत्त्वतः शुद्धसच्चिदानंदस्वरूप असल्यामुळें अनन्य ध्यानानें ध्यान करणाऱ्यालाहि आपण शुद्धसच्चिदानंद स्वरूप आहोंत अशी प्रचीति येते. "ब्रह्मैवाहमस्मि अहं ब्रह्मैवास्मि हंसः सोऽहं शिवोऽहम्" असा स्वतःचा अनुभव ध्याता व्यक्त करूं लागतो. याच अभिप्रायानें आचार्य म्हणतात बा मना! तुला जर सुखी व्हावयाचें असेल आणि जीवाला जर सुखी करावयाचें असेल तर श्रीलक्ष्मीनृसिंहाची सतत पूजा कर. श्रीलक्ष्मीनृसिंहाला भज. श्रीलक्ष्मीनृसिंहाला संतुष्ट कर. त्याच्याच संतोषानें त्याच्या यथार्थ स्वरूपाचें तुला ज्ञान होईल व तूं सुखी होशील.

शुक्तौ रजत-प्रतिभा जाता कटकाद्यर्थ-समर्था चेद्-
दुःखमयी ते संसृतिरेषा निर्वृतिदाने निपुणा स्यात् ।
चेतोभृङ्ग भ्रमसि वृथा भवमरुभूमौ विरसायां
भज भज लक्ष्मीनरसिंहानघ-पद-सरसिज-मकरन्दम् ॥२॥

हे मना! तूं म्हणशील कीं, मला या संसारांत सुख होईल. मी या संसारांत सुखी राहीन. तर ती तुझी कल्पना पूर्णपणें चुकीची आहे. संसार स्वतःच स्वरूपतां दुःखमय आहे. दुःख देणें हा संसाराचा स्वभावच आहे. अशा स्थितींत हा संसार आनंद देण्यांत कसा निपुण असूं शकेल? क्वचित्प्रसंगीं संसारांत आनंद प्रतीतीला येत असला, तरी तो आनंद खरा आनंद नसून तो केवळ आनंदाचा आभास होय. तत्त्वतः पाहूं गेलें असतां सांसारिक विषयच जेथें स्वप्नतुल्य आभासमय आहेत तेथें त्या विषयांपासून होणारा आनंद हा तात्त्विक व सत्यस्वरूपाचा कसा असूं शकेल? जें आडांतच नाहीं तें पोहऱ्यांत कोठून येणार? तात्पर्य, या दुःखमय संसारापासून खरा आनंद कसा मिळूं शकेल?

अरे बाबा! नदीच्या वाळवंटांत पडलेले शिंपले उन्हाच्या वेळीं दुरून रुपयासारखे दिसतात. पण ते रुपये बाजारांत सोनें खरेदी करण्यास उपयोगी

पंडित नाहींत. रुपये म्हणून भासलेले शिंपले जर सोनें मिळवून देण्यास समर्थ होतील तर हा दुःखमय संसारहि तुला आनंद देण्यास समर्थ होईल. तात्पर्य, रुपया म्हणून भासलेला शिंपला जसा बाजारांत उपयोगाला येत नाहीं, मृगजळ हें जसें तहान भागवूं शकत नाहीं किंवा आकाशाची चौवडी कधीं करतां येत नाहीं, त्याचप्रमाणें अज्ञानमूलक आणि म्हणूनच दुःखमय असलेल्या अशा या संसारापासूनहि कोणालाहि नित्य नि निरतिशय अशा आनंदाचा लाभ होणें शक्य नाहीं.

हे चित्तरूपी भ्रमरा! या नीरस असलेल्या संसाररूपी मरुभूमीवर तूं व्यर्थ भटकत आहेस. तुला सुखी व्हावयाचें असेल, तर तूं श्रीलक्ष्मीनरसिंहाच्या निर्मल पदकमलांतील मकरंदाचें सेवन कर. श्रीलक्ष्मीनरसिंहाला भज. तोच तुला सुखी करील.

आकृति-साम्याच्छाल्मलि-कुसुमे स्थल-नलिनत्व-भ्रममकरोः
गन्धरसाविह किमु विद्येते विफलं भ्राम्यसि भृशविरसेऽस्मिन् ।
चेतोभृङ्ग भ्रमसि वृथा भवमरुभूमौ विरसायां
भज भज लक्ष्मीनरसिंहानव-पद-सरसिज-मकरन्दम् ॥ ३ ॥

हे चित्तरूपी भ्रमरा! शाल्मलिवृक्षाचीं फुलें तांबडीं आणि टपोरीं दिसतात. दुरून पहातांना स्थलकमलांचा भ्रम होतो. पण स्थलकमलांचा गंध आणि रस त्यांत कोठून असणार? तीं फुलें नीरस असतात व त्यांना वासहि येत नाहीं. केवळ आकृतिसाम्यामुळें अर्थात् शाल्मलि वृक्षाचें फूल दिसण्यांत स्थलकमलाच्या आकारासारखें दिसत असल्यामुळें तुला या शाल्मलि वृक्षाच्या फुलाच्या ठिकाणीं स्थलकमलाचा भ्रम झालेला आहे. पण या फुलांत स्थलकमलाप्रमाणें गंध आणि रस आहेत काय? नाहींत. अत्यंत विरस असलेल्या या फुलांच्या ठिकाणीं अर्थात् या फुलांच्या भोंवतालीं " विफलं भ्राम्यसि " उगीच निरर्थक गिरट्या घालीत आहेस. हे चित्तरूपी भ्रमरा! ज्या प्रमाणें भ्रमराला शाल्मलि वृक्षाच्या फुलांत गंध आणि रस मिळत नाहींत त्याच-प्रमाणें या नीरस असलेल्या संसाररूपी मरुभूमीमध्येंहि तुला सुख मिळणार नाहीं. सुखाच्या आशेनें या संसारांत तूं व्यर्थच भटकत आहेस. हे मना! नित्य आणि निरतिशय सुख पाहिजे असेल तर तूं श्रीलक्ष्मीनरसिंहाच्या 'अनघ' म्हणजे

निर्मल अथवा सर्व पाप हरण करण्याला समर्थ असलेल्या 'पदसरसिज' म्हणजे चरणकमलांच्या मकरंदाचें सेवन कर. पुष्परसाला मकरंद असें म्हणातात. प्रकृतस्थलीं सच्चिदानंद हाच श्रीलक्ष्मीनरसिंहाच्या चरणकमलाचा मकरंद होय. या मकरंदाच्या प्राप्तीकरितां वा मना ! तूं लक्ष्मीसहित श्रीनरहरीला भज. तो तुला पूर्ण सुखी करील.

वस्तुस्थिति अशी कीं, आनंद हा परब्रह्मस्वरूप असल्यामुळें परब्रह्माप्रमाणें तोहि एकरूपच आहे. पण परब्रह्म जसें उपाधिभेदानें विविध जीवांच्या रूपानें नटतें अथवा देहभेदानें भिन्न भिन्न रूपानें प्रतीतीला येतें त्याचप्रमाणें एकच आनंद पण तो विषयभेदानें अनेकविध बनतो व भिन्न भिन्न इंद्रियांच्याद्वारां भिन्न भिन्न रूपानें प्रतीतीला येतो. अंतःकरणें किंवा देह हे जीवांचें उपाधि आहेत तर भिन्न भिन्न विषय हे विषयानंदाचे उपाधि आहेत. वस्तु एकरूप असून ती ज्या कारणामुळें अनेकरूप बनतें किंवा अनेक रूपानें प्रतीतीला येतें त्या कारणाला उपाधि असें म्हणतात. जीवात्मा हे परब्रह्माचें सोपाधिक स्वरूप आहे तर विषयानंद हा ब्रह्मानंदाचें सोपाधिक स्वरूप आहे. उपाधिमुळें परिच्छिन्नता येते व परिच्छेदामुळें अल्पता आणि अल्पतेमुळें अतृप्ति किंवा भय, दुःख, शोक हे निर्माण होत रहातात. "भयं वै द्वितीयाद्भवति", "यो वै भूमा तत्सुखं नाल्पे सुखमस्ति त्रेधाविभेदिनि" इत्यादि उपनिषद्वचनें याच तत्त्वाचीं द्योतक आहेत. विद्वान् लोक विवेकानें उपाधीचें निरसन करतात व शुद्ध परब्रह्माच्या स्वरूपाचा साक्षात्कार करून घेऊन निरुपाधिक अशा विषयातीत आनंदाचा अर्थात् नित्य निरतिशय आनंदाचा अनुभव घेतात. या आनंदांतच खरें समाधान आहे हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. हा विवेक किंवा ही बुद्धीची पात्रता श्रीलक्ष्मीनृसिंहाच्याच कृपेनें प्राप्त होत असते. याच अभिप्रायानें आचार्य वारंवार मनाला श्रीलक्ष्मीनृसिंहाच्या चरणकमलाचा आश्रय घेण्याचा आग्रह करीत आहेत. "भज भज" ही क्रियापदाची द्विरुक्ति आचार्याच्या अन्तःकरणांतील कळकळीची द्योतक आहे.

स्रक्चन्दन-वनितादीन्विषयान्सुखदान्मत्वा तत्र विहरसे
गन्धफली-सदृशा ननु तेऽमी भोगानन्तरदुःस्वकृतः स्युः ।
चेतोभृङ्ग भ्रमसि वृथा भवमरुभूमौ विरसायां
भज भज लक्ष्मीनरसिंहानघ-पद-सरसिज-मकरन्दम् ॥४॥

सुगंधी फुलांच्या माळा, केशर, कस्तुरी, कापूर इत्यादि सुवासिक द्रव्यांनीं मिश्रित असलेलें सुगंधी चंदन आणि अप्सरेप्रमाणें सुंदर कांता इत्यादि विषयांना, ते सुखदायक आहेत असें समजून हे मना ! तूं त्या विषयामध्यें विहरत आहेस. पण हे मना ! ते हे सर्व विषय सोनचाफ्याच्या कळीप्रमाणें किंवा फुलाप्रमाणें खरोखर शेवटीं भोगानंतर तुला दुःखकारक होतील. तुला त्याची कल्पना नाहीं. नीट विचार कर. मी सांगतों तें ऐक.

प्रस्तुत स्थलीं गंधफली शब्दाचा अर्थ सोनचाफ्याची कळी किंवा सोनचाफ्याचें फूल असा आहे. गंधफली म्हणजे चम्पक. धन्वनंतरीय निघंटुकार चाफ्याचे पर्याय देतांना " चाम्पेयो हेमपुष्पश्च काञ्चनः षट्पदातिथिः " असे पर्याय देत आहेत. समान अर्थाच्या वाचक 'शब्दाला' पर्याय असें म्हणतात. वर दिलेलीं हीं चाफ्याचीं नांवें आहेत. चंपापुरीच्या सभोंवारच्या प्रदेशांत जन्माला येतो म्हणून त्याला चाम्पेय असें म्हणतात. त्याचीं फुलें सोन्यासारखीं दिसत असल्यामुळें त्याला हेमपुष्प आणि काञ्चन असेंहि म्हणतात. तो सुगंधी असल्यामुळें त्याच्या गंधानें आकृष्ट होऊन षट्पद अर्थात् भ्रमर हे अतिथीप्रमाणें त्याच्याकडे धांव घेतात, या अभिप्रायानें त्याला 'षट्पदातिथि' असें म्हटलें आहे. पण भ्रमर हे अतिथीप्रमाणें चाफ्याकडे धांव घेत असले तरी शेवटीं चाफा हा भ्रमरांचा घात करतो, असेंच म्हणावें लागतें. कारण चाफ्याच्या फुलाचें विशेष वर्णन करतांना " चम्पक-प्रसवमिष्टसुगन्धं भूसुरामर-मही-पति-योग्यम् । वातपित्त-शमनं च सुगन्धि स्वर्णवर्णमपि षट्पदघाति ॥ " चाफ्याचें फूल हें मोठें प्रिय वाटतें. तें सुगंधी असतें. देव, ब्राह्मण आणि राजे लोक यांना तें अर्पण करण्याला योग्य आहे. तें वात आणि पित्त यांचें शमन करतें. त्याचा गंध फारच उत्तम असतो. तें सोन्यासारखें सुंदर दिसतें. हे सर्व गुण त्याच्या ठिकाणीं असले तरी ते षट्पदांचा म्हणजे भ्रमरांचा मात्र घात करतें म्हणून त्याला "षट्पदघाति" असें म्हटलें आहे. राजनिघंटुकारांनीं देखील चाफ्याचें वर्णन करतांना " सुभगो भृङ्गमोही च शीतलो भ्रमरातिथिः " असें म्हटलेलें आहे. यांतहि भ्रमर हे चाफ्याकडे अतिथीप्रमाणें धांव घेत असले तरी शेवटीं तो 'भृङ्गमोही' आहे. भ्रमरांना त्याच्या सेवनानें 'मोह' म्हणजे मूर्च्छा येते असेंच म्हटलेलें आहे. तात्पर्य गंधफली म्हणजे चाफ्याचें फूल किंवा चाफ्याची कळी. ही भ्रमरांना आपाततः आकर्षक वाटली तरी शेवटीं त्यांचा ती घात करते हें निश्चित.

"तस्य उत्कटमनोरमगन्धवत्त्वेऽपि भ्रमरस्तं न स्पृशति". उत्कट आणि मनोरम गंध असला तरी चाफ्याच्या फुलाला भ्रमर स्पर्श करीत नाहीं असें श्रीहर्षानें म्हटलेलें आहे. "स्पृशति परं स्पर्शसमनन्तरमेव म्रियते" भ्रमर चाफ्याच्या फुलाला स्पर्श करतो, पण तो लागलीच मरतो असें दंडीनेंहि म्हटलेलें आहे. या बाबतींत एक प्रसिद्ध सुभाषितहि विचार करण्यासारखें आहे "भ्रमन् वनान्ते नवमञ्जरीषु न षट्पदो गन्धफलीमजिघ्रत्। सा किं न रम्या? स च किं न रन्ता? बलीयसी केवलमीश्वरेच्छा!!" पुष्पवाटिकेंतील ताज्या मंजरीमध्यें – विकसित झालेल्या पुष्पांच्या समूहामध्यें इतस्ततः परिभ्रमण करणारा भ्रमर चाफ्याच्या फुलांचा मात्र आस्वाद घेत नाहीं. चंपक-कलिकेचें तो रसग्रहण करीत नाहीं. काय ती रमणीय नाहीं? कां हा रसग्रहण करण्याला अपात्र आहे? दोन्ही गोष्टी मान्य करतां येत नाहींत. "ईश्वरेच्छा बलीयसी" हेंच त्याचें उत्तर आहे. हिंदी भाषेंतील रामायणाचें ज्यांना वाल्मीकि म्हणतात ते संतमुकुटमणि श्रीगोस्वामी तुलसीदास देखील "चञ्चरीक जिमि चम्पकबागा" अशा शब्दांनीं भ्रमर हा चंपकवनाचा त्याग करीत असल्याचें सांगत आहेत. याच अभिप्रायानें प्रकृत स्थलीं आचार्य देखील आपल्या चित्तरूपी भ्रमराला अत्यंत मोहक वाटणाऱ्या विषयरूपी चंपकवनांतून परावृत्त होण्याचा उपदेश करीत आहेत.

हे माझ्या मनोरूपी भ्रमरा! या नीरस असलेल्या संसाररूपी मरुभूमीमध्यें व्यर्थच तूं भटकत आहेस. हा विषयांचा नाद सोडून दे आणि श्रीलक्ष्मीनरसिंहाच्या पावन पदकमलाचा मकरंद सेवन कर. नरहरीच्या चरणकमलांचा तूं आश्रय कर. त्यानेंच तूं पूर्ण सुखी होशील. संसारांतील विषयसुखें सेवन करतांना आरंभीं आरंभीं सुख वाटतें, पण शेवटीं दुःखेंच भोगावीं लागतात. असा सर्व संसारी जीवांचा अनुभव आहे. श्रीलक्ष्मीनरसिंहाच्या चरणीं अनन्यभावानें शरण जाणें हेंच एक खरें सुखाचें साधन आहे यांत संशय नाहीं.

तव हितमेकं वचनं वक्ष्ये शृणु सुखकामो यदि सततं
स्वप्ने दृष्टं सकलं हि मृषा जाग्रति च स्मर तदविरतं।
चेतो भृङ्ग भ्रमसि वृथा भवमरुभूमौ विरसायां
भज भज लक्ष्मीनरसिंहानघ-पद-सरसिज-मकरन्दम् ॥५॥

हे मना ! मी तुला अगदीं तुझ्या हिताची एक गोष्ट सांगणार आहे. तुला जर आपण सतत -- सदासर्वकाळ सुखी असावें अशी इच्छा असेल तर ऐक. स्वप्नांमध्यें आपण जें जें पाहिलेलें असतें तें सर्व खोटें असतें. स्वप्नामध्यें आपण आपल्याला सार्वभौम राजे आहोंत असें पहात असतों, ती विशाल राजधानी, तो प्रचंड राजेवाडा, तो भव्य नि थाटामाटाचा दरबार, ते भाटांचे स्तुतिपाठ, मांडलिकांकडून होणारे सत्कार आणि कमरेइतके वांकून केले जाणारे मुजरे, चतुरंगदल सैन्याकडून केली जाणारी मानवंदना, हत्ती, घोडे, विमानें, जहाजें, मोटारी इत्यादि लवाजमा, शत्रूंशीं होणाऱ्या लढाया, युद्धांत मिळणारे विजय, अष्टप्रधानांचें नम्रतापूर्वक वृत्तान्तनिवेदन, तो अंतःपुरांतील अप्सरातुल्य महाराण्यांचा परिवार ! तें थाटामाटाचें भोजन इत्यादि इत्यादि सर्व कांहीं स्वप्नांत आपण अनुभवीत असतों. आपल्यासारखे सुखी आपणच असा स्वप्नांत आपल्याला प्रत्यय येत असतो, पण वा मना ! जागें होऊन पाहिल्यानंतर यांतलें काय काय शिल्लक रहात असतें ? जागृत अवस्थेंत येऊन पाहिल्यानंतर स्वप्नांतील सर्व पदार्थ खोटे आहेत असाच आपल्याला अनुभव येत असतो. ज्याप्रमाणें स्वप्नांतील पदार्थ जागृतींत खोटे ठरतात त्याचप्रमाणें जागृत अवस्थेंत दिसणारें वैभव आणि अनुभवलीं जाणारीं सुखें हीं पारमार्थिक दृष्टीनें खोटींच ठरतात. ही गोष्ट लक्षांत घे.

यथा स्वप्ने द्वयाभासं स्पन्दते मायया मनः ।
तथा जाग्रद्द्वयाभासं स्पन्दते मायया मनः ॥

स्वप्नामध्यें ज्याप्रमाणें मनच विविधरूपानें नटून कीडत असतें त्याचप्रमाणें जागृत अवस्थेंत देखील विश्वप्रपंचाची घडामोड म्हणजे हा केवळ मनाचाच खेळ होय आणि याला कारण माया ! असें मांडूक्यकारिकेंत म्हटलें आहे. तात्पर्य, स्वप्नांतील कल्पित विषय हे जसे मानवाला सुखी करूं शकत नाहींत त्याचप्रमाणें जागृतींतील विषय देखील मनःकल्पितच असल्यामुळें मानवाला सुखी करूं शकत नाहींत. क्षणिक सुखानें कोण बरें सुखी होणार ?

हे चित्तरूपी भ्रमरा ! या नीरस असलेल्या संसाररूपी मरुभूमीमध्यें सुखाच्या आशेनें तूं व्यर्थ भटकत आहेस. तुला येथें खरें सुख मिळणार नाहीं. तुला जर खरें सुख पाहिजे असेल तर तूं लक्ष्मीकांत भगवान् श्रीनरहरि यांच्या निर्मल चरणकमलांच्या मकरंदाचें सेवन कर. श्रीलक्ष्मीनरसिंहाला भज. श्रीलक्ष्मीनरसिंहाची उपासना कर. श्रीनरसिंहाची उपासनाच तुला पूर्ण सुखी करील.

श्रीनृसिंहमन्त्रजपविधि

श्रीनृसिंहदेवतेच्या सर्व मंत्रांत एकाक्षर बीजमंत्र हा सर्व श्रेष्ठ आहे. याला मंत्रराज अशी संज्ञा आहे. "क्षकारो वह्निमारूढो मनुस्वरसमन्वितः। बिन्दुनादलसन्मूर्धा बीजं नरहरेर्मतम्" असें शारदातिलकामध्यें या बीजमंत्राचें स्वरूप सांगितलें आहे. क्ष् + र् + औ + म् या सर्वांचा समुचित उच्चार म्हणजेच "क्ष्रौम्" हें बीज तयार होतें. सर्व फलसमृद्धीचें मूळ जसें बीजांत असतें त्याचप्रमाणें इष्ट कामनांची सफलताहि मंत्रबीजांतच असते. याच दृष्टीनें प्रायः सर्व मंत्र हे सबीज असल्याचें दृष्टीस पडतात. केवळ बीज हाहि एक मंत्रच मानला जातो. कोणताहि मंत्र अधिकारी गुरूंच्या मुखांतूनच घेतला जावा असा शास्त्राचा संकेत आहे. त्याचें सहसा उल्लंघन करूं नये. मंत्राचा जप इष्टदेवतेच्या सांन्निध्यांत करावा लागतो. शांत, निवांत आणि एकान्त स्थळीं शुचिर्भूत पवित्र आसनावर बसावें. आपल्या हृदयांतच इष्टदेवतेच्या यंत्राचें चिंतन करून त्या यंत्राच्या मध्यभागीं आपली इष्टदेवता अधिष्ठित असल्याची भावना करावी. मंत्र हें देवतेचेंच स्वरूप असल्यामुळें यंत्रांत दिलेले मंत्र किंवा बीजाक्षर या रूपानें आपली इष्टदेवताच यंत्रांत आहे हें लक्षांत घ्यावें. पूर्वी सांगितल्याप्रमाणें आचमन प्राणायाम झाल्यानंतर देशकालसंकीर्तन करून संकल्प करावा. "मम आत्मनः सकलाभीष्टसिद्धिद्वारा श्रीलक्ष्मीनरसिंहदेवता-प्रीत्यर्थं श्रीनरसिंहैकाक्षरबीजमन्त्रजपाख्यं कर्म करिष्ये" असें म्हणून पाणी सोडावें. अस्य श्रीनृसिंहैकाक्षरमन्त्रस्य अत्रिर्ऋषिः गायत्रीच्छन्दः श्रीनृसिंहो देवता ममाभीष्टसिध्यर्थे जपे विनियोगः ॐ क्ष्रां अङ्गुष्ठाभ्यां नमः। ॐ क्ष्रीं तर्जनीभ्यां नमः ॐ क्ष्रूं मध्यमाभ्यां नमः। ॐ क्ष्रैं अनामिकाभ्यां नमः। ॐ क्ष्रौं कनिष्ठिकाभ्यां नमः। ॐ क्ष्रः करतलकरपृष्ठाभ्यां नमः। ॐ क्ष्रां हृदयाय नमः। ॐ क्ष्रीं शिरसे-स्वाहा। ॐ क्ष्रूं शिखायै वषट्। ॐ क्ष्रैं कवचाय हुम्। ॐ क्ष्रौं नेत्रत्रयाय वौषट्। ॐ क्ष्रः अस्त्राय फट्। ॐ अत्रिमहर्षये नमः शिरसि। ॐ गायत्रीच्छन्दसे नमः मुखे। ॐ श्रीनृसिंहदेवतायै नमः हृदये। ॐ अभीष्टसिद्ध्यर्थे जपे विनियोगाय नमः सर्वाङ्गेषु। अथ ध्यानम् —

माणिक्याद्रि-सम-प्रभं निजरुचा सन्त्रस्तरक्षोगणं
जानुन्यस्त-कराम्बुजं त्रिनयनं रत्नोल्लसद्भूषणम्।

बाहुभ्यां धृतशङ्खचक्रमनिशं दंष्ट्राग्रवक्त्रोल्लस-
ज्ज्वालाजिह्वमुदग्र-केशनिचयं वन्दे नृसिंहं विभुम् ॥

हा श्लोक म्हणावा अथवा मागील स्तोत्रांत दिलेला " एकेन चक्रमपरेण करेण शङ्खं " हा श्लोक म्हणून नमस्कार करावा. नंतर श्रीलक्ष्मीनरसिंहाय नमः ले पृथिव्यात्मकं गन्धं परिकल्पयामि इत्यादि पूर्वी सांगितलेल्या पद्धतीनें इष्टदेवतेची पंचमानसोपचार पूजा करावी. " मां माले महामाये " या मंत्रानें माळेचें प्रोक्षण करून माळेला नमस्कार करावा. नंतर प्रणवपूर्वक एकाक्षर बीजमंत्राचा जप करावा. जप पूर्ण झाल्यानंतर " त्वं माले सर्वदेवानाम् " हा मंत्र म्हणून माळा उजव्या हाताच्या तळहातांत घेऊन मस्तकावर ठेवावी. नमस्कार करून मंत्रजप इष्टदेवतेला समर्पण करावा. सर्व वाक्यरचना पूर्वी सांगितलेल्या पद्धतीप्रमाणेंच करावयाची आहे. फक्त इष्टदेवतेच्या नांवांत बदल करावा. आसनाखालची मृत्तिका अनामिकेनें ललाटीं लावून मग आसनावरून उठावें.

नृसिंहतापनीय उपनिषदामध्यें श्रीनृसिंहाचा बत्तीस अक्षरी मंत्र दिलेला आहे. हा मंत्र आम्ही नृसिंहयंत्राच्या षट्कोणामध्यें दिलेला आहे. तो अनुष्टुभ् वृत्ताच्या श्लोकासारखा असला, तरी तो उपनिषदांतील वेदमंत्र आहे. तो अधिकारी गुरूकडूनच ग्रहण करावा. त्याची अनुष्ठानपद्धति वर सांगितलेल्या पद्धतीप्रमाणेंच आहे.

अस्य श्रीनृसिंहमन्त्रस्य ब्रह्मा ऋषिः । अनुष्टुप्छन्दः । श्रीनृसिंहो देवता ममाभीष्टसिद्ध्यर्थे जपे विनियोगः । ॐ ब्रह्मर्षये नमः शिरसि । अनुष्टुप्छन्दसे नमो मुखे । श्रीनृसिंहदेवतायै नमो हृदये । अभीष्टसिद्ध्यर्थे जपे विनियोगाय नमः सर्वाङ्गेषु । इति ऋष्यादिन्यासः । ॐ उग्रवीरं अङ्गुष्ठाभ्यां नमः । ॐ महाविष्णुं तर्जनीभ्यां नमः । ॐ ज्वलन्तं सर्वतोमुखं मध्यमाभ्यां नमः । ॐ नृसिंहं भीषणं अनामिकाभ्यां नमः । ॐ भद्रं मृत्युमृत्युं कनिष्ठिकाभ्यां नमः । ॐ नमाम्यहं करतल-करपृष्ठाभ्यां नमः । इति करन्यासः । ॐ उग्रवीरं हृदयाय नमः । ॐ महाविष्णुं शिरसे स्वाहा । ॐ ज्वलन्तं सर्वतोमुखं शिखायै वषट् । ॐ नृसिंहं भीषणं कवचाय हुं । ॐ भद्रं मृत्युमृत्युं नेत्रत्रयाय वौषट् । ॐ नमाम्यहं अस्त्राय फट् । इति हृदयादिन्यासः । अथ ध्यानम् । " माणिक्याद्रिसमप्रभं " या श्लोकानें किंवा " एकेन चक्रमपरेण करेण शङ्खं " या श्लोकानें ध्यान करावें. पूर्वी सांगितलेल्या

पद्धतीने पंचमानसोपचार पूजा करून जप करावा. "उग्रवीरं महाविष्णुं ज्वलन्तं सर्वतोमुखम्। नृसिंहं भीषणं भद्रं मृत्युमृत्युं नमाम्यहम" हीं मंत्रांतील अक्षरें नीट लक्षांत घ्यावींत. मागें श्रीनृसिंहयंत्र दिलेलेंच आहे तें लक्षांत घ्यावें. कांहीं ठिकाणीं यंत्रांतील षट्कोणांत फक्त एकाक्षर बीजमंत्र लिहून अष्टदल-कमलांतील वरच्या दलापासून बत्तीस अक्षरी मंत्रांतील चार-चार अक्षरें क्रमशः उजवीकडून प्रत्येक दलांत लिहावींत असेंहि सांगितलेलें आहे. हा बत्तीस अक्षरी श्रीनरसिंहमंत्र फार महत्त्वाचा आहे. याहि मंत्राला "मन्त्रराजं सुरद्रुमम्" मंत्रराज असें म्हटलेलें असून हा भक्तांच्या कामना पूर्ण करण्याला कल्पद्रुमासारखा आहे असें शारदातिलककार त्याचें वर्णन करतात.

श्रीमद्भागवतामध्यें श्रीनरसिंहाचा एक मोठा उत्तम मंत्र दिलेला आहे. या मंत्राला अभयनृसिंहमंत्र असेंहि म्हणतात. ज्याच्याकरितां आदिपुरुष भगवान् महाविष्णु यांनीं नरसिंह अवतार धारण केला त्या भक्तवर प्रह्लादाचा तर हा मंत्र अत्यंत आवडता होता. याच मंत्रानें प्रह्लादानें श्रीनरहरीची उपासना केलेली आहे. याची अनुष्ठानपद्धति एकाक्षर बीजमंत्राप्रमाणेंच समजावी. "अस्य श्रीनृसिंह-मन्त्रस्य श्रीशुक ऋषिः जगतीच्छन्दः श्रीनृसिंहो देवता अभीष्टसिद्ध्यर्थे जपे विनियोगः। श्रीशुकमहर्षये नमः शिरसि। जगतीच्छन्दसे नमो मुखे। श्रीनृसिंह-देवतायै नमो हृदये। सकलाभीष्टसिद्ध्यर्थे जपे विनियोगाय नमः सर्वाङ्गेषु। एवढा फरक लक्षांत घ्यावा.

मंत्रमहोदधिकारांनीं श्रीलक्ष्मीनृसिंहाच्या ध्यानाचा एक उत्तम श्लोक दिलेला आहे. आम्ही तो येथें उद्धृत करून त्याचा अर्थहि खालीं देत आहोंत. श्रीलक्ष्मीनृसिंहाची उपासना करतांना अथ ध्यानंच्या पुढें पाहिजे तर हाच श्लोक म्हणून श्रीलक्ष्मीनृसिंहाचें ध्यान करावें.

क्षीराब्धौ वसुमुख्य-देवनिकरैरद्रादि-संवेष्टितः
शङ्खं चक्र-गदाम्बुजं निजकरैर्बिभ्रत्त्रिनेत्रः सितः।
सर्पाधीश-फणातपत्र-ललितः पीताम्बरालंकृतो
लक्ष्म्याश्लिष्ट-कलेवरो नरहरिः स्तान्नीलकण्ठो मुदे॥

लक्ष्मीसहवर्तमान भगवान् श्रीनरहरि हे क्षीरसमुद्रामधील श्वेतद्वीपामध्यें वास्तव्य करीत आहेत. वसुरुद्रादि देवतांचा समुदाय त्यांच्या भोंवतालीं विराज-

मान झालेला आहे. अग्रभाग, पार्श्वभाग, पृष्ठभाग अशा सर्व भागीं अनेक देव श्रीनरसिंहाच्या भोंवतीं विराजमान झालेले आहेत. पुढच्या बाजूला अष्टवसु आहेत. पाठीमागच्या बाजूस बारा आदित्य आहेत. उजव्या बाजूस अकरा रुद्र आहेत. डाव्या बाजूस विश्वदेव आहेत. खालच्या डाव्या हातांत शंख आणि उजव्या हातांत चक्र धारण केलेलें आहे. वरच्या डाव्या हातांत गदा आणि उजव्या हातांत कमल धारण केलेलें आहे. श्रीनरहरीची अंगकांति चंद्राप्रमाणें शुभ्र आणि आह्लादायक असून त्यांना तीन नेत्र आहेत. त्यांच्या मस्तकावर सर्पराज वासुकीनें आपल्या फणांचें छत्र धारण केलेलें असल्यामुळें ते फार सुंदर शोभत आहेत. त्यांनीं पीतवस्त्र परिधान केलेलें आहे. वामाङ्कीं श्रीलक्ष्मीदेवी विराजमान झालेली आहे. त्यांचा कंठ मोराप्रमाणें नीलवर्ण आहे. असे हे भगवान् श्रीनरहरि आम्हांला आनंद देवोत.

श्रीमद्भागवतांतील श्रीनृसिंहमन्त्र :

ॐ नमो भगवते नरसिंहाय नमस्तेजस्तेजसे आविरावि र्भव वज्रनख वज्रदंष्ट्र कर्माशयान् रन्धय रन्धय तमो ग्रस ग्रस ॐ स्वाहा। अभयमभयमात्मनि भूयिष्ठा ॐ क्ष्रौम्।

■ ■ ■

द्वादशज्योतिर्लिङ्गस्तोत्रम्।

भारतामध्यें असंख्य शिवलिंगें आहेत. त्यांत द्वादश ज्योतिर्लिंगांचा महिमा कांहीं निराळाच आहे. या ठिकाणीं भक्तजनांना ज्योतीच्या रूपानें प्रकट होऊन महादेवानें दर्शन दिलेलें असल्यामुळें आणि ज्योत ही नेहमी पिंडिकाकार असल्यामुळें ज्योतीरूप पिंडिका हेंच महादेवाचें लिंग म्हणजे लक्षण ठरलें. लिङ्गं, लक्षणं, चिह्नं, आकृतिः हे सर्व पर्यायवाचक शब्द आहेत. हाच अभिप्राय लक्षांत घेऊन लिंग शब्दाचा अर्थ 'शिवमूर्तिविशेष' असा मेदिनीकारांनीं केलेला आहे. अशीं लिंगें भारतामध्यें प्रामुख्यानें बारा आहेत. त्यांच्या स्मरणाचा, दर्शनाचा व पूजनाचा विशेष महिमा आहे. दर्शनाचा व पूजनाचा योग नाहीं आला तरी निदान त्यांचें स्मरण तरी घडावें. आचार्यांचें हें स्तोत्र या दृष्टीनें अत्यंत महत्वाचें आहे.

शिवपुराणामध्यें स्थाननिर्देशपूर्वक व नामनिर्देशपूर्वक या ज्योतिर्लिंगांचा उल्लेख आलेला आहे तो असा :

सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम् ।
उज्जयिन्यां महाकालमोङ्कारे परमेश्वरम् ॥ १ ॥
केदारं हिमवत्पृष्ठे डाकिन्यां भीमशंकरम् ।
वाराणस्यां च विश्वेशं त्र्यम्बकं गौतमीतटे ॥ २ ॥
वैद्यनाथं चिताभूमौ नागेशं दारुकावने ।
सेतुबन्धे च रामेशं घुश्मेशं च शिवालये ॥ ३ ॥
द्वादशैतानि नामानि प्रातरुत्थाय यः पठेत् ।
सप्तजन्मकृतं पापं स्मरणेन विनश्यति ॥ ४ ॥

रामायण, महाभारत, स्कन्दपुराण इत्यादि अनेक ग्रंथातून ज्योतिर्लिंगांचा महिमा वर्णन केलेला दृष्टीस पडतो. सौराष्ट्र प्रदेशांत प्रभासपट्टणक्षेत्र प्रसिद्धच आहे. क्षयरोगानें ग्रस्त झालेल्या चंद्रानें येथें शंकराची आराधना केली. शंकर प्रसन्न झाले. क्षयरोगानें चंद्राचा नाशच व्हावयाचा. पण शंकरानें चंद्राला वांचविलें. कृष्णपक्षांत एका-एका कलेनें तुम्ही क्षीण झाला तरी शुक्लपक्षांत पुन्हां कलेकलेनें तुमची वाढ होऊन तुम्ही पूर्णिमेच्या दिवशीं सर्व कलांनीं पूर्ण व्हाल असा वर दिला आणि चंद्राला अमर बनविलें. सर्व विश्वाला चंद्रमंडलांतील अमृताचा लाभ होऊं लागला. देव संतुष्ट झाले. सर्वांनीं शंकराची स्तुति केली. सर्वांच्या प्रार्थनेवरून भगवान् शंकर पार्वतीसह या क्षेत्रांत ज्योतिर्लिंगाच्या रूपानें विराजमान झाले. तेच हे सोमनाथ होत. सोम म्हणजे चंद्र आणि नाथ म्हणजे रक्षण करणारा स्वामी. म्हणून यांना सोमनाथ हे नांव पडलें.

भारताच्या दक्षिणेस आंध्र प्रदेशांत कृष्णाकांठीं श्रीशैल पर्वत प्रसिद्धच आहे. यालाच क्रौंच पर्वत असेंहि म्हणतात. श्रीकार्तिकस्वामी आणि श्रीगणपति हे लग्नाला योग्य झाले होते. त्यांनीं आपल्या मनांतला विचार मातापिता श्रीपार्वती-परमेश्वर यांना बोलून दाखविला. ते म्हणाले, जो कोणी पृथ्वीप्रदक्षिणा अगोदर करून येईल त्याचें लग्न आधि करूं. कार्तिकस्वामींनीं पृथ्वीप्रदक्षिणेसाठीं धूम ठोकली. गणपतिबाप्पा पडले तुंदिलतनु आणि लंबोदर ! पण मोठे बुद्धिमान् होते. त्यांनीं लागलीच आईवडिलांना प्रदक्षिणा घालून साष्टांग नमस्कार केला.

म्हणाले, मातापित्यांना प्रदक्षिणा घालून जो आदरपूर्वक नमस्कार करतो त्याला पृथ्वीप्रदक्षिणेचें श्रेय मिळतें असें शास्त्रवचन आहे. माझी पृथ्वीप्रदक्षिणा झाली. शास्त्रवचन खोटें आहे असें तरी म्हणा नाहीं तर माझी पृथ्वीप्रदक्षिणा मान्य करून माझें लग्न करून द्या.

विश्वरूप प्रजापतीच्या सिद्धि आणि बुद्धि या दोन कन्या उपवर झाल्या होत्या. त्यांच्याशीं गणपतीचा विवाह झाला. सिद्धीपासून क्षेम आणि बुद्धीपासून लाभ असे दोन पुत्रहि त्यांना झाले. कार्तिकस्वामी पृथ्वीप्रदक्षिणा आटोपून परतले होते. नारदाकडून त्यांना वार्तेतच ही वार्ता समजली. ते रुसले व क्रौंच पर्वतावर जाऊन बसले. त्यांची समजूत घालण्याकरितां भगवान् शंकर पार्वतीसह ज्योतिर्लिंगाच्या रूपानें तेथें प्रकट झाले. तेच हे श्रीमल्लिकार्जुन होत.

असेंहि सांगतात कीं, या पर्वताजवळ चंद्रगुप्त राजाची राजधानी होती. एकदां एका विशिष्ट संकटांतून मुक्त होण्याकरितां राजकन्या राजमहालांतून गुप्तपणें निघाली व या पर्वतावर येऊन राहिली. गोपकन्येच्या वेषांत कंद व फळें-मुळें खाऊन आणि दूध पिऊन ती शंकराची आराधना करूं लागली. तिच्याजवळ एक कपिला गाय होती. कोणी तरी तिचें दूध चोरीत असावें असा तिला संशय आला. चोराला पकडण्याकरितां रात्रौ तिनें गुपचूपपणें आडोशास उभें राहून पहारा केला. मध्यरात्रीनंतर चोर गायीचें दूध काढीत आहे असें तिला वाटलें. चोराला धरण्याकरितां ती जोरानें धांवली. जवळ येऊन पहाते तों आपलें आराध्य दैवत भगवान् शंकर ज्योतिर्लिंगाच्या रूपानें विराजमान झालेले आहेत व कपिलाधेनूच्या कासेंतून दुधाच्या धारांचा त्यांच्यावर अभिषेक होत आहे असें दिसलें!! तेच हे मल्लिकार्जुन होत.

माळव्यांत शिप्रानदीच्या कांठीं उज्जयिनी हें शहर अत्यंत पुरातन व प्रसिद्ध आहे. एकदां चंद्रसेन राजा शंकराची आराधना करीत असतां एक गौळण आपल्या लहान मुलाला घेऊन तेथें आली. त्या बालकालाहि शिवपूजेचा छंद लागला. तो तहानभूकहि विसरला. शंकर भेटेना म्हणून तो विलाप करूं लागला. रडून रडून त्यानें आकाशपाताळ एक केलें ! शेवटीं शंकराला दया आली. त्याला दर्शन देण्याकरितां ज्योतिर्लिंगाच्या रूपानें भगवान् शंकर प्रकट झाले. तेच हे महाकालेश्वर होत.

महाकाळ असें नांव कां पडलें ? उज्जयिनीलाच अवंती नगरी असें दुसरें नांव आहे. तेथें एक अग्निहोत्री ब्राह्मण रहात असे. तो अत्यंत विद्वान् आणि सदाचारसंपन्न होता. तसाच तो मोठा शिवभक्तहि होता. जवळच रत्नमाल पर्वतावर दूषण नांवाचा एक दैत्य रहात होता. त्यानें उज्जयिनीवर आपल्या प्रचंड सेनेसह हल्ला केला. लोक घाबरले. 'त्राहि भगवन्' असा एकच हलकल्लोळ सुरू झाला. शेवटीं या ब्राह्मणानें शंकराचा धांवा केला. भगवान् शंकर प्रकट झाले आणि एका हुंकारासरसे त्यांनीं त्या सर्व दुष्टांचें भस्म करून टाकलें ! यामुळेंच येथील ज्योतिर्लिंगाला महाकाळ असें नांव पडलें. तो काळाचाहि काळ असल्यामुळें त्याला महाकाळ असें म्हणतात.

नर्मदेच्या कांठीं ओंकारमांधाता हें प्रसिद्ध क्षेत्र आहे. येथें ओंकारेश्वर आणि अमलेश्वर अशीं दोन प्रसिद्ध ज्योतिर्लिंगें आहेत. तीं दोन्ही एकच मानलीं जातात. दोहोंचें मिळून अमरेश्वर अथवा परमेश्वर हें एकच नांव आहे. यांना विमलेश्वर असेंहि म्हणतात.

हिमालयांत श्रीकेदारनाथ हें स्थान प्रसिद्धच आहे. "हिमालयांतील तीर्थ-क्षेत्रें" या प्रबंधांत आम्ही श्रीकेदारनाथांचें वर्णन केलेलें आहे. पुणें जिल्ह्यांत सह्याद्रीच्या शिखरावर भीमाशंकर हें प्रसिद्ध ठिकाण आहे. या क्षेत्राला डाकिनी असें म्हणतात. येथूनच भीमरथी अथवा भीमा नदी उगम पावते. हिलाच पंढर-पूरला चंद्रभागा असें म्हणतात.

काशी क्षेत्रांतील श्रीविश्वेश्वर हेंहि एक बारा ज्योतिर्लिंगांपैकींच एक शिवलिंग आहे. गोदावरीच्या उगमाजवळ श्रीत्र्यंबकेश्वर हें एक ज्योतिर्लिंग प्रसिद्ध आहे. वैद्यनाथ या ज्योतिर्लिंगाबद्दल मतभेद आहे. बंगालममधील संताळ परगण्यांत श्रीवैद्यनाथधाम हें क्षेत्र प्रसिद्ध आहे. द्वादश ज्योतिर्लिंगांपैकीं हें एक स्थान आहे. याच क्षेत्राच्या परिसराला चिताभूमि असें नांव आहे. कांहीं लोक "परल्यां वैजनाथं च" असा पाठ मानतात व महाराष्ट्रांतील मराठवाडा विभागांत असलेलें श्रीपरळी वैजनाथाचें क्षेत्र हेंच द्वादश ज्योतिर्लिंगांपैकीं एक होय असें म्हणतात. आचार्यांना हा पाठ संमत असल्याचें दिसत नाहीं. तथापि आचार्यांनीं "पूर्वोत्तरे" हीं प्रादेशिक मर्यादा दाखवून स्थानाचा उल्लेख पारलिका या शब्दानें केला आहे. पारलिका म्हणजे परळी असा अर्थ योग्यच आहे. आमच्या मतें मतभेदाचा

वाद घालीत बसण्यापेक्षां एकाच ज्योतिर्लिंगाचीं हीं दोन प्रतीकें आहेत असें मानणें अधिक श्रेयस्कर होय.

हिमालयांत मानस सरोवराजवळ रावणह्रद प्रसिद्धच आहे. त्यालाच राक्षसताल असें म्हणतात. राक्षसांचा राजा रावण तेथें राहून जवळच असलेल्या कैलास पर्वतावर शंकराची आराधना करीत असे. शंकरानें लौकर प्रसन्न व्हावें म्हणून त्यानें आपलें एक-एक शिरकमल शंकराला अर्पण केलें. शेवटीं दहावें मस्तकहि तो तोडणार इतक्यांत शंकर प्रकट झाले व प्रसन्न होऊन काय पाहिजे तें माग म्हणाले. तो मोठा शिवभक्त होता. कैलास पर्वतावर असलेल्या ज्योतिर्लिंगाची नित्य पूजा घडावी म्हणून त्या ज्योतिर्लिंगासह लंकेंत येण्याची त्यानें विनंती केली. शंकर म्हणाले, चल हें ज्योतिर्लिंग घेऊन. पण तूं हें जेथें ठेवशील तेथेंच तें स्थिर होईल. रावण तें ज्योतिर्लिंग घेऊन निघाला. वाटेंत त्याला लघुशंका लागली. त्यानें तें ज्योतिर्लिंग एका गवळ्याच्या मुलाजवळ दिलें आणि तो लघु शंकेकरितां गेला. इकडे तें ज्योतिर्लिंग हळूहळू जड होऊं लागलें ! मुलाला त्याचा भार सहन झाला नाहीं. त्यानें तें खालीं ठेवलें. झालें. तें ज्योतिर्लिंग तेथेंच स्थिरावलें. रावण हातपाय धुऊन परत आला. पहातो तर हा प्रकार ! त्यानें आपली सर्व शक्ति वेचून तें ज्योतिर्लिंग उचलण्याचा प्रयत्न केला, पण त्याला यश आलें नाहीं ! हताश होऊन तो लंकेला गेला. इकडे ब्रह्मदेव, विष्णु वगैरे स्वर्गींचे देव खालीं आले व त्यांनीं त्या ज्योतिर्लिंगाची प्रतिष्ठापना करून पूजा केली. कुष्ठ व कुष्ठासारख्या दुर्धर रोगांतून अनेक लोक येथें शिवपूजनानें रोगमुक्त झाले म्हणून या ज्योतिर्लिंगाला वैद्यनाथ असें नांव पडलें. वैद्यनाथ याचाच अपभ्रंश वैजनाथ आहे. वैजू नांवाचा एक भील होता. तो शंकराचा मोठा अनन्यभक्त होता. त्यानें या ज्योतिर्लिंगाची फार मोठी उपासना केलेली आहे. त्याचें स्मारक म्हणूनहि या ज्योतिर्लिंगाला वैजनाथ असें नांव पडलें असेंहि म्हणतात.

नागनाथाबद्दलहि असेच मतभेद आहेत. महाराष्ट्रांत एक औंढ्यानागनाथ म्हणून प्रसिद्ध ठिकाण आहे. भोंवतालीं डोंगराळ प्रदेश असून जंगलहि आहे. यालाच दारुकावन असें म्हणतात. येथें श्रीशंकराच्या पुरातन भव्य मंदिरांत असलेल्या गाभाऱ्यांत गुप्त तळघर असून तेथें आपल्याला या ज्योतिर्लिंगाचें

दर्शन घडतें. कांहीं लोकांच्या मतें हें ठिकाण द्वारकेजवळ आहे तर कांहींच्या मतें अलमोड्याजवळ प्रसिद्ध असलेलें जागेश्वर महादेव हेच नागेश्वर ज्योतिर्लिंग होत.

सेतुबंध रामेश्वर हें तर सुप्रसिद्धच क्षेत्र आहे. दौलताबादजवळ वेरूळचीं लेणीं प्रसिद्ध आहेत. वेरूळच्या लेण्यांचा डोंगर उतरून आपण खालीं गेलों कीं, एका ओढ्याच्या कांठीं आपल्याला एक पुरातन शिवमंदिर दिसेल. या मंदिरांत असलेल्या शिवलिंगालाच घुश्मेश्वर किंवा घृष्णेश्वर असें म्हणतात.

घुश्मेश्वर हें नांव कां पडलें ? वेरूळ गांवीं एक ब्राह्मण रहात होता. त्याचे नांव सुधर्मा होतें. त्याची बायको सुदेहा मोठी पतिव्रता होती. तो ब्राह्मणहि विद्वान्, सदाचारी व मोठा सुखी होता. तरी पण पोटीं पुत्र नसल्यामुळें त्या दोघांना — नवरा-बायकोना संसार दुःखमय वाटूं लागला. आपल्या पोटीं पुत्रप्राप्तीचा योग नाहीं हें जाणून सुदेहेनें नवऱ्यास. दुसरें लग्न करण्याचा आग्रह केला. पत्नीच्या आग्रहानें त्यानें दुसरें लग्न केलें त्याची दुसरी पत्नी सुदेहेचीच धाकटी बहीण होती. तिचें नांव घुश्मा असें होतें. ती आपल्या पतीची अनन्यचित्तानें सेवा करीत होती. थोरल्या बहिणीला मातेप्रमाणें पूज्य मानीत होती. घुश्माही अनन्यभक्तीनें रोज शंकराची आराधना करीत असे. १०८ पार्थिव शिवलिंगें करून त्यांची पूजा करावी. नंतर शिवलिंगांचें एका तळ्यांत विसर्जन करावें व मग जेवावें. असा तिचा नित्यक्रम असे. शिवकृपेनें तिला मुलगाहि झाला. तोहि विद्वान् झाला. त्याचें लग्नहि झालें. आपल्या बहिणीचा हा उत्कर्ष सुदेहेला मानवला नाहीं. तिनें एके दिवशीं संधि साधून त्या मुलाचा खून केला व त्याचें प्रेत तळ्यांत फेकून दिलें. अशा रीतीनें कर्ता-सवर्ता मुलगा हातीं आलेला गेला ! बाप शोकसागरांत बुडाला. बायकोनें रडून रडून आकान्त केला ! लोक हळहळले. धावपळ करीत मुलाचा शोध करूं लागले ! पण मुलाची आई घुश्मा ही " सुखदुःखे समे कृत्वा " या तत्त्वाप्रमाणें शांत चित्तानें व एकाग्र अंतःकरणानें नित्याप्रमाणें लिंगार्चन, पार्थिव पूजा करीत बसली ! पूजा झाल्यानंतर तीं सर्व पार्थिव लिंगें परातींत गोळा करून ती तळ्यावर गेली. जय शंकरा भक्तवत्सला ! असें म्हणून तिनें त्या पार्थिव लिंगांचें तळ्यांत विसर्जन केलें. काय चमत्कार झाला पहा ! सुदेहेनें तेथेंच त्या मुलाचें प्रेत टाकलेलें होतें ! अकस्मात् मुलगा डोहांतून वर आला ! चटकन् कांठावर येऊन त्यानें आईच्या पायाला आनंदानें मिठी मारली ! घुश्मेनें पुन्हां जय शंकरा भक्तवत्सला ! असा

घोष केला. ती एका – अनिर्वचनीय सात्त्विक आनंदांत निमग्न झाली ! भगवान् प्रकट झाले ! त्या अनन्यभक्त असलेल्या घुश्मेच्या मस्तकावर वरदहस्त करून म्हणाले, तुला काय पाहिजे तें मागून घे. ती म्हणाली प्रभो ! आपण माझ्या बहिणीला तिनें केलेल्या अपराधाबद्दल क्षमा करा ! आणि सर्व लोकांच्या कल्याणाकरितां आपण येथेंच वास्तव्य करा. शंकरानें तिचें म्हणणें ऐकलें आणि तेव्हांपासून ज्योतिर्लिंगाच्या रूपानें तेथेंच वास्तव्य केलें ! घुश्मेच्या अनन्यभक्तीचें स्मारक म्हणून त्या ज्योतिर्लिंगाला लोक घुश्मेश्वर असेंच म्हणूं लागले ! ज्या तळ्यांत पार्थिव लिंगांचें विसर्जन होत होतें त्या तळ्याला व त्याच्या परिसराला शिवालय असें म्हणतात. याच अभिप्रायानें वर स्तोत्रांत "घुश्मेशं च शिवालये" असें म्हटलेलें आहे. आचार्यांनी वेरूळ या क्षेत्राचा उल्लेख एलापुरी या शब्दानें केलेला आहे. आचार्यांनी केलेलें हे द्वादशज्योतिर्लिंगस्तोत्र रोज अवश्य म्हणावें.]

सौराष्ट्रदेशे वसुधावकाशे
ज्योतिर्मयं चन्द्रकलावतंसम् ।
भक्तिप्रदानाय कृतावतारं
तं सोमनाथं शरणं प्रपद्ये ॥१॥

या भूमंडलाच्या एकाभागीं विराजमान असलेल्या सौराष्ट्र प्रदेशांत ज्योतिर्मय म्हणजे तेजोरूप असलेलें चंद्राच्या कोरेला आपल्या मस्तकांवर शिरोभूषणाप्रमाणें धारण करणारे, त्याचप्रमाणें भक्तजनांना दृढभक्तीचें मुक्तहस्तानें दान करण्याकरितां ज्यांनीं अवतारग्रहण केला आहे अर्थात लोककल्याणाकरितां जे भूमंडलावर अवतरलेले आहेत, त्या श्रीसोमनाथाला मी शरण येत आहें. ज्योतिर्लिंगाच्या रूपानें सौराष्ट्र प्रदेशांत अवतीर्ण झालेले भगवान् शंकर श्रीसोमनाथ हे माझें रक्षण करोत. "वसुधावकाशे" याऐवजीं "विशदेऽतिरम्ये" असा पाठ घेतल्यास निर्मल आणि अतिरम्य असा अर्थ करावा.

श्रीशैलशृङ्गे विविधप्रसङ्गे
शेषाद्रिशृङ्गेऽपि सदा वसन्तम् ।
तमर्जुनं मल्लिकपूर्वमेनं
नमामि संसार-समुद्र-सेतुम् ॥२॥

जेथें साधु, संत, महात्मे आणि तपस्वी यांच्या गांठीभेटी त्याचप्रमाणें पूजाअर्चा इत्यादि विविध प्रसंग पहावयास सांपडतात त्या श्रीशैल पर्वताच्या शिखरावर वास्तव्य करणारे तसेंच शेषाचलाच्या शिखरावरहि पण सर्वकाळ वास्तव्य करणारे हे सुप्रसिद्ध मल्लिकाशब्दपूर्वक अर्जुन या नांवानें ओळखले जाणारे अर्थात् मल्लिकार्जुन या नांवानें प्रसिद्ध असलेले भगवान् श्रीशंकर, भक्तजनांना भवसांगरांतून पैलतीरावर पोहोंचविण्याकरितां जणुं कांहीं सेतूच आहेत ते. त्या श्रीशैल पर्वतावर असलेल्या श्रीमल्लिकार्जुन महादेवाला मी नमस्कार करतों. "विविधप्रसङ्गे" याच्या ऐवजीं "विबुधातिसङ्गे" असाहि पाठ आढळतो. विबुध म्हणजे देव. इंद्र, चंद्र, वरुण, कुबेर इत्यादि देवांचा अतिसंग म्हणजे वरचेवर जाणें, येणें आणि रहाणें इत्यादि हें सर्व ज्याच्या शिखरावर होत आहे असा त्याचा अर्थ करावा. दुसऱ्या चरणांत "शेषाद्रिशृङ्गेऽपि" याच्या ऐवजीं "तुलाद्रितुङ्गेऽपि" असा पाठ दृष्टीस पडतो. तुलना करण्याकरितां योजलेल्या पर्वतापेक्षांहि तुंग म्हणजे उंच असलेला असा त्याचा अर्थ करावा.

आचार्यांना श्रीशैल पर्वत फार प्रिय होता. तेथें ते मधून मधून कांहीं काळ रहात असत व नादानुसंधानरूपी साधनाभ्यासहि करीत असत. ही गोष्ट त्यांच्या योगतारावलि या स्तोत्रावरून स्पष्ट दिसते. श्रीशैल पर्वतावर योगाभ्यास करीत असतांना त्यांना विविध प्रसंग पहावयास सांपडणें स्वाभाविकच आहे. म्हणूनच त्यांनीं श्रीशैल पर्वताला "विविधप्रसङ्गे" असें स्वानुभवाचें विशेषण दिलेलें आहे. त्याचप्रमाणें या श्लोकांत शेषाद्रिशृंगाचाहि उल्लेख केलेला आहे. शेषाद्रि-शेषाचल हा तिरूपति क्षेत्र म्हणून ओळखला जातो. यालाच गिरि अथवा वेंकट असेंहि म्हणतात. येथें वेंकटरमण भगवान् लक्ष्मीकांत यांचें वास्तव्य तर प्रसिद्धच आहे. पण आचार्य म्हणतात त्याप्रमाणें श्रीमल्लिकार्जुनाचेंहि दुसरें स्थान तेथें असलें पाहिजे. अथवा आचार्यांच्या तत्त्वज्ञानांत हर आणि हरि यांच्यांत एकरूपता असल्यामुळें श्रीशैल पर्वतावर वास्तव्य करणारे श्रीमल्लिकार्जुन हेंच शेषाचलावर श्रीलक्ष्मीकांताच्या — श्रीविष्णूच्या रूपानें वास्तव्य करीत आहेत असाहि अभिप्राय लक्षांत घ्यावा.

अवन्तिकायां विहितावतारं
मुक्तिप्रदानाय च सज्जनानाम् ।

अकालमृत्योः परिरक्षणार्थं
वन्दे महाकालमहं सुरेशम् ॥३॥

अवंतिका म्हणजे हल्लीचें उज्जयिनी शहर. या अवंतिका नगरीमध्यें सज्जनांना मुक्तिप्रदान करण्याकरितां ज्यानें अवतार धारण केला. त्याचप्रमाणें भक्तजनांचें अकालमृत्यूपासून संरक्षण करणें हेंहि अवताराचें दुसरें प्रयोजन आहे. अशा हेतूनीं अवंतिकेमध्यें अवतीर्ण झालेले भगवान् शंकर "सुरेश" म्हणजे सर्व देवांचे अधिपति, ज्यांना महाकाल म्हणतात ते, काळाचाहि काळ असल्यामुळें त्यांना "महाकाळ" महान् काल – महाकाळ अथवा महांकाळेश्वर असें म्हटलें जातें त्या महांकाळेश्वराच्या चरणीं मी वंदन करीत आहें.

कावेरिकानर्मदयोः पवित्रे
समागमे सज्जनतारणाय ।
सदैव मान्धातृपुरे वसन्त-
मोङ्कारमीशं शिवमेकमीडे ॥४॥

कावेरी आणि नर्मदा यांच्या पवित्र संगमाच्या परिसरांत असलेल्या मांधाता नगरीमध्यें निरंतर सज्जनांचें संरक्षण करण्याकरितां सज्जनांना तारण्याकरितां वास्तव्य करीत असलेले सर्वश्रेष्ठ सर्वेश्वर भगवान् सदाशिव ज्यांना ओंकारनाथ किंवा ओंकारेश्वर म्हणतात त्यांची मी अनन्यचित्तानें स्तुति करीत आहें. या ज्योतिर्लिंगाला अमलेश्वर, अमरेश्वर आणि विमलेश्वर अशींहि नांवें आहेत.

पूर्वोत्तरे पारलिकाभिधाने
सदाशिवं तं गिरिजासमेतम् ।
सुरासुराराधितपादपद्मं
श्रीवैद्यनाथं सततं नमामि ॥५॥

पूर्व आणि उत्तर दिशेच्या मध्यभागीं असलेल्या पारलिका अर्थात् परली नांवाच्या क्षेत्रांत, ज्यांच्या चरणकमलांची देव, दैत्य, राक्षस, यक्ष, गंधर्व आणि मानव या सर्वांनीं आराधना केलेली आहे असे गिरिजेसह म्हणजे पार्वतीसह

विराजमान असलेले भगवान् श्रीसदाशिव ज्यांना या ठिकाणीं वैद्यनाथ असें म्हणतात त्यांना मी निरंतर नमस्कार करीत आहें.

आमर्दसंज्ञे नगरे च रम्ये
विभूषिताङ्गं विविधैश्च भोगैः ।
सद्भुक्ति-मुक्ति-प्रदमीशमेकं
श्रीनागनाथं शरणं प्रपद्ये ॥६॥

आमर्द नांवाच्या रम्य नगरांत विविध प्रकारच्या नागांनीं ज्यांची मूर्ति विभूषित झालेली आहे. त्याचप्रमाणें सज्जनांना भोग आणि मोक्ष यांचें दान करण्यामध्यें निरंतर तत्पर असलेले, सर्वश्रेष्ठ महेश्वर भगवान् शंकर – ज्यांना नागनाथ म्हणतात त्यांना मी शरण येत आहें. ते माझें रक्षण करोत. आमर्द नगर म्हणजेच औंढे गांव होय.

सानन्दमानन्दवने वसन्त-
मानन्दकन्दं हतपापवृन्दम् ।
वाराणसीनाथमनाथनाथं
श्रीविश्वनाथं शरणं प्रपद्ये ॥ ७ ॥

आनंदवनामध्यें आनंदानें वास्तव्य करून भक्तजनांच्या पापसमूहाचा नाश करणारे आनंदकंद भगवान् शंकर, अनाथांचे नाथ काशी-वाराणसीचे अधिपति श्रीविश्वनाथ यांना मी शरण आलों आहें. तें माझें रक्षण करोत.

यो डाकिनीशाकिनिकासमाजे
निषेव्यमाणः पिशिताशनैश्च ।
सदैव भीमादिपदप्रसिद्धं
तं शंकरं भक्तहितं नमामि ॥ ८ ॥

जे शाकिनी आणि डाकिनी यांच्या समुदायांत वास्तव्य करीत आहेत. शाकिनी आणि डाकिनी या एक प्रकारच्या स्त्रीजातीय पिशाचयोनि आहेत. त्याचप्रमाणें पिशिताशन म्हणजे राक्षस अथवा भूतप्रेतादि गण यांच्याकडूनहि ज्यांची सेवा केली जात आहे. अर्थात् शाकिनी, डाकिनी आणि भूतप्रेतपिशाच-

गण त्याचप्रमाणें यक्ष-राक्षस यांच्या समाजांत ज्यांचें वास्तव्य असतें तसेंच ज्यांच्या नांवामागें भीम अथवा भीमा हा शब्द नेहमींच जोडला जातो त्या भीमशंकराला अथवा भीमाशंकराला मी नमस्कार करतों. ते भक्तांचे मोठे हितचिंतक आणि हितकर्तेहि आहेत. त्यांना माझा नमस्कार असो.

श्रीताम्रपर्णीजलराशियोगे
निबध्य सेतुं निशिबिल्वपत्रैः ।
श्रीरामचन्द्रेण समर्चितं तं
रामेश्वराख्यं सततं नमामि ॥९॥

श्रीताम्रपर्णी या नांवानें प्रसिद्ध असलेल्या पवित्र नदीचा दक्षिण समुद्रामध्यें जेथें समागम होतो. ताम्रपर्णी नदी जेथें समुद्राला मिळते त्या ठिकाणीं सेतु बांधून रात्रींच्या वेळीं प्रभुरामचंद्रांनीं ज्यांची पूजा केली आहे त्या श्रीरामेश्वरसंज्ञक ज्योतिर्लिंगस्वरूप असलेल्या श्रीशंकराला मी भक्तिपूर्वक निरंतर नमस्कार करीत आहें.

सह्याद्रिशीर्षे विमले वसन्तं
गोदावरीतीर-पवित्रदेशे ।
यद्दर्शनात्पातकमाशु नाशं
प्रयाति तं त्र्यंबकमीशमीडे ॥१०॥

गोदावरी कांठच्या पवित्र देशांत अत्यंत निर्मल असलेल्या सह्य पर्वताच्या शिखरावर वास्तव्य करीत असलेले त्याचप्रमाणें ज्यांच्या दर्शनानें पातकांचा सत्वर निरास होतो असे जे भगवान् श्रीशंकर त्र्यंबकेश्वर महादेव त्यांची मी भक्तिपूर्वक स्तुति करीत आहें. कांहीं पुस्तकांतून "सह्याद्रि" या ऐवजीं "सिंहाद्रि" असा पाठ दिसतो. या पाठावरून कांहीं लोक गोदावरी जिल्ह्यांत प्रसिद्ध असलेल्या सिंहाचलावर हे स्थान मानतात. आमच्या मतें हा पाठभेद हस्तदोषमूलक असावा. अनादिसिद्ध व सर्व लोकांमध्यें प्रसिद्ध असलेलें श्रीत्र्यंबकेश्वर क्षेत्र हे गोदावरीच्या उगमस्थानीं सह्याद्रिपर्वताच्याच शिखरावर आहे हें निर्विवाद होय.

हिमाद्रि-पार्श्वेऽपि तटे रमन्तं
संपूज्यमानं सततं मुनीन्द्रैः ।

सुरासुरैर्यक्ष-महोरगाद्यैः
केदारसंज्ञं शिवमीशमीडे ॥११॥

हिमालयाच्या परिसरांत मंदाकिनीच्या कांठीं रममाण असलेले, सनक-सनन्दनादि मोठ्या मोठ्या ऋषिजनांकडून ज्यांचें नित्य पूजन केलें जात आहे. त्याचप्रमाणें देव, दानव, यक्ष, राक्षस, गंधर्व, किन्नर, नाग इत्यादिकांकडूनहि ज्यांची नित्य समाराधना होत आहे त्या श्रीकेदारेश्वर किंवा केदारनाथ या नावानें प्रसिद्ध असलेल्या लोककल्याणकारक श्रीसांबसदाशिवाची मी स्तुति करीत आहें.

एलापुरीरम्यशिवालयेऽस्मिन्
समुल्लसन्तं त्रिजगद्वरेण्यम् ।
वन्दे महोदार-तर-स्वभावं
सदाशिवं तं धिषणेश्वराख्यम् ॥१२॥

एलापुरी – एलोरा – वेरूळ या नांवानें प्रसिद्ध असलेल्या क्षेत्रांतील रम्य असलेल्या शिवालयांत – शिवमंदिरांत अथवा शिवालय या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या सरोवरांत अर्थात् सरोवराच्या कांठीं विराजमान असलेले तसेंच त्रैलोक्यांत अत्यंत श्रेष्ठ असलेले त्याचप्रमाणें ज्यांचा स्वभाव अत्यंत उदार आहे अर्थात् जे मोठे दानशूर आहेत, ते भगवान् सदाशिव-धिषणेश्वर हें त्यांचें नांव आहे. ते धिषणा म्हणजे बुद्धि तिचे ईश्वर म्हणजे अधिपति असलेले अर्थात् बुद्धिदाते भगवान् शंकर त्यांना मी वंदन करीत आहें. घुश्मेश्वर अथवा घृष्णेश्वर यांनाच उद्देशून आचार्यांनीं येथें धिषणेश्वर हा शब्द उपयोगांत आणलेला आहे.

एतानि लिङ्गानि सदैव मर्त्याः
प्रातः पठन्तोऽमलमानसाश्च ।
ते पुत्रपौत्रैश्च धनैरुदारैः
सत्कीर्तिभाजः सुखिनो भवन्ति ॥१३॥

जे कोणी मानव नित्य प्रातःकाळीं निर्मल मनानें या बारा ज्योतिर्लिंगांचें स्मरण करतील या स्तोत्राचें पठण करतील ते पुत्र, पौत्र, विपुल धनधान्य आणि उत्तम कीर्ति यांनी संपन्न होऊन सुखी होतील.

कांहीं पुस्तकांतून फलश्रुतीचा श्लोक निराळा असलेला दृष्टीस पडतो तो असा :

ज्योतिर्मय-द्वादश-लिङ्गकानां
शिवात्मनां प्रोक्तमिदं क्रमेण ।
स्तोत्रं पठित्वा मनुजोऽतिभक्त्या
फलं तदालोक्य निजं भजेच्च ॥१४॥

प्रत्यक्ष शिवस्वरूप असलेल्या या बारा ज्योतिर्लिंगांचें हें क्रमानें वर्णिलेलें स्तोत्र जो कोणी मनुष्य अत्यंत भक्तियुक्त अन्तःकरणानें पठण करील तो त्या त्या ज्योतिर्लिंगाच्या दर्शनाचें जें निज म्हणजे खास स्वतःचें असलेलें फळ, अर्थात् त्या त्या ज्योतिर्लिंगाचें दर्शन घेऊन जें फळ मिळावयाचें तेंच फळ या स्तोत्राच्या पठणानेंहि प्राप्त करून घेईल. असा या स्तोत्राच्या पाठाचा महिमा स्वतः आचार्यांनींच वर्णन केलेला आहे.

■ ■ ■

दशश्लोकी साम्बस्तुतिः ।

[आचार्यांनीं केलेलें हें श्रीसांबसदाशिवाचें दहा श्लोकाचें स्तोत्र मोठें मननीय आहे. आचार्यांचे सांब हे परिपूर्ण परब्रह्मस्वरूप आहेत. केवल कंठीं रुद्राक्षमाला किंवा हातीं त्रिशूल आणि डमरू तसेंच मस्तकीं जटाभार किंवा कमरेभोंवतीं व्याघ्रांबर इत्यादि चिह्नांनीं अलंकृत असलेली परिच्छिन्न परिमित पार्वतीसहित शंकराची मूर्ति म्हणजेच सांब असा अर्थ प्रकृतस्थलीं विवक्षित नसून साऱ्या विश्वप्रपंचाचा अधिष्ठाता मायासंवलित परब्रह्म परमात्मा हाच या ठिकाणीं सांब शब्दाचा अर्थ आहे. माया ही त्याची अनिर्वचनीय शक्ति असून त्या शक्तीमुळेंच तो शक्तिमान् झाला आहे. त्याची शक्ति त्याच्याहून निराळी पहातां येत नाहीं व त्या शक्तीहून तोहि निराळा दिसत नाहीं. म्हणूनच तत्त्ववेत्ते शक्ति आणि शक्तिमान् यांच्यांत अभेद मानतात.

सांब हा शब्द देखील पार्वती आणि परमेश्वर यांच्यांतील अभेदच व्यक्त करणारा आहे. " अम्बया सहितः साम्बः " अशी सांब शब्दाची व्युत्पत्ति आहे.

अंबा म्हणजे जननी. अर्थात् जगज्जननी आदिमाया महाशक्ति. तिच्यासह विराजमान असलेला परमात्मा हाच सांब शब्दाचा अर्थ होय. कोणी म्हणेल कीं, साहचर्यानें विराजमान असणें हें तर भेदाचें द्योतक आहे, मग त्यांच्यांत अभेद कसा असूं शकेल ? बरोबर आहे. ज्या ठिकाणीं संयोग समवाय इत्यादि संबंधानें साहचर्य विवक्षित असतें तेथेंच संबंधित असलेल्या दोन पदार्थांमध्यें भेद असूं शकतो. प्रकृतस्थलीं शक्ति आणि शक्तिमान् हे दोवेहि अनिर्वचनीय असल्यामुळें त्यांचा संबंध देखील अनिर्वचनीयच आहे. तो संयोग किंवा समवाय इत्यादि संबंधासारखा द्वैतसापेक्ष नाहीं. याच अभिप्रायानें प्रकृतस्थळीं पार्वती आणि परमेश्वर यांचा अभिन्नसाहचर्यानें उल्लेख केलेला आहे. अशा या परब्रह्मस्वरूप सांबसदाशिवाच्या ठिकाणीं माझ्या मनानें नित्य रमावें, समरस व्हावें, अशी प्रार्थना आचार्यांनीं प्रत्येक श्लोकाच्या शेवटच्या चरणांत केलेली आहे.

शार्दूलविक्रीडित वृत्तांतील हे अवघे दहाच श्लोक आहेत. तथापि "सांब" या शब्दानें विवक्षित असलेल्या शक्तिसहकृत सदाशिव तत्त्वाचा अफाट महिमा ते आपल्यापुढें मूर्तिमंत स्वरूपानें उभा करीत आहेत ! सर्वच स्तोत्र उत्तम आहे, पण त्यांतल्या त्यांत सहावा आणि नववा श्लोक तर विवक्षित तत्त्वाचें मोठ्या बहारीनें वर्णन करीत आहेत.]

साम्बो नः कुलदैवतं पशुपते साम्ब त्वदीया वयं
साम्बं स्तौमि सुरासुरोरगगणाः साम्बेन संतारिताः ।
साम्बायास्तु नमो मया विरचितं साम्बात्परं नो भजे
साम्बस्यानुचरोऽस्म्यहं मम रतिः साम्बे परब्रह्मणि ॥ १ ॥

सांब म्हणजे भगवान् शंकर हें आमचें कुलदैवत आहे. हे पशुपते साम्बा ! आम्ही तुमचेच आहों. मी सांबाचें स्तवन करीत आहें. सुर म्हणजे देव, असुर म्हणजे दैत्य राक्षस आणि उरग म्हणजे नाग इत्यादिकांच्या समुदायांना सांबानेंच उत्तम रीतीनें तारलेलें आहे. मी सांबाला नमस्कार केलेला आहे अथवा करीत आहें. मी सांबाशिवाय दुसऱ्याला भजत नाहीं. मी सांबाचा अनुचर म्हणजे सेवक आहें. दास आहें. सांबस्वरूपी परब्रम्हाच्या ठिकाणीं माझें निरंतर प्रेम असो (हीच माझी इच्छा आहे). या श्लोकांतील प्रत्येक वाक्यांत सांब शब्दाच्या प्रथमा, संबोधन, द्वितीया इत्यादि सर्व विभक्तींच्या एकवचनाची रूपें क्रमानें

दिलेलीं आहेत. या ठिकाणीं रामरक्षेंतील " रामो राजमणिः सदा विजयते रामं रमेशं भजे " या श्लोकाची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. दोन्ही श्लोकांत पूर्णपणें कल्पनासाम्य आहे.

विष्ण्वाद्याश्च पुरत्रयं सुरगणा जेतुं न शक्ताः स्वयं
यं शम्भुं भगवन्वयं तु पशवोऽस्माकं त्वमेवेश्वरः ।
स्वस्वस्थाननियोजिताः सुमनसः स्वस्था बभूवुस्तत-
स्तस्मिन्मे हृदयं सुखेन रमतां साम्बे परब्रह्मणि ॥ २ ॥

हे षड्गुणैश्वर्यसंपन्ना प्रभो शंकरा ! ज्या शंभूला सोडून विष्णु वगैरे देवांचे समुदाय देखील स्वतः त्रिपुरासुराला जिंकूं शकले नाहींत ते शंभू म्हणजे तुम्हींच. ज्या वेळेला त्रिपुरासुर उन्मत्त झाला त्या वेळेला त्याला जिंकण्याचे विष्णु, इंद्र इत्यादि अनेक देवगणांनीं प्रयत्न केले, पण तुम्हांला सोडून ते स्वतः कोणीहि त्रिपुरासुराला जिंकण्यास समर्थ झाले नाहींत. तुम्ही मात्र त्रिपुरासुराच्या तिन्ही नगरींचा भेद करून त्याला जिंकलें, त्याचा नाश केला आणि सर्व लोकांचें रक्षण केलें. म्हणूनच तुम्हांला त्रिपुरारि असें म्हणतात. हे भगवन् त्रिपुरासुराला जिंकून देवगणांचेंहि तुम्हीं रक्षण केलें ! मग आम्ही तर पशु म्हणजे सामान्य जीव. आमचे ईश्वर म्हणजे अधिपति तुम्हींच आहां. तुमच्याच उपकारानें (आणि कृपेनें) आपआपल्या स्थानीं कार्य करण्यास योजलेले देव सुखी झाले व शांत झाले. आपला हा महिमा लक्षांत घेऊन मी प्रार्थना करतों कीं, ज्याच्या कृपेनें सर्व देव सुखी झाले त्या परब्रह्मस्वरूप सांबाच्या ठिकाणीं माझें मन आनंदानें रमो.

क्ष्मा यस्य रथो रथाङ्गयुगलं चन्द्रार्कबिम्बद्वयं
कोदण्डः कनकाचलो हरिरभूद्बाणो विधिः सारथिः ।
तूणीरो जलधिर्हयाः श्रुतिचयो मौर्वी भुजंगाधिप-
स्तस्मिन्मे हृदयं सुखेन रमतां साम्बे परब्रह्मणि ॥ ३ ॥

पृथ्वी हा ज्याचा रथ आहे. चंद्रबिंब आणि सूर्यबिंब हे दोन्ही ज्याच्या रथाचीं दोन चाकें आहेत. कनकाचल म्हणजे सोन्याचा पर्वत अर्थात् मेरु हा ज्याचें कोदण्ड म्हणजे धनुष्य आहे. प्रत्यक्ष विष्णु भगवान् श्रीहरि हा ज्याचा बाण आणि विधि म्हणजे ब्रह्मदेव हा ज्याचा सारथी आहे. सागर हा ज्याचा

माता म्हणजे बाण ठेवण्याचें साधन असून वेद ज्याचे घोडे आहेत. सर्व भुजंगांचा राजा शेष ही ज्याच्या धनुष्याची दोरी आहे. अशा त्या परब्रह्मस्वरूप सांबाच्या ठिकाणीं माझें मन आनंदानें रमो (हीच माझी मनीषा आहे).

येनापादितमङ्गजाङ्गभसितं दिव्याङ्गरागैः समं
येन स्वीकृतमञ्जसम्भवशिरः सौवर्णपात्रैः समम् ।
येनाङ्गीकृतमच्युतस्य नयनं पूजारविन्दैः समं
तस्मिन्मे हृदयं सुखेन रमतां साम्बे परब्रह्मणि ॥ ४ ॥

ज्यानें आपल्या तृतीय नेत्रांतील अग्नीनें भस्म करून टाकलेल्या कामदेवाच्या देहाचें भस्म आपल्या अंगाला लावलें असतां तें दिव्य म्हणजे अलौकिक मनोहर अंगाला लावण्याच्या उटण्याप्रमाणें दिसत आहे. ब्रह्मदेवाचें उडविलेलें पांचवें मस्तक अर्थात् त्या मस्तकाची करवंटी ज्यानें आपल्या हातांत घेतली असल्यामुळें ती सुवर्णपात्राप्रमाणें दिसत आहे. अच्युत म्हणजे भगवान् श्रीहरि यानें पूजेच्या वेळीं अर्पण केलेलें नेत्रकमळ (ज्यानें स्वीकारलें असतां तें) पूजेंतील कमलाप्रमाणेंच शोभत आहे. त्या परब्रह्मस्वरूप असलेल्या सांबाच्या ठिकाणीं माझे मन आनंदानें रमो. या श्लोकांत पौराणिकदृष्ट्या घडून आलेल्या तीन घटनांचा उल्लेख आहे. (१) शंकरानें मदनास जाळलें व त्याचेंच भस्म अंगास लावलें. (२) ब्रह्मदेवाचें पांचवें मस्तक उडविलें व तेंच कपाल म्हणून हातांत धारण केलें. (३) श्रीविष्णूनें आपला डोळा पूजेच्या वेळीं कमी आलेल्या कमळाच्या मोबदल्यांत दिला. त्याचें फल त्याला सुदर्शनचक्र मिळालें.

गोविन्दादधिकं न दैवतमिति प्रोच्चार्य हस्तावुभा-
वुद्वृत्यार्थ शिवस्य सन्निधिगतो व्यासो मुनीनां वरः ।
यस्य स्तम्भितपाणिरानतिकृता नन्दीश्वरेणाभव-
त्तस्मिन्मे हृदयं सुखेन रमतां साम्बे परब्रह्मणि ॥ ५ ॥

गोविंदापेक्षां श्रेष्ठ दैवत नाहीं असें मोठ्यानें म्हणत हात वर करून सर्व ऋषिसमुदायांत श्रेष्ठ असलेले व्यास मुनि शंकराच्या जवळ गेले. तेव्हां नम्र होऊन नमस्कार करणाऱ्या ज्याच्या नंदीश्वरामुळें व्यासांचें हात जसेच्या तसे वरच

राहिले. ते त्यांना खालीं करतां येईनात त्या परब्रह्मस्वरूप असलेल्या सांबाच्या ठिकाणीं माझें मन आनंदानें रमो.

आकाशश्चिकुरायते दशदिशाभोगो दुकूलायते
शीतांशुः प्रसवायते स्थिरतरानन्दः स्वरूपायते ।
वेदान्तो निलयायते सुविनयो यस्य स्वभावायते
तस्मिन्मे हृदयं सुखेन रमतां साम्बे परब्रह्मणि ॥ ६ ॥

आकाश ज्याचा केशकलाप आहे. दाही दिशा हें ज्याच्या अंगावरील वस्त्र आहे. चंद्र ज्याच्या मस्तकावर फुलासारखा दिसत आहे. अत्यंत स्थिर निश्चल आनंद हेंच ज्याचें स्वरूप आहे. वेदान्त हें ज्याचें आश्रयस्थान आहे. उत्तम विनय हा ज्याचा स्वभाव आहे. त्या परब्रह्मस्वरूप असलेल्या सांबसदाशिवाच्या ठिकाणीं माझें मन आनंदानें रमो.

विष्णुर्यस्य सहस्रनामनियमादम्भोरुहाण्यर्चय-
न्नेकोनोपचितेषु नेत्रकमलं नैजं पदाब्जद्वये ।
सम्पूज्यासुरसंहतिं विदलयंस्त्रैलोक्यपालोऽभव-
त्तस्मिन्मे हृदयं सुखेन रमतां साम्बे परब्रह्मणि ॥ ७ ॥

ज्याच्या सहस्रनामांचा पाठ करून प्रत्येक नांदानें एक-एक कमल अर्पण करावें – वहावें असा नियम करून भगवान् विष्णु हजार कमलें रोज गोळा करून पूजा करूं लागले असतां एके दिवशीं पूजेसाठीं आणलेल्या कमलांच्या राशींत एक कमळ कमी पडलें तेव्हां विष्णूनें स्वतःचा डोळा काढून शंकराच्या चरणकमलीं वाहिला ! अर्थात् श्रीहरीनें अनन्यभक्तीनें आपलें नेत्रकमल शंकराच्या चरणीं अर्पून आपला सहस्र कमलें वाहण्याचा नियम पूर्ण केला. याचा परिणाम असा झाला कीं, शंकरानें प्रसन्न होऊन श्रीहरीस डोळा तर दिलाच दिला, पण सुदर्शनचक्रहि अर्पण केलें ! त्या सुदर्शनचक्राच्या साहाय्यानें विष्णूनें संपूर्ण असुरगणांचा अर्थात् दैत्य-राक्षसांचा पराभव केला व तो शंकरांच्या कृपेनें त्रैलोक्याचा संरक्षक म्हणजे पालनकर्ता झाला ! त्या परब्रह्मस्वरूप असलेल्या सांबसदाशिवाच्या ठिकाणीं माझें मन आनंदानें रमो.

शौरिं सत्यगिरं वराहवपुषं पादाम्बुजादर्शने
चक्रे यो दयया समस्तजगतां नाथं शिरोदर्शने ।
मिथ्यावाचमपूज्यमेव सततं हंसस्वरूपं विधिं
तस्मिन्मे हृदयं सुखेन रमतां साम्बे परब्रह्मणि ॥ ८ ॥

एकदां ब्रह्मदेव, विष्णु आणि शंकर यांच्यामध्यें आपणां तिघांत श्रेष्ठ कोण, अशी चर्चा सुरू झाली. जो तो आपलें श्रेष्ठत्व प्रतिपादन करणार हें स्वाभाविकच आहे. शंकर म्हणाले, मी सर्वांत श्रेष्ठ आहे. मी देवांचा देव आहे. म्हणूनच मला महादेव म्हणतात. शेवटीं परीक्षा घ्यावयाचें ठरलें. महादेवाचें मोठेंपण परीक्षून पहाण्याकरितां भगवान् विष्णु वराहरूप धारण करून महादेवाचा ठाव घेण्यासाठीं खालीं निघाले आणि ब्रह्मदेव हंसरूप धारण करून महादेवाच्या मस्तकाचा ठाव घेण्यासाठीं वर निघाले. दोघेहि थकले. विष्णूलाहि शंकराच्या पायांचें दर्शन घडलें नाहीं आणि ब्रह्मदेवालाहि शंकराच्या मस्तकाचें दर्शन घडलें नाहीं. भगवान् विष्णु प्रामाणिकपणें शंकरांना म्हणाले, महाराज ! मी थकलों. मला कांहीं आपल्या पायांचें दर्शन घडलें नाहीं. आपल्या पायांचा पत्ता लागला नाहीं. मी हरलों हें मी मान्य करतों. "वराहरूप धारण करून मी पाताळापर्यंत आपले चरण शोधण्याचा प्रयत्न केला, पण आपलें चरणकमल मला दिसलें नाहींत." याप्रमाणें महादेवाचें चरण न दिसण्याच्या बाबतींत सत्य भाषण करणाऱ्या शौरीला म्हणजे श्रीहरीला पाहून शंकराला त्याची दया आली व शंकरानें श्रीहरीला दयेनें सर्व जगांचा नाथ म्हणजे जगाचा पालनकर्ता जगन्नाथ बनविलें असा ज्याचा अनुग्रह आहे ! त्याचप्रमाणें हंसाचें रूप घेऊन शंकराच्या मस्तकाचा थांगपत्ता लावूं पहाणारा ब्रह्मदेवहि थकला, पण त्याला शंकराचें मस्तक दिसलेंच नाहीं ! तथापि त्यानें शंकरांना त्यांच्याजवळ येऊन खोटेंच सांगितलें कीं, मला तुमचें मस्तक दिसलें. मी तुमच्या मस्तकाचा थांगपत्ता लावला. हें ब्रह्मदेवाचें खोटें भाषण ऐकून शंकराला राग आला व त्यांनीं ब्रह्मदेवाला शाप दिला कीं, तुम्हांला आजपासून कोणी पूज्य मानणार नाहीं. तुमची पूजा अथवा सत्कार होणार नाहीं. याप्रमाणें शंकरानें ब्रह्मदेवाला सर्वकाळ अपूज्यच ठरविलें ! असा ज्याचा कोप आहे, त्या परब्रह्मस्वरूप सांबसदाशिवाच्या ठिकाणीं माझें मन सदासर्वकाळ आनंदानें रमो. "गर्वाचें घर खालीं असतें" व "सत्याची शोरवी अगाध असते" हीं दोन तत्त्वें या श्लोकांत मोठ्या खुबीनें प्रतिपादिलीं

आहेत." वराहवपुषं शौरिं पादाम्बुजादर्शने सत्यगिरं दृष्ट्वा यः दयया (तं) समस्तजगतां नाथं चक्रे, हंसस्वरूपं विधिं शिरोदर्शने मिथ्यावाचं दृष्ट्वा (कोपेन) तं सततं अपूजयं एव चक्रे, तस्मिन् परब्रह्मणि सांबे मे हृदयं सुखेन रमताम्।) असा या श्लोकाचा अन्वय समजावा.

यस्यामन्धरणीजलाग्निपवनव्योमार्कचन्द्रादयो
विख्यातास्तनवोऽष्टधा परिणता नान्यत्ततो वर्तते।
ओंकारार्थविवेचनी श्रुतिरियं चाचष्ट तुर्यं शिवं
तस्मिन्मे हृदयं सुखेन रमतां साम्बे परब्रह्मणि ॥ ९ ॥

ज्याच्या आठ मूर्ति प्रख्यात आहेत. (आसन् हें क्रियापद भूतकाळाचें असलें तरी येथें त्याचा अर्थ वर्तमानकाळाप्रमाणेंच करावयाचा आहे. कारण भगवान शंकर पूर्वी म्हणजे सृष्टीच्या आरंभकाळीं जसें अष्टरूपानें परिणत झाले तसे ते आजहि आहेत.) धरणी म्हणजे पृथ्वी, जल म्हणजे पाणी, अग्नि म्हणजे तेज, पवन म्हणजे वायु आणि व्योम म्हणजे आकाश. हीं पंचमहाभूतें तसेंच अर्क म्हणजे सूर्य आणि चंद्र हा प्रसिद्धच आहे. आदि शब्दानें आत्मा याप्रमाणें शंकराच्या आठ तनु म्हणजे शरीरें अर्थात् स्वरूपें शास्त्रांत, पुराणांत प्रसिद्ध आहेत. पंचमहाभूतें, सूर्य, चन्द्र आणि आत्मा हीं शंकराचींच रूपें आहेत. भगवान् शंकरच या आठ रूपानें परिणत झालेले आहेत. त्यांच्याशिवाय दुसरें कांहीं नाहीं. ॐकाराच्या अर्थाचें विवेचन करणारी ही प्रसिद्ध श्रुति म्हणजे माण्डूक्यो पनिषद, या माण्डूक्योपनिषदानें ज्याचें वर्णन करतांना ज्याला तुर्य म्हणजे तुरीय अर्थात् जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तीन अवस्थांच्या पलीकडचा किंवा विश्व, तैजस आणि प्राज्ञ यांच्या पलीकडचा चौथा – अनिर्वचनीय असें म्हटलेलें आहे. ज्याला शिव म्हणजे परब्रह्म म्हणतात त्या परब्रह्मस्वरुपी सांबाच्या ठिकाणीं माझें मन सदा आनंदानें रमो.

विष्णु-ब्रह्म-सुराधिप-प्रभृतयः सर्वेऽपि देवा यदा
सम्भूताज्जलधेर्विषात्परिभवं प्राप्तास्तदा सत्वरम्।
तानार्तांश्शरणागतानिति सुरान्योऽरक्षदर्धक्षणा-
त्तस्मिन्मे हृदयं सुखेन रमतां साम्बे परब्रह्मणि ॥ १० ॥

भगवान् विष्णु, ब्रह्मदेव आणि इंद्र इत्यादि सर्व देव अमृताच्या आशेनें समुद्राचें मंथन करूं लागले असतां त्या समुद्रांतून (भयंकर) विष निर्माण झालें. त्या विषाला पाहून सर्व देव घाबरले. विषापुढें ते हतबल झाले. अशी जेव्हां स्थिति झाली तेव्हां ते सर्व देव ताबडतोब शंकराला शरण गेले. हे देव हालाहल विषानें पीडित झालेले आहेत आणि आपल्याला शरण आलेले आहेत असें समजून ज्यानें विष प्राशन करून त्या देवांचें ताबडतोब क्षणार्धांत संरक्षण केलें, (देवांचेंच नव्हे तर असुरांचें–दैत्यांचें व सर्व जगांचेंहि संरक्षण केलें) त्या परब्रह्मस्वरूप असलेल्या सांबसदाशिवाच्या ठिकाणीं माझें मन सुखानें राहो. आनंदानें रमो. (विश्वाच्या कल्याणाकरितां शंकरानें विषहि प्राशन केलें! केवढें हें परोपकारी जीवन आणि केवढी ही दयार्द्र बुद्धि! कां न अशा देवाला महादेव म्हणावें!)

■ ■ ■

शिवनामावल्यष्टकम्।

[शंकराची स्तुति-प्रार्थना करीत करीत आचार्यांनीं या स्तोत्रांत महादेवाचीं अनेक नांवें गोविलेलीं आहेत. तीं सर्व नांवें शंकराचा स्वभाव, रूप आणि चरित्र व्यक्त करणारीं आहेत. अज्ञानरूपी दारिद्र्याचीं दुःखें जाळून टाकण्याकरितां आणि संसाररूपी दुःखजालांतून आपली सुटका करून घेण्याकरितां या अष्टकाची रचना झालेली आहे.

शिवनामाचा महिमा फार मोठा आहे. रामनामाप्रमाणेंच शिवनामालाहि तारकब्रह्म म्हटलेलें आहे. "शिव इत्यस्ति यन्नाम तद्धि नामोत्तमोत्तमम्।", "तारकं ब्रह्म परमं शिव इत्यक्षरद्वयम्।" शिव हें नाम सर्व नामांमध्यें अत्यंत उत्तम नाम आहे. शिव हीं दोन अक्षरें तारकब्रह्मच होत, असें शिवरहस्यामध्यें वर्णन केलेलें आहे. शिवनामाप्रमाणेंच शंकराच्या इतरहि नामांचा महिमा वर्णिलेला आहे. "महादेव महादेव महादेवेति यो वदेत्। एकेनैव भवेन्मुक्तिर्द्वाभ्यां शम्भुर्ऋणी भवेत्॥" महादेव महादेव महादेव असा तीन वेळां महादेव शब्दाचा उच्चार केला तर त्यांतील एका नामोच्चारानेंच मोक्षसुखाचा लाभ होतो व राहिलेल्या नामोच्चारांनीं भगवान् शंकर हे आपले ऋणी होतात. व्यवहारामध्यें ऋणकोला धनकोच्या सर्व

कामना पूर्ण कराव्या लागतात. त्याचप्रमाणें ऋणी झालेले भगवान् शंकर हे भक्तजनांच्या सर्व कामना पूर्ण करतात, असें शैवपुराणांत वर्णिलेलें आहे.

नामाचा महिमा केवळ पुराणांनीं किंवा संतांनींच वर्णन केलेला आहे असें नसून तो वेदांनीं व शास्त्रांनींहि वर्णन केलेला आहे. तत्त्ववेत्ते ऋषि-मुनि देखील नाममहिमा मुक्तकंठानें गातात. यावरून नामस्मरण हें निरुद्योगी आणि भोळ्या-भाबड्या लोकांचें काम आहे असा नामस्मरणाबद्दल विपरीत ग्रह करून घेणें हें अज्ञानाचें व दुर्दैवाचें लक्षण ठरेल. "वेद, शास्त्रें, पुराणें आणि संतवाङ्मय यांत वर्णन केलेला नाममहिमा हा अर्थवादस्वरूपाचा आहे" असें कोणी शहाणे म्हणविणारे लोक म्हणत असतात; पण शास्त्रवेत्त्यांना हें संमत नाहीं. "नाम्न्यर्थवादभ्रमः" नामाचा महिमा हा अर्थवाद आहे असें मानणें हा निव्वळ भ्रम आहे असें म्हटलेलें आहे. हा भ्रम असेतोंपर्यंत केलेलें नामस्मरण हें व्यर्थच होत असतें ! हा भ्रम असणें हा एक अपराध मानला जातो. अपराध असेतोंपर्यंत फलप्राप्ति कशी होणार ? किंबहुना नामस्मरणाचा महिमा हा अर्थवाद आहे असें मानणें हें एक मोठें पाप आहे. या पापानें पापी बनलेल्या मनुष्याला निरय म्हणजे दुःखच भोगावें लागतें. " अर्थवादं हरेर्नाम्नि सम्भावयति यो नरः । स पापिष्ठो मनुष्याणां निरये पतति ध्रुवम् । " (कात्यायनसंहिता)

यावर कोणी असें विचारील कीं, अहो ! ज्या पापांचीं फळें जन्मभर किंवा अनेक जन्म घेऊनहि दुःखरूपानें भोगावीं लागतात तीं पापें केवळ नामस्मरणानें कशीं नाहींशीं होतील ? तीं केवळ नामस्मरणानें नाहींशीं होत असतील तर मग त्या पापांच्या निरसनाकरितां धर्मशास्त्रानें जीं कृच्छ्रचान्द्रायणादि खडतर प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत त्यांचा तरी काय उपयोग ? यावर उत्तर असें कीं, कापसांचे ढीग कितीहि प्रचंड असले तरी अग्नीची ठिणगी त्यांना भस्म करून टाकते. हत्तीसारखे प्रचंड देहहि बिंदुमात्र सर्पविषानें नाश पावतात. यालाच प्रभाव, शक्ति किंवा सामर्थ्य असें म्हणतात. भगवन्नामाचाहि असाच प्रभाव आहे.

दुसऱ्या शंकेचें उत्तर असें कीं, एकाच कार्याचीं अनेक साधनें असूं शकतात. कोणत्याहि साधनानें कार्य सिद्ध करून घ्यावें. एका साधनानें दुसरें साधन निरर्थक ठरत नाहीं. आतां नामसंकीर्तनासारखें सोपें साधन सोडून कृच्छ्रचान्द्रायणादि अवघड असलेल्या प्रायश्चित्ताकडे कोण प्रवृत्त होईल ? असें कोणीं विचारल्यास " रुचीनां वैचित्र्यात् " हेंच त्याला उत्तर आहे. " भिन्न-

रुचिर्हि लोकः " लोकांची अभिरुचि ही भिन्न भिन्न असते. ज्याला जें आवडेल तो त्या साधनाकडे प्रवृत्त होईल. तात्पर्य, नामस्मरणाचा महिमा हा अर्थवादस्वरूपाचा नसून तो पूर्ण सत्य आहे.

हरिनाम हें केवळ पातकांचाच नाश करतें असें नसून त्याच्या योगानें अपार पुण्याच्या राशीहि जोडल्या जातात. " हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा पुण्याची गणना कोण करी ? " कोणी म्हणेल, अहो हा हरिनामाचा महिमा आहे. शिवनामाचा महिमा कोठें आहे ? यावर उत्तर असें कीं, जो हरिनामाचा महिमा तोच शिवनामाचाहि पण आहे. हरि आणि हर यांच्यांत तत्त्वतः भेद नाहीं. ते दोन्ही एकच आहेत. त्यांनीं स्वीकारलेलीं कार्यें व कार्यानुरूप असलेले देहरूपी उपाधि हे भिन्न असल्यामुळें ते निराळे आहेत अशी कल्पना येते. या कल्पनेमुळेंच अज्ञ जन त्यांच्या रूपांत तात्त्विक भेद मानतात. एकच नट अनेक प्रकारच्या भूमिका घेऊन रंगभूमीवर आल्यामुळें तो जसा अनेक प्रकारचा भासतो तसाच हा प्रकार आहे. शब्दशास्त्राच्या दृष्टीनें देखील हरि आणि हर या दोन्ही शब्दांतील मूळ प्रकृति "हृ" धातु हा एकच आहे. केवळ प्रत्ययभेदानें शब्दाचें रूप भिन्न झालें. 'इ' प्रत्यय लागून हरि शब्द बनला व 'अ' प्रत्यय लागून हर शब्द बनला. एवढाच काय तो फरक आहे. " हरिहरयोः प्रकृतिरेका, प्रत्ययभेदेन रूपभेदोऽयम्। एकस्यैव नटस्यानेकविधा भूमिकाभेदात्। " तात्पर्य, शिव आणि विष्णु हे एकच आहेत. जसे शिव हे विष्णुमय आहेत त्याचप्रमाणें विष्णु हेहि शिवमयच आहेत. " यथा शिवमयो विष्णुरेवं विष्णुमयः शिवः। " असा शास्त्रज्ञांचा सिद्धान्त आहे.

हरिनामानें अथवा शिवनामानें भक्तांचा कसा विकास होतो हें पहाण्यासारखें आहे. प्रथम भगवन्नामाचा ध्यास लागतो. अखंड नामस्मरणानें मनुष्याचीं कश्मलें दूर होतात. कश्मलांचें निरसन झालें कीं, तेथें त्याच नामस्मरणाच्या प्रभावानें पुण्य निर्माण होतें. त्या पुण्यप्रभावानेंच वैराग्याचाहि लाभ होतो. इंद्रपदाचें व ब्रह्मपदाचेंहि ऐश्वर्य तुच्छ वाटूं लागतें. त्याच पुण्यानें श्रीगुरूंचा लाभ होतो. त्यांच्या चरणीं भक्ति निर्माण होते. सद्गुरूंच्या उपदेशानें परमात्मस्वरूपाचें यथार्थ ज्ञान मिळतें. त्या ज्ञानानें जन्ममरणरूपी संसारभ्रांतीचें बीज जळून जातें. अंतःकरणांत संपूर्ण आनंदाचा प्रकाश पडतो व त्या आनंदानें जीव ब्रह्मपदीं स्थिर होतो व कृतार्थ होतो. या प्रमाणें भगवन्नामस्मरण हें जीवाला नित्यनिरतिशय

आनंदस्वरूप असलेल्या परब्रह्माच्या ठिकाणीं नेऊन पोहोंचवितें आणि मगच तें विराम पावतें.

विष्णोर्नामैव पुंसः शमलमपनुदत्पुण्यमुत्पादयच्च
ब्रह्मादि-स्थानभोगाद्विरतिमथ गुरुश्रीपदद्वन्द्वभक्तिम् ।
तत्त्वज्ञानं च विष्णोरिह मृति-जनन-भ्रान्ति-बीजं च दग्ध्वा
सम्पूर्णानन्दबोधे महति च पुरुषे स्थापयित्वा निवृत्तम् ॥

— मात्स्यपुराण

हा सर्व अभिप्राय लक्षांत घेऊनच आचार्यांनीं या शिवनामावलिरूपी अष्टकाची रचना केलेली आहे. फारच सुंदर आहे हें अष्टक.]

हे चन्द्रचूडमदनान्तक शूलपाणे
स्थाणो गिरीश गिरिजेश महेश शम्भो ।
भूतेश भीत-भय-सूदन मामनाथं
संसारदुःखगहनाज्जगदीश रक्ष ॥ १ ॥

हें शंकरा ! आपल्या जटेमध्यें चंद्र विराजमान असल्यामुळें आपणांस "चंद्रचूड" असें म्हणतात. आपण जगाला छळणाऱ्या मदनाचा नाश केला म्हणून आपणांस "मदनांतक" 'मदनारि' असें म्हणतात. आपल्या हातांत शूल आहे. त्रिशूळ आहे म्हणून आपणांस शूलपाणि असेंहि म्हटलेलें आहे. आपण एखाद्या वृक्षाच्या बुंध्याप्रमाणें अचल निर्विकार आहां म्हणून आपणांस स्थाणु असें नांव मिळालें. आपण हिमालय प्रदेशाचें अधिपति आहां म्हणून आपणांस "गिरीश" असें म्हणतात. (गिरीश शब्दांतील 'री' ऱ्हस्व केल्यास "गिरिश" म्हणजे कैलास पर्वतांवर शयन करणारा, विश्रांति घेणारा असाहि अर्थ होतो.) हे शंकरा ! आपण हिमालयाची कन्या जी गिरिजा तिचे पति आहां म्हणून आपणांस "गिरिजेश" "गिरिजापति" "गिरिजारमण" इत्यादि नांवें मिळालीं. प्रभो ! आपण महान् ईश म्हणजे थोर सत्ताधारी आहां म्हणून आपणांस "महेश" किंवा "महेश्वर" असें म्हणतात. आपणांपासून सर्वांचें "शं" म्हणजे कल्याण होतें किंवा आपणांपासून सर्वांना सुख मिळतें म्हणून आपणांस शंभु असें म्हटलें आहे. शंकरा ! आपण सर्व भूतांचे भूतप्रेतपिशाच्च इत्यादि गणांचे अधिपति आहां म्हणून "भूतेश" "भूतपति" इत्यादि आपलीं नावें आहेत. हे शंकरा ! आपण संसार, संकटें

आणि मृत्यु इत्यादिकांना भ्यालेल्या लोकांचें भय नाहींसे करतां म्हणून आपणांस भीत-भय-मृदन असें म्हटलें आहे. हे जगदीशा विश्वनाथा ! मी अनाथ आहें. अत्यंत गहन असलेल्या या संसारदुःखांतून आपण माझें रक्षण करा. संसारदुःखरूपी अरण्यांतून माझें रक्षण करा.

हे पार्वतीहृदयवल्लभ चन्द्रमौले
भूताधिप प्रमथनाथ गिरीशचाप ।
हे वामदेव भव रुद्र पिनाकपाणे
संसारदुःखगहनाज्जगदीश रक्ष ॥ २ ॥

हे शंकरा ! आपण पार्वतीचे हृदयवल्लभ म्हणजे प्राणप्रिय, अत्यंत आवडते आहां. आपल्या मस्तकावर चंद्र असल्यामुळें आपणांस "चंद्रमौलि" असें म्हणतात. आपण भूतगणांचे अर्थात प्रमथगणांचे नाथ म्हणजे संरक्षण करणारे आहां. म्हणून आपणांस प्रमथनाथ असें म्हणतात. नगाधिराज हें आपलें धनुष्य आहे म्हणून आपणांस "गिरीशचाप" असें म्हणतात. आपण वाम म्हणजे सुंदर आणि देव म्हणजे प्रकाशमान, दिव्य, तेजस्वी आहां म्हणून आपणांस वामदेव म्हटलेलें आहे. वाम शब्दाचा अर्थ कोणी कोणी विपरीत आचरण करणारा असाहि करतात. देव शब्दाचाहि अर्थ खेळाडू सर्वभूतांमध्यें आत्मस्वरूपानें विराजमान असणारा किंवा सर्वांना आपआपल्या कार्यामध्यें प्रोत्साहन देणारा असाहि केलेला आहे.

सर्व विश्वाची उत्पत्ति आपणांपासून होते म्हणून आपणांस "भव" म्हटलेलें आहे. आपण शत्रूंना रडविलां म्हणून आपणांस रुद्र म्हटलेलें आहे. आपल्या धनुष्याचें नांव "पिनाक" आहे. तें धनुष्य नेहमीं आपल्या हातांत असतें म्हणून आपणांस "पिनाकपाणि" असें म्हणतात. हे जगदीशा ! अत्यंत तापदायक असलेल्या या संसाररूपीगहन अरण्यांतून आपण माझें रक्षण करा.

हे नीलकण्ठ वृषभध्वज पञ्चवक्त्र
लोकेश शेषवलय प्रमथेश शर्व ।
हे धूर्जटे पशुपते गिरिजापते मां
संसारदुःखगहनाज्जगदीश रक्ष ॥ ३ ॥

हे नीलकंठा ! विश्वशांतीसाठीं आपण हालाहल विष प्राशन केलें. तें विष अत्यंत प्रभावी असल्यामुळें त्या विषानें आपला कंठ निळा झाला. म्हणून आप-

णांस "नीळकंठ" असें म्हणतात. आपल्या ध्वजावर – पताकेवर वृषभाचें म्हणजे बैलाचें नंदीचें चिह्न आहे म्हणून आपलें नांव "वृषभध्वज" पडलें. आपणांस पांच मुखें असल्यामुळें "पंचवक्त्र" किंवा "पंचानन" असें म्हणतात. आपण सर्व लोकांचे ईश म्हणजे स्वामी आहां म्हणून "लोकेश" असें आपलें नांव आहे. शेषाला आपण आपल्या हातांतील कडें बनविलें आहे म्हणून "शेषवलय" अथवा "फणिभूषण" असेंहि आपणांस म्हटलें जातें. आपण प्रमथगणांचे ईश आहां म्हणून आपणांस "प्रमथेश" किंवा "प्रमथनाथ" असें म्हणतात. प्रलयकालीं सर्व सृष्टीचा लय आपणच करतां म्हणून आपणांस "शर्व" असें म्हटलें आहे. (शृणातीति शर्वः) धुर् म्हणजे धुरा अर्थात् धुरेप्रमाणें तुमच्या मस्तकावर जटाभार शोभत आहे म्हणून तुम्हाला "धूर्जटि" असें म्हणतात. किंवा धुर् म्हणजे गंगा, ती तुमच्या जटेमध्यें विराजमान आहे म्हणूनहि तुम्हांला "धूर्जटि" असें म्हटलेलें आहे. अथवा " धुरस्त्रैलोक्यचिन्तायाः जटिः संङ्घातो यत्र वा " या व्युत्पत्तीप्रमाणें त्रैलोक्याची अनेक प्रकारें चिंता वाहणारा असाहि अर्थ होतो. त्रैलोक्याची सर्व प्रकारची चिंता भगवान् शंकर वाहतात म्हणून शंकरांना धूर्जटि असें नांव पडलें आहे. हे शंकरा ! पशु म्हणजे नंदी किंवा पशु म्हणजे जीव त्यांचे तुम्ही अधिपति, स्वामी, पालक आहां म्हणून तुम्हाला "पशुपति" असें म्हटलेलें आहे. गिरि म्हणजे हिमालय पर्वत. त्याची कन्या गिरिजा म्हणजे पार्वती तिचे तुम्ही पति आहां म्हणून तुम्हांला "गिरिजापति", "पार्वतीपति", "गिरिजारमण" "पार्वतीरमण" इत्यादि नांवांनीं संबोधितात. हें जगदीशा ! अत्यंत कठीण असलेल्या या संसारतापांतून आपण मला सोडवा. माझें रक्षण करा.

हे विश्वनाथ शिव शङ्कर देवदेव
गङ्गाधर प्रमथनायक नन्दिकेश ।
बाणेश्वरान्धकरिपो हर लोकनाथ
संसारदुःखगहनाज्जगदीश रक्ष ॥ ४ ॥

हे परमेश्वरा ! आपण विश्वाचें नाथ आहां म्हणून आपणांस "विश्वनाथ" ही संज्ञा मिळाली. आपण शिव म्हणजे मंगलमय परब्रह्म आहां. आपण शंकर म्हणजे भक्तजनांचें कल्याण करणारे आहां. भक्तजनांना सुख देतां म्हणून तुम्हांला शंकर असें म्हटलेलें आहे. आपण "देव-देव" म्हणजे देवांचेहि देव आहां. हे प्रभो-

आपण मस्तकावर गंगेला धारण केलेलें आहे म्हणून आपणांस "गंगाधर" असें म्हणतात. आपण प्रमथगणांचे अधिनायक आहां म्हणून "प्रमथनायक" असेंहि आपणांस म्हणतात. आपण "नंदिकेश्वर" म्हणजे नंदीचे स्वामी आहां. बलीचा पुत्र बाणासुर हा आपला अनन्यभक्त म्हणून त्याला तुम्हीं "सायुज्यता" दिली म्हणूनच आपल्याला "बाणेश्वर" हें नांव मिळालें. अंधक नांवाच्या दैत्याचा आपण वध केला म्हणून आपणांस "अंधकरिपु" म्हटलें आहे. आपण भक्तजनांची सर्व दुःखें हरण करतां म्हणून लोक आपणांस "हर" असें म्हणतात. आपण त्रैलोक्याचे नाथ म्हणजे संरक्षक आहां. म्हणून "लोकनाथ" "त्रिलोकीनाथ" अशी आपलीं नावें आहेत. हे जगदीश्वर ! आपण मला संसार-दुःखरुपी या गहन जंगलांतून पार करा. आपण माझें रक्षण करा.

वाराणसीपुरपते मणिकर्णिकेश
वीरेश दक्षमखकाल विभो गणेश ।
सर्वज्ञ सर्वहृदयैकनिवास नाथ
संसारदुःखगहनाज्जगदीश रक्ष ॥ ५ ॥

हे शंकरा ! आपण वाराणसी नगरीचे अधिपति आहां म्हणून आपणांस "वाराणसी-पुर-पति" किंवा काशिनाथ असेंहि म्हणतात. काशीमध्यें असलेलें मणिकर्णिकातीर्थ अथवा मणिकर्णिका देवी तिचेंहि "ईश" म्हणजे स्वामी तुम्हींच आहां. आपण वीरगणांचेहि स्वामी आहां म्हणून आपणांस "वीरेश" किंवा "वीरेश्वर" असें, म्हणतात. काशीस "आत्मावीरेश्वर" हें शंकराचें स्थान प्रसिद्ध आहे. हे प्रभो आपण दक्षप्रजापतीच्या यज्ञाचे जणुं कांहीं काळच झालांत म्हणून आपणांस "दक्ष-मख-काल" असें म्हटलें जातें. आपण विभू म्हणजे सर्वव्यापी आहां आणि गणेश म्हणजे शृंगीभृंगी आदि गणांचे अधिपति आहां. गणेश हें जसें शंकराच्या मुलाचें नांव आहे तसेंच तें शंकराचेंहि आहे. हे परमेश्वरा ! आपण सर्व कांहीं जाणत असल्यामुळें आपणांस सर्वज्ञ असेंहि म्हणतात. हे प्रभो सर्वांचें हृदय हेंच एक आपलें निवासस्थान आहे म्हणून आपण "सर्वहृदयैक-निवास" आहां. तसेंच आपण नाथ म्हणजे सर्वांचें पालक आहां, स्वामी आहां. हे जगदीशा ! आपण या अत्यंत जटिल असलेल्या संसारदुःखरूपी जंगलांतून मला बाहेर काढा. माझें रक्षण करा !

श्रीमन्महेश्वर कृपामय हे दयालो
हे व्योमकेश शितिकण्ठ गणाधिनाथ ।
भस्माङ्गराग नृकपाल-कलापमाल
संसारदुःखगहनाज्जगदीश रक्ष ॥ ६ ॥

हे शंकरा ! आपण श्रीमान् आहां. तुमच्याच कृपेनें इंद्र, विष्णु, कुबेर हे श्रीमान् आहेत. आपण महेश्वर आहां. आपण कृपापूर्ण आहां. परमदयालु आहां. व्योम म्हणजे आकाश, तें आपल्या मस्तकावरील केश-समूहाप्रमाणें दिसत आहे म्हणून आपणांस "व्योमकेश" म्हटलें आहे. आपला कंठ निळा दिसत आहे. हा निळा वर्ण विषाचा आहे. हालाहल विषच आपल्या कंठांत असल्यामुळें आपणांस "शितिकंठ" म्हणतात. आपण सर्वगणांचे अधिनाथ—अधिनायक आहां. चिता-भस्म हाच आपला "अंगराग" म्हणजे अंगाला लावण्याची जणुं कांहीं उटी आहे. तेंच आपण अंगाला लावतां म्हणून "भस्माङ्गराग" हें आपलें नांव पडलें. "नृ-कपाल-कलाप-माल" म्हणजे नरमुंडांच्या समूहाची माळा धारण करणारा असेंहि तुम्हांला म्हणतात. हे जगदीश ! या संसारतापाच्या गहन अरण्यांतून मला पार करा ! आपण माझें रक्षण करा.

कैलासशैल-विनिवास वृषाकपे हे
मृत्युञ्जय त्रिनयन त्रिजगन्निवास ।
नारायणप्रिय मदापह शक्तिनाथ
संसारदुःखगहनाज्जगदीश रक्ष ॥ ७ ॥

हे शंकरा ! आपलें वास्तव्य नेहमीं कैलास पर्वतावर असतें. हें परमेश्वरा ! आपण वृषाकपि आहां वृषाकपि या शब्दांत "वृष" आणि अकपि किंवा आकपि असे दोन शब्द आहेत. "वृष" म्हणजे भक्तजनांवर इष्ट फलांची वृष्टि करणारा (वर्षति कामान् इति वृषः) आकपि म्हणजे दुष्ट दैत्य, राक्षक यांचा थरकांप करून सोडणारा, घाबरवून सोडणारा. (आकंपयति पापान् इति आकपिः) तात्पर्य, भक्तांच्या कामना पूर्ण करणारा आणि दुष्टांचा थरकांप करून सोडणारा, तो वृषाकपि होय. अथवा "आकपि" म्हणजे पापांना कंपित करणारा. ज्याला पाहिल्याबरोबर पापें पळतात तो. वृष शब्दाचा अर्थ श्रेष्ठ असाहि आहे. जो

श्रेष्ठ असून भक्तजनांच्या पापांचें निरसन करतो तो वृषाकपि समजावा. कपि शब्दाचा अर्थ वानर प्रसिद्ध आहे. तो झाडांना, फांद्यांना कंपित करीत असतो म्हणून त्याला "कपि" म्हणतात. कपि म्हणजे कंपित करणारा. अकपि म्हणजे कंपित न करणारा. अर्थात् स्थिर राखणारा. वृष म्हणजे धर्म. धर्माला स्थिर राखण्याचें कार्य भगवान् शंकर करतात. म्हणूनहि त्यांना "वृषाकपि" असें म्हटलेलें आहे. अथवा वृष म्हणजे इंद्रादि देव, ते देखील ज्याला पाहून "आकम्पन्ते" म्हणजे थावरतात तो वृषाकपि अर्थात् इंद्रादि देवांच्या मनांत दरारा निर्माण करणारा तो वृषाकपि समजावा. भगवान् शंकर हे परब्रह्म परमात्मा परमेश्वर असल्यामुळें त्यांच्या भयानें वायु वाहण्याचें कार्य करतो. सूर्य उदयाला येतो. इंद्र पाऊस पाडतो. अग्नि उष्णता देतो. मृत्यु मारण्याचें कार्य करतो. सर्व देव आपआपलीं कार्यें शंकरांच्या भयानेंच करतात. "भीषास्माद्वातः पवते। भीषोदेति सूर्यः। भीषा इन्द्रश्चाग्निश्च मृत्युर्धावति पञ्चमः॥" असे वेदानेंहि ज्याचें वर्णन केलेलें आहे, तो वृषाकपि म्हणजे भगवान् शंकर. वृषाकपि शब्दाचा अर्थ भगवान् विष्णु असाहि आहे. "हरो विष्णुर्वृषाकपिः" असें कोशांत म्हटलें आहे. प्रकृतस्थली शंकरांची स्तुति असल्यामुळें वृषाकपि शब्दाचा अर्थ शंकर असाच होतो.

हे वृषाकपे शंकरा! आपण मृत्यूलाहि जिंकतां म्हणून आपणांस मृत्युंजय म्हटलेलें आहे. (भगवान् शंकर हे तर मृत्युंजय आहेतच, पण त्यांच्या नांवाच्या मंत्राचा जप करणाराहि मृत्यूला जिंकूं शकतो. मग शंकराबद्दला काय वर्णन करावें ?) हे त्रिनयना ! सूर्य, चंद्र आणि अग्नि हे आपले तीन नेत्र आहेत म्हणून आपणांस त्रिनयन किंवा त्रिलोचन असें म्हणतात. हा अर्थ "त्र्यंबक" या शब्दांतहि विवक्षित आहे. (त्रीणि अम्बकानि नयनानि यस्य सः त्र्यम्बकः). आणखीहि त्र्यंबक शब्दाचे अनेक अर्थ आहेत. हे त्रिजगन्निवासा ! त्रैलोक्याचें निवासस्थान म्हणजे आधार आपणच आहां. नारायण म्हणजे भगवान् विष्णु हे आपले अत्यंत प्रिय आहेत. आपणहि त्यांना अत्यंत प्रिय आहां. (शिवस्य हृदयं विष्णुः विष्णोश्च हृदयं शिवः). म्हणून हे शंकरा ! आपणांस नारायणप्रिय म्हटलेलें आहे.

"मदापह" म्हणजे दुष्टांच्या गर्वाचा परिहार करणारा. शक्तिनाथ म्हणजे आदिशक्ति महामाया जी महात्रिपुरसुंदरी तिचे तुम्ही स्वामी आहां. हे जगदीश्वरा ! अत्यंत क्लिष्ट असलेल्या या संसारदुःखजालांतून आपण माझें रक्षण करा.

विश्वेश विश्वभवनाशक विश्वरूप
विश्वात्मक त्रिभुवनैकगुणाधिकेश ।
हे विश्वनाथ करुणामय दीनबन्धो
संसारदुःखगहनाज्जगदीश रक्ष ॥ ८ ॥

हे विश्वेश्वरा ! आपण जगाच्या संसारदुःखाचा नाश करतां म्हणून आपणांस "विश्वभवनाशक" म्हणतात, आपण विश्वरूप आहां. साऱ्या विश्वाचा आत्मा आपणच आहां. त्रिभुवनामध्यें गुणांनीं श्रेष्ठ असलेल्यांचें मुख्य ईश म्हणजे स्वामी, तुम्हींच आहां. हे विश्वनाथा, हे करुणासागरा ! हे दीनबंधो जगदीशा ! आपण मला या संसारदुःखरूपी अरण्यांतून मुक्त करा. माझें रक्षण करा !

गौरीविलासभुवनाय महेश्वराय
पञ्चाननाय शरणागतरक्षकाय ।
शर्वाय सर्वजगतामधिपाय तस्मै
दारिद्र्यदुःखदहनाय नमः शिवाय ॥ ९ ॥

हे शंकरा ! गौरी म्हणजे पार्वती. तिच्या विलासाचें, क्रीडेचें, लीलांचें आपण "भवन" म्हणजे स्थान आहां. अर्थात् आपल्या आश्रयानेंच आदिशक्ति गौरी जी पार्वती तिच्या सर्व लीला जगदुत्पत्ति-स्थिति-संहारादिरूप क्रीडा त्या चालू आहेत आपण महेश्वर आहां. "पञ्चानन" म्हणजे पंचवक्त्र अथवा पंचमुख आहां. आपल्या चरणीं शरण आलेल्यांना आपण कल्पद्रुमाप्रमाणें त्यांचे सकल मनोरथ पूर्ण करतां. आपण "शर्व" म्हणजे विश्वाचे लयकर्ते आहां. आपण सर्व जगाचे अधिनायक आहां. हे शंकरा, एवंगुण-विशेषण-विशिष्ट असे जे तुम्ही, भक्तजनांच्या दारिद्र्यदुःखाला जाळून भस्म करणारे परब्रह्मस्वरूप असे जे तुम्ही, त्या तुम्हांला मी भक्तिपूर्वक प्रणाम करतों.

■ ■ ■

उमामहेश्वरस्तोत्रम् ।

[भगवान श्रीशंकर आणि देवी श्रीपार्वती यांना उद्देशून केलेल्या या स्तोत्राला आचार्यांनीं उमामहेश्वरस्तोत्र हें नांव दिलेलें आहे. आदिमाया महाशक्ति हीच प्रकृतस्थलीं उमा शब्दानें विवक्षित आहे. अनंतकोटि ब्रह्माण्डात्मक सर्व विश्वाचें ती संरक्षण करते म्हणून तिला उमा असें म्हणतात. (अवति इति उमा). सूत्रामध्यें मणि गोवावेंत त्याप्रमाणें सर्व विश्वाला ती आपल्या स्वरूपांत गोंवून ठेवते म्हणूनहि तिला उमा असें म्हणतात (ऊयते इति उमा). उङ् शब्दे या धातूवरूनहि उमा शब्द निष्पन्न होतो. सर्व शब्दसृष्टीचें मूलकारण असलेली जी शक्ति ती उमा, असा त्याचा अर्थ होतो. " यद्वाचाऽनभ्युदितं, येन वाग-भ्युद्यते, तदेव ब्रह्म त्वं विद्धि " जें वाणीनें बोलून दाखवतां येत नाहीं पण वाणी मात्र ज्याच्यामुळें बोलावयास प्रवृत्त होते तेंच ब्रह्म होय. या उपनिषद्वचनाप्रमाणें उमा ही प्रत्यक्ष ब्रह्मस्वरूपच आहे. म्हणूनच तर " या देवी सर्वभूतेषु शक्ति-रूपेण संस्थिता ", " चितिरूपेण या कृत्स्नमेतद्व्याप्य स्थिता जगत् " अशा शब्दांनीं मार्कण्डेयांनीं तिचें वर्णन केलेलें आहे. केनोपनिषदांतहि अग्नि, वायु आणि इंद्र इत्यादि देवांना ब्रह्मविद्येचा उपदेश देण्याकरितां ती प्रकट झाली असतां " उमा हैमवती " अशा शब्दांनींच तिचा उल्लेख केलेला आहे. तीच ही आदिशक्ति पुढें पर्वतराजाच्या पोटीं अवतरल्यामुळें तिला पार्वती असें नांव पडलें. परब्रह्मस्वरूप असलेल्या शंकराची प्राप्ति व्हावी म्हणून पार्वती तपश्चर्येला निघाली असतां तिच्या आईनें " उ मा " असे शब्द उच्चारले. हे मुली, घोर अरण्यांत तपश्चर्येला जाऊं नकोस. असा त्याचा अर्थ आहे. तेव्हांपासून उमा हेंच तिचें नांव पडलें. " उ मेति मात्रा तपसो निषिद्धा पश्चादुमाख्यां सुमुखी जगाम " (कालिदास).

उ शब्दाचा अर्थ शंकर असा आहे. पार्वतीनें शंकराला वरल्यानंतर ती जणुं कांहीं शंकराची मा म्हणजे लक्ष्मीच झाली म्हणूनहि तिला उमा असें म्हटलें आहे. " ओः हरस्य मा लक्ष्मीः इति उमा " असा उमा शब्दाचा विग्रह आहे. " उं शिवं माति अथवा मिमीते इति उमा " परिपूर्ण परब्रह्मस्वरूप असलेल्या शंकरालाहि तिनें परिच्छिन्न परिमित रूप धारण करावयास लावलें म्हणूनहि तिला उमा असें म्हटलेलें आहे. हा झाला उमा शब्दाचा अर्थ.

महेश्वर म्हणजे शंकर. "महांश्चासौ ईश्वरश्च महेश्वरः" महान् म्हणजे सर्वांत थोर आणि ईश्वर म्हणजे अधिपति. अर्थात् कर्तु अकर्तु अन्यथा कर्तु समर्थ असलेला सर्वश्रेष्ठ असा महेश्वर या शब्दाचा अर्थ आहे. "महत्या ईश्वरः महेश्वरः" असा विग्रह केल्यास, महती म्हणजे महामाया आदिशक्ति जी पार्वती तिच्यामुळें जो ईश्वर झाला, ऐश्वर्यपदाला प्राप्त झाला तो भगवान् सदाशिव असाहि महेश्वर शब्दाचा अर्थ होतो. अथवा "महतां ईश्वरः महेश्वरः" अग्नि, वायु, इंद्र, ब्रह्मा, विष्णु इत्यादि विश्वांतील बड्या बड्या देवांचाहि तो ईश्वर म्हणजे अधिपति आहे म्हणूनहि त्याला महेश्वर असें म्हणतात. "विश्वस्यानां च सर्वेषां महतामीश्वरः स्वयम्। महेश्वरं च तेनेमं प्रवदन्ति मनीषिणः" (ब्रह्मवैवर्त, प्रकृतिखंड).

उमामहेश्वर म्हणजे पार्वती आणि शंकर. समस्त विश्वाच्या कल्याणाला कारणीभूत असलेला ज्ञानराशि विश्वाच्या स्वाधीन करण्याकरितां एकच चित्तत्व शिवपार्वतीच्या रूपानें नटलें. मंत्र, तंत्र, उपासना, योग, सदाचार, भक्ति, तत्त्वज्ञान आणि इतिहास तसेंच नृत्य, वाद्य आणि संगीत इत्यादि सर्व विषयांत आदिकर्ती म्हणून भगवान् शंकरच आपल्या दृष्टीस पडतील तर आदि श्रोत्याचें कार्य देवी पार्वतीनें केलेलें आहे असें दिसून येईल. संस्कृत वाङ्मयातील प्रायः सर्व विषयांचा उगम "कैलास शिखरे रम्ये गौरी पृच्छति शंकरम्" अशा अर्थाच्या वाक्यानें झालेला दृष्टीस पडतो, तर जगत्पिता भगवान् शंकर विश्वाच्या कल्याणाकरितां लागलीच तावडतोब "शृणु देवि प्रवक्ष्यामि सर्वेषां हितमुत्तमम्" अशा अर्थाच्या वाक्यानें पार्वतीच्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यास उत्सुक असलेले दृष्टीस पडतात. असे हे जगाचे मातापिता स्वरूपतः दोन पृथक् असले तरी तत्त्वतः ते एकच आहेत. शब्द आणि अर्थ हे जसे एकमेकांशीं संपृक्त आहेत त्याचप्रमाणें शब्दस्वरूप उमा व अर्थस्वरूप महेश्वर हेहि एकमेकांशीं संलग्न आहेत. शब्दाचा अनुगम असल्याशिवाय कोणत्याहि अर्थाची प्रतीति येऊं शकत नाहीं. त्याचप्रमाणें उमेचें साहाय्य असल्याशिवाय परमेश्वराचीहि प्रतीति येणार नाहीं. म्हणूनच उमा ही श्रीविद्यास्वरूप आहे तर महेश्वर हे परब्रह्मस्वरूप आहेत "उमासहायं परमेश्वरं प्रभुम्" असें उपनिषदांनेंहि पण महेश्वराचें वर्णन केलेलें आहे. तात्पर्य, उमा म्हणजे पार्वती आणि महेश्वर म्हणजे शंकर. आचार्यांनीं या स्तोत्रांत दोघांचेंहि वर्णन अत्यंत गोड शब्दांनीं केलेलें आहे.]

नमः शिवाभ्यां नवयौवनाभ्यां
परस्पराश्लिष्ट-वपुर्धराभ्याम् ।
नगेन्द्रकन्या-वृषकेतनाभ्यां
नमो नमः शंकर-पार्वतीभ्याम् ॥ १ ॥

अर्थ आणि शब्द यांचा संबंध जसा अविभाज्य आहे अथवा शक्ति आणि शक्तिमान् हे जसे एकरूप आहेत त्याचप्रमाणें अखिल विश्वाचे माता आणि पिता असलेले भगवान् श्रीशंकर आणि देवी पार्वती दोघेहि नित्य एकरूपच आहेत. हीं त्यांची एकरूपता दाखविण्याकरितांच आचार्यांनीं "शिवाभ्यां" असा एकच शब्द योजला आहे. " शिवा च शिवश्च शिवौ ताभ्यां शिवाभ्याम् " या समासाला एकवद्भाव असें म्हणतात. शिव म्हणजे कल्याणकर्ता. माता आणि पिता ज्याप्रमाणें मुलांचे हितचिंतक असतात, त्याचप्रमाणें सर्व विश्वाला जन्म देणारे शिव आणि पार्वती हे विश्वाचे कल्याणकर्तेच आहेत. या अभिप्रायानें त्यांनीं शिव शब्द योजला आहे. शिवशब्दाचेंच स्त्रीलिंगीरूप शिवा असें होतें. शिवस्वरूप असलेल्या दोघांना माझा नमस्कार असो.

शिव शब्दाचा अर्थ ब्रह्म असाहि आहे. ब्रह्मस्वरूप असलेले पार्वतीपरमेश्वर हे नित्य नवयौवन आहेत. विश्वपरंपरा ही अनादि व अनंत आहे. सर्व विश्वांच्या मुळाशीं विश्वाचे जनक म्हणून पार्वतीपरमेश्वरच आहेत. या दृष्टीनें त्यांच्याकडे जेव्हां पहावें तेव्हां ते नवयौवनावस्थेतच असतात. एकमेकांशीं संलग्न असलेलीं रूपें त्यांनीं धारण केलेलीं आहेत. पार्वती ही नगाधिराज हिमालयाची कन्या आहे व श्रीशंकर हे वृषभध्वज आहेत. शंकरांच्या ध्वजावर नंदीचें चिह्न आहे. अशा या शंकर-पार्वतींना माझा वारंवार नमस्कार असो.

नमः शिवाभ्यां सरसोत्सवाभ्यां
नमस्कृताभीष्ट-वरप्रदाभ्याम् ।
नारायणेनार्चित-पादुकाभ्यां
नमो नमः शंकर-पार्वतीभ्याम् ॥ २ ॥

सरस म्हणजे घनदाट, उत्सव म्हणजे आनंद. भगवान् शंकर आणि श्रीपार्वतीदेवी हे नित्य आनंदघन असल्यामुळें त्यांना सरसोत्सव असें म्हटलें

आहे. जे कोणी त्यांच्या चरणीं अनन्यप्रेमानें नमस्कार करतील त्यांना ते अभीष्ट वर देणारे आहेत. नारायणानें ज्यांच्या चरणकमलांची पूजा केलेली आहे, त्या शंकर-पार्वतींना माझा वारंवार नमस्कार असो.

नमः शिवाभ्यां वृषवाहनाभ्यां
विरिञ्चि-विष्णवेन्द्र-सुपूजिताभ्याम् ।
विभूति-पाटीर-विलेपनाभ्यां
नमो नमः शंकर-पार्वतीभ्याम् ॥ ३ ॥

वृष म्हणजे नंदीश्वर. त्याला ज्यांनीं आपलें वाहन केलें आहे त्या शिव-पार्वतींना मी नमस्कार करतों. विरिंचि म्हणजे ब्रह्मदेव. त्याचप्रमाणें विष्णु आणि इंद्र इत्यादि देवांनीं मनोभावें त्यांची पूजा-अर्चा केलेली आहे. शंकरांनीं आपल्या सर्वांगाला भस्म लावलेलें आहे तर पार्वतीनें आपल्या सर्वांगीं चंदनाची उटी लावलेली आहे. अशा त्या शंकर-पार्वतींना मी भक्तिपूर्वक नमस्कार करतों.

नमः शिवाभ्यां जगदीश्वराभ्यां
जगत्पतिभ्यां जयविग्रहाभ्याम् ।
जम्भारिमुख्यैरभिवन्दिताभ्यां
नमो नमः शंकर-पार्वतीभ्याम् ॥ ४ ॥

जगाचे ईश्वर असलेल्या शिवपार्वतीला नमस्कार असो. ते सर्व जगाचे अधिपति आहेत. त्यांचा देह जयप्रद आहे. त्यांच्या मूर्तींचें चिंतन आणि पूजन केलें असतां जय प्राप्त होतो. जम्भासुराचा इंद्रानें वध केलेला असल्यामुळें इंद्राला जंम्भारि असें म्हणतात. जम्भारि म्हणजे इंद्र. तो ज्यांच्यामध्यें प्रमुख आहे अशा वरुण, कुबेर, अग्नि आणि वायु इत्यादि देवांनीं ज्यांच्या चरणीं वंदन केलेलें आहे, त्या शंकर-पार्वतींना माझा पुनः पुन्हां नमस्कार असो.

नमः शिवाभ्यां परमौषधाभ्यां
पञ्चाक्षरी-पञ्जर-रञ्जिताभ्याम् ।
प्रपञ्च-सृष्टि-स्थिति-संहृताभ्यां
नमो नमः शंकर-पार्वतीभ्याम् ॥ ५ ॥

श्रीपार्वती आणि परमेश्वर हे खरोखर या जीवाला भवरोगांतून मुक्त करणारें उत्तम औषधच आहेत. भवरोगांतूनच काय, पण दैहिक रोगांतूनहि त्यांच्या स्मरणानें व पूजनानें रोगी रोगमुक्त होतात असें शास्त्रज्ञांचें सांगणें आहे व अनेक भक्तांचा अनुभवहि आहे म्हणून त्यांना परमौषध असें म्हटलेलें आहे. त्यांना माझा नमस्कार असो. श्रीशिव आणि पार्वती यांच्या उपासनेचा शक्ति-पंचाक्षरी मंत्र मंत्रशास्त्रांत प्रसिद्ध आहे. "ह्रीं" हें शक्तिबीज आहे. या बीजासह "नमः शिवाय" हा पंचाक्षरी मंत्रच शक्ति-पंचाक्षरी मंत्र म्हणून ओळखला जातो. "ॐ बीजपूर्वक नमः शिवाय" हा मंत्रहि शिव-पंचाक्षरी म्हणून ओळखला जातो. या मंत्राचाहि महिमा फार मोठा आहे. हे दोन्ही मंत्र भक्तांचे सर्व संकटापासून संरक्षण करणारे जणुं कांहीं पंजर म्हणजे पिंजरेच आहेत. एरवी पिंजरा हा तापदायक आणि बंधनकारक असला तरी हा शिव-पंचाक्षरी मंत्ररूपी पंजर मात्र भक्तजनांचीं सर्व संकटें दूर करून त्यांना सुखी करणारा आहे. या मंत्रांच्या द्वारांच शिवपार्वती हे भक्तजनांना रमवितात, सुखी करतात अथवा ते स्वतः सुखी होतात, संतुष्ट होतात. "रञ्ज्" धातूचा अर्थ संतुष्ट करणें अथवा संतुष्ट होणें असा आहे. या अभिप्रायानें शिव-पार्वती यांना "पञ्चाक्षरी-पञ्जर-रञ्जिताभ्याम्" असें विशेषण दिलेलें आहे. पार्वती आणि परमेश्वर हे दोघेहि सर्व विश्वप्रपंचाच्या उत्पत्तीचे, स्थितीचे व संहाराचे निमित्तकारण आहेत. त्या दोघांनाहि माझे नमस्कार असोत.

नमः शिवाभ्यामतिसुन्दराभ्या-
मत्यन्तमासक्त-हृदम्बुजाभ्याम् ।
अशेषलोकैक-हितं-कराभ्यां
नमो नमः शंकर-पार्वतीभ्याम् ॥ ६ ॥

अत्यंत सुंदर असलेल्या या शिव-पार्वतींना माझा नमस्कार असो. ज्यांच्या ठिकाणीं माझें हृत्कमल अत्यंत आसक्त झालेलें आहे असे हे सर्व लोकांचे प्रामुख्यानें एकच एक हितकर्ते असलेले भगवान् श्रीशंकर आणि श्रीदेवी पार्वती यांना माझे वारंवार नमस्कार असोत.

नमः शिवाभ्यां कलिनाशनाभ्यां
कङ्काल-कल्याण-वपुर्धराभ्याम् ।

कैलास-शैलस्थित-देवताभ्यां
नमो नमः शंकर-पार्वतीभ्याम् ॥ ७ ॥

कालिकल्मषाचा नाश करणाऱ्या शिवपार्वतींना माझा नमस्कार असो. एकानें आपल्या देहावर कंकाल म्हणजे मानवांच्या अस्थि अर्थात् नरमुंडमाला धारण केलेली आहे, तर दुसरीनें कल्याणकारक सुवर्णाच्या मंगलालंकारांनीं आपला देह भूषविलेला आहे. कैलास पर्वतावरील मूर्तिमंत देवताच असलेल्या या शंकर-पार्वतींना मी पुनः पुन्हां नमस्कार करतों.

नमः शुभाभ्यामशुभापहाभ्या-
मशेषलोकैकविशेषिताभ्याम् ।
अकुण्ठिताभ्यां स्मृतिसम्भृताभ्यां
नमो नमः शंकर-पार्वतीभ्याम् ॥ ८ ॥

श्रीशिव आणि पार्वती उभयतांच्या मूर्ति शुभ म्हणजे मंगलमय कल्याण-कारक आहेत. दोघांचेंहि स्मरण आणि पूजन केलें असतां सर्व अशुभांचा परिहार होतो. त्यांना मी नमस्कार करतों. त्रैलोक्यामध्यें त्यांची गति अकुंठित आहे. दोघांनाहि आम्ही आमच्या स्मरणामध्यें सांठवून ठेवलेलें आहे. आम्ही त्यांना कधींहि विसरत नाहीं. त्या शंकर-पार्वतींना आमचा वारंवार नमस्कार असो.

नमः शिवाभ्यां रथवाहनाभ्यां
रवीन्दु-वैश्वानर-लोचनाभ्याम् ।
राकाशशाङ्काभ-मुखाम्बुजाभ्यां
नमो नमः शंकर-पार्वतीभ्याम् ॥ ९ ॥

श्रीशिव आणि पार्वती या दोघांनाहि लोक उत्सव-यात्रेच्या वेळीं रथामध्यें बसवून मिरवीत असतात. या दृष्टीनें आचार्यांनीं दोघांनाहि रथवाहन हें विशेषण दिलेलें आहे. रथामध्यें बसलेल्या दोघांनाहि माझा नमस्कार असो. रवि, इन्दु आणि वैश्वानर म्हणजे क्रमशः सूर्य, चंद्र आणि अग्नि हे तिघेहि ज्यांचे नेत्र आहेत. शिव आणि शक्ति हे दोघेहि त्रिलोचन असल्यामुळें हें विशेषण दोघांनाहि लागू पडतें. ज्यांचीं मुखकमलें पौर्णिमेच्या पूर्णचंद्राप्रमाणें आह्लाददायक आहेत, त्या उभयतां शिव-पार्वतींना माझे वरचेवर नमस्कार असोत.

नमः शिवाभ्यां जटिलंधराभ्यां
जरा-मृतिभ्यां च विवर्जिताभ्याम् ।
जनार्दनाब्जोद्भव-पूजिताभ्यां
नमो नमः शंकर-पार्वतीभ्याम् ॥ १० ॥

श्रीशिव आणि पार्वती दोघेहि जटिलंधर आहेत. जटिल शब्दाचा एक अर्थ जटाजूट, गुंतागुंतीचा केशकलाप, तो शंकरांनी आपल्या मस्तकावर धारण केलेला आहे; तर जटिल शब्दाचा दुसरा अर्थ सिंह असा आहे. तो पार्वतीचें वाहन असल्यामुळें पार्वतीलाहि पण जटिलंधर हें विशेषण लागू पडतेंच. मस्तकावरील केशकलापांत धारण केल्या जाणाऱ्या केकतकेवडा इत्यादि सुवर्णालंकारांनाहि 'जटिल' असें नांव आहे. ते सर्व अलंकार देवी पार्वती आपल्या वेणीमध्यें धारण करते म्हणून तिला जटिलंधरा असें म्हटलेलें आहे. त्या दोघांनाहि माझा नमस्कार असो. दोघेहि जरामरणरहित आहेत. अजरामर आहेत. जनार्दन म्हणजे विष्णु आणि अब्जोद्भव म्हणजे ब्रह्मदेव या दोघांनींहि ज्यांची पूजा केलेली आहे त्या शंकर-पार्वतींना आमचे वारंवार नमस्कार असोत.

नमः शिवाभ्यां विषमेक्षणाभ्यां
बिल्वच्छदा-मल्लिकदाम-भृद्भ्याम् ।
शोभावती-शान्तवतीश्वराभ्यां
नमो नमः शंकर-पार्वतीभ्याम् ॥ ११ ॥

श्रीपार्वती आणि परमेश्वर हे दोघेहि "विषमेक्षण" म्हणजे त्रिलोचन आहेत. सूर्य, चंद्र आणि अग्नि हे त्यांचे तीन नेत्र असल्यामुळें त्यांना त्रिनयन असें म्हणतात. तीन ही संख्या विषम असल्यामुळें आणि ईक्षण शब्दाचा अर्थ नेत्र – डोळा असा असल्यामुळें विषमेक्षण शब्दाचा त्रिनेत्र किंवा त्रिलोचन असा अर्थ होतो. बिल्वच्छद म्हणजे बिल्वदळें. शंकरानें आपल्या गळ्यांत बिल्वदळांच्या माळा घातलेल्या आहेत, तर जगज्जननी पार्वतीमाता हिनें "आमल्लिकदाम" म्हणजे मोगऱ्याच्या फुलांची अथवा जाईच्या फुलांची वेणी आणि जाळी घातलेली आहे. त्या दोघांना मी नमस्कार करतों. हे दोघेहि "शोभावती" आणि "शांतवती"चे अधिपति आहेत. या ठिकाणीं शांतवती

शब्दाचा अर्थ स्मशानभूमि अथवा काशीनगरी असा करावा. शांत म्हणजे मृत अथवा प्रेत त्यांची जी भूमि ती शांतवती अर्थात् स्मशानभूमि समजावी. ती शंकरांची आवडती आहे. "स्मशानेष्वाक्रीडाः" हें शंकरांचें वर्णन प्रसिद्धच आहे. काशीनगरीलाहि महास्मशान असें म्हटलेलें आहे. "आनन्दवने महास्मशाने" असा काशीक्षेत्राचा देशकाल-संकीर्तनांत उल्लेख केला जातो. शांत शब्दाचा दुसरा अर्थ परम विरक्त साधु, संत, महात्मे असाहि आहे. ते ज्या ठिकाणीं रहातात तीं हिमाचल भूमि हीहि शांतवती शब्दानें घेतां येईल. भगवान् शंकर हे काशी-क्षेत्राप्रमाणें हिमाचल प्रदेशाचेहि ईश्वर म्हणजे अधिपति आहेतच. त्याचप्रमाणें "शोभावती" शब्दाचा अर्थ श्रीपार्वतीदेवीची अत्यंत प्रिय असलेली कांची नगरी असा करावा. आपल्या अद्वितीय शोभेनें – सौंदर्यानें विलसणारी ती नगरी शोभावती या संज्ञेला योग्यच आहे. पार्वतीदेवी त्या नगरीची अधिष्ठात्री आहे. अशा अभिप्रायानें आचार्यांनीं श्रीपार्वती आणि भगवान् शंकर यांना उद्देशून "शोभावती-शान्तवतीश्वराभ्याम्" असें विशेषण दिलेलें आहे. अशा या शंकर-पार्वतींना मी पुनः पुन्हां नमस्कार करतों.

नमः शिवाभ्यां पशुपालकाभ्यां
जगत्त्रयी-रक्षण-बद्ध-हृद्भ्याम् ।
समस्तदेवासुरपूजिताभ्यां
नमो नमः शंकर-पार्वतीभ्याम् ॥ १२ ॥

विश्वकल्याणकर्ते भगवान् श्रीशंकर आणि देवी पार्वती हे दोघेहि "पशु-पालक" आहेत. पशु शब्दाचा अर्थ शंकराचें वाहन असलेला नंदी आणि पार्वतीचें वाहन असलेला सिंह, त्या दोघांचेंहि शंकर आणि पार्वती हे पालक असल्यामुळें त्यांना पशुपालक असें म्हटलेलें आहे. शैवदर्शनशास्त्राच्या दृष्टीनें "पशु" शब्दाचा अर्थ अज्ञानी जीव असा आहे. पार्वतीपरमेश्वर हे या अज्ञानी जीवांचे पालनकर्ते आहेत. याहि दृष्टीनें त्यांना "पशुपालक" असें म्हणणें योग्यच आहे. त्यांना माझा नमस्कार असो. दोघांनींहि त्रैलोक्याचें संरक्षण करण्याचा दृढनिश्चय केलेला आहे. अंतःकरणापासून जगाचें संरक्षण करण्यास ते नित्य तत्पर आहेत. यावर कोणी असें विचारील कीं, शंकर ही संहार करणारी देवता आहे मग त्यांना जगद्रक्षक कसें म्हणावें? पण ही शंका बरोबर नाहीं. प्रलयकालीं

विश्वाचा संहार करणें हें त्यांचें अंगीकृत कार्य असून जगाचें रक्षण करणें हा वात्सल्यमूलक त्यांचा सहजसिद्ध स्वभाव आहे. याच कारणामुळें हालाहल विष प्राशन करून त्यांनीं जगाचें रक्षण केलें. ते जगाचें पालन करून जगाला सुख देतात म्हणूनच तर त्यांना "मृड" अशी संज्ञा आहे. जगज्जननी पार्वती देखील विश्वाचें पालन करून विश्वाला सुखी करते म्हणून तिलाहि "मृडानी" असें म्हणतात.

समस्त देव आणि असुर म्हणजे दैत्य राक्षस यांनी त्यांची पूजा म्हणजे आदर सत्कार केलेला आहे. एवढेंच नव्हे तर यक्ष, गंधर्व, किन्नर, सिद्ध, भूत, प्रेत, पिशाच आणि मानव या सर्वांनींच त्यांना पूज्य मानलेलें आहे. त्या शंकर-पार्वतींना माझे नमस्कार असोत.

स्तोत्रं त्रिसन्ध्यं शिवपार्वतीभ्यां
भक्त्या पठेद् द्वादशकं नरो यः ।
स सर्वसौभाग्यफलानि भुङ्क्ते
शतायुरन्ते शिवलोकमेति ॥ १३ ॥

श्रीशिव आणि पार्वती यांच्या संतोषासाठीं केलेलें हें बारा श्लोकाचें स्तोत्र जो कोणी मनुष्य रोज तिन्ही काळीं भक्तियुक्त अन्तःकरणानें म्हणेल तो शतायु म्हणजे दीर्घजीवी होईल. सर्व सौभाग्यफलांचा तो उपभोग घेईल. अर्थात् सर्व-प्रकारचीं सुखें त्याला प्राप्त होतील व अंतीं तो शिवलोकाला जाईल. त्याला शिवसायुज्याचा लाभ होईल.

■ ■ ■

अर्धनारीश्वरस्तोत्रम् ।

[शिवनामाचा महिमा मोठा अगाध आहे. पर्वतप्राय पिंजलेल्या कापसाच्या राशीवर पडलेली अग्नीची ठिणगी ही जशी त्या राशीला क्षणांत भस्मसात् करून टाकते त्याचप्रमाणें शिव या मंगलनामाचा उच्चार ज्याच्या वाणींतून व्यक्त होतो त्याचीं सर्व पापें अगदीं कोट्यवधि महापापें देखील जळून खाक होतात. " शिवेति मङ्गलं नाम यस्य वाचि प्रवर्तते । भस्मीभवन्ति राजेन्द्र

महापातककोटयः " हा शिवनामाचा महिमा लक्षांत घेऊनच आचार्यांनी प्रकृतीनें व आकृतीनेंहि एकरूप असलेल्या अर्धनारीनटेश्वराच्या या स्तोत्रांतील प्रत्येक श्लोकाच्या शेवटच्या चरणांत " नमः शिवायै च नमः शिवाय " असें म्हणून शिवस्वरूप असलेल्या पार्वतीपरमेश्वराला नमस्कार केलेला आहे. शिव आणि शिवा अर्थात पार्वती आणि परमेश्वर या दोघांच्या स्वरूपांतील व स्वभावांतील वैलक्षण्यांचें वर्णन करीत करीत आचार्यांनी शेवटीं शिव या एकाच शब्दानें दोहोंचें सादृश्यच प्रकट केलेलें आहे. गंगा आणि यमुना भिन्न भिन्न मार्गानें वहातात, पण शेवटीं तीर्थराज प्रयागक्षेत्रामध्यें त्या एकरूप होऊन जातात, त्याचप्रमाणें श्रीशंकर आणि पार्वती भिन्न भिन्न स्वरूपांतून व भिन्न भिन्न स्वभावांतून विहार करीत शेवटीं "शिव" या एकाच मंगलमय स्वरूपांत पर्यवसित होतात. याच अभिप्रायानें " नमः शिवायै च नमः शिवाय " असें म्हणून आचार्यांनी दोघांना उद्देशून एकच अन्वर्थ संज्ञा योजलेली आहे. पार्वतीपरमेश्वरांची एकरूपता दाखविण्याकरिताच या स्तोत्राचेंहि नांव अर्धनारीश्वरस्तोत्र असेंच योजलेलें आहे.]

चाम्पेय-गौरार्ध-शरीरकायै
कर्पूर-गौरार्ध-शरीरकाय ।
धम्मिल्लकायै च जटाधराय
नमः शिवायै च नमः शिवाय ॥ १ ॥

चाम्पेय म्हणजे सोनचाफ्याचें फूल. त्या फुलाप्रमाणें जिचें अर्धें शरीर गौरवर्ण दिसत आहे, तर ज्याचें अर्धें शरीर कापूराप्रमाणें गौरवर्ण दिसत आहे. ते उभयतां अर्धनारीनटेश्वर जगज्जननी देवी पार्वती आणि भगवान श्रीशंकर. एकीनें आपल्या वुचड्यांत मोगऱ्याचा गजरा घातलेला आहे, तर एकानें आपल्या मस्तकावर जटाभार धारण केलेला आहे. पार्वती विश्वाचें कल्याण करणारी असल्यामुळें तिला "शिवा" असें म्हणतात, तर शंकर हे त्रैलोक्याचें मंगल करणारे असल्यामुळें त्यांना "शिव" असें म्हणतात. याप्रमाणें अर्धनारीश्वरस्वरूप असलेल्या उभयतांना माझा नमस्कार असो.

कस्तूरिका-कुङ्कुम-चर्चितायै
चितारजःपुञ्ज-विचर्चिताय ।

कृतस्मरायै विकृतस्मराय
नमः शिवायै च नमः शिवाय ॥ २ ॥

श्रीजगज्जननी देवी पार्वती हिनें कस्तूरीमिश्रित केशरांची उटी लावलेली आहे तर भगवान् शंकर यांनी आपल्या सर्वांगाला चिताभस्म चर्चिलेलें आहे. श्रीशंकरांनी कामदेवाला विकृत केलें, भस्म करून टाकलें तर आदिमाया जगज्जननी देवी पार्वती हिनें कामदेवाला अर्पिन केलें.

पूर्वी दक्षानें एक यज्ञ केला. त्या यज्ञांत शंकराला निमंत्रण नव्हतें व यज्ञांतला भागहि पण दिला नव्हता. दक्षाचें आणि शंकराचें वाकडे होतें. शंकराची पत्नी सती दाक्षायणी ही दक्षाचीच कन्या. आपल्या पित्याच्या घरीं मोठा यज्ञ चालू असल्याचें तिला समजलें. शंकरांची अनुमति नसतांना ती यज्ञाला गेली. दक्षाच्या भीतीनें तिचें कोणीहि स्वागत केलें नाहीं. तिची विचार-पूसहि कोणी केली नाहीं. सतीला त्याचा राग आला. इतर देवतेप्रमाणें त्या यज्ञांत शंकरांना उद्देशून यज्ञभागहि पण दिलेला नव्हता. हें तिच्या लक्षांत आलें. त्याचें तिला फार वाईट वाटलें. तिनें यज्ञमंडपांत सर्वांच्या समक्ष शंकरांचा महिमा गाइला.

सर्वश्रेष्ठ असलेल्या शंकरांशीं वैर करणारा हा माझा पिता महापापी आहे असें म्हणून तिनें आपल्या पित्याची निर्भर्त्सना केली. अशा पित्यापासून मिळालेला हा देह तरी मी का ठेवावा ! असें म्हणून आपल्या योगसामर्थ्यानें तिनें आपलें शरीर दग्ध करून टाकलें. ही वार्ता शंकरांना समजली. त्यांना अत्यंत दुःख झालें. ते रागावले. त्यांनीं जटा झाडल्या. त्या जटांच्या वटांतून वीरभद्र प्रकट झाला ! त्याला शंकरांनीं आज्ञा केली. जा, गर्वानें उन्मत्त झालेल्या दक्षाच्या यज्ञाचा विध्वंस कर. बरोबर प्रमथगणांची सेना घेऊन वीरभद्र निघाला. त्यानें दक्षयज्ञाचा विध्वंस केला. शेवटीं दक्षालाहि ठार केलें ! जिकडे तिकडे हाहाकार झाला ! सर्व देव कैलासशिखरावर असलेल्या शंकरांना शरण गेले. स्तुति केली. शंकरांचा राग शांत झाला. शंकरांसह सर्व देव दक्षाच्या मंडपांत आले. यज्ञांतली झालेली मोडतोड भरून काढली. शंकरांनीं आपल्या कृपापूर्णदृष्टीनें दक्षाला जिवंत केलें. दक्षाच्या सर्व गर्वाचा परिहार झाला. त्यानें हात जोडून शंकरांची स्तुति केली. आपल्या सामर्थ्याचा, सत्तेचा, वैभवाचा व योग्यतेचा कोणीहि गर्व

करूं नये. गर्वानें परिणामीं अनर्थच होतो. ही गोष्ट शंकरांनीं या प्रसंगानें सर्वांच्या निदर्शनास आणून दिली. सतीच्या आत्मविसर्जनानें भगवान् शंकर अत्यंत दुःखी झालेले होते. अगोदरच ते विरक्त होते. त्यांत या उद्वेगानें भरच घातली. ते तपश्चर्या करण्याकरितां हिमालयाच्या शिखरावर गेले. गंगोत्तरी-गोमुखाजवळ अगदीं एकान्तांत बसून ते तपश्चर्या करूं लागले! त्यांच्या तपश्चर्येचा भंग करण्याकरितां इंद्रानें कामदेवाला पाठविलें. कामदेवालाहि स्वतःच्या स्वरूपाचा व सामर्थ्याचा मोठा गर्व होता. शंकरांच्या चित्ताला मोहून टाकावें व त्यांना तपोभ्रष्ट करावें अशा हेतूनें त्यानें प्रयत्न सुरू केले, पण परिणाम उलटाच झाला! शंकरांनीं आपल्या तृतीय नेत्रांतील अग्नीनें कामदेवाला भस्म करून टाकलें! तेव्हांपासून काम अनंग बनला! याच अभिप्रायानें आचार्यांनीं या श्लोकांतील तिसऱ्या चरणांत शंकराला "विकृतस्मराय" असें विशेषण दिलेलें आहे.

इकडे आत्मत्याग केल्यानंतर सतीनें हिमालय आणि मेनका यांच्या पोटीं पार्वतीच्या रूपानें जन्म घेतला. पार्वती उपवर झाल्यानंतर तिनेंहि पतिरूपानें शंकरांचीच प्राप्ति व्हावी या हेतूनें तपश्चर्या सुरू केली. नारदांनीं मध्यस्थी करून दोघांचा विवाह घडवून आणला! याच वेळीं तारकासुरानें देवांना अगदीं "त्राहि भगवन्" करून सोडलें होतें. शंकराच्या पोटीं जन्माला येणारा पुत्रच तारकासुराला मारूं शकेल, असें देवांना कळल्यानंतर ते मोठ्या पेंचांत पडले. शंकरांच्या अन्तःकरणांत कामाचा अंकुर निर्माण झाल्याशिवाय हें कार्य कसें होणार? शेवटीं सर्व देव पार्वतीला शरण गेले. त्यांचें मनोगत जाणून जगज्जननी आदिमाया श्रीराजराजेश्वरी देवी पार्वती त्रिपुरांबा हिनें आपल्या अलौकिक सौंदर्यानें शंकरांच्या अंतःकरणांत कामाचा अंकुर निर्माण केला! याच वेळीं पतिवियोगानें अति खिन्न असलेली रति श्रीशंकरांच्या चरणीं अनन्यभावानें शरण आली. हे अनाथनाथा! विश्वनाथा! दीनबंधो शंकरा! पतिवियोगानें मी अनाथ आहें. दीन आहे. सर्व अपराधांची क्षमा करून आपण माझ्या पतीला जीवदान द्या. मी आपल्यापुढें पदर पसरते. तिची ती केविलवाणी अवस्था पाहून शंकरांना दया आली व त्यांनीं आपल्या कृपापूर्ण अमृतमय दृष्टीनें कामदेवाला जिवंत केलें! या कृतीच्या मुळाशीं पार्वतीच कारणीभूत असल्यामुळें पार्वतीच परंपरेनें कामदेवाच्या पुनरुज्जीवनाचें कारण बनली! याच अभिप्रायानें आचार्यांनीं पार्वतीला उद्देशून "कृतस्मरायै" हें विशेषण दिलेलें आहे. शेवटीं पार्वतीपरमेश्वरा-

पासून जन्मास आलेल्या षडाननानें तारकासुराचा वध करून सर्व देवांना सुखी केलें. असा हा इतिहास या श्लोकांतील तिसरा चरण लावतांना लक्षांत घ्यावा. याप्रमाणें परस्परविरुद्ध कार्य करणाऱ्या पण शेवटीं जगाच्या कल्याणासाठीं एक होणाऱ्या शिव-पार्वतींना माझा नमस्कार असो.

झणत्क्कणत्कङ्कण-नूपुरायै
पादाब्ज-राजत्फणिनूपुराय ।
हेमाङ्गदायै भुजगाङ्गदाय
नमः शिवायै च नमः शिवाय ॥ ३ ॥

पार्वतीनें आपल्या पायांमध्यें पैंजण घातलेले असून त्यांचा झन् झन् आवाज होत आहे. तसेंच हातांत कंकणें घातलेलीं असून त्या कंकणांचाहि मधुर ध्वनि कानांना आनंदवीत आहे. इकडे शंकरानेंहि पण आपल्या चरण-कमलामध्यें जणुं कांहीं सर्पांचीं पैंजणेंच घातलेलीं असून तीं त्यांना फार शोभत आहेत. इकडे पार्वतीनें सोन्याचीं बाहु-भूषणें घातलेलीं आहेत, तर शंकरांनीं आपल्या दंडावर सर्पांचीं वेटोळीं हीच अंगद म्हणजे बाहुभूषणें म्हणून धारण केलेलीं आहेत. अशा त्या अर्धनारीश्वरस्वरूप असलेल्या शिव-पार्वतींना माझा नमस्कार असो.

विशाल-नीलोत्पल-लोचनायै
विकासि-पङ्केरुह-लोचनाय ।
समेक्षणायै विषमेक्षणाय
नमः शिवायै च नमः शिवाय ॥ ४ ॥

देवी पार्वती ही जगज्जननी असल्यामुळें विश्वांतील प्राणिमात्र तिचीं लेकरें आहेत. म्हणून ती सर्वांकडे समबुद्धीनें ईक्षण म्हणजे अवलोकन करते तर भगवान् शंकर मात्र भक्तीच्या तारतम्यानें अवलोकन करणारे असल्यामुळें "विषमेक्षण" आहेत. विषमबुद्धीनें पहाणारे आहेत. (पार्वतीचे नेत्र नीलकमला-प्रमाणें विशाल आहेत तर शंकरांचे नेत्र प्रफुल्लित असलेल्या कमलाप्रमाणें सुंदर आहेत.) अशा या शिवस्वरूप असलेल्या अर्धनारीनटेश्वरांना माझा नमस्कार असो.

मन्दारमालाकलितालकायै
कपालमालाङ्कित-कन्धराय ।
दिव्याम्बरायै च दिगम्बराय
नमः शिवायै च नमः शिवाय ॥ ५ ॥

देवी पार्वतीनें आपल्या वेणीमध्यें मंदार पुष्पांच्या माळा, गजरे, जाळ्या धारण केलेल्या आहेत, तर शंकरांनी आपल्या गळ्यांत नरमुंडमाळ धारण केलेली आहे. पार्वतीनें दिव्य बहुमोलाचीं सुंदर वस्त्रें परिधान केलेलीं आहेत, तर भगवान् शंकर दिगंबरच आहेत. अशा विरोधावस्थेंतहि दोघांची एकरूपता कांहीं अलौकिक आहे. त्यांना माझा नमस्कार असो. वर "मन्दारमाला" असा शब्द आलेला आहे या ठिकाणीं मंदार शब्दाचा अर्थ कल्पवृक्ष असा समजावा.

अम्भोधरश्यामल-कुन्तलायै
तडित्प्रभा-ताम्र-जटा-धराय ।
निरीश्वरायै निखिलेश्वराय
नमः शिवायै च नमः शिवाय ॥ ६ ॥

अम्भोधर म्हणजे पाण्यानें डवडबलेला ढग. या ढगाचा रंग काळा असतो. पार्वतीच्या मस्तकावरील केशहि सजल जलधराप्रमाणें कृष्णवर्णच आहेत. म्हणून तिला "अम्भो-धर-श्यामल-कुन्तला" असें म्हटलेलें आहे. शंकरांच्या मस्तकावरील जटा या विद्युल्लतेच्या कांतीप्रमाणें देदीप्यमान, पीतवर्ण आणि ताम्रवर्ण अर्थात् निर्मल तांब्याप्रमाणें तांबूसवर्ण अशा दोन्ही वर्णांनीं मिश्रित आहेत. तात्पर्य, भगवान् शंकर हे किंचित् पीतवर्ण व किंचित् ताम्रवर्ण अशा जटा धारण करणारे आहेत. देवी पार्वती ही आदिमाया जगज्जननी शक्तिस्वरूप असल्यामुळें सर्वश्रेष्ठ आहे. तिच्यापेक्षां श्रेष्ठ कोणीच नाहीं. या अभिप्रायानें तिला "निरीश्वरायै" असें म्हटलेलें आहे; तर भगवान् शंकर हे सर्व विश्वाचे अधिपति असल्यामुळें त्यांना निखिलेश्वर असें म्हटलेलें आहे. अशा या अर्धनारीश्वरस्वरूप शिव-पार्वतींना माझा नमस्कार असो.

प्रपञ्च-सृष्ट्युन्मुख-लास्यकायै
समस्त-संहारक-ताण्डवाय ।

जगज्जनन्यै जगदेक-पित्रे
नमः शिवायै च नमः शिवाय ॥ ७ ॥

देवी पार्वती ही प्रपंचाची सृष्टि म्हणजे उत्पत्ति करण्याला उन्मुख म्हणजे उत्सुक अथवा अनुरूप नृत्य करणारी आहे, तर भगवान् शंकर हे सान्या सृष्टीचा संहार करण्याला अनुरूप असें तांडवनृत्य करणारे आहेत. असा हा दोघांच्या नर्तनांतील परस्परविरोध स्पष्ट आहे. तथापि एक जगज्जननी आहे, तर दुसरे जगत्पिता आहेत. याप्रमाणें एकरूप असलेल्या उभयतांना माझा नमस्कार असो.

प्रदीप्तरत्नोज्ज्वलकुण्डलायै
स्फुरन्महापन्नगभूषणाय ।
शिवान्वितायै च शिवान्विताय
नमः शिवायै च नमः शिवाय ॥ ८ ॥

देदीप्यमान रत्नांनीं झळकणारी सुंदर कुंडलें पार्वतीनें धारण केलेलीं आहेत, तर अत्यंत चपल असे महासर्प शंकरांनीं भूषण म्हणून आपल्या अंगावर धारण केलेले आहेत. पार्वती ही विश्वकल्याणकर्त्री म्हणून 'शिवा' आहे, तर शंकर हे विश्वकल्याणकर्ते म्हणून 'शिव' आहेत. शिव म्हणजे महादेव यांनीं पार्वती ही अन्वित म्हणजे युक्त आहे, तर शिवा म्हणजे पार्वती हिनें शिव म्हणजे भगवान् शंकर हे अन्वित म्हणजे युक्त आहेत. या उभयतांना माझा नमस्कार असो.

एतत्पठेदष्टकमिष्टदं यो
भक्त्या स मान्यो भुवि दीर्घजीवी ।
प्राप्नोति सौभाग्यमनन्तकालं
भूयात्सदा तस्य समस्तसिद्धिः ॥ ९ ॥

या इष्ट फलदायक असलेल्या अष्टकाचें जो कोणी भक्तियुक्त अन्तःकरणानें पठण करील त्याला सर्व लोकांमध्यें मान्यता मिळेल. त्याला दीर्घ आयुष्याचा लाभ होईल. सर्व प्रकारचें उत्तम भाग्य त्याला अनंतकाळ लाभेल आणि सदासर्वकाळ अणिमादि समस्त सिद्धि त्याला प्राप्त होतील.

■ ■ ■

शिवभुजंगमस्तोत्रम् ।

[भुजंगप्रयात वृत्तांतील चाळीस श्लोकांचें हें शंकराचें स्तोत्र वाचकांच्या हृदयाला हेलावून सोडील इतकें करुणारसानें ओथंबलेलें आहे. यांतील कित्येक श्लोक असे आहेत कीं, ते वाचतां वाचतांच अंतःकरणाचा ठाव घेतात. वाचतांना ते अंतःकरणाच्या तळाशीं जाऊन भिडतात. उदाहरणार्थ, सातवा, दहावा आणि अकरावा तसेंच एकवीस ते एकतीस हे श्लोक अवश्य पहा. दुसऱ्या, चौथ्या आणि छत्तिसाव्या त्याचप्रमाणें सदतिसाव्या श्लोकांत तर शिवतत्त्व हें साक्षात् परिपूर्ण परब्रह्मस्वरूप कसें आहे हें उपनिषदांतील शब्दांचा व अभिप्रायांचाहि श्लोकांतच समावेश करून सुस्पष्ट दाखविलेलें आहे. तिसरा आणि अडतिसावा श्लोक सदाशिवाच्या सगुण स्वरूपाचा साक्षात्कार करून देत आहेत. चौथ्या श्लोकानें तर शिवाच्या परतत्त्वालाच मोठ्या खुबीनें हात घातला आहे.

शिवस्वरूपानें शंकराची स्तुति करीत असतांना ते जगन्मातेचेंहि स्तवन करावयास विसरले नाहींत. "हा केवळ त्यांचींच अर्थात् शंकरांचीच स्तुति करतो, याचें माझ्याकडे लक्षच नाहीं," असा विकल्प जगज्जननीच्या मनांत येऊं नये म्हणून तेहतिसाव्या श्लोकांत "त्वमप्यम्ब मां पश्य" आई ! तूं देखील माझ्याकडे पहा, असें म्हणत आदिशक्ति जगज्जननीचीहि आचार्य प्रार्थना करीत आहेत. भक्तियुक्त अंतःकरणानें या स्तोत्राचा जे नित्य पाठ करतील ते शिव-कृपेस पात्र होतील. त्यांना इहलोकीं उत्तम पुत्रपौत्र, आयुष्य, आरोग्य आणि ऐश्वर्य प्राप्त होऊन ते अध्यात्मविद्येनें संपन्न होतील व मृत्यूला सहज तरून जातील. अंतीं निर्भयपणें ते शिवसायुज्याला प्राप्त होतील. अशी या स्तोत्राची फलश्रुति स्वतः आचार्यांनींच वर्णन केलेली आहे. स्तोत्राची भाषाहि नेहमींप्रमाणें सहजसुलभ आणि अत्यंत गोड अशीच आहे. हातच्या कांकणाला आरसा कशाला ? स्तोत्रांतील शब्दांची आणि अर्थाची गोडी प्रत्यक्षच पहा. स्तोत्रांतील सर्व श्लोक भुजंगप्रयात वृत्तांतलेच असल्यामुळें या स्तोत्राला शिवभुजंगमस्तोत्र असेंच नांव दिलेलें आहे.]

स्तोत्राच्या आरंभीं मंगलाचरण म्हणून श्रीगजाननाचें ध्यान करीत आहेत.

गलद्दानगण्डं मिलद्भृङ्गषण्डं
चलच्चारुशुण्डं जगत्त्राण-शौण्डम् ।
कनद्दन्तकाण्डं विपद्भङ्ग-चण्डं
शिवप्रेमपिण्डं भजे वक्रतुण्डम् ॥ १ ॥

ज्याच्या गंडस्थलांतून दानोदक स्रवत आहे, हत्ती वयांत आला म्हणजे त्याच्या गंडस्थलांतून एक प्रकारचा जो सुगंधी द्रव पाझरत असतो त्याला दानोदक म्हणतात. गंडस्थलांतून स्रवणारें दानोदक अत्यंत सुगंधी असल्यामुळें ज्याच्या गंडस्थलामोंवतीं भ्रमरांचे थवेच्या थवे गुंजारव करीत विरट्या घालीत आहेत, ज्याची सुंदर सोंड सारखी हालत आहे, जो 'जगत्त्राणशौंड' म्हणजे जगाचें रक्षण करण्यांत कुशल आहे, ज्याच्या मुखामध्यें एक दांत शोभत आहे, कनत् शब्दाचा अर्थ शोभायमान अथवा दीप्तिमान् असा आहे. जो भक्तजनांच्या संकटांचा नाश करण्यामध्यें चंड म्हणजे भयंकर पराक्रमी आहे आणि जो श्रीशंकर आणि पार्वती यांचें जणूं कांहीं मूर्तिमंत प्रेमच आहे अशा त्या वक्रतुंडाला मी अनन्यभक्तीनें भजत आहें.

अनाद्यन्तमाद्यं परं तत्त्वमर्थं
चिदाकारमेकं तुरीयं त्वमेयम् ।
हरि-ब्रह्म-मृग्यं परब्रह्मरूपं
मनोवागतीतं महः शैवमीडे ॥ २ ॥

ज्याला आदि म्हणजे आरंभ नाहीं व अंत म्हणजे शेवटहि नाहीं म्हणून अनाद्यन्त किंवा अनाद्यनन्त असेंहि म्हणतात, जें शिवतत्त्व आद्य म्हणजे सर्वांच्या आरंभीचें आहे, किंवा आद्य शब्दाचा मुख्य अथवा सर्वश्रेष्ठ असाहि अर्थ होतो. पर म्हणजे पलीकडचा – सर्वांच्या पलीकडचा – ज्याच्या पलीकडे कोणीच नाहीं, 'तत्त्वमर्थम्' म्हणजे जें तत्त्व तत्पदवाच्य ईश्वरचैतन्यस्वरूपहि आहे व त्वंपदवाच्य जीवचैतन्यस्वरूपहि आहे. तदर्थ म्हणजे परमात्मा व त्वमर्थ म्हणजे जीवात्मा ही दोन्ही शिवाचींच रूपें आहेत. जें शिवतत्त्व चिदाकार म्हणजे केवल चैतन्यस्वरूप आहे, एक म्हणजे अद्वितीय आहे, तसेंच तुरीय म्हणजे:जागृति, स्वप्न आणि सुप्ति या तिन्ही अवस्थांच्या पलीकडचें आहे, तें कोणत्याहि परिमाणानें मोजतां

येत नाहीं. म्हणून त्याला 'अमेय' म्हटलें आहे. ज्याचा श्रीहरीनें व ब्रह्मदेवानेंहि शोध लावावा एवढें तें विशाल आहे आणि म्हणूनच तें परब्रह्मरूप आहे. तेथें मनालाहि गति नाहीं आणि वाणीलाहि वाव नाहीं. म्हणून त्याला 'मनोवागतीत' म्हटलें आहे. अशा तऱ्हेचें 'शैव' म्हणजे शिवसंबंधी जें 'महः' म्हणजे तेज त्या तेजाची अर्थात् तेजःस्वरूप शिवतत्त्वाची मी स्तुति करीत आहें.

स्वशक्त्यादिशक्त्यन्तसिंहासनस्थं
मनोहारि-सर्वाङ्ग-रत्नोरु भूषम् ।
जटाहीन्दु-गङ्गास्थि-शम्याक-मौलिं
पराशक्तिमित्रं नुमः पञ्चवक्त्रम् ॥ ३ ॥

जें शिवतत्त्व स्वशक्ति म्हणजे स्वसामर्थ्य, स्वमहिमा आणि आदिशक्त्यन्त म्हणजे आदिशक्ति जी माया तिचा जो अंत म्हणजे शेवट, पर्यवसान हेंच कोणी सिंहासन, त्या सिंहासनावर विराजमान झालेलें आहे; जेथें मायाशक्तीचा अंत होतो आणि स्वशक्ति म्हणजे स्वतःचा महिमाच शिल्लक रहातो. तेंच शिवतत्त्वाचें सिंहासन म्हणजे अधिष्ठान होय. उपनिषदांतहि 'स्वे महिम्नि प्रतिष्ठितः' असें त्याचें वर्णन केलेलें आहे.

अथवा स्वशक्तिस्वरूप असलेली जी आदिशक्ति म्हणजे महामाया तिचा अंत म्हणजे मर्यादा-पूर्णता हेंच ज्याचें सिंहासन म्हणजे अधिष्ठान आहे असा. अर्थात् स्वशक्तिस्वरूप असलेल्या आदिशक्तीच्या पूर्णत्वावर अधिष्ठित असलेला म्हणजे पूर्ण शक्तीनें संपन्न असा त्याचा अर्थ होतो. अथवा तांत्रिक उपासनेमध्यें शिवयंत्रस्थित शिवमंत्रस्वरूप सदाशिवाची आराधना करतांना वामा, ज्येष्ठा, रौद्री, काली, कलविकरणी, बलविकरणी बलप्रमथनी, सर्वभूतदमनी आणि मनोन्मनी अशा नऊ पीठशक्ति सांगितलेल्या आहेत. याच सर्व शक्ति स्वशक्त्यादिशक्त्यन्त शब्दांनीं व्याख्यात आणि या सर्वशक्तींनीं विराजमान असलेल्या पीठरूपी सिंहासनावर अधिष्ठित असलेले भगवान् सदाशिव असा त्याचा अर्थ करावा.

ज्याच्या सगुणस्वरूपाचें अवलोकन केलें म्हणजे ज्याच्या अंगावर मनोहर असें रत्नांचे श्रेष्ठ अलंकार शोभत आहेत असें दिसतें, ज्यानें आपल्या मस्तकावर जटाभार धारण केलेला आहे, फणा असलेला नाग धारण केलला आहे, चंद्र आहे, गंगा आहे, तसेंच अस्थि म्हणजे नरकपाल आणि

शम्याक म्हणजे वाहव्याची फुलें हींहि धारण केलेलीं आहेत, वाहव्याचीं फुलें पिवळीं, गुच्छाकार व सुगंधी असतात. तीं शंकरांना फार आवडतात. जें शिवतत्त्व पराशक्ति म्हणजे जगन्माता महात्रिपुरसुंदरी, तिचा मित्र म्हणजे अत्यंत आवडता प्रिय सुहृद सखा आहे, ज्याला पांच मुखें असल्यामुळें पंचवक्त्र म्हणजे पंचानन म्हणतात, त्या शिवतत्त्वाची आम्ही भक्तिपूर्वक स्तुति करीत आहों. आम्ही हें अनेकवचन आपल्यावरोबर असलेला शिष्यपरिवार आणि भक्तजन यांना उद्देशून आहे अथवा कवींना स्वतःचा उल्लेख अनेकवचनानें करण्याचा अधिकार आहे.

शिवेशान-तत्पूरुषाघोर-वामा-
दिभिः पञ्चभिर्हृन्मुखैः षड्भिरङ्गैः ।
अनौपम्य षट्त्रिंशतं तत्त्वविद्या-
मतीतं परं त्वां कथं वेत्ति को वा ॥ ४ ॥

"हे अनौपम्य शिव ईशान तत्पुरुष-अघोर वामादिभिः पञ्चभिः हृन्मुखैः षड्भिः अङ्गैः (महितां) षट्त्रिंशतं तत्त्वविद्यां अतीतं परं त्वां कः वेत्ति कथं वा वेत्ति ?"

हे अनुपम परब्रह्मस्वरूपा शंकरा ! ईशान, तत्पुरुष, अघोर, वामदेव आणि सद्योजात ह्या पांच अंगांनीं (देवतांनीं) युक्त असलेल्या, त्याचप्रमाणें हृदय, मुख इत्यादि सहा अंगांनीं (उपांगांनीं) युक्त असलेल्या आणि छत्तीस संख्येनें प्रसिद्ध असलेल्या तत्त्वरूपांनीं नटलेल्या विद्येच्या—मंत्राच्या—पलीकडे असलेले तुम्ही 'पर' म्हणजे पूर्णपरब्रह्मस्वरूप आहां. तुमचें स्वरूप कोण जाणूं शकणार आणि तो कसें जाणूं शकणार ! तुम्ही वाणीच्या आणि मनाच्या शक्तीच्या पलीकडचे आहां. वाणीला तुमचें स्वरूप बोलून दाखवितां येत नाहीं आणि मनालाहि तुमच्या स्वरूपाचें आकलन होत नाहीं. तुम्ही सर्वातीत परब्रह्मस्वरूप आहां. असा या श्लोकाचा अन्वय, त्याचा अर्थ आणि भावार्थ आहे.

आतां आपण या श्लोकाचें अधिक स्पष्ट स्वरूप पाहूं. या स्तोत्राची अधिष्ठात्री देवता भगवान् शंकर आहे. शंकराचें मूळ तात्त्विक स्वरूप "शिव" या शब्दानें उल्लेखिलें जातें. जो सर्व विश्वाशीं एकरूप होऊन राहिलेला आहे किंवा हें सर्व विश्व ज्याच्याशीं एकरूप होऊन राहिलेलें आहे तो अर्थात् विश्वरूपानें नटलेला परमात्मा, असा शिव या शब्दाचा अर्थ आहे. "शेते अनेन इति शिवः

अथवा विश्वस्मिन् शेते इति शिवः " अशी शिव शब्दाची व्युत्पत्ति आहे. त्या शिवतत्त्वापासूनच सर्व विश्व उत्पन्न झालेलें आहे. या विश्वाच्या मुळाशीं असलेलीं पस्तीस तत्त्वें या शिवतत्त्वांतूनच अभिव्यक्त होत असतात. अभिव्यक्त होणारीं पस्तीस तत्त्वें आणि त्या सर्वांच्या अभिव्यक्तीचें मूलकारण असलेलें छत्तिसावें शिवतत्त्व हीं सर्व छत्तीस तत्त्वें म्हणजेच हें सर्व विश्व होय. विश्व जरी अनंत पदार्थांनीं भरलेलें असलें आणि अनंत नामरूपांनीं नटलेलें असलें तरी तें या छत्तीस तत्त्वांच्या बाहेर जाऊं शकत नाहीं. तात्पर्य, छत्तीस तत्त्वांचा पसारा म्हणजेच हें सारें जग होय, असा शैवागमाचा सिद्धान्त आहे. शक्तियुक्त शिवतत्त्वापासूनच सर्व विश्वाची अभिव्यक्ति होत असल्यामुळें सर्व विश्व शिवस्वरूपच आहे. सुवर्णांतून अभिव्यक्त होणारे अलंकार जसे सुवर्णाहून भिन्न असूं शकत नाहींत त्याचप्रमाणें शिवतत्त्वांतून अभिव्यक्त होणारें विश्वहि तत्त्वतः शिवतत्त्वाहून भिन्न असूं शकत नाहीं. म्हणूनच तत्त्ववेत्त्याला हें सर्व विश्व " सत्यं शिवं सुंदरम् " अशा रूपानेंच प्रतीतीला येत असतें.

विश्वप्रपंच हा दोन प्रकारचा आहे. एक शब्दप्रपंच तर दुसरा अर्थप्रपंच. शब्दप्रपंच हा वाचक असून अर्थप्रपंच हा वाच्य आहे. वाच्य आणि वाचक तत्त्वतः अभिन्न असतात. वाक्प्रपंच हा शक्तिस्वरूप आहे, तर अर्थप्रपंच हा शिवस्वरूप आहे. शक्ति आणि शक्तिमान् हे एकरूपच असतात. अनिर्वचनीय तादात्म्य हाच त्यांचा संबंध होय. याच अभिप्रायानें कालिदासानेंहि " वागर्थाविव सम्पृक्तौ " असें शक्तिविशिष्ट शिवाचें वर्णन केलेलें आहे. वाक्प्रपंचाच्या व अर्थप्रपंचाच्या यथार्थ स्वरूपाचा साक्षात्कार शिवशक्तीच्याच कृपेनें व्हावयाचा असतो. या शक्ति-सहकृत शिवतत्त्वापासूनच सर्व विश्वप्रपंचाचा आविष्कार झालेला असल्यामुळें यांना जगाचे माता आणि पिता असें म्हटलें जातें. पार्वती आणि परमेश्वर हीं त्यांचीं परिचायक नामें आहेत. " वागर्थाविव सम्पृक्तौ वागर्थप्रतिपत्तये । जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ॥ "

विश्वाचा पसारा कितीहि अफाट असला, तरी ज्या तत्त्वांचें हें विश्व बनलें आहे तीं तत्त्वें छत्तीसच आहेत. त्यांतहि सर्व तत्त्वांच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वाला शिवतत्त्व असें नांव आहे. याच अभिप्रायानें " षट्त्रिंशत्तत्त्वानि शिवः " असें परशुराम-कल्पसूत्रांत शिवतत्त्वाचें वर्णन केलेलें आहे. याच शान्त-स्वरूप असलेल्या शिवतत्त्वाच्या ठिकाणीं इच्छा, ज्ञान आणि क्रियारूप शक्तींचें

स्पंदन सुरू झालें कीं त्यांतूनच शब्दसृष्टीचा आणि अर्थसृष्टीचा आविष्कार होत असतो. हा आविष्कार प्रथम अत्यंत सूक्ष्म स्वरूपांत असतो. या सूक्ष्म स्वरूपालाच तत्त्व अशी संज्ञा आहे. हीं तत्त्वें जगाच्या अंतापर्यंत विराजमान असतात. म्हणूनच त्यांना तत्त्व असें म्हणतात. हींच तत्त्वें स्थावर आणि जंगम रूपानें नटतात. हींच तत्त्वें देह आणि जीवरूपानें नटतात. हींच तत्त्वें या जीवाला सुखदुःखांचा साक्षात्कार घडवितात. स्थूल स्वरूपांत आलेल्या घटपटादि पदार्थांना किंवा देह आणि इंद्रियसंघात यांना कार्य असें म्हणतात. त्यांना तत्त्व असें कोणी म्हणत नाहीं. " आप्रलयं यत्तिष्ठति सर्वेषां भोगदायि भूतानाम्। तत्तत्त्व-मिति प्रोक्तं न शरीरघटादि तत्त्वमतः। "

शिवस्वरूपाच्या ठिकाणीं इच्छा, ज्ञान आणि क्रिया या रूपानें स्पंदन पावणाऱ्या शक्तीला शक्तितत्त्व असें म्हणतात. हें दुसरें तत्त्व होय. हेंच तत्त्व विश्वोत्पत्तीच्या आरंभीं शिवतत्त्वाच्या ठिकाणीं जेव्हां आविर्भूत होत असतें तेव्हां तें " बहुस्यां प्रजायेय " इत्याकारक प्रपंचवासनारूपानें आविर्भूत झालेलें दृष्टीस पडतें. या शक्तींतूनच अहंतेचा आविष्कार होतो. हा अहंकार समष्टि-स्वरूप आहे. या समष्टिस्वरूप अहंकाराचें शिवतत्त्वाच्या ठिकाणीं स्पंदन होऊं लागलें कीं तेंच शिवतत्त्व 'सदाशिव' या शब्दानें व्यवहारिलें जातें. 'सदाशिव' हें तिसरें तत्त्व होय. या सदाशिव तत्त्वाच्या ठिकाणींच सर्व जग बीजरूपानें सामावलेलें आहे. ज्याप्रमाणें अत्यंत सूक्ष्म असलेल्या वटबीजांत पुढें प्रकट होणाऱ्या वडाचें खोड, शाखा, फांद्या, पानें, फळें आणि पारंब्या या सर्वांचाच समावेश झालेला असतो, कल्पनाचक्षूंनींहि आपल्याला तो पहातां येणार नाहीं इतका तो सूक्ष्म असतो. हीच अवस्था सदाशिवतत्त्वाची आहे.

सदाशिवाच्या ठिकाणीं अहंकारयुक्त विश्वाचें स्फुरण होऊं लागलें कीं त्यालाच "ईश्वर" असें म्हणतात. विश्वाच्या विकासांतला हा चौथा स्तर आहे. तत्त्ववेत्ते याला चौथें तत्त्व मानतात. या ईश्वराच्या ठिकाणीं " मी विश्वरूप आहें " अशा प्रकारच्या वृत्तीचें जें स्फुरण होत असतें त्या वृत्तीला 'विद्या' असें म्हणतात. हें पांचवें तत्त्व होय. ईश्वराच्या ठिकाणीं निर्मिल्या जाणाऱ्या विश्वाचें वैपरीत्यानें स्फुरण होणें अथवा उदीयमान जगाचें पृथक् पृथक् स्वरूपानें भान होणें याला 'माया' असें म्हटलेलें आहे. हें सहावें तत्त्व होय.

पूर्वी सांगितलेल्या पांचव्या स्तरांतील विद्यातत्त्वाचा प्रतिबंध करणारें अविद्या हें सातवें तत्त्व होय. या अविद्येमुळें तत्त्वतः शिवस्वरूप असलेल्या शिव-तत्त्वालाच जीवभाव प्राप्त होतो. जिवाच्या ठिकाणीं तत्त्वतः सकलकर्तृत्वशक्ति असूनहि तिचा अविद्येमुळें संकोच होतो व तेथें अल्पकर्तृत्वाची प्रतीति येते. या अल्पकर्तृत्वाच्या स्फुरणालाच 'कला' असें म्हणतात. हें आठवें तत्त्व होय. जीवाच्या ठिकाणीं स्वतःसिद्ध असलेल्या त्याच्या स्वकीय नित्यतृप्तीचा अविद्येनें तिरोभाव होऊन त्याच्या ठिकाणीं अतृप्तीचें स्फुरण होऊं लागतें. या अतृप्तीच्या स्पंदनांतूनच "हें मला असावें, तें मला असावें" अशा तऱ्हेच्या उत्कट इच्छा प्रकट होऊं लागतात. या इच्छांना 'राग' असें म्हणतात. हें नववें तत्त्व होय. ही उत्कट इच्छाच सृष्टींतील आपल्याला अनुकूल असलेल्या पदार्थांना जन्म देत असते. हा सिद्धान्त उत्क्रांतिवादालाहि मान्य आहे.

अविद्येमुळेंच जीवाच्या ठिकाणीं स्वतःसिद्ध असलेली त्याची नित्यता लुप्त झाल्यासारखी होते व त्या ठिकाणीं "जायते, अस्ति, वर्धते, विपरिणमते, अपक्षीयते आणि विनश्यति अर्थात् जन्म, मृत्यु, जरा, वार्धक्य इत्यादि भावविकारांचा आविर्भाव होतो. यालाच तत्त्ववेत्त्यांनीं 'काल' असें म्हटलेलें आहे. हें दहावें तत्त्व होय. शिवतत्त्व आणि जीवतत्त्व हीं तत्त्वें तत्त्वतः एकरूप असल्यामुळें जीव देखील शिवाप्रमाणें सर्व स्वातंत्र्यानें विराजमान आहे. पण अविद्येकडून जीवाच्या स्वातंत्र्याचा अपहार केला जातो आणि जीव हा सर्वस्वीं पाळलेल्या पशूप्रमाणें परतंत्र बनतो. ज्या कारणामुळें अविद्येकडून जीवाच्या स्वातंत्र्याचा अपहार केला जातो त्या कारणाला शास्त्रज्ञ 'नियति' असें म्हणतात. नियति हें अकरावें तत्त्व होय. नियति, काल, राग, कला आणि अविद्या या पांच तत्त्वांनीं युक्त झालेला शिवच जीवभावाला प्राप्त होतो. जीवतत्त्व हें बारावें तत्त्व आहे. यालाच 'पुरुष' असेंहि म्हणतात. सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांच्या साम्यावस्थेलाच प्रकृति असें नांव आहे. या प्रकृतीलाच 'चित्त' असें म्हणतात. हें चित्त किंवा ही प्रकृति हें तेरावें तत्त्व होय. या चित्तस्पंदनांत सत्त्वगुणाचा आणि तमोगुणाचा पराभव होऊन रजोगुणाला जेव्हां प्राधान्य मिळतें तेव्हां हें चित्तस्पंदनच 'मन' या शब्दानें व्यवहारिलें जातें. हें मनच सर्व संकल्पांचें कारण आहे. सर्व संकल्पांचें अधिष्ठान मन असल्यामुळें "तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु" माझें मन नेहमीं कल्याणमय संकल्पांनीं भरलेलें असावें अशी यजुर्वेदांत अष्टाध्यायी रुद्रांतील

पहिल्याच अध्यायांत सहा मंत्रांनीं मोठी सुंदर प्रार्थना केलेली आहे. मन हें चौदावें तत्त्व होय.

रजोगुण आणि तमोगुण यांचा अभिभव होऊन मनःस्पंदनामध्यें जेव्हां सत्त्वगुण प्रकर्ष पावतो तेव्हां त्या मनाला 'बुद्धि' असें म्हणतात. निश्चयाच्या पातळींवर असणें हा बुद्धीचा स्वभाव आहे. "निश्चयात्मिका बुद्धिः" असें बुद्धीचें लक्षण आहे. बुद्धि हें पंधरावें तत्त्व होय. रजोगुणाचा आणि सत्त्वगुणाचा अभिभव होऊन बुद्धीच्या स्पंदनांत जेव्हां तमोगुणाला प्राधान्य येतें तेव्हां ती बुद्धीच अहंकार या नांवानें ओळखली जाते. अहंकाराच्या पातळींत तमोगुण प्रधान असल्यामुळें अहंकारांतून अभिव्यक्त होणारीं तत्त्वें हीं प्राधान्यानें जडस्वरूपच असतात. अहंकारच सर्व विकल्पांचें कारण होय. या ठिकाणीं विकल्प शब्दाचा अर्थ भेद असा आहे. भोक्ता आणि भोग्य किंवा मी, तूं आणि माझें – तुझें इत्यादि सर्व विकल्पाचें कारण अहंकारच आहे. अहंकार हें सोळावें तत्त्व होय. या अहंकारांतूनच पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें आणि शब्दस्पर्शादि पंचतन्मात्रा उत्पन्न झाल्या. पंचतन्मात्रांपासून आकाशादि पंचमहाभूतांचीं उत्पत्ति झाली. अहंकारापर्यंतचीं सोळा व पुढचीं वीस मिळून हीं छत्तीस तत्त्वें या जगाच्या मुळाशीं मानलीं जातात. यांतील पंचमहाभूतांपासूनच या पांचभौतिक विश्वाचा पसारा प्रकट झालेला आहे. या विश्वाच्या अगदीं मुळाशीं असलेलें शिवतत्त्व आणि शिवतत्त्वांतून अभिव्यक्त झालेलें विश्व हीं दोन्ही एकरूपच आहेत. सर्व विश्वाला आणि विश्वाला कारणीभूत असलेल्या तत्त्वांना आपल्या स्वरूपांत सामावून ठेवणारें शिवतत्त्वहि अखेर सोपाधिकच आहे असें म्हणावें लागतें. या सोपाधिक असलेल्या शिवतत्त्वाच्याहि पलीकडे असलेलें जें निरुपाधिक शुद्ध चित्तत्त्व त्याचीच आचार्य या ठिकाणीं स्तुति करीत आहेत.

ईशान, तत्पुरुष, अघोर, वामदेव आणि सद्योजात अशा या शिवाच्या पांच मूर्ति आहेत. हे शंकरांचे पांच अवतारच आहेत असेंहि वर्णन केलेलें आहे. शंकरांच्या पांच मुखांचीहि पण हीं पांच नांवें आहेत असेंहि म्हटलेलें आहे. भिन्न भिन्न कल्पांत ब्रह्मदेवाला ज्ञानशक्तीचा आणि क्रियाशक्तीचा लाभ करून देण्याकरितां शंकरांनीं हे पांच अवतार धारण केलेले आहेत. वेदामध्यें या पांच देवतांचे पांच पृथक् मंत्रहि सांगितलेले आहेत. "ईशानः सर्वविद्यानामीश्वरः सर्वभूतानां ब्रह्माधिपतिर्ब्रह्मणोऽधिपतिर्ब्रह्मा शिवो मेऽस्तु सदा शिवोम्" हा

ईशानदेवतेचा मंत्र आहे. या मंत्रांत ईशानदेवतेला सर्व विद्यांचा अधीश्वर म्हटलेलें आहे. तो सर्व भूतांचाहि अधिपति असून विश्वविधात्या ब्रह्मदेवाचाहि तो विधाता आहे. तो वेदांचाहि अधिपति आहे. तो ब्रह्मा म्हणजे सर्वापेक्षां मोठा आहे. तो शिव सर्वकाळ आम्हांला कल्याणास्पद होवो. "शिवोम्" म्हणजे मी ब्रह्मस्वरूप आहें असा साक्षात्कार त्याच्या कृपेनें आम्हांला होवो. असा या मंत्राचा अर्थ आहे. " तत्पुरुषाय विद्महे महादेवाय धीमहि तन्नो रुद्रः प्रचोदयात् " हा तत्पुरुषदेवतेचा मंत्र आहे. तत्पुरुषस्वरूप सदाशिवाची आम्ही उपासना करीत आहोंत. आम्ही महादेवाचें ध्यान करीत आहोंत. तो रुद्र आमच्या शत्रूंना कामक्रोधादि विकारांनाहि रडवितो – पराभूत करतो म्हणूनच त्याला रुद्र अशी संज्ञा आहे. तो रुद्र आम्हांला कल्याणप्रद कर्माकडे प्रवृत्त करो, असा या मंत्राचा अर्थ आहे. हा मंत्र रुद्रदेवतेचा गायत्रीमंत्र म्हणून समजला जातो.

" अघोरेभ्योऽथ घोरेभ्यो घोरघोरतरेभ्यः । सर्वतः शर्व सर्वेभ्यो नमस्ते अस्तु रुद्ररूपेभ्यः " ॥ हा शिवस्वरूपांतील चौथ्या अघोरदेवाचा मंत्र आहे. शर्व म्हणजे सर्व स्थिरचर विश्वाला आत्मस्वरूपात लीन करून घेणारा अथवा सर्वांचा संहार करणारा, अर्थात् महादेव असा याचा अर्थ झाला. हे महेश्वरा ! सत्त्वगुणानें संपन्न असलेल्या तुमच्या कांहीं मूर्ति 'अघोर' म्हणजे शांतस्वरूपाच्या आहेत तर कांहीं मूर्ति रजोगुणानें संपन्न असल्यामुळें 'घोर' म्हणजे भयंकर आहेत. तमोगुणानें संपन्न असलेल्या कांहीं मूर्ति तर फारच फार भयंकर आहेत. हे परमेश्वरा ! त्या तुमच्या सर्व रुद्रमूर्तींना माझा सर्व प्रकारें काया, वाचा, मनेंकरून नमस्कार असो. असा या मंत्राचा अर्थ आहे. हा मंत्र अत्यंत श्रेष्ठ आहे. "अघोरान्नापरो मन्त्रः" असें पुष्पदंतानें या मंत्राबद्दल शिवमहिम्नस्तोत्रांत वर्णन केलेलें आहे. या मंत्रानें भूत, प्रेत, पिशाच व ब्रह्मसमंध इत्यादि विकार नाहींसे होऊन अनेक रोगांचेंहि निरसन होतें. मनालाहि शांति मिळते. असा या मंत्राचा प्रभाव आहे.

" वामदेवाय नमो ज्येष्ठाय नमः श्रेष्ठाय नमो रुद्राय नमः कालाय नमः कलविकरणाय नमो बलविकरणाय नमो बलाय नमो बलप्रमथनाय नमः सर्वभूतदमनाय नमो मनोन्मनाय नमः " हा वामदेवस्वरूप शिवदेवतेचा मंत्र आहे. या एका मंत्रांतच अकरा मंत्र समाविष्ट झालेले आहेत. यांत अकरा रुद्रांचा उल्लेख करून त्यांना नमस्कार केलेला आहे. मागील श्लोकांत वामा, ज्येष्ठ-

इत्यादि ज्या नऊ पीठशक्ति सांगितल्या आहेत त्यांचे हे अधिपति आहेत. आतां आपण सद्योजाताचें स्वरूप पाहूं.

" सद्योजातं प्रपद्यामि सद्योजाताय वै नमो नमः । भवे भवे नातिभवे भवस्व मां भवोद्भवाय नमः ॥ " सद्योजातसंज्ञक शिवदेवतेला मी शरण आलेलों आहें. सद्योजात शिवदेवाला मी पुनःपुन्हां नमस्कार करतों. मला आपण अशी बुद्धि द्या कीं, ज्यामुळें मला पुनःपुन्हां या संसारामध्यें यावें लागणार नाहीं. 'भवे भवे न, अतिभवे मां भवस्व' जेणें करून मी संसाराच्या पलीकडे जाईन. संसाराच्या पलीकडे असलेल्या तुमच्या मंगलमय शिवस्वरूपाशीं मी एकरूप होईन अशीच मला बुद्धि द्या. संसारांतून उद्धार करणाऱ्या तुम्हांला मी नमस्कार करतों. नुकत्याच जन्माला आलेल्या मुलाप्रमाणें हें रूप नेहमींच कोमल असतें म्हणून या देवतेला 'सद्योजात' असें म्हटलेलें आहे.

ईशान, तत्पुरुष, अघोर, वामदेव आणि सद्योजात या पांच देवता, वर वर्णन केलेल्या छत्तीस तत्त्वांचेहि पांच खंड कल्पिलेले असून त्या खंडांच्याहि अधिष्ठात्री देवता म्हणून सांगितलेल्या आहेत. छत्तीस तत्त्वांचेंच सर्व विश्व असल्यामुळें पर्यायानें सर्व विश्वांच्याच या अधिष्ठात्री देवता आहेत. आपल्या शरीरांतहि पृथ्वी, जल इत्यादि पंचमहाभूतांचें अधिष्ठान म्हणून पांच विभाग कल्पिलेले आहेत. पायांपासून गुडघ्यापर्यंतचा एक भाग, गुडघ्यांपासून नाभिस्थानापर्यंतचा दुसरा भाग, नाभिस्थानापासून कंठस्थानापर्यंतचा तिसरा भाग, कंठस्थानापासून ललाटस्थानापर्यंतचा चौथा भाग आणि ललाटस्थानापासून ब्रह्मरंध्रापर्यंतचा पांचवा भाग. या पांच भागांच्याहि अधिष्ठात्री देवता याच आहेत.

शंकराची आराधना करण्याचें सुलभ पण प्रभावी साधन म्हणून जो मंत्र सांगितलेला आहे त्या शिवपंचाक्षरी-मंत्राचींहि अक्षरें पांचच आहेत. (सु. स्तो. सं., भाग पहिला, पान ४ पहा.). या मंत्रांतील पांच अक्षरें हीं त्या मंत्राचीं अंगेंच मानलीं जातात. त्या प्रत्येक अंगाची अर्थात् मंत्रांतील प्रत्येक अक्षराची अधिष्ठात्री देवता म्हणूनहि ईशान, तत्पुरुष, अघोर, वामदेव आणि सद्योजात या देवतांचा उल्लेख केलेला आहे. या अक्षरांचा उपासकाला आपल्या शरीरामध्यें न्यास करावा लागतो. करन्यास, अंगन्यास, अक्षरन्यास असे न्यासांचे अनेक प्रकार आहेत. या न्यासांनीं उपासकाचा देह शुद्ध होतो. शिवस्वरूप होतो. याप्रमाणें भावनेनें शिवस्वरूप होऊन केलेली उपासनाच पुढें उपासकाला शिव-

स्वरूपाचा साक्षात्कार करून देते. याच अभिप्रायानें आचार्यांनीं या श्लोकाच्या पहिल्या चरणांत त्यांचा उल्लेख केलेला आहे.

या पंचाक्षरी शिवमंत्राला प्रणव अर्थात् ॐ हें अक्षर जोडल्यास हा षडक्षरी मंत्र होतो. वस्तुतः सूक्ष्म विचार केल्यास प्रणवाचीं देखील पांच अंगें आहेत. अकार, उकार, मकार, नाद आणि विंदु हींच प्रणवाचीं पांच अंगें होत. या पांच अंगांतूनच "नमः शिवाय" या पांच अक्षरांचा आविर्भाव झालेला असल्यामुळें प्रणव आणि शिवपंचाक्षरी मंत्रांतील पांच अक्षरें हीं एकरूपच आहेत. या अभिप्रायानें पाहिल्यास वरील पंचाक्षरी मंत्र प्रणवयुक्त म्हटला तरी तो पंचाक्षरीच आहे असें म्हणावें लागतें.

मंत्राला तंत्रशास्त्रांत विद्या असें म्हणतात. "वियते ज्ञायते उपास्यतत्त्व-मनया इति विद्या" उपास्यदेवतेचा अथवा इष्टदेवतेचा साक्षात्कार मंत्राच्या उपासनेनेंच होत असल्यामुळें मंत्राला विद्या असें म्हणतात. मंत्र हें देवतेचेंच स्वरूप होय. या दृष्टीनें पहातां शिवमंत्र हा शिवस्वरूपच आहे. शक्तिविशिष्ट शिवतत्त्वच विश्वरूपानें नटलेलें आहे. विश्वांतील शब्दप्रपंच अथवा अक्षरप्रपंच हा शक्तिस्वरूप असून अर्थप्रपंच हा शिवस्वरूप आहे. शिव आणि शक्ति हीं दोन्ही एकरूप असल्यामुळें शब्द आणि अर्थरूप संपूर्ण विश्वप्रपंच हा शिव-स्वरूपच झाला. शिव हा मंत्रमय असल्यामुळें शिवपंचाक्षरी मंत्रहि शिवाप्रमाणेंच विश्वरूपानें नटला आहे असेंच म्हणावें लागतें. सर्व विश्वाचा जसा शिवतत्त्वांत अंतर्भाव होतो तसाच तो शिवमंत्रांतहि होतो. पिंपळाचें पान चिखलांत रुतून वाळलें आणि त्या पानांतील मांसल भाग झडला म्हणजे देठापासून तों शेंड्याच्या अग्रभागापर्यंत तें पान शिरांनीं व्यापून टाकलेलें आहे असें आपणांस दिसतें. त्याचप्रमाणें अकार, उकार, मकार, नाद आणि विंदु अर्थात् ॐकार, या ॐकारानेंच सर्व वाक्प्रपंच व्यापून टाकलेला आहे. अक्षरप्रपंच हा वाचक आहे तर भूतभौतिक विश्वप्रपंच हा वाच्य आहे. वाच्य आणि वाचक यांच्यामध्येंहि शास्त्रज्ञ अभेद मानीत असतातच. तात्पर्य, शिवपंचाक्षराची सांगोपांग उपासना म्हणजे विश्वरूपानें नटलेल्या विश्वेश्वराचीच उपासना होय. शिवपंचाक्षरी मंत्र हा छत्तीस तत्त्वांना प्रकाशित करतो म्हणून त्यास 'तत्त्वविद्या' असें म्हटलेलें आहे.

आतां आपण मूळ श्लोकांतील अन्वयार्थाच्या अनुरोधानें सर्व श्लोकाचा अर्थ लक्षांत घेऊं. हे शिवा मंगलमय ब्रह्मस्वरूपा शंकरा! ईशान, तत्पुरुष,

अघोर, वामदेव आणि सद्योजात अशा या पांच देवतारूपी अंगांनीं युक्त असलेली आणि हृदय, मुख इत्यादि जीं शिवमंत्रांतील अक्षरांचा न्यास करण्याला उपांगभूत असलेलीं सहा अंगें, त्यांनीं युक्त असलेली अशी ही तत्त्वविद्या म्हणजे "नमः शिवाय" हा पंचाक्षरी मंत्र अथवा "ॐ नमः शिवाय" हा षडक्षरी मंत्र अथवा "ह्रीं नमः शिवाय" हा शक्तिबीजसहकृत शिवशक्तिषडक्षरी मंत्र या मंत्र्याच्याहि पलीकडे आपण आहां. विश्वरूपानें नटलेल्या अथवा छत्तीस तत्त्वांच्या रूपानें नटलेल्या शिवतत्त्वाचा वाचक असलेला मंत्र हा अखेर सगुण ब्रह्माचाच वाचक ठरतो. सगुण ब्रह्माच्याहि पलीकडे असलेलें अर्थात् कार्य आणि कारण यांच्याहि पलीकडे असलेलें जें शुद्ध शिवतत्त्व त्याचें शब्दानें प्रतिपादन करतां येत नाहीं. "यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह" असें वेदानें त्याचें वर्णन केलेलें आहे. केवळ ओळखीसाठीं अथवा व्यवहाराठीं त्या तत्त्वाला "परात्पर शिवतत्त्व" असें म्हटलें जातें.

हे परात्पर शिवतत्त्वस्वरूपा शंकरा! पृथ्वी, जल, तेज, वायु आणि आकाश त्याचप्रमाणें सूर्य, चंद्र आणि आत्मा या तुमच्या सगुण स्वरूपांतील आठ मूर्ति आहेत. अथवा वर वर्णन केलेल्या छत्तीस तत्त्वांच्या रूपानें आणि तत्त्वजन्य विश्वप्रपंचाच्या रूपानें तुम्हीच नटलेले आहां. संपूर्ण वाक्प्रपंच तुमच्या या सगुण स्वरूपाचेंच प्रतिपादन करतो. तत्त्वतः तुम्ही या छत्तीस तत्त्वांच्या 'परं' म्हणजे पलीकडचे आहां. अक्षरराशिस्वरूप असलेल्या मंत्रविद्येच्याहि पलीकडे तुम्ही आहां. परमेश्वरा! तुम्ही 'अनौपम्य' आहां. तुम्हांला कोणाची उपमा द्यावी? कोण आहे या जगांत तुमच्यासारखा दुसरा? या जगांत तुमच्यासारखे तुम्हीच आहां. हे प्रभो! अतीत अतीत अगदीं सर्वातीत असलेल्या तुम्हांला कोण बरें जाणूं शकेल? आणि कसा जाणूं शकेल? हे परमेश्वरा! मी तुम्हांला लाखो प्रणाम करीत आहें.

प्रवाल-प्रवाह-प्रभा-शोणमर्धं
मरुत्वन्मणि-श्रीमहःश्याममर्धम् ।
गुणस्यूतमेतद्वपुः शैवमन्तः
स्मराणि स्मरापत्ति-संपत्ति-हेतोः ॥ ५ ॥

हे परमेश्वरा ! आपण अर्धनारीनटेश्वर आहां. आपलें अर्धे स्वरूप पोवळ्यांच्या अंकुरांच्या कांतीप्रमाणें आरक्त अर्थात् श्वेतमिश्रित रक्तवर्ण आहे. तर अर्धे स्वरूप इंद्रनील मण्याच्या कांतीप्रमाणें तेजस्वी, शनीच्या खड्गाप्रमाणें श्यामवर्ण आहे. मरुत्वन्मणि याचा अर्थ इंद्रनील रत्न असा आहे. आपलें स्वरूप, आपली मूर्ति एका दृष्टीनें सर्व गुणांनीं ओतप्रोत भरलेली आहे. तर अंतर्दृष्टीनें 'शैव' म्हणजे शिवस्वरूप – परब्रह्मस्वरूप – अर्थात् निर्गुणहि आहे. हे अर्धनारीनटेश्वरा ! आपलें हें स्वरूप एकीकडे स्मर म्हणजे कामदेव, त्याच्या आपत्तीला म्हणजे नाशाला – मरणाला कारणीभूत आहे, तर दुसरीकडे तें स्मर म्हणजे कामदेव त्याच्या संपत्तीला म्हणजे अभिवृद्धीला कारणीभूत आहे ! शिवस्वरूपानें आपण कामदेवाचा नाश केला आहे, तर शक्तिरूपानें आदिमायेच्या श्रीललितामहात्रिपुरसुंदरी देवतेच्या रूपानें कामदेवाला समृद्धहि केलेलें आहे. श्रीविद्येच्या उपासनेनेंच कामदेव जगज्जेता झाला ! (सौंदर्यलहरी, श्लोक ६ पहा). परमेश्वरा ! तुमच्या या स्वरूपाचें मी अन्तःकरणपूर्वक स्मरण करीत आहें, चिंतन करित आहें.

स्वसेवा-समायात-देवासुरेन्द्राऽऽ
नमन्मौलि-मन्दार-मालाभिषक्तम् ।
नमस्यामि शम्भो पदाम्भोरुहं ते
भवाम्भोधिपोतं भवानीविभाव्यम् ॥ ६ ॥

स्वतःची सेवा करण्याकरितां आलेले देव, दैत्य आणि त्यांचे राजे हे चरणकमलीं पूर्णपणें नम्र झाले असतां त्यांच्या मस्तकांवरील पारिजातकाच्या फुलांच्या माळा ज्यांच्या ठिकाणीं संलग्न झालेल्या आहेत अशीं हीं तुमचीं चरणकमलें, हीं जणूं कांहीं भवसागरांतून तारून नेणारें जहाजच आहे, भवानी म्हणजे सर्व विश्वाला जन्म देणारी व सर्व विश्वाचें कल्याण करणारी जी देवी पार्वती तिनेंहि आपल्या हृदयामध्यें ज्यांचें चिंतन करावें अशा त्या तुमच्या चरणकमलांना मी नमस्कार करतों.

जगन्नाथ मच्चाथ गौरीसनाथ
प्रपञ्चानुकम्पिन्विषञ्चातिंहारिन् ।

महःस्तोममूर्ते समस्तैकबन्धो
नमस्ते नमस्ते पुनस्ते नमोऽस्तु ॥ ७ ॥

हे परमेश्वरा जगन्नाथा ! आपण जगाचे नाथ म्हणजे स्वामी, पालक आहां. जगांतच माझाहि अंतर्भाव असल्यामुळें आपण मन्नाथ म्हणजे माझेहि नाथ आहां. आपण गौरीसनाथ म्हणजे पार्वतीसहित विराजमान आहां, पार्वतीनें युक्त आहां. पार्वती ही आपली स्वामिनी आहे. आपल्या चरणीं अनन्यभावानें जे शरण आलेले असतील त्यांच्याविषयीं आपण पूर्ण दयाशील आहां. आपत्तीमध्यें सांपडलेल्यांचीं संकटें आपण हरण करतां. आपण तेजःपुंज आहां. आपली मूर्ति तेजःपुंज आहे. आपण समस्तांचे एकमेव बंधु म्हणजे हितचिंतक आहां. तुम्हांला मी नमस्कार करतों. भक्तियुक्त अंतःकरणानें मी तुम्हांला पुनःपुन्हां नमस्कार करतों.

विरूपाक्ष विश्वेश विश्वादिदेव
त्रयीमूल शम्भो शिव त्र्यम्बक त्वम् ।
प्रसीद स्मर त्राहि पश्यावमुक्त्यै
क्षमां प्राप्नुहि त्र्यक्ष मां रक्ष मोदात् ॥ ८ ॥

हे शंभो परमेश्वरा ! सूर्य, चंद्र आणि अग्नि हे आपले नेत्र असल्यामुळें आपणांस विरूपाक्ष म्हणतात. अथवा विरूप म्हणजे दैत्य, राक्षस किंवा आंधळे, लुळे, पांगळे यांच्यावरहि आपण कृपादृष्टि करतां म्हणूनहि आपणांस विरूपाक्ष म्हणतात. आपण सर्व विश्वाचे ईश म्हणजे स्वामी आहां. या सर्व विश्वाचे आदिदेव म्हणजे मुख्य देव तुम्हीच आहां. अथवा सर्व विश्वाला प्रामुख्यानें प्रकाशित करण्याचें कार्य आपणच करीत आहां म्हणून आपणांस आदिदेव म्हणतात. हे शिवशंकरा ! आपण प्रामुख्यानें ऋक्, यजु आणि साम या तिन्ही वेदांचें, यज्ञकर्माला प्रामुख्यानें उपयुक्त असलेल्या तिन्ही वेदांचें आपण मूळ म्हणजे अधिष्ठान आहां. आधार आहां. हे शंभो शंकरा ! तुम्ही त्रैलोक्याचे अंबक म्हणजे पिता आहां, म्हणून तुम्हाला त्र्यंबक म्हणतात. अथवा तिन्ही वेदांचे आपण जनक आहां म्हणूनहि आपणांस त्र्यंबक म्हणतात.

हे प्रभो ! या जटिल संसारबंधनांतून मुक्त होण्यासाठीं आपण माझ्याकडे कृपादृष्टीनें पहा. माझ्या अपराधांची क्षमा करा. हे त्रिनयना ! आपण 'मोदात्' म्हणजे विषयसुखापासून अर्थात् विषयसुखाच्या मोहापासून माझें रक्षण करा.

महादेव देवेश देवादिदेव
स्मरारे पुरारे यमारे हरेति ।
ब्रुवाणः स्मरिष्यामि भक्त्या भवन्तं
ततो मे दयाशील देव प्रसीद ॥९॥

हे महादेवा ! आपण सर्व देवांचे अधिपति आहां. सर्व देवांचे आपण मुख्य देव आहां. आपण कामदेवाला भस्म केलें म्हणून आपणांस स्मरारि असें म्हणतात. त्रिपुरासुराचा आपण वध केला म्हणून आपणांस पुरारि असेंहि म्हणतात. आपल्या मंत्राच्या जपानें मृत्यूलाहि जिंकतां येतें म्हणून आपणांस यमारि म्हणजे मृत्युंजय असेंहि म्हणतात. आपण भक्तांचीं सर्व दुःखें हरण करतां म्हणून आपणांस हर असेंहि म्हणतात. हे शंभो, शंकरा, महादेवा, सदाशिवा, महेश्वरा अशीं आपलीं नांवें घेत घेत मी भक्तियुक्त अंतःकरणानें आपलें स्मरण करीन. आपण दयाशील आहां. म्हणून हे देवा ! आपण माझ्यावर प्रसन्न व्हा हींच माझी प्रार्थना आहे.

त्वदन्यः शरण्यः प्रपन्नस्य नेति
प्रसीद स्मरन्नेव हन्यास्तु दैन्यम् ।
न चेत्ते भवेद्भक्तवात्सल्यहानि-
स्ततो मे दयालो सदा संनिधेहि ॥ १० ॥

अनन्यचित्तानें चरणीं शरण आलेल्यांना तुझ्याशिवाय दुसरा कोणी शरण्य म्हणजे रक्षण करणारा नाहीं. हे देवा ! प्रसन्न हो. याप्रमाणें तुमचें स्मरण करीत असतांनाच तुम्ही त्याच्या दैन्याचें अपहरण करतां. हे दयाळा परमेश्वरा ! माझें रक्षण करण्यांत तुमच्या भक्तवात्सल्याची हानि होत नसेल तर माझ्या नित्य सान्निध्यांत रहा आणि माझें रक्षण करा.

अयं दानकालस्त्वहं दानपात्रं
भवानेव दाता त्वदन्यं न याचे ।

भवद्भक्तिमेव स्थिरां देहि मह्यं
कृपाशील शम्भो कृतार्थोऽस्मि तस्मात् ॥ ११ ॥

हे शंभो महादेवा ! माझ्यासारखा आतुर, दान घेण्याला प्राप्त झालेला असल्यामुळें, हा दान करण्याला योग्य काल आहे आणि मी दान घेण्याला योग्य आहें. आपण दानशूर आहां. आपल्यासारखा श्रेष्ठ दाता या जगांत दुसरा कोणी नाहीं. मी तुमच्याशिवाय दुसऱ्या कोणाची याचनाहि करणार नाहीं. माझें एकच मागणें आहे. मला तुमची स्थिरभक्ति द्या. अचल – दृढभक्तीच – द्या. आपण कृपाशील आहां. आपल्या दृढभक्तीनेंच मी कृतार्थ होईन.

पशुं वेत्सि चेन्मां तमेवाधिरूढः
कलङ्कीति वा मूर्ध्नि धत्से तमेव ।
द्विजिह्वः पुनः सोऽपि ते कण्ठभूषा
त्वदङ्कीकृताः शर्व सर्वेऽपि धन्याः ॥ १२ ॥

हे प्रभो शंकरा ! तुम्ही म्हणाल कीं, तूं पशु आहेस. अज्ञानी मूर्ख आहेस. तुला सान्निध्य देण्यांत काय अर्थ आहे आणि दृढभक्ति अर्पण करून तरी त्याचा काय उपयोग ? त्यावर माझें उत्तर असें कीं, तुम्ही मला पशु समजत असाल तर तेवढ्यानें मी कांहीं उपेक्षणीय होत नाहीं. कारण तुम्ही पशुपति आहां. नंदी हा तर तुमचें वाहन आहे. तुम्ही पशूवर आरुढ झालेले आहां. म्हणूनच तुम्हांला पशुपति किंवा पशुपतीश्वर असें म्हणतात. बरें, तुम्ही म्हणाल कीं, तूं कलंकी आहेस. तुला कलंक म्हणजे पातकांचा डाग लागलेला आहे. तुला कसलें सान्निध्य द्यावें ? तुझा अंगीकार कसा करावा ? तर तेंहि म्हणणें बरोबर नाहीं. कारण तुम्ही कलंकी असलेल्याला आपल्या मस्तकावर धारण केलेलें आहे. या ठिकाणीं कलंकी शब्दाचा अर्थ चंद्र असा आहे. चंद्राला कलंक असतो, डाग असतो. म्हणून त्याला कलंकी असें म्हणतात. तो डाग सशासारखा दिसतो म्हणून चंद्राला शशी किंवा शशांक असें म्हणतात. तो डाग हरिणासारखा दिसतो म्हणून कांहीं लोक चंद्राला मृगाङ्क असेंहि म्हणतात. असो; देवा तुम्ही कलंकी असलेल्या चंद्राला आपल्या मस्तकावर धारण केलेलें आहे. मग मी कलंकी असलों म्हणून माझा अंगीकार करण्यास काय हरकत आहे ? देवा ! तुम्ही म्हणाल कीं, तूं

द्विजिह्व, दुष्ट, दुतोंड्या, खोटें बोलणारा आहेस तर हीहि सबब बरोबर नाहीं. कारण द्विजिह्वाला म्हणजे सर्पाला तुम्ही आपल्या गळ्यांतलें भूषण बनविलेलें आहे. शंकरा ! तुम्ही ज्याचा ज्याचा अंगीकार केला ते सर्व धन्य झालेले आहेत. माझाहि आपण अंगीकार केलांत तर मीहि धन्य होईन.

न शक्नोमि कर्तुं परद्रोहलेशं
कथं प्रीयसे त्वं न जाने गिरीश ।
तथा हि प्रसन्नोऽसि कस्यापि कान्ता-
सुतद्रोहिणो वा पितृद्रोहिणो वा ॥ १३ ॥

हे गिरिशा म्हणजे कैलासाधिपते शंकरा ! मी तिळमात्रहि कोणाचाहि द्रोह करूं शकत नाहीं. मी कोणाचाहि द्वेष, मत्सर अथवा घातपात करूं शकत नाहीं. तुम्ही माझ्यावर कसें बरें संतुष्ट व्हाल ? मला कांहीं कळत नाहीं. कारण असें कीं, तुमच्या भक्तांपैकीं कोणी कांतादोही तर कोणी पुत्रद्रोही, कोणी पितृद्रोही तर कोणी आत्मद्रोही ! देवा ! त्यांच्यावरहि तुम्ही प्रसन्न झालांत. मी तर कोणाचाच द्रोह करूं शकत नाहीं. मग आपण माझ्यावर कसें प्रसन्न व्हाल ?

सिंहकेतु राजाचा एक सेवक होता. त्याचें नांव चंडेश्वर होतें. तो मोठा शिवभक्त होता. चिताभस्म लावून रोज शंकराची पूजा करावी असा त्याचा नियम असे. एके दिवशीं त्याला चिताभस्म मिळालें नाहीं. शेवटीं त्याच्या पत्नीनें चिताप्रवेश केला ! तिच्या चितेचें भस्म लावून त्यानें शंकराची पूजा केली. भगवान् शंकर प्रसन्न झाले. त्यांनी चंडेश्वराच्या पत्नीला जिवंत करून चंडेश्वराला कृतार्थ केले ! आचार्य म्हणतात देवा ! चंडेश्वराचा कांतादोह तुम्हीं उपेक्षिला व त्याच्यावर कृपा केली.

दक्षिण देशांत दभ्रभक्त या नांवाचा शंकरांचा एक भक्त होता. त्याला तेलगू भाषेंत 'शिरुत्तोंडर' असें म्हणत. दोन्ही शब्दांचा अर्थ एकच आहे. अगदीं सामान्य शिवभक्त असा त्याचा अर्थ होतो. शिवभक्त असलेल्या अतिथीला जेवूं घातल्यावांचून आपण जेवावयाचें नाहीं असा त्याचा नियम असे. एके दिवशीं त्यानें पुष्कळ मार्गप्रतीक्षा केली, पण शिवभक्त असलेला अतिथि मिळाला नाहीं. शेवटीं भगवान् शंकरच अतिथि होऊन त्याच्या घरीं आले. म्हणाले, तूं आपल्या मुलाचें मांस घालशील तर मी भोजन करीन. दभ्रभक्त मोठ्या पेंचांत पडला. निरुपायास्तव

स्थानें तें मान्य केलें. आपला एकुलता एक मुलगा त्यानें त्या शिवभक्ताच्या आतिथ्याला बळी दिला. मुलाचें मांस शिजवून त्यानें त्या अतिथीस बोलावलें. अतिथि म्हणाला, 'तुमच्या मुलाला माझ्या पंक्तीस बसवा.' दभ्रभक्त म्हणाला, 'महाराज! आमचा एकुलता एक मुलगा, तो आपल्या आज्ञेप्रमाणें आम्ही आपल्या भोजनाकरितां मारला. आतां आम्हांला मूलबाळ कांहीं नाहीं.' अतिथि म्हणाला, 'तर मग निपुत्रिकाच्या घरीं मी जेवत नसतो. हा मी निघालों.' दभ्रभक्त मोठ्या संकटांत पडला. एकुलता एक मुलगा होता तोहि हातचा गेला आणि शिवभक्त अतिथीहि पण उपाशी चालला!! त्यानें त्या अतिथीचे पाय धरले. म्हणाला, 'महाराज! आपण जेवा. उपाशी जाऊं नका.' अतिथि म्हणाला, 'जा. इकडे तिकडे पहा. मुलाला खूप मोठ्यानें हांका मारा.' काय चमत्कार झाला पहा. तो मुलगा हांकेसरसे धावतच आला. सर्वांना आनंद झाला. सर्वांनीं त्या अतिथीच्या चरणीं साष्टांग प्रणिपात केला. मुलाच्या आईनेंहि गुडघे टेकवून अतिथीच्या पायांवर मस्तक ठेवलें. अतिथि कसला तो? ते प्रत्यक्ष भगवान् शंकरच होते! ते दभ्राची भक्ति पाहून प्रसन्न झाले. अतिथीचा वेष टाकून त्यांनीं शिवरूपानें सर्वांना दर्शन दिलें! त्यांनीं सर्वांना कृतार्थ केलें. आचार्य म्हणतात, शंकरा! सुतद्रोही दभ्रभक्ताप्रमाणें आपण:माझ्यावरहि प्रसन्न व्हा. आपण माझी परीक्षा पाहूं नका व मला कसालाहि लावूं नका. कृपा करा.

पितृद्रोही शब्दाचा अर्थ माता आणि पिता यांचा द्रोह करणारा असा होतो. 'माता च पिता च पितरौ' असा हा एकशेष समास होतो. आचार्य म्हणतात, हे प्रभो शंकरा! परशुराम हे तुमचे मोठे भक्त होते. त्यांच्या हातून मातृवध घडला. तरी पण तुम्ही त्यांना कृतार्थ केलें! रावण तुमचा मोठा भक्त होता. त्यानें आपल्या पित्याचा फार छळ केला, असें वाल्मीकि रामायणाच्या उत्तर कांडांत सांगितलेलें आहे. प्रभो! आपण रावणालाहि प्रसन्न झालांत.

एक शिवभक्त होता. त्याचेंहि नांव चंडेश्वरच होतें असें म्हणतात. त्याला त्याच्या वडिलांनीं गाई राखण्याचें काम दिलें. रानांत गेला म्हणजे त्यानें गाईच्या धारा काढावयाच्या व शंकराला गाईच्या दूधानें स्नान घालावयाचें. शंकरावर दुधाची धार धरावयाची असा त्याचा नित्यक्रम असे. संध्याकाळीं त्याचे वडील चरवी घेऊन धारा काढावयास गाईच्या जवळ जावयाचे तेव्हां त्यांना गाईच्या कासा रिकाम्या असलेल्या दिसत. ते चिंता करूं

लागले. लोकांनीं त्यांना सांगितलें कीं, तुमचाच मुलगा रोज गाईच्या धारा काढून तें दूध महादेवाच्या पिंडीवर ओततो. वडील रागावले. त्याला न कळत ते एके दिवशीं रानांत गेले. पहातात तर मुलगा आपला गाईच्या धारा काढून शंकराला अभिषेक करीत आहे ! ते त्याच्यावर फार रागावले. त्यांनीं त्याची व शंकराची खूपच निर्भर्त्सना केली. शंकरांची निंदा त्या मुलाला आवडली नाहीं. त्यालाहि मोठा राग आला. त्यानें रागाच्या भरांत कुऱ्हाड घेतली व शिवनिंदा करणाऱ्या वडिलांचे पाय तोडले !! शेवटीं भगवान् शंकर तेथें प्रकट झाले. त्यांनीं त्या मुलाचा राग शांत केला व त्याच्या वडिलांनाहि पाय देऊन पूर्ववत् धडधाकट केलें ! आचार्य म्हणतात, शंकरा ! अशा या पितृद्रोही भक्तांवरहि तुम्हीं कृपा केली. तुमच्या कित्येक भक्तांनीं तुम्हांला आपलीं शिरकमलें अर्पण केलेलीं आहेत. देवा ! माझ्या हातून हें कांहीं घडलें नाहीं तरी आपण माझ्यावर प्रसन्न व्हावें. कृपा करावी. हीच माझी मनीषा आहे.

स्तुतिं ध्यानमर्चां यथावद्विधातुं
भजन्नप्यजानन् महेशावलम्बे ।
त्रसन्तं सुतं त्रातुमग्रे मृकण्डो-
र्यम-प्राण-निर्वापणं त्वत्पदाब्जम् ॥ १४ ॥

हे महेश्वरा ! मी तुमची भक्ति करीत असूनहि अज्ञानामुळें तुमची स्तुति कशी करावी, ध्यान कसें करावें, यथाशास्त्र पूजा-अर्चा कशी करावी, हें मला कांहीं कळत नाहीं. तथापि, मी अनन्यभक्तीनें तुमचा आश्रय करीत आहें. पूर्वी आपण मृत्यूच्या भयानें त्रस्त झालेल्या मृकण्डु ऋषींच्या पुत्राला म्हणजे मार्कण्डेय महामुनींना वांचविण्याकरितां, रेड्यावर बसून आलेल्या यमाला लत्ताप्रहार करून गतप्राण केलें आणि मार्कण्डेयाचा जीव वांचविला ! 'त्वत्पदाब्जम्' म्हणजे आपलें चरणकमल हें 'यमप्राणनिर्वापण' म्हणजे यमदेवाचेहि प्राण घेणारें आहेत. हे शंकरा ! असा हा आपला प्रभाव आहे.

मार्कण्डेय ऋषींचे आयुष्य सोळा वर्षांचेंच होतें. १६ वर्षें पूर्ण झाल्याबरोबर यमराज त्यांना घेऊन जाण्यासाठीं स्वतः आले तेव्हां भयभीत होऊन मार्कण्डेय ऋषींनीं शंकराला मिठी मारली व " चन्द्रशेखर चन्द्रशेखर चन्द्रशेखर पाहि माम् ! चन्द्रशेखर चन्द्रशेखर चन्द्रशेखर रक्ष माम् " अशा आर्तस्वरानें

शंकरांचा धावा केला. भक्तवत्सल भगवान् शंकर धावत आले व त्यांनीं यमाला लाथ मारली! यम गतप्राण झाला! मार्कण्डेय मुनि मृत्यूच्या संकटांतून मुक्त झाले! अश्वत्थामा, बलि, व्यास इत्यादि सप्तचिरंजीवांच्या स्मरणाबरोबरच मार्कण्डेयांचेंहि लोक पहांटें स्मरण करावें. "जीवेद्वर्षशतं साग्रमपमृत्युविवर्जितः" अपमृत्यु-विरहित होऊन त्याला पूर्ण सुखाचें शंभर वर्षांचें आयुष्य लाभतें असें मार्कण्डे-यांच्या स्मरणाचें माहात्म्य आहे.

शिरो-दृष्टि-हृद्रोग-शूल-प्रमेह-
ज्वरार्शो-जरा-यक्ष्म-हिक्का-विषार्तान् ।
त्वमाद्यो भिषग्भेषजं भस्म शम्भो
त्वमुल्लाघयास्मान्वपुर्लाघवाय ॥ १५ ॥

शिरोरोग म्हणजे डोकेंदुखी, अर्धशिशी वगैरे; दृष्टिरोग म्हणजे डोळे लाल होणें, डोळे दुखणें, चिपडे येणें, मोतीबिंदु, कांचबिंदु, तिमिर, दृष्टिमांद्य इत्यादि; हृद्रोग म्हणजे हृदयाचे विकार – हृदय सुजणें, मोठे होणें, हृदयाची गति अनियमित होणें, हृदय फडफडणें इत्यादि; शूल म्हणजे पोटांत दुखणें, कळ येणें इत्यादि. प्रमेह म्हणजे लघुशंकेचे विकार; ज्वर म्हणजे ताप; अर्श म्हणजे मूळव्याध; जरा म्हणजे वार्धक्य; यक्ष्मा म्हणजे क्षय; हिक्का म्हणजे उचकी आणि विष म्हणजे अनेक प्रकारच्या विषबाधा. अशा प्रकारच्या अनेक रोगांनीं आर्त म्हणजे पीडित झालेल्या मानवांना त्या सर्व रोगांतून मुक्त करणारे तुम्हीच मुख्य वैद्य आहां. आणि तुमच्या धुनींतील भस्म – तुमची विभूति – अंगारा हेंच मुख्य औषध आहे. "अस्मान् उल्लाघय" म्हणजे तुम्ही आम्हांला रोगमुक्त करा. आमच्या शरिरांतील सर्व रोग नाहींसे होऊन आम्हांला शरीरलाघव प्राप्त व्हावें म्हणून हे शंकरा, तुम्हीच आमच्या रोगाची चिकित्सा करा. तुम्हीच आम्हांला आरोग्यसंपन्न करा. या ठिकाणीं शारीरिक रोगांचा उल्लेख दिग्दर्शनमात्र आहे. शारीरिक रोगांबरोबरच तुम्ही आम्हांला भवरोगांतूनहि मुक्त करा हाच प्रार्थनेचा अभिप्राय आहे.

दरिद्रोऽस्म्यभद्रोऽस्मि भग्नोऽस्मि दूये
विषण्णोऽस्मि सन्नोऽस्मि खिन्नोऽस्मि चाहम् ।
भवान्प्राणिनामन्तरात्मास्ति शम्भो
ममाधिं न वेत्सि प्रभो रक्ष मां त्वम् ॥ १६ ॥

हे शंकरा ! मी दरिद्री आहें. मी अभद्र म्हणजे अमंगळ आहें. माझे सर्व मनोरथ भग्न झालेले आहेत. 'दूये' म्हणजे मला अत्यंत दुःख होत आहे. मी 'विषण्ण' म्हणजे उद्विग्न झालों आहें. 'सन्न' म्हणजे थकलों आहें आणि 'खिन्न' म्हणजे कष्टी झालों आहें. हे शंकरा ! आपण पूज्य आहां. सर्व प्राण्यांचे अन्तरात्मा आहां. हे प्रभो ! तुम्हांला माझें दुःख कळत नाहीं काय ? हे शंकरा ! आपण माझें रक्षण करा.

त्वदक्ष्णोः कटाक्षः पतेत्तूर्ध्वक्ष यत्र
क्षणं क्षमा च लक्ष्मीः स्वयं तं वृणाते ।
किरीट-स्फुरच्चामर-च्छत्र-माला-
कलाची-गज-क्षौम-भूषाविशेषैः ॥ १७ ॥

शंकराला तीन 'अक्ष' म्हणजे नेत्र आहेत म्हणून त्र्यक्ष किंवा त्रिनयन, त्रिलोचन असें म्हणतात. हे त्रिनयना ! तुमच्या नेत्रद्वयाचे कटाक्ष ज्या ठिकाणीं क्षणभर पडतील अर्थात् कृपापूर्ण दृष्टीनें तुम्ही क्षणभर ज्याच्याकडे पहातां त्याला 'क्ष्मा' म्हणजे पृथ्वी आणि लक्ष्मी ह्या दोन्ही आपण होऊन वरतात. त्याला पृथ्वीचा आणि लक्ष्मीचा सहजच लाभ होतो. पृथ्वी आणि लक्ष्मी यांचा लाभ झाला असतां त्याच्या मस्तकावर मुकुट झळकतो. चामरें ढाळलीं जातात. छत्र धरलें जातें. गळ्यांत माळा पडतात. कलाची म्हणजे बाहुभूषणें त्याच्या भुजदंडावर शोभूं लागतात. दारावर हत्ती झुलतो. जरीचीं व रेशमाचीं वस्त्रें आणि अनेक प्रकारचे अलंकार त्याला प्राप्त होत असतात. जणूं कांहीं या सर्व प्रकारांनीं पृथ्वीनें आणि लक्ष्मीनें त्याला स्वतः वरलेलेंच असतें ! आपल्या कृपा-कटाक्षाचा केवढा हा महिमा आहे ! !

भवान्यै भवायापि मात्रे च पित्रे
मृडान्यै मृडायाप्यघघ्न्यै मखघ्ने ।
शिवाङ्गायै शिवाङ्गाय कुर्मः शिवायै
शिवायाम्बिकायै नमस्त्यम्बकाय ॥ १८ ॥

हे शंकरा ! आपल्या वामभागीं भवानी म्हणजे पार्वती विराजमान आहे. तिला मी नमस्कार करतों. ती सर्व विश्वाला जन्म देते, विश्वाचें कल्याण करतें

म्हणून तिला भवानी असें म्हटलें आहे. तुम्ही पण त्या आदिशक्तीच्या साहाय्यानें सर्व विश्वाला जन्म देतां व विश्वाचें कल्याण करतां म्हणून तुम्हांलाहि पण 'भव' असें म्हणतात. मी तुम्हांलाहि नमस्कार करतों. पार्वती ही जगन्माता आहे तर आपण जगाचे पिता म्हणजे जनक आहां. पार्वती ही जगाला सुख देणारी आहे म्हणून तिला मृडानी असें म्हणतात, तर भगवान् शंकर हेहि विश्वाला सुख देणारे असल्यामुळें त्यांनाहि 'मृड' असें म्हणतात. म्हणूनच पुष्पदंतांनीं देखील " जनसुखकृते सत्त्वोद्रिक्तौ मृडाय नमो नमः " सत्त्वगुणाचा उत्कर्ष झाला असतां भगवान् शंकर सर्व जनांना सुख देतात म्हणून त्यांना मृड असें म्हणतात (मृडयति सुखयति इति मृडः). पार्वती भक्तजनांच्या सर्व पातकांचा नाश करते म्हणून तिला अघघ्नी म्हणतात. तर भगवान् शंकर यांनीं दक्ष-प्रजापतीच्या यज्ञाचा विध्वंस केला असल्यामुळें त्यांना 'मखघ्न' असें म्हणतात. दोघेहि नखशिखान्त मंगलमय अवयवांनीं नटलेले असल्यामुळें पार्वतीला 'शिवाङ्गी' असें म्हटलें आहे, तर शंकराला 'शिवाङ्ग' असें म्हटलें आहे. भगवान् शंकर हे परब्रह्मस्वरूप असल्यामुळें त्यांना 'शिव' म्हणतात तर देवी पार्वती ही त्याच परब्रह्माची पूर्ण शक्ति असल्यामुळें तीहि परिपूर्ण परब्रह्मस्वरूपच आहे म्हणून तिला 'शिवा' असें म्हणतात. एक अंबिका म्हणजे माता आहे तर दुसरे त्र्यंबक म्हणजे त्रैलोक्याचे पिता आहेत. आम्ही उभयतांच्या चरणीं भक्तिभावें नमस्कार करतों.

भवद्गौरवं मद्लघुत्वं विदित्वा
प्रभो रक्ष कारुण्यदृष्ट्यानुगं माम् ।
शिवात्मानुभावस्तुतावक्षमोऽहं
स्वशक्त्या कृतं मेऽपराधं क्षमस्व ॥ १९ ॥

हे प्रभो परमेश्वरा ! आपला मोठेपणा आणि माझा लहानपणा आपण लक्षांत घेऊन आपला अनुयायी — भक्त असलेला असा जो मी, या माझें आपण कृपापूर्ण दृष्टीनें रक्षण करा. हे सदाशिवा ! तुमच्या स्वतःच्या प्रभावाची स्तुति करण्यास मी असमर्थ आहें. मी आपल्या अल्पस्वल्प शक्तीप्रमाणें स्तुति करीत आहें. यांत माझ्याकडून जें कांहीं चुकेलमाकेल त्या अपराधाची क्षमा करावी.

यदा कर्णरन्ध्रं व्रजेत्कालवाह-
द्विपत्कण्ठ-घण्टा-घणात्कार-नादः ।
वृषाधीशमारुह्य देवौपवाह्यं
तदा वत्स मा भीरिति प्रीणय त्वम् ॥ २० ॥

कानाला शत्रूप्रमाणें भयप्रद वाटणारा यमराजाचें वाहन असलेल्या रेड्याच्या गळ्यांतील घंटांचा घण् घण् आवाज, ज्या वेळेला माझ्या कानांवर येऊन आदळेल, कर्णरंध्रांत प्रवेश करील, अर्थात् मला घेऊन जाण्यासाठीं यमराज आल्याची मला जेव्हां सूचना मिळेल, त्या वेळेला हे देवाधिदेवा महादेवा ! तुम्हीं पण तुमचें औपवाह्य म्हणजे वाहन असलेला जो वृषाधीश म्हणजे नंदिकेश्वर, त्यावर बसून "बाळा, भिऊं नकोस हा मी आलों" असें म्हणून धावत या आणि मला संतुष्ट करा.

यदा दारुणाभाषणा भीषणा मे
भविष्यन्त्युपान्ते कृतान्तस्य दूताः ।
तदा मन्मनस्त्वत्पदाम्भोरुहस्थं
कथं निश्चलं स्यान्ममस्तेऽस्तु शम्भो ॥ २१ ॥

कृतान्त म्हणजे काळ, त्याचे दूत – ज्यांचें संभाषणहि अत्यंत दारुण म्हणजे भयंकर असतें, ते स्वतः दिसण्यांतहि अत्यंत भीषण म्हणजे भयंकर असतात. असे हे यमदूत जेव्हां माझ्याजवळ येऊन उभे रहातील त्या वेळीं माझें मन तुमच्या चरणकमलीं कसें बरें स्थिर राहील ? अगोदरच तें चंचल आहे. अंतकाळीं यमयातनेच्या भीतीनें तें अधिकच चंचल होणार ! हे शंभो ! माझ्यावर कृपा करा आणि आत्तांच माझ्या मनाला आपल्या चरणकमलीं स्थिर करून घ्या. श्रीकृष्णाच्या एका भक्तानेंहि श्रीकृष्णाची अशीच प्रार्थना केली आहे. हे श्रीकृष्णा ! अंतकाळी प्राण जाण्याची वेळ आली म्हणजे कफवात-पित्तांनीं माझा कंठ अवरुद्ध झाल्यावर तुझें स्मरण कसें घडणार ? म्हणून माझ्या मनोरूपी राजहंसाला आजच तुम्ही आपल्या चरणकमलरूपी पिंजऱ्यांत वास्तव्य करूं द्या. "कृष्ण त्वदीय-पदपङ्कजपञ्जरान्ते ह्यद्यैव मे वसतु मानसराजहंसः। प्राणप्रयाणसमये कफवातपित्तैः कण्ठावरोधनविधौ स्मरणं कुतस्ते ?" असो. हे शंकरा ! मी तुम्हांला नमस्कार करतों.

यदा दुर्निवारव्यथोऽहं शयानो
लुठन्निःश्वसन्निःसृताव्यक्तवाणिः ।
तदा जह्नुकन्याजलालङ्कृतं ते
जटामण्डलं मन्मनोमन्दिरं स्यात् ॥ २२ ॥

हे परमेश्वरा ! ज्या वेळेला मी मृत्युशय्येवर खिळेन. माझ्या व्यथांचें औषधादि लौकिक उपायांनीं निवारण होणें अशक्य होईल. असह्य दुःखांनीं व्याकुळ होऊन मी मृत्युशय्येवर गडबडा लोळत राहीन. कष्टानें धापा टाकीन. माझ्या तोंडांतून स्पष्ट शब्दहि बाहेर पडणार नाहीं. त्या वेळेला जाह्नवीच्या गंगेच्या जलानें सुशोभित असलेलें तुमचें जटामंडल हेंच माझ्या मनाचें निवासस्थान असावें.

यदा पुत्रमित्रादयो मत्सकाशे
रुदन्त्यस्य हा! कीदृशीयं दशेति ।
तदा देवदेवेश गौरीश शम्भो
नमस्ते शिवायेत्यजस्रं ब्रवाणि ॥ २३ ॥

हे प्रभो ! मी मृत्युशय्येवर खिळलों असतां ज्या वेळीं पुत्र, मित्र, आप्त, इष्ट, सोयरेधायरे माझ्याजवळ येतील, माझ्या अंथरुणाजवळ बसून रडूं लागतील, डोळ्यांत आसवें आणून म्हणतील कीं, अरेरे! काय ही दशा झाली आहे. अंगांत रक्त राहिलें नाहीं. मास उरलें नाहीं. केवळ हाडांचा सांपळा झाला आहे ! त्या वेळेला हे शंकरा ! माझ्या मुखांतून देवदेवा ! महेश्वरा ! गौरीशा ! शंभो ! शंकरा ! सदाशिवा ! असेच शब्द पडोत. निरंतर "नमः शिवाय" असेंच मी म्हणत रहावें.

यदा पश्यतां मामसौ वेत्ति नास्मा-
नयं श्वास एवेति वाचो भवेयुः ।
तदा भूतिभूषं भुजंगावबद्धं
पुरारे भवन्तं स्फुटं भावयेयम् ॥ २४ ॥

अंतकाळीं भेटावयास येणारे लोक रुग्णाच्या भोंवतालीं बसतात. रुग्णाकडे पहातात, त्याला विचारतात, कोण आहें मी ? ओळखलें का मला ? आसन्नमरण असलेला तो रुग्ण अत्यंत जडदृष्टीनें पहातो व अस्पष्ट वाणीनें बोलण्याचा प्रयत्न

करीत असतो. एखाद्याची ओळख पटलेली असते तर अनेकांना तो ओळखूहि शकत नाहीं. ही अवस्था लक्षांत घेऊन आचार्य वर्णन करीत आहेत. हे परमेश्वरा ! अंतकाळीं मला पहाणाऱ्या लोकांपैकीं कोणी म्हणेल यानें मला ओळखलें. कोणी म्हणतील यानें आम्हांला ओळखलें नाहीं. कोणी म्हणेल संपलें. आतां कांहीं आशा नाहीं. श्वास मात्र शिल्लक राहिला आहे. अशा रीतीनें लोक जेव्हां बोलत रहातील त्या वेळेला हे त्रिपुरारे महादेवा ! सर्वांगीं भस्म चर्चिलेले आणि अलंकाराप्रमाणें सर्पांनीं, नागांनीं वेष्टिलेले असे जे तुम्ही, त्या तुमचेंच मी सुस्पष्ट चिंतन करावें. त्या वेळेला माझ्या मनाला आणि वाणीला तुमच्याशिवाय दुसरा विषयच नसावा.

यदा यातनादेहसंदेहवाही
भवेदात्मदेहे न मोहो महान्मे ।
तदा काशशीतांशुसंकाशमीश
स्मरारे वपुस्ते नमस्ते स्मराणि ॥ २५ ॥

मृत्यूनंतर यमयातना भोगण्याकरितां जो देह घ्यावा लागतो त्याला यातनादेह असें म्हणतात. हे प्रभो, ज्या वेळेला यातनादेहाबद्दल संदेह म्हणजे संशय निर्माण करणारा महामोह माझ्या आत्मदेहांत म्हणजे बुद्धींत निर्माण होईल, त्या वेळेला त्या महामोहाचें निरसन करण्याकरितां चंद्राप्रमाणें शीतल, आल्हाददायक आणि 'काश' म्हणजे प्रकाशमय अशा तुमच्या मूर्तीचें अथवा आकाशाप्रमाणें नीलवर्ण असलेल्या तुमच्या स्वरूपाचें मला स्मरण व्हावें. मी तुमचें स्मरण करावें. हे स्मरारे मदनान्तका महादेवा ! तुम्हांला माझा नमस्कार असो.

यदापारमच्छायमस्थानमाद्रि-
र्जनैर्वा विहीनं गमिष्यामि मार्गम् ।
तदा तं निरुन्धन्कृतान्तस्य मार्गं
महादेव मह्यं मनोज्ञं प्रयच्छ ॥ २६ ॥

हे महादेवा ! ज्या वेळेला मी यमदूताकडून यमपुरीच्या मार्गानें नेला जाईन त्या वेळेला तो मार्ग अत्यंत भयंकर असलेला मला दिसेल. 'अपार' म्हणजे ज्याला पलीकडची बाजू नाहीं – पलीकडची बाजू ज्याची दिसत नाहीं असा तो मार्ग

आहे. 'अच्छाय' म्हणजे तेथें विश्रांतीला छाया नाहीं किंवा 'अस्थान' म्हणजे स्थानहि नाहीं. कोठें पाणी आढळावयाचें नाहीं किंवा सहानुभूति व्यक्त करील असा माणूसहि भेटावयाचा नाहीं ! असा तो विकट यमघाट जेव्हां मी क्रमूं लागेन तेव्हां माझ्या कष्टांनाहि पारावार उरणार नाहीं. अशा वेळीं माझ्या त्या यमपुरीच्या मार्गाचा निरोध करून आपण मला मनोज्ञ म्हणजे सुंदर असा मार्ग अर्पण करा. मला चांगला मार्ग दाखवा. हीच माझी प्रार्थना आहे.

यदा रौरवादि स्मरन्नेव भीत्या
व्रजाम्यत्र मोहं महादेव घोरम् ।
तदा मामहो नाथ कस्तारयिष्य-
त्यनाथं पराधीनमर्धेन्दुमौले ॥ २७ ॥

हे महादेवा ! ज्या वेळेला रौरवादि नरकांची मला आठवण होते त्याच वेळेला माझें मन भीतीनें गांगरून जातें. कांहीं सुचत नाहीं. मनामध्यें घोर म्हणजे भयंकर मोह म्हणजे बेचैनी निर्माण होते. हे माझ्या नाथा चंद्रशेखरा ! त्या वेळेला सर्वस्वीं पराधीन आणि अनाथ झालेल्या मला, तुमच्यावांचून कोण बरें तारील ?

यदा श्वेतपत्रायतालङ्घ्यशक्तेः
कृतान्ताद्भयं भक्तवात्सल्यभावात् ।
तदा पाहि मां पार्वतीवल्लभान्यं
न पश्यामि पातारमेतादृशं मे ॥ २८ ॥

श्वेतपत्र म्हणजे शंकर, महादेव. कारण पत्र शब्दाचा अर्थ वाहन असा आहे. शंकरांचें वाहन असलेला नंदी पांढरा असल्यामुळें शंकराला श्वेतपत्र म्हणणें योग्यच आहे. या ठिकाणीं शंकराचा नंदी पांढरा होता हें कशावरून, असा प्रश्न पुढें उभा राहिला. त्या वेळीं " ढवळ्या नंदीवर बसून यावें " असा एका मराठी पद्याचा अंश आठवला. यावरून शंकरांचा नंदी ढवळा होता, अशी कल्पना आली. ढवळा हा शब्द संस्कृतमधील 'धवल' शब्दाचा अपभ्रंश आहे. धवल शब्दाचा अर्थ श्वेत म्हणजे शुभ्र असा आहे. म्हणून शंकराला श्वेतपत्र म्हणणें ठीकच आहे. संस्कृतमध्येंहि शंकरांना श्वेतवाहन म्हटलेलें आहे. वाहन शब्दाचा पर्यायवाचक शब्द 'पत्र' आहे म्हणून श्वेतवाहन याऐवजीं श्वेतपत्र

हा शब्द या ठिकाणीं योजला आहे हें ठीकच आहे. शिवाय 'धवल' शब्दाचा अर्थ म्हातारा गुणी बैल असाहि कोशांत आढळतो. हर्षचरितांतहि याच अर्थानें या शब्दाचा प्रयोग केलेला आहे. वाहन शब्दाचा पर्यायवाचक शब्द पत्र आहे. म्हणून धवलवाहन याऐवजीं 'श्वेतपत्र' असा शब्द शंकर या अर्थानें येथें योजला आहे. हे श्वेतपत्रा शंकरा! ज्याची शक्ति 'आयत' म्हणजे विशाल आणि 'अलंघ्य' म्हणजे उल्लंघन करण्यास कठीण आहे अशा त्या कृतान्तापासून मला जेव्हां भय प्राप्त होईल, अर्थात् मृत्यूची माझ्यावर झडप पडत असतांना मी जेव्हां भयग्रस्त होईन तेव्हां हे परमेश्वरा! तुमच्या ठिकाणीं असलेल्या भक्तवात्सल्यरूपी धर्मामुळें तुम्हीं माझें रक्षण करा! हे पार्वतीवल्लभा! माझें रक्षण करणारा असा तुमच्यासारखा दुसरा कोणी मला दिसत नाहीं.

इदानीमिदानीं मृतिर्मे भवित्री-
त्यहो सन्ततं चिन्तया पीडितोऽस्मि ।
कथं नाम मा भून्मृतौ भीतिरेषा
नमस्ते गतीनां गते नीलकण्ठ ॥ २९ ॥

आत्तां आत्तां मला मृत्यु येईल अशा काळजीनें खरोखर मी अगदीं दुःखी झालों आहें, व्याकूळ झालों आहें. हे नीलकंठा! ही माझी मृत्यूची भीति कशी बरें नाहींशी होईल? भयांतून मुक्त होण्याच्या सर्व मार्गांमध्यें तुम्हींच उत्तम मार्ग आहां. हे नीलकंठा! तुम्ही देवांचें देव आहांत. मी तुम्हांला नमस्कार करतों. गति शब्दाचा उत्तम लोक किंवा उत्तम फल असाहि अर्थ करतात. शंकराची प्राप्ति होणें हाच सर्वांत श्रेष्ठ, उत्तम लोक होय. अथवा सर्व फलांत उत्तम फल होय.

अमर्यादमेवाहमाबालवृद्धं
हरन्तं कृतान्तं समीक्ष्यास्मि भीतः ।
मृतौ तावकाङ्घ्र्यब्ज-दिव्य-प्रसादा-
दधुनापते निर्भयोऽहं भवानि ॥ ३० ॥

बालपणापासून तों म्हातारपणापर्यंत मी अगदीं मर्यादा सोडूनच वागलों आहें. आतां मात्र कृतान्त म्हणजे यम मला ओढीत असलेलें पाहून घाबरलों

आहे, भ्यालों आहे. हे भवानीपते शंकरा ! तुमच्या चरणकमलाच्या दिव्य प्रसादानें मी मृत्यूबद्दल निर्भय व्हावें, हीच माझी इच्छा आहे.

जरा-जन्म-गर्भाधिवासादि-दुःखा-
न्यसह्यानि जह्यां जगन्नाथ देव ।
भवन्तं विना मे गतिर्नैव शम्भो
दयालो न जागर्ति किं वा दया ते ॥ ३१ ॥

हे देवा जगन्नाथा ! जरा म्हणजे म्हातारपण, त्याचप्रमाणें जन्म आणि गर्भवास इत्यादि अनेक प्रकारचीं असह्य दुःखें माझीं सुटावींत. या सर्व दुःखांतून मी मुक्त व्हावें. हे शंभो ! तुमच्याशिवाय मला गति नाहीं. दुसरा मार्ग नाहीं. हे दयाघना ! तुमची दया अजून जागी होत नाहीं काय ?

शिवायेति शब्दो नमःपूर्व एष
स्मरन्मुक्तिकृन्मृत्युहा तत्त्ववाची ।
महेशान मा गान्मनस्तो वचस्तः
सदा मह्यमेतत्प्रदानं प्रयच्छ ॥ ३२ ॥

'नमः' हा शब्द ज्याच्या पूर्वीं जोडलेला आहे असा 'शिवाय' हा शब्द अर्थात् 'नमःशिवाय' हा शब्द अत्यंत प्रभावी असा महामंत्रच आहे. 'नमः-शिवाय' हा शब्द—हा मंत्र स्मरण करणाऱ्यांना, जप करणाऱ्यांना मुक्ति देणारा आहे. सर्व सांसारिक दुःखांतून सोडविणारा आहे. तो 'मृत्युहा' म्हणजे अपमृत्यु टाळणारा आहे. तो तत्त्ववाचीहि आहे. तत्त्व शब्दाचा अर्थ ब्रह्म असा आहे. 'शिव' शब्द केवळ शंकर या देवतेचा वाचक नसून तो सर्व विश्वाच्या मुळाशीं असलेल्या परब्रह्माचा परिपूर्ण परमात्मतत्त्वाचाहि वाचक आहे, म्हणून 'नमः-शिवाय' हा मंत्र तत्त्वाचाहि वाचक होतो. (चौथ्या श्लोकाचें विवेचन पहा). माझ्या वाणींत 'नमःशिवाय' हा मंत्र नेहमीं रहावा; आणि माझ्या मनांत 'नमःशिवाय' या मंत्राचें तत्त्व नेहमीं ठसलेलें असावें. हे महेश्वरा ! माझ्या वाणींतून आणि मनांतून नमःशिवाय हा मंत्र आणि त्याचें तत्त्व कधींहि दूर होऊं नये हींच देणगी मला आपण सर्वकाळ द्यावी, हेंच माझें आपणाजवळ मागणें आहे.

त्वमप्यम्बं मां पश्य शीतांशुमौलि-
प्रिये भेषजं त्वं भवव्याधिशान्तौ ।
बहुक्लेशभाजं पदाम्भोज-पोते
भवाब्धौ निमग्नं नयस्वाद्य पारम् ॥ २३ ॥

आतां शंकरांच्या अर्धांगी विराजमान असलेल्या पार्वतीकडे पाहून प्रार्थना करीत आहेत कीं, हे आई ! तूं देखील माझ्याकडे पहा. तूं शीतांशुमौलि म्हणजे चंद्रशेखर जे भगवान् शंकर त्यांची अत्यंत प्रिय आहेस. अर्थात् तूं माझ्याकडे पाहिलेंस तर तुझ्या प्रेमानें भगवान् शंकरहि माझ्याकडे पहातील असा 'शीतांशुमौलिप्रिये' या विशेषणांतला अभिप्राय आहे. आई ! तूं भवरोगाच्या निरासाचें औषधच आहेस. तुझें चरणकमल हें भवसागरांतून तारून नेणारें 'पोत' म्हणजे जहाजच आहे. मी भवसागरांत बुडालों आहें. गटंगळ्या खात आहें. मला फार कष्ट होत आहेत. मला तूं आज भवसागराच्या पैलतीराला घेऊन जा.

अनुद्यल्ललाटाक्षि-वह्नि-प्ररोहै-
रवाम-स्फुरच्चारु-वामोरु-शोभैः ।
अनङ्ग-भ्रमद्भोगि-भूषा-विशेषै-
रचन्द्रार्धचूडैरलं दैवतैर्नः ॥ २४ ॥

ज्या देवतांच्या भालप्रदेशीं असलेल्या तृतीय नेत्रांतून वह्नीच्या ज्वाला प्रकट होत नाहींत, ज्या देवतांच्या वामभागीं त्रिपुरसुंदरी विराजमान नाहीं, ज्यांच्या अंगांवर इकडेतिकडे फिरणारे सर्प, विशिष्ट अलंकाराप्रमाणें शोभत नाहींत, चंद्राची कोर ज्यांच्या जटेमध्यें दिसत नाहीं त्या इतर दैवतांचा आम्हांला काय उपयोग ? तात्पर्य, ज्याच्या भालप्रदेशीं असलेल्या तृतीय नेत्रांतून अग्नीच्या ज्वाला प्रकट होत आहेत, वामभागीं देदीप्यमान सुंदर स्त्री पार्वती विराजमान झालेली आहे. इतस्ततः फिरणारे सर्प ज्याच्या अंगावर अलंकाराप्रमाणें शोभत आहेत आणि ज्याच्या जटा-जूटामध्यें चंद्राची कोर झळकत आहे. तो भगवान् शंकरच माझें आराध्यदैवत आहे.

अकण्ठेकलङ्कादनङ्गेभुजङ्गा-
दपाणौकपालादफालेनलाक्षात् ।

अमौलौशशाङ्कादवामेकलत्रा-
दहं देवमन्यं न मन्ये न मन्ये ॥ ३५ ॥

ज्याच्या गळ्याला विषप्राशन केल्याचा काळा कलंक नाहीं, ज्याच्या अंगावर भुजंग नाहींत, ज्याच्या हातामध्यें कपाल म्हणजे करवंटी नाहीं, ज्याच्या भालप्रदेशीं अग्निरूपी तृतीय नेत्र नाहीं, ज्याच्या मस्तकावर शशांक म्हणजे चंद्र नाहीं, ज्याच्या वामभागीं कलत्र म्हणजे पत्नी (पार्वती) नाहीं, अशा दुसऱ्या कोणत्याहि देवाला मी जाणीत नाहीं, अगदीं जाणीत नाहीं, अथवा मानीत नाहीं. या ठिकाणीं इतर देवतांची अवहेलना अभिप्रेत नसून प्रस्तुत देवतेचें महत्त्व प्रतिपादन करणें हाच अभिप्राय आहे, ही गोष्ट लक्षांत घ्यावी.

महादेव शम्भो गिरीश त्रिशूलिं-
स्त्वयीदं समस्तं विभातीति यस्मात् ।
शिवादन्यथा दैवतं नाभिजाने
शिवोऽहं शिवोऽहं शिवोऽहं शिवोऽहम् ॥ ३६ ॥

हे महादेवा शंभो गिरीशा ! हे त्रिशूलधारी शंकरा ! ज्या अर्थीं सर्व विश्व तुमच्याच ठिकाणीं भासत आहे, प्रतीतीला येत आहे, त्या अर्थीं शिवस्वरूप परब्रह्मस्वरूप असलेल्या तुमच्याशिवाय अन्य दैवत मी जाणीतच नाहीं. भ्रमामध्यें अधिष्ठानाच्या सत्तेशिवाय भासणाऱ्या वस्तूंची निराळी सत्ता नसतेच. परब्रह्मस्वरूप सदाशिवाच्या ठिकाणीं भिन्न भिन्न नामरूपानें सर्व विश्व भासत असल्यामुळें भानाचें अधिष्ठान असलेल्या शिवतत्त्वाशिवाय कोणत्याहि पदार्थांना तत्त्वतः निराळें अस्तित्व नाहीं. म्हणून राम, कृष्ण, विष्णु, देवी, दत्त, नरसिंह, गणपति, पांडुरंग इत्यादि दैवतें हीं शिवस्वरूपच आहेत. या अभिप्रायानें आचार्यांनीं शंकरांना मी तुमच्याशिवाय दुसरें दैवत जाणीत नाहीं असें म्हटलें आहे. फार काय सांगावें ! मला देखील तुमच्याशिवाय तत्त्वतः निराळें अस्तित्व नाहीं. शंकरा ! हा माझा दृढनिश्चय तीन वेळां नव्हे, तर चार वेळां सांगतों, " शिवोऽहं, शिवोऽहं, शिवोऽहं, शिवोऽहम् ".

यतोऽजायतेदं प्रपञ्चं विचित्रं
स्थितिं याति यस्मिन्यदेकान्तमन्ते ।

स कर्मादिहीनः स्वयंज्योतिरात्मा
शिवोऽहं शिवोऽहं शिवोऽहं शिवोऽहम् ॥ ३७ ॥

ज्याच्यापासून हा सर्व विविध विश्वप्रपंच उत्पन्न झाला, ज्याच्यामुळेंच या विश्वप्रपंचाची स्थिति आहे आणि शेवटीं प्रलय झाला असतां हा सर्व विश्वप्रपंच ज्याच्यामध्यें विलीन होतो, तो कर्तृत्व-भोक्तृत्व-विरहित असलेला स्वयंप्रकाश आत्मा भगवान् सदाशिव तोच मी आहें. शिवोऽहं, शिवोऽहं, शिवोऽहं, शिवोऽहम्.

किरीटे निशेशो ललाटे हुताशो
भुजे भोगिराजो गले कालिमा च ।
तनौ कामिनी यस्य तत्तुल्यदेवं
न जाने न जाने न जाने न जाने ॥ ३८ ॥

ज्याच्या किरीटीं चंद्र आहे, भालप्रदेशीं अग्नि आहे, भुजांच्या ठिकाणीं भोगिराज म्हणजे मोठा सर्प आहे, गळ्याच्या ठिकाणीं काळिमा म्हणजे नीलवर्ण आहे, आणि ज्याच्या अर्धांगीं कांता विराजत आहे, त्याच्यासारखा देव मला या जगांत दुसरा माहीत नाहीं. नाहींच कोणी हें मी त्रिवार नव्हे, चतुर्वार सांगतों. " न जाने, न जाने. न जाने, न जाने ".

अनेन स्तवेनादरादम्बिकेशं
परां भक्तिमासाद्य ये ये नमन्ति ।
मृतौ निर्भयास्ते जनास्तं भजन्ते
हृदम्भोजमध्ये सदासीनमीशम् ॥ ३९ ॥

या स्तोत्रानें आदरपूर्वक जे कोणी अंबिकेश्वराची – शंकराची – स्तुति करतील आणि अंतःकरणांत भक्ति ठेवून जे कोणी नमस्कार करतील ते मृत्यूबद्दल निर्भय होतील. त्यांना अपमृत्यूचें भय रहाणार नाहीं. त्याचप्रमाणें आपल्या हृत्कमलामध्यें सदासर्वकाळ वास्तव्य करणाऱ्या त्या परमेश्वराला जे भजतील त्यांनाहि मृत्यूचें भय रहाणार नाहीं.

भुजङ्गप्रियाकल्प शम्भो मयैवं
भुजङ्गप्रयातेन वृत्तेन कृतम् ।

नरः स्तोत्रमेतत्पठित्वोरुभक्त्या
सुपुत्रायुरारोग्यमैश्वर्यमेति ॥ ४० ॥

हे शंभो ! तुम्ही भुजंगप्रियाकल्प आहां. भुजंगप्रियाः म्हणजे नागीण. ती तुमचें 'आकल्प' म्हणजे भूषण आहे. अथवा भुजंग म्हणजे नाग हा तुमचा प्रिय म्हणजे आवडता असा 'आकल्प' म्हणजे अलंकारः आहे. मी याप्रमाणें भुजंगप्रयात वृत्तानें जें तुमचें स्तोत्र केलें आहे, त्याचें जो कोणी मनुष्य मोठ्या भक्तीनें पठण करील त्याला उत्तम पुत्र, आयुष्य, आरोग्य आणि ऐश्वर्य प्राप्त होईल. असें या स्तोत्राचें माहात्म्य आहे. तात्पर्य, भक्तियुक्त अन्तःकरणानें या स्तोत्राचा पाठ नित्य करावा.

श्रीशिवपञ्चाक्षरमन्त्रजपविधि

वरील स्तोत्रांत दोन ठिकाणीं श्रीशिवपंचाक्षरी मंत्राचा महिमा वर्णिलेला आहे. जिज्ञासु भक्तांसाठीं आम्ही या ठिकाणीं संक्षेपानें शिवमंत्रजपाच्या अनुष्ठानाची पद्धति देत आहोंत. स्नानसंध्यादि नित्यकर्म आटोपल्यानंतर साधकानें दर्भाचें आसन घालावें. त्याच्यावर मृगाजिन अथवा पांढऱ्या घोंगडीची घडी घालावी. त्याच्यावर मृदु वस्त्राची घडी घालून बसावें. आचमन आणि प्राणायाम करून संकल्प करावा. यथाशक्ति शिवपूजन करावें अथवा पंचमानसोपचारपूजा करावी. अथवा सुबोधस्तोत्रसंग्रह, भाग पहिला यामध्यें अकराव्या पानावर दिलेलें शिवमानसपूजास्तोत्र अर्थाकडे लक्ष देऊन भक्तिपूर्वक शांत चित्तानें म्हणावें. श्रीशंकरांना नमस्कार करावा. नंतर –

अस्य श्रीशिवपञ्चाक्षरीमन्त्रस्य वामदेव ऋषिः पङ्क्तिश्छन्दः श्रीशिवो देवता 'ॐ' बीजं 'नमः' शक्तिः, 'शिवाय' इति कीलकम्, मम सकलमनोरथसिद्धिद्वारा श्रीसदाशिवप्रीत्यर्थं जपे विनियोगः । ॐ ॐ अङ्गुष्ठाभ्यां नमः, ॐ नं तर्जनीभ्यां नमः, ॐ मं मध्यमाभ्यां नमः, ॐ शिं अनामिकाभ्यां नमः, ॐ वां कनिष्ठिकाभ्यां नमः, ॐ यं करतलकरपृष्ठाभ्यां नमः, ॐ ॐ हृदयाय नमः, ॐ नं शिरसे स्वाहा, ॐ मं शिखायै वषट्, ॐ शिं कवचाय हुम्, ॐ वां नेत्रत्रयाय वौषट्, ॐ यं अस्त्राय फट् । ॐ वामदेवर्षये नमः शिरसि, ॐ पङ्क्तिछन्दसे नमः मुखे, ॐ श्रीशिवदेवतायै नमः हृदये, ॐ बीजाय नमः गुह्ये,

ॐ नमः शक्तये नमः पादयोः, ॐ शिवाय इति कीलकाय नमः नाभौ, ॐ अभीष्टसिद्ध्यर्थे जपे विनियोगाय नमः सर्वाङ्गेषु, ॐ नमः शिवाय इति दिग्बन्धः।
अथ ध्यानम् –

ध्यायेन्नित्यं महेशं रजतगिरिनिभं चारुचन्द्रावतंसं
रत्नाकल्पोज्ज्वलाङ्गं परशु-मृग-वराभीतिहस्तं प्रसन्नम् ।
पद्मासीनं समन्तात् स्तुतममरगणैर्व्याघ्रकृत्तिं वसानं
विश्वाद्यं विश्वरूपं निखिलभयहरं पञ्चवक्त्रं त्रिनेत्रम् ॥

हा श्लोक म्हणून शंकराचें ध्यान करावें. या श्लोकाचा अर्थ असा :– श्रीभगवान् शंकर हे रुप्याच्या पर्वताप्रमाणें गौरवर्ण आहेत, अथवा रजतगिरि म्हणजे कैलास पर्वत. कैलास पर्वताप्रमाणें ज्यांची अंगकांति शुभ्रवर्ण आहे, सुंदर चंद्राची कोर त्यांच्या मस्तकावर शोभत आहे, रत्नांच्या विविध अलंकारांनी ज्यांचें अंग अत्यंत देदीप्यमान दिसत आहे, एका हातांत परशु धारण केलेला असून दुसऱ्या हातांत मृग दिसत आहे, एका हातानें वरमुद्रा धारण केलेली असून दुसरा हात अभय-मुद्रा दाखवीत आहे, त्यांचें मुखकमल अत्यंत प्रसन्न आहे, त्यांनीं व्याघ्रांवर परिधान केलेलें असून पद्मासन घातलेलें आहे, भोंवतालीं देवांचे समुदाय नम्र होऊन स्तुति करीत आहेत, ते सर्व विश्वाचें उगमस्थान आहेत. सर्व विश्वामध्यें तेच मुख्य आहेत, तेच विश्वरूपानें नटलेले आहेत, त्यांना तीन नेत्र असून पांच मुखें आहेत, ते सर्व विश्वाचें भय हरण करतात, ते महेश्वर आहेत. अशा स्वरूपानें त्यांचें ध्यान करावें. शंकराला नमस्कार करावा. पोवळ्यांची, स्फटिकांची अथवा रुद्राक्षांची माळ घेऊन पूर्वी सांगितल्याप्रमाणें मंत्र म्हणून प्रोक्षण करावें. माळेला नमस्कार करून मंत्राचा जप करावा. मंत्र गुरुमुखानें घेतलेला असावा. स्त्रियांना पुत्रवंतीच्या मण्यांची माळ अत्यंत उत्तम म्हणून सांगितलेली आहे. यथाशक्ति जप झाल्यानंतर " त्वं माले " हा मंत्र म्हणून माळ मस्तकावर ठेवावी. तिला नमस्कार करून " अनेन मन्त्रजपाख्येन कर्मणा भगवान् श्रीसदाशिवः प्रियतां न मम " असें म्हणून उदक सोडावें. शेवटीं " यस्य स्मृत्या " म्हणून विष्णवे नमो, विष्णवे नमो, विष्णवे नमः म्हणावें. आसनाखालची मृत्तिका अनामिकेनें कपाळीं लावून मग आसन सोडावें.



क्रमांक ६ : श्रीशिवपूजन यंत्र

■ ■ ■

वर्णमालाशिवस्तुतिः ।

[आचार्यांचीं कांहीं स्तोत्रें संगीताप्रमाणें गेय स्वरूपांतलीं आहेत. तीं आपल्याला पाहिजे त्या रागांत गातां येतात. प्रस्तुत स्तोत्रहि असेंच एक उत्तम गेय स्तोत्र आहे. तें धुमाळी अथवा त्रिताल या तालांत सहज म्हणतां येतें. संगीत हें सर्वंच देवांना प्रिय आहे, पण त्यांतल्या त्यांत तें शंकरांना फारच आवडतें ! नृत्यकला, वाद्यकला आणि संगीतकला या शंकरांच्या अत्यंत आवडत्या कला आहेत. या तिन्ही कलांचा परस्पर अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. वाद्यावांचून संगीताला शोभा नाहीं. संगीतावांचून वाद्यालाहि शोभा नाहीं. संगीत आणि वाद्य हीं दोन्ही लयबद्ध होऊन जेव्हां द्रुततर लयींत पर्यवसित होतात, तेव्हां तर मनुष्याचा देह बसल्या ठिकाणीं नागाप्रमाणें सहजच डोलत असतो ! तालांतील मात्रांचें वर्तुळ अथवा आवर्तन पूर्ण होऊन गायक, वादक आणि नर्तक ज्या वेळेला एकसमयावच्छेदानें समेवर येतात त्या वेळेला तर केवळ गाणारा, वाजविणारा आणि

नृत्य करणारा यांचेंच चित्त आनंदानें प्रफुल्लित होऊन एकदम उडी मारूं लागतें असें नसून, संपूर्ण प्रेक्षकवर्गाचें व श्रोतृवर्गाचेंहि चित्त आनंदमग्न होऊन उड्या मारूं लागतें, असा सर्वांचाच अनुभव आहे. चित्ताच्या स्पंदनाबरोबरच देहाचेंहि अंतर्गत स्पंदन होतच असतें. मनाच्या स्पंदनाबरोबर होत असलेल्या देहाच्या अथवा देहावयवांच्या लयबद्ध प्रकट स्पंदनालाच नृत्य असें म्हणतात. हेंच नृत्य गीत, वाद्य आणि विविध ताल यांच्याशीं संलग्न होऊन होऊं लागलें कीं, तें कलेंत पर्यवसित होतें. याप्रमाणें गीत, वाद्य आणि नृत्य यांचा निकट संबंध आहे. किंबहुना "नृत्यं गीतं च वाद्यं च त्रयं संगीतमुच्यते" अशी संगीताची व्याख्याच आहे.

गीत आणि नृत्य यांचा संबंध व्यक्त करण्याकरितांच कीं काय, संगीतामध्यें तराणा हा प्रकार पहावयास सांपडतो. "दृदू ततन तन देरेना दीम्" अथवा "यललि याह्ल लल यललि याह्ल लल लेऽ" इत्यादि तराणे द्रुतगतीनें म्हणत असतांना श्रोत्यांच्या मनाबरोबर देहांचेंहि द्रुतगतीनें स्पंदन होत असतें, हेंच नृत्याचें स्वरूप होय. त्याचप्रमाणें वाद्याचा आणि नृत्याचाहि निकट संबंध असल्याचें दृष्टीस पडतें. "तक् तक् त्रान् त्रकिट धिकिट" अथवा "ध्डान् धा धा धा धाऽ" किंवा "था तक थै तक थै" इत्यादि वाद्याच्या आणि नृत्याच्या बोलांतील शब्दांचा सारखेपणा हा त्यांच्या निकट संबंधाचाच द्योतक आहे. आचार्यांनीं देखील "झणुतक झंकिणु झणुतत किटतक" असे नृत्याचे बोल स्तोत्रांत व्यक्त केलेलेच आहेत. गीत आणि वाद्य यांच्यांत अनुस्यूत असलेला लय हा नृत्याला सहजच जन्म देतो. एका लयींत "गोपाल-कृष्ण राधा-कृष्ण" हें भजन आपण गाऊं लागलों आणि योग्य वाद्याची साथ मिळाली कीं, त्याच्यांतूनच नृत्याचा आविष्कार झालेला दिसेल. हाच न्याय सर्वत्र समजावा.

शंकरांचें तांडवनृत्य प्रसिद्धच आहे. त्यांचें डमरू वाद्यहि प्रसिद्ध आहे. "अगडबं अगडबं वाजे डमरू, नाचे सदाशिव जगद्गुरु". शंकरांच्या नृत्याला आदिमाया महाशक्ति श्रीदेवी पार्वती हिचीहि साथ असतेच. म्हणूनच तिला "महालास्या" असेंहि नांव आहे. संगीतांतूनच आनंदाचा साक्षात्कार होत असतो. संगीताचें मूळ नादांत आहे व नाद हा ब्रह्मरूप आहे. म्हणूनच संगीतांत आनंद आहे. प्रस्तुत स्तोत्र कोणत्याहि वेळीं त्या वेळेला अनुरूप असलेल्या

रागांत म्हणावें अशीच त्याची रचना आहे. भैरव, भैरवी, तोडी, सारंग, गौड-सारंग, भीमपलास, धनाश्री, पूर्वी, यमन, भूप, हमीर, बिहाग, केदार, तिलक-कामोद, दुर्गा, कानडा, जोगी, मालकंस इत्यादि कोणत्याहि रागांत हें स्तोत्र गावें, गुणगुणत रहावें, त्यानें मनाला आनंदच वाटतो.

याशिवाय या स्तोत्राचें असें वैशिष्ट्य आहे कीं, यांतील प्रत्येक श्लोकाचा आरंभ अकारादि वर्णानुक्रमानें केलेला आहे. शाळेंत विद्यार्थी कधीं कधीं श्लोकांच्या भेंड्या लावीत असतात. त्या वेळीं विद्यार्थ्यांना या स्तोत्राचा फारच उपयोग होण्यासारखा आहे. इतकें असूनहि आचार्यांच्या तत्त्वज्ञानाच्या व भक्तीच्या छटाहि यांत अत्यंत उज्ज्वल स्वरूपांत व्यक्त झालेल्या आहेत. शब्दांचा गोडवा कांहीं अपूर्व आहे.]

अथ कथमपि मद्रसनां त्वद्गुणलेशैर्विशोधयामि विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ १ ॥

हे प्रभो शंकरा ! तुमचे गुण अगाध आहेत, अवर्णनीय आहेत. हें मला कळल्यानंतरहि माझ्या अंगीं ते वर्णन करण्याचें सामर्थ्य नसलें तरी आतां मी त्यांचें वर्णन करण्यास प्रवृत्त झालों आहें. हेतु एवढाच कीं, तुमच्या गुणांचें कसें तरी अल्प-स्वल्प यथाशक्ति वर्णन करून मी आपली वाणी पवित्र करावी. हे सांब सदाशिवा, शंभो शंकरा ! तुमच्या चरणीं मी शरण आलों आहें. तुमचें चरणयुगल हेच माझें रक्षण करणारें आहेत.

आखण्डल-मद-खण्डन-पण्डित तण्डुप्रिय चण्डीश विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ २ ॥

आपण इंद्राच्याहि गर्वाचें खंडण करण्यांत पंडित म्हणजे चतुर आहां. आपणांस तांदुळ फार आवडतात. (भक्तजन शंकराच्या पिंडीवर बिल्वपत्र आणि तांदूळ वहात असतात हें प्रसिद्धच आहे.) हे प्रभो शंकरा ! पार्वतीचें नांव चण्डी असल्यामुळें लोक तुम्हांला चण्डीश म्हणतात. हे शंभो सांबसदाशिवा शंकरा ! मी तुम्हांला शरण आलों आहें. तुमचे दोन्ही चरणकमल हेंच माझें संरक्षण करणारे आहेत. (या स्तोत्रांतील प्रत्येक पद्याच्या उत्तरार्धाचा सर्वत्र हाच अर्थ करावा.)

इभ-चर्माम्बर शम्बर-रिपु-वपुरपहरणोज्ज्वल-नयन विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ३ ॥

हे शंकरा ! आपण हत्तीचें चर्म म्हणजे कातडें हेंच वस्त्र म्हणून धारण केलेलें आहे (इभ + चर्म + अम्बर). तसेंच आपण शंबरासुराचा शत्रु जो मदन त्याच्या शरीराचा दाह करून त्याचें अपहरण म्हणजे नाश केलेला आहे. (शम्बर + रिपु + वपुः + अपहरण) हे प्रभो शंकरा ! आपले नेत्र अत्यंत उज्ज्वल म्हणजे देदीप्यमान आहेत. मी आपल्या चरणीं शरण आलों आहें.

ईश गिरीश नरेश परेश महेश विलेशय-भूषण भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ४ ॥

हे शंकरा ! तुम्ही ईश म्हणजे सर्व जगाचे स्वामी आहां. तुम्ही कैलास पर्वताचे अधिपति असल्यामुळें तुम्हांला गिरीश असें म्हणतात. तुम्ही सर्व लोकांचे पालक असल्यामुळें तुम्हांला नरेश असेंहि म्हणतात. तुम्ही सर्वांचे श्रेष्ठ स्वामी असल्यामुळें तुम्हांला परेश म्हटलेलें आहे. तुमच्यापेक्षां मोठा सत्ताधारी कोणीच नाहीं म्हणून तुम्हांला महेश असें नांव पडलें. हे शंकरा ! आपण विलेशय म्हणजे सर्प – नाग – यांना भूषण म्हणजे अलंकाराप्रमाणें धारण केलेलें आहे, म्हणूनच आपणांस फणिभूषण असें यथार्थ नांव आहे. हे शंकरा ! मी आपल्या चरणयुगलीं शरण आलों आहे.

उमया दिव्य-सुमङ्गल-विग्रहयाऽऽलिङ्गित-वामाङ्ग विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ५ ॥

हे प्रभो शंकरा ! स्वतःच्या दिव्य आणि अत्यंत मंगलमय देहानें आलिंगन देऊन आपल्या वामांगीं उमादेवी विराजमान आहे. हे परमेश्वरा ! मी तुमच्या चरणयुगलाला शरण आलों आहें. तेच माझे रक्षण करतील.

करीकुरु मामज्ञमनाथं दूरीकुरु मे दुरितं भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ६ ॥

हे प्रभो महेश्वरा ! मी अत्यंत अज्ञ आहें, अनाथ आहें, माझा आपण अंगीकार करा. माझें दुरित म्हणजे पाप दूर करा, नाहींसें करा. हे शंभो शंकरा साम्ब सदाशिवा ! तुमच्या चरणकमलीं मी शरण आलों आहें.

ऋषिवर-मानसहंस चराचर-जनन-स्थिति-कारण भो ।
साम्ब सदाशिव शंभो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ७ ॥

हे शंकरा ! मार्कण्डेयादि श्रेष्ठ ऋषींच्या अन्तःकरणांत निरंतर वास्तव्य करणारे तुम्ही जणूं कांहीं त्यांचे मानस राजहंस आहां. आपण चराचर विश्वाची उत्पत्ति, स्थिति आणि प्रलय या तिन्ही अवस्थांचें कारण आहां. हे सांब सदाशिवा ! मी आपल्या चरणीं शरण आलों आहें.

ऋक्षाधीश-किरीट महोक्षारूढ विधृत-रुद्राक्ष विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ८ ॥

हे प्रभो महादेवा ! ऋक्ष म्हणजे तारका, त्यांचा अधीश म्हणजे अधिपति जो चंद्र, तो तुमच्या किरीटावर विराजमान झालेला आहे म्हणून तुम्हांला "ऋक्षाधीशकिरीट" असें म्हटलें आहे. महोक्ष म्हणजे मोठा बैल. त्याच्यावर तुम्ही आरूढ झालेले आहां. हे प्रभो महादेवा ! तुम्ही गळयांत, मस्तकावर, दंडांत आणि हातांत रुद्राक्ष धारण केलेले आहेत. हे सांब सदाशिवा ! मी तुमच्या चरणीं शरण आलों आहें. माझें रक्षण करा.

ऌवर्ण-द्वन्द्वमवृन्त-सुकुसुममिवाङ्घ्रौ तवार्पयामि विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ९ ॥

हे परमेश्वरा ! देठ नसलेल्या फुलाप्रमाणें असलेले हे दोन ऌवर्ण हींच फुलें मी तुमच्या चरणकमलीं अर्पण करीत आहें. हे सांब सदाशिवा शंकरा ! तुमचे चरणयुगल हेच माझे रक्षण करणारे आहेत. मी अनन्यभावानें तुमच्या चरणीं शरण आलों आहें.

एकं सदिति श्रुत्या त्वमेव सदसीत्युपास्महे मृड भो ।
सांब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ १० ॥

हे शंभो शंकरा ! " एकं सत् " या वाक्यानें तुम्हींच एक सत्स्वरूप आहां असें वेदानें तुमचें वर्णन केलेलें आहे. तुम्ही सर्व जगाला सुखी करतां म्हणून तुम्हांला "मृड" म्हणजे सुखी करणारा असें म्हटलें आहे. हे सुखदायका शंकरा ! आम्ही तुमची अनन्यभावानें उपासना करीत आहों. सांब सदाशिवा ! आपल्या चरणयुगलाचा आम्हांला आधार द्या.

ऐक्यं निजभक्तेभ्यो वितरसि विश्वंभरोऽथ साक्षी भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ११ ॥

हे परमेश्वरा ! तुम्ही विश्वाचें भरणपोषण करतां म्हणून तुम्हांला विश्वंभर म्हटलेलें आहे. या जगामध्यें सर्वसाक्षी तुम्हींच आहां. अनन्यचित्तानें शरण आलेल्या निजभक्तांना, आपल्या उपासकांना तुम्ही ऐक्य म्हणजे एकरूपता अर्थात् सारूप्य मुक्ति देतां ! केवढें तुमचें औदार्य आहे ! हे शंभो शंकरा ! मी तुमच्या चरणीं शरण आलों आहें. माझें रक्षण करा.

ओमिति तव निर्देष्ट्री मायाऽस्माकं मृडोपकर्त्री भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ १२ ॥

हे मृडा म्हणजे सर्व लोकांना सुखी करणाऱ्या शंकरा ! वस्तुतः तुम्ही एकरूप असून या मायेनें अज्ञ जीवांना तुम्ही अनेकरूप असल्याचें प्रतीतीला आणून दिलेलें आहे. या अनेकरूपतेंतून तुमची एकरूपता पहाण्याकरितां मायेनेंच ॐ असा तुमचा निर्देश करून तुमची उपासना करावयास सांगितलें आहे. प्रणवाच्या उपासनेनें तुमच्या एकरूपतेचा साक्षात्कार होतो. अशा रीतीनें ॐ या अक्षरानें तुमचा निर्देश करणारी माया ही आमच्यावर मोठा उपकार करणारी आहे. हे सांब सदाशिवा शंभो शंकरा ! तुमच्या चरणीं मी शरण आलों आहें. तुमचें चरणयुगल माझें रक्षण करोत.

औदास्यं स्फुटयति विषयेषु दिगम्बरता च तवैव विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ १३ ॥

हे परमेश्वरा ! आपण विश्वनाथ विश्वेश्वर असून दिगंबर आहां. हें आपलें दिगंबरत्व तुमच्या अन्तःकरणांत असलेलें विषयावद्दलचें औदासीन्य म्हणजे वैराग्यच स्पष्ट करीत आहे. हे शंकरा ! तुमचे दोन्ही चरणारविंद माझें रक्षण करोत.

अन्तःकरणविशुद्धिं भक्तिं च त्वयि सतीं प्रदेहि विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ १४ ॥

हे प्रभो शंकरा ! अन्तःकरणाची पूर्ण शुद्धि आणि तुमच्याविषयीं दृढ भक्ति येवढेंच माझें आपणांस मागणें आहे. तें मला द्या आणि हे शंकरा, माझें रक्षण करा !

अस्तोपाधि-समस्त-व्यस्तै रूपैर्जगन्मयोऽसि विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ १५ ॥

हे परमेश्वरा ! वस्तुतः सर्व उपाधींचा तुमच्या ठिकाणीं अस्त झालेला असूनहि, सर्व उपाधींतून तुम्ही पूर्णपणें मुक्त असूनहि, व्यस्त रूपानें अर्थात् नाम-रूपात्मक विश्वप्रपंचाच्या रूपानें तुम्ही नटलेले आहां. तुम्ही जगन्मय आहां. हे शंकरा ! माझें रक्षण करा.

करुणावरुणालय मयि दास उदासस्तवोचितो न हि भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ १६ ॥

हे शंकरा ! आपण करुणावरुणालय म्हणजे दयेचे सागर आहां (वरुण + आलय = वरुणालय म्हणजे सागर). आपण करुणेचे सागर आहां. मी आपला दास आहें. या दासाच्या ठिकाणीं आपण उदासभाव धारण करणें हें आपल्याला योग्य होणार नाहीं. हे शंभो शंकरा ! आपण माझें रक्षण करा.

खलसहवासं विघटय घटय सनामेव सङ्गमनिशं भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ १७ ॥

हे सांब सदाशिवा ! दुष्टांच्या सहवासांतून मला सोडवा; आणि रात्रंदिवस सज्जनांच्याच संगतीची जोड मला द्या. हे प्रभो, मी आपल्या चरणीं शरण आलों आहें. माझें रक्षण करा !

गरलं जगदुपकृतये गिलितं भवता समोऽस्ति कोऽत्र विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ १८ ॥

जगाच्या उपकाराकरितां आपण भयंकर हालाहल विष प्राशन केलें. आप-ल्याशीं तुलना करावी असा या जगांत दुसरा कोण आहे ? आपण माझें रक्षण करा.

घनसार-गौरगात्र प्रचुर-जटाजूट-बद्धगङ्ग विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ १९ ॥

हे शंकरा ! कापराच्या गाभ्याप्रमाणें आपला देह गौरवर्ण आहे. आपण आपल्या विपुल जटाजूटामध्यें, जटेच्या समूहामध्यें जणूं कांहीं गंगेला बांधून ठेवलें आहे ! हे प्रभो, मी आपल्या चरणीं शरण आलों आहें. आपण माझें रक्षण करा.

ज्ञप्तिः सर्वशरीरेष्वखण्डिता या विभाति सा त्वं भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ २० ॥

विश्वांतील प्राणिमात्रांच्या सर्व शरीरांत जें अखंड चैतन्य प्रतीतीला येत आहे तें तुम्हीच आहां. तुम्ही अखंड चित्स्वरूप – ज्ञानस्वरूप आहां. हे विश्वेश्वरा ! माझें रक्षण करा. मी तुमच्या चरणीं शरण आलों आहें.

चपलं मम हृदयकपिं विषयद्रुचरं दृढं बधान विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ २१ ॥

हे प्रभो ! अत्यंत चंचल असलेलें माझें मन हें जणूं कांहीं माकडच आहे. शब्दस्पर्शादि विषयरूपी वृक्षांवर तें सारखें भटकत रहातें. त्याला तुम्ही पक्के बांधून टाका. हे विश्वेश्वरा ! आपणच माझें संरक्षण करणारे आहां.

छाया स्थाणोरपि तव तापं नमतां हरत्यहो शिव भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ २२ ॥

कूटस्थ, अचल, निर्विकार असल्यामुळें शंकराला स्थाणु असें म्हणतात. स्थाणु शब्दाचा दुसरा अर्थ शाखा, उपशाखा व पानें यांनीं विरहित असलेलें खोड असा आहे. हे शंकरा, आपण स्थाणु असूनहि आपली छाया आपल्या चरणीं नम्र झालेल्या भक्तजनांचा ताप हरण करते, हें केवढें आश्चर्य आहे ! मी आपल्या चरणांचा आश्रय घेतला आहें. आपण माझें रक्षण करा !

जय कैलासनिवास प्रमथगणाधीश भूसुरार्चित भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ २३ ॥

हे शंकरा ! आपण कैलास पर्वतावर वास्तव्य करतां. आपण प्रमथगणांचे अधिपति आहां. (शंकराच्या अनुचरांना प्रमथगण असें म्हणतात). भूसुर म्हणजे ब्राह्मण हे नेहमीं आपली पूजा-अर्चा करीत असतात. परमेश्वरा ! आपला जयजयकार असो. आपण माझें रक्षण करा !

झणुतक-झङ्कृणु-झणुतत्किटतक-शब्दैर्नटसि महानट भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ २४ ॥

हे शंकरा ! आपण महानट म्हणजे नटवर आहां, नटश्रेष्ठ आहां. झणुतक, झंकिणु, झणुतत किटतक या किंवा अशांसारख्या धा तक धै इत्यादि शब्दांनीं आपण नृत्य करतां. परमेश्वरा ! आपल्या नृत्याला तांडवनृत्य म्हणतात. मी आपल्या चरणीं शरण आलों आहें. आपण माझें रक्षण करा.

ज्ञानं विक्षेपावृति-रहितं कुरु मे गुरुस्त्वमेव विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ २५ ॥

हे प्रभो विश्वनाथा ! तुम्हीच माझे गुरु आहां. आपण मला ज्ञान द्या. तें ज्ञान, विक्षेप म्हणजे विकल्प यानें रहित असावें. अर्थात् विपरीत ज्ञान नसावें. तसेंच 'आवृति' म्हणजे आवरण अर्थात् आत्म्याच्या यथार्थ स्वरूपाचें आच्छादन करणारेंहि तें ज्ञान नसावें. हे शंकरा ! आत्मस्वरूपाचें यथार्थ ज्ञान देऊन आपण माझें रक्षण करा.

टङ्कारस्तव धनुषो दलयति हृदयं द्विषामशनिरिव भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ २६ ॥

हे शंकरा ! वीज कडाडली म्हणजे हृदय जसें घाबरतें त्याचप्रमाणें तुमच्या धनुष्याचा टणत्कार ऐकला कीं, शत्रूंच्या हृदयांचा थरकांप होतो. शत्रूंचीं हृदयें विदीर्ण होतात. कडाडणाऱ्या विजेप्रमाणें आपल्या धनुष्याचा टणत्कार शत्रूंच्या हृदयाला विदीर्ण करतो. हे शंभो दयाघना ! आपण माझें रक्षण करा.

ठाकृतिरिव तव माया बहिरन्तःशून्य-रूपिणी खलु भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ २७ ॥

हे प्रभो शंकरा ! 'ठ' ह्या अक्षराची आकृति जशी आंत-बाहेर शून्य-स्वरूप आहे, त्याचप्रमाणें तुमची माया देखील आंत-बाहेर म्हणजे सर्व बाजूंनीं विचार करून पाहिलें असतां शून्यस्वरूपच आहे. तुम्हीच काय ते तत्त्वतः सत्यस्वरूप आहां. मी तुमच्या चरणीं शरण आलों आहें.

डम्बरमम्बुरुहामपि दलयत्यनघं त्वदङ्घ्रियुगलं भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ २८ ॥

हे शंकरा ! तुमचीं दोन्ही चरणकमलें इतकीं कोमल आणि आरक्त आहेत कीं, तीं कमलांच्याहि गर्वाचा परिहार करतात. इतर म्हणजे गर्व मी तुमच्या चरणकमलीं शरण आलों आहें. तेच माझें रक्षण करणारे आहेत.

ढक्काक्ष-सूत्र-शूल-दुंहिण-करोटी-समुल्लसत्कर भो ।
साम्ब सदाशिव शंभो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ २९ ॥

हे शंकरा ! आपल्या हातामध्यें ढक्का म्हणजे मोठा डमरू, अक्षसूत्र म्हणजे रुद्राक्षमाला, शूल म्हणजे अणकुचीदार लोखंडाचें शस्त्र – त्रिशूळ, दुहिणकरोटी म्हणजे ब्रह्मदेवाच्या पांचव्या मस्तकाची कवटी. हीं सर्व आपल्या हातांत शोभत आहेत. हे प्रभो ! आपण माझें रक्षण करा.

णाकारगर्भिणी चेच्छुभदा ते शर-गतिर्नृणामिह भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ३० ॥

हे शंकरा ! आपली शरगति म्हणजे बाणाचा वेग हा लक्ष्यवेध केल्याशिवाय – लक्ष्याचा नाश केल्याशिवाय रहाणार नाहीं; पण तीच शर-गति 'णा' या अक्षरानें गर्भित झाली 'णा' हें अक्षर मध्यें योजलें कीं, 'शरणागति' हा शब्द तयार होतो आणि ती शरणागति अर्थात् अनन्यभावानें तुमच्या चरणीं शरण येणें हें तर मनुष्याला शुभदायक अर्थात् कल्याणप्रद आहे ! हे शंभो शंकरा ! आपलीं दोन्ही चरणकमलें माझें संरक्षण करोत. मी आपल्या चरणीं शरण आलों आहें.

तव मन्वति-मञ्जपतः सद्यस्तरति नरो हि भवाब्धिं भो
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ३१ ॥

हे प्रभो शंकरा ! तुमच्या 'नमः शिवाय' अथवा 'ॐ नमः शिवाय' या मंत्राचा अत्यंत प्रेमपूर्वक जर जप केला, तर त्या जपानें मनुष्य तावडतोब भवसागर तरून जातो. असा तुमच्या जपाचा प्रभाव आहे. प्रभो ! तुमचे चरण-कमल माझें रक्षण करोत.

थूत्कारस्तस्य मुखे भूयात्ते नाम नास्ति यस्य विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ३२ ॥

हे शंभो शंकरा! ज्याच्या मुखीं तुमचें नांव नाहीं, जो कधीं शंभो सदाशिवा, विश्वेश्वरा, विश्वनाथा, हरहर महादेवा परमेश्वरा, अशा रीतीनें तुमचें नांव घेत नाहीं, त्याच्या मुखावर थूः!! काय म्हणावें त्याला? धिक्कार असो त्याचा. हे शंकरा! तुम्ही माझें रक्षण करा.

आतां खालील श्लोक पहा –

मथुरेतिविलोमेन मध्यमाक्षरलोपतः।
यो न गृह्णाति तन्नाम मध्यमं तन्मुखोपरि

एका रामभक्तानेंहि मोठ्या गमतीनें हाच अभिप्राय प्रकट केलेला आहे. तो म्हणतो, 'मथुरा' शब्द उलटा लिहा. मग त्याच्यातील मधलें अक्षर बाजूला काढून ठेवा. आतां जीं दोन अक्षरें राहिलीं आहेत – कोणतीं बरें तीं दोन अक्षरें? वाचकांच्या लक्षांत आलींच असतील. 'राम' हींच तीं दोन अक्षरें. हीं अक्षरें, हें नाम नेहमीं आपल्या मुखांत ठेवा. आतां बाजूस काढून ठेवलेल्या मधल्या अक्षराचें काय करावयाचें! तर सांगतात – जे कोणी हें नांव आपल्या मुखानें म्हणत नसतील त्यांच्या मुखावर तें टाका!

दयनीयश्च दयालुः कोऽस्ति मदन्यस्त्वदन्य इव वद भो।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम्॥ ३३॥

हे प्रभो परमेश्वरा! माझ्याहून माझ्यासारखा निराळा दुसरा कोणी दयनीय म्हणजे दया करण्याला पात्र आहे काय? आणि तुमच्याहून निराळा तुमच्यासारखा दुसरा कोणी दयाळू आहे काय? सांगा भला. तात्पर्य, माझ्यासारखा दयनीय आणि तुमच्यासारखा दयाळू दुसरा कोणी सांपडणार नाहीं. हे विश्वनाथा! मी तुमच्या चरणीं शरण आलों आहें. तुम्ही माझें रक्षण करा.

धर्मस्थापन-दक्ष त्र्यक्ष गुरो दक्षयज्ञ-शिक्षक भो।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम्॥ ३४॥

हे त्र्यक्षा म्हणजे त्रिनयना! जगद्गुरो शंकरा! आपण धर्माची स्थापना करणारे आहांत. आपण दक्ष-प्रजापतींच्या यज्ञाचा विध्वंस करून यज्ञांतील अपराधी असलेल्या यजमान, ऋत्विज वगैरेंना चांगली शिक्षा केलेली आहे! हे परमेश्वरा, मी आपल्या चरणीं शरण आलों आहें. माझें रक्षण करा.

ननु ताडितोऽसि धनुषा लुब्धधिया त्वं पुरा नरेण विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ३५ ॥

हे प्रभो शंकरा ! नर म्हणजे अर्जुन, त्याला तुमचें स्वरूप ओळखतां आलें नाहीं म्हणून, पूर्वी त्यानें 'हा कोणी तरी लुब्ध – लुब्धक – म्हणजे फासेपारधी अर्थात् अरण्यांत भटकणारा, शिकारीचा धंदा करणारा आहे,' असें समजून तुमच्यावर धनुष्यानें प्रहार केला. त्यानें तुमच्याशीं धनुर्युद्ध केलें ! तरी पण तुम्ही त्याच्यावर अनुग्रह केला आणि त्याला पाशुपतास्त्र दिलें. ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. प्रभो ! मी तुमच्या चरणीं शरण आलों आहें. माझें आपण रक्षण करा.

परिमातुं तव मूर्तिं नालमजस्तत्परात्परोऽसि विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ३६ ॥

हे विभो परमेश्वरा ! तुमच्या मूर्तीचा – विराट् स्वरूपाचा – थांगपत्ता लावण्याचा ब्रह्मदेवानें खूप प्रयत्न केला, पण त्याला त्यांत यश आलें नाहीं. तुमच्या मूर्तीचें परिमाण जाणण्यास ब्रह्मदेव समर्थ झाला नाहीं. (अजः न अलम्) म्हणून हे सांब सदाशिवा ! तुम्ही परात्पर म्हणजे मोठ्यापेक्षांहि मोठे आहां. हे शंभो शंकरा ! तुमचे चरणयुगल हे माझे संरक्षक आहेत.

फलमिह नृतया जनुषस्त्वत्पदसेवा सनातनेश विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥३७॥

हे सनातन म्हणजे सदासर्वकाळ एकरूप असणाऱ्या आणि ईश म्हणजे समर्थ अथवा स्वामी असलेल्या शंकरा ! परमेश्वरा ! या मृत्युलोकांत मनुष्यरूपानें घेतलेल्या जन्माचें फळ काय ? असा कोणी प्रश्न केल्यास 'त्वत्पदसेवा' तुमच्या चरणकमलाची सेवा हेंच त्याचें उत्तर आहे. अर्थात् तुमच्या सेवेनेंच नरजन्म सफल होतो. हे देवाधिदेवा ! माझें आपण रक्षण करा.

बलमारोग्यं चायुस्त्वद्गुण-रुचितां चिरं प्रदेहि विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ३८ ॥

हे विभो विश्वेश्वरा ! मला चिरकाल बल द्या, आरोग्य द्या, आयुष्य द्या; आणि तुमच्या गुणांची आवडहि पण पूर्णपणें द्या. हे शंकरा ! तुमच्या चरणार-

त्रिवेदी मी शरण आलों आहें. तेच माझे 'शरणं' म्हणजे आधार आहेत, आश्रय आहेत आणि रक्षकहि आहेत.

भगवन् भर्ग भयावह भूतपते भूति-भूषिताङ्ग विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ३९ ॥

हे प्रभो षड्गुणैश्वर्यसंपन्ना महादेवा ! आपण भर्ग म्हणजे जाळणारे आजणारे आहां. अर्थात् आपण कामदेवाला जाळून टाकलें म्हणून आणि भक्त-जनांचीं पापेंहि भस्म करून टाकतां म्हणून आपणांस भर्ग असें म्हणतात. आपण भक्तजनांचें भय दूर करतां. आपण भूतांचे -- भूत-प्रेत-पिशाच-प्रमथगण इत्यादिकांचे अधिपति आहां ! आपण सर्व अंग भूतीनें म्हणजे भस्मानें विभूषित केलेलें आहे. हे परमेश्वरा ! मी आपणांस शरण आलों आहें. आपण माझें रक्षण करा.

महिमा तव न हि माति श्रुतिषु हिमानी-धरात्मजा-धव भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥४०॥

हिमानी म्हणजे बर्फ. बर्फाला नित्य आपल्या शिखरांवर धारण करणारा पर्वत म्हणजे हिमालय. त्याची आत्मजा म्हणजे कन्या पार्वती तिचा धव म्हणजे पति. हे हिमानीधरात्मजाधवा म्हणजे पार्वतीपते शंकरा ! तुमचा महिमा श्रुतीमध्यें म्हणजे वेदांमध्यें मावत नाहीं. अर्थात् वैदिक वाङ्मयाला भरूनहि तुमचा महिमा उरलेला आहे ! अथवा श्रुति म्हणजे कान. तुमचा महिमा ऐकतां ऐकतां कान भरून जातात, पण तुमचा महिमा संपत नाहीं, तो शिल्लकच रहातो व ऐकावासाच वाटतो. शंकरा ! मी आपणांस शरण आलों आहें. आपण माझें रक्षण करा !

यम-नियमादिभिरङ्गैर्यमिनो हृदये भजन्ति स त्वं भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥४१॥

हे शंकरा ! यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि या अष्टांगयोगाचें अनुष्ठान करून योगी लोक आपल्या हृदयामध्यें ज्याला भजतात तो तूंच अर्थात् तुम्हीच आहां ! हे प्रभो शंकरा ! आपण माझें रक्षण करा.

रज्जावहिरिव शुक्तौ रजतमिव त्वयि जगन्ति भान्ति विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥४२॥

हे प्रभो परमेश्वरा ! मंद अंधकारामध्यें दोरीवर जसा साप भासावा किंवा वाळवंटांत उन्हामध्यें शिंपल्यावर जसा चांदीचा भास व्हावा, त्याचप्रमाणें तुमच्या ठिकाणीं अज्ञानानें – मायेनें हें सर्व जग भासत आहे. भ्रमामध्यें भासणारी ती वस्तु मिथ्या म्हणजे खोटी असते आणि ज्या ठिकाणीं ती भासते तें ठिकाण अर्थात् भ्रमांत भासणाऱ्या वस्तूचें अधिष्ठान, तेवढेंच सत्य असतें. हे परमेश्वरा ! मायेमुळें तुमच्या ठिकाणीं भासणारें जग मिथ्या असून त्या जगाचें अधिष्ठान असलेले तुम्हीच तेवढे सत्य आहां. हे सांब सदाशिवा ! तुमचे चरण माझें रक्षण करोत.

लब्ध्वा भवत्प्रसादाच्चक्रं विधुरवति लोकमखिलं भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥४३॥

विधु म्हणजे भगवान् विष्णु. विधु शब्दाचे ब्रह्मा, विष्णु, महेश, चंद्र, राक्षस, कापूर इत्यादि अनेक अर्थ आहेत. प्रस्तुत श्लोकांत 'चक्र' या शब्दाच्या सान्निध्यामुळें विधु शब्दाचा विष्णु हाच अर्थ घेणें योग्य होय. शंकरांच्या कृपेनेंच विष्णूला सुदर्शनचक्राचा लाभ झालेला आहे. हे शंकरा ! भगवान् विष्णु हे आपल्याच कृपेनें सुदर्शनचक्राला मिळवून सर्व जगाचें संरक्षण करीत आहेत. हे शंभो सदाशिवा ! आपलें चरणयुगल हे माझें संरक्षण करोत.

वसुधा-तद्धर-तच्छय-रथ-मौर्वी-शर-पराकृतासुर भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥४४॥

हे प्रभो शंकरा ! वसुधा म्हणजे पृथ्वी, तद्धर म्हणजे पृथ्वीला धारण करणारा पर्वत आणि तच्छय म्हणजे पृथ्वी ज्याच्यावर विश्रांति घेते तो शेष, हेच जणूं कांहीं रथ, धनुष्याची दोरी आणि बाण यांच्या योगानें सर्व असुरांचा पराभव करणारे तुम्ही, सर्व असुरांना जिंकलेले तुम्ही, माझें रक्षण करा. मी तुमच्या चरणयुगलाला शरण आलों आहें.

शर्व देव सर्वोत्तम सर्वद दुर्वृत्त-गर्व-हरण विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥४५॥

हे विश्वेश्वरा ! आपण प्रलयकालीं सर्व जगाचा संहार करतां म्हणून अथवा भक्तजनांच्या सर्व दुःखांचा संहार करतां म्हणून आपणांस शर्व असें म्हणतात. "शर्वति अथवा शृणाति इति शर्वः" अशी शर्व शब्दाची व्युत्पत्ति आहे. आपण सदासर्वकाळ स्वप्रकाशानें प्रकाशत असतां म्हणून आपणांस देव असें म्हणतात. आपण सर्वापेक्षां श्रेष्ठ आहां, चांगले आहां म्हणून आपणांस सर्वोत्तम असें म्हणतात. आपण भक्तांना सर्व कांहीं देतां, भक्तांच्या सर्व कामना पूर्ण करतां म्हणून आपणांस 'सर्वद' म्हटलें आहे. आपण दुर्वृत्त म्हणजे दुष्ट, दुराचारी, दैत्य, राक्षस वगैरे लोकांचा गर्व हरण करतां. हे प्रभो ! आपण विभु म्हणजे समर्थ आहां. आपण अंबा म्हणजे जगज्जननी जी पार्वती तिच्यासह नित्य विराजमान असतां म्हणून आपणांस सांब म्हटलेलें आहे. आपण नेहमीं भक्तजनांचें कल्याण करतां म्हणून आपणांस सदाशिव म्हणतात. आपणांमुळेंच सर्व लोकांचें कल्याण होत असतें म्हणून आपणांस शंभु म्हणतात. आपण सर्वांना सुखी करतां म्हणून आपणांस शंकर म्हणतात. हे प्रभो शंकरा ! आपले चरणकमल हाच माझा आधार आहे.

षड्रिपु-षड्ऊर्मि-षड्विकार-हर सन्मुख षण्मुख-जनक विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ४६ ॥

हे शंकरा ! आपण भक्तजनांच्या षड्विकारांना दूर करतां. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर यांना षड्रिपु असें म्हणतात. हे सर्व शंकरांच्या कृपेनें नाहींसे होतात. षड्ऊर्मि म्हणजे क्षुधा, पिपासा, शोक, मोह, जरा आणि मृत्यु किंवा शीत आणि उष्ण. तरंगाप्रमाणें जीवांच्या ठिकाणीं सतत उत्पन्न होणें आणि नाश पावणें हा यांचा स्वभाव असल्यामुळें यांना ऊर्मि असें म्हटलें आहे. हे शंकरा ! भक्तजनांच्या षड्ऊर्मि आपण दूर करतां. तसेच षड्विकार म्हणजे यास्काचार्यांनीं सांगितलेले उत्पन्न होणाऱ्या भाव पदार्थांचे सहा विकार. जायते, अस्ति, वर्धते, विपरिणमते, अपक्षीयते आणि विनश्यति म्हणजे जन्माला येणें, जन्मानंतरचें अस्तित्व, वृद्धि, विपरिणाम, अपक्षय आणि विनाश हेच ते सहा विकार होत. शंकरा ! आपण भक्तजनांचे हे सर्व विकार दूर करतां. हे परमेश्वरा ! आपण 'सन्मुख' म्हणजे उत्तमवदन आहां ज्यांचें मुख सत् म्हणजे चांगलें, दर्शनीय, मंगलमय आहे असें आपण आहां. षण्मुख म्हणजे

कार्तिकस्वामी, सर्व देवांचा सेनापति, आपण त्याचे जनक म्हणजे वडील आहां. हे प्रभो ! मी आपल्या चरणीं शरण आलों आहें. आपण माझें रक्षण करा.

सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्मेत्येतल्लक्षण-लक्षित भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥४७॥

हे प्रभो विश्वनाथा ! " सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म " या वाक्यानें सत्यस्वरूप, ज्ञानस्वरूप आणि अनन्तस्वरूप म्हणून श्रुतीनें ज्याचें वर्णन केलें आहे तें ब्रह्म, परब्रह्म तुम्हींच आहां. तुम्हींच त्या लक्षणाचें लक्ष्य आहां. परमेश्वरा ! आपण माझें आधार आहां. माझें रक्षण करा.

हाहा-हूहू-मुख-सुर-गायक-गीतापदान-पद्य विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥४८॥

हे प्रभो शंकरा ! ' हाहा-हूहू ' इत्यादि नांवांनीं प्रसिद्ध असलेले देवलोकींचे गायक – गंधर्व हे तुमचें यश वर्णन करणारीं पद्यें गात असतात. तुमचें यश वर्णन करणारीं पदें देव-गंधर्वांनींहि गाइलेलीं आहेत. मग इतरांच्याबद्दल काय सांगावें ? हे प्रभो ! मी तुम्हांला शरण आलों आहें. तुम्ही माझें रक्षण करा.

ळादिर्न हि प्रयोगस्तदन्तमिह मङ्गलं सदाऽस्तु विभो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ४९ ॥

हे प्रभो शंकरा ! 'ळ' हें अक्षर ज्याच्या आरंभीं आहे असा शब्दप्रयोगच कोठें आढळत नाहीं, असा शब्दप्रयोगहि होत नाहीं. परंतु 'ळ' हें अक्षर ज्याच्या अंतीं आहे असा शब्द मात्र प्रसिद्ध आहे. तो शब्द 'मंगळ' अर्थात् 'मंगल' हाच आहे. आणि हे प्रभो ! तेंच मी तुम्हांला सदासर्वकाळ मागत आहें. माझें सदोदित मंगल असावें हीच माझी प्रार्थना आहे. हे परमेश्वरा ! आपण माझे आधार आहां. माझें रक्षण करा.

क्षणमिव दिवसान्नेष्यति त्वत्पदसेवा-क्षणोत्सुकः शिव भो ।
साम्ब सदाशिव शम्भो शंकर शरणं मे तव चरणयुगम् ॥ ५० ॥

हे शिवा मंगलमय ब्रह्मरूपा शंकरा ! तुमच्या चरणकमलांची सेवा करण्यास जो मनुष्य एक क्षणहि उत्सुक होईल, त्याचे सर्व दिवस एका क्षणासारखे जातील,

तो सर्व दिवसांना क्षणाप्रमाणें घालवील. अभिप्राय असा आहे कीं, मनुष्याला इष्ट वस्तूचा किंवा इष्ट व्यक्तीचा लाभ झाला म्हणजे त्या आनंदांत त्याला एक दिवसहि क्षणासारखा वाटतो. दिवस कोणीकडे गेला व कसा गेला हें लक्षांतहि येत नाहीं. इतका तो आनंदांत असतो. याच्या उलट प्रिय वस्तूचा किंवा व्यक्तीचा वियोग झाला म्हणजे एक क्षणहि युगासारखा वाटतो. तो काळ जातां जात नाहीं. अनन्यप्रेमानें शंकरांच्या चरणकमलांची सेवा करण्यास मनुष्य एक क्षणभरहि उत्सुक झाला, तरी शिवकृपेनें त्याला जो आनंद होईल, त्या आनंदाच्या भरांत तो दिवसच्या दिवस क्षणासारखे घालवील. शिवभक्तीच्या आनंदांत आयुष्याचे दिवस क्षणासारखे निघून गेलेले त्याला कळणारहि नाहींत, इतका तो आनंदी होईल. हे सांब सदाशिवा शंभो शंकरा ! आपले चरणयुगल हेच माझे आधार आहेत. अधिक काय सांगूं ते माझे रक्षणकर्ते आहेत.

■ ■ ■

मृत्युंजय-मानसपूजा-स्तोत्रम्

[मृत्युंजय हें नांव शंकराचें आहे. भगवान् शंकर हे तत्त्वतः शिव म्हणजे निरुपाधिक परब्रह्मस्वरूप असल्यामुळें खऱ्या अर्थानें ते मृत्युंजयच आहेत. " न जायते म्रियते वा कदाचित् " त्यांना कधीं जन्महि नाहीं आणि मृत्यूहि नाहीं. हेंच त्यांचें तात्त्विक स्वरूप आहे. एवढेंच काय पण सर्व जगाला खाऊन टाकणारा मृत्यु हें त्यांचें तोंडीलावणें आहे.: मृत्यूची तो चटणी करतो, "मृत्युर्यस्योपसेचनम्" असें त्या शिवस्वरूप ब्रह्माचें कठोपनिषदांत वर्णन केलेलें आहे. ज्या शिवतत्त्वाचें चिंतन करणारा, त्या शिवतत्त्वाला जाणणारा तत्त्ववेत्ता देखील मृत्यूच्या जबड्यांतून सुटतो. " निचाय्य तं मृत्युमुखात् प्रमुच्यते " तो तत्त्ववेत्ताहि मृत्युंजय बनतो तर मग तें शिवतत्त्व स्वतः मृत्युंजय असेल यांत नवल कसलें !

अधर्माच्या वंशांत भयापासून मायेच्या पोटीं मृत्यूचा जन्म झालेला आहे. प्राणिमात्रांचें सतत अपहरण करणें हेंच त्याचें कार्य आहे. " भयाज्जज्ञेऽथ वै माया मृत्युं भूताऽपहारिणम् " असें विष्णुपुराणांत वर्णन केलेलें आहे (प्रथम खंड अ. ७). या मृत्यूपासून कोणीच सुटला नाहीं. ब्रह्मदेवालाहि मृत्यु आहे मग

इतरांची कथा काय! याला फक्त एकच अपवाद आहे. तेथें मृत्यूची कांहीं मात्रा चालत नाहीं. तो म्हणजे अविनाशी सच्चिदानन्दघन परमात्मा, परब्रह्म अथवा शुद्ध चित्तत्त्व. त्याला मात्र कधींहि मरण नाहीं. कारण मृत्यु हा रोग, अपघात किंवा परम वार्धक्यामुळें प्राप्त होणारी क्षीणता या निमित्तानेंच लोकांचे प्राण घेत असतो. शुद्ध चित्स्वरूप असलेल्या आत्म्याच्या ठिकाणीं अथवा परब्रह्माच्या ठिकाणीं रोगांचा तिळमात्रहि संपर्क नाहीं. आत्मतत्त्व अथवा परब्रह्म शुद्ध चित्स्वरूप असल्यामुळें तें आकाशापेक्षांहि व्यापक आहे. जेथें आकाशालाच आघात आणि प्रत्याघात नाहींत तेथें आकाशापेक्षांहि व्यापक असलेल्या शुद्ध चित्स्वरूपाला ते कोठून असणार ? जेथें आघात आणि प्रत्याघात नाहीत तेथें अपघात तरी कसा संभवेल ? याप्रमाणें शुद्ध चित्स्वरूपाच्या ठिकाणीं रोगमूलक किंवा अपघातमूलक मरण संभवत नाहीं. आतां राहिली वार्धक्यमूलक क्षीणता. ही क्षीणता म्हणजेच जरा होय. तीहि शुद्ध चित्स्वरूप परब्रह्माच्या ठिकाणीं संभवत नाहीं. जेथें जन्मच नाहीं तेथें वृद्धि कसली आणि जेथें वृद्धि नाहीं तेथें क्षय म्हणजे ऱ्हास हा तरी कसा संभवणार ? अशा रीतीनें वार्धक्यमूलक क्षीणतेमुळेंहि शुद्ध चित्स्वरूप परब्रह्माला मरण नाहीं. आपले मृत्युंजय भगवान् शंकर हे शुद्ध चित्स्वरूप परब्रह्मच आहेत. त्यांचा वाचक असलेल्या शिव शब्दाचाहि तोच अर्थ आहे. (शिवभुजंगमस्तोत्र, श्लोक ४, पान ३३३ पहा). मृत्यूनें सर्व जगाला ग्रासलेले असल्यामुळें मृत्यूला काळ असें म्हणतात. "कलयतीति कालः" अशी काल शब्दाची व्युत्पत्ति आहे. भगवान् शंकर हे काळाचेहि काळ आहेत. मृत्यूनें सर्व जग जिंकलेलें असलें तरी शंकरानें मृत्यूलाहि जिंकलेलें आहे. मृत्यूनें मात्र कधींहि शंकरांनीं जिंकलेलें नाहीं. "न मृत्युना जितः शम्भुः कल्पे कल्पे श्रुतौ श्रुतम्" (मृत्युंजयतंत्र). म्हणूनच त्यांना मृत्युंजय अशी अन्वर्थ संज्ञा आहे. "मृत्युं जयतीति मृत्युंजयः" अशी मृत्युंजय शब्दाची व्युत्पत्ति आहे. मृत्यूला तो जिंकतो म्हणून त्याला मृत्युंजय असें म्हणतात. आतां मृत्यु म्हणजे काय याचा आपण विचार करूं.

मृत्यु म्हणजे मरण. शरीर आणि प्राण यांचा वियोग होणें याला मृत्यु असें म्हणतात; पण हें खरें मरण नव्हे. सापानें जशी कात टाकावी किंवा आपण जीर्ण वस्त्राचा जसा परित्याग करावा त्याचप्रमाणें शरीर आणि प्राण यांचा वियोग तत्त्ववेत्ते समजतात. "वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि । तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥" (भ.

गीता २–२२). जीर्ण वस्त्रांच्या परित्यागापेक्षां या मरणाचें अधिक मूल्य तत्त्ववेत्ते मानीत नाहींत. मग खरें मरण कोणतें ? तर नित्य चित्स्वरूपापासून आपण च्युत होणें, ढळणें, दूर होणें यालाच मरण असें म्हणतात. या मरणाला कारण अज्ञान असल्यामुळें अज्ञान हाच खरा मृत्यु होय. या अज्ञानाचें निरसन ज्ञानानेंच होऊं शकतें म्हणून ज्ञानाला – आत्मस्वरूपाच्या यथार्थ ज्ञानाला – मृत्युंजय असें म्हटलेलें आहे. अज्ञानरूपी मृत्यूला जिंकण्याला समर्थ असें ज्ञान देणारा जो गुरु तोहि पण मृत्युंजयच होय. हें ज्ञान देण्याचें कार्य शंकरांनींच केलेलें आहे म्हणून शंकरांना आदिगुरु आणि मृत्युंजय असें म्हणतात. " शम्भुश्च चतुरो वेदान् वेदाङ्गानितरांस्तथा । बालकं पाठयामास ज्ञानं मृत्युंजयं परम् ॥ " असें ब्रह्मवैवर्त पुराणांत ज्ञानाला मृत्युंजय आणि ज्ञानदात्याला शंभु असें म्हटलें असल्याचें स्पष्ट दिसत आहे.

आत्मस्वरूपाच्या यथार्थ ज्ञानानें अज्ञानाचें निरसन होऊन जीव जेव्हां स्वस्वरूपीं पोहोंचतो, निजानन्दांत लीन होतो तेव्हांच तो खरा मुक्त होतो. अशा रीतीनें मरणांतून मुक्त झालेल्या तत्त्ववेत्त्यालाहि पण मृत्युंजयच म्हणतात. मृत्यूला जिंकण्याचें कार्य तत्त्वज्ञानाप्रमाणेंच अनन्यभक्तीनेंहि घडून येत असल्यामुळें भक्ति ही एक मृत्यूला जिंकण्याचें उत्कृष्ट साधन आहे. अकालीं मृत्यु प्राप्त झाला असतां शंकरांच्या चरणीं अनन्यभावानें शरण जाऊनच मार्कंडेयांनीं मृत्यूला जिंकलें आहे. हातामध्यें पाश घेऊन स्वतः यमराजच उपस्थित झाले असतांना मार्कंडेय ऋषींनीं चटकन् शंकरांना मिठी मारली आणि " पाहि माम् " देवा ! माझें रक्षण करा, असें म्हणून करुणा भाकली. " चन्द्रशेखरमाश्रये मम किं करिष्यति वै यमः " मी चंद्रशेखर भगवान् श्रीशंकर यांना शरण आलों आहें, मीं त्यांचा आश्रय घेतला आहे. आतां यम माझें काय करणार ? अशा दृढ विश्वासानें ते शंकरांना शरण गेले. परिणाम असा झाला कीं, ते स्वतः अपमृत्यूपासून मुक्त झाले व दीर्घकाल जगलेच, पण त्यांचे प्रातःकाळीं स्मरण करणारा देखील अपमृत्यूला जिंकून शतायु होतो. " जीवेद्वर्षशतं साग्रमपमृत्युविवर्जितः " असा हा मृत्युंजय भगवान् शंकर यांचा महिमा आहे.

यावर कोणी म्हणेल कीं, अहो, मृत्यु हा तर अटळ आहे. " जातस्य हि ध्रुवो मृत्युः ". मृत्यूला जिंकण्याची कल्पना हा केवळ भ्रम आहे. पण हें म्हणणें बरोबर नाहीं. मृत्यु हा दोन प्रकारचा आहे. एक कालमृत्यु आणि दुसरा

अकालमृत्यु. अकालमृत्यूलाच "आगंतुमृत्यु" असें म्हणतात. आगंतु-मृत्यूचे असंख्य प्रकार आहेत. कांहीं मृत्यु रोगानें येतात तर कांहीं अपघातानें येतात. कांहीं विषानें येतात तर कांहीं जारण, मारण, चेटूक वगैरेसारख्या अभिचारकर्मानें म्हणजे जादूटोण्यानें येतात. यांपैकीं कालमृत्यु हा अपरिहार्य आहे. त्याचें विवेकानें स्वागतच करावें लागतें. पण अकालमृत्यु हे अटळ आहेत असें मात्र म्हणतां येत नाहीं. तसें असतें तर " मृत्युर्बुद्धिमताऽपोह्यः यावद्बुद्धि-बलोदयम् " (भागवत, द. स्कं., अ. १) असें सांगितलेंच गेलें नसतें. कफ, वात आणि पित्त यांच्या प्रकोपानें येणारे मृत्यु, तसेंच आगंतुक, आघात किंवा जारण-मारण इत्यादि निमित्तानें येणारे मृत्यु या सर्वांपासून रसशास्त्र-विशारदांनीं आणि मंत्रशास्त्र-विशारदांनीं राजाचें रक्षण करावें, असें आयुर्वेदप्रवर्तक श्रीचरक-सुश्रुत इत्यादि ऋषिजनांनीं सांगितलेंच नसतें. " दोषागन्तुजमृत्युभ्यो रस-मन्त्र-विशारदौ। रक्षेतां नृपतिं नित्यं यत्नाद्वैद्यपुरोहितौ॥ " (सुश्रुत, सू. अ. २४). ज्या अर्थी अधिकारी तज्ज्ञ ऋषिमुनि मृत्यु टाळण्याचा उपाय सांगत आहेत त्या अर्थी मृत्यु अपरिहार्य आहे असें म्हणतां येत नाहीं. अर्थात् या ठिकाणीं मृत्यु शब्दाचा अर्थ "अकालमृत्यु" असा समजावा. कोणी असें विचारील कीं, हा सर्व प्रयत्न करूनहि अपमृत्यु टळत नाहीं असें दिसतें. त्यावर उत्तर एवढेंच कीं, त्या ठिकाणीं मृत्यूच्या सामग्रीपेक्षां मृत्यूला टाळण्याच्या प्रयत्नाची सामग्री ही कमी पडली. पुष्कळ वेळेला अपमृत्यु टाळण्याचे प्रयत्नहि यशस्वी झाल्याचे दिसतात.

मंत्र, तंत्र, औषधें, रसायनें इत्यादि अपमृत्यु टाळण्याचीं अनेक साधनें सांगितलीं आहेत. त्यांतच श्रीमृत्युंजय भगवान् शंकर यांच्या चरणीं अनन्य-भावानें शरण जाणें, मृत्युंजयाची आराधना करणें हेंहि एक उत्तम साधन सांगितलें गेलें आहे. " यस्तु संपूजयेद्भक्त्या लिङ्गं मृत्युञ्जयाभिधम्। यमोऽपि प्रणमेद्भक्त्या किं करिष्यति चामयः॥ " " रोगी प्रमुच्यते सद्यो भोगीव कञ्चुको-ज्झितः। यदि मद्वचने भक्तिस्तदा मुक्तो भवेन्नरः॥ " (मृत्युंजयतन्त्र). मृत्युंजय शिवलिंगाची आराधना केली असतां यमहि नम्र होतो तेथें रोगांची कथा काय ? सापानें जशी कात टाकावी त्याप्रमाणें रोग्यालाहि सर्व रोग सोडून जातात. मात्र या गोष्टीला श्रद्धेची जोड अवश्य पाहिजे. श्रद्धेनें मृत्युंजयाचें अनुष्ठान केल्यास अपमृत्यु तर टळेलच, पण श्रीमृत्युंजयाच्या कृपेनें खऱ्या अर्थानें अज्ञानरूपी मृत्यूचाहि नाश होऊन तो भक्तहि मृत्युंजय बनेल. ध्रुवाप्रमाणें तोहि मृत्यूच्या

मस्तकावर पाऊल ठेवून मोठ्या आनंदानें स्वस्वरूपाच्या ठिकाणीं आरूढ होईल यांत शंका नाहीं.

यावर कोणी अशी शंका घेईल कीं, अहो ! मृत्युंजय शब्दाचा खऱ्या अर्थानें परब्रह्म असा जर अर्थ आहे आणि सर्वच देवता जर परब्रह्मस्वरूप आहेत तर मग मृत्युंजय म्हणून शिवलिंगाची – शंकरांचीच – आराधना कां करावी ? यावर उत्तर – शंका अगदीं बरोबर आहे. शंकाकार सर्व देवतांकडे परब्रह्मस्वरूपानें पहात असेल तर आम्ही त्याचें अभिनंदनच करूं; तथापि मार्कंडेय ऋषींना मृत्यूच्या संकटांतून सोडविण्याकरितां धावत आलेल्या शंकरांनीं यमाचे प्राणच घेतले व मार्कंडेयांना यमाच्या तावडींतून सोडविलें आहे. (शिवभुजंगमस्तोत्र, १४ वा श्लोक पहा). ऐतिहासिकदृष्ट्या प्रत्यक्ष मृत्यूला – यमाला – जिंकण्याचें कार्य शंकर-स्वरूपानेंच झालेलें असल्यामुळें 'मृत्युंजय' हा शब्द शंकर या अर्थानेंच रूढ झाला आहे. म्हणून मृत्यूवर विजय मिळविण्यासाठीं शंकरांचीच उपासना करणें विहित आहे.

मृत्युंजयाची आराधना करतांना हें आचार्यांनीं केलेलें मृत्युंजय-मानस-पूजास्तोत्र अर्थाकडे दृष्टि देऊन अवश्य म्हणावें. यांत चव्वेचाळीस श्लोकांनीं परमेश्वराला चव्वेचाळीस उपचार समर्पण केलेले असून पंचेचाळिसाव्या श्लोकानें फलश्रुति वर्णन केलेली आहे. सेहेचाळिसाव्या श्लोकांत शिवदर्शनाचा व शिव-पंचाक्षरी मंत्राच्या जपाचा महिमा वर्णन केलेला आहे. या स्तोत्राचा पाठ करणें हीहि मृत्युंजयाचीं आराधनाच होय.]

कैलासे कमनीय-रत्नखचिते कल्पद्रु-मूले स्थितं
कर्पूर-स्फटिकेन्दु-सुन्दर-तनुं कात्यायनी-सेवितम् ।
गङ्गा-तुङ्ग-तरङ्ग-रञ्जित-जटा-भारं कृपासागरं
कण्ठालंकृत-शेषभूषणममुं मृत्युंजयं भावये ॥ १ ॥

मी मृत्युंजयाचें चिंतन करीत आहें. अत्यंत सुंदर रमणीय रत्नें ज्याच्यावर जडविलेलीं आहेत अर्थात् निसर्गतःच विविध रत्नें ज्याच्यावर जडविल्याप्रमाणें शोभत आहेत, अशा कैलासपर्वतावर कल्पवृक्षाच्या मुळाशीं ते बसलेले आहेत. त्यांचा देह अर्थात् शरीरकांति ही कापराप्रमाणें अथवा स्फटिकाप्रमाणें किंवा चंद्राप्रमाणें अत्यंत सुंदर, निर्मल, आह्लादायक दिसत आहे. त्यांच्या वामभागीं

कात्यायनी म्हणजे देवी पार्वती विराजमान झालेली आहे. कत नांवाच्या ऋषींच्या पोटीं तिनें केव्हां तरी जन्म घेतलेला होता म्हणून तिला कात्यायनी असें म्हटलेलें आहे. "कतस्य अपत्यं स्त्री कात्यायनी" अशी कात्यायनी शब्दाची व्युत्पत्ति आहे.

मृत्युंजय भगवान् शंकर यांचा जटाभार गंगेच्या उंच उंच उसळणाऱ्या तरंगांनीं शोभायमान झालेला दिसत आहे. भगवान् मृत्युंजय हे कृपेचे मूर्तिमंत सागर आहेत. त्यांनी आपल्या कंठामध्यें शेषाला म्हणजे नागाला अलंकाराप्रमाणें भूषण म्हणून धारण केलेलें आहे. अशा ह्या मृत्युंजयाचें मी आपल्या अंतःकरणांत भक्तिपूर्वक चिंतन करीत आहें. मी मृत्युंजयाचें ध्यान करीत आहें.

आगत्य मृत्युंजय चन्द्रमौले व्याघ्राजिनालंकृत शूलपाणे ।
स्वभक्त-संरक्षण-कामधेनो प्रसीद विश्वेश्वर पार्वतीश ॥ २ ॥

हे पार्वतीपते मृत्युंजया ! आपण आपल्या मस्तकावर चंद्र धारण केलेला आहे. आपण परिधान केलेलें व्याघ्रचर्म हें आपणांस अलंकाराप्रमाणें शोभत आहे. भक्तजनांच्या संरक्षणाकरितां आपण आपल्या हातांत त्रिशूळ धारण केलेला आहे म्हणून आपणांस शूलपाणि असें म्हणतात. कामधेनूप्रमाणें आपण आपल्या भक्तांचे सकल मनोरथ पूर्ण करून त्यांचें संरक्षण करतां. आपण सर्व विश्वाचे अधिपति आहां. मी आपलें हृदयांत "आवाहन" करीत आहें. आपण येऊन माझ्यावर प्रसन्न व्हावें. आपण माझ्यावर कृपा करावी.

भास्वन्मौक्तिक-तोरणे मरकत-स्तम्भायुतालंकृते
सौधे धूप-सुवासिते मणिमये माणिक्य-दीपाञ्चिते ।
ब्रह्मेन्द्रामर-योगि-पुंगव-गणैर्युक्ते च कल्पद्रुमैः
श्रीमृत्युंजय सुस्थिरो भव विभो माणिक्यसिंहासने ॥ ३ ॥

हे मृत्यंजया प्रभो ! हा पहा मी आपल्याकरितां भव्य प्रासाद निर्माण केलेला आहे. त्याला मरकत म्हणजे पाचू या रत्नांचे हजारों खांब असल्यामुळें तो मोठा भव्य व शोभायमान दिसत आहे. त्याला भास्वत् म्हणजे उज्ज्वल देदीप्यमान मोत्यांच्या झालरी लावलेल्या आहेत. नानाप्रकारच्या उदबत्त्या व धूप यांनीं तो सुवासित केलेला आहे. त्याला असंख्य रत्नें जडविलेलीं असून त्यांत माणकांचे दीप प्रज्वलित केलेले आहेत. तेथें ब्रह्मदेव, इंद्र, अग्नि, वरुण, कुबेर, वायु इत्यादि देवांचे समुदाय आणि बड्या बड्या योगी लोकांचे समुदाय विराजमान

झालेले आहेत. त्याचप्रमाणें अनेक कल्पवृक्षांनीं तो युक्त आहे. अशा या भव्य सुंदर मंदिरामध्यें तयार केलेल्या माणकांच्या सिंहासनावर हे प्रभो मृत्युंजया ! आपण सुस्थिर व्हावें.

मन्दार-मल्ली-करवीर-माधवी-पुन्नाग-नीलोत्पल-चम्पकान्वितैः ।
कर्पूर-पाटीर-सुवासितैर्जलैराधत्स्व मृत्युंजय पाद्यमुत्तमम् ॥ ४ ॥

हे मृत्युंजया प्रभो ! हें पहा मी आपल्याकरितां उत्तम "पाद्य" म्हणजे पाय धुण्याकरितां पाणी आणलेलें आहे. या पाण्यांत पारिजातक, जाई, जुई, करवीर म्हणजे कण्हेर त्याचप्रमाणें मोगरा, नागकेशर, नीलकमल, सोनचाफा इत्यादि सुगंधी फुलें घातलेलीं आहेत. त्याचप्रमाणें कापूर आणि चंदन यांनींहि तें सुवासिक केलेलें आहे. अशा रीतीनें तयार केलेलें हें उत्तम पाद्य म्हणजे पाय धुण्याचें पाणी याचा आपण स्वीकार करावा.

सुगन्ध-पुष्पप्रकरैः सुवासितैर्वियन्नदी-शीतल-वारिभिः शुभैः ।
त्रिलोकनाथार्ति-हरार्घ्यमादराद्गृहाण मृत्युंजय सर्ववन्दित ॥५॥

अनेक प्रकारच्या सुगंधी फुलांनीं सुवासिक केलेलें शुभ म्हणजे कल्याणकारक, मंगलमय अथवा पवित्र असें हें शीतल गंगाजल आणलेलें आहे. हें मी हस्तप्रक्षालनाकरितां अर्घ्य म्हणून आपणांस अत्यंत आदरानें अर्पण करीत आहें. आपण त्याचा प्रेमपूर्वक स्वीकार करावा. हे मृत्युंजया प्रभो ! आपण त्रैलोक्याचे नाथ म्हणजे स्वामी आहां. आपण कृपाळूपणें भक्तजनांच्या सर्व पीडांचा परिहार करतां. देव, दानव, मानव सर्व आपल्या चरणीं वंदन करीत आहेत. हे प्रभो शंकरा ! हें माझें अर्घ्यदान आपण स्वीकारावें.

हिमाम्बुवासितैस्तोयैः शीतलैरतिपावनैः ।
मृत्युंजय महादेव शुद्धाचमनमाचर ॥ ६ ॥

हे मृत्युंजया महादेवा ! आपणांस आचमन करण्याकरितां हें मीं कापूर आणि वाळा वालून सुवासिक केलेलें अत्यंत पवित्र आणि शीतल जल आणलेलें आहे. याच्या योगानें आपण 'शुद्धाचमन' करावें. याप्रमाणें एक ते सहा श्लोकांपर्यंत क्रमशः ध्यान, आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य आणि आचमन असे सहा उपचार झाले.

गुड-दधि-सहितं मधु-प्रकीर्णं सु-घृत-समन्वित-धेनु-दुग्ध-युक्तम् ।
शुभकर मधुपर्कमाहर त्वं त्रिनयन मृत्युहर त्रिलोकवन्द्य ॥ ७ ॥

हे परमेश्वरा ! मी आपली मधुपर्कपूजा करीत आहें. या मधुपर्कामध्यें गूळ आणि दहीं यांच्यासह पुष्कळ मध मिसळलेला आहे. त्याचप्रमाणें गाईचें उत्तम साजूक तूपहि पण त्यामध्यें घातलेलें आहे. तसेंच या मधुपर्कामध्यें गाईचें दूधहि आहे. त्याचप्रमाणें गोप्रदान करण्यासाठीं ही उत्तम गायहि आणलेली आहे. असा हा मधुपर्क मी आपणांस अर्पण करीत आहें. विशिष्ट इष्टदेवता, विद्वान्, अतिथि आणि नवरदेव यांच्या सत्काराकरितां जें विशिष्ट प्रकारचें पूजासाहित्य तयार केलें जातें त्यास मधुपर्क असें म्हणतात. सर्व मधुर पदार्थांचें एकत्र मिश्रण असल्यामुळें 'मधुपर्क' असें त्याचें अन्वर्थ नांव आहे. त्यांत गोप्रदानहि असतेंच. अशा या सामग्रीनें जी पूजा केली जाते तिला मधुपर्कपूजा असें म्हणतात.

आचार्य म्हणतात, शंकरा ! हा मधुपर्क मी आपणांकरितां तयार केला आहे. आपण याचा अंगीकार करा. आपण भक्तजनांच्या अपमृत्यूचा नाश करतां म्हणून आपणांस 'मृत्युहर' किंवा मृत्युंजय असें म्हणतात. आपण सर्वांचें शुभ करतां, कल्याण करतां म्हणून आपणांस 'शुभकर' असेंहि म्हटलेलें आहे. याच अभिप्रायानें भक्तजन आपणांस शिव किंवा शंकर असेंहि म्हणतात. हे त्रिलोचना, आपण त्रैलोक्याला वंदनीय आहां. हे परमेश्वरा ! आपण माझ्या या मधुपर्कपूजेचा स्वीकार करा.

पञ्चास्त्र शान्त पञ्चास्य पञ्चपातकसंहर ।
पञ्चामृत-स्नानमिदं कुरु मृत्युंजय प्रभो ॥ ८ ॥

पञ्चास्त्र म्हणजे ज्याची उपासना पांच अस्त्रांनीं अर्थात् अस्त्रमंत्रांनीं केली जाते तो भगवान् सदाशिव. मंत्रहि अस्त्राप्रमाणें शत्रूंचें निरसन करतात आणि आपलें संरक्षण करतात म्हणून मंत्रांनाहि अस्त्र असें म्हणतात. ईशान, तत्पुरुष, अघोर, वामदेव आणि सद्योजात हीं शंकरांचीं पांच रूपें असून त्यांची उपासनाहि निरनिराळ्या पांच वैदिक मंत्रांनीं केली जाते. त्या मंत्रांना अस्त्रमंत्र असें म्हणतात. मंत्र हे अस्त्राप्रमाणें संरक्षणाचें कार्य करीत असल्यामुळें त्यांना

अस्त्र ही अन्वर्थ संज्ञा आहे. शंकरांचें अस्त्रमंत्र शिवभुजंगमस्तोत्रांतील चौथ्या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें पांच असल्यामुळें शंकरांना "पञ्चास्त्र" असें म्हटलें आहे. हे पंचास्त्रा शंकरा !

अथवा "पञ्चास्त्रशान्त" हें एकच पद समजावें. पंचास्त्र शब्दाचा अर्थ मदन असा आहे. मदनाचींहि अस्त्रें पांचच असल्यामुळें त्याला 'पञ्चास्त्र' 'पञ्चबाण' किंवा 'पञ्चशर' असें म्हणतात. तात्पर्य, पंचास्त्र म्हणजे मदन, तो शंकरांनीं शांत केला आहे, त्याला जाळलें आहे, मारलें आहे म्हणून शंकरांना 'पञ्चास्त्रशान्त' असें विशेषण दिलेलें आहे. अथवा मदनाचें दहन झाल्यानंतर मदनाची पत्नी जी रति, तिनें केलेल्या प्रार्थनेवरून भगवान् शंकर शांत झाले व मदनाचें स्वरूप फक्त रतीलाच गोचर होऊं शकेल, मदनाचा देह रतीलाच दिसूं शकेल असा शंकरांनीं रतीला वर दिला. हा अभिप्राय लक्षांत घेऊन आचार्यांनीं शंकरांना 'पञ्चास्त्रशान्त' असें म्हटलें आहे. केवळ स्वतंत्र 'शान्त' हें विशेषण कल्पिल्यास भगवान् शंकर हे जसे उग्रस्वरूप, रुद्रस्वरूप अथवा भीम म्हणजे भयंकरस्वरूप आहेत तसेंच ते शांतस्वरूपहि आहेत. शिव, शंकर, मृड हीं नांवें त्यांच्या शांतस्वरूपाचींच द्योतक आहेत. शिवमहिम्नस्तोत्रांतहि "जनसुखकृते सत्त्वोद्रिक्तौ मृडाय नमो नमः" सत्त्वगुणाच्या उत्कर्षावस्थेंत सर्वजनांना सुखी करणारे म्हणून त्यांना मृड असें म्हणतात असें त्यांचें वर्णन केलेलें आहे तें बरोबरच आहे. तात्पर्य, हे शांतस्वरूपा शंकरा ! आपण पंचास्य म्हणजे पंचमुख आहां. ईशान, तत्पुरुष, अघोर, वामदेव आणि सद्योजात हीं शंकरांच्या पांच मुखांचीं पांच नावें आहेत. हे मृत्युंजया प्रभो ! आपण भक्तजनांच्या पंच महापातकांचा संहार करतां. ब्रह्महत्या, मद्यपान, परद्रव्यापहरण आणि गुरुपत्नीगमन हीं चार महापातकें असून हीं पातकें करणाऱ्यांच्या संगतींत रहाणें हेंहि एक महापातकच आहे. प्रभो ! आपण या सर्व पातकांचा निरास करतां. हे प्रभो ! ही मी आपल्यासाठीं पंचामृतस्नानाची तयारी केली आहे. गाईचें दूध, दहीं आणि तूप, तसेंच साखर आणि मध हीं पांच द्रव्यें एकत्र करून मीं पंचामृत आणलेलें आहे. हे मृत्युंजया ! आपण या पंचामृतानें स्नान करावें.

जगत्त्रयी-ख्यात-समस्त-तीर्थ-समाहृतैः कल्मष-हारिभिश्च ।
स्नानं सुतोयैः समुदाचर त्वं मृत्युंजयानन्तगुणाभिराम ॥ ९ ॥

अनंत गुणांनीं अभिराम म्हणजे सुंदर असलेल्या हे मृत्युंजया परमेश्वरा ! त्रैलोक्यामध्यें प्रख्यात असलेल्या गंगा, यमुना, सरस्वती, कृष्णा, वेण्या, ककुद्मती, गोदावरी, नर्मदा, तुंगभद्रा, कावेरी, ताम्रपर्णी, शरयू, ब्रह्मपुत्रा, सिंधु, शोणभद्र, भीमा, नर्मदा इत्यादि समस्त तीर्थांतून आणलेलें आणि सर्व कल्मषांना दूर करणारें असें हें अत्यंत पवित्र जल अत्यंत सुंदर आहे. हें शुद्धोदक मी आपणांस अर्पण करीत आहें. आपण या शुद्धोदकानें स्नान करावें. 'जगत्त्रयी-ख्यात' स्वतंत्र पद काढल्यास मृत्युंजयाचेंहि विशेषण करतां येईल. हे विश्वविख्याता परमेश्वरा ! स्नानाकरितां आणलेल्या या शुद्धोदकाचा आपण अंगीकार करा. असा त्याचा अर्थ करावा.

आनीतेनातिशुभ्रेण कौशेयेनामरद्रुमात् ।
मार्जयामि जटाभारं शिव मृत्युंजय प्रभो ॥ १० ॥

कल्पवृक्षापासून आणलेल्या अर्थात् तयार केलेल्या तसेंच अत्यंत शुभ्र असलेल्या अशा या रेशमी वस्त्रानें हे मृत्युंजया प्रभो ! मी आपल्या जटाभाराचें परिमार्जन करीत आहें. स्नानानें ओल्या झालेल्या जटा पुसून कोरड्या करीत आहें. माझी ही सेवा स्वीकारावी.

नाना-हेम-विचित्राणि चीर-चीनाम्बराणि च ।
विविधानि च दिव्यानि मृत्युंजय सुधार्य ॥ ११ ॥

ज्यांच्यावर सोन्याच्या जरीचीं नानाप्रकारचीं प्रेक्षणीय सुंदर कामें केलेलीं आहेत अशीं रेशमी व भरजरीचीं वस्त्रें त्याचप्रमाणें 'चीनाम्बर' म्हणजे बारीक धाग्याचीं तलम वस्त्रें आपणांस परिधान करण्याकरितां आणलेलीं आहेत, तीं वस्त्रें विविध प्रकारचीं असून, अत्यंत सुंदर आहेत. हे मृत्युंजया ! आपण तीं परिधान करावींत. 'चीनाम्बर' याचा अर्थ चीन देशांतील वस्त्रें असाहि होतो. 'चीनांशुक', 'चीनांबर' असे शब्दप्रयोग संस्कृत वाङ्मयांत सांपडतात. यावरून प्राचीन काळीं चीन देशांतील अति तलम कापडाचा भारतीय लोक उपयोग करीत असत असें दिसतें. भारताशीं चीनचा वैरभावहि नव्हता, पण अलीकडे चीनची ही अवस्था राहिली नाहीं. चीन भारताचा वैरी बनला. चीननें स्वीकारलेल्या धोरणामुळें भारत आपल्या कैलास-मानससरोवरासारख्या तीर्थक्षेत्रांना मुकला !

अशा स्थितींत आचार्य चीनचीं वस्त्रें आपल्या उपास्यदेवतेला – श्रीमृत्युंजयाला कधींहि अर्पण करणार नाहींत, हें वाचकांनीं लक्षांत घ्यावें. याच अभिप्रायानें आम्ही 'चीनाम्बर' या शब्दाचा अर्थ बारीक धाग्याचें वस्त्र असा केला आहे. चीन शब्दाचा अर्थ बारीक धागा असा कोशकारांनींहि दिलेला आहे.

विशुद्ध-शुक्ताफल-जाल-रम्यं मनोहरं काञ्चन-हेम-सूत्रम् ।
यज्ञोपवीतं परमं पवित्रमाधत्स्व मृत्युंजय भक्तिगम्य ॥ १२ ॥

हे शंकरा मृत्युंजया ! आपण 'भक्तिगम्य' म्हणजे भक्तींनेंच ज्यांचा लाभ होऊं शकतो असें आहां. आपल्या भक्तींनेंच आपले भक्त आपल्या यथार्थ स्वरूपाला जाणूं शकतात. हे प्रभो ! अत्यंत शुद्ध, स्वच्छ असलेल्या मोत्यांच्या जाळीप्रमाणें रम्य म्हणजे मनोहर असलेलें, तसेंच ज्याच्यामध्यें सोन्यासारखीं देदीप्यमान आणि मनोहर अशीं सूत्रें शोभत आहेत, असें हें परम पवित्र असलेलें यज्ञोपवीत मी आपणांस अर्पण करीत आहें. प्रभो ! हें आपण धारण करा.

श्रीगन्धं घनसार-कुङ्कुम-युतं कस्तूरिका-पूरितं
कालेयेन हिमाम्बुना विरचितं मन्दार-संवासितम् ।
दिव्यं देवमनोहरं मणिमये पात्रे समारोपितं
सर्वाङ्गेषु विलेपयामि सततं मृत्युंजय श्रीविभो ॥ १३ ॥

हे प्रभो मृत्युंजया ! हें उत्तम चंदनाचें गंध, त्यांत कापूर आणि केशर घातलेलें आहे. कस्तूरीहि पण त्यांत घातलेली आहे. तसेंच कृष्णागरूचें चूर्णहि पण त्यांत मिसळलेलें आहे. तें गंध शीतल जलानें उगाळलेलें असून त्याला स्वर्गीय कल्पद्रुमाच्या फुलांची भावना दिलेली आहे. देवा ! तें गंध सर्व देवांच्या मनाला आकृष्ट करणारें आणि अत्यंत सुंदर आहे. रत्नखचित अशा सुवर्णाच्या पात्रांत तें भरलेलें आहे. मी तें आपल्या सर्वांगाला चर्चित आहे. परमेश्वरा ! माझ्या गंधविलेपनाचा आपण अंगीकार करावा.

अक्षतैर्धवलैर्दिव्यैः सम्यक्-तिल-समन्वितैः ।
मृत्युंजय महादेव पूजयामि वृषध्वज ॥ १४ ॥

हे वृषभध्वजा शंकरा ! आपल्या ध्वजावर म्हणजे पताकेवर नंदीचें चिह्न असल्यामुळें आपणांस वृषभध्वज असें म्हणतात. हे महादेवा मृत्युंजया ! उत्तम शुभ्र तीळ ज्यामध्यें मिसळलेले आहेत अशा या सुंदर शुभ्र तांदळाच्या अक्षता मी आपल्याकरितां आणलेल्या आहेत. या अक्षतांनीं मी आपली पूजा करीत आहें. या अक्षतांचा आपण स्वीकार करावा.

चम्पक-पङ्कज-कुरबक-कुन्दैः करवीर-मल्लिका-कुसुमैः ।
विस्तारय निजमुकुटं मृत्युंजय पुण्डरीक-नयनाप्त ॥ १५ ॥

हे कमलनयना मृत्युंजया ! आपण 'आप्त' म्हणजे आमचे यथार्थ हितचिंतक आहांत. हे परमेश्वरा ! आपल्याकरितां मीं हीं अनेक प्रकारचीं फुलें आणलेलीं आहेत. यांत सोनचाफ्याचीं फुलें आहेत, कमळें आहेत, कोरांटीचीं फुलें आहेत, कुंदाचीं फुलें आहेत, कण्हेरीचीं फुलें आहेत. मोगरा, जाई, जुई इत्यादि अनेक प्रकारचीं फुलें आहेत. या फुलांनीं आपण आपल्या मुकुटाला विस्तृत करावें, शोभिवंत करावें. तात्पर्य, आपल्या मुकुटावर आपण हीं फुलें धारण करावींत, अशी माझी प्रार्थना आहे. या श्लोकांत मुकुट शब्दाच्या ऐवजीं 'मकुट' असाहि पाठभेद आढळतो. दोन्ही शब्दांचा अर्थ एकच आहे.

माणिक्य-पादुका-द्वन्द्वे मौनि-हृत्पद्म-मन्दिरे ।
पादौ सत्पद्म-सदृशौ मृत्युंजय निवेशय ॥ १६ ॥

हे मृत्युंजया ! आपल्याकरितां मी माणकें आणि इतर रत्नें ज्यांत जडविलेलीं आहेत अशा या दोन पादुका आणलेल्या आहेत. मुनिजनांचें अर्थात् ऋषिमुनींचें हृत्कमल हेंच त्यांचे 'मंदिर' म्हणजे निवासस्थान आहे. कमलाप्रमाणें अत्यंत कोमल आणि आरक्तवर्ण असलेले आपले चरणकमल आपण त्या पादुकांमध्यें ठेवावेत. मी भक्तिपूर्वक आणलेल्या या उत्तम पादुका आपण धारण कराव्यात. सातव्या श्लोकापासून सोळाव्या श्लोकापर्यंत मधुपर्क, पंचामृत, शुद्धोदक, मार्जन, वस्त्र, यज्ञोपवीत, गंध, अक्षता, पुष्प आणि पादुका असे हे दहा उपचार अर्पण केले गेले.

माणिक्य-केयूर-किरीट-हारैः काञ्ची-माणि-स्थापित-कुण्डलैश्च ।
मञ्जीर-मुख्याऽऽभरणैर्मनोज्ञैरङ्गानि मृत्युंजय भूषयामि ॥ १७ ॥

हे मृत्युंजया ! मी आपल्याकरितां माणकें बसविलेले केयूर म्हणजे बाहु-भूषणें, तसेंच रत्नजडित मुकुट आणि विविध रत्नांचे हार आणले आहेत. त्याचप्रमाणें रत्नजडित कंबरपट्टा आणि रत्नजडित कुंडलें आणि 'मंजीर' म्हणजे पैंजण वगैरे पायांतील अलंकारहि आणलेले आहेत. ते अत्यंत सुंदर आहेत. हे मृत्युंजया ! या सर्व अलंकारांनीं मी आपणांस भूषवीत आहें. आपल्या सर्व अंगावर मी अलंकार घालीत आहें. मीं आणलेल्या या अलंकारांचा आपण अंगीकार करावा.

गजवदन-स्कन्द-धृतेनातिस्वच्छेन चामर-युगेन ।
गलदलकानन-पद्मं मृत्युंजय भावयामि हृत्पद्मे ॥ १८ ॥

हे मृत्युंजया ! हीं दोन अत्यंत स्वच्छ शुभ्र असलेलीं चामरें—एक गजाननानें धारण केलेलें आहे आणि दुसरें 'स्कन्द' म्हणजे कार्तिकस्वामी यांनीं धारण केलेलें आहे. हे दोघेहि आपल्या मस्तकावर चवऱ्या ढाळीत असल्यामुळें आपल्या जटेंतील केस आपल्या मुखकमलावर विलसत आहेत. असें हें आपलें सुंदर मुखकमल मी माझ्या हृदयांत निरंतर चिंतीत आहें. तात्पर्य, हे मृत्युंजया ! मी आपणांस चामरें अर्पण केलेलीं आहेत. आपले दोन्ही चिरंजीव आपल्या मस्तकावर चामरें ढाळीत आहेत. आपल्या जटेंतील केसांचे अग्रभाग आपल्या मुखकमलावर हलत असलेले दिसत आहेत. असें हें आपलें सुंदर मुखकमल त्याचें मी आपल्या हृत्कमलांत निरंतर ध्यान करीत आहें.

मुक्तातपत्रं शशिकोटि-शुभ्रं शुभप्रदं काञ्चन-दण्ड-युक्तम् ।
माणिक्य-संस्थापित-हेमकुम्भं सुरेश मृत्युंजय तेऽर्पयामि ॥ १९ ॥

हे देवाधिदेवा मृत्युंजया ! आपल्याकरितां मी हें छत्र तयार करून आणलेलें आहें. हें मोत्यांचें छत्र कोट्यवधि चंद्रांच्या कांतीप्रमाणें अत्यंत शुभ्र आहे. चिंतन करणाऱ्या भक्तांचें तें कल्याण करणारें आहे. या छत्राला सोन्याचा दंड लावलेला आहे. रत्नजडित सोन्याचा कुंभ म्हणजे कळस त्याच्यावर बसविलेला आहे. हे परमेश्वरा ! अशा तऱ्हेचें सुंदर छत्र मी तुम्हांला अर्पण करीत आहें. त्याचा स्वीकार करावा.

मणि-मुकुरे निष्पटले त्रिजगद्गाढान्धकार-समाश्वे ।
कन्दर्प-कोटि-सदृशं मृत्युंजय पश्य वदनमात्मीयम् ॥ २० ॥

हे मृत्युंजया प्रभो ! हा पहा रत्नांचा आरसा. हा मी आपणांस समर्पण करीत आहें. हा 'निष्पटल' म्हणजे मलांचें धुळीचें आवरण नसलेला असा अत्यंत स्वच्छ आहे. जणुं कांहीं त्रैलोक्याच्या गाढ अंधकाराला नाहींसें करणारा हा 'समाश्व' म्हणजे सूर्यच आहे. कोट्यवधि मदनांची ज्याला कदाचित् उपमा देतां येईल असें आपलें मुखकमल आपण या आरशांत पहावें.

कर्पूर-चूर्णं कपिलाज्य-पूतं दास्यामि कालेय-समन्वितं च ।
समुद्भवं पावन-गन्ध-धूपितं मृत्युंजयाङ्गं परिकल्पयामि ॥२१॥

हे मृत्युंजया परमेश्वरा ! कपिला गाईच्या तुपानें माखलेलें कर्पूरचूर्ण आणि कृष्णागरु गुगुळ वगैरे सुगंधी द्रव्यांनीं तयार केलेला हा धूप आहे. या धूपांतून निर्माण होणाऱ्या पवित्र व सुगंधी धूमानें मी तुमच्या सर्वांगाला सुधूपित करीत आहें. तात्पर्य, मी आपणांस धूप अर्पण करीत आहें. आपण त्याचा स्वीकार करावा.

वर्तित्रयोपेतमखण्ड-दीप्त्या तमोहरं बाह्यमथान्तरं च ।
साज्यं समस्तामर-वर्ग-हृद्यं सुरेश मृत्युंजय वंशदीपम् ॥२२॥

हे मृत्युंजया देवाधिदेवा ! आपल्यासाठीं हा पहा मी दीप प्रज्वलित केला आहें. या दिव्यांत मी (त्रैगुण्याच्या) तीन वाती घातलेल्या आहेत. तो आपल्या अखंड प्रकाशानें अंतर्बाह्य तमाचें निरसन करीत आहे. अंतर्गत तम म्हणजे अज्ञान आणि बाह्य तम म्हणजे अंधकार. भक्तियुक्त अंतःकरणानें परमेश्वराकरितां प्रज्वलित केलेला दीप हा बाह्य तमाचें – अंधकाराचें – निरसन तर करतोच, पण त्याच्या योगानें भगवत्कृपेनें भक्तजनांच्या अंतर्गत तमाचा – अज्ञानाचाहि – निरास होतो. हे प्रभो ! या दिव्यांत मी 'आज्य' म्हणजे तूप घातलेलें आहें. सर्व देवगणाला आवडेल इतका तो दीप सुंदर आहे. हे परमेश्वरा ! हा माझा वंशदीप – वंशस्तंभावर स्थापन केलेला दीप – आपण स्वीकारावा. याप्रमाणें सतराव्या श्लोकापासून बाविसाव्या श्लोकापर्यंत क्रमशः अलंकार, चामर, छत्र, आदर्श, धूप आणि दीप असे हे सहा उपचार झाले. आतां नैवेद्य समर्पण केला जात आहे.

राजान्नं मधुरान्वितं च मृदुलं माणिक्य-पात्रे स्थितं
हिङ्गू-जीरक-सन्मरीच-मिलितैः शाकैरनेकैः शुभैः ।
शाकं सम्यगपूप-सूप-सहितं सद्योघृतेनाप्लुतं
श्रीमृत्युंजय पार्वतीप्रिय विभो सापोशनं भुज्यताम् ॥ २३ ॥

हे परमेश्वरा पार्वतीप्रिया प्रभो ! हा मी आपल्याकरितां नैवेद्य तयार केला आहे. हा नैवेद्य रत्नखचित सोन्याच्या ताटांत वाढलेला आहे. रायभोग आणि आंबेमोहोर तांदळांचा अगदीं मऊ सुंदर भात आहे. त्यावर गोड वरण वातलेलें आहे. हिंग, जिरें, सैंधव आणि मिरीं वगैरे वालून तयार केलेल्या अनेक प्रकारच्या उत्तम भाज्या आहेत. पातळ भाजी, आमटी वगैरे वाढलेलें आहे. तोंडी लावण्याकरितां उत्तम कोशिंबिरी आहेत, पुऱ्या आहेत, वडे आहेत. भातावर ताजें साजूक तूप वाढलेलें आहे. हे श्रीमृत्युंजया ! हें आपोशन घ्या आणि नैवेद्य सेवन करा.

कूष्माण्ड-वार्ताक-पटोलिकानां फलानि रम्याणि च कारवल्ल्याः ।
सुपाक-युक्तानि ससौरभाणि श्रीकण्ठ मृत्युंजय भक्षयेश ॥ २४ ॥

कोहाळें, वांगीं, पडवळ, कारलीं इत्यादि सुंदर फळें आणून त्यांच्या उत्तम भाज्या केलेल्या आहेत. त्यांत सुगंधी मसाला वातलेला आहे. हे श्रीकंठा, नीलकंठा, महादेवा, मृत्युंजया ! आपण या भाज्या सेवन करा.

शीतलं मधुरं स्वच्छं पावनं वासितं लघु ।
मध्ये स्वीकुरु पानीयं शिव मृत्युंजय प्रभो ॥ २५ ॥

हे सदाशिवा, मृत्युंजया प्रभो ! हें मधुर, शीतल आणि स्वच्छ जल अत्यंत पवित्र आहे. तें वाळा आणि फुलें वालून सुवासिक केलेलें आहे. 'लघु' म्हणजे पचनाला हलकें आहे. आपण जेवणामध्यें त्याचा स्वीकार करावा. नैवेद्य दाखवीत असतांना 'मध्ये पानीयं समर्पयामि' असें म्हणून हा उपचार अर्पण केला जात असतो. आपण जेवणामध्यें जसें पाणी पीत असतों त्याच प्रमाणें तें " यथादेहे तथा देवे " या न्यायानें देवालाहि नैवेद्याच्या मध्यें अर्पण करावयाचें असतें.

शर्करा-मिलितं स्निग्धं दुग्धान्नं गोघृतान्वितम् ।
कदलीफल-सम्मिश्रं भुज्यतां मृत्युसंहर ॥ २६ ॥

भगवान् शंकर हे अकालमृत्यूचा संहार करतात म्हणून त्यांना 'मृत्यु-संहर' असें म्हटलेलें आहे. हे मृत्युंजया प्रभो ! हें अत्यंत स्निग्ध, साखर मिसळलेलें आणि गाईचें तूप घातलेलें दुधाचें पक्कान्न – केळांचें शिकरण तयार केलेलें आहे. आपण तें सेवन करावें.

केवलमतिमाधुर्यं दुग्धैः स्निग्धैश्च शर्करामिलितैः ।
एला-मरीच-मिलितं मृत्युंजय देव भुङ्क्ष्व परमान्नम् ॥ २७ ॥

हे मृत्युंजया ! केवळ अत्यंत माधुर्ययुक्त साय न काढलेल्या आणि साखर मिसळलेल्या दुधानें तयार केलेलें पक्कान्न – बासुंदी अथवा 'परमान्न' म्हणजे पायस, तांदूळ घालून तयार केलेली दुधाची खीर; त्याच्यांत वेलदोडे आणि मिरी वगैरे सुगंधी आणि रुचकर द्रव्यें घातलेलीं आहेत. हे देवा ! आपण तें सेवन करावें.

रम्भा-चूत-कपित्थ-कण्टकफलैर्द्राक्षारस-स्वादुभि-
स्त्वर्जूरैर्मधुरेक्षु-खण्ड-शकलैः सन्नारिकेलाम्बुभिः ।
कर्पूरेण सुवासितैर्गुडजलैर्माधुर्य-युक्तैर्विभो
श्रीमृत्युंजय पूरय त्रिभुवनाधारं विशालोदरम् ॥ २८ ॥

हे श्रीमृत्युंजया परमेश्वरा ! केळीं, आंबे, कवठें आणि फणस; तसेंच द्राक्षें आणि द्राक्षांचा रस, त्याचप्रमाणें गोड गोड खजूर आणि उंसाच्या कांडांच्या गंडेऱ्या, त्याचप्रमाणें उत्तम नारळाचें पाणी आणि कापूर घालून सुवासिक केलेलें गुळासाखरेचें गोड सरबत; हें सर्व मी आपल्याकरितां नैवेद्यांत ठेवलेलें आहे. आपण आपलें त्रैलोक्याचें आधारभूत असलेलें विशाल उदर या सर्व पदार्थांनीं पूर्ण करावें.

ज्याचें उदर त्रिभुवनाचा आधार आहे आणि जो स्वयं विश्वंभर आहे त्याची या नैवेद्यांतील परिमित पदार्थांनीं तृप्ति कशी व्हावयाची ? तथापि, आचार्य प्रार्थना करीत आहेत त्यांतील अभिप्राय एवढाच कीं, जरी या नैवेद्यांतील पदार्थ परिमित असले तरी त्यांना अनन्यभक्तीचें अधिष्ठान आहे. त्या भक्तीमुळेंच ते विश्वंभराच्या विशाल उदरालाहि तृप्त करूं शकतील असा विश्वास या कल्पनेच्या सुळाशीं आहे. आपल्या भक्तांनीं भक्तिपूर्वक अर्पण केलेले पदार्थ थोडे असले तरी ते परमेश्वराला तृप्त व संतुष्ट करतात. भक्तीवांचून कितीहि

अर्पण केलें तरी त्यांत परमेश्वराला संतोष नाहीं. श्रीमद्भागवतांत स्वतः श्रीकृष्णानेंच म्हटलें आहे – " अण्वप्युपाहृतं भक्तैः प्रेम्णा भूर्येव मे भवेत् । भूर्यप्यभक्तोपहृतं न मे तोषाय कल्पते ॥ "

मनोज्ञ-रम्भा-वन-खण्ड-खण्डितान्रुचि-प्रदान् सर्षप-जीरकांश्च ।
ससौरभान् सैन्धव-सेवितांश्च गृहाण मृत्युंजय लोकवन्द्य ॥२९॥

अत्यंत सुंदर अशा केळींच्या बनांतून हीं केळखंडें आणलेलीं आहेत. तीं चिरून त्यांचें हें उत्तम तोंडीलावणें केलेलें आहे. तें मोठें रुचकर आहे. त्याच्यावर मोहऱ्या, जिरे वगैरे सर्व कांहीं घातलेलें आहे. वेलदोड्यांची पूड आणि सैंधव-चूर्ण घालून तें सुगंधी आणि रुचकर केलेलें आहे. हे लोकवंद्या परमेश्वरा ! माझ्या या सर्व उपचारांचा आपण स्वीकार करावा.

हिङ्गु-जीरक-सहितं विमलामलकं कपित्थमतिमधुरम् ।
बिस-खण्डाढ्यवण-युतान् मृत्युंजय तेऽर्पयामि जगदीश ॥ ३० ॥

हिंग आणि जिरेपूड ज्याच्यामध्यें घातलेली आहे असें हें निर्मळ आंवळ्यांचें रायतें आणि पिकलेल्या व अत्यंत मधुर असलेल्या कवठांची चटणीहि पण मी आपल्यापुढें ठेवलेली आहे. त्याचप्रमाणें बारीक सैंधव लावून चवदार केलेलें हे कमलकंदांचे कापहि, हे मृत्युंजया जगदीश्वरा ! मी तुम्हांला अर्पण करीत आहें.

एला-शुण्ठी-सहितं दध्यन्नं चारु हेम-पात्रस्थम् ।
अमृत-प्रतिनिधिमाढ्यं मृत्युंजय भुज्यतां त्रिलोकेश ॥ ३१ ॥

हे त्रैलोक्याधिपते मृत्युंजया ! वेलदोडे आणि सुंठ (तसेंच जिरे, मिरीं आणि सैंधव) यांची पूड घालून सोन्याच्या ताटांत कालविलेला हा दहींभात मीं आपणांस अर्पण केला आहे. हा अगदीं अमृताचा प्रतिनिधि म्हणजे अमृतासारखा गोड आणि 'आढ्य' म्हणजे रुचिकर आहे. आपण हा दहिभात सेवन करावा.

जम्बीर-नीराञ्चित-शृङ्गवेरं मनोहरानम्ल-शलाटु-खण्डान् ।
मृदूपदंशान् सहसोपभुङ्क्ष्व मृत्युंजय श्रीकरुणासमुद्र ॥ ३२ ॥

हे करुणासागरा श्रीमृत्युंजया ! ज्याच्यावर लिंबू पिळलेलें आहे असें हें किसलेलें आलें त्याचप्रमाणें रुचकर आंबट फळांच्या फोडी आणि वेलफळांतील

मगजाचे तुकडे, मृदु म्हणजे मऊ मऊ जिभेस न झोंबणाऱ्या अशा या चटण्या आपण निःसंशय सेवन कराव्यात.

नागर-रामठ-युक्तं सुललित-जंबीर-नीर-सम्पूर्णम् ।
मंथितं सैन्धव-सहितं पिब हर मृत्युंजय क्रतुध्वंसिन् ॥ ३३ ॥

सुंठ (सिरे, मिरी) आणि हिंग घातलेलें लिंबाच्या रसाचें हें अत्यंत सुंदर पेय आहे. यांत चवीकरितां सेंधेलोण घातलेलें असून त्याचें उत्तम आलोडन केलेलें आहे म्हणजे घुसळून तयार केलेलें आहे. उत्तम मिश्रण केलेलें आहे. हे हरा ! क्रतुध्वंसी मृत्युंजया ! हें आपण प्यावें. शंकरांनीं दक्षयज्ञाचा विध्वंस केलेला असल्यामुळें त्यांना क्रतुध्वंसी असें नांव पडलें आहे.

मन्दार-हेमाम्बुज-गन्ध-पुष्पैर्मन्दाकिनी-निर्मल-पुण्य-तोयैः ।
गृहाण मृत्युंजय पूर्णकाम श्रीमत्वरापोशनमभ्रकेश ॥ ३४ ॥

हे परमेश्वरा ! आकाशांतील काळे ढग हेच तुमचे केस असल्यामुळे अथवा काळ्या ढगाप्रमाणें तुमचे केस काळे असल्यामुळें तुम्हांला 'अभ्रकेश' असें म्हटलें आहे. कल्पवृक्षाचीं फुलें, सुगंधी सुवर्णकमळें, तसेंच जाई, जुई, मोगरा इत्यादि सुगंधी फुलें घालून सुवासिक केलेलें हें मंदाकिनी गंगेचें निर्मल आणि पवित्र जल आपणांस आपोशन घेण्याकरितां आणलेलें आहे. हे मृत्युंजया ! आपण श्रीमंतांचे श्रीमंत आहां, सर्व श्रीमंतांपेक्षां श्रेष्ठ आहां. आपण पूर्णकाम आहां. आपलें सर्व वैभव आणि तृप्ति सहजच सिद्ध असल्यामुळें आपणांस 'आप्तकाम', 'पूर्णकाम' असें म्हटलेलें आहे. हे प्रभो ! आपण हें जल आपोशनाकरितां घ्यावें. तेविसाव्या श्लोकापासून चौतिसाव्या श्लोकापर्यंत बारा श्लोकांनीं आपोशनासह नैवेद्याचे बारा उपचार समर्पण केलेले आहेत. एकंदर प्रत्येक श्लोकानें एक-एक याप्रमाणें असे हे चौतीस उपचार झाले.

गगन-धुनी-विमल-जलैर्मृत्युंजय पद्मराग-पात्र-गतैः ।
मृगमद-चन्दन-पूर्णं प्रक्षालय चारु हस्तपद-युग्मम् ॥ ३५ ॥

हे मृत्युंजया ! पद्मराग रत्नांच्या कलशांतून हें आकाशगंगेचें निर्मल जल आपणांस हात धुण्याकरितां व पाय धुण्याकरितां आणलेलें आहे. याच्यांत कस्तूरी आणि चंदन घातलेलें आहे. हे परमेश्वरा ! आपण या जलानें 'चारु' म्हणजे चांगल्या प्रकारें हात आणि पाय धुवावेत.

पुन्नाग-मल्लिका-कुन्द-वासितैर्जाह्नवी-जलैः ।
मृत्युंजय महादेव पुनराचमनं कुरु ॥ ३६ ॥

हे मृत्युंजया महादेवा ! हातपाय धुऊन झाल्यानंतर पुन्हां आचमन करण्याकरितां मी हें गंगाजल आपणांसाठीं आणलेलें आहे. याच्यामध्यें चाफा, मोगरा, कुंद इत्यादि सुगंधी फुलें घालून हें सुवासिक केलेलें आहे. या जलानें आपण पुन्हां आचमन करावें.

चौक्तिक-चूर्ण-समेतैर्मृगमद-घनसार-वासितैः पूगैः ।
पर्णैः स्वर्णसमानैर्मृत्युंजय तेऽर्पयामि ताम्बूलम् ॥ ३७ ॥

हे मृत्युंजया ! हा आपणांकरितां मी तांबूल म्हणजे विडा तयार केलेला आहे. याच्यांतील नागवेलीचीं पानें अगदीं सोन्यासारखीं पिवळींजर्द, अत्यंत उत्तम पिकलेलीं आहेत. त्यांना मोत्यांचा चुना लावलेला आहे. त्यांत बारीक सुपारी घातलेली आहे. सुपारीच्या चूर्णाला कस्तूरी आणि कापूर लावून तें 'वासित' म्हणजे सुगंधित केलेलें आहे. (केवड्याच्या भावना दिलेल्या कातगोळ्या, लवंग, वेलदोडा, जायफळ, जायपत्री, कंकोळ, बडीशेप, खोबरें इत्यादि सर्व कांहीं त्यांत घातलेलें आहे). असा हा पूगीफलसहित तांबूल मी आपणांस अर्पण करीत आहें. या तांबूलाचा आपण स्वीकार करावा.

नीराजनं निर्मल-दीप्तिमद्भिर्दीपाङ्कुरैरुज्वलमुच्छ्रितैश्च ।
घण्टा-निनादेन समर्पयामि मृत्युंजयाय त्रिपुरान्तकाय ॥ ३८ ॥

हे त्रिपुरासुरविनाशका मृत्युंजया ! मी आपणांस घंटानिनादासहित या नीराजन-दीपाचा उपचार समर्पण करीत आहें. या नीराजनामध्यें उत्कृष्ट प्रकाश देणाऱ्या अनेक निर्मल दीपज्योति पाजळलेल्या आहेत. त्या उंच उंच उठणाऱ्या दीपज्योतींनीं हें नीरांजन अत्यंत उज्ज्वल दिसत आहे. हे परमेश्वरा ! हा नीरांजन-दीपविधि मी आपणांस समर्पण करीत आहें. आपण या नीराजन-दीपांचा म्हणजे ओवाळणें – आरति करणें या उपचाराचा स्वीकार करावा.

विरिञ्चि-मुख्यामर-वृन्द-वन्दिते सरोज-मत्स्याङ्कित-चक्र-चिह्निते ।
ददामि मृत्युंजय पादपङ्कजे फणीन्द्र-भूषे पुनरर्घ्यमीश्वर ॥ ३९ ॥

हे मृत्युंजया ! ब्रह्मदेव ज्यांच्यामध्यें मुख्य आहेत अशा सर्व देवांच्या समुदायानें ज्यांना भक्तिभावानें वंदन केलेलें आहे असे हे आपले चरणकमल आहेत. आपल्या चरणकमलांच्या ठिकाणीं वैभवाची, ऐश्वर्याची व सर्वश्रेष्ठत्वाची सूचक अशीं सुचिह्नें कमल आणि मत्स्य यांच्यासह चक्र; तसेंच वज्र, अंकुश, ध्वज आणि छत्र इत्यादि चिह्नें विराजमान आहेत. वर निर्दिष्ट केलेल्या सर्व सुचिह्नांनीं चिह्नित असलेल्या व सर्प ज्यांच्या ठिकाणीं अलंकाराप्रमाणें शोभत आहेत अशा आपल्या चरणारविंदीं मी पुन्हां अर्घ्य अर्पण करीत आहें.

पुन्नाग-नीलोत्पल-कुन्द-जाजी-मन्दार-मल्ली-करवीर-पङ्कजैः ।
पुष्पाञ्जलिं बिल्वदलैस्तुलस्या मृत्युंजयाङ्घ्रौ विनिवेशयामि ॥ ४० ॥

सोनचाफा, नीलकमल, कुंद, जाई, पारिजातक, मोगरा, कण्हेर आणि इतर कमळें वगैरे फुलें, तसेंच बिल्वदलें आणि तुलसीदलें या सर्वांनीं परिपूर्ण असलेली ही पुष्पांजलि, हे मृत्युंजया, अत्यंत आदरानें मी आपल्या चरणीं वहात आहें. मीं अर्पण केलेल्या या पुष्पांजलीचा आपण स्वीकार करावा अशी माझी नम्र प्रार्थना आहे.

पदे पदे सर्व-तमो-निकृन्तनं पदे पदे सर्व-शुभ-प्रदायकम् ।
प्रदक्षिणं भक्तियुतेन चेतसा करोमि मृत्युंजय रक्ष रक्ष माम् ॥४१॥

हे मृत्युंजया ! मी तुम्हांला प्रदक्षिणा घालीत आहें. अनन्यभक्तीनें प्रदक्षिणा करीत असतांना प्रत्येक पावला-पावलाला सर्व अज्ञानाचें निरसन होत असतें. प्रदक्षिणेंतील पावलेंहि अज्ञानाचें निरसन करणारीं आहेत व भक्तियुक्त अन्तःकरणानें केला जाणारा प्रदक्षिणा-विधि हाहि प्रत्येक पावला-पावलाला सर्व प्रकारचें शुभ देणारा आणि कल्याण करणारा आहे. हे परमेश्वरा ! मी आपणांस प्रदक्षिणा घालीत आहें. आपण माझें रक्षण करा. आपण माझें रक्षण करा.

नमो गौरीशाय स्फटिक-धवलाङ्गाय च नमो
नमो लोकेशाय स्तुत-विबुध-लोकाय च नमः ।
नमः श्रीकण्ठाय क्षपित-पुरदैत्याय च नमो
नमः कालाक्षाय स्मर-मद-विनाशाय च नमः ॥ ४२ ॥

हे गौरीशा पार्वतीरमणा ! तुम्हांला माझा नमस्कार असो. आपला देह –
ी अंगकांति स्फटिकमण्याप्रमाणें अत्यंत शुभ्र, स्वच्छ आहे. आपणांस मी
कार करीत आहें. आपण सर्व लोकांचे, त्रैलोक्याचे, चतुर्दश भुवनांचे अधिपति
ां. आपणांस मी नमस्कार करतों. देवलोकीं सर्व देवांनीं आपली मुक्तकंठानें
ा केलेली आहे. आपणांस माझा नमस्कार असो. हे प्रभो, आपण श्रीकंठ
ां. श्री शब्दाचा अर्थ 'विष' असा आहे. 'शृ विशरणे' शृ धातूचा अर्थ
ार्ण करणें – नाश करणें असा आहे. विष हें सर्व देहाला विशीर्ण करतें.
चा नाश करतें म्हणून त्याला 'श्री' असें म्हणतात. तात्पर्य, श्री म्हणजे विष.
म्ही आपल्या कंठामध्यें भूषणाप्रमाणें धारण केलें आहे, म्हणून आपणांस
कंठ' असें म्हणतात. अथवा "श्रिया युक्तः कण्ठः यस्य सः श्रीकण्ठः।" विष
तांना दूषित करणारें असलें तरी आपल्या कंठाला त्यानें भूषित केलेलें आहे.
ल्या कंठाला एक प्रकारें, आपण लोककल्याणाकरितां प्राशन केलेल्या विषानें
ा आगळी आहे, म्हणून आपणांस श्रीकंठ असें म्हणतात. आपणांस माझा
स्कार असो.

हे मृत्युंजया शंकरा ! आपण जगाच्या कल्याणाकरितां त्रिपुर दैत्याचा
। केला आहे. आपणांस मी नमस्कार करतों. आपल्या भालप्रदेशीं तृतीय नेत्र
हे म्हणून आपणांस 'फालाक्ष' म्हटलें आहे. आपणांस माझा नमस्कार असो.
ापण आपल्या सामर्थ्यानें त्रैलोक्याचें दमन करणाऱ्या मदनालाहि जिंकून त्याच्या
ीचा व त्याचाहि पण नाश केला आहे. आपणांस मी नमस्कार करीत आहें.
झ्या या नमस्कारविधीचा आपण स्वीकार करावा. आपण माझा प्रणाम घ्यावा.

संसारे जनि-ताप-रोग-सहिते ताप-त्रयाक्रन्दिते
नित्यं पुत्र-कलत्र-वित्त-विलसत्पाशैर्निबद्धं दृढम् ।
गर्वान्धं बहु-पाप-वर्ग-सहितं कारुण्य-दृष्ट्या विभो
श्रीमृत्युंजय पार्वतीप्रिय सदा मां पाहि सर्वेश्वर ॥ ४३ ॥

हे पार्वतीप्रिया मृत्युंजया जगदीशा ! हा संसार सर्व दुःखांनीं व्यापलेला
आहे. जन्म, ताप, रोग, जरा, मृत्यु इत्यादिकांनीं युक्त असलेल्या या संसारांत
जेकडे तिकडे तापत्रयानें म्हणजे आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक
अशा त्रिविध प्रकारच्या दुःखांनीं गांजलेल्या लोकांचीं आक्रंदनें – शोक, दुःखानें

व्याकुळ झालेल्या लोकांचें ओरडणें हेंच कानावर येत आहे. या संसारांत हा जीव नेहमींच पुत्र, मित्र, कलत्र, वित्त, वैभव इत्यादि रूपानें – मोहक रूपानें विराजमान असलेल्या विविध पाशांनीं अगदी दृढबद्ध झालेला आहे. हे परमेश्वरा ! गर्वानें अंध झालेल्या आणि पुष्कळ पापसमूहानें घेरलेल्या या जीवाला – मला कृपापूर्ण दृष्टीनें सदासर्वकाळ पहा आणि माझें रक्षण:करा. आपण सर्वेश्वर आहां. या माझ्या प्रार्थनेचा अंगीकार करा.

मौधे रत्नमये नवोत्पल-दलाकीर्णे च तल्पान्तरे
कौशेयेन मनोहरेण धवलेनाच्छादिते सर्वशः ।
कर्पूराञ्चित-दीप-दीप्ति-मिलिते रम्योपधान-द्वये
पार्वत्या कर-पद्म-लालितपदं मृत्युंजयं भावये ॥ ४४ ॥

हे मृत्युंजया विश्वेश्वरा ! रत्नजडित अशा या भव्य मंदिरामध्यें, जिच्या भोंवतालीं ताजीं ताजीं कमलदलें पसरलेलीं आहेत अशी अत्यंत सुंदर मृदु शय्या मीं आपणाकरितां घातलेली आहे. त्या शय्येवर अत्यंत मनोहर आणि शुभ्र असें रेशमी वस्त्र सर्व बाजूंनीं आच्छादिलेलें आहे. कर्पूरमिश्रित दीपप्रभा त्या शय्येवर फांकलेली आहे. अत्यंत रम्य उशा आणि गिरद्या यांनीं युक्त असलेल्या या शय्येवर आपण पहुडलेले आहांत. जगज्जननी देवी पार्वती आपल्या कर-कमलानें तुमच्या चरणकमलांची संवाहन-संमर्दन इत्यादि स्वरूपानें सेवा करीत आहे. हे प्रभो, असें हें आपलें शयनमंदिरांत विश्रांति घेत असलेलें रम्य ध्यान मी आपल्या हृदयांत सतत चिंतीत आहें. तात्पर्य, मी आपणांस 'शयन' उपचार समर्पण करीत आहें. आपण त्याचा अंगीकार करून सुखानें विश्रांति घ्यावी.

पस्तिसाव्या श्लोकापासून चव्वेचाळिसाव्या श्लोकापर्यंत क्रमशः हस्तमुख-पाद-प्रक्षालन, पुनराचमन, तांबूल, उत्तरनीराजनदीप, म्हणजे आरति, पाद्यार्घ्य, मंत्रपुष्पांजलि, प्रदक्षिणा, नमस्कार, प्रार्थना आणि शयन असे दहा उपचार अर्पण केलेले आहेत. यांतच भक्तजनांनीं नृत्य, वाद्य आणि गीत यांचीहि कल्पना करावी.

चतुश्चत्वारिंशदिति सदुपचारैरभिमतै-
र्मनःपद्मे भक्त्या बहिरपि च पूजां शुभकरीम् ।

करोति प्रत्यूषे निशि दिवसमध्येऽपि च पुमान्
प्रयाति श्रीमृत्युंजय-पदमनेकाद्भुत-पदम् ॥ ४५ ॥

शास्त्रांना संमत असलेले हे चव्वेचाळीस श्लोकांनीं सांगितलेले सुंदर असे चव्वेचाळीस पूजोपचार आहेत. या उपचारांनीं भक्तिपूर्वक आपल्या हृदयामध्यें जो कोणी अन्तःपूजा अर्थात् मानसिक पूजा करील आणि यावच्छक्य बाह्योपचारांनींहि पूजा करील त्याची ती पूजा मंगलकारक होईल. ती त्याचें कल्याण करील. जो मनुष्य प्रातःकाळीं, संध्याकाळीं म्हणजे प्रदोषसमयीं आणि मध्याह्नकाळीं अशा या तिन्ही वेळेला भक्तियुक्त अंतःकरणानें पूजा करील, तो श्रीमृत्युंजयाच्या कृपेनें मृत्युंजयपदाला प्राप्त होईल. हें मृत्युंजयपद अनेक आश्चर्यांचें – अनिर्वचनीय आनंदाचें स्थान आहे. अशी ही मृत्युंजयाच्या पूजेची फलश्रुति आहे.

प्रातर्लिङ्गमुमापतेरहरहः संदर्शनात्स्वर्गदं
मध्याह्ने हयमेध-तुल्य-फलदं सायंतने मोक्षदम् ।
भानोरस्तमये प्रदोष-समये पञ्चाक्षराराधनं
तत्काल-त्रय-तुल्यमिष्ट-फलदं सद्योऽनवद्यं दृढम् ॥ ४६ ॥

आचार्य या श्लोकानें शिवदर्शनाचा महिमा वर्णन करीत आहेत. उमापति भगवान् सदाशिव यांचें अर्थात् शिवलिंगाचें रोजच्या रोज प्रातःकाळीं जो कोणी भक्तियुक्त अंतःकरणानें दर्शन घेईल त्याला शिवदर्शनानें स्वर्गसुखाचा लाभ होईल. त्याला स्वर्गलोकाची प्राप्ति होईल. मध्याह्नकाळीं जो दर्शन घेईल त्याला अश्वमेध यज्ञाचें फळ मिळेल. संध्याकाळीं शंकराचें दर्शन घेतलें असतां मोक्षसुखाचा लाभ होईल. सूर्यास्ताच्या वेळीं – प्रदोषकाळीं शिवपंचाक्षरी मंत्राचा जप करून जो कोणी शंकराची आराधना करील त्याला वर निर्दिष्ट केलेल्या तिन्ही काळच्या शिवदर्शनाच्या फळासारखें फळ मिळेल. या स्तोत्रांतील प्रत्येक श्लोकाच्या अर्थाकडे लक्ष देऊन हे श्रीमृत्युंजय-मानसपूजा-स्तोत्र म्हणणें ही शंकराची पूजा – समाराधनाच होय. ही मानसपूजा लोकमान्य व शास्त्रमान्य आहे. ती तत्काळ निश्चित इष्ट व उत्तम फल देणारी आहे.

श्रीमृत्युंजयमन्त्रजपविधि

पूर्वी सांगितलेल्या पद्धतीप्रमाणें आसनावर बसून आचमन आणि प्राणायाम करून संकल्प करावा. अमुकगोत्रः अमुकशर्माऽहं मम आत्मनः अमुकरोग

परिहारद्वारा श्रीमृत्युंजयदेवताप्रीत्यर्थं श्रीमृत्युंजयमन्त्रजपाख्यं कर्म करिष्ये। अस्य श्रीमृत्युंजयमन्त्रस्य वसिष्ठऋषिः अनुष्टुप्छन्दः श्रीमृत्युंजयसदाशिवो देवता मम अभीष्टसिद्धिद्वारा श्रीमृत्युंजयप्रीत्यर्थे जपे विनियोगः। ॐ वसिष्ठर्षये नमः शिरसि। ॐ अनुष्टुप्छन्दसे नमः मुखे। ॐ श्रीमृत्युंजयदेवतायै नमः हृदये। ॐ हौं बीजाय नमः गुह्ये। ॐ जूं शक्तये नमः पादयोः। ॐ सः कीलकाय नमः सर्वाङ्गेषु। ॐ त्र्यम्बकं अङ्गुष्ठाभ्यां नमः। ॐ यजामहे तर्जनीभ्यां नमः। ॐ सुगन्धिं पुष्टिवर्धनं मध्यमाभ्यां नमः। ॐ उर्वारुकमिव बन्धनात् अनामिकाभ्यां नमः। ॐ मृत्योर्मुक्षीय कनिष्ठिकाभ्यां नमः। ॐ मामृतात् करतलकरपृष्ठाभ्यां नमः। ॐ त्र्यम्बकं हृदयाय नमः। ॐ यजामहे शिरसे स्वाहा। ॐ सुगन्धं पुष्टिवर्धनम् शिखायै वषट्। ॐ उर्वारुकमिव बन्धनात् कवचाय हुं। ॐ मृत्योर्मुक्षीय नेत्रत्रयाय वौषट्। ॐ मामृतात् अस्त्राय फट्। अथ ध्यानम् –

चन्द्रोद्भासित्मूर्धजं सुरपतिं पीयूषपात्रद्वयं हस्ताभ्यां दधतं सुदिव्य-
ममलं हास्यास्यपङ्केरुहम्। सूर्येन्द्वग्निविलोकनं करतलैः पाशाक्षसूत्रा-
ङ्कुशाम्भोजं बिभ्रतमक्षयं पशुपतिं मृत्युंजयं तं स्मरे॥

या श्लोकानें ध्यान करावें. अथवा या स्तोत्रांतील पहिल्या श्लोकानेंहि ध्यान करावें. नंतर "श्रीमृत्युंजयाय नमः लं पृथिव्यात्मकं गन्धं परिकल्पयामि" या प्रकारें पंचोपचार मानस पूजा करावी. माळेची प्रार्थना करून मंत्राचा जप करावा. मंत्र गुरुमुखानेंच घेतलेला असावा. "ॐ हौं जूं सः ॐ भूर्भुवः स्वः ॐ त्र्यम्बकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम्। उर्वारुकमिव बन्धनान्मृत्योर्मुक्षीय माऽमृतात्" असा मृत्युंजयाचा वैदिक मंत्र आहे. ज्यांना या मंत्राचा अधिकार नाहीं त्यांनीं "मृत्युंजय महारुद्र त्राहि मां शरणागतम्। जन्म-मृत्यु-जरा-रोगैः पीडितं कर्म-बन्धनैः" या मंत्राचा जप करावा. वरील मंत्राच्या जपाचें फळ याहि मंत्राच्या जपानें मिळतें. फलप्राप्ति श्रद्धेच्या अधीन असते. नंतर पूर्वोक्त पद्धतीनें जप-निवेदन करून देवाला नमस्कार करावा.

■ ■ ■

शिवानन्दलहरी ।

[आचार्यांचें श्रीशिवानन्दलहरी स्तोत्र हें एक अद्वितीय स्तोत्र आहे. साहित्यशास्त्राच्या दृष्टीनें तें एक अद्वितीय काव्यहि आहे. भक्ति, ज्ञान, वैराग्य आणि अनन्यशरणागति या सर्वांचें अत्यंत उत्कटपणें प्रत्यक्ष दर्शन आपणांस या शिवानंदलहरींत घडेल. आपण भगवान् श्रीसदाशिव यांच्याकडे फारच स्थूल दृष्टीनें पहातों. कंबरेभोंवतीं गुंडाळलेलें व्याघ्रांबर, हातीं धारण केलेला डमरू आणि त्रिशूळ, मस्तकावरील जटाजूट आणि त्यांत विराजमान असलेली गंगा, सर्वांगीं चिताभस्माचें लेपन, गळ्यांत रुद्राक्षांच्या माळा, अंगावर सर्पांचीं वेटोळीं, जवळ पांढरा शुभ्र बैल आणि भूत, प्रेत, पिशाच यांच्यासह स्मशानांत भटकणें, अशा या परिच्छिन्न परिमित रूपानेंच आपल्याला शिवदर्शन घडतें. तत्त्वतः शिवस्वरूप अत्यंत निराळें आहे. वर वर्णन केलेलें शंकराचें स्वरूप हें त्या तात्त्विक शिवतत्त्वाचें एक अत्यंत स्थूल रूप होय. तात्त्विक शिवस्वरूप हें त्याच्याहून पलीकडे आहे. तें परमसूक्ष्म आहे, तें सर्व विश्वाचें मूळ अधिष्ठान आहे, तें आनंदमय आहे. त्याच निर्गुणनिराकार, निर्विकार, आनंदमय शिवतत्त्वाची या स्तोत्रानें आचार्य स्तुति करीत आहेत.

वस्तुतः निर्गुणाची स्तुति काय करणार ? जेथें शब्दांचा प्रवेश नाहीं त्याचें वर्णन काय करणार ? " यत्र वेदा अवेदा भवन्ति " मूलभूत शिवतत्त्वाचें प्रतिपादन करावयास प्रवृत्त झालेले वेद जसे जसे त्या शिवस्वरूपाच्या जवळ जातात तसे तसे ते स्वतःच्या वेदपणाला विसरून शिवस्वरूपच होतात ! तेहि ब्रह्मरूप होतात. तेथें प्रतिपाद्य-प्रतिपादकभाव कांहीं न उरल्यामुळें वेदवाणी मौन धारण करून बसते. तेथें कोणीं कोणाचें वर्णन करावयाचें व काय वर्णन करावयाचें अशी अवस्था होऊन बसते ! तैत्तिरीयोपनिषदांतहि " यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह " शिवतत्त्वाचें साकल्यानें आकलन होत नसल्यामुळें मनासह वाणी तेथून परावृत्त होते असें म्हटलेलें आहे. अशा स्थितींतहि आचार्य त्या शिवतत्त्वाचें स्तवन करावयास प्रवृत्त झालेले आहेत. अर्थात् निर्गुणाचे गुण वर्णन करतांना त्याच्या सगुण स्वरूपाचाच अंगीकार करावा लागतो. निर्गुण स्वरूपाचा साक्षात्कार करून घेण्याचें सगुण स्वरूप हें एक द्वारच आहे. सगुण स्वरूपाच्या द्वाराच परमेश्वराच्या निर्गुण स्वरूपाचें दर्शन घडत असतें.

स्थूलांतूनच सूक्ष्माचें अवलोकन करावयाचें असतें. अरुंधतीचा तारा किंवा शुक्र प्रतिपदेचा चंद्र पहावयाचा झाल्यास प्रथम त्या दिशेकडे असलेल्या वृक्षाची स्थूल शाखाच पहावयाची असते. त्याच न्यायानें परम सूक्ष्म शिवतत्त्वाचा साक्षात्कार करून घ्यावयाचा असेल तर त्याकरितां आपल्याला स्थूल सगुण शिवस्वरूपाची उपासना करणें, भगवान् श्रीशंकर यांना शरण जाणें हें आवश्यक आहे.

परमेश्वराच्या सगुण स्वरूपीं मन रमलें तरी देखील तें धन्य होतें, त्यांतहि त्याला अद्वितीय आनंदाचा अनुभव येतो, तर मग तें जेव्हां परम सूक्ष्म शिवतत्त्वाशीं जाऊन मिळेल, त्या अनिर्वचनीय आनंदरूप शिवतत्त्वाशीं जेव्हां तें समरस होईल, तेव्हां त्याला किती आनंद वाटेल हें काय सांगावें ! याकरितां साधकानें आपल्या उपास्यदेवतेच्या स्थूल स्वरूपांतूनच त्या देवतेच्या परम सूक्ष्म स्वरूपापर्यंत जाऊन पोहोंचलें पाहिजे. परम सूक्ष्म स्वरूपांत अथवा मूलभूत स्वरूपांत सर्वच देवता एकरूप असतात.

शिवतत्त्व हें जसें अत्यंत सूक्ष्म आहे तसेंच तें अत्यंत विशालहि आहे. तें इतकें विशाल आहे कीं, कवडशांत अर्थात् झरोक्यांतून घरांत शिरलेल्या सूर्याच्या किरणांत जसे असंख्य त्रसरेणु परिभ्रमण करीत असलेले दिसतात त्याप्रमाणें प्रत्येकांत चौदा-चौदा भुवनें असलेलीं अशीं असंख्य ब्रह्मांडें त्याच्या विशाल स्वरूपांत इतस्ततः परिभ्रमण करीत आहेत ! एवढेंच नव्हे तर, या अनंत ब्रह्मांडांना व्यापून तें शिवतत्त्व ब्रह्मांडांच्या बाहेरहि अपरिमित रूपानें उरलेलेंच आहे ! अशा रीतीनें ब्रह्मांडांच्या आंतबाहेर असून शिवाय ब्रह्मांडांच्या रूपानेंहि पण तेंच शिवतत्त्व नटलेलें आहे. यावरून शिवतत्त्वाची विशालता लक्षांत घ्यावी. अशा या विशाल शिवस्वरूपाचा साक्षात्कार करून घ्यावयाचा असेल तर त्याकरितां प्रथम त्याच शिवतत्त्वाचीं सगुण चरित्रें ऐकावींत, वाचावींत आणि दुसऱ्यालाहि वर्णन करून सांगावींत. त्याच्या परिच्छिन्न, परिमित पण रमणीय अशा सगुणस्वरूपाचें चिंतन करावें. त्याची पूजाअर्चा करावी. त्याला प्रिय असलेल्या स्वधर्माचें आचरण करावें. दान, दया आणि परोपकार इत्यादि धर्माचेंहि आचरण करावें. हींच त्याच्या कृपेचीं साधनें आहेत. त्याच्या कृपेनेंच त्याच्या विशाल स्वरूपाचा साक्षात्कार करून घ्यावा. "नदीमुखेनैव समुद्रमाविशेत् ।" नदीच्या द्वाराच समुद्रामध्यें प्रवेश करणें श्रेयस्कर असतें, त्याचप्रमाणें

सगुणाच्या द्वारांच निर्गुणाकडे जावें अथवा सान्तांतून अनंताला पहावें हाच मार्ग श्रेयस्कर होय. भागवतकारांनीं देखील "एष निष्कण्टकः पन्थाः" असें म्हणून हाच मार्ग दाखविला आहे.

या ठिकाणीं शिवतत्त्व हें उदाहरणमात्र आहे. जो विचार शिवतत्त्वाचा तोच विचार शक्तितत्त्वाचाहि समजावा. शक्तितत्त्वाचेंहि वर्णन करावयाचें झाल्यास तेंहि शिवतत्त्वाप्रमाणेंच "अणोरणीयान् महतो महीयान्" असेंच आहे. तें अणूपेक्षांहि सूक्ष्म आणि आकाशापेक्षांहि विशाल आहे. शक्तितत्त्वाचें साहचर्य असल्याशिवाय केवल शिवतत्त्वापासून कोणत्याहि कार्याचा आविष्कार होत नाहीं. याच अभिप्रायानें सौन्दर्यलहरीच्या पहिल्याच श्लोकांत "शिवः शक्त्या युक्तो यदि भवति शक्तः प्रभवितुम्" असें म्हटलेलें आहे. भगवान् शंकर अर्थात् 'शिव' हे जर शक्तितत्त्वानें युक्त असतील, तरच ते विश्वरूपानें नटण्यास समर्थ होतात. त्यांना जर शक्तीचें साहाय्य नसेल तर ते शवतुल्य अर्थात् निष्क्रिय स्वरूपांतच रहातात. स्पंदनाचेंहि तेथें सामर्थ्य असूं शकत नाहीं, मग अनंत कोटि ब्रह्मांडांच्या रूपानें नटण्याचें कार्य त्यांच्या हातून कसें होऊं शकेल? तात्पर्य, शिवतत्त्वाच्या ठिकाणीं अभिव्यक्त होणारी अनंत कोटि ब्रह्मांडांची घडामोड अर्थात् सृष्टीची रचना, स्थिति आणि प्रलय हें सर्व शक्तितत्त्वाच्या साहचर्यानेंच घडून येत असतें. असें हें शिवतत्त्वाच्या साहचर्यानें असलेलें शक्तितत्त्व शिवतत्त्वाहून निराळें दिसत नाहीं व असतहि नाहीं. कारण शक्तितत्त्वालाहि शिवतत्त्वाचें अधिष्ठान असल्याशिवाय ती शक्ति स्वतः कांहीं करूं शकत नाहीं. शिव आणि शक्ति या उभयतांच्या साहचर्यातूनच सर्व जगाचा आविष्कार होत असतो. शिव आणि शक्ति यांचें साहचर्य नित्यच असल्यामुळें ते दोघेहि समनियत आहेत. त्या दोन्ही तत्त्वांची व्याप्ति समान असल्यामुळें तीं दोन्ही तत्त्वें समव्याप्त आहेत. समनियत अथवा समव्याप्त अशा दोन पदार्थांचें ऐक्य तार्किकहि मानतात. याच युक्तीनें आकाशतत्त्व, कालतत्त्व, दिक्तत्त्व, आणि आत्मतत्त्व या सर्वांचें कांहीं तत्त्ववेत्ते ऐक्यच मानतात. या सर्वांचें एकच स्वरूप आहे आणि तें म्हणजे ईश्वर, असाच कांहीं तत्त्ववेत्त्यांचा सिद्धान्त आहे. याच न्यायानें प्रकृतस्थलीं शिवतत्त्व आणि शक्तितत्त्व यांचेंहि ऐक्यच मानलें जातें.

यावर कोणी असें विचारील कीं, अहो! शिवतत्त्व आणि शक्तितत्त्व हीं दोन तत्त्वें जर विश्वाच्या मुळाशीं असतील, तर विश्व हें द्वैतमूलक आहे असें

म्हणावें लागेल. विश्वाचें मूळतत्त्व जर द्वैतात्मक असेल तर मग तेथें आनंद कसा असणार ? कारण जेथें द्वैत असतें तेथें भय आणि दुःख हें असतेंच. " भयं वै द्वितीयाद्भवति " " मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति " इत्यादि उपनिषद्वचनें देखील द्वैतांत भय आणि दुःख असल्याचें सांगत आहेत. तर्कानें व अनुभवानें देखील जेथें द्वैतभाव आहे तेथें भय आणि दुःखच असल्याचें दृष्टीस पडतें. अशा स्थितींत द्वैतस्वरूप असलेल्या मूलतत्त्वाशीं चित्तानें समरस होण्यांत त्याला काय आनंद मिळणार ?

यावर थोडा सूक्ष्म विचार केल्यास ही शंका बरोबर नाहीं असें लक्षांत येईल. शिवतत्त्व आणि शक्तितत्त्व हीं नावें दोन असलीं तरी तत्त्वतः तीं दोन्ही तत्त्वें एकच आहेत. " एक एव रुद्रो न द्वितीयाय तस्थे " असें तैत्तिरीयसंहितेंत रुद्र शब्दानें शिवतत्त्वाचें वर्णन केलेलें आहे. रुद्र म्हणजे शिवतत्त्व तें एकच आहे. तेथें द्वैत नाहीं. जेथें अकरा रुद्रांचा किंवा असंख्य रुद्रांचा उल्लेख सांपडतो तेथें तो केवळ उपाधिभेदानेंच भेद मानलेला आहे. तो भेद तात्त्विक नाहीं. शक्तितत्त्वाच्याहि बाबतींत हाच न्याय आहे. ' परमात्मा यथा देवो एक एव त्रिधा स्थितः । प्रयोजनवशाच्छक्तिरेकैव त्रिविधाऽभवत ॥ " (वराहपुराण). एकच शिवतत्त्व कार्यभेदानें ब्रह्मा, विष्णु आणि महेश या रूपानें नटलें त्याचप्रमाणें शक्तितत्त्व देखील ब्राह्मी, वैष्णवी, रौद्री इत्यादि रूपानें नटलेलें आहे. बरें, अगदीं मूळांत पाहिलें तरी शिवतत्त्वाहून शक्तितत्त्व भिन्न असल्याचें दिसत नाहीं व शक्तितत्त्वाहून शिवतत्त्वहि भिन्न असल्याचें दिसत नाहीं. दोन्ही तत्त्वांचें लक्षण एकच आहे. जगाची उत्पत्ति, स्थिति आणि लय यांचें कारण असणें हाच दोघांचा स्वभाव आहे. दोघेंहि निर्गुण, निराकार, निर्विकार, अजर, अमर, सत्, चित् आणि आनंदस्वरूप आहेत. या दृष्टीनें पहातां तीं दोन्ही तत्त्वें तत्त्वतः एकरूपच आहेत.

यावर कोणी अशी शंका घेईल कीं, अहो ! शिव आणि शक्ति या दोहोंच्या साहचर्यानें विश्वप्रपंच निर्माण होतो, असें आपण म्हणतां आणि दोघांचें साहचर्य मानूनहि ते दोघे एकरूप आहेत असेंहि म्हणतां. हें आपलें म्हणणें बरोबर नाहीं. साहचर्य म्हटलें कीं तेथें भेद हा असलाच पाहिजे. पण ही शंका बरोबर नाहीं. कारण एकच तत्त्व पुरुष आणि प्रकृति या रूपानें नटलें आहे. त्यांतील पुरुषतत्त्वाला शिव असें नांव दिलें गेलें व प्रकृतितत्त्वाला शक्ति असें नांव

दिलें गेलें. याप्रमाणें शिव आणि शक्ति हीं दोन नांवें भिन्न असलीं तरी त्यांचें मूळ तात्त्विक स्वरूप एकच आहे. शिव आणि शक्ति यांचें साहचर्य हें कांहीं अग्नि आणि धूम यांच्या साहचर्यासारखें 'सामानाधिकरण्यरूप' अर्थात् एकाधिकरणावर रहाणें या स्वरूपाचें नाहीं. दोन्ही तत्त्वें तत्त्वतः एकरूप असल्यामुळें त्यांच्या साहचर्याचा उल्लेख हा केवळ औपचारिक आहे. तो लाक्षणिक आहे. तत्त्वतः त्या साहचर्याला कांहींच अर्थ नाहीं. औपचारिक भेदानें तत्त्वभेद होत नसतो, हें लक्षांत घ्यावें.

वरील अभिप्राय लक्षांत घेऊनच श्रीज्ञानेश्वरमाऊलीनें आपल्या अनुभवामृताच्या आरंभीं मंगलाचरणांत संस्कृत भाषेंत मोठे मार्मिक श्लोक लिहिलेले आहेत.

सार्धं केन च कस्यार्धं शिवयोः समरूपिणोः ।
ज्ञातुं न शक्यते लक्षमिति द्वैतच्छलान्मुहुः ॥
अद्वैतमात्मनस्तत्वं दर्शयन्तौ मिथस्तराम् ।
तौ वन्दे जगतामाद्यौ तयोस्तत्त्वाभिपत्तये ॥

शिवतत्त्व आणि शक्तितत्त्व हीं दोन्ही तत्त्वें परस्पर संलग्न आहेत. अशा या परस्पर संलग्न असलेल्या तत्त्वालाच अर्धनारीश्वर अथवा अर्धनारीनटेश्वर असें नांव दिलेलें आहे. तीं दोन्ही तत्त्वें शिवरूप म्हणजे मंगलमय अथवा परब्रह्मस्वरूपच आहेत. म्हणूनच तीं समरूपी म्हणजे एकरूपीच आहेत. शिव आणि शक्ति या दोघांमध्यें कोणाचें अर्ध कोणाच्या अर्धाशीं संलग्न झालेलें आहे हें कांहीं जाणतां येत नाहीं. व्यवहाराला अनुलक्षून अर्धी स्त्री आणि अर्धा पुरुष अशी जी कल्पना केली जाते, किंवा अशा स्वरूपाचें जें चित्र रेखाटलें जातें, तीं केवळ कल्पनाच होय. या कल्प स्वरूपांतहि अर्धनारीनटेश्वर हे परस्पर अत्यंत संलग्न होऊन द्वैताच्या मिषानें पुनःपुन्हां स्वतःचें अद्वैत रूपच दाखवीत आहेत. स्थूल बुद्धीला तें ग्रहण होत नाहीं. त्या त्यांच्या अद्वैत स्वरूपाचा साक्षात्कार होण्यासाठीं त्यांच्याच चरणीं मी अनन्यभावानें वंदन करीत आहें. ते जगाचे आद्य माता आणि पिता आहेत. याप्रमाणें श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं शिव आणि शक्ति या दोहोंचें ऐक्य स्पष्टच दर्शविलेलें आहे. आचार्यांनीं देखील प्रस्तुत स्तोत्राच्या आरंभीं मंगलाचरणांतच 'कलाभ्यां' आणि 'आनन्दस्फुरदनुभवाभ्यां' या दोन विशेषणांनीं शिव आणि शक्ति या दोघांचें ऐक्यच व्यक्त केलेलें आहे.

शिवशक्तींचें ऐक्य लक्षांत घेऊनच श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं आणखी एका श्लोकांत कारच बहारीचें वर्णन केलेलें आहे.

मूलाद्याद्याय मध्याय मूलमध्याद्यमूर्त्तये ।
क्षीणाद्यमूलमध्याय नमः पूर्णाय शम्भवे ॥

शिवशक्तिस्वरूप परमात्मा भगवान् सदाशिव हेच सर्व विश्वाचें मूळ म्हणजे आदिकारण आहेत. मध्य म्हणजे विश्वाच्या स्थितीचेंहि तेच कारण आहेत. त्याचप्रमाणें अग्र म्हणजे शेवट अर्थात् जगाच्या लयाचेंहि तेच कारण आहेत. तसेंच या विश्वाचें सृष्टिकालीन आदिस्वरूपहि तेच आहेत. स्थितिकालीन मध्यस्वरूपहि तेच आहेत आणि शेवटी परिणामकालीन 'अग्र' म्हणजे अंतिम स्वरूपहि पण तेच आहेत. असें असूनहि त्यांच्या ठिकाणीं मूल, मध्य आणि अग्र हें कांहींच नाहीं ! या सर्व कल्पना त्यांच्या स्वरूपांत क्षीण होतात — मावळतात आणि शेवटीं एकच एक पूर्ण रूपानें तेच शिल्लक रहातात. त्या शिवशक्तिस्वरूप असलेल्या पूर्णतत्त्वाला शंभूला — शिवाला माझा नमस्कार असो.

श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं उपयोगांत आणलेला 'पूर्ण' शब्द मोठा मार्मिक आहे. बृहदारण्यकोपनिषदांत श्रीयाज्ञवल्क्यांनींहि पण 'पूर्ण' या शब्दानेंच त्या तत्त्वाचें प्रतिपादन केलेलें आहे.

पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

पूर्ण म्हणजे निरुपाधिक निर्गुणनिराकारनिर्विकार असें सर्वव्यापी सच्चिदानन्दघन आत्मतत्त्व; त्यालाच कांहीं तत्त्ववेत्ते 'शिवतत्त्व' असें म्हणतात, तर कांहीं तत्त्ववेत्ते 'शक्तितत्त्व' असेंहि म्हणतात. वस्तुतः हीं दोन्ही तत्त्वें एकरूपच असल्यामुळें श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं त्यांचा उल्लेख जगाचीं माता-पितरें म्हणून 'शिव' या एकाच शब्दानें केलेला आहे. आचार्यांनींहि पण शिवशक्तींना उद्देशून शिव हा एकच शब्द उपयोगांत आणलेला आहे. दोघांच्याहि दृष्टीपुढें तें तत्त्व पूर्णरूपानेंच विराजमान आहे. तेंच शिवस्वरूप असलेलें पूर्णतत्त्व शक्तितत्त्वाच्या साहचर्यानें सोपाधिक होऊन, शब्द आणि अर्थ या रूपानें अभिव्यक्त होऊं लागतें. त्याच शब्दप्रपंचाचा आणि अर्थप्रपंचाचा निःसीम विस्तार म्हणजेच हें जग होय. श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या शब्दांत सांगा-



वन्दे वन्द्यानन्दवरं शिवमानन्दरूपिणम् ।
पिण्डब्रह्माण्डरूपेण राजमानं सनातनम् ॥

वयाचें म्हणजे " वियालें बाळ जगाएवढें " असें म्हणावें लागतें. जगाएवढ्या बाळाला जन्म देऊनहि तें शिवशक्तिरूपी दांपत्य जगाहून निराळें राहिलें नाहीं. जगाच्या रूपानें तेंच नटलें. पत्नीच्या पोटीं पतीच पुत्ररूपानें जन्म घेत असतो, म्हणूनच पत्नीला 'जाया' असें म्हटलें जातें. " जायते अस्यां इति जाया " अशी जाया शब्दाची व्युत्पत्ति आहे. तात्पर्य, ज्याप्रमाणें पिताच आपल्या पत्नीच्या पोटीं पुत्ररूपानें आविर्भूत होतो त्याचप्रमाणें शिवतत्त्वच शक्तीच्या साहचर्यानें विश्वरूपानें नटलें. 'अदः' म्हणजे तें प्रत्यक्ष न दिसणारें निरुपाधिक शिवतत्त्व. तें पूर्ण म्हणजे संपूर्ण विश्वव्यापि ब्रह्मस्वरूप आहे. त्याचप्रमाणें ' पूर्ण इदम् ' म्हणजे हें विविध नामरूपानें नटलेलें विशाल जग तें-देखील पूर्ण म्हणजे परब्रह्मस्वरूपच आहे. सोन्याचे अलंकार बनले तरी ते सोनेंच असतात. त्याचप्रमाणें शिवतत्त्वच विश्वप्रपंचाच्या रूपानें प्रगट झालेलें असल्यामुळें हा विश्वप्रपंच विविध नामरूपानें विस्तारलेला असला तरी तो शिवतत्त्वस्वरूपच आहे. अर्थात् तो पूर्णब्रह्मस्वरूपच आहे. शिवतत्त्व हें कारणब्रह्म आहे, तर विश्वप्रपंच हा कार्यब्रह्मस्वरूप आहे. कार्यब्रह्मस्वरूप असलेला विश्वप्रपंच हा ब्रह्मस्वरूपाहून भिन्न असूं शकत नाहीं. " अलंकारातें आलें तरी सोनेपण काई गेले ? " असें श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं स्पष्टच म्हटलेलें आहे. याच अभिप्रायानें वरच्या मंत्रांतहि " पूर्णात् पूर्णम् उदच्यते " असें म्हटलेलें आहे. पूर्णब्रह्मांतून अभिव्यक्त होणारें विश्वहि पूर्णत्वानेंच प्रगट होत असतें. तें आपल्या जन्मसिद्ध पूर्णत्वाचा कधींहि त्याग करीत नाहीं. " पूर्णस्य पूर्णम् आदाय " पूर्णस्वरूप शिवशक्तिस्वरूप असलेल्या या विश्वाचें आपण पूर्णत्व जाणलें, हें सर्व विश्व पूर्ण परब्रह्मस्वरूप आहे, तें शिवशक्तिस्वरूप आहे असें आपण जाणलें की, अविद्येनें भासविलेल्या सर्व कृत्रिम नामरूपांचा बाध होऊन अकृत्रिम शुद्ध सच्चिदानन्दघन शिवतत्त्वच शिल्लक रहातें. तेंच आपल्या या स्तोत्रांतलें उपास्य आहे. शिखरिणी, शार्दूलविक्रीडित, मालिनी इत्यादि अनेक वृत्तांतून या स्तोत्राची आचार्यांनीं मोठी रसाळ रचना केलेली आहे. श्लोकांतील कल्पना-वैचित्र्यहि मोठें मनोरम आहे.]

कलाभ्यां चूडालङ्कृत-शशि-कलाभ्यां निजतपः-
फलाभ्यां भक्तेषु प्रकटित-फलाभ्यां भवतु मे ।
शिवाभ्यामस्तोक-त्रिभुवन-शिवाभ्यां हृदि पुन-
र्भवाभ्यामानन्द-स्फुरदनुभवाभ्यां नतिरियम् ॥ १ ॥

त्रिपुरारि भगवान सदाशिव आणि त्रिपुरसुंदरी श्रीदेवी पार्वती या उभयतांना हा माझा नमस्कार असो. हे दोघेहि कलास्वरूप आहेत. कला म्हणजे तत्त्व. भगवान शंकर हे शिवतत्त्वस्वरूप – परब्रह्मस्वरूप आहेत, तर देवी पार्वती ही शक्तितत्त्वस्वरूपें आहे. म्हणून त्यांना कला असें म्हटलेलें आहे. दोघांच्याहि मस्तकावर चंद्राची कोर शोभत आहे. दोघेहि आपल्या तपश्चर्येचें मूर्तिमंत फलच आहेत. भक्तजनांच्या निकाणीं त्यांनीं आपल्या तपांचें फल स्वतःच्या दर्शनानें अथवा कृपेनें वेळोवेळीं प्रगट केलेलेंच आहे. दोघेहि शिवस्वरूप म्हणजे मंगलमय आहेत. " शिवा च शिवश्च शिवौ ताभ्याम " दोघेहि त्रैलोक्याचें यथार्थ मूर्तिमंत मंगलच आहेत. दोघेहि 'भव' म्हणजे विश्वाचें आदिकारण आहेत. " भवा च भवश्च भवौ एकवद्भाव ". हृदयामध्यें स्फुरणारा आनंद आणि अनुभव हेंच त्यांचें स्वरूप आहे. दोघांनाहि हा माझा नमस्कार असो.

गलन्ती शम्भो त्वच्चरित-सरितः किल्बिष-रजो
दलन्ती धी-कुल्या-सरणिषु पतन्ती विजयताम् ।
दिशन्ती संसार-भ्रमण-परितापोप शमनं
वसन्ती मच्चेतो-हृद-भुवि शिवानन्दलहरी ॥ २ ॥

हे शंभो ! ही शिवानंदलहरी – जीवाला आनंद देणारे तुमच्या स्तवनाचे हे आनंद तरंग माझ्या चित्तरूपी डोहावर निरंतर लहरत राहोत. हे प्रभो! तुमच्या चरित्रनदीपासून या आनंदलहरी बाहेर पडत आहेत. भक्तजनांच्या अंतःकरणांतील किल्बिषरूपी धुळीचें त्या निरसन करीत आहेत. भक्तजनांच्या बुद्धिरूपी वृत्तिप्रवाहांत त्या येऊन मिळत आहेत. संसारामध्यें परिभ्रमण करून थकल्या भागलेल्या जीवांना होत असलेल्या कष्टांचें त्या उपशमन करीत आहेत. अशा या शिवानंदलहरीचा विजय असो. शिवानंदलहरीचा उत्तरोत्तर उत्कर्ष होवो. ती आम्हांला समाधान देवो.

त्रयीवेद्यं हृद्यं त्रिपुर-हरमाद्यं त्रिनयनं
जटाभारोदारं चलदुरग-हारं मृग-धरम् ।
महादेवं देवं मयि सदयभावं पशुपतिं
चिदालम्बं साम्बं शिवमतिविडम्बं हृदि भजे ॥ ३ ॥

भगवान शंकर हे त्रयीवेद्य आहेत. म्हणजे वेदांच्याच साहाय्यानें त्यांचें यार्थ ज्ञान होऊं शकतें. इतर साधनानीं त्यांचें यथार्थ ज्ञान होणार नाहीं. ते ठि हय म्हणजे मनोहर आहेत. त्रिपुरासुराचा त्यांनीं नाश केलेला आहे. ते आद्य णजे सर्वश्रेष्ठ आहेत. सूर्य, चंद आणि अग्नि हे त्यांचे तीन नेत्र असल्यामुळें यांना त्रिनयन म्हणतात. त्यांच्या मस्तकीं मोठा जटाभार शोभत आहे. त्यांच्या ळ्यांत चंचल सर्प हारांप्रमाणें शोभत आहे. त्यांनीं आपल्या हातांत हरिणाला ारण केलेलें आहे. शंकरांनी आपल्या हातांत हरिणाला धारण का केलें ? असा श्न मनांत येतो. त्याचें उत्तर असें – हरिण हा अत्यंत चंचल असतो. मनहि त्यंत चंचल असतें. त्या मनाला जे आपल्या मुठींत ठेवतात – मनावर यंत्रण ठेवतात तेच सुखी होतात. जीवनांत खऱ्या आनंदाचा लाभ त्यांनाच तो हा बोध देण्यासाठींच शंकरांनी आपल्या हातांत हरिणाला धारण केलेले ाहे. ते महादेव म्हणजे देवांचे देव आहेत. अथवा त्यांची क्रीडा मोठी दिव्य ाहे, अलौकिक आहे, म्हणूनहि त्यांना महादेव असें म्हणतात. ते देव म्हणजे त्यंत तेजस्वी आहेत. माझ्याबद्दल त्यांचें अंतःकरण नेहमींच दयेनें भरलेलें ाहे. ते पशुपति म्हणजे सर्व जीवांचे अधिपति आहेत. ते चित्स्वरूप असून र्वाधार आहेत. अशा त्या सांबसदाशिवाला, बहुविधरूपानें नटणाऱ्या नटराजाला ी हृदयामध्यें अनन्यभावानें भजत आहें. 'अतिविडंब' म्हणजे बहुरूपानें नटणारा.

सहस्रं वर्तन्ते जगति विबुधाः क्षुद्र-फलदा
न मन्ये स्वप्ने वा तदनुसरणं तत्कृतफलम् ।
हरि-ब्रह्मादीनामपि निकट-भाजामसुलभं
चिरं याचे शम्भो शिव तव पदाम्भोज-भजनम् ॥ ४ ॥

हे शंकरा ! या जगामध्यें भक्तजनांना सामान्य फलें अर्पण करणारे हजारों व आहेत. त्या देवांना अनुसरणें, भजणें, तेंच या जन्मीं अथवा पूर्वजन्मीं संपादन केलेल्या सुकृताचें फळ आहे असें मला स्वप्नांतहि वाटत नाहीं. स्वप्नांतहि ी गोष्ट मी मान्य करीत नाहीं, तुमच्या निकटवर्ती असलेल्या ब्रह्मा, विष्णु इत्यादि-ांनाहि जें सहज सुलभ नाहीं, तें तुमच्या चरणकमलांचें भजन नित्य निरंतर मला प्राप्त व्हावें. हीच माझी याचना आहे. हे शंभो सदाशिवा ! आपण माझी च्छा पूर्ण करा.

स्मृतौ शास्त्रे वैद्ये शकुन-कविता-गान-फणितौ
पुराणे मन्त्रे वा स्तुति-नटन-हास्येष्वचतुरः ।
कथं राज्ञां प्रीतिर्भवति मयि कोऽहं पशुपते
पशुं मां सर्वज्ञ प्रथित-कृपया पालय विभो ॥ ५ ॥

हे प्रभो ! मी स्मृति म्हणजे धर्मशास्त्र त्यांत निष्णात नाहीं. न्याय, वेदान्त मीमांसा इत्यादि दर्शनशास्त्रांत निष्णात नाहीं. मला उत्तम वैद्यकी येत नाहीं. शकुनविद्या, ज्योतिःशास्त्र, कविता करणें, गाणें म्हणणें इत्यादि इत्यादि कांहींच येत नाहीं. मी पुराण सांगण्यांत निष्णात नाहीं. मी मंत्रविद्येंत निष्णात नाहीं. मला कोणाची स्तुति करतां येत नाहीं. नटणें, हास्यविनोद करणें याहि गोष्टींचें चातुर्य माझ्या ठिकाणीं नाहीं. राजे लोकांनीं संतुष्ट व्हावें असा एकहि गुण माझ्याजवळ नाहीं. मग राजेलोकांनीं माझ्यावर कसें संतुष्ट व्हावें ? कसें प्रेम करावें ? कोण आहें मी ? अगदीं कांहींच नाहीं. अगदीं तुच्छ मानव ! हे पशुपते ! मी पशुच आहें. हे सर्वज्ञा परमेश्वरा ! तुझी कृपा प्रसिद्ध आहे. त्या प्रसिद्ध असलेल्या कृपेनेंच तुम्हीं माझें परिपालन करावें.

घटो वा मृत्पिण्डोऽप्यणुरपि च धूमोऽग्निरचलः
पटो वा तन्तुर्वा परिहरति किं घोर-शमनम् ।
वृथा कण्ठक्षोभं वहसि तरसा तर्क-वचसा
पदाम्भोजं शम्भोर्भज परम-सौख्यं व्रज सुधीः ॥ ६ ॥

कोणी घटपटाची खटपट करीत आहेत, तर कोणी घटाचें उपादानकारण कपाल का मृत्पिंड अशी चर्चा करीत आहेत. कोणी अणु-परमाणुंची चर्चा करीत आहे, तर कोणी पर्वत, वन्हि आणि धूम (पक्ष, साध्य आणि हेतु) यांची चर्चा करीत आहेत. कोणी पट आणि तंतु यांच्या कार्यकारणभावाचीच चर्चा करीत आहेत. पण या चर्चेनें कांहीं दुःखाचा परिहार होईल का ? पाठीमागें लागलेलें घोर संकट शमेल का ? आचार्य म्हणतात, भल्या गृहस्था ! मोठ्या आवेशानें तार्किक पद्धतीनें वादविवाद करून उगीचच घसा दुखवीत आहेस. शहाण्या माणसा ! परमेश्वराची आठवण ठेव. शंकरांच्या चरणकमलाला भज आणि निरतिशय व नित्य अशा आनंदाचा अनुभव घे.

मनस्ते पादाब्जे निवसतु वचः स्तोत्र-फणितौ
करौ चाभ्यर्चायां श्रुतिरपि कथाकर्णन-विधौ ।
तव ध्याने बुद्धिर्नयन-युगलं मूर्तिविभवे
परग्रन्थान्कैर्वा परमशिव जाने परमतः ॥ ७ ॥

हे परमशिवस्वरूपा आत्यंतिक कल्याणरूपा शंकरा ! माझें मन तुमच्या चरणकमलीं सदा स्थिर राहो. वाणी तुमचीं स्तोत्रें म्हणण्यांत गुंतो. दोन्ही हात तुमची सतत पूजा-अर्चा करीत राहोत. कान तुमचीं चरित्रें ऐकण्यांत गढोत. त्याचप्रमाणें माझी बुद्धि तुमच्या ध्यानांत सदा निमग्न होवो आणि दोन्ही डोळे तुमच्या मूर्तीचें-तुमच्या रूपाचें वैभव पहाण्यांत रमोत. आतां तुमचे श्रेष्ठ ग्रंथ कोणत्या साधनानें जाणावेत ? तात्पर्य, नकोच ती कोरडी ग्रंथांची उठाठेव. माझा सर्व देह आणि इंद्रियादि समुदाय तुमच्या कारणीं लागला म्हणजे मी कृतार्थ आहें

यथा बुद्धिः शुक्तौ रजतमिति काचाश्मनि मणि-
र्जले पैष्टे क्षीरं भवति मृगतृष्णासु सलिलम् ।
तथा देवभ्रान्त्या भजति भवदन्यं जडजनो
महादेवेशं त्वां मनसि च न मत्वा पशुपते ॥ ८ ॥

हे पशुपते शंकरा ! भ्रान्त लोकांना ज्याप्रमाणें शिंपला पाहून ही चांदी आहे अशी बुद्धि होते, कांचेचा तुकडा पाहून हें रत्न आहे असें वाटतें, त्याच-प्रमाणें पीठ कालविलेलें पाणी पाहून हें दूध आहे असें वाटतें, किंवा वाळवंटांत तळपणाऱ्या सूर्यकिरणांकडे पाहून हें पाणी आहे असें वाटतें, त्याचप्रमाणें भ्रांत लोकांच्या मनाला तुमच्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान नसल्यामुळें, ते तुम्हांला सोडून इतर देवांनाच देवाधिदेव विश्वनाथ जगन्नाथ असें समजून भजत रहातात. वस्तुतः तुम्हीच महादेव आहां, महेश्वर आहां, हें त्यांच्या मनाला आकलन होत नाहीं. कारण ते जडमति आहेत, भ्रांतच आहेत. वस्तुस्थिति अशी आहे कीं, कोणत्याहि देवाला भजलें तरी तें महादेवालाच भजल्यासारखें होतें. गणपति, देवी, विष्णु, मारुति, दत्त, पांडुरंग, राम, कृष्ण, इत्यादि नामरूप भेद कल्पित असून त्या सर्व कल्पनांचें अधिष्ठान असलेलें शिवतत्त्व हेंच सत्य आहे. हें सत्य न ओळखणाऱ्या लोकांनाच आचार्यांनीं 'जडजनः' असें म्हटलेलें आहे, हें लक्षांत घ्यावें. आचार्य

म्हणतात, हे रहस्य मूढ जनांना कळत नाहीं म्हणून ते भिन्न भिन्न नामरूपानेंच हे परमेश्वरा ! तुम्हांला भजत असतात. तुम्हीं त्यांच्यावर अनुग्रह करावा.

गभीरे कासारे विशति विजने घोरविपिने
विशाले शैले च भ्रमति कुसुमार्थं जडमतिः ।
समर्प्यैकं चेतःसरसिजमुमानाथ भवते
सुखेनावस्थातुं जन इह न जानाति किमहो ॥ ९ ॥

देवा ! तुमच्या पूजेकरितां आंब्याचा मोहोर, बेल फुलें, कमळें वगैरे आणण्यासाठीं लोक खोल खोल असलेल्या सरोवरांत प्रवेश करतात. निर्जन घोर अरण्यांत हिंडतात. विशाल पर्वताच्या दऱ्याखोऱ्यांतून भटकतात. दुसऱ्याच्या बागेंतील फुलें चोरतात. मूर्ख आहेत ते. हे उमानाथा पार्वतीपते ! एक अंतःकरणरूपी कमल तुम्हांला समर्पण करावें आणि सुखानें असावें हें त्यांना कळतच नाहीं. काय आश्चर्य आहे ! तात्पर्य, एक अन्तःकरण परमेश्वराला अर्पण केलें कीं परमेश्वराची खरी पूजा केल्यासारखें होतें. अंतःकरण परमेश्वराला अर्पण केलें नसेल तर गंध, पुष्प, धूप, दीप इत्यादि सर्व अवडंबर व्यर्थ होय.

नरत्वं देवत्वं नग-वन-मृगत्वं मशकता
पशुत्वं कीटत्वं भवतु विहगत्वादि-जननम् ।
सदा त्वत्पादाब्ज-स्मरण-परमानन्द-लहरी-
विहारासक्तं चेद्धृदयमिह किं तेन वपुषा ॥ १० ॥

शंकरा ! मला कोणताहि जन्म असूं द्या. मनुष्याचा जन्म मिळो किंवा देवाचा जन्म मिळो. एखाद्या पर्वतावर अथवा जंगलांत वाघ, सिंह किंवा हरिण यांचा जन्म मिळो. एखाद्या मशकाचा, कीटकाचा, अथवा गाय, बैल इत्यादि पशूंचा जन्म मिळो. अथवा मोर, कोकिळा, भरद्वाज किंवा पोपट इत्यादि पक्ष्यांचा जन्म मिळो. कोणताहि जन्म मिळो. परमेश्वरा ! माझें हृदय सदासर्वकाळ तुमच्या चरणकमलाच्या स्मरणानें होणारा जो महान आनंद, त्या आनंदाच्या तरंगांत विहार करण्यामध्यें निमग्न होऊन राहो हीच माझी मनीषा आहे. तात्पर्य, माझें अन्तःकरण तुमच्या चरणकमलीं जडलें कीं माझें काम झालें ! मग मला येथें कोणता का जन्म मिळेना, मला त्याची तिळमात्रहि परवा नाहीं.

वटुर्वा गेही वा यतिरपि जटी वा तदितरो
नरो वा यः कश्चिद्भवतु भव किं तेन भवति ।
यदीयं हृत्पद्मं यदि भवदधीनं पशुपते
तदीयस्त्वं शम्भो भवसि भव-भारं च वहसि ॥ ११ ॥

हे प्रभो शंकरा ! कोणी ब्रह्मचारी असो अथवा गृहस्थाश्रमी असो, संन्यासी असो अथवा वनवासी असो. मनुष्य कोणी का असेना आणि कसा का असेना ? हे शंकरा ! त्याचें कांहीं बिघडत नाहीं. हे पशुपते ! त्यानें आपलें हृदयरूपी कमल तुम्हांला अर्पण केलें, त्याचें हृत्कमल जर तुमच्या स्वाधीन झालें तर तुम्ही त्याचेच होतां आणि हे शंभो ! तुम्ही त्याचा सर्व संसारभारहि वाहतां !

गुहायां गेहे वा बहिरपि वने वाद्रि-शिखरे
जले वा वह्नौ वा वसतु वसतेः किं वद फलम् ।
सदा यस्यैवान्तःकरणमपि शम्भो तव पदे
स्थितं चेद्योगोऽसौ स च परम-योगी स च सुखी ॥१२ ॥

हे शंकरा ! कोणी गुहेंत बसून योगसाधना करतात, तर कोणी घरींच एकान्तांत बसून ध्यानधारणा करतात. कोणी बाहेर रानावनांत वास्तव्य करतात, तर कोणी पर्वतांच्या शिखरावर रहातात. कोणी पाण्यांत उभे राहून तपश्चर्या करतात, तर कोणी पंचाग्निसाधन करतात म्हणजे आपल्या भोंवतालीं जवळ चार कोंपऱ्यांत चार अग्नीचे ढीग करून भर उन्हांत मध्याह्नकाळीं त्यामध्यें बसून रहातात. बसोत बिचारे. अंतःकरण जर तुमच्या ठिकाणीं स्थिर नसेल तर त्या बसण्याचें फळ काय आहे ? हे शंभो सदाशिवा ! ज्याचें अंतःकरण सदासर्वकाळ तुमच्याच चरणीं स्थिर झालें असेल, कान, डोळे, वाणी आणि मन तुमच्याच स्वरूपीं जडलें असेल, तर तोच त्याचा खरा योग होय. तोच महायोगी असें म्हणण्याला योग्य होतो व तोच खरा सुखी होतो.

असारे संसारे निज-भजन-दूरे जड-धिया
भ्रमन्तं मामन्धं परम-कृपया पातुमुचितम् ।
मदन्यः को दीनस्तव कृपण-रक्षातिनिपुण-
स्त्वदन्यः को वा मे त्रिजगति शरण्यः पशुपते ॥ १३ ॥

हे प्रभो ! माझी बुद्धि अत्यंत जड असल्यामुळें मी तुमच्या भक्तीपासून दूर राहून या असार संसारामध्यें सारखा भटकत आहें. हे परमेश्वरा ! मी अंध म्हणजे अविचारी आहें. अत्यंत कृपेनें माझें संरक्षण करणें हेंच तुम्हांला योग्य आहे. हे पशुपते ! या त्रैलोक्यामध्यें तुम्हांला माझ्यासारखा दीन अर्थात् संरक्षण करण्याला योग्य, असा माझ्याहून निराळा कोण भेटणार ? त्याचप्रमाणें दीनांचें संरक्षण करण्यांत अत्यंत निपुण असा तुमच्याहून निराळा मला तरी दुसरा कोण भेटणार ? तात्पर्य, शरणागतांचें संरक्षण करण्यास सर्वस्वीं तुम्हींच योग्य आहां. मी आपल्या चरणीं शरण आलों आहें. आपण माझें रक्षण करा.

प्रभुस्त्वं दीनानां खलु परम-बन्धुः पशुपते
प्रमुख्योऽहं तेषामपि किमुत बन्धुत्वमनयोः ।
त्वयैव क्षन्तव्याः शिव मदपराधाश्च सकलाः
प्रयत्नात्कर्तव्यं मदवनमियं बन्धुसरणिः ॥ १४ ॥

हे पशुपते परमेश्वरा ! तूं खरोखर दीनांचा प्रभु आहेस तसेंच मोठा हितचिंतकहि आहेस आणि मी तर दीनांचा प्रमुख म्हणजे अग्रगण्य आहें. तूं दीनांचा प्रभु तसाच परमहितचिंतक असल्यामुळें आणि मी दीनांचा प्रमुख असल्यामुळें, तूं माझाहि प्रभु आणि हितचिंतक झालासच. हें तुझें-माझें नातें काय निराळें सांगावयाला पाहिजे ? तें कैमुतिकन्यायानें अर्थातच सिद्ध झालें ! तेव्हां हे सदाशिवा ! तूंच माझे सर्व अपराध पोटांत घालावेस आणि योग्य त्या प्रयत्नांनीं माझें रक्षण करावें. बंधु म्हणविणाऱ्याला आपलें बंधुत्व व्यक्त करण्याचा हाच मार्ग आहे.

उपेक्षा नो चेत्किं न हरसि भवद्ध्यान-विमुखां
दुराशाभूयिष्ठां विधि-लिपिमशक्तो यदि भवान् ।
शिरस्तद्वैधात्रं न न खलु सुवृत्तं पशुपते
कथं वा निर्यत्नं कर-नख-मुखेनैव लुलितम् ॥ १५ ॥

हे परमेश्वरा ! तुम्ही माझी उपेक्षा कां करतां ? तुम्ही म्हणाल, मी उपेक्षा कोठें करीत आहें ? तर मी तुम्हांला असें विचारतों कीं, ही उपेक्षा नाहीं तर काय आहे ? उपेक्षा जर नसेल तर ब्रह्मदेवानें माझ्या कपाळीं लिहिलेली ही वेडी-

वाकडीं अक्षरें, ज्या अक्षरांनीं मला तुमच्या ध्यानापासून विमुख केलेलें आहे, त्याचप्रमाणें ज्या अक्षरांमध्यें सगळी दुराशाच दुराशा भरलेली आहे. माझ्या मनाला आनंद वाटेल अशा तऱ्हेचा आशेचा धागादोराहि त्या अक्षरांत नाहीं, अशी ही माझ्या कपाळांतलीं वेडीं-वाकडीं अक्षरें तुम्ही पुसून कां टाकीत नाहीं ? " तीं अक्षरें पुसण्याची माझ्या अंगीं शक्ति नाहीं " असें तुम्ही म्हणाल तर मी तुम्हाला विचारतों कीं, तुम्ही जर अशक्त आहां, असमर्थ आहां, तर मग हे पशुपते ! आपण ब्रह्मदेवाचें पांचवें मुख सुवृत्त म्हणजे गोल, गरगरीत, घडघाकट असलेलें कांहीं एक यत्न न करतां, सहज हाताच्या बोटाच्या नखानेंच कसें बरें तोडलें ! (न लुलितमिति न अपि तु लुलितमेव). तात्पर्य, एवढें जर सामर्थ्य तुमच्या अंगीं आहे, तर मग माझ्या कपाळीं ब्रह्मदेवानें लिहिलेलीं वाईट अक्षरें पुसून टाकावयाला तुम्हांला काय जड आहेत !

विरिञ्चिर्दीर्घायुर्भवतु भवता तत्परशिर-
श्चतुष्कं संरक्ष्यं स खलु भुवि दैन्यं लिखितवान् ।
विचारः को वा मां विशद-कृपया पाति शिव ते
कटाक्ष-व्यापारः स्वयमपि च दीनावन-परः ॥ १६ ॥

हे शंकरा ! ब्रह्मदेव खुशाल दीर्घायु असूं द्या. त्याचीं तीं राहिलेलीं चार मस्तकें तुम्ही खुशाल सुरक्षित ठेवा. त्यानें या भूमंडलावर माझ्या कपाळीं वाईट अक्षरें लिहिलीं आहेत एवढेंच मला सांगावयाचें आहे. तुम्ही निःसंदिग्ध कृपेनें माझ्याकडे नुसती दृष्टि जरी टाकली, तरी तुमच्या त्या निर्मल कृपापूर्ण दृष्टीनें माझें रक्षण होईल. तुमचा कृपायुक्त कटाक्षव्यापार म्हणजे कृपेनें दृष्टिक्षेप करणें हेंहि माझें रक्षण करील आणि तुम्ही स्वतःहि दीन जनांचें अवन म्हणजे रक्षण करण्यास तत्परच आहां. मग मला विचार करण्याचें काय कारण आहे ?

फलाद्वा पुण्यानां मयि करुणया वा त्वयि विभो
प्रसन्नेऽपि स्वामिन् भवदमल-पादाब्ज-युगलम् ।
कथं पश्येयं मां स्थगयति नमःसम्भ्रम-जुषां
निलिम्पानां श्रेणिर्निज-कनक-माणिक्य-मुकुटैः ॥ १७ ॥

हे शंकरा ! मी संपादन केलेल्या पुण्याच्या परिपाकानें म्हणा अथवा माझ्याबद्दल तुमच्या अंतःकरणांत करुणा असल्यामुळें म्हणा, तुम्ही माझ्यावर प्रसन्न असलां तरी स्वामिन्—महाराज ! मला तुमच्या निर्मल चरणकमलांचें दर्शन कसें घडणार ! मी तुमच्या प्रसन्न चरणकमलांना कसा पाहूं शकेन ? कारण तुम्हांला नमस्कार करण्याकरितां गर्दी करणाऱ्या देवांचा समुदाय आपल्या रत्नजडित सुवर्णाच्या मुकुटांनीं मला कुंठित करीत आहे. तात्पर्य, असंख्य देव तुमच्या चरणीं नमस्कार करण्याकरितां आपलीं मस्तकें वाकवून तीं वर:करीत असतांना जणुं कांहीं त्यांच्या मस्तकांवरील ते मुकुट मला "दूर हो, दूर हो" असा संकेत करीत आहेत असें वाटतें. त्या देवांच्या गर्दीत माझी डाळ कशी शिजेल !

त्वमेको लोकानां परम-फलदो दिव्य-पदवीं
वहन्तस्त्वन्मूलां पुनरपि भजन्ते हरिमुखाः ।
कियद्वा दाक्षिण्यं तव शिव मदाशा च कियती
कदा वा मद्रक्षां वहसि करुणा-पूरित-दृशा ॥ १८ ॥

हे शंकरा ! तुम्हीच एक सर्व लोकांना अत्युत्तम फल देणारे आहां. 'त्वन्मूला' म्हणजे तुमच्याच कृपेनें प्राप्त होणारी दिव्य पदवी—जगत्स्रष्टा, जगत्पालक इत्यादि मोठीं मोठीं नांवें धारण करून ब्रह्मदेव, विष्णु वगैरे देव पुन्हां तुम्हांलाच भजतात. प्रभो, हें केवढें तुमचें सामर्थ्य आहे ! केवढें तुमचें औदार्य आहे ! माझी आशा ती किती ! माझें रक्षण करा एवढेंच माझें मागणें आहे. कृपापूर्ण दृष्टीनें आपण माझें केव्हां बरें रक्षण कराल ?

दुराशा-भूयिष्ठे दुरधिप-गृह-द्वार-घटके
दुरन्ते संसारे दुरित-निलये दुःख-जनके ।
मदायासं किं न व्यपनयसि कस्योपकृतये
वदेयं प्रीतिश्चेत्तव शिव कृतार्थाः खलु वयम् ॥ १९ ॥

हे शंकरा ! हा संसार अत्यंत कठीण आहे. विफल मनोरथांनीं तो पूर्ण भरलेला आहे. या संसारामध्यें दुष्ट, श्रीमंत, धनी, मालक यांच्या दरांचीं दारें

झिजवावीं लागतात. श्रीमंतांचीं दारें हेलपाट्यांनीं झिंजविणें हेंच या संसारांतील एक घटक काम असतें. या संसाराला अंत नाहीं. तो पापांचें मोठें कांहीं निवासस्थान आहे. तो दुःखाचा जनक आहे. हे प्रभो ! या संसारांत मला होत असलेले कष्ट आपण कां बरें दूर करीत नाहीं ? तुमची ही उपेक्षा कोणाच्या उपकारांकरिता आहे ? सांगा ! आम्हांला कष्ट होण्यांत तुम्हांला जर संतोष वाटत असेल, तुमची जर तृप्ति होत असेल, तर हे शंकरा ! आम्ही त्यांत कृतार्थ होऊं.

सदा मोहाटव्यां चरति युवतीनां कुचगिरौ
नटत्याशा-शाखास्वटति झटिति स्वैरमभितः ।
कपालिन् भिक्षो मे हृदय-कपिमत्यन्तचपलम्
दृढं भक्त्या बद्ध्वा शिव भवदधीनं कुरु विभो ॥ २० ॥

हे परमेश्वरा ! माझें मन मर्कटासारखें अत्यंत चपल आहे. नव्हे मर्कटच आहे तें ! माकड जसें अरण्यांत हिंडतें, गिरिशिखरांवरून भटकतें, झाडांच्या फांद्यावरून स्वैरपणें इकडे तिकडे संचार करीत रहातें, त्याचप्रमाणें माझें हें अत्यंत चपल असलेलें मनरूपी मर्कट नेहमीं मोहाच्या जंगलांत भटकत रहातें. तरुण स्त्रियांचें वक्षस्थल त्याला पर्वतासारखें प्रिय वाटतें आणि वेडेपणानें तेथेंच तें रमतें ! मनोरथांच्या वृक्षांवर आणि खोट्या आशारूपी शाखांवर तें वेगानें इकडून तिकडे आणि तिकडून इकडे स्वैरपणें भटकत रहातें. हे परमेश्वरा ! एखादा मदारी जसा माकडाच्या गळ्याला दोरी बांधून त्याला आपल्या ताब्यांत ठेवतो, त्याप्रमाणें तुम्ही देखील माझ्या मनाचे मदारी बना. माझ्या मनोरूपी मर्कटाला भक्तिरूपी शृंखलेनें पक्के बांधून त्याला तुम्ही आपल्याच ताब्यांत ठेवा. मदारी लोकांच्या हातांत भिक्षापात्र असतें. ते भिक्षा मागत असतात. हें लक्षांत घेऊन आचार्यांनीं शंकरांना या ठिकाणीं कपालिन् आणि भिक्षो अशा शब्दांनीं संबोधिलें आहे. नर-कपाल धारण करणारा आणि भिक्षा मागणारा असा त्यांचा अर्थ आहे.

शंकराच्या भिक्षेविषयीं एक गमतीची गोष्ट :—

एकदां भगवान् शंकर पार्वतीकडे आले आणि म्हणाले, हे गिरिजे, तूं अन्नपूर्णा आहेस. मला भिक्षा घाल. भूक लागली आहे ! " भिक्षां प्रदेहि गिरिजे क्षुधितायं मह्यम् " शंकरांचे हे शब्द ऐकतांच पार्वतीला मोठा राग आला आणि जरा तिरस्कारानें म्हणाली, काय भिक्षा मागतां आपण ? ही भीक मागण्याची वृत्ति

सोडून द्या. अग, मग काय करूं मी ? ती म्हणाली, " जा. (कुळांनीं जमिनी खाल्ल्या असल्या तरी) परशुरामाकडे जा. ते जमिनी वाटत आहेत असें ऐकलें. मागा त्यांना थोडी जमीन. तुम्हांला मागायला संकोच वाटत असेल तर दुसऱ्याच्या तोंडून मागा. " (श्लोकांत 'याचय' असें प्रयोजक रूप आहे) " त्याला बी कोठून आणायचें ? " " कुबेराकडून. " " पैसे ? " " उधार मागा. देतां येतील पुढें. " " आणि नांगर ? " " तो दोनतीन दिवस बलरामाकडून मागून घ्या. " " आणि बैल ? " " अहो ! तो तुमचा नंदी आहे ना ? " " अग ! तो एकच आहे. त्यानें कसें मागणार ? " " अहो ! त्या यमराजाकडून दोन दिवस रेडा मागून घ्या आणि जोडा त्याला ! " (रेडा हें यमाचें वाहन आहे.) " बलरामाचा नांगर जुना झाला आहे. त्याचा फाळ कसा टिकेल ? " " तो मोडला तर तुमचा त्रिशूळ लांवा ना त्याला. " " मला भूक लागल्यावर काय करूं " " अहो ! मी देईन चटणीभाकरी आणून तुम्हांला. " " विसाव्याच्या वेळीं रेडा आणि बैल कोण राखणार ? " " हा कुमार कार्तिक आहे ना रिकामा ! " बाई बाई कंटाळलें तुमच्या या भीक मागण्याला. करा. शेती करा. " असा हा शिव-पार्वतीचा गमतीचा विनोद जगाचें कल्याण करो. असें एका शिवभक्त कवीनें वर्णन केलेलें आहे. " गमाद्याचय मेदिनीं धनपतेर्बीजं बलाल्लाङ्गलं, प्रेतेशान्महिषं तवास्ति वृषभः फालं त्रिशूलं तव। शक्ताहं तव चान्नदानकरणे स्कन्दोऽस्ति गोरक्षणे, खिन्नाहं हर भिक्षया कुरु कृषिं गौरीवचः पातु वः॥ " तात्पर्य, आचार्य म्हणतात, शंकरा ! तुमच्या हातांत कवडी आहे. तुम्ही भिक्षाहि मागतां. तुमच्याजवळ माकड तेवढें नाहीं. तेव्हां माझें मन हें एक माकडच आहे. त्याला तुम्ही आपल्याचरोवर नेहमीं बागवा. हीच माझी प्रार्थना आहे.

धृति-स्तम्भाधारां दृढ-गुण-निबद्धां सगमनां
विचित्रां पद्माढ्यां प्रतिदिवस-सन्मार्ग-घटिताम् ।
स्मरारे मच्चेतः-स्फुट-पट-कुटीं प्राप्य विशदां
जय स्वामिन् शक्त्या सह शिवगणैः सेवित विभो ॥ २१ ॥

हे स्मरारे शंकरा ! विश्वविजयी म्हणविणारा कामदेव हा आपला शत्रु आहे, तर मी आपल्यासाठीं हा एक उत्तम तंबू तयार केलेला आहे. शत्रूशीं सामना करतांना त्याचा उपयोग होईल. आपण त्याचा स्वीकार करा, आणि

विजयी व्हा, अशा अर्थानें प्रार्थना करीत आहेत. हे शंकरा! शक्ति आणि शिवगण हीं नेहमीं आपल्या सान्निध्यांत राहून आपली सेवा करीत आहेत. आपण स्वामी म्हणजे सर्वांचे अधिपति आहां. हे मदनारे! आपल्यासाठीं मी अन्तःकरणरूपी कापडाचा मजबूत तंबू तयार केलेला आहे. तो अत्यंत विशद म्हणजे स्वच्छ, निर्मळ आहे. त्याला मध्यभागीं धैर्याचा खांब आधार म्हणून दिलेला आहे. गुण म्हणजे दोरी अथवा सद्गुण. सद्गुणरूपी चांगल्या दोरांच्या पक्क्या तणावांनीं तो बळकट बांधलेला आहे. गमन म्हणजे ज्ञान अथवा प्रवेशद्वार. त्यानें तो युक्त आहे. तो चांगला रंगविलेला आहे. त्याच्यावर पद्मांची म्हणजे कमळांचीं चित्रें काढलेलीं आहेत. अथवा तंबूतील खांबावर वरच्या बाजूस जी फळी ठेवतात तिलाहि 'पद्म' असें नांव आहे. पद्मानें आढ्य म्हणजे युक्त असा अर्थ करावा. सन्मार्ग म्हणजे सज्जनांचा मार्ग अथवा चांगली रीत. प्रत्येक दिवशीं मीं स्वतः खपून चांगल्या पद्धतीनें तो तयार केलेला आहे. आपण 'प्राप्य' म्हणजे त्याचा अंगीकार करून 'जय' म्हणजे विजयी व्हा. तात्पर्य, आपण माझ्या अंतःकरणांत रहा.

प्रलोभाद्यैरर्थाहरण-परतन्त्रो धनिगृहे
प्रवेशोद्युक्तः सन् भ्रमति बहुधा तस्करपते।
इमं चेतश्चोरं कथमिह सहे शंकर विभो
तवाधीनं कृत्वा मयि निरपराधे कुरु कृपाम् ॥ २२ ॥

हे प्रभो शंकरा! वेद तुमचें 'तस्करपति' म्हणून वर्णन करीत आहे. 'तस्कराणां पतये नमः' हें रुद्राध्यायांतील वाक्य प्रसिद्धच आहे. वेद कधींच खोटें सांगत नसतो. मग माझी एक विनंती ऐका. माझें चित्त अगदीं चोरासारखेंच आहे, नव्हे तो एक मोठा चोरच आहे. लोभ-मोह इत्यादि विकारांच्या अधीन होऊन तो सारखा 'अर्थाहरणपरतन्त्र' म्हणजे अर्थाचें, धनाचें अथवा शब्दस्पर्शादि विषयांचें 'आहरण' म्हणजे चौर्य, तें करण्यांत माझा हा चित्तरूपी चोर सदा गुंतलेला असतो. धनी लोकांच्या घरीं प्रवेश मिळविण्याकरितां उत्सुक होऊन तो सारखा भटकत असतो. या चित्तरूपी चोरानें मला अगदीं 'त्राहि भगवन्' करून सोडलें आहे. तो मला असह्य झाला आहे. त्याचा त्रास मी आतां कसा सहन करूं? हे परमेश्वरा! आपण तस्करपति आहां ना? मग माझ्या या चित्तरूपी चोराला

पकडा. त्याला तुम्ही आपल्या अधीन करून ठेवा. निरपराध असलेल्या माझ्यावर एवढी कृपा करा. तात्पर्य, सर्व विषयांकडे सतत भटकणाऱ्या माझ्या चित्ताला तुम्ही बांधून ठेवा.

करोमि त्वत्पूजां सपदि सुखदो मे भव विभो
विधित्वं विष्णुत्वं दिशसि खलु तस्याः फलमिति ।
पुनश्च त्वां द्रष्टुं दिवि भुवि वहन् पक्षि-मृगता-
महट्टवा तत्खेदं कथमिह सहे शंकर विभो ॥ २३ ॥

हे प्रभो शंकरा ! तुम्ही भक्तांना ब्रह्मपद अथवा विष्णुपदहि अर्पण करतां म्हणून मी तुमची पूजा केली, भक्ति केली. तिचें फल म्हणून तुम्ही मला ब्रह्मदेवाचा जन्म दिला व विष्णूचाहि जन्म दिला. पुढें तुमचें संपूर्णपणें दर्शन घडावें म्हणून मी पक्षी – हंसरूपानें अंतरिक्षलोकांत तुम्हांला पहाण्याचा प्रयत्न केला आणि मृग म्हणजे वराहरूप धारण करून भूलोकापासून खालीं खालीं पहाण्याचा प्रयत्न केला; पण आपण मला दिसलाच नाहीं. आपल्या स्वरूपाचें दर्शन न झाल्यामुळें मला मोठा खेद म्हणजे दुःख होत आहे. तें दुःख मी कसें सहन करूं ? शंकरा ! या दुःखाचा परिहार करून आपण मला तत्काळ सुखी करा. (ही कथा श्लोक ९९ मध्यें पहावी). तात्पर्य, मला ब्रह्मपदहि नको व विष्णुपदहि नको. मला तुम्ही आपलें दर्शन देऊनच सुखी करा.

कदा वा कैलासे कनक-मणि-सौधे सह गणै-
र्वसन् शम्भोरग्रे स्फुट-घटित-मूर्धाञ्जलिपुटः ।
विभो साम्ब स्वामिन् परम-शिव पाहीति निगद-
न्विधातॄणां कल्पान् क्षणमिव विनेष्यामि सुखतः ॥२४॥

हे शंकरा ! कैलास पर्वतावरील रत्नजडित सुवर्णमंदिरामध्यें तुमच्या गणांत समाविष्ट होऊन, त्यांच्यासह तुमच्यापुढें दोन्ही हात जोडून, ते मस्तकाला लावून मी कधीं बरें बसेन ? आणि याप्रमाणें बसून हे स्वामिन् सांबा ! परमशिवा ! प्रभो ! माझें आपण रक्षण करा, असें म्हणत ब्रह्मदेवाच्या दिवसासारखा – कल्पासारखा प्रचंड काल पण तो क्षणासारखा सुखानें केव्हां बरें घालवीन ?

तात्पर्य, कैलास पर्वतावर तुमच्या सान्निध्यांत वसून ब्रह्मदेवांचे कल्पच्या कल्प मी सहज सुखानें तुमचें स्मरण करीत क्षणासारखे घालवावेत हीच माझी इच्छा आहे.

स्तवैर्ब्रह्मादीना जयजय वचोभिर्नियमिनां
गणानां केलीभिर्मद-कल-महोक्षस्य ककुदि ।
स्थितं नीलग्रीवं त्रिनयनमुमाश्लिष्ट-वपुषं
कदा त्वां पश्येयं करधृत-मृगं खण्डपरशुम् ॥ २५ ॥

हे शंकरा ! ब्रह्मदेव, विष्णु इत्यादि देव तुमची स्तुति करीत आहेत. योगीजनांचे समुदाय जयजयकार करीत आहेत. अनेक गण विविध प्रकारच्या लीला करीत आहेत. मधुर आणि गंभीर गर्जना करणाऱ्या नंदिकेश्वराच्या वशंडीजवळ आपण विराजमान झालेले आहां. अर्धांगी पार्वती शोभत असून लोकोपकारार्थ सेवन केलेल्या हालाहल विषामुळें आपला कंठ काळा दिसत आहे. हातांमध्यें मृग आणि खंड-परशु म्हणजे एक प्रकारचें शस्त्र धारण केलेलें आहे. तसेंच आपण त्रिनयन आहां. अशा थाटांत मी तुम्हांला केव्हां बरें पाहीन ?

कदा वा त्वां दृष्ट्वा गिरिश तव भव्याङ्घ्रियुगलं
गृहीत्वा हस्ताभ्यां शिरसि नयने वक्षसि वहन् ।
समाश्लिष्याघ्राय स्फुट-जलज-गन्धान् परिमला –
नलभ्यां ब्रह्माद्यैर्मुदमनुभविष्यामि हृदये ॥ २६ ॥

हे गिरिशा ! कधीं बरें मी तुम्हांला पाहीन ? तुम्हांला पाहून तुमचें भव्य म्हणजे कल्याणकारक चरणकमल मी आपल्या हातीं केव्हां बरें घेईन ? त्यांना मस्तकावर केव्हां धारण करीन ? केव्हां बरें डोळ्यांनीं पाहीन आणि हृदयांत प्रेमानें ठेवीन, आलिंगीन ? आणि हें सर्व करीत असतांना तुम्हांला अर्पण केल्या गेलेल्या सुगंधी कमळांचा चोहोंकडे दरवळणारा घमघमाट आपल्या घ्राणेंद्रियानें ग्रहण करून ब्रह्मादि देवांनाहि दुर्लभ असलेल्या आनंदाला मी आपल्या हृदयांत केव्हां बरें अनुभवीन ?

करस्थे हेमाद्रौ गिरिश निकटस्थे धनपतौ
गृहस्थे स्वर्भूजामर-सुरभि-चिन्तामणि-गणे ।

शिरस्थे शीतांशौ चरणयुगलस्थेऽखिल-शुभे
कमर्थं दास्येऽहं भवतु भवदर्थं मम मनः ॥ २७ ॥

हे गिरिशा शंकरा ! तुम्हांला मी काय वरें अर्पण करूं ? तुम्हांला सोनें अर्पण करावें तर सुवर्णाचा महामेरु तुमच्या हातांतच आहे. कांहीं द्रव्य धन द्यावें तर धनपति म्हणजे कुबेर तुमच्याजवळच आहे. जें मनांत आणावें तें देणारा कल्पद्रुम, ज्याची इच्छा करावी तें सर्व कांहीं देणारी कामधेनु आणि जें मनीं चिंतावें त्याचा लाभ करून देणारा चिंतामणि हें सर्व कांहीं तुमच्या घरींच आहे. 'स्वर्भूज' म्हणजे कल्पवृक्ष, 'अमरसुरभि' म्हणजे कामधेनु, 'चिंतामणि' म्हणजे जें चिंतावें, मनीं आणावें त्याची प्राप्ति करून देणारें रत्न. शंकरा ! हें सर्व कांहीं तुमच्याजवळ आहे. 'शीतांशु' म्हणजे चंद्र, तो तुमच्या मस्तकावर विराजत आहे. विश्वांतील अखिल कल्याणकारक गोष्टी तुमच्या चरणयुगलीं आश्रय करून राहिलेल्या आहेत. देवा ! तुमच्याजवळ नाहीं असें मला कांहींच दिसत नाहीं. मग मी तुम्हांला काय देऊं ? सर्व कांहीं तुमच्याजवळ आहे. हां ! फक्त एक वस्तु तुमच्याजवळ नाहीं. ती वस्तु म्हणजे माझें मन होय. तेंच मी आतां तुम्हांला अर्पण करतों. ' भवतु भवदर्थं मम मनः ' माझें मन तुमच्या-करितां तुमच्याजवळ असूं द्या ! आरंभापासून येथपर्यंतचे सर्व श्लोक शिखरिणी वृत्तांतील आहेत. पुढील चव्वेचाळीसावा श्लोक सोडून सहासष्टपर्यंतचे सर्व श्लोक शार्दूलविक्रीडित वृत्तांत आहेत.

सारूप्यं तव पूजने शिव महादेवेति सङ्कीर्तने
सामीप्यं शिव-भक्ति-धुर्य-जनता-सांगत्य-सम्भाषणे
सालोक्यं च चराचरात्मक-तनु-ध्याने भवानीपते
सायुज्यं मम सिद्धमत्र भवति स्वामिन्कृतार्थोऽस्म्यहम् ॥२८॥

हे प्रभो महेश्वरा ! तुमची पूजा केली असतां सारूप्यमुक्तीचा लाभ होतो. शिव महादेव इत्यादि नामांचें संकीर्तन केलें असतां सामीप्यमुक्ति मिळते. शिव-भक्तीची रा वहाणाऱ्या भक्तसमूहाच्या संगतीनें आणि त्यांच्याशीं केलेल्या संभाषणानें सालोक्यमुक्ति मिळते. शिवभक्तीनें 'धुर्य' म्हणजे श्रेष्ठ अशी जी जनता म्हणजे लोकसमुदाय, त्यांच्याशीं 'सांगत्य' म्हणजे संगति आणि संभाषण म्हणजे वार्तालाप घडला असतां सालोक्याचा लाभ होतो. आणि हे भवानीपते !

तुमच्या चराचर विश्वरूपी विराट् स्वरूपाचें ध्यान केलें असतां सायुज्य मिळतें. आपल्या कृपेनें हें सर्व कांहीं मला प्राप्त झालेलें आहे. महाराज ! मी कृतार्थ झालों आहें. या श्लोकांत आचार्यांनी चारी मुक्तींच्या साधनांचा निर्देश केलेला आहे.

त्वत्पादाम्बुजमर्चयामि परमं त्वां चिन्तयाम्यन्वहं
त्वामीशं शरणं व्रजामि वचसा त्वामेव याचे विभो ।
वीक्षां मे दिश चाक्षुषीं सकरुणां दिव्यैश्चिरं प्रार्थितां
शम्भो लोकगुरो मदीय-मनसः सौख्योपदेशं कुरु ॥ २९ ॥

हे शंकरा ! मी तुमच्या चरणकमलांची पूजा करीत आहें. सर्वश्रेष्ठ अशा तुमचें मी रोजच्या रोज चिंतन करीत आहें. हे विश्वेशा ! मी तुम्हांला शरण आलों आहें. हे प्रभो ! वाणीनें मी तुमची याचना करीत आहें कीं, आपण माझ्याकडे कृपापूर्ण दृष्टीनें अवलोकन करावें. आपल्या कृपापूर्ण दृष्टीची द्युलोकामध्यें वास्तव्य करणाऱ्या देवांनीं देखील चिरकाल प्रार्थना म्हणजे याचना केलेली आहे. हे जगद्गुरो शंकरा ! माझ्या मनाला आपण नित्य सौख्याचा लाभ होईल असा उपदेश करा.

वस्त्रोद्धूत-विधौ सहस्र-करता पुष्पार्चने विष्णुता
गन्धे गन्धवहात्मताऽन्नपचने वह्निर्मुखाध्यक्षता ।
पात्रे काञ्चन-गर्भतास्ति मयि चेद्बालेन्दुचूडामणे
धृश्यूषां करवाणि ते पशुपते स्वामिंस्त्रिलोकीगुरो ॥ ३० ॥

हे बालेंदुचूडामणे शंकरा ! शंकरांच्या मस्तकावर चंद्राची कोर रत्नाप्रमाणें शोभत असल्यामुळें शंकरांना बालेंदुचुडामणि असें विशेषण दिलेलें आहे. हे प्रभो पशुपते त्रिलोकीनाथा ! मी अल्पशक्ति पामर काय तुमची सेवा करणार ! तुम्ही दिगंबर आहां. दिशा ही विभु म्हणजे व्यापक असल्यामुळें माझ्या दोन हातांनीं तिचें प्रक्षालन कसें होणार ? त्याच्याकरितां मला 'सहस्रकरता' म्हणजे कार्तवीर्य सहस्रार्जुनासारखे हजार हात पाहिजे होते. अथवा सहस्र शब्द असंख्यवाची समजावा. हजारों हात मला असते तर मला तुमची दिशारूपी वस्त्रें धुतां आलीं असतीं अथवा सहस्रकर म्हणजे सूर्य. 'कर' म्हणजे किरण. सूर्यालाहि 'सहस्रांशु' असें नांव आहे. तो उदयाला आला म्हणजे सर्व दिशा प्रकाशतात. निर्मळ होतात. तेव्हां

हे शंकरा तुमचे 'दिग्वस्त्र' स्वच्छ करण्याला सूर्यच समर्थ आहे. मी दोन हातांनीं काय करणार? बरें, फुलांनीं मी तुमची पूजा करावी तर तें तरी मला कसें शक्य आहे? तुम्ही सर्वव्यापी आहां. तुम्हांला फुलें वहावयाची! म्हणजे मी विष्णु म्हणजे सर्वव्यापीच व्हावयाला पाहिजे. बरें, मीं तुम्हांला गंध वहावें तर तेंहि मला शक्य नाहीं. माझे हातच तुमच्या मालप्रदेशापर्यंत पोहोंचणार नाहींत. त्याला प्रत्यक्ष सर्वगामी वासुदेवच पाहिजे. माझ्या ठिकाणीं 'गंधवहता' म्हणजे वायूचें स्वरूपहि नाहीं. मी तुमच्या सर्वांगाला उटी कसा लावूं शकेन? 'अन्नपचने' म्हणजे तुमचा नैवेद्य शिजविण्याच्या बाबतींत सर्व देवांचा अध्यक्ष असलेला अग्नीच काय तो समर्थ आहे. माझ्या ठिकाणीं 'बहिर्मुखाध्यक्षता' म्हणजे देवांचा अध्यक्ष असलेल्या अग्नीचें स्वरूप नाहीं. मग मी तुमचा नैवेद्य तरी काय तयार करणार? आणि हे शंकरा! तुमच्यापुढें नैवेद्याला पात्र तरी कसलें ठेवूं! मी काय हिरण्यगर्भ थोडाच आहे! मी हिरण्यगर्भ असतों तर आपल्यापुढें सोन्याचें ताट ठेवूं शकलों असतों. तात्पर्य, कोणत्याहि प्रकारें तुमची सेवा करण्याचें सामर्थ्य माझ्या ठिकाणीं नाहीं. तेव्हां तुम्हीच निरपेक्ष बुद्धीनें मला उपकृत करा. मला कृतार्थ करा.

नालं वा परमोपकारकमिदं त्वेकं पशूनां पते
पश्यन्कुक्षि-गतांश्चराचरगणान्बाह्यस्थितान्रक्षितुम् ।
सर्वामर्त्यपलायनौषधमतिज्वालाकरं भीकरं
निक्षिप्तं गरलं गले न गिलितं नोद्गीर्णमेव त्वया ॥ २१ ॥

आचार्य म्हणतात, शंकरा! तुम्ही म्हणाल कीं, मी तुझ्यावर उपकार कां करावा? यावर माझें असें उत्तर आहे कीं, उपकार करणें हा तुमचा स्वभावच आहे. उदाहरणार्थ, सर्व देवांना धावरवून पळावयास लावणारें जणुं कांहीं औषधच असलेलें असें तें भयंकर, सर्वांगाचा दाह करून सोडणारें किंवा अत्यंत भयंकर ज्वालाकार असलेलें कालकूट विष तुम्हीं गळ्यांत ओतलें, तें आंत पोटांतहि उतरवूं दिलें नाहीं आणि बाहेरहि टाकलें नाहीं. कारण तुमच्या उदरांत सर्व चराचर विश्व वसलेलें आहे. तुम्हीं विष गिळलें असतें तर तुमच्या कुक्षीमध्यें असलेल्या सर्व चराचर गणांना दुःख झालें असतें. बाहेर टाकलें असतें तर बाहेर असलेल्या सर्व देवांना व इतर चराचर प्राण्यांना असह्य दुःख झालें असतें. अशा रीतीनें आंत-बाहेर वसत

असलेल्या चराचर प्राणिमात्रांच्या सुखाकरितां, संरक्षणाकरितां तें विष तुम्हीं आपल्या कंठांतच धारण केलें ! हे पशुपते ! आपलें कृत्य अत्यंत उपकारक असतें हें सिद्ध करण्याला हें उदाहरण पुरेसें होणार नाहीं का ? तात्पर्य, सर्व चराचर विश्वाला उपकृत करणाऱ्या तुम्हांला माझ्यावर उपकार करणें मोठें अवघड का आहे ?

ज्वालोग्रः सकलामरारि-भयदः क्ष्वेलः कथं वा त्वया
दृष्टः किं च करे धृतः करतले किं पक्व-जम्बूफलम् ।
जिव्हायां निहितश्च सिद्ध-गुटिका वा कण्ठदेशे धृतः
किं ते नीलमणिर्विभूषणमयं शम्भो महात्मन्वद ॥ ३२ ॥

हे शंभो महात्मन् ! सर्व देवांना अत्यंत भयंकर वाटणारे तें हालाहल — कालकूट विष तुम्हीं कंठामध्यें धारण केलें ! त्याच्या ज्वाळा अत्यंत उग्र होत्या. इतरांची त्याच्याकडे पहावयाचीहि शक्ति नव्हती ! तुम्ही तें कसें बरें पाहिलें ? एवढेंच नव्हे तर तें हातांतहि घेतलें. अगदीं तळहातावर घेतलें ! काय तें पिकलेलें जांभळ का होतें ? तें तुम्ही जिभेवरहि ठेवलें. रसायनाप्रमाणें रोगांचा परिहार करणारी, जरा-मृत्यूची निरास करणारी ती सिद्ध गुटिका का होती ! तें कालकूट तुम्हीं कंठांतहि धारण केलें. काय तो कंठमणि आहे ? कंठांत धारण करावयाचें तें नीलरत्न आहे काय ? तो अलंकार आहे काय ? सांगा मला. तात्पर्य, अत्यंत भयंकर विष पण तें केवळ परोपकाराकरितां आपण अलंकाराप्रमाणें अंगीकारलें. केवढें आपलें हें औदार्य आणि सामर्थ्य ? तात्पर्य, आपण उदार अंतःकरणानें मला कृतार्थ करा.

नालं वा सकृदेव देव भवतः सेवा नतिर्वा नुतिः
पूजा वा स्मरणं कथा-श्रवणमप्यालोकनं मादृशाम् ।
स्वामिन्नस्थिर-देवतानुसरणायासेन किं लभ्यते
का वा मुक्तिरितः कुतो भवति चेत्किं प्रार्थनीयं तदा ॥३३॥

हे देवा ! एकदांच जरी आपली सेवा केली, आपल्या चरणीं नमस्कार केला किंवा आपली स्तुति केली, अथवा पूजा, स्मरण, कथाश्रवण किंवा दर्शनहि घेतलें, तरी तें माझ्यासारख्याचे सर्व मनोरथ पूर्ण करण्याला पुरेसें होणार नाहीं

काय ? महाराज ! इतर अस्थिर – चंचल देवतांचें अनुसरण करण्यांत त्यांना भजण्यांत मला काय लाभ होणार ? आपण म्हणाल, मुक्ति मिळेल. ' का वा मुक्तिः ? ' मुक्ति म्हणजे काय ? आपण म्हणाल. ' सर्व संसार-दुःखांतून पूर्णपणें सुटका होणें म्हणजे मुक्ति. " तर मग महाराज ! ही मुक्ति स्वतः अस्थिर – चंचल असलेल्या देवतांकडून कशी मिळणार ? ही मुक्ति 'इतःकुतः' म्हणजे वाटेल त्या देवतेकडून मिळत असेल, तर मग आपल्यासारख्या सर्वश्रेष्ठ स्थिर देवतेजवळ मागण्यासारखें काय राहिलें ? आपल्याजवळ मी काय मागावें ? तात्पर्य, सांसारिक दुःखांतून पूर्णपणें सुटका होऊन, सच्चिदानंद परब्रह्मस्वरूपीं समरस होऊन रहाणें हेंच खरें मुक्तीचें स्वरूप होय आणि या मुक्तीचा लाभ स्वयं, कूटस्थ, अचल, परिपूर्ण, परात्पर भगवान् सदाशिव जगद्गुरु असे जे तुम्ही त्या तुमच्याशिवाय होणें शक्य नाही. म्हणून इतर देवतांना सोडून मी आपली प्रार्थना करीत आहे.

किं ब्रूमस्तव साहसं पशुपते कस्यास्ति शम्भो भव-
द्धैर्यं चेदृशमात्मनः स्थितिरियं चान्यैः कथं लभ्यते ।
भ्रश्यद्देवगणं त्रसन्मुनिगणं नश्यत्प्रपञ्चं लयं
पश्यन्निर्भय एक एव विहरत्यानन्दसान्द्रो भवान् ॥ ३४ ॥

हे पशुपते शंकरा ! आपल्या साहसाचें – धैर्याचें आम्हीं काय वर्णन करावें ? आपल्यासारखें धैर्य कोणाच्या अंगीं आहे ? हे शंभो ! आपल्यासारखी निर्विकार आत्मस्थिति – स्वस्वरूपीं स्थिर रहाणें इतरांना कसें लाभणार ? ज्यामध्यें सर्व देवांचे समुदाय आपआपल्या स्थानापासून भ्रष्ट होत आहेत, सर्व ऋषिमुनींचे समुदाय भयग्रस्त होत आहेत आणि सर्व प्रपंचाचा – विश्वाचा नाश होत आहे, अशा त्या भयंकर प्रलयकाळाकडे पाहूनहि निर्भयपणें तुम्ही एकटेच आपल्या आनंदघन स्वरूपानें विहार करीत रहातां. तात्पर्य, आपली निर्भयता आणि निर्विकारता अवर्णनीय आहे.

योगक्षेम-धुरंधरस्य सकल-श्रेयः-प्रदोद्योगिनो
दृष्टादृष्ट-मनोपदेश-कृतिनो बाह्यान्तर-व्यापिनः ।
सर्वज्ञस्य दयाकरस्य भवतः किं वेदितव्यं मया
शम्भो त्वं परमान्तरङ्ग इति मे चित्ते स्मराम्यन्वहम् ॥३५॥

हे प्रभो ! आपण भक्तजनांच्या योगक्षेमाची चिंता वाहाण्यास धुरंधर म्हणजे समर्थ आहां. भक्तजनांना अभिमत म्हणजे इष्ट असलेल्या अप्राप्त वस्तूंचा लाभ करून देणें याला योग म्हणतात आणि प्राप्त वस्तूंचें संरक्षण करणें याला क्षेम म्हणतात. सर्व भक्तजनांना कल्याण प्राप्त करून देणें हाच तुमचा सतत उद्योग आहे. इष्ट फळ म्हणजे भुक्ति आणि अदृष्ट फळ म्हणजे मुक्ति या दोन्ही प्रकारच्या, भक्तजनांना 'मत' म्हणजे अभिमत अर्थात् इष्ट असलेल्या फलांचा उपदेश करण्यांत आपण अत्यंत कुशल आहां. तसेंच आपण आंतबाहेर सर्व विश्वाला व्यापून राहिलेले आहां. आपण सर्वज्ञ आहां आणि दया करणारे अर्थात् पूर्ण दयाळू आहां. आपणांस मी काय सांगावें ? हे शंभो ! तुम्ही माझे अत्यंत अंतरंग म्हणजे पूर्णपणें मनापासून आवडणारे आहां अशाच भावनेनें मी अन्तःकरणामध्यें आपलें रोजच्या रोज चिंतन करीत असतों. तात्पर्य, मी जसें तुम्हांला अंतरंग म्हणून समजतों तसेंच तुम्ही पण मला अंतरंग म्हणून समजावें आणि मला कृतार्थ करावें.

भक्तो भक्तिगुणावृते मुदमृतापूर्णे प्रसन्ने मनः-
कुम्भे साम्ब तवाङ्घ्रि-पल्लवयुगं संस्थाप्य संवित्फलम् !
सत्त्वं मन्त्रमुदीरयन्निज-शरीरागार-शुद्धिं वह-
न्पुण्याहं प्रकटीकरोमि रुचिरं कल्याणमापादयन् ॥ २६ ॥

हे शंकरा ! आपण माझ्या देहरूपी वास्तूमध्यें नित्य वास्तव्य करावें अशी माझी विनंती आहे. तुम्ही म्हणाल कीं, वास्तुशांति झाल्याशिवाय कसें रहावें ! तर हें पहा, वास्तुशांतीसाठीं मी पुण्याहवाचन सुरू केलें आहे. अशा अभिप्रायानें स्तवन करीत आहेत. हे परमेश्वरा ! मी आपला भक्त आहें. आपल्या वास्तव्यासाठीं देहरूपी वास्तूची शांति करण्याकरितां पुण्याहवाचनाला आरंभ केला आहे. हा पहा अंतःकरणरूपी कलश. भक्तीच्या दोऱ्यानें तो सुतविला आहे. अर्थात् भक्तीचा दोरा त्याच्या भोंवतालीं गुंडाळलेला आहे. प्रेमाच्या जलानें तो पूर्ण भरलेला आहे. तो प्रसन्न म्हणजे स्वच्छ आहे, निर्मळ आहे. तुमचे दोन्ही चरणकमल हेच पल्लव त्यांत घातलेले आहेत आणि बुद्धिरूपी श्रीफल त्यावर ठेवलेलें आहे. सत्त्वगुणाचे मंत्र म्हणत मी स्वतःच्या शरीररूपी गृहाची शुद्धि करूं लागलों आहें. ही वास्तु कल्याणप्रद व्हावी म्हणून मी सुंदर म्हणजे मोठ्या

थाटांत पुण्याहवाचन सुरू करीत आहें. आतां आपण माझ्या देहरूपी वास्तूमध्यें आनंदानें रहावें.

आम्नायाम्बुधिमादरेण सुमनःसंघाः समुद्यन्मनो
मन्थानं दृढभक्ति-रज्जु-सहितं कृत्वा मथित्वा ततः ।
सोमं कल्पतरुं सुपर्व-सुरभिं चिन्तामणिं धीमतां
नित्यानन्द-सुधां निरन्तर-रमासौभाग्यमातन्वते ॥ ३७ ॥

हे प्रभो ! देवांचे समुदाय मोठ्या आदरानें वेदरूपी समुद्राचें मंथन करीत आहेत. त्यांनी आपलें उत्साही मन हाच रवि केला आहे. त्याला दृढभक्तीच्या दोऱ्या लावून मंथन करीत आहेत. या मंथनांतून चंद्र, कल्पतरु, कामधेनु, चिंतामणि आणि बुद्धिमान् लोकांना प्राप्त होणारा नित्य आनंद हेंच अमृत; तसेंच निरंतर रमा म्हणजे लक्ष्मीरूपी सौभाग्य प्राप्त करून घेत आहेत. तात्पर्य, वेदरूपी सागर तुम्हींच निर्माण केलेला आहे व त्यांतूनच सर्व देव आपआपलें अभीष्ट प्राप्त करून घेत आहेत. या श्लोकांत 'सुमनःसंघ' म्हणजे ज्यांनी आपलें मन प्रसन्न म्हणजे निर्मल केलेलें आहे अशा भक्तांचा समुदाय असाहि श्लेष अभिप्रेत आहे.

प्राक्पुण्याचल-मार्ग-दर्शित-सुधा-मूर्तिः प्रसन्नः शिवः
सोमः सद्गण-सेवितो मृगधरः पूर्णस्तमो-मोचकः ।
चेतःपुष्कर-लक्षितो भवति चेदानन्द-पाथोनिधिः
प्रागल्प्येन विजृम्भते सुमनसां वृत्तिस्तदा जायते ॥ ३८ ॥

पूर्वजन्मामध्यें संपादन केलेल्या पुण्यरूपी पर्वताच्या मार्गानें ज्याची अमृतमय मूर्ति प्रकट होत आहे, जो प्रसन्न म्हणजे निर्मल आहे, ज्याच्या भोंवतालीं उत्तम गण विराजमान झालेले आहेत, ज्यानें आपल्या हातांत मृग धारण केलेला आहे, अज्ञानरूपी अंधकाराचा निरास करीत असलेला असा तो शिवरूपी पूर्णचंद्र अंतःकरणरूपी कमलामध्यें उदयाला आला कीं, आनंदसागराला जोराचें भरतें येतें आणि त्या वेळीं भक्तजनांचीं मनें प्रसन्न होतात. पूर्वेकडील पावन उदयाचलाकडे आपलें अमृतमय मूर्तस्वरूप प्रकट करीत उदयाला येणारा, तसेंच प्रसन्न आणि तारागणांनीं युक्त असलेला आणि मृगचिन्ह धारण करणारा असा हा अंध-

काराचा नाश करीत पूर्ण चंद्र जेव्हां वर येतो तेव्हां सागराला भरतें येतें व लोकांचीं मनें प्रसन्न होतात.

धर्मो मे चतुरङ्घ्रिकः सुचरितः पापं विनाशं गतं
काम-क्रोध-मदादयो विगलिताः कालाः सुखाविष्कृतः ।
ज्ञानानन्द-महौषधिः सुफलिता कैवल्य-नाथे सदा
मान्ये मानस-पुण्डरीक-नगरे राजावतंसे स्थिते ॥ ३९ ॥

सदासर्वकाळ सर्वमान्य असलेला राजचक्रचूडामणि भगवन् सदाशिव माझ्या हृत्कमलरूपी नगरामध्यें विराजमान होऊन राहिले कीं, मी धन्य होईन. शिवमूर्ति माझ्या हृदयांत विराजमान झाली कीं, सर्वांगपरिपूर्ण धर्माचें मी आचरण केल्यासारखेंच झालें. माझें पापहि विनाशाला गेलें. काम, क्रोध, मद, मोहादि विकारहि गळाले आणि सर्वकाळ आयुष्यांतील सर्व क्षण सुखाचा आविष्कार करणारे असेच झाले म्हणून मी समजतों. त्याचप्रमाणें ज्ञान आणि आनंदरूपी महौषधि — महावेल सुफलित झाली. मी धन्य झालों.

धीयन्त्रेण वचो-घटेन कविता-कुल्योपकुल्या-क्रमै-
रानीतैश्च सदाशिवस्य चरिताम्भोराशि-दिव्यामृतैः ।
हृत्केदारयुताश्च भक्तिकलमाः साफल्यमातन्वते
दुर्भिक्षान्मम सेवकस्य भगवन्विश्वेश भीतिः कुतः ॥ ४० ॥

हे प्रभो विश्वेश्वरा ! बुद्धिरूपी रहाटगाडग्याला मी वाणी अर्थात् शब्दरूपी पोहरे बांधले. कवितारूपी लहानमोठे पाट बांधून त्या मार्गानें तुमच्या अर्थात् सदाशिवाच्या चरित्ररूपी जलराशींतून दिव्य जल आणलें आणि त्या जलानें अन्तःकरणरूपी वाफ्यामध्यें भक्तीच्या भाताचीं रोपें लावलीं. तीं रोपें आतां भाताच्या तुऱ्यांनीं बहरलीं आहेत (साफल्यमातन्वते). तीं रोपें कल्पनातीत फलद्रूप झालीं आहेत. हे परमेश्वरा ! आतां आपल्या या सेवकाला — मला दुर्भिक्षाची — दुष्काळांची भीति कसली ? तात्पर्य, माझ्या अंतःकरणांत तुमच्या भक्तीचे अंकुर फलद्रूप झाल्यामुळें मी तृप्त आहें, निश्चित आहें.

पापोत्पात-विमोचनाय रुचिरैश्वर्याय मृत्युंजय
स्तोत्र-ध्यान-नति-प्रदक्षिण-सपर्या-लोकनाकर्णने ।

जिह्वा-चित्त-शिरोऽङ्घ्रि-हस्त-नयन-श्रोत्रैरहं प्रार्थितो
मामाज्ञापय तन्निरूपय मुहुर्मामेव मा मेऽवचः ॥ ४१ ॥

शंकरानें वरचेवर आपल्याकडे पहावें व आपल्याशीं बोलावें अशा अभिप्रायानें आचार्य या श्लोकांत शंकरांची प्रार्थना करीत आहेत. हे प्रभो ! अनेक प्रकारच्या सांसारिक दुःखांनीं अगदीं गोंधळ घातला आहे, त्यांतून सुटका होण्याकरितां तसेंच रुचिर म्हणजे सुंदर अर्थात् विलोभनीय ऐश्वर्य प्राप्त होण्याकरितां माझ्या सर्व इंद्रियांनी मला प्रार्थना करून सांगितलें. जीभ म्हणाली, मला शंकरांचीं स्तोत्रें म्हणण्याची आज्ञा करा. चित्त म्हणालें कीं, मला शंकरांचें ध्यान करण्यांत गुंतवा. मस्तक म्हणालें, मला शंकारांच्या चरणीं प्रणाम करण्याचें काम द्या. पाय म्हणाले, आम्हांला शंकरांना प्रदक्षिणा करावयाला सांगा. हात म्हणाले, आम्हांला शंकरांची सपर्या म्हणजे पूजा करूं द्या. डोळे म्हणाले, आम्हांला शंकरांचें रूप पाहूं द्या. कान म्हणाले, आम्हांला शंकरांचीं चरित्रें ऐकूं द्या. याप्रमाणें सर्व इंद्रियांनीं 'मां आज्ञापय' आम्हांला आज्ञा करा अशी प्रार्थना केली. त्याप्रमाणें मीं माझीं सर्व इंद्रियें तुमच्या सेवेला लावलीं आहेत. हें सर्व लक्षांत घेऊन तुम्हीं आतां माझ्याकडेच कृपादृष्टीनें वरचेवर पहा. 'तत् मुहुः मामेव निरूपय' माझ्या बाबतींत हें असें मौन धारण करून बसूं नका. मे 'अवचः मा भवतु' माझ्याशीं न बोलण्याचें धोरण सोडून द्या. तात्पर्य, माझीं सर्व इंद्रियें मीं आपल्या सेवेला लावलीं आहेत. आपण कृपादृष्टीनें वरचेवर माझ्याकडे पहा व मौन सोडून माझ्याशीं बोला.

गाम्भीर्यं परिखापदं घनधृतिः प्राकार उद्यद्गुण-
स्तोमश्चातिबलं घनेन्द्रियचयो द्वाराणि देहे स्थितः ।
विद्यावस्तुसमृद्धिरित्यखिलसामग्रीसमेते सदा-
दुर्गातिप्रियदेव मामकमनो-दुर्गे निवासं कुरु ॥ ४२ ॥

हे देवा शंकरा ! तुम्ही दुर्गातिप्रिय आहां. दुर्गा म्हणजे पार्वतीदेवी ती तुमची अत्यंत प्रिय आहे. अथवा दुर्ग म्हणजे किल्ला, शत्रूंनीं आक्रमण करण्यास कठीण असें स्थान. तुम्ही किरातांचे – भिल्लांचे राजे आहां. तुम्हांला दुर्ग अत्यंत प्रिय आहे, तर मग तुम्ही माझ्या मनरूपी किल्ल्यामध्यें वास्तव्य करा. हा माझा मनरूपी किल्ला कसा आहे पहा. किल्ल्याभोंवतालीं खोल खंदक असतो. माझ्या

मनांतील गांभीर्य हें खंदकासारखें खोल आहे. धनधृति म्हणजे पक्कें धैर्य हाच माझ्या मनरूपी किल्ल्याचा प्राकार म्हणजे तट होय. मनामध्यें उदयाला येणारे शम-दम इत्यादि गुणांचे समुदाय हेच 'आप्तबल' म्हणजे मित्रबल समजावें. राजा किल्ल्यांत राहिला तरी त्याला मित्रबलाची आवश्यकता असतेच. माझ्या देहामध्यें असलेला सुदृढ इंद्रियांचा समुदाय हेच या मनरूपी किल्ल्याचे दरवाजे आहेत. विद्या हाच या मनरूपी किल्ल्यांतील सर्व वस्तूंचा संग्रह समजावा. दारूगोळा, शस्त्रें, अन्न, पाणी इत्यादि उपयुक्त वस्तूंचा संग्रह किल्ल्यांत असणें आवश्यक असतें. अशा रीतीनें सर्व सामग्रीनें युक्त असलेल्या माझ्या मनरूपी किल्ल्यांत हे शंकरा, आपण सर्वकाळ वास्तव्य करा. तात्पर्य, आपण माझ्या मनांत नेहमीं रहावें हीच माझी प्रार्थना आहे.

मा गच्छ त्वमितस्ततो गिरिश भो मय्येव वासं कुरु
स्वामिन्नादिकिरात मामकमनःकान्तारसीमान्तरे ।
वर्तन्ते बहुशो मृगा मदजुषो मात्सर्यमोहादय-
स्तान्हत्वा मृगया-विनोद-रुचिता-लाभं च सम्प्राप्यसि ॥४३॥

हे गिरिशा प्रभो शंकरा ! तुम्ही इकडे तिकडे कोठेंहि जाऊं नका. माझ्याच देहांत वास्तव्य करा. तुम्ही म्हणाल, मी तुझ्या देहांत वास्तव्य करून काय करूं ? मी बोलून-चालून आदिकिरात म्हणजे भिल्लांचा प्रमुख, जंगलांत भटकणारा व शिकार करणारा. तर मग हे स्वामिन् निषादाधिपते, तुम्ही माझ्याच देहांत वास्तव्य करा. माझ्या देहांत एक मनोरूपी जंगल अर्थात् माझें मन हेंच एक विशाल जंगल आहे. माझ्या मनोरूपी घनदाट जंगलाच्या मर्यादेमध्यें अत्यंत मदोन्मत्त असे मात्सर्य, मोह, काम, क्रोध, इत्यादि हिंस्र पशु पुष्कळच आहेत. त्यांना तुम्हीं मारलें म्हणजे तुम्हांला शिकार खेळल्याच्या आनंदाचा लाभ होईल. तात्पर्य, तुम्हीं माझ्या देहांत राहून, मनांत राहून माझ्या मनांतील काम-क्रोधादि विकार पार निवटून टाकावेत, अशी माझी प्रार्थना आहे.

करलग्नमृगः करीन्द्रभङ्गो-
घनशार्दूलविखण्डनोऽस्तजन्तुः ।

गिरिशो विशदाकृतिश्च चेतः-
कुहरे पञ्चमुखोऽस्ति मे कुतो भीः ॥ ४४ ॥

माझ्या हृदयकुहरामध्यें पंचवदन भगवान् शंकर हाच कोणी एक सिंह वास्तव्य करीत असल्यामुळें मला आतां भीति कसली ? अशा अभिप्रायानें वर्णन करीत आहेत. शंकरांना पांच मुखें असल्यामुळें पंचवदन, पंचास्य, पंचमुख अशीं नांवें आहेत. सिंहाचेहि चार पंजे मुखासारखेच अक्राळविक्राळ व विदारक असतात म्हणून चार पंजे व एक मुख मिळून त्यालाहि पांच मुखें आहेत, या दृष्टीनें सिंहालाहि पंचास्य, पंचमुख इत्यादि नांवें आहेत. 'चेतःकुहरे' म्हणजे हृदयरूपी गुहेमध्यें, गिरिश म्हणजे हिमाचलामध्यें कैलास पर्वतावर शयन करणारे भगवान् श्रीशंकर. सिंहाचाहि स्वभाव गिरिशिखरावर, पर्वतावर विश्रांति घेण्याचा असतोच म्हणून त्यालाहि हें विशेषण लागू पडतेंच, 'विशदाकृति' म्हणजे ज्याचा आकार स्वच्छ, स्पष्ट अथवा निर्मल आहे, असा हा पंचमुख म्हणजे सिंह. अर्थात् शंकररूपी सिंह माझ्या हृदयरूपी गुहेमध्यें वास्तव्य करीत आहे. मग मला हिंस्र श्वापदांची अर्थात् कामक्रोधादि विकारांची भीति कसली ? हृदयकुहरामध्यें रहाणारा हा शिवरूपी सिंह कसा आहे ? पहा : 'करलग्नमृगः' म्हणजे ज्यानें हातामध्यें मृग धारण केलेला आहे. सिंह देखील मृगांची शिकार करीत असल्यामुळें त्याच्याहि हातीं मृग लागलेला असतोच. याप्रमाणें हें विशेषण सिंह आणि शंकर या दोघांनाहि लागू पडतें. 'करीन्द्रभङ्ग' करीन्द्र म्हणजे प्रचंड हत्ती. त्याचा 'भंग' म्हणजे पराभव. सिंह हा हत्तीचा पराभव करतो हें प्रसिद्धच आहे. शंकरानींहि पण एकदां प्रचंड हत्तीचा नाश करून त्या हत्तीचें कातडें 'गजचर्म' आपल्या अंगावर धारण केलें आहे. म्हणून शंकरांनाहि 'करीन्द्रभङ्ग' हें विशेषण लागू पडतेंच. असें सांगतात कीं, दारुकावनामध्यें एकदां अनेक ऋषि एकत्र जमून यज्ञ करीत होते. यज्ञांत अगदीं गढून गेले होते. ते सर्व ईश्वरपराङ्-मुख होते. त्यांना ईश्वरप्रवण करण्याकरितां प्रत्यक्ष भगवान् शंकरच त्यांच्यापुढें अवतीर्ण झाले. कर्मांच्या जाळ्यांत गुरफटलेल्या त्या अहंकारी ऋषींनीं हा कोणी तरी पाखंडी आहे असें समजून शंकरांचा नाश करण्याकरितां आपल्या आभिचारिक मंत्रशक्तीनें एक प्रचंड हत्ती निर्माण केला आणि तो शंकरांच्या अंगावर घातला. शंकरांनीं सहज लीलेनेंच त्या हत्तीचा वध करून त्याचें कातडें

आपल्या पाठीवर घेतलें. तेव्हांपासून शंकरांना 'कृत्तिवासाः' असें नांव पडलें. 'कृत्तिवास' म्हणजे गजचर्मधारी. शंकरांनीं हत्तीला मारल्यानंतर त्या ऋषींनीं आपल्या मंत्रसामर्थ्यानें एक प्रचंड वाघ निर्माण केला ! शंकरांनीं त्या वाघालाहि सहज लीलेनें मारून त्याचें कातडें आपल्या कमरेभोंवतीं गुंडाळलें. तेव्हांपासून भगवान् शंकर हे व्याघ्रांबरधारी म्हणून प्रसिद्ध झाले. हें शंकरांचें प्रचंड सामर्थ्य पाहून सर्व ऋषींनीं अहंकार टाकला व हा पाखंडी नसून साक्षात् परमेश्वरच आहे असें समजून ते शंकरांना शरण गेले. शंकरांनीं सर्वांना सदुपदेश देऊन कृतार्थ केलें. 'घनशार्दूलविखण्डन' म्हणजे बलिष्ठ वाघाला मारणारा. हेंहि विशेषण सिंहाला आणि शंकरांना दोघांनाहि लागू पडतें. 'अस्तजन्तु' म्हणजे जंगलांतील श्वापदांना परास्त करणारा. सिंह जेथें रहातो तेथें इतर जनावरें सिंहाच्या भीतीनें वास्तव्य करीत नसतात म्हणून सिंहाला 'अस्तजन्तु' असें म्हटलें आहे. भगवान् शंकरहि प्रलयकाळीं सर्व सृष्टीचा उपसंहार करीत असल्यामुळें त्यांनाहि 'अस्तजन्तु' म्हटलें आहें. अशा रीतीनें या श्लोकांतील सर्व विशेषणें सिंहाला व शंकरांना लागू पडतात. तात्पर्य, ज्यांच्या हृदयांत शंकरांनीं वास्तव्य केलें त्यांना भीति कशाची असणार ? ते सर्वस्वीं निर्भय होतात. हा श्लोक अर्धसम वृत्तांतला असून याला छन्दःशास्त्रांत 'कालभारिणी' असें नांव दिलेलें आहे. या श्लोकांतील पहिला व दुसरा तसेंच तिसरा व चौथा हे चरण सारखे आहेत. या वृत्ताला कांहीं ठिकाणीं मालभारिणी किंवा माल्यभारा असेंहि नांव दिलेलें आढळतें. "विषमे ससजा यदा गुरू चेत् सभरा येन तु कालभारिणीयम्" असें या वृत्ताचें लक्षण आहे.

छन्दःशारिव-शिखान्वितैर्द्विज-वरैः संसेविते शाश्वते
सौख्यापादिनि खेदभेदिनि सुधासारैः फलैर्दीपिते ।
चेतःपक्षिशिखामणे त्यज वृथासञ्चारमन्यैरलं
नित्यं शंकर-पादपद्म-युगली-नीडे विहारं कुरु ॥ ४५ ॥

वेदरूपी वृक्षाच्या शेंड्यावर बसलेल्या श्रेष्ठ द्विजांनीं ज्याचा आश्रय केलेला आहे, द्विज म्हणजे पक्षी आणि द्विज म्हणजे ब्राह्मण. पक्षी हे झाडांच्या फांद्यांवर शेंड्यावर रहात असतात व ब्राह्मण हे वेदांच्या शाखांच्या आश्रयानें रहात असतात. शंकरांचें स्वरूप केवळ वेदानेंच समजण्यासारखें असल्यामुळें वेदांच्या शाखा, उपनिषदें वगैरे या भागांतच आश्रय करण्याला योग्य असें

शंकरांचें चरणारविंदयुगलरूपी घरटें आहे. त्याच्या भोंवतालीं द्विजवरांची म्हणजे श्रेष्ठ ब्राह्मणांची वसति आहे. वृक्षाच्या शाखा जशा पक्ष्यांनीं आश्रयिलेल्या असतात, त्याचप्रमाणें या वेदवृक्षाच्या शाखा ब्राह्मणांनीं सेविलेल्या आहेत. तें घरटें शाश्वत म्हणजे अविनाशी आहे. त्या घरट्यांत वास्तव्य केलें कीं सौख्याचा लाभ होतो, सर्व दुःखांचा नाश होतो. त्या शिवचरणरूपी घरट्यामध्यें अमृतासारखी गोड रसाळ फळें आहेत. पक्ष्यांच्या घरट्यांतील फळें पेरू, डाळिंब वगैरे तर शंकरांच्या चरणारविंदरूपी घरट्यांतील फळें म्हणजे शिवसलोकता, शिवसमीपता, शिवसरूपता, शिवसायुज्यता इत्यादि सर्व प्रकारच्या मुक्ति समजाव्यात. या फळांनीं हें घरटें दीपित म्हणजे प्रकाशित आहे, प्रख्यात आहे. आचार्य आपल्या मनाला म्हणतात, हे मना! मनोरूपी श्रेष्ठ पक्ष्या! तूं या शंकरांच्या चरणयुगलरूपी घरट्याचा आश्रय करून रहा. व्यर्थ इकडे तिकडे भटकणें सोडून दे. अन्य ठिकाणीं जाणें पुरें कर. तूं नित्य कमलाप्रमाणें कोमल आणि रम्य असलेल्या श्रीशंकरांच्या चरणयुगलरूपी घरट्यांत विहार करीत रहा. तेथेंच तूं रम. धन्य होशील.

आकीर्णे नख-राजि-कान्ति-विभवैरुद्यत्सुधा-वैभवै-
राधौतेऽपि च पद्मराग-ललिते हंस-व्रजैराश्रिते ।
नित्यं भक्ति-वधू-गणैश्च रहसि स्वेच्छा-विहारं कुरु
स्थित्वा मानसराजहंस गिरिजानाथाङ्घ्रि-सौधान्तरे ॥ ४६ ॥

हे मना! माझ्या मानसराजहंसा! तुला आपल्या इच्छेप्रमाणें स्वैर विहारच करावयाचा असेल तर तो गिरिजानाथ म्हणजे भगवान् श्रीशंकर यांच्या चरणकमलरूपी राजमहालांतच विहार कर. तेथें परमेश्वराच्या नखमालिकेच्या कांतीचें वैभव पसरलेलें आहे. सदाशिवाच्या नखपंक्तीच्या तेजोवैभवानें तो महाल पूर्णपणें व्यापलेला आहे. शंकरांच्या पदनखकांतीचें वैभव असें आहे कीं, जणुं कांहीं त्यांतून अमृताचें वैभवच उदयाला येत आहे. प्रभूचे चरणकमल स्वच्छ, निर्मळ असूनहि तें आरक्तवर्ण असल्यामुळें पद्मरागरत्नाप्रमाणें अत्यंत सुंदर दिसत आहे. सदाशिवाच्या चरणकमलरूपी महालाचा अनेक हंसांनीं, शुद्धमानस असलेल्या भक्तसमूहांनीं आश्रय घेतलेला आहे. वा माझ्या मनोरूपी राजहंसा! भक्तिरूपी स्त्रीगणांसह तूं तेथेंच एकान्तांत नित्य स्वच्छन्द विहार कर. तात्पर्य, माझ्या मना! तूं शंकरांच्या चरणकमलींच स्थिर रहा.

शम्भुध्यान-वसंत-सङ्गिनि हृदारामेऽघ-जीर्ण-च्छदाः
स्रस्ता भक्ति-लता-च्छटा विलसिताः पुण्य-प्रवाल-श्रिताः ।
दीप्यन्ते गुणकोरका जप-वचः-पुष्पाणि सद्वासना
ज्ञानानन्द-मुधा-मरन्द-लहरी संवित्फलाभ्युन्नतिः ॥ ४७ ॥

अहाहा ! शिवभक्तीनें पावन झालेलें माझें हृदय हें एक उपवनच आहे. शंकरांचें ध्यान हाच वसंत ऋतु या उपवनांत अवतरलेला आहे. शिवध्यानरूपी वसंताच्या समागमानें माझ्या हृदयरूपी उपवनांत पापांची—मलिन वासनांची जीर्णपानें गळून पडलीं आहेत. भक्तिरूपी लतांचे अंकुर टवटवीत दिसत आहेत. त्यांना पुण्यकर्मांची, शुद्ध निर्मल वासनांची कोमल पालवी फुटलेली आहे. या माझ्या शिवभक्तीनें पावन झालेल्या हृदयरूपी 'आरामांत' म्हणजे बागेंत शमदमादि गुणांच्या कोमल कळ्या बहरलेल्या आहेत. या बागेंत 'ॐ नमः शिवाय' या मंत्राच्या जपाचीं अक्षरें अथवा शंभो, शंकरा, महादेवा, प्रभो, परमेश्वरा, विश्वनाथा, सदाशिवा इत्यादि नाममंत्रांचीं अक्षरें हींच फुलें विकसित झालेलीं आहेत. सद्वासना, ज्ञान आणि आनंद हाच अमृताप्रमाणें मधुर असा पुष्पांचा रस (मकरंदलहरी) स्रवत आहे. तसेंच संवित् म्हणजे शुद्धबोध, परिपूर्ण, परब्रह्माची स्फूर्ति हीच या बागेंतील फलांची समृद्धि होय. प्रत्येकानें आपल्या हृदयाला शिवभक्तीनें पावन करून त्याला या आरामाचें—उपवनाचें स्वरूप द्यावें आणि अद्वितीय आनंद लुटावा.

नित्यानंद-रसालयं सुर-मुनि-स्वान्ताम्बुजाताश्रयं
स्वच्छं सद्द्विज-सेवितं कलुपहृत्सद्वासनाविष्कृतम् ।
शम्भु-ध्यान-सरोवरं व्रज मनोहंसावतंस स्थिरं
किं क्षुद्राश्रय-पल्वल-भ्रमण-संजात-श्रमं प्राप्स्यसि ॥ ४८ ॥

हे माझ्या मना ! मनोरूपी हंसश्रेष्ठा राजहंसा ! स्थिर म्हणजे नित्य—अविनाशी असलेलें शंकरांचें ध्यान, चिंतन हेंच कोणी सरोवर, ह्याच सरोवराला जा आणि तेथेंच रहा. नित्य अविनाशी आनंदाचा अनुभव हेंच या सरोवरांतील जल आहे. नित्यानंदरसाचें तें स्थान आहे. देव आणि ऋषिमुनि यांची अन्तःकरणें हींच कोणीं कमलें, या कमलांचें हें सरोवर आश्रयस्थान आहे. तें अत्यंत स्वच्छ आहे. ज्याप्रमाणें एखाद्या सरोवरावर मोर, कोकिळा, भारद्वाज, शुक, चक्रवाक

इत्यादि उत्तम पक्षी वास्तव्य करतात म्हणून तें 'सद्विज' आहे. त्याप्रमाणें 'सद्विज' म्हणजे चांगलें उत्तम सदाचारसंपन्न तत्त्ववेत्ते ब्राह्मण यांनीं तें नित्य सेविलेलें आहे. द्विज शब्दाचे ब्राह्मण आणि पक्षी असे दोन अर्थ आहेत. बा मना ! त्याच सरोवरावर तूं रहा. क्षुद्र देवतांच्या ध्यान-चिंतनरूपी डबक्यांत व्यर्थ परिभ्रमण करून कां दुःख भोगतोस ? तात्पर्य, क्षुद्र कामनांच्या आहारीं जाऊन क्षुद्र देवतांच्या उपासनेंत काळ घालविण्यापेक्षां निष्कामबुद्धीनें सच्चिदानंदघन परब्रह्मस्वरूप असलेल्या सदाशिवाचीच उपासना करावी. यांतच खरें कल्याण आहे.

आनन्दामृत-पूरिता हर-पदाम्भोजालवालोद्यता
स्थैर्योपघ्नमुपेत्य भक्ति-लतिका शाखोपशाखान्विता ।
उच्चैर्मानसकायमानपटलीमाक्रम्य निष्कल्मषा
नित्याभीष्ट-फलप्रदा भवतु मे सत्कर्म-संवर्धिता ॥ ४९ ॥

शिवभक्तीची वेल माझे सफल मनोरथ पूर्ण करो अशा अभिप्रायानें आचार्य वर्णन करीत आहेत : मी आपल्या हृदयांत भक्तीची वेल लावलेली आहे. तिच्या मुळाभोंवतालीं श्रीशंकरांच्या चरणकमलांचें आळें केलेलें आहे. त्यांतच तिची वाढ झालेली आहे. त्या भक्तिलतेला आनंदाचें अमृत म्हणजे जल भरपूर घातलें आहे. स्थैर्यरूपी आधार-दंडाच्या आश्रयानें ती वर चढलेली आहे. तिला श्रवण-कीर्तनादि रूपानें शाखा-उपशाखा फुटलेल्या आहेत. खूप उंच असलेल्या अर्थात् अत्यंत शुद्धश्रेष्ठ असलेल्या 'मानसकायमानपटली' म्हणजे अन्तःकरणस्वरूपी मांडव. या मांडवाला आक्रम्य म्हणजे व्यापून ती भक्तिलता निष्कल्मष म्हणजे निर्दोष झालेली आहे. अर्थात् तिला मलिन वासनांची कीड, रोगराई वगैरे कांहीं नाहीं. सत्कर्मांचें खत घालून ती मीं वाढविलेली आहे. अशी ती माझ्या हृदयांतील शिवभक्तिरूपी वेल मला नित्य अभीष्ट म्हणजे मनोवांच्छित फलें देणारी होवो. तात्पर्य, माझ्या हृदयामध्यें वाढलेली ही शिव-भक्तिरूपी लता मला नित्य अभीष्ट फळें देत राहो.

सन्ध्यारम्भ-विजृम्भितं श्रुति-शिरः-स्थानान्तराधिष्ठितं
सप्रेम-भ्रमराभिरामसकृत्सद्वासना-शोभितम् ।
भोगीन्द्राभरणं समस्त-सुमनः-पूज्यं गुणाविष्कृतं
सेवे श्रीगिरि-मल्लिकार्जुन-महालिङ्गं शिवालिङ्गितम् ॥५०॥

श्रीगिरि म्हणजे श्रीशैल पर्वत. या पर्वतावर मल्लिकार्जुन नांवाचें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक सुप्रसिद्ध श्रीशंकरांचें महालिंग आहे. तें पार्वतीनें आलिंगिलेलें आहे. आचार्य म्हणतात, त्याची मी भक्तिपूर्वक सेवा करीत आहें. कसें आहे तें मल्लिकार्जुनरूपी महालिंग ? तर सांगतात कीं, तें संध्याकाळच्या वेळीं तांडव-नृत्याच्या निमित्तानें विशाल रूप धारण करतें. उपनिषदांतील विविध स्थानांतून त्याचें वर्णन केलेलें आहे. भक्तीचे, प्रेमाचे भ्रमर अर्थात् प्रेमळ भ्रमर त्याच्या भोंवतालीं गुंजारव करीत असल्यामुळें तें मोठें सुंदर दिसत आहे. 'असकृत्' म्हणजे वारंवार तें निर्मल वासनांनीं सुभोषित होत आहे. नागराज हाच ज्याचा अलंकार आहे, सर्व 'सुमनस्' म्हणजे देव अथवा शुद्ध मनाचे साधुसंत महात्मे यांनीं पूजा करण्यास योग्य आहे. अर्थात् त्यांनीं त्याची पूजा, उपासना केलेली आहे. ते सर्व देवांमध्यें पूज्य म्हणजे श्रेष्ठ, आदरणीय आहे. असाहि ' समस्त-सुमनःपूज्यं ' याचा अर्थ होतो ! 'गुणाविष्कृत' म्हणजे आयुष्याला कृतार्थ करणाऱ्या अनेक गुणांचा, दैवी संपत्तीचा आविष्कार ज्याच्यांतून होत आहे, असें तें मल्लिकार्जुन महालिंग, त्याची मी उपासना करीत आहें.

अर्जुन हें एक प्रकारच्या वृक्षाचें नांव आहे. याला अर्जुनसादडा असें म्हणतात. हे वृक्ष ६०—७०—८० फूट उंच असतात. खोड सरळ आणि पांढरें असतें. त्याला पाहून जणुं कांहीं संगमरवरी शंकरांची ती पिंडच आहे अथवा शुभ्र चंदन चर्चिलेले भगवान् शंकरच आहेत किंवा शंकरांनीं सर्वांगावर विभूतीचें उधळणच केलें आहे कीं काय, असा भास होतो. याची त्वचा बाहेरून पांढरी पण आंतून तांबूस आणि मऊ असते. पानें पेरूच्या पानाप्रमाणें ४ ते ६ इंच लांब आणि २—४ इंच रुंद असतात. एका डहाळीला १० ते १५ पानांच्या जोड्या असून शेंड्याला एक पान असतें. फुलें पांढरीं अथवा फिकट पिवळसर असतात. फळें कमरखासारखीं असतात. अर्जुनवृक्षाच्या अंगीं फार उपयुक्त गुण आहेत. ह्याच्या अंतरसालीचें चूर्ण दूध, तूप अथवा गुळाच्या पाण्याबरोबर घेतलें तर हृदयाचे विकार दूर होतात. हृदयाची गति विकृत असेल तर ती सुधारते. यानें हृदयाचें पोषण चांगलें होऊन हृदयाला शक्ति येते. जीर्णज्वर थांबतो. याच्या सेवनानें रक्त व पित्त शुद्ध होऊन रक्तपित्तजन्य विकाराना आळा बसतो. तृष्णा आणि दाह यांचा उपशम होतो. अर्जुनवृक्ष हें एक रसायन आहे. तूप, मध आणि अर्जुनाच्या अंतरसालीचें चूर्ण नित्य सेवन केल्यानें

मनुष्य दीर्घायुषी होतो. अर्जुनाच्या सालीचा काढा घेतल्यास जीर्णज्वर थांबतो. अर्जुनाचें चूर्ण गव्हाच्या रव्याची खीर करून त्यांत दूध आणि तूप घालून घेतल्यास शरीरांतील भंगलेलीं हाडें सांधतात, तीं मजबूत होतात. जेथें हाड मोडलें अथवा पिचलें असेल तेथें याच्या सालीचा लेप केल्यानें हाड सांधलें जातें. याच्या सालीच्या काढ्यानें व्रण धुतल्यास आणि व्रणांत याचें चूर्ण भरल्यास व्रण लवकर भरून येतात. यानें रक्तस्राव थांबतो. स्त्रियांनीं पोटांत घेतल्यास रक्तप्रदर आणि श्वेतप्रदर यांसारखे स्त्रियांना अशक्त बनविणारे रोगहि यानें नाहींसे होतात. मूत्रावरोध आणि मूत्रकृच्छ्र या विकारांतहि याचा काढा किंवा चूर्ण पोटांत घेतलें असतां फार उपयोग होतो. हा वीर्यस्तंभन करणारा आणि बल देणारा आहे. फुप्फुसांतील क्षतेंहि यानें बरीं होतात. खोकला थांबतो, क्षयाची बाधा नाहींशी होते. विषावरहि याचा चांगला उपयोग होतो. हा लघु, रुक्ष आणि कटु विपाकी असल्यामुळें मधुमेहांतहि याचा उपयोग होईल. याच गुणांनीं हा मेदहि कमी करील. हा कषाय रसाचा असल्यामुळें कफजन्य त्वग्विकार कं , कुष्ठ आदि यानें नाहींसे होतात. हा शीतवीर्य असल्यामुळें पित्तजन्य त्वग्विकार आणि इतर पित्तजन्य रोग यानें नाहींसें होतांत. याच्या चूर्णानें दांत घासले असतां ते बळकट होतील. याच्या काढ्यानें चुळा भरल्यास हिरड्यांची सूज कमी होईल. हिरड्यांचे व जिभेचेहि व्रण बरे होतील. अर्जुनाचें चूर्ण मधांतून चाटल्यास अथवा साल दुधांत वांटून मधांतून घेतल्यास साधा अतिसार व रक्तातिसारहि थांबतो. खरूज, नायटे, विंब्वा उतणें, रुईचा अथवा शेराचा चीक उतणें, अग्निक्षार इत्यादिकांनीं दाह होऊन व्रण निर्माण होणें, या सर्व विकारांत अर्जुनाचीं पानें कुटून लेप करावा, अथवा साल वांटून लेप करावा. या लेपानें तारुण्यपीटिकाहि जातात. कंकुमादि चूर्ण, अर्जुनारिष्ट व अर्जुनघृत हे सर्व अर्जुनाचेच कल्प आहेत. अशा रीतीनें हा वृक्ष शंकरांप्रमाणें मानवी जीवितांचें कल्याण करणारा आहे. याला संस्कृतमध्यें 'शिवमल्लक' असेंहि नांव असल्याचें दिसून येतें. हे झाले अर्जुनाचे गुण. आतां आपण मल्लिकेचे गुण पाहूं या.

मल्लिका ही एक लता आहे. हिलाच मालती असेंहि म्हणतात. श्रीशैल पर्वतावरील अर्जुन वृक्षाला मालतीनें शेंड्यापर्यंत वेष्टिलेलें असतें. अर्जुनाचीं व मालतीचीं फुलें संध्यासमयीं प्रफुल्लित होतात. त्यांच्या भोंवतालीं भ्रमर म्हणजे भुंगे गुंजारव करीत विरड्या घालीत असतात. त्यांची शोभा कांहीं अद्वितीय

दिसते. सर्वत्र सुगंध दरवळलेला असतो. त्यामुळें तेथें नागराजहि आश्रय करून रहातात. शोभा, सौगंध्य इत्यादि धर्मांनीं मल्लिकार्जुनांचीं फुलें सर्व फुलांत फारच श्रेष्ठ असतात. मल्लिका आणि अर्जुन या दोवांचेहि गुणधर्म फारच चांगले आणि उपयुक्त आहेत. मल्लिका ही साक्षात् जगज्जननी पार्वतीच आहे. संस्कृतभाषेमध्यें गौरी आणि गिरिजा असे तिचे पर्यायवाचक शब्दच आहेत. गिरिजा आणि गौरी शब्दांचा अर्थ पार्वती हा प्रसिद्धच आहे. मल्लिकेला मालती असें दुसरें नांव आहे. मालती शब्दाचे मराठींत दोन अर्थ आहेत. जाई आणि मोगरा. 'मल्लिकार्जुन' या नांवांत मल्लिका हा शब्द जाई या अर्थानेंच आचार्यांनीं वापरलेला आहे. वृक्षाला शेंड्यापर्यंत व्यापण्याचें कार्य जाईच करूं शकतें. मोगरा फारसा उंच वाढत नाहीं. ही मल्लिका अर्जुनवृक्षाला शेंड्यापर्यंत लपेटून रहाते. जणुं कांहीं मल्लिकेनें अर्जुनाला आलिंगिलेलेंच असतें. जसें पार्वतीनें शंकरांना आलिंगावें तशीच शोभा दिसते. म्हणूनच तर या दोहोंची एकरूपता व्यक्त करण्यासाठीं 'मल्लिकार्जुन' हा एकच शब्द 'शंकर' या अर्थानें रूढ झाला. पार्वती देखील गुणांनीं शंकरांपेक्षां कांहीं कमी नाहीं. मल्लिकेचे गुणधर्महि जवळ जवळ अर्जुनासारखेच आहेत.

जाईच्या वेली आपल्या नेहमींच पहाण्यांत असतात. पांच पाकळ्यांचीं पांढरी शुभ्र सुंदर सुगंधी अशीं जाईचीं फुलें कोणाच्या मनाला आकृष्ट करीत नाहींत ? जाईचीं मुळें, पानें आणि फुलें मानवाच्या अनेक व्याधींना दूर करून मानवाचें जीवन सुखी करतात. जाई ही गुणानें लघु, स्निग्ध आणि मृदु आहे. हिचा विपाक कटु असून, रस कडवट आणि कषाय आहे. ही वीर्यानें उष्ण आहे. कडवट आणि तुरट रसामुळें ही कफपित्तांचें शमन करते, तर उष्णवीर्य असल्यामुळें वाताचाहि निरास करते, अर्थात् ही त्रिदोषशमनी आहे. आणि म्हणून गुणांनीं ही अर्जुनापेक्षां कांकणभर अधिकच आहे. हिचीं पानें खडिसाखरेबरोबर चावून खालीं असतां मुखरोग नाहींसे होतात, दांत बळकट होतात. जाईच्या पानांच्या आणि मुळ्यांच्या काढ्यानें व्रण धुतले असतां व्रणांतील दोष नाहींसे होतात, व्रण लवकर भरून येतात. जाईच्या तेलाचा बोळा व्रणांत ठेवला असतां व्रण सत्वर भरून येतो. जाईचीं पानें वांटून अंगाला लावलीं असतां कुष्ठ, कंडु इत्यादि त्वग्रोग बरे होतात. पाना-फुलांचा काढा पोटांत घेतल्यास रक्तदोष नाहींसे होतात, रक्त शुद्ध होतें. स्त्रियांच्या ठिकाणीं आर्तवप्रवृत्ति होते.

जाईच्या पाना-फुलांनीं सिद्ध केलेलें तेल वातविकाराचा निरास करतें. पाना-फुलांचा काढा सेवन केल्यास शौचाला साफ होते. यानें मूत्रकृच्छ्र मूत्राव-रोधहि नाहींसा होतो. याच्या सेवनानें वीर्यवृद्धि होऊन शरीर सुदृढ होतें. जाईच्या मुळांचा लेप अंगाला लावल्यास अंगकांति उत्तम होते. डोक्याला लाव-ल्यास डोकें दुखणें थांबतें. अर्धांग अथवा अर्दित यांसारखे वातविकार जाईच्या फुलांच्या तेलानें व मुळाच्या लेपानें बरे होतात. पानांच्या रसानें व फुलांनीं सिद्ध केलेलें तेल कानांत घातलें असतां कानाचा ठणका थांबतो. कानांतील पूहि थांबतो. जाईच्या फुलांचा रस डोळ्यांत घालून चोथ्याच्या घड्या डोळ्यांवर ठेवून रात्रीं झोंपावें म्हणजे डोळे दुखणें, लाल होणें, चिपडे येणें, डोळ्यांची आग होणें इत्यादि नेत्रविकार नाहींसे होतात. यानें विषविकारहि निंकले जातात. रजोदोष आणि पांढ्याहि जाईच्या मुळांच्या काढ्यानें व लेपनानें नाहींसे होतात. जाईच्या मुळांचा काढा ज्वरहि नाहींसा करतो. मिरीं, पिंपळी व खडीसाखर यांबरोबर जाईच्या पानांचा रस दिला असतां ओकारी थांबतें. असो. याप्रमाणें जाईचेहि गुणधर्म अर्जुनासारखेच प्रायः सर्व पहावयास सांपडतात. याप्रमाणें मल्लिकार्जुनांच्या गुणांचा आविष्कार लक्षांत घेऊनच आचार्यांनीं श्लोकाच्या तिसऱ्या चरणांत 'गुणाविष्कृतं' असें जें विशेषण दिलेलें आहे तें अत्यंत समर्पक असल्याचें प्रत्ययास येतें. आचार्यांना श्रीशैल पर्वत फार आवडत होता. योगतारावलींतील एका श्लोकांत त्यांनीं श्रीशैल पर्वता-बद्दलचा आपल्या अंतःकरणांतील आदर व्यक्त केला आहे. "मला श्रीशैल पर्वताच्या शिखरावरील गुहेंत केव्हां समाधि लागेल ? त्या निर्विकल्प समाधींत माझें मन परब्रह्मस्वरूपाशीं समरस झालेलें आहे, अशी सिद्धि मला केव्हां प्राप्त होईल ? श्रीशैल पर्वतावर लागलेल्या समाधींत माझ्या शरीराला लतांनीं वेष्टिलेलें आहे व पक्ष्यांनीं कर्णकुहरांत घरटीं बांधलेलीं आहेत, अशी अवस्था मला केव्हां प्राप्त होईल ? माझ्या मनामध्यें नित्य 'विहरतां श्रीशैलवासी प्रभुः' अशी श्रीमल्लिकार्जुनाची प्रार्थना पुढच्याच श्लोकांत केलेली आहे." श्रीशैल पर्वतावर एके काळीं मल्लिकावेष्टित अर्जुन वृक्षांची फार दाटी असली पाहिजे. मल्लिकार्जुन वृक्षसमूहांतच या महाज्योतिर्लिंगाची स्थापना झालेली असल्यामुळें या ज्योतिर्लिंगाला मल्लिकार्जुन हेंच नांव मिळालें असावें. अर्जुन वृक्ष हा शंकराप्रमाणें व मल्लिका ही गिरिजेप्रमाणें दिसत असल्यामुळें शिवा म्हणजे पार्वती – गिरिजा,

आलिंगिलेल्या अशा या मल्लिकार्जुन संज्ञक महाज्योतिर्लिंगाची मी नित्य
। करीत आहे, असा या श्लोकाचा तात्पर्यार्थ आहे.

भृङ्गीच्छा-नटनोत्कटः करि-मद-ग्राही स्फुरन्माधवा-
ह्लादो नाद-युतो महा-सित-वपुः पञ्चेषुणा चादृतः ।
सत्पक्षः सुमनोवनेषु स पुनः साक्षान्मदीये मनो-
राजीवे भ्रमराधिपो विहरतां श्रीशैल-वासी विभुः ॥ ५१ ॥

भृंगी नांवाच्या ऋषींच्या इच्छेमुळें अथवा भृंगी हें एका शिवगणाचेंहि
व आहे त्याच्या इच्छेमुळें नृत्य करण्यांत तन्मय झालेला तसेंच उन्मत्त झालेल्या
ीची अथवा गजासुराची मस्ती जिरवून त्याला निगृहीत करणारा, ज्याच्या-
ई पाहून माधवाला म्हणजे विष्णूला आनंद होतो, नृत्यसमयीं शंख, डमरू
यादि वाद्यांच्या नादांनीं युक्त असलेला, त्याचप्रमाणें पांढरें शुभ्र शरीर असलेला
णि 'पंचेषु म्हणजे पंचबाण जो मदन -- कामदेव त्यानें आदरिलेला तसेंच सुमनस्
णजे देव अथवा शुद्ध अंतःकरणाचे भक्तजन त्यांच्या वनामध्यें म्हणजे
मुदायामध्यें सत्पक्ष धारण करणारा अथवा 'सुमनोऽवन' म्हणजे देवांचें व
क्तांचें 'अवन' म्हणजे रक्षण करण्याविषयीं नेहमीं उत्तम पक्ष धारण करणारा,
सेंच श्रीशैल पर्वतावर वास्तव्य करणारा, सर्वसमर्थ भगवान् मल्लिकार्जुन महादेव
ाच कोणी श्रेष्ठ भ्रमर, त्याला कमल अत्यंत प्रिय असल्यामुळें तो प्रत्यक्ष माझ्या
नोरूपी कमळामध्यें सतत वास्तव्य करो हीच माझी मनीषा आहे. या श्लोकांत
ाकरांना भ्रमर कल्पिलेलें आहे. भ्रमर जसा कमळामध्यें प्रेमानें रमतो, त्याप्रमाणें
ीशैल पर्वतावर वास्तव्य करणाऱ्या श्रीमल्लिकार्जुन सदाशिवरूपी भ्रमरानें माझ्या
त्कमलांत रमावें, अशी आचार्य प्रार्थना करीत आहेत.

या श्लोकांतील शंकरांना दिलेलीं सर्व विशेषणें भ्रमराला म्हणजे भुंग्यालाहि
ागू पडतात. चिदंबर क्षेत्रांत जसे भगवान् शंकर भृंगी ऋषींच्या इच्छेमुळें
ृत्यांत तन्मय होऊन नटराज बनले, त्याचप्रमाणें भ्रमर देखील भृंगीच्या
भ्रमरीच्या इच्छेनें नृत्यांत तिच्याभोंवतीं फिरट्या घालण्यांत तत्पर होतो.
ागील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें शंकरानें उन्मत्त हत्तीचा वध केला म्हणून त्यांना
'करिमदग्राही' म्हटलेलें आहे. भ्रमर देखील हत्तीच्या गंडस्थलांतून पाझर-
णाऱ्या दानोदकाचें -- द्रवाचें ग्रहण करीत असतो म्हणून तोहि करिमदग्राही

झाला. 'स्फुरन्माधवाह्लादः' चिदंबर क्षेत्रांत नटराजाच्या मंदिराशेजारींच श्रीविष्णूचेंहि मंदिर आहे. शंकरांचें तांडवनृत्य पाहून श्रीविष्णूच्या हृदयांत आनंदाचें स्फुरण होत असल्याचें दृश्य तेथें दृष्टीस पडतें. हा भाव लक्षांत घेऊन शंकरांना 'स्फुरन्माधवाह्लाद' हें विशेषण दिलेलें आहे. माधव शब्दाचा अर्थ वसंत ऋतु असाहि आहे. वसंत ऋतूंतील फुललेलें फुलांचें 'ताटवे' पाहून भ्रमरालाहि आल्हाद होत असतो म्हणून हें विशेषण भ्रमरालाहि लागू पडतें. 'नादयुक्त' शंकर विविध वाद्यांच्या नादानें युक्त असतात, तर भ्रमर गुंजारवानें युक्त असतो. शंकरांनीं मदनाला भस्म केल्यानंतर पुन्हां त्याच्यावर अनुग्रह केला व त्याला सर्वांच्या मनांतच राहाण्याकरितां स्थान दिलें. तो मूर्तरूपानें दिसत नसला तरी कामरूपानें प्रकट होतोच म्हणून त्याला 'अनंग', 'काम' अशीं नांवें मिळालीं. अर्थात् कामदेवानें महादेवाचा आदर केला हें निराळें सांगणें नकोच.

कामदेवानें जगाला जिंकण्याकरितां अप्सरा, फुलें, सुगंध वायु इत्यादि जी सामग्री स्वीकारली होती त्यांत भ्रमरांचाहि अंतर्भाव होता म्हणून 'पंचेषुणा चादृतः' हें विशेषण भ्रमरालाहि लागू पडतें. 'सुमनोवन' म्हणजे फुलांचे समुदाय. त्यामध्यें भ्रमर हा पंख पसरून गुंजारव करीत विरट्या घालीत असतो. म्हणून भ्रमराला सत्पक्षः असें म्हटलें आहे. भ्रमराला कमल आवडतें म्हणून शिवरूपी भ्रमराला रमण्याकरितां स्वतःच्या हृदयाला 'राजीव' म्हणजे कमल म्हटलेलें आहे. 'महासितवपु' याचा शंकरांकडे अर्थ करतांना कर्पूरगौर, अत्यंत शुभ्र वर्णाचा असा अर्थ करावा. आणि भ्रमराकडे लावतांना 'महा असित वपु' म्हणजे अत्यंत काळ्या रंगाचा असा अर्थ करावा. सित म्हणजे शुभ्र व असित म्हणजे काळा. भ्रमर कृष्णवर्णाचा असतो हें प्रसिद्धच आहे. अशा रीतीनें या श्लोकांत आचार्यांनी सर्वांगपरिपूर्ण रूपकाची कल्पना फारच उत्तम केली आहे.

कारुण्यामृत-वर्षिणं घन-विपद्ग्रीष्म-च्छिदा-कर्मठं
विद्या-सस्य-फलोदयाय सुमनः-संसेव्यमिच्छाकृतिम् ।
नृत्यद्भक्त-मयूरमद्रि-निलयं चञ्चज्जटा-मण्डलं
शम्भो वाञ्छति नीलकन्धर सदा त्वां मे मनश्चातकः ॥५२॥

शंकरांना पाण्यानें भरलेल्या ढगाची आणि स्वतःच्या मनाला चातकाची कल्पना करून आचार्य या श्लोकांत शंकरांची स्तुति करीत आहेत. हे नीलकंठा,

शंकरा, माझें मन हाच चातक पक्षी. तो सदासर्वकाळ तुमची इच्छा करीत आहे. कारण तुम्ही करुणारूपी अमृताचा वर्षाव करीत असतां भक्तजनांच्या प्रचंड संकटरूपी उन्हाळ्याचा उच्छेद करण्याच्या कामीं तुम्ही सतत गढून गेलेले असतां. विद्यारूपी धान्यसमृद्धीचा उदय व्हावा म्हणून शुद्ध अंतःकरणानें भक्तजन तुमची सेवा करतात. आपल्या इच्छेप्रमाणें तुम्ही विविध आकार धारण करतां. तुमच्या मस्तकावरील जटाभार मोठा सुंदर शोभत आहे. भक्तरूपी मोर तुमच्या भोंवतालीं नृत्य करीत आहेत. तुम्ही कैलास पर्वताचा आश्रय करून राहिलेले आहांत. हे परमेश्वरा! तुम्ही माझ्या मनोरूपी चातकाला पाण्यानें भरलेल्या ढगासारखेच दिसत आहां. म्हणून हा मनरूपी चातक पक्षी तुमची सारखी इच्छा करीत आहे. तुमच्या कृपेची अपेक्षा करीत आहे.

या श्लोकांत 'नीलकंधर' या शब्दाचे दोन अर्थ आहेत. 'कंधरा' म्हणजे ग्रीवा – कंठ. तो निळा असल्यामुळें शंकरांना नीलकंठ किंवा नीलग्रीव असें म्हणतात. याप्रमाणें नीलकंधर म्हणजे शंकर असा एक अर्थ झाला. 'नीलकंधर' या शब्दाचा दुसरा अर्थ मेघ – ढग असा आहे. 'कं' म्हणजे उदक – पाणी, त्याला धारण करणारा तो कंधर म्हणजे जलधर अर्थात् मेघ असा अर्थ झाला. तो वर्णानें काळा असल्यामुळें नीलकंधर याचा अर्थ काळा ढग असा झाला. काळा ढग हा पाण्यानें भरलेला असतो. त्याच ढगांतून जलवृष्टि होत असते. पाऊस पडत असतो. त्याच ढगामुळें ग्रीष्म ऋतूचा ताप दूर होतो. धान्य-फल-समृद्धीहि अशाच ढगानें होत असते. अशा ढगामुळें मनें प्रसन्न होतात. या ढगाच्या आकृति वाटेल तशा असतात. या ढगांना पाहून मोर नाचतात. हे ढग पर्वतांच्या शिखरांवर व कडेवर अर्थात् मध्यभागावर आश्रय करून रहातात. जणुं कांहीं पर्वतांचा तो सुशोभित जटाभारच होय. तात्पर्य, नीलकंठ भगवान् शंकर आणि पाण्यानें भरलेला काळा ढग हे दोन्ही सारखे आहेत तेव्हां शिवरूपी नीलघनाची माझ्या मनोरूपी चातक पक्ष्यानें प्रतीक्षा करणें योग्यच आहे. तर हे नीलकंठा! माझ्या या मनोरूपी चातक पक्ष्याची कामना तुम्ही तृप्त करा हेंच माझें मागणें आहे!

आकाशेन शिखी समस्त-फणिनां नेत्रा कलापी नता-
नुग्राहि-प्रणवोपदेश-निनदः केकीति यो गीयते।
।मां शैल-समुद्भवां घनरुचिं दृष्ट्वा नटन्तं मुदा
शान्तोपवने विहार-रसिकं तं नीलकण्ठं भजे ॥ ५३ ॥

विषप्राशन केल्यामुळें शंकरांचा कंठ निळा-काळा पडला म्हणून शंकरांना नीलकंठ असें नांव पडलें. मोराचा कंठ निसर्गतःच निळा असतो. मोरालाहि नीलकंठ म्हणतात. भगवान् शंकर हे एक नीलकंठ म्हणजे मयूरच आहेत. अशी कल्पना करून आचार्य या श्लोकांत शंकरांची स्तुति करीत आहेत. मोराच्या मस्तकावर शिखा म्हणजे तुरा असल्यामुळें मोराला 'शिखी' असें नांव पडलें आहे. हे शंकरा! आपल्याहि डोक्यावर आकाश शिखेप्रमाणें शोभत आहे म्हणून आपणहि शिखी आहांत. मोर आपल्या मागें पंखांची प्रभावळ उभी करतो त्याला 'कलाप' असें म्हणतात. मोराच्या प्रत्येक पंखावर डोळा असतो, डोळ्याचें चिन्ह असतें. असा हा मोराचा कलाप दिसण्यांत मोठा सुंदर दिसतो. या कलापामुळेंच मोराला 'कलापी' असें नांव आहे. शंकरा! आपल्याहि पाठीशीं समस्त नागांचा नेता म्हणजे प्रमुख जो शेष तो उभा आहे. त्याची फणा देखील हजारों नेत्र असल्यामुळें प्रभावळी-सारखी सुंदर दिसते. तो तुमचा 'कलाप'च होय. यामुळें तुम्ही देखील 'कलापी' झाला. मोर मोठमोठ्यानें शब्द करूं लागला म्हणजे त्या शब्दांचे सभोंवार निनाद उमटतात. मोराच्या शब्दाला 'केका' म्हणतात, आणि या शब्दावरूनच मोराला 'केकी' असें नांव पडलें आहे. हे महादेवा! आपणहि चरणीं नम्र झालेल्या भक्त-जनांना अनुग्रह करून प्रणवाचा उपदेश करतां तेव्हां त्या उपदेशाचे निनाद केकेप्रमाणेंच उमटत असतात; म्हणून आपणांस 'केकी' असेंहि म्हटलें जातें. पर्वतांच्या शिखरांवर आणि दऱ्याखोऱ्यांतून प्रकट होणाऱ्या श्यामवर्ण ढगांची शोभा पाहून मोराला मोठा आनंद होतो व तो नाचूं लागतो. शंकरा! आपणहि शैलसमुद्भवा म्हणजे पर्वतराजाच्या पोटीं जन्माला आलेली 'घनरुचि' म्हणजे तेजःपुंजाप्रमाणें शोभणारी श्यामा म्हणजे सर्वलक्षणसंपन्न अशी सुंदर स्त्री अर्थात् पार्वती, तिच्याकडे पाहून आनंदानें नृत्य करतां. मोराला उपवनामध्यें विहार करण्याची आवड असते. आपणालाहि वेदान्तउपनिषद्रूपी उपवनामध्यें विहार करण्याची, वेदान्ताचा उपदेश देण्याची आवड आहेच. याप्रमाणें हे शंकरा! आपण नीलकंठ म्हणजे मयूरच आहां. मी त्या नीलकंठाला, मयूराला भक्तिभावानें भजत आहें.

सन्ध्या घर्म-दिनात्ययो हरिकराघात-प्रभूतानक-
ध्वानो वारिद-गर्जितं दिविषदां दृष्टिच्छटा चञ्चला ।

भक्तानां परितोष-बाष्प-वितति-र्वृष्टिर्मयूरी शिवा
यस्मिन्नुज्ज्वल-ताण्डवं विजयते तं नीलकण्ठं भजे ॥ ५४ ॥

आचार्य या श्लोकांत नीलकंठाच्या तांडवनृत्याचें वर्णन करीत आहेत. नीलकंठ शब्दाचे 'मोर' आणि 'शंकर' असे दोन अर्थ वर आपण पाहिलेच आहेत. मोर संध्याकाळच्या वेळीं नाचत असतात. ग्रीष्म ऋतूचा शेवट आणि वर्षा ऋतूचा आरंभ हाच मोरांच्या नाचण्याचा काळ असतो. त्या वेळेला मेघांची गर्जना होत असते, विजा चमकत असतात, वृष्टि होत असते, लांडोरहि सान्निध्यांत असते. अशा वेळीं मोरांना फारच आनंद होत असतो व त्या आनंदाच्या भरांत ते खूप नाचत असतात. जणुं कांहीं ते त्यांचें तांडवनृत्यच होय. शंकरांचें 'तांडवनृत्यहि' संध्या म्हणजे प्रदोषकाळींच होत असते. 'घर्मांदिनात्यय' म्हणजे उन्हाळ्याच्या दिवसांचा शेवट आणि पावसाळ्याचा आरंभ. शंकर हे शीतप्रिय असल्यामुळें हे दिवस त्यांच्या तांडव-नृत्याला योग्यच आहेत. शंकरांचें तांडव नृत्य सुरू झालें म्हणजे प्रत्यक्ष भगवान् विष्णु दुंदुभी अथवा मृदंग वाजवीत असतात. हीच मेघगर्जना समजावी. 'दिविषद्' म्हणजे देव. देवांच्या दृष्टींचे समुदाय हीच चंचला म्हणजे विद्युत् समजावी. शंकरांचें तांडवनृत्य पाहून भक्तजनांना आनंद होतो व त्या आनंदानें त्यांच्या नेत्रांतून अश्रु वाहतात. हा भक्तजनांचा आनंदाश्रुप्रवाह हीच वृष्टि समजावी. शंकरांच्या तांडवनृत्याच्या वेळीं सान्निध्यांत असलेली शिवा म्हणजे पार्वती हीच मयूरी समजावी. अशा रीतीनें ज्याच्या ठिकाणीं तांडवनृत्याचा उत्कर्ष पहावयास सांपडतो त्या नीलकंठाला— मयूराप्रमाणें असलेल्या शंकरांना मी अनन्यप्रेमानें भजत आहें.

आद्यायामित-तेजसे श्रुति-पदैर्वेद्याय साध्याय ते
विद्यानन्द-मयात्मने त्रिजगतः संरक्षणोद्योगिने ।
ध्येयायाखिलयोगिभिः सुरगणैर्गेयाय मायाविने
सम्यक्ताण्डव-सम्भ्रमाय जटिने सेयं नतिः शम्भवे ॥ ५५ ॥

जटाधारी शंभु महादेवाला हा माझा नमस्कार असो. कसे आहेत भगवान् शंकर महादेव? असें कोणी विचारील तर सांगतात. ते 'आद्य' म्हणजे सर्व देवांमध्यें प्रमुख आहेत. आद्य याचा अर्थ सर्वप्रथम असाहि

आहे. भगवान शंकर हे परब्रह्मस्वरूप असल्यामुळें ते आद्य म्हणजे विश्वाचें मूळ अधिष्ठान आहेत. तसेंच ते 'अमिततेजस्' म्हणजे अपरिमित तेजःस्वरूप आहेत. वेदांतील शब्दांनीं श्रुतिवाक्यांनींच ते 'वेद्य' म्हणजे जाणण्यास योग्य आहेत. वेदानें उपदेश केल्याशिवाय त्यांच्या यथार्थ स्वरूपाचें ज्ञान होत नाहीं. तें सर्व भक्तजनांच्या मनांतील साध्य म्हणजे फलस्वरूप आहेत. विद्या आणि आनंद हेंच त्यांचें स्वरूप आहे. अर्थात् ते ज्ञानमय आणि आनंदमय आहेत. त्रैलोक्याचें संरक्षण करणें हाच त्यांचा उद्योग आहे. सर्व योगीजनांनीं नित्य ध्यान करण्यास ते योग्य आहेत. देवगणांनीं त्यांच्या कीर्तीचें गान करावें, वर्णन करावें अशी त्यांची कीर्ति आहे. ते 'मायावी' म्हणजे मायेला खेळविणारे, मायेला आपल्या ताब्यांत ठेवणारें, आपल्या मायेनें विश्वाला मोहविणारे, अत्युत्तम तांडवनृत्यांतच ते नेहमीं गढलेले असतात. त्यांतच त्यांना आनंद वाटत असतो. अशा त्या तुम्हां जटाधारी शंकराला हा माझा नमस्कार असो.

नित्याय त्रिगुणात्मने पुरजिते कात्यायनीश्रेयसे
सत्यादि-कुटुम्बिने मुनि-मनः-प्रत्यक्ष-चिन्मूर्तये ।
मायां-सृष्ट-जगत्त्रयाय सकलाम्नायान्त-सञ्चारिणे
मायंनाण्डव-सम्भ्रमाय जटिने सेयं नतिः शम्भवे ॥ ५६ ॥

भगवान् शंकर हे नित्य म्हणजे अविनाशी आहेत. ते स्वभावतः निर्गुण असूनहि सत्त्व, रज आणि तम या तिन्ही गुणांच्या रूपानें (विश्वाच्या कार्याकरितां) नटलेले आहेत. त्यांनीं त्रिपुरासुराचा वध केलेला आहे. कात्यायनी देवीचे—पार्वतीचे ते मूर्तिमत मंगलच आहेत. ते पूर्ण सत्यस्वरूप आदिकुटुंबी आहेत. सर्व विश्व हेंच त्यांचें कुटुंब म्हणजे परिवार असल्यामुळें मुख्य कुटुंबी तेच आहेत. त्यांच्या चिन्मयमूर्तीचें मुनिजनांच्या मनाला प्रत्यक्ष दर्शन होत असतें. मायेचा अंगीकार करून त्यांनीं त्रैलोक्य निर्माण केलें. सर्व वेदांमध्यें अथवा वेदांचा अंतिम भाग असलेलीं जीं उपनिषदें त्यांमध्यें किंवा सर्व वेदांचें सारसर्वस्वस्वरूप असलेल्या उपनिषद्वाङ्मयामध्यें संचार करणारा, अर्थात् सर्व वेदांचा अथवा उपनिषदांचा प्रतिपाद्य विषय असलेला असेंच त्यांचें रूप आहे. प्रदोषसमयीं ते तांडवनृत्याच्या उत्साहांत निमग्न असतात. त्यांच्या मस्तकावर जटाभार शोभत आहे. अशा शंभुमहादेवाला हा माझा भक्तिपूर्वक नमस्कार असो.

नित्यं स्वोदर-पूरणाय सकलानुद्दिश्य वित्ताशया
व्यर्थं पर्यटनं करोमि भवतः सेवां न जाने विभो ।
मज्जन्मान्तर-पुण्य-पाक-बलतस्त्वं शर्व सर्वान्तर-
स्तिष्ठस्येव हि तेन वा पशुपते ते रक्षणीयोऽस्म्यहम् ॥ ५७॥

सदासर्वकाळ स्वतःच्या उदरपूर्तीकरितां पैशाच्या आशेनें सर्वांकडे मी व्यर्थच धाव घेत सुटतों. हे परमेश्वरा, तुझी सेवा मी कांहीं लक्षांत घेतली नाहीं. तुझ्या सेवेकडे लक्ष दिलें नाहीं. तुझी सेवा केली नाहीं. माझें पूर्वजन्मांतील पुण्य प्रबल. त्या पुण्याच्या परिपाकाच्या सामर्थ्यानें हे शंकरा, तुम्ही सर्वांतर्यामी आहां म्हणूनच माझ्याहि पण अन्तर्यामामध्यें तुम्ही राहिलेलेच आहां. या कारणानें का होईना हे पशुपते, परमेश्वरा ! तुम्ही माझें संरक्षण केलें पाहिजे.

एको वारिज-बान्धवः क्षिति-नभो-व्याप्तं तमो-मण्डलं
भित्त्वा लोचनगोचरोऽपि भवसि त्वं कोटिसूर्यप्रभः ।
वेद्यः किं न भवस्यहो घनतरं कीदृग्भवेन्मत्तम-
स्तत्सर्वं व्यपनीय मे पशुपते साक्षात्प्रसन्नो भव ॥ ५८ ॥

हे पशुपते शंकरा ! वारिजबांधव म्हणजे भगवान् सूर्यनारायण. हा एकटा एकच एक असूनहि साऱ्या भूमंडळाला आणि गगनमंडळाला व्यापून टाकणाऱ्या अंधकारपटलाचा भेद करून, तो मला दृग्गोचरहि होत आहे. अर्थात् तो माझ्या दृष्टीस पडतो, मी त्याला पाहूं शकतों. पण तुम्ही कोटिसूर्यासारखे तेजस्वी असूनहि माझ्या अंतःकरणांतील तमाचा, अज्ञानपटलाचा भेद करून, मला दृग्गोचर होत नाहीं. तुम्ही माझ्या दृष्टीस पडत नाहीं ! मी तुम्हांला पाहूं शकत नाहीं ! खरोखर माझ्या अंतःकरणांतील अज्ञानरूपी तमःपटल किती दाट असलें पाहिजे ! परमेश्वरा ! तें सर्व माझें अज्ञानपटल दूर करून तुम्ही मला प्रत्यक्ष दर्शन द्या, प्रसन्न व्हा, हीच माझी प्रार्थना आहे.

हंसः पद्मवनं समिच्छति यथा नीलाम्बुदं चातकः
कोकः कोकनदप्रियं प्रतिदिनं चन्द्रं चकोरस्तथा ।
चेतो वाञ्छति मामकं पशुपते चिन्मार्गमृग्यं विभो
गौरीनाथ भवत्पदाब्जयुगलं कैवल्य-सौख्य-प्रदम् ॥ ५९ ॥

हे प्रभो शंकरा! हंस ज्याप्रमाणें विकसित असलेल्या कमलवनाची इच्छा करतो, चातक जसा काळ्या ढगाची – पाण्यानें भरलेल्या ढगाची अपेक्षा करतो, चक्रवाक पक्षी ज्याप्रमाणें प्रत्येक दिवशीं सूर्याची – सूर्यदर्शनाची इच्छा करतो, सूर्य अस्ताला गेला कीं, चक्रवाक पक्ष्यांचें जोडपें वियुक्त होत असतें. पुन्हां सूर्यदर्शन होईपर्यंत ते एकमेकांना दिसत नसतात. आपली विरहव्यथा दूर होण्यासाठीं ते सूर्यनारायणाची मोठ्या आतुरतेनें मार्गप्रतीक्षा करीत असतात. त्याचप्रमाणें चकोर पक्षी देखील चंद्राची मोठ्या आतुरतेनें वाट पहात असतो. त्याचप्रमाणें हे पशुपते, गौरीशंकरा! माझें मन ज्ञानमार्गामध्येंच ज्याचा शोध लागू शकतो अशा मुक्तिसुखाला प्राप्त करून देणाऱ्या तुमच्या चरणकमलयुगलाला पाहूं इच्छित आहे. तात्पर्य, माझ्या चित्ताला तुमच्या चरणकमलाची आस लागलेली आहे. ती तुम्ही पूर्ण करा.

रोधस्तोयहृतः श्रमेण पथिकश्छायां तरोर्वृष्टितो
भीतः स्वस्थ-गृहं गृहस्थमतिथिर्दीनः प्रभुं धार्मिकम् ।
दीपं सन्तमसाकुलश्च शिखिनं शीतावृतस्त्वं तथा
चेतः सर्वभयापहं व्रज सुखं शम्भोः पदाम्भोरुहम् ॥ ६० ॥

या श्लोकांत आचार्य अत्यंत आतुरतेनें शंकरांच्या चरणीं शरण जाण्याचें मनाला अनेक उदाहरणें देऊन सुचवीत आहेत. नदींत पाण्याच्या प्रवाहांत वाहवणारा जसा कांठाला लागण्याचा प्रयत्न करतो, कांठाला लागण्यासाठीं उत्कंठित झालेला असतो, उन्हामध्यें चालून थकलेला प्रवासी जसा झाडाच्या छायेकडे जातो, जोरदार पावसांत सांपडून वावरलेला मनुष्य ज्याप्रमाणें निवाऱ्याच्या जागीं धाव घेतो, अथवा भुकेलेला अतिथि जसा गृहस्थाश्रम्याच्या घरीं जातो आणि तान्हेलेला पाण्याकडे धाव घेतो, त्याचप्रमाणें दीन मनुष्य जसा धार्मिक धन्याला जाऊन गांठतो, तसेंच निबिड अंधकारानें पीडित झालेला जसा दिव्याकडे जातो, दिव्याची अपेक्षा करतो, दिवा मिळवितो किंवा थंडीनें कुडकुडणारा 'शिखिनं' म्हणजे अग्नीकडे – शेकोटीकडे जातो, त्याचप्रमाणें माझ्या मना! तूं देखील सर्व भयाचा निरास करणाऱ्या सदाशिवाच्या चरणकमलीं शरण जा आणि सुखी हो.

अङ्कोलं निज-बीज-सन्ततिरयस्कान्तोपलं सूचिका
साध्वी नैज-विभुं लता क्षितिरुहं सिन्धुः सरिद्वल्लभम् ।
प्रामोतीह यथा तथा पशुपतेः पादारविन्द-द्वयं
चेतोवृत्तिरुपेत्य तिष्ठति सदा सा भक्तिरित्युच्यते ॥ ६१ ॥

अंकोल वृक्षाच्या बियांचा असा स्वभाव आहे कीं, त्या बिया देठापासून सुटल्या तरी झाडालाच चिकटून रहातात. दूर टाकल्या तरी झाडाकडेच आकृष्ट होतात. हा त्यांचा स्वभाव लक्षांत घेऊन आचार्य म्हणतात, निजबीजसंतति म्हणजे स्वतःच्या बीजांचा समुदाय—अंकोल वृक्षाच्या बीजांचा समुदाय जसा अंकोल वृक्षाकडेच खेचला जातो, सुया ज्याप्रमाणें लोहचुंबकाकडे खेचल्या जातात, अथवा साध्वी म्हणजे सती, पतिव्रता स्त्री ही जशी स्वतःच्या पतीच्या सेवेंत तत्पर असते, वेली ज्याप्रमाणें वृक्षाचा आश्रय घेऊन रहातात, इकडे तिकडे जात नाहींत किंवा नदी ज्याप्रमाणें सागराकडे धाव घेते व सागरांत एकरूप होऊन रहाते, त्याचप्रमाणें आपल्या अंतःकरणाची वृत्ति पशुपति भगवान् शंकर याच्या चरणारविंदाकडे अनन्यप्रेमानें धाव घेऊन जर तेथें सतत स्थिर राहील तरच ती खरी भक्ति समजावी. तात्पर्य, शंकरांच्या चरणीं आकृष्ट होऊन अनन्यप्रेमानें चित्तवृत्ति जर तेथें स्थिर राहील तरच ती खरी भक्ति म्हटली जाते. या श्लोकांत आचार्यांनीं खऱ्या निष्काम भक्तीची मोठी उत्तम व्याख्या केलेली आहे.

आनन्दाश्रुभिरातनोति पुलकं नैर्मल्यतश्छादनं
वाचाशङ्खमुखे स्थितैश्च जठरापूर्तिं चरित्रामृतैः ।
रुद्राक्षैर्भसितेन देव वपुषो रक्षां भवद्भावना-
पर्यङ्कं विनिवेश्य भक्ति-जननी भक्तार्भकं रक्षति ॥ ६२ ॥

भक्तिरूपी जननी म्हणजे माता ही भक्तरूपी अर्भकाला आनंदाश्रूंनीं न्हाऊ घालून पुलकित करते, भक्तरूपी बालकाच्या देहाला टवटवी आणते, त्याला निर्मलपणाचें पांघरूण घालते, स्वच्छतेचें त्याच्यावर आच्छादन घालतें, वाचारूपी शंखाच्या मुखांत अथवा गोकर्णांत घेतलेल्या तुमच्या चरित्ररूपी अमृतानें—दुधानें ती बालकाची उदरपूर्ति करते, बालकाला भरविते, बालकाच्या अंगावरून रुद्राक्षें फिरवून आणि शंकरांची विभूति बालकाच्या अंगाला लावून त्या अंगाऱ्यानें बालकाचें

ती रक्षण करतें, बालकाला भूतपिशाचादिकांची किंवा कोणाच्या दृष्टीची बाधा होऊं देत नाहीं. हे शंकरा ! नंतर भक्तरूपी अर्भकाला तुमच्या ध्यानरूपी पलंगावर झोंपवून ही भक्तिरूपी माता त्या भक्तरूपी अर्भकाचें रक्षण अर्थात् भरणपोषण करीत असते. केवढे हे भक्तीचे उपकार आहेत ! या श्लोकांत आचार्यांनीं भक्तीला मातेच्या ठिकाणीं कल्पून माता हींच जशी अर्भकाचें सर्वतोपरी संगोपन करते, त्याचप्रमाणें भक्ति हींच जीवाचें संरक्षण करून त्याचें कल्याण करूं शकते, म्हणून भक्तीचीच जीवानें कांस धरावी असें सूचित केलेलें आहे.

मार्गावर्तित-पादुका पशुपतेरङ्गस्य कूर्चायते
गण्डूषाम्बु-निषेचनं पुररिपोर्दिव्याभिषेकायते ।
किञ्चिद्भक्षित-मांस-शेष-कवलं नव्योपहारायते
भक्तिः किं न करोत्यहो वनचरो भक्तावतंसायते ॥ ६३ ॥

सुप्रसिद्ध तिरुपति क्षेत्राजवळच कालहस्ति नांवाचें एक क्षेत्र आहे. येथील सुप्रसिद्ध शिवालयांत एक पुजारी भक्तिभावानें शंकरांची सांगोपांग पूजा करून रात्रीच्या वेळीं आपल्या घरीं जात असे. तेथेंच एक कण्णप्प नांवाचा पारधी रहात होता. तोहि मोठा शिवभक्त होता. अरण्यांत भटकून शिकार करून कुटुंबनिर्वाह करीत असे. रात्रीं सर्वत्र सामसूम झाल्यानंतर तो शंकरांची पूजा करण्याकरितां शिवालयांत येत असे. नदीवर जावयाचा, स्नान करावयाचा, लक्तरें गुंडाळून, पायांत पादत्राणें घालून व उरले-सुरले मांसाचे तुकडे बरोबर घेऊन यावयाचा. येतांना तोंडांत भरगच्च चूळ भरलेली असायची. असा हा त्याचा सर्व थाट, त्याच्या जातीला व संस्काराला शोभण्यासारखाच होता. त्याचें शंकरांवर प्रेम मात्र अत्यंत उच्च कोटींचें होतें. त्याची भक्ति अत्यंत श्रेष्ठ कोटीची होती. तो शंकरांजवळ आल्याबरोबर फू करून तोंडांतली चूळ शंकरांच्या अंगावर टाकायचा. हाच त्याचा शंकरांना अभिषेक असे. नंतर पूर्वीची केलेली पूजा तो वाजूला सारीत असे. बेल, फुलें वगैरे सर्व कांहीं काढून टाकीत असे. तें काढतांना शंकरांची पिंडी, शाळुंका व भोंवतालचा भाग आपल्या पादत्राणानेंच झाडीत असे. या रीतीनें शंकरांना तो स्वच्छ करीत असे. नंतर आणलेल्या मांसाचे तुकडे शंकरांच्यापुढें ठेवीत असे. बेल, निर्गुडी, धोतऱ्याचीं फुलें वगैरे मिळेल तें शंकरांना मोठ्या भक्तीनें वाहत असे व नमस्कार करून निघून जात असे. दुसऱ्या दिवशीं पहाटेच गुरव यायचा.

त्याला आपण केलेली पूजा नाहीशी झालेली आहे व शंकरांच्या सभोवार मांसाचे तुकडे पडलेले आहेत हें पाहून फारच दुःख व्हावयाचें. रोजच असा अनुभव त्यास येऊं लागला. हे कोण करीत असावें हें त्याला कळेना. तोहि मोठा शंकरांचा भक्त होता. शंकरानें त्याच्या स्वप्नांत सांगितलें कीं, अरे! तो माझा मोठा अनन्यभक्त आहे. त्यानें तूं केलेली पूजा विसकटली म्हणून दुःख मानूं नकोस. त्याच्या प्रेमाची चुणूक मी तुला दाखवितो. आज रात्रीं तूं गाभाऱ्यांत लपून रहा आणि पहा. त्या गुरवानें शंकरांच्या सांगण्याप्रमाणें केलें. रोजच्याप्रमाणें तो पारधी आला. त्याला आज त्या पिंडींत शंकराचें प्रत्यक्ष दर्शन झालें. शंकरांच्य एका डोळ्यांतून रक्त वाहत असलेलें पाहून त्याला अतिशय दुःख झालें. तो फार तळमळला, रडला. शेवटीं त्यानें तीक्ष्ण बाणाच्या घात्यानें आपला एक डोळा काढून शंकरांच्या डोळ्याला लावला. तो डोळा बरा झाला तोंच दुसऱ्या डोळ्यांतून रक्त वाहूं लागलें! त्यानें आपला दुसराहि डोळा काढून शंकरांच्या डोळ्याला लावला! भगवान् शंकर प्रसन्न झाले. त्यांनीं त्या पारध्याला दृष्टि दिली. गुरवालाहि अनन्यभक्तीची कल्पना आली. शेवटीं त्या दोघांनाहि शंकरानें कृतार्थ केलें. हा सर्व भक्त कण्णपाचा इतिहास लक्षांत घेऊन आचार्य स्तुति करीत आहेत 'मार्गावर्तितपादुका' म्हणजे रस्त्यानें इकडून तिकडे फिरतांना घातलेलीं पादत्राणें हीं शंकरांच्या अंगाला झाडणाऱ्या कुंचल्यासारखीं उपयोगाला येत आहेत. 'गण्डूषाम्बुनिषेचनं' म्हणजे गालांत साठविलेले जल फू करून शिंपडणें हाच जणुं कांहीं अभिषेक होत आहे. थोडेसें भक्षण करून शिल्लक राहिलेल्या मांसाचा घास हाच ताज्या पक्वान्नासारखा होत आहे. अहो! खरोखर ईश्वराची अनन्यभक्ति ही काय करीत नाहीं? एक क्षुद्र वनचर पारधी, पण तोहि अनन्यप्रेमानें भक्तशिरोमणी म्हणून गणला जात आहे! शंकरा! धन्य आहे तुमचें भक्तवात्सल्य!

दक्षस्ताडनमन्तकस्य कठिनाऽपस्मार-सम्मर्दनं
भूभृत्पर्यटनं नमत्सुर-शिरः-कोटीर-सङ्घर्षणम् ।
कर्मेदं मृदुलस्य तावक-पद-द्वन्द्वस्य किं योचितं
मच्चेतो-मणिपादुका-विहरणं शम्भो सदाङ्गीकुरु ॥ ६४ ॥

हे शंभो महादेवा! आपण माझें चित्त ह्याच कोणी रत्नजडित पादुका, त्या पायांत घालूनच इकडे तिकडे फिरण्याचें करावें! कारण आपली चरणकमलें

अत्यंत कोमल आहेत व आपण स्वीकारलेलें कार्य मात्र अत्यंत कठोर आहे. अशा अभिप्रायानें आचार्य शंकरांची स्तुति करीत आहेत. हे शंकरा ! भक्ताला मृत्यूच्या संकटांतून सोडविण्याकरितां आपणांला यमाच्या अत्यंत कठोर असलेल्या वक्षःस्थलावर लत्ताप्रहार करावा लागला ! मृत्यूच्या तावडींतून सुटण्याकरितां मार्कंडेय मुनींनीं शंकरांचा धावा केला. " चन्द्रशेखर चन्द्रशेखर चन्द्रशेखर पाहि मां चन्द्रशेखर चन्द्रशेखर चन्द्रशेखर रक्ष मामू " हें तें स्तोत्र प्रसिद्धच आहे. धावा ऐकून भगवान् शंकर प्रसन्न झाले; आणि यमाच्या वक्षःस्थलावर लाथ मारून यमाचे पाश तोडले व मार्कंडेयांना यमाच्या तावडींतून सोडवून दीर्घायु – चिरंजीव केलें ही कथा प्रसिद्धच आहे. शंकरांनीं नटराजाचें रूप घेऊन अत्यंत कठोर अशा अपस्मार नांवाच्या असुराच्या शरीरावर नृत्य केलें व त्याच्या शरीराचें मर्दन केलें (दक्षिणामूर्तिस्तोत्र श्लोक दुसरा पहा). हा इतिहास लक्षांत घेऊन आचार्य म्हणतात, प्रभो 'कठिनापस्मारसम्मर्दनं' अत्यंत कठोर अशा अपस्मार दैत्याच्या शरीराचें पायानें संमर्दन करणें हें अत्यंत कठीण कार्य आहे. तसेंच 'भूभृत्पर्यटनम्' म्हणजे हिमाचल – कैलास पर्वतावर फिरणें हेंहि आपल्या पायाला अत्यंत कठोर कार्य करावें लागतें. 'नमत्सुरशिरः-कोटीरसङ्घर्षणं' हे शंकरा ! आपल्या चरणीं नमस्कार करणाऱ्या देवांच्या मुकुटांतील हिरे – पाषाणच ते ! त्यांचें सारखें संघर्षण आपल्या कोमल चरण-कमलाला होत असतें. आपलें दोन्ही चरणकमल किती मृदुल म्हणजे कोमल आहेत आणि वर निर्दिष्ट केलेलीं कार्यें किती कठोर आहेत ? आपल्या दोन्ही पायांना हें उचित म्हणजे योग्य आहे काय ? छे, हे योग्य नाहीं; तर मग माझ्या चित्तरूपी रत्नखचित पादुका ह्या नेहमींच आपल्या पायांत असूं द्या. त्यांचा आपण स्वीकार करा आणि मगच 'विहरणम्' म्हणजे इकडे तिकडे फिरणें वगैरे जें कांहीं कार्य करावयाचें असेल तें करा. तात्पर्य, माझ्या चित्तांत नेहमींच आपले पाय असूं द्या, हीच माझी विनंती आहे.

वक्षस्ताडनशङ्कया विचलितो वैवस्वतो निर्जरः
कोटीरोज्ज्वल-रत्नदीप-कलिका-नीराजनं कुर्वते ।
दृष्ट्वा मुक्तिवधूस्तनोति निभृताश्लेषं भवानीपते
त्वयेतस्तव पादपद्मभजनं तस्येह किं दुर्लभम् ॥ ६५ ॥

शंकरांच्या चरणकमलांचा प्रभाव आचार्य या श्लोकांत वर्णन करीत आहेत. भगवान् शंकर पुन्हां आपल्या वक्षःस्थलावर लत्ताप्रहार करतील की काय, या भीतीनें वैवस्वत म्हणजे यम अगदीं घाबरून गेलेला आहे. इतर सर्व देव आपल्या मुकुटांतील उज्ज्वल रत्नरूपी दीपज्योतींनीं ज्यांच्या चरणारविंदांना नीरांजन म्हणजे ओवाळण्याचें कार्य करीत आहेत. हे भवानीपते—पार्वतीवल्लभा, शंकरा! तुमचा हा प्रभाव पाहून मुक्तिरूपी वधू ही तर तुमच्या चरणारविंदांना दृढ आलिंगनच देऊन बसली आहे. असा हा तुमच्या चरणांचा महिमा आहे. ज्याचें चित्त तुमच्या चरणारविंदांचें अनन्यभावानें चिंतन करीत असेल, भजन करीत असेल, त्याला खरोखर 'इह' म्हणजे या मृत्युलोकांत अथवा या देहांत, या जन्मांत काय दुर्लभ आहे? तात्पर्य, जो शंकरांच्या चरणारविंदांना अनन्य-प्रेमानें भजतो त्याचे सकल मनोरथ पूर्ण होतात.

क्रीडार्थं सृजसि प्रपञ्चमखिलं क्रीडामृगास्ते जना
यत्कर्माचरितं मया च भवतः प्रीत्यै भवत्येव तत् ।
शम्भो स्वस्य कुतूहलस्य करणं मच्चेष्टितं निश्चितं
तस्मान्मामक-रक्षणं पशुपते कर्तव्यमेव त्वया ॥ ६६ ॥

एखादा राजा किंवा श्रीमंत मनुष्य कुत्रीं, मांजरीं, ससे, हरिण, पोपट, मोर इत्यादि पशुपक्ष्यांना मनोरंजनाकरितां आपल्याजवळ बाळगतो, त्यांचें खेळणें-बागडणें पाहून संतुष्ट होतो व तो त्यांचें प्रेमानें संगोपनहि करीत असतो. हा व्यवहार लक्षांत घेऊन आचार्य म्हणतात, हे पशुपते विश्वनाथा! तुम्ही क्रीडेकरितांच सर्व विश्वप्रपंच निर्माण करतां; सर्व प्राणी, सर्व लोक हे तुमचे 'क्रीडामृग' म्हणजे मनाला रमविण्यासाठीं, मनोरंजनासाठीं जवळ बाळगलेले पशूच आहेत. मीहि पण त्यांतलाच एक पशु आहे. मीं जें कर्म केलें असेल किंवा करीत असेन तें सर्व माझें कर्म तुमच्या संतोषालाच कारणीभूत व्हावयास पाहिजे. बाळगलेल्या पशुपक्ष्यांचे खेळणें-बागडणें जसें मालकाच्या मनाला रमवितें, त्याचप्रमाणें माझी हालचाल देखील निश्चितपणें तुमच्या कुतूहलाचें, आश्चर्याचें व आनंदाचेंच साधन होय. म्हणून हे पशुपते शंकरा! तुम्ही माझें रक्षण केलेंच पाहिजे. तात्पर्य, हे शंकरा! तुम्ही मला जन्माला घातलें आहे, आतां स्वतःच्या करमणुकीसाठीं का होईना, पण तुम्हीं माझें रक्षण केलेंच पाहिजे.

बहु-विध-परितोष-बाष्प-पूर-
स्फुट-पुलकाङ्कित-चारु-भोग-भूमिम् ।
चिर-पद-फल-काङ्क्षि-सेव्यमानां
परम-सदाशिव-भावनां प्रपद्ये ॥ ६७ ॥

विविध प्रकारच्या आनंदाश्रूंचे पूर जिच्यामध्यें वाहत आहेत, तसेंच आनंदानें शरीरावर सुस्पष्ट उभे राहिलेल्या रोमांचांनीं अंकित म्हणजे युक्त असलेले अनेक प्रकारचे भोग म्हणजे सुखांचे, आनंदाचे साक्षात्कार यांची जणुं कांहीं भूमि म्हणजे क्षेत्रच असलेली, त्याचप्रमाणें 'चिरपद' म्हणजे चिरंजीवपद अर्थात् ब्रह्मसुख याच फलाची अपेक्षा करणाऱ्या लोकांकडून सेविली जाणारी जी, परमसदाशिव म्हणजे सर्वश्रेष्ठ आणि सदासर्वकाळ सर्वांचे कल्याण करणारे जे भगवान शंकर त्यांची भावना म्हणजे भक्ति अथवा ध्यान; तें मी प्राप्त करून घेत आहे. तात्पर्य, शंकरांची भक्ति प्राप्त करून घेणें हेंच आपलें कर्तव्य आहे. भक्तीमध्यें अष्टविध सात्त्विकभावांचा आविष्कार होत असल्यामुळें विविध प्रकारच्या आनंदाचे अश्रु नेत्रांतून वाहत असल्याचें दृष्टीस पडतात. तसेंच अंगावर रोमांच उभे रहातात. अशा अवस्थेंत विविध प्रकारचे आनंदहि प्रतीतीस येतात. अविनाशी ब्रह्मसौख्याचाहि लाभ अनन्यभक्तीनेंच होत असतो. म्हणून शंकरांची भक्ति प्राप्त करून घेणें हेंच आपलें कर्तव्य आहे. आचार्य म्हणतात, तेंच मी प्राप्त करून घेत आहें.

अमितमुदमृतं मुहुर्दुहन्तीं
विमल-भवत्पद-गोष्ठमावसन्तीम् ।
सदय पशुपते सुपुण्यपाकां
मम परिपालय भक्ति-धेनुमेकाम् ॥ ६८ ॥

आचार्य म्हणतात, हे शंकरा ! माझ्या या एका भक्तिरूपी कामधेनूचें आपण परिपालन करा. कारण ही माझी भक्तिरूपी कामधेनु अपरिमित आनंदरूपी अमृताला—दुधाला पुनः पुन्हां देणारी आहे. विमल म्हणजे शुद्ध सर्व संसारधर्म-विरहित अशा तुमच्या चरणकमलरूपी गोठ्यामध्यें ती नेहमीं वास्तव्य करणारी आहे. 'दुहन्तीं' आणि 'आवसन्तीं' या दोन विशेषणांनीं भक्तीचें इष्टफलदायकत्व

आणि दृढत्व सूचित केलें आहे. त्याचप्रमाणें हे दयाघना पशुपते ! उत्तम पुण्य हेंच या भक्तिरूपी कामधेनूचें वासरूं आहे. अर्थात् उत्तम पुण्याला ती प्रसवेल. उत्तम पुण्य हाच तिचा पाक म्हणजे फल होय. शंकरा ! अशा या एका माझ्या भक्तिरूपी धेनूचें आपण रक्षण करा. हीच माझी आपणांस विनंती आहे.

जडता पशुता कलङ्किता
कुटिल-चरत्वं च नास्ति मयि देव ।
अस्ति यदि राजमौले
भवदाभरणस्य नास्मि किं पात्रम् ॥ ६९ ॥

आचार्य म्हणतात, हे शंकरा ! आपण माझा अंगीकार करा. हीच माझी प्रार्थना आहे. आपण म्हणाल कीं, तुझा अंगीकार कसा करावा ? कारण तूं जड आहेस, पशु आहेस, कलंकित आहेस आणि कुटिल आचरण करणाराहि आहेस. यावर आचार्य म्हणतात, देवा ! मी तसा नाहीं. मी जड नाहीं, मी चित्स्वरूप, चिदंश जीव आहें. मी पशु नाहीं. मी 'हंसः सोऽहं शिवोऽहं' म्हणजे मी शुद्ध ब्रह्मस्वरूप आहें. मी कलंकित नाहीं. मी निष्कलंक निरंजन आहें. तसेंच मी कुटिलचर म्हणजे वाकड्या बुद्धीनें वागणाराहि नाहीं. मी ऋजुबुद्धि अर्थात् जें सत्य असेल तेंच बोलणारा आणि तसेंच वागणारा आहें. तात्पर्य, माझ्या ठिकाणीं जडत्व, पशुत्व, कलंकित्व आणि कुटिलचरत्व हें कांहीं नाहीं. मग आपण माझा अंगीकार कां करीत नाहीं ? बरें, मी क्षणभर गृहीत धरतों कीं, तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें मी जड आहें, पशु आहें, कलंकित आहे, कुटिलचारीहि आहें, तरी पण माझ्या ठिकाणीं हे धर्म असले तरी हे राजमौले म्हणजे चंद्रशेखरा ! तुमच्या आभरणाला म्हणजे भूषण होण्याला मी योग्य नाहीं काय ? गंगा ही जड आहे, जलस्वरूप आहे. संस्कृतमध्यें ड आणि ल यांचा अभेद मानतात. ती जड असूनहि तुम्ही तिला आपल्या मस्तकावर धारण केलें आहे. नंदिकेश्वर हा पशु आहे पण त्याचा तुम्ही वाहन म्हणून अंगीकार केला आहे. चंद्र हा कलंकी आहे तरी पण तुम्हीं त्याला शिरोभूषण केलें, तो तुमचा चूडामणि झाला. त्याच्यामुळें तुम्ही चंद्रचूड बनला ! आणि तो कुटिलचारी नागराज ? त्याला तुम्ही गळ्यांतल्या ताइतप्रमाणें कंठ-भूषण केलें ! जड, पशु, कलंकी आणि कुटिल असलेले हे जर तुमचें भूषण आहेत

तर मग मी नाही का तुमचें भूषण होण्याला पात्र होणार ? तात्पर्य, मी कसाहि असो, तुम्ही माझा अंगीकार करा, हीच माझी प्रार्थना आहे.

अरहसि रहसि स्वतन्त्रबुद्धया
वरिवसितुं सुलभः प्रसन्न-मूर्तिः ।
अगणित-फलदायकः प्रभुर्मे
जगदधिको हृदि राजशेखरोऽस्ति ॥ ७० ॥

'रहसि' म्हणजे एकान्तांत गुप्तपणें अथवा 'अरहसि' म्हणजे लोकसमुदायामध्यें प्रकटपणें स्वतंत्र बुद्धीनें उपासना करण्यास सुलभ आणि प्रसन्नमूर्ति तसेंच अगणित फलदाता आणि जगांत सर्वापेक्षां अधिक श्रेष्ठ असलेला असा प्रभु 'राजशेखर' चंद्रचूड भगवान् श्रीशंकर माझ्या हृदयामध्यें विराजमान आहे. या श्लोकाचें रहस्य असें आहे कीं, इतर देवतांची उपासना एकान्तांत गुप्तपणें करावी लागते. तंत्रशास्त्रांत सांगितलेल्या पद्धतीनेंच ती करावी लागते. त्यांची उपासना करतांना स्वतंत्र बुद्धि उपयोगाची नाहीं. उपास्य-उपासकरूपानें भेदभाव जागृत ठेवावा लागतो. इतकेंहि करून त्या देवता सुलभ नसतात व प्रसन्नहि होत नाहींत. प्रसन्न झाल्या तरी अगणित फलदायकत्व त्यांच्या ठिकाणीं नसतें. त्या परिच्छिन्न, परिमित फल देतात. त्याचप्रमाणें त्या देवता जगांत अधिक म्हणजे सर्वश्रेष्ठहि असत नाहींत. बोलून-चालून अवांतर देवताच त्या. त्या, काय आणि किती फल देणार ? शंकरांचा दरबार मात्र सदासर्वकाळ सर्वांना मोकळा आहे. माझे प्रभु भगवान् शंकर असे आहेत कीं, त्यांची उपासना लोकसमुदायामध्यें उघडपणें केली तरी चालते. स्वतंत्र बुद्धीनें म्हणजे केव्हांहि कोठेंहि आणि कशीहि केली तरी चालते. तसेंच 'हंसः सोऽहं शिवोऽहं' या अभेदभावनेनें केली तरी चालते. ते 'आशुतोष' म्हणजे सत्वर संतुष्ट होणारे असल्यामुळें सहजसुलभ आहेत आणि प्रसन्नमूर्ति आहेत. अगणित फल देण्याचें त्यांच्या ठिकाणीं सामर्थ्य आहे नित्यनिरतिशय आनंद हेंच अगणित फल होय. तें शंकरांच्या उपासनेनेंच मिळतें. भगवान् शंकर हे जगांत सर्वापेक्षां श्रेष्ठ आहेत, ते समर्थ आहेत व राजशेखर म्हणजे राजमणि, राजांचे राजे, सम्राटांनाहि वैभवसंपन्न करणारे आहेत. असे भगवान् शंकर – राजशेखर – चंद्रमौली जर माझ्या हृदयांत विराजमान

आहेत, तर मग मला कशाची चिंता आहे ? तात्पर्य, मी शंकरांच्या चरणीं अनन्यभावानें शरण गेल्यामुळें निश्चित झालों आहें.

आरूढ-भक्ति-गुण-कुञ्चित-भाव-चाप-
युक्तैः शिव-स्मरण-बाणगणैरमोघः ।
निर्जित्य किल्बिषरिपून्विजयी सुधीन्द्रः
सानन्दमावहति सुस्थिर-राजलक्ष्मीम् ॥ ७१ ॥

ध्यानरूपी धनुष्याला भक्तिरूपी दोरी बांधून तें धनुष्य चांगलें लववावें. त्याला कधींहि विफल न होणारे शिवस्मरणरूपी बाणांचे समूह योजावेत; आणि त्या जोडलेल्या बाणांच्या समुदायानें अंतःकरणांतील मलिन वासना आणि कामक्रोधादिस्वरूप शत्रूंना पूर्णपणें जिंकून टाकावें. याप्रमाणें अंतःशत्रूंना जिंकून जो विजयी होतो, तो खरोखरच 'सुधीन्द्र' म्हणजे बुद्धिमंतांचा राजा समजावा. सुस्थिर म्हणजे अविनाशी अशा राजवैभवाला तोच आनंदानें चिरकाल धारण करूं शकतो. शाश्वत वैभवाचा तोच उपभोग घेऊं शकतो. तात्पर्य, अनन्यभक्तीनें शंकरांचें ध्यान करीत शिवनामस्मरणानें काम-क्रोधादि विकारांना जिंकून स्वानंदसाम्राज्यवैभव संपादन करावें आणि अखंड आनंदाचा उपभोग घ्यावा.

ध्यानाञ्जनेन समवेक्ष्य तमःप्रदेशं
भित्त्वा महा-बलिभिरीश्वर-नाम-मन्त्रैः
दिव्याश्रितं भुजग-भूषणमुद्वहन्ति
ये पादपद्ममिह ते शिव ते कृतार्थाः ॥ ७२ ॥

हे शंकरा ! डोळ्यांमध्यें तुमच्या ध्यानाचें अंजन घालून अज्ञानरूपी अंध-कारानें व्यापलेल्या प्रदेशाचें जे निरीक्षण करतात आणि सुदृढ, समर्थ अशा शिव-नाम मंत्रांनीं अंधकाराचा नाश करून स्वर्गीय देवांनींहि ज्यांचा आश्रय केलेला आहे अशा तुमच्या नागराजांनीं भूषित असलेल्या चरणारविंदांना जे आपल्या हृदयारविंदामध्यें किंवा मूर्धस्थानीं असलेल्या सहस्रदल कमलामध्यें धारण करतात, ते खरोखर कृतकृत्य होतात, धन्य होतात.

भूदारतामुदवहद्यदपेक्षया श्री-
भूदार एव किमतः सुमने लभस्व ।
केदारमाकलित-मुक्ति-महौषधीनां
पादारविन्दभजनं परमेश्वरस्य ॥ ७३ ॥

'श्रीभूदार' म्हणजे भगवान् विष्णु. श्री म्हणजे लक्ष्मी आणि भू म्हणजे पृथ्वी या दोन्ही विष्णूच्या दारा म्हणजे स्त्रिया आहेत. "समुद्रवसने देवि पर्वत-स्तनमण्डले । विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे" या नित्याच्या प्रातः-स्मरणाच्या श्लोकांत आपण पृथ्वीचा विष्णुपत्नी म्हणून उल्लेख करीतच असतों. लक्ष्मी ही तर विष्णुपत्नी म्हणून प्रसिद्धच आहे. म्हणून आचार्यांनीं विष्णूला श्रीभूदार असें म्हटलें आहे. भगवान् विष्णु देखील ज्याच्या प्राप्तीसाठीं चरणकमल शोधण्याकरितां 'भूदार' म्हणजे वराह बनले. शंकरांचें स्वरूप शोधण्यासाठीं विष्णूनें वराहाचें रूप घेतलें. पृथ्वीचें विदारण करून ते पाताळापर्यंत गेले. ही कथा पुराणांत प्रसिद्धच आहे. अशा रीतीनें विष्णूनेंहि 'भूदारत्व' म्हणजे वराहरूप स्वीकारलें. 'अतः' म्हणजे म्हणून हे विचारवंता मना ! तूं देखील त्या परमेश्वराच्या चरणारविंदांनाच मिळव. कारण त्याचें पादारविंद म्हणजे मोठमोठ्या विरक्त तत्त्ववेत्त्यांनी संपादन केलेल्या मुक्तिरूपी महौषधीचें 'केदार' म्हणजे क्षेत्रच आहे. तात्पर्य, प्रत्यक्ष विष्णूनेंहि ज्याच्या चरणारविंदाच्या प्राप्तीसाठीं वराहरूप धारण करून प्रयत्न केला आणि ऐश्वर्य मिळविलें त्याचेंच चरणारविंद मिळविण्याचा आपल्या मनानें प्रयत्न करावा. शंकरांचें चरणारविंद हे मुक्तिरूपी महौषधीचें क्षेत्र आहे. अर्थात् मुक्तीचाहि लाभ तेथेंच होईल.

आशा-पाश-क्लेश-दुर्वासनादि-
भेदोद्युक्तैर्दिव्यगन्धैरमन्दैः ।
आशा-शाटीकस्य पादारविन्दं
चेतःपेटीं वासितां मे तनोतु ॥ ७४ ॥

आशापाशांनीं बद्ध झाल्यामुळें होणाऱ्या विविध क्लेशांचा आणि दुर्वासनांचा उच्छेद करण्यास 'उद्युक्त' म्हणजे तयार असलेल्या 'अमन्द' म्हणजे विपुल, घनदाट अशा आपल्या दिव्य म्हणजे अलौकिक गंधानें, 'आशाशाटिक' म्हणजे

दिगंबर असलेल्या त्या शंकरांचें पदारविंद माझ्या अंतःकरणरूपी पेटीला सुगंधयुक्त करोत. हीच माझी मनीषा आहे. तात्पर्य, श्रीशंकरांच्या चरणकमलांच्या संपर्कानें माझ्या अंतःकरणांतील मलिन वासनांचें निर्मूलन व्हावें व तेथें निर्मल शुद्ध वासनांचा – शुभवासनांचा आविष्कार व्हावा हीच माझी इच्छा आहे.

कल्याणिनं सरस-चित्र-गतिं सवेगं
सर्वङ्गितज्ञमनघं ध्रुव-लक्षणाढ्यम् ।
चेतस्तुरङ्गमधिरुह्य चर स्मरारे
नेतः समस्तजगतां वृषभाधिरूढ ॥ ७५ ॥

हे शंकरा ! आपण सर्व जगाचे नेते म्हणजे पुढारी आहां. 'नेतः' हें नेतृ शब्दाचें संबोधन आहे. सर्व जगाचे नेते विश्वनाथ विश्वेश्वर असूनहि आपण 'वृषभाधिरूढ' म्हणजे बैलावर बसलेले आहां ! आपण वाहन म्हणून बैलाचा अंगीकार केला आहे. हे स्मरारे मदनान्तका शंभो ! आपण बसण्याकरितां माझा मनोरूपी घोडा घ्या आणि त्याच्यावर बसून इकडे तिकडे फिरा. कसा आहे तो माझा मनोरूपी घोडा ? असें विचाराल तर सांगतों ऐका : 'कल्याणी' म्हणजे कल्याणदायक लक्षणांनीं तो युक्त आहे. 'सरसचित्रगति' म्हणजे त्याची चाल मोठी मनोवेधक आणि चित्रविचित्र म्हणजे गमतीगमतीची आहे. हा मनोरूपी घोडा मोठ्या वेगानें धावतो. मालकाच्या मनांतील सर्व भाव जाणतो आणि सर्व उत्तम गुणांनीं तो संपन्न आहे. ईश्वरा ! निःसंशय अशा सर्वलक्षणसंपन्न असलेल्या माझ्या मनोरूपी घोड्याचा अंगीकार करून आपण फिरा. आपण जगदीश्वर आहां. बैलावर बसणें आपल्याला शोभत नाहीं. तात्पर्य, माझ्या मनाचा आपण अंगीकार करा. माझें मन आपल्या सेवेंत असूं द्या.

भक्तिर्महेश-पद-पुष्करमावसन्ती
कादम्बिनीव कुरुते परितोषवर्षम् ।
संपूरितो भवति यस्य मनस्तटाक-
स्तज्जन्म-सस्यमखिलं सफलं च नान्यत् ॥ ७६ ॥

श्रीमहेश्वरांच्या चरणकमलीं रहाणारी भक्ति अर्थात् श्रीशंकरांच्या चरणाविषयींची भक्ति ही खरोखर 'कादम्बिनी इव' म्हणजे आकाशांत भरून आलेल्या

मेघांच्या समुदायाप्रमाणें आनंदाची वृष्टीच वृष्टि करते. भक्तीनें केलेल्या आनंदाच्या वृष्टीनें ज्याचें अंतःकरणरूपी सरोवर तुडुंब भरतें, त्याचें जन्मरूपी पीक संपूर्णपणें फलांनीं समृद्ध होतें. तसें साफल्य इतरांच्या जन्माला लाभत नाहीं. तात्पर्य, भक्तीनें ज्याच्या हृदयांत आनंदाचा पूर येतो, त्याचाच जन्म सफल समजावा. इतरांचा जन्म विफल होय यांत संशय नाहीं.

बुद्धिः स्थिरा भवितुमीश्वर-पाद-पद्म-
सक्ता वधूर्विरहिणीव सदा स्मरन्ती ।
सद्भावना-स्मरण-दर्शन-कीर्तनादि-
सम्मोहितेव शिवमन्त्रजपेन विन्ते ॥ ७७ ॥

परमेश्वराच्या चरणारविंदीं आसक्त झालेली बुद्धि आपल्याला तेथेंच स्थिरता लाभावी म्हणून, पतिविरहानें व्याकुळ झालेली कांता ही जशी आपल्या पतीचेंच स्मरण करीत रहातें, जणुं काहीं एखाद्या मंत्रानें मुग्ध झालेली विरहिणी स्त्री आपल्या पतीचेंच चिंतन करीत असते, पतीचीच तिला सारखी आठवण होत असते, आपल्या पतीच्या भेटीला ती उत्सुक झालेली असते, ती आपल्या पतीचेच सारखे गुणवर्णन करीत असते, त्याचप्रमाणें शिवचरणीं आसक्त झालेली बुद्धि शिवमंत्रजपानें जणुं कांहीं संमोहित होऊन सदासर्वकाळ शंकरांचें चिंतन करीत रहाते. तिला नेहमीं शंकरांचीच आठवण होत रहाते. शिवदर्शनाला ती सर्वकाळ उत्सुक असते आणि सर्वकाळ शंकरांच्या नामसंकीर्तनांत अथवा गुण-संकीर्तनांतच ती रमत असते. (विन्ते, विद् सप्तमगण – विचार करणें या धातूचें हें रूप आहे.)

सदुपचार-विधिष्वनुबोधितां
सविनयां सुहृदं समुपाश्रिताम् ।
मम समुद्धर बुद्धिमिमां प्रभो
वर-गुणेन नवोढ-वधूमिव ॥ ७८ ॥

एखाद्यानें कन्या अर्पण केल्यानंतर नवऱ्यानें तिला आपल्या आंगच्या गुणांनीं तिचा उद्धार करावयाचा असतो. अर्थात् तिला आपल्या कुलाशीं समरस करून घेणें, आपल्याबद्दल तिच्या अंतःकरणांत प्रेम, आत्मीयता वृद्धिंगत करणें

इत्यादि गोष्टी कराव्ययाच्या असतात. हा व्यवहार लक्षांत घेऊन आचार्य शंकरांची प्रार्थना करीत आहेत कीं, हे प्रभो शंकरा ! मी माझी बुद्धिरूपी कन्या तुम्हांला अर्पण केलेली आहें. तुम्ही तिचा उद्धार करणें, तिला कृतार्थ करणें हें तुमचें कर्तव्य आहे. कशी आहे ही माझी बुद्धिरूपी कन्या ? असें विचाराल तर सांगतों ऐका – ' सदुपचारविधिषु अनुबोधिताम् ' एखाद्या मुलीला सासरीं कसें वागावें, नवऱ्याची सेवा कशी करावी इत्यादि गोष्टी ज्याप्रमाणें शिकविलेल्या असतात, (' शुश्रूषस्व गुरून् ' इत्यादि कण्वऋषींनीं शकुंतलेला सासरीं जातांना केलेला उपदेश प्रसिद्धच आहे.) त्याप्रमाणें मी माझ्या बुद्धीला उपाचार-विधि म्हणजे सेवा-शुश्रूषा करण्याची पद्धति ही 'अनुबोधिता' म्हणजे शिकविलेली आहे. उत्तम सेवा करण्याचें तिला मीं शिक्षण दिलेलें आहे. ती 'सविनया' म्हणजे विनयसंपन्न अर्थात् नम्रताशील आहे. 'सुहृद्' म्हणजे ती तुमचें हित आणि प्रिय चिंतणारी आहे. त्याचप्रमाणें 'समुपाश्रिता' म्हणजे तुमचाच आश्रय करून राहिलेली आहे. तेव्हां वराच्या ठिकाणीं अपेक्षित असलेल्या सद्गुणांनीं नवरा जसा आपल्या नव-परिणीत वधूचा उद्धार करतो, तिला नांवारूपाला आणतो, तिचें कल्याण करतो, त्याचप्रमाणें हे प्रभो ! मी आपली बुद्धिरूपी कन्या तुम्हांला अर्पण केलेली आहें तर तिचा तुम्ही उद्धार करा. तात्पर्य, तुम्ही माझ्या बुद्धीवर अनुग्रह करून तिला कृतार्थ करा, हीच माझी विनंती आहे. द्रुतविलंबित वृत्त.

नित्यं योगि-मनः-सरोज-दल-सञ्चार-क्षमस्त्वत्क्रमः
शम्भो तेन कथं कठोर-यमराड्वक्षः-कवाट-क्षतिः ।
अत्यन्तं मृदुलं त्वदङ्घ्रि-युगलं हा मे मनश्चिन्तय-
त्येतल्लोचन-गोचरं कुरु विभो हस्तेन संवाहये ॥ ७९ ॥

हे प्रभो शंकरा ! नेहमीं योगिजनांच्या हृत्कमलाच्या दलामध्येंच संचार करण्याची ज्यांची योग्यता आहे असे तुम्ही आहां. तुमचा 'क्रम' म्हणजे पदन्यास अर्थात् संचार हा नेहमीं योगिजनांच्या हृदयांतच होत असतो. तुम्ही आपल्या सुकोमल चरणकमलानें अत्यंत कठोर अशा यमराजाच्या वक्षःस्थलाचीं कवाडें कशीं फोडलीं ? (मार्कंडेय ऋषींना यमाच्या तावडींतून सोडवितांना शंकरांनीं यमाच्या वक्षःस्थलावर लाथ मारली होती.) प्रभो ! तुमचीं चरणकमलें अत्यंत कोमल आहेत. ही घटना ऐकून माझ्या मनाला मोठें दुःख होत आहे.

'हा' अरेरे, मला फार वाईट वाटत आहे ! माझें मन फार काळजी करीत आहे. प्रभो ! मला दाखवा तुमचें ते सुकोमल चरणकमल. तुमचे चरण मला दिसूं द्या. मी प्रेमानें आपल्या हातांनीं त्यांचें संवाहन करतों. प्रेमानें त्यांना दाबतों, चुरतों, चेपतों. तात्पर्य, मला तुमच्या पायांचें दर्शन घडावें आणि त्यांची सेवा व्हावी हीच माझी इच्छा आहे.

एष्यत्येष जनिं मनोऽस्य कठिनं तस्मिन्नटानीति मद्-
रक्षायै गिरिसीम्नि कोमल-पदन्यासः पुराभ्यासितः ।
नो चेद्दिव्य-गृहान्तरेषु सुमनस्तल्पेषु वेद्यादिषु
प्रायः सन्तु शिलातलेषु नटनं शम्भो किमर्थं तव ॥ ८० ॥

आपल्या कोमल चरणकमलानें हिमाचलाच्या दऱ्याखोऱ्यांतून भगवान् शंकर फिरत असतात. यावर आचार्य मोठी गमतीची कल्पना करून शंकरांची स्तुति करीत आहेत. हा अर्थात् मी जन्माला येणार. माझ्यासारखा कठोर मनाचा भक्त जन्माला येणार. याचें मन अत्यंत कठीण आहे. त्या मनांत मला संचार करावा लागेल. शंकरा ! असा विचार करूनच कीं काय तुम्ही माझें रक्षण करण्यासाठीं पर्वतांच्या सीमाप्रदेशांत कोमल पावलांचा संचार अगोदरच अभ्यासिला आहे. 'नो चेत्' नाहीं तर फुलांनीं आच्छादिलेलीं, पुष्पशय्येनें युक्त असलेलीं, सभागृहासारखीं दिव्य मंदिरें आणि 'वेद्यादि' म्हणजे परिष्कृत, सालंकृत, सुशोभित जागा, ओटे, रंगभूमि वगैरे असतांना बहुधा दगडाधोंड्यांनीं व्यापलेल्या प्रदेशांत खडकांवर तुमचें हें नृत्य कशाकरितां चालू असतें ! आपल्या कोमल पावलांनीं कठोर असलेल्या माझ्या मनांत संचार करावा लागेल, म्हणून तर तुम्ही हा हिमाचलाच्या खडकाळ प्रदेशांत नृत्य करण्याचा आधीपासूनच अभ्यास सुरू केला नाहीं ना ? तात्पर्य, आपण दयार्द्र आहां. माझें मन अत्यंत कठोर असलें तरी आपण त्यांत दयेनें वास्तव्य करा, हीच माझी प्रार्थना आहे.

कंचित्कालमुमामहेश भवतः पादारविन्दार्चनैः
कंचिद्ध्यान-समाधिभिश्च नतिभिः कंचित्कथाकर्णनैः ।
कंचित्कंचिदवेक्षणैश्च नुतिभिः कंचिद्दशामीदृशीं
यः प्राप्नोति मुदा त्वदर्पित-मना जीवन्स मुक्तः खलु ॥ ८१ ॥

हे उमापते परमेश्वरा ! जो मनुष्य खरोखर आपल्या आयुष्याचा काहीं काळ रोजच्या रोज तुमच्या चरणकमलांची पूजाअर्चा करण्यांत घालवितो, कांहीं काळ तुमचें ध्यान करण्यांत तल्लीन होऊन – अर्थात् समाधि लावून घालवितो, कांहीं काळ तुमच्या चरणीं वंदन करण्यांत घालवितो, तर कांहीं काळ तुमच्या कथाचरित्रें ऐकण्यांत घालवितो ! कांहीं काळ तुमच्या स्वरूपाचें अवलोकन करण्यांत घालवितो तर कांहीं काळ तुमची स्तुतिस्तोत्रें म्हणण्यांत घालवितो. अशी अवस्था ज्याला आपल्या आयुष्यांत प्राप्त होते तो खरोखर:सदासर्वकाळ आपलें अंत:-करण तुम्हांला अर्पण करून जीवन्मुक्तच होतो. ज्यानें सदासर्वकाळ आपलें अंत:करण तुम्हांला अर्पण केलें आहे तो जीवन्मुक्तच समजावा.

बाणत्वं वृषभत्वमर्ध-वपुषा भार्यात्वमार्यापते
घोणित्वं सखिता मृदङ्ग-वहता चेत्यादि रूपं दधौ ।
त्वत्पादे नयनार्पणं च कृतवाँस्त्वद्देह-भागो हरिः
पूज्यात्पूज्यतरः स एव हि न चेत्को वा तदन्योऽधिकः ॥८२॥

हे प्रभो शंकरा ! कोणत्या तरी प्रसंगानें नित्य तुमचें सान्निध्य घडावें म्हणून श्रीहरीनें काय काय गोष्टी केल्या ! पहा – त्रिपुरासुराचा वध करावयाला तुम्ही निघालांत तेव्हां भगवान् विष्णु हां तुमचा बाण झाला. (त्रिपुरासुराचा वध करतेवेळीं मेरुपर्वत शंकरांचें धनुष्य बनला. वासुकि सर्पानें धनुष्याच्या दोरीचें काम केलें आणि भगवान् विष्णु हे स्वत: बाण बनले अशी पुराणांतरीं कथा आहे.) शंकरांची नित्य सेवा घडावी म्हणून भगवान् विष्णु नंदीहि झाला. (वृषभत्वं) आर्या म्हणजे गौरी पार्वती तिचा पति जो भगवान् शंकर त्यांचें अर्धदेहानें विष्णूनें भार्यात्वहि पत्करलें. अर्धनारीनटेश्वराच्या स्वरूपांत शंकरांचा नारीस्वरूप असलेला अर्धा देह हा विष्णूचाच अंश आहे. शंकरांच्या चरणकमलांचा शोध करतांना विष्णूनें 'घोणित्व' म्हणजे वराहरूप धारण करून भूविवरांत – पाताळांत प्रवेश केला. 'सखिता' म्हणजे शंकरांचें मित्रत्वहि श्रीहरीनें केलेलें आहे. शंकर तांडवनृत्य करीत असतांना विष्णूनें मृदंग वाजविण्याचेंहि कार्य केलें आहे (मृदंगवहता). इत्यादि अनेक रूपें शंकरांच्या लाभासाठीं श्रीहरीनें धारण केलेलीं आहेत. हे प्रभो ! विष्णूनें आपला डोळा देखील कमल म्हणून तुमच्या चरणीं अर्पण केलेला आहे. श्रीहरि

हा तुमच्या देहाचा घटकहि होऊन राहिला आहे. दक्षिणेकडे ताम्रपर्णी नदीच्या पश्चिमतीरांत 'शंकरनारायणपुर' या नांवाचें क्षेत्र प्रसिद्ध आहे. या ठिकाणीं विष्णु आणि शंकर यांची एकरूप मूर्ति आहे. अशा रीतीनें श्रीहरीनें शंकरांचें सान्निध्य मिळविलेलें आहे. तात्पर्य, या सर्व घटनांवरून पूज्यांमध्येंहि अत्यंत पूज्य असे एक शंकरच आहेत. तेच श्रेष्ठ आहेत ही गोष्ट सिद्ध होत नाहीं काय ? नाहीं तर त्यांच्यापेक्षां या जगांत दुसरा कोण अधिक श्रेष्ठ आहे ? सांगा बरें !

जनन-मृति-युतानां सेवया देवतानां
न भवति सुखलेशः संशयो नास्ति तत्र ।
अजनिममृतरूपं साम्बमीशं भजन्ते
य इह परमसौख्यं ते हि धन्या लभन्ते ॥ ८३ ॥

शंकरांशिवाय या जगतांत दुसऱ्या कोणत्या देवाला शरण जावें ? कारण सर्व देव जन्म आणि मरण यांनीं युक्त म्हणजे ग्रासलेलेच आहेत. जन्म आणि मरण यांनीं विरहित असे एकच देव आहेत आणि ते म्हणजे भगवान् शंकर. तेव्हां त्यांनाच भजावें, त्यांचीच सेवा करावी अशा अभिप्रायानें आचार्य शंकरांची स्तुति करीत आहेत. हे प्रभो शंकरा ! जन्ममरणांनीं युक्त असलेल्या देवांच्या सेवेनें सुखाचा लेशहि प्राप्त होत नाहीं. त्याविषयीं तिळमात्रहि संशय बाळगावयास नको. जे स्वतःच जन्ममरणशील आहेत, त्यांना शरण जाऊन किंवा त्यांची सेवा करून काय मिळणार ? 'अजनि' म्हणजे ज्याला जन्म नाहीं आणि 'अमृतरूप' म्हणजे ज्याला मरणहि नाहीं, असा जो 'अमृतरूप' म्हणजे सुखमय, आनंदमय भगवान् सांब सदाशिव जगदीश त्याला जे भजतात ते खरोखरच अत्यंत धन्य होत. त्यांनाच उत्तम सुखाचा लाभ होतो. तेच नित्य निरतिशय आनंद मिळवितात.

शिव तव परिचर्यासन्निधानाय गौर्यां
भव मम गुणधुर्यां बुद्धिकन्यां प्रदास्ये ।
सकल-भुवन-बन्धो सच्चिदानन्द-सिन्धो
सदय हृदयगेहे सर्वदा संवस त्वम् ॥ ८४ ॥

हे शिवा ! तुम्ही 'भव' म्हणजे सर्व विश्वाचें कारण आहां. ' भवति विश्वमस्मादिति भवः ' सर्व विश्व तुमच्यापासून उत्पन्न होतें म्हणून तुम्हाला 'भव'

असें म्हणतात ! हे भवा शंकरा ! तुमची सेवा उत्तम रीतीनें पार पडावी म्हणून 'गौर्या' म्हणजे गौरवर्ण असलेली जी पार्वती तिच्या बरोबरीनें तुमची सेवा करण्याकरितां मी माझी सर्वगुणसंपन्न अशी ही बुद्धिरूपी कन्या तुम्हांला अर्पण करतों. हे सच्चिदानंद सागरा ! सर्व विश्वाचे तुम्ही बंधु आहां, हितकर्ते आहां. हे सदया विश्वनाथा ! सर्व विश्वाचे तुम्ही बंधु म्हणजे खरे हितचिंतक आहां. तुम्ही सच्चिदानंदाचे सागर आहां. हे सदया महादेवा ! तुम्ही माझ्या हृदयमंदिरामध्यें सर्व काळ सुखानें वास्तव्य करावें. हा श्लोक मालिनी वृत्तांतला आहे.

जलधि-मथन-दक्षो नैव पाताल-भेदी
न च वनमृगयायां नैव लब्धः प्रवीणः ।
अशन-कुसुम-भूषा-वस्त्र-मुख्यां सपर्यां
कथय कथमहं ते कल्पयानीन्दुमौले ॥ ८५ ॥

हे इंदुमौले म्हणजे चंद्रचूडा शंकरा ! मीं तुमची पूजा कशी करावी ? मीं काय तुम्हांला अर्पण करावें ? तुम्हांला विष आवडतें. कमळें तुम्हांला प्रिय आहेत. सर्पांना तुम्ही अलंकाराप्रमाणें धारण करतां. गजचर्म आणि व्याघ्रचर्म हें तुम्हांला पांघरावयला आणि नेसावयाला लागतें. विष्णु हा समुद्रमंथन करण्यांत दक्ष म्हणजे कुशल होता. त्याचें साहाय्य घेऊन देवांनीं तुम्हांला खाण्याकरितां विष दिलें. विष्णु स्वतःच पातालभेदी असल्यामुळें त्यानें तुमचीं कमळें वाहून पूजा केली. पातालांतून सर्प आणले आणि अलंकाराप्रमाणें तुम्हांला अर्पण केले ! तुम्ही स्वतःच वनमृगया म्हणजे जंगली जनावरांची शिकार करण्यांत दक्ष असल्यामुळें गजचर्म आणि व्याघ्रांबर धारण केलेंत. मला मात्र कोणी असा प्रवीण मिळाला नाहीं कीं, ज्याच्या साहाय्यानें 'अशन' म्हणजे खाणें-पिणें, 'कुसुम' म्हणजे फुलें, कमळें, भूषा म्हणजे अलंकार, सर्प, चंद्र इत्यादि आणि 'वस्त्र' म्हणजे नेसण्या-पांघरण्याचें साधन अशा उपचारांनीं मी तुमची 'सपर्या' म्हणजे पूजा करावी. मी असहाय आहें. मग सांगा बरें तुम्हांला आवडणाऱ्या पदार्थांनीं मीं तुमची पूजा कशी करावी ? (मया जलधिमथनदक्षः नैव लब्धः, पातालभेदी न च लब्धः वनमृगयायां प्रवीणः नैव लब्धः हे इन्दुमौले ! अशनकुसुमभूषावस्त्रमुख्यां ते सपर्यां अहं कथं कल्पयानि ? कथय.) असा या श्लोकाचा अन्वय समजावा.

पूजाद्रव्य-समृद्धयो विरचिताः पूजां कथं कुर्महे
पक्षित्वं न च वा किटित्वमपि न प्राप्तं मया दुर्लभम् ।
जाने मस्तकमङ्घ्रि-पल्लवमुमाजाने न तेऽहं विभो
न ज्ञातं हि पितामहेन हरिणा तत्त्वेन तद्रूपिणा ॥ ८६ ॥

हे प्रभो उमावरा ! मी तुमची पूजा करण्याकरितां पूजा-द्रव्यांची समृद्धि स्वरूप संपादन केली. अनेक प्रकारची पूजासामग्री गोळा केली. पण शंकरा ! आम्ही तुमची पूजा कशी करावी ! तुमच्या मस्तकाचा शोध लावण्यासाठीं ब्रह्मदेव पक्ष्याचें म्हणजे हंसाचें रूप धारण करून ऊर्ध्व दिशेला गेले आणि भगवान् विष्णु वराहाचें रूप धारण करून तुमच्या पायाचा शोध लावण्याकरितां खालच्या दिशेनें पाताळापर्यंत गेले, तरी त्यांना तुमच्या मस्तकाचा आणि पायाचा शोध लागला नाहीं ! मला पक्ष्याचेंहि रूप धारण करणें दुर्लभ आहे आणि 'किटित्व' म्हणजे वराहाचेंहि रूप, तेंहि धारण करणें दुर्लभ आहे. तें मीं कांहीं मिळविलें नाहीं, मला तें प्राप्त झालें नाहीं. हे विभो म्हणजे विश्वव्यापका, उमा-वल्लभा ! उमा म्हणजे पार्वती ही शंकरांची जानि म्हणजे पत्नी आहे. म्हणून शंकरांना उमाजानि म्हटलें. हे उमाकान्ता ! मी तुमचें मस्तकहि जाणूं शकत नाहीं आणि चरणकमलहि जाणूं शकत नाहीं. 'तद्रूपिणा' म्हणजे तें पहाण्याकरितां तन्मय होऊन प्रयत्न करणाऱ्या पितामहानें म्हणजे ब्रह्मदेवानेंहि तें तत्त्वतः जाणलें नाहीं. आणि श्रीहरीनेंहि पण तत्त्वतः तें जाणलें नाहीं. मग माझी काय कथा ? ज्यांचें मस्तकहि हातीं लागत नाहीं व पायहि हातीं लागत नाहींत, त्यांची पूजा कशी करणार ? तात्पर्य, भगवान् शंकर हे विभु म्हणजे विश्वव्यापी, अनंत, अमूर्त, अपरिच्छिन्न असल्यामुळें त्यांची नखशिखान्त साकल्यानें पूजा करणें अशक्यच आहे.

अशनं गरलं फणी कलापो
वसनं चर्म च वाहनं महोक्षः ।
मम दास्यसि किं किमस्ति शम्भो
तव पादाम्बुजभक्तिमेव देहि ॥ ८७ ॥

हे शंभो महादेवा ! तुम्ही मला काय देणार ? काय आहे तुमच्याजवळ देण्यासारखें ? खायला विष, नेसायला चर्म (कातडें) आणि बसायला बैल !

तुमच्या अलंकारांकडे पहावें तर सर्प तुम्हीं आपल्या मस्तकावर, गळ्यांत, दंडांत आणि पायांत धारण केलेले आहेत. सर्प हें तुमचें 'कलाप' म्हणजे अंगभूषण ! असा हा तुमचा थाट ! काय तुम्ही देणार आम्हांला ? हे प्रभो विश्वेश्वरा ! तुमच्या चरणकमलाची भक्तीच द्या म्हणजे झालें. " अनायासेन मरणं विना दैन्येन जीवनम् । कृपया देहि मे शम्भो त्वयि भक्तिमचञ्चलाम् ॥ " या श्लोकांतहि शेवटीं शंकरांना दृढभक्तीचेंच मागणें मागितलेलें आहे. भक्तीशिवाय जन्मांत खरा आनंद नाहीं व जन्माचें सार्थक्यहि नाहीं. कालभारिणी वृत्त.

यदा कृताम्भोनिधि-सेतुबन्धनः
करस्थलाधःकृतपर्वताधिपः ।
भवानि ते लङ्घितपद्मसम्भव-
स्तदा शिवार्चास्तव-भावन-क्षमः ॥ ८८ ॥

हे शिवा शंकरा ! तुमचे एक-एक प्रचंड भक्त पाहिले म्हणजे त्यांच्यापुढें मी अगदी क्षुल्लक कःपदार्थ आहें. मी तुमची पूजा अथवा ध्यान करण्यास कसा समर्थ होईन ? मला मोठी काळजी वाटते. अशा अभिप्रायानें स्तुति करीत आहेत. तुमचे भक्त भगवान् रामचंद्र त्यांनीं समुद्रावर सेतु बांधला ! तुमचे भक्त अगस्ति महर्षि त्यांनीं तर आपल्या तळहाताच्या आधारानें, पर्वतामध्यें श्रेष्ठ असलेला विंध्याचल प्रचंड पर्वत, पण त्याला ठेंगणें केलें ! ब्रह्मदेव तुमचे भक्त ते तर सर्व सृष्टीचे जनकच आहेत. आतां मी जेव्हां रामाप्रमाणें सेतुबंधन करीन किंवा अगस्ति ऋषीप्रमाणें एखाद्या प्रचंड पर्वताला ठेंगणा करीन, अथवा सृष्टीची रचना करून ब्रह्मदेवापेक्षांहि थोर होईन (लङ्घितपद्मसम्भवः) तेव्हांच हे शंकरा ! मी तुमचें पूजन, स्तवन किंवा ध्यान करण्याला समर्थ होईन ! पण मला हें कसें शक्य आहे ? मग मला तुमची पूजा-अर्चा, स्तुति-स्तोत्रें किंवा ध्यान-चिंतन हें कसें घडणार ? तात्पर्य, मी असमर्थ म्हणून मला दूर न लोटतां तुम्ही मला कृतार्थ करा. (हे शिव अहं यदा कृताम्भोनिधिसेतुबन्धनः करस्थलाधःकृतपर्वताधिपः लङ्घितपद्मसम्भवः भवानि तदा ते अर्चा-स्तव-भावन-क्षमः भवानि ।) असा या श्लोकाचा अन्वय समजावा. भवानि हें भू धातूचें आज्ञार्थ प्रथमपुरुषाचें एकवचन आहे. वंशस्थ वृत्त.

नतिभिर्नुतिभिस्त्वमीशपूजा-
विधिभिर्ध्यानसमाधिभिर्न तुष्टः ।

धनुषा मुसलेन चाश्मभिर्वा
वद ते प्रीतिकरं तथा करोमि ॥ ८९ ॥

हे प्रभो परमेश्वरा ! मी तुम्हांला नति म्हणजे नमस्कार केले. नुति म्हणजे स्तुतिस्तोत्रें केलीं. पूजा-सामग्री गोळा करून अनेक प्रकारें मी तुमची पूजा-अर्चा केली. मी तुमचें ध्यान केलें. समाधि लावून बसलों. तरी पण तुम्ही संतुष्ट झाला नाहीं. धनुष्यानें, मुसळानें का दगडांनीं कशानें तुम्हांला संतोष होणार आहे ? जे तुम्हांला संतोषकारक असेल तें सांगा म्हणजे मी त्याप्रमाणें करतों. अर्जुनानें धनुष्यबाण हातीं घेऊन शंकरांशीं युद्ध केलें. पण भगवान् शंकर त्याच्यावर प्रसन्न झाले. एका मुसळधारी भक्तानें शंकरांच्या डोळ्यावरच मुसळाचा प्रहार केला. पण त्याची अनन्यभक्ति पाहून मुलानें आईला मारलें तरी आई त्याचें कल्याणच करतें, त्याप्रमाणें भगवान् शंकर त्याच्यावरहि प्रसन्न झाले !

एक लहान मुलगा होता. तो मोठा शिवभक्त होता. योगायोगानें तो कट्टर वैष्णवांच्या अथवा शिवद्वेष्ट्यांच्या मेळाव्यांत सांपडला ! त्याला उघड उघड शंकरांची पूजा करतां येईना व शंकरांची पूजा केल्याशिवाय रहावेनाहि. तो लहान लहान दगड गोळा करावयाचा आणि शंकरांच्या जवळ जाऊन ते दगड शंकरांच्या पिंडीवर ठेवावयाचा. वैष्णव मुलांना असें वाटत असें कीं, हा महादेवाला दगड मारतो आहे, शंकरांचा तिरस्कार करीत आहे, वरें करतो आहे. शंकरा-विषयीं याच्या अंतःकरणांत असलेल्या अनन्यप्रेमाची त्या विचाऱ्यांना कल्पनाहि नव्हती. दुसऱ्यांनाहि दिसतांना तो शंकरांच्या पिंडीवर दगड ठेवीत असल्याचें दिसत होतें. पण त्याच्या प्रत्येक दगडाच्या मुळाशीं शंकरांना प्रिय असलेल्या कमल, गुलाब, चाफा, जाई, मोगरा इत्यादि फुलांची भावना होती. भगवान् शंकर हे भावप्रिय आहेत. ते अर्पिलेल्या पदार्थांकडे पहात नाहींत. ते पदार्थ अर्पण करणाऱ्याच्या अंतःकरणांतील भक्तीकडे पहातात. मदनानें शंकरांवर फुलांचे बाण टाकले अर्थात् फुलें फेकून मारलीं. पण त्या फुलांच्या मुळाशीं द्वेष होता. शत्रुभावना होती. मूढबुद्धि होती ! शंकरांनीं मदनाला आपल्या तृतीय नेत्रांतील अग्नीनें क्षणांत भस्म करून टाकलें ! या बालभक्तानें शंकरांच्या अंगावर दगड टाकले, पण ते अनन्यप्रेमानें, दृढभक्तीनें, फुलांच्या भावनेनें टाकले. ते दगडहि शंकरांना फुलाप्रमाणें प्रिय वाटले ! शंकर त्या बालावर प्रसन्न झाले. त्यानीं त्याला

कृतार्थ केलें ! ह्या गोष्टी लक्षांत घेऊन आचार्य म्हणतात, प्रभो महेश्वरा ! धनुष्यानें, मुसळानें का दगडानें ? कशानें तुम्ही प्रसन्न होणार ? ते मला सांगा म्हणजे त्याप्रमाणें मी करतों. तात्पर्य, तुम्ही मला प्रसन्न व्हा हीच माझी प्रार्थना आहे.

वचसा चरितं वदामि शम्भो-
रहमुद्योगविधासु तेऽप्रसक्तः ।
मनसाऽऽकृतिमीश्वरस्य सेवे
शिरसा चैव सदाशिवं नमामि ॥ ९० ॥

हे शंकरा ! मी वाणीनें तुमचें अर्थात् शंभु महादेवाचें चरित्र वर्णन करतों. मनानें तुमच्या अर्थात् परमेश्वराच्या आकृतीचें म्हणजे स्वरूपाचें चिंतन करतों. मी मस्तकानें तुम्हांला अर्थात् सदाशिवाला नमस्कार करतों. हीच माझी भक्तिपूर्वक सेवा होय. इतर पूजापद्धतीची माझ्या मनांत प्रसक्ति नाहीं. इतर कोणत्याहि पूजाविधीचा उद्योग करण्याचा मी प्रयत्न करीत नाहीं. तात्पर्य, हे परमेश्वरा ! वाणीनें तुमचें ध्यान करणें आणि मस्तकानें तुमच्या चरणीं वंदन करणें यांशिवाय माझ्याकडून कांहीं होत नाहीं. आपण क्षमा करा व मला कृतार्थ करा ! अप्रसक्तः याच्या ऐवजीं प्रसक्तः असें पद काढल्यास हे शंकरा ! मी तुम्हांला प्रिय असलेले सर्व उद्योग करण्यांत तत्पर असतों, असा अर्थ करावा.

आद्याऽविद्या हृद्गता निर्गतासी-
द्विद्या हृद्या हृद्गता त्वत्प्रसादात् ।
सेवे नित्यं श्रीकरं त्वत्पदाब्जं
भावे मुक्तेर्भाजनं राजमौले ॥ ९१ ॥

"हे राजमौले या आद्या अविद्या हृद्गता आसीत् सा त्वत्प्रसादात् निर्गता, ॥ विद्या च हृद्गता जाता ! मुक्तेः भाजनं श्रीकरं त्वत्पदाब्जं नित्यं भावे सेवे ।" ा या श्लोकाचा अन्वय आहे. शुद्ध चित्स्वरूपाला ज्या अज्ञानामुळें जीवभाव । झाला त्या अज्ञानाला 'मूलाविद्या' असें म्हणतात. ही अविद्या हृदयामध्यें न जणुं कांहीं चित्स्वरूपाचें आवरण करते. यथार्थ चित्स्वरूप प्रतीतीला येऊं नाहीं. चित्स्वरूपाचें यथार्थ ज्ञान न झाल्यामुळें भ्रम निर्माण होतो. या ामुळेंच मन, बुद्धि, प्राण आणि देह तसेंच इंद्रियें यांना आत्मा समजून आपण

या संसारांत अनंत दुःखें भोगीत असतों. ईश्वराची कृपा झाली कीं या अज्ञानाचा, अविद्येचा निरास होतो आणि हृदयामध्यें शुद्ध चित्स्वरूपाची प्रचीति आणून देणाऱ्या विद्येचा आविर्भाव होतो. विद्येनें आत्मस्वरूपाचा साक्षात्कार झाला कीं आनंदच आनंद अनुभवाला येतो. अशी ही प्रक्रिया आहे. आचार्य म्हणतात, हे राजमौले म्हणजे चंद्रशेखरा ! राजाशब्दाचा अर्थ सोम म्हणजे चंद्र असा आहे. शंकरांच्या मस्तकावर चंद्र असल्यामुळें शंकराला 'राजमौलि' असें म्हटलें आहे. हे चंद्रचूडा प्रभो ! माझ्या हृदयामध्यें सर्व दुःखांना कारणीभूत असलेली जी मूळ अविद्या होती ती तुमच्या कृपेनें हृदयांतून निघून गेली आणि 'हृद्या' म्हणजे हृदयाला प्रिय असलेली, नित्य निरतिशय आनंदाचा साक्षात्कार करून देणारी विद्या हृदयांत प्रकट झाली. हे परमेश्वरा ! सर्व वैभवाला प्राप्त करून देणारें आणि मुक्तीचें म्हणजे मोक्षाचें आधार असलेलें तुमचें चरणकमल हेंच नित्य 'भावें' म्हणजे हृदयांमध्यें अनन्यप्रेमानें चिंतीत आहें आणि 'सेवे' म्हणजे सेवीत आहें आणि सेवीत राहीन.

दूरीकृतानि दुरितानि दुरक्षराणि
दौर्भाग्य-दुःख-दुरहंकृति-दुर्वचांसि ।
सारं त्वदीयचरितं नितरां पिबन्तं
गौरीश मामिह समुद्धर सत्कटाक्षैः ॥ ९२ ॥

हे गौरीपते शंकरा ! ज्यांच्या नांवांचीं अक्षरेंहि उच्चारूं नयेत अशीं दुरितें म्हणजे पापें मी तुमच्या नामस्मरणानें दूर केलीं आहेत. दौर्भाग्य मावळलें. दुःखें निमालीं. दुरहंकार गेला. कोणाला वाईट बोलणें, टाकून बोलणें हेहि मी सोडून दिलें आहें. सारभूत असलेल्या – अमृताप्रमाणें गोड असलेल्या – तुमच्या चरित्राचेंच आकंठ प्राशन करीत रहाणाऱ्या मला आपण आपल्या कृपापूर्ण कटाक्षांनीं या संसारतापांतून काढा. माझा उद्धार करा.

सोमकलाधरमौलौ
कोमल-घनकन्धरे महामहसि ।
स्वामिनि गिरिजानाथे
मामकहृदयं निरन्तरं रमताम् ॥ ९३ ॥

ज्यानें आपल्या मस्तकांवर चंद्राची कला धारण केलेली आहे, कोमल म्हणजे लुसलुसित अर्थात् पाण्यानें भरलेला असा जो 'घन' म्हणजे मेघ – ढग, त्या ढगाप्रमाणें नीलवर्ण आहे 'कंधर' म्हणजे कंठ, ज्याचा असा जो 'महा-महस्' म्हणजे अत्यंत तेजस्वी, प्रकाशाचाहि प्रकाश, स्वयंप्रकाश, आनंदकंद, जगाचा स्वामी, गिरिजानाथ, त्याच्या ठिकाणीं माझें हृदय निरंतर रमो हीच माझी मनीषा आहे.

सा रसना ते नयने
तावेव करौ स एव कृतकृत्यः ।
या ये यौ यो भर्गं
वदतीक्षेते सदार्चतः स्मरति ॥ ९४ ॥

जी रसना म्हणजे जीभ – वाणी शंकरांचें गुणसंकीर्तन करते, नांव घेत रहाते तीच रसना खरी रसना होय. तीच वाणी खरी वाणी होय. जे दोन डोळे शंकरांचें रूप अवलोकन करतात तेच खरे डोळे समजावेत. जे दोन हात शंकरांची पूजा करतात तेच हात खरे हात समजावेत. तसेंच जो मनुष्य शंकरांचें नित्य स्मरण करतो तोच खरोखर कृतकृत्य समजावा. त्याचाच जन्म सफळ समजावा. जी वाणी शंकरांचें गुणसंकीर्तन करीत नाहीं, नांव घेत नाहीं, त्या वाणीचा काय उपयोग ? जे डोळे शंकरांचें रूप अवलोकन करीत नाहींत त्या डोळ्यांचा काय उपयोग ? तसेंच जे हात शंकरांची पूजा करीत नाहींत त्या हातांचा काय उपयोग ? जो मनुष्य शंकरांचें स्मरण करीत नाहीं त्याच्या जन्माचा काय उपयोग ? तात्पर्य, शंकरांशीं विमुख असलेली वाणी, डोळे, हात आणि मानवदेह हे सर्वच व्यर्थ होत. "या भर्गं वदति सा रसना ये भर्गं ईक्षेते ते नयने, यौ भर्गं अर्चतः तौ एव करौ, यः भर्गं सदा स्मरति स एव कृतकृत्यः भवति ।" असा या श्लोकाचा अन्वय आहे. शंकर हे अत्यंत तेजस्वी असल्यामुळें त्यांना भर्गं असें म्हटलेलें आहे.

अतिमृदुलौ मम चरणा-
वतिकठिनं ते मनो भवानीश ।
इति विचिकित्सां संत्यज
शिव कथमासीद् गिरौ तथा वेशः ॥ ९५ ॥

हे भवानीश – हे भवानीपते शंकरा ! माझ्या मनांत तुम्ही संचार कां करीत नाहीं ? कदाचित् म्हणाल कीं, माझे पाय अत्यंत कोमल आहेत आणि तुझें मन अत्यंत कठीण आहे, मग मी तुझ्या मनांत संचार कसा करावा ? तर परमेश्वरा ! अशी शंका येऊं देऊं नका. ही भीति आपण सोडून द्या. आपल्या पायाला कठीण प्रदेशांत संचार करण्याचा अभ्यास आहे. नाहीं तर हिमाचल प्रदेशांत कैलास पर्वतावर आपण तसा संचार कसा केला असतां ? तात्पर्य, निःशंक मनानें आपण माझ्या मनांत वावरत असावें हीच माझी मनीषा आहे.

धैर्याङ्कुशेन निभृतं
रभसादाकृष्य भक्तिशृङ्खलया
पुरहर चरणालाने
हृदयमदेभं बधान चिद्यन्त्रैः ॥ ९६ ॥

हे त्रिपुरारे ! आपण त्रिपुरासुराचा वध केल्यामुळें आपणांस 'पुरहर' असें म्हणतात. हे पुरहरा शंकरा ! तुम्ही तुमच्या चरणरूपी 'आलान' म्हणजे हत्तीला बांधण्याचें ठिकाण (हत्तीला ज्या खांबाला बांधतात तो खांब). या ठिकाणीं माझ्या मनरूपी मदोन्मत्त हत्तीला भक्तिरूपी शृंखलेनें बांधून आणि धैर्यरूपी अंकुशाचा मार देऊन अत्यंत जोरानें खेचून 'चित्' म्हणजे चैतन्य – ज्ञानरूपी यंत्रानें आपण आपल्या चरणरूपी खांबाला बांधून ठेवा. तात्पर्य, एखादा माहूत उन्मत्त हत्तीला आपल्या ताब्यांत घेऊन जसा बांधून ठेवतो त्याप्रमाणें तुम्ही माझ्या उन्मत्त मनाला आपल्या ताब्यांत घेऊन आपल्या चरणीं बांधून ठेवावें. तुम्ही आपल्यापासून माझ्या मनाला हलूं देऊं नका हीच माझी प्रार्थना आहे.

प्रचरत्यभितः प्रगल्भवृत्त्या
मदवानेष मनःकरी गरीयान् ।
परिगृह्य नयेन भक्तिरज्ज्वा
परम-स्थाणु-पदं दृढं नयामुम् ॥ ९७ ॥

हत्तीला मद आला, त्याच्या गंडस्थलांतून दानोदक स्रवूं लागलें म्हणजे तो जसा उन्मत्त होऊन प्रौढीनें भटकत असतो, त्याचप्रमाणें माझें मन हाच कोणी मोठा हत्ती हा गर्वानें उन्मत्त होऊन इकडे तिकडे प्रौढवृत्तीनें भटकत आहे. त्याला

युक्तीनें ताब्यांत घेऊन भक्तिरूपी सोलानें – मोठ्या जाड दोरानें बांधून हे परमेश्वरा ! तुम्ही ह्याला स्थाणुपदाला – स्थिरपदाला खेचून न्या ! देवा ! तुम्ही स्वतः स्थाणुच आहां. तेव्हां तुम्ही आपल्यास्वरूपीच याला दृढ बांधून ठेवा हीच माझी प्रार्थना आहे. (शंकरांचें नांव 'स्थाणु' आहे.)

सर्वालंकारयुक्तां सकलपदयुतां साधुवृत्तां सुवर्णां
सद्भिः संस्तूयमानां सरसगुणयुतां लक्षितां लक्षणाढ्याम् ।
उद्यद्भूषाविशेषामुपगतविनयां द्योतमानार्थरेखां
कल्याणीं देव गौरीप्रिय मम कविताकन्यकां त्वं गृहाण ॥९८॥

हे गौरीप्रिया परमेश्वरा ! ही माझी कवितारूपी कन्या मी तुम्हांला अर्पण करीत आहें, तिचा तुम्ही स्वीकार करा. कन्यादानसमयीं कन्येच्या अंगावर जसें अलंकार असतात त्याप्रमाणें माझी कवितारूपी कन्या उपमा, उत्प्रेक्षा, अर्थान्तर-न्यास, रूपक इत्यादि अलंकारांनीं युक्त आहे. कन्या जशी मधुरभाषिणी असावी त्याप्रमाणें ही माझी कविताकन्या सर्व प्रकारच्या मधुर शब्दांनीं युक्त आहे. एखादी कन्या जशी 'साधुवृत्ता' म्हणजे सद्वर्तनी असावी त्याचप्रमाणें माझी ही कविताकन्या 'साधुवृत्ता' म्हणजे मालिनी, भुजंगप्रयात, शार्दूलविक्रीडित, स्रग्धरा, पंचचामर, मत्तमयूर इत्यादि वृत्तांनीं नटलेली आहे. एखादी कन्या जशी 'सुवर्णा' म्हणजे उत्तम वर्णांची गोरीगोमटी असावी त्याचप्रमाणें माझी कवितारूपी कन्या देखील 'सुवर्णा' म्हणजे उत्तम वर्णरचना असलेली यमक, अनुप्रास इत्यादि शब्दालंकारांनीं युक्त आहे. 'सद्भिः संस्तूयमानां' एखाद्या कन्येची सज्जनांनीं जशी प्रशंसा करावी त्याप्रमाणें माझी ही कवितारूपी कन्या सज्जनांकडून प्रशंसिली जाणारी आहे. 'सरसगुणयुतां' एखादी कन्या जशी उत्तम गुणांनीं युक्त असावी त्याचप्रमाणें माझी ही कविता 'सरसगुणयुता' म्हणजे कारुण्य, वात्सल्य, शांत इत्यादि रसांनीं आणि ओज, माधुर्य, प्रसाद इत्यादि गुणांनीं युक्त आहे. 'लक्षणाढ्यां लक्षितां' म्हणजे सर्वलक्षणांनीं संपन्न अशी दिसणारी, त्याचप्रमाणें 'उद्यद्भूषाविशेषां' म्हणजे विशिष्ट भूषणांनीं संपन्न, 'उपगतविनयां' म्हणजे कन्या जशी विनयशील नम्रताशील असावी; त्याचप्रमाणें माझ्या कवितेमध्येंहि नम्रता आहे. 'द्योतमानार्थरेखां' एखाद्या कन्येच्या हातावर धनरेषा जशी स्पष्ट असावी, त्याचप्रमाणें माझ्या कवितारूपी कन्येच्या ठिकाणीं 'अर्थरेखा' विविध

मनोहर अर्थांची मालिका पहावयास सांपडेल. तसेंच एखादी कन्या जशी क्षेमकल्याण गुणांची सूचक – द्योतक असावी, त्याचप्रमाणें माझी ही कवितारूपी कन्याहि 'कल्याणी' म्हणजे क्षेमकल्याण प्राप्त करून देणारी आहे. तात्पर्य, हे गौरीप्रिया शंकरा! तुम्ही माझ्या या कवितारूपी कन्येचा अंगीकार करावा अशी माझी आपणांस प्रार्थना आहे.

इदं ते युक्तं वा परमशिव कारुण्य-जलधे
गतौ तिर्यग्रूपं तव पद-शिरो-दर्शन-धिया ।
हरिब्रह्माणौ तौ दिवि भुवि चरन्तौ श्रमयुतौ
कथं शम्भो स्वामिन् कथय मम वेद्योऽसि पुरतः ॥९९॥

हे प्रभो! परमशिव म्हणजे भक्तलोकांचें आत्यंतिक कल्याण करणारे अथवा भक्तजनांचें जीवन पूर्ण मंगलमय करणारे असे आपण आहां. आपण भक्तवत्सल करुणासागर आहां. आपलें संपूर्ण रूप मला कसें आकलन करतां येईल! तुमचे चरणकमल अवलोकन करण्याच्या बुद्धीनें भगवान् विष्णु वराह बनले आणि पाताळांत गेले! तुमचें मस्तक अवलोकन करण्याच्या बुद्धीनें ब्रह्मदेव हंस बनले आणि अंतरिक्षलोकांत गेले. ते अंतराळांत अगदी वर गेले. याप्रमाणें विष्णु आणि ब्रह्मदेव या दोघांनींहि तिर्यग्रूप – पशूचें आणि पक्ष्याचें रूप धारण करून तुमचें यथार्थरूप पहाण्याचा प्रयत्न केला. ते द्युलोकांत, भूलोकांत सर्वत्र फिरले पण शेवटीं थकले! त्यांना तुमच्या स्वरूपाचा थांगपत्ता लागला नाहीं. ही त्यांची अवस्था झाली. मग महाराज, स्वामिन्, हे प्रभो शंभुनाथा! मला आपण कसें बरें प्रत्यक्ष 'पुरतः' म्हणजे माझ्यापुढें आकलन होऊं शकाल? तात्पर्य, जेथें ब्रह्मदेव आणि विष्णूहि थकले तेथें आपलें स्वरूप साकल्यानें प्रत्यक्ष मला कसें आकलन होऊं शकेल? दयाघना! आपणच कृपा करा आणि आपलें स्वरूप प्रत्यक्ष मला दाखवा.

एकदां ब्रह्मदेव, विष्णु आणि शंकर या तिघांमध्यें चर्चा सुरू झाली कीं, आपल्यामध्यें मोठा कोण आहें? श्रेष्ठ कोण आहे? ब्रह्मदेव म्हणाले, मी मोठा आहें. विष्णु म्हणाले, मी मोठा आहें. शेवटीं शंकर म्हणाले, तुम्ही दोघेजण माझ्या पायांचा आणि मस्तकाचा शोध लावून या आणि मग सांगा कीं, आपल्यांपैकीं कोण मोठा आहे! हें ऐकतांच दोघे म्हणाले कीं, यांत काय अवघड आहे!

इतक्यांत शंकरांनीं आपलें विराट रूप धारण केलें. भगवान् विष्णु शंकरांच्या पायांचा शोध लावण्याकरितां वराहरूप धारण करून पृथ्वीचें विदारण करीत खालीं खालीं चालले. पाताळापर्यंत गेले, थकले, पण शंकरांच्या पयांचा शोध लागला नाहीं. इकडे ब्रह्मदेवहि हंसाचें रूप घेऊन वर वर चालले. खूप वर गेले, पण शंकरांच्या मस्तकाचा कांहीं मागमूस लागेना. थकले. किती उंच असेल बरें शंकरांचें मस्तक ! याप्रमाणें विचार करीत बसले, इतक्यांत केतकीचें पान वरून येत असलेलें त्यानीं पाहिलें. ब्रह्मदेवांनीं विचारलें, कोण आहेस तूं ? कोठून येत आहेस ? केतकीचें पान म्हणालें, मी केवडा आहें. मला केतकी म्हणतात. मी शंकरांच्या मस्तकावर होतें. तेथून खालीं पडलें. मला खालीं येतां येतां किती तरी काळ निघून गेला, पण अजून खालचा पत्ताच लागत नाहीं ! मला अजून किती खालीं जावें लागणार ? ब्रह्मदेव म्हणाले, मी शंकरांच्या मस्तकाचा शोध करीत करीत वर निघालों आहें. किती तरी काळ गेला पण अजून कांहीं शंकरांच्या मस्तकाचा पत्ता लागत नाहीं. शेवटीं दोघांचें संगनमत झालें. ब्रह्मदेव म्हणाले, मी तुला शंकराजवळ घेऊन जातों. तूं फक्त एवढी साक्ष दे कीं, मी शंकरांच्या मस्तकापर्यंत येऊन पोहोंचलों होतों. मीं शंकरांचें मस्तक पाहिलें. केतकीनें तें मान्य केलें. शेवटीं ब्रह्मदेव आणि केतकीचें पान शंकरांजवळ येऊन पोहोंचलें. ब्रह्मदेव शंकरांना म्हणाले, महाराज मी आपल्या मस्तकाचा शोध लावून आलों. शंकर म्हणाले, खोटें सांगत आहां तुम्ही. ब्रह्मदेव म्हणाले, छः मी खोटें बोलत नाहीं. ही पहा, ही केतकी साक्ष देईल. केतकीची खोटी साक्ष ऐकून शंकर रागावले. त्यांनीं केतकीला शाप दिला कीं, खोटी साक्ष देणारी तूं यापुढें माझ्या पूजेंत तुला स्थान मिळणार नाहीं. तेव्हांपासून केतकी शंकरांच्या पूजेंत वर्ज्य झाली. पुढें शंकरांनीं ब्रह्मदेवाकडे पाहिलें त्या वेळीं ब्रह्मदेवाला पांच मुखें होतीं. शंकर म्हणाले, याच तोंडानें तुम्ही खोटें बोललांत का ? तुमचें हें मुखच नाहींसें करून टाकतों. असें म्हणून शंकरांनीं आपल्या बोटाच्या नखांनीं ब्रह्मदेवाचें मस्तक तोडलें ! तेव्हांपासूनच ब्रह्मदेव चतुर्मुख झाले. ब्रह्मदेवाला पूजेंतहि स्थान उरलें नाहीं. असा हा खोटें बोलण्याचा दुष्परिणाम ब्रह्मदेव आणि केतकी या दोघांनाहि भोंवला. विष्णु मात्र सत्य बोलले, " मला कांहीं आपल्या पायांचा शोध लागला नाहीं. मी थकलों. निःसंशय आपण सर्वश्रेष्ठ आहां. " विष्णूचें हें सत्य भाषण ऐकून शंकर प्रसन्न झाले आणि त्यांनीं

विष्णूला त्रैलोक्यांच्या संरक्षणाकरितां सुदर्शनचक्र बहाल केलें. या कथानकाला " यो ब्रह्मा ब्रह्मण उज्जभार प्राणैः शिरः कृत्तिवासाः पिनाकी " इत्यादि ऋग्वेदाचें वचन प्रमाण आहे. या गोष्टीवरून खोटें बोलूं नये आणि गर्व कधीं करूं नये हाहि बोध सहजच घेतां येतो.

स्तोत्रेणालमहं प्रवच्मि न मृषा देवा विरिञ्चादयः
स्तुत्यानां गणनाप्रसङ्गसमये त्वामग्यगण्यं विदुः ।
माहात्म्याग्रविचारणप्रकरणे धानातुषस्तोमवद्-
धूतास्त्वां विदुरुत्तमोत्तमफलं शम्भो भवत्सेवकाः ॥ १०० ॥

हे परमेश्वरा ! तुमचीं मी किती स्तुतिस्तोत्रें गाऊं ? पुरे हीं स्तोत्रें. मी आपणांशीं खोटें बोलत नाहीं. ब्रह्मदेव, भगवान् विष्णु इत्यादि देवानीं, या विश्वांत स्तुति करण्याला कोण योग्य आहे, याचा विचार सुरू केला असतां अर्थात् स्तुति करण्याला योग्य असलेल्यांची गणना करीत असतांना तुम्हांला त्यांनीं अग्रगण्य ठरविलेलें आहे. तुम्हीच स्तुति करण्यास योग्य असलेल्या देवांमध्यें अग्रगण्य आहां. असें त्यांनीं जाणलेलें आहे आणि तसेंच माहात्म्यानें सर्वांत अधिक कोण श्रेष्ठ आहे ? कोणाचें माहात्म्य सर्वांत अधिक आहे ? असा विचार करण्याचें प्रकरण जेव्हां सुरू झालें तेव्हां धान्याच्या कोंड्याचा समूह जसा वाऱ्यानें उडून जातो त्याप्रमाणें इतर देव 'धूताः' म्हणजे सहज वाऱ्यानें उडून गेल्याप्रमाणें नाहींसे झाले आणि तुम्हीच तेवढे आपल्या माहात्म्यानें स्थिर राहिला. तेव्हां तुमच्या सेवकांनीं -- भक्तजनांनीं हे शंभो ! तुम्हांलाच उत्तमोत्तम फलस्वरूप म्हणून जाणलेलें आहे. तात्पर्य, हलका असलेला कोंडा वाऱ्यानें जसा उडून जातो आणि फलस्वरूप असलेलें भारदस्त धान्य शिल्लक रहातें, त्याप्रमाणें सर्वश्रेष्ठ माहात्म्याचा विचार करतांना इतर सर्व देव निरस्त झाले आणि शंकरा ! आपणच तेवढें आपल्या स्वतःसिद्ध सर्वश्रेष्ठ असलेल्या माहात्म्यानें एकच एक शिल्लक राहिलांत, तेव्हां आपणाला सोडून मी कोणाला शरण जावें ? भगवन्, आपणच मला कृतार्थ करा.

■ ■ ■

दक्षिणामूर्तिस्तोत्रम् ।

[श्रीदक्षिणामूर्ति हें शंकरांचेंच स्वरूप होय. भक्तजनांना आत्मस्वरूपाचा साक्षात्कार करून देण्यासाठींच शंकरांनीं हें रूप धारण केलेलें आहे. श्रीदक्षिणामूर्तींची उपदेशपद्धति मोठी विलक्षण आहे. उपदेशाचा एकहि शब्द न उच्चारतां केवळ आपल्या सान्निध्यानेंच ते भक्तजनांच्या अज्ञानाचा परिहार करतात. त्याचप्रमाणें भक्तजनांना आत्मस्वरूपाचा साक्षात्कार करून देऊन त्यांचें जीवनहि आनंदमय बनवितात. " गुरोस्तु मौनव्याख्यानं शिष्यास्तु च्छिन्नसंशयाः । " प्रश्न करणारे मी मी म्हणत श्रीदक्षिणमूर्तींच्या जवळ येतात. पण जवळ येतांक्षणींच त्यांच्या अन्तःकरणांतील सर्व संशय – शंका-कुशंका पार मावळतात, अन्तःकरणें स्वच्छ होतात आणि त्या निर्मळ अन्तःकरणांत त्यांना आत्मस्वरूपाचें प्रत्यक्ष दर्शन घडतें, असा सर्वांचा अनुभव आहे. " यन्मौनव्याख्यया मौनिपटलं क्षणमात्रतः । महामौनपदं याति स हि मे परमा गतिः " ज्याच्या मौनव्याख्यानानें ऋषि-मुनिजनांचे समुदाय एका क्षणांत महामौनपदाला अर्थात् सनक-सनन्दादिक महामुनींनीं ज्या पदाची अपेक्षा करावी त्या सच्चिदानन्दपदाला प्राप्त होतात. ते श्रीदक्षिणामूर्ति हेच सर्वस्वीं आश्रय करण्याला योग्य आहेत. तेच माझे सर्वश्रेष्ठ आधार आहेत, असें त्यांचें वर्णन केलेलें आहे.

श्रीदक्षिणामूर्तींचे अनेक प्रकार आहेत. योगदक्षिणामूर्ति, वीणादक्षिणामूर्ति, ज्ञानदक्षिणामूर्ति आणि व्याख्यानदक्षिणामूर्ति इत्यादि त्यांचीं नांवें आहेत. त्यांच्या उपासनेचे मंत्र आणि त्यांचीं ध्यानेंहि पण निरनिराळीं आहेत. दक्षिणामूर्ति हें नांव कां पडलें याचें उत्तर सुबोधस्तोत्रसंग्रह, भाग १ ला, पान २२८ आणि ३३९ पहा. भारताच्या दक्षिणेकडील विभागांत असलेल्या शिवमंदिरांचें निरीक्षण केल्यास आपल्याला असें दिसून येईल कीं, मंदिरांच्या गाभाऱ्यांत मधोमध शिवलिंगाची स्थापना केलेली असते. पश्चिमेस श्रीदुर्गाभवानी व उत्तरेस चंडेश्वर असतात. चंडेश्वर हे एक मोठे शिवभक्त होते. भक्तलोक शंकरांना प्रदक्षिणा घातल्यानंतर चंडेश्वराजवळ चुटकी वाजवितात. आपण केलेल्या शिवदर्शनाचा तो साक्षीदार आहे अशी त्याच्याबद्दल श्रद्धा असते. शंकरांच्यापुढें पूर्वेस गाभाऱ्याबाहेर नंदी असतो व दक्षिणेकडे श्रीदक्षिणामूर्तींची स्थापना केलेली असते. यावरूनहि दक्षिणामूर्ति हें नांव अन्वर्थ असल्याचें दिसतें.

आध्यात्मिकदृष्ट्या वर्णन करतांना उपनिषदामध्यें तर बुद्धीलाच 'दक्षिणा' असें म्हटलेलें आहे. गुरुकृपेनें व शास्त्रसंस्कारानें समर्थ झालेली बुद्धीच शिवतत्त्वाचा – परब्रह्माचा साक्षात्कार करून घेण्यास समर्थ असते. " दृश्यते त्वग्र्यया बुद्ध्या " सूक्ष्मबुद्धीनेंच त्याचें दर्शन होऊं शकतें असेंहि उपनिषदांत वर्णन केलेलें आहे. सूक्ष्मबुद्धि ही आत्मतत्त्वाच्या साक्षात्काराचें मुख म्हणजे द्वार आहे. याच अभिप्रायानें तत्त्ववेत्त्यांनीं शिवतत्त्वाला 'दक्षिणामुख' किंवा 'दक्षिणामूर्ति' असें म्हटलेलें आहे. " शेमुषी दक्षिणा प्रोक्ता सा यस्याऽभीक्षणे मुखम् । दक्षिणाभिमुखः प्रोक्तः शिवोऽसौ ब्रह्मवादिभिः " (दक्षिणामूर्त्युपनिषद् १९).

प्रस्तुत स्तोत्र हें श्रीमेधादक्षिणामूर्तीचें स्तोत्र आहे. प्रज्ञा, प्रतिभा, मेधा असे बुद्धीचे अनेक प्रकार आहेत. एखाद्या विषयाचें सूक्ष्म व सांगोपांग ग्रहण करण्याचें सामर्थ्य जिच्यामध्यें असतें अशा बुद्धीला 'प्रज्ञा' असें म्हणतात. " प्रकर्षेण ज्ञायतेऽनया इति प्रज्ञा " अशी प्रज्ञा शब्दाची व्याख्या आहे. बुद्धीमध्यें नव्या नव्या उत्तमोत्तम कल्पना उत्स्फूर्त होऊं लागल्या म्हणजे त्या बुद्धीला 'प्रतिभा' असें म्हणतात. ग्रहण केलेले विषय चिरकाल स्थिर राखण्याची शक्ति ज्या बुद्धिमध्यें असते त्या बुद्धीला 'मेधा' असें म्हणतात. या स्तोत्रांतील प्रत्येक श्लोकाचीं आद्याक्षरें क्रमशः संकलित केलीं म्हणजे श्रीदक्षिणामूर्तीचा चोवीस अक्षरी मंत्र तयार होतो. या मंत्राचा जप करून श्रीदक्षिणामूर्तीची जो कोणी उपासना करील त्याला प्रज्ञा आणि मेधा यांचा लाभ होईल. श्रीदक्षिणामूर्तीच्या कृपेनें तो मोठा ज्ञानी होईल.]

ॐमित्येतद्यस्य बुधैर्नाम गृहीतं
यद्भासेदं भाति समस्तं वियदादि ।
यस्याज्ञातः स्व-स्व-पदस्था विधिमुख्या-
स्तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ १ ॥

वस्तुतः ज्याला नांव नाहीं आणि रूपहि नाहीं पण नामरूपानें व्यवहार करावयाचाच झाल्यास ॐ हेंच त्याला सुज्ञजनांनीं नांव दिलेलें आहे. सर्व भारताला व भारताच्याद्वारां विश्वाला उपदेश देण्याकरितां त्यानें दक्षिणामूर्ति हा अवतार घेतलेला आहे, म्हणून दक्षिणामूर्ति हेंच त्याचें रूप होय. 'प्रत्यक्' अथवा प्रत्यञ्च' म्हणजे अन्तर्यामी आत्मा हेंच त्याचें स्वरूप आहे. ज्याच्या प्रकाशानें

हीं पंचमहाभूतें व हें सर्व पांचभौतिक विश्व प्रकाशत आहे, भासत आहे, दृग्गोचरहि होत आहे. त्याचप्रमाणें ब्रह्मदेवादि सर्व देव ज्याच्या आज्ञेनें आपआपल्या पदावर विराजमान होऊन आपआपलीं कार्यें करीत आहेत, अशा त्या 'दक्षिणवक्त्र' म्हणजे दक्षिणामूर्ति देवाला मी आपल्या हृदयांत धारण करीत आहें. मी श्रीगुरु दक्षिणामूर्ति भगवान् शंकर यांचें चिंतन करीत आहें.

नम्राङ्गाणां भक्तिमतां यः पुरुषार्थान्
दत्त्वा क्षिप्रं हन्ति च तत्सर्वविपत्तीः ।
पादाम्भोजाधस्तनितापस्मृतिमीशं
तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ २ ॥

चरणारविंदीं नम्र झालेल्या भक्तजनांना जे चतुर्विध पुरुषार्थ समर्पण करतात आणि त्यांच्या सर्व आपत्तींचा निरासहि करतात त्या सर्वांतर्यामी असलेल्या श्रीगुरु दक्षिणामूर्तींचें मी अंतःकरणपूर्वक चिंतन करीत आहें. ते 'ईश' म्हणजे परम समर्थ आहेत. अपस्मृति म्हणजे अपस्मार. या अपस्मार नांवाच्या दानवाला आपल्या पायाखालीं घालून त्यांनीं त्याचें पादपीठ म्हणजे पाय ठेवण्याचें आसन केलेलें आहे.

श्रीदक्षिणामूर्ति आणि श्रीनटराज हे दोन्ही शंकरांचेच अवतार होत. भारताच्या दक्षिण भागांत 'चिदंबरम्' हें क्षेत्र प्रसिद्ध आहे. या ठिकाणीं शिवभक्त आणि शाक्त या दोघांचीहि वसति होती. कालान्तरानें शाक्त संप्रदाय अधिक बळावला. त्या लोकांनीं शाक्ताद्वैत तत्त्वज्ञान गुंडाळून ठेवलें आणि शक्तिपूजेचें बाह्य अवडंबर माजविलें. संप्रदायांतील सात्त्विक भाग सुटला व त्या ठिकाणीं राजस आणि तामस प्रवृत्ति बळावल्या. होतां होतां शाक्त संप्रदायाला वामाचरणाचें विपरीत वळण लागलें. ही गोष्ट शंकरांना रुचली नाहीं. त्यांनीं त्या वामाचरणी लोकांना सात्त्विक वळण लावण्याकरितां अवतार घेतला. नटराजाच्या रूपानें अवतरलेल्या शिवाचा पराभव करण्याकरितां त्या शाक्तांनी होमहवन करून मंत्रप्रभावानें नाग, वाघ आणि एक काळाकभिन्न ठेंगणा पुरुष निर्माण केला आणि या तिघांनाहि शंकरांच्या अंगावर सोडलें ! नाग शंकरांच्या अंगावर फणा काढून धांवला, पण त्यांच्या पायाजवळ येतांच नम्र झाला. त्यानें आपली फणा आवरली ! जणुं कांहीं तो शंकरांना शरणच गेला ! शंकरांनीं त्याला

उचललें आणि आपल्या गळ्यांत घातलें. तो त्यांचा कंठभूषण बनला ! अशा रीतीनें भगवान् शंकर हे फणिभूषण झाले. वाघानें शंकरांच्या अंगावर झेप घेतली. शंकरांनीं त्याला चुटकीसरसे ठार करून त्याचें कातडें परिधान केलें. तेव्हांपासून भगवान् शंकर व्याघ्रांबरधारी बनले ! आतां राहिला तो काळाकुळकुळीत ठेंगणा पुरुष. त्याला अपस्मार पुरुष असें म्हणतात. तद्देशीय लौकिक भाषेंत त्याला 'मुयळक राक्षक' असेंहि म्हटलेलें आहे. त्याला तर शंकरांनीं आपल्या पायाखालींच घेतलें. कालिय सर्पाच्या मस्तकावर श्रीकृष्णानें जसें नृत्य केलें त्याचप्रमाणें श्रीशंकरांनींहि अपस्मार पुरुषाच्या पाठीवर नृत्य केलें ! ते नटराज नृत्यमुद्रेनें त्या अपस्मार पुरुषाच्या पाठीवर पाय ठेवून तसेंच उभें असल्याचें आपणांस अजूनहि दिसत आहेत.

दक्षिणामूर्तीच्या अवतारांतहि तोच अपस्मार पुरुष शंकरांनीं आपल्या पायाखालीं पादपीठ म्हणून धारण केलेला आहे. तमोगुणाचें मूर्तिमंत प्रतीक असलेला हा काळाकुट्ट अपस्मार पुरुष दिसण्यांत ठेंगणा असला तरी प्रभावानें दांडगा आहे. " अपस्मर्यते अनेन इति अपस्मारः " अशी अपस्मार शब्दाची व्युत्पत्ति आहे. ज्याच्यामुळें जीव स्वस्वरूपाला विसरतो, तत्त्वतः तो नित्य निरतिशय आनंदरूप असूनहि आपण अत्यंत दुःखी आहोंत असें अनुभवतो आणि या संसारांत भटकत रहातो, तो त्याचा मोह अथवा तें त्याचें अज्ञान हाच खरा अपस्मार होय. या अज्ञानानें – मोहानेंच जीवाच्या ठिकाणीं स्वस्वरूपाची विस्मृति घडवून आणली आणि मोठा अनर्थ निर्माण केला आहे. जो कोणी श्रीदक्षिणामूर्तीच्या चरणीं अनन्यभावानें शरण जाईल त्याच्या अज्ञान-मोहरूपी अपस्माराला ते आपल्या पायाखालीं घालतात. केवळ आपल्या सान्निध्यानेंच भक्ताचें अज्ञान दूर करून त्याला ते कृतार्थ करतात. याच अभिप्रायानें आचार्यांनीं 'पादाम्भोजाधस्तनितापस्मृतिम्' असें श्रीदक्षिणामूर्तींना विशेषण दिलेलें आहे. भक्तजनांच्या अपस्मृतीला म्हणजे अपस्माराला अर्थात् मोहाला – अज्ञानाला ज्यानें आपल्या चरणकमलांच्या खालीं घातलेलें आहे. 'पादाम्भोज' म्हणजे चरणकमल आणि 'अधस्तनित' म्हणजे खालीं घातलेले असे या शब्दांचे अर्थ आहेत. तात्पर्य, भक्तजनांच्या मोहाला – अज्ञानाला आपल्या पायाखालीं दडपून टाकणाऱ्या त्या श्रीगुरु दक्षिणामूर्तींचें मी आपल्या हृदयांत ध्यान करीत आहें.

मोह-ध्वस्त्यै वैणिक-वैयासिकि-मुख्याः
संविन्मुद्रा-पुस्तक-वीणाक्ष-गुणान् यम् ।
हस्ताम्भोजैर्बिभ्रतमाराधितवन्त-
स्तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ ३ ॥

आपल्या अंतःकरणातील मोहाचा – मोहाला कारणीभूत असलेल्या अज्ञानाचा निरास व्हावा म्हणून 'वैणिक' म्हणजे नित्य हातामध्यें वीणा घेऊन हरिसंकीर्तन करणारे नारदमहर्षि आणि वैयासिकि म्हणजे व्यासपुत्र श्रीशुकाचार्य महामुनि हे ज्यांच्यामध्यें मुख्य आहेत असे मोठे मोठे ऋषि, मुनि, आचार्य, विद्वान् आणि साधुसंत व महात्मे या सर्वांनीं ज्याची आराधना केलेली आहे, ज्यानें आपल्या कमलाप्रमाणें कोमल असलेल्या चार हातांपैकीं एका हातानें ज्ञानमुद्रा धारण केलेली आहे, दुसऱ्या हातांत पुस्तक घेतलेलें आहे, तिसऱ्या हातांत वीणा म्हणजे तंबोरा धारण केलेला आहे आणि चौथ्या हातांत रुद्राक्षांची अथवा स्फटिकांची माला धारण केलेली आहे, त्या प्रत्यगात्मस्वरूप असलेल्या अर्थात् अन्तर्यामी रूपानें सर्वांमध्यें विराजमान असलेल्या त्या 'दक्षिणवक्त्र' म्हणजे दक्षिणामूर्ति देवाला – दक्षिणामूर्तींच्या रूपानें अवतरलेल्या जगद्गुरु भगवान् श्रीशंकरांना मी आपल्या हृदयांत अनन्यभावानें चिंतीत आहें.

भद्रारूढं भद्रदमाराधयितॄणां
भक्ति-श्रद्धा-पूर्वकमीशं प्रणमन्ति ।
आदित्या यं वाञ्छित-सिद्धयै करुणाब्धिं
तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ ४ ॥

जगद्गुरु श्रीदक्षिणामूर्ति भगवान् शंकर हे भद्रासन घालून बसलेले आहेत. (भद्रासनाची माहिती योगतारावलीमध्यें पहावी.) स्वतः भद्रासनावर बसून ते आराधना करणाऱ्या भक्तजनांचें कल्याण करतात म्हणून त्यांना 'भद्रद' असें म्हटलेलें आहे. "भद्रं ददाति इति भद्रदः" म्हणजे सुख देणारा अथवा मंगलदायक असाहि त्याचा अर्थ आहे. "आदित्याः वाञ्छितसिद्धयै यं भक्तिश्रद्धापूर्वकं प्रणमन्ति तं करुणाब्धिं प्रत्यञ्चं दक्षिणवक्त्रं ईशं कलयामि।" आदित्य म्हणजे देव. अदितीच्या पोटीं कश्यपापासून देवांचा जन्म झाला म्हणून

देवांना 'आदित्य' असें म्हणतात. आपले मनोरथ सिद्ध होण्यासाठीं देव देखील भक्तिपूर्वक आणि श्रद्धापूर्वक ज्यांच्या चरणीं प्रणिपात करतात त्या करुणासागर असलेल्या सर्वान्तर्यामी जगद्गुरु श्रीदक्षिणामूर्ति भगवान् शंकर यांचें मी अन्तःकरणपूर्वक चिंतन करीत आहें.

गर्भान्तस्थाः प्राणिन एते भवपाश-
च्छेदे दक्षं निश्चितवन्तः शरणं यम् ।
आराध्याङ्घ्रि-प्रस्फुरदम्भोरुह-युग्मं
तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ ५ ॥

मातेच्या गर्भामध्यें असलेले हे प्राणी विशेषतः मानवमातेच्या उदरांत गर्भाशयामध्यें गर्भशय्येवर पहुडलेले असतात. दोन्ही गुडघे पोटाशीं घेऊन उजवा हात डाव्या खांद्याकडे व डावा हात उजव्या खांद्याकडे वळविलेला असतो. दोन्ही हातांच्या मध्यावर मस्तक नमविलेलें असतें. गर्भावस्थेतील शरीराची वाढ पूर्णत्वाला पोहोंचलेली असते. स्थूल शरीराबरोबरच लिंगदेहाचाहि विकास होत असतो. लिंगदेहामध्यें घटक असलेली बुद्धि ही विचारक्षम झालेली असते. डोहाळ्यांच्या रूपानें इच्छाशक्तीचा व चलनवलनादि रूपानें क्रियाशक्तीचाहि आविष्कार झालेला असतो. अशा स्थितींत त्या गर्भस्थ जीवाला गर्भवासांतील दुःखांची जाणीव होऊं लागते. गर्भवासाच्या कारागृहांतून आपण मुक्त व्हावें असें त्याला वाटत असतें. मातेच्या उदरांतील आमाशय, पच्यमानाशय, पक्वाशय, मलाशय आणि मूत्राशय इत्यादि अनेक आशयांची गर्दी त्याला नकोशी झालेली असते. पित्ताशयांतील ऊष्म्याची धग आणि मातेच्या जठराग्नीच्या ज्वाला त्याला असह्य झालेल्या असतात. या गर्भवासाच्या बंधनांतून मुक्त होण्याला तो अत्यंत आतुर झालेला असतो. अशा वेळेला जागृत झालेल्या त्याच्या बुद्धींत पूर्वकर्मांची स्मृति अवतीर्ण होते. आपल्याच कर्मांचीं हीं फळें आपण भोगीत आहोंत अशी त्याला जाणीव होते. पूर्वकर्मांचा पश्चात्ताप होऊन तो जणुं कांहीं दोन्ही कानांना हात लावून परमेश्वराची प्रार्थना करतो. " हे परमेश्वरा ! ज्या कर्मांनीं माझी ही दशा झाली—दैना झाली. असलीं कर्में मी आतां यापुढें करणार नाहीं. मी तुझ्या चरणीं शरण आलों आहें. सोडीव मला तूं या दुःखांतून. " याप्रमाणें जीव गर्भवासांत परमेश्वराची प्रार्थना करीत असतांनाच प्रसूतिवात त्याच्या कर्मांना अनुसरून

त्याला मातेच्या उदरांतून बाहेर ढकलीत असतो. त्या वेळीं त्या जीवाला इतके क्लेश होत असतात कीं, त्या दुःखांच्या आघातानें त्याचें तें ज्ञान पार मावळतें ! त्यांतच त्याला क्षुधा-पिपासादि विकारांपासून अनेक दुःखें भोगावीं लागतात. त्याच्या बुद्धीवर अनेक मलिन संस्कार होऊन ती बुद्धि आत्मस्वरूपाच्या जाणिवेपासून फारच दूर जाते. तशांतच कामक्रोधादि विकार आणि लोभमोहादि रूपानें अनेक दुर्वासना त्याच्या चित्तांत थैमान घालूं लागतात व तो जीव स्वस्वरूपापासून भ्रष्ट होऊन या संसारांत कोणीकडेच्या कोणकिडे भटकत रहातो. पुढें सद्गुरुकृपेनें सन्मार्गाचें दर्शन घडून जेव्हां तो ताळ्यावर येतो तेव्हांच श्रीहरीच्या चरणीं अनन्यभावानें शरण जाऊन त्याच्याच कृपेनें तो सर्व दुःखांतून मुक्त होतो. हा सर्व अभिप्राय लक्षांत घेऊन आचार्य म्हणत आहेत –

गर्भवासामध्यें असलेले हे प्राणी, संसारपाशांचा नाश करण्याला सद्गुरु भगवान् श्रीशंकर दक्षिणामूर्तीच समर्थ आहेत, तेच जीवांना संसारतापांतून सोडविण्यांत कुशल आहेत, असा निश्चय करतात आणि ज्याच्या चरणीं शरण जातात, ज्याच्या चरणाचा आश्रय घेतात, ज्याच्या देदीप्यमान अशा दोन्ही चरणकमलांची आराधना करतात आणि सर्व संसारबंधनांतून मुक्त होतात त्या सर्वान्तर्यामी असलेल्या श्रीसद्गुरु दक्षिणामूर्ति भगवान् सदाशिव यांचें मी हृदयांत चिंतन करीत आहें.

वक्त्रं धन्याः संसृति-वार्धेरतिमात्रा-
द्भीताः सन्तः पूर्णशशाङ्क-द्युति यस्य ।
सेवन्तेऽध्यासीनमनन्तं वटमूलं
तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ ६ ॥

अतिमात्र म्हणजे प्रमाणाबाहेर. अत्यंत विशाल आणि भयंकर असलेल्या या संसारसागराला पाहून घाबरलेले लोक, ज्याचें पूर्णचन्द्राप्रमाणें कान्तियुक्त आणि आह्लाददायक असलेलें मुख अवलोकन करतात आणि धन्य होतात.

त्याचप्रमाणें स्वतः अखण्ड अनन्त परब्रह्मस्वरूप असूनहि केवळ भक्तजनांच्या कल्याणाकरितां जे वडाच्या मुळाशीं छायेमध्यें बसलेले आहेत अशा त्या सर्वान्तर्यामी असलेल्या श्रीगुरुदक्षिणामूर्ति देवाचें मी आपल्या हृदयांत चिंतन करीत आहें.

तेजःस्तोमैरङ्गद-संघट्टित-भास्व-
न्माणिक्योत्थैर्भासित-विश्वो रुचिरैर्यः ।
तेजोमूर्तिं स्वानिल-तेजः-प्रमुखाब्धिं
तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ ७ ॥

श्रीसद्गुरु दक्षिणामूर्तीकडे पाहिल्याबरोबरच सर्व संसारतापांचा उपशम होतो. अंतःकरणांतील सर्व संशय मावळतात आणि आत्मस्वरूपाची जाणीव होऊन निरतिशय आनंदाचा लाभ होतो असा जगद्गुरु श्रीदक्षिणामूर्ति देवाचा प्रभाव आहे. ज्यांनीं बाहुभूषण म्हणून दंडांत घातलेल्या अंगद नांवाच्या अलंकारांत जडविलेल्या माणिक्य रत्नांपासून निर्माण होणारे अत्यंत सुंदर प्रेक्षणीय असे तेजांचे 'स्तोम' म्हणजे समूह. त्या समूहांनीं विश्वाला 'भासित' म्हणजे प्रकाशित केलेले आहे. जे स्वतः तेजोमूर्ति म्हणजे मूर्तिमंत तेजच आहेत अर्थात् अत्यंत तेजस्वी आहेत. त्याचप्रमाणें आकाश, वायु, अग्नि वगैरे पंचमहाभूतांचे जणुं कांहीं ते अब्धि म्हणजे सागर अर्थात् निधिच आहेत. त्यांच्यांतूनच पंचमहाभूतांचा आविर्भाव झालेला आहे. कांहीं विद्वान् या ठिकाणीं "स्वानिलतेजःप्रमुखादिम्" असा पाठ कल्पितात आणि आकाशादि पंचमहाभूतांचे ते आदिकारण आहेत असा अर्थ करतात. असो. पंचमहाभूतांचा आदि अथवा कारण असलेल्या त्या सर्वान्तर्यामी श्रीदक्षिणामूर्तीचे मी आपल्या हृदयांत ध्यान करीत आहें असा अर्थ करतात.

दध्याज्यादि-द्रव्यक-कर्माण्यखिलानि
त्यक्त्वा काङ्क्षां कर्मफलेष्वत्र करोति ।
यज्जिज्ञासां रूपफलार्थी क्षितिदेव-
स्तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ ८ ॥

दहीं, तूप इत्यादि हविर्द्रव्यांनीं जीं यज्ञयागादिक कर्मे केलीं जातात व त्यापासून जीं विशिष्ट फळें मिळविलीं जातात त्या सर्व कर्मफलांची आकांक्षा — कामना सोडून आणि त्या सर्व कर्मांचाहि त्याग करून 'रूपफलार्थी' म्हणजे आत्मस्वरूपाच्या साक्षात्कारानें होणारा आनंद मिळविण्याची इच्छा करणारा. 'क्षितिदेव' म्हणजे ब्राह्मण. अर्थात् ब्राह्मणवर्ग ज्याची जिज्ञासा करतो, ज्याचा

विचार करतो तो सर्वान्तर्यामी असलेला शिवतत्त्वस्वरूप जगद्गुरु श्रीदक्षिणामूर्ति त्याचें मी आपल्या हृदयांत अनन्यभावानें चिंतन करीत आहें. या ठिकाणीं ब्राह्मण हा शब्द उपलक्षण म्हणजे उदाहरणमात्र आहे. सर्व अधिकारी भक्त काम्य कर्मांचा त्याग करून आत्मसाक्षात्कारासाठीं श्रीदक्षिणामूर्तीलाच शरण जातात. त्यांच्याच तात्त्विक स्वरूपाचा विचार करतात, असा त्याचा अर्थ आहे.

क्षिप्रं लोके यं भजमानः पृथुपुण्यः
प्रध्वस्ताधिः प्रोज्झित-संसृत्यखिलार्तिः ।
प्रत्यग्भूतं ब्रह्म परं सन् रमते य-
स्तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ ९ ॥

या मृत्युलोकामध्यें ज्याची आराधना करणारा मोठा पुण्यवान् होतो, ज्याच्या सेवेनें मानवाच्या मानसिक व्यथा पार नष्ट होतात, मानव आपल्या सर्व सांसारिक दुःखांना ज्याच्या सेवेनें टाळतात, प्रत्यग्भूत होऊन म्हणजे सर्वान्तर्यामी परब्रह्मस्वरूप होऊन मानव ज्याच्या कृपेनें नित्य आनंदांत रमतो असा जो सर्वान्तर्यामी परब्रह्मस्वरूप श्रीदक्षिणामूर्ति त्याचें मी आपल्या चित्तांत ध्यान करीत आहें.

णानेत्येवं यन्मनु-मध्यस्थित-वर्णा-
न्भक्ताः काले वर्ण-गृहीत्यै प्रजपन्तः ॥
मोदन्ते संप्राप्त-समस्त-श्रुति-तन्त्रा-
स्तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ १० ॥

'वर्णगृहीत्यै' म्हणजे सर्व पदार्थांचें ग्रहण होण्याकरितां "वर्ण्यन्ते इति वर्णाः" या व्युत्पत्तीनें वर्ण शब्दाचा अर्थ वेदशास्त्रादि वाङ्मयांत वर्णन केलेले सर्व पदार्थ असा होतो. त्यांची 'गृहीति' म्हणजे ग्रहण—ज्ञान अर्थात् सर्व शास्त्रीय पदार्थांचें ज्ञान-विज्ञान प्राप्त होण्यास सुज्ञ लोक ज्याच्या मंत्राचा जप करतात. मनु म्हणजे मंत्र. मंत्रानेंच मनन करण्याचें सामर्थ्य प्राप्त होत असल्यामुळें मंत्राला मनु असें म्हणतात. ज्याच्या मंत्रामध्यें 'मध्यस्थित' म्हणजे मध्यभागीं घटक असलेले वर्ण 'णा', 'न' इत्यादि आहेत. अर्थात् याच स्तोत्रांतील प्रत्येक श्लोकाचें पहिलें पहिलें अक्षर संगृहीत केलें म्हणजे चोवीस श्लोकांनीं चोवीस अक्षरांचा मंत्र तयार होतो. या मंत्रांत 'णा न' इत्यादि वर्ण मंत्राचे घटक

म्हणून समाविष्ट झालेले आहेत. त्या सर्व वर्णांना संकलित करून जो कोणी भक्त योग्य कालीं त्या वर्णांचा अर्थात् त्या वर्णांनीं सिद्ध झालेल्या मंत्राचा जप करतात त्यांना समस्त वेद आणि तंत्रें हीं उत्तम रीतीनें प्राप्त होतात. ते समस्त निगम म्हणजे वेद आणि आगम म्हणजे तंत्र यामध्यें निष्णात होतात आणि जीवनभर आनंदांत रहातात, त्या सर्वान्तर्यामी दक्षिणामूर्तीचें मी चिंतन करीत आहें.

मूर्ति-च्छाया-निर्जित-मन्दाकिनि-कुन्द-
प्रालेयाम्भो-राशि-सुधा-भूति-सुरेभा ।
यस्याभ्राभा हासविधौ दक्षशिरोधि-
स्तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ ११ ॥

श्रीदक्षिणामूर्तींच्या देहाची कांति इतकी स्वच्छ आहे कीं, तिनें आपल्या स्वच्छपणानें आपल्या शुभ्रवर्णानें गंगेच्या प्रवाहालाहि जिंकलेलें आहे. गंगेच्या प्रवाहापेक्षांहि ती अत्यंत स्वच्छ – निर्मल – शुभ्रवर्ण दिसत आहे. कुंदाच्या फुलापेक्षांहि ती अधिक पांढरी शुभ्र आहे. अथवा 'प्रालेयाम्भोराशि' म्हणजे बर्फाचा सागर. बर्फाच्या सागरापेक्षांहि ती शुभ्र दिसत आहे. अमृत, भस्म अथवा सुरेभ म्हणजे इंद्राचा ऐरावत या सर्वांच्या कांतीला श्रीदक्षिणामूर्तींच्या शरीरकांतीनें पराजित केलेलें आहे. अर्थात् या सर्वांपेक्षां त्यांची देहकांति शुभ्र आहे. ते हंसूं लागले असतां 'दक्षशिरोधि' म्हणजे उजव्या बाजूचा कंठ. 'अभ्राभा' म्हणजे शरद्ऋतूंतील ढगाप्रमाणें, अभ्रकाप्रमाणें अथवा कापराप्रमाणें पांढरा स्वच्छ दिसतो. अर्थात् हें श्रीदक्षिणामूर्तींच्या शिवस्वरूपाचें वर्णन आहे. त्यांच्या डाव्या बाजूस पार्वती असल्यामुळें डाव्या बाजूच्या कंठाला अधिक गौरवर्णता आलेली आहे. मध्यभाग विषानें नीलवर्ण दिसत आहे, तर कंठाचा उजवा भाग त्यांच्याच हास्यानें अधिक निर्मल – शुभ्र दिसत आहे. अशा त्या सर्वान्तर्यामी असलेल्या श्रीदक्षिणा-मूर्तिस्वरूप सांब-सदाशिवाला मी आपल्या हृदयामध्यें निरंतर चिंतीत आहे.

तप्त-स्वर्ण-च्छाय-जटाजूट-कटाह-
प्रोद्यद्वीची-वल्लि-विराजत्सुरसिन्धुम् ।
नित्यं सूक्ष्मं नित्य-निरस्ताखिल-दोषं
तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ १२ ॥

जिच्या लाटा उंच उंच उसळत आहेत अशी 'सुरसिन्धु' म्हणजे गंगा ही ज्याच्या मस्तकावर तापविलेल्या सुवर्णाप्रमाणें देदीप्यमान दिसणाऱ्या जटाजूटरूपी कटाहामध्यें एखाद्या वेलीप्रमाणें विराजत आहे. कटाह म्हणजे कढई किंवा राशि. जो नित्य म्हणजे अविनाशी आहे त्याचप्रमाणें 'सूक्ष्म' म्हणजे अत्यंत तीक्ष्ण, निर्मळ आणि एकाग्र झालेल्या बुद्धीनेंच जाणण्याला योग्य आहे. तसेंच ज्याच्या ठिकाणीं जरा, मृत्यु, क्षुधा, पिपासा, शोक, मोह, रज, तम इत्यादि सर्व संसार-दोष नेहमींच निरस्त झालेले आहेत. अर्थात् कोणत्याहि संसारधर्माचा ज्याला लेशहि स्पर्श करूं शकत नाहीं असे जे सर्वान्तर्यामी श्रीगुरु दक्षिणामूर्ति भगवान् शंकर त्यांचें मी चिंतन करीत आहें.

येन ज्ञातेनैव समस्तं विदितं स्या-
द्यस्मादन्यद्वस्तु जगत्यां शशशृङ्गम् ।
यं प्राप्तानां नास्ति परं प्राप्यमनादिं
तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ १२ ॥

ज्याचें ज्ञान झालें असतांना या जगांत सर्व कांहीं जाणल्यासारखें होतें, कारण तो सर्वरूपानें नटलेला आहे. सर्व कांहीं तोच आहे, असें आहे म्हणूनच त्याचें ज्ञान झालें कीं, या जगांत सर्व विषयांचें ज्ञान झाल्यासारखेंच आहे. सर्व विषय हे तत्स्वरूपच असल्यामुळें त्याच्या ज्ञानानें सर्वांचें ज्ञान होणें हें युक्ति-युक्तच आहे. त्याच्यावांचून या जगांत दुसरी वस्तुच नाहीं. सोनें सोडून सोन्याच्या अलंकारांना जसें निराळें पहातां येत नाहीं त्याचप्रमाणें अन्तर्यामी परब्रह्मस्वरूप श्रीदक्षिणामूर्तींना सोडून तुम्ही दुसरें कांहीं पहावयास जाल, तर तुमच्या हातीं कांहीं लागणार नाहीं. त्यांना सोडून दुसऱ्या पदार्थांचें अस्तित्व हें शशशृंगासारखे – सशाच्या शिंगाप्रमाणें मिथ्या होय. शशशृंग या पदार्थाला जसें अस्तित्व नाहीं त्याचप्रमाणें अधिष्ठानस्वरूप असलेल्या श्रीदक्षिणामूर्तीशिवाय या जगांत प्रतीतीला येणारे इतर पदार्थ शशशृंगासारखे मिथ्याच आहेत. ज्याच्या स्वरूपाला जाऊन मिळालें असतां मिळविण्यासारखें दुसरें कांहीं शिल्लक उरतच नाहीं. " यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः " या गीतावचनाप्रमाणें ज्याचा लाभ झाला असतां दुसरें कांहीं अधिक मिळवावयाचें शिल्लक राहिलें

आहे असें वाटत नाहीं, अशा त्या अनादि, अनंत आणि सर्वान्तर्यामी असलेल्या श्रीदक्षिणामूर्तींना मी हृदयामध्यें चिंतीत आहें.

"एकेन विज्ञातेन सर्वमिदं विज्ञातं भवति।" अधिष्ठानभूत मूलतत्त्व जाणलें असतां कार्यरूप विश्वप्रपंच त्याहून तत्त्वतः भिन्न नसल्यामुळें तोहि जाणल्यासारखाच होतो हा सिद्धान्त छांदोग्यउपनिषदांत मोठ्या युक्तीनें प्रतिपादन केलेला आहे. श्रीदक्षिणामूर्ति हे परात्पर शिवतत्त्वस्वरूप असल्यामुळें सर्व विश्वाचें ते अधिष्ठानच आहेत; म्हणून त्यांचें ज्ञान झालें कीं, विश्वप्रपंच जाणल्यासारखाच होतो; आणि या जगांत दुसरें कांहीं जाणावयाचें शिल्लक उरत नाहीं. हें दक्षिणामूर्ति यांच्याविषयींचें केलेलें वर्णन योग्यच आहे. (सु. स्तो. सं., भाग १ ला, श्रीदक्षिणामूर्तिस्तोत्र पहा.)

मत्तो मारो यस्य ललाटाऽक्षि-भवाग्नि-
स्फूर्जत्कील-प्रोषित-भस्मीकृत-देहः ।
तद्भस्मार्षीद्यस्य सुजातः पटवास-
स्तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ १४ ॥

सौंदर्याच्या गर्वानें उन्मत्त झालेला कामदेव ज्याच्या भालप्रदेशीं असलेल्या तृतीय नेत्रांतून निर्माण होणाऱ्या अग्नीच्या भडकलेल्या प्रखर ज्वालांनीं जागच्या जागीं दग्ध झाला व त्याच्या देहाचें भस्म झालें. 'स्फूर्जत्' म्हणजे प्रखर, देदीप्यमान. 'कील' म्हणजे ज्वाला आणि 'प्रोषित' म्हणजे दग्ध केला, जाळला. 'उषू' जाळणें या धातूला प्र हा उपसर्ग लागून प्रोषित शब्द बनला. याप्रमाणें दुसऱ्या चरणांतील शब्दांचे अर्थ लक्षांत घ्यावेत. श्रीदक्षिणामूर्तींनी शिवस्वरूपानें कामदेवाच्या शरीराचें भस्म केल्यानंतर तें भस्म त्यांच्या अंगाला लावण्याचें एक 'सुजात' म्हणजे अत्यंत उत्तम असें 'पटवास' म्हणजे सुगंधि चूर्णच बनलें ! त्या सर्वान्तर्यामी असलेल्या श्रीदक्षिणामूर्ति गुरूंचें मी आपल्या हृदयांत चिंतन करीत आहें.

ह्यम्भोराशौ संसृतिरूपे लुठतां त-
त्पारं गन्तुं यत्पदभक्तिर्दृढनौका ।
सर्वाराध्यं सर्वगमानन्दपयोधिं
तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ १५ ॥

ज्याच्या चरणकमलाची भक्ति ही या संसाररूपी महासागरामध्यें गटांगळ्या खात असलेल्या लोकांना संसारसागराच्या पैलतीराला सुखानें जाऊन पोहोंचण्यासाठीं उपयोगाला येणारी एक भरभक्कम – मजबूत अशी नौकाच आहे. भगवान् श्रीदक्षिणामूर्ति हे सर्वाराध्य म्हणजे विश्वांतील सर्व मानवांनीं आराधना-पूजा-उपासना करण्यास योग्य आहेत. ते 'सर्वग' म्हणजे सर्वत्र संचार करणारे अथवा सर्वव्यापी, सदासर्वकाळ सर्वत्र सर्वरूपानें असणारे असे आहेत. त्याच-प्रमाणें ते आनंदाचे महासागर आहेत. आनंदाचे निधान आहेत. त्यांना भजणाऱ्याचें जीवनहि आनंदमय होतें. अशा त्या सर्वान्तर्यामी श्रीदक्षिणामूर्तीचें मी भक्तिपूर्वक चिंतन करीत आहें.

मेधावी स्यादिन्दु-वतंसं धृतवीणं
कर्पूराभं पुस्तकहस्तं कमलाक्षम् ।
चित्ते ध्यायन्यस्य वपुर्द्राङ् निमिषार्धं
तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ १६ ॥

या श्लोकांत आचार्य श्रीदक्षिणामूर्तीच्या सगुण स्वरूपाचें ध्यान – मूर्तीचा आकार प्रगट करीत आहेत. श्रीदक्षिणामूर्तीच्या मस्तकावर त्यांच्या जटाजूटा-मध्यें त्यांनीं चंद्र धारण केलेला आहे. 'इन्दु' म्हणजे चंद्र. तो ज्यांचा 'वतंस' म्हणजे शिरोभूषण आहे. त्याचप्रमाणें 'धृतवीणम्' म्हणजे ज्यांनीं आपल्या हातांत वीणा म्हणजे तंबोरा धारण केलेला आहे. एका हातामध्यें पुस्तक आहे तर एका हातांत कमलाक्षमाला धारण केलेली आहे. एका हातानें ते चिन्मुद्रा – ज्ञानमुद्रा दाखवीत आहेत. त्यांची अंगकांति कापराप्रमाणें गौरवर्ण आहे. अशा या श्रीगुरुदक्षिणामूर्तीचें मनामध्यें अर्थात् मन लावून निमिषार्ध जरी ध्यान केलें, तरी तो 'मेधावी' म्हणजे बुद्धिमान् होतो. त्याच्या बुद्धीमध्यें धारणाशक्ति निर्माण होते. ग्रहण केलेला विषय न विसरणें याला 'धारणा' असें म्हणतात. ही धारणा-शक्ति ज्या बुद्धीमध्यें असते तिला 'मेधा' असें म्हणतात. श्रीदक्षिणामूर्तीच्या उपासनेनें मनुष्य 'द्राक्' म्हणजे ताबडतोब मेधावी बनतो. त्या सर्वान्तर्यामी श्रीदक्षिणामूर्तीचें मी चिंतन करीत आहें.

धाम्नां धाम प्रौढरुचीनां परमं य-
त्सूर्यादीनां यस्य स हेतुर्जगदादेः ।

एतावान् यो यस्य न सर्वेश्वरमीड्यं
तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ १७ ॥

ज्याचें उत्कृष्ट तेज हाच प्रौढप्रकाशक असलेल्या सूर्य, चंद्र आणि अग्नि इत्यादि तेजस्वी पदार्थांच्या प्रकाशाला हेतु म्हणजे कारणीभूत आहे, अर्थात् त्याच्याच प्रकाशानें सूर्य, चंद्र, अग्नि, ग्रह, नक्षत्र, तारे वगैरे प्रकाशत असतात. "यस्य भासा सर्वमिदं विभाति" याप्रमाणें श्रुतिग्रंथांतहि त्याच्या स्वरूपाचें वर्णन केलेलें आहे. "यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् । यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥" असें प्रत्यक्ष श्रीकृष्णानेंहि गीतेंत सांगितलें आहे. येथील 'मामक' हा शब्द परब्रह्मसंबंधाचा द्योतक असल्यामुळें श्रीदक्षिणामूर्तीनाहि तो लागू पडतोच. तात्पर्य, श्रीदक्षिणामूर्ति हे सर्वप्रकाशक परब्रह्मस्वरूप आहेत. "एतावान् यः" म्हणजे जो येवढा आहे, अर्थात् एवढा ज्याचा महिमा आहे, जो स्वयंप्रकाश आहे, अर्थात् ज्याला प्रकाशित करणारा दुसरा कोणताच प्रकाश कारणीभूत नाहीं, जो सर्वांचा ईश्वर आहे आणि सर्वांनीं स्तुति करण्याला योग्य आहे, त्या सर्वान्तर्यामी असलेल्या श्रीदक्षिणामूर्तीला मी आपल्या अन्तःकरणांत भक्ति-भावानें चिंतीत आहें.

प्रत्याहार-प्राण-निरोधादि-समर्थै-
र्भक्तैर्दान्तैः संयत-चित्तैर्यतमानैः ।
स्वात्मत्वेन ज्ञायत एव त्वरया य-
स्तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ १८ ॥

भगवान् श्रीदक्षिणामूर्ति यांच्या स्वरूपाचा साक्षात्कार होण्याकरितां यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि या अष्टांग योगाचें अनुष्ठान करण्याला समर्थ असलेले सतत प्रयत्न करतात. त्याचप्रमाणें 'दान्त' म्हणजे इंद्रियांचा निग्रह केलेले आणि 'संयतचित्त' म्हणजे मनाचा निग्रह केलेले असे भक्तजन सतत प्रयत्न करतात. प्रयत्नाअंतीं ज्याच्या कृपेनें त्यांना आत्मस्वरूपानें स्वात्मरूपानें त्याचा सत्वर साक्षात्कार होतो. तात्पर्य, अष्टांग योगाच्या अभ्यासानें इंद्रियनिग्रह मनोनिग्रहपूर्वक अनन्यभक्तीनें श्रीदक्षिणामूर्तीच्या साक्षात्काराचा प्रयत्न केला, तर त्यांच्याच कृपेनें स्वात्मरूपानें

यांचा साक्षात्कार सत्वर होतो. अशा या सर्वान्तर्यामी असलेल्या श्रीदक्षिणामूर्तीचें मी हृदयामध्यें चिंतन करीत आहें.

ज्ञांशीभूतान् प्राणिन एतान्फलदाता
चित्तान्तस्थः प्रेरयति स्वे सकलेऽपि ।
कृत्ये देवः प्राक्तनकर्मानुसरः सं-
स्तं प्रत्यक्त्वं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ १९ ॥

भगवान श्रीदक्षिणामूर्ति हे सर्वसमर्थ परमात्मा परमेश्वर आहेत. ते स्वतः चित्स्वरूप चैतन्यघन आहेत. 'ज्ञ' शब्दाचा अर्थ ज्ञानघन, चिद्घन असा आहे. चिद्घनस्वरूप असलेल्या त्यांच्यापासूनच जगांतील सर्व जीवांचा आविर्भाव होत असतो. " अग्नेर्यथा विस्फुलिङ्गाः " प्रदीप्त अग्नींतून ज्याप्रमाणें असंख्य स्फुलिंग बाहेर पडतात, त्याचप्रमाणें चैतन्यघनांतून चिदंशस्वरूप असंख्य जीवांचा आविर्भाव होत असतो. या अभिप्रायानें आचार्यांनीं सर्व प्राण्यांना उद्देशून 'ज्ञांशीभूतान्' हें विशेषण दिलेलें आहे. या जगांत एकमेव अद्वितीय शुद्धचैतन्य हें एकच तत्त्व आहे. तें निर्विकार आणि निराकार असल्यामुळें त्या ठिकाणीं अंशांशिभाव संभवत नाहीं. मग जीवांना 'ज्ञांशीभूत' म्हणजे चैतन्याचा अंश असें कसें म्हटलें असें कोणी विचारल्यास, त्याचें समाधान करण्यासाठींच 'ज्ञांशीभूत' या पदांत अभूततद्भावे 'च्वि' योजला आहे. अंशभूत असें म्हटलें असतें तर वरची शंका बरोबर आहे असें म्हणतां आलें असतें. जीव तत्त्वतः अंशस्वरूप नसल्यामुळेंच त्याला 'अंशीभूत' असें म्हटलें आहे. अंशीभूत म्हणजे तत्त्वतः अंशस्वरूप नसतांहि अंशाप्रमाणें प्रतीतीला येणारा. तात्पर्य, जीव हा देहेंद्रियादि-संघात-रूपी उपाधीमुळें चैतन्यघन ब्रह्मस्वरूपाहून निराळा दिसतो.

तत्त्वतः ब्रह्मस्वरूप पण उपाधीमुळें भिन्न भिन्न स्वरूपानें प्रतीतीला येणाऱ्या या असंख्य प्राण्यांना त्यांच्या त्यांच्या अनादि प्राक्तन कर्मानुसारानें त्यांना त्यांच्या कर्मांचीं सुखदुःखात्मक फळें देणारा, सर्वांच्या हृदयांमध्यें राहून सर्वांना आपआपल्या कार्याची प्रेरणा देणारे, असे हे देदीप्यमान असलेले सर्वान्तर्यामी भगवान् श्रीदक्षिणामूर्ति त्यांचें मी हृदयांत चिंतन करतों.

प्रज्ञामात्रं प्रापित-संविन्निज-भक्तं
प्राणाक्षादेः प्रेरयितारं प्रणवार्थम् ।

माहुः प्राज्ञा यं विदितानुभव-तत्त्वा-
स्तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ २० ॥

'प्रज्ञामात्रम्' भगवान् श्रीदक्षिणामूर्ति हे केवल ज्ञानस्वरूप आहेत. ते ब्रह्मस्वरूप आहेत. प्रज्ञा किंवा प्रज्ञान या दोन्ही शब्दांचा अर्थ ब्रह्म असा आहे. 'प्रज्ञानं ब्रह्म' असें श्रुतीनेंच सांगितलें आहे. दक्षिणामूर्ति हे स्वतः तर ज्ञानस्वरूप आहेतच, पण जे कोणी त्यांची अनन्यभक्ति करतील त्यांनाहि ते ज्ञान प्राप्त करून देतात. आपल्या भक्तांनाहि ते ब्रह्मस्वरूपाचा साक्षात्कार करून देतात. ब्रह्मच बनवितात. "ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति" असें श्रुतीनें वर्णन केलेलें आहे. श्रीदक्षिणामूर्ति हे प्राण आणि इन्द्रियें यांना आपआपल्या कार्यांची प्रेरणा देतात. याच अभिप्रायानें केनोपनिषदामध्यें "श्रोत्रस्य श्रोत्रं मनसो मनः, यद्वाचो ह वाचं प्राणस्य प्राणश्चक्षुषश्चक्षुः" कानाचा कान, मनाचें मन, वाणीची वाणी (प्रेरकशक्ति), प्राणाचा प्राण आणि डोळ्याचा डोळा असें ज्याचें वर्णन केलेलें आहे, तें परब्रह्मतत्त्वच श्रीदक्षिणामूर्ति होत. 'प्रणवार्थम्' म्हणजे श्रीदक्षिणामूर्ति हें मूर्तिमंत प्रणवाचा अर्थच आहेत. अकार, उकार, मकार आणि अर्धमात्रा या सर्वांचा समुच्चय असलेला ॐकार हेंच प्रणवाचें स्वरूप होय. प्रणव हा ब्रह्मा, विष्णु, महेश आणि तुरीयतत्त्व म्हणजे शिवशक्तिस्वरूप असलेलें परब्रह्म यांचा द्योतक आहे. श्रीदक्षिणामूर्ति हे परात्पर परब्रह्मस्वरूप असल्यामुळें ते प्रणवाचा अर्थच आहेत. 'विदितानुभवतत्त्वाः' म्हणजे ज्यांनीं वेदांचें रहस्य जाणलेलें आहे असे प्राज्ञ म्हणजे तत्त्ववेत्ते लोक ज्याचें या श्लोकाच्या पूर्वार्धांत सांगितल्याप्रमाणें वर्णन करतात, त्या प्रत्यगात्मस्वरूप म्हणजे सर्वान्तर्यामी असलेल्या श्रीदक्षिणामूर्तीचें मी आपल्या हृदयांत भक्तिपूर्वक चिंतन करीत आहें.

यस्याज्ञानादेव नृणां संसृतिबन्धो
यस्य ज्ञानादेव विमोक्षो भवतीति ।
स्पष्टं ह्रूते वेदशिरो देशिकमाद्यं
तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ २१ ॥

ज्याच्या अज्ञानामुळें मानवांना संसाराचें बंधन प्राप्त होत असतें आणि ज्याच्या स्वरूपाचा साक्षात्कार होतांच संसाराचा निरास होतो आणि मानव

संसाराच्या बंधनांतून मुक्त होतो असें श्रीदक्षिणामूर्तीचें स्वरूप उपनिषदांमध्यें स्पष्टच प्रतिपादन केलेलें आहे.

यांतील अभिप्राय असा आहे कीं, जीवांना संसाराची जी प्रतीती येत असते ती स्वस्वरूपाच्या – आत्मस्वरूपाच्या अज्ञानामुळें येत असते. वस्तुस्थिति अशी आहे कीं, या जगांत आत्मस्वरूप असलेल्या चित्तत्त्वाशिवाय दुसरें कांहींच नाहीं. असें असूनहि हा विविध नामरूपानें नटलेला जो विश्वप्रपंच प्रतीतीला येतो, तो निव्वळ अज्ञानामुळेंच प्रतीतीला येतो. या अज्ञानालाच भ्रम असें दुसरें नांव आहे. भ्रमामध्यें प्रतीतीला येणारे पदार्थ भ्रमाचा निरास झाल्यानंतर निरास पावत असतात. भ्रमाचा आणि भ्रमांत भासलेल्या पदार्थांचा निरास झाल्यानंतर भ्रमाचें अधिष्ठान मात्र शिल्लक रहात असतें. त्या अधिष्ठानाचा जोंपर्यंत साक्षात्कार होत नाहीं तोंपर्यंत भ्रमांत भासलेल्या पदार्थांमुळें मानवाला सुखदुःखें होत रहातात. अधिष्ठानाचा साक्षात्कार झाला कीं, अज्ञानानें भासलेले पदार्थ मिथ्या आहेत – खोटे आहेत हें पटतें. ते खोटे आहेत हें पटल्यानंतर त्यांच्याबद्दलचा अभिनिवेश मावळतो व त्यापासून होणारीं सुखदुःखेंहि मावळतात. अशा रीतीनें अधिष्ठानाच्या साक्षात्कारानें जीव सर्व दुःखांतून मुक्त होतो. अधिष्ठानालाच आत्मा, परमात्मा, परब्रह्म असें म्हणतात, असा उपनिषदांचा सिद्धान्त आहे. प्रकृतस्थलीं त्या अधिष्ठानाला 'दक्षिणामूर्ति' असें म्हटलेलें आहे. या दृष्टीनें वरील श्लोकार्धाचा अर्थ लक्षांत घ्यावा.

'देशिकमाद्यम्' जगद्गुरु श्रीदक्षिणामूर्ति हे या जगाचे आद्य गुरु आहेत. आद्य, मुख्य, श्रेष्ठ किंवा मूळ आरंभीचे, या स्वरूपानें श्रीदक्षिणामूर्ति हेच या जगाचें 'देशिक' म्हणजे उपदेश करणारे, आत्मकल्याणाचा मार्ग दाखविणारे गुरु आहेत. ते परब्रह्मस्वरूप आहेत. सर्वान्तर्यामी आहेत. मी आपल्या हृदयांत भक्तियुक्त अन्तःकरणानें त्यांचें चिंतन करीत आहें.

छन्नेऽविद्यारूपपटेनैव च विश्वं
यत्राध्यस्तं जीव-परेशत्वमपीदम् ।
भानोर्भानुष्वम्बुवदस्ताखिलभेदं
तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ २२ ॥

अविद्यारूपी पटलानें अथवा वस्त्रानें मानवाची दृष्टि झांकली गेली म्हणजे त्याला विश्वप्रपंचाच्या अधिष्ठानाचा – अर्थात् आत्म्याचा साक्षात्कार होत नाहीं. अज्ञानरूपी पडद्यानें आत्माहि झांकल्यासारखा वाटतो. नंतर त्या आत्म्याच्या ठिकाणीं अज्ञानाच्या विक्षेपशक्तीनें तूं-मी व माझें-तुझें अथवा जीवात्मा-परमात्मा हा सर्व विकल्प भ्रमानें प्रतीतीला येतो. यालाच अध्यास असें म्हणतात. तत्त्वतः ज्या ठिकाणीं जें नाहीं त्या ठिकाणीं त्याची प्रतीति येणें हेंच अध्यासाचें स्वरूप होय. तत्त्वतः ज्या ठिकाणीं जें नसतें पण अज्ञानानें भासतें त्यालाच अध्यस्त असें म्हणतात. अज्ञानानें आच्छादन केल्यानंतरच ज्याच्या ठिकाणीं विश्व हें अध्यस्त म्हणून प्रतीतीला येतें, त्याचप्रमाणें हें जीवत्व, परमात्मत्व दर्शवील आणिलें जातें. याला आचार्य तिसऱ्या चरणांत दृष्टान्त देत आहेत. " भानोर्भानुषु अम्बुवत् " या वाक्यांतील पहिला भानु शब्द सूर्य या अर्थानें आहे, तर दुसरा भानु शब्द किरण या अर्थानें आहे. उन्हाळ्यामध्यें प्रखर उन्हाच्या वेळीं सूर्याच्या किरणांवर जलाचा भास होतो. असतात सूर्याचे किरण, पण दिसतात मात्र पाण्याचे तरंग !! यालाच व्यवहारामध्यें मृगजल असें म्हणतात. या जलाकडे पाहून हरिण फार फसतात, म्हणून याला मृगजल असें नांव पडलें. या ठिकाणीं जल हें अध्यस्त आहे तर सूर्याचे किरण हें अधिष्ठान आहेत.

प्रकृतस्थलीं अधिष्ठानरूप श्रीदक्षिणामूर्तींचा साक्षात्कार झाला कीं, अध्यस्तरूप सर्व द्वैतप्रपंच पार विलयाला जातो. सर्व द्वैतभाव मावळतो. याच अभिप्रायानें आचार्यांनीं श्रीदक्षिणामूर्तींना 'अस्ताखिलभेदं' हें विशेषण दिलेलें आहे. अस्त म्हणजे निरस्त झालेला आहे, नाहींसा झालेला आहे. अखिलभेद म्हणजे संपूर्ण द्वैतभाव ज्यांच्या ठिकाणीं, ते सर्वान्तर्यामी असलेले भगवान श्रीदक्षिणामूर्ति यांचें मी हृदयांत चिंतन करीत आहें.

स्वाप-स्वप्नौ जाग्रदवस्थाऽपि न यत्र
प्राणश्चेतः सर्वगतो यः सकलात्मा ।
कूटस्थो यः केवल-सच्चित्सुखरूप-
स्तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ २३ ॥

भगवान् श्रीदक्षिणामूर्ति यांच्या ठिकाणीं 'स्वाप' म्हणजे निद्रा आणि 'स्वप्न' म्हणजे जागृति आणि सुषुप्ति यांच्यामधील अवस्था, त्याचप्रमाणें जाग्रदवस्था या तिन्ही अवस्था नाहींत, ते या तिन्ही अवस्थांच्या पलीकडचे असून तिन्ही अवस्थांचे साक्षी आहेत. ते प्राणरूपानें सर्व प्राण्यांच्या देहांत विराजमान आहेत. तसेंच ते चित्तरूपानेंहि पण सर्वांमध्यें विराजत आहेत. याच अभिप्रायानें त्यांना 'प्राणः' आणि 'चेतः' असें म्हटलेलें आहे. जो 'सर्वगत' म्हणजे सर्वत्र ओतप्रोत भरलेला असून सर्वांचा आत्मा आहे. त्याचप्रमाणें जो 'कूटस्थ' म्हणजे अचल अथवा निर्विकार आहे. जो केवळ सच्चिदानंदस्वरूप आहे, अशा त्या सर्वान्तर्यामी असलेल्या श्रीदक्षिणामूर्तीना मी शरण जात आहें. त्यांचें मी एकनिष्ठेनें चिंतन करीत आहे.

हार्देन्देवं विस्मयमीयुर्मुनि-मुख्या
ज्ञाते यस्मिन् स्वात्मतयाऽनात्मविमोहः ।
प्रत्यग्भूते ब्रह्मणि यातः कथमित्थं
तं प्रत्यञ्चं दक्षिण-वक्त्रं कलयामि ॥ २४ ॥

सर्वान्तर्यामी ब्रह्मस्वरूप असलेल्या श्रीदक्षिणामूर्तींचा आत्मस्वरूपानें साक्षात्कार झाला असतां मोठ्या मोठ्या ऋषिमुनींना मोठा आनंद होतो. त्यांचा 'अनात्मविमोह' म्हणजे पुत्र, मित्र, कलत्र, वित्त, वैभव आणि देह इत्यादि अनात्म-स्वरूप असलेल्या काल्पनिक द्वैतप्रपंचाबद्दलचा व्यामोह अगदीं नाहींसा होतो. आत्मस्वरूपाविषयींचें अज्ञान नाहींसें होतें आणि त्यांना आत्मसाक्षात्काराचा जो आनंद होतो त्या आनंदाच्या भरांत ते हा ! हा ! अहा ! असे आनंदाचे उद्गार काढीत नाचूं लागतात. कसें अज्ञान मावळलें ! कसा व्यामोह नाहींसा झाला ! याप्रमाणें ते मोठें आश्चर्य व्यक्त करीत असतात. अशा रीतीनें ज्याचा साक्षात्कार झाला असतां ऋषिमुनींच्या आनंदाला पारावार उरत नाहीं, त्या सर्वान्तर्यामी असलेल्या श्रीदक्षिणामूर्तींचें मी आपल्या हृदयांत अनन्यभक्तीनें चिंतत करीत आहें.

यैषा रम्यैर्मत्तमयूराभिधवृत्तै-
रादौ कल्पिता यन्मनुवर्णैर्मुनिभङ्गी ।

तामेवैनां दक्षिण-वक्त्रः कृपयाऽसा-
वूरीकुर्यादेशिक-सम्राट् परमात्मा ॥ २५ ॥

सद्गुरु श्रीदक्षिणामूर्ति यांनीं आपली ही स्तोत्ररूपी सेवा स्वीकारावी अशी आचार्य या स्तोत्रांतील शेवटच्या श्लोकानें प्रार्थना करीत आहेत. " या एषा मुनिभङ्गी आदौ यन्मनुवर्णैः कल्पा रम्यैः मत्तमयूराभिधवृत्तैः रचिता अस्ति तां एव एतां असौ देशिकसम्राट् परमात्मा दक्षिणवक्त्रः कृपया ऊरीकुर्यात् " जी ही 'मुनिभङ्गी' म्हणजे मननशील असलेल्या मीं (शंकराचार्यांनीं) केलेली ही 'भङ्गी' म्हणजे वैचित्र्यपूर्ण स्तुति. ही स्तुति अशी आहे कीं, तिच्या प्रत्येक श्लोकांतील पहिलें अक्षर हें श्रीदक्षिणामूर्ति देवाच्या मंत्रांतील क्रमशः एक एक अक्षरच होय. या स्तोत्रांतील श्लोकांची रचना अत्यंत रम्य अशा मत्तमयूर नांवाच्या वृत्तानें केलेली आहे. त्याच ह्या स्तुतीचा उपदेशकांचे सम्राट् असलेल्या आणि परमात्मस्वरूप असलेल्या श्रीदक्षिणामूर्ति भगवान् शंकर यांनीं कृपा करून अंगीकार करावा, हीच माझी नम्र प्रार्थना आहे.

'मत्तमयूर' हें समवृत्त आहे. याच्या प्रत्येक चरणांत तेरा तेरा अक्षरें असतात. चार अक्षरांनीं आणि नऊ अक्षरांनीं विराम घ्यावा लागतो. प्रत्येक चरणांत मगण, तगण, यगण, सगण आणि शेवटचें अक्षर गुरु, अशी याची रचना असते. " वेदैरन्ध्रैर्मौ यसगा मत्तमयूरम् " असें याचें लक्षण आहे. सुबोधस्तोत्रसंग्रह भाग पहिला यांतील हरिमीडेस्तोत्र याच वृत्तांतील आहे.

श्रीदक्षिणामूर्तिमन्त्रजपविधि

आचमन, प्राणायाम झाल्यानंतर देश-काल-संकीर्तन करून संकल्प करावा. " मम आत्मनः सकलाभीष्टसिद्धिद्वारा श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं श्रीदक्षिणामूर्तिजपाख्यं कर्म करिष्ये " अस्य श्रीदक्षिणामूर्तिमन्त्रस्य ब्रह्मा ऋषिः । गायत्रीच्छन्दः । श्रीदक्षिणामूर्तिर्देवता । ममाभीष्टसिद्ध्यर्थं जपे विनियोगः । ॐ आं ॐ अङ्गुष्ठाभ्यां नमः । ॐ ईं ॐ तर्जनीभ्यां नमः । ॐ ऊं ॐ मध्यमाभ्यां नमः । ॐ ऐं ॐ अनामिकाभ्यां नमः । ॐ औं ॐ कनिष्ठिकाभ्यां नमः । ॐ अः ॐ करतल-करपृष्ठाभ्यां नमः । ॐ आं ॐ हृदयाय नमः । ॐ ईं ॐ शिरसे स्वाहा । ॐ ऊं ॐ शिखायै वषट् । ॐ ऐं ॐ कवचाय हुम् । ॐ औं ॐ नेत्रत्रयाय वौषट् । ॐ अः ॐ अस्त्राय फट् । अथ मन्त्रन्यासः । ॐ ॐ नमो अङ्गुष्ठाभ्यां नमः ।

ॐ भगवते तर्जनीभ्यां नमः । ॐ दक्षिणामूर्तये मध्यमाभ्यां नमः । ॐ मह्यं तर्जनीभ्यां नमः । ॐ मेधां प्रज्ञां अनामिकाभ्यां नमः । ॐ प्रयच्छ स्वाहा करतल-करपृष्ठाभ्यां नमः । ॐ ॐ नमो हृदयाय नमः । ॐ भगवते शिरसे स्वाहा । ॐ दक्षिणामूर्तये शिखायै वषट् । ॐ मह्यं कवचाय हुम् । ॐ मेधां प्रज्ञां नेत्रत्रयाय वौषट् । ॐ प्रयच्छ स्वाहा अस्त्राय फट् । अथ ऋष्यादिन्यासः । ॐ ब्रह्मर्षये नमः शिरसि । ॐ गायत्रीच्छन्दसे नमो मुखे । ॐ श्रीदक्षिणामूर्तिदेवतायै नमः हृदये । ॐ अभीष्टसिद्ध्यर्थे जपे विनियोगाय नमः सर्वाङ्गेषु । अथ ध्यानम् ।

स्फटिकरजतवर्णं मौक्तिकीमक्षमाला-
ममृतकलशविद्याज्ञानमुद्राः कराग्रैः ।
दधतमुरगकक्षं चन्द्रचूडं त्रिनेत्रं
विधृतविविधभूषं दक्षिणामूर्तिमीडे ॥

एवं ध्यात्वा, पञ्चमानसोपचारैः संपूज्य गुरुमुखगृहीतं मन्त्रं जपेत् । अन्यत्सर्व पूर्ववत् । ॐ तत्सत् ।

■ ■ ■

भवानीभुजङ्गमस्तोत्रम् ।

[" भवति अथवा भवते इति भवः " विश्वरूपानें जो नटतो त्याला भव असें म्हणतात. भव म्हणजे परमात्मा परब्रह्म. त्यालाच शिव असेंहि म्हणतात. आदिनारायण, आदिविष्णु, भगवान्, वासुदेव, गणाधीश, गुणाधीश इत्यादि त्याचींच नांवें आहेत. विश्वाच्या आरंभी तें परब्रह्मतत्त्व पुरुषरूपानें नटलें म्हणजे त्याला हीं नांवें दिलीं जातात. तेंच तत्त्व स्त्रीरूपानें नटलें म्हणजे त्याला आदिमाया, महाशक्ति, महालक्ष्मी, महादेवी, शिवा, भवानी, दुर्गा, अंबिका, जगज्जननी इत्यादि नांवें दिलीं जातात. शिव शिवानी, मृड मृडाणी, रुद्र रुद्राणी, भव भवानी, शर्व शर्वाणी इत्यादि नांवें हीं जोडीची वाचक असलीं तरी त्या जोडींत विवक्षित असलेलें तत्त्व आणि त्या शब्दांत अभिप्रेत असलेला अर्थ मात्र एकच आहे. तो म्हणजे विश्वोद्भावक अथवा विश्वाच्या रूपानें नटणारें तत्त्व. तेंच तत्त्व प्रकृतस्थलीं भवानी शब्दानें विवक्षित आहे.

एकच तत्त्व प्रकृति आणि पुरुष या रूपानें नटत असल्यामुळें आणि दोघांचेंहि निरुपाधिक स्वरूप सारखेंच असल्यामुळें त्यांच्यांतील भेद स्पष्ट होत नाहीं. नाहींच तो, मग स्पष्ट कोठून होणार ? तथापि विश्वांतील विविध कार्यें पार पाडण्याकरितां तें तत्त्व जेव्हां विविध रूपानें नटतें, तेव्हांच त्याच्या स्थूल, सगुण स्वरूपाचा साक्षात्कार होऊं शकतो. तो साक्षात्कारहि त्याच्याच कृपेनें व्हावयाचा असतो. सगुण स्वरूपाच्या साक्षात्कारांतूनच त्याच्या निर्गुण स्वरूपांतहि अवगाहन करतां येतें. त्याच्या नित्य निरतिशय आनंदाचा लाभ घेतां येतो. पण त्याची कृपा कशी होणार ? अनन्यभक्ति हेंच ईशकृपेचें उत्तम साधन होय. ईशात्मरूप असलेल्या शंकरांनाच भव असें म्हणतात. त्या भवाशीं सर्वस्वीं अभिन्न – एकरूप असलेली जी त्याची शक्ति तीच भवानी होय. तिलाच दुर्गा, उमा, पार्वती असेंहि म्हणतात. तिलाच आचार्यांनीं या स्तोत्रांत महादेवी आणि राजराजेश्वरी असें म्हटलेलें आहे. अर्थात् आचार्यांची उपास्य असलेली श्रीविद्या ती हीच होय. हिलाच त्रिपुरसुंदरी अथवा महात्रिपुरसुंदरी असेंहि म्हणतात. श्रीचक्राच्या केंद्रस्थानांत मधोमध असलेल्या त्रिकोणामध्यें ती विराजमान झालेली असून, सर्वांच्या सुषुम्ना नाडींतहि कुंडलिनीच्या रूपानें तीच विलसत असते. आचार्यांची भवानीदेवी ही जशी शंकरांच्या अर्धांगी विराजमान झालेली आहे तशीच ती चिदानंदस्वरूपहि आहे. शिवतत्त्वाप्रमाणेंच तीहि पण विश्वरूपानें नटलेली आहे. तिच्या सगुण आणि निर्गुण स्वरूपाचें आचार्यांनीं या स्तोत्रांत मोठें सुंदर वर्णन केलेलें आहे. श्रीदेवी भवानीचें हें स्तोत्र भुजंगप्रयात वृत्तांतलें असल्यामुळें याला भवानीभुजंगमस्तोत्र असें नांव दिलेलें आहे.]

षडाधारषट्केरुहान्तर्विराज-
त्सुषुम्नान्तरालेऽतितेजोलसन्तीम् ।
सुधामण्डलं द्रावयन्तीं पिबन्तीं
सुधामूर्तिमीडे चिदानन्दरूपाम् ॥ १ ॥

हे माते ! मूलाधारचक्र, स्वाधिष्ठानचक्र, मणिपूरचक्र, अनाहतचक्र, विशुद्धिचक्र आणि आज्ञाचक्र अशीं हीं शरीरांतील सहा आधारचक्रें हींच कोणीं कमलें. या कमलांतून विराजमान असलेली जी सुषुम्ना नाडी तिच्याहि अंतर्भागीं तेजोरूपानें विलसणारी जी कुंडलिनी-शक्ति तीच. तूं आहेस. तूं सहस्रदल कमलामध्यें

असलेल्या सुधामंडलाला वितळवितेस आणि त्या सुधेचें – अमृताचें प्राशन करतेस. तूं स्वतः चिदानंदरूप सुधामूर्तीच आहेस. आई भवानी मी तुझी स्तुति करीत आहें.

ज्वलत्कोटि-बालार्क-भासारुणाङ्गीं
सुलावण्य-शृङ्गार-शोभाभिरामाम् ।
महापद्म-किञ्जल्क-मध्ये विराज-
त्त्रिकोणे निषण्णां भजे श्रीभवानीम् ॥ २ ॥

हे आई भवानी ! देदीप्यमान असलेल्या कोट्यवधि बालसूर्यांच्या तेजाप्रमाणें तुझी अंगकांति अरुणवर्ण आहे. तुझें उत्तम लावण्य आणि तुझ्या अंगावर असलेले उत्तमोत्तम शृंगारालंकार यांच्या शोभेनें तूं अत्यंत अभिराम म्हणजे सुंदर दिसत आहेस. मस्तकाच्या ठिकाणीं विराजमान असलेल्या सहस्रदल कमलाच्या केसरांमध्यें शोभायमान असलेला जो त्रिकोण, तेंच तुझें वसतिस्थान आहे. तेथें तूं बसलेली आहेस. आई ! मी तुझ्या आश्रयाला आलों आहें. मला पदरांत घे.

क्वणत्किङ्किणी-नूपुरोद्भासि-रत्न-
प्रभा-लीढ-लाक्षार्द्र-पादाब्ज-युग्मम् ।
अजेशाच्युताद्यैः सुरैः सेव्यमानं
महादेवि मन्मूर्ध्नि ते भावयामि ॥ ३ ॥

रुणु झुणु रुणु झुणु आवाज करणारीं घुंगरें अथवा घागऱ्या ज्यांना बसविलेल्या आहेत अशा नूपुरांवर जडविलेल्या उज्ज्वल रत्नांची कांति ज्यांच्या वर पसरलेली आहे, तसेंच ज्यांना (स्वाभाविक आरक्तवर्ण असुनहि) अळिता वगैरे लावल्यामुळें ते अधिकच आरक्तवर्ण दिसत आहेत, असे तुझे दोन्ही चरणारविंद; ब्रह्मा, विष्णु आणि महेश इत्यादि देवहि ज्यांची सेवा करीत आहेत, त्या तुझ्या दोन्ही चरणकमलांना, हे आई महादेवी ! मी आपल्या मस्तकीं धारण करीत आहें अथवा मी माझ्या मस्तकीं असलेल्या सहस्रदल कमलामध्यें त्यांचे सतत चिंतन करीत आहें.

सुशोणाम्बरावद्ध-नीवी-विराज-
न्मणिरत्न-काञ्ची-कलापं नितम्बम् ।
स्फुरद्दक्षिणावर्तनाभिं च तिस्रो
वलीरम्ब ते रोमराजिं भजेऽहम् ॥ ४ ॥

हे माते त्रिपुरसुंदरी ! अरुणवर्ण वस्त्राच्या घातलेल्या निऱ्यांवर विराजमान असलेला, ज्याच्यावर मोठमोठीं रत्नें जडविलेलीं आहेत असा सोन्याचा कंबरपट्टा तुझ्या कमरेवर शोभत आहे. त्याचप्रमाणें उजवीकडे वळण घेणाऱ्या पाण्याचरील भोंवऱ्याप्रमाणें गंभीर असलेला तुझा दिव्य नाभिप्रदेश आणि त्यावर विराजमान असलेल्या तीन वळ्या व रोमपंक्ति. (मनाला सर्व विषयांपासून परावृत्त करणाऱ्या या) तुझ्या रमणीय गात्रांचें मी भक्तियुक्त अन्तःकरणानें चिंतन करीत आहें.

लसद्वृत्तमुत्तुङ्गमाणिक्यकुम्भो-
पमश्रि स्तनद्वन्द्वमम्बाम्बुजाक्षि ।
भजे दुग्धपूर्णाभिरामं तवेदं
महाहारदीप्तं सदा प्रस्नुतास्यम् ॥ ५ ॥

हे आई ! रम्य वर्तुळाकार आणि माणकांच्या घड्याप्रमाणें आरक्तवर्ण तसेंच उन्नत आणि परिपुष्ट असे तुझे दोन्ही स्तन जणुं कांहीं भक्तजनांचे सकल मनोरथ पूर्ण करणाऱ्या दुधानें भरलेले आहेत. त्यांच्यावर मोठमोठे रत्नजडित सुवर्णाचे व मौक्तिकांचे हार शोभत आहेत. खरोखर भक्तजनांच्या सकल कामना पूर्ण करणारें अमृत सदासर्वकाळ त्यांच्या मुखांतून स्रवत आहे. ते सुंदर आहेत. हे कमलनयने माते त्रिपुरसुंदरी ! मी भक्तिपूर्वक अन्तःकरणानें त्यांचें चिंतन करीत आहें.

शिरीषप्रसूनोल्लसद्बाहुदण्डै-
र्ज्वलद्बाण-कोदण्ड-पाशाङ्कुशैश्च ।
चलत्कङ्कणोदार-केयूरभूषो-
ज्ज्वलद्भिर्लसन्तीं भजे श्रीभवानीम् ॥ ६ ॥

आई ! शिरसाच्या फुलाप्रमाणें आरक्तवर्ण आणि सुंदर अशा बाहुदंडांनीं तूं देदीप्यमान बाण, धनुष्य, पाश आणि अंकुश धारण केलेले आहेस. तुझ्या हातांतील आयुधें चंचल कंकणांनीं आणि श्रेष्ठ केयूर म्हणजे बाक्या, बाजूबंद इत्यादि अलंकारांनीं, तसेंच उज्ज्वल दिसणाऱ्या त्या आयुधांनीं तूं अधिकच शोभून दिसत आहेस. आई श्रीभवानी ! मी तुला अनन्यभावानें भजत आहें.

शरत्पूर्णचन्द्र-प्रभा-पूर्णबिम्बा-
धर-स्मेर-वक्त्रारविन्दां सुशान्ताम् ।
सुरत्नावली-हार-ताटङ्क-शोभां
महासुप्रसन्नां भजे श्रीभवानीम् ॥ ७ ॥

जिचें अधरबिंब आणि स्मितयुक्त मुखकमल शरदृतूंतील पूर्णिमेच्या पूर्ण-चंद्राच्या प्रभेनें जणुं कांहीं पूर्णपणें व्यापलेलें आहे. जी अत्यंत शांत आहे, उत्तमोत्तम रत्नराजींनीं युक्त असलेले सुवर्णाचे हार आणि ताटंक म्हणजे कर्ण-भूषणें यांनीं जिची शोभा अधिकच उठून दिसत आहे, जी सर्वांत श्रेष्ठ आणि अत्यंत सुप्रसन्न आहे, त्या श्रीभवानीमातेला मी अनन्यभावानें भजत आहें.

सुनासा-पुटं सुन्दर-भ्रू-ललाटं
तवौष्ठश्रियं दानदक्षं कटाक्षम् ।
ललाटोल्लसद्गन्ध-कस्तूरि-भूषं
स्फुरच्छ्रीमुखाम्भोजमीडेऽहमम्ब ॥ ८ ॥

हे आई त्रिपुरसुंदरी ! तुझीं सुंदर नासापुटें (सरळ नाक), सुंदर भुवया आणि सुंदर विशाल भाल तसेंच ओठांची शोभा, भक्तजनांना मनोवांच्छित फलांचें दान करण्यास दक्ष असलेलें तुझे कृपापूर्ण कटाक्ष, तसेंच भाल-प्रदेशीं शोभणारें गंध कस्तूरी आणि अलंकार; अशा थाटानें विराजमान असलेल्या तुझ्या सुप्रसन्न मुखकमलाची मी भक्तिभावानें स्तुति करीत आहें.

चलत्कुन्तलान्तर्भ्रमद्भृङ्गवृन्दं
घनस्निग्ध-धम्मिल्ल-भूषोज्ज्वलं ते ।
स्फुरन्मौलि-माणिक्य-बद्धेन्दुरेखा-
विलासोल्लसद्दिव्यमूर्धानमीडे ॥ ९ ॥

हे आई भवानी ! मस्तकावरील वाऱ्यानें हलणाऱ्या तुझ्या कुरळ्या केसाभोंवतालीं भ्रमरांचे समुदाय गुंजारव करीत विरट्या घालीत आहेत. मस्तकावरील घनदाट आणि चकाकणाऱ्या केसांची वेणी आणि त्यांत बसविलेले अलंकार यांनी तुझ्या मस्तकाची शोभा अत्यंत उज्ज्वल म्हणजे सुंदर दिसत आहे. तुझ्या मस्तकावर असलेल्या देदीप्यमान मुकुटामध्यें बसविलेल्या हिऱ्या-माणकांच्या समूहांत असलेली ती चन्द्रकोर फारच शोभा देत आहे. त्या शोभेनें खुलून दिसणाऱ्या तुझ्या दिव्य मस्तकाची मी स्तुति करीत आहें.

इति श्रीभवानि स्वरूपं नवेदं
प्रपञ्चात्परं चातिसूक्ष्मं प्रसन्नम् ।
स्फुरत्वम्ब डिम्भस्य मे हृत्सरोजे
सदा वाङ्मयं सर्वतेजोमयं च ॥ १० ॥

हे आई श्रीभवानी ! तुझें हें स्वरूप दृश्यप्रपंचाच्या पलीकडचें आहे. तें अत्यंत सूक्ष्म आहे आणि प्रसन्न आहे. आई ! मी तुझें 'डिंभ' म्हणजे अज्ञ बालक आहें. माझ्या हृदयकमलामध्यें तुझें हें वाङ्मयरूप म्हणजे शब्दप्रपंच व सर्व तेजोमयरूप म्हणजे लौकिक आणि अलौकिक असलेला अर्थप्रपंच, हा सदासर्वकाळ स्फुरत राहो, प्रकाशत राहो, हीच माझी प्रार्थना आहे.

गणेशाणिमाद्यखिलैः शक्तिवृन्दै-
र्वृतां वै स्फुरच्चक्रराजोल्लसन्नीम् ।
परां राजराजेश्वरि त्रैपुरि त्वां
शिवाङ्कोपरिस्थां शिवां भावयामि ॥ ११ ॥

गणेशादि देवता आणि अणिमादि अखिल देवता ह्या सर्व तुझ्या पार्षद-गणांत अंतर्भूत असलेला शक्तिसमुदायच होय. या अनेक शक्तिसमुदायांनीं तूं वेष्टिलेली आहेस. या सर्व शक्तिसमुदायासह तूं चक्रराज म्हणजे सर्व यंत्रांमध्यें अत्यंत उज्ज्वल व श्रेष्ठ असलेलें श्रीचक्र – श्रीयन्त्र, त्या श्रीयंत्रांतील मुख्य त्रिकोणांत विराजमान असलेल्या बिंदुस्थानीं विलसत आहेस. तूं परा म्हणजे सर्व-श्रेष्ठ आहेस. राजांचेहि राजे बडे बडे महाराज, अष्टदिक्पाल आणि त्रिभुवनाधीश, त्यांचीहि तूं ईश्वरी म्हणजे सत्ताधीश आहेस. म्हणून तुला राजराजेश्वरी म्हणतात.

हे त्रिपुराधिवासिनी! स्थूल सूक्ष्म आणि कारण या तिन्ही देहांत तुझेंच वास्तव्य आहे. म्हणून तुला त्रैपुरी – त्रिपुरसुंदरी अशा अन्वर्थ नांवानें हांक मारतात. शिव म्हणजे परब्रह्मस्वरूप भगवान् शंकर, त्यांच्या अंकावर विराजमान असलेली तूंहि पण 'शिवा' म्हणजे लोककल्याणकर्त्री अशीच आहेस. आई! मी तुझें निरंतर चिंतन करीत आहें.

त्वमर्कस्त्वमिन्दुस्त्वमग्निस्त्वमाप-
स्त्वमाकाश-भू-वायवस्त्वं महत्त्वम् ।
त्वदन्यो न कश्चित्त्वपञ्चोऽस्ति सर्वं
त्वमानन्दसंवित्स्वरूपां भजेऽहम् ॥ १२ ॥

आई! तूंच सूर्य आहेस. तूंच चंद्र आहेस. अग्नि तूंच आहेस आणि जलहि पण तूंच आहेस. आकाश, पृथ्वी आणि वायु हींहि पण तुझींच रूपें आहेत. अहंकार ज्याच्यांतून आविर्भूत होतो तें महत्तत्त्वहि तूंच आहेस. हा विश्वप्रपंच तुझ्याहून निराळा असा कांहीं नाहींच. सर्व कांहीं तूंच आहेस. आनंदस्वरूपहि तूंच आहेस आणि चित्स्वरूपहि तूंच आहेस. तात्पर्य, नामरूपात्मक विश्वप्रपंच-स्वरूपहि तूंच आहेस आणि सच्चिदानंद परब्रह्मस्वरूपहि पण तूंच आहेस. सर्व कांहीं तूंच आहेस. आई! मी भक्तियुक्त अन्तःकरणानें तुझा आश्रय करीत आहें.

श्रुतीनामगम्ये सुवेदागमज्ञा
महिम्नो न जानन्ति पारं तवाम्ब ।
स्तुतिं कर्तुमिच्छामि ते त्वं भवानि
क्षमस्वेदमत्र प्रमुग्धः किलाहम् ॥ १३ ॥

हे आई, तूं श्रुतीलाहि अगम्य आहेस. अर्थात् वेदांनाहि तुझ्या स्वरूपाचा पूर्णपणें थांगपत्ता लागलेला नाहीं. बडेबडे वेदशास्त्रज्ञ देखील तुझ्या माहात्म्याचा थेलपार जाणत नाहींत. मग इतरांची काय कथा! तरी पण, हे आई भवानी! मी तुझी स्तुति करण्याची इच्छा करीत आहें. आई! खरोखर किती वेडा आहे मी! तुझी स्तुति करण्याची तिळमात्रहि योग्यता नसतांना मी तुझी स्तुति करण्याची इच्छा करीत आहें, केवढें हें माझें धाष्टर्य आहे! आई! क्षमा कर, मी खरोखर वेडा आहें.

गुरुस्त्वं शिवस्त्वं च शक्तिस्त्वमेव
त्वमेवासि माता पिता च त्वमेव ।
त्वमेवासि विद्या त्वमेवासि बन्धु-
र्गतिर्मे मतिर्देवि सर्वं त्वमेव ॥ १४ ॥

हे देवी जगज्जननी ! तूं गुरु आहेस. शक्तियुक्त शिव म्हणजे विश्वप्रपंचाची घडामोड करणारें मायोपहित ब्रह्मचैतन्य अर्थात् परमात्माहि तूंच आहेस. आणि त्याची ती कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुं समर्थ असलेली अनिर्वचनीय मायाशक्ति तीहि पण तूंच आहेस. आई ! तूंच आमची माता म्हणजे जननी आहेस आणि पिता म्हणजे जनक तोहि पण तूंच आहेस. तूंच माझी विद्या आणि तूंच माझा बंधु म्हणजे 'आप्त' अर्थात् खरी हितचिंतक आहेस. माझी गति म्हणजे जेथें पोहोंचावयाचें आहे तें स्थान परम धाम तूंच आहेस. अथवा गति म्हणजे आधार. आई ! माझा आधार तूंच आहेस आणि माझी मति म्हणजे बुद्धि हीहि पण तूंच आहेस. सर्व कांहीं तूंच आहेस. आई ! कृपा कर.

शरण्ये वरेण्ये सुकारुण्यमूर्ते
हिरण्योदराद्यैरगण्ये सुपुण्ये ।
भवारण्यभीतेश्च मां पाहि भद्रे
नमस्ते नमस्ते नमस्ते भवानि ॥ १५ ॥

हे आई भवानी ! तूंच एक शरण्य म्हणजे शरण जाण्याला योग्य आहेस. तुझ्यावांचून दुसऱ्या कोणाला शरण जावें ? आई, तूंच वरेण्य म्हणजे सर्वश्रेष्ठ आहेस. तूं 'सुकारुण्यमूर्ति' म्हणजे उत्तम दयेनें जिची मूर्ति परिपूर्ण भरलेली आहे. म्हणूनच तुला करुणावन, करुणासागर असें म्हणतात. हे आई ! हिरण्योदर म्हणजे जगत्स्रष्टा ब्रह्मदेव तो ज्यांच्यामध्यें 'आद्य' म्हणजे प्रमुख आहे अशा विष्णु महेश, इंद्र, वरुण, कुबेर इत्यादि देवांनाहि जिच्या स्वरूपाची गणना करतां येत नाहीं, जिचें स्वरूप जाणतां येत नाहीं अशी तूं आहेस. तशीच तूं उत्तम पुण्य-स्वरूप आहेस. आई ! उत्तम पुण्यानेंच तुझें दर्शन आणि स्मरण घडतें आणि तुझ्या दर्शनानें व स्मरणानेंच उत्तम पुण्य लाभतें म्हणून तूं 'सुपुण्या' आहेस. हे कल्याणकारिणी माते ! या संसाररूपी गहन अरण्याची मला मोठी भीति वाटत

आहे. या भयापासून तूं माझें रक्षण कर. आई भवानी ! नमस्ते नमस्ते नमस्ते. मी तुला भक्तियुक्त अन्तःकरणानें त्रिवार नमस्कार करतों.

इतीमां महच्छ्रीभवानीभुजंग-
स्तुतिं यः पठेद्भक्तियुक्तश्च तस्मै ।
स्वकीयं पदं शाश्वतं वेदसारं
श्रियं चाष्टसिद्धिं भवानी ददाति ॥ १६ ॥

याप्रमाणें या श्रेष्ठ असलेल्या श्रीभवानीभुजंगमस्तोत्राचें जो कोणी भक्तियुक्त अन्तःकरणानें पठण करील, त्याला भवानी माता वेदांनीं प्रामुख्यानें गाइलेलें आपलें शाश्वत पद आणि अणिमादि अष्टसिद्धींनीं संपन्न असलेलें वैभवहि पण अर्पण करते.

भवानी भवाना भवानी त्रिवार-
मुदारं मुदा सर्वदा ये जपन्ति ।
न शोको न मोहो न पापं न भीतिः
कदाचित्कथंचित्कुतश्चिज्जनानाम् ॥ १७ ॥

भवानी भवानी भवानी याप्रमाणें प्रत्येक वेळीं तीन तीन वेळां जे कोणी अत्यंत प्रेमानें व उदारबुद्धीनें अर्थात् आदरयुक्त श्रद्धेनें सदासर्वकाळ जप करतात, त्या भक्तजनांना शोक, मोह, भीति, पाप, ताप, दैन्य इत्यादि गोष्टींचा कधींहि कोणाकडूनहि कोणत्याहि प्रकारें त्रास होत नाहीं. सदासर्वकाळ ते सुखी रहातात.

■ ■ ■

देवीभुजङ्गमस्तोत्रम् ।

[आपण देवीच्या दर्शनाकरितां एखाद्या मंदिरांत जातों. तेथें चतुर्भुज, अष्टभुज मूर्तीचें अथवा शेंदूर लावलेल्या तांदळ्याचें दर्शन घेतों. ज्या प्रतीकाचें आपण दर्शन घेत असतों त्या प्रतीकाचें मूळ रूप किती भव्य आणि उदात्त आहे याची आपल्याला कल्पनाहि नसते. आचार्य या स्तोत्रांत देवी भवानीच्या मूलगामी भव्य स्वरूपाची कल्पना देत आहेत. तिच्या एकमेव अद्वितीय आणि

निर्गुण व निराकार स्वरूपांतूनच अनंत, सगुण आणि साकार स्वरूपांचा आविर्भाव झालेला आहे. सर्व देवदेवतांच्या रूपानें तीच नटलेली आहे. एवढेंच नव्हे तर विश्वांतील पदार्थमात्र तिचेंच स्वरूप आहे. ती सूक्ष्मापेक्षांहि सूक्ष्म आणि विराटापेक्षांहि विराट् आहे. ती सर्व जगाचा आधार आहे. सर्व विश्वाच्या उत्पत्तीला, स्थितीला आणि प्रलयाला तीच कारण आहे. याच अभिप्रायानें "हेतुः समस्तजगताम्" आणि "प्रकृतिस्त्वमाद्या" अशा शब्दांनी इंद्रादि देवांनी तिची स्तुति केलेली आहे.

"दीव्यति इति देवी" अशी देवी शब्दाची व्युत्पत्ति आहे. दिव् म्हणजे प्रकाशणें. स्वतःसिद्ध असलेल्या आत्मप्रकाशानें ती नित्य प्रकाशत असते. ती स्वतः तर प्रकाशतेच पण सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्रें, अग्नि आणि प्रदीप इत्यादि परप्रकाशक पदार्थांनाहि तीच प्रकाश देत असते म्हणून तिला देवी असें म्हणतात. अथवा दिव् धातूचा अर्थ खेळणें असा घेतल्यास अनंतकोटिब्रह्मांडांच्या घडा-मोडींच्या रूपानें तिचींच ही क्रीडा चाललेली आहे म्हणूनहि तिला देवी असें म्हणतात. अथवा "देवयति इति देवी" अशी देवी शब्दाची व्युत्पत्ति स्वीकारल्यास, जी प्रवृत्तीचा आणि निवृत्तीचा उपदेश करून सर्वांना आपापल्या अधिकाराप्रमाणें व्यवहार करायला लावते ती देवी. अथवा सर्वांच्या अंतरांत वास करून ती सर्वांना खेळविते म्हणूनहि तिला देवी असें म्हटलेलें आहे. याच अभिप्रायानें "इन्द्रियाणामधिष्ठात्री" असें तिचें देवी माहात्म्यांत वर्णन केलेलें आहे.

देवीचा स्वभाव, प्रभाव, स्वरूप आणि कार्य हें सर्वच कांहीं अलौकिक आहे. तिची वेदांत, शास्त्रांत आणि पुराणांत आलेलीं नांवें जरी पाहिलीं तरी आपल्याला या गोष्टीची कल्पना येईल. दुर्गा, भवानी, चण्डिका, अम्बिका, शारदा, मंगला, नारायणी, महामाया, माहेश्वरी, महादेवी, जयंती, महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती, आद्या, महाशक्ति, महाविद्या, शताक्षी, अनन्ताक्षी, सिद्धेश्वरी, चक्रेश्वरी, राजराजेश्वरी, नित्या, सनातनी, श्रीविद्या, महा-नन्दा, ललिता, महात्रिपुरसुन्दरी, कामेश्वरी इत्यादि. हीं सर्व नांवें तिचें महत्त्वच प्रतिपादन करीत आहेत. या सर्व नांवांत "दुर्गा" हें तिचें नांव तर फारच महत्त्वाचें आहे. "दुःखेन गम्यते प्राप्यते असौ इति दुर्गा" अशी दुर्गा शब्दाची व्युत्पत्ति आहे. मोठ्या मोठ्या योगिजनांना व ज्ञानी लोकांनाहि तिची प्राप्ति म्हणजे साक्षात्कार मोठ्या कष्टानें होतो. "यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति

तत्त्वतः" हा न्याय तत्त्वतः तिलाच लागू पडतो. म्हणून तिला दुर्गा असें म्हणतात. दुर्ग अधिक आ बरोबर दुर्गा. दुर्गशब्दाचे अनेक अर्थ आहेत. दुर्ग हा एक दैत्य होता. तो तिनें युद्धामध्यें मारला म्हणून तिला दुर्गा असें म्हणतात. तसेंच महाविघ्न, संसारबन्धन, कुकर्म, शोक, दुःख, नरक, यमयातना, जन्म, महाभय आणि अतिरोग असे दुर्ग शब्दाचे किती तरी अर्थ आहेत. दुर्गा शब्दांत घटक असलेला "आ" शब्द मारणारा या अर्थाचा आहे. ही देवी या सर्वांना मारते, यांचा नाश करते म्हणून तिला दुर्गा असें म्हणतात. "दुर्गो दैत्ये महाविघ्ने भवबन्धे कुकर्मणि। शोके दुःखे च नरके यमदण्डे च जन्मनि॥ महाभयेऽतिरोगे चाप्याशब्दो हन्तृवाचकः। एतान् हन्त्येव या देवी सा दुर्गा परिकीर्तिता॥" दुर्गा शब्दांत घटक असलेला प्रत्येक वर्ण सार्थ आहे. द् + उ + र् + ग् + आ = दुर्गा. अशी दुर्गा शब्दाची फोड आहे. दकार हा चंड, मुंड, शुंभ, निशुंभ आणि महिषासुर इत्यादि दैत्यांचा नाश सुचवितो. उकार हा विघ्नांचा नाश सुचवितो. रेफ हा रोगांचा नाश सुचवितो. गकार हा पापांचा नाश सुचवितो, तर आकार हा भय आणि शत्रु यांचा नाश सुचवितो. दुर्गेचें स्मरण केलें, नामसंकीर्तन केलें अथवा श्रवण केलें तरी देखील या सर्वांचा निश्चित नाश होतो. दुर्गा ही परात्पर शिवतत्त्वाची शक्ति आहे असें श्रीहरीनेंच तिचें वर्णन केलेलें आहे. "दैत्यनाशार्थवचनो दकारः परिकीर्तितः। उकारो विघ्ननाशस्य वाचको वेदसंमतः॥ रेफो रोगघ्नवचनो गश्च पापघ्नवाचकः। भयशत्रुघ्नवचनश्चाकारः परिकीर्तितः॥ स्मृत्युक्तिश्रवणाद्यस्या एते नश्यन्ति निश्चितम्। ततो दुर्गा हरेः शक्तिर्हरिणा परिकीर्तिता॥"

दुर्गा भक्तजनांचें रक्षण करते. भक्तजनांच्या मोठमोठ्या संकटांचा ती सदासर्वकाळ नाश करीत असते. तिचें यथार्थ स्वरूप जाणणें देवांना देखील कठीण आहे. अशा या दुर्गेचें मी भक्तिभावानें पूजन करतों. असे देवीभागवतामध्यें म्हटलेलें आहे. "दुर्गा त्रायति भक्तं या सदा दुर्गार्तिनाशिनी। दुर्ज्ञेया सर्वदेवानां तां दुर्गां पूजयाम्यहम्।" असा हा दुर्गादेवीचा महिमा आहे. त्याचें कितीहि वर्णन केलें तरी तें अपुरेंच होईल. तिच्या महिम्याचा पार कोणाला लागलेला आहे? तो लागत नाहीं म्हणूनच तर "दुर्गायै दुर्गपारायै" असें म्हणून देवांनीं तिला नमस्कार केलेला आहे. अशा या देवीचा सर्वत्र "उदयोऽस्तु उदयोऽस्तु" या अर्थाच्या 'आईराजाचा उदो उदो' अशा शब्दांनीं जयघोष होणें उचितच आहे.

ती देवी जीवात्मा आणि परमात्मा यांच्याहि पलीकडे आहे. तिच्याच प्रेरणेनें विकसित झालेल्या सहस्रदलकमलाच्या आंत अत्यंत मृदुकोशावर प्रतिष्ठित असलेल्या श्रीचक्ररूपी सिंहासनावर ती विराजमान झालेली आहे. आतां आपण या श्रीराजराजेश्वरी देवीचें स्तवन आचार्यांच्याच शब्दानें करूं या.]

विरिञ्च्यादिभिः पञ्चभिर्लोकपालैः
समूढे महानन्दपीठे निषण्णम् ।
धनुर्बाणपाशाङ्कुश-प्रोत-हस्तं
महस्त्रैपुरं शंकराद्वैतमव्यात् ॥ १ ॥

"त्रैपुरं महः नः अव्यात्" त्रिपुरसुंदरीरूपी तेज आमचें रक्षण करो. श्रीललिता महात्रिपुरसुंदरी ही स्वयंप्रकाश शुद्ध चित्स्वरूप परब्रह्मच असल्यामुळें तिला उद्देशून "महः" हा शब्द योजला आहे. 'महस्' म्हणजे तेज किंवा कांति. कांतीच्या रूपानें श्रीदेवीचें सर्वभूतांमध्यें वास्तव्य असतें. "या देवी सर्वभूतेषु कान्तिरूपेण संस्थिता" असें श्रीदेवीमाहात्म्यांत तिचें वर्णन केलेलें आहे. तें तेज म्हणजे ती देवी शंकरांशीं अद्वैतभावाला प्राप्त झालेली आहे. ती शंकरांशीं समरस झालेली आहे म्हणून तिला "शंकराद्वैत" हें विशेषण दिलेलें आहे. "त्रैपुरम्" स्थूल शरीर, सूक्ष्म शरीर आणि कारण-शरीर हींच कोणीं त्रिपुरें. या त्रिपुरांमध्यें ती वास्तव्य करते. या तिन्ही पुरांची ती अधिष्ठात्री असल्यामुळें तिला त्रिपुरा असें म्हणतात. त्रैपुर शब्दाचाहि तोच अर्थ आहे.

ती त्रिपुरादेवी महानंदपीठावर बसलेली आहे. श्रीचक्रालाच महानंदपीठ असें म्हणतात. भूपुरापासून मध्यत्रिकोणापर्यंत जसजसा श्रीचक्राच्या स्वरूपाचा विचार करावा तसतसा आनंद वाढतच जातो. त्रिकोणांतील मध्यबिंदु हा तर पूर्ण परब्रह्मस्वरूप असल्यामुळें आनंदमय आहे. या आनंदमय पीठावरच श्रीललितादेवी विराजमान झालेली आहे "स्वे महिम्नि प्रतिष्ठितः" या सिद्धान्तप्रमाणें महानन्दस्वरूप तिचा महिमा हेंच तिचें पीठ म्हणजे आसन होय. श्रीचक्रांतील नऊ आवरणें हें जणुं कांहीं तिच्या मणिमय मंडपाचे नऊ प्राकार म्हणजे तटच आहेच. त्यांच्या आंत तिचें तें महानन्दपीठ विराजत आहे. ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईशान आणि सदाशिव यांनीं त्या पीठाला धारण केलेलें आहे. याच अभिप्रायानें आचार्यांनीं "विरिञ्च्यादिभिः पञ्चभिः

लोकपालैः "समूढे" असें त्या सिंहासनाचें – महानन्दपीठाचें वर्णन केलेलें आहे. "विरिञ्चि म्हणजे ब्रह्मदेव. अव्यक्त अवस्थेंत बीजभूत वासनारूपानें असलेल्या जीवांना जन्म देऊन ब्रह्मदेव हे जीवांवर उपकारच करीत असतात. आत्मकल्याण प्राप्त करून घेण्यासाठींच त्यांनीं जीवांना जन्म दिलेला असतो. या दृष्टीनें त्यांना लोकपाल म्हटलेलें आहे. स्थितिकालीं सर्वांच्या संरक्षणाचें कार्य भगवान् विष्णु करीत असल्यामुळें ते लोकपाल म्हणून प्रसिद्धच आहेत. शेतांतून नांगर फिरविणें हें जसें शेतकऱ्याचें लोकोपकारक कार्य असतें त्याचप्रमाणें शंकराचें सृष्टीचा संहार करण्याचेंहि कार्य लोकोपकारकच आहे म्हणून भगवान् शंकर हेहि लोकपालच आहेत. आदि शब्दानें इंद्रादि लोकपाल समजावेत. अशा या लोकपालांनीं धारण केलेल्या महानंदपीठावर श्रीदेवी विराजमान झालेली आहे. तिनें आपल्या हातांत भक्तजनांच्या कल्याणासाठीं धनुष्य, बाण, पाश आणि अंकुश धारण केलेले आहेत. अशी ती दुर्गा श्रीत्रिपुरादेवी आमचें रक्षण करो.

पड्भादिभिः पञ्चभिः कोशजालैः
शिरः-पक्ष-पुच्छात्मकैरन्तरन्तः ।
निगूढे महायोगपीठे निषण्णं
पुरारेरथान्तःपुरं नौमि नित्यम् ॥ २ ॥

तैत्तिरीयोपनिषदामध्यें शिर, पक्ष, पुच्छ इत्यादि अवयवांच्या रूपांनीं निरूपिलेल्या आणि अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय या पंच कोशांच्या जालांनीं झांकलेल्या अशा हृदयाकाशरूपी महायोगपीठावर आरूढ झालेली, श्रीत्रिपुरारि भगवान् शंकर यांची "अन्तःपुरम्" म्हणजे नववयस्क असलेली परमप्रिय श्रीमहात्रिपुरसुंदरी देवी, तिची मी सर्वकाळ स्तुति करीत आहें. असा या श्लोकाचा अन्वयानुसारी सरळ अर्थ आहे.

शुद्ध चित्स्वरूप आत्मतत्त्वाची ओळख करून देण्याकरितां तैत्तिरीयोपनिषदामध्यें पांच कोशांची कल्पना दिलेली आहे. अन्नमयकोश, प्राणमयकोश, मनोमयकोश, विज्ञानमयकोश आणि आनन्दमय कोश असे आत्म्याचे पांच कोश आहेत. या ठिकाणीं कोश शब्दाचा अर्थ पेटी, आवरण, किंवा आच्छादन असा आहे. तलवारीच्या आच्छादनाला म्यान असें म्हणतात. तलवार म्यान करून खुंटीवर ठेवलेली असते. ती म्यानच तलवार म्हणून दाखविली जाते. ती खरी

तलवार नसते. ती म्यानाच्या आंत असते. पहाणारा मात्र म्यानालाच तलवार समजत असतो. तीच स्थिति आत्म्याची आहे. आत्म्याची निरुपाधिक स्वरूपांत प्रतीति येणें हें अत्यंत अवघड आहे. याकरितां आत्म्याचें ज्ञान करून देतांना प्रथम देहच आत्मा म्हणून सांगितला जातो. वस्तुतः देह हा आत्मा नसून तो आत्म्याचा कोश आहे, आच्छादन आहे. त्यालाच उपाधि असें म्हणतात. या उपाधीलाच सामान्य लोक आत्मा समजतात. तत्त्ववेत्ते लोक याला आत्म्याचा अन्नमय कोश असें म्हणतात. कारण तो अन्नानेंच बनला आहे व अन्नानेंच पोसला जातो. देहाचा आत्म्याशीं अत्यंत निकट संबंध आहे. जीवाला सुख-दुःखांचे साक्षात्कार देहांतच होत असतात. म्हणून सामान्यजन देहालाच आत्मा समजतात. आत्मा हा देहाच्या आंत आहे.

देहामध्यें प्राण असेल तरच देहाची हालचाल होऊं शकते. प्राण गेला कीं देह हा चिखलाच्या गोळ्यासारखा निश्चेष्ट पडतो. म्हणून देहांत राहून देहाची हालचाल घडविणारा प्राणच आत्मा आहे असें कांहीं लोक समजतात. पण प्राण हाहि खरा आत्मा नसून तो देहाप्रमाणेंच आत्म्याचें आच्छादन आहे. आत्मा हा त्याच्या आंत आहे म्हणून त्याला प्राणमय कोश असें म्हणतात. प्राण हा देहाची हालचाल घडवीत असला तरी तो स्वतः वायुस्वरूप आहे. " देहान्तःसंचारी वायुः प्राणः " देहामध्यें संचार करणाऱ्या वायूलाच प्राण असें म्हणतात. वायु हा पंचमहाभूतांतील एक असल्यामुळें तो स्वतः पृथ्वीप्रमाणें जडस्वरूपच आहे. तोहि परप्रेरितच आहे. तो आत्मा कसा असूं शकेल ? आत्मा हा त्याच्याहि आंत आहे.

कांहीं लोक मनालाच आत्मा समजतात. सर्व प्रवृत्तींच्या मुळाशीं मनच असतें. संकल्प हेंच मनाचें स्वरूप आहे. सर्व कर्में संकल्पमूलकच असतात. " यस्मान्न ऋते किंचन कर्म क्रियते " ज्याच्यावांचून कोणतेंहि कर्म घडूं शकत नाहीं, " यत्प्रज्ञानमुत चेतः धृतिश्च यज्ज्योतिरन्तरम् " सामान्य ज्ञान, विशेष ज्ञान आणि धैर्य मनानेंच लाभतें. मन हें 'अन्तरज्योति' म्हणजे अन्तःप्रकाशक आहे, असें यजुर्वेदांत मनाचें वर्णन केलेलें आहे. हा सर्व मनाचा महिमा लक्षांत घेऊन कांहीं लोक मनच आत्मा असें समजतात. पण हें समजणें बरोबर नाहीं. कांहीं असलें तरी अखेर मनहि भौतिकच आहे. तें अन्नमय आहे. " अन्नमयं हि सोम्य मनः " असें तैत्तरीयोपनिषदांत त्याचें वर्णन केलेलें आहे. मन हें जड

आहे. तें आत्मा कसें असूं शकेल ? तात्पर्य, मन हा आत्मा नसून तें एक आत्म्याचें आच्छादन आहे. तो एक आत्म्याचा कोश आहे. आत्मा त्याच्याहि आंत आहे.

कांहीं लोक बुद्धीलाच आत्मा असें म्हणतात. बुद्धि ही मनापेक्षांहि सूक्ष्म आहे, स्थिर आहे. निश्चय हा तिचा स्वभाव आहे. निश्चयात्मक बुद्धीच्या बळावरच सर्व कामें पार पडत असतात. म्हणून बुद्धीच आत्मा होय असें वाटणें स्वाभाविक आहे. पण बुद्धि हा आत्मा होऊं शकत नाहीं. बुद्धि हा एक अंतःकरणाचा अंश असल्यामुळें मनाप्रमाणेंच तीहि आत्मा होऊं शकत नाहीं. देह, इंद्रियें इत्यादिकांच्या मानानें ती आत्म्याच्या अधिक जवळ आहे एवढेंच काय तें. याच कारणामुळें बुद्धि हा आत्मा नसून आत्म्याचा तो एक कोश आहे. याच कोशाला विज्ञानमय कोश असें म्हणतात. या ठिकाणीं विज्ञान आणि बुद्धि या दोन्ही शब्दांचा अर्थ एकच आहे. आत्मा विज्ञानमयाच्याहि पलीकडे आहे " यो बुद्धेः परतस्तु सः " बुद्धीच्याहि पलीकडे असलेल्या बुद्धीच्या आधारभूत तत्त्वालाच आत्मा असें म्हणतात.

विज्ञानमय आत्मा आणि शुद्ध चिन्मय आत्मा या दोहोंच्यामध्यें आनंदमय नांवाचा एक सूक्ष्म कोष आहे. तो शुद्ध, चित्स्वरूप आणि आनन्दस्वरूप असलेल्या परब्रह्माच्या अगदींच जवळ आहे. इष्ट वस्तूचा लाभ झाल्यामुळें समाधान पावलेल्या बुद्धींत जी सुखाची – आनन्दाची प्रतीति येते तेंच त्या आनन्दमय कोशाचें स्वरूप आहे. अथवा गाढ झोंपेंतून उठल्यानंतर "सुखमस्वाप्सम्" मी सुखानें झोपलों होतों असें जें आपण जागे झाल्याबरोबर बोलून दाखवितों तेंच सुख आनंदमय कोशाचें स्वरूप आहे. " न किंचिदवेदिषम् " आत्तांपर्यंत मला कांहीं कळलें नाहीं असा अज्ञानाचा अनुभवहि या सुखाच्या जोडीला असतोच. या अज्ञानातूनच स्वप्न आणि जागृति यांचा आविष्कार होत असतो. या अभिप्रायानेंच अज्ञानालाच कारण-शरीर असें शास्त्रज्ञांनीं नांव दिलेलें आहे. विज्ञानमय कोश, मनोमयकोश आणि प्राणमयकोश या तिघांना मिळून लिंगशरीर असें म्हणतात. लिंगशरीरामध्यें पंचप्राण, पंचकर्मेंद्रियें, पंचज्ञानेंद्रियें, मन आणि बुद्धि या सर्वांचा समावेश असतो. या लिंगशरीरालाच सूक्ष्मशरीर असेंहि म्हणतात. स्थूल शरीर अर्थात् अन्नमय देह हा तर प्रसिद्धच आहे. चालू स्तोत्राची अधिष्ठात्री असलेली देवता – आपली देवी ही या तिन्ही पुरांची – शरीरांची अधिष्ठात्री असून

ती अत्यंत सुंदर आहे म्हणूनच तिला त्रिपुरसुन्दरी असें म्हणतात. ती सर्वापेक्षा श्रेष्ठ आहे म्हणून तिला महात्रिपुरसुन्दरी असें म्हणतात.

वर वर्णन केलेल्या पांचहि कोशांचें पक्ष्याच्या रूपानें रूपक केलेलें आहे. उदाहरणार्थ, प्राणमयकोश घेतल्यास त्याचें प्राणवायु हा मस्तक आहे तर व्यान आणि अपान हे उजवे आणि डावे पंख आहेत. समान वायु हा शरीराचा मध्यभाग होय. पृथ्वी देवता हें त्याचें पुच्छ आहे. ती त्याचा आधार आहे. आनन्दमयकोश घेतल्यास 'प्रिय' म्हणजे आपल्याला इष्ट असलेल्या पुत्र, मित्र, भार्या इत्यादिकांच्या दर्शनानें होणारा आनंद हा त्याचें मस्तक होय. 'मोद' म्हणजे विविध धनवैभवाचा लाभ झाल्यानें होणारा आनंद हा त्याचा उजवा पंख होय. 'प्रमोद' म्हणजे वैभवाची उत्तरोत्तर वाढ झाल्यानें होणारा आनंद हा त्याचा डावा पंख होय. सामान्य आनंद हा त्याचें मधलें शरीर समजावें. ब्रह्मानंद हें त्याचें आधारभूत पुच्छ समजावें. याप्रमाणें शिर, पक्ष पुच्छ, आणि मधलें शरीर अशा रूपानें वर्णन केलेल्या अन्नमयादि पांच कोशांनी 'निगूढ' म्हणजे आच्छादित असलेलें, सर्वांच्या आंत असलेलें जें हृदयाकाशरूपी 'महायोगपीठ' अथवा बुद्धिरूपी सिंहासन त्याच्यावर 'निषण्णं' म्हणजे विराजमान झालेलें. जीवाचें शिवाशीं तादात्म्य घडून येणें याला महायोग असें म्हणतात. ज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग, राजयोग इत्यादि योगांचे अनेक प्रकार आहेत. हे सर्व योग साधनस्वरूप आहेत. जिवाशिवाचा तादात्म्ययोग हा मात्र साध्यस्वरूप आहे. तो फलस्वरूप आहे म्हणूनच त्याला महायोग असें म्हणतात. या महायोगाचें पीठ म्हणजे आसन, हृदयाकाश अथवा हृदयान्तर्वर्ती बुद्धि आहे. या पीठावरच आपली उपास्यदेवता अधिष्ठित झालेली आहे. कारण तिचा साक्षात्कार हृदयांत अथवा हृदयान्तर्वर्ती बुद्धीतच होत असतो. आदिमाता देवी भवानी ही पुरारि म्हणजे भगवान् शंकर यांची अन्तःशक्ति असल्यामुळें व ती सदासर्वकाळ नवयौवनामध्येंच असल्यामुळें तिला " पुरारेः अन्तःपुरम् " असें म्हटलेलें आहे. तात्पर्य, सर्वान्तर्यामी चित्स्वरूप असलेल्या आदिमायेची – श्रीदेवी भवानीची मी नित्य स्तुति करीत आहें.

विरिञ्चादिरूपैः प्रपञ्चे विहृत्य
स्वतन्त्रा यदा स्वात्मविश्रान्तिरेषा ।
तदा मान-मातृ-प्रमेयातिरिक्तं
परानन्दमीडे भवानि त्वदीयम् ॥ ३ ॥

हे आई भवानी ! ज्या वेळेला तूं ब्रह्मदेव, विष्णु, शंकर, इंद्र, चंद्र, वरुण, कुबेर, अग्नि, वायु इत्यादि विविध रूपें धारण करून या विश्वप्रपंचांत अनेक लीला करीत रहातेस त्या वेळेला तो तुझा क्रीडाकाळ समजला जातो. त्या वेळेला तूं उपाधिपरतंत्र असतेस. तुझे ते उपाधि तूं आपल्या इच्छेनेंच धारण केलेले असतात. ही लीला संपवून ज्या वेळेला तूं स्वतंत्र होतेस त्या वेळेला ती तुझी विश्रांति समजली जाते. तुझी विश्रांति तुझ्या आत्मस्वरूपांतच होत असते. तात्पर्य, ज्या वेळेला तूं एकच एक शिल्लक रहातेस त्याच वेळेला ती तुझी आत्मविश्रांति होय. तुझ्या ह्या आत्मविश्रांतीच्या काळांत प्रमाता, प्रमिति, प्रमाण आणि प्रमेय हें कांहींच शिल्लक रहात नसतें.

ज्याला ज्ञान होत असतें तो आत्मा 'प्रमाता' होय. आत्म्याला जें ज्ञान होत असते त्याला 'प्रमिति' असें म्हणतात. ज्यांच्या योगानें ज्ञान होत असतें त्या इंद्रियादि साधनांना 'प्रमाण' असें म्हणतात आणि ज्या विषयांचें ज्ञान होत असतें त्या विषयांना 'प्रमेय' असें म्हणतात. आई ! ज्या वेळेला तुझी लीला चालते त्याच वेळेला प्रमाता, प्रमिति, प्रमाण आणि प्रमेय हा सर्व व्यवहार होत असतो. तुझ्या विश्रांतीच्या काळीं हा सर्व व्यवहार मावळतो आणि या व्यवहाराचें अधिष्ठान असलेला आनंद मात्र शिल्लक रहातो. आई ! तो निरुपाधिक सर्वश्रेष्ठ आनंद हेंच तुझें स्वरूप आहे. हे देवी भवानी ! तुझ्या त्या सर्वोत्कृष्ट आनंद-स्वरूपाचें मी स्तवन करीत आहें.

विनोदाय चैतन्यमेकं विभज्य
द्विधा देवि जीवः शिवश्चेति नाम्ना ।
शिवस्यापि जीवत्वमापादयन्ती
पुनर्जीवमेनं शिवं वा करोषि ॥ ४ ॥

आई जगज्जननी ! ज्या वेळेला तुला विनोद करावासा वाटतो, खेळावेंसें वाटतें तेव्हां तूं एकाच शुद्ध चैतन्याचें – स्वस्वरूपाचे जीव आणि शिव या नांवानें दोन विभाग करतेस. शिवाला म्हणजे परब्रह्माला देखील जीवभाव प्राप्त करून देतेस आणि पुन्हां संसारतापानें तप्त झालेल्या जीवांना अनुगृहीत करून शिवभावहि म्हणजे ब्रह्मस्वरूपता देखील प्राप्त करून देतेस ! काय तुझा हा खेळ ! आणि किती तुझी ही दया ! आई ! धन्य आहेस तूं !

समाकुञ्च्य मूलं हृदि न्यस्य वायुं
मनो भ्रूचिलं प्रापयित्वा निवृत्ताः ।
ततः सच्चिदानन्दरूपे पदे ते
भवन्त्यम्ब जीवाः शिवत्वेन केचित् ॥ ५ ॥

हे अम्ब, आई जगदंबे ! योगमार्गानें ब्रह्मपदाला पोहोंचणारे कांहीं लोक अपान वायूचा संकोच करून मूलबन्ध करतात आणि हृदयाच्या ठिकाणीं वायूचा निरोध करून जालंधरबन्ध करतात. (योगतारावलि ५ वा श्लोक पहा). अशा रीतीनें प्राणायामांचा अभ्यास करून पुष्कळ लोक संसारांतून निवृत्त होतात, विरक्त होतात आणि आपल्या मनाला भ्रूमध्यप्रदेशीं म्हणजे आज्ञाचक्रांत पोहोंचवून स्थिर करतात. त्यानंतर सच्चिदानन्दघनस्वरूप असलेल्या तुझ्या चरणारविंदीं पोहोंचून कांहीं जीव तुझ्या कृपेनें जीवस्वरूपांतून मुक्त होऊन शिवस्वरूपानें – परब्रह्मस्वरूपानें परिणत होतात. अर्थात् ब्रह्मभावाला ते प्राप्त होतात. ब्रह्मस्वरूप होतात ! हा सर्व तुझाच प्रभाव आहे !

शरीरेऽतिकष्टे रिपौ पुत्रवर्गे
सदा भीतिमूले कलत्रे धने वा ।
न कश्चिद्विरज्यत्यहो देवि चित्रं
कथं त्वत्कटाक्षं विना तत्त्वबोधः ॥ ६ ॥

हे देवी जगदंबे ! शरीराची अवस्था अत्यंत कष्टमय झालेली आहे. शत्रु दंड थोपटून पुढें उभा आहे. कामक्रोधादि विकारांनीं त्रस्त करून टाकलेलें आहे. कन्यापुत्र ममतेनें घरांत खेंचीत आहेत. घरांत येऊन पहावें तर बायको कृत्ये-प्रमाणें भेडसावीत आहे ! " दारा देत कडी सदा कडकडी बोले सदा वाकुडी " असा घरांतला थाट आहे ! जवळ थोडेंफार धन आहे, त्याच्यावर सर्वांचा डोळा असल्यामुळें त्या धनाचीहि भीति वाटते ! आई जगन्माते ! अशी ही परिस्थिति असूनहि कोणी विरक्त होत नाही ! काय आश्चर्य आहे ! आई, तुझ्या कृपाकटाक्षाचा लाभ झाल्याशिवाय तत्त्वसाक्षात्कार कसा होणार ? तात्पर्य, आई जगज्जननी ! तूं माझ्याकडे कृपादृष्टीनें पहा आणि मला तत्त्वाचा – तुझ्या यथार्थ-स्वरूपाचा साक्षात्कार होऊं दे.

शरीरे धनेऽपत्यवर्गे कलत्रे
विरक्तस्य सद्देशिकादिष्ट बुद्धेः ।
यदाकस्मिकं ज्योतिरानन्दरूपं
समाधौ भवेत्तत्त्वमस्यम्ब सत्यम् ॥ ७ ॥

शरीर, धन, कन्यापुत्र, कलत्र म्हणजे पत्नी "कलेन त्रायते इति कलत्रम्" मधुर भाषणानें पतीचें मन राखते व त्याचें संरक्षण करते म्हणून तिला कलत्र असें म्हणतात. या सर्वांविषयीं ज्याच्या अंतःकरणांत वैराग्य उत्पन्न झालें आहे आणि ज्याला सद्गुरूपासून इष्ट बुद्धीचा लाभ झालेला आहे, सद्गुरूंच्या कृपेनें ज्याची बुद्धि इष्ट तत्त्वाकडे वळली आहे, त्याला सद्गुरूंनीं केलेल्या मार्गदर्शनानें समाधीचा म्हणजे चित्ताच्या एकाग्रतेचा लाभ होतो. चित्त पूर्णपणें एकाग्र झालें असतां त्या समाधींत आकस्मिकपणें शुद्ध आनंदरूप ज्योतीचा – तेजाचा – प्रकाशाचा जो आविर्भाव होतो तेंच तेज – आनंद आई जगदंबे ! तुझें सत्यस्वरूप आहे. तोच आनंद तुझें रूप आहे. तो आनंदच तूं आहेस. हें मी खरें सांगतों. " या देवी सर्वभूतेषु तुष्टिरूपेण संस्थिता । नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ॥ " या ठिकाणीं तुष्टि म्हणजे निरुपाधिक संतोष आनंद हाच अर्थ आहे.

मृषाऽन्यो मृषान्यः परो मिश्रमेनं
परः प्राकृतं चापरो बुद्धिमात्रम् ।
प्रपञ्चं मिमीते मुनीनां गणोऽयं
तदेतत्त्वमेवेति न त्वां जहीमः ॥ ८ ॥

आई जगदंबे ! हा विश्वप्रपंच कोणी (शून्यवादी बौद्ध) खोटा आहे असें म्हणतात, तर कोणी सांख्ययोगवेत्ते तो सत्य आहे असें प्रतिपादन करतात. कांहीं तत्त्ववेत्ते (वैशेषिक आणि नैयायिक) तो उभयविध म्हणजे मिश्र स्वरूपाचा अर्थात् खराहि आहे आणि खोटाहि आहे असें मानतात, तर कांहीं लोक (निसर्गवादी) तो प्राकृतिक म्हणजे प्रकृतिसिद्ध निसर्गसिद्ध आहे असेंहि मानतात. कांहीं तत्त्ववेत्ते त्याला कल्पनामात्र आहे असें म्हणतात तर कांहीं लोक विश्व-प्रपंच हा विज्ञानमय अथवा क्षणिक विज्ञानस्वरूप आहे असेंहि म्हणतात. या-प्रमाणें अनेक तत्त्ववेत्ते, ऋषि, मुनि त्याच्यासंबंधानें विवाद करीत आहेत. आई !

त्यांनीं कांहीं म्हटलें तरी त्यांच्या प्रतिपादनाचा विषय तूंच आहेस. तुझेंच ते प्रतिपादन करीत असतात. आई ! ते कांहीहि म्हणोत, खुशाल वाद घालोत. आम्हीं मात्र तुला सोडणार नाहीं.

निवृत्तिः प्रतिष्ठा च विद्या च शान्ति-
स्तथा शान्त्यतीतेति पञ्चीकृताभिः ।
कलाभिः परे पञ्चविंशात्मिकाभि -
स्त्वमेकैव सेव्या शिवाऽभिन्नरूपा ॥ ९ ॥

आचार्य म्हणतात, हे देवी माते जगदंबे ! संख्येनें पंचवीस असलेल्या कलांनीं, पंचमहाभूतात्मक तत्त्वांनीं या जगांत भगवान् सदाशिव यांच्याशीं अभिन्न म्हणजे एकरूप असलेली तूंच सेवा करण्यास भजन-पूजन करण्यास योग्य आहेस. आतां पंचीकृत पंचमहाभूतात्मक पंचवीस कला कोणत्या तें आपण पाहूं. शिवशक्तिस्वरूप आत्म्यापासून आकाश उत्पन्न होतें. आकाशापासून वायु, वायूपासून अग्नि म्हणजे तेज, तेजापासून जल, जलापासून पृथ्वी, पृथ्वीपासून वनस्पति आणि वनस्पतीपासून अन्न निर्माण होतें. या अन्नापासूनच प्राणिमात्रांची उत्पत्ति होत असते. असा हा सृष्टीचा क्रम आहे. यांत आकाशापासून पृथ्वीपर्यंतच्या पदार्थांना पंचमहाभूतें असें म्हणतात. हीं संख्येनें पांच असल्यामुळें 'पञ्च', सर्व विश्वाला व्यापीत असल्यामुळें 'महा', आणि विश्वरूपानें नटत असल्यामुळें ऐश्वर्यशाली या अर्थानें 'भूत' अशा अभिप्रायानें पंचमहाभूतें अशी त्यांना संज्ञा मिळाली.

हीं पंचमहाभूतें प्रथम अत्यंत सूक्ष्म असतात. तीं पृथक् पृथक् असतात. त्यांच्या ठिकाणीं व्यवहारक्षमताहि नसते. त्या पंचमहाभूतांच्या पांच अधिष्ठात्री देवता आहेत. ब्रह्मा, विष्णु, रुद्र, महेश आणि सदाशिव अशीं त्यांचीं नांवें आहेत. त्या देवांच्या प्रेरणेनें तीं महाभूतें पुढें एकमेकांमध्यें कमीअधिक प्रमाणांत मिसळतात. या त्यांच्या परस्पर मिश्रभूत अवस्थेलाच पंचीकरण असें म्हणतात. पंचीकरणामुळें त्या भूतांच्या ठिकाणीं स्थूलता येते. स्थूलतेमुळें विचारक्षमताहि येते. पंचीकृत पंचमहाभूतापासूनच सर्व स्थूल द्रव्यांची निष्पत्ति होत असते. वनस्पति आणि अन्न यांचा अंतर्भाव पृथ्वींतच होत असल्यामुळें पंचमहाभूतांच्या पांच या संख्येला बाध येत नाहीं.

या पंचमहाभूतांच्या ज्या पांच देवता आहेत त्या देवतांचीं वाचक पांच बीजें आहेत. बीजें हीं मंत्रस्वरूप असतात व मंत्र हे देवतास्वरूप असतात. या दृष्टीनें पहातां पंचमहाभूतांचीं बीजें हीं पंचमहाभूतांच्या अभिमानी देवताच होत. ज्या देवतेचें जें बीज असेल तेंच त्या देवतेच्या भूताचेंहि बीज समजावें. बीजाक्षरांचा उच्चार नेहमीं अनुस्वारयुक्त असतो. म्हणूनच पृथ्वीच्या बीजाचा उच्चार लं असा होतो. जलाचें बीज वं आहे तर तेजाचें बीज रं आहे. तसेंच वायु आणि आकाश यांचीं बीजें अनुक्रमें यं आणि हं अशीं आहेत. या बीजभूत पंचमहाभूतांच्या देवता परम सूक्ष्म असल्यामुळें त्यांना कला असें म्हणतात. अर्थात् पंचमहाभूतांच्या कलाहि पांचच आहेत. याच कलांना पृथ्वी, जल, तेज, वायु आणि आकाश या क्रमानें निवृत्ति, प्रतिष्ठा, विद्या, शांति आणि शांत्यतीता अशीं नांवें दिलेलीं आहेत. या कलांना शक्ति असेंहि म्हणतात. शक्तिविशिष्टभूतें हींच या विश्वाचीं कारणें असल्यामुळें या शक्तींना कारणतावच्छेदकीभूत शक्ति किंवा कारणतावच्छेदकतावच्छेदकीभूत शक्ति असेंहि म्हणतात. या सर्व शक्ति देवतास्वरूपच आहेत.

पंचमहाभूतांप्रमाणें या बीजांचें अथवा या कलांचेंहि पंचीकरण होत असतें. शुद्ध पृथ्वी, जलसहकृत पृथ्वी, तेजःसहकृत पृथ्वी, वायुसहकृत पृथ्वी आणि आकाशसहकृत पृथ्वी असे पृथ्वीचे पांच प्रकार होतात. याचप्रमाणें जल, तेज, वायु आणि आकाश यांचाहि विचार करावा. अशा रीतीनें पंचमहाभूतांचे पंचवीस प्रकार होतात. भूतांच्या पंचीकरणाप्रमाणेंच कलांचेंहि पंचीकरण केलें म्हणजे त्या कलाहि पंचवीस होतात. याच अभिप्रायानें आचार्यांनीं मूळ श्लोकांत कलांना उद्देशून "पञ्चीकृताभिः" आणि "पञ्चविंशात्मिकाभिः" अशीं दोन विशेषणें दिलेलीं आहेत.

सर्व कलांचा आविष्कार चित्स्वरूप अथवा शिवशक्तिस्वरूप असलेल्या नाद आणि बिंदु यांतूनच होत असल्यामुळें नाद आणि बिंदु यांची सर्व कलांमध्यें अथवा कलावाचक बीजांमध्यें अनुवृत्ति असते. नादाचा वाचक हकार आहे. तर बिंदूचा वाचक अनुस्वार आहे. आणि म्हणूनच हकार आणि अनुस्वार हे सर्व कलांच्या बीजाशीं संलग्न झालेले दिसतात. त्या त्या भूतांच्या अवांतर कलांचे वाचक आ, ई, ऊ, ऐ आणि औ हे पांच स्वर आहेत. हकार, लकार, आकार आणि अनुस्वार या सर्वांचें संकलन केलें म्हणजे 'ह्लां' असें बीज सिद्ध होतें. याच युक्तीनें ह्लीं, ह्लूं,

ह्रैं आणि ह्रौं ही बीजें सिद्ध करावींत. पंचीकृत पृथ्वीस्वरूप निवृत्तिकलेचीं हीं पांच बीजें होत. याचप्रमाणें ह्रां ह्रीं इत्यादि पांच बीजें पंचीकृत जलस्वरूप प्रतिष्ठाकलेचीं समजावींत. त्याचप्रमाणें ह्रां ह्रीं इत्यादि पांच बीजें पंचीकृत वह्निस्वरूप विद्याकलेचीं समजावींत. तसेंच ह्यां ह्रीं इत्यादि पांच बीजें वायु-स्वरूप शांतिकलेचीं समजावींत. आकाशस्वरूप असलेल्या शांत्यतीता कलेचीं बीजें मात्र हां हीं इत्याकारकच आहेत. आकाशाचें बीजहि 'हं' इत्याकारकच असल्यामुळें तेथें इतर बीजाप्रमाणें तिसरा वर्ण दिसत नाहीं. अशा रीतीनें पंचीकृत पांच कलांचीं पंचवीस बीजें तयार होतात. या पंचवीस बीजांच्या अथवा पंचीकृत पंचवीस कलांच्या अधिष्ठात्री देवताहि पंचवीस आहेत. कला शब्दाचा अर्थ अंश असा केल्यास या सर्व कला विकासोन्मुख चित्स्वरूप शिव-शक्तीच्या अंशभूतच आहेत असें समजावें.

श्रीचक्रामध्यें देखील तीन रेषांचें चौकोनी असलेलें भूपुर आणि वर्तुलाकार तीन रेषांचीं तीन वलयें हा भाग पृथ्वीस्वरूप निवृत्तिकलेचा समजला जातो, तर त्याच्या आंत असलेलें षोडशदलकमल हा जलस्वरूप प्रतिष्ठाकलेचा भाग समजला जातो. त्याचप्रमाणें अष्टदलकमल हा तेजः-स्वरूप विद्याकलेचा भाग समजला जातो, तर त्याच्या आंतील चौदा त्रिकोण असलेलें एक चक्र आणि दहा दहा त्रिकोण असलेलीं दोन चक्रें हा वायुरूप शांतिकलेचा भाग समजला जातो. त्याच्याहि आंत आठ त्रिकोण असलेला भाग हा आकाशस्वरूप शांत्यतीतकलेचा मानलेला असून, त्याच्याहि आंत असलेला मुख्य त्रिकोण आणि त्या त्रिकोणांत असलेला बिन्दु हे दोन्ही चिद्घन शिवशक्तिस्वरूप मानले जातात. अशा रीतीनें निवृत्ति, प्रतिष्ठा, विद्या, शान्ति आणि शान्त्यतीता या सर्व कला श्रीदेवी भवानीच्या सान्निध्यांत विराज-मान आहेत.

वर लिहिलेला सर्व अभिप्राय लक्षांत घेऊन आचार्य म्हणतात, "हे परे !" श्रीदेवी जगदंबा हीच सर्वोत्तम आणि सर्वश्रेष्ठ असल्यामुळें तिला "पर" असें म्हटलेलें आहे. हे परात्परस्वरूपे जगदंबे ! निवृत्ति, प्रतिष्ठा, विद्या, शान्ति आणि शान्त्यतीता अशा ज्या पंचीकृत पंचमहाभूतांना कारणीभूत असलेल्या शक्ति त्या अपंचीकृत अवस्थेंत पांचच असल्या तरी पंचीकृत अवस्थेंत पांचांच्या पंचवीस होतात. नादकलादि स्वरूप असलेल्या या शक्तींनीं युक्त अशा पंचवीस

कलांतूनच अकारादि वर्णप्रपंच आणि आकाशादि भूतप्रपंच निर्माण होतो व त्या वर्णप्रपंचांतून सर्व मंत्रादिरूप शब्दसृष्टि आणि भूतांतून देहादिरूप भौतिक सृष्टि निर्माण होत असते. ते वर्णात्मक श्रीविद्यादिमंत्र आणि भौतिक देह तत्त्वतः शिवशक्तिस्वरूपच आहेत. तेव्हां या सर्व कलांनीं – कलात्मक तत्त्वांनीं या जगांत शिवस्वरूपाशीं अभिन्न असलेली तूंच एक 'सेव्या' म्हणजे उपासना करण्यास योग्य आहेस. असा या श्लोकाचा अर्थ आहे. "निवृत्तिः च प्रतिष्ठा च विद्या च शान्तिः तथा शान्त्यतीता इति पञ्चीकृताभिः पञ्चविंशात्मिकाभिः कलाभिः हे परे शिवाभिन्नरूपा त्वं एका एव सेव्या असि" असा या श्लोकाचा अन्वय समजावा.

अगाधेऽत्र संसारपङ्के निमग्नं
कलत्रादि-भारेण खिन्नं नितान्तम् ।
महामोह-पाशैव-बद्धं चिरान्मां
समुद्धर्तुमम्ब त्वमेकैव शक्ता ॥ १० ॥

आई जगदंबे ! या जन्मांत या देहांत मी अगदीं संसाराच्या गाळांत पूर्णपणें फसलों आहें. पुत्र, मित्र आणि कलत्र इत्यादिकांच्या भारानें अत्यंत कष्टी झालों आहे. महामोहाच्या अनेक पाशांनीं मी चिरकाल अगदीं:गच्च बांधला गेलों आहें. या सर्व संकटांतून माझा उद्धार करण्यास आई ! तूंच एक समर्थ आहेस.

समारभ्य मूलं गतो ब्रह्मचक्रं
भवद्दिव्य-चक्रेश्वरी-धामभाजः ।
महासिद्धि-संघात-कल्पद्रुमाभा-
नवाप्याम्ब नादानुपास्ते च योगी ॥ ११ ॥

मूलाधारचक्राला आरंभ करून सहस्रदलकमलाप्रमाणें असलेल्या ब्रह्मचक्रापर्यंत या देहांत जीं दिव्य चक्रें आहेत त्या सर्वांची अधीश्वरी, मुख्य अधिष्ठात्री देवता, आई जगदंबे ! तूंच आहेस. तें प्रत्येक चक्र तुझेंच दिव्य धाम आहे. त्या धामांच्या म्हणजे स्थानांच्या आश्रयानें व्यक्त होणारे विविध प्रकारचे अनाहतनाद हे जणुं कांहीं अणिमादि महासिद्धींचे कल्पद्रुमच आहेत. हे अनाहतनाद ज्याला ऐकावयास सांपडतात त्याला अणिमा-महिमा इत्यादि अष्टविध सिद्धींचा अथवा श्रीमद्भागवताच्या अकराव्या स्कंधांत सांगितलेल्या अष्टादश म्हणजे अठरा

प्रकारच्या सिद्धींचा समुदाय हा सहजच प्राप्त होत असतो. मूलाधारचक्रापासून षट्चक्रांचा भेद करीत ब्रह्मचक्रापर्यंत पोहोंचलेला योगी, हे जगज्जननी माते ! तुझ्याच कृपेनें या नादांची उपासना करीत असतो. नादानुसंधानानेंच त्याला सर्व सिद्धि प्राप्त होतात व ब्रह्मस्वरूप असलेल्या तुझ्या स्वरूपाचा साक्षात्कार होऊन तो धन्य होतो. तो सर्व संसारदुःखांतून मुक्त होतो. अनाहतनादांचीं विविध स्वरूपें आणि त्यांचीं फलें हा विषय योगतारावलीमध्यें अवश्य पहावा.

गणेशैर्ग्रहैरम्ब नक्षत्रषट्क्त्या
तथा योगिनीराशिपीठैरभिन्नम् ।
महाकालमात्मानमामृश्य लोकं
विधत्से कृतिं वा स्थितिं वा महेशि ॥ १२ ॥

" हे अम्ब महेशि गणेशैः ग्रहैः नक्षत्रषट्क्त्या तथा योगिनीराशिपीठैः अभिन्नं आत्मानं महाकालं आमृश्य (त्वं) लोकं विधत्से कृतिं वा स्थितिं वा विधत्से ! " हे आई महेश्वरी ! गणेशदेवता, ग्रह, नक्षत्रमाला त्याचप्रमाणें योगिनी, राशि आणि पीठें यांच्याशीं अभिन्न म्हणजे एकरूप असलेल्या स्वस्वरूपाला आपण महाकालस्वरूप आहोंत असा विचार करून, अर्थात् महाकालस्वरूपानें नटून, तूं या लोकांना निर्माण करतेस. तूंच त्यांची 'स्थिति' म्हणजे परिपालन करतेस आणि तूंच त्यांची 'कृति' म्हणजे हिंसा अर्थात् नाश अथवा प्रलयहि करतेस. आई ! तुझा महिमा अचिंत्य आहे ! असा या श्लोकाचा अन्वय आणि त्याचा अर्थ आहे.

या श्लोकामध्यें गणेश, ग्रह, नक्षत्रें, त्याचप्रमाणें योगिनी, राशि आणि पीठें यांचा उल्लेख करून आचार्यांनीं श्रीदेवीचा त्यांच्याशीं अभेद दाखविला आहे. तसेंच त्या सर्वांशीं अभिन्न म्हणजे एकरूप असलेली श्रीदेवी ललिता-महात्रिपुरसुंदरी महाकालाच्या रूपानें नटते आणि या विश्वाच्या उत्पत्ति-स्थिति-प्रलयाचा खेळ खेळत असते ! " गणेशग्रहनक्षत्रयोगिनीराशिरूपिणीम्। देवीं मन्त्रमयीं नौमि मातृकां पीठरूपिणीम् " असें तिचें त्यांनीं वर्णन केलेलें आहे. गणेश, ग्रह, नक्षत्र इत्यादि सर्व तिचेंच रूप आहे. मातृका म्हणजे स्वर आणि व्यंजनें हेंहि तिचेंच रूप आहे आणि त्या मातृकांतून निर्माण होणारे विविध मंत्र हेंहि पण तिचेंच रूप होय. म्हणून तिला मंत्रमयी म्हटलेलें आहे. सर्व शक्तिपीठांच्या अधिष्ठात्री देवताहि तिचेंच रूप असल्यामुळें तिला पीठरूपिणी असें म्हटलें आहे. तात्पर्य,

श्रीदेवी जगदंबा ही गणेशरूपिणी आहे, ग्रहरूपिणी आहे, नक्षत्ररूपिणी आहे, आणि राशिरूपिणीहि पण आहे. याच अभिप्रायानें आचार्यांनीं या श्लोकाच्या पहिल्या दोन चरणांत ग्रहनक्षत्रादिकांशीं देवीच्या स्वरूपाचा अभेद वर्णिलेला आहे.

तंत्रशास्त्रांत देवी-भवानीलाच श्रीविद्या असें म्हटलेलें आहे. श्रीविद्येचें अधिष्ठान असलेलें श्रीचक्र हेंहि देवीचेंच स्वरूप आहे. "महायंत्रा महासना" "श्रीचक्रराजनिलया". महायंत्र शब्दानें श्रीचक्राचाच निर्देश केला जातो. सर्व यंत्रांत श्रीयंत्र अत्यंत श्रेष्ठ असल्यामुळें त्याला चक्रराज असें म्हणतात. श्रीचक्रराज म्हणजे श्रीयंत्र हें तिचें निलय म्हणजे वासस्थान आहे. अन्यत्र वासस्थानामध्यें वास्तव्य करणारा हा त्या वासस्थानाहून निराळा असला, तरी प्रकृतस्थलीं श्रीयंत्रामध्यें वास्तव्य करणारी देवी श्रीविद्या ही श्रीयंत्राहून निराळी नाहीं. म्हणूनच "श्रीचक्रं शिवयोर्वपुः" श्रीयंत्र हें एकमेकाशीं एकरूप असलेल्या श्रीशिवशक्तीचेंच रूप होय असें ब्रह्माण्डपुराण, भैरवयामल इत्यादि ग्रंथांमध्यें वर्णन केलेलें आहे. या श्रीचक्रामध्यें मध्यस्थानीं विराजमान असलेल्या श्रीदेवीचे प्रकाशकिरण सर्वत्र पसरलेले आहेत. तेच वाक्प्रपंचाला कारणीभूत असलेल्या, बीजभूत मातृकांच्या—स्वर आणि व्यंजनें यांच्या रूपानें, तसेंच अर्थ-प्रपंचाला कारणीभूत असलेल्या पृथ्वीतत्त्वापासून शिवतत्त्वापर्यंत प्रसिद्ध अशा छत्तीस तत्त्वांच्या रूपानें या श्रीचक्रांत विराजमान आहेत. श्रीविद्या हीच त्या सर्वांच्या पृथक् पृथक् अधिष्ठात्री देवतांच्या रूपानें नटलेली आहे. त्या देवतांनाच गणेश, ग्रह, नक्षत्र, योगिनी, राशि आणि पीठ अशा संज्ञा आहेत.

या श्रीचक्रामध्यें नऊ आवरणें आहेत. त्या आवरणांमध्यें अनेक गणदेवता आहेत. त्या गणदेवतांच्या अधिपतीला गणेश असें म्हणतात. हे गणेश संख्येनें एक्कावन आहेत. म्हणूनच आचार्यांनीं श्लोकामध्यें "गणेशैः" असा बहुवचनी शब्दप्रयोग केलेला आहे. विघ्नेश, विघ्नराज, विनायक, विघ्नकर्ता, विघ्नहर्ता, गणनायक, एकदंत, वक्रतुंड, लंबोदर, त्रिलोचन, वरेण्य इत्यादि एक्कावन गणेशांचीं एक्कावन नांवें आहेत. उपासकाला उपासनेच्या वेळीं या देवतांचे न्यासहि करावे लागतात. त्याचप्रमाणें सूर्य, चंद्र, मंगळ, बुध इत्यादि प्रसिद्ध नऊ ग्रह आणि अश्विनी, भरणी, कृत्तिका इत्यादि रेवतीपर्यंत सत्तावीस नक्षत्रें, तसेंच मेष, वृषभ, मिथुन इत्यादि बारा राशि या सर्वांच्या अधिष्ठात्री देवता श्रीचक्रामध्यें विराजमान आहेत. त्या सर्व देवता श्रीदेवी दुर्गाभवानीस्वरूपच आहेत. त्या महाशक्तीशीं अभिन्न आहेत

योगिनी शब्दाचा अर्थ कोशकारांनीं "भगवत्याः सख्यीरूपा आवरणदेवताः" श्रीललिता महात्रिपुरसुंदरीच्या श्रीचक्रांतील ज्या परमप्रिय आवरणदेवता आहेत त्यांना योगिनी असें म्हणतात, असा केलेला आहे. या योगिनी चौसष्ट कोटि आहेत असें म्हणतात. पण तेहतीस कोटि देव जसे तेहतीस संख्येंत सामावले त्याचप्रमाणें चौसष्ट कोटि योगिनींचा समावेश चौसष्ट योगिनीमध्यें झालेला आहे. श्रीसमर्थांनीहि पण "द्वितीयेचे दिवशीं मिळती चौसष्ट योगिनी हो" असा देवीच्या आरतींत चौसष्ट योगिनींचा उल्लेख केलेला आहे. पिठोराजपूजेच्या चित्रांतहि आपण चौसष्ट योगिनी पहात असतोंच. नारायणी, गौरी कात्यायनी, भ्रामरी, महादेवी, भद्रकाली, विशालाक्षी, कालरात्री, इत्यादि त्यांचीं नांवें आहेत. यांतील कांहीं योगिनी या शरीरांतील सप्त धातूंच्या अधिष्ठात्री आहेत. रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा आणि शुक्र हें शरीरांतील सप्त धातु, प्रसिद्ध आहेत. पहिल्या धातूला रस याऐवजीं कोणी कोणी त्वक् किंवा त्वचा असेंहि म्हणतात. डाकिनी, राकिणी, लाकिनी, काकिनी, साकिनी, हाकिनी आणि याकिनी अशीं या सप्त धातूंच्या सात योगिनींचीं क्रमशः सात नांवें आहेत. यांतील याकिनी ही सर्वश्रेष्ठ असून तिचें वास्तव्य मूर्द्धस्थानीं असलेल्या सहस्रदल कमलामध्यें असतें. इतर योगिनी या मूलाधारादि षट्चक्रांमध्यें आपआपल्या स्थानीं असतात. शब्दप्रपंचाला कारणीभूत असलेला अक्षरप्रपंच हा आठ वर्गांनीं विभागलेला आहे. त्या वर्गांना अवर्ग, कवर्ग, चवर्ग, टवर्ग, तवर्ग, पवर्ग, यवर्ग, आणि शवर्ग असें म्हणतात. या आठहि वर्गांच्या आठ अधिष्ठात्री देवता आहेत. त्यांना वशिनी, कामेश्वरी, मोदिनी, विमला, अरुणा, जयिनी, सर्वेश्वरी आणि कौलिनी अशीं क्रमशः नांवें आहेत या आठ वाग्देवतांनाहि पण योगिनी असें म्हणतात. या सर्व देवता श्रीविद्यास्वरूप असलेल्या देवी भवानीशीं अभिन्न म्हणजे एकरूपच आहेत.

"विशिष्ट दिवशीं विशिष्ट दिशेला आश्रय करून रहाणाऱ्या देवता" असा ज्योतिःशास्त्रामध्यें योगिनी शब्दाचा अर्थ आहे. यश, अर्थलाभ इत्यादि मनोरथ पूर्ण होण्याच्या दृष्टीनें परगांवीं प्रस्थान करतांना या योगिनींचा विचार केला जातो. ब्रह्माणी, माहेश्वरी, कौमारी, नारायणी, वाराही, इंद्राणी, चामुंडा आणि महालक्ष्मी अशीं या योगिनींचीं नांवें आहेत. प्रतिपदा आणि नवमी या दिवशीं पूर्वेकडे ब्रह्माणीचें वास्तव्य असतें. द्वितीया आणि दशमी या दिवशीं माहेश्वरी

उत्तरेकडे असते. तृतीया आणि एकादशी या दिवशीं कौमारी ही आग्नेय दिशेला असते. चतुर्थी आणि द्वादशी या तिथींना नारायणी ही नैर्ऋत्य दिशेला असते. पंचमी आणि त्रयोदशी या दिवशीं दक्षिण दिशेला वाराहीचें वास्तव्य असतें. षष्ठी आणि चतुर्दशीला इंद्राणी ही पश्चिमेस असते. सप्तमी आणि पौर्णिमेच्या दिवशीं चामुंडा ही वायव्य दिशेला असते, तर महालक्ष्मी ही अष्टमी आणि अमावास्या या दिवशीं ईशान्य दिशेला असते. आपल्याला ज्या दिवशीं ज्या दिशेला प्रवास करावयाचा असेल त्या दिवसाची व त्या दिशेची योगिनी आपल्या दक्षिण बाजूला अथवा पृष्ठभागीं असावी म्हणजे प्रवास सफल होतो.

"मङ्गला पिङ्गला धन्या भ्रामरी भद्रिका तथा। उल्का सिद्धा संकटा च योगिन्योऽष्टौ प्रकीर्तिताः" मानवी जीवनांतील कालखंडाच्या अधिष्ठात्री देवता म्हणूनहि वर निर्दिष्ट केलेल्या आठ योगिनी आहेत. त्यांत पहिल्या 'मंगला' योगिनीचा काल एक वर्षाचा तर दुसऱ्या 'पिंगला' योगिनीचा काल दोन वर्षांचा. याप्रमाणें प्रत्येकीचा काल एक एक वर्षानें वाढत जातो. याप्रमाणें आठ योगिनींचें कालचक्र छत्तीस वर्षांनीं पूर्ण होतें. पुन्हां पूर्ववत् पहिल्या योगिनीपासून दुसऱ्या कालचक्राला आरंभ होतो. असें हें योगिनींचें चक्र अव्याहत चालू असतें. मंगला, धन्या, भद्रिका आणि सिद्धा या योगिनी शुभ फल देणाऱ्या आहेत, तर पिंगला, भ्रामरी, उल्का आणि संकटा या योगिनी अनिष्ट फल देणाऱ्या आहेत. आपलें आयुष्य कोणत्या योगिनीच्या काल-खंडांतून चाललें आहे हें पहावयाचें झाल्यास "स्वनक्षत्रं ध्रुवं कृत्वा पञ्च तत्र विमिश्रयेत्। मङ्गलेन हृतः शेषः मङ्गलादिर्विनिश्चयः।" अश्विनी नक्षत्रापासून आपल्या जन्मनक्षत्रापर्यंत जी संख्या येईल त्या संख्येंत पांच ही संख्या मिळवावी. नंतर त्या संख्येस आठांनीं भागावें. जी संख्या शेष राहील त्या संख्येच्या योगिनीचा काळ त्याच्या जन्माच्या वेळीं समजावा. नंतर वर सांगितल्याप्रमाणें योगिनींचें क्रमशः काळ लक्षांत घेऊन आयुष्याच्या चालू काळांत कोणती योगिनी येतें तें पहावें. अनिष्ट योगिनी असल्यास उपासनेनें तिला संतुष्ट करावें. श्रीदेवी ललिता महात्रिपुरसुंदरी ही या सर्व योगिनींशीं एकरूप असल्यामुळें अनन्यभावानें तिलाच शरण जाऊन तिला संतुष्ट करावें. तिची कृपा झाली कीं, ग्रह, राशी, नक्षत्रें आणि योगिनी हीं सर्वच

उत्तम आणि शुभ फलें देत असतात. जगज्जननी माता अनुकूल झाली कीं, सर्वच अनुकूल होतात.

"योगिनीराशिपीठैः" आतां आपल्याला 'पीठ' या शब्दाचा विचार करावयाचा आहे. पीठ शब्दाचा अर्थ आसन आहे. जेथें जेथें देवीनें आपल्या शक्तिस्वरूप विविध अंशानें वास्तव्य केलें तीं तीं स्थानें शक्तिपीठ म्हणून समजलीं जातात. शब्दप्रपंचाचीं मूलभूत मूळाक्षरें जशीं एक्कावन आहेत त्याचप्रमाणें हीं शक्तिपीठेंहि संख्येनें एक्कावन आहेत. तीं भारतांत सर्वत्र विखुरलेलीं आहेत. जणुं कांहीं भारताची मानमर्यादा दाखविणारीं तीं केंद्रस्थानेंच आहेत. दुर्दैवामुळें आणि चुकींच्या नेतृत्वामुळें भारत आज यांतील कांहीं शक्तिपीठांना मुकलेला आहे. कांहींच्या मतें हीं पीठें अधिक आहेत. यांतच मातापूर, तुळजापूर आणि कोल्हापूर यांची प्रधानपीठ अथवा मूळपीठ म्हणून गणना केली जाते. सप्तशृंग गडावरील देवीचाहि मुख्य पीठामध्येंच अंतर्भाव करतात. वामकेश्वर तंत्रांत व इतरत्रहि या पीठांचीं नांवें व स्थानें दिलेलीं आहेत. वरिवस्यारहस्यामध्यें "पीठानि पुनर्गणितान्योजापूकानि चत्वारि" या वचनानें एक्कावन अधिक चार मिळून पंचावन पीठें सांगितलेलीं आहेत. ओ म्हणजे ओड्याणपीठ, जा म्हणजे जालंधरपीठ, पू म्हणजे पूर्णागिरीपीठ आणि का म्हणजे कामरूपपीठ. या पीठांचीं स्थानें आणि देवता यांचें खुलासेवार समग्र वर्णन तंत्र-ग्रंथांत आणि पौराणिक वाङ्मयांत पहावयास सांपडतें. या पीठदेवताहि आदिशक्तीचेच अंश असल्यामुळें श्रीदेवी आदिभवानी ही या पीठांशीं – पीठ-देवतांशीं अभिन्न म्हणजे एकरूपच आहे. तात्पर्य, गणेश, ग्रह, नक्षत्र, योगिनी, राशि आणि पीठें या सर्वच देवता श्रीविद्यास्वरूप देवीभवानीचीं रूपांतरेंच असल्या-मुळें श्रीदेवीभवानी या सर्वांशीं एकरूप आहे. "देव्या रूपांतरत्वेन विद्यायास्तद-भेदतः। गणेश-ग्रह-नक्षत्र-योगिनी-राशि-पीठता॥" (वरिवस्यारहस्य ९१)

श्लोकाच्या तिसऱ्या चरणांत "महाकालमात्मानमामृश्य" असें म्हटलेलें आहे. आतां आपण त्याचा विचार करूं. काल हें एक परमेश्वराचें अतर्क्य स्वरूप आहे. "कालः कलयते विश्वं तेन कालोऽभिधीयते। कालो हि भगवान् देवः स साक्षात्परमेश्वरः" कलयते म्हणजे सर्व विश्वाला आपल्या उदरांत गडप करून टाकतो म्हणून त्याला काल असें म्हणतात. "कालोऽस्मि लोकक्षयकृत् प्रवृद्धः" प्रक्षुब्ध अवस्थेंत अथवा प्रलयाच्या काळांत सर्व लोकांचा क्षय करून टाकणारा

जो काल तो मीच आहें, असें श्रीकृष्ण गीतेंत सांगत आहेत. श्रीकृष्णहि आपल्या ज्या स्वरूपाला अथवा ज्या शक्तीला उद्देशून हें सांगत आहेत तें स्वरूप अथवा ती शक्ति म्हणजेच आपली या स्तोत्रांतील देवी भवानी होय. महाकाल हें तिचेंच स्वरूप आहे. या महाकालाच्या स्वरूपाचें आपल्याला आकलन होऊं शकणार नाहीं.

क्षण, लव, घटका, मुहूर्त, प्रहर, दिवस, रात्र, पक्ष, मास, ऋतु, अयन आणि संवत्सर असे हे सामान्यपणें कालखंड मानले जातात. वाचकांना थोडीशी कल्पना येण्याकरितां आम्ही या ठिकाणीं कालाचें कांहीं स्वरूप दाखवीत आहोंत. पहा—"नलिनीपत्रसंहत्या सूक्ष्मसूच्यभिभेदने। दले दले तु यः कालः स कालो लवबाचकः॥" एकावर एक शेंपन्नास कमळांच्या पाकळ्या रचाव्यात आणि लोखंडाच्या तीक्ष्ण सळईनें त्यांच्यावर जोरानें आघात करावा. चुटकीसरसे सर्व दलांचा भेद करून त्या सळईचें टोंक बाहेर येईल. एका क्षणांत ही क्रिया घडली असें आपण म्हणतों. पण या ठिकाणीं एकावर एक रचलेल्या शतदलांचा तीक्ष्ण सळईनें भेद करतांना कालाचेहि अतिसूक्ष्म असे शंभर विभाग झाले ही गोष्ट कोणालाहि मान्य करावी लागेल. सडकेवरील विजेचे दिवे स्विच् ऑन् केल्याबरोबर एकदम लागल्यासारखे वाटतात, पण ते एकदम लागत नसतात. ते क्रमाक्रमानेंच लागतात. ही क्रिया इतक्या झपाट्यानें घडत असते कीं, सामान्यपणें तो क्रम लक्षांत येत नाहीं व दिवे एकदम लागले असें आपण म्हणतों. तोच न्याय प्रकृतस्थलीं समजावा.

वर निर्दिष्ट केलेल्या शतपत्रांतील एका कमलदलाचा भेद करण्याकरितां त्या लोहशलाकेला जितका काळ लागला त्या काळाला लव असें म्हणतात. तीस लव म्हणजे एक त्रुटि. तीस त्रुटि म्हणजे एक कला. तीस कला म्हणजे एक काष्ठा, तीस काष्ठा म्हणजे एक निमेष. अर्थात् डोळ्याची पापणी लवण्याला जितका काळ लागतो तो. "सोऽङ्गुलिस्फोटतुल्यः स्यात्" अंगुलिस्फोट म्हणजे चुटकी. एका चुटकीला जेवढा वेळ लागतो त्याला निमेष असें म्हणतात. आठ निमेष म्हणजे एक मात्रा. आपल्या गुडघ्याच्या एका बाजूस बोट ठेवून तें गुडघ्याभोंवती एकवेळ फिरविण्यास जितका काळ लागतो त्या कालाला मात्रा असें म्हणतात. अथवा विलंबदलय आणि द्रुतलय सोडून मध्यम लयीनें ठेका धरल्यास एकपासून दोन हा अंक मोजण्यास जितका वेळ लागतो तो काळ एका मात्रेचा समजावा. एका मात्रेंत

आपला एक श्वास पूर्ण होतो. तीनशेंसाठ निश्वास म्हणजे एक घटका. दोन घटका म्हणजे एक मुहूर्त. तीस मुहूर्त म्हणजे एक अहोरात्र अर्थात् संपूर्ण दिवस समजावा. एका दिवसांत आपले एकवीस हजार सहाशें श्वासोच्छ्वास होत असतात. प्रत्येक श्वासोच्छ्वासाच्या मिषानें "हंसः सोऽहम्" या अजपा गायत्री मंत्राचा जप सहजच होत असतो. फक्त संकल्प आणि जाणीव ठेवणें आवश्यक असतें. असो.

तीस दिवस म्हणजे एक महिना. बारा महिने म्हणजे एक वर्ष. मनुष्याचें एक वर्ष म्हणजे देवांचा एक पूर्ण दिवस होतो. देवांचे ३६० दिवस म्हणजे देवांचें एक वर्ष. देवांचीं बारा हजार वर्षें म्हणजे चार युगांचा एक पर्यय अर्थात् फेरा पूर्ण होतो. कृतयुगांचीं चार हजार वर्षें, त्रेतायुगाचीं तीन हजार वर्षें, द्वापरयुगाचीं दोन हजार वर्षें आणि कलियुगाचीं एक हजार वर्षें. त्याचप्रमाणें प्रत्येक युगाच्या संधिकालाचीं दोन हजार वर्षें. सर्व मिळून चार युगांच्या एका फेऱ्यांत बारा हजार वर्षें होतात. हीं सर्व वर्षें देवांच्या वर्षमानाचीं आहेत. या मानानें चार युगांचे एक हजार फेरे झाले म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो. जेवढा दिवस तेवढीच त्याची रात्रहि समजावी. याप्रमाणें तीस दिवसांचा एक महिना या क्रमानें ब्रह्मदेवाचीं शंभर वर्षें पूर्ण होतात. "शतमानं भवति शतायुर्वै पुरुषः" या वचनाप्रमाणें ब्रह्मदेवाचें आयुष्य येथें संपतें. या आकाशांत अनंतकोटि ब्रह्मांडांची सतत घडामोड चाललेली असते. प्रत्येक ब्रह्मांडांत एकेक ब्रह्मदेव असतोच. त्याचीं शंभर वर्षें पूर्ण झालीं कीं तो संपतो. या कालाच्या विशाल उदरांत आतापर्यंत असंख्य ब्रह्मदेव झाले, सध्यां आहेत व पुढेंहि होतील ! केवढें हें कालाचें विशाल स्वरूप आहे ! कालाचा आरंभ कोठें होतो व शेवट केव्हां होतो हें कोणालाच ठाऊक नसतें. तो अनादि व अनंत आहे म्हणूनच तो परमेश्वर आहे. या कालालाच महाकाल असें म्हणतात.

आपली श्रीविद्या देवी भवानी अथवा दुर्गामाता ही महाकालस्वरूपच आहे. म्हणूनच आचार्य या श्लोकाच्या उत्तरार्धांत म्हणतात कीं, हे महेशी माते जगदंबे ! तूं आपण महाकाल आहोंत असें लक्षांत घेऊन या सर्व विश्वाची उत्पत्ति, स्थिति आणि प्रलय करीत आहेस. चौथ्या चरणांतील कृति शब्दाचा अर्थ हिंसा, नाश अथवा प्रलय असा समजावा. स्थिति आणि प्रलय यांचा उल्लेख केल्यानंतर उत्पत्ति ही ओघानेंच येते. जन्म, स्थिति आणि नाश हीं सर्व

कालाच्याच अधीन असतात. तात्पर्य, आई ! केवढा तुझा हा महिमा आहे !! तूं माझ्यावर अनुग्रह कर हीच माझी प्रार्थना आहे.

लसत्तार-हारामतिस्वच्छ-चेलां
वहन्तीं करे पुस्तकं चाक्षमालाम् ।
शरच्चन्द्रकोटि-प्रभा-भासुरां त्वां
सकृद्भावयन् भारती-वल्लभः स्यात् ॥ १३ ॥

आई जगज्जननी ! तुझ्या गळ्यामध्यें अत्यंत देदीप्यमान असे पाणीदार टपोऱ्या मौक्तिकांचे हार शोभत आहेत. तुझें वस्त्र अत्यंत स्वच्छ, निर्मळ आणि शुभ्र आहे. तूं आपल्या एका हातांत पुस्तक आणि दुसऱ्या हातांत स्फटिकांच्या मण्यांची माळ धारण केलेली आहेस. शरदृतूंतील कोट्यवधि चंद्रांप्रमाणें तुझी अंगकांति भासुर म्हणजे देदीप्यमान आहे. आई ! जो कोणी तुझ्या या स्वरूपाचें एक वेळ अनन्यचित्तानें चिंतन करील तो विद्यादेवीचा अत्यंत आवडता होईल. अर्थात् तो बृहस्पतितुल्य विद्वान् होईल. जगज्जननी ! हें तुझ्या स्वरूपाच्या चिंतनाचें फळ होय.

समुद्यत्सहस्रार्क-बिम्बाभ-वक्त्रां
स्वभासैव सिन्दूरिताजाण्ड-कोटिम् ।
धनुर्बाण-पाशाङ्कुशान्धारयन्तीं
स्मरन्तः स्मरं वाऽपि सम्मोहयेयुः ॥ १४ ॥

आई त्रिपुरसुंदरी ! तुझ्या मुखकमलाची कांति मी काय वर्णन करूं ? किती वर्णन करूं ? उदयाला येणाऱ्या सहस्र सूर्यांच्या बिंबांप्रमाणें तुझें मुख आरक्तवर्ण आणि तेजस्वी आहे ! तूं स्वतःच्या कांतीनेंच कोटि ब्रह्मांडें सिंदूरवर्ण – आरक्तवर्ण केलेलीं आहेस. तुझ्या अंगकांतीनें कोट्यवधि ब्रह्मांडें (अजाण्डकोटि) अरुणवर्ण झालेलीं दिसत आहेत. धनुष्य, बाण, पाश आणि अंकुश हीं आयुधें तूं आपल्या हातांत धारण केलेलीं आहेस. जे कोणी तुझ्या या स्वरूपाचें भक्तियुक्त अंतःकरणानें स्मरण करतील ते आपल्या दिव्य स्वरूपानें स्मराला म्हणजे कामदेवालाहि संमोहित करतील. तात्पर्य, तुझ्या दिव्य स्वरूपाचें चिंतन करणाऱ्या भक्तांना

कामदेवानेंहि ज्यांच्याकडे पाहून संमोहित व्हावें अशा दिव्य स्वरूपाची प्राप्ति होते असें तुझ्या ध्यानाचें फल आहे.

मणि-स्यूत-ताटङ्क-शोणास्य-बिम्बां
हरित्पट्टवस्त्रां त्वगुल्लासि-भूषाम् ।
हृदा भावयंस्तप्त-हेम-प्रभां त्वां
श्रियो नाशयत्यम्ब चाञ्चल्यभावम् ॥ १५ ॥

ज्यांच्यावर अनेक हिरे-माणकें बसविलेलीं आहेत असे ताटंक म्हणजे कर्णभूषणें अर्थात् कानांतले अलंकार, त्यांच्या योगानें जिच्या मुखाचें रूप आरक्त-वर्ण दिसत आहे. सोनेरी जरीचे कांठ, वेलबुट्टी आणि पदर असलेलें हिरव्या रंगाचें अत्यंत सुंदर रेशमी वस्त्र जिनें परिधान केलेलें आहे, जिच्या अंगावर सोन्यामोत्यांचीं व विविध रत्नांचीं आभूषणें शोभत आहेत; आई जगन्माते ! तप्त सुवर्णाप्रमाणें देदीप्यमान अंगकांति असलेल्या अशा तुझे अर्थात् तुझ्या स्वरूपाचें जो कोणी भक्तियुक्त अंतःकरणानें चिंतन करील, तो तुझ्या कृपेनें स्वभावतः चंचल असलेल्या लक्ष्मीच्या चांचल्यालाहि नाहींसें करण्यास समर्थ होतो. तात्पर्य, ज्याच्यावर तुझी कृपा होईल त्याच्याजवळ स्वभावतः चंचल असलेली लक्ष्मीहि स्थिर रहाते ! असा तुझ्या कृपेचा महिमा आहे. आई ! माझ्यावर कृपा कर.

महामन्त्रराजान्तबीजं परारूयं
स्वतो न्यस्तबिन्दु स्वयं न्यस्तहार्दम् ।
भवद्वक्त्र-वक्षोज-गुह्याभिधानं
स्वरूपं सकृद्भावयेत्स त्वमेव ॥ १६ ॥

" यः (उपासकः) परारूयं स्वतो न्यस्तबिन्दु स्वयं न्यस्तहार्दं भवद्वक्त्र-वक्षोज-गुह्याभिधानं महामन्त्रराजान्तबीजं स्व-रूपं भावयेत् सः त्वमेव भवेत् " असा या श्लोकाचा अन्वय आहे. हे आई देवी त्रिपुरसुंदरी ! या जगांत अनेक मंत्र आहेत. त्यांत कांहीं मंत्र अत्यंत श्रेष्ठ आहेत म्हणून त्यांना महामंत्र असें म्हणतात. तुझा मंत्र या महामंत्रांचाहि राजा आहे. त्या महामंत्रराजाच्या अंतीं म्हणजे शेवटीं असलेलें जें बीज, त्या बीजाला "पर" अशी आख्या म्हणजे संज्ञा आहे. कारण तें पर म्हणजे अत्यंत श्रेष्ठ आहे. त्या बीजामध्यें तीन बिंदु

आहेत. ते स्वभावतःच स्वतःसिद्धरूपानें त्या बीजामध्यें न्यस्त म्हणजे ठेवले गेलेले आहेत. अर्थात् त्या बीजाचे ते 'स्वतः' म्हणजे स्वरूपतः घटक आहेत. त्याचप्रमाणें "हार्द" म्हणजे हार्दकला-योनि अर्थात् त्रिकोण हाहि तेथें स्वयं म्हणजे स्वभावतःच समाविष्ट झालेला आहे. ते तीन बिंदु आणि ती हार्दकला असे जे त्या बीजाचे घटक आहेत, ते जणुं कांहीं माते जगज्जननी ! तुझ्या मूर्तस्वरूपांतील वक्त्र म्हणजे मुखभाग, वक्षोज म्हणजे कंठापासून नाभिस्थानापर्यंतचा मध्यभाग आणि गुह्य म्हणजे दिव्यवस्त्रानें आच्छादित असलेला नाभिस्थानापासून चरणकमलापर्यंतचा अधोभाग असें ज्यांना अभिधान म्हणजे नांव दिलें जातें तेच ते आहेत. याप्रमाणें तें बीज म्हणजे तुझें मंगलमय दिव्य असें मूर्तरूपच आहे. त्या तुझ्या रूपाचें जो कोणी भक्त अनन्यचित्तानें चिंतन करील, तें रूप मीच आहें, माझेंच 'स्व-रूप' आहे. अर्थात् तें आणि मी एकमेकांहून भिन्न नाहींत असें अनन्यरूपानें सकृत् म्हणजे एक वेळ अर्थात् थोडा वेळ जरी चिंतन करील तरी तो "त्वमेव" म्हणजे तूंच होईल. अर्थात् तो तुझ्या स्वरूपाशीं समरस म्हणजे एकरूप होईल. असा या श्लोकाचा अन्वयानुसारी सरळ अर्थ आहे. आतां आपण या श्लोकाचा थोडा अधिक साकल्यानें विचार करूं.

या ठिकाणीं वाचकांनीं ही गोष्ट लक्षांत घ्यावी कीं, या श्लोकांतील दुसऱ्या चरणांत "हार्द" शब्द आलेला आहे. कांहीं विद्वान् हार्द शब्दाच्या ऐवजीं "हार्ध" असा पाठ गृहीत धरून श्लोकाचा अर्थ लावतात. आम्ही मुळांतील "हार्द" पाठ कायम ठेवूनच अर्थ केला आहे, तोहि शास्त्रीय परिभाषेला धरून योग्य तोच केला आहे. पाठभेद दोन मानले तरी अभिप्रेत अर्थ एकच आहे.

शिवशक्तिरूपानें परस्पर संवलित असलेल्या मूळ तत्त्वांतून संपूर्ण वाक्-प्रपंचाचा आणि अर्थप्रपंचाचा आविष्कार झालेला आहे. शब्दप्रपंच हा वाचक आहे तर अर्थप्रपंच हा वाच्य आहे. जगांतील कोणतेंहि अक्षर निरर्थक नाहीं व कोणताहि अर्थ शब्दविरहित नाहीं. याच अभिप्रायानें प्रत्येक अक्षर मंत्रस्वरूप असल्याचें सांगितलेलें आहे. मंत्र हे देवतांचें अधिष्ठान असतात, तर देवता त्या मंत्रांच्या ठिकाणीं अधिष्ठित असतात. देवतांमध्येंहि मुख्य देवता आणि अंगभूत देवता असा भेद असतोच. अंगभूत देवता या अवांतर फलें देतात, तर मुख्य देवता ही मुख्य फल देते. याच दृष्टीनें अवांतर देवतांच्या मंत्रांना मंत्र असें म्हणतात तर मुख्य देवतेच्या मंत्राला महामंत्र असें म्हणतात. या मुख्य देवता

देवांवरील त्यांच्याहिपेक्षां वरिष्ठ असलेल्या मूलभूत देवतेच्या अधीन असतात. म्हणून त्या मूलभूत देवतेची उपासना ज्या मंत्रानें केली जाते त्या मंत्राला – तो सर्वश्रेष्ठ असल्यामुळें महामंत्रराज असें म्हटलें जातें.

प्रकृतस्थली आपल्या या स्तोत्राची उपास्यदेवता श्रीदेवी जगदंबा महात्रिपुरसुंदरी ही राजराजेश्वरी असल्यामुळें स्वाभाविकच तिच्या मंत्राला महामंत्रराज असें म्हटलेलें आहे. ज्याचा जप केला असतां आणि ज्याच्या अर्थाचें मनन केलें असतां साधकाचे सर्व मनोरथ पूर्ण होतात व साधकाचें सर्व दुःखांपासुन संरक्षण होतें त्याला मंत्र असें म्हणतात. "मननात त्रायते इति मन्त्रः" अशी मंत्र शब्दाची व्याख्या आहे. मंत्र जितका गुप्त असेल तितकी त्याची शक्ति अधिक असते, असा मंत्रशास्त्राचा सिद्धान्त आहे. गुप्तपणें सुरक्षित राखलेलीं बीजेंच उत्तम फल देऊं शकतात. या दृष्टीनें आपली प्रकृत देवता श्रीललितामहात्रिपुरसुंदरी हिचा मंत्र हा फारच गुप्त राखला गेलेला आहे. कर्ममूलक जन्ममरणपरंपरा ज्याची संपत आली असेल त्यालाच या मंत्राचा लाभ होतो असा या मंत्राचा महिमा सांगितला आहे. तेव्हां हा मंत्र प्रत्यक्ष अधिकारी असलेल्या श्रीगुरूंच्याच मुखांतून अवगत करून घ्यावा.प्रस्तुत मंत्र हा पंधरा अक्षरांचा असल्यामुळें त्याला 'पञ्चदशी' असें म्हणतात. या मंत्राचे तीन विभाग केलेले आहेत. पहिल्या विभागांत पांच अक्षरें आहेत. दुसऱ्या विभागांत सहा अक्षरें आहेत तर तिसऱ्या विभागात चार अक्षरें आहेत. या विभागांना कूट असें म्हणतात. पहिल्या कूटास वाग्भवकूट असें नांव आहे तर दुसऱ्या कूटास कामराजकूट असें म्हणतात. तिसरें कूट शक्तिकूट या नांवानें ओळखलें जातें. कोठें कोठें प्रथम कूट, द्वितीय कूट आणि तृतीय कूट असेंहि म्हटलेलें आढळतें. द्वितीय कूटाला मध्यम कूट असेंहि म्हणतात. ही तिन्ही कूटें ज्ञानशक्ति, इच्छाशक्ति आणि क्रियाशक्ति यांचीं अधिष्ठानें आहेत. वाग्भवकूटामध्यें श्रीदेवी ही वागीश्वरीरूपानें वास्तव्य करून भक्तजनांना ज्ञान आणि मोक्ष देते. कामराजकूटामध्यें ती कामेशी रूपानें वास्तव्य करून भक्तजनांच्या सकलकामना पूर्ण करते. तसेंच शक्तिकूटामध्यें पराशक्ति अथवा महाशक्ति या रूपानें वास्तव्य करून ती भक्तजनांना शक्तिप्रदान करते.

वर निर्दिष्ट केलेल्या तिन्ही कूटांच्या शेवटीं ह्रीं हें एकच बीज आहे. यावरून ह्रीं या बीजाचें महत्त्व लक्षांत घ्यावें. ह्रीं हें श्रीविद्यास्वरूप महादेवीचेंच रूप आहे. ह्रीं हें अक्षर तिला फार आवडतें. तें तिचें वसतिस्थान आहे. तें

तिचें बीज आहे. तें तिचें स्वरूप आहे. तो तिचा मंत्र आहे. फार काय सांगावें, ह्रीं म्हणजे प्रत्यक्ष श्रीविद्यामहात्रिपुर-सुंदरीच होय, असें ह्रीं या बीजाचें वर्णन केलेलें आहे. ह्रीं या बीजामध्यें हकार, रकार, ईकार आणि अनुस्वार अशीं चार अक्षरें आहेत. त्यांतील हकार हा लयशक्तिविशिष्ट शिवतत्त्वाचा बोधक आहे, रकार हा सृष्टिशक्तिविशिष्ट ब्रह्मतत्त्वाचा बोधक आहे आणि ईकार हा स्थिति-शक्तिविशिष्ट विष्णुतत्त्वाचा बोधक आहे. अनुस्वारानें या तिन्ही तत्त्वांचा शुद्ध चित्स्वरूपांत होत असलेला समावेश सूचित होतो. तात्पर्य, ब्रह्मा, विष्णु आणि महेश हे जिच्या स्वरूपांत विलीन होतात ती शुद्ध चित्स्वरूप असलेली श्रीविद्या-देवी हाच ह्रीं या शब्दाचा अर्थ झाला.

ह्रीं या बीजामध्यें सर्वांच्या अंतीं ई हें बीज आहे. हेंच बीज प्रकृत श्लोकांत "महामन्त्रराजान्तबीजम्" या पदानें सूचित केलेलें आहे. हें बीज फारच महत्त्वाचें आहे. हें प्रत्यक्ष आपल्या उपास्यदेवतेचें श्रीविद्यामहात्रिपुरसुंदरी देवीचें मूर्तिमंत रूपच आहे. ह्रीं या बीजाला मायाबीज असें म्हणतात तर ई या बीजाला कामकलाबीज असें म्हटलेलें आहे. माया आणि कामकला हीं दोन्ही श्रीदेवी भवानीचींच नांवें आहेत. "माया मधुमती मही" अशी ललितासहस्र-नामांत तिचीं नांवें आहेत. तिची शक्ति अचिंत्य असल्यामुळें आणि अघटित घटना घडवून आणण्यामध्यें ती कुशल असल्यामुळें, तिला माया असें म्हटलेलें आहे. ती विश्वाची मूलप्रकृति असल्यामुळेंहि तिला माया असें म्हणतात. "मायां तु प्रकृतिं विद्यात्" हें वचन प्रसिद्धच आहे.

आतां आपण कामकला या नांवाचा विचार करूं. कामकला या शब्दामध्यें दहा वर्ण आहेत. क् + अ + अ, + म् + अ, क् + अ, + ल् + अ + अ = कामकला. अशी कामकला या शब्दाची फोड आहे. व्यंजनांचा उच्चार स्वरांच्या साहाय्यावांचून होत नसल्यामुळें ककार, मकार, अशा रीतीनें त्यांचा निर्देश करण्याची पद्धति आहे. कामकला या शब्दांतील पहिला ककार हा मायेचा वाचक आहे. 'क्' म्हणजे माया. त्यानंतरचा पहिला अकार हा मायाविशिष्ट चैतन्याचा बोधक आहे. मायाविशिष्ट चैतन्यालाच ईश्वर असें म्हणतात. "मायां तु प्रकृतिं विद्धान्मायिनं तु महेश्वरम्" हें गीतावचन प्रसिद्धच आहे. दुसऱ्या अकाराचा अर्थ शुद्ध चैतन्य असा आहे. मायाविशिष्टचैतन्य आणि शुद्धचैतन्य हीं दोन्ही एकच आहेत. "विशिष्टं शुद्धान्नातिरिच्यते" असा न्याय आहे. निळा घट हा घटाहून

निराळा आहे असें कोणी मानीत नाहीं. याच न्यायानें मायाविशिष्ट चैतन्य हें शुद्धचैतन्याहून निराळें मानतां येत नाहीं. यामाणें 'का' या अक्षराचा अर्थ शुद्धचैतन्याहून निराळें नसलेलें मायाविशिष्ट चैतन्य म्हणजे परमात्मा असा झाला. चौथें अक्षर मकार हा अविद्येचा – अज्ञानाचा वाचक आहे. 'म्' म्हणजे अज्ञान. 'अ' म्हणजे अविद्याविशिष्ट चैतन्य अर्थात् जीव. वर सांगितलेल्या न्यायानें अविद्याविशिष्ट चैतन्यस्वरूप जीव हाहि शुद्धचैतन्याहून निराळा नाहीं. तात्पर्य, परमात्मा आणि जीवात्मा यांच्याशी अभिन्न असलेला शुद्ध आत्मा म्हणजे सच्चिदानंदघन परब्रह्म, असा 'कामकला' या शब्दांतील काम शब्दाचा अर्थ झाला.

आतां आपण कला या शब्दाचा अर्थ पाहूं. कला या शब्दांतील ककार हा आकाशाचा वाचक आहे. 'क्' म्हणजे आकाश. 'अ' म्हणजे आकाशविशिष्ट चैतन्य, 'ल्' म्हणजे पृथ्वी, 'अ' म्हणजे पृथ्वीविशिष्टचैतन्य. आणि दुसऱ्या अचा अर्थ शुद्धचैतन्य असा आहे. आकाश आणि पृथ्वी हीं दोन टोकांचीं महाभूतें वेतल्यामुळें वायु, तेज आणि जल हीं तीन महाभूतें 'संदंश' न्यायानें अर्थात् चिमट्यांत पकडल्याप्रमाणें आपोआपच येतात. तात्पर्य, आकाशादि पंचमहाभूत-विशिष्ट चैतन्याशीं अभिन्न म्हणजे एकरूप असलेलें शुद्धचैतन्य, असा 'कला' या शब्दाचा अर्थ झाला. अशा रीतीनें परमात्मचैतन्य, जीवचैतन्य आणि शुद्ध-चैतन्य तसेंच भूतभौतिक विश्वप्रपंचाच्या रूपानें नटलेलें चैतन्य आणि शुद्धचैतन्य हे सर्व शुद्ध चैतन्यस्वरूपच आहेत, अर्थात् ब्रह्मच आहे. उपनिषदेंहि " आत्मै-वेदं सर्वम् ", " सर्वं खल्विदं ब्रह्म " असाच सिद्धान्त प्रतिपादन करीत आहेत. यामाणें " सर्वं खल्विदं ब्रह्म " हाच कामकला या शब्दाचा अर्थ झाला.

यावर कदाचित् कोणी असें विचारील कीं, अहो ! कामकला हा शब्द स्त्रीलिंगी आहे. चैतन्य किंवा ब्रह्म हे शब्द नपुंसकलिंगी आहेत. तेव्हां ही विसंगति आहे असें वाटतें. पण ही शंका बरोबर नाहीं. ब्रह्म किंवा चैतन्य या शब्दाप्रमाणेंच संस्कृतमध्यें या अर्थाचे चित् किंवा चिति हे शब्द आहेतच. चित् किंवा चिति या शब्दांचा अर्थ शुद्ध चित् अथवा चितिशक्तिस्वरूप असलेली श्रीदेवी भवानी असा आहेच. " या देवी सर्वभूतेषु चेतनेत्यभिधीयते, " " चितिरूपेण य कृत्स्नमेतद्व्याप्य स्थिता जगत् । नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः " या देवीमाहात्म्यांतील श्लोकांतून चेतना आणि चिति या शब्दांनीं शुद्धचैतन्यच विवक्षित आहे. तेव्हां कामकला हा शब्द शुद्धचित्स्वरूप असलेल्या आदिशक्तीचा

श्रीदेवी भवानीचाच वाचक आहे यांत संशय नाहीं. तात्पर्य, एखाद्या साधकानें "अहं ब्रह्मास्मि" या महावाक्याला अनुलक्षून मी अखंड, अनंत, शुद्ध सच्चिदानन्दघन परब्रह्मस्वरूप आहें असें ज्याप्रमाणें चिंतन करावयाचें असतें, त्याचप्रमाणें आदिमातेच्या उपासकानेंहि वर सांगितल्याप्रमाणें मायाविशिष्ट चैतन्यरूप परमात्मा, अविद्याविशिष्ट चैतन्यरूप जीवात्मा आणि शुद्धचैतन्य त्याचप्रमाणें भूतभौतिक विश्वप्रपंचाच्या रूपानें नटलेलें चैतन्य आणि शुद्धचैतन्य हीं सर्व कांहीं आदिमाता जगज्जननी श्रीमहात्रिपुरसुंदरीच आहे. तीच मी आहें. मी तिच्याहून निराळा नाहीं असेंच "कामकला" या शब्दानें ध्यान करावयाचें असतें असा सांप्रदायिकांचा सिद्धान्त आहे. याच अभिप्रायानें आचार्यांनीं या श्लोकाच्या चौथ्या चरणांत "स्वरूपं सकृद्भावयेत् स त्वमेव" स्वतःच्या रूपाचें तुझ्या स्वरूपाशीं जो एकरूपतेनें चिंतन करील – एक वेळ जरी तुझ्या तात्त्विक स्वरूपाशीं स्वतःला अभिन्नरूपानें पाहील, तो तूंच होईल. तुझ्याप्रमाणें तोहि चिदानन्दस्वरूप होईल असें म्हटलेलें आहे. या प्रकारच्या उपासनेला तत्त्ववेत्ते "अहंग्रहोपासना" असें म्हणतात.

आतां आपण कामकलाबीजाच्या स्वरूपाचा विचार करूं. कारण तेंच बीज आपल्या या श्लोकांतील पहिल्याच चरणांत सांगितलेल्या महामंत्रराजांतील अंतिम बीज होय.

"ई" हा त्या बीजाचा आकार आहे. विश्वाच्या मुळाशीं असलेलीं सर्व तत्त्वें या बीजांत सामावेलेलीं आहेत. हें बीज दिसण्यांत लहान असलें, तरी तत्त्वतः तें अत्यंत महान् आहे. याच अभिप्रायानें आचार्यांनीं त्याला "पराख्यम्" असें म्हटलेलें आहे. पर शब्दाचा अर्थ श्रेष्ठ अथवा उत्तम असा आहे. हें बीज शुद्धचिदानन्दस्वरूप कामकलेचें वाचक असल्यामुळें हें परात्पर अथवा उत्तमोत्तम आहे यांत संशय नाहीं. बीजाक्षरांचे उच्चार अनुस्वार जोडून केले जात असतात या नियमाला अनुसरून प्रकृत बीजाचा "ई" असा उच्चार केला जातो. वस्तुतः ई हेंच मूळ बीजाक्षर समजावें. या बीजाक्षरांत तीन बिंदु आणि चौथी हार्दकला म्हणजे योनि अथवा त्रिकोण असे चार भाग आहेत. हे चारहि भाग विश्वाच्या मुळाशीं असलेल्या भिन्न भिन्न तत्त्वाचे बोधक आहेत. कोणी कोणी मुख्य बिंदु आणि हार्दकला यांच्यामध्यें असलेले दोन बिंदु हा एकच भाग मानतात. यामध्यें मुख्य बिंदु हा प्रकाशस्वरूप आहे. या प्रकाशामध्यें

विमर्शशक्तीचाहि समावेश झालेला आहे. ही विमर्शशक्ति प्रकाशाहून निराळी दिसत नाहीं. जसे अग्नीचें औष्ण्य किंवा उंसाच्या रसाचा गोडी हीं अग्नीहून आणि उसाच्या रसाहून निराळीं दाखवितां येत नाहींत, त्याचप्रमाणें प्रकाश आणि विमर्श हे एकमेकांहून निराळे प्रतीतीला येत नाहींत. " प्रकाशः अस्ति, प्रकाशः स्फुरति " प्रकाश आहे, प्रकाश स्फुरतो अशा अनुभवावरूनच प्रकाशाच्या ठिकाणीं सत्ता आणि स्फुरण असल्याचें प्रतीतीला येतें. या सत्ता आणि स्फुरण यांनाच विमर्श असें नांव आहे. याच अभिप्रायानें " सा स्फुरत्ता महासत्ता " अशा शब्दांनीं या विमर्शशक्तीचें वर्णन केलेलें दिसतें.

परस्पर संवलित अथवा एकरूप असलेल्या या प्रकाश आणि विमर्शस्वरूप महाबिंदूंतील प्रकाशतत्त्वाला शिव असें म्हणतात, तर विमर्शाला शक्ति असें म्हणतात. या शक्तीच्या साहचर्यानें प्रकाशाच्या ठिकाणीं जेव्हां स्पंदन सुरू होतें तेव्हां त्या प्रकाशांतून अग्नि आणि सोम या दोन तत्त्वांचा आविर्भाव होतो. याच दोन तत्त्वांतून पुढें सर्व जगाची उत्पत्ति होत असते. " अग्नीषोमात्मकं जगत्" हा सिद्धान्त सर्व शास्त्रज्ञांना मान्य आहे. हेच अग्नि आणि सोम आपल्या या कामकलावाचक ई या अक्षरांत दोन बिंदूंच्या रूपानें घटक झालेले आहेत. या तीन बिंदूंतूनच पुढें त्रिकोणाचा आविष्कार होतो. या त्रिकोणाला हार्दकला असेंहि म्हणतात. हा त्रिकोण ह्या अक्षराच्या खालच्या अर्ध्या भागासारखा असल्यामुळें याला " हार्धकला" असेंहि म्हटलेलें आहे. याप्रमाणें ई या अक्षराच्या रूपानें परिणत होत असलेल्या या कामकलाबीजामध्यें तीन बिंदु आणि एक त्रिकोण असे हे विभाग पहावयास सांपडतात.

या ठिकाणीं बिंदु आणि कला हे शब्द तत्त्व या अर्थानेंच उपयोगांत आणलेले आहेत. मूळ स्वरूपांत हीं तत्त्वें अत्यंत सूक्ष्म आहेत, अमूर्त आहेत, अदृश्य आहेत, हें लक्षांत असूं द्यावें. या तीन बिंदूंपैकीं पहिला मूलभूत बिंदु हा सर्वांच्या वर आहे. तो सर्वश्रेष्ठ आहे म्हणून त्याला महाबिंदु असेंहि म्हटलेलें आहे. या महाबिंदूमध्यें प्रकाश आणि विमर्श या दोहोंचें संवलन असल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. प्रकाश हा शुद्ध निर्मल ज्ञानस्वरूप असल्यामुळें शुक्लवर्ण आहे, तर शक्तिस्वरूप असलेला विमर्श हा रक्तवर्ण आहे. प्रकाशाचा शुक्लवर्ण आणि विमर्शशक्तीचा रक्तवर्ण हे दोन्ही वर्ण एकत्र मिळाल्यामुळें मुख्यबिंदु हा रक्तशुक्लमिश्रित अर्थात् अरुणवर्णाचा असल्याचें मानतात. याच शिवशक्तिस्वरूप

अरुणवर्ण महापिंडातून भुवनमंडलाचा अर्थात् छत्तीस तत्त्वांचा आणि त्या तत्त्वांतून निर्माण होणाऱ्या विश्वप्रपंचाचा आविर्भाव होत असतो. हेंच वेदांताच्या भाषेंत सांगावयाचें झाल्यास शुक्लवर्णप्रकाशतत्त्व हें ब्रह्मस्वरूप आहे, तर रक्तवर्णविमर्श हा मायाशक्तिस्वरूप आहे. मायोपहित ब्रह्मचैतन्यांतूनच सर्व विश्वाचा आविर्भाव होत असतो. विमर्शशक्तीच्या ठिकाणीं असलेली स्वाभाविक अहंता ही जेव्हां प्रकाश-बिंदूमध्यें संक्रमित होते तेव्हां प्रकाशाच्या ठिकाणीं पूर्ण अहंभाव निर्माण होतो. प्रकाशचैतन्याच्या ठिकाणीं अहंभावाची स्फूर्ति झाली कीं तो प्रकाशबिंदु विमर्शबिंदूशीं संलग्न होतो. अर्थात् विमर्शबिंदूहि पण प्रकाशबिंदूशीं संलग्न होतो. प्रकाशबिंदूंतून इंदुतत्त्वाचा अर्थात् सोमाचा आविर्भाव होतो तर रक्तबिंदुस्वरूप विमर्शशक्तींतून अग्नितत्त्वाचा आविर्भाव होतो. याप्रमाणें आविर्भूत होणारीं अग्नि आणि सोम हीं दोन तत्त्वें सर्व विश्वाच्या भरणपोषणाला उपयुक्त होतात. एकमेकांमध्यें संमिश्र झालेले हे रक्तशुक्लबिंदु जेव्हां प्रसरणशील होतात तेव्हां त्यांना त्रिकोणाचा आकार येतो. हें त्रिकोणात्मक चक्रच सर्व विश्वाचें मूलाधारचक्र होय. हा त्रिकोण सर्व विश्वाचें मूळ उगमस्थान असल्यामुळें याला योनि असेंहि म्हणतात. योनि शब्दाचा अर्थ कारण, आदिकारण किंवा प्रकृति असा आहे.

प्रकाशतत्त्व हें शिवस्वरूप आहे तर विमर्शतत्त्व हें शक्तिस्वरूप आहे. या प्रकाशस्वरूप शिवतत्त्वालाच "काम" असें नांव दिलेलें आहे. शिवतत्त्वाला काम असें नांव देण्याचें कारण शिवतत्त्व हें अत्यंत कमनीय म्हणजे सुंदर आहे. तें सुंदर आहे, आनंददायक आहे म्हणूनच सर्वांना तें प्राप्त व्हावें अशी इच्छा असते. "काम्यते अभिलष्यते सर्वैः इति कामः" अशी काम शब्दाची व्युत्पत्ति आहे. या कामरूप शिवतत्त्वालाच कामेश्वर असें म्हणतात. प्रकाश-तत्त्वस्वरूप भगवान् सदाशिव हे कामेश्वर आहेत तर विमर्शशक्तिस्वरूप श्रीदेवी पार्वती ही कामेश्वरी आहे. हिला राजराजेश्वरी असेंहि म्हणतात. याप्रमाणें ती निरपेक्ष प्रिय असलेल्या प्रकाशतत्त्वात्मक सदाशिवस्वरूप कामाची कला म्हणजे शक्ति असल्यामुळें तिला कामकला याहि शब्दानें ओळखतात. याच अहंकार-युक्त काम किंवा कामराजसंज्ञक आणि प्रकाशस्वरूप शुक्लबिंदुपासून आणि रक्तबिंदुस्वरूप विमर्शशक्तिसंज्ञक कामकलेपासून समस्त भूत-भौतिक अर्थसृष्टीचा आणि अक्षरप्रपंचात्मक शब्दसृष्टीचा आविर्भाव होत असतो. शब्दसृष्टीचें मूळ नादांत असतें. विमर्शशक्ति किंवा कामकला हें नादाचेंच मूळरूप मानलें

जातें. या अवस्थेतल्या नादाला परा किंवा परावाणी असें म्हणतात. या परावाणींतूनच पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी अशा शब्दाच्या तीन अवस्था निर्माण होतात. वैखरी शब्द हा स्थूल असल्यामुळें त्याचें आपल्याला बाह्य श्रवणेंद्रियानें ज्ञान होऊं शकतें. याचप्रमाणें अहंतावि‌शिष्ट प्रकाशात्मक शिवस्वरूप शुक्रबिंदूतून अर्थप्रपंचाचा आविष्कार होत असतांना प्रथम तो कारणावस्थेंत होतो. कारणावस्थेंतून सूक्ष्म अवस्थेंत आणि सूक्ष्मावस्थेंतून स्थूलावस्थेंत होत असतो. याप्रमाणें समग्र झालेल्या शिवशक्तिस्वरूपांतून सर्व सृष्टिप्रपंच उत्पन्न होत असतो. पिंडब्रह्मांडन्यायानें जें ब्रह्मांडीं पाहिलें तेंच पिंडांतहि दृष्टीस पडतें. पित्याचा शुक्रअर्थात् शुक्र बिंदु आणि मातेचा रजोबिंदु या दोहोंच्या परस्पर संवलनांतून मिश्रबिंदुस्वरूप स्थूलबिंदु उत्पन्न होतो. हाच स्थूल बिंदु पुढें कलल, बुद्बुद इत्यादि रूपानें परिणत होत असतो. बीजांकुरन्यायानें याच स्थूलबिंदूंतून कारण, सूक्ष्म आणि स्थूल शरीरांचा आविष्कार होत रहातो.

तात्पर्य, वर वर्णन केल्याप्रमाणें शिवशक्तिस्वरूप, अग्निषोमात्मक मिश्रबिंदु त्याचप्रमाणें शुद्धप्रकाशस्वरूप आणि विमर्शस्वरूप असे दोन बिंदु मिळून तीन बिंदु आणि या तीन बिंदूंच्या प्रसरणांतून प्रकट होणारा त्रिकोण म्हणजेच हार्धकला अर्थात् ह या अक्षराचा अर्धा भाग हेंच आपल्या कामकलाबीजाचें स्वरूप असलेल्या ई या अक्षराचें रूप आहे. दाक्षिणात्य ग्रंथलिपीमध्येंहि ई या अक्षराचें सामान्यपणें हेंच स्वरूप आहे. ई या बीजाक्षरांतील वर वर्णन केलेले तीनहि बिंदु म्हणजे घटक असलेले भाग हे स्वाभाविकपणेंच त्या अक्षरांत घटक झालेले आहेत. याच अभिप्रायानें आचार्यांनीं त्या बीजाला या श्लोकांतील दुसऱ्या चरणांत "स्वतोन्यस्तबिन्दु" असें म्हटलेलें आहे. तीन बिंदूंप्रमाणेंच "हार्द" म्हणजे त्रिकोण हाहि पण त्या बीजामध्यें स्वाभाविकपणेंच घटक झालेला असल्यामुळें त्या बीजाला "स्वयंन्यस्तहार्दम्" असेंहि पण विशेषण दिलेलें आहे. हार्द याच्या-ऐवजीं "हार्धम्" असा पाठ घेतल्यास हार्ध शब्दाचा 'ह' या अक्षराचा अर्धा भाग असा अर्थ होतो. तोहि सामान्यतः त्रिकोणाच्याच आकाराचा असतो, हें लक्षांत घेऊन अर्थ लावावा. दोन्ही कल्पनेंत अर्थ एकच आहे.

उपासकानें श्रीदेवी ललितामहात्रिपुरसुंदरीची उपासना करतांना ई या बीजाक्षराचें स्मरण व चिंतन करावें. ई बीजातील वरचा स्थूल बिंदु, जो प्रकाश आणि विमर्शशक्ति यांचें मिश्रण असलेला, प्रत्यक्ष शिवशक्तिस्वरूप

म्हणून ज्याचें वर वर्णन केलेलें आहे तोच श्रीदेवी महात्रिपुरसुंदरी हिच्या मुखस्थानीं समजावा. अर्थात् तो बिंदु:श्रीदेवीचें मुख आहे असें चिंतन करावें. सर्व अवयवांत मुख हें श्रेष्ठ मानलें जातें. शिवशक्तिस्वरूप महाबिंदु हाहि सर्व तत्त्वांत अत्यंत श्रेष्ठ आहे. त्याची मुखस्थानीं कल्पना करणें हें योग्यच आहे. त्या महाबिंदूच्या खालीं अग्निस्वरूप आणि सोमस्वरूप असे जे दोन बिंदु आहेत ते श्रीदेवीचा कंठस्थानापासून नाभिस्थानापर्यंतचा मध्यभाग समजावा. आचार्यांनीं या श्लोकांतील तिसऱ्या चरणांत "वक्षोज" असा शब्द योजलेला आहे तो मार्मिक आहे. वक्षोज म्हणजे स्तन. सातेच्या स्तनांतील दूध हें अर्भकाच्या परिपोषणाचें व अभिवृद्धीचें सर्वोत्कृष्ट साधन असतें हें तत्त्व सर्वमान्य आहे. जगज्जननी श्रीदेवीच्या मध्यदेहांत स्तनरूपानें विराजमान असलेलीं अग्नितत्त्व आणि सोमतत्त्व हीं दोन्ही तत्त्वें सर्व विश्वाचें संवर्धन आणि पोषण करीत असतात. सोम हा सर्व औषधींचा राजा आहे. तो जलतत्त्वस्वरूप आहे. अमृतमय आहे. सर्वांना जीवन देणारा आहे. त्याचप्रमाणें अग्नि देखील अनुकूल तेजोरूपानें सर्व विश्वाचें संवर्धन आणि पोषण करीतच असतो. देहामध्यें अग्नि आहे म्हणूनच देहाचें जीवन आहे. अग्नि संपला कीं देहहि संपलाच, हें सर्वानुभवसिद्ध आहे. जगन्माता श्रीदेवी भवानी हीं अग्नि आणि सोम या दोन तत्त्वांच्या रूपानें आपल्या विश्वरूपी अपत्याला सर्वकाळ जीवन देत असते. याच अभिप्रायानें आचार्यांनीं श्लोकामध्यें "वक्षोज" या शब्दाची योजना केलेली आहे. तात्पर्य, अग्नि आणि सोम हीं दोन तत्त्वें श्रीललितादेवीचे स्तन आणि नाभिस्थानापासून कंठापर्यंतचा मध्यभाग आहे अशी भावना करावी.

नाभिस्थानापासून चरणकमलापर्यंतचा देहाचा तिसरा भाग, हा अधोभाग म्हणून समजला जातो. तो नेहमीं वस्त्रानें आच्छादित असतो. झांकलेला असतो. याच अभिप्रायानें आचार्यांनीं त्याला "गुह्य" असें अन्वर्थ नांव दिलेलें आहे. गुह् धातूचा अर्थ झांकणें, आच्छादणें असा आहे. ई या बीजांतील तिसरा भाग त्रिकोण अथवा हार्दकला. हा श्रीदेवीचा नाभिस्थानापासून चरणकमलापर्यंतचा तिसरा भाग समजावा. याप्रमाणें ई या बीजानें नखशिखान्त श्रीदेवीच्या सगुणस्वरूपाची उपासना करावी. अशा रीतीनें सगुणरूपानें श्रीदेवीच्या तात्त्विक स्वरूपाचें चिंतन करावें. याप्रमाणें चिंतन करीत असतांना श्रीसच्चिदानंदघनपरिपूर्ण परब्रह्मस्वरूप असलेली श्रीदेवी आपणच आहोंत अशी दृढ भावना ठेवावी.

अनन्यचित्तानें केल्या जाणाऱ्या चिंतनाचा सुपरिणाम असा होतो कीं, चिंतक हा चिंत्य विषयाशीं समरस होऊन जातो, एकरूप होतो. "म्हणा गोविंद गोविंद मना लागलिया छंद । मग गोविंद ते काया, भेद नाहीं देवा तया" असें अनुभवी संत सांगत आहेत. "तस्मिंस्तज्जने भेदाभावात्" तो आणि त्याचे भक्त यांमध्यें भेद रहात नाहीं असें नारदभक्तिसूत्रहि सांगत आहे. "ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति" हा उपनिषदांचा सिद्धान्तहि हेंच तत्त्व प्रतिपादन करीत आहे. एका प्राचीन कवीनें मोठ्या हृदयग्राही विनोदानें एक मार्मिक दृष्टान्त देऊन हाच सिद्धान्त स्पष्ट केला आहे. तो कवि म्हणतो, भृंगी म्हणजे एक प्रकारची माशी. तिला आपण कुंभारीण म्हणतों. आपल्या घराच्या कोनाकोपऱ्यांत भिंतीला कोठें तरी तिचें घरकुलें आपल्या दृष्टीस पडलें. लहानशा सुपारीएवढें तिचें मातीचें घर असतें. त्याला एक वर्तुलाकार छिद्र असतें. तें तिच्या घराचें दारच होय. ती त्या घरांत गवतावरची आळी आणून ठेवते. गवतावरच्या आळीला तृणजळु असें म्हणतात. ती त्या गवतावरच्या आळीला जातां-येतां सारखी टोचीत असते. त्यामुळें त्या आळीला कुंभारणीचा सारखा ध्यास लागलेला असतो. त्या ध्यासानें कालांतरानें तिचें रूप बदलतें. तिलाहि पंख फुटतात व ती कुंभारीण बनते. हा त्या आळीनें रात्रं-दिवस कुंभारणीचा जो निदिध्यास घेतलेला असतो त्याचाच परिपाक होय, अशा अभिप्रायानें कवि वर्णन करीत आहे. प्रसंग : जानकीला रावणानें अशोकवनामध्यें ठेवलेलें आहे. भोंवतालीं राक्षसिणी आहेत. त्या तिला तिनें रावणाला वश व्हावें म्हणून भेडसावीत असतात, धाक घालीत असतात. त्यांत अपवाद म्हणून त्रिजटा नांवाची एक राक्षसीण जानकीला अनुकूल असते. ती एकदां एकान्तांत जानकीशीं इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत बसली असतां जानकी तिला म्हणते, "हे त्रिजटे ! मला आज एक मोठें नवल दिसलें. गवतावरची आळी पहातां पहातां कुंभारीण झाली ! मला मोठी काळजी वाटतें. कारण मी रात्रं-दिवस रामाचा सारखा ध्यास घेतलेला आहें. या ध्यासानें मीहि अकस्मात् रामरूप झालें तर मग रामाला जानकी कोठून मिळणार ? माझ्या रामावर माझ्या विरहव्यथेचें दुःख भोगण्याचा प्रसंग कायमचाच रहाणार !!" तेव्हां त्रिजटेनें जानकीचें मोठें सुंदर समाधान केलें आहे. त्रिजटा म्हणते, "हे जानकी ! तुला जसा रात्रंदिवस रामाचा ध्यास लागलेला आहे त्याचप्रमाणें रामाला देखील रात्रं-दिवस तुझा ध्यास लागलेला नाहीं का ? तूं जसें रात्रं-दिवस रामाचें

चिंतन करतेस, त्याचप्रमाणें प्रभु रामचंद्र देखील रात्रंदिवस तुझें चिंतन करीत नाहीं का? रामाच्या निदिध्यासानें सीता जर राम झाली तर सीतेच्या निदिध्यासानें राम देखील सीता होणार नाहीं का? अशा रीतीनें राम-सीतेचें पुनर्मीलन घडून येईल हें निश्चित. मग काळजी कां करतेस?

तृणजळु सखिये वो देखतां भृंगि झाली
म्हणउनि मनिं माझ्या थोर चिंता उदेली।
निशिदिनिं जपतें मी राघवालागि ऐसें
अवचित जरि झालें राम होईल कैसें॥

जरि जनकसुते तूं चिंतिसी राघवातें
दशरथसुत तोहि चिंति ना काय तूंतें।
जरि जनकसुते तूं राम होशील आतां
दशरथसुत तोहि होइना काय सीता॥

तात्पर्य, अनन्यचिंतनाचा परिपाक एकरूपतेंत होतो हें सर्वमान्य आहे. हाच अभिप्राय लक्षांत घेऊन आचार्य या श्लोकाच्या चौथ्या चरणांत म्हणतात, "स्वरूपं सकृद्भावयेत्स त्वमेव" जो कोणी भक्त वर वर्णन केल्याप्रमाणें स्वतःच्या रूपाला तुझ्या स्वरूपाशीं एकरूपतेनें एक वेळ जरी पाहील, चिंतील, तरी तो तूंच होईल. त्याला सायुज्यमुक्ति मिळेल. तुझ्यांत आणि त्याच्यांत भेद रहाणार नाहीं.

तथान्ये विकल्पेषु निर्विण्णचित्ता-
स्तदेकं समाधाय बिन्दुत्रयं ते।
परानन्द-संधान-सिन्धौ निमग्नाः
पुनर्गर्भ-रन्ध्रं न पश्यन्ति धीराः॥ १७॥

हे आई जगज्जननी! वरच्या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें ई या बीजांतील मुख्य बिंदूची मुखस्थानीं कल्पना करून, त्याचप्रमाणें दुसऱ्या दोन बिंदूंची वक्षःस्थानीं कल्पना करून आणि हार्दकलेची नाभिस्थानापासून चरणकमलापर्यंतचा तिसरा भाग म्हणून कल्पना करून, तुझी उपासना करणारे जे लोक आहेत, त्यांच्यापेक्षां निराळे असलेले कांहीं तुझे अत्यंत श्रेष्ठ

ज्ञानी भक्त "विकल्पेषु निर्विण्णचित्ताः" मुख्य बिंदु, अग्निसोमात्मक बिंदु, मिश्रबिंदु, पृथक्‌बिंदु, हार्दकला, मुखभाग, मध्यभाग, कमरेपासून पायापर्यंतचा अधोभाग इत्यादि विकल्पांविषयीं त्यांचें मन निर्विण्ण म्हणजे उदासीन असतें. अशा भिन्नभिन्न स्वरूपानें तुझ्या स्वरूपाचा विचार करणें त्यांना रुचत नाहीं. ते वरच्या श्लोकांत सांगितलेले प्रकाश आणि विमर्शस्वरूप महाबिंदु तसेंच अग्नि आणि सोमस्वरूप दोन बिंदु आणि हार्दकला देखील हें सर्व कांहीं एकरूपच आहे आणि तें तुझेंच रूप आहे, अशा रीतीनें "समाधाय" म्हणजे सर्व तत्त्वांचा एका चित्स्वरूपामध्यें संग्रह करून शुद्ध. सच्चिदानंद-स्वरूप असलेल्या तुझ्याच रूपाचा विचार करतात. तूं नित्य निरतिशय आनंदरूप आहेस. त्या आनंदाचाच ते निरंतर "संधान" म्हणजे विचार करीत रहातात. त्या अत्युत्कृष्ट आनंदाच्या विचारसागरांत ते निमग्न होतात. अशा रीतीनें तुझ्या स्वरूपाचें नित्य चिंतन करणारे ते ज्ञानी भक्त तुझ्या चिंतनानें मुक्तच होतात. "गर्भ-रन्ध्र" म्हणजे गर्भाशयरूपी गुहा. ते गर्भाशयरूपी गुहेचें पुन्हां अवलोकन करीत नाहींत. आई जगज्जननी ! तुझ्या शुद्ध चिदानन्दस्वरूपाचें नित्य चिंतन करणाऱ्या त्या श्रेष्ठ भक्तांना कर्मांच्या अधीन होऊन या संसारांत पुन्हां जन्म घ्यावा लागत नाहीं. असा तुझ्या चिंतनाचा महिमा आहे.

कांहीं लोक या श्लोकाचा थोडा निराळ्या रीतीनें अर्थ लावतात. बिंदुत्रय शब्दानें ज्याच्यामध्यें तीन बिंदु समाविष्ट झालेले आहेत असा बिंदुत्रय-घटित त्रिकूटात्मक श्रीविद्येचा पंचदशाक्षरी मंत्रच घेतात. या महामंत्रराजस्वरूप असलेल्या मंत्राचा महिमा फारच मोठा आहे. सर्व मंत्रांच्या जपाचें फल यांत समाविष्ट होत असल्यामुळें सूर्यप्रकाशाचा लाभ झाल्यावर दिव्याची जशी आवश्यकता उरत नाहीं त्याचप्रमाणें श्रीविद्येचा लाभ झाल्यानंतर इतर मंत्राचें कांहीं प्रयोजन उरत नाहीं. या मंत्रांत तीन कूटें असल्याचें वरच्या श्लोकांत सांगितलेंच आहे. या तिन्ही कूटांत ह्रीं अथवा ई हें बीज असल्यामुळें हा मंत्र बिन्दुत्रययुक्त होतो. तेव्हां कांहीं उपासक इतर कोणत्याहि देवतेचा अथवा त्या देवतेकडून मिळणाऱ्या फलाचा विकल्प मनांत येऊं न देतां हाच एक मंत्र प्रत्यक्ष मूर्तिमंत श्रीविद्या देवीभवानीच आहे असा विचार करून, याच एका मंत्राचा जप करीत रहातात. ते आनंदसागरामध्यें निमग्न होतात. त्यांना पुन्हां जन्ममरणाच्या फेऱ्यांत पडावें लागत नाहीं.

श्रीललितासहस्रनामामध्यें "श्रीमद्वाग्भवकूटैकस्वरूपमुखपङ्कजा। कण्ठाधः-कटिपर्यन्तमध्यकूटस्वरूपिणी ॥ शक्तिकूटैकतापन्नकट्यधोभागधारिणी। मूल-मन्त्रात्मिका मूलकुटत्रयकलेवरा ॥" पंचदशाक्षरी श्रीविद्यामंत्रांतील ह्रीं बीजा-पर्यंतची पहिलीं पांच अक्षरें वाग्भवकूट म्हणून समजलीं जातात. शास्त्रज्ञान आणि आत्मज्ञान करून देण्याचें सामर्थ्य या कूटांत असल्यामुळें त्याला वाग्भवकूट हें अन्वर्थ नांव आहे. दुसऱ्या ह्रीं बीजापर्यंतच्या सहा अक्षरांना मध्यकूट, कामकूट अथवा कामराजकूट असें म्हणतात. काम किंवा कामराज या शब्दाचा अर्थ भगवान् सदाशिव असा आहे. हें कूट इच्छाशक्तीचें अधिष्ठान आहे. भक्तजनांच्या सकल कामना पूर्ण करण्याचें सामर्थ्य यामध्यें आहे म्हणूनच याला कामकूट हें अन्वर्थ नांव आहे. तिसऱ्या ह्रीं बीजापर्यंतचीं शेवटचीं चार अक्षरें शक्तिकूट म्हणून समजलीं जातात. हें कूट क्रियाशक्तीचें अधिष्ठान आहे. याच्या मननानें भक्त क्रियाशील आणि शक्तिसंपन्न होतो. हा सर्व मंत्र श्रीविद्यादेवीचें मूर्तिमंत स्वरूप आहे. पहिलें वाग्भवकूट हें तिचें मुखकमल आहे. दुसरें मध्यकूट हा तिचा कंठापासून खालीं कटि म्हणजे कमरेपर्यंतचा भाग समजावा. त्याचप्रमाणें तिसरें शक्तिकूट हा तिचा कमरेपासून खालीं चरणकमलापर्यंतचा भाग समजावा. याप्रमाणें चरणकमलापासून मुखकमलापर्यंत मंत्ररूपानें ती नटलेली आहे. म्हणून तिला मूलमन्त्रात्मिका असें नांव दिलेलें आहे. या त्रिकूटात्मक पंधरा अक्षरांच्या मंत्रालाच मूलमंत्र असें म्हटलें जातें. कारण तो मंत्र सर्व सुखाचें मूळ आहे. चतुर्विध पुरुषार्थांचें तो मूळकारण आहे. या मंत्रांतील ह्रीं या बीजांत समाविष्ट असलेलें ई हें अक्षर तर अत्यंत महत्त्वाचें आहे. ईकार हा प्रत्यक्ष देवीचें रूप होय. म्हणूनच "ईकाररूपा चेशित्री" असें त्रिशतीमध्यें तिचें वर्णन केलेलें आहे. ई या बीजमंत्रांतहि तीन कूटें आहेतच. त्यांतील ऊर्ध्व बिंदु हें एक कूट असून तें आपल्या उपास्यदेवतेचें मुखकमल मानलें जातें. आडवे दोन बिंदु हें मध्यकूट असून श्रीदेवीभवानीचा तो कंठापासून कमरेपर्यंतचा मधला भाग समजला जातो. खालची हार्धकला अथवा त्रिकोण हा या बीजमंत्रांतील तिसरें कूट असून तो श्रीदेवीचा कमरेपासून चरणकमलापर्यंतचा खालचा भाग मानला जातो. हा श्रीदेवीचा अत्यंत सूक्ष्म स्वरूपाचा मूलभूत मंत्र आहे. मुख्य अर्थानें हाच मूलमंत्र होय. तात्पर्य, बिंदुत्रयात्मक एकाच बीजमंत्राचा विचार करून इतर कोणत्याहि फलाचा विकल्प मनांत येऊं न देतां निरपेक्षबुद्धीनें जे भक्त श्रीत्रिपुरसुंदरीचें चिंतन

करतात त्यांना पुन्हां पुनर्जन्माचें दुःख भोगावें लागत नाहीं. खरोखरच ते भक्त मोठे धीर म्हणजे बुद्धिमान् – ज्ञानी भक्त होत यात संशय नाहीं. "त्यांची सरली येरझार झाला सफल संसार."

त्वदुन्मेष-लीलानुबन्धाधिकारान्
विरिञ्च्यादिकांस्त्वद्गुणाम्भोधिबिन्दून् ।
भजन्नस्तितीर्षन्ति संसारसिन्धुं
शिवे तावकीना सुसम्भावनेयम् ॥ १८ ॥

आई जगज्जननी ! तूं आपल्या दृष्टीचें उन्मीलन करतेस तेव्हां तुझी, सृष्टीचें उत्पादन, परिपालन इत्यादि स्वरूपाची जी लीला सुरू होते, तेव्हां त्या लीलेचें सातत्य राखण्याकरितां तुझ्याकडून ज्यांना ज्यांना अधिकार प्राप्त झालेले आहेत, ते ब्रह्मा, विष्णु, महेश, इंद्र, वरुण, कुबेर इत्यादि देव महासागराप्रमाणें अनंत आणि अपार असलेल्या अशा तुझ्या गुणांच्या सागरांतून बिंदूप्रमाणें अल्पस्वल्प तुझ्या गुणांना मिळवून ते आपआपलें कार्य करीत असतात. तुझ्या गुणांच्या मानानें त्यांचे गुण "दर्यामें खसखस" या म्हणीप्रमाणें अगदींच अल्प असतात. पण सामान्य लोकांना मात्र ते देव गुणांचे सागर आणि सामर्थ्यांचें आगर वाटतात. सामान्य लोक त्यांचें भजन करीत, त्यांची सेवा करीत, या संसारसागराला तरून जाण्याची इच्छा करीत असतात. आई माते भवानी ! विश्वकल्याणकर्त्री तूं, त्यांच्याबद्दल तुझ्या अंतःकरणांत असलेल्या सद्भावनेचाच हा परिपाक होय. तात्पर्य, ब्रह्मदेव, विष्णु इत्यादि बडेबडे देवहि तुझ्या कृपाकटाक्षानें तुझ्या अफाट गुणसागरांतून अल्प-स्वल्प गुण मिळवतात आणि जगद्वन्द्य होतात. प्रत्यक्ष तुझ्या गुणांचा महिमा काय वर्णन करावा ?

कदा वा भवत्पाद-पोतेन तूर्णं
भवाब्धोधिमुत्तीर्य पूर्णान्तरङ्गः ।
निमज्जन्तमेनं दुराशाविषाब्धौ
समालोक्य लोकं कथं पर्युदास्से ॥ १९ ॥

आई माते भवानी ! मी तुझ्या चरणकमलरूपी नौकेचा आश्रय करून तिच्या साहाय्यानें केव्हां बरें या दुस्तर भवसागराला झटकन् पार करून जाईन ? केव्हां बरें मी सफलमनोरथ होईन ? माझें अंतरंग केव्हां बरें पूर्ण होईल ? आई ! या दुराशारूपी विषानें भरलेल्या संसारसागरांत हे लोक बुडत आहेत. यांना पाहून तूं कशी बरें उदास रहातेस ? तूं यांचा उद्धार कां करीत नाहींस ? अथवा " एनं जनं " म्हणजे हा मी तुझा तुच्छ सेवक या दुस्तर संसारसागरांत बुडत असतांना याला तूं वर कां काढीत नाहींस ? माझें दुःख पाहून तूं उदास कशी रहातेस ? तात्पर्य, तूं माझी उपेक्षा करूं नकोस. मला या संसारसागरांतून झटकन् वर काढ.

कदा वा हृषीकाणि साम्यं भजेयुः
कदा वा न शत्रुर्न मित्रं भवानि ।
कदा वा दुराशा-विषूची-विलोपः
कदा वा मनो मे समूलं विनश्येत् ॥ २० ॥

आई भवानी ! माझी इंद्रियें केव्हा बरें साम्यावस्थेला पोहोंचतील ? इष्ट वाटणाऱ्या विषयांचें दर्शन झालें असतां इंद्रियें प्रफुल्लित होतात. अनिष्ट वाटणाऱ्या विषयांचें दर्शन घडलें असतां इंद्रियें तेथून मुरड घेतात. मी-तूं, माझें-तुझें हा विषम भाव चित्तांत जागृत आहे. माझीं इंद्रियें आणि मन ह्या विषम-भावाला सोडून साम्यावस्थेला केव्हां प्राप्त होईल ? सुख-दुःख, मान-अपमान, लाभ-हानि, शत्रु-मित्र हा भेदभाव चित्तांतला केव्हां मावळेल ? शत्रुहि नाहीं आणि मित्रहि नाहीं अशी माझी केव्हां अवस्था होईल ? दुराशारूपी विषूचिका म्हणजे पटकी — महामारी ही माझी केव्हां बरें शांत होईल ? या दुराशारूपी विकासाचा केव्हां बरें लोप होणार ? माझ्या मनांतील संकल्प-विकल्पांच्या भावना केव्हां बरें समूळ नष्ट होतील ? माझें मन पूर्णपणें केव्हां शांत होईल ? आई ! मी अत्यंत आतुरलों आहें. तूं माझ्यावर अनुग्रह कर.

नमोवाकमाशास्महे देवि युष्म-
त्पदाम्भोजयुग्माय तिग्माय गौरि ।
विरिञ्च्यादि-भास्वत्किरीट-प्रतोली-
प्रदीपायमान-प्रभा-भास्वराय ॥ २१ ॥

हे आई गौरी ! अत्यंत तेजस्वी, देदीप्यमान अशा तुझ्या – अर्थात् तुमच्या दोन्ही चरणकमलांना आम्ही भक्तिभावानें नमस्कार करीत आहों. आई ! कोणी विचारील, तुझे चरणकमल कसे आहेत ? तर सांगतों : विरिंच्यादि म्हणजे ब्रह्मदेव, विष्णु, इंद्र, वरुण, कुबेर इत्यादि देव, त्यांच्या मस्तकीं विराजमान असलेले जे देदीप्यमान मुकुट, त्या मुकुटांतील हिरेमाणकें वगैरे रत्नांची राजमार्गावरील प्रदीपाप्रमाणें दिसणारी जी कांति, त्या कांतीप्रमाणें ते अत्यंत तेजस्वी आहेत. हे देवी ! तुझ्या त्या पदारविंदद्वयाला माझा नमस्कार असो.

कचे चन्द्ररेखं कुचे तारहारं
करे स्वादुचापं शरे षट्पदौघम् ।
स्मरामि स्मरारेरभिप्रायमेकं
मदाघूर्णनेत्रं मदीयं निधानम् ॥ २२ ॥

आई ! तुझ्या केशकलापामध्यें चंद्राची कोर शोभत आहे. तुझ्या वक्षस्थळीं टपोऱ्या आणि पाणीदार मोत्यांचे हार शोभत आहेत. तुझ्या हातामध्यें गोड धनुष्य – उंसाचें धनुष्य आहे. त्याचप्रमाणें तुझ्या हातांतील बाणांच्या भोंवतालीं भ्रमरांचा समुदाय गुंजारव करीत घिरट्या घालीत आहे. आई ! तुझें स्वरूप म्हणजे स्मरारि – मदनारि जे भगवान् शंकर त्याच्या अंतःकरणातील एकमेव इष्टतत्त्व आहे आणि माझ्या अंतःकरणातील एकमेव निधान म्हणजे सकल मनोरथ पूर्ण करणारा मूर्तिमंत निधीच आहे. माझा ठेवाच आहे तो. आई ! तुझे नेत्र हर्षानें चंचल झालेले दिसत आहेत. तात्पर्य, आई ! तुझें स्वरूप मोठें रमणीय आणि स्पृहणीय आहे.

शरेष्वेव नासा धनुष्वेव जिह्वा
जपा-पाटले लोचने ते स्वरूपे ।
त्वगेषा भवच्चन्द्रखण्डे श्रवो मे
गुणे ते मनोवृत्तिरम्ब त्वयि स्यात् ॥ २३ ॥

आई जगदंबे ! माझें घ्राणेंद्रिय तुझ्या बाणांच्या ठिकाणीं नेहमीं संलग्न असावें. देवीचे बाण फुलांचे असल्यामुळें त्या फुलांचा गंध ग्रहण करण्यांत माझ्या घ्राणेंद्रियानें सदा रमावें असा अभिप्राय आहे. फुलांचे बाण हें उदाहरणमात्र

आहे. गळ्यांतील फुलांच्या माळा, मस्तकावर आणि पायांवर वाहिलेलीं फुलें यांच्याहि गंधाचें ग्रहण घ्राणेन्द्रियानें नित्य होत असावें, हेंहि अभिप्रेत आहेच. आई ! माझ्या जिह्वेनें तुझ्या धनुष्याच्या ठिकाणींच नेहमीं संलग्न असावें. देवीचें धनुष्य उसाचें असल्यामुळें त्याच्या रसाचा आस्वाद घेण्यांतच माझ्या रसनेंद्रियानें नेहमीं रमावें अशी माझी इच्छा आहे. पूजेंतील पंचामृताचा, प्रसादाचाहि रसास्वाद विवक्षित आहेच.

हे आई ! जास्वंदीच्या फुलाप्रमाणें आरक्तवर्ण असलेल्या तुझ्या स्वरूपाच्या ठिकाणीं माझ्या दोन्ही डोळ्यांनी नित्य रमावें. तुझें आरक्त रमणीय रूपच डोळ्यांनीं नित्य पहात असावें हीच मनीषा आहे. तुझ्या मस्तकीं विराजमान असलेल्या चंद्रकलेच्या आह्लाददायक चंद्रिकेचा आस्वाद घेण्यांतच माझ्या ह्या त्वगिंद्रियानें नित्य तन्मय व्हावें. अर्थात् तुझ्या मस्तकावरील चंद्राच्या शीतल किरणांचा लाभ माझ्या त्वगिंद्रियाला नित्य व्हावा. चंद्र शब्दाचा अर्थ चंदन असाहि आहे. तुझ्या चंदनाच्या उटीचा लेश माझ्या अंगाला मी लावावा व त्याच्या शीतल स्पर्शांत माझ्या त्वगिंद्रियानें रमावें असाहि अर्थ करावा. हे माते ! माझ्या कानांनीं तुझें गुणच नित्य श्रवण करावेत. त्याचप्रमाणें माझी मनोवृत्ति नेहमीं तुझ्याच ठिकाणीं संलग्न असावी, असेंच माझें मागणें आहे. मोरोपंतांनींहि पण देवाजवळ "मन भवच्चरित्रीं जडो" असेंच मागणें मागितलेलें आहे.

जगत्कर्म-धीरान्वचोधूत-कीरान्
कुच-न्यस्त-हारान्कृपासिन्धु-पूरान् ।
भवाम्भोधि-पारान्महा-पाप-दूरान्
भजे वेदसाराञ्शिव-प्रेमदारान् ॥ २४ ॥

जगाची उत्पत्ति, स्थिति, पालन, पोषण इत्यादि स्वरूपाचें जें कार्य त्यामध्यें अत्यंत धीर म्हणजे कुशल, तसेंच शुकाच्या अर्थात् पोपटाच्या मधुर वाणीलाहि जिच्यापुढें तुच्छ म्हणावें लागेल अशा मधुर वाणीनें युक्त, त्याचप्रमाणें जिच्या वक्षःस्थळीं मोत्यांचे हार संलग्न झालेले दिसत आहेत आणि जी कृपेचा परिपूर्ण महासागरच आहे, त्याचप्रमाणें जिच्या कृपेनें भवसागर सहजच पार करतां येतो, जिच्या स्मरणानें महापापेंहि दूर होतात आणि जी वेदांचें जणूं कांहीं सारच

आहे त्या शंकरांच्या परमप्रिय पत्नीला – देवीभवानीला मी अनन्यभावानें भजत आहें. अनन्यचित्तानें मी तिचा आश्रय करीत आहें.

सुधा-सिन्धु-सारे चिदानन्द-नीरे
समुत्फुल्लनीपे सुरत्नान्तरीपे ।
मणि-व्यूह-साले स्थिते हैम-शाले
मनोजारि-वामे निषण्णं मनो मे ॥ २५ ॥

आई त्रिपुरसुंदरी ! मनोज म्हणजे कामदेव, त्याचा अरि म्हणजे शत्रु अर्थात् कामदेवाला जिंकणारे, मदनाला भस्म करून टाकणारे जे भगवान् शंकर त्यांच्या वामभागीं विराजमान असलेली तूं जणूं कांहीं अमृताच्या सागराचें सार आहेस. अथवा चिदानन्दरूपी नीर म्हणजे जल अथवा जीवनच तूं आहेस. तुझ्या सान्निध्यांत कदंबाचे वृक्ष प्रफुल्लित झालेले दिसत आहेत. उत्तम रत्नांच्या माळा तुझ्या गळ्यांत शोभत आहेत. रत्नजडित सुवर्णमंदिरांत तूं विराजमान झालेली आहेस. तुझ्यास्वरूपीं माझें मन भक्तिभावानें पूर्णपणें संलग्न झालेलें आहे.

दृगन्ते विलोला सुगन्धीषुमाला
प्रपञ्चेन्द्रजाला विपत्सिन्धु-कूला ।
मुनि-स्वान्त-शाला नमल्लोकपाला
हृदि प्रेमलोलाऽमृत-स्वादु-लीला ॥ २६ ॥

आई ! तुझ्या नेत्राचे अंतभाग म्हणजे अपांग-कटाक्ष. ते अत्यंत चंचल आहेत. अर्थात् तूं मीनाक्षी आहेस. तुझ्या हातांतील इषु म्हणजे बाण आणि गळ्यांतील फुलांचे हार हे सुगंधी आहेत. देवीच्या हातांतील बाण फुलांचे असल्यामुळें ते सुगंधी असणें स्वाभाविकच आहे. आई ! हें प्रपंचाचें इंद्रजाल म्हणजे आश्चर्य-जनक विचित्र पसारा तूंच निर्माण केला आहेस. संकटांच्या सागराची तूं मर्यादा आहेस. भक्त जोंपर्यंत तुझ्या सान्निध्यांत येऊन पोहोंचला नाहीं तोंपर्यंतच तो संकटांच्या सागरांत गटंगळ्या खात असतो. तो तुझ्या सान्निध्यांत येऊन पोहोंचला कीं, त्याचा संकटाचा सागर संपला म्हणून समजावें.

आई जगज्जननी ! तूं ऋषि-मुनि लोकांच्या अंतःकरणांची शाला म्हणजे वसतिस्थान आहेस. अथवा ऋषिमुनि जनांचीं अन्तःकरणें हें तुझें वसतिस्थान

आहे. भक्ताचें अन्तःकरण हेंच तुझें मंदिर आहे. सर्व लोकपालदेवता तुझ्या चरणीं नम्र झालेल्या आहेत. तुझ्या चरणीं नम्र झालेल्या लोकांचें तूं परिपालन करतेस. तुझें अन्तःकरण भक्ताविषयींच्या प्रेमानें उत्कंठित झालेलें असतें. भक्ताविषयीं तुझ्या अंतःकरणांत लोभ आहे. लोल म्हणजे लोभी. आई ! तुझीं लीलाचरित्रें अमृतासारखीं मधुर आहेत.

जगज्जालमेतत्त्वयैवाम्ब सृष्टं
त्वमेवाद्य यासीन्द्रियैरर्थ-जालम् ।
त्वमेकैव कर्त्री त्वमेकैव भोक्त्री
न मे पुण्यपापे न मे बन्धमोक्षौ ॥ २७ ॥

या श्लोकांत आचार्य शुद्ध-सकल-संसार-धर्म-विरहित निरंजन अशा आत्म-स्वरूपाची स्पष्ट कल्पना देऊन आत्मा हा स्वतःसिद्ध स्वयंप्रकाश असून, नेहमींच तो कर्तृत्व, भोक्तृत्व आणि पापपुण्य यांच्या पलीकडे आहे. या कोणत्याहि गोष्टींचा त्याला तिळमात्रहि स्पर्श नाहीं. सुखदुःख, पापपुण्य, कर्तृत्व, भोक्तृत्व, नामरूपात्मक विविध विश्वप्रपंच आणि असंख्य प्राणिसृष्टि हा सर्व आदिशक्तिस्वरूप असलेल्या महामायेचा श्रीदेवीभवानीचाच खेळ आहे ! असा अभिप्राय व्यक्त करीत मोठ्या मार्मिकपणानें आई ! सर्व कांहीं तूंच आहेस अशा अर्थानें श्रीदेवीभवानीची स्तुति करीत आहेत.

हे आई ! हें विश्वप्रपंचाचें अवडंबर तूंच निर्माण केलें आहेस; आणि तूंच आज इंद्रियांच्या द्वारां शब्दस्पर्शादि विषयांच्या समुदायाकडे धांव घेत आहेस ! तूंच निर्माण केलेल्या या विषयजालांत तूंच सर्व देहांमध्यें जीवरूपानें प्रविष्ट होऊन इंद्रियांच्या साहाय्यानें तूंच विविध विषयांच्या जाळ्यांत गुरफटून पडत आहेस ! आई ! तूंच एक कर्त्री आणि तूंच एक भोक्त्री आहेस. अर्थात् सर्व कार्यांचें आणि सर्व कर्मांचें कर्तृत्व तुझ्याकडेच आहे आणि सर्वकर्मफलांचें भोक्तृत्वहि पण तुझ्याकडेच आहे ! आई ! मला पुण्यहि नाहीं व पापहि नाहीं. कोणत्याहि कार्यांचें व कर्मांचें माझ्याकडे कर्तृत्वहि नाहीं आणि कर्मफलांचें भोक्तृत्वहि नाहीं. म्हणून मला बंधहि नाहीं आणि मोक्षहि नाहीं. काय मौज आहे पहा, श्रीविद्येच्या कृपेनें असा दृढ-निश्चय ज्याचा झाला तो खरोखर धन्यच होय.

इति प्रेम-भारेण किञ्चिन्मयोक्तं
न बुध्वैव तत्त्वं मदीयं त्वदीयम् ।
विनोदाय बालस्य मौख्यं हि मात-
स्तदेतत्प्रलाप-स्तुतिं मे गृहाण ॥ २८ ॥

वरच्या श्लोकांत अगदी निर्भीडपणें यथार्थ तत्त्वाचा निर्देश करून या श्लोकांत तितक्याच नम्रपणानें हात जोडून प्रार्थना करीत आहेत. आई! आई! हें जें कांहीं प्रेमाच्या भरांत मी वेडेंवाकडें बोललों त्याची मला तूं क्षमा कर. मी हें जें कांहीं तुझें यथाशक्ति आणि यथाबुद्धि अल्पस्वल्प स्तवन केलें आहे तें केवळ प्रेमाच्या भरांत केलेलें आहे ! आई ! मला मी कोण आहें व माझें काय स्वरूप आहे हेंहि कळलेलें नाहीं. त्याचप्रमाणें तूं कोण आहेस व तुझें काय स्वरूप आहे हेंहि कळलेलें नाहीं. न कळतांच मी कांहीं तरी अल्लडपणानें बडबड केली ! आई ! अल्लड बाळाचें वेडेपणांतील वेडेंवाकुडे बोल हे आईच्या मनोरंजनालाच कारणीभूत होत असतात. अज्ञान बालकानें केलेल्या असंबद्ध प्रलापांचा आईला कधीं खेद वाटतो काय ? आई ! माझ्या या निरर्थक अथवा अपार्थक स्तुतीचा तूं अंगीकार कर. हीच माझी तुला हात जोडून विनंती आहे. आचार्यांचे हे विचार वाचल्यानंतर " बोलिलें लेकरूं वेडें वाकडें उत्तरुं । क्षमा करा अपराध महाराज तुम्ही सिद्ध " या श्रीतुकोबारायांच्या वचनाची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं.

श्रीदुर्गा हा आदिमाया देवीभवानीचाच अवतार आहे. केवळ भक्तजनांना संकटांतून सोडविण्याकरितां आणि भक्तांचे सकल मनोरथ पूर्ण करण्याकरितांच हा अवतार धारण केलेला आहे. सप्तशतीपाठ आणि नवार्णमंत्राचा जप करून अनेक भक्त श्रीदुर्गादेवीची आराधना करीत असतात. पुष्कळांना इष्टलाभ झाल्याचीहि प्रचीति येत असते. कलियुगामध्यें हें दैवत जागृत आहे. जिज्ञासू जनांच्या हितासाठीं आम्ही एक सोपी उपासनापद्धति सादर करीत आहों.

श्रीदुर्गामंत्रजप-पद्धति

ॐ अस्य श्रीदुर्गामन्त्रस्य महेश्वरऋषिः । अनुष्टुप् छन्दः । श्रीदुर्गा देवता । दुंबीजम् । ह्रीं शक्तिः ॐ कीलकम् । ॐ नम इति दिग्बन्धः । सकलमनोरथ-सिद्ध्यर्थं जपे विनियोगः । ॐ ह्रां अङ्गुष्ठाभ्यां नमः । ॐ ह्रीं तर्जनीभ्यां नमः

इत्यादि करन्यास करावा. त्यानंतर ॐ हां हृदयाय नमः । ॐ हीं शिरसे स्वाहा इत्यादि षडङ्गन्यास करावा. नंतर ऋष्यादि न्यास. ॐ महेश्वरऋषये नमः शिरसि । ॐ अनुष्टुप्छन्दसे नमो मुखे । ॐ श्रीदुर्गादेवतायै नमो हृदये । ॐ दुं बीजाय नमो नाभौ । ॐ ह्रीं शक्तये नमो गुह्ये । ॐ ॐ कीलकाय नमः पादयोः । ॐ नमो दिग्बन्धाय सर्वाङ्गेषु । अथ ध्यानम् । दूर्वानिभां त्रिनयनां विलसत्किरीटां शङ्खाब्जखड्गशरखेटकशूलचापाम् । सन्तर्जनीं च दधतीं महिषासनस्थां दुर्गां नवारकुलपीठगतां भजेऽहम् ॥ हें ध्यान म्हणून पंचमानसोपचार पूजा करावी. पूर्वी सांगितलेल्या पद्धतीनें माळेचा मंत्र म्हणून प्रोक्षण करावें व माळेला नमस्कार करून गुरुमुखानें घेतलेल्या ॐ ह्रीं दुं दुर्गायै नमः या मंत्राचा जप करावा. शेवटीं पुन्हां दुसरा माळेचा मंत्र म्हणून माळ मस्तकावर ठेवावी व माळेला नमस्कार करून झालेला जप श्रीदुर्गादेवीला निवेदन करावा. अर्थात् — अनेन यथाशक्तिकृतेन श्रीदुर्गामन्त्रजपाख्येन कर्मणा भगवती श्रीदुर्गादेवी प्रीयतां न मम असें म्हणून संध्येच्या पळीनें ताम्हणांत पाणी सोडावें. नंतर "यस्य स्मृत्या" म्हणून विष्णवे नमो विष्णवे नमो विष्णवे नमः असें म्हणून जपकर्म पूर्ण करावें.

■ ■ ■

कनकधारास्तोत्रम् ।

[श्रीविद्यारूपी श्रीललितामहात्रिपुरसुंदरीचेंच श्रीमहालक्ष्मी हें एक रूप आहे. या रूपानें श्रीदेवी ही भक्तांना धनसंपन्न करते, वैभवसंपन्न करते. यावर कोणी म्हणेल, धनवैभवाची काय आवश्यकता आहे ? पण हें म्हणणें बरोबर नाहीं. गृहस्थाश्रमाची सफलता ही धनवैभवावरच अवलंबून आहे. ज्याच्याजवळ अर्थ नाहीं त्याच्या जीवनावर निरर्थकतेची छाया पडलेली असते. धर्म आणि काम हे पुरुषार्थहि अर्थावरच अवलंबून असतात. "दया धर्मका मूल है" हा सिद्धान्त मानला तरी दयेमध्यें उपकाराला प्राधान्य आहे व उपकार हे प्रायः अर्थावरच अवलंबून असतात. तुम्ही कितीहि गुणवान् असा पण दारिद्र्याच्या फेऱ्यांत सांपडलांत कीं तुमच्या सर्व गुणांचा नाशच होतो. "दारिद्र्यदोषो

गुणराशिनाशी " असाच व्यवहारामध्यें सर्वांना अनुभव येतो. याकरितां सर्वांनीं धनसंपन्न होण्याचा प्रयत्न करवा. यावर कोणी असें विचारील कीं, अहो ! आचार्यांनींच " अर्थमनर्थं भावय नित्यं " असें म्हटलेलें आहे, तेव्हां त्याच्या उलट तुम्ही धनसंपन्न होण्याचा प्रयत्न करावा असें कसें सांगतां ? यावर उत्तर असें कीं, आचार्यांना दारिद्र्य मुळींच मान्य नाहीं. जे लोक धनाच्या संचयानें आपण सुखी होऊं असें समजतात व धनाचा योग्य विनियोग न करतां केवळ धनसंचयच करून ठेवतात, अशाच लोकांना आचार्यांचें सांगणें आहे कीं, नुसता धनसंचय करूं नका. " नास्ति ततः सुखलेशः सत्यम् " केवळ धनसंचयानें कोणीहि सुखी होऊं शकत नाहीं. याकरितां धनसंग्रहहि करावा व त्या धनाचा सुविचारांनीं योग्य विनियोगहि करावा. असेंच आचार्यांना अभिप्रेत आहे. नाहीं तर त्यांनीं या कनकधारास्तोत्रानें श्रीमहालक्ष्मीची प्रार्थना करून एका स्वधर्मनिष्ठ दरिद्री ब्राह्मण कुटुंबाच्या दारिद्र्याचा परिहार केलाच नसता. " धन्यो गृहस्थाश्रमः " या वचनाप्रमाणें आपला गृहस्थाश्रम धन्य व्हावयाचा असेल तर त्याला इतर उपयुक्त साधनांबरोबर 'अर्थोपार्जन' हेंहि आवश्यक आहेच. म्हणूनच मनुमहर्षींनीं सर्व मानवांना उद्देशून अर्थाच्या संयोजनाचा व नियोजनाचा मोठा मार्मिक उपदेश केलेला आहे. " अर्थेभ्योऽथ प्रवृद्धेभ्यः प्रवृत्तेभ्यस्ततस्ततः । क्रियाः सर्वाः प्रजायन्ते पर्वतेभ्य इवापगाः " पैसा मिळवला, वाढवला आणि योग्य अशा निरनिराळ्या मार्गांनीं वेंचला तरच पर्वताच्या पठारावर संचित झालेल्या सरोवरांतून जसे अनेक नद्यांचे प्रवाह प्रवृत्त होतात त्याचप्रमाणें त्या धनाच्या व्ययांतून यज्ञयाग, धर्मशाळा, पाठशाळा, आरोग्यमंदिरें, विहिरी, तळीं, पाणपोई, अन्नदान, आतिथ्यधर्म इत्यादि सर्व गोष्टी होऊं शकतात. अर्थ हा व्यष्टीच्या उन्नतीबरोबरच समष्टीच्या व राष्ट्राच्या उन्नतीलाहि कारणीभूत असतो. मात्र तो अर्थ अन्यायानें लाचलुचपतीनें व काळ्याबाजारानें संपादन केलेला नसावा. अन्यायानें मिळविलेला अर्थ परिणामीं अत्यंत अनर्थकारक असतो. याच अभिप्रायानें आचार्यांनीं " अर्थमनर्थं भावय नित्यं " असा उपदेश केलेला आहे. तात्पर्य, आपला गृहस्थाश्रम धन्य होण्याच्या दृष्टीनें व जीवन सुखी होण्याच्या दृष्टीनें आपण योग्य ते न्याय्य प्रयत्न करीत असतांना त्या प्रयत्नाला दैवी अधिष्ठान लाभावें म्हणून या कनकधारास्तोत्रानें श्रीमहालक्ष्मीची स्तुति अवश्य करावी. या स्तोत्राची पीठिका सुबोधस्तोत्र-

संग्रह भाग पहिला यातील आचार्यांच्या संक्षिप्त चरित्रांत पान ५२ व ५३ अवश्य पहावी.]

अङ्गं हरेः पुलकभूषणमाश्रयन्ती
भृङ्गाङ्गनेव मुकुलाभरणं तमालम् ।
अङ्गीकृताखिल-विभूतिरपाङ्ग-लीला
माङ्गल्यदाऽस्तु मम मङ्गल-देवतायाः ॥ १ ॥

" मङ्गलदेवताया अपाङ्गलीला मम माङ्गल्यदा अस्तु । " श्रीमहालक्ष्मी ही मूर्तिमंत मंगल देवताच आहे. जिच्या भजनानें भक्तजनांचें मंगल होतें ती मंगल देवताच समजावी. मंगल शब्दाचा अर्थ सुख किंवा कल्याण असा आहे. सर्व प्रकारचें सुख आणि सर्व प्रकारची समृद्धि ही श्रीमहालक्ष्मीच्याच कृपेनें प्राप्त होत असते. सर्व मंगल पदार्थांच्या ठिकाणीं लोकांना सुखी करण्याचें किंवा आनंद देण्याचें जें सामर्थ्य आहे तें तिच्याचमुळें आहे. म्हणूनच तिला " सर्व मङ्गलमाङ्गल्या " असें म्हटलेलें आहे. ती भक्तजनांचें सकल मनोरथ पूर्ण करणारी असल्यामुळें तिला 'सर्वार्थसाधिका' असेंहि म्हटलेलें आहे. अशी जी मंगल देवता महालक्ष्मी तिची अपांगलीला म्हणजे कृपाकटाक्षांची क्रीडा जेथें होत असेल तेथें तिच्या कृपादृष्टीनेंच भक्तजनांकडून सर्व वैभवाचा अंगीकार केल्यासारखाच होतो. तात्पर्य, श्रीमहालक्ष्मीच्याच कृपादृष्टीनें सर्व वैभवाचा लाभ होऊं शकतो. श्रीलक्ष्मीदेवीच्या कृपाकटाक्षाचें मी काय वर्णन करूं? ती कटाक्षलीला जेव्हां श्रीहरीच्या देहाचा आश्रय करते तेव्हां श्रीहरीचा देह रोमांचानें भूषित होतो. श्रीहरीचा देह पुलकित होतो. श्रीहरीच्या अंगावरील ते रोमांच भूषणासारखे सुंदर दिसतात. नीलवर्णाच्या कळ्यांनीं भूषित असलेल्या तमाल वृक्षावर जशा 'भृङ्गाङ्गना' म्हणजे भुंगे बसावेत त्याचप्रमाणें लक्ष्मीच्या कटाक्षांनीं पुलकित झालेला श्रीहरीचा देह शोभत आहे. सर्व वैभवांनीं संपन्न असलेली ती लक्ष्मीची कृपाकटाक्षलीला मला सर्वकाल मंगलदायक होवो, अशी माझी नम्र प्रार्थना आहे.

मुग्धा मुहुर्विदधती वदने मुरारेः
प्रेम-त्रपा-प्रणिहितानि गतागतानि ।

माला दृशोर्मधुकरीव महोत्पले या
सा मे श्रियं दिशतु सागर-सम्भवायाः ॥ २ ॥

" सागरसम्भवायाः सा दृशोः माला मे श्रियं दिशतु " श्रीमहालक्ष्मी ही सागरापासून आविर्भूत झालेली आहे म्हणून तिला सागरसंभवा असें म्हटलेलें आहे. तिची ती कृपापूर्ण दृष्टींची माला अर्थात् कृपापूर्ण दृष्टीनें पुनःपुन्हां अवलोकन करणें, " मे श्रियं दिशतु " म्हणजे मला समृद्ध करो. तिची ती दृष्टि मला चतुर्विध पुरुषार्थांनीं संपन्न करो. श्रीलक्ष्मीची दृष्टि कशी आहे पहा : एखाद्या विकसित झालेल्या सहस्रदल कमलाकडे पुष्परसाला मुग्ध झालेली भ्रमरांची मालिका जशी जा-ये करीत असावी त्याप्रमाणें ही लक्ष्मीची दृष्टि, मुरारि म्हणजे भगवान् श्रीविष्णु यांच्या सौंदर्यानें मुग्ध होऊन प्रेम आणि लज्जा यांनीं युक्त झाली आहे व ती सारखी श्रीहरीच्या मुखाकडे ये-जा करीत आहे. मुग्ध शब्दाचा अर्थ सुंदर, रम्य असाहि आहे. तात्पर्य, एखाद्या विकसित झालेल्या मोठ्या कमलाकडे भ्रमरांची माला जशी आकृष्ट व्हावी, त्याचप्रमाणें प्रेम आणि लज्जा यांनीं परिपूर्ण असलेली श्रीलक्ष्मीची रम्य दृष्टि श्रीहरीच्या मुखकमलाकडे आकृष्ट होऊन पुनःपुन्हां ये-जा करीत आहे. श्रीहरीच्या मुखकमलाचें ती पुनःपुन्हां अवलोकन करीत आहे. तो दृष्टि माझे सकल मनोरथ पूर्ण करो.

विश्वामरेन्द्र-पद-विभ्रम-दान-दक्ष-
मानन्द-हेतुरधिकं मुर-विद्विषोऽपि ।
ईषन्निषीदतु मयि क्षणमीक्षणार्ध-
मिन्दीवरोदर-सहोदरमिन्दिरायाः ॥ ३ ॥

" इन्दिरायाः इन्दीवरोदरसहोदरं ईक्षणार्धं मयि ईषत् क्षणं निषीदतु " इंदिरा म्हणजे लक्ष्मी इद् इन्द् धातूचा अर्थ ऐश्वर्यसंपन्न असणें असा आहे. ती स्वतः तर ऐश्वर्यसंपन्न आहेच, पण भक्तांनाहि विपुल ऐश्वर्य देते म्हणून तिला इंदिरा असें म्हणतात. लक्ष्मीचें तें कमलाच्या कोशाप्रमाणें अत्यंत कोमल, स्निग्ध आणि आरक्तवर्ण असलेलें ईक्षणार्ध म्हणजे अर्धोन्मीलित दृष्टीनें पहाणें अर्थात् किंचित् डोळे उघडून पहाणें, मिस्किलपणानें अवलोकन करणें हें माझ्या ठिकाणीं थोडेसें क्षणभर राहो. तात्पर्य, तिनें अगदीं थोडेसे डोळे उघडून क्षणभर माझ्याकडे

पहावें. तिच्या त्या पहाण्याचा काय महिमा आहे पहा. साऱ्या विश्वाला अमरेंद्र-पदाचा -- इंद्राच्या वैभवाचा विभ्रम म्हणजे विलास अथवा शोभा आणि सौंदर्य यांचें दान करण्यास तिचें तें कृपायुक्त दृष्टीनें पहाणें अत्यंत दक्ष म्हणजे तत्पर आहे, समर्थ आहे. सर्व विश्वाच्या आनंदाला तें कारण आहे. श्रीलक्ष्मीदेवीच्या कृपाकटाक्षाच्या लेशानेंच सर्व विश्व आनंदी आहे. विशेषेंकरून मुरारिपु भगवान् विष्णु यांच्या आनंदाला तर तें अधिकच वाढवीत असतें. तात्पर्य, श्रीलक्ष्मीदेवीनें किंचित् नेत्र उघडून कृपापूर्ण दृष्टीनें माझ्याकडे पहावें हीच माझी प्रार्थना आहे.

आमीलिताक्षमधिगम्य मुदा मुकुन्द-
मानन्द-कन्दमनिमेषमनङ्गतन्त्रम् ।
आकेकर-स्थित-कनीनिक-पक्ष्म-नेत्रं
भूत्यै भवेन्मम भुजङ्ग-शयाङ्गनायाः ॥ ४ ॥

"भुजङ्गशयाङ्गनायाः आकेकरस्थितकनीनिकपक्ष्मनेत्रं मम भूत्यै भवेत्" भुजंगशय म्हणजे भगवान् श्रीविष्णु, त्यांची अंगना म्हणजे पत्नी असलेली जी महालक्ष्मी तिची दृष्टि, कनीनिक म्हणजे दृष्टिमंडल आणि पक्ष्म म्हणजे पापण्या, ज्याच्यामधील 'आकेकरस्थित' म्हणजे अर्धवट उघड्या असलेल्या स्थितींत आहेत, अथवा किंचित् वक्र अवस्थेंत आहेत असा जो श्रीलक्ष्मीचा नेत्र म्हणजे डोळा अर्थात् तिची कृपापूर्ण दृष्टि, ही मला अपेक्षित असलेल्या ऐश्वर्याला कारणीभूत होवो. कशी आहे लक्ष्मीची दृष्टि तें पहा : आनन्दकन्द भगवान् मुकुन्द हे शेषशय्येवर झोंपलेले आहेत आणि त्यांचा डोळा लागलेला आहे, असें पाहून त्यांच्या सौंदर्य, लावण्य इत्यादि गुणांना लुब्ध झालेल्या लक्ष्मीला जो आनंद झाला, त्या आनंदाच्या भरांत तिचे डोळे 'अनिमेष' झाले. अर्थात् पापण्यांची उघडझाप बंद झाली व ती सारखी अर्ध्या-मुर्ध्या उघड्या डोळ्यांनीं विष्णूकडे पाहूं लागली. तिची दृष्टि क्षणभर "अनङ्गतन्त्र" म्हणजे श्रीहरीविषयीं अन्तःकरणांत आविर्भूत झालेल्या कामदेवाच्या अधीन झाली. ती श्रीहरीच्या ठिकाणीं निश्चलपणें आसक्त झालेली लक्ष्मीची दृष्टि माझ्या ऐश्वर्याला कारणीभूत होवो. ती मला ऐश्वर्यसंपन्न करो.

बाह्वन्तरे मधुजितः श्रितकौस्तुभे या
हारावलीव हरि-नील-मयी विभाति ।

कामप्रदा भगवतोऽपि कटाक्ष-माला
कल्याणमावहतु मे कमलालयायाः ॥ ५ ॥

" कमलालयायाः कटाक्षमाला मे कल्याणं आवहतु " लक्ष्मीचें वास्तव्य नेहमीं कमलामध्यें असतें म्हणून तिला 'कमलालया' असें म्हणतात. कमलालया म्हणजे महालक्ष्मी. तिच्या कृपाकटाक्षांची मालिका माझें कल्याण करो. कशी आहे ती श्रीलक्ष्मीची कृपाकटाक्षमाला तें पहा : श्रीहरीच्या गळ्यामध्यें कौस्तुभ-मणि आहे. त्या कौस्तुभ रत्नाची हिरवी कांति श्रीहरीच्या दोन्ही बाहूंच्या मध्यभागीं वक्षःस्थलावर पसरलेली आहे. श्रीहरीनें मधु नांवाच्या दैत्याचा वध केलेला असल्यामुळें त्याला मधुजित् असें म्हटलेलें आहे. मधुरिपूच्या वक्षःस्थलाशीं संलग्न झालेली लक्ष्मीची कटाक्षमाला, तिच्या नीलवर्ण असलेल्या दृष्टिमंडलांतून बाहेर पडत असल्यामुळें, तीहि नीलवर्णच दिसत आहे. त्यामुळें जणुं कांहीं स्वभावतः स्वच्छ आणि आरक्तवर्ण असलेली श्रीहरीच्या गळ्यांतील मौक्तिकमाला कांहीं हिरवी आणि निळी दिसत आहे. भगवान् श्रीहरि हे स्वतः षड्गुणैश्वर्यसंपन्न असले तरी श्रीलक्ष्मी देवीची कृपा-दृष्टीच त्यांचे सकल मनोरथ पूर्ण करते ! ती श्रीलक्ष्मीची कृपादृष्टीच माझें कल्याण करो, हीच माझी प्रार्थना आहे.

कालाम्बुदालि-ललितोरसि कैटभारे-
र्धाराधरे स्फुरति या तडिदङ्गनेव ।
मातुः समस्तजगतां महनीयमूर्ति-
र्भद्राणि मे दिशतु भार्गव-नन्दनायाः ॥ ६ ॥

" समस्तजगतां मातुः भार्गवनन्दनायाः (सा) महनीयमूर्तिः मे भद्राणि दिशतु " समस्त विश्वाची माता आणि भृगुमहर्षींची कन्या अशी जी महालक्ष्मी तिची ती परमरमणीय आणि अत्यंत श्रेष्ठ असलेली मूर्ति माझें कल्याण करो. कशी आहे ती लक्ष्मीची मूर्ति तें पहा : मधुदैत्याचा श्रीविष्णूनें जसा वध केला तसाच कैटभ नांवाच्या दैत्याचाहि वध केलेला असल्यामुळें, श्रीविष्णूला कैटभारि असेंहि म्हणतात. कैटभारि म्हणजे भगवान महाविष्णु. त्यांच्या काळ्या मेघांच्या समुदायाप्रमाणें सुंदर दिसणाऱ्या वक्षःस्थलीं श्रीलक्ष्मीची मूर्ति ही मेघमंडलामध्यें

जशी विद्युल्लता शोभावी, विद्युत्‌रूपी अंगना म्हणजे स्त्री जशी मेघाच्या सान्निध्यांत शोभावी, त्याचप्रमाणें श्रीविष्णूच्या सान्निध्यांत श्रीलक्ष्मीची मूर्ति शोभत आहे. ती आमचें सर्वप्रकारें कल्याण करो.

प्राप्तं पदं प्रथमतः खलु यत्प्रभावा-
न्माङ्गल्यभाजि मधुमाथिनि मन्मथेन ।
मय्यापतेत्तदिह मन्थरमीक्षणार्धं
मन्दालसं च मकरालय-कन्यकायाः ॥ ७ ॥

"मकरालयकन्यकायाः मन्दालसं मन्थरं ईक्षणार्धं इह मयि आपतेत्" मकरालय म्हणजे सागर, त्याची कन्या. सुसरी-मगरीसारखे महाभयंकर आणि प्रचंड जलचर सागरामध्यें वास्तव्य करतात, म्हणून सागरास मकरालय म्हटलेलें आहे. देव आणि दैत्य यांनीं अमृताच्या प्राप्तीकरितां सागराचें मंथन केलें असतां, त्यातून जीं अनेक रत्नें निघालीं त्यांतच लक्ष्मीचाहि अंतर्भाव आहे. म्हणून लक्ष्मीला सागरकन्या असें म्हणतात. सागरकन्या असलेली श्रीलक्ष्मी, तिची मन्द म्हणजे मृदु अथवा सौम्य आणि अलस म्हणजे सावकाशपणें अवलोकनाचें कार्य करणारी, तसेंच मन्थर म्हणजे किंचित् वक्रस्वरूपाची अथवा गंभीर असलेली कृपापूर्ण दृष्टि, तीहि डोळ्याची अर्धवट उघडझाप होत असलेल्या स्वरूपातली. आचार्य म्हणतात, ती लक्ष्मीची अर्धोन्मीलित कृपादृष्टि मला याच लोकीं व याच जन्मांत लाभो अशी माझी इच्छा आहे. लक्ष्मीच्या कृपादृष्टीच्या प्रभावानेंच सर्व मंगलांचें अधिष्ठान असलेल्या श्रीहरीच्या ठिकाणीं कामदेवानें प्रथमच स्थान प्राप्त करून घेतलें ! रुक्मिणीच्या उदरीं श्रीकृष्णापासून कामदेव प्रद्युम्नाच्या रूपानें अवतरला ही कथा प्रसिद्धच आहे.

दद्याद्दयानुपवनो द्रविणाम्बुधारा -
मस्मिन्नकिञ्चनविहंगशिशौ विषण्णे ।
दुष्कर्म-घर्ममपनीय चिराय दूरं
नारायण-प्रणयिनी-नयनाम्बुवाहः ॥ ८ ॥

"दयानुपवनः नारायणप्रणयिनीनयनाम्बुवाहः दुष्कर्मघर्मं दूरं अपनीय अस्मिन् विषण्णे अकिञ्चनविहंगशिशौ द्रविणाम्बुधारां चिराय दद्यात्" हे दयानिधे

जगज्जननी महालक्ष्मी ! तूं नारायण-प्रणयिनी म्हणजे आदिनारायण भगवान् श्रीविष्णु यांच्या ठिकाणीं अनन्यप्रेम करणारी आहेस. त्यांची तूं प्रिय पत्नी आहेस. तुझे नेत्र हा एक भक्तजनांवर कल्याणाची वृष्टि करणारा मेघच आहे. तुझी दया हाच त्याचा अनुकूल वारा होय. तूं ज्याच्यावर दया करशील त्याच्यावरच तो तुझा कृपादृष्टिरूपी मेघ वळेल ! आई ! या दुष्कर्मरूपी उन्हाळ्यानें मी अगदीं पीडित झालों आहें. या उन्हाळ्याला कायमचें दूर करून, तुझा तो कृपादृष्टिरूपी मेघ या अकिंचन म्हणजे दरिद्री आणि असहाय असलेल्या, त्याचप्रमाणें अत्यंत विषण्ण म्हणजे खिन्न दुःखी असलेल्या "विहंगम-शिशु" म्हणजे चातक पक्ष्याच्या पिलाप्रमाणें असलेल्या या बालकावर "द्रविण" म्हणजे सोनें आणि हिरे-माणकें हेंच कोणी जल, त्या जलधारांची वृष्टि करो, हीच माझी प्रार्थना आहे. आचार्यांना स्वतःकरितां कांहीं सोन्या-नाण्यांची आवश्यकता नव्हती. पण या गरीब ब्राह्मणाच्या घरच्या दारिद्र्याचा परिहार व्हावा, म्हणूनच आचार्यांनीं ही श्रीलक्ष्मीदेवीची प्रार्थना केलेली आहे.

इष्टाविशिष्टमतयोऽपि यया दयार्द्र-
दृष्ट्या त्रिविष्टप-पदं सुलभं लभन्ते ।
दृष्टिः प्रहृष्ट-कमलोदर-दीप्तिरिष्टां
पुष्टिं कृषीष्ट मम पुष्कर-विष्टरायाः ॥ ९ ॥

"पुष्करविष्टरायाः दृष्टिः मम इष्टां पुष्टिं कृषीष्ट" पुष्कर म्हणजे कमल हेंच जिचें विष्टर म्हणजे आसन आहे ती पुष्करविष्टरा अर्थात् कमलासना श्रीमहालक्ष्मी, तिची कृपापूर्ण दृष्टि माझें पोषण करो. ती मला इष्ट असलेली पुष्टि प्राप्त करून देवो. कशी आहे ती लक्ष्मीची दृष्टि तें पहा : "प्रहृष्टकमलोदरदीप्तिः" प्रहृष्ट म्हणजे प्रफुल्लित अर्थात् विकसित झालेल्या कमलांतील कोशाप्रमाणें, आंतल्या भागाप्रमाणें त्या दृष्टीची कांति अत्यंत कोमल आणि आरक्त आहे. त्याचप्रमाणें त्या दयार्द्र दृष्टीचा ज्यांना लाभ झाला, ते तुझे इष्ट म्हणजे भक्त असलेले लोक "अविशिष्टमति" म्हणजे सामान्य बुद्धीचे असले तरी ते तुझ्या दयार्द्र दृष्टीनें सहजच "त्रिविष्टपपदाला" अर्थात् स्वर्गीय अनुपम सुखाला मिळवितात. त्यांना अलौकिक सुखाचा लाभ होतो. आई ! तुझी ती कृपादृष्टि आम्हांला इष्ट असलेल्या सुखाचा लाभ करून देवो, हीच माझी प्रार्थना आहे.

गीर्देवतेति गरुडध्वज-सुन्दरीति
शाकम्भरीति शशिशेखर-वल्लभेति ।
सृष्टि-स्थिति-प्रलय-केलिषु संस्थितायै
तस्यै नमस्त्रिभुवनैकगुरोस्तरुण्यै ॥ १० ॥

" तस्यै त्रिभुवनैकगुरोः तरुण्यै नमः अस्तु " साऱ्या त्रैलोक्याचे मुख्य गुरु भगवान् श्रीमहाविष्णु यांच्या सान्निध्यांत विराजमान असलेली 'तरुणी' कोमलांगी श्रीदेवी महालक्ष्मी तिला माझा नमस्कार असो. कशी आहे ती महालक्ष्मी तें पहा : ती समस्त वाक्प्रपंचाची अधिष्ठात्री असल्यामुळें तिला गीर्देवता म्हणजे वाग्देवता असें म्हणतात. याच अभिप्रायानें " महाविद्या महावाणी भारती वाक् सरस्वती " असें प्राधानिक रहस्यामध्यें तिचें वर्णन केलेलें आहे. महाविद्या म्हणजे ब्रह्मविद्या, महावाणी म्हणजे परा वाक् अथवा शास्त्रीय व्यवहाराला कारणीभूत असलेला शब्द-शब्दप्रपंच. भारती म्हणजे सर्वसामान्य व्यवहाराला कारणीभूत असलेला शब्द-प्रपंच. तसेंच वाक् म्हणजे अक्षरप्रपंच आणि सरस्वती म्हणजे या सर्वांची अधिष्ठात्री देवता. ती महालक्ष्मीच होय. तिलाच 'गरुडध्वजसुंदरी' असें म्हणतात. गरुडध्वज म्हणजे भगवान् श्रीविष्णु. त्यांची ती सुंदरी म्हणजे प्रिय पत्नी आहे. याच अभिप्रायानें तिला गरुडवाहना, वैष्णवी, नारायणी असेंहि म्हणतात. शाकंभरी हेंहि पण तिचेंच नांव आहे. " शाकैर्बिभर्ति इति शाकम्भरी " एकदां दीर्घकाळ प्रचंड दुष्काळ पडला असतां अनेक ऋषींनीं एकत्र होऊन तिची प्रार्थना केली. तेव्हां तिनें शताक्षी, सहस्राक्षी, अनंताक्षी होऊन आपल्या कृपापूर्ण दृष्टीनें विपुल वृष्टि केली. धरणी सुजला आणि सुफला झाली. सस्यशाकांनीं समृद्ध झाली. तिनें ऋषिजनांचें शाकपाकानें आतिथ्य केलें. ऋषिजन संतुष्ट झाले. सर्व देश तृप्त झाला ! तेव्हांपासून लोक तिला शाकंभरी म्हणूं लागले. शाकंभरीच्या उपासनेनें दुर्भिक्ष टळतें. श्रीमहालक्ष्मी हीच पार्वतीच्या रूपानें नटलेली असल्यामुळें, तिला शशिशेखरवल्लभा असें म्हटलेलें आहे. शंकरांनीं आपल्या जटाजूटामध्यें चंद्र धारण केलेला असल्यामुळें, त्यांना शशिशेखर — चंद्रशेखर असें म्हणतात. त्यांची ती प्राणवल्लभा आहे. विश्वाची उत्पत्ति, स्थिति आणि प्रलय या तिन्ही अवस्था जणुं कांहीं तिचा खेळच आहे. अशा या श्रीमहालक्ष्मीला माझा नमस्कार असो.

श्रुत्यै नमोऽस्तु शुभकर्म-फल-प्रसूत्यै
रत्यै नमोऽस्तु रमणीय-गुणार्णवायै ।
शक्त्यै नमोऽस्तु शतपत्र-निकेतनायै
पुष्ट्यै नमोऽस्तु पुरुषोत्तम-वल्लभायै ॥ ११ ॥

हे माते महालक्ष्मी ! तुला माझा नमस्कार असो. तूं श्रुति म्हणजे वेदस्वरूप आहेस. याच अभिप्रायानें " विद्याः समस्तास्तव देवि भेदाः " वेदादि समस्त विद्या हीं तुझींच रूपें आहेत (सप्तशती अ. ११). त्याचप्रमाणें " देवि त्रयी भगवती " म्हणजे हे देवी परमपूज्य असलेली त्रयी म्हणजे वेदविद्या ही तूंच आहेस, असेंहि म्हटलेलें आहे. (सप्तशती अध्याय चौथा पहा.) हे आई ! शुभकर्मांचीं फळें देणारी तूंच आहेस. हें एक उदाहरणमात्र आहे. मानवांना त्यांच्या सर्व कर्मांचीं फळें आदिमाता महालक्ष्मीच देत असते. तिला माझा नमस्कार असो. आई ! तूं रमणीय गुणांचा महासागर आहेस. तूं 'रति' म्हणजे निरतिशय आनंदस्वरूप आहेस. अथवा शुद्ध, निरपेक्ष, प्रेमस्वरूप आहेस. तुला माझा नमस्कार असो.

आई लक्ष्मी ! शतपत्र म्हणजे कमल हें तुझें निकेतन म्हणजे वास्तव्य करण्याचें स्थान आहे. तूं सर्व विश्वाची शक्ति आहेस, याच अभिप्रायानें " देव्या यया ततमिदं जगदात्मशक्त्या निःशेषदेवगणशक्तिसमूहमूर्त्या " (सप्तशती अ. ४) जिनें स्वतःच्या शक्तीनें हें सर्व विश्व व्यापून टाकलेलें आहे; अखिल देवसमुदायामध्यें शक्तिसमूहाच्या रूपानें तींच वास्तव्य करीत आहे; शक्ति म्हणजे तेज, सार किंवा बल. हे आई ! हें सर्व कांहीं तूंच आहेस. " या देवी सर्वभूतेषु शक्तिरूपेण संस्थिता " असें तुझें वर्णन केलेलें आहे. पुरुषोत्तम म्हणजे भगवान् आदिविष्णु, त्यांची तूं वल्लभा म्हणजे परमप्रिय आहेस. या सर्व विश्वाचीतुष्टि-पुष्टि सर्व कांहीं तूंच आहेस. तुला माझा नमस्कार असो.

नमोऽस्तु नालीक-निभाननायै
नमोऽस्तु दुग्धोदधि-जन्मभूम्यै ।
नमोऽस्तु सोमामृत-सोदरायै
नमोऽस्तु नारायण-वल्लभायै ॥ १२ ॥

हे आई जगन्माते महालक्ष्मी ! नालीक म्हणजे कमळ. कमळाचा देठ नळीसारखा पोकळ असतो, म्हणून कमळाला नालीक म्हटलें जातें. कमळाप्रमाणें तुझें मुख कोमल आणि आरक्तवर्ण आहे. आई ! तुला माझा नमस्कार असो. आई ! तुझ्या ऐश्वर्याची गणना कोण करूं शकेल ? क्षीरसागर ही तुझी जन्मभूमि आहे. रत्नाकर हा तुझा पिता आहे. मी तुला नमस्कार करतों. सोम म्हणजे चंद्र आणि हें प्रसिद्ध असलेलें अमृत हीं तुझीं भावंडें आहेत. माझा तुला नमस्कार असो. आई लक्ष्मी ! तूं नारायणाची वल्लभा म्हणजे परमप्रिय आहेस. तुलाहि पण नारायणी म्हणतात. "त्वं वैष्णवी शक्तिरनन्तवीर्या" (सप्तशती अ. ११) इत्यादि श्लोकांनीं तुझा अपारमहिमा वर्णन करण्याचा प्रयत्न देवांनीं केलेला आहे. हे जगदंबे महालक्ष्मी ! माझा तुला नमस्कार असो. मी भक्तिपूर्वक तुला नमस्कार करीत आहें. माझे मनोरथ पूर्ण कर.

संपत्करााणि सकलेन्द्रिय-नन्दनानि
साम्राज्य-दान-विभवानि सरोरुहाक्षि ।
त्वद्वन्दनानि दुरिताहरणोद्यतानि
मामेव मातरनिशं कलयन्तु मान्ये ॥ १३ ॥

"हे मातः त्वद्वन्दनानि एव मां। कलयन्तु अन्ये मा" आई ! तुझ्या चरणीं निरंतर वंदन करण्याची प्रवृत्ति माझ्या ठिकाणीं असावी. मला दुसरें कांहीं नको. तुझ्या वंदन-भक्तीचाच छंद मला लागू दे. मला इतर कांहीं नको. आई महालक्ष्मी ! तुझ्या चरणीं केल्या जाणाऱ्या वंदनाचा केवढा प्रभाव आहे ! पहा : तुझी वंदनें भक्ताला सर्व प्रकारच्या संपत्तीचा लाभ करून देतात. सर्व इंद्रियांना त्याच्यापासून आनंद वाटतो. हे कमलाक्षी माते ! अनन्यचित्तानें तुझ्या चरणीं केलीं जाणारीं वंदनें हीं भक्तजनांना साम्राज्य-वैभवाचेंहि दान करण्यास समर्थ आहेत. त्याचप्रमाणें भक्तजनांच्या सकल दुरितांचें निर्हरण करण्यासहि तुझ्या चरणीं भक्तिभावानें केली जाणारीं वंदनें अत्यंत तत्पर आहेत. सर्व दुरितांमध्यें अज्ञान हेंच मोठें दुरित आहे. आई ! जे तुझ्या चरणीं अनन्यभावानें नम्र झाले त्यांचें अज्ञानहि पार मावळतें. तुझ्या कृपेनें भक्तांच्या अंतःकरणांत ज्ञानरवीचा उदय होतो व ते भक्त नित्य निरतिशय आनंदांत रमतात. याच अभिप्रायानें इंद्रादि देवांनीं देखील "तामम्बिकामखिल-

देवमहर्षिपूज्यां भक्त्या नताः स्म विदधातु शुभानि सा नः ।" अखिल देव आणि महर्षि यांनाहि पूज्य असलेली ती अंबिका जगन्माता, तिच्या चरणीं आम्ही भक्तिभावाने प्रणाम करीत आहोंत. ती आमचें कल्याण करो. अशी सप्तशतीच्या चौथ्या अध्यायांत सर्व देवांनीं तुझी प्रार्थना केलेली आहे. सप्तशतीच्या मध्यम-चरित्राची अधिष्ठात्री देवता श्रीमहालक्ष्मीच आहे.

यत्कटाक्ष-समुपासना-विधिः
सेवकस्य सकलार्थ-सम्पदः ।
संतनोति वचनाङ्ग-मानसै-
स्त्वां मुरारि-हृदयेश्वरीं भजे ॥ १४ ॥

आई जगज्जननी ! तुझ्या कृपाकटाक्षाची अर्थात् तुझ्या कृपाकटाक्षाचा लाभ व्हावा म्हणून, प्रत्यक्ष तुझीच अत्यंत उत्तमरीतीनें विधिपूर्वक केली जाणारी उपासना, ही सेवकाच्या सकलमनोरथांना पूर्ण करते. सेवकाला अभीष्ट असलेल्या सर्व संपत्तींचा – सर्व वैभवाचा ती लाभ करून देते. "संतनोति" अभीष्ट वैभवाचा ती सतत विस्तार करते, असा तुझ्या उपासनेचा महिमा आहे. आई महालक्ष्मी ! तूं मुरारि म्हणजे भगवान् श्रीहरि यांची हृदयेश्वरी आहेस. त्यांची तूं परमप्रिय प्राणवल्लभा आहेस. माते ! मी तुझी कायावाचामनेंकरून भक्ति करीत आहें. मी तुला शरण आलों आहें. माझ्यावर कृपा कर.

सरसिज-निलये सरोज-हस्ते
धवलतमांशुक-गन्ध-माल्य-शोभे ।
भगवति हरिवल्लभे मनोज्ञे
त्रिभुवन-भूति-करि प्रसीद मह्यम् ॥ १५ ॥

" हे भगवति मह्यं प्रसीद " हे सर्वैश्वर्यसंपन्न माते ! माझ्यावर प्रसन्न हो. तूं त्रिभुवनांचें कल्याण करणारी आहेस. तूं श्रीहरि भगवान् विष्णु यांची वल्लभा म्हणजे परमप्रिय आहेस. अत्यंत आवडती आहेस. तूं मोठी मनोज्ञ म्हणजे रम्य – सुंदर आहेस. भक्तजनांच्या मनांतील अभिलषित जाणणारी आहेस. हे आई महालक्ष्मी ! सरसिज म्हणजे कमळ हें तुझें निलय म्हणजे वसतिस्थान आहे. तूं स्वतः 'सरोजहस्ता' म्हणजे आपल्या हातांत कमल धारण केलेलें

आहेस. कमलावर अधिष्ठित होऊन आणि कमल हातांत घेऊन जणुं कांहीं तूं आपलें हृदय कमलासारखें कोमल आणि सरस आहे हेंच सूचित करीत आहेस. आई ! तुझ्या अंगावरील वस्त्र हें 'धवलतम' म्हणजे अत्यंत निर्मल पांढरें स्वच्छ दिसत आहे. त्याचप्रमाणें शुभ्र चंदनाची उटी लावलेली आहे. शुभ्र फुलांच्या माळा गळ्यांत घातलेल्या आहेस. तूं स्वतः गौरवर्ण आहेस. त्यांतच शुभ्र वस्त्र, शुभ्र गंध आणि शुभ्र माळा यांनीं तुझी शोभा अधिकच खुलून दिसत आहे. आई ! मी तुला नमस्कार करतों. तूं मला प्रसन्न हो.

दिग्घस्तिभिः कनक-कुम्भ-मुखावसृष्ट-
स्वर्वाहिनी-विमल-चारु-जल-प्लुताङ्गीम् ।
प्रातर्नमामि जगतां जननीमशेष-
लोकाधिनाथ-गृहिणीममृताब्धि-पुत्रीम् ॥ १६ ॥

हे माते महालक्ष्मी ! मी तुला भक्तिभावानें नमस्कार करीत आहें. "प्रातर्नमामि" या ठिकाणीं "मातर्नमामि" असाच पाठ असण्याची शक्यता आहे. प्रातः म्हणजे प्रभातकाळीं. आई ! कशी आहेस तूं ? हे पहा. हे चार दिग्गज तुझ्या भोंवतालीं उभे आहेत. त्यांनीं आपल्या सोंडेमध्यें चार सुवर्ण-कलश धारण केलेले आहेत. त्या सुवर्णकलशांतून त्यांनीं अत्यंत निर्मल आणि सुंदर असे स्वर्वाहिनीचें म्हणजे गंगेचें जल भरून आणलेलें आहे. ते चारीहि हत्ती एकसमयावच्छेदानें त्या गंगाजलानें सुवर्णकलशांच्या मुखांतून तुझ्यावर अभिषेक करीत आहेत. चारी बाजूंनीं आपल्या सोंडा वर करून, त्यांनीं तुझ्यावर अमृताची संतत धार धरलेली आहे. "जलप्लुताङ्गी" त्या जलानें तुझें सर्व अंग भिजलेलें दिसत आहे. आई ! तूं सर्व जगाची जननी आहेस. अशेष लोकांचे म्हणजे चौदा भुवनांचे अधिनायक जे भगवान् महाविष्णु त्यांची तूं गृहिणी म्हणजे गृहस्वामिनी आहेस. तूं क्षीरसागराची कन्या आहेस. आई ! तुला मी नमस्कार करतों. या श्लोकांत आचार्यांनीं श्रीमहालक्ष्मीला अशीं विशेषणें दिलीं आहेत कीं, त्यामुळें तिचें पितृकुल, पतिकुल आणि दिग्गजांकडून अमृतपूर्ण कलशांनीं सतत होत असलेल्या अभिषेकामुळें तिचा स्वतःसिद्ध अलौकिक महिमा, या सर्व गोष्टींवरून भक्तजनांचे सकल मनोरथ पूर्ण करण्याला तीच समर्थ आहे असेंहि ध्वनित केलेलें आहे. दिग्गजांकडून केल्या जाणाऱ्या अभिषेकामुळें ती जशी

बहिरंगानें आर्द्र झालेली आहे, त्याचप्रमाणें ती अंतरंगानेंहि पण अत्यंत दयार्द्र आहे हाहि भाव ध्वनित केलेला आहे. याच अभिप्रायानें " दारिद्र्यदुःखभयहारिणि का त्वदन्या सर्वोपकारकरणाय सदार्द्रचित्ता। " दारिद्र्यदुःखाच्या भयाचा परिहार करणारी तूं आई ! तुझ्याशिवाय या जगांत दुसरी कोण बरें सर्वांवर उपकार करण्याकरितां सदासर्वकाळ दयेनें आर्द्रचित्त असलेली दृष्टीस पडेल ? अर्थात् कोणीच नाहीं. तात्पर्य, तुझ्यासारखी दयाळू आणि सर्वांवर उपकार करणारी अशी तूंच आहेस, असें मार्कंडेय पुराणांतहि वर्णन केलेलें आहे.

कमले कमलाक्ष-वल्लभे त्वं
करुणा-पूर-तरङ्गितैरपाङ्गैः ।
अवलोकय मामकिञ्चनानां
प्रथमं पात्रमकृत्रिमं दयायाः ॥ १७ ॥

श्रीमहालक्ष्मी बहिरंगानें व अंतरंगानेंहि कमलाप्रमाणें सुकोमल असल्यामुळें तिला 'कमला' हेंच नांव देण्यांत आलेलें आहे. हे माते कमले ! तूं 'कमलाक्षवल्लभा' म्हणजे पुंडरीकाक्ष जो भगवान् महाविष्णु त्याची 'वल्लभा' म्हणजे अत्यंत आवडती आहेस. त्याची तूं प्रिय पत्नी आहेस. आई ! तुझ्या अंतःकरणांत करुणेचा महापूर येऊं दे. त्या पुरानें तुझी दृष्टि तरंगित होऊं दे. माझ्याविषयीं तुझी कृपापूर्ण दृष्टि हेलावूं दे ! आई ! मी 'प्रथम' म्हणजे दीन आणि अकिंचन असलेल्या लोकांचा प्रमुख आहें. मी सर्वस्वीं अकिंचन आहें. माझ्याकडे पहा ! मी तुझ्या दयेचें अकृत्रिम पात्र आहें. तुझ्या दयेचा वर्षाव माझ्यावर होऊं दे. आई ! मी तुला भक्तिभावानें वारंवार मी नमस्कार करीत आहें.

स्तुवन्ति ये स्तुतिभिरमूभिरन्वहं
त्रयीमयीं त्रिभुवनमातरं रमाम् ।
गुणाधिका गुरुतर-भाग्य-भाजिनो
भवन्ति ते भुवि बुध-भाविताशयाः ॥ १८ ॥

आचार्य या शेवटच्या श्लोकानें या स्तोत्राची फलश्रुति वर्णन करीत आहेत. या स्तोत्रांतील श्लोकांनीं जे कोणी रोजच्या रोज त्रिभुवनाची माता आणि वेदस्वरूप असलेल्या या महालक्ष्मीची स्तुति करतील ते खरोखर धन्य होतील.

ते सर्व गुणांनीं श्रेष्ठ होतील. "गुरुतरभाग्यभाजिनः" गुरुतर म्हणजे अत्यंत श्रेष्ठ अशा तऱ्हेचें जें भाग्य म्हणजे ऐश्वर्य, तें त्यांना लाभेल. ते मोठे भाग्यशाली होतील.

श्रीलक्ष्मीमन्त्रजपविधि

अस्य श्रीलक्ष्मीमन्त्रस्य भृगुर्ऋषिः निवृच्छन्दः श्रीलक्ष्मीर्देवता मम अभीष्टसिद्ध्यर्थं जपे विनियोगः। ॐ श्रां अङ्गुष्ठाभ्यां नमः। ॐ श्रीं तर्जनीभ्यां नमः। ॐ श्रूं मध्यमाभ्यां नमः। ॐ श्रैं अनामिकाभ्यां नमः। ॐ श्रौं कनिष्टिकाभ्यां नमः। ॐ श्रः करतलकरपृष्ठाभ्यां नमः। ॐ श्रां हृदयाय नमः। ॐ श्रीं शिरसे स्वाहा। ॐ श्रूं शिखायै वषट्। ॐ श्रैं कवचाय हुं। ॐ श्रौं नेत्रत्रयाय वौषट्। ॐ श्रः अस्त्राय फट्। ॐ भृगुऋषये नमः शिरसि। ॐ निवृच्छन्दसे नमो मुखे। ॐ श्रीलक्ष्मीदेवतायै नमः हृदये। ॐ अभीष्टसिद्ध्यर्थं जपे विनियोगाय नमः सर्वाङ्गेषु। अथ ध्यानम्।

कान्त्या काञ्चन-सन्निभां हिमगिरि-प्रख्यैश्चतुर्भिर्गजै-
र्हस्तोत्क्षिप्त-हिरण्मयामृत-घटैरासिच्यमानां श्रियम्।
बिभ्राणां वरमब्ज-युग्ममभयं हस्तैः किरीटोज्ज्वलां
क्षौमाबद्ध-नितम्बबिम्ब-लसितां वन्देऽरविन्द-स्थिताम्॥

याप्रमाणें ध्यान करून पूर्वी सांगितलेल्या पद्धतीनें श्रीलक्ष्मीदेवतायै नमः लं पृथिव्यात्मकं गन्धं परिकल्पयामि इत्यादि पंचमानसोपचारांनीं श्रीलक्ष्मीदेवीची पूजा करावी. मालाप्रोक्षण, नमस्कार, जप आणि विसर्जन त्याचप्रमाणें आरंभीं आचमन, प्राणायाम, देशकालसंकीर्तन आणि संकल्प हें सर्व पूर्वी सांगितलेल्या पद्धतीप्रमाणें करावें.

■ ■ ■

कल्याणवृष्टिस्तोत्रम्।

[कल्याणवृष्टि या शब्दानें या स्तोत्राचा आरंभ होत असल्यामुळें या स्तोत्राला कल्याणवृष्टिस्तोत्र असें नांव देण्यांत आलेलें आहे. भवानीभुजंगमस्तोत्रांत आणि देवीभुजंगमस्तोत्रांत आचार्यांनीं श्रीललितामहात्रिपुरसुंदरीचें तात्त्विक दृष्टीनें मनन करण्यास आणि उपासनेच्या दृष्टीनें नित्य पाठ करण्यास

उपयुक्त असें स्तवन केलें. आतां या स्तोत्रांत उपासनेच्याच दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें व मंत्राक्षरांनीं घटित असलेलें असें हें सोळा श्लोकांचें स्तोत्र आचार्य आपल्यापुढें ठेवीत आहेत. या स्तोत्राच्या पाठानें श्रीविद्येच्या मंत्राचाहि पाठ झाल्यासारखाच होतो. हा मंत्र फारच महत्त्वाचा आणि अत्यंत गुप्तित स्वरूपांतला असल्यामुळें प्रत्यक्ष अधिकारी अशा गुरूंच्या मुखांतून प्राप्त झाल्याशिवाय या मंत्राचें अनुष्ठान करणें श्रेयस्कर मानलें जात नाहीं. मंत्रशक्तीच्या दृष्टीनें व फलप्राप्तीच्या दृष्टीनें सांप्रदायिक सिद्धान्ताचें परिपालन करणें हें श्रेयस्करच असतें. जिज्ञासु साधकानें हा मंत्र अधिकारी अशा थोर व्यक्तीकडून अवश्य संपादन करावा. केवळ ग्रंथांतील अक्षरें वाचून या मंत्राचें ग्रहण करूं नये. हा मंत्र सांगणारे अधिकारी थोर पुरुष फार दुर्मिळ असतात, तथापि आपल्या अंतःकरणांत जर उत्कट तळमळ असेल तर जगद्गुरु भगवान् श्रीशंकर आणि जगज्जननी श्रीललितामहात्रिपुरसुंदरी हे आपली इच्छा पूर्ण केल्याशिवाय रहाणार नाहींत. अनेक भक्तांचा हा अनुभव आहे. आपणहि भक्त होऊन पहा.

हें आणि यापुढें दिलें जाणारें "मंत्रमातृकापुष्पमालास्तोत्र" हीं दोन्ही स्तोत्रें अत्यंत महत्त्वाचीं आहेत. त्यांतील प्रत्येक श्लोकाच्या पहिल्या चरणांतील पहिलें अक्षर हें क्रमशः मंत्रांतीलच अक्षर असल्यामुळें, या दोन्ही स्तोत्रांना कांहीं निराळेंच महत्त्व आलेलें आहे. पहिल्या स्तोत्रांत श्रीदेवीचें गुणवैभव वर्णिलेलें आहे, तर दुसऱ्या स्तोत्रांत श्रीदेवीची मोठ्या थाटानें मानसोपचार पूजा केलेली आहे. बाह्योपचार पूजेचें सामर्थ्य ज्यांना नाहीं त्यांनीं मंत्रमातृकापुष्पमाला स्तोत्रानें मानसपूजा अवश्य करावी. ही मानसोपचारपूजा बाह्योपचारपूजेपेक्षांहि अत्यंत श्रेष्ठ आहे, असा हा दोन्ही स्तोत्रांचा महिमा लक्षांत घेऊनच वाचकांनी हीं दोन्ही स्तोत्रें वाचावींत.]

कल्याण-वृष्टिभिरिवामृत-पूरिताभि-
र्लक्ष्मी-स्वयंवरण-मङ्गल-दीपिकाभिः ।
सेवाभिरम्ब तव पाद-सरोज-मूले
नाकारि किं मनसि भाग्यवतां जनानाम् ॥ १ ॥

हे आई त्रिपुरसुंदरी ! तुझ्या चरणकमलांच्या ठिकाणीं दृढ श्रद्धा ठेवून केल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या सेवा भाग्यवंत असलेल्या भक्तजनांच्या

अन्तःकरणांत काय काय वरें सुपरिणाम घडवून आणीत नाहींत ? अन्तःकरणांत घडून येणारे सर्व प्रकारचे सुपरिणाम हे माता त्रिपुरसुंदरीच्याच चरणकमलांच्या सेवेचे सुपरिणाम होत. जगज्जननीची सेवा म्हणजे लक्ष्मीनें अर्थात् भाग्यानें स्वतः येऊन वरावें म्हणून पाजळलेल्या मंगलमय मशालींच होत. महात्रिपुर-सुंदरीच्या सेवेनें जणुं कांहीं अमृतानें परिपूर्ण अशा सर्व प्रकारच्या सुखांची — मंगलांची उपासकावर वृष्टीच होत असते. तात्पर्य, आई ! तुझ्या सेवेचे सर्व परिणाम उत्तमच झालेले आहेत, असाच भक्तांचा अनुभव आहे. विद्यमान काळ व भविष्यकाळहि तुझ्या सेवेनें सुखाचा होतो.

एतावदेव जननि स्पृहणीयमास्ते
त्वद्वन्दनेषु सलिल-स्थगिते च नेत्रे ।
सान्निध्यमुद्यदरुणायुत-सोदरस्य
त्वद्विग्रहस्य परया सुधयाऽऽप्लुतस्य ॥ २ ॥

हे आई जगज्जननी ! मला नेहमीं तुझें वंदन घडावें. तुझें अवलोकन करीत असतांना नेत्र आनंदाश्रूंनीं भरून यावेत. उदयाला येणाऱ्या हजारों सूर्यांच्या समुदायाप्रमाणें ज्याची कांति अरुणवर्ण म्हणजे आरक्त आहे, अथवा उदयाला येणाऱ्या हजारों सूर्यांचा समुदाय हा ज्याचा सहोदर म्हणजे सख्खा बंधूच आहे असा तुझा देह, तो जणुं कांहीं अमृतानें ओथंबलेला आहे. आई ! तुझ्या त्या अरुणवर्ण आणि अमृतानें परिपूर्ण असलेल्या मंगलमय मूर्तीचें मला नित्य सान्निध्य असावें, हीच माझी मनीषा आहे.

ईशत्व-नाम-कलुषाः कति वा न सन्ति
ब्रह्मादयः प्रतिभवं प्रलयाभिभूताः ।
एकः स एव जननि स्थिरसिद्धिरास्ते
यः पादयोस्तव सकृत् प्रणतिं करोति ॥ ३ ॥

हे आई त्रिपुरसुंदरी ! आपल्या नांवाच्या मोठेपणाला कलुषित करणारे कोण कोण देव नाहींत ? ब्रह्मदेव, विष्णु इत्यादि सर्वच देव स्वतःला ईश म्हणवितात. ईश म्हणजे समर्थ. पण एकहि देव प्रलयकालापुढें आपलें पूर्ण सामर्थ्य प्रकट करूं शकत नाहीं. प्रलयकालानें त्या सर्वांचा अभिभव म्हणजे

पराभव केलेला आहे. प्रलयकालानें सर्व देव पराभूतच केलेले आहेत. हे आई जगज्जननी ! जो भक्त तुझ्या चरणीं एक वेळ का होईना पण श्रद्धेनें, भक्तीनें प्रणाम करतो तोच पूर्ण सिद्धीला प्राप्त होतो. त्याच्या ठिकाणीं सर्व सिद्धि चिरकाल वास्तव्य करतात.

लब्ध्वा सकृत् त्रिपुरसुन्दरि तावकीनं
कारुण्य-कन्दलित-कान्ति-भरं कटाक्षम् ।
कन्दर्प-कोटि-सुभगास्त्वयि भक्तिभाजः
सम्मोहयन्ति तरुणीर्भुवनत्रयेऽपि ॥ ४ ॥

हे आई त्रिपुरसुंदरी ! कारुण्यानें ओथंबलेल्या अशा तुझ्या तेजोमयः कृपा-कटाक्षाला एकदां जरी भक्तांनीं प्राप्त करून घेतलें, तरी ते भक्त कोटि-कोटि मदनांच्या सौंदर्यालाहि पराभूत करून अर्थात् कोट्यवधि मदनापेक्षांहि सुंदर दिसून त्रिभुवनामध्यें ते आपल्या अद्वितीय सौंदर्यानें तरुण आणि तरुणी जनांच्याहि अन्तःकरणांत मोह निर्माण करतात. अर्थात् सर्वांचे ते आवडते होतात. असा तुझ्या कृपादृष्टीचा प्रभाव आहे.

ह्रींकारमेव तव नाम गृणन्ति वेदा
मातस्त्रिकोण-निलय त्रिपुरे त्रिनेत्रे ।
त्वत्संस्मृतौ यम-भटाभिभवं विहाय
दीव्यन्ति नन्दन-वने सह लोकपालैः ॥ ५ ॥

आई त्रिपुरसुंदरी ! ज्ञानबीज असलेलें ह्रीं इत्याकारक अक्षर हेंच तुझें नांव आहे असें वेद म्हणतात. ह्रीं या बीजाक्षरानेंच ते तुझी स्तुति करतात. ॐ ह्रीं ॐ ह्रीं या शब्दांनीं उपनिषद तुझें वर्णन करीत आहे. याच अभिप्रायानें त्रिशतीमध्यें देखील "ह्रींकाररूपा ह्रींकारनिलया ह्रींपदप्रिया। ह्रींकारबीजा ह्रींकार-मन्त्रा ह्रींकारलक्षणा। ह्रींशीला ह्रींपदाराध्या" इत्यादि शब्दांनीं तुझें वर्णन केलेलें आहे. हे आई जगज्जननी ! श्रीचक्रांतील मध्यवर्ती त्रिकोण हें तुझें वसति-स्थान आहे. म्हणून तुला त्रिकोण-निलया असें म्हणतात. तूं तिन्ही पुरांची, नगरांची अर्थात् स्थूल, सूक्ष्म आणि कारण या तीन प्रकारच्या देहांची अधिष्ठात्री आहेस अथवा जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तीन अवस्थांची अथवा

सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांची अथवा विश्व, तैजस आणि प्राज्ञ या तिघांची अधिनायक आहेस. स्वर्ग, मृत्यु आणि पाताल अथवा भूर्लोक, भुवर्लोक आणि स्वर्लोक हीं तुझीं अधिष्ठानें आहेत. अथवा तुझ्या उपासना-मंत्रांतील वाग्भवकूट, कामराजकूट आणि शक्तिकूट हींच तुझीं तीन पुरें आहेत; म्हणूनच तुला त्रिपुरा, त्रिपुरेश्वरी अथवा त्रिपुरसुंदरी असें म्हणतात. आई ! तुला तीन नेत्र असल्यामुळें त्रिनेत्रा असेंहि म्हणतात. आई जगदंबे ! तुझें स्मरण केलें असतां यमदूत तुझ्या भक्ताकडे पाहूं शकत नाहींत. तुझे भक्त यमदूताकडून होणाऱ्या पराभवाला – छळाला टाळून नंदनवनामध्यें इंद्रादि लोकपालांसह आनंदानें क्रीडा करीत असतात. तुझ्या स्मरणाचा हा केवढा महिमा आहे !

हन्तुः पुरामधिगलं परिपीयमानः
क्रूरः कथं न भविता गरलस्य वेगः ।
नाश्वासनाय यदि मातरिदं तवार्धं
देहस्य शश्वदमृताप्लुत-शीतलस्य ॥ ६ ॥

हे आई त्रिपुरेश्वरी ! त्रिपुरासुराचा वध करणाऱ्या शंकरांना त्यांच्याकडून घटाघटा प्राशन केल्या जाणाऱ्या विषाचा वेग भयंकर तापदायक झाला नसता काय ? अवश्य झाला असता. पण तसा तो तापदायक झाला नाहीं. याचें कारण तूंच आहेस. अमृतानें ओथंबलेला आणि म्हणूनच अत्यंत शीतल असलेला मंगलमय – आनंदमय अशा तुझ्या मूर्तस्वरूपाचा – देहाचा अर्धा भाग हा जर समाधान देण्याकरितां त्यांना आधारभूत म्हणून लाभला नसता, तर तो भयंकर हालाहल विषाचा वेग त्यांनाहि अत्यंत क्रूर वाटला असता. पण तसा तो वाटला नाहीं याला कारण, त्यांना लाभलेलें केवळ तुझें सान्निध्य हेंच होय. आई ! केवढा तुझ्या सान्निध्याचा हा प्रभाव आहे !

सर्वज्ञतां सदसि वाक्पटुतां प्रसूते
देवि त्वदङ्घ्रि-सरसीरुहयोः प्रणामः ।
किं च स्फुरन्मुकुटमुज्ज्वलमातपत्रं
द्वे चामरे च महतीं वसुधां ददाति ॥ ७ ॥

हे आई जगन्माते ! तुझ्या चरणारविंदीं केलेला प्रणाम हा भक्ताला सर्वज्ञता देतो. त्याचप्रमाणें तो उत्तम वक्तृत्वहि देतो. अर्थात् तुझ्या चरणीं भक्तिपूर्वक प्रणाम केला असतां सर्वज्ञता प्राप्त होते आणि उत्तम वक्तृत्वहि मिळतें. तसेंच तुझ्या मस्तकीं झळकणारा मुकुट आणि चकाकणारें छत्र, त्याचप्रमाणें तीं दोन चामरें, चवऱ्या यांचें ध्यान केलें असतां त्या ध्यानानें पृथ्वीचा लाभ होतो. अर्थात् तुझें भक्तिपूर्वक ध्यान करणारा पृथ्वीपति होतो.

कल्पद्रुमैरभिमत-प्रतिपादनेषु
कारुण्य-वारिधिभिरम्ब भवत्कटाक्षैः ।
आलोकय त्रिपुरसुंदरि मामनाथं
त्वय्येव भक्ति-भरितं त्वयि बद्धतृष्णम् ॥ ८ ॥

आई त्रिपुरसुंदरी ! तुझे कृपाकटाक्ष हे कारुण्याचे सागर आहेत. भक्तजनांना अभीष्ट प्राप्त करून देण्याकरितां ते जणुं कांहीं कल्पवृक्षच आहेत. हे आई जगज्जननी ! मी अनाथ आहे. तूं माझ्याकडे त्या कृपापूर्ण आणि कल्पद्रुमाप्रमाणें सकल कामना पूर्ण करण्याला समर्थ असलेल्या कटाक्षांनीं पहा. तुझ्या ठिकाणीं असलेल्या भक्तीनें अर्थात् तुझ्याविषयींच असलेल्या प्रेमानें माझें अन्तःकरण पूर्ण भरलेलें आहे. आई ! तूंच माझा उद्धार करशील अशी आशा मी धारण केलेली आहे. तरी तूं ही माझी आशा पूर्ण कर.

हन्तेतरेष्वपि मनांसि निधाय चान्ये
भक्तिं वहन्ति किल पामर-दैवतेषु ।
त्वामेव देवि मनसा समनुस्मरामि
त्वामेव नौमि शरणं जननि त्वमेव ॥ ९ ॥

अरेरे ! आई ! खरोखर मला मोठा खेद वाटतो कीं, इतर लोक आपलें मन तुझ्याशिवाय सामान्य आणि असमर्थ अशा इतर दैवतांच्या ठिकाणीं संलग्न करून त्यांची भक्ति करतात. तीं बिचारीं दैवतें त्यांना काय देणार ? काय सामर्थ्य आहे त्यांच्या ठिकाणीं ? जो कांहीं सामर्थ्याचा लेश आहे, तोहि तुझ्याच कृपेनें त्यांना प्राप्त झालेला आहे. हे जगज्जननी देवी ! मी मात्र सतत मनानें तुझेंच चिंतन करीत आहें. मी तुझेंच मनःपूर्वक सारखें स्मरण करीत

आहें. तुझेंच मी स्तवन करीत आहें. आई ! तुलाच मी शरण आलों आहें. तूंच माझें रक्षण करणारी आहेस.

लक्ष्येषु सत्स्वपि कटाक्ष-निरीक्षणाना-
मालोकय त्रिपुरसुन्दरि मां कदाचित् ।
नूनं मया तु सदृशः करुणैक-पात्रं
जातो जनिष्यति जनो न च जायते वा ॥ १० ॥

श्रीसमर्थांनीं "उदंड भक्त तुम्हांला, आम्हांला कोण पूसतो ?" असें श्रीरामापुढें आपलें गाऱ्हाणें गाइलेलें आहे. भगवत्पूज्यपाद श्रीआचार्य देखील अशाच तऱ्हेची कुरकुर करीत जगज्जननी श्रीदेवीची प्रार्थना करीत आहेत. हे आई त्रिपुरसुंदरी ! तुला तुझ्या कृपाकटाक्षानें निरीक्षण करण्याला योग्य असें अनेक भक्त आहेत. तरी पण तूं मला विसरूं नकोस. वेळ नाहीं म्हणून माझी उपेक्षा करूं नकोस. केव्हां तरी आठवण ठेवून तूं माझ्याकडे पहा. आई जगज्जननी ! खरोखर माझ्यासारखा दया करण्याला योग्य असा अजून कोणी झाला नाहीं, पुढें होणार नाहीं आणि विद्यमान काळांतहि कोणी सांपडणार नाहीं. खरोखर तुझ्या करुणेला मीच एकमेव पात्र आहें.

ह्रीं ह्रीमिति प्रतिदिनं जपतां तवाख्यां
किं नाम दुर्लभमिह त्रिपुराधिवासे ।
माला-किरीट-मदवारण-माननीया
तान्सेवते वसुमती स्वयमेव लक्ष्मीः ॥ ११ ॥

हे आई त्रिपुरसुंदरी ! तूं समष्टि आणि व्यष्टिस्वरूप अर्थात् व्यक्तिशः आणि सर्व प्राणिसमूहांच्या स्थूल, सूक्ष्म आणि कारणरूपी तिन्ही देहांमध्यें — त्या देहांना नगरेंच समजून तेथें अधिवास करतेस. तेथें तूं रहातेस म्हणून तुला 'त्रिपुराधिवासा' त्रिपुरवासिनी असें म्हटलें जातें. आई ! तुझ्या मंत्रांतील तिन्ही कूटांच्या — तिन्ही विभागांच्या अंतीं असलेलें ह्रीं हें अक्षर तुझें अर्थात् तुझ्या मंत्राचें बीज आहे. तें तुझें नामच आहे. त्या तुझ्या नांवाचा जे कोणी रोजच्या रोज ह्रीं ह्रीं असा जप करीत रहातील त्यांना इहलोकांत अथवा या जन्मांत काय बरें दुर्लभ आहे ? मोत्यांचे हार, रत्नजडित मुकुट आणि मदनत्त

हत्ती यांनीं युक्त असलेली माननीय लक्ष्मी ही "वसुमती" धनकनकसंपन्न होऊन स्वतःच त्यांची सेवा करते. त्यांच्या आश्रयाला येऊन रहाते. तात्पर्य, ते तुझ्या कृपेनें धन, धान्य, पशु, पुत्रपौत्र आणि मनोरम स्त्री इत्यादि सर्व वैभवानें संपन्न होतात.

संपत्कराणि सकलेन्द्रिय-नन्दनानि
साम्राज्य-दान-निरतानि सरोरुहाक्षि !
त्वद्वन्दनानि दुरिताहरणोद्यतानि
मामेव मातरनिशं कलयन्तु नान्यम् ॥ १२ ॥

आई कमलनयने त्रिपुरसुंदरी ! तुझ्या चरणीं पुनःपुन्हां वंदन केलें असतां तीं वंदनें सर्व प्रकारची संपत्ति प्राप्त करून देतात. सर्व इंद्रियांना आनंदित करतात. भक्तांना साम्राज्याचाहि लाभ करून देण्यास तीं तत्पर असतात. आई जगज्जननी ! तुझ्या चरणीं केलेले नमस्कार सर्व दुरितांचें अपहरण करण्यास नेहमी तयार असतात. तुझ्या चरणीं अहर्निश केलेलीं वंदनें मलाच पावन करोत. इतरांना नको.

यावर कोणी म्हणेल कीं, आचार्यांसारख्या महान् तत्त्ववेत्त्याच्या ठिकाणीं येवढा भेदभाव असणें ठीक नाहीं. "सर्वेऽपि सुखिनः सन्तु" अशी जेथें भावना असणें उचित आहे तेथें "तुझीं वंदनें माझेंच कल्याण करोत, इतरांचें नको" असें म्हणणें बरोबर दिसत नाहीं. यावर उत्तर असें कीं, आपलें म्हणणें बरोबर आहे. सर्व लोकांच्या कल्याणासाठीं ज्यांनीं आपलें सारें आयुष्य वेचलें ते असा संकुचित भाव ठेवणारच नाहींत. करितां चौथ्या चरणांतील "मामेव" याचा अर्थ केवळ मलाच असा न करतां माझ्याप्रमाणें जे कोणी तुझ्या चरणीं भक्तियुक्तअन्तःकरणानें वंदन करतील त्या सर्वांनाच तुझें वंदन पावन करो. असाच अर्थ आचार्यांना अभिप्रेत आहे. एवकार हा जसा इतरांची व्यावृत्ति करतो तसाच तो अनभिमतांचीहि व्यावृत्ति करतो. अनभिमत शब्दाचा अर्थ ज्यांना श्रीविद्येची उपासना इष्ट वाटत नाहीं, रुचत नाहीं. ज्यांना श्रद्धा नाहीं, भक्ति नाहीं; जे उपास्य देवतेचा आणि तिच्या भक्तांचा द्वेष, मत्सरच करीत रहातात असे सर्व लोक. अशा लोकांचीच व्यावृत्ति येथें आचार्यांना अभिप्रेत आहे. अन्य शब्दाचाहि अर्थ केवळ इतर असाच न करतां 'विरोधी' असाहि करतात. तेव्हां जो जगदंबेशीं विरोधी आहे त्याला वंदनभक्ति घडणार नाहीं व

तिचें फळहि मिळणार नाहीं हें स्वाभाविकच आहे. "फलस्य कर्तृगामित्वम्" फल हें कर्त्यालाच मिळत असतें इतरांना नाहीं. याच अभिप्रायानें "जो तळें राखील तो पाणी चाखील" ही म्हण प्रसिद्ध आहे. सर्वांचें सुख इच्छिणारें संत देखील "ही संत मंडळी सुखी असो." अशीच प्रार्थना करीत असतात. हा सर्व भाव लक्षांत घेतला म्हणजे आचार्यांकडेहि संकुचित स्वार्थाचा दोष येत नाहीं.

आई ! तुझ्या चरणीं केलें जाणारें वंदन सर्व प्रकारें कल्याणकारक असतें याला उदाहरण म्हणून लोकांनीं माझ्याकडेच पहावें. इतरांकडे पहाण्याची आवश्यकता नाहीं असाहि या श्लोकाचा कांहीं विद्वान् अर्थ करतात.

कल्पोपसंहृतिषु कल्पित-ताण्डवस्य
देवस्य खण्डपरशोः परभैरवस्य ।
पाशाङ्कुशेक्षव-शरासन-पुष्पबाणा
सा साक्षिणी विजयते तव मूर्तिरेका ॥ १३ ॥

दुष्टांचें निर्दलन करण्याकरितां हातामध्यें शंकरांनीं परशु धारण केलेला आहे म्हणून शंकरांना "खण्डपरशु' असें म्हणतात. प्रलयकालीं शंकरांचें रूप अत्यंत उग्र आणि भयंकर असतें म्हणून त्यांना "उग्रभैरव" असेंहि म्हणतात. उग्रभैरव आणि परभैरव या दोन्ही शब्दांचे अर्थ एकच आहेत. देव म्हणजे दिव्यतेजानें संपन्न असलेले असे जे भगवान् शंकर, त्यांचें कल्पान्तकालीं सृष्टीचा उपसंहार करीत असतांना जें तांडवनृत्य चालू असतें त्या तांडवनृत्याची साक्ष देणारी, आई ! केवळ तूंच एक आहेस. शंकरांच्या प्रलयकालीं होणाऱ्या तांडव नृत्याची साक्ष देणारी तुझी ती हातांत पाश, अंकुश, उसाचें धनुष्य आणि फुलांचे बाण घेतलेली अशी एकच एक मूर्ति सर्वसमर्थ आहे. ती विजयी आहे. आम्ही तिचा जयजयकार करतों.

लग्नं सदा भवतु मातरिदं तवार्धं
तेजः परं बहुल-कुङ्कुम-पङ्क-शोणम् ।
भास्वत्किरीटममृताङ्कशु-कलावतंसं
मध्ये त्रिकोण-निलयं परमामृतार्द्रम् ॥ १४ ॥

हे आई जगज्जननी ! अर्धनारीनटेश्वराच्या देहांत विराजमान असलेला तुझा अर्धा देह तुझें हें अर्धे रूप आमच्या अंतःकरणांत सदा संलग्न होऊन राहो. तुझा तो अर्धा देह अत्यंत तेजोरूप आहे. पुष्कळशा कालवलेल्या केशराच्या उटीप्रमाणें तो: "शोण" म्हणजे पीतरक्त अर्थात् पिवळा आणि तांबडा अशा मिश्रवर्णाचा दिसत आहे.

आई ! तुझ्या मस्तकावरील मुकुट मोठा देदीप्यमान आहे. "अमृतांशु" म्हणजे चंद्र, त्याची कला म्हणजे कोर ही तुझ्या मस्तकीं चूडामणीप्रमाणें शोभत आहे. तुझी मूर्ति श्रीयंत्रांतील त्रिकोणामध्यें विराजमान असून ती जणुं कांहीं अत्युत्कृष्ट अमृतानें ओथंबलेली आहे. आई ! तुला माझा नमस्कार असो.

ह्रींकारमेव तव नाम तदेव रूपं
त्वन्नाम दुर्लभमिह त्रिपुरे गृणन्ति ।
त्वत्तेजसा परिणतं वियदादि-भूतं
सौख्यं तनोति सरसीरुह-सम्भवादेः ॥ १५ ॥

आई त्रिपुरसुंदरी ! 'ह्रीं' हें एकच अक्षर तुझें नांव आहे. 'ह्रीं' हे बीज तुझेंच वाचक आहे. तसेंच तें तुझें रूपहि आहे. इहलोकीं अथवा या जन्मांत तुझें नांव मुखी येणें अथवा तुझें नांव घेण्याची बुद्धि होणें हें मोठें दुर्लभ आहे. पदरीं कांहीं पूर्वजन्माचें सुकृत असेल तरच तुझें नांव घेण्याची बुद्धि होईल.

आई जगज्जननी ! असें हें तुझें दुर्लभ नांव ज्यांच्या मुखीं असतें, जे तुझें नांव घेत असतात, तुझ्या नांवाचा जप करीत असतात ते सुखी होतात. हीं आकाशादि पंचमहाभूतें तुझ्या तेजानेंच परिणत झालेलीं आहेत, तुझ्या तेजानेंच तीं उदयाला आलेलीं आहेत. तीं पंचमहाभूतें ब्रह्मदेवादिकांनाहि सुखी करतात. 'सरसीरुह' म्हणजे कमल. अर्थात् श्रीविष्णूच्या नाभिस्थानांतून निर्माण झालेलें कमल; त्याच्यातून ज्याचा 'संभव' म्हणजे उत्पत्ति अथवा जन्म होतो तो ब्रह्मदेव, असा 'सरसीरुहसम्भव' या शब्दाचा अर्थ आहे. आदि शब्दानें शंकर आणि विष्णु हे समजावेत. तात्पर्य, ब्रह्मा, विष्णु आणि महेश हेहि तुझें नांव घेऊनच सुखी होतात. असा तुझ्या नांवाचा महिमा आहे.

ह्रींकार-त्रय-संपुटेन महता मन्त्रेण सन्दीपितं
स्तोत्रं यः प्रतिवासरं तव पुरो मातर्जपेन्मन्त्रवित् ।
तस्य क्षोणि-भुजो भवन्ति वशगा लक्ष्मीश्चिरस्थायिनी
वाणी निर्मल-सूक्ति-भार-भरिता जागर्ति दीर्घं वयः ॥ १६ ॥

हे आई त्रिपुरसुंदरी ! तुझा कूटत्रयात्मक पंचदशाक्षरीमंत्र हा सर्व मंत्रांत श्रेष्ठ असल्यामुळें त्याला महामंत्र असें म्हणतात. या महामंत्रामध्यें प्रत्येक कूटाच्या शेवटीं एक एक ह्रींकार आहे. अशीं तीन ह्रीं ह्रीं बीजें या मंत्रांत संपुटित म्हणजे घटक झालेलीं आहेत. याप्रमाणें ह्रींकारत्रयाचा ज्याला संपुट म्हणजे आधार आहे अथवा जो ह्रींकारत्रयानें घटित आहे असा तुझा पंचदशाक्षरी महामंत्र, या मंत्रानें हें स्तोत्र संदीपित म्हणजे उज्ज्वल, तेजस्वी आणि प्रभावी असें झालेलें आहे. तो मंत्र या स्तोत्रांत घटक झालेला आहे. श्रीविद्यामंत्रानें तुझी उपासना करणारा जो कोणी रोजच्या रोज या स्तोत्राचा तुझ्यापुढे पाठ करील त्याला राजेलोक वश होतील; त्याच्या येथें लक्ष्मी चिरकाल वास्तव्य करील. त्याची वाणी निर्मल आणि सुविचार व्यक्त करणाऱ्या अशा विपुल शब्दांनीं समृद्ध होऊन तो दीर्घायुषी होईल. सर्व प्रकारें त्याचें कल्याण होईल.

■ ■ ■

मन्त्रमातृका-पुष्पमाला-स्तोत्रम्

[श्रीविद्यामहामंत्राचीं अक्षरें हींच कोणी फुलें, त्या फुलांची मालाच या स्तोत्रांत गोविलेली असल्यामुळें या स्तोत्राला मन्त्रमातृकापुष्पमालास्तोत्र असें नांव देण्यांत आलेलें आहे. या स्तोत्रानें श्रीललितामहात्रिपुरसुंदरीदेवीच्या सगुण स्वरूपाचें चिंतन आणि ध्यानावाहनादि मानसोपचार द्रव्यांनीं केलें जाणारें पूजन अशा दोन्ही गोष्टी सहजच घडतात. या दृष्टीनें हें स्तोत्र अत्यंत उत्तम आहे.]

कल्लोलोल्लसितामृताब्धि-लहरी-मध्ये विराजन्मणि-
द्वीपे कल्पक-वाटिका-परिवृते कादम्ब-वाटयुज्ज्वले ।

रत्न-स्तम्भ-सहस्र-निर्मित-सभा-मध्ये विमानोत्तमे
चिन्तारत्न-विनिर्मितं जननि ते सिंहासनं भावये ॥ १ ॥

हे आई महात्रिपुरसुंदरी ! पृष्ठभागावर उसळणाऱ्या अशा असंख्य तरंगांनीं शोभत असलेल्या अमृताच्या सागरावर तरंगांच्या समूहांत विराजमान असलेल्या, त्याचप्रमाणें कल्पवृक्षांच्या उपवनांनीं आणि कदंबवृक्षांच्या वाटिकांनीं (बागांनीं) उज्ज्वल दिसणाऱ्या अत्यंत उत्तम अशा मणिद्वीपामध्यें – रत्नखचित भूप्रदेशामध्यें एक विशाल सभामंडप आहे. ज्यांना विविध प्रकारचीं रत्नें जडविलेलीं आहेत अशा हजार खांबांनीं तो सभामंडप तयार केलेला आहे. त्या सभामंडपांत एक सुंदर विमान आहे. त्या विमानामध्यें चिंतामणि रत्नांनीं निर्माण केलेलें अत्यंत उत्तम सिंहासन आहे. आई ! मी आपल्या हृदयांत तुझ्या त्या सिंहासनाचें चिंतन करीत आहे. तेंच सिंहासन मी तुला बसण्याकरितां अर्पण करीत आहें. (वर निर्दिष्ट केलेल्या मणिद्वीपाचें वर्णन देवीभागवताच्या बाराव्या स्कंधांत १०, ११ आणि १२ या अध्यायांत अत्यंत विस्तारानें केलेलें आहे. विशेष जिज्ञासु जनांनीं तें तेथेंच पहावें.)

एणाङ्कानल-भानु-मण्डल-लसच्छ्रीचक्र-मध्ये स्थितां
बालार्क-द्युति-भासुरां कर-तलैः पाशाङ्कुशौ बिभ्रतीम् ।
चापं बाणमपि प्रसन्न-वदनां कौसुम्भ-वस्त्रान्वितां
तां त्वां चन्द्र-कलावतंस-मकुटां चारुस्मितां भावये ॥ २ ॥

एण म्हणजे हरिण. तो अंकावर विराजमान असल्यामुळें चंद्राला एणांक म्हणतात. अंक शब्दाचा अर्थ चिह्न असाहि आहे. चंद्रावर हरिणाचें चिह्न असल्यामुळें चंद्राला मृगांक, हरिणांक, एणांक अशीं नावें आहेत. आई त्रिपुरसुंदरी ! तुझें वसतिस्थान असलेलें श्रीचक्र म्हणजे श्रीयंत्र हें चंद्रमंडलाप्रमाणें शोभत आहे. तें अग्निमंडालाप्रमाणें देदीप्यमान आणि सूर्यमंडलाप्रमाणें तेजस्वी आहे. अशा त्या देदीप्यमान असलेल्या सुंदर श्रीचक्रांत तूं विराजमान झालेली आहेस. तुझी अंगकांति बालसूर्याप्रमाणें अर्थात् उदयाला येणाऱ्या सूर्याच्या कांतीप्रमाणें 'भासुर' म्हणजे देदीप्यमान दिसत आहे. तूं आपल्या चारी करतलांनीं पाश, अंकुश, धनुष्य आणि बाण हीं आयुधें धारण केलेलीं आहेत. तुझें मुखकमल

अत्यंत प्रसन्न दिसत आहे. कुसुंभाच्या रंगानें तें रंगविलेलें अर्थात् करडईच्या फुलाप्रमाणें अथवा केशराप्रमाणें आरक्तवर्ण दिसणारें अथवा तापविलेल्या सोन्याप्रमाणें देदीप्यमान असलेलें वस्त्र तूं परिधान केलेलें आहेस. तुझ्या मस्तकावर विराजमान असलेल्या मुकुटांत चंद्राची कोर झळकत आहे. तुझें स्मितहास्य अत्यंत चारु म्हणजे मनाला मुग्ध करणारें आहे. आई! तुझ्या या मंगलमय मनोरम स्वरूपाचें मी आपल्या हृदयामध्यें चिंतन करीत आहें.

ईशानादि-पदं शिवैक-फलदं रत्नासनं ते शुभं
पाद्यं कुङ्कुम-चन्दनादि-भरितैरर्घ्यं सरत्नाक्षतैः ।
शुद्धैराचमनीयकं तव जलैर्भक्त्या मया कल्पितं
कारुण्यामृत-वारिधे तदखिलं सन्तुष्टये कल्पताम् ॥ ३ ॥

हे आई जगज्जननी! कल्याण हेंच एक प्रामुख्यानें फल प्राप्त करून देणारें ईशानादिपद म्हणजे शिवपद, विष्णुपद आणि ब्रह्मपद. हीं पदेंच मी तुझ्याकरितां मंगलमय रत्नजडित आसन म्हणून योजिलेलीं आहेत. केशर, चंदन इत्यादि सुगंधी द्रव्यांनीं माखलेल्या रत्नासारख्या अक्षतांनीं युक्त असलेलें हे जल पाय धुण्याकरितां पाद्य म्हणून आणि हस्तप्रक्षालनासाठीं अर्घ्य म्हणून मी तुला अर्पण करीत आहें. तसेंच तुझ्या आचमनासाठीं मी भक्तियुक्त अंतःकरणानें हें शुद्ध जलहि पुढें ठेवलेलें आहे. आई! तूं दयेच्या अमृताचा सागर आहेस. मी तुझ्याकरितां योजलेले हे सर्व उपचार तुझ्या संतोषाला कारणीभूत होवोत. तात्पर्य, भक्तियुक्त अन्तःकरणानें केलेल्या या सर्व उपचारांनीं तूं संतुष्ट हो.

लक्ष्ये योगिजनस्य रक्षित-जगज्जाले विशालेक्षणे
प्रालेयाम्बु-पटीर-कुङ्कुम-लसत्कर्पूर-मिश्रोदकैः ।
गोक्षीरैरपि नारिकेल-सलिलैः शुद्धोदकैर्मन्त्रितैः
स्नानं देवि धिया मयैतदखिलं सन्तुष्टये कल्पताम् ॥ ४ ॥

आई जगन्माते! तूं योगीजनांचें लक्ष्य आहेस. अर्थात् योगी लोक तुझ्याच प्राप्तीकरितां मन लावून झटत असतात. तूं या संपूर्ण विश्वसमूहाचें रक्षण करीत आहेस. तुझे नेत्र विशाल आहेत. मी तुला भक्तियुक्त अन्तःकरणानें स्नान घालीत आहें. स्नानाकरितां हिमालयांतील हिमप्रवाहस्वरूप गंगेचें हें निर्मल जल

आणलेलें आहे. चंदन, केशर आणि सुंदर कापूर त्या पाण्यांत मिसळलेला आहे. गाईचें दूधहि पण स्नानाकरितां आणलेलें आहे. हें पंचामृत आणि हें नारळांतील पाणीहि पण आई, मी तुझ्या स्नानाकरितां आणलेलें आहे. तसेंच श्रीसूक्त, पवमान-सूक्त, रुद्राध्याय इत्यादि मंत्रांनीं पावन केलेलें शुद्धोदक आणलेलें आहे. या सर्वांच्या योगानें मी तुला भक्तियुक्त अन्तःकरणानें स्नान घालीत आहें. हे देवी जगन्माते ! मी कल्पिलेलीं हीं स्नानें तुझ्या हृदयाला संतोष देण्यास समर्थ होवोत.

ह्रींकाराङ्कित-मन्त्र-लक्षित-तनो हेमाचलात्सञ्चितै
रत्नैरुज्ज्वलमुत्तरीय-सहितं कौसुम्भ-वर्णांशुकम् ।
मुक्ता-सन्तति-यज्ञसूत्रममलं सौवर्ण-तन्तूद्भवं
दत्तं देवि धिया मयैतदखिलं सन्तुष्टये कल्पताम् ॥ ५ ॥

हे देवी जगज्जननी ! तुझ्या पंचदशाक्षरी महामंत्रामध्यें तीन वेळां ह्रीं या बीजांचा उच्चार होत असल्यामुळें तुझा मंत्र ह्रींकारांनीं अंकित म्हणजे युक्त आहे. ह्रींकारयुक्त असलेल्या तुझ्या मंत्रानें तुझी तनु म्हणजे तुझें स्वरूप भक्तांच्या ध्यानीं येत असतें; कारण तूं मंत्रमय आहेस. त्या मंत्रमय असलेल्या तुझ्या मूर्त स्वरूपाच्या ठिकाणीं सुवर्णाच्या मेरुपर्वतापासून गोळा करून आणलेलीं जीं रत्नें, त्या रत्नांनीं उज्ज्वल दिसणारें तुझ्या अंगावरील वस्त्र अर्थात् दुपट्टा आणि कौसुंभ वर्णाचें अर्थात् केशरी रंगाचें हें नेसण्याचें वस्त्र; हीं दोन्ही वस्त्रें फारच उत्तम आहेत. तसेच हे मोत्यांचे हार आणि सोन्याच्या धाग्यानें विणलेलें निर्मल यज्ञोपवीत मी हें सर्व तुला स्वतःच्या बुद्धीनें तयार केलेलें अर्पण केलें आहें. आई ! याचा तूं अंगीकार कर. हें सर्व तुझ्या संतोषाला कारणीभूत होवो.

हंसैरप्यति-लोभनीय-गमने हारावलीमुज्ज्वलां
हिन्दोल-द्युति-हीर-पूरिततरे हेमाङ्गदे कङ्कणे ।
मञ्जीरौ मणि-कुण्डले मकुटमप्यर्धेन्दु-चूडामणिं
नासामौक्तिकमङ्गुलीय-कटकौ काञ्चीमपि स्वीकुरु ॥ ६ ॥

आई त्रिपुरसुंदरी ! तुझी चालण्याची पद्धति अशी आहे कीं, हंसांना देखील ती अत्यंत लोभनीय वाटावी. तात्पर्य, हंसापेक्षांहि तुझी चालण्याची पद्धति अत्यंत उत्तम आहे. आई ! हा मी तुझ्याकरितां उत्तम पाणीदार मोत्यांचा कंठा

आणलेला आहें. ही सोन्याचीं कंकणें आणि बाहुभूषणेंहि पण आणलेलीं आहेत. या दोन्ही अंगदांत म्हणजे बाजुबंदांत पुष्कळ हिरे बसविलेले असून त्यांचें तेज लकाकत आहे. मंजीर म्हणजे पायांतील अलंकार, वाळे, पैंजण, चाळ वगैरे. तसेंच हीं कानांत घालण्याकरितां रत्नखचित कुंडलें आणलेलीं आहेत. त्याचप्रमाणें हा रत्नजडित मुकुटहि आणलेला आहे. मुकुटावर चंद्राची कोर चूडामण्याप्रमाणें शोभत आहे. कानांत घालण्याकरितां हा मोत्यांचा अलंकार आणलेला आहे. बोटांत घालण्याकरितां ह्या आंगठ्या आणि कडींतोडे वगैरे अलंकारहि आणलेले आहेत. त्याचप्रमाणें हा रत्नजडित सोन्याचा कंबरपट्टा आणलेला आहे. आई ! या सर्व अलंकारांचा तूं अंगीकार कर.

सर्वाङ्गे घनसार-कुङ्कुम-घन-श्रीगन्ध-पङ्काङ्कितं
कस्तूरीतिलकं च फालफलके गोरोचना-पत्रकम् ।
गण्डादर्शन-मण्डले नयनयोर्दिव्याञ्जनं तेऽञ्चितं
कण्ठाब्जे मृगनाभि-पङ्कममलं त्वत्प्रीतये कल्पताम् ॥ ७ ॥

हे आई त्रिपुरसुंदरी ! कापूर, केशर, वाळा, चंदन इत्यादि सुगंधी द्रव्यांचा कल्क करून तयार केलेलें हें उटणें तूं आपल्या सर्व अंगाला लाव. आणि ही कस्तूरी आणलेली आहे. या कस्तूरीचा तिलक तूं आपल्या भालप्रदेशीं धारण कर. त्याचप्रमाणें आदर्शमंडलाप्रमाणें अर्थात् आरशाप्रमाणें स्वच्छ असलेल्या गंडस्थलीं किंवा कपोलप्रदेशीं (गालावर) नक्षी काढण्याकरितां हें गोरोचन कालवून आणलेलें आहे. या गोरोचनानें 'पत्रक' म्हणजे नक्षी काढ. तसेंच हें दिव्य म्हणजे अत्यंत सुंदर अंजन डोळ्यांत घालण्याकरितां आणलेलें आहें. हें काजळ तूं आपल्या डोळ्यांत घाल. आई ! कमलाप्रमाणें कोमल आणि सुंदर असलेल्या तुझ्या कंठप्रदेशीं ही निर्मल कस्तूरीची उटी लाव. आई ! मी आणलेलीं हीं सर्व उपचारसाधनें तुझ्या संतोषाला कारणीभूत होवोत. तात्पर्य, या सर्व उपचारांनीं तूं संतुष्ट हो.

कह्लारोत्पल-मल्लिका-मरुवकैः सौवर्ण-पङ्केरुहै-
र्जाती-चम्पक-मालती-बकुलकैर्मन्दार-कुन्दादिभिः ।
केतक्या करवीरकैर्बहुविधैः कल्पाः स्रजो मालिकाः
सङ्कल्पेन समर्पयामि वरदे सन्तुष्टये गृह्यताम् ॥ ८ ॥

आई भक्तवरदायिनी जगदंबे ! मी माझ्या संकल्पानें कल्पिलेल्या अनेक फुलांच्या लहानमोठ्या माळाच माळा तुझ्या गळ्यांत घालण्याकरितां आणलेल्या आहेत. हीं कह्लाराचीं म्हणजे पांढऱ्या कमळाचीं फुलें, हीं रक्तकमलें, हीं मोगऱ्याचीं फुलें, हीं मरुबक म्हणजे कोऱ्हांटीचीं फुलें, हीं सोन्यासारखीं देदीप्यमान असलेलीं सुवर्णकमलें, त्याचप्रमाणें जाई, चांफा, बटमोगरा आणि बकुल तसेंच कल्पवृक्ष, कुंद आणि पारिजातक इत्यादि किती तरी फुलें आणलेलीं आहेत. हीं केवड्याच्या कणसाचीं पानें आणि विविध प्रकारचीं कण्हेरीचीं फुलें गोळा करून आणलेलीं आहेत. त्यांच्या संकल्पानें तयार केलेल्या या माळा मी तुला अर्पण करीत आहें. हे अभीष्टवरदायिनी जगन्माते ! या माळा तूं आपल्या गळ्यांत घाल आणि संतुष्ट हो. तूं आपल्या संतोषासाठीं या माळांचा स्वीकार कर. त्यामुळें मलाहि संतोष वाटेल.

हन्तारं मदनस्य नन्दयसि यैरङ्गैरनङ्गोज्ज्वलै-
र्यैर्भृङ्गावलि-नील-कुन्तल-भरैर्बध्नासि तस्याशयम् ।
तानीमानि तवाम्ब कोमलतराण्यामोद-लीला-गृहा-
ण्यामोदाय दशाङ्ग-गुग्गुलु-घृतैर्धूपैरहं धूपये ॥ ९ ॥

हे आई त्रिपुरसुंदरी ! ज्यानें मदनाला भस्म करून टाकलें त्या शंकरांना तूं आपल्या मदनाप्रमाणें देदीप्यमान, कोमल आणि सुंदर असलेल्या अशा ज्या अंगांनीं रमवितेस, त्याचप्रमाणें भ्रमरांच्या मालिकेप्रमाणें अथवा समूहाप्रमाणें कृष्णवर्ण दिसणाऱ्या कुरळ्या केसांच्या कलापानें त्यांचें अन्तःकरण आपलेंसें करून घेतलें आहेस, ते हे तुझे अत्यंत कोमल अवयव हस्त, कंठ, नेत्र इत्यादि हीं सर्व अंगें श्रीत्रिपुरारि भगवान् शंकर यांचीं जणुं कांहीं आनंदप्रद लीलागृहेंच आहेत. त्या तुझ्या सर्व कोमल गात्रांना आणि केशकलापाला मी या तुपानें मारवलेल्या दशांगगुग्गुलाच्या धूपानें धुपवीत आहें. आई ! तुझ्या संतोषाकरितां समर्पण केलेल्या या धूपानें तूं संतुष्ट हो. (दशांगधूप, पान १२७, १२८ पहा.)

लक्ष्मीमुज्ज्वलयामि रत्ननिवहोद्भास्वत्तरे मन्दिरे
माला-रूप-विलम्बितैर्मणिमय-स्तम्भेषु सम्भावितैः ।
चित्रैर्हाटक-पुत्रिका-करधृतैर्गव्यैर्घृतैर्वर्धिते-
र्दिव्यैर्दीप-गणैर्धिया गिरिसुते सन्तुष्टये कल्पताम् ॥ १० ॥

हे आई गिरिसुते पर्वतराजकन्ये पार्वती ! रत्नसमूहांनीं अत्यंत देदीप्यमान असलेल्या मंदिरांत विविध माळांच्या रूपानें लोंबणाऱ्या झालरींनीं व तोरणांनीं त्याचप्रमाणें रत्नजडित खांबांच्या ठिकाणीं मी आपल्या मनानें बसविलेल्या नाना प्रकारच्या चित्रांनीं आरास करून शोभा वाढवीत आहें. तसेंच या सोन्याच्या सुंदर पुतळ्या करून त्यांच्या हातांत दिवे दिलेले आहेत. त्या दिव्यांत गाईचें तूप घातलेलें असून ते उत्तमोत्तम असलेलें सर्व दिवे मी आपल्या मनानें पाजळलेले आहेत. या सर्व दीपसमूहांनीं मी तुझ्या मंदिराची शोभा वाढवीत आहें. आई ! मी केलेली ही आरास, रोषणाई आणि पूजेंतील दीपसमर्पण हें सर्व तुझ्या संतोषाला कारणीभूत होवो.

ह्रींकारेश्वरि तप्त-हाटक-कृतैः स्थाली-सहस्रैर्भृतं
दिव्यान्नं घृत-सूप-शाक-भरितं चित्रान्न-भेदं तथा ।
दुग्धान्नं मधु-शर्करा-दधि-युतं माणिक्य-पात्रे स्थितं
माषापूप-सहस्रमम्ब सफलं नैवेद्यमावेदये ॥ ११ ॥

हे आई त्रिपुरसुंदरी ! ह्रीं हें श्रीलक्ष्मीचें बीजाक्षर आहे. लक्ष्मीच्या रूपानें तूंच त्या बीजाक्षराची ईश्वरी म्हणजे अधिष्ठात्री देवता आहेस. तुझ्या-करितां मी हा नैवेद्य मनानें तयार केलेला आहे. शुद्ध सोन्यानें घडविलेल्या हजारों ताटांमध्यें नैवेद्याचे पदार्थ वाढलेले आहेत. अत्यंत सुंदर सुगंधी अशा बारीक तांदळाचा भात आहे. साजूक तूप आहे. वरण आहे. कढी, आमटी, भाज्या, कोशिंबिरी सर्व कांहीं भरपूर वाढलेलें आहे. मसालेभात, साखरभात वाढलेले आहेत. तसेंच दुग्धान्न म्हणजे खीर, पायस, बासुंदी इत्यादि दुधाचे पदार्थ वाढलेले आहेत. त्यांच्या जोडीला मध, साखर, दहीं वगैरे पदार्थ माणकांच्या वाट्यांतून भरून ठेवलेले आहेत. उडदाचे वडे, हरबऱ्याच्या डाळीचे वडे, भोपळवडे त्याचप्रमाणें पुऱ्या, कचोऱ्या ह्याहि असंख्य वाढलेल्या आहेत. त्याचप्रमाणें हे आई ! मी मनानें तयार केलेल्या या नैवेद्यांत अनेक प्रकारचीं फळेंहि आहेत. केळें, डाळिंबें, संत्रें, मोसंबी, फणस, आंबे इत्यादि अनेक प्रकारचीं फळेंहि ठेविलेलीं आहेत. हा सर्व मनानें कल्पिलेला नैवेद्य मी तुला अर्पण करीत आहें. याचा तूं स्वीकार कर.

सच्छायैर्वर-केतकी-दल-रुचा ताम्बूल-वल्ली-दलैः
पूगैर्भूरि-गुणैः सुगन्धि-मधुरैः कर्पूर-खण्डोज्ज्वलैः ।
मुक्ताचूर्ण-विराजितैर्बहुविधैर्वक्त्राम्बुजामोदनैः
पूर्णा रत्नकलाचिका तव मुदे न्यस्ता पुरस्तादुमे ॥१२॥

आई ! तुझ्या मुखशुद्धीसाठीं हा पहा मी चतुर्दशगुणी विडा तयार केलेला आहे. हीं नागवेलीचीं पानें उत्तम केतकीच्या पानाप्रमाणे फिकट पीतवर्णाचीं पण 'सच्छाय' म्हणजे टवटवीत, तजेलदार आहेत. त्यांत सुपारी घातलेली आहे. ती सुपारी देखील अनेक सुगंधी आणि मधुर द्रव्यांच्या भावना देऊन मोठी रुचकर आणि सुवासिक बनविलेली आहे. त्या पानांत कापराचें चूर्ण घालून त्याला खुमास आणलेला आहे. आई ! या पानांना मी मोत्यांचा चुना लावलेला आहे. त्या चुन्यामुळें ती पानें फारच सुंदर दिसत आहेत. आई ! तुझ्या मुख-कमलाला रुचि आणि सौगंध्य निर्माण करणारीं अनेक सुगंधी द्रव्यें त्यांत घातलीं आहेत. केशर, कस्तूरी, जायफळ, जायपत्री, लवंग, वेलदोडा, कंकोळ, कात, ज्येष्ठमध, बडिशेप, पुदिन्याचा अर्क आणि ओल्या नारळाचा चव अशा या चतुर्दशगुणी विड्यांनीं भरलेली "रत्नकलाचिका" म्हणजे रत्नजडित सोन्याचें, वरच्या बाजूस पळीच्या पात्राप्रमाणें आकार असलेलें बीतभर उंचीचें विडा ठेवण्याचें पात्र अथवा पानदान. आई उमादेवी ! हें मी तुझ्यापुढें ठेवलेलें आहे. तें तुझ्या संतोषाला कारणीभूत होवो.

कन्याभिः कमनीय-कान्तिभिरलङ्कारामलारार्तिका-
पात्रे मौक्तिक-चित्र-पङ्क्ति-विलसत्कर्पूर-दीपालिभिः ।
तत्तत्ताल-मृदङ्ग-गीत-सहितं नृत्यत्पदाम्भोरुहं
मन्त्राराधन-पूर्वकं सुविहितं नीराजनं गृह्यताम् ॥ १३ ॥

हे आई त्रिपुरसुंदरी ! ज्यांची अंगकांति अत्यंत सुंदर आहे अशा या रूपवती असलेल्या कन्यांच्या हस्तें मी तुला नीरांजनदीप अर्पण करीत आहें. त्याचा तूं स्वीकार कर. तुला नीरांजनदीप अर्पण करण्याकरितां त्यांच्या हातांत नीरांजनपात्रें दिलेलीं आहेत. त्या पात्रांना "अलंकारार्तिकापात्र" म्हटलेलें आहे. तीं पात्रें घासून-पुसून अत्यंत अमल म्हणजे स्वच्छ केलेलीं आहेत. त्या पात्रामध्यें

मोत्यांच्या नाना प्रकारच्या माळांप्रमाणें शोभणाऱ्या कर्पूरदीपांच्या माळा लावलेल्या आहेत. त्या कर्पूरदीपमालांनीं तुझी आरती मोठ्या थाटांत चालली आहे. या उत्तर-निरांजन-विधीच्या वेळीं मत्ततालं, रुद्रताल, ब्रह्मताल इत्यादि विविध प्रकारच्या तालांत मृदंगांचे मंजुल ध्वनि आणि संगीत यांच्यासह त्या कन्यकांचीं पदकमलें नृत्य करीत आहेत. अशा थाटांत नीरांजनविधि चालू असतांना वैदिक मंडळी विविध वेदमंत्रांचा घोष करून तुझी आराधना करीत आहेत. याप्रमाणें मंत्राराधनपूर्वक "सुविहितं" म्हणजे थाटानें केला जात असलेला हा नीरांजन-दीप-विधि मी तुला अर्पण करीत आहें. माझ्या या अन्तःकरणपूर्वक भक्तिभावानें अर्पण केल्या जाणाऱ्या नीरांजन-दीपाचा तूं स्वीकार कर.

लक्ष्मीमौक्तिक-लक्ष-कल्पित-सित-च्छत्रं तु धत्ते रसा
दिन्द्राणी च रतिश्च चामरवरे धत्ते स्वयं भारती ।
वीणामेण-विलोचनाः सुमनसां नृत्यन्ति तद्रागव-
द्भावैराङ्गिक-सात्त्विकैः स्फुटरसं मातस्तदाकर्ण्यताम् ॥ १४॥

हे आई त्रिपुरसुंदरी ! माझ्या या मानसपूजेमध्यें तुला राजोपचार अर्पण करतांना ही लक्ष्मी लाखों मोत्यांची झालर ज्याला लावलेली आहे, अशा चांदीच्या श्वेत छत्राला तुझ्या मस्तकावर आवडीनें धारण करीत आहे. "रसात्" म्हणजे स्वरसतः अर्थात् आवडीनें, बळेंच नव्हे, तर अगदीं मनापासून, असा या शब्दाचा अर्थ आहे. आई ! तुझ्या दोन्ही बाजूला इंद्राणी म्हणजे इंद्राची — देवांच्या राजाची पत्नी आणि रति म्हणजे कामदेवाची पत्नी या दोघींनीं 'चामरवर' म्हणजे उत्तम चवऱ्या धारण केलेल्या आहेत. त्याचप्रमाणें सरस्वतीनें स्वतः आपल्या हातांत तंबोरा घेतलेला असून, ती तंबोऱ्याच्या तारा छेडीत आहे. "सुमनसां" म्हणजे देवांच्या "एणविलोचनाः" म्हणजे हरिणीप्रमाणें ज्यांचे नेत्र सुंदर आहेत अशा "अंगना" म्हणजे स्त्रिया, अर्थात् अप्सरा ह्या नृत्य करीत आहेत. त्या नृत्यसमयीं जोगी, भैरव, सारंग, भूप, धनाश्री, वसंत, मल्हार, मालकंस, भैरवी इत्यादि निरनिराळ्या रागांना आळवीत आहेत आणि त्याचप्रमाणें आंगिक भावांनीं अर्थात् हातांनीं केल्या जाणाऱ्या अभिनयानें आणि सात्त्विक भावांनीं म्हणजे मुखावर व्यक्त होणाऱ्या अंतःकरणांतील आंतरिक भावांनीं अर्थात् अष्टविध सात्त्विक भावांनीं ज्यामध्यें सात्त्विक शृंगार, कारुण्य आणि शांत म्हणजे

भक्तिरस इत्यादि रसांचा आविर्भाव स्पष्ट होत आहे असें हें नृत्य, वाद्य आणि संगीत मी तुला अर्पण करीत आहें. आई ! तें तूं श्रवण करावेस अशी माझी प्रार्थना आहे.

ह्रींकार-त्रय-सम्पुटेन मनुनोपास्ये त्रयी-मौलिभि-
र्वाक्यैर्लक्ष्य-तनो तव स्तुति-विधौ को वा क्षमेताम्बिके ।
सञ्चापाः स्तुतयः प्रदक्षिणशतं सञ्चार एवास्तु ते
संवेशो नमसः सहस्रमखिलं त्वत्प्रीतये कल्पताम् ॥ १५ ॥

हे अंबिके जगन्माते ! तुझा मंत्र ह्रींकारत्रयानें म्हणजे तीन ह्रीं या बीजांनीं संपुटित म्हणजे घटित आहे. तो मंत्र तुझा अत्यंत आवडता असल्यामुळें त्याच मंत्रानें तूं उपासना करण्यास योग्य आहेस. तुझें स्वरूप वेदांच्या शिरःस्थानीं असलेल्या उपनिषदांतील वाक्यांनींच जाणलें जातें. अर्थात् तूं केवळ परब्रह्मस्वरूप आहेस. तुझी स्तुति करण्याला कोण बरें समर्थ होईल ? तुझें यथार्थ स्तवन करण्याला माझ्याजवळ शब्दच नाहींत. आमचीं संभाषणें हीच तुझी स्तुति आणि इकडे तिकडे होणारे संचार म्हणजे फिरणें याच तुझ्या शंभर प्रदक्षिणा होत. तसेंच निद्रेच्या निमित्तानें जमिनीवर आडवें होणें हेच माझे सहस्रशः साष्टांग प्रणिपात समज. आई ! हे सर्व माझे मानसोपचार तुझ्या संतोषाला कारणीभूत होवोत.

श्रीमन्त्राक्षर-मालया गिरिसुतां यः पूजयेच्चेतसा
सन्ध्यासु प्रतिवासरं सुनियतस्तस्यामलं स्यान्मनः ।
चित्ताम्भोरुह-मण्टपे गिरिसुता नृत्तं विधत्ते रसा-
द्वाणी वक्त्र-सरोरुहे जलधिजा गेहे जगन्मङ्गला ॥ १६ ॥

श्रीविद्येच्या यंत्राला श्रीयंत्र म्हणतात, तर श्रीविद्येच्या मंत्राला श्रीमंत्र असें म्हणतात. या स्तोत्रांतील पंधरा श्लोकांच्या पहिल्या पहिल्या चरणातील पहिलीं अक्षरें क्रमानें एकत्र गुंफलीं म्हणजे श्रीमंत्राक्षरमालाच तयार होते. या मंत्राक्षरमालेनें युक्त अललेल्या या मानस-पूजास्तोत्रानें गिरिसुता म्हणजे पार्वती श्रीललितामहात्रिपुरसुंदरी तिची जो कोणी भक्त अंतःकरणपूर्वक रोजच्या रोज तिन्हीत्रिकाळ नियमानें पूजा करील, अर्थात् हें स्तोत्र मानसपूजाच असल्यामुळें या स्तोत्राचा पाठ करणें ही श्रीललितामहात्रिपुरसुंदरीची पूजाच होय. अशा

रीतीनें श्रीजगदंबेची जो पूजा करील त्याचें मन अत्यंत निर्मल होईल, शुद्ध होईल. त्याच्या हृत्कमलरूपी मंडपांत श्रीत्रिपुरांबा ललितामहादेवी आवडीनें नृत्य करील. त्याच्या मुखकमलामध्यें – वाणीमध्यें सरस्वतीदेवी विराजमान होऊन राहील. त्याचप्रमाणें त्याच्या गृहामध्यें जगन्मंगला श्रीलक्ष्मीदेवी देखील नित्य वास्तव्य करील. तात्पर्य, या स्तोत्रानें श्रीविद्येची उपासना करणारा भक्त श्रीविद्येप्रमाणेंच श्रीसरस्वतीचें व श्रीलक्ष्मीचेंहि अधिष्ठान बनतो. असा या स्तोत्राचा महिमा आहे.

इति गिरिवर-पुत्री-पादराजीव-भूषा
भुवनममलयन्ती सूक्तिसौरभ्यसारैः ।
शिव-पद-मकरन्द-स्यन्दिनीयं निबद्धा
मदयतु कविभृङ्गान्मातृका-पुष्पमाला ॥ १७ ॥

आचार्य म्हणतात याप्रमाणें माझी ही मातृकापुष्पमाला म्हणजे प्रत्येक श्लोकाच्या आद्याक्षरांनीं गुंफलेली श्रीविद्येच्या मंत्रांतील अक्षररूपी पुष्पांची माला ही गिरिवर म्हणजे पर्वतराज हिमालय त्याची कन्या असलेली श्रीदेवी पार्वती तिच्या चरणकमलांचा हा अलंकारच आहे. ही पुष्पमाला आपल्या उत्तम अक्षरांच्या व अर्थाच्या सौगंध्यानें आणि रसानें सर्व भू-मंडलाला निर्मल रीत आहे, प्रसन्न करीत आहे. परिपूर्णपरब्रह्मस्वरूप भगवान् सदाशिव यांच्या चरण-कमलांतील मकरंदाला – पुष्परसाला स्रवणारी अशी ही मी गुंफलेली मंत्रमातृका-पुष्पमाला, कवि म्हणजे विवेकी आणि विद्वान् लोक हेच कोणी भ्रमर त्यांना आपल्या अपूर्व रसानें गुंग करून सोडील, तन्मय करील.

■ ■ ■

त्रिपुरसुन्दरीस्तोत्रम्

[श्रीललितामहात्रिपुरसुंदरीच्या सगुण स्वरूपाचें चिंतन करण्याच्या दृष्टीनें पृथ्वी वृत्तांतील हें स्तोत्र फार महत्वाचें आहे. याच स्तोत्रांतील सातवा श्लोक श्रीविद्यामंत्राच्या जपाचें अनुष्ठान करतांना अथ ध्यानं म्हणून म्हटला जात असतो. यावरून आचार्यपुरस्कृत शक्त्युपासनेमध्यें या स्तोत्राला कांहीं निराळें महत्त्व आहे. याच हेतूनें आम्ही हें स्तोत्र वाचकांना सादर करीत आहोंत.]

कदम्बवनचारिणीं मुनिकदम्ब-कादम्बिनीं
नितम्ब-जित-भू-धरां सुर-नितम्बिनी-सेविताम् ।
नवाम्बुरुह-लोचनामभिनवाम्बुद-श्यामलाम्
त्रिलोचन-कुटुम्बिनीं त्रिपुरसुन्दरीमाश्रये ॥ १ ॥

माता त्रिपुरसुंदरी ही नेहमीं कदंबवनामध्यें संचार करणारी आहे. ऋषि-मुनिरूपी कदंबवनाला उल्लासित करणारी ती जणुं कांहीं "कादंबिनी" म्हणजे मेघमालाच आहे. मेघांच्या वृष्टीनें कदंबवृक्ष जसे टवटवीत होतात, त्याचप्रमाणें श्रीत्रिपुरसुंदरीच्या दर्शनानें ऋषिमुनि-जनांच्या मनाला मोठा आनंद होतो.

श्रीत्रिपुरसुंदरीचें स्थूलस्वरूप एवढें विशाल आहे कीं, तिच्या कटिप्रदेशा-जवळील भागानें तिनें पर्वतांनाहि जिंकलें आहे. देवांच्या स्त्रिया देवीदेवता तिची निरंतर सेवा करीत आहेत. ताज्या कमलाप्रमाणें तिचे नेत्र प्रफुल्लित आणि आरक्त दिसत असून, ती पाण्यानें भरून आलेल्या ढगाप्रमाणें श्यामवर्ण आहे. त्रिलोचन म्हणजे भगवान् शंकर यांची ती कुटुंबिनी आहे. अशा या श्रीमहात्रिपुरसुंदरीचा मी आश्रय करीत आहें. मी श्रीललितामहात्रिपुरसुंदरीला शरण आलों आहें.

कदम्ब-वन-वासिनीं कनक-वल्लकी-धारिणीं
महार्ह-मणि-हारिणीं मुख-समुल्लसद्वारुणीम् ।
दया-विभव-कारिणीं विशद-रोचना-चारिणीं
त्रिलोचन-कुटुम्बिनीं त्रिपुरसुन्दरीमाश्रये ॥ २ ॥

श्री-महात्रिपुरसुंदरी ही कदंबवनामध्यें वास्तव्य करीत आहे. तिनें आपल्या हातांत सोन्याचा वीणा अर्थात् तंबोरा धारण केलेला आहे. तिनें आपल्या गळ्यांत अत्यंत मौल्यवान् रत्नांचे हार घातलेले आहेत. वारुणी म्हणजे मद्य आणि पाणी यांच्या मिश्रणापासून तयार केलेलें एक प्रकारचें पेय. हें पेय प्राशन केल्यामुळें जिचें मुख प्रसन्न दिसत आहे. तें पेय जिच्या मुखात शोभत आहे. कांहीं लोक वारुणी शब्दाचा अर्थ द्राक्षासव असाहि करतात. ती दयेनें भक्तजनांना वैभव प्राप्त करून देणारी आहे. विशद म्हणजे स्वच्छ, निर्मल असें गोरोचन तिनें अंगाला लावलेलें आहे. गोरोचनाची उटी चर्चिलेली आहे. अशा या त्रिलोचन-कुटुंबिनी श्रीत्रिपुरसुंदरीचा मी आश्रय घेत आहें. मी श्रीत्रिपुरसुंदरीला भजत आहें.

कदम्ब-वनशालया कुचभरोल्लसन्मालया
कुचोपमित-शैलया गुरुकृपा-लसद्वेलया ।
मदारुण-कपोलया मधुर-गीत-वाचालया
कयाऽपि घननीलया कवचिता वयं लीलया ॥ ३ ॥

कदंबवन हेंच श्रीललितामहात्रिपुरसुंदरीची 'शाला' म्हणजे वसतिस्थान आहे. तिच्या वक्षस्थलावर मोत्यांचे व फुलांचे हार शोभत आहेत. पर्वतांचीच ज्यांना उपमा द्यावी असे तिचे स्तन भक्तजनांना तृप्त करण्याकरितां अमृतानें पूर्ण भरलेले आहेत. गुरुकृपेनेंच तिच्या स्वरूपमर्यादेचा प्रकाश हृदयामध्यें पडूं शकतो. गुरुकृपेनेंच तिची रूपमर्यादा भक्तांच्या हृदयांत विलसते – प्रकाशते. मद म्हणजे तारुण्याचा भर, त्यानें तिचे कपोल म्हणजे गाल आरक्त दिसत आहेत. तिचे मधुर गीतांचे आलाप सारखे चाललेले आहेत. मेघाप्रमाणें श्यामवर्ण असलेली ती एक अनिर्वचनीय मूर्तिमंत लीलाच आहे. अशा या श्रीत्रिपुरसुंदरीनें "वयं कवचिताः" म्हणजे आमचें रक्षण केलेलें आहे. कवच शब्दाचा अर्थ चिलखत असा आहे. तें जसें शरीराचें संरक्षण करतें त्याचप्रमाणें माता त्रिपुरसुंदरी ही सर्वतोपरी आमचें संरक्षण करीत आहे, असा याचा अर्थ समजावा.

कदम्ब-वन-मध्यगां कनक-मण्डलोपस्थितां
षडम्बुरुह-वासिनीं सतत-सिद्ध-सौदामिनीम् ।
विडम्बित-जपा-रुचिं विकच-चन्द्र-चूडामणिं
त्रिलोचन-कुटुम्बिनीं त्रिपुरसुन्दरीमाश्रये ॥ ४ ॥

श्रीललितामहात्रिपुरसुंदरी ही नेहमी कदंबवनाचाच आश्रय करून राहते. कारण तिला तें अत्यंत प्रिय आहे. सुवर्णाच्या अथवा सुवर्णाप्रमाणें देदीप्यमान असलेल्या श्रीचक्ररूपी मंडलावर ती विराजमान झालेली आहे. सर्वांच्या शरीरांत असलेल्या षट्कमलांमध्यें अर्थात् मूलाधारादि सहा चक्रांमध्यें तिचेंच वास्तव्य आहे. ती "सततसिद्धसौदामिनी" म्हणजे सर्वकाळ योगीजनांच्या अंतःकरणांत नित्य प्रकाश देणारी जणुं कांहीं मालाकार विद्युलताच आहे ! वस्तुतः विद्युलता ही चंचल असते. पण प्रकृतस्थलीं भक्तजनांवर अनुग्रह करण्याकरितां 'सततसिद्ध' म्हणजे नित्य एकरूपानें अथवा स्थिररूपानें रहात आहे. तिची अंगकांति जणुं

कांहीं जास्वंदीच्या फुलांचें अनुकरण करीत आहे. 'विकच' म्हणजे उज्ज्वल अथवा प्रफुल्लित असलेला चंद्र हा तिचा चूडामणि म्हणजे शिरोभूषण झालेला आहे. अशा या श्रीत्रिपुरसुंदरी देवीच्या चरणकमलांचा मी आश्रय करीत आहें.

कुचाञ्चित-विपञ्चिकां कुटिल-कुन्तलालंकृतां
कुशेशय-निवासिनीं कुटिल-चित्त-विद्वेषिणीम् ।
मदारुण-विलोचनां मनसिजारि-सम्मोहिनीं
मतङ्ग-मुनि-कन्यकां मधुर-भाषिणीमाश्रये ॥ ५ ॥

"अञ्चित" म्हणजे वर्तुळाकार व सुंदर असा वीणा (विपञ्चिका) जिच्या स्तनमंडलाच्या सांन्निध्यांत शोभत आहे. मस्तकावरील कुटिल केश अत्यंतच शोभा देत आहेत. जणुं कांहीं त्यांनीं ती अलंकृत झालेली आहे. कुशेशय म्हणजे कमळ. कमळामध्यें ती निवास करीत रहाते म्हणून तिला कुशेशय-निवासिनी असें म्हणतात. कमलासना, कमलालया हीं तर तिचीं नांवेंच आहेत. जे लोक कुटिलचित्त असतात अर्थात् शठ-दुष्ट असतात, त्यांचा ती विद्वेष म्हणजे तिरस्कार करते. तारुण्यभरामुळें तिचे नेत्र आरक्तवर्ण दिसत आहेत. "मनसिज" म्हणजे कामदेव, त्याचा अरि म्हणजे शत्रु आपल्या तृतीय नेत्रांतील अग्नीनें कामदेवाला भस्मसात करून टाकणारे स्मरहर म्हणजे भगवान् शंकर, त्यांच्याहि चित्तांत ती संमोह निर्माण करणारी, त्यांनाहि ती आपल्या अलौकिक व अद्वितीय गुणांनीं मोहून टाकणारी आहे. मतंगऋषींना पावन करण्याकरितां त्यांची ती कन्याहि झालेली आहे म्हणून तिला मतंगमुनिकन्यका असें म्हटलेलें आहे. ती मोठी मधुर भाषण करणारी आहे. आचार्य म्हणतात, अशा या त्रिपुर-सुंदरी देवीला मी अनन्यभावानें भजत आहें. ती माझे कल्याण करो.

स्मरेत्प्रथम-पुष्पिणीं रुधिर-बिन्दु-नीलाम्बरां
गृहीत-मधु-पात्रिकां मदविघूर्ण-नेत्राञ्चलाम् ।
घन-स्तन-भरोन्नतां गलित-चूलिकां श्यामलां
त्रिलोचन-कुटुम्बिनीं त्रिपुरसुन्दरीमाश्रये ॥ ६ ॥

नवयौवनामध्यें पदार्पण करीत असलेल्या रमणीय वयांत ती असल्या-प्रमाणें तिचें चिंतन करावें. " निवसतु हृदि बाला नित्यकल्याणशीला " असें तिचें

ध्यान करावें. बालात्रिपुरसुंदरी हें तिचेंच नांव आहे. तांबडे ठिपके असलेलें निळें वस्त्र तिनें परिधान केलेलें आहे. तिच्या हातांत मधुपात्र असून तारुण्यमदाच्या भरानें तिच्या नेत्रांचे अंचल म्हणजे कडेचे भाग मोठे चंचल दिसत आहेत. भक्तजनांचें पोषण करण्याकरितां धारण केलेल्या अमृतानें जिचें स्तन उन्नत दिसत आहेत, मस्तकावरील तुरा खालीं लोंबत असून जिची अंगकांति श्यामल म्हणजे काळी सांवळी आहे, अशा त्या त्रिलोचन कुटुंबिनी त्रिपुरसुंदरीचा मी आश्रय करीत आहें.

सकुङ्कुमविलेपनामलकचुम्बि-कस्तूरिकां
समन्द-हसितेक्षणां सशर-चाप-पाशाङ्कुशाम् ।
अशेषजनमोहिनीमरुणमाल्यभूषाम्बरां
जपा-कुसुम-भासुरां जपविधौ स्मराम्यम्बिकाम् ॥ ७ ॥

अंबिका-अंबा-जगदंबा-श्रीललितामहात्रिपुरसुंदरी, तिचें मी जपानुष्ठानाच्या वेळीं चिंतन करीत आहें. कशी आहे ती त्रिपुरसुंदरी देवी तें पहा. तिनें आपल्या भव्य कपाळीं केशराचा मळवट भरलेला असून मधोमध भांगेपर्यंत कस्तुरीचा टिळा धारण केलेला आहे. मुखावर मंदहास्य झळकत असून, तिचे नेत्र प्रफुल्लित दिसत आहेत. तिनें आपल्या हातांत फुलांचे बाण, उंसाचें धनुष्य, पाश आणि अंकुश धारण केलेले आहेत. देव, दानव, मानव, यक्ष, राक्षस इत्यादि अशेष जनांच्या मनाला आपल्या अलौकिक सौंदर्यानें ती मोहित करीत असून, तिनें आपल्या गळ्यांत अरुणवर्ण असलेल्या फुलांच्या माळा घातलेल्या आहेत. तिचीं भूषणेंहि अरुणवर्णच आहेत आणि परिधान केलेलें वस्त्रहि पण अरुणवर्णच आहे. तिची अंगकांति जास्वंदीच्या फुलाप्रमाणें भासुर म्हणजे देदीप्यमान आरक्तवर्ण आणि टवटवीत दिसत आहे. अशा अंबिकेचें मी जपाच्या वेळीं स्मरण करीत आहें. श्रीविद्येचा जप करतांना याच श्लोकानें तिचें ध्यान करण्याचा संप्रदाय आहे.

पुरन्दर-पुरन्ध्रिका-चिकुर-बन्ध-सैरन्ध्रिकां
पितामह-पतिव्रता-पटु-पटीर-चर्चा-रताम् ।
मुकुन्द-रमणी-मणी-लसदलंक्रिया-कारिणीं
भजामि भुवनाम्बिकां सुर-वधूटिका-चेटिकाम् ॥ ८ ॥

पुरंदर म्हणजे इंद्र त्याची स्त्री शची अथवा इंद्राणी त्याचप्रमाणें इतरहि देवांच्या स्त्रिया जिची वेणी घालण्याकरितां दासीप्रमाणें सेवा करीत आहेत. तसेंच पितामह म्हणजे ब्रह्मदेव त्यांची पतिव्रता म्हणजे स्त्री अर्थात् ब्रह्माणी ही जिच्या अंगाला कर्पूर-केशरमिश्रित अशा सुंदर चंदनाची उटी लावण्याचें कार्य करीत आहे. मुकुंदपत्नी श्रीलक्ष्मीदेवी ही जिच्या अंगावर रत्नखचित अलंकार घालण्याचें कार्य करीत आहे. संपूर्ण देवांच्या स्त्रिया, अप्सरा जिचें दास्य करीत आहेत, त्या त्रिभुवनाची जननी असलेल्या श्रीललितामहात्रिपुरसुंदरीच्या चरणकमलांचा मी भक्तिपूर्वक आश्रय करीत आहें.

■ ■ ■

ललितापञ्चरत्नस्तोत्रम् ।

[श्रीविद्यास्वरूप श्रीललितामहात्रिपुरसुंदरीचें हें पांच श्लोकांनीं केलेलें स्तोत्र हें प्रातःस्मरणस्तोत्र आहे. उपासक ज्या देवतेची उपासना करीत असेल त्यानें पहाटे उठल्याबरोबर जें सर्वसामान्य प्रातःस्मरण करावयाचें असतें त्याच वेळीं आपल्या विशिष्ट उपास्य देवतेचेंहि प्रातःस्मरण करणें इष्ट असतें. श्रीविद्येच्या उपासकांनीं हें प्रातःस्मरण नित्य पाठांत ठेवावें अशी याची योग्यता आहे. पहिल्या श्लोकांत श्रीच्या मुखारविंदाचें चिंतन असून दुसऱ्या श्लोकांत तिच्या भुजलतांचें वर्णन केलेलें आहे. तिसऱ्या श्लोकांत चरणकमलांचें वर्णन केलेलें आहे तर चौथ्या श्लोकांत उपनिषदांनीं प्रतिपादन केलेल्या परम तात्त्विक स्वरूपाचें चिंतन केलेलें आहे. पांचवा श्लोक श्रीच्या नामस्मरणानें नटलेला आहे. हे पांच श्लोक खरोखर रत्नासारखे बहुमोलाचे आहेत. म्हणूनच यांना श्रीललितापंचरत्न-स्तोत्र असें म्हटलेलें आहे.]

प्रातः स्मरामि ललितावदनारविन्दं
बिम्बाधरं पृथुलमौक्तिक-शोभिनासम् ।
आकर्ण-दीर्घ-नयनं मणिकुण्डलाढ्यं
मन्दस्मितं मृगमदोज्ज्वल-फालदेशम् ॥ १ ॥

जगज्जननी श्रीमाता ललितादेवी हिच्या मुखकमलाचें मी प्रातःकाळीं स्मरण करीत आहें. उदयाला येणाऱ्या सूर्याच्या बिंबाप्रमाणें जिचा अधरोष्ठ आरक्तवर्ण

आहे अथवा बिंब म्हणजे पिकलेलें तोंडलीचें फळ. त्या फळाप्रमाणें जिचे ओठ आरक्तवर्ण दिसत आहेत, टपोऱ्या मोत्यांच्या अलंकारानें जिचें नाक अत्यंत शोभायमान दिसत आहे, जिचे नेत्र कानांपर्यंत लांब अर्थात् अत्यंत विशाल दिसत आहेत, त्याचप्रमाणें कानांमध्यें रत्नजडित कुंडलें शोभत असून जिचें स्मित म्हणजे गालांतल्या गालांत हंसणें हें अत्यंत मंद म्हणजे सौम्य दिसत आहे. तसेंच जिच्या भालप्रदेशीं कस्तूरीतिलक अत्यंत सुंदर शोभा देत आहे. अशा या श्रीललितादेवीचें मी प्रातःस्मरण करीत आहें.

प्रातर्भजामि ललिताभुज-कल्पवल्लीं
रक्ताङ्गुलीय-लसदङ्गुलि-पल्लवाढ्याम् ।
माणिक्य-हेमवलयाङ्गद-शोभमानां
पुण्ड्रेक्षु-चाप-कुसुमेषु-सृणीर्दधानाम् ॥ २ ॥

हे आई ललितामाते ! तुझे बाहु ही जणुं कांहीं भक्तजनांचे सकल मनोरथ पूर्ण करणारी कल्पलताच आहे. माणिकें ज्यांच्यामध्यें जडविलेलीं आहेत अशा अंगठ्यांनीं शोभायमान दिसणारीं तुझ्या हाताचीं अत्यंत कोमल व आरक्तवर्ण असलेलीं बोटें हे जणुं कांहीं त्या कल्पलतेचे पल्लवच आहेत. हिऱ्या-माणकांनीं युक्त असलेलीं सुवर्णकंकणें आणि अंगद नांवाचीं बाहुभूषणें त्यांमध्यें शोभत आहेत. त्याचप्रमाणें तांबड्या उंसाचें धनुष्य, फुलांचे बाण, पाश आणि अंकुश तूं आपल्या हातांमध्यें धारण केलेले आहेस. आई ललितामाते, मी या मंगलमय सुप्रभातीं तुझ्या बाहुरूपीं कल्पलतेचा आश्रय करीत आहें. चिंतन करीत आहें. तुझ्या कृपेनें माझें सकल मनोरथ पूर्ण होवोत.

प्रातर्नमामि ललिताचरणारविन्दं
भक्तेष्टदान-निरतं भव-सिन्धु-पोतम्
पद्मासनादि-सुरनायक-पूजनीयं
पद्माङ्कुश-ध्वज-सुदर्शनलाञ्छनाढ्यम् ॥ ३ ॥

आई ललितामाते ! मी प्रातःकाळीं तुझ्या चरणकमलीं नमस्कार करीत आहें. तुझीं चरणकमलें भक्तजनांना अभीष्ट दान करण्यामध्यें निरंतर तत्पर आहेत. भवसागर तरून जाण्यासाठीं उपयुक्त असलेलें तें जहाजच आहे. 'पद्मासन'

म्हणजे श्रीहरीच्या नाभिस्थानापासून उत्पन्न झालेल्या कमळामध्यें निरंतर वास्तव्य करणारे ब्रह्मदेव, त्याचप्रमाणें आदि शब्दानें इंद्र, वरुण, कुबेर इत्यादि समजावेत. या बड्याबड्या देवांनीं पूजा करण्यास आदर-सत्कार करण्यास ते योग्य आहेत. तुझ्या दोन्ही पायांवर कमल, अंकुश, पताका आणि चक्र इत्यादि शुभ चिह्नें विराजत आहेत. तीं चिह्नें तुझ्या मोठेपणाचीं, ऐश्वर्याचीं व वात्सल्याचीं द्योतक आहेत. आई ! तुझ्या त्या चरणारविंदीं मी प्रातःकाळीं नमस्कार करीत आहें.

प्रातः स्तुवे परशिवां ललितां भवानीं
त्रय्यन्त-वेद्य-विभवां करुणानवद्याम् ।
विश्वस्य सृष्टि-विलय-स्थिति-हेतुभूतां
विश्वेश्वरीं निगम-वाङ्मनसातिदूराम् ॥ ४ ॥

परशिवा म्हणजे परब्रह्मस्वरूप असलेल्या श्रीललिताभवानीची मी प्रातःकाळीं भक्तियुक्त अन्तःकारणानें स्तुति करीत आहें. तिचें वैभव जाणावयाचें झाल्यास "त्रय्यन्त" म्हणजे उपनिषदें हेंच एक साधन आहे. ती पूर्णपरब्रह्मस्वरूप असल्यामुळें उपनिषदांशिवाय तिच्या ऐश्वर्याची व स्वरूपाची यथार्थ कल्पना येणार नाहीं. त्रयी म्हणजे वेद व अन्त म्हणजे तात्पर्यस्वरूप असलेला शेवटचा भाग अर्थात् वेदान्त. वेदान्तानेंच जगन्मातेचें वैभव जाणण्यास योग्य असल्यामुळें तिला "त्रय्यन्तवेद्यविभवा" असें विशेषण दिलेलें आहे. ललितादेवी ही करुणेनें अनवद्या म्हणजे अत्यंत उदार आहे. सर्व विश्वाची उत्पत्ति, स्थिति आणि प्रलय हे तिच्यामुळेंच होत असतात. विद्येची – अध्यात्मविद्येची ती ईश्वरी म्हणजे अधिष्ठात्री देवता आहे. वेदालाहि तिचें साकल्यानें आकलन होत नाहीं, मग मानवाच्या वाणीची आणि मनाची कथा काय ? अर्थात् वेदांना, वाणीला आणि मनाला अतिदूर म्हणजे वर्णन करण्यास अथवा अवगाहन करण्यास कठीण असलेली. तात्पर्य, अशा या ललितामातेची मी प्रातःकाळीं स्तुति करीत आहें.

प्रातर्वदामि ललिते तव पुण्यनाम
कामेश्वरीति कमलेति महेश्वरीति ।
श्रीशाम्भवीति जगतां जननी परेति
वाग्देवतेति वचसा त्रिपुरेश्वरीति ॥ ५ ॥

आई माते ललिते ! मी प्रातःकाळच्या वेळीं तुझ्या पुण्यकारक नामांचा उच्चार करीत आहें. तूं सकल कामना पूर्ण करणारी असल्यामुळें तुला कामेश्वरी असें म्हणतात. तूं त्रैलोक्याची मूर्तिमंत लक्ष्मीच असल्यामुळें तुला कमला असेंहि म्हणतात. तूं मानवी जीवनाला पूर्ण आनंदी करणारी आहेस म्हणून "कमला" हें तुझें नांव अन्वर्थ आहे. तूं त्रैलोक्याची सर्व श्रेष्ठ अधिकारी असल्यामुळें तुला महेश्वरी असें म्हणतात. "शं" म्हणजे सुख अथवा कल्याण. सर्व विश्वाचें कल्याण तुझ्यामुळेंच होत असल्यामुळें तुला शाम्भवी असें म्हणतात. तूं सर्व जगाची जननी असल्यामुळें तुला परा अथवा पराम्बा असेंहि म्हणतात. तूं भूतमात्रांच्या वाणीमध्यें वाग्देवतेच्या रूपानें वास्तव्य करीत आहेस अथवा तूं प्रत्यक्ष सरस्वतीच आहेस म्हणून तुला वाग्देवता असें म्हणतात. स्थूल, सूक्ष्म आणि कारण या तिन्ही पुरांची, तिन्ही देहांची तूं अधिष्ठात्री देवता आहेस म्हणून तुला त्रिपुरेश्वरी असेंहि म्हटलेलें आहे. आई ! अशा अनेक शब्दांनीं तुझ्या नांवांचा व्यवहार होत असतो. हीं तुझीं सर्व नांवें अत्यंत पुण्यकारक आहेत. या सुप्रभातीं मी तुझ्या पुण्यकारक नामांचा उच्चार करीत आहें.

यः श्लोकपञ्चकमिदं ललिताम्बिकायाः
सौभाग्यदं सुललितं पठति प्रभाते ।
तस्मै ददाति ललिता झटिति प्रसन्ना
विद्यां श्रियं विमलसौख्यमनन्तकीर्तिम् ॥ ६ ॥

सुललित म्हणजे अत्यंत आनंददायक आणि सौभाग्यद म्हणजे उत्तम भाग्य प्राप्त करून देणारे असे हे श्रीललितांबा महात्रिपुरसुंदरीचें स्तवन करणारे पांच श्लोक जो कोणी भक्तियुक्त अंतःकरणानें प्रभातकाळीं म्हणेल, या श्लोकांचें पठण करील, त्याला श्रीललितांबा महादेवी तत्काळ प्रसन्न होऊन विद्या, वैभव, विमल म्हणजे निरुपाधिक अर्थात् नित्य आणि निरतिशय असें सौख्य म्हणजे आनंद व अनंत कीर्ति हें सर्व कांहीं देईल. या सर्वांचा लाभ तिच्या कृपेनें होईल. असा या पांच श्लोकांचा महिमा आहे.

■ ■ ■

सौन्दर्यलहरीस्तोत्रम् ।

संस्कृत भाषेंतील स्तोत्रवाङ्मयांत सौंदर्यलहरी या स्तोत्राचें स्थान फारच उच्च कोटीचें आहे. हें स्तोत्र म्हणजे आदिशक्तीच्या उपासनेचा आत्मा आहे. श्रीशक्तिदेवीच्या उपासनाक्षेत्रांत कांहीं घडलें नाहीं तरी निदान सौंदर्यलहरी या स्तोत्राचा पाठ तरी अवश्य घडावा. या स्तोत्राच्या पाठानेंहि श्रीविद्येची उपासना घडते असें या स्तोत्राचें माहात्म्य आहे. प्रायः सात्विक, सुविद्य आणि सुस्थितींतील लोकच या उपासनेच्या क्षेत्रांत पदार्पण करीत असतात. अथवा भाग्यानें जे कोणी श्रीविद्येची उपासना करतात, त्यांना ते सात्विक, सुविद्य आणि सुस्थितींतील म्हटलें जाईल अशीच अवस्था श्रीदेवी भगवतीच्या कृपेनें प्राप्त होत असते असें दृष्टीस पडतें. असा हा श्रीविद्येच्या उपासनेचा महिमा आहे. या सर्व फलापेक्षांहि तात्विकदृष्ट्या शुद्ध समाधानाचा लाभ होणें हें श्रीविद्येच्या उपासनेचें असाधारण फल आहे. तांत्रिकदृष्ट्या श्रीविद्येची उपासना घडणें हें अत्यंत दुरापास्त आहे. श्रीविद्येच्या उपासनेंत श्रीचक्रपूजेला अथवा श्रीयंत्राच्या पूजेला अग्रस्थान आहे. या श्रीयंत्राची माहिती श्रीसौंदर्यलहरीस्तोत्राच्या अकराव्या श्लोकांत दिलेली आहे. श्रीचक्राच्या पूजेचें फल अत्यंत श्रेष्ठ असेल यांत नवल काय, केवळ भक्तियुक्त अन्तःकरणानें श्रीयंत्राचें दर्शनहि घेतलें तरी सांगोपांग शंभर यज्ञ केल्याचें, सोळा महादानें दिल्याचें आणि साडेतीन कोटि तीर्थांमध्यें स्नान केल्याचें फळ मिळतें, असा श्रीचक्राच्या दर्शनाचा महिमा शास्त्रांत वर्णिलेला आहे. तीनरंगी श्रीचक्रचित्रांतील श्लोक पहा.

श्रीविद्येच्या उपासनेच्या दृष्टीनें आचार्यांनीं केलेलीं भवानीभुजंगमस्तोत्र, देवीभुजंगमस्तोत्र, कल्याणवृष्टिस्तोत्र, मंत्रमातृकामानसपूजास्तोत्र हीं स्तोत्रें अत्यंत महत्त्वाचीं आहेत. मानसपूजेच्या दृष्टीनें आचार्यांनीं केलेलीं श्रीत्रिपुरसुंदरी देवीचीं आणखी एक-दोन स्तोत्रें चांगलीं आहेत. पण तीं मोठीं असल्यामुळें त्यांचा अंतर्भाव या ग्रंथांत करतां आला नाहीं. तथापि जीं स्तोत्रें दिलीं आहेत तीं श्रीललितामहात्रिपुरसुंदरीच्या उपासनेला अत्यंत उपयुक्त अशींच आहेत. त्यांतहि ही सौंदर्यलहरी म्हणजे फारच महत्त्वाचें स्तोत्र आहे. " सर्वे पादा हस्तिपदे निमग्नाः " या न्यायानें सर्व स्तोत्रांचा भाव यांत समाविष्ट झालेलाच आहे. भगवद्गीतेच्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास हें स्तोत्र " सर्वतः

सम्प्लुतोदके " अथांग जलानें भरलेल्या महासागरासारखें सर्वांग संपूर्ण आहे. अथवा श्रीविद्येच्या उपासना-साधन-मंदिराचा हें स्तोत्र कळस आहे असें म्हटलें तरी त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. या स्तोत्रानें संस्कृत भाषेंतील महा-महा विद्वानांचीं मनें आपल्याकडे आकृष्ट करून घेतलेलीं आहेत. या स्तोत्रावर प्राचीन विद्वानांच्या छत्तीस टीका उपलब्ध आहेत हीच एक गोष्ट या स्तोत्राचें बड्या-बड्या विद्वान् लोकांना केवढें आकर्षण वाटत आहे, हें लक्षांत घेण्यास पुरेशी आहे. अशा या अधिकारी आणि विद्वान् लोकांनीं पुरस्कारलेल्या श्रीसौंदर्य-लहरीचा महिमा मी काय वर्णन करणार ? आणि तो कोणत्या शब्दांनीं वर्णन करणार ? असें हें अत्यंत महत्त्वाचें स्तोत्र मराठी भाषेच्या भाविक भक्तांच्या हातीं देतांना मनाला अत्यंत आनंद वाटत आहे. हें स्तोत्र म्हणजे आचार्यांनीं श्रीविद्येच्या भाविक भक्तांना दिलेला हा एक अपूर्व आनंदाचा निधीच आहे.

आचार्यांना हें स्तोत्र कोणत्या वयांत व कसें स्फुरलें ! याचा इतिहास मोठा मनोरम आहे. तो वाचकांनीं सुबोधस्तोत्रसंग्रहाच्या पहिल्या भागांत दिलेल्या आचार्यांच्या संक्षिप्त चरित्रांत पान एकावनमध्यें "काव्यस्फूर्ति" या सदरांत अवश्य पहावा. हें स्तोत्र आचार्यांनीं केलेलें नसावें अशी शंका एक-दोन विद्वानांनीं घेतलेली आहे. पण त्यांचा युक्तिवाद अगदीच पोकळ असल्यामुळें असंख्य विद्वानांनीं तिकडे लक्षच दिलेलें नाहीं. एवढेंच नव्हे तर हें स्तोत्र निश्चित आचार्यांनींच केलेलें आहे असा आपला निर्वाळा देऊन बहुसंख्य विद्वज्जनांनीं या स्तोत्राचा पुरस्कार केलेला आहे. आपणहि या निरर्थक असलेल्या शंका-कुशंकांच्या कर्दमापासून आपल्याला अलिप्त ठेवावें हेंच श्रेयस्कर होय.

अशीहि एक आख्यायिका आहे कीं, एकदां भगवान् आद्य श्रीशंकराचार्य कैलासावर गेले. तेथें पार्वतीसह विराजमान असलेल्या शंकरांना पाहून त्यांनीं भक्तिभावानें साष्टांग प्रणिपात केला. आशुतोष भगवान् शंकर प्रसन्न झाले. म्हणाले काय पाहिजे आहे ? आचार्यांनीं उत्तर दिलें, कृपा करून आपण मला सौंदर्यलहरी द्या. शंकरांनीं सौंदर्यलहरीचीं लिहिलेलीं पानें आचार्यांच्या स्वाधीन केलीं ! आचार्य तीं पानें घेऊन निघाले तोंच नंदिकेश्वराची दृष्टि त्यांच्यावर गेली. तो नंदी आचार्यांच्या अंगावर झपाट्यानें धांवला ! त्यानें आचार्यांच्या हातांतील कांहीं पानें तोंडानें हिसकावून घेतलीं. राहिलेलीं पानें हातांत घेऊन आचार्य मोठ्या लगबगीनें धूम ठोकून भूमंडलावर आले. निवांतपणें

बसून श्लोकांची जुळवाजुळव करूं लागले. तों काही श्लोक खंडित असल्याचें आढळून आलें. त्यांनीं पुन्हां शंकरांची आराधना केली. शंकरांच्या कृपेनें त्रुटित झालेले श्लोक त्यांना स्फुरले आणि संपूर्ण सौंदर्यलहरी हातीं आल्याचा आनंद झाला. तीच ही सौंदर्यलहरी आहे. कांहीं असो; आख्यायिका या निर्णायक नसल्या तरी सौंदर्यलहरी हें स्तोत्र अलौकिक आहे यांत शंकाच नाहीं. अशा या अलौकिक स्तोत्राचा लाभ आचार्यांकडूनच जनतेला झाला आहे हेंहि तितकेंच निश्चित होय.

कांहीं लोक सौंदर्यलहरीचे दोन भाग मानतात. एक्केचाळीस श्लोकांच्या पहिल्या अंशाला आनंदलहरी असें म्हणतात, तर एकूणसाठ श्लोकांचा दुसरा अंश सौंदर्यलहरी म्हणून मानला जातो. कांहीं लोकांच्या मतानें सौंदर्यलहरीचे श्लोक एकशेंएक आहेत, तर कांहीं ग्रंथांत एकशेंदोन व एकशेंतीनहि श्लोक असल्याचें दृष्टीस पडतें. पहिला अंश मननाला योग्य अशा त्रिपुरसुंदरीच्या तात्त्विक स्वरूपाचें प्रतिपादन करीत आहे, तर दुसरा अंश ध्यानाला योग्य अशा तिच्या सगुण स्वरूपाचें प्रतिपादन करीत आहे. प्रायः लोकव्यवहारामध्यें या दोन्ही अंशांना मिळून सौंदर्यलहरी हें एकच नांव दिलेलें आढळतें.

साहित्यशास्त्राच्या दृष्टीनेंहि या स्तोत्राकडे दृष्टि टाकल्यास हें स्तोत्र हें एक अद्वितीय काव्य आहे, असेंच कोणालाहि मान्य करावें लागेल, अशीच या स्तोत्राची रचना आहे. तंत्रशास्त्र, मंत्रशास्त्र, योगशास्त्र, आणि तत्त्वज्ञान यांतील गूढ रहस्यें इतक्या सहज रीतीनें यांत समावलेलीं आहेत कीं, सामान्यपणें स्तोत्र म्हणतांना चटकन् तीं लक्षांतहि येत नाहींत. अनेक विद्वानांनीं याच्यावर इतक्या टीका लिहिल्या त्यांतील रहस्यहि हेंच आहे. शास्त्रीय सिद्धान्त अवघड, पण ते मोठ्या गोड शब्दांत येथें मांडलेले आहेत. "कान्तासंमिततयोपदेशयुजे" प्रिय पत्नी आपल्या पतिराजाच्या मनांत ज्याप्रमाणें गोड गोड शब्द बोलून सुविचार भरविते त्याचप्रमाणें काव्याचाहि उपयोग होत असतो. हा जो काव्याचा एक हेतु सांगितला जातो तोहि या स्तोत्रांत पूर्णपणें सिद्धीस गेलेला आहे.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं म्हटल्याप्रमाणें "वाचें बरवें कवित्व । कवित्वींहि रसिकत्व। रसिकत्वीं परतत्त्व। स्पर्शु जैसा" असा हा उत्तरोत्तर उत्कर्षाकडे धांव घेणारा उत्कृष्ट काव्याचा जो स्वभाव तोहि या स्तोत्रांत पहावयास सांपडेल. आचार्यांच्या

शब्दांत कवित्व तर आहेच, पण त्या कवित्वांतहि रसिकत्व म्हणजे रसिक जनांच्या चित्ताला आकृष्ट करणारे शृंगार, करुणा, अद्भुत आणि शांत इत्यादि विविध रसहि ठिकठिकाणीं दृष्टीस पडतात. शांतरस हा तर आचार्यांच्या स्तोत्रांतला जणुं कांहीं आत्माच आहे ! शरीरांत जसा आत्मा नांदत असावा त्याप्रमाणें आचार्यांच्या स्तोत्रांत शांतरस हा आपल्या अद्वितीय वैभवानें विराजत आहे. आचार्यांच्या स्तोत्रवाङ्मयांत परतत्त्वाला – शिवाद्वैत, शाक्ताद्वैत अथवा ब्रह्माद्वैत कांहीं म्हणा सर्वश्रेष्ठ अद्वैततत्त्वाला सहजच स्पर्श करतां येतो म्हणून आचार्यांच्या या स्तोत्ररूपी काव्यानें उत्कर्षाच्या परंपरेची चरम सीमा गांठलेली आहे. या विधानाचें पूर्ण सत्यत्व आपल्याला सौंदर्यलहरी या स्तोत्रांत पहावयास सांपडेल. या स्तोत्रांत ओज आहे, प्रसाद आहे, माधुर्य आहे, विविध अलंकार आहेत. इष्ट देवतेची स्तुति करण्याच्या दृष्टीनें योजिलेलें शिखरिणीवृत्तहि अत्यंत बहारीचें आहे.

आचार्यांचें सौंदर्यलहरी हें स्तोत्र तंत्रशास्त्राच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें आहे. यांतील प्रत्येक श्लोक मंत्रस्वरूप आहे. प्रत्येक श्लोकांत कांहीं बीजभूत मंत्र अंतर्भूत असतातच. प्रत्येक श्लोकाला पृथक् पृथक् यंत्रहि आहे. त्याची पूजा-अनुष्ठानपद्धति आहे. त्या सर्वांचीं फलेंहि पण पृथक् पृथक् निर्दिष्ट केलेलीं आहेत. श्रीयंत्र हें तर या स्तोत्रांतील मुख्य यंत्र आहे. श्रीविद्या ही या स्तोत्राची अधिष्ठात्री देवता आहे. श्रीचक्राच्या निरूपणाच्या मिषानें आपल्या देहालाच श्रीचक्र समजून देहांतील षट्चक्रांचें या स्तोत्रांत विषयसंदर्भानें अत्यंत उत्तम विवेचन केलेलें असून उपासकाची कुंडलिनी कशी जागृत होते व तो कुंडलिनी-शक्तीच्या जागृतीनें अंन्तर्मुख होऊन शिवशक्तिस्वरूपाशीं कसा समरस होतो, हाहि विषय मोठ्या बहारीनें प्रतिपादन केलेला आहे. अष्टांगयोगाच्या अनुष्ठानानें योगी ज्या निर्बीज समाधि-अवस्थेला पोहोंचतो ती अवस्था या स्तोत्राच्या पाठानें, मननानें व निदिध्यासानें उपासकाला प्राप्त होईल अशीच या स्तोत्राची रचना आचार्यांनीं मोठ्या कुशलतेनें केलेली आहे. रचना म्हणण्यापेक्षां कांहीं विचारवंत लोक या स्तोत्राला आचार्यांची स्फूर्तिच मानतात. अशा या स्तोत्राचा लाभ होणें हें एक आपलें मोठें भाग्यच आहे यांत संशय नाहीं. जगज्जननी श्रीललिता-महात्रिपुरसुंदरी आम्हांला आत्मस्वरूपाचा साक्षात्कार करून देऊन कृतार्थ करो हीच तिच्या चरणीं आमची अनन्यभावानें प्रार्थना आहे.

अनुष्ठान पद्धतीनें या स्तोत्राचा पाठ करावयाचा झाल्यास आचमन आणि प्राणायाम करून देशकाल संकीर्तन करावें. गोत्रोच्चारपूर्वक स्वतःच्या नांवाचा उच्चार करून संकल्प करावा. अस्य श्रीसौन्दर्यलहरी-स्तोत्रमन्त्रस्य गोविन्द ऋषिः अनुष्टुप्छन्द। श्रीमहात्रिपुरसुन्दरीदेवता मम अभीष्टसिध्यर्थे जपे विनियोगः। ॐ ह्रां ॐ ह्रीं याप्रमाणें सहा बीजाक्षरांनीं करन्यास आणि हृदयादि न्यास करावेत. ॐ भूर्भुवः सुवरोमिति दिग्बन्धः असें म्हणून दिग्बंध करावा. श्रीगोविन्दर्षये नमः शिरसि। अनुष्टुप्छन्दसे नमो मुखे। श्रीललितामहात्रिपुरसुन्दरीदेवतायै नमः हृदये। अभीष्टसिद्धयर्थे जपे विनियोगाय नमः सर्वाङ्गेषु। अथ ध्यानम्।

लौहित्य-निर्जित-जपा-कुसुमानुरागां
पाशाङ्कुशौ धनुरिषूनपि धारयन्तीम्।
ताम्रेक्षणामरुण-माल्य-विशेष-भूषां
ताम्बूल-पूरित-मुखीं त्रिपुरां नमामि॥

श्रीललितामहात्रिपुरसुन्दरीदेवतायै नमः लं पृथिव्यात्मकं गन्धं परिकल्पयामि। याप्रमाणें पंचमानसोपचार पूजा करून मंदस्वरानें स्तोत्राचा पाठ करावा. या स्तोत्राचे ऋषि आणि छन्द यांविषयीं मतभेद दृष्टीस पडतात. कांहीं ग्रंथांत गोविंद ऋषि आणि अनुष्टुप्छंद असा उल्लेख आहे, तर कांहीं ग्रंथांत सदाशिव ऋषि आणि जगतीछन्द असा उल्लेख आहे. कोठें कोठें ईशानभैरव ऋषि आणि गायत्र्यनुष्टुप् असा दोन छंदांचा जोडीनें उल्लेख आहे. या भेदाचें मूळ संप्रदाय भेदांत असावेसें वाटतें. तांत्रिक संप्रदायांत एखाद्या स्तोत्रामध्यें जो मंत्र अभिप्रेत असेल त्या मंत्राचाच छंद त्या स्तोत्राला लावतात असा सामान्यपणें संकेत आहे. प्रस्तुत सौंदर्य-लहरी स्तोत्रांत कादिविद्या, हादिविद्या अथवा पंचदशी, षोडशी इत्यादि स्वरूपाचें अनेक मंत्र अभिप्रेत आहेत. गुरु-परंपराप्राप्त संप्रदायाला अनुलक्षून छंदांचा उल्लेख होणें हें योग्यच आहे. ऋषींच्या बाबतींतहि आचार्यांनीं या स्तोत्राचें द्रष्टृत्व आपल्या गुरूंकडे गोविंदयतींकडे दिलें असल्याचें दिसत आहे, तर मतभेदानें ते सदाशिवाकडे अथवा ईशानभैरवाकडे मानलें जात आहे. आम्ही मात्र श्रीशृंगेरीपीठ अथवा श्रीकांची कामकोटिपीठ या पीठांना अभिप्रेत असलेला शांकरसंप्रदायानुसारी पाठ स्वीकारलेला आहे. असो; आतां आपण या स्तोत्राच्या अर्थाचें मनन करूं या.]

शिवः शक्त्या युक्तो यदि भवति शक्तः प्रभवितुं
नचेदेवं देवो न खलु कुशलः स्पन्दितुमपि
अतस्त्वामाराध्यां हरि-हर-विरिञ्चादिभिरपि
प्रणन्तुं स्तोतुं वा कथमकृतपुण्यः प्रभवति ॥ १ ॥

भगवान् शिव हे जर शक्तीनें युक्त असतील तरच ते सर्व कार्य करण्यास समर्थ होतात. ते शक्तियुक्त नसतील तर त्यांच्या ठिकाणीं खरोखर स्पंदन करण्याचेंहि सामर्थ्य असूं शकत नाहीं ! म्हणून हे सकलशक्तिस्वरूपिणी माते ! ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांनीं देखील आराधना करण्यास योग्य असलेल्या तुझ्या चरणीं प्रणाम करण्यास किंवा तुझी स्तुति करण्यास, ज्याच्या पदरीं पुण्याची सामग्री नाहीं असा कोण बरें समर्थ होईल ? अर्थात् पदरीं पुण्याची सामग्री असल्याशिवाय तुझ्या चरणीं प्रणाम करण्याची बुद्धि होणार नाहीं आणि तुझी स्तुति करण्याचीहि पण बुद्धि होणार नाहीं. असा या श्लोकाचा सरळ अन्वयानुसारी अर्थ आहे.

"देवः शिवः यदि शक्त्या युक्तः भवति तदैव प्रभवितुं शक्तः, एवं नचेत् सः स्पन्दितुं अपि खलु कुशलः न । अतः हरिहरविरिञ्चादिभिः अपि आराध्यां त्वां प्रणन्तुं स्तोतुं वा अकृतपुण्यः कथं प्रभवति ॥" असा या श्लोकाचा अन्वय आहे.

आतां आपण या श्लोकाच्या विशेष अर्थाचा विचार करूं. श्रीराजराजेश्वरी श्रीविद्यास्वरूप असलेली ललितामहात्रिपुरसुंदरी ही या स्तोत्राची अधिष्ठात्री देवता आहे. ती शुद्धचैतन्यस्वरूप आहे. तिलाच आदिमाया चिच्छक्ति अथवा केवलशक्ति असेंहि म्हणतात. उत्पत्ति, स्थिति आणि प्रलय यारूपानें या विश्वप्रपंचाची जी अविरत घडामोड चाललेली आहे त्याच्या मुळाशीं तीच शक्ति कारणीभूत आहे. ती अनादि आणि अनंत असल्यामुळें तिला सनातन असेंहि म्हणतात. अभिव्यक्त होणाऱ्या सर्व कार्याचा ती शक्ति आश्रय असून तीच सर्व कार्याच्या रूपानें नटते. याच अभिप्रायानें " सृष्टिस्थितिविनाशानां शक्तिभूते सनातनि । गुणाश्रये गुणमयि नारायणि नमोस्तु ते " असें मार्कंडेय पुराणांत तिचें वर्णन केलेलें आहे.

यावर कोणी असें विचारील कीं, अहो या विश्वाच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वाला आदिविष्णु अथवा आदिनारायण असें म्हणतात. " विश्वस्य कर्ता

भुवनस्य गोप्ता " अशा पुंलिंगी शब्दांनींच त्याचें वर्णन केलेलें आहे. शक्तितत्त्व हें विश्वाच्या उत्पत्तीचें अथवा प्रवृत्तीचें मूळ आहे असें तत्त्ववेत्ते मानीत नाहींत. पण ही आशंका बरोबर नाहीं. विश्वाच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वाचें प्रतिपादन करणारा शब्द पुंलिंगी आहे का स्त्रीलिंगी आहे हा खरा महत्वाचा मुद्दा नसून त्या तत्त्वाचें स्वरूप काय आहे ? हाच खरा महत्त्वाचा विषय आहे. स्नेही अथवा मित्र या अर्थानें प्रतिपादन करणारा संस्कृतमधला मित्र शब्द नपुंसकलिंगी आहे. जल अथवा पाणी या अर्थाचा संस्कृतमधील "आप" शब्द स्त्रीलिंगी आहे. पत्नी अथवा स्त्री या अर्थाचा संस्कृतमधील "दार" शब्द पुंलिंगी आहे. याप्रमाणें शब्दाचें लिंग भिन्न असलें तरी अर्थामध्यें भेद होत नाहीं. याच न्यायानें विश्वाच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वाला आदिनारायण, आदिविष्णु, आदिशिव असे शब्द योजले काय किंवा आदिमाया, आदिशक्ति असे शब्द योजले काय, तत्त्वांत कांहींच फरक पडत नाहीं.

आदिभगवान्, आदिविष्णु, आदिनारायण अथवा आदिशिव इत्यादि शब्दांनीं ओळखलें जाणारें, विश्वाच्या मुळाशीं असलेलें जें सोपाधिक चित्तत्त्व त्या तत्त्वाचेंहि अधिष्ठान असलेलें जें निरुपाधिक चित्तत्त्व तेंच प्रकृतस्थलीं आचार्यांना आदिशक्ति, महाशक्ति अथवा केवलशक्ति या शब्दानें विवक्षित आहे. याच शक्तीच्या प्रेरणेनें परमात्मा ब्रह्मा, विष्णु आणि शिव या रूपानें नटला अनुक्रमें सर्व जगाची उत्पत्ति, स्थिति आणि प्रलय हीं कार्यें करूं लागला ! शक्तीशिवाय प्रेरणा नाहीं हा सिद्धान्त निर्विवाद आहे. याच शक्तीमुळें अव्यक्ताच्या ठिकाणीं " तदैक्षत, बहुस्याम्, प्रजायेय " या वाक्यांत सांगितल्याप्रमाणें ईक्षण आणि बहुरूपानें नटण्याच्या संकल्पाचें स्फुरण अभिव्यक्त झालें. याच शक्तीमुळें परमात्मा बहुरूपानें नटूं शकला. याच परमात्म्याला कोणी आदिविष्णु म्हणतात तर कोणी आदिशिव असेंहि म्हणतात.

आदिविष्णूच्या किंवा आदि शिवाच्या ठिकाणीं असलेली ही शक्ति त्यांच्याहून निराळ्या स्वरूपानें पहातां येत नाहीं म्हणूनच शक्ति आणि शक्तिमान् यांच्यामध्यें अभेद मानला जातो. लौकिक व्यवहारामध्यें देखील शक्तीनें शक्तिमानाला सोडलें कीं तो शक्तिमान् पूर्वीप्रमाणें शक्तिमान् या स्वरूपांत शिलक उरत नाहीं. तो शक्तिहीन अर्थात् अचेतन, जड होतो. यांच मूलशक्तीला चिच्छक्ति असें म्हटलेलें आहे. हीच चिच्छक्ति भिन्न-भिन्न पदार्थांमध्यें त्या

ग्रा पदार्थांच्या विशिष्ट शक्तीच्या रूपानें प्रतीतीला येत असते. याच अभि-
यानें "अम्बास्तव" नांवाच्या स्तोत्रांत या शक्तीचें वर्णन करतांना "हे
गज्जननी अम्बे! चंद्रामध्यें आल्हाददायक असलेली चंद्रिका हें तुझेंच रूप आहे.
र्यामध्यें प्रखर तेजाच्या रूपानें तूंच विराजमान झालेली आहेस. पुरुषांमध्यें
चैतन्यरूपानें तूंच वास्तव्य करतेस. चराचर सर्व भूतांना प्राणदान देण्याचें अथवा
ल देण्याचें वायूमध्यें असलेलें सामर्थ्यहि तूंच आहेस. गोडीच्या रूपानें पाण्यांत
आणि उष्णतेच्या रूपानें अग्नींत तूंच रहातेस. फार काय सांगावें, या विश्वांतील
दार्थमात्रांत साररूपानें तूंच रहातेस. साररूपानें सर्वत्र तूं आहेस म्हणूनच
हें विश्व रमणीय आहे. तूं जर या विश्वांतील पदार्थांना सोडलेस तर हे सारे पदार्थ
असार, तुच्छ, त्याज्य असेच होतील. "त्वं चन्द्रिका शशिनि तिग्मरुचौ
रुचिस्त्वं, त्वं चेतनाऽसि पुरुषे पवने बलं त्वम्। त्वं स्वादुताऽसि सलिले शिखिनि
त्वमूष्मा, निःसारमेव निखिलं त्वदृते यदि स्यात्।"

याच शक्तीचें आणखी एका ठिकाणीं स्तवन करतांना असें म्हटलें आहे
कीं, हें आई जगदंबे! या त्रैलोक्यामध्यें साऱ्या शब्दप्रपंचाची व विश्वप्रपंचाची
जननी तूंच आहेस. तुलाच वाग्वादिनी अथवा सरस्वती असें म्हणतात.
तुझ्यापासूनच सृष्टीच्या आरंभीं ब्रह्मा, विष्णु, महेश त्याचप्रमाणें इन्द्र, वरुण,
कुबेर इत्यादि देव प्रकट होतात आणि सृष्टीच्या अंतीं खरोखर ते सर्व तुझ्या-
मध्येंच लीन होतात! खरोखर तुझा रूपमहिमा अचिंत्य आहे. तुझें काय वर्णन
करावें? "सर्वश्रेष्ठ शक्ति" याच एका शब्दानें तुझें वर्णन केलें जातें! "शब्दानां
जननी त्वमत्र भुवने वाग्वादिनीत्युच्यसे, त्वत्तः केशव-वासव-प्रभृतयोऽप्यावि-
र्भवन्ति ध्रुवम्। लीयन्ते खलु यत्र कल्पविरमे ब्रह्मादयस्तेऽप्यमी, सा त्वं
काचिदचिन्त्यरूपमहिमा शक्तिः परा गीयसे॥"

असो, ही शक्ति ज्याच्यामध्यें वास्तव्य करते ती त्याच्याहून निराळी दिसत
नाहीं. म्हणून शक्ति आणि शक्तिमान् हे दोघेहि एकरूपच मानले जातात. वस्तुतः
ते एकरूपच आहेत. शक्ति आणि शक्तिमान् यांच्यांत भेद मानणें हें अपरिपक्व
विचारांचेंच द्योतक आहे. एकाग्र चित्तानें तत्त्वचिंतन करणाऱ्या योग्यांना—
तत्त्ववेत्त्यांना—शक्ति आणि शक्तिमान् यांच्यांत भेद दिसत नाहीं. "शक्तिशक्ति
मतोर्भेदं वदन्त्यपरमार्थतः। अभेदमनुपश्यन्ति योगिनस्तत्त्वचिन्तकाः"
(कूर्मपुराण). तात्पर्य, चिच्छक्ति, महाशक्ति, आदिशक्ति, शक्ति, अम्बा,

जगज्जननी, दुर्गा, भवानी, ललिता, महाविद्या, श्रीविद्या, महात्रिपुरसुंदरी, महामाया इत्यादि सर्व नांवें एकाच तत्त्वाचीं आहेत.

आतां आपण "शिव" या शब्दाच्या अर्थाचा विचार करूं. शिव म्हणजे मंगलमय कल्याणस्वरूप सदाशिवतत्त्व. यालाच परमात्मा आदिविष्णु अथवा आदिशिव असेंहि म्हणतात. जन्ममरणादिरूप कोणत्याहि विकाराचा ज्याला तिळमात्रहि स्पर्श नाहीं; आध्यात्मिक, आधिदैविक अथवा आधिभौतिक अशा त्रिविध दुःखांपैकीं कोणत्याहि दुःखाचा ज्याच्या ठिकाणीं लेशहि नाहीं; कोणत्याहि प्रकारचें अशुभ, अमंगल ज्याच्या ठिकाणीं नाहीं तो सदासर्वकाळ नित्य-निरतिशय आनंदरूप असलेला परमात्मा हाच या ठिकाणीं शिव शब्दाचा अर्थ आहे. 'वश्' या धातूपासून शिव शब्द निष्पन्न झालेला आहे. विश्वाच्या उत्पत्तीला कारणीभूत असलेल्या इच्छाशक्तीचा तो आश्रय असल्यामुळें त्याला शिव असें म्हणतात. "वष्टि इति शिवः" अशी शिव शब्दाची व्युत्पत्ति आहे. 'वश्' धातूचा अर्थ प्रकाशणें असा घेतल्यास "वशाति" म्हणजे प्रकाशतो तो शिव. अर्थात् स्वतःसिद्ध स्वयंप्रकाश असलेला परमात्मा असा त्याचा अर्थ होतो. तो स्वतः स्वयंप्रकाश आहे, एवढेंच नसून तो आपल्या प्रकाशानें साऱ्या विश्वालाहि प्रकाशित करतो म्हणूनहि त्याला शिव असें म्हटलेलें आहे.

यावर कोणी असें विचारील कीं, अहो ! वश् धातूवरून शिव शब्द कसा निष्पन्न होणार ? पुढचा श मागें व मागचा व पुढें कसा गेला ? याला उत्तर असें कीं, क्वचित् प्रसंगीं असा वर्णविपर्यय होतो, अर्थात् विपरीत वर्णरचना होते, ही गोष्ट व्यवहारसिद्ध आहे. हिंस् म्हणजे मारणें, ठार करणें या धातूपासून सिंह शब्द बनला. दृश् पश्य् पहाणें या धातूपासून पश्यक शब्द बनावयाचा, पण व्यवहारामध्यें पश्यक या शब्दाऐवजीं कश्यप हाच शब्द रूढ असल्याचें दिसत आहे. याच न्यायानें वश् धातूपासून वर्णविपर्ययानें शिव शब्द निष्पन्न होऊन व्यवहारांत रूढ झाल्याचें दिसत आहे. मराठी भाषेंतहि कोठें कोठें हा गमतीचा प्रकार पहावयास सांपडतो. अरसा या शब्दांतील रस शब्दाचा अर्थ पारा असा आहे. कांचेच्या एका बाजूस पारा लावला म्हणजे ती कांच प्रतिबिंब ग्रहण करण्यास योग्य बनते. वस्तुतः ही कांच रसानें म्हणजे पाऱ्यानें युक्त झाल्यामुळें सरस झाली. पण व्यवहारांत तिला आपण आरसा म्हणतों ! त्याचप्रमाणें वधूला

चरण्यासाठीं आलेल्या वरदेवाला उद्देशून आपण नवरदेव असा शब्दप्रयोग करतों. याप्रमाणें मराठी भाषेंत रूढीनें वराचा नवरा केला. त्याचप्रमाणें वश् धातूपासून रूढीनें शिव शब्द निष्पन्न झाल्याचें दृष्टीस पडते. " हिंसि धातोः सिंहशब्दो वशाकान्तौ शिवः स्मृतः । वर्णव्यत्ययतः सिद्धौ पश्यकः कश्यपो यथा ॥ "

शी धातूचा अर्थ निद्रा घेणें व वा धातूचा अर्थ फेकणें, दूर टाकणें. या दोन धातूंपासून निष्पन्न झालेल्या शिव शब्दाचा अर्थ ज्यानें अज्ञानरूपी निद्रेला फेकून दिलेलें आहे तो सदासर्वकाळ जागृत असलेला परमात्मा असाहि करतात. वा धातूचा अर्थ वाहणें, जाणें असा केल्यास निद्रा शब्दानें उपलक्षित असलेल्या अज्ञानाला – अविद्येला अथवा मायेला धारण करून जीवभावाला प्राप्त होणारा परमात्मा असाहि शिव शब्दांचा अर्थ करतात. तात्पर्य, कोणतीहि व्युत्पत्ति घेतली तरी शिव शब्दाचा अर्थ परमात्मा भगवान् सदाशिव असाच होतो. हा परमात्माच ब्रह्मा, विष्णु आणि शंकर या रूपानें नटतो व अखिल विश्वप्रपंचाचें उत्पादन, परिपालन आणि नियमन करीत रहातो. शिवस्वरूप असलेल्या परमात्म्याच्या ठिकाणीं हें सर्व सामर्थ्य आलें कोठून ? यावर आचार्य उत्तर देतात, शिव म्हणजे परमात्मा. हा जेव्हां शक्तीनें युक्त होतो तेव्हांच तो हें सर्व कार्य करण्यास समर्थ होतो. शिव शब्दांत असलेला इकार हा शक्तीचा वाचक आहे. शिव शब्दांतून तो इकार काढल्यानंतर राहिलेल्या शब्दाला कांहीं महत्त्वाचा अर्थ उरत नाहीं. शक्तिविरहित झालेला शिव हा शवासारखा जड अचेतन बनतो ! शक्तीमुळेंच शिवाला देवपण आलेलें आहे. शक्तीनें त्याला सोडलें कीं, तो तिळमात्रहि हालचाल करूं शकत नाहीं. " न खलु कुशलः स्पन्दितुमपि " खरोखर स्पंदन करण्याचेंहि सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं उरत नाहीं, मग तो विश्वाची घडामोड काय करणार ? तात्पर्य, परमेश्वराच्या ठिकाणीं " कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुं " असें जें सामर्थ्य आहे तें सर्व शक्तीमुळेंच आहे. हे शक्तिस्वरूपिणी माते महात्रिपुरसुंदरी ! हा सर्व तुझाच प्रभाव आहे.

व्यवहारांमध्यें देखील वधूवर हे लक्ष्मीनारायणस्वरूप अथवा शिवशक्ति-स्वरूपच मानले जातात. त्यांत वधू ही लक्ष्मीस्वरूप अथवा शक्तिस्वरूप आहे. या शक्तीचें साहाय्य नसेल तर वर हा नारायणस्वरूप अथवा शिवस्वरूप असूनहि प्रपंचक्षमता त्याच्या ठिकाणीं असूं शकत नाहीं ही गोष्ट प्रसिद्धच आहे. जें पिंडीं तें ब्रह्मांडीं हा न्याय प्रसिद्धच आहे.

अशा रीतीनें सर्व विश्वाची आधारशक्ति, ज्ञानशक्ति, इच्छाशक्ति आणि क्रियाशक्ति सर्व कांहीं श्रीमाता ललिता ललितामहात्रिपुरसुंदरीच असल्यामुळें ब्रह्मा, विष्णु आणि रुद्र त्याचप्रमाणें इंद्र, वरुण, कुबेर, अग्नि आणि वायु इत्यादि देवहि आपआपल्या अंगीकृत कार्याचें अर्थात् तें निर्वेधपणें पार पाडण्याचें सामर्थ्य आपल्याला लाभावें म्हणून तिची आराधना करीत असतात. सकलांचे सकल मनोरथ पूर्ण करण्याला तीच समर्थ असल्यामुळें या विश्वांत आराधना करण्याला तीच योग्य आहे. आचार्य म्हणतात, "आई! तुझ्या अंगीं असलेले हे स्वतःसिद्ध गुण लक्षांत घेऊनच मी तुझी स्तुति करण्यास प्रवृत्त झालों आहें. नसते गुण तुझ्या अंगीं कल्पून मी कांहीं तुझी खोटी स्तुति करीत नाहीं. आई! तुझी स्तुति करण्याला अथवा तुझ्या चरणीं प्रणाम करण्याला देखील पूर्वी कांहीं सुकृताची शिदोरी संपादन केलेली असेल तरच तो समर्थ होऊं शकेल. पदरीं पूर्वार्जित पुण्याची सामग्री नसेल तर तुझ्या चरणीं प्रणाम करणें किंवा तुझी स्तुति करणें हें त्याला घडणार नाहीं."

भक्तांचीं सर्व दुःखें हरण करतो म्हणून विष्णूला हरि असें म्हणतात. प्रलयकालीं सर्व सृष्टीचा संहार करण्याचें कार्य महादेवाकडे असल्यामुळें महादेवाला हर असें म्हणतात. "विशेषेण रिञ्चति इति विरिञ्चः" विशेषेकरून भौतिक सृष्टि निर्माण करतो म्हणून ब्रह्मदेवाला 'विरिञ्च' असें म्हणतात. हरिहरादिकांवर जसा तूं अनुग्रह करतेस तसाच माझ्यावरहि पण कर. असा आचार्यांचा यांतील गर्भितार्थ आहे. या श्लोकांतील शिव, शक्ति इत्यादि सर्व शब्द अभिप्रायगर्भित असल्यामुळें साहित्यशास्त्राच्या दृष्टीनें परिकरालंकार होतो. तसेंच पूर्वार्धांतील विषय उत्तरार्धांतील विषयाला कारणीभूत असल्यामुळें काव्यलिंग या नांवाचाहि अलंकार आहेच. श्लेष आणि समासोक्ति हेहि अलंकार दृष्टीस पडतात. मंगलमय ध्येयभूत वस्तुस्थितीचें यथार्थ वर्णन हा तर सर्वांत मोठा अलंकार आहे. हें संपूर्ण स्तोत्र शिखरिणी वृत्तांत आहे. या वृत्तांत चार चरण असून प्रत्येक चरणांत सतरा अक्षरें असतात. सहाव्या आणि अकराव्या अक्षरावर विराम असतो. क्रमानें यगण, मगण, नगण, सगण आणि भगण अशी गणांची योजना असून त्यापुढें एक लघु अक्षर आणि एक गुरु अक्षर असतें. "रसै रुद्रैश्छिन्ना यमनसभलागः शिखरिणी".

या स्तोत्रांतील प्रत्येक श्लोक मंत्रस्वरूप असल्यामुळें त्याचें सबीज यंत्र, त्याची पूजा-अनुष्ठान पद्धति व त्याचें फल इत्यादि सर्व प्रकार आंग्ल, केरळ,

द्रविड, तामिळ, आंध्र आणि संस्कृत अशा अनेक भाषांतून प्रसिद्ध आहेत. आम्ही मराठीच्या जिज्ञासू वाचकांना त्याचा संक्षिप्त परिचय येथें देत आहों.



यंत्र क्रमांक ७

यद्यपि कर्म हें निष्काम बुद्धीनें अर्थात् परमेश्वरार्पणबुद्धीनेंच अनुष्ठिलें जाणें श्रेयस्कर असतें. तथापि, एखाद्या काम्य फलाची कामना अपरिहार्य असेल आणि त्यांत कोणाचा द्वेष, मत्सर अथवा शोक, दुःख अभिप्रेत नसेल तर तें काम्य कर्महि करावयास हरकत नाहीं. हें यंत्र तांदळाचें पीठ कालवून स्थंडिलावर काढावें. त्याची पूर्वेकडे तोंड करून शास्त्रोक्त पूजा करावी. गूळ, नारळ आणि केळांचें मिश्रण करून नैवेद्य दाखवावा. तुपाचा दिवा लावून चारा दिवस रोज एक हजार वेळ या श्लोकाचा जप करावा. सकल कार्यसिद्धि हें याचें फळ आहे. सोन्याच्या पत्र्यावर यंत्र काढून याच पद्धतीनें तें सिद्ध करावें व कंठांत धारण करावें.

तनीयांसं पांसुं तव चरणपङ्केरुहभवं
विरिञ्चिः संचिन्वन् विरचयति लोकानविकलम्
वहत्येनं शौरिः कथमपि सहस्रेण शिरसां
हरः संक्षुद्यैनं भजति भसितोद्धूलनविधिम् ॥ २ ॥

"हे भगवति! विरिञ्चिः तव चरणपङ्केरुहभवं तनीयांसं पांसुं सञ्चिन्वन् लोकान् अविकलं विरचयति। शौरिः शिरसां सहस्रेण एनं कथमपि वहति। हरः एनं संक्षुद्य भसितोद्धूलनविधिं भजति" असा या श्लोकाचा अन्वय आहे. मागच्या श्लोकामध्यें ब्रह्मा, विष्णु आणि रुद्र त्याचप्रमाणें इंद्र, अग्नि आणि वायु इत्यादि इतरहि देव श्रीललितामहात्रिपुरसुंदरीची आराधना करतात असा उल्लेख केला आहे. तिच्या कृपेनेंच ते या विश्वरूपी संस्थेंतील आपआपलें अंगीकृत कार्य सुव्यस्थित रीतीनें पार पाडण्यास समर्थ होतात असा हा चिच्छक्तिस्वरूप असलेल्या जगन्मातेचा महिमा आहे असेंहि सांगितलें. हाच विषय या दुसऱ्या श्लोकांत अधिक स्पष्ट करून सांगत आहेत.

हे जगन्मातें महात्रिपुरसुंदरी ! ब्रह्मदेव, विष्णु आणि शंकर हे या सृष्टीच्या रचनेचे, संरक्षणाचे आणि संहाराचे अधिकारी आहेत. अधिकारपरत्वें आपआपलें कार्य ते तुझ्याच चरणकमलाच्या प्रभावानें पार पाडीत असतात. तुझ्या चरणकमलाचा महिमा मी काय वर्णन करूं ? त्याचें साकल्यानें वर्णन करणें अशक्य आहे. आई ! ब्रह्मदेवाचें हें अवाढव्य सृष्टिरचनेचें कार्य चाललेलें आहे, पण त्याचें भांडवल काय आहे ? असा जर कोणी प्रश्न केला तर तुझ्या चरणकमलांतील परागाचा एक लहानसा रजःकण, हेंच त्याचें उत्तर आहे. कमलाप्रमाणें सुकोमल आणि आरक्तवर्ण असलेल्या तुझ्या चरणाचा एक लहानसा रजःकण गोळा करून अथवा हातीं घेऊन ब्रह्मदेव संपूर्ण भूत-भौतिक विश्वप्रपंचाची रचना करीत असतो. भूलोक, भुवर्लोक स्वर्लोक इत्यादि वरचीं सात भुवनें आणि अतल, वितल, सुतल इत्यादि खालचीं सात भुवनें याप्रमाणें चतुर्दश भुवनात्मक प्रचंड ब्रह्मांडाच्या रचनेचें ब्रह्मदेवाचें साधन काय, तर तुझ्या चरणकमलांतील एक रजःकण !

प्रलयकालीं सर्व कार्यप्रपंचाचा नाश होऊन जिकडे तिकडे पृथ्वी, जल, तेज आणि वायु या महाभूतांचे परमाणूच परमाणु भरलेले असतात. ते परमाणु स्वभावतः जड असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं कोणत्याहि प्रकारची हालचाल असूं शकत नाहीं. पुढें जन्माला येणाऱ्या प्राणिमात्रांच्या अदृष्टकर्मामुळें आदिशक्तिस्वरूप जगन्मातेकडून ब्रह्मदेवाला सृष्टि निर्माण करण्याची प्रेरणा मिळते. त्या प्रेरणेनंतर ब्रह्मदेव संकीर्ण असलेल्या परमाणूंचें पृथक्करण करतात. पार्थिव परमाणु, जलीय परमाणु, तैजस परमाणु आणि वायवीय परमाणु असें परमाणूंचें संकलन झाल्यानंतर दोन-दोन पार्थिव परमाणूंना एकत्र करून त्यांच्या संयोगानें द्व्यणुकें निर्माण केलीं जातात. अशा तीन द्व्यणुकांचें एकत्रीकरण करून एक त्रसरेणु निर्माण केला जातो. हा त्रसरेणु इतका सूक्ष्म असतो कीं, कडोशाच्या रूपानें झरोक्यांतून घरांत येणाऱ्या सूर्याच्या किरणांतच आपण त्याला अंतराळांत परिभ्रमण करीत असलेल्या स्वरूपांत पाहूं शकतों. असे अनेक त्रसरेणु एकत्र झाले म्हणजे व्यवहारक्षम, कार्यरूप पृथ्वी उत्पन्न होते. याच पद्धतीनें जल, तेज आणि वायु यांचीहि पण उत्पत्ति होत असते. ही सर्व रचना आकाशाच्या उदरांत होत असल्यामुळें आकाशहि पण निमित्तरूपानें त्यांत घटक झालेलें असतेंच. अशा या पंचमहा-

भूतांपासूनच ब्रह्मदेव, वृक्ष, लता, वेली, वनस्पति, डोंगर, नद, नद्या, सागर, अग्नि, विद्युत्, ग्रह, नक्षत्र, सूर्य, चंद्र आणि विविध जातींचे वायु निर्माण करतात. याच पंचमहाभूतांपासून स्त्री, पुरुष, पशु, पक्षी, कीट, पतंग इत्यादि रूपांनीं अनंत शरीरांचीहि रचना ब्रह्मदेवाकडून होत असते. यालाच आपण सृष्टि असें म्हणतों.

मनानेंहि जिचें आकलन करतां येत नाहीं अशा या विशाल सृष्टिरचनेचें ब्रह्मदेवाचें भांडवल म्हणजे आदिशक्तिस्वरूप असलेल्या जगज्जननीच्या चरण-कमलांतील एक सूक्ष्म रजःकण होय. जिच्या चरणकमलाचा एक सूक्ष्म रजःकण ब्रह्मांडरूपानें नटला तिच्या संपूर्ण चरणकमलाचें स्वरूप केवढें विशाल असेल आणि त्याच्याहि पलीकडे तिचें संपूर्ण नखशिखान्त स्वरूप किती विशाल असेल याचें कल्पनेलाहि आकलन होत नाहीं! तात्पर्य, आचार्य म्हणतात, "आई! तुझ्या चरणकमलाच्या एका अत्यंत लहान रजःकणापासून ब्रह्मदेव अत्यंत सुस्पष्टपणें अथवा अविरतपणें या संपूर्ण स्थिरचर विश्वाची रचना करीत आहे. असा महिमा तुझ्या चरणकमलांतील एका लहानशा रजःकणाचा आहे. तर मग प्रत्यक्ष तुझा महिमा केवढा असणार? आणि मी त्याचें वर्णन काय करणार?" असा हा या श्लोकांतील पूर्वार्धाचा अभिप्राय झाला.

या श्लोकांतील उत्तरार्धानें भगवान् विष्णु आणि श्रीशंकर यांच्याहि दृष्टीनें श्रीललिता महात्रिपुरसुंदरीच्या चरणकमलाच्या रजःकणाचा महिमा वर्णन करीत आहेत. शौरी म्हणजे भगवान् विष्णु. यदुवंशांत शूर नांवाचा राजा होऊन गेला. त्याच्याच कुलांत जन्माला आलेल्या वसुदेवाच्या पोटीं श्रीकृष्णरूपानें विष्णूनें अवतार घेतला म्हणून श्रीकृष्णाप्रमाणें विष्णूला देखील शौरी असें म्हणतात. भगवान् विष्णु यांना हजारों मस्तकें आहेत. "सहस्रशीर्षा पुरुषः" असें वेदांत त्यांचें वर्णन केलेलें आहे "नमोऽस्त्वनन्ताय सहस्रमूर्तये सहस्रपादाक्षिशिरोरु-बाहवे" याप्रमाणें पुराणांतहि श्रीविष्णूला हजारों मस्तकें असल्याचें वर्णिलेलें आहे. भगवान् श्रीविष्णु हें आपल्या हजारों मस्तकांनीं श्रीललितामहात्रिपुरसुंदरीच्या चरणकमलांतील परागाच्या अत्यंत सूक्ष्म रजःकणाला मोठ्या आदरानें धारण करीत आहेत. अर्थात् त्याचें संरक्षण करीत आहेत. सृष्टीचें संरक्षण करणें हें विष्णूच्या अवतारांतील मुख्य कार्य आहे. संपूर्ण सृष्टि ही श्रीललितामहात्रिपुर-सुंदरीच्या चरणकमलांतील परागाचा एक लहानसा रजःकण आहे हें आपण वर

पाहिलेंच आहे. तात्पर्य, भगवान् विष्णु देखील हें कार्य आपल्या शक्तीच्या बाहेरचें आहे, ही जाणीव ठेवून "कथमपि" म्हणजे कसें तरी अत्यंत सावधपणानें अर्थात् अत्यंत जपून सृष्टिस्वरूप असलेल्या महात्रिपरसुंदरीच्या चरणकमलांतील रजःकणाचें संगोपन करीत आहेत. केवढा हा श्रीविद्यारूपी आदिशक्तीच्या चरणकमलाचा महिमा आहे !

भगवान् शंकर देखील प्रलयकाळीं आपल्या सर्वांगाला आदिमाता शक्तिस्वरूप असलेल्या श्रीमहात्रिपुरसुंदरीच्याच चरणकमलांतील रजःकणाचा भस्म म्हणून लेप लावीत असतात. सृष्टीचा संहार करणें हें महादेवाचें कार्य आहे. म्हणून प्रलयकाळीं महादेव या सृष्टीचें अर्थात् सृष्टिस्वरूप असलेल्या महात्रिपुरसुंदरीच्या चरणकमलांतील रजःकणाचें चूर्ण करून तें भस्म म्हणून आपल्या सर्वांगाला लावीत असतात. हाच त्यांचा भस्मोद्धूलनविधि किंवा भस्मधारणविधि होय. तात्पर्य, आई जगज्जननी ! प्रत्यक्ष भगवान् शंकर देखील तुझ्या चरणकमलांतील एका भूत-भौतिक प्रपंचरूपी सूक्ष्म रजःकणाला भस्म म्हणून आपल्या सर्वांगाला चर्चितात आणि स्वतःला पवित्र व धन्य मानतात ! असा हा तुझ्या चरणकमलांतील रजःकणाचा महिमा अद्वितीय आहे ! पृथ्वी, जल, तेज, वायु आणि आकाश हीं पंचमहाभूतें व त्यांच्यापासून उत्पन्न झालेला भौतिक विश्वप्रपंच भस्मस्वरूपच आहे असें वेदानेंहि वर्णन केलेलें आहे. " अग्निरिति भस्म, वायुरिति भस्म, जलमिति भस्म स्थलमिति भस्म, व्योमेति भस्म, सर्वं ह वा इदं भस्म, मन एतानि चक्षूंषि भस्मानि " असो. जिच्या चरणकमलांतील रजःकणाचा हा महिमा आहे तर मग प्रत्यक्ष या श्रीमहात्रिपुरसुंदरीचा महिमा किती अगाध असेल याची कल्पना करावी.



यंत्र क्रमांक ८

ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांच्या कृतींवरून जगज्जननीच्या अगाध महिम्याचें या श्लोकांत निदर्शन केलेलें असल्यामुळें येथें 'निदर्शना' हा अलंकार मानतात. निदर्शनेच्या जोडीला स्वभावोक्ति हाहि अलंकार आहेच.

या ऊर्ध्वमुख त्रिकोणांत ह्रीं हें बीज आहे. हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर काढून पंचावन दिवस उत्तरेकडे तोंड करून त्याची विधि-

पूर्वक पूजा करावी. पायसाचा नैवेद्य दाखवावा. रोज एक हजार वेळां या श्लोकाचा जप करून यंत्र सिद्ध करावें व तें दंडांत अथवा कंठांत धारण करावें. यानें सर्व लोक वश होतील, प्रकृतीवर ताबा राहील आणि आरोग्य लाभेल. अनुष्ठानाच्या वेळीं सर्वत्र तुपाचा दिवा आणि उत्तम सुवासिक उदबत्ती लावलेली असावी.

अविद्यानामन्तस्तिमिर-मिहिर-द्वीप-नगरी
जडानां चैतन्य-स्तबक-मकरन्द-स्रुति-झरी ।
दरिद्राणां चिन्तामणि-गुणनिका, जन्मजलधौ
निमग्नानां दंष्ट्रा मुररिपुवराहस्य भवति ॥ ३ ॥

"हे मातः तव चरणकमलपांसुः अविद्यानां अन्तस्तिमिर-मिहिर-द्वीप-नगरी भवति, जडानां चैतन्य-स्तबक-मकरन्द-स्रुति-झरी भवति, दरिद्राणां चिन्तामणि-गुणनिका भवति, जन्मजलधौ निमग्नानां मुररिपु-वराहस्य दंष्ट्रा भवति, स कथं मां अनुपयुक्तो भविष्यति ?" आचार्य म्हणतात, आई जगज्जननी ! तूं म्हणशील कीं, तूं माझी स्तुति करावयास कसा समर्थ होशील ? तूं अज्ञानी आहेस, जड आहेस, तुझ्या ठिकाणीं विचारसंपत्ति नाहीं, तूं दरिद्री आहेस, संसार-सागरांत बुडालेला आहेस. संसारांत गर्क झालेला आहेस, तुला काय माझी स्तुति करतां येणार ? यावर माझें उत्तर असें आहे कीं, आई ! तुझ्या चरण-कमलाच्या रजःकणाचें सामर्थ्य फार मोठें आहे. अर्थात् तुझेंहि पण. मग मी तुझ्या कृपेनें नाहीं कां समर्थ होणार ?

तुझ्या चरणकमलाचा रजःकण म्हणजे "अविद्य" अर्थात् अज्ञानी अस-लेल्या लोकांच्या अंतःकरणांतील अज्ञानरूपी तिमिराचा नाश करणाऱ्या सूर्यांची ती उदयस्थानांतील अथवा उदयाचलावरील नगरी आहे. सूर्य उदयाला आला म्हणजे अंधकार जसा मावळतो त्याप्रमाणें आई ! तुझ्या चरणकमलाच्या रजः-कणानेंहि अज्ञ जनांच्या अंतःकरणांतील अज्ञानरूपी अंधकार मावळतो यांत शंका नाहीं. त्याचप्रमाणें तुझ्या चरणकमलांतील रजःकण म्हणजे जड अर्थात् मतिमंद असलेल्या लोकांना चैतन्यरूपी पुष्पगुच्छांतील मकरंदाला अविरत स्रवणारा तो एक झराच आहे. तात्पर्य, जडालाहि चैतन्य प्राप्त करून देण्याचें सामर्थ्य आई ! तुझ्या चरणकमलाच्या रजःकणांत आहे. तो रजःकण म्हणजे दयनीय दरिद्री लोकांचे सकल मनोरथ पूर्ण करणारा चिंतामणिरत्नांचा समूहच आहे. गुणनिका शब्दाचा

अर्थ माळा अथवा राशि, समूह असा आहे. एक चिंतामणि जरी हातीं लागला तरी दारिद्र्याचा परिहार होऊन सर्व मनोरथ पूर्ण होतात, तर मग चिंतामणि रत्नांची माळ अथवा राशि हातीं आल्यानंतर दारिद्र्याचा परिहार होईल हें काय सांगावयास पाहिजे ? आई ! तुझ्या चरणकमलाच्या कृपेनें माझ्या सर्व विचार-दारिद्र्याचा परिहार होईल यांत शंकाच नाहीं.

आई जगज्जननी ! तुझ्या चरणकमलाचा रजःकण म्हणजे जन्ममरणरूपी संसारसागरांत पार बुडून गेलेल्या लोकांना त्यांचा उद्धार करणारी ती एक आदि विष्णुस्वरूप असलेल्या वराहाची दाढाच आहे ! पूर्वी ही पृथ्वी समुद्रामध्यें रसातळाला गेली असतां आदिविष्णुनीं वराहाचा अवतार धारण करून विरोध करणाऱ्या हिरण्याक्षाचा वध केला आणि आपल्या दाढेवर तोलून धरून पृथ्वीचा उद्धार केला ही पुरातन ऐतिहासिक कथा प्रसिद्धच आहे. आई ! माझ्यासारख्या ससारसागरांत बुडालेल्या जनांचा उद्धार करण्याकरितां तुझ्या चरणकमलाचा रजःकण म्हणजे आदि-विष्णुस्वरूप असलेल्या वराहाची ती एक दाढाच आहे. तात्पर्य, संसारसागर कितीहि गहन असला तरी तुझ्या चरणकमलाच्या कृपेनें उद्धार होण्यास कांहींच अवघड नाहीं ! आई ! हा सर्व विचार करूनच मी तुझी स्तुति करण्यास प्रवृत्त झालों आहें. तात्पर्य, तुझ्या कृपेनें माझे सकल मनोरथ पूर्ण झालेच पाहिजेत.



यंत्र क्रमांक ९

या श्लोकांत महात्रिपुरसुंदरीच्या चरणकमलांतील रजःकणाला नगरी, झरी, चिंतामणि-माला आणि वराहदंष्ट्रा अशी कल्पना करून आचार्यांनीं परंपरित रूपकाचीं जणुं कांहीं मालाच तयार केली आहे ! प्रत्येक ठिकाणीं कल्पनेचें रमणीयत्व, गांभीर्य हें कांहीं अपूर्व आहे. कांहीं लोक या ठिकाणीं परिणामालंकारहि मानतात.

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर लिहून त्याची ईशान्य दिशेकडे तोंड करून विधिपूर्वक चोपन दिवस पूजा करावी. उडदाच्या वड्यांचा नैवेद्य दाखवावा. रोज दोन हजार वेळां श्लोकाचा जप करून यंत्र सिद्ध करावें. यानें सर्व ऐश्वर्याचा व विद्येचा लाभ होतो.

त्वदन्यः पाणिभ्यामभयवरदो दैवतगणः
त्वमेका नैवासि प्रकटितवराऽभीत्यभिनया ।
भयात्त्रातुं दातुं फलमपि च वाञ्छासमधिकं
शरण्ये लोकानां तव हि चरणावेव निपुणौ ॥ ४ ॥

"हे मातः जगज्जननि ! त्वदन्यः दैवतगणः पाणिभ्यां अभयवरदः अस्ति। एका त्वं प्रकटितवराऽभीत्यभिनया नैव असि। हे लोकानां शरण्ये ! हि भयात् त्रातुं अपि च वाञ्छासमधिकं फलं दातुं तव चरणौ एव निपुणौ स्तः।" हे आई जगज्जननी ! तूं म्हणशील कीं, इतर पुष्कळ दैवतें भक्तजनांना अभय आणि इष्ट वर देण्याकरितां तत्पर आहेत. हें त्यांनीं धारण केलेल्य अभयमुद्रेवरून आणि वरमुद्रेवरून स्पष्टच दिसत आहे. मग त्यांनाच का नाहीं शरण जात ? यावर माझें उत्तर असें आहे कीं, तुझ्याहून निराळा असलेला देवतांचा समुदाय केवळ हातानेंच आपण अभय आणि इष्ट वर देणारे आहोंत असें सुचविणारा आहे. हा केवळ त्यांचा अभिनय म्हणजे नाटकांतल्या सोंगासारखी कृति आहे. तत्त्वतः त्यांच्यामध्यें तें सामर्थ्य नाहीं असें आचार्यांनीं "अभिनय" या शब्दाचा प्रयोग करून ध्वन्यर्थानें सूचित केलेलें आहे. इतर देवांमध्यें जें कांहीं थोडेंबहुत सामर्थ्य आहे तेंहि त्यांना श्रीमच्छात्रिपुरसुंदरीच्याच कृपेनें प्राप्त झालेलें आहे. हें सर्व त्यांच्या इतिहासावरून उघड आहे. " ये हि ब्रह्मादयो देवा भवन्ति वरदायिनः। त्वद्रूपां शक्तिमासाद्य ते भवन्ति वरप्रदाः ॥ "

आई ! तूं मात्र एकच एक अशी आहेस कीं, तूं कोणत्याहि प्रकारें वरमुद्रा आणि अभयमुद्रा धारण करण्याचें सोंग केलेलें नाहींस; आणि तसें करण्याचें तुला कांहीं कारणहि नाहीं. कारण तूं सर्व लोकांनीं शरण जाण्याला योग्य आहेस. अथवा सर्व लोकांचें संरक्षण करण्याला तूं योग्य आहेस. भक्तजनाचें भयापासून संरक्षण करण्याला अथवा त्यांना त्यांच्या इच्छेपेक्षांहि अधिक फल देण्याला तुझे चरणच निपुण म्हणजे प्रवीण आहेत. निपुण शब्दाचा कुशल अर्थात् समर्थ असाहि अर्थ होतो. अशा स्थितींत हे आई ! तुला हातांनीं वरमुद्रा आणि अभयमुद्रा धारण करण्याचें कांहींच कारण नाहीं. डाव्या हाताचीं चार बोटें तर्जनी, मध्यमा, अनामिका आणि कनिष्ठिका हीं एकास एक जुळवून उताणा

तळहात किंचित् अधोमुख धारण केला म्हणजे वरमुद्रा बनते. त्याचप्रमाणें उजवा तळहात ऊर्ध्वमुख धारण केला म्हणजे अभयमुद्रा तयार होते. " अधोमुखो वामहस्तः प्रधृतो वरमुद्रिका ऊर्ध्वीकृतो दक्षहस्तः प्रधृतोऽभयमुद्रिका " अशीं या दोन मुद्रांचीं लक्षणें आहेत. तात्पर्य, आई महात्रिपुरसुंदरी ! तुझ्या कृपेनें हरिहरादि देवांचेहि मनोरथ सफल होतात मग माझे होतील यात काय नवल आहे ? हें तुझें सामर्थ्य लक्षांत घेऊनच मी तुझ्या चरणीं शरण अलों "हि" या अव्ययाचा प्रयोग कारण आणि निश्चय अशा दोन्ही अर्थानें होतो. या श्लोकांत उपमेय हें उपमानापेक्षांहि श्रेष्ठ असल्याचें वर्णन केलेलें असल्यामुळें साहित्यशास्त्रदृष्ट्या व्यतिरेकालंकार सिद्ध होतो.



यंत्र क्रमांक १०

हें यंत्र चांदीच्या पत्र्यावर लिहून त्याची पूर्वेकडे तोंड-करून यथाशास्त्र पूजा करावी. सोळा दिवस अथवा छत्तीस दिवस या श्लोकाचा रोज एक हजार वेळां जप करावा. नैवेद्य केशरी भात. यानें साम्राज्य-सिद्धि, सर्व रोगांचा नाश व दारिद्र्याचा परिहार होतो. कांहीं लोक दुंच्या ऐवजीं श्रीं हें बीज लिहितात.

हरिस्त्वामाराध्य प्रणत-जन-सौभाग्यजननीं
पुरा नारी भूत्वा पुररिपुमपि क्षोभमनयत् ।
स्मरोऽपि त्वां नत्वा रति-नयन-लेह्येन वपुषा
मुनीनामप्यन्तः प्रभवति हि मोहाय महताम् ॥ ५ ॥

" हे मातः हरिः प्रणतजनसौभाग्यजननीं त्वां आराध्य पुरा नारी भूत्वा पुररिपुं अपि क्षोभं अनयत् । स्मरः अपि त्वां नत्वा रतिनयनलेह्येन वपुषा महतां मुनीनां अपि अन्तः मोहाय प्रभवति हि ।" हे माते जगदंबे ! भगवान् श्रीविष्णु

यांनीं तुझीच आराधना करून सामर्थ्य संपादन केलेलें आहे. कारण तू चरणीं नम्र झालेल्या भक्तजनांना सर्व प्रकारचें उत्तम भाग्य प्राप्त करून देणारी आहेस. भगवान् श्रीविष्णु तुझ्या कृपेनेंच परम विरक्त असलेल्या शंकरांच्याहि अंतःकरणांत मोह निर्माण करण्यास समर्थ झाले आहेत. पूर्वी देवांना अमृताची प्राप्ति करून देण्यासाठीं समुद्राचें मंथन करण्यांत आलें. त्या वेळीं हातांत अमृताचा कलश घेऊन धन्वंतरी समुद्रांतून बाहेर आले. पहातां पहातां दैत्यांनीं त्यांच्या हातून अमृताचा कलश पळविला. देव हताश झाले. इकडे दैत्यामध्यें अहमहमिका सुरू झाली. हा म्हणतो मी अगोदर घेईन. तूं कोण ? तो म्हणतो मी अगोदर घेईन. तूं कोण ? इतक्यांत भगवान् विष्णु मोहिनीचें रूप घेऊन तेथें आले. मोहिनीला पहातांच सर्व दैत्यांना मोह निर्माण झाला. ते तिच्या पाठीमागें लागले ! ते तिच्या अंकित बनले ! त्यांनीं तो अमृतकलश तिच्या स्वाधीन केला ! तिनें मोठ्या युक्तिप्रयुक्तीनें तें अमृत देवांना वांटून टाकलें ! देव संतुष्ट झाले. देवांच्या संतोषानें त्रैलोक्यहि संतोषलें. पुढें शंकरांना तें रूप पहावेसें वाटलें. पार्वतीसह तें विष्णूकडे गेले. तें रूप दाखविण्याची श्रीविष्णूला त्यांनीं विनंती केली. त्या विनंतीस मान देऊन विष्णूनें पुन्हां मोहिनीचें रूप घेतलें. भगवान् शंकर स्वतः कामारि, मदनाला भस्म करून टाकणारे. पण तें रूप पाहून त्यांच्याहि चित्ताचा क्षोभ झाला ! जवळ असलेल्या पार्वतीला सोडलें आणि ते मोहिनीच्या पाठीमागें लागले !! हा इतिहास लक्षांत घेऊनच आचार्यांनीं "पुरा नारी भूत्वा" इत्यादि वर्णन केलेलें आहे. तात्पर्य, विष्णूच्या अंगीं त्रैलोक्यरक्षणाचें व विविध रूपें धारण करण्याचें जें सामर्थ्य आहे तें महात्रिपुरसुंदरीच्याच आराधनेचें फळ आहे.

स्मर म्हणजे कामदेव. केवळ स्मरणानेंहि लोकांच्या चित्ताला अस्वस्थ करून टाकतो म्हणून त्याला "स्मर" असें म्हणतात. यालां शंकरांनीं जाळून टाकलें होतें. पण आदिभवानीच्या जगदंबेच्या कृपेनें त्याला जीवदान मिळालें. पुढें त्यानें महात्रिपुरसुंदरीची आराधना केली. त्या आराधनेच्या प्रभावानेंच पुढें तो त्रैलोक्यविजयी बनला. रति कामदेवाची स्त्री, ती अतिशय सुंदर; पण तिनेंहि आपल्या सौंदर्याचा अभिमान बाजूला ठेवून अहोरात्र आपल्या डोळ्यांची ओंजळ करावी व मदनाच्या सौंदर्याचा आस्वाद घ्यावा. इतकें सुंदर रूप महात्रिपुरसुंदरीच्याच कृपेनें कामदेवाला मिळालें. मोठ्या मोठ्या ऋषिजनांच्याहि

अंतरंगांत मोह निर्माण करण्याला तो समर्थ झाला. आचार्य म्हणतात, आई ! हा तुझ्याच कृपेचा प्रभाव आहे.

कोणी म्हणेल विष्णूनें आणि कामदेवानें श्रीमहात्रिपुरसुंदरीची आराधना केली याला काय प्रमाण ? यावर उत्तर असें कीं, वामकेश्वर महातंत्रांतच हा इतिहास वर्णिलेला आहे. पहा –

" एतामेव पुराऽऽराध्य विद्यां त्रैलोक्यमोहिनीम् ।
त्रैलोक्यं मोहयामास कामारिं भगवान् हरिः ॥
कामदेवोऽपि देवेशीं देवीं त्रिपुरसुन्दरीम् ।
समाराध्यामवल्लोके सर्व सौभाग्यसुन्दरः ॥ "

श्रीविद्येच्या मंत्राचे विविध प्रकार आहेत. त्यांपैकीं एका मंत्राचे ऋषि अर्थात् द्रष्टे प्रत्यक्ष श्रीविष्णूच आहेत. त्याचप्रमाणें कामदेव देखील एका मंत्राचे द्रष्टे असल्याबद्दलचा उल्लेख दृष्टीस पडतो. असा हा श्रीविद्यास्वरूप महात्रिपुरसुंदरीचा प्रभाव लक्षांत घेऊनच आचार्य म्हणतात, आई ! मी तुझ्या चरणीं शरण आलों आहें. कृपा कर.



यंत्र क्रमांक ११

हें यंत्र तांब्याच्या पत्र्यावर काढून त्याची विधिपूर्वक वायव्य दिशेला तोंड करून आठ दिवस पूजा करावी. गूळ आणि पायस यांचा नैवेद्य दाखवावा. रोज दोन हजार वेळां या श्लोकाचा जप करावा. हें यंत्र सकलजन संमोहन करणारें आहे. पति आणि पत्नी यांच्यांतील वैमनस्य दूर होईल. हें यंत्र गळ्यांत अथवा वेणींत घालावें.

धनुः पौष्पं मौर्वी मधुकरमयी पञ्च विशिखाः
वसन्तः सामन्तो मलय-मरुदायोधन-रथः ।
तथाप्येकः सर्वं हिमगिरिसुते कामपि कृपा-
मपाङ्गात्ते लब्ध्वा जगदिदमनङ्गो विजयते ॥ ६ ॥

"हे हिमगिरिसुते ! अनङ्गः ते अपाङ्गात् कां अपि कृपां लब्ध्वा इदं सर्वं जगत् एकः विजयते" हे हैमवती गिरिजे माते ! हा अनंग म्हणजे शरीर नसलेला मदन अर्थात् कामदेव तुझ्या कृपापूर्ण कटाक्षांतून अनिर्वचनीय असा कृपेचा लेश संपादन करून त्याच्या जिवावर हें सर्व जग तो एकटाच जिंकतो, असा या श्लोकांतील मुख्य अन्वय आणि त्याचा अर्थ आहे.

मागच्या श्लोकांत अनंग म्हणजे कामदेव हा श्रीविद्येच्या उपासनेनें समर्थ झाला असें सांगितलें. त्याचेंच अधिक स्पष्टीकरण या श्लोकांत करीत आहेत. कामदेव हा स्वतः अनंग म्हणजे शरीररहित आहे. तरी तो सर्व जगाला जिंकीत असतो. बरें त्याची युद्धाची सामग्री तरी काय आहे ? त्याचें धनुष्य पहावें तर तें "पौष्पं" म्हणजे फुलांचें तयार केलेलें असतें. म्हणूनच मदनाला संस्कृत भाषेमध्यें पुष्पधन्वा असें नांव आहे. मौर्वी म्हणजे धनुष्याची दोरी. ती पहावी तर "मधुकरमयी" अर्थात् भ्रमरांची माळा. भ्रमरांचा समूह ! तो काय धनुष्याच्या दोरीचें काम करणार ? आणि फुलांचें धनुष्य तरी काय उपयोगाला येणार ? "विशिख" म्हणजे बाण. ते पहावेत तर ते संख्येनें पांचच आहेत. हे पांच बाण हातचे निघून गेले कीं, पुढें तो काय युद्ध करणार ? बरें मदनाला साहाय्य करणारा पहावा तर तो वसंत. वर्षांतून दोन महिने त्याचें अस्तित्व ! तो बिचारा किती साहाय्य करणार ? बरें याचा युद्ध करण्याचा रथ तरी कोणता आहे ? असें विचाराल तर सांगतात, "मलयमरुत्" म्हणजे दक्षिणेकडील मलय पर्वतावरचा वारा ! त्याला ना रूप ना आकार ! असा हा कामदेवाच्या युद्धाच्या सामग्रीचा थाट आहे ! तरी देखील तो एकटा या सर्व जगाला जिंकीत असतोच. हा कशाचा प्रभाव आहे ? हे नगाधिराजतनये माते पार्वती ! हा तुझ्या कृपाकटाक्षाचा प्रभाव आहे ! तात्पर्य, आई जगदंबे ! तुझी कृपा मुक्यालाहि वाचस्पति बनवते ! पंगूलाहि मेरु पर्वताचें उल्लंघन करायला लावते ! राईचा पर्वत बनविते तर पर्वताचाहि खंदक करते ! योग्य कारण नसतांनाहि कार्याची निष्पति दाखविल्यामुळें या श्लोकांत विभावना अलंकार साधला आहे.

शंकरांनीं कामदेवाला जाळून टाकलें, पण पार्वतीनें आपल्या कृपापूर्ण अमृतमय दृष्टीनें त्याला पुन्हां जन्म दिला ! अक्षि म्हणजे डोळा. पार्वतीच्या अक्षीपासून कामदेवाला पुन्हां जन्म मिळाल्यामुळें तिला कामाक्षी असें नांव पडलें. कांची नगरीची ती अधिष्ठात्री देवता आहे. "कामोऽक्षितो यतो जातस्तस्याः कामेश

योषितः । कामाक्षीति ततः ख्याति सा गता काञ्चिकापुरे " कामेश्वरयोषित् याचा अर्थ भगवान् सदाशिव यांची पत्नी जगन्माता महात्रिपुरसुंदरी असा आहे. तात्पर्य, आई जगज्जननी ! तुझा हा अद्भुत प्रभाव पाहूनच मी तुझ्या चरणीं शरण आलों आहें. कृपा करून तूं मलाहि कृतार्थ कर.

यंत्र क्रमांक ११ प्रमाणेंच याहि श्लोकाचें यंत्र केवळ त्रिशूलयुक्त समभुज चतुष्कोण तयार करून मध्यभागीं क्लीं क्लीं क्लीं या बीजांच्या एकाखालीं एक अशा दोन ओळी लिहाव्यात. त्या दोन ओळींमध्यें थोडें अंतर ठेवून त्या जागीं साध्याचा उल्लेख करावा. सोन्याच्या पत्र्यावर हें यंत्र लिहून पूर्वेकडे तोंड करून यथाशास्त्र एकवीस दिवस अनुष्ठान करावें. उंसाचे सोलीव तुकडे करून त्यांचा नैवेद्य दाखवावा. रोज पांचशें वेळां श्लोकाचा जप करावा. फल पांड्यनिवृत्ति आणि पुत्रप्राप्ति.

क्वणत्काञ्चीदामा करिकलभ-कुम्भस्तननता
परिक्षीणा मध्ये परिणत-शरच्चन्द्र-वदना ।
धनुर्बाणान्पाशं सृणिमपि दधाना करतलैः
पुरस्तादास्तां नः पुरमथितुराहोपुरुषिका ॥ ७ ॥

" पुरमथितुः आहोपुरुषिका नः पुरस्तात् आस्ताम् " त्रिपुरारि भगवान् सदाशिव यांनीं जिच्याबद्दल अहंकार बाळगावा, जिच्यामुळें स्वतःला धन्य मानावें, जिच्या सामर्थ्यावर विश्वाला सुखी करावें, शिव म्हणजे मंगलमय आणि शंकर म्हणजे सुखी करणारा अशी बहुमानाची ख्याति मिळवावी, ती शंकरांची आहो पुरुषिका म्हणजे मूर्तिमंत अहंकार अथवा उत्साहशक्ति श्रीदेवी महात्रिपुरसुंदरी, "नः" म्हणजे आमच्या "पुरस्तात्" म्हणजे पुढें अर्थात् हृदयमंदिरामध्यें किंवा हृत्कमलामध्यें निरंतर विराजमान असो, असा या श्लोकांतील मुख्य अन्वय आणि त्याचा अर्थ आहे.

मागील दोन श्लोकांत भगवान् श्रीविष्णु आणि कामदेव यांनीं श्रीविद्येची उपासना करूनच महात्रिपुरसुंदरीची कृपा संपादन केली व तिच्या कृपेनेंच ते पूर्ण समर्थ बनले असे प्रतिपादन केलें. आपणहि तिची उपासना करून कृतार्थ व्हावें या अभिप्रायानें या श्लोकांत श्रीविद्यास्वरूप असलेल्या महाशक्तीचें सगुण स्वरूप आचार्य स्पष्ट करीत आहेत. ध्यानाकरितां सगुण स्वरूपाचीच आवश्यकता



इक्षुचापां पुष्पबाणां पाशाङ्कुशधरां शुभाम् ।

असते. इष्टदेवतेच्या सगुण स्वरूपांत चित्ताला स्थिर करून तेथें त्याची एकतानता करणें यालाच ध्यान असें म्हणतात. तें ध्यान सगुण स्वरूपाचेंच होऊं शकतें. निर्गुणाचें चिंतन करतां येतें पण ध्यान करतां येत नाहीं. याच अभिप्रायानें "अथ ध्यानं" असें म्हणून आपण जे श्लोक म्हणत असतों त्या श्लोकांत इष्ट देवतेच्या सगुण स्वरूपाचेंच वर्णन केलेलें असतें असें आपल्या दृष्टीस पडेल.

यावर कोणी असें म्हणेल कीं, अहो! "ब्रह्मानन्दं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम्" या सद्गुरूच्या ध्यानांत सद्गुरूच्या निर्गुण स्वरूपाचेंच वर्णन केलेलें आहे. तेव्हां ध्यानाकरितां सगुण स्वरूपच लागतें, हें विधान बरोबर नाहीं. यावर उत्तर असें कीं, "ब्रह्मानन्दं परमसुखदं" या श्लोकांत शेवटीं "सद्गुरुं तं नमामि" असें जें वाक्य आहे त्या वाक्यांतील सद्गुरु हाच शब्द त्यांच्या सगुण स्वरूपाचा द्योतक आहे. ब्रह्मानन्दं इत्यादि शब्दांनीं त्यांचा स्वभाव वर्णिलेला आहे. सद्गुरु हे आकृतीनें मानव असले, तरी स्वभावानें ते परब्रह्म स्वरूप असतात. सद्गुरूंच्या स्वभावाचें चिंतन व आकृतीचें ध्यान हेंच त्या श्लोकांत विवक्षित आहे. निर्गुणाचेंहि ध्यान करतां येतें असा कोणी आग्रहच धरला तर "क्लेशोऽधिकतरस्तेषां" त्यांना अत्यंत क्लेश पडतात हें श्रीकृष्णाचें वचन त्यांनी लक्षांत घ्यावें.

असो. प्रकृतस्थलीं श्रीविद्यास्वरूप महात्रिपुरसुंदरीचें भक्तजनांना सहज सुलभ रीतीनें ध्यान करतां यावें म्हणून आचार्य तिच्या सगुण स्वरूपाचें वर्णन करीत आहेत. कशी आपली माता श्रीललितामहात्रिपुरसुंदरी आहे तें पहा : तिनें आपल्या कमरेला रत्नजडित सुवर्णाचा कंबरपट्टा घातलेला आहे. त्या कंबर-पट्ट्यांतील साखळ्यांना घुंगरें बसविलेलीं आहेत. त्या घुंगरांचा कर्णमधुर आवाज होत आहे. जगज्जननी त्रिपुरांबा श्रीविद्या आपल्यावर अनुग्रह करण्याकरितां चालत येत आहे. आपल्या हृत्कमलांत वास्तव्य करण्याकरितां ती चालत येत आहे. ती चालत आहे म्हणूनच तिच्या कंबरपट्ट्यांतील घुंगरांचा आवाज होत आहे. याच अभिप्रायानें "क्वणत्काञ्चीदामा" या पदांत क्वणत् या शब्दाचा उपयोग केलेला आहे. जिचा काञ्चीदाम म्हणजे कंबरपट्टा क्वणत् म्हणजे मधुर शब्द करणारा आहे अशी ती माता त्रिपुरसुंदरी. असा पहिल्या विशेषणाचा अर्थ आहे. कंबरपट्टा हें एक उदाहरणमात्र आहे. इतरहि सर्व अलंकार यथायोग्य रीतीनें तिनें घातलेले आहेत असेंच तिचें ध्यान करावें.

"करि-कलभ-कुम्भ-स्तन-नता" भक्तजनांचें पोषण करण्याकरितां तिनें आपल्या स्तनांमध्यें स्तन्य अर्थात् अमृतरूप दुग्ध धारण केलेलें असल्यामुळें ती तीस वर्षांच्या हत्तीच्या गंडस्थलाप्रमाणें पुष्ट असलेल्या स्तनमारानें किंचित् नम्र झालेली दिसत आहे. भगवान् सदाशिव हे विश्वंभर आहेत तर त्यांची अर्धांगी जगज्जननी श्रीविद्या ही तत्स्वरूपच असल्यामुळें ती विश्वंभरा आहे. विश्वाच्या भरण-पोषणाला अनुरूप असा स्तनभार धारण करणें हें तिच्या अंगीं असलेल्या अनन्यसाधारण वात्सल्याचें द्योतक आहे. अनन्यभावानें आपण तिची आराधना केल्यास भक्तवत्सला जगज्जननी आपली उपेक्षा करणार नाहीं हें निश्चित समजावें. असा भाव या विशेषणांत आहे.

" मध्ये परिक्षीणा " भक्तजनांनीं ध्यान करण्याकरितां तिनें धारण केलेला देह हा मध्यभागीं म्हणजे कमरेजवळ परिक्षीण म्हणजे कृश झालेला दिसत आहे. कमरेजवळ उदराची दिसणारी कृशता ही विकृति नसून तें देहरूपी उपाधीचें प्राकृतिक सौंदर्य आहे. जगज्जननीचें मुखकमल हें शरदृतूंतील पूर्णिमेच्या पूर्ण चंद्राप्रमाणें अत्यंत तेजस्वी आणि आह्लाददायक आहे. तिच्या वरच्या दोन्ही हातांत अंकुश आणि पाश हीं दोन आयुधें आहेत. उजव्या हातांत अंकुश असून डाव्या हातांत पाश म्हणजे दोरी आहे. ही दोन्ही आयुधें सुवर्णाचीं आहेत. खालच्या उजव्या हातांत पुष्पांचे बाण असून डाव्या हातांत उंसाचें धनुष्य तिनें धारण केलेलें आहे. कपाळीं केशराचा मळवट असून तिनें केसांच्या भांगापर्यंत उभा कस्तूरीचा टिळा धारण केलेला आहे. नेत्र प्रफुल्लित आहेत. मुखावर मंद हास्य झळकत आहे. अरुण वर्णाचें वस्त्र परिधान केलेलें असून, अरुण वर्ण असलेल्या फुलांची माळ तिच्या गळ्यांत शोभत आहे. तिची अंगकांतीहि जास्वंदीच्या फुलाप्रमाणें देदीप्यमान आहे. असेंच जपाच्या वेळीं तिचें ध्यान करावें. याप्रमाणें आचार्यांनीं तिचें दुसरीकडेहि वर्णन केलेलें आहे. श्रीललितामहात्रिपुरसुंदरी ही स्वतः निर्गुण, निराकार, निर्विकार, शुद्ध, चिन्मय, आनंदमय असूनहि केवळ भक्तजनांच्या कल्याणासाठीं तिनें हें सगुण साकार रूप धारण केलेलें आहे. साधकानें तिच्या याच स्वरूपाचें चिंतन करावें. ध्यान करावें. या श्लोकांतील "आहोपुरुषिका" या शब्दाचा अर्थ अहंकार, स्वाभिमान असा आहे. गर्व त्याज्य असला तरी स्वत्वाभिमान हा आदरणीयच असतो. ही गोष्ट सर्वमान्य आहे. तात्पर्य, अशी ही श्रीदेवी ललितामहात्रिपुरसुंदरी आमच्यापुढें नित्य विराजमान असो.

या श्लोकाचें यंत्र त्रिशूलरहित केवळ सोन्याच्या पत्र्यावर समभुज चतुष्कोण काढून मध्यभागीं क्लीं हें बीज लिहावें. पंचेचाळीस दिवस पूर्वेकडे तोंड करून विधियुक्त पूजा करावी. रोज या श्लोकाचा एक हजार जप करावा. पायसाचा नैवेद्य दाखवावा. सिद्ध केलेलें हें यंत्र शत्रूवर विजय मिळविण्यास अत्यंत उपयुक्त आहे.

सुधासिन्धोर्मध्ये सुरविटपि-वाटी-परिवृते
मणिद्वीपे नीपोपवनवति चिन्तामणिगृहे ।
शिवाकारे मञ्चे परमशिव-पर्यङ्क-निलयां
भजन्ति त्वां धन्याः कतिचन चिदानन्दलहरीम् ॥ ८ ॥

"हे मातः धन्याः कतिचन चिदानन्दलहरीं त्वां भजन्ति" हे जगज्जननी माते ! धन्य म्हणजे भाग्यवान् पुण्यवान् असलेले असे फारच थोडे लोक अखंड चिदानन्द-प्रवाह-स्वरूप असलेल्या तुझी उपासना करीत असतात. अर्थात् चिदानन्द-स्वरूप असलेल्या तुझी उपासना करणारे फारच थोडे भाग्यवंत लोक असतात. असा या श्लोकांतील मुख्य अन्वय आणि त्याचा अर्थ आहे.

मागील श्लोकांत ध्यान करण्याला उपयुक्त असें महात्रिपुरसुंदरीच्या सगुण स्वरूपाचें वर्णन केलें. आतां या श्लोकांत तिच्या ऐश्वर्याचें वर्णन करीत आहेत. सुधासिंधु म्हणजे अमृताचा महासागर, क्षीरसागर असा अर्थ समजावा. या क्षीरसागरांत एक पुष्पराग, पद्मराग, गोमेद, वज्र, वैदूर्य, नील, मौक्तिक, प्रवाल इत्यादि विविध रत्नांचें सुंदर द्वीप आहे. त्या द्वीपामध्यें जिकडे तिकडे देवांना अत्यंत प्रिय असलेल्या वृक्षांची अर्थात् कल्पवृक्ष, संतानवृक्ष, हरिचंदनवृक्ष, मंदारवृक्ष आणि पारिजातवृक्ष या वृक्षांची गर्दी आहे. त्यांची वनेंच्या वनें दृष्टीस पडतात. वाटी म्हणजे उपवनें अथवा बगीचे. त्यांतहि आंतल्या बाजूला कदंबवृक्षांचें सुंदर उपवन आहे. त्या कदंबवनांत चिंतामणि रत्नांचें सुंदर मंदिर आहे. त्या मंदिरांत परमरमणीय मंगलमय अशा स्वरूपाचें सिंहासन आहे. जणुं कांही भगवान् सदाशिव हेच सिंहासन बनलेले आहेत. त्या सिंहासनावर त्यांच्या अंकीं अर्थात् वामांकीं श्रीललितामहात्रिपुरसुंदरी विराजमान झालेली आहे. शिवतत्त्वाच्याहि पलीकडे असलेलें परमशिवतत्त्व हेंच तिचें पर्यंकाप्रमाणें "निलय" म्हणजे वास्तव्यस्थान आहे. परमशिवतत्त्वामध्येंहि ती शक्तिरूपानें

अधिष्ठित झालेली आहे. ती शुद्धचित्स्वरूप आणि आनंदस्वरूप आहे. साधक ध्यान करीत करीत तेथपर्यंत जाऊन पोहोंचला कीं, साधकाच्याहि अंतःकरणांत अनिर्वचनीय आनंदाच्या लहरी उसळतात ! चित् म्हणजे शुद्ध आत्मस्वरूपाचें ज्ञान, त्याच्या प्रकाशानें प्राप्त होणारा जो अद्वितीय अनिर्वचनीय आनंद अर्थात् नित्य निरतिशय सुख अथवा आत्यंतिक समाधान. त्याचे तरंग साधकाच्या अंतःकरणांत उसळत असतात. त्याच्या आत्यंतिक आनंदाला सारखें भरतें येत असतें ! आई ! केवढा तुझ्या स्वरूपसाक्षात्काराचा हा महिमा आहे ! तो फारच थोड्यांच्या वांट्याला येतो. तो ज्यांच्या वांट्याला येतो ते खरोखर धन्य होत. यद्यपि चिदानंद हा निर्विकार असल्यामुळें त्याला उसळी येणें किंवा भरतें येणें हें संभवत नाहीं, तथापि या ठिकाणीं त्या आनंदाची परिपूर्ण अवस्थाच या ठिकाणीं लहरी, उचंबळणें अथवा भरतें येणें या शब्दांनीं विवक्षित आहे. या ठिकाणचा हा आनंदलहरी शब्दच या स्तोत्राच्या पूर्वार्धाचा वाचक असल्याचें कांहीं विद्वान् मानतात.

कांहीं लोक या श्लोकाचा अर्थ श्रीचक्राला अनुलक्षूनहि लावतात. श्रीचक्रामध्यें नऊ आवरणें असतात. आवरण शब्दाचाहि अर्थ मंडल किंवा चक्र असा करतातच. श्रीचक्रामध्यें खालचीं चार चक्रें शिवाचीं व वरचीं पांच चक्रें शक्तीचीं मानलीं जातात. शिवचक्रें आणि शक्तिचक्रें यांच्यामध्यें असलेल्या अवकाशाला सुधासिंधु असें म्हटलेलें आहे. भूपुर, त्रिवलय, षोडशदल कमल आणि अष्टदल कमल हा परिसर ओलांडून आपण पुढें गेलों कीं, शक्तिचक्रांना आरंभ होतो. या शक्तिचक्रांच्या सभोंवारचा परिसर हाच सुधासिंधु होय. या सुधासिंधूमध्यें चौदा त्रिकोणांचें एक चक्र दहा-दहा त्रिकोणांचीं दोन चक्रें आणि आठ त्रिकोणांचें एक चक्र, या सर्वच चक्रांतील बेचाळीस त्रिकोण ह्या जणुं कांहीं मंदार, पारिजात, कल्पवृक्ष इत्यादि देववृक्षांच्या वाटिका म्हणजे बागाच आहेत. श्रीमहात्रिपुरसुंदरीच्या अंशभूत असलेल्या या त्रिकोणांतील देवता कल्पद्रुमाप्रमाणें भक्तजनांचे सकल मनोरथ पूर्ण करीत असतात म्हणून या त्रिकोणांना कल्पद्रुम असें म्हटलेलें आहे. या बेचाळीस त्रिकोणांनीं मध्यवर्ति असलेला त्रिकोण हा सर्व बाजूंनीं वेष्टिलेला आहे. या मुख्य त्रिकोणाला चिंतामणि-मंदिर म्हटलेलें असून त्याच्या बाहेरच्या बेचाळीस त्रिकोण असलेल्या चक्रांना मणिद्वीप कल्पिलेलें आहे. या त्रिकोणांच्या घटक असलेल्या रेखा हे जणुं कांहीं त्या मणिद्वीपांतील कदंबवृक्षच होत. कदंबवृक्ष

हे श्रीमहात्रिपुरसुंदरीचे अत्यंत आवडते वृक्ष आहेत. म्हणूनच आचार्यांनीं तिला कदंबवनवासिनी, कदंबवनचारिणी, कदंबवनमध्यगा अशीं विशेषणें दिलेलीं आहेत. " कदम्बकाननावासा कदम्बकुसुमप्रिया " असें त्रिशतीमध्यें तिचें वर्णन केलेलें आहे. " कदम्बमञ्जरीक्लृप्तकर्णापूरमनोहरा " कदंबाच्या मंजरी कर्णभूषण म्हणून तिनें आपल्या कानांवर धारण केलेल्या असल्यामुळें ती मोठी मनोहर दिसत आहे असें ललितासहस्रनामांत तिचें वर्णन केलेलें आहे. कदंब हा एक कल्पवृक्षांतलाच प्रकार आहे.

श्रीचक्रांतील मध्यवर्ति मुख्य त्रिकोणालाच या श्लोकांत चिंतामणिगृह असें म्हटलेलें असून त्यांतील बिंदु हाच शिवाकार म्हणजे परमरमणीय मंगलमय मंच म्हणजे पर्यंक अर्थात् पलंग अथवा सिंहासन होय. त्या ठिकाणीं विराजत असलेलें प्रकाशस्वरूप परमशिवतत्त्व म्हणजेच भगवान् सदाशिव, त्यांच्या अर्धांगीं विराजमान असलेली विमर्शस्वरूप महाशक्ति श्रीत्रिपुरसुंदरी हिलाच या श्लोकामध्यें चिदानंदलहरी असें म्हटलेलें आहे. आचार्य म्हणतात, आई त्रिपुरसुंदरी ! श्रीचक्रामध्यें तुझ्या या मंगलमय स्वरूपाचें फारच थोडे लोक चिंतन करतात. जे चिंतन करतात ते खरोखर धन्य होत.

आपला देह हाच शिवशक्तीचें अधिष्ठान असल्यामुळें कांहीं लोक सुधासिंधु शब्दाचा अर्थ देह असाच करतात. पाय किंवा मूलाधारचक्र हीं शरीराची उत्तम रीतीनें धारणा करीत असतात म्हणून त्यांना "सुध" असें म्हणतात. सुध + आसिन्धु = सुधासिन्धु. आसिन्धु म्हणजे मस्तकामध्यें विराजमान असलेल्या सहस्रदल कमलांतील चंद्रमंडल " आसमन्तात् सेधति सिञ्चति नाडीमार्गं इति आसिन्धुः " अशी असिंधु या शब्दाची व्युत्पत्ति आहे. मस्तकस्थानीं विराजत असलेल्या चंद्रमंडलांतूनच अमृताचा स्राव होत असतो व त्याच्या योगानें देहांतील बहात्तर हजार नाड्यांचें व त्या नाड्यांच्या द्वारां संपूर्ण देहाचें पोषण होत असतें म्हणून त्या चंद्रमंडलाला आसिंधु म्हणणें योग्यच आहे. तात्पर्य, सुधासिंधु म्हणजे आपला नखशिखान्त देह. या देहामध्यें मूलाधारचक्र स्वाधिष्ठानचक्र इत्यादि चक्रस्थानें रत्नाप्रमाणें विलसत असल्यामुळें तीं चक्रेंच "मणिद्वीप" या शब्दाचा अर्थ समजावा. मणि म्हणजे रत्न आणि द्वीप म्हणजे देवतांचें विशिष्ट आश्रयस्थान. मूलाधारादि चक्रें हीं गणेशादि देवतांचीं अधिष्ठानें आहेत हें प्रसिद्धच आहे. हीं सर्व द्वीपें जीवचैतन्यानें व्यापलेलीं आहेत.

म्हणूनच तीं कार्यप्रवण आहेत. याच अभिप्रायानें त्या मणिद्वीपांना "सुरविटपि-वाटीपरिवृते" असें विशेषण दिलेलें आहे.

" सुष्ठु राजते प्रकाशते इति सुरः " या व्युत्पत्तीप्रमाणें या देहांत विराजमान असलेलें आत्मचैतन्यच सुर शब्दाचा अर्थ समजावा. या आत्मचैतन्यानें नखशिखान्त देहाला व्यापलेलें असल्यामुळें त्याला "विटपी" म्हणजे विशालवृक्ष असें म्हटलेलें आहे. या वृक्षानें शरीरांतील चक्रस्थानें वेष्टिलेलीं आहेत. "वाटी" म्हणजे वेष्टन. या देहांत नीपांचीं उपवनें आहेत. नीप शब्दाचा प्रसिद्ध अर्थ कदंब असा आहे. शरीरदृष्टीनें त्रिपुरसुंदरीच्या वसतिस्थानाची कल्पना करीत असतांना नीप शब्दाचा अर्थ पांच मुख्य प्राण आणि पांच उपप्राण असा करतात. प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान यांना मुख्य प्राण असें म्हणतात तर नाग, कूर्म, कृकल, देवदत्त आणि धनंजय या पांच वायूंना उपप्राण असें म्हणतात. हे सर्व वायु शरीराचा निर्वाह करीत असतात. शरीराला वागवितात व जगवितात म्हणून यांना "नीप" म्हटलेलें आहे. " नयन्ति पान्ति च इति नीपाः " अशी नीप शब्दाची व्युत्पत्ति आहे. तात्पर्य, शरीरांतील दशविध वायु अथवा इंद्रियांच्या अधिष्ठात्री देवता हेच या मणिद्वीपांतील कदंबवृक्ष होत. या कदंबसमूहांत असलेलें हृत्पुंडरीक अर्थात् अनाहतचक्ररूपी हृदयकमल हेंच आपल्या इष्ट देवतेचें "चिन्तामणिगृह" होय. हृदय हें संकल्प-विकल्पात्मक मनाचें वसतिस्थान व आत्म्याचें अधिष्ठान असल्यामुळें आणि तो देहांतील सर्वश्रेष्ठ अवयव असल्यामुळें त्याला चिंतामणिगृह असें म्हणणें योग्यच आहे. तात्पर्य, अशा या हृत्कमलांत मंगलमय सिंहासनावर श्रीसदाशिवाशीं अभिन्न रूपानें विराजमान असलेल्या श्रीमहात्रिपुरसुंदरीचें जें ध्यान करतात ते खरोखर धन्य होत.

कांहीं विद्वान् लोक सुधासिंधु शब्दाचा अर्थ ऋषिमुनींना अभिप्रेत असलेला संपूर्ण अखंड भारतवर्ष असाच करतात. सुधा म्हणजे श्रेष्ठ दर्जाचा खडीचा पांढरा शुभ्र चुना. त्या चुन्याप्रमाणेंच सदासर्वकाळ हिमालय पर्वत बर्फानें आच्छादित असल्यामुळें शुभ्र दिसत असतो, म्हणून सुधा शब्दानें हिमालय पर्वत घेतात. त्या हिमालयापासून "आसिन्धु" म्हणजे सेतु अथवा कन्याकुमारीपर्यंतचा सर्व भाग अर्थात् मानससरोवर आणि कैलास पर्वत यांच्यासह कन्याकुमारीपर्यंतचा सर्व भाग अखंड भारतांत समाविष्ट होतो. त्याचप्रमाणें भारताची पूर्व आणि पश्चिम मर्यादा ही हिमालयानें दाखविलेलीच आहे. " पूर्वापरौ तोयनिधी वगाह्य स्थितः पृथिव्या

इव मानदण्डः " असें कविकुलगुरु श्रीकालिदासानें त्याचें वर्णन केलेलेंच आहे. असा हा अखंड भारत हाच प्रकृतस्थली सुधासिंधु शब्दाचा अर्थ आहे. अयोध्या मथुरा, हरिद्वार, काशी, कांची, त्याचप्रमाणें बदरीनाथ, केदारनाथ इत्यादि क्षेत्रें त्याचप्रमाणें गंगा, यमुना, गोदावरी, नर्मदा, सिंधु, कृष्णा, तुंगभद्रा इत्यादि तीर्थें त्याचप्रमाणें ज्योतिर्लिंगें हींच या भारतरूपी सुधासिंधूंतील मणिमयद्वीपें समजावींत. यांत कदंबांचीं उपवनें तर आहेतच. त्या त्या तीर्थक्षेत्रांतील देवता ह्या कल्पवृक्षाप्रमाणें फळ देणाऱ्या असल्यामुळें त्याच या सुधासिंधूंतील कल्पवृक्ष होत. अशा या अखंड भारतरूपी श्रीललितामहात्रिपुरसुंदरीच्या मंदिरांत चिंतामणीप्रमाणें मनोहर मंदिरें आहेत. अशा या भारतवर्षरूपी सुधासिंधूमध्यें विराजत असलेला कैलास पर्वत हाच " शिवाकार मंच " होय. कैलास पर्वताच्या भोंवतालीं असलेल्या पायथ्याच्या पर्वतांच्या रांगा या श्रीयंत्रांतील पहिल्या मुख्य त्रिकोणाप्रमाणेंच दिसतात. जणुं कांहीं ती शंकरांची शाळुंकाच आहे. प्रत्यक्ष कैलास पर्वत हा त्या शाळुंकेंतील महादेवाच्या पिंडीप्रमाणें दिसतो. अथवा श्रीचक्रांतील मुख्य त्रिकोणांत असलेला मध्यवर्ती बिंदु जसा असावा तसाच तो कैलास पर्वत मानससरोवराच्या जवळ शोभत आहे. त्रैलोक्याचे गुरु भगवान् सदाशिव तेथेंच विराजमान झालेले आहेत. त्यांच्या वामभागीं अंकरूपी पर्यंकावर देवी श्रीमहात्रिपुरसुंदरी विराजत आहे. म्हणूनच तिला " परमशिवपर्यंकनिलया " असें म्हटलेलें आहे. तात्पर्य, अखंड भारतरूपी सुधासिंधूंमध्यें विलसत असलेल्या कैलासरूपी मंचकावर सदाशिवाच्या वामभागीं तादात्म्यानें विराजत असलेल्या श्रीत्रिपुरसुंदरीचें जे कांहीं थोडे लोक ध्यान करतात ते धन्य होत. यद्यपि श्रीत्रिपुरसुंदरीच्या मंदिराचा परिसर असलेला भारत आज अखंड राहिला नाहीं तरी भक्तजनांच्या ध्यानाला यथार्थता यावी म्हणून सर्वसमर्थ असलेली श्रीमहात्रिपुरसुंदरी या भारताला पुन्हां अखंड करील. जगाला उपद्रव देणाऱ्या शुंभ, निशुंभ, चंड, मुंड अथवा महिषासुर इत्यादि दैत्यांचा जसा तिनें नाश केला तसाच ती भारताला खंडित करणाऱ्या दुष्टांचाहि नाश करील. " इत्थं यदा यदा बाधा दानवोत्था भविष्यति तदा तदावतीर्याहं करिष्याम्यरिसंक्षयम् " असें तिनेंच आश्वासन दिलेलें आहे. मात्र वर वर्णन केल्याप्रमाणें तिची उपासना करणाऱ्या भक्तांची बहुसंख्या आणि अनन्यभक्ति यांची आवश्यकता आहे. कांहीं लोक ॐकारांतील अकार, उकार, मकार आणि अर्धमात्रा हाच शिवाकार मंचक



यंत्र क्रमांक १२

समजून त्यावर विराजत असलेल्या शिवशक्ति-स्वरूपाचें ध्यान करतात.

हें यंत्र रक्तचंदनाच्या तुकड्यावर तयार करून रक्तपुष्पांनीं त्याची बारा दिवस विधि-पूर्वक पूजा करावी. काळ्या मिऱ्यांचा नैवेद्य दाखवावा. रोज या श्लोकाचा बाराशे जप करावा.

याप्रमाणें यंत्र सिद्ध करून धारण केल्यास कारागारांतून सुटका होते व सर्व कार्यांमध्यें विजय मिळतो.

महीं मूलाधारे कमपि मणिपूरे हुतवहं
स्थितं स्वाधिष्ठाने हृदि मरुतमाकाशमुपरि ।
मनोऽपि भ्रूमध्ये सकलमपि भित्त्वा कुलपथं
सहस्रारे पद्मे सह रहसि पत्या विहरसे ॥ ९ ॥

"हे मातः त्वं मूलाधारे महीं, मणिपूरे कं, स्वाधिष्ठाने स्थितं हुतवहं अपि, हृदि मरुतं, उपरि आकाशं, भ्रूमध्ये मनः अपि (एवं) सकलं अपि कुलपथं भित्त्वा सहस्रारे पद्मे रहसि पत्या सह विहरसे।" (एतादृशीं त्वां ये ध्यायन्ति ते धन्याः) आई त्रिपुरसुंदरी! मूलाधारचक्रांत पृथ्वीतत्त्वाला, मणिपूरचक्रांत जल-तत्त्वाला, त्याचप्रमाणें स्वाधिष्ठानचक्रांत असलेल्या अग्नितत्त्वालाहि भेदून तसेंच हृदयाजवळ असलेल्या अनाहतचक्रांतील वायुतत्त्वाला, त्याच्याहि वर कंठस्थानीं असलेल्या विशुद्धिचक्रांतील आकाशतत्त्वाला आणि भ्रूमध्यप्रदेशीं असलेल्या आज्ञाचक्रांतील मनस्तत्त्वाला भेदून, अर्थात् सर्वच कुलपथाला म्हणजे मूलाधारादि षट्चक्रांना अथवा सुषुम्नामार्गाला भेदून मूर्धस्थानीं असलेल्या सहस्रदल कमला-मध्यें आपल्या परमशिवस्वरूप पतीसह तूं एकान्तामध्यें विहार करतेस. तुझ्या या चिदानन्दस्वरूप अवस्थेचें जे कोणी ध्यान करतात, खरोखर ते धन्य होत. असा या श्लोकाचा अन्वयानुसारी सरळ अर्थ आहे.

आपला संपूर्ण देहच श्रीललितामहात्रिपुरसुंदरीचें अधिष्ठान आहे. त्यांतहि विशेषेंकरून या देहांत असलेल्या मुख्य मुख्य चक्रांत तिचें प्रामुख्यानें वास्तव्य आहे. त्यांतहि मूलाधारादि सहा चक्रांच्याहि वर मूर्धस्थानीं विराजमान असलेलें

सहस्रदल कमल हें. तर तिचें अत्यंत आवडतें स्थान आहे. या देहांत श्रीत्रिपुरसुंदरी ही कुंडलिनीच्या रूपानें वास्तव्य करीत असते. कुंडलिनी ही एक विशिष्ट प्रकारची शक्ति आहे. ती प्रसुप्त असते तेव्हां इंद्रियें हीं विषयोन्मुख होतात व मन विषयानंदामध्यें गर्क होत असतें. ती कुंडलिनीशक्ति जेव्हां जागृत होते तेव्हां सर्व इंद्रियें अंतर्मुख होतात व बुद्धि ही स्वतःसिद्ध, नित्य आणि निरतिशय अशा निजानंदाचा अनुभव घेत असते. " नीवारशूकवत्तन्वी कुंडली परदेवता " देवमातेच्या कुसाचा शेंडा जसा अगदीं बारिक असतो त्याप्रमाणें कुंडलिनी ही अत्यंत सूक्ष्म असून ती एक श्रेष्ठ देवता आहे असें संमोहनतंत्रांत तिचें वर्णन केलेलें आहे.

ही कुंडलिनी मूलाधारचक्राचा आधार घेऊन स्वाधिष्ठानचक्रावर अधिष्ठित झालेली आहे. तेथें तिचे साडेतीन वेटोळे असल्याचें वर्णन करतात. नागाचें दिलें । कुंकुमें न्हाले । वळण देऊनि आलें । सेजे जैसें ॥ तैसी ते कुंडलिनी । मोटका आंटे वळणी । अधोमुख सर्पिणी निदेली असे ॥ (ज्ञा. ६–१२२–२३) मूलाधारचक्र आणि स्वाधिष्ठानचक्र हीं दोन्हीं चक्रें अगदीं जवळ जवळ आहेत. मूलाधारचक्र हें चार दलाच्या कमलाप्रमाणें आहे तर स्वाधिष्ठानचक्र हें सहा दलें असलेल्या कमलाप्रमाणें आहे. मूलाधारचक्र हें देहाच्या अगदीं मूलस्थानीं म्हणजे गुदस्थानाच्या सान्निध्यांत आहे, तर स्वाधिष्ठानचक्र हें त्याच्या किंचित् वर उपस्थेंद्रियाच्या सान्निध्यांत आहे. मूलाधार-चक्र हें देहांतील सर्व चक्रांचें आणि कुंडलिनीचेंहि मूळ आधारभूत चक्र असल्यामुळें त्याला मूलाधार हें यथार्थ नांव आहे. त्याचप्रमाणें स्वाधिष्ठानचक्र याच्यांतील स्व शब्दाचा अर्थ कुंडलिनीच असल्यामुळें व तिचें तें चक्र अधिष्ठान म्हणजे वसतिस्थान असल्यामुळें त्या चक्रालाहि स्वाधिष्ठानचक्र असें यथार्थ नांव मिळालेलें आहे. या दोन्ही चक्रांत वास्तव्य करणारी कुंडलिनी ही या प्रस्तुत सौंदर्यलहरीस्तोत्राची अधिष्ठात्री देवताच होय.

ललितासहस्रनामामध्यें "कुण्डलिनी" हें एक त्रिपुरसुंदरीचें नांव आहेच. " महासक्तिः कुण्डलिनी बिसतन्तुतनीयसी " कमळांतील तंतूप्रमाणें अत्यंत सूक्ष्म व गौरवर्ण असलेली ही कुण्डलिनी "महासक्ति" म्हणजे सर्वश्रेष्ठ सहस्रदल कमलामध्यें अत्यंत तेजस्वी असलेल्या चंद्रमंडलांत शिवस्वरूपाशीं समरस होऊन रहाण्याची तिला मोठी आवड आहे. अशी ती आहे म्हणूनच

ती शरीरांतील षट्चक्रांचें उल्लंघन करून सहस्रदल कमलामध्यें असलेल्या अमृत-मंडलांत सच्चिदानंद परब्रह्मस्वरूप असलेल्या श्रीसदाशिवतत्त्वाशीं समरस होऊन रहाते म्हणून तिला "महासक्ति" म्हणतात. याच अभिप्रायानें कुण्डलिनीस्वरूप श्रीत्रिपुरसुंदरीला "चिच्छक्तिश्चेतनारूपा" आणि "चिदेकरसरूपिणी" अशींहि नांवें दिलेलीं आहेत. सहस्रदल कमल हें साही चक्रांच्या वर असल्यामुळें "षट्चक्रोपरि संस्थिता" असेंहि तिला म्हटलेलें आहे.

"मूलाधाराम्बुजारूढा" "स्वाधिष्ठानाम्बुजगता" "मणिपूराब्जनिलया" "अनाहताब्जनिलया" "विशुद्धिचक्रनिलया" "आज्ञाचक्राब्जनिलया" "सहस्रदल-पद्मस्था" अशीं श्रीललितामहात्रिपुरसुंदरीचीं ललितासहस्रनामांमध्यें नांवें आहेत. या नांवांवरून ती शरीरांतील सर्वच चक्रांची अधिष्ठात्री असल्याचें स्पष्टच दिसत आहे. या सर्व चक्रांत अधिष्ठित होऊन ती त्या त्या चक्रांतील बीजांना, भूततत्त्वांना व देवतांना कार्यप्रवण करीत असते. ती जीवचैतन्याच्या रूपानें सर्व देहालाच जीवन देत असते. म्हणूनच तिला "प्राणदा प्राणरूपिणी" अथवा जीवा, जीवभूता असेंहि म्हटलें जातें. तंत्रसारग्रंथांतहि मूलाधारचक्राच्या ठिकाणीं इष्ट देवतास्वरूप कुंडलिनीचें एकाग्र मनानें ध्यान केलें असतां सर्व अशुभांचा निरास होतो असें सांगितलें आहे. "ध्यायेत्कुण्डलिनीं सूक्ष्मां मुलाधारनिवासिनीम्। तामिष्टदेवतारूपां सार्धत्रिवलयान्विताम्॥ अशेषाशुभशान्त्यर्थं समाहितमनाश्चिरम्" मूलाधारचक्राप्रमाणेंच इतरहि चक्रांत कुंडलिनीरूप त्रिपुरसुंदरीचें ध्यान केलें असतां निरनिराळीं फलें प्राप्त होतात असेंहि सांगितलेलें आहे. मूलाधारचक्र हें पृथ्वी तत्त्वाचें असल्यामुळें पृथ्वीचा धारकत्व हा गुण त्याच्यामध्यें आहे. धरा, धरित्री, धरणी अशीं पृथ्वीचीं नांवें आहेत. देहाला धारण करणारें पृथ्वीतत्त्व हें मूलाधारचक्रांत नसतें तर हा देह खालीं तरी पडला असता अथवा आकाशांत तरी उडून गेला असता असें रुद्ररहस्यांत म्हटलेलें आहे. "सर्वाधारा मही यस्मात्, मूलाधारतया स्थिता। तदभावे तु देहस्य पातः स्यादुद्गमोऽपि वा॥"

स्वाधिष्ठानचक्र हें अग्नितत्त्वाचें आहे. अग्नि हा सर्व शक्तींचें मूळ आहे. अग्नीमुळेंच देहामध्यें सर्व प्रकारची शक्ति नांदत असते. "अग्निमूलं बलं पुंसाम्" हा सिद्धान्तच आहे. कांहीं लोक स्वाधिष्ठानचक्र हें जलतत्त्वाचें असून मणिपूरचक्र हें अग्नितत्त्वाचें आहे असें म्हणतात. तें कांहीं असो. आपली कुंडलिनीशक्ति ही

ब्रह्मरन्ध्रांतील चंद्रमंडलाकडे जाण्यास उत्सुक झाली म्हणजे क्रमशः ती सर्व चक्रांचें उल्लंघन करीत असते. यालाच योगशास्त्रांत षट्चक्रभेदन असें म्हणतात.

माणिपूरचक्र हें दहा दलांच्या कमळासारखें आहे. मूलाधारचक्रांतील चार दलांत वं, शं, षं आणि सं अशीं बीजें आहेत तर स्वाधिष्टानचक्रांतील सहा दलांत बं भं मं यं रं आणि लं अशीं सहा बीजें आहेत. त्याचप्रमाणें मणिपूरचक्राच्या दहा दलांत ड-पासून फ-पर्यंतचीं अक्षरें बीजरूपानें रहातात. अक्षरें हीं अनुस्वार-युक्त झालीं कीं, त्यांना बीजांचें स्वरूप येतें. मणिपूरचक्राच्या वर हृदयाच्या शेजारी असलेल्या चक्राला अनाहतचक्र असें म्हणतात. विविध प्रकारच्या अनाहत नादांना अभिव्यक्त होण्याची अवस्था याच चक्रांत प्राप्त होत असल्यामुळें या चक्राला अनाहतचक्र असें म्हटलें जातें. या चक्राला बारा पाकळ्या असून त्यांत क-पासून ठ-पर्यंतचीं बारा अक्षरें बीजरूपानें वसलेलीं आहेत. हें चक्र वायुतत्त्वाचें मानलें जातें. या तत्त्वाचा भेद करून कुंडलिनी-शक्तिस्वरूप श्रीमहात्रिपुरसुंदरी वर जाते तेव्हां ती विशुद्धिचक्रांत येते. विशुद्धिचक्र हे कंठस्थानीं आहे. हें आकाशतत्त्वाचें चक्र असल्यामुळें व आकाश हें स्वभावतःच अत्यंत शुद्ध, निर्मल असल्यामुळें अथवा शुद्ध स्फटिकाप्रमाणें त्याचा वर्ण स्वच्छ असल्यामुळें या चक्राला विशुद्धिचक्र असें म्हटलें जातें. या चक्राला सोळा पाकळ्या असून त्यांत क्रमशः अ-पासून अः-पर्यंत सोळा स्वर विराजमान झालेले आहेत. येथूनच अक्षरप्रपंचाला मूर्त स्वरूप येतें व पुढें तीं अक्षरें स्थानभेदानें कंठ्य, तालव्य इत्यादि शब्दांनीं व्यवहारिलीं जातात.

विशुद्धिचक्राचा भेद करून कुंडलिनी वर गेली कीं, ती आज्ञाचक्रांत प्रवेश करते. आज्ञाचक्र हें दोन भुवयांच्या मध्यें असून याला दोनच पाकळ्या आहेत. या दोन पाकळ्यांत हं आणि क्षं हीं दोन बीजें विराजत आहेत. साधकाला याच चक्राच्या आधारें आपल्या उपास्यदेवतेचा, श्रीमहात्रिपुरसुंदरीचा थोडासा साक्षात्कार होत असतो. आ म्हणजे थोडें आणि ज्ञा म्हणजे ज्ञान. अथवा श्रीत्रिपुरसुंदरी ही फारच थोडा काळ या चक्रांत विद्युल्लेखेप्रमाणें प्रतीतीला येते म्हणूनहि या चक्राला आज्ञाचक्र असें म्हटलें जातें. मन हें या चक्राचें तत्त्व होय. या ठिकाणीं मन या शब्दानें पंचज्ञानेंद्रियें आणि पंचकर्मेंद्रियें यांचाहि अंतर्भाव विवक्षित आहेच. त्याचप्रमाणें पंचमहाभूतांनीं पंचतन्मात्राहि घेतल्या जातात. षट्चक्रांचें भेदन करतांना या एकवीस तत्त्वांचाहि भेद होतोच. अर्थात

ही एकवीस तत्त्वें साधकाच्या अधीन होतात. त्यावर नियंत्रण ठेवण्याची साधकाला शक्ति प्राप्त होत असते. पुढें श्रीत्रिपुरसुंदरी सहस्रदल कमलांत प्रवेश करते तेव्हां ती माया, शुद्धविद्या, महेश्वर आणि सदाशिव या तत्त्वांशीं संपृक्त होते. मायाविशिष्ट महेश्वर हा जीवभावाला प्राप्त होत असतो, तर शुद्ध-विद्याविशिष्ट सदाशिव हा परमशिवपदाला प्राप्त होत असतो. या परमशिव-पदालाच शास्त्रांत सादाख्यकला असें म्हटलेलें आहे. याच सहस्रदल कमलांत विलसत असलेल्या चंद्रमंडलांत आपली उपास्यदेवता श्रीमहात्रिपुरसुंदरी ही परम-शिवतत्त्वाशीं समरस होऊन विहार करीत असते. अर्थात् एकरूप होऊन रहाते. तें शिवशक्तींचें ऐक्य एकमेव, अद्वितीय, परिपूर्ण, परब्रह्मस्वरूपच आहे.

आपल्या देहांत असलेल्या मूलाधारादि चक्रांपेक्षां मूर्धस्थानीं असलेलें सहस्रदल कमल हें अत्यंत श्रेष्ठ होय. म्हणूनच या कमलाला चक्रराज असें म्हटलें जातें. हेंच आपल्या त्रिपुरसुंदरीचें निकेतन म्हणजे निवासस्थान असल्यामुळें याहि अभिप्रायानें श्रीत्रिपुरसुंदरीला "चक्रराज-निकेतना" असें म्हटलेलें आहे. परस्पर तादात्म्यभावाला प्राप्त झालेलें शिवतत्त्व आणि शक्तितत्त्व हीं परस्परांच्या तपश्चर्येचीं जणुं मूर्तिमंत फळेंच होत. असे हे सदासर्वकाळ पुरातनच असलेले विश्वप्रपंचाचे माता आणि पिता यांना आमचा नमस्कार असो. आम्ही भक्तिभावानें त्यांची स्तुति करीत आहोंत " परस्परतपःसंपत्फलायितपरस्परौ । प्रपञ्चमातापितरौ प्राञ्चौ जायापती स्तुमः " असें एका भक्तानें या शिवशक्तीचें वर्णन केलेलें आहे तें अत्यंत योग्य आहे.

या श्लोकांतील "कुलपथ" या शब्दाचा अर्थ कांहीं विद्वान् सुषुम्णामार्ग असा करतात, तर कांहीं विद्वान् षट्चक्रें असाहि करतात. तात्पर्य, देहामध्यें कुंडलिनीच्या रूपानें विराजमान असलेली श्रीत्रिपुरसुंदरी ही सुषुम्णामार्गानें षट्चक्रांचा भेद करून साधकाच्या उपासनाबलानें ज्या वेळेला सहस्रदल कमलांत प्रवेश करते आणि तेथें असलेल्या चंद्रमंडलांत सच्चिदानंदरूप परमशिवतत्त्वाशीं समरस होते त्या वेळेला तिचा तो आपल्या परमप्रिय शिवतत्त्वस्वरूप पतीबरोबर "रहसि" म्हणजे एकान्तांत होणारा सामरस्य विहार ही तिची नित्यनिरतिशय आनंदरूप अवस्था होय. ही अवस्था लक्षांत घेऊनच तिला "सच्चिदानन्दरूपिणी" असें नांव दिलेलें आहे. या अवस्थेंत जे भक्त तिचें चिंतन करतात ते खरोखर धन्य होत.

आसनें, प्राणायाम, धारणा आणि ध्यान या क्रियांनीं शरीरांतील वर सांगितलेल्या षट्चक्रांचा भेद करतां येतो. योगमार्गांतील मूलबंध, ओड्याणबंध आणि जालंधरबंध, त्याचप्रमाणें कांहीं मुद्रा यांचाहि षट्चक्रभेदनाला उपयोग होतो. मूलाधारादि चक्रांच्या ठिकाणीं केल्या जाणाऱ्या इष्ट देवतेच्या उपासनेनेंहि चट्चक्रांचा भेद घडवून आणतां येतो. त्या त्या चक्रांतील बीजें, अधिष्ठात्री देवता आणि पृथ्वी, जल इत्यादि भूततत्त्वें यांचें चिंतन करीत श्रीललिता महा-त्रिपुरसुंदरीची त्या त्या चक्रांत जर उपासना केली तर कुंडलीस्वरूप असलेली भक्तकामकल्पद्रुम श्रीमहात्रिपुरसुंदरी ही स्वयंजागृत होऊन साधकाच्या षट्चक्रांचें भेदन करीत करीत सकलतत्त्वातीत असलेल्या सहस्रदलकमलांतील निष्कलंक आणि सर्व कलांनीं पूर्ण अशा चंद्रमंडलांत जेव्हां परमशिवतत्त्वाशीं विहार करते तेव्हां उपासनाबलानें तिच्या स्वरूपाशीं तादात्म्य पावलेलें साधकांचें मनहि त्या अद्वितीय आनंदाचा अनुभव घेत असते. असा हा अर्धनरनटेश्वरी असलेल्या श्रीत्रिपुरसुंदरीच्या उपासनेचा प्रभाव आहे.

मूलाधारचक्रांत पृथ्वीतत्त्वाचा भेद झाल्यानंतर साधकाचें शरीर पृथ्वीचा आधार घेतल्यावांचूनहि इतस्ततः संचार करूं शकतें. वह्नितत्त्वाचा भेद केल्या-नंतर त्याला अग्नि शीतल होतो. जलतत्त्वाचा भेद केल्यानंतर पाणी त्याला बुडवूं शकत नाहीं. अनाहतचक्रांत वायुतत्त्वाचा भेद केल्यानंतर साधक वायुगतीनें संचार करूं शकतो. श्रीसदाशिवेंद्रसरस्वती, श्रीवासुदेवानंदसरस्वती इत्यादि सिद्ध सत्पुरुषांच्या चरित्रांत ह्या गोष्टी पहावयास सांपडतात. आकाशतत्त्वाचा भेद केल्यानंतर साधक आकाशगामी होतो. मनस्तत्त्वाचा भेद केल्यानंतर तो मनो-गतीनें त्रैलोक्यामध्यें संचार करतो. सहस्रदल कमलांतील विहार हा अनिर्वचनीय आनंदस्वरूप असल्यामुळें सर्व सिद्धींची तेथें परिसमाप्ति होते. "सा काष्ठा सा परागतिः" आई! तुझ्या कृपेनें ही अवस्था ज्यांना लाभली खरोखर ते मोठे धन्य होत असें 'रहस्यासिद्धिसोपान' या ग्रथांत मोठें सुंदर वर्णन केलेलें आहे.

पुढील यंत्र सोन्याच्या पत्र्यावर काढून दहा दिवस त्याची रोज विधिपूर्वक पूजा करावी. आटीव दुधाचा अथवा पायसाचा नैवेद्य दाखवावा. रोज एक हजार वेळां श्लोकाचा जप करावा. देशांतरीं गेलेला माणूस लौकर परत येईल. याच यंत्राला केशर, कस्तूरी, चंदन इत्यादि सुगंधी द्रव्यांनीं लेप करून ४५ दिवस वरच्या-प्रमाणें आराधना केल्यास साधकाला पंचमहाभूतांवर विजय संपादन करतां येईल.



यंत्र क्रमांक १३

सुधा-धारासारैश्चरण-युगलान्तर्विगलितैः
प्रपञ्चं सिञ्चन्ती पुनरपि रसाम्नाय-महसः।
अवाप्य स्वां भूमिं भुजगनिभमध्युष्ट-वलयं
स्वमात्मानं कृत्वा स्वपिषि कुलकुण्डे कुहरिणि ॥ १० ॥

"हे मातः चरणयुगलान्तर्विगलितैः सुधाधारासारैः प्रपञ्चं सिञ्चन्ती रसाम्नायमहसः (सकाशात्) स्वां भूमिं पुनः अपि अवाप्य भुजगनिभं अध्युष्टवलयं स्वं आत्मानं कृत्वा कुलकुण्डे स्वपिषि" आई त्रिपुरसुंदरी! तुझ्या दोन्ही चरणकमलांतून स्रवणाऱ्या अमृताच्या धारावृष्टींनीं तूं देहांतील सर्व नाड्यांच्या समूहाला आणि नाड्यांच्या द्वारां देहालाहि पण शिंपडतेस, तृप्त करतेस, त्यांचें पोषण करतेस आणि त्यानंतर पुन्हां चंद्रमंडलांतून खालीं उतरतेस. आपल्या पहिल्या स्थानाला येतेस. तेथें सर्प जसा वेटोळें घालून बसावा त्याप्रमाणें तूं स्वतःचें (साडेतीन) वेटोळें करून कुंडाप्रमाणें असलेल्या आधारचक्रांतील कुहरांत अर्थात् छिद्रामध्यें पूर्वीप्रमाणेंच झोंपतेस. तात्पर्य, लोकोपकाराकरितां हा तुझा सर्व खेळ चालला आहे! असा या श्लोकाचा अन्वय आणि त्याचा अर्थ आहे.

मागील श्लोकांत कुंडलिनीरूप श्रीमहात्रिपुरसुंदरी मूलाधारादि चक्रांच्या ठिकाणीं क्रमशः पृथ्वी, जल इत्यादि तत्त्वांचा लय करीत मस्तकामध्यें असलेल्या हजार पाकळ्यांच्या कमलांतील चंद्रमंडलामध्यें विहार करते असें सांगितलें. आतां या श्लोकांत ती त्या चंद्रमंडलांतील आपल्या चरणकमलांच्या स्पर्शानें

पुनीत झालेल्या अमृताच्या वृष्टीनें साधकाच्या देहांतील सर्व नाड्यांना व नाड्यांच्या द्वारां साधकाच्या शरीरपिंडालाहि तृप्त करते, पुष्ट करते आणि पुन्हा पूर्ववत् सृष्टिक्रमाच्या अनुरोधानें सर्व तत्त्वांचा आविष्कार करीत मूलाधारचक्राजवळ असलेल्या आपल्या स्थानांत स्वाधिष्ठानचक्रांत वेटोळें घालून स्वस्थ झोंपते. हें सर्व तिचें कार्य साधकाच्या शरीरपिंडाचें पोषण आणि परिपालन होण्याच्या दृष्टीनेंच चाललेलें असतें. जें पिंडीं तें ब्रह्मांडीं या न्यायानें साधकाच्या शरीरपिंडाप्रमाणेंच अखिल ब्रह्मांडाचेंहि ती पोषण आणि परिपालन करीत असतेच. अशा या तिच्या दयापूर्ण लीलेचें वर्णन आचार्य करीत आहेत.

आपल्या शरीरांत एक सहस्रदल कमल आहे. ज्याला आपण व्यवहारामध्यें मेंदू, मगज अथवा मस्तिष्क म्हणतों तेंच हें सहस्रदल कमल होय. हें सर्व तत्त्वांचें बीजस्थान आहे. सर्व तत्त्वांचा लय यांतच होत असतो. हेंच सच्चिदानंदरूप महात्रिपुरसुंदरीचें अधिष्ठान आहे. श्रीविद्येच्या ध्यानात्मक समाराधनेमध्यें या सहस्रदलकमलाला श्रीचक्र असेंच म्हटलेलें आहे. नामरूपात्मक विश्वप्रपंचाचीं मूळ बीजभूत असलेलीं अक्षरें आणि तत्त्वें हीं बाह्य श्रीचक्राप्रमाणेंच या ब्रह्मरंध्रस्थानीं असलेल्या सहस्रदल कमलरूपी श्रीचक्रांतहि अंतर्भूत झालेलीं आहेत. शक्तितत्त्व हें वाक्प्रपंचाचें उगमस्थान आहे तर शिवतत्त्व हें अर्थप्रपंचाचें उगमस्थान आहे. शब्दप्रपंच आणि अर्थप्रपंच या दोन्ही प्रपंचाचें मूळ अक्षरांतच असल्यामुळें श्रीचक्रांतील सर्व त्रिकोणांत आणि कमलदलांत आपल्याला अक्षरांचाच विन्यास दृष्टीस पडेल. श्रीचक्र हें शिवशक्तिस्वरूप पूर्ण तत्त्वाचें अधिष्ठान असल्यामुळें श्रीचक्रांत आपल्याला शिवचक्रांचा आणि शक्तिचक्रांचाहि एकत्र समावेश असलेला दृष्टीस पडतो. आपल्या घराला सर्व बाजूंनीं जसा परिघ असावा किंवा कुसूं असावें त्याप्रमाणें श्रीचक्रांत आपल्याला बाहेरून आंत प्रवेश करतांना पहिल्या प्रथम तीन रेघांचा चतुष्कोण दिसेल. यालाच भूपुर असें म्हणतात. या भूपुराला चार द्वारें आहेत. तीं क्वचित् उघडीं असतात तर क्वचित् भूपुरांशीं अखंडपणें संलग्न असतात. आपण भूपुरांत प्रवेश केला कीं, त्या ठिकाणीं कांहीं भाग मोकळा दृष्टीस पडेल. त्यापुढें आपल्याला तीन वर्तुळें दिसतील. अर्थात् तीन वर्तुळाकार रेघा दिसतील. कांहीं ठिकाणीं त्या चारहि असल्याचें दिसतें. सर्वत्र विकल्प हा मतभेदामुळें अथवा संप्रदायभेदामुळें असतो ही गोष्ट लक्षांत ठेवावी. हीं तीन वर्तुळें जणुं कांहीं बाह्य विश्वाच्या त्रैगुण्याचीं द्योतक आहेत.

या वर्तुळांच्या आंत षोडशदल कमल आहे. त्याच्याहि आंत एक अष्टदल कमल आहे. षोडशदलकमलांतील प्रत्येक पाकळींत अं, आं इत्यादि सोळा स्वरांचीं बीजें लिहिलेलीं असतात. श्रीचक्र आपल्या हातावर घेऊन पहा. त्यांत आपल्या बाजूला असलेल्या भूपुराच्या द्वारांमध्यें जें दल येईल त्यांत अं हें बीज दिसेल. पुढें उजवीकडून उलट्या बाजूनें प्रत्येक दलांत आं, ई इत्यादि स्वरबीजें पृथक् पृथक् लिहिलेलीं असतात. याप्रमाणें सोळा दलांत सोळा स्वर पूर्ण होतात.

षोडशदल कमलानंतर आपल्याला आंतल्या बाजूस अष्टदल कमल दिसेल. पुढच्या बाजूस ऊर्ध्वमुख त्रिकोणाशीं संलग्न असलेल्या दलांत क-वर्गांतील बीजाक्षरें सरळ क्रमानें लिहिलेलीं दिसतील. आपल्या बाजूस असलेल्या अधोमुख त्रिकोणाशीं संलग्न असलेल्या दलांत ट-वर्गांतील बीजाक्षरें लिहिलेलीं असतात. उजवीकडील दलांत च-वर्गाचीं बीजाक्षरें लिहितात, तर डावीकडील दलांत त-वर्गाचीं बीजाक्षरें लिहितात. उजव्या बाजूकडील वरच्या कोंपऱ्यातील दलांत प-वर्गांतलीं बीजाक्षरें पहावयास सांपडतील, तर खालच्या बाजूच्या कोपऱ्यांतील दलांत य-वर्गांतील चार बीजाक्षरें लिहिलेलीं दिसतील. त्याचप्रमाणें डाव्या बाजूच्या खालच्या कोंपऱ्यांतील दलांत श-वर्गांतील चार बीजें लिहिलेलीं असून वरच्या कोंपऱ्यांतील दलांत ळं आणि क्षं हीं दोन बीजाक्षरें लिहिलेलीं असतात. याप्रमाणें अष्टदल कमलापर्यंतचीं सर्व चक्रें हीं शिवचक्रें म्हणून समजलीं जातात. या शिवचक्रांच्या आंत आपण गेलों म्हणजे आपल्याला शक्तिचक्रांचा समूह दिसेल.

आतां आपण शक्तिचक्रांचा विचार करूं. अष्टदल कमलाचें अवलोकन करून आपण आंत गेलों कीं, प्रथम आपल्याला सर्व बाजूंनीं मोकळा असलेला बराच मोठा वर्तुळाकार प्रदेश दृष्टीस पडेल. या प्रदेशांत अनेक त्रिकोणांनीं संलग्न असलेलीं पांच चक्रें आहेत. पांचवें चक्र केवळ त्रिकोणात्मकच आहे. यांत पहिलें चक्र चौदा त्रिकोणांचें आहे, तर त्याच्या आंतील दोन चक्रें हीं दहा-दहा त्रिकोणांचीं आहेत. त्यांच्या आंतील एक चक्र आठ त्रिकोणांचें असून त्याच्या आंत शुद्ध त्रिकोण दिसत आहे. पहिल्या चौदा त्रिकोणांच्या चक्राला "चतुर्दशार" असें म्हणतात, तर त्याच्या आंतील दहा-दहा त्रिकोण असलेल्या दोन चक्रांना क्रमशः "बहिर्दशार" आणि "अन्तर्दशार" असें म्हणतात. त्यांच्याहि पलीकडे असलेल्या आठ त्रिकोणांच्या चक्राला अष्टकोण अथवा वसुकोण अशीं नांवें दिलेलीं आहेत. त्याच्याहि आंत आपल्याला शुद्धत्रिकोण पहावयास सांपडेल. या त्रिकोणात्मक

श्रीयन्त्र



सम्यक् शतक्रतून् कृत्वा यत्फलं समवाप्नुयात् ।
तत्फलं लभते भक्त्या कृत्वा श्रीचक्रदर्शनम् ॥

महाषोडशदानानि कृत्वा यल्लभते फलम् ।
तत्फलं समवाप्नोति कृत्वा श्रीचक्रदर्शनम् ॥

सार्धत्रिकोटितीर्थेषु स्नात्वा यत्फलमश्नुते ॥
लभते तत्फलं भक्त्या कृत्वा श्रीचक्रदर्शनम् ॥

— यामल

चक्रांत दुसरा कोणताहि त्रिकोण घटक झालेला नाहीं. म्हणून या चक्राला शुद्धत्रिकोण असेंच म्हटलें जातें. चतुर्दशार चक्रामध्यें खालच्या बाजूला जो त्रिकोण आहे त्यांत कं हें बीजाक्षर असून क्रमाक्रमानें उजवीकडून डावीकडें खं, गं या क्रमानें ढं-पर्यंत चौदा बीजाक्षरें आहेत. त्याचप्रमाणें बहिर्दशारचक्रांतील दहा त्रिकोणांत खालच्या त्रिकोणापासून उजवीकडून डावीकडे णं-पासून भं-पर्यंत दहा बीजें लिहिलीं जातात, तर अंतर्दशार चक्रांतील दहा त्रिकोणांत मं-पासून क्षं-पर्यंत असलेलीं दहा बीजें लिहिलेलीं दृष्टीस पडतात. आपल्या देहांतहि मूलाधारचक्रापासून आज्ञाचक्रापर्यंत जीं सहा चक्रें आहेत त्या चक्रांच्याहि दलांत सर्व स्वर आणि व्यंजनें बीजरूपानें समावलेलींच आहेत. म्हणून कुलपथांतील अर्थात् सुषुम्नामार्गातील षट्चक्रें आणि श्रीयंत्रांतील चक्रें हीं एकरूपच समजलीं जातात.

मूर्धस्थानीं असलेल्या सहस्रदल कमलांतहि श्रीचक्राची भावना केली जाते. या श्रीचक्रांतहि स्वरवर्णात्मक मातृकाबीजांची स्थापना केलेली असतेच. या मूर्धस्थानीं विलसत असलेल्या सहस्र दलकमलांतील श्रीचक्रांत सर्व कलांनीं परिपूर्ण असलेलें, वृद्धिक्षयविरहित आणि निष्कलंक असें एक चंद्रमंडल आहे. श्रीचक्रांतील त्रिकोणांत मध्यवर्ती जसा बिंदु आहे त्याचप्रमाणें हा पूर्ण चंद्र सहस्रदल कमलांतील श्रीचक्रांत विराजमान झालेला आहे. या पूर्ण चंद्रांतच आपली उपास्यदेवता श्रीललितामहात्रिपुरसुंदरी ही मंगलमय शिवतत्त्वाशीं समरस होऊन विहरत असते. याच वेळेला तिच्या चरणकमलाच्या स्पर्शानें स्पंदित झालेल्या चंद्रमंडलांतून अमृताचा स्राव होत असतो व त्या अमृतानें शरीरांतील बहात्तर हजार नाड्यांचें व त्या नाड्यांबरोबर देहाचेंहि परिपोषण होत असतें असा योग्यांचा व तांत्रिकांचा सिद्धान्त आहे.

श्रीचक्रांतील मूलभूत मध्यवर्ति असलेल्या त्रिकोणाच्या बाहेर जे आठ त्रिकोण असलेलें चक्र आहे. ज्याला "अष्टार" किंवा वसुकोण अथवा अष्टकोणचक्र म्हणतात, त्या चक्रांत आपल्या बाजूला अधोमुख असलेल्या त्रिकोणापासून उजवीकडून डावीकडे उलट्या क्रमानें प्रत्येक त्रिकोणांत मंत्रस्वरूप वाग्देवतांचीं बीजें स्थापन केलेलीं असतात. तीं क्रमानें ब्लूं, क्लीं, न्लीं, ल्लूं, ज्म्रीं, ह्स्ल्व्यूं, झ्म्र्यूं, क्ष्म्रीं अशीं आहेत. या अष्टारचक्राच्या आंत असलेल्या त्रिकोणांत आपल्या उपास्य देवतेचा पंचदशाक्षरी महामंत्रराज विराजमान झालेला आहे.

देवीभुजंगमस्तोत्रांतील सोळावा श्लोक पहा. या त्रिकोणांतहि मध्यवर्ती असलेला बिंदु हा पूर्ण अर्थात् पोकळ स्वरूपाचा असून त्यामध्यें महामंत्रराजाच्या अंतिम बीजानें घटित असलेला 'ॐ ईं ईं नमः" हा मंत्रच तादात्म्यभावाला प्राप्त झालेल्या शिवशक्तीच्या रूपानें विलसत आहे. उपासनाबलानें येथपर्यंत पोहोंचलेल्या साधकाच्या आनंदाला पारावार उरत नाहीं.

हें सर्व अंतर्गत व बहिर्गत श्रीचक्रसमाराधनेचें स्वरूप आणि फल लक्षांत घेऊन आचार्य या श्लोकानें वस्तुस्थितीनें श्रीललिता महात्रिपुरसुंदरीचें वर्णन करीत आहेत. आई जगज्जननी ! तुझे चरणकमल हें खरोखर अमृताचा वर्षाव करणारे आहेत. त्या अमृताच्या वृष्टीनें तूं व्यष्टी आणि समष्टीच्या विश्वप्रपंचाचें सिंचन करतेस. "रसाम्नायमहसः" रसाम्नायमहस् शब्दाचा अर्थ चंद्र असा आहे. कारण तेथें रसाची—अमृताची पूर्ण अभिवृद्धि असते. आम्नाय शब्दाचा अर्थ जसा वेद आहे तसाच अभिवृद्धि असाहि पण आहे. ज्याच्यामध्यें अमृताची पूर्ण अभिवृद्धि आहे असा 'महस्' म्हणजे तेजोमय अथवा कांतिरूप असलेला चंद्र, त्या चंद्रांतून अमृताचा वर्षाव होतो व त्या वृष्टीनें साधकाच्या सर्व नाड्यांचें व देहाचेंहि पोषण होत असतें. हें सर्व कार्य कुंडलिनीच्या रूपानें चाललेलें असतें. त्यानंतर पुन्हां ती त्रिपूरसुंदरी कुंडलिनीच्या रूपानें खालीं उतरते. पुन्हां पूर्ववत् ती आपल्या प्रदेशांत म्हणजे मूलाधारभूत चक्रावर आधारित होऊन स्वाधिष्ठानचक्रामध्यें एखाद्या सर्पाप्रमाणें साडेतीन वेटोळे घालून झोंप घेत असते. ती तिची निद्रा आधारचक्राच्या मध्यभागीं कुंडाप्रमाणें असलेल्या खळग्यांत तोंड घालून होत असते. त्याच ठिकाणीं उगम पावणाऱ्या सुषुम्ना नाडीचाहि मार्ग तिनें आपल्या मुखानें अवरुद्ध केलेला असतो. कु म्हणजे पृथ्वी तिचें लं इत्याकारक बीज तेथेंच लीन असतें. म्हणून आधारचक्राला कुल असें म्हटलेलें आहे. त्या आधारचक्रांतला मध्यवर्ति भाग सखल असल्यामुळें त्याला कुलकुंड असें म्हणतात. त्या कुल-कुंडातहि एक सूक्ष्म छिद्र आहे. त्यालाच आचार्यांनीं कुहर असें म्हटलेलें आहे. इडा आणि पिंगला यांच्यामध्यें असलेली सुषुम्ना नाडी येथूनच उगम पावत असते. निद्रिस्त असलेल्या सर्पाकार कुंडलिनीच्या मुखानें सुषुम्नेचें द्वार झांकलेलें असतें. त्यामुळें प्राणवायूचा सुषुम्नेमध्यें प्रवेश होत नाहीं. जोंपर्यंत सुषुम्ना नाडींत प्राणवायूचा प्रवेश होत नाहीं तोंपर्यंत साधकाला अंतर्मुखता प्राप्त होत नाहीं.

जोंपर्यंत अंतर्मुखता नाहीं तोंपर्यंत मनाला स्वास्थ्याचा लाभ होत नाहीं व जोंपर्यंत स्वास्थ्याचा लाभ नाहीं तोंपर्यंत समाधानहि नाहीं. तात्पर्य समाधानासाठीं स्वास्थ्य पाहिजे, स्वास्थ्यासाठीं अंतर्मुखता पाहिजे, अंतर्मुखतेसाठीं सुषुम्ना नाडीचें द्वार उघडलें जाणें आवश्यक आहे व सुषुम्ना नाडीच्या द्वाराचें उद्घाटन होण्यासाठीं कुंडलिनीची जागृति होणें आवश्यक आहे. ही कुंडलिनीची जागृति श्रीललितामहात्रिपुरसुंदरीच्या उपासनेनें घडवून आणतां येते. श्रीत्रिपुरसुंदरी ही कुंडलिनीस्वरूपच आहे. तेव्हां तिची उपासना हेंच तिच्या जागृतीचें उत्कृष्ट साधन आहे यांत संशय नाहीं. कांहीं लोक "कुहरिणि" हें श्रीललितामहात्रिपुरसुंदरीचेंच विशेषण मानतात. कांहीं मानलें तरी वर निर्दिष्ट केलेल्या अर्थाला बाध येत नाहीं.



यंत्र क्रमांक १४

या यंत्रांतील चारी त्रिकोणांत ह्रीं बीज असल्याचें लक्षांत घ्यावें. हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर लिहून त्याची विधिपूर्वक सहा दिवस पूजा करावी. केळांचा नैवेद्य दाखवावा. रोज या श्लोकाचा एक हजार जप करावा. तांबड्या रेशमी दोऱ्यांत बांधून तें यंत्र धारण केल्यास शरीरांतील तेजःस्वरूप शुक्र धातूची वृद्धि होते. पांड्य जातें. हें सिद्ध यंत्र धारण केल्यास स्त्रियांच्या शरीरांतहि रजःप्रवृत्ति निर्माण होते.

चतुर्भिः श्रीकण्ठैः शिवयुवतिभिः पञ्चभिरपि
प्रभिन्नाभिः शम्भोर्नवभिरपि मूलप्रकृतिभिः ।
चतुश्चत्वारिंशद्वसुदल-कलाश्र-त्रिवलय-
त्रिरेखाभिः सार्धं तव शरणकोणाः परिणताः ॥११॥

"हे मातः त्रिपुरसुंदरि ! चतुर्भिः श्रीकण्ठैः शम्भोः सकाशात् प्रभिन्नाभिः पञ्चाभिः शिवयुवतिभिः नवभिः अपि मूलप्रकृतिभिः तव शरण कोणाः वसुदल-कलाश्र-त्रिवलय-त्रिरेखाभिः सार्धं परिणताः सन्तः चतुश्चत्वारिंशत् भवन्ति" अशा या श्लोकाचा अन्वय आहे. हे माते त्रिपुरसुंदरी ! चार ऊर्ध्वमुख

त्रिकोण, ते शंकरांचे त्रिकोण असल्यामुळें त्यांना श्रीकंठ असें म्हणतात. त्याचप्रमाणें मूळ बिंदुस्वरूप जो शंभु म्हणजे भगवान् सदाशिव त्याच्यापासून खालीं पांच अधोमुख त्रिकोण आहेत ते शक्तीचे त्रिकोण असल्यामुळें त्यांना "शिवयुवति" असें म्हटलेलें आहे. हे ऊर्ध्वमुख चार त्रिकोण आणि अधोमुख पांच त्रिकोण मध्यवर्ति असलेल्या बिंदूनें प्रभिन्न म्हणजे पृथक् झालेले आहेत. असे हे श्रीचक्रांतील नऊ त्रिकोण म्हणजे जणुं कांहीं विश्वप्रपंचाचीं मूळ कारणेंच आहेत. ऊर्ध्वमुख शिवचक्रांतील त्रिकोण आणि अधोमुख शक्तिचक्रांतील त्रिकोण सर्व मिळून त्रेचाळीस त्रिकोण होतात. श्रीत्रिपुरसुंदरीचें प्रत्यक्ष निवासस्थान असलेला मध्यवर्ति बिंदु हा चव्वेचाळीसावा समजावा. या सर्व त्रिकोणांच्या भोंवतालीं अष्टदल कमल, त्याच्याहि बाहेर षोडशदल कमल, त्यांच्या बाहेर तीन वर्तुलें अथवा मेखला आणि त्यांच्याहि बाहेर चतुष्कोणाकार तीन भूपुराच्या रेखा; अशा क्रमानें परिणत झालेलें, पूर्णतेला पोहोंचलेलें श्रीचक्र हें तुझें मंदिर आहे. त्याचा महिमा मी काय वर्णन करूं ? तो अवर्णनीय आहे. असा या श्लोकाचा अन्वयानुसारी अर्थ आहे.

विश्वाचे माता आणि पिता त्याचप्रमाणें आपलें इष्ट दैवत असलेल्या अद्वैतभावापन्न शिवशक्तिस्वरूप श्रीललितामहात्रिपुरसुंदरीचें मंदिर असलेल्या श्रीचक्राचा काय थाट वर्णन करावा ? त्याचें जितकें अवलोकन करावें, जितकें चिंतन करावें तितकें तें अपुरेंच वाटतें. विविध वैभवानें संपन्न अशा एखाद्या विशाल राजमंदिरांत प्रवेश केल्यानंतर मन जसें तेथें रमतें अथवा श्रीरामेश्वराच्या विशाल मंदिराचे प्राकार ओलांडून आपण जसा जसा आंत संचार करतों तशी तशी आपल्याला अनेक मंदिरें व तीर्थें दृष्टीस पडतात. अनेक देवतांचें दर्शन घडतें. थाटामाटांत विराजमान झालेल्या श्रीरामेश्वराचें दर्शन घडलें म्हणजे जीवाला एक प्रकारचें अनिर्वचनीय समाधान वाटतें. तोच प्रकार श्रीचक्राच्या स्वरूपाचें चिंतन करीत असतांना आपल्या प्रतीतीला येतो. मनाला समाधान वाटतें. आनंद वाटतो.

" चतुर्भिः शिवचक्रैश्च शक्तिचक्रैश्च पञ्चभिः ।
शिवशक्त्यात्मकं ज्ञेयं श्रीचक्रं शिवयोर्वपुः ॥ "

ऊर्ध्वमुख चार शिवत्रिकोण आणि अधोमुख पांच शक्तित्रिकोण असें हें नऊ त्रिकोणांचें शिवशक्तिस्वरूप असलेलें श्रीचक्र हें प्रत्यक्ष शिवपार्वतीचें

स्वरूपच होय. यंत्र (क्रमांक १५ पहा). या श्रीचक्रांत मध्यभागीं असलेल्या एका वर्तुळांत ऊर्ध्वमुख असे चार त्रिकोण दिसत आहेत तर अधोमुख असे पांच त्रिकोण दिसत आहेत. हा नऊ त्रिकोणांचा समूह हें श्रीचक्राचें अंतरंग स्वरूप आहे तर आठ दलांचें कमल, सोळा दलांचें कमल, तीन वर्तुळाकार मेखला आणि तीन रेघांचें भूपुर हें श्रीचक्राचें बहिरंग स्वरूप होय. अंतरंगाची मुख्य देवता शक्ति आहे तर बहिरंगाची मुख्य देवता शिव आहे. मध्यवर्ती असलेल्या बिंदुस्थानांत शिव आणि शक्ति तादात्म्यभावाला प्राप्त होऊन विराजमान झालेलीं आहेत. त्यांतहि शक्तिस्वरूप श्रीत्रिपुरसुंदरी ही परमशिवाच्या अंकावर विराजमान झालेली आहे. अशा रीतीनें बिंदुस्थानाची देवता शिवशक्ति हीच मानली जाते. या शिवशक्तीलाच "परदेवता" असें म्हटलें आहे.



यंत्र क्रमांक १५

श्रीचक्राचीं एकंदर नऊ आवरणें आहेत. या प्रत्येक आवरणाला चक्र असेंच म्हटलें जातें. अधोमुख पांच त्रिकोण असलेली आपल्याकडील बाजू ही पश्चिम दिशा समजावी. ऊर्ध्वमुख चार त्रिकोण असलेली आपल्यासमोरची वरची बाजू ही पूर्वेकडील समजावी. आपल्या डाव्या बाजूस उत्तर आणि उजव्या बाजूस दक्षिण दिशा समजावी. पश्चिम आणि उत्तर यांमधील कोंपरा वायव्य दिशेचा असून उत्तर आणि पूर्व यांमधील कोपरा ईशान्य दिशेचा समजावा. पूर्व आणि दक्षिण यांमधील कोंपरा आग्नेय दिशेचा असून दक्षिण आणि पश्चिम यांमधील कोंपरा ही नैर्ऋत्य दिशा समजावी. असा हा श्रीचक्राचा दिग्विभाग लक्षांत घ्यावा. श्रीचक्रांतील तीन रेघांचें चतुष्कोणाकार भूपुर हें पहिलें आवरण असून याला त्रैलोक्यमोहनचक्र असें नांव आहे. सोळा पाकळ्यांचें कमल हें दुसरें आवरण असून याला सर्वाशापरिपूरकचक्र असें म्हणतात. आठ पाकळ्यांचें कमल हें श्रीचक्रांतील तिसरें आवरण असून याला सर्वसंक्षोभणचक्र असें म्हटलेलें आहे. यानंतर चौदा त्रिकोण असलेलें चौथें चक्र हें श्रीचक्रांतील चौथें आवरण मानलें जातें. या आवरणाला सर्वसौभाग्यदायकचक्र असें म्हणतात. यानंतर दहा त्रिकोण असलेलें बहिर्दशारचक्र हें पांचवें आवरण असून याला सर्वार्थसाधकचक्र असें नांव दिलेलें आहे. त्यानंतर दहा त्रिकोणांचें दुसरें चक्र असून त्याला अंतर्दशारचक्र असें म्हणतात. हें चक्र श्रीचक्रातील सहावें आवरण असून त्याला सर्वरक्षाकरचक्र असें म्हटलेलें आहे. याच्या आंत आठ त्रिकोण असलेलें सातवें आवरण असून त्याला सर्वरोगहरचक्र असें म्हटलें जातें. या सभोंवार आठ त्रिकोण असलेल्या सातव्या आवरणांत मध्यवर्ती एक त्रिकोण आहे. तो मुख्य त्रिकोण असून श्रीचक्रांतील तें आठवें आवरण मानतात. या आवरणाला सर्वसिद्धिप्रदचक्र असें म्हणतात. या त्रिकोणांतहि जो पोकळ शून्याकार बिंदु आहे तो या श्रीचक्रातील नववें आवरण होय. या नवव्या आवरणाला सर्वानंदमयचक्र असें म्हणतात. याच चक्रामध्यें आपली आराध्य-देवता श्रीललितामहात्रिपुरसुंदरी ही शिवस्वरूपाशीं समरस होऊन विराजमान झालेली आहे. साधकाचें चित्त आपल्या या उपास्यदेवतेशीं जेव्हां समरस होतें तेव्हां त्याच्या आनंदाला सीमा रहात नाहीं. म्हणूनच या आवरणाला "सर्वानन्दमय" असें अगदीं योग्य नांव दिलेलें आहे. बाकीचीं आवरणेंहि आपआपल्या नांवाप्रमाणें साधकाला फलें देतच असतात.

श्रीचक्रांतील भूपुराच्या चारी दिशांना चार दारें आहेत. चतुष्कोणाकृति भूपुर हें तीन रेषांचें आहे. जणुं कांहीं ते तीन प्राकारच आहेत. पहिली रेषा शुक्ल वर्णाची आहे तर दुसरी रेषा अरुण वर्णाची आहे. तिसऱ्या रेषेचा वर्ण पिवळा आहे. पहिल्या रेषेच्या चारी दरवाजांत, चारी कोपऱ्यांत आणि पश्चिम आणि नैर्ऋत्य यांच्यामध्यें व पूर्व आणि ईशान्य यांच्यामध्यें दहा प्रकारच्या सिद्धि अर्थात् त्या त्या सिद्धींच्या अधिष्ठात्री देवता विराजमान झालेल्या आहेत. अणिमा, महिमा, लघिमा, ईशित्व, वशित्व इत्यादि त्यांचीं नावें आहेत. भूपुराच्या दुसऱ्या रेषेंत चारी दरवाजांमध्यें आपल्या वाम भागाकडे चार आणि चारी कोपऱ्यांत चार अशा आठ मातृका (लोकमाता) विराजमान झालेल्या आहेत. ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी इत्यादि त्यांचीं नांवें आहेत. सात मातृका प्रसिद्धच आहेत. या ठिकाणीं महालक्ष्मी ही आठवी मातृका असल्याचें दृष्टीस पडतें. भूपुराच्या तिसऱ्या रेषेंत आपण आलों म्हणजे तेथें पहिल्या रेषेप्रमाणेंच सर्वसंक्षोभिणीमुद्रा-शक्ति, सर्वविद्राविणीमुद्राशक्ति इत्यादि दहा शक्तिदेवता चारी द्वारांत आणि चारी त्रिकोणांत त्याचप्रमाणें पश्चिम आणि नैर्ऋत यांच्यामध्यें एक आणि पूर्व आणि ईशान्य यांच्यामध्यें एक याप्रमाणें आपआपल्या स्थानीं सुप्रतिष्ठित असलेल्य दृष्टीस पडतील. यांना प्रकट योगिनी असेंहि म्हणतात.

वर निर्दिष्ट केलेलें भूपुर ओलांडून आपण आंत गेलों कीं पुढें सर्व बाजूंनीं विशाल पटांगण असलेलें दृष्टीस पडेल. त्या पटांगणांतून पुढें आल्यावर आपल्याला तीन वलयें दिसतील. हीं तीन वलयें सत्त्व रज, आणि तम या तीन गुणांचीं द्योतक आहेत. अथवा सोम, सूर्य आणि अग्नि या तीन तत्त्वांचीं द्योतक आहेत अथवा इच्छाशक्ति, ज्ञानशक्ति आणि क्रियाशक्ति या तीन शक्तींचीं तीं द्योतक आहेत असेंहि मानतात. कांहीं श्रीचक्रांतून हीं तीन वलयें षोडशदल कमलाला लागून असलेल्या वरच्या बाजूच्या वलयानंतर दाखवितात तर कांहीं श्रीचक्रांत चौदा त्रिकोण असलेल्या चतुर्दशारचक्राच्या बाहेर एक वर्तुल दाखवतात, तर अष्टदल कमलाच्या बाहेर दुसरें वर्तुळ दाखवितात. तसेंच तिसरें वर्तुल सोळा पाकळ्या असलेल्या कमलाच्या बाहेर त्या कमलदलांना लागून असलेलें दाखवितात. कांहीं श्रीचक्रांतून पांच वर्तुलें दिसतात तर कांहींतून तीं सहाहि दिसतात.

श्रीचक्रांतील तीन मेखला ओलांडून आपण आंत गेलों म्हणजे आपल्याला सोळा पाकळ्यांचें कमल दिसेल. या सोळा पाकळ्या म्हणजे जशा कांहीं चंद्राच्या

सोळा कलाच होत. म्हणूनच या सोळा पाकळ्यांच्या कमलाप्रमाणें असलेल्या चक्राला चंद्रस्वरूप मानलेलें आहे. बरोबर आपल्या बाजूकडील खालच्या पाकळीला आरंभ करून उजवीकडून डावीकडे प्रत्येक पाकळींत कामाकर्षिणी नित्या कलादेवी, बुद्ध्याकर्षिणी नित्या कलादेवी याप्रमाणें सोळा देवींचीं मंदिरें आहेत. या सोळा देवींना गुप्त योगिनी असें म्हणतात. या सर्व देवतांचें दर्शन घेऊन आपण आंत गेलों म्हणजे आपल्याला आठ दलांचें कमल दिसेल. या कमलाचीं आठ दलें म्हणजे भगवान् श्रीशंकर यांच्या प्रत्यक्ष आठ मूर्तिच होत. पृथ्वी, जल, तेज, वायु आणि आकाश, त्याचप्रमाणें सूर्य, चंद्र आणि आत्मा ह्याच त्या शंकरांच्या आठ मूर्ति आहेत. शिवाय या कमलाच्या चारी दिशांचीं चार दलें आणि चारी कोणांतील चार दलें यांच्यामध्यें अनंगकुसुमादेवी, अनंगमेखलादेवी, अनंगमदनादेवी इत्यादि आठ देवतांचीं मंदिरें आहेत. त्या मंदिरांत सुप्रतिष्ठित असलेल्या या आठ देवता म्हणजे आपली उपास्यदेवता असलेल्या श्रीराजराजेश्वरी महात्रिपुरसुंदरीदेवीच्या गुप्ततर योगिनीच होत. हें गुप्त खातें मोठें जबरदस्त असून चौदाहि भुवनांचें तें निरीक्षण करीत असतें. येथपर्यंत तीन आवरणें संपलीं.

अष्टदलकमलाचें वर्तुळ ओलांडून आपण आंत गेलों कीं, सर्व बाजूंनीं मोकळा असलेला वर्तुलाकार असा बराच मोठा प्रदेश दृष्टीस पडेल. याच प्रदेशाला सुधासिंधु अथवा क्षीरसागर असें म्हटलेलें आहे. या क्षीरसागरांत पुढें मोठें द्वीप दृष्टीस पडेल. याच द्वीपाला मणिद्वीप असें म्हटलेलें आहे. यांत आपण प्रवेश केला कीं, आपल्याला चौदा त्रिकोण असलेलें श्रीचक्रांतील चौथें आवरण दृष्टीस पडेल. याला सर्वसौभाग्यदायकचक्र असें म्हणतात. या चक्रांतील अधोमुख असलेल्या खालच्या त्रिकोणापासून उलट्या क्रमानें उजवीकडून डावीकडे असलेल्या प्रत्येक त्रिकोणांत सर्वसंक्षोभिणीशक्ति, सर्वविद्राविणीशक्ति इत्यादि नांवें असलेल्या चौदा देवता विराजमान झालेल्या आहेत. यांना संप्रदाययोगिनी असें म्हणतात. याच्यापुढें दोन दशारचक्रें आहेत. एक बहिर्दशार व एक अन्तर्दशार. यांतील बाहेरच्या दहा त्रिकोण असलेल्या चक्रांत खालच्या त्रिकोणापासून उलट्या क्रमानें सर्वसिद्धिप्रदादेवी, सर्वसंपत्प्रदादेवी इत्यादि नांवें असलेल्या दहा देवता सर्व त्रिकोणांत पहावयास सांपडतील. हें चक्र दशावतारात्मक श्रीविष्णुस्वरूप आहे असें मानतात. यांतील देवतांना कुलोत्तीर्णयोगिनी असें म्हटलेलें आहे. याच दशारचक्राप्रमाणें दुसऱ्या दहा त्रिकोण असलेल्या चक्रांतील प्रत्येक त्रिकोणांत सर्वज्ञादेवी,

सर्वशक्तिदेवी, सर्वैश्वर्यप्रदादेवी इत्यादि दहा देवता आहेत. यांना निगर्भयोगिनी असें म्हणतात. याप्रमाणें पांचवें आणि सहावें आवरण ओलांडून आपण आंत गेलों म्हणजे आपल्याला आठ त्रिकोण असलेलें सातवें आवरण दिसेल. या सातव्या आवरणांतहि खालच्या त्रिकोणापासून उलट्या क्रमानें वशिनी वाग्देवता, कामेश्वरी वाग्देवता इत्यादि नांवें असलेल्या आठ वाग्देवता प्रत्येक त्रिकोणांत एक-एक याप्रमाणें प्रतिष्ठित झालेल्या आहेत. यांना रहस्ययोगिनी असें म्हणतात.

सर्वरोगहर नांव असलेल्या या सातव्या आवरणांतून आपण आंत गेलों कीं, आपल्याला मुख्य त्रिकोणाचें दर्शन होईल. या त्रिकोणाला सर्वसिद्धिप्रद असें नांव आहे. या त्रिकोणाच्या सभोंवार श्रीकामेश्वर भगवान् सदाशिव आणि श्रीकामेश्वरी महात्रिपुरसुंदरी यांचीं आयुधें आहेत. धनुष्यबाण, पाश आणि अंकुश अशीं त्या आयुधांचीं स्वरूपें आहेत. या त्रिकोणाच्या तीन भुजा म्हणजे सत्त्वगुण, रजोगुण आणि तमोगुणप्रधान अशा त्या तीन मूर्तिमंत शक्तिदेवताच आहेत. हा त्रिकोण नादशक्तीचें अधिष्ठान आहे. या त्रिकोणाचा वर्ण तांबड्या दुपारीच्या फुलासारखा आरक्त आहे. या त्रिकोणाच्या भुजांजवळ कामगिरिपीठ, जालंधरपीठ आणि पूर्णगिरिपीठ अशीं तीन पीठें म्हणजे आसनस्थानें अथवा सिंहासनें आहेत. या सिंहासनांवर ब्रह्मा, विष्णु आणि महेश आपआपल्या शक्तिदेवतेसह विराजमान झालेले आहेत. या देवता जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तीन अवस्थांच्या अधिष्ठात्री आहेत. त्याचप्रमाणें सृष्टि, स्थिति आणि प्रलय यांच्याहि त्या अधिष्ठात्री देवता आहेत. या त्रिकोणाच्या तीन भुजा म्हणजे अग्निचक्र, सूर्यचक्र आणि सोमचक्रच होत. इच्छाशक्ति, ज्ञान-शक्ति आणि क्रियाशक्ति यांच्याहि त्या अधिष्ठान आहेत. याच त्रिकोणांत आपल्या महात्रिपुरसुंदरीचेंच रूप बालात्रिपुरसुंदरीच्या रूपानें विराजमान झालेलें आहे. देवता ही मंत्रमय असल्यामुळें श्रीबालात्रिपुरसुंदरीचा मंत्रच या त्रिकोणांत दिलेला असल्याचें आढळतें, तर कांहीं श्रीचक्रांतून श्रीमहात्रिपुरसुंदरीचा पंचदशाक्षरी महामंत्र अथवा महामंत्रराज याच त्रिकोणांत विराजमान झालेले दिसतील. असा हा त्रिकोण अत्यंत महत्त्वाचा आहे.

वर निर्दिष्ट केलेल्या त्रिकोणाच्या आंत मध्यवर्ति असलेला बिंदु, ज्याला बिंदुस्थान असें म्हणतात. तो या श्रीचक्रांतील नववें आवरण होय. या बिंदुस्थानाला सर्वानंदमयचक्र असें म्हणतात. या नांवावरूनच आवरणाचें

महत्त्व लक्षांत घ्यावें. हें या चक्रांतील सर्वोच्च स्थान होय. जसा किल्ल्यांतील बालेकिल्ला व बालेकिल्ल्यांतील सभागृह. या सभागृहांत मधोमध एक रत्नजडित सिंहासन आहे. या सिंहासनाला चार पाय आहेत. या चारी पायांशीं ब्रह्मदेव, विष्णु, रुद्र आणि महेश्वर हे सेवाभावानें नम्र होऊन बसलेले आहेत. त्या सिंहासनावर परम शिवस्वरूपाशीं तादात्म्य पावलेली आपली उपास्यदेवता राजराजेश्वरी श्रीमहात्रिपुरसुंदरी विराजमान झालेली आहे. ती या ठिकाणीं शुद्धसच्चिदानंदस्वरूपच आहे. जो साधक श्रीचक्राचा सांगोपांग विचार करीत येथपर्यंत येऊन पोहोंचतो आणि येथें श्रीमहात्रिपुरसुंदरीचें अनन्यचित्तानें दर्शन घेतो तो धन्य होतो. त्याची कर्माधीन जन्ममरण परंपरा संपते व तो साक्षात् शिवस्वरूप होतो.

या बाह्य श्रीचक्राप्रमाणेंच आपल्या देहांतहि षट्चक्रस्वरूपी श्रीचक्राचें वर्णन करतां येण्यासारखें आहे. त्याचप्रमाणें ब्रह्मरंध्रांतर्गत सहस्रदलकमल हेंहि एक स्वतंत्र श्रीचक्रच आहे. किंबहुना आपला संपूर्ण देहच श्रीचक्रस्वरूप आहे. या देहांतील रस, रक्त, मांस, मेद आणि अस्थि हे धातु शक्तिचक्रस्वरूप आहेत तर मज्जा, शुक्र, प्राण, आणि जीव हे धातु शिवचक्रस्वरूप आहेत. "धारणाद्धातवः" या न्यायानें प्राण आणि जीव हे देहाची धारणा करीत असल्यामुळें त्यांनाहि धातूच म्हटलें आहे. देहाप्रमाणेंच संपूर्ण ब्राह्मांडहि श्रीचक्रस्वरूपच आहे. पंचमहाभूतें हीं शक्तिचक्रस्वरूपच आहेत तर माया, शुद्धविद्या, महेश्वर आणि सदाशिव हीं चार तत्त्वें शिवचक्रस्वरूप आहेत. या सर्वांमध्यें सर्वोच्च स्थानीं असलेलें श्रीसच्चिदानंदघन परब्रह्मतत्त्व हींच आपली उपास्यदेवता श्रीललितामहात्रिपुर-सुंदरी होय.

असें हें श्रीचक्राचें अलौकिक स्वरूप लक्षांत घेऊनच आचार्य वर्णन करीत आहेत : हे आई त्रिपुरसुंदरी ! बिंदुस्थानासह त्रेचाळीस त्रिकोणांनीं अर्थात् चव्वेचाळीस संख्येनें पूर्णत्वाला पोहोंचलेलें तुझें श्रीचक्ररूपी मंदिर मोठें अवर्णनीय आहे. या श्लोकांत श्रीकंठ आणि शिवयुवति हे शब्द लाक्षणिक आहेत. श्रीकंठ हा शब्द शिवाचा वाचक आहे. प्रकृतस्थलीं श्रीकंठ शब्दानें चार शिवचक्रें समजावींत. त्याचप्रमाणें शिवयुवति या शब्दाचा वाच्यार्थ पार्वती अर्थात् शक्ति असा आहे. पण या ठिकाणीं शिवयुवति या शब्दाचा अर्थ शक्तिचक्रें असा समजावा. त्याचप्रमाणें साक्षात् त्रिकोणांची संख्या त्रेचाळीस होत असल्यामुळें

कांहीं पुस्तकांतून "त्रयश्चत्वारिंशत्" असाच पाठभेद आढळतो. या मतानें "शरणकोणाः" या शब्दाचा षष्ठीतत्पुरुष समास मानावा लागतो. "चतुश्चत्वारिंशत्" हा पाठ मानल्यास "शरणकोणाः" या ठिकाणीं शरणं च कोणाश्च असा द्वन्द्व समास स्वीकारावा लागतो. कांहीं केलें तरी तात्पर्य एकच आहे. शरण शब्दाचा अर्थ घर किंवा मंदिर असा आहे.



यंत्र क्रमांक १६

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर लिहून एक्याऐंशी दिवस शास्त्रोक्त पूजा करावी. नैवेद्य गूळ आणि पायस. श्लोकाचा जप रोज एक हजार. यंत्र सिद्ध करून धारण करावें. अथवा या श्लोकानें लोणी अभिमंत्रून एक्याऐंशी दिवस प्राशन करावें. यानें वंध्या-दोष निवृत्त होतात.

त्वदीयं सौन्दर्यं तुहिन-गिरि-कन्ये तुलयितुं
कवीन्द्राः कल्पन्ते कथमपि विरिञ्चि-प्रभृतयः ।
यदालोकौत्सुक्यादमर-ललना यान्ति मनसा
तपोभिर्दुष्प्रापामपि गिरिश-सायुज्य-पदवीम् ॥ १२ ॥

श्रीचक्राचें वर्णन केल्यानंतर आचार्य या श्लोकानें श्रीचक्राच्या ठिकाणीं अधिष्ठित असलेल्या त्रिपुरसुंदरीच्या रूपसंपत्तीचें वर्णन करीत आहेत. हे तुहिन-गिरिकन्ये, तुहिन म्हणजे बर्फ त्यानें सतत आच्छादिलेला जो गिरि म्हणजे पर्वत अर्थात् हिमालय पर्वत, त्याची तूं कन्या आहेस. हे पर्वतराजतनये आई त्रिपुरसुंदरी ! तुझ्या सौंदर्याची तुलना करण्याकरितां अर्थात् त्याला उपमा देऊन त्याचें वर्णन करण्याकरितां ब्रह्मदेव, विष्णु, इंद्र बृहस्पति यांच्यासारखे मोठे मोठे कवि म्हणजे श्रेष्ठ विद्वान् असलेले प्रत्यक्ष देव देखील कथमपि म्हणजे कसें तरी मोठा प्रयास करून सुद्धां, "कल्पन्ते किम्" म्हणजे समर्थ होतात काय ? नाहीं. असेंच या प्रश्नाचें उत्तर द्यावें लागेल. तात्पर्य, हे आई जगज्जननी ! तुझ्या सौंदर्याचें तुलना करून वर्णन करावयास मोठे मोठे इंद्र-बृहस्पतीसारखे देवहि

समर्थ नाहींत तेथें माझी कथा काय ? मी काय वर्णन करणार ? तुझें सौंदर्य खरोखरच अवर्णनीय आहे.

अमरललना म्हणजे देवांच्या स्त्रिया देवता, अप्सरा वगैरे तुझें लावण्य अवलोकन करण्यास जेव्हां उत्कंठित होतात तेव्हां त्या मनानें शंकरांची समाराधना – उपासना करतात. योग, याग, तपश्चर्या इत्यादि साधनांनींहि मिळविण्यास कठीण असलेलें शिवपद, त्या भक्तिपूर्वक शंकरांची उपासना करून प्राप्त करून घेतात. " गिरिशसायुज्यपदवीं यान्ति " केवल मनःपूर्वक केल्या जाणाऱ्या भक्तीनें त्या देवता आणि अप्सरा गिरिशांच्या म्हणजे शंकरांच्या सायुज्य पदवीला शिवसायुज्यपदाला पोहोंचतात, अर्थात् त्या शिवस्वरूप होतात. तात्पर्य, शिवस्वरूप होऊनच त्या तुझ्या सौंदर्याचा आस्वाद घेतात. केवळ मनानें शिवस्वरूप होऊन तुझ्या सौंदर्याला अवलोकन करण्याचा त्या मनोरथ करीत असतात असाहि याचा अर्थ कांहीं विद्वान् करतात. तात्पर्य, श्रीमहात्रिपुरसुंदरीच्या सौंदर्याशीं तुलना करावी असें जगांत दुसरें कोणीच नाहीं. ब्राह्मी, वैष्णवी, इंद्राणी इत्यादि देवता किंवा उर्वशी, तिलोत्तमा, रंभा इत्यादि अप्सरा ह्या तर श्रीत्रिपुरसुंदरीच्या सौंदर्यलेशाच्या पासंगालाहि पुरत नाहींत मग त्रिपुरसुंदरीच्या सौंदर्याला त्यांची काय उपमा देणार ?

श्रीत्रिपुरसुंदरीच्या सौंदर्याचा आस्वाद भगवान् श्रीसदाशिवच घेऊं शकतात म्हणून त्या देवता मनानें सदाशिवाची उपासना करून सदाशिवस्वरूप होतात व सदाशिवाशीं तादात्म्य पावूनच त्या महात्रिपुरसुंदरीच्या सौंदर्याचा आस्वाद घेतात, असें श्रीललितामहात्रिपुरसुंदरीचें सौंदर्य अपूर्व आहे. या अभिप्रायानें आचार्य म्हणतात, आई ! तुझ्या सौंदर्याचें मी काय वर्णन करणार ? यांत आचार्यांनीं अनन्वयालंकार मोठ्या युक्तीनें ध्वनित केला आहे.

या श्लोकाचें यंत्र समचतुष्कोण असून त्यांत एकाखालीं एक सौः सौः अशीं अक्षरें लिहिलेलीं असतात. हें यंत्र देवाच्या ताम्हणांत पाण्यावर लिहावें. पंचेचाळीस दिवस विधिवत् पूजा करावी. मधाचा नैवेद्य दाखवावा. ताम्हणांतील जलाला स्पर्श करून या श्लोकाचा एक हजार रोज जप करावा. याप्रमाणें अभिमंत्रित केलेलें तें पाणी व मध प्राशन करावा. यानें विद्या, वक्तृत्व आणि सर्व लोकवशित्व प्राप्त होतें.

नरं वर्षीयांसं नयनविरसं नर्मसु जडं
तवापाङ्गालोके पतितमनुधावन्ति शतशः ।
गलद्वेणी-बन्धाः कुच-कलश-विस्रस्त-सिचया
हठात् त्रुट्यत्काञ्च्यो विगलित-दुकूला युवतयः ॥ १३ ॥

श्रीमहात्रिपुरसुंदरी ही स्वतः तर अत्यंत सुंदर आहेच, पण तिच्या कृपा-कटाक्षाचा लेशहि ज्याला लाभतो तो देखील सुंदर बनतो अशा अभिप्रायानें आचार्य वर्णन करीत आहेत. आई त्रिपुरसुंदरी ! मनुष्य "वर्षीयांसं" म्हणजे कितीहि वृद्ध असला, डोळ्यांनीं पहावत नाहीं असा विद्रूप असला, मनोरंजक हावभाव, विनोद वगैरे गोष्टींमध्यें तो जड म्हणजे अनभिज्ञ असला तरी देखील तो तुझ्या कृपाकटाक्षाच्या टप्प्यांत आला असतां अर्थात् तुझ्या कृपाकटाक्षाची त्याला प्राप्ति झाली असतां शेंकडों तरुण स्त्रिया पाठीमागें धांवतात. त्यांची जणुं कांहीं तारांबळ उडते. वेणीबंध शिथिल होतात. खांद्यावरचे "सिचय" म्हणजे पदर खालीं पडतात. कंबरपट्टे निसटतात आणि त्यांना वस्त्राचेंहि भान उरत नाहीं ! तात्पर्य, तुझ्या कृपाकटाक्षाला पात्र झाल्याबरोबर तुझा भक्त इतका आकर्षक बनतो कीं, त्याच्याकडे पाहून तरुण स्त्रियांचीहि ही अवस्था होते मग इतरांना तो आकर्षक वाटेल यांत नवल काय ? आई, धन्य आहे तुझा कृपाकटाक्षमहिमा !

या श्लोकाचें यंत्र एक लंब चतुष्कोण काढून त्यामध्यें क्लीं क्लीं क्लीं अशा तीन बीजांच्या दोन ओळी एकाखालीं एक लिहाव्यात. त्या दोन ओळींत मध्यें थोडें अंतर सोडावें. त्या अंतरांत आपल्या साध्याचा उल्लेख करावा. हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर लिहून सहा दिवस आराधना करावी. नैवेद्य गूळ, नारळ आणि केळांचें मिश्रण. या श्लोकाचा एक हजार जप करावा. फल स्त्री वश होते.

क्षितौ षट् पट्पञ्चाशद् द्वि-समधिक-पञ्चाशदुदके
हुताशे द्वाषष्टिश्चतुरधिक-पञ्चाशदनिले ।
दिवि द्विष्पट्त्रिंशन् मनसि च चतुःषष्टिरिति ये
मयूखास्तेषामप्युपरि तव पादाम्बुज-युगम् ॥ १४ ॥

श्रीविद्यारूप महात्रिपुरसुंदरीच्या चरणकमलाचा महिमा या श्लोकानें आचार्य वर्णन करीत आहेत. आपल्या शरीरामध्यें सहा चक्रें आहेत. मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्धि आणि आज्ञा अशीं त्या चक्रांचीं नांवें आहेत. या सर्वांशीं चक्र शब्द योजिला जातो. क्रमशः पृथ्वी, अग्नि, जल, वायु आणि आकाश हीं पंचमहाभूतें आणि मन या सर्व तत्त्वांचीं हीं चक्रें अधिष्ठान आहेत. हीं तत्त्वें, या तत्त्वांतून अभिव्यक्त होणारा शब्दप्रपंच आणि अर्थप्रपंच म्हणजे त्या शब्दाचे वाच्यार्थ असलेल्या पदार्थांची सृष्टि. त्याचप्रमाणें त्या अक्षरांच्या व अर्थांच्या अधिष्ठात्री देवता हे सर्व त्या षट्चक्रांच्या दलांतूनच वास्तव्य आणि व्यवहार करीत असतात. या सर्व देवता चित्स्वरूप आणि स्वयंप्रकाश असलेल्या श्रीमहात्रिपुरसुंदरीच्याच अंशभूत देवता आहेत. अग्नीपासून जसे स्फुलिंग प्रकट व्हावेत किंवा सूर्यापासून जसे चोहोंकडे किरण पसरावेत त्याचप्रमाणे हीं सर्व तत्त्वें आणि या सर्व देवता श्रीललितात्रिपुरसुंदरीच्याच स्वरूपांतून प्रकट झालेल्या आहेत. श्रीविद्यास्वरूप श्रीत्रिपुरसुंदरीचे ते किरणच मानले जातात. या किरणांनाच उद्देशून प्रस्तुत श्लोकाच्या चौथ्या चरणांत मयूख हा शब्द उपयोगांत आणला आहे. "मयूख" म्हणजे किरण.

किरणें हीं अनंत असलीं तरी परम सूक्ष्म मूलतत्त्वस्वरूप निरनिराळ्या चक्रांतील निरनिराळ्या तत्त्वांचीं किरणें हीं सांकेतिक स्वरूपानें व संक्षिप्त संख्येनें निर्दिष्ट करून सांगत आहेत. "क्षितौ" म्हणजे पृथ्वीतत्त्वानें युक्त असलेल्या मूलाधारचक्रामध्यें, "षट्पञ्चाशत्" म्हणजे छप्पन किरणें आहेत. सोळा स्वर आणि चौतीस व्यंजनें मिळून पन्नास अक्षरें होतात. हीं अक्षरें, पंचमहाभूतें, पंचतन्मात्रा, पंचज्ञानेन्द्रियें, पंचकर्मेन्द्रियें, अंतःकरणचतुष्टय, दशविधप्राण, प्रकृतितत्त्व पुरुषतत्त्व इत्यादि तत्त्वांचीं सूचक आहेत. हीं पन्नास अक्षरें अधिक ऐं ह्रीं श्रीं ऐं क्लीं सौः हीं मंत्रबीजाक्षरें सहा मिळून छप्पन्न किरणें पृथ्वीचीं अर्थात् पृथ्वीतत्त्वाच्या मूलाधारचक्रांतील आहेत. हीं छप्पन किरणें शिवशक्तिस्वरूप असल्यामुळें त्यांची जोडीजोडीनें अठ्ठावीस नांवेंहि शास्त्रांत सांपडतात. उदाहरणार्थ, त्रिपुरसंदरी, त्रिपुरसुंदर; महावज्रेश्वरी, महावज्रेश्वर; कुलसुंदरी, कुलसुंदर; परमेश्वरी, परमेश्वर इत्यादि. याप्रमाणें अठ्ठावीस दुणें छप्पन्न किरणें पृथ्वीतत्त्वात्मक मूलाधारचक्रांत आहेत. याचप्रमाणें जलतत्त्वामक मणिपूरचक्रांत बावन्न किरणें आहेत.

त्याचप्रमाणें अग्नितत्त्वात्मक स्वाधिष्ठानचक्रामध्यें बासष्ट किरणें आहेत. श्लोकांतील उदक शब्दानें मणिपूरचक्र आणि हुताश शब्दानें अग्नितत्त्वाचें स्वाधिष्ठानचक्र घ्यावयाचें आहे.

"अनिले" अनिल म्हणजे वायु अर्थात् वायुतत्त्वात्मक हृदयाच्या जवळ असलेलें अनाहतचक्र. या चक्रांतहि पन्नास मातृका म्हणजे मूळाक्षरें अधिक चार भूतांचीं बीजें यं रं लं वं मिळून चोपन्न किरणें आहेत. त्यांचींहि अमृताकर्षिणी अमृताकर्षण; शरीराकर्षणी शरीराकर्षण इत्यादि नांवें आहेत. यानंतर "दिवि" म्हणजे कंठस्थानीं असलेल्या आकाशतत्त्वयुक्त विशुद्धिचक्रामध्यें "द्विः पट्त्रिंशत्" म्हणजे बहात्तर किरणें आहेत. याच्याहि वर मन या तत्त्वानें युक्त असलेल्या आज्ञाचक्रांत चौसष्ट किरणें आहेत. या सर्व किरणांची बेरीज केली तर एकंदर तीनशेंसाठ संख्या होते. एक वर्षाच्या कालचक्रांतहि तीनशेंसाठ दिवस समाविष्ट झालेले असतात हें आपणांस माहीतच आहे. आपल्या देहांत जशीं षट्चक्रें आहेत त्याचप्रमाणें एका वर्षाच्या कालखंडांतहि वसंत, ग्रीष्म इत्यादि सहा अयनें असतात. हीं अयनें संवत्सरात्मक कालपिंडांतील मूलाधारादि षट्चक्रेंच होत. तात्पर्य, जें कालपिंडांत तेंच देहपिंडांत आणि जें देहपिंडांत तेंच ब्रह्माण्डपिंडांत अशी ही सर्व कल्पना लक्षांत घेऊन आचार्य म्हणतात, हे आई त्रिपुरसुंदरी! याप्रमाणें वेदांत, शास्त्रांत आणि योगीजनांच्या अनुभवांत प्रसिद्ध असलेलीं जीं किरणें (देवता आणि तत्त्वें) आहेत "तेषां अपि उपरि तव पादाम्बुजयुगं आस्त" म्हणजे त्या सर्वांच्याहिवर श्रीचक्रांतील बिंदुस्थानांत, त्याचप्रमाणें कालचक्राच्याहिवर आणि सर्वतत्त्वात्मक ब्रह्मांडाच्याहि वर अर्थात् कालातीत आणि सर्वतत्त्वातीत अशा अनिर्वचनीय सर्वानंदमय आवरणांत तुझे चरणारविंद विराजमान झालेले आहेत. ते आमच्या देहपिंडांतहि सर्वांच्यावर विराजमान असलेल्या ब्रह्मरंध्रांतर्गत सहस्रदलकमलातील पूर्ण चंद्रमंडलांतहि विराजमान झालेले आहेत. आई! त्या तुझ्या चरणारविंदांचा महिमा मी काय वर्णन करणार?

या श्लोकाचें यंत्र – समभुज चतुष्कोण काढावा. चारी कोणांत एकत्र मिळणाऱ्या रेघांची टोकें किंचित् बाहेर काढून तेथें त्रिशूळाचा आकार द्यावा. एकंदर आठ त्रिशूल होतील. मधल्या भागांत क्लीं क्लीं क्लीं हीं बीजें आडव्या दोन ओळींत लिहावींत. त्या दोन ओळींमध्यें आपल्या साध्याचा निर्देश करावा. हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर लिहून पूर्वेकडें तोंड करून एकवीस दिवस समाराधना

करावी. उंसाच्या गंडेऱ्यांचा नैवेद्य दाखवावा. रोज पांचशें वेळां या श्लोकाचा जप करावा. सिद्धयंत्र धारण करावें. यानें षंढत्वनिरास आणि पुत्रप्राप्ति होते.

शरज्ज्योत्स्ना-शुद्धां शशि-युत-जटाजूट-मुकुटां
वर-त्रास-त्राण-स्फटिक-घटिका-पुस्तक-कराम् ।
सकृन्न त्वा नत्वा कथमिव सतां सन्निदधते
मधु-क्षीर-द्राक्षा-मधुरिम-धुरीणाः फणितयः ॥ १५ ॥

"हे मातः त्वा सकृन्नत्वा सतां मधु-क्षीर-द्राक्षा-मधुरिम-धुरीणाः फणितयः कथं इव न सन्निदधते ? अपि तु सन्निदधते एव" असा या श्लोकाचा मुख्य अन्वय आहे. आई त्रिपुरसुंदरी ! तुझ्या चरणीं (भक्तिभावानें) एक वेळ जरी नमस्कार केला तरी देखील त्याला मोठ्या मोठ्या सज्जनांचे, कवीश्वरांचे गोड गोड शब्द – जे दूध, मध अथवा मनुका-द्राक्षें यांच्या माधुर्यालाहि मागें सारतील ते कां बरें प्राप्त होणार नाहींत ? का बरें ते त्याच्या सान्निध्यांत येणार नाहींत ? अर्थात् अवश्य येतील. त्याच्या मुखांत उत्तम वाणी, उत्तम शब्द वास करतील. असा या मुख्य अन्वयाचा अर्थ आहे.

आई ! कशी आहेस तूं ? "शरज्ज्योत्स्नाशुद्धाम्" तुझें रूप, तुझी कांति ही शरदृतूंतील चंद्राच्या चांदण्याप्रमाणें अत्यंत शुद्ध म्हणजे स्वच्छ, शुभ्र, आह्लादायक अशी आहे. त्याचप्रमाणें "शशियुत-जटा-जूट-मुकुटाम्" म्हणजे तुझ्या जटाजूटावर अर्थात् मस्तकावर शोभणाऱ्या मुकुटांत चंद्राची कोर झळकत आहे. चंद्राची कोर ही तुझें शिरोभूषण आहे. आई ! तुझ्या चार हातांपैकीं एका हातानें तूं "वर" म्हणजे वरमुद्रा धारण केलेली आहेस. दुसऱ्या हातानें "त्रासत्राण" म्हणजे भयापासून संरक्षण अर्थात् अभयमुद्रा धारण केलेली आहेस. एका हातांत स्फटिकाचा कलश धारण केलेला आहेस तर एका हातांत पुस्तकच धारण केलेलें आहेस. स्फटिकघटिका या ठिकाणीं कांहीं विद्वान् "स्फटिकघुटिकां" असा पाठभेद स्वीकारतात आणि स्फटिक मण्यांची माळ असा त्याचा अर्थ करतात तोहि योग्यच आहे. "स्फटिकगुलिका" असाहि पाठ कांहीं ठिकाणीं आढळतो. अर्थ एकच आहे. आई ! अशा या तुझ्या स्वरूपाचें ध्यान करून तुझ्या चरणीं भक्तिभावानें एक वेळ जरी नमस्कार केला तरी त्याला दूध, मध आणि द्राक्षें यांच्या माधुर्यालाहि जिंकून पुढें पाऊल टाकतील असे गोड शब्द, मनोहर शब्द

आणि "सतां" म्हणजे बृहस्पतीसारख्या सज्जनांचे – कवीश्वरांचेहि गुण त्याला प्राप्त होतात. आई ! तुझ्यासारखी सर्वसमर्थ कृपाळु प्रसन्न झाल्यानंतर काय बरें दुर्लभ आहे ?

हें श्रीत्रिपुरसुंदरीच्या वाग्वादिनी रूपाचें अथवा श्रीसरस्वतीरूपाचें ध्यान असल्यामुळें चौथ्या श्लोकाशीं विरोध मानण्याचें कांहींच कारण नाहीं. श्रीबाला-त्रिपुरसुंदरीचेंहि ध्यान असेंच आहे. फणिति शब्दाचा अर्थ वाग्वैभव अथवा वक्तृत्वशक्ति असा समजावा.



यंत्र क्रमांक १७

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर लिहून एके-चाळीस दिवस त्याची समाराधना करावी. या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. नैवेद्य मध, केळें आणि साखर. सिद्ध यंत्र धारण करावें अथवा हें यंत्र पाण्यामध्यें लिहून पूर्ववत् पूजा आणि जप करून तें पाणी प्यावें. साधकाला कवित्वशक्ति – लाभ होईल. तो ज्ञानविज्ञान संपन्न होईल.

कवीन्द्राणां चेतःकमलवन-बालातप-रुचिं
भजन्ते ये सन्तः कतिचिदरुणामेव भवतीम् ।
विरिञ्चि-प्रेयस्यास्तरुण-तर-शृङ्गार-लहरी-
गभीराभिर्वाग्भिर्विदधति सतां रञ्जनममी ॥ १६ ॥

"ये अरुणामेव भवतीं भजन्ते ते वाग्भिः सतां रञ्जनं विदधति" असा या श्लोकाचा मुख्य अन्वय आहे. हे आई त्रिपुरेश्वरी ! तुझा स्वाभाविक वर्ण अरुण आहे आणि तुझें नांवहि पण अरुणाच आहे. तेव्हां वर्णानें आणि नांवानेंहि तूं अरुणा असल्याचें शास्त्रांत वर्णन केलेलें आहे. तुझ्या या स्वरूपाचें जे कोणी सज्जन ध्यान करतात ते आपल्या अपूर्व वाग्विलासांनीं सज्जनांची, मोठ्या मोठ्या विद्वानांची अथवा देवतांचींहि मनें रमविण्यास समर्थ होतात. असा या अन्वयाचा अभिप्रेतार्थ आहे.

वामकेश्वर तंत्रामध्यें "अरुणाख्यां भगवतीमरुणाभां विचिन्तयेत्" असें सांगितलेलें आहे. श्रीललितामहात्रिपुरसुंदरीचेंच हें एक रूप आहे. या

रूपांत अंगकांति अरुणवर्ण आहे. नांवहि अरुणा असेंच आहे. सर्वैश्वर्यसंपन्न असलेल्या या अरुणादेवीला आठ हात असून पाश, अंकुश, धनुष्य, बाण, वर-मुद्रा, अभयमुद्रा, पुस्तक आणि स्फटिकाच्या मण्यांची माळ तिनें आपल्या हातांनीं धारण केलेलीं आहेत. तिला तीन नेत्र आहेत. ती अमृताच्या सागरामध्यें क्रीडा करीत आहे. याप्रमाणें जो साधक त्या मंगलमय देवीचें ध्यान करतो तो मोठा विद्वान् आणि कवि होतो. आपल्या अद्भुत आणि मधुर वाणीनें तो विद्वानांचें व सज्जनांचें मनोरंजन करतो. या वर्णनाला अनुलक्षून आचार्य या श्लोकांत वर्णन करीत आहेत. हे आई, षड्गुणैश्वर्यसंपन्न माते ! ब्रह्मदेव, बृहस्पति, इंद्र इत्यादि जे कवींद्र म्हणजे कवीश्वर अर्थात् ज्ञानी लोक, त्यांच्या अंतः-करणरूपी कमलांच्या वनाला प्रफुल्लित करणाऱ्या बालातपाप्रमाणें म्हणजे बाल-रवीच्या किरणांप्रमाणें तुझी अंगकांति अरुणवर्ण आहे. बालरवि म्हणजे नुकताच उदयाला आलेला सूर्य. तो जसा अरुणवर्ण तशीच तुझी अंगकांति अरुणवर्ण आहे. तुझें नांवहि पण अरुणा असेंच आहे. जे कांहीं सज्जन अशा तुझ्या रूपाचें ध्यान करतात, अशा रूपानें तुला भजतात ते देखील "विरिञ्चिप्रेयसी" म्हणजे ब्रह्मदेवाची जी प्रिय पत्नी श्रीसरस्वतीदेवी तिच्या नव्या नव्या मधुरतम शृंगाररसाच्या तरंगांनीं युक्त अशा वाग्विलासांनीं सज्जनांच्या मनांचें रंजन करतात. तात्पर्य, "अमी". म्हणजे हे तुझी उपासना करणारे साधक तुझ्या उपासनेनें प्राप्त झालेल्या अशा सर्वगुणसंपन्न वाग्वैभवानें सज्जनांची आणि मोठ्या मोठ्या विद्वज्जनांचींहि मनें रमवितात. आई, असा हा तुझा महिमा आहे. तो "मूकं करोति वाचाऽलम्" म्हणजे मुक्यालाहि "वाचा" म्हणजे वाग्वैभवानें "अलंकरोति" म्हणजे अलंकृत करतो, भूषवितो. आई ! माझा तुला नमस्कार असो. कांहीं लोक या श्लोकांत श्रीबालात्रिपुरसुंदरीचें ध्यान अभिप्रेत आहे असें मानतात.

"अरुण-किरण-जालैरञ्जिता सावकाशा
विधृत-जप-पटीका-पुस्तकाऽभीति-हस्ता ।
इतरकर-वराढ्या फुल्ल-कल्हार-माला
निवसतु हृदि बाला नित्य-कल्याण-शीला ॥"

श्रीबालात्रिपुरसुंदरीच्या चिंतनानेंहि साधकाचें ऐहिक व पारलौकिक जीवन धन्य होतें.

सोन्याच्या पत्र्यावर अधोमुख त्रिकोण काढावा. त्रिकोणाच्या तिन्ही कोपऱ्यांना बाहेरच्या बाजूनें त्रिशूलाचा आकार काढावा. एकेचाळीस दिवस समाराधना करावी. मधाचा नैवेद्य दाखवावा. रोज या श्लोकाचा एक हजार जप करावा. सिद्ध यंत्र धारण करावें. वेदशास्त्रादि विद्येमध्यें तो निष्णात होईल.

सवित्रीभिर्वाचां शशि-मणि-शिला-भङ्ग-रुचिभि-
र्वशिन्याद्याभिस्त्वां सह जननि सञ्चिन्तयति यः ।
स कर्ता काव्यानां भवति महतां भङ्गिरुचिभि-
र्वचोभिर्वाग्देवी-वदन-कमलामोद-मधुरैः ॥ १७ ॥

" हे जननि ! वाचां सवित्रीभिः शशि-मणि-शिला-भङ्ग-रुचिभिः वशिन्याद्याभिः सह त्वां यः सञ्चिन्तयति, सः महतां भङ्गिरुचिभिः वाग्देवी-कमलामोदमधुरैः वचोभिः काव्यानां कर्ता भवति " असा या श्लोकाचा अन्वय आहे. हे आई जगज्जननी ! वाक्शक्तीला निर्माण करणाऱ्या आणि सर्व मूळाक्षरांच्या अधिष्ठात्री असलेल्या तसेंच चंद्रकांत रत्नाच्या तुकड्याप्रमाणें ज्यांची अंगकांति स्वच्छ व शुभ्र आहे अशा वशिनी, कामेश्वरी, मोदिनी इत्यादि ज्या आठ वाग्देवता आहेत त्यांच्यासह जो भक्त भक्तियुक्त अंतःकरणानें तुझें चिंतन करील तो खरोखर मोठ्या मोठ्या विश्वमान्य असलेल्या सुप्रसिद्ध कवींच्या काव्यरचनेप्रमाणें सुंदर असलेल्या आणि वाग्देवीच्या अर्थात् सरस्वतीच्या मुखकमलांतील आमोदानें मधुर असलेल्या अशा गोड गंभीर व मनोरंजक शब्दांनीं उत्तम काव्य करणारा होईल. असें तुझ्या ध्यानाचें फल आहे. असा या श्लोकाचा अन्वयानुसारी अर्थ आहे.

यांतील अभिप्राय असा आहे कीं, श्रीललितात्रिपुरसुंदरी ही मातृकारूप आहे. मातृका शब्दाचा अर्थ वर्णसमूह असा आहे. अ-पासून क्ष-पर्यंत संपूर्ण वर्णसमूहाच्या अधिष्ठात्री देवतेलाहि मातृका असेंच म्हणतात. या सर्व मातृकांचा समावेश श्रीचक्रांत झालेलाच आहे. श्रीचक्राची अधिष्ठात्री देवता आणि संपूर्ण मातृकांची अधिष्ठात्री देवता श्रीमहात्रिपुरसुंदरी ही एकच आहे. याच अभिप्रायानें तंत्रशास्त्रांत " मातृकां वशिनीयुक्तां योगिनीभिः समन्विताम् । गन्धाद्याकर्षिणीयुक्तां संस्मरेत्त्रिपुराम्बिकाम् " या श्लोकानें मातृका आणि त्रिपुराम्बिका या दोन्ही शब्दांनीं एकच देवतेचा निर्देश केलेला आहे. वेदांतहि " गन्धद्वारां दुराधर्षां " या मंत्रानें याच मातृकारूप श्रीविद्या-महात्रिपुरसुंदरीचाच मंत्राच्या शेवटीं "श्रियम्" पदानें

निर्देश केलेला आहे. श्रीचक्रामध्यें अधिष्ठित असलेल्या मातृकारूपी श्रीविद्या-देवीच्या उपासनेनें उपासक कवि आणि विद्वान होतो. अशी या उपासनेची फलश्रुति आहे.

वर निर्दिष्ट केलेल्या मातृका संख्येनें पन्नास आहेत. या मातृकांचे आठ वर्ग कल्पिलेले आहेत. अवर्ग, कवर्ग, चवर्ग, टवर्ग तवर्ग, पवर्ग, यवर्ग आणि शवर्ग अशीं त्या वर्गांचीं नांवें आहेत. अवर्गामध्यें सोळा स्वर येतात. कवर्गापासून पवर्गापर्यंत पंचवीस अक्षरें येतात. यांना व्याकरणांत स्पर्श अशी संज्ञा आहे. य-वर्गामध्यें य, व, र, ल अशीं चार अक्षरें आहेत. त्यांना अंतस्थवर्ण असें म्हणतात. तसेंच शवर्गामध्यें श, ष, स, ह आणि क्ष अशीं पांच अक्षरें येतात. एकूण या अक्षरांची संख्या पन्नास अक्षरें म्हणजे आपल्या श्रीललितामहात्रिपुर सुंदरीचेंच रूप होय.

वर सांगितलेल्या आठ वर्गांच्या ज्या आठ देवता आहेत त्यांना वाग्देवता असें म्हणतात. वशिनी, कामेश्वरी, मोदिनी, विमला इत्यादि त्यांचीं नांवें आहेत. या वाग्देवतांबरोबरच विद्या, रोचिका, मोचिका इत्यादि बारा योगिनी आणि गंधाकर्षिणी, रूपाकर्षिणी इत्यादि चार शक्तिदेवता; या सर्वांसह शास्त्रांत वर्णन केल्याप्रमाणें त्यांचीं नांवें, रूपें व ध्यानें लक्षांत घेऊन श्रीमहात्रिपुरसुंदरीचें चिंतन केलें असतां साधकाला विद्वत्त्व आणि कवित्व यांचा लाभ होतो. अशा अभिप्रायानें आचार्यांनीं या सतराव्या श्लोकांत महात्रिपुरसुंदरीचें वर्णन केलेलें आहे.



यंत्र क्रमांक १८

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर काढून एक्याण्णव दिवस त्याची विधिपूर्वक पूजा करावी. मध, केळें, दूध, साखर आणि खडीसाखर यांचें मिश्रण करून नैवेद्य दाखवावा. रोज एक हजार या श्लोकाचा जप करावा. सिद्ध यंत्र धारण करावें याच्या योगें बुद्धि सर्व कलांमध्यें निष्णात होईल.

तनुच्छायाभिस्ते तरुण-तरणि-श्रीसरणिभि-
र्दिवं सर्वामुर्वीमरुणिमनि मग्नां स्मरति यः ।

भवन्त्यस्य त्रस्यद्वन-हरिण-शालीन-नयनाः
सहोर्वश्या वश्याः कति कति न गीर्वाणगणिकाः ॥ १८ ॥

हे आई जगज्जननी ! नुकतेंच उदयाला येत असलेलें सूर्याचें बिंब जसें आरक्तवर्ण असावें त्याचप्रमाणें तुझ्या शरीराची कांति आरक्त आहे. तरुणतर म्हणजे अत्यंत बालस्वरूपांतला अर्थात् नुकताच उदयाला येणारा असा जो तरणि म्हणजे सूर्य अर्थात् बालरवि. त्याच्या कांतीप्रमाणें आहे श्रीसरणि म्हणजे शोभेचा प्रकार अथवा पद्धति ज्यांची अशा तुझ्या "तनुच्छाया" म्हणजे अंगकांतींनीं अंतरिक्षलोक आणि संपूर्ण भूलोक जणुं कांहीं अरुणवर्णामध्यें निमग्न झाला आहे. तुझ्या अरुणवर्णामध्यें स्वर्गलोक आणि संपूर्ण भूलोक न्हाऊन निघाला आहे अशा स्वरूपानें जो कोणी तुझें चिंतन करील, स्वच्छंदपणें अरण्यामध्यें बागडत असतांना भ्यालेल्या – घाबरलेल्या हरिणीप्रमाणें ज्यांचे नेत्र शालीन म्हणजे सुंदर आणि चंचल आहेत अशा उर्वशीसह किती तरी देवांच्या गणिका म्हणजे अप्सरा त्याला कां वश होणार नाहींत ? सर्वच अप्सरा त्याला वश होतील. असा याचा अर्थ समजावा. तात्पर्य, तो तुझा भक्त अप्सरांच्याहि चित्ताला मोह पडेल इतका सुंदर होतो. हा तुझ्या ध्यानाचा महिमा आहे. उर्वशी हें एका अप्सरेचें नांव आहे. ती आपल्या रूपानें 'उरु' म्हणजे श्रेष्ठ अशा ऋषिमुनि-देवांनाहि "वशयति" म्हणजे वश करते म्हणून तिला उर्वशी असें नांव पडलें.



यंत्र क्रमांक १९

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर काढून पंचेचाळीस दिवस पूजा करावी. नैवेद्य दूध, पायस आणि तांबूल. या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. सिद्धयंत्र धारण करावें. चंदन, केशर अथवा फूल अभिमंत्रून द्यावें. सकल प्राणी वश होतील.

मुखं बिन्दुं कृत्वा कुचयुगमधस्तस्य तदधो
हरार्धं ध्यायेद्यो हरमहिषि ते मन्मथकलाम् ।
स सद्यः संक्षोभं नयति वनिता इत्यतिलघु
त्रिलोकीमप्याशु भ्रमयति रवीन्दु-स्तन-युगाम् ॥ १९॥

" हे हरमहिषि ! मुखं बिन्दुं कृत्वा, तस्य अधः कुचयुगं कृत्वा, तदधः हरार्धं कृत्वा, यः ते मन्मथकलां ध्यायेत् सः वनिताः सद्यः संक्षोभं नयति इति अतिलघु सः रवीन्दुस्तयुगां त्रिलोकीं अपि आशु भ्रमयति " असा यों श्लोकाचा अन्वय आहे. या श्लोकाचा अर्थ वाचण्यापूर्वी वाचकांनीं देवीभुजंगमस्तोत्रांतील सोळाव्या आणि सतराव्या श्लोकाचें विवेचन अवश्य वाचावें (पान ५३०).

हर म्हणजे कामेश्वर भगवान् श्रीशंकर. त्यांची महिषी म्हणजे पट्टराणी कामेश्वरी श्रीललितामहात्रिपुरसुंदरी देवी. हे माते, त्रिपुरसुंदरी ! तुझी मन्मथकला म्हणजे कामकला अर्थात् क्लीं हें बीजाक्षर अथवा ह्रीं या बीजांतील केवल ई इत्याकारक बीजाक्षर. हें बीजाक्षर मंत्ररूपानें तर तुझें स्वरूप आहेच, पण आकृतीनेंहि तें तुझें मूर्तस्वरूप आहे. जो कोणी तुझ्या या मूर्तस्वरूपाचें ध्यान करील — उपासना करील, तो आपल्या अद्वितीय प्रभावानें त्रैलोक्यालाहि मोहित करील. अशा अभिप्रायानें आचार्य या श्लोकानें महात्रिपुरसुंदरीचें वर्णन करीत आहेत.

ई या बीजांत सर्वांत वर एक बिंदु आहे. त्याच्या खालीं दोन बिंदु असून त्यांच्याहि खालीं ह या अक्षराचा अर्धा भाग आहे. ज्याला हार्दकला, योनि अथवा त्रिकोण असें म्हणतात. हार्दकला या शब्दाचाहि अर्थ मन्मथकला किंवा कामकला असाच आहे. काम शब्दाचा अर्थ या ठिकाणीं परमेश्वर भगवान् सदाशिव असा आहे. " काम्यते सर्वैः इति कामः " आपल्या अभ्युदयासाठीं सर्वांकडून ज्याची अपेक्षा केली जाते तो काम म्हणजे परमात्मा. त्याचें वास्तव्यस्थान हृदयच आहे. " ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति " हें गीतावचन प्रसिद्धच आहे. या अभिप्रायानें ईश्वराला 'हार्द' असें म्हणतात. त्याची जी कला म्हणजे शक्ति ती कामकला. अर्थात् श्रीललितामहात्रिपुरसुंदरी असा काम कला या शब्दाचा अर्थ होतो. त्रिपुरसुंदरीचा जो बीजमंत्र ई इत्याकारक अक्षर, त्यालाहि पण कामकला असेंच म्हणतात. कारण मंत्र आणि देवता दोन्ही एकरूपच असतात.

ई या बीजांतील वरचा बिंदु हा शुद्ध रविस्वरूप आहे. " रूयते स्तूयते इति रविः " या व्युत्पत्तीप्रमाणें रवि शब्दाचा अर्थ सर्वांकडून स्तविला जाणारा परमात्मा असा होतो. तोच शक्तिसहकृत परमात्मा मुख्य बिंदूच्या रूपानें सर्वांत वर आहे त्याच्या खालीं असलेले दोन बिंदु हे अग्नितत्त्व आणि सोमतत्त्व या स्वरूपाचे आहेत. अग्नि आणि सोम या दोन तत्त्वांनींच सर्व जगाचें पोषण होत असतें. याच अभिप्रायानें सर्व जगच "अग्नीषोमात्मक" मानलें जातें. त्याच्याहि खालीं असलेलें तत्त्व ज्याला योनि अथवा प्रकृति म्हणतात तें तर या जगाचें मूळकारणच आहे. याप्रमाणें परमात्मा, अग्नि, सोम आणि मूलप्रकृति हेंच आपल्या त्रिपुरसुंदरीचें रूप होय.

" **नभो महाबिन्दुमुखी चन्द्रसूर्यस्तनद्वया ।**
सुमेरु-हार-वलया शोभमाना महीपदा ॥
पाताल-तलविन्यासा त्रिलोकीयं तवाम्बिके ।
कामराज-कला-रूपा जागर्ति सचराचरा ॥ "

असें हें कामकलारूप श्रीत्रिपुरसुंदरीचें चित्र रुद्रयामलामध्यें वर्णिलेलें आहे. या स्वरूपाच्या उपासनेला तंत्रशास्त्रांत मादनप्रयोग असेंहि म्हटलेलें आहे. निष्कामरूपानें केली जाणारी ही उपासना साधकाचें जीवन धन्य करते.

ई बीजामध्यें तो जो रविरूप सर्वांत वर असलेला बिंदु तेंच श्रीमहात्रिपुरसुंदरीचें मुख आहे अशी भावना करावी. असा हा मुखं बिन्दुं कृत्वा याचा अर्थ झाला. त्यानंतर त्याच्या खालीं दोन बिंदूंच्या रूपानें अग्नि आणि सोम हीं जीं दोन तत्त्वें आहेत ते महात्रिपुरसुंदरीचें स्तन समजावेत. या ठिकाणीं स्तन या शब्दानें कंठापासून नाभिस्थानापर्यंतचा भाग समजावा. त्याचप्रमाणें त्या दोन बिंदूंच्या खालीं असलेला, ह या अक्षराच्या अर्ध्या भागाप्रमाणें दिसणारा भाग किंवा त्रिकोणामध्यें दिसणारा हा भाग आपल्या श्रीत्रिपुरसुंदरीच्या नाभिस्थानापासून चरणकमलापर्यंतचा भाग आहे अशी भावना करावी. याप्रमाणें माते ! जो तुझ्या मन्मथकलेचें अर्थात् ई या बीजमंत्राच्या रूपानें नटलेल्या तुझें " यो ध्यायेत् " म्हणजे जो ध्यान करील. "सः" तो भक्त त्या उपासनेच्या बलानें इतका प्रभावी होईल कीं, तो आपल्याकडे सर्व जगांतील स्त्रियांना आकृष्ट करून घेईल हें अगदीं सामान्य आहे. तो सूर्यमंडल आणि चंद्रमंडल हे दोन जिचे स्तन आहेत अर्थात् विश्वाच्या

पोषणाचीं साधनें आहेत, त्या त्रिलोकरूपी कामिनीलाहि आपल्याकडे सत्त्वर आकृष्ट करून घेईल. सारें त्रैलोक्य त्याच्यावर मुग्ध होईल असा याचा अर्थ आहे. आचार्य म्हणतात, आई, ई या बीजाक्षराच्या रूपानें नटलेल्या तुझ्या स्वरूपाच्या ध्यानाचा हा केवढा महिमा आहे ! तंत्रशास्त्रांतील निरनिराळ्या ग्रंथांत ठिकठिकाणीं याप्रमाणें श्रीमहात्रिपुरसुंदरीचें ध्यान करण्याचें विधान केलेलें आहे. विस्तारभयास्तव त्यांचा येथें निर्देश करतां येत नाहीं.

सोन्याच्या पत्र्यावर वर्तुलाकार यंत्र काढून त्यांत एकापुढें एक व एकाखालीं एक अशी चार "ह्रीं" हीं बीजें लिहावींत. रोज विधिपूर्वक पूजा करून बाराशें वेळां या श्लोकाचा जप करावा. तें यंत्र धारण करावें अथवा चंदन, पुष्प, पंचवीस दिवस भस्म किंवा केशर अभिमंत्रून धारण करावें. दूध, मध आणि केळें यांचा नैवेद्य दाखवावा. राजे-महाराजे, राक्षस, पशु, स्त्री, पुरुष सर्व वश होतील.

किरन्तीमङ्गेभ्यः किरण-निकुरुम्बामृतरसं
हृदित्वामाधत्ते हिमकर-शिलामूर्तिमिव यः ।
स सर्पाणां दर्पं शमयति शकुन्ताधिप इव
ज्वरप्लुष्टान् दृष्ट्या सुखयति सुधाधारसिरया ॥ २० ॥

"हे जननि ! किरणनिकुरुम्बामृतरसं किरन्तीं हिमकर-शिलामूर्तिं इव यः त्वां हृदि आधत्ते सः शकुन्ताधिपः इव सर्पाणां दर्पं शमयति, सुधाधारसिरया दृष्ट्या ज्वरप्लुष्टान् सुखयति च" हे आई जगज्जननी, तूं आपल्या देहांतून किरणांचा समुदाय हाच कोणी अमृतरस. या अमृतरसाला चोहोंकडे शिंपडित आहेस. चन्द्रकान्तरत्नाप्रमाणें तुझी मूर्ति अत्यंत स्वच्छ आहे. जणुं कांहीं चंद्रकांतरत्नाचीच ती घडविलेली आहे ! आई ! तुझ्या या स्वरूपाला "अमृतेश्वरी" असें नांव आहे. तुझ्या या अमृतेश्वरीरूपाचें जो कोणी भक्त आपल्या हृदयामध्यें चिंतन करतो, त्याची उपासना करतो, तो सर्व पक्ष्यांचा राजा असलेल्या गरुडाप्रमाणें सर्पाचा दर्प शमवितो. त्याला पाहून सर्प घाबरतात व दाही दिशांना पळून जातात. त्याच्या दृष्टीनें सर्पविषाची बाधा नाहीशी होते. एक दिवसाआड, दोन दिवसांआड येणाऱ्या थंडी-तापांना व इतरहि ज्वरबाधांना त्याची दृष्टि जणुं कांहीं अमृताच्या धारेला स्रवणारी "सिरा" म्हणजे प्रणालीच बनते. अमृताचा तीं पाटच बनते. आई ! अमृतेश्वरीरूपानें केल्या

जाणाऱ्या तुझ्या उपासनेचा हा केवढा प्रभाव आहे ! या उपासनेनें साधक हा गरुडासारखा प्रभावी होत असल्यामुळें या साधनाला "गरुडध्यानयोग" असें तंत्रशास्त्रांत नांव दिलेलें आहे.

" षण्मासध्यानयोगेन जायते गरुडोपमः ।
दृष्ट्या कर्षयते लोकं दृष्ट्यैव हरते विषम् ॥
दृष्ट्या चातुर्थिकादींश्च ज्वरान्नाशयते क्षणात् ॥ "

याप्रमाणें चतुःशर्तामध्यें या ध्यानाची फलश्रुति सांगितलेली आहे.

हें यंत्र भस्मावर लिहावें. विधिपूर्वक देवतेची पूजा करून एक हजार वेळां या श्लोकाचा जप करावा. या भस्मानें सर्पविष उतरेल. हे भस्म सर्पावर टाकल्यास सर्पाला मूर्च्छा येते. साधकानें हा मंत्र म्हणतच भस्माचा प्रयोग करावा.

अमृतेश्वरीरूपानें, श्रीत्रिपुरेश्वरीची पूजा करून या श्लोकाचा रोज हजार वेळां जप करावा. पंचेचाळीस दिवस अनुष्ठान करावें. हा मंत्र सिद्ध होतो व साधकाला कधींहि विषबाधा होत नाहीं.



यंत्र क्रमांक २०

मयूरताम्र आणि पुन्नागताम्रमिश्रित केलेल्या सोन्याच्या पत्र्यावर हें यंत्र लिहून वर सांगितल्याप्रमाणें अनुष्ठान करून यंत्र सिद्ध करावें. तें यंत्र आंगठींत बसवून धारण करावें. साधकानें वरचा श्लोक म्हणत त्या हातानें सर्पदंश झालेल्या मनुष्यावर — गाय, म्हैस, घोडा इत्यादि प्राण्यांवरहि जल शिंपडावें. विषबाधा निवृत्त होईल.

तटिल्लेखा-तन्वीं तपन-शशि-वैश्वानर मयीं
निषण्णां षण्णामप्युपरि कमलानां तव कलाम् ।
महापद्माटव्यां मृदित-मल-मायेन मनसा
महान्तः पश्यन्तो दधति परमाह्लाद-लहरीम् ॥ २१ ॥

या शरीरांत सहा चक्रें आहेत. त्यांना मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर इत्यादि नांवें आहेत. या चक्रांना कमल अशी संज्ञा आहे. कारण कमलाप्रमाणें

त्या चक्रांना दलें असतात. उदाहरणार्थ, मूलाधारचक्राला चतुर्दलकमल असें म्हणतात, तर स्वाधिष्ठानचक्राला षड्दलकमल असें म्हणतात. मणिपूरचक्राला दशदलकमल असें म्हणतात, तर अनाहतचक्राला द्वादशदलकमल असें म्हणतात. तर आज्ञाचक्राला द्विदलकमल असें म्हणतात. क्वचित् कमल या शब्दाच्या ऐवजीं पद्म असाहि शब्द वापरतात. दोन्ही शब्दांचा अर्थ एकच आहे. आचार्य म्हणतात, आई ! या साही कमळांच्या वर तुझी कला म्हणजे मूर्ति अथवा स्वरूप विराजमान झालेलें आहे अथवा कला शब्दाचा सकलतत्त्वातीत, सर्वाधारभूत, शुद्धसच्चिदानंदरूप आदिशक्ति असाहि अर्थ करतात. ही कला तंत्रशास्त्रांत सांगितलेल्या पंचवीस, छत्तीस अथवा एक्कावन तत्त्वांच्याहि पलीकडची आहे. तिला शास्त्रांत "सादकला" असें म्हटलेलें आहे. ती सर्वापेक्षां श्रेष्ठ असल्यामुळें तिला परा, परात्परा अथवा परमेश्वरी असें म्हटलेलें आहे. आई जगज्जननी ! तूंच या शरीरांतील सर्व कमलांच्या वर विराजमान झालेली आहेस.

कांहीं लोक कला शब्दाचा अर्थ प्रकृतस्थली कुंडलिनीशक्ति असा करतात. कुंडलिनी ही श्रीत्रिपुरसुंदरीचेंच रूप आहे हें आपण नवव्या व दहाव्या श्लोकांत पाहिलेंच आहे. तीहि पण शरीरांतील साही चक्रांचा भेद करून अर्थात् साही कमळांचा भेद करून सर्वांच्या वर सहस्रदलकमलांतील चंद्रमंडलामध्यें विराजमान होत असते. कांहीं लोक कला शब्दानें कामकलाच येथें विवक्षित आहे असें म्हणतात. कामकला म्हणजे ई हें बीजाक्षर. ई हा बीजमंत्र महात्रिपुरसुंदरीस्वरूपच आहे (पृष्ठ ५२३ पहा). श्रीचक्रामध्यें ई हा बीजमंत्र सर्व आवरणांच्या वर असलेल्या बैन्दवस्थानांत विराजमान झालेला आहे. आपल्या शरीरांतहि हें बैन्दवस्थान सर्व चक्रांवर असलेल्या ब्रह्मरंध्रांतील सहस्रदलकमलांत असलेलें चंद्रमंडलच मानलेलें आहे. हाच अभिप्राय लक्षांत घेऊन आचार्यांनीं साही कमलांच्या वर "निषण्णा" म्हणजे विराजमान असलेली तुझी कला असें वर्णन केलेलें आहे.

आई ! कशी आहे तुझी कला असें कोणी विचारील तर सांगतो. "तटिल्लेखातन्वीं तपन-शशि-वैश्वानरमयीं" तटिल्लेखा म्हणजे विद्युल्लता. ती जशी दीर्घ सूक्ष्म कुटिलाकार, प्रकाशमय आणि क्षणभर प्रतीतीला येणारी असते त्याचप्रमाणें तुझ्या उपासकाला आज्ञाचक्रामध्यें प्रतीति येत असते. त्याचप्रमाणें तपन म्हणजे सूर्य, शशी म्हणजे चंद्र आणि वैश्वानर म्हणजे

अग्नि हेंच तुझें रूप आहे. तूं श्रीचक्रस्वरूप आहेस. श्रीचक्र हें त्रिखंड आहे. सोम, सूर्य आणि अग्नि हेंच ते श्रीचक्रांतील तीनखंड होत. "त्रिखण्डं मातृकाचक्रं सोमसूर्यानलात्मकम्" असें श्रीचक्राचें वर्णन केलेलें आहे. तेंच श्रीमहात्रिपुरसुंदरीचें रूप होय. श्रीचक्रांतील नऊ आवरणें म्हणजे अवांतर चक्रें यांचें पूर्वी वर्णन केलेलेंच आहे. त्यांतील बिंदुत्रिकोण आणि वसुकोण हा एक खंड समजला जातो. दहा-दहा त्रिकोण असलेलीं दोन चक्रें आणि चौदा त्रिकोणांचें एक चक्र यांना दुसरा खंड म्हणतात. तर अष्टदलचक्र, षोडशदलचक्र आणि भूपूरचक्र यांना तिसरा खंड म्हणतात. हे तीन खंड सोम, सूर्य आणि अग्निस्वरूप आहेत. या त्रिखंडालाच जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति; स्थूल, सूक्ष्म आणि कारण; प्रमाता, प्रमाण आणि प्रमेय; विश्व तैजस आणि प्राज्ञ; सृष्टि, स्थिति आणि प्रलय; ज्ञान, इच्छा आणि क्रिया इत्यादि त्रिपुटीसूचक नांवें दिलीं जातात. आपली आराध्यदेवता ही या त्रिपुटीची अधिष्ठात्री असल्यामुळेंच तिला त्रिपुरा अथवा त्रिपुरसुंदरी हें नांव पडलें. हें त्रिखंडात्मक श्रीचक्र हेंच त्रिपुरसुंदरीचें स्वरूप असल्यामुळें आणि तें सोम, सूर्य आणि अग्निस्वरूप असल्यामुळें आचार्यांनीं त्रिपुरसुंदरीच्यां कलेला "तपनशशिवैश्वानरमयी" असें विशेषण दिलेलें आहे.

शरीरांतील षट्चक्रांच्या दृष्टीनें विचार केला असतां मूलाधार आणि स्वाधिष्ठान या दोन चक्रांचें एक खंड मानतात. मणिपूर आणि अनाहत या दोन चक्रांचें दुसरें खंड मानतात तर विशुद्धिचक्र आणि आज्ञाचक्र या दोन चक्रांचें तिसरें खंड मानतात. हीं तिन्ही खंडें देखील सोम, सूर्य आणि अग्निस्वरूपच आहेत. या तिन्ही खंडांच्या वर "महापद्माटवी" म्हणजे सहस्रदलकमलरूपी अरण्य आहे. मूर्धस्थानीं असलेल्या सहस्रदलकमलाला हजार पाकळ्या असल्यामुळें महापद्म असें म्हटलेलें आहे. शरीरांतील सर्व कमलांत तें मोठें आहे. त्या कमलाचीं दलें हीं अरण्यासारखीं दाट आणि जटिल आहेत, म्हणून त्या कमलाला "महापद्माटवी" असें म्हटलेलें आहे. अटवी म्हणजे अरण्य. आई त्रिपुरसुंदरी ! या अरण्यांत तुझा संचार असतो. तेथें तूं "निषण्णा" म्हणजे बसलेली आहेस. त्या सहस्रदल-कमलांतील पूर्ण चंद्रांत तूं विराजमान झालेली आहेस. "महान्तः" म्हणजे मोठे-मोठे तुझे अनन्यभक्त असलेले योगीश्वर हेच तुझ्या स्वरूपाला पहात असतात. कारण त्यांनीं आपल्या मनाला निर्मल केलेलें असतें. कामक्रोधादि विकार हेंच

मनांतले मल होत. माया म्हणजे अविद्या, अहंकार, अभिनिवेश इत्यादि हें सर्व त्यांनीं निकलेले असतात. त्यांचा त्यांनी निरास करून आपल्या मनाला निर्मल केलेलें असतें. त्या निर्मल मनानेंच ते तुझ्या स्वरूपाचा साक्षात्कार करून घेतात. सकल तत्त्वातीत असलेल्या तुझ्या स्वरूपालाच "सादकला" असें म्हटलेलें आहे. साद म्हणजे चरम गति किंवा परम अधिष्ठान असा साद शब्दाचा अर्थ आहे. त्रिपुरसुंदरीच्या सादकलेचा साक्षात्कार झाल्यानंतर ते नित्य आणि निरतिशय आनंदाच्या लहरींत निमग्न होतात. "परमानन्दलहरीं दधति" आनंदाला सतत भरतें येत असल्याचा ते अनुभव घेत असतात. त्यांचा तो आनंद कधींहि क्षीण होत नाहीं. अतृप्तीचा लेशहि त्यांच्या चित्ताला स्पर्श करीत नाहीं.



यंत्र क्रमांक २१

गीतेच्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास "यल्लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः" अशा अवस्थेला ते पोहोंचतात. आई! मलाहि या आनंदाचा लाभ होईल. असा माझ्यावर तूं अनुग्रह कर हीच माझी प्रार्थना आहे.

सोन्याच्या, चांदीच्या अथवा तांब्याच्या पत्र्यावर हें यंत्र लिहून पंचेचाळीस दिवस पूजा करावी. रोज एक हजार या श्लोकाचा जप करावा. नैवेद्य मध, गूळ आणि केळें. याचें फल सर्व जनविरोधाचा निरास होऊन लोक वश होतील.

भवानि त्वं दासे मयि वितर दृष्टिं सकरुणा-
मिति स्तोतुं वाञ्छन् कथयति भवानि त्वमिति यः।
तदैव त्वं तस्मै दिशसि निजसायुज्य-पदवीं
मुकुन्द-ब्रह्मेन्द्र-स्फुट-मकुट-नीराजित-पदाम् ॥ २२ ॥

आई त्रिपुरसुंदरी! भवानी हें त्रिपुरसुंदरीचेंच नांव आहे. "भवानी भावनागम्या भवारण्यकुठारिका।" असें सहस्रनामांत तिचें वर्णन केलेलें आहे. खरोखरच तूं अत्यंत उदार आहेस. तुझ्या ध्यानानें त्रिविध पुरुषार्थांचा लाभ होईल यांत नवल काय आहे? तुझी केवळ करुणा भाकण्याला आरंभ केला

तरी देखील तूं त्याला परम पुरुषार्थाचा लाभ करून देतेस ! धन्य आहेस तूं. अशा अभिप्रायानें आचार्य स्तुति करीत आहेत. " हे भवानि त्वं दासे मयि सकरुणां दृष्टिं वितर " आईभवानी ! मी तुझा दास आहें. तूं माझ्यावर आपली करुणायुक्त दृष्टि टाक. तूं. माझ्याकडे कृपापूर्ण दृष्टीनें पहा. याप्रमाणें तुझी स्तुति करण्याची मनांत इच्छा ठेवून वाक्य उच्चारावयास जो कोणी आरंभ करतो, तो " भवानि त्वं " एवढीं अक्षरें उच्चारतांक्षणींच " त्वं तस्मै निजसायुज्य-पदवीं दिशसि " तूं त्याला आपलें सायुज्यपदहि देतेस ! ! कशी आहे तुझी सायुज्य-पदवी ? असें कोणी विचारील तर सांगतों. " मुकुन्द-ब्रह्मेन्द्र-स्फुट-मकुट-नीराजित पदं " मुकुंद म्हणजे विष्णु, तसेंच ब्रह्मदेव आणि इंद्र इत्यादि देवहि रत्नजडित मुकुट घालून तुझ्या चरणीं नम्र होत असतांना जणुं कांहीं ते आपल्या मुकुटांनीं स्पष्टपणें तुझ्या चरणकमलांना नीरांजनांनीं ओवाळीत आहेत असें वाटतें. तात्पर्य, ब्रह्मा, विष्णु, महेश, इंद्र, वरुण, कुबेर इत्यादि बडेबडे देवहि तुझ्या चरणारविंदीं नम्र होऊन प्रणाम करीत आहेत. यावरून तुझ्या सायुज्यपदाचा महिमा लक्षांत घ्यावा.

या श्लोकांतील गूढ अभिप्राय असा आहे कीं, भवानि त्वं इत्यादि अन्वय वाक्यांतील भवानि हे पद संबोधन आहे. " हे आईभवानी ! तूं " अशा अभि-प्रायानें स्तुतिवाक्याला आरंभ करीत असतांनाच " त्वं भवानि " आई तूंच मी व्हावें. भू-धातूचें आज्ञार्थी प्रथम पुरुषाचें एकवचन. अशा अभिप्रायानें जणुं कांहीं तो स्तुति करण्यासप्रवृत्त झालेला, तुझी अहंग्रहोपासनाच करीत आहे, असें समजून तूं त्याला सत्वर उत्तम फल देतेस. जप, होम इत्यादि साधनांपेक्षां अहंग्रहोपासनेनें फलप्राप्ति सत्वर होते. " अहं ब्रह्मास्मि " " अयमात्मा ब्रह्म " या महावाक्याप्रमाणेंच तो " तूं मी व्हावें " मी त्वत्स्वरूप व्हावें अशा तादात्म्य चिंतनाचेंहि फल अनपेक्षित रीतीनें तुझ्याकडून त्याला प्राप्त होतें ! आई ! असा हा तुझा नाममहिमा आहे. कोणत्याहि मिषानें का होईना तें मुखीं आलें तरी कृतार्थता प्राप्त होते. " विक्रुश्य पुत्रमघवान् यदजामिलोऽपि नारायणेति म्रियमाण इयाय मुक्तिम् " (भागवत). पापी अजामिल मुलाला हांक मारण्याच्या मिषानें नारायण नारायण म्हणतांच कृतार्थ झाला. याच न्यायानें तुझ्या नाम संकीर्तनानेंहि सायुज्यमुक्तीचा लाभ होतो मग इतर फलांची कथा काय ? सायुज्य म्हणजे तादात्म्य. जेथें सायुज्यमुक्तीचा लाभ झाला तेथें सालोक्य,

सारूप्य आणि सामीप्य प्राप्त होईल हें काय सांगावयास पाहिजे ? तें तर कैमुतिकन्यायानेंच सिद्ध होत आहे ! मागील सात श्लोकांनीं ध्यानाचा महिमा सांगितला, तर या श्लोकानें नामाचाहि महिमा वर्णिला आहे हें लक्षांत घ्यावें.

सायुज्यपदवी म्हणजे मोक्षाचा मार्ग अथवा मोक्षाची अवस्था. पदवी शब्दाचा अर्थ पद किंवा स्थान असाहि आहे. सायुज्य पदवी म्हणजे मोक्षपद, परमात्मपद अथवा ब्रह्मपद. यालाच मुक्ति असें म्हणतात. ही मुक्ति चार प्रकारची मानलेली आहे. सालोक्य, सामीप्य, सारूप्य आणि सायुज्य अशीं त्यांचीं नांवें आहेत. उपासनेनें इष्टदेवतेच्या लोकाचा लाभ होणें याला सालोक्य म्हणतात. वैकुंठ लोक, कैलास लोक, गोलोक इत्यादि विविध लोक प्रसिद्ध आहेत. आनंद हें मोक्षाचें स्वरूप आहे. इष्टदेवतेचा लोक प्राप्त झाल्यानंतर साधकाच्या चित्ताला एक प्रकारचा अनिर्वचनीय आनंद होत असतो. म्हणून या अवस्थेला सालोक्यमुक्ति असें म्हणतात. इष्टदेवतेचा लोक प्राप्त झाल्यानंतर आपल्याला इष्टदेवतेचें सान्निध्य लाभतें. इष्टदेवतेच्या सान्निध्यानें साधकाचा आनंद पूर्वापेक्षां अधिकच वाढतो. या अवस्थेला सामीप्यमुक्ति असें म्हणतात.

इष्टदेवतेच्या सान्निध्याचा लाभ झाल्यानंतर साधकाला इष्टदेवतेचें रूप प्राप्त होत असतें. असिस्टंट कलेक्टर किंवा पर्सनल सेक्रेटरी झाला म्हणजे आपण मोठ्या पदाला चढल्याचें समाधान वाटत असतें. इष्टदेवतेचें रूप प्राप्त झाल्यानंतर असाच एकप्रकारचा अनिर्वचनीय आनंद वाढलेला असतो. या अवस्थेला सारूप्यमुक्ति असें म्हणतात. सारूप्यामुळें इष्टदेवता आणि त्या देवतेचा उपासक यांच्यांत भेद असतोच. भेद आहे तोंपर्यंत अपूर्णतेची जाणीव होतच असते. अपूर्णतेच्या जाणिवेनें सुखांत न्यूनता येते. ती न्यूनता साधक हा आपल्या इष्टदेवतेशीं जेव्हां तादात्म्य पावतो तेव्हांच नाहींशी होत असते. इष्टदेवता ही तत्त्वतः सत्, चित् आणि आनंदस्वरूप असल्यामुळें इष्टदेवतेशीं तादात्म्य पावलेला साधकहि सत् चित् आनंदस्वरूप होत असतो. याच अवस्थेला सायुज्यपदवी असें म्हणतात. ही पदवी ब्रह्मस्वरूपच असल्यामुळें हिला ब्रह्मपद असेंहि म्हणतात. मोक्षाचेंहि हेंच स्वरूप असल्यामुळें याला मोक्षपद असेंहि म्हणतात.

मोक्षाच्या स्वरूपाविषयीं तत्त्ववेत्त्यांत अनेक मतभेद आहेत. मरण म्हणजेच मोक्ष असें चार्वाक म्हणतो. त्याची धांव याच्या पलीकडे गेलीच नाहीं.

नित्य ऊर्ध्वगमन म्हणजे महाकाशांत वरवर जाणें हेंच मोक्षाचें स्वरूप होय असें जैन म्हणतात. निर्विषय, शुद्ध, क्षणिक, विज्ञानपरंपरेचा सतत अनुभव येत रहाणें म्हणजेच मोक्ष असें बौद्धांचें मत आहे. कायमचा दुःखांचा नाश होणें यालाच मोक्ष म्हणतात असें तार्किकांचें म्हणणें आहे. आदि विद्वान सिद्धपुरुष असा जो ईश्वर त्याच्या नित्ययोग-शक्तीचा साक्षात्कार होऊन अनिर्वचनीय व नित्य आनंदाचा लाभ होणें म्हणजेच मोक्ष असें योगतत्त्ववेत्त्यांचें मत आहे. तर त्रिगुणात्मक मूलप्रकृति आणि चेतन-पुरुष यांच्या पार्थक्याचा वास्तव भूमिकेवरुन साक्षात्कार होणें म्हणजे मोक्ष होय, असें सांख्य तत्त्ववेत्त्यांचें म्हणणें आहे. नित्य आणि निरतिशय सुखाची अभिव्यक्ति होणें म्हणजेच मोक्ष असें मीमांसक म्हणतात, तर अविद्येची—अज्ञानाची निवृत्ति होणें म्हणजेच मोक्ष होय, असेंहि कांहीं वेदान्ती म्हणतात. "कर्मणामात्मलाभान्न परं विद्यते" सर्व कर्मांचें अंतिम फल म्हणजे आत्मलाभ. त्यालाच मोक्ष असें म्हणतात, असें आपस्तंबांचें म्हणणें आहे. सच्चिदानंदस्वरूप असलेल्या आपल्या उपास्यदेवतेशीं पूर्ण तादात्म्य प्राप्त होणें म्हणजेच मोक्ष होय, असा उपासनाशास्त्राचा सिद्धान्त आहे. प्रकृतस्थलीं परस्पर अभिन्न, एकरूप असलेल्या शिव-शक्तिस्वरूप इष्टदेवतेशीं पूर्ण तादात्म्य प्राप्त होणें हेंच मोक्षाचें स्वरूप असून यालाच प्रकृतस्थलीं सायुज्य-पदवी असें म्हटलेलें आहे. आई! अनन्यचित्तानें तुझें नांव घेतांक्षणींच तूं आपल्या भक्ताला सायुज्यमुक्तीचा लाभ करून देतेस! धन्य आहे तुझें औदार्य.

यंत्र नंबर १५ म्हणजेच श्रीयंत्र. सोन्याच्या पत्र्यावर काढून त्याची एखाद्या तीर्थक्षेत्रांत अथवा देवीच्या मंदिरांत रोज पंचेचाळीस दिवस विधिवत् पूजा करावी. गूळ, नारळ, केळें, दहीं, दूध, मध आणि खिचडीचा नैवेद्य दाखवावा. रोज एक हजार वेळां या श्लोकाचा जप करावा. यानें ऐहिक सर्व कामना पूर्ण होतील. ऐश्वर्यप्राप्ति व साम्राज्यलाभहि होईल.

त्वया हृत्वा वामं वपुरपरितृप्तेन मनसा
शरीरार्धं शम्भोरपरमपि शङ्के हृतमभूत्।
यदेतत्त्वद्रूपं सकलमरुणाभं त्रिनयनं
कुचाभ्यामानम्रं कुटिल-शशि-चूडाल-मकुटम् ॥२३॥

आई ! कदाचित् तूं असें विचारशील कीं, लोक शिवसायुज्याची अपेक्षा करीत असतात. तूं माझ्या सायुज्याची अपेक्षा कां करतोस ? यावर माझें उत्तर असें आहे कीं, मला तुझें सायुज्य मिळालें कीं, शिवसायुज्य मिळाल्यासारखेंच आहे. कारण तूंच शिवस्वरूप आहेस. पहा. तूं प्रथम शंकरांच्या देहाचा वामभाग हरण केलास. तेवढ्यानें मन संतुष्ट झालें नाहीं म्हणून अतृप्त मनानें शंकरांच्या शरीराच्या दुसऱ्याहि भागाचें हरण केलें आहेस असा मी तर्क करतों. कारण तुझें अरुणवर्ण असलेलें हें जें सगळें रूप आहे तें शंकरांच्या रूपासारखेंच दिसत आहे. स्वभावतः अरुणवर्ण आणि स्तनभारानें किंचित् नम्र असलेली तूं शंकरांप्रमाणें "त्रिनयन" दिसत आहेस. त्रिलोचना, त्रिनयना, त्र्यंबका हीं तुझीं नांवें प्रसिद्धच आहेत. सूर्य, चंद्र आणि अग्नि हेच तुझे तीन नेत्र आहेत. आई ! तुझें हें त्रिनेत्रत्व शिवसायुज्याचेंच द्योतक आहे. त्याचप्रमाणें हा अरुणवर्णहि शिवसायुज्याचाच द्योतक आहे. भगवान् शंकर हे अरुणवर्ण आहेत. " असौ यस्ताम्रो अरुण उत बभ्रुः " असें वेदांत शंकरांचें वर्णन केलेलें आहे. हा अरुणवर्ण शंकरांनीं तुझ्याकडून घेतला का तूं शंकरांकडून घेतला ? माहीत नाहीं, पण तुम्ही दोघेंहि अरुणवर्णानें एकरूप आहां हें निश्चित. तसेंच तुझें रूप " कुटिलशशिचूडालमकुटं " म्हणजे चंद्राची किंचित् वाकडी कोर तुऱ्याप्रमाणें जेथें मुकुटावर शोभत आहे असें आहे. म्हणजे भगवान् शंकर चंद्रचूड आहेत तर तूंहि पण चंद्रचूड आहेस ! तुझ्या मस्तकावरील चंद्र हा अष्टमीच्या चंद्रासारखा शोभत आहे, "अष्टमीचन्द्रविभ्राजदलिकस्थलशोभिता" असें तुझें वर्णन प्रसिद्धच आहे. अशा रीतीनें हे आई ! तूं शिवसायुज्य प्राप्त करून घेतलेलेंच आहेस. अथवा शिवानें तुझें सायुज्य प्राप्त करून घेतलेलें आहे असें म्हटलें तरी हरकत नाहीं. दोहोंचाहि अर्थ एकच आहे. तूं आणि शिव परस्पर सायुज्यभावाला प्राप्त झालेले असल्यामुळें तुम्ही दोघेंहि एकरूपच आहांत. " न शिवेन विना शक्तिः न शक्तिरहितः शिवः । " तात्पर्य, तुझ्या सायुज्यानें शिवसायुज्याचा व शिवसायुज्यानें तुझ्या सायुज्याचा लाभ हा सहजच होतो. आई ! सर्व कांहीं तूंच आहेस म्हणूनच मी तुझी प्रार्थना करीत आहें. तूं करुणादृष्टीनें माझ्याकडे पहा.

पुढील यंत्र सोन्याच्या पत्र्यावर काढावें. चौरंगावर ठेवून त्याची रोज विधिपूर्वक पूजा करावी. तीस दिवस या श्लोकाचा रोज तीन हजार जप करावा. दूध अथवा पायसाचा नैवेद्य दाखवावा. याप्रमाणें हें यंत्र सिद्ध करून



यंत्र क्रमांक २२

धारण करावें. अथवा घरांत ठेवावें. यानें ऋण फिटेल. त्याचप्रमाणें भूतप्रेत-पिशाचबाधाहि टळेल.

जगत्सूते धाता हरिरवति रुद्रः क्षपयते
तिरस्कुर्वन्नेतत्स्वमपि वपुरीशस्तिरयति ।
सदापूर्वः सर्वं तदिदमनुगृह्णाति च शिव-
स्तवाज्ञामालम्ब्य क्षणचलितयोर्भ्रूलतिकयोः ॥ २४ ॥

आई ! तुझ्या केवळ भुवयांच्या संकेतानें ब्रह्मांडांच्या घडामोडींचीं केवढीं प्रचंड कामें चाललेलीं आहेत. पहा – "धाता जगत् सूते" ब्रह्मदेव तुझ्या भुवयांचा संकेत होतांक्षणींच जग निर्माण करतो. "हरिः अवति" विष्णु त्या जगाचें पालन-पोषण करतो आणि "रुद्रः क्षपयते" म्हणजे प्रलयकाळीं रुद्र त्या जगाचा लय करतो. याप्रमाणें जगाची उत्पत्ति, स्थिति आणि प्रलय या कामीं नियुक्त असलेले अधिकारी देव "तव भ्रूलतिकयोः आज्ञां आलम्ब्य" तुझ्या क्रियाशील झालेल्या भ्रूलतांची आज्ञा होतांच आपआपलें कार्य करूं लागतात. रुद्रदेवतेनें प्रलयकाळीं सर्व कार्यांचा नाश केल्यानंतर त्या कार्यांचीं कारणें शिल्लक रहातात. घट फुटला तरी खापरें शिल्लक रहातात. पट फाटला तरी धागेदोरे शिल्लक रहातात. त्याच-

प्रमाणें कार्यप्रपंचाचा नाश झाला तरी कारणप्रपंच शिल्लक रहातोच. त्या कारण-प्रपंचाचाहि लय करण्याचें कार्य महेशाचें आहे. तो महेश देखील, आई ! तुझ्या भ्रुकुटीचा संकेत होतांच ती तुझी आज्ञा समजून त्या विसकळित झालेल्या कारणप्रपंचाचा आपल्या स्वरूपांत लय करून घेतो. येथें लय शब्दाचा अर्थ अव्यक्त स्वरूपांत रहाणें असा समजावा. सर्व कारणप्रपंचाला आत्मस्वरूपांत लीन करून घेऊन शेवटीं तो महेश्वर देखील स्वतःला सदाशिवस्वरूपांत लीन करून घेतो. हाच अभिप्राय श्लोकाच्या दुसऱ्या चरणांत सांगितला आहे. " ईशः एतत् तिरस्कुर्वन् स्वं अपि वपुः तिरयति " ईश म्हणजे महेश्वर. या सर्वांचा लय करीत स्वतःच्या देहाचाहि सदाशिवतत्त्वांत लय करून घेतो. सदाशब्द-पूर्वक शिवतत्त्व म्हणजे भगवान् सदाशिव. हे ब्रह्मा, विष्णु, रुद्र आणि महेश या सर्वांनाच अव्यक्तरूपानें आपल्या स्वरूपांत ते लीन होऊन राहिले असतांना पुन्हां सृष्टिकालीं आविर्भूत करण्याचा प्रयत्न करतात. हा त्यांचा प्रयत्नहि आई, तुझ्या भ्रुकुटीच्या संकेतानेंच होत असतो. ब्रह्मा, विष्णु, रुद्र आणि ईशान म्हणजे महेश्वर यांना सृष्टिकालीं त्यांच्या कार्यासह आविर्भूत करणें या क्रियेला अनुग्रह असें म्हणतात. सदाशिवाच्या अनुग्रहानेंच हे सर्व देव सृष्टिकालीं प्रकट होऊन आपआपलीं कार्यें करीत असतात. हा सदाशिवाचा अनुग्रह देखील तुझ्या भ्रूसंकेतावरच अवलंबून आहे. तात्पर्य, हे माते त्रिपुरसुंदरी ! तुझ्या केवळ भुवयांच्या संकेतानेंच ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईशान आणि सदाशिव या पांचहि देवता आपआपलें कार्य सृष्टि, स्थिति, प्रलय, तिरोधान आणि अनुग्रह क्रमशः करीत असतात. आई ! तुझ्या नुसत्या भुवयांचा हा प्रभाव आहे तर मग साक्षात् तुझा प्रभाव काय वर्णन करावा ! सर्वांवर अनुग्रह करणाऱ्या सदाशिवावर देखील तुझा अनुग्रह आहे, म्हणूनच तो सर्वांवर अनुग्रह करूं शकतो. हीं सगळीं कार्यें तत्त्वतः तूंच करीत आहेस, म्हणूनच तुझें वर्णन करतांना ललितासहस्रनामामध्यें –

सृष्टिकर्त्री ब्रह्मरूपा गोप्त्री गोविन्दरूपिणी ॥
संहारिणी रुद्ररूपा तिरोधानकरीश्वरी ।
सदाशिवाऽनुग्रहदा पञ्चकृत्यपरायणा ॥

असें वर्णन केलेलें आहे. पंचकृत्य शब्दाचा अर्थ वर सांगितलेलीं उत्पत्ति, स्थिति इत्यादि पांच कार्यें असा समजावा. या पांचहि कार्यांचा आश्रय किंवा

त्यांमध्यें तत्पर श्रीललितामहात्रिपुरसुंदरीच आहे. सकलजननीस्तवामध्येंहि हाच अभिप्राय मोठ्या बहारीनें वर्णन केलेला आहे.

" विरिञ्चाख्या मातः सृजसि हरिसंज्ञा त्वमवसि
त्रिलोकीं रुद्राख्या हरसि विदधासीश्वरतया ।
भवन्ती सादाख्या प्रभवसि च पाशौघदलने
त्वमेवैकाऽनेका भवसि कृतिभेदैर्गिरिसुते ॥ "

हे आई ! ब्रह्मदेव हें नांव धारण करून तूं हें सर्व जग निर्माण करतेस. विष्णु हें नांव धारण करून त्याचें तूं संरक्षण करतेस. रुद्र हें नांव धारण करून तूं त्रैलोक्याचा संहार करतेस. तर पुन्हां ईश्वर हें नांव धारण करून या सर्वांना उत्पन्न करतेस. तूंच सच्चिदानंदरूप सर्वाधारभूत सादाख्यकलारूपानें सर्व जीवांच्या भवपाशांचें दुःखपाशांच्या समूहाचें निर्दालन करतेस. आई गिरिसुते ! तत्त्वतः तूं एकच असून कार्यभेदानें अनेक नांवें व रूपें धारण करतेस. धन्य आहेस तूं.



यंत्र क्रमांक २३

हें शिवयंत्र सोन्याच्या पत्र्यावर काढावें. विधिपूर्वक त्याची तीस दिवस पूजा करावी. मध, उडदाचे वडे आणि तिळकुटाचा नैवेद्य दाखवावा. यंत्राजवळ बसून रोज या चोविसाव्या श्लोकाचा एक हजार जप करावा. हें यंत्र धारण केलें असतां भूतप्रेत-पिशाचबाधा नाहींशी होते. अपस्मार म्हणजे फीट येण्याचा विकार थांबतो.

त्रयाणां देवानां त्रिगुण-जनितानां तव शिवे
भवेत्पूजा पूजा तव चरणयोर्या विरचिता ।
तथा हि त्वत्पादोद्वहन-मणि-पीठस्य निकटे
स्थिता ह्येते शश्वन्मुकुलित-करोत्तंस-मकुटाः ॥ २५ ॥

आई जगज्जननी ! तुझी पूजा केली म्हणजे सर्व देवांची पूजा केल्याचें श्रेय मिळतें. कारण सर्वांमध्यें श्रेष्ठ तूंच आहेस. ब्रह्मा, विष्णु आणि रुद्र हे सर्व देवांमध्यें श्रेष्ठ मानले जातात. पण हे तिन्ही देव तुझ्या सत्व, रज आणि तम या तीन गुणांपैकीं एका-एका गुणापासून जन्माला आलेले आहेत. अर्थात् तीं तुझींच लेकरेंच आहेत. " ब्रह्मविष्णुमहादेवा अस्याः पुत्रा वरानने ! चतुर्थोऽहं महेशानि सुतस्तस्या महेश्वरः ॥ " असें भगवान् शंकरच प्रत्यक्ष पार्वतीला शिवशक्ति-तत्त्वाचें वर्णन करतांना दक्षिणामूर्तिसंहितेत सांगत आहेत. हे शिवा भवानी ! " शिवयति इति शिवा " सर्व विश्वाचें तूं कल्याण करतेस म्हणून तुला शिवा असें म्हटलेलें आहे. हे जगत्कल्याणकारिणी माते ! तुझ्या चरणकमलांची पूजा केली म्हणजे या सर्व देवांची पूजा केल्यासारखींच आहे. " तव चरणकमलयोः या पूजा विरचिता सा देवानां पूजा भवेत् " आई ! तूं म्हणशील, असें कसें म्हणतोस ? एकाची पूजा केल्यानें दुसऱ्याची पूजा केल्यासारखें कसें होईल ? सांगतों ऐक.

सर्व देवांत श्रेष्ठ असलेले ब्रह्मा, विष्णु, रुद्र आणि महेश हे चारहि देव तुझे पाय ठेवण्याकरितां तयार केलेलें जें रत्नखचित पादपीठ म्हणजे चौरंगासारखें आसन अथवा उपसिंहासन आहे त्याच्या जवळ हात जोडून निरंतर नम्र भावानें उभे आहेत. त्यांनीं जोडलेले दोन्ही हात आपल्या मुकुटाला लावलेले असल्यामुळें त्यांचे मुकुट जणुं कांहीं तुरे लावल्याप्रमाणें दिसत आहेत. तात्पर्य, ब्रह्मा, विष्णु, रुद्र आणि महेश्वर हे सर्व देवांत श्रेष्ठ असलेले देव, तुझी सेवा घडावी म्हणून निरंतर तुझ्या सान्निध्यांत हात जोडून नम्र भावानें उभे आहेत. अशा स्थितींत एखाद्या भक्तानें तुझी पूजा केली तर त्यांत त्यांना अत्यंत संतोषच वाटतो. उलट तुझी पूजा सोडून त्यांची पूजा केली तर त्यांत त्यांना संतोष वाटणार नाहीं. हा भक्तांचा स्वभाव असतो. ते तुझे भक्त आहेत. तुझी पूजा केल्यानेंच त्यांना आनंद वाटत असल्यामुळें तुझी पूजा हींच त्यांची पूजा होय. हाच अभिप्राय लक्षांत घेऊन श्रीत्रिपुरसुंदरीच्या पूजेचा महिमा आगमग्रंथांत गाइलेला आहे.

" विष्णुपूजासहस्राणि शिवपूजाशतानि च
अम्बिकाचरणार्चायाः कलां नार्हन्ति षोडशीम् "

सोन्याच्या पत्र्यावर अधोमुख त्रिकोण काढून त्याच्या तिन्ही कोणाला बाहेरच्या बाजूनें त्रिशूळ काढावेत. त्रिकोणामध्यें सौः हें बीजाक्षर लिहावें. पंचे-

चाळीस दिवस त्याची पूजा करावी. मधाचा नैवेद्य दाखवावा. या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. सिद्ध यंत्र धारण करावें. याच्या योगानें राजकीय अधिकाराचा लाभ होईल. उत्कृष्ट पदवीचाहि लाभ होईल.

विरिञ्चिः पञ्चत्वं व्रजति हरिरामोति विरतिं
विनाशं कीनाशो भजति धनदो याति निधनम् ।
वितन्द्री माहेन्द्री विततिरपि सम्मीलितदृशा
महासंहारेऽस्मिन् विहरति सति त्वत्पतिरसौ ॥ २६ ॥

आई ! तुझा महिमा मी काय वर्णन करूं ? हा सृष्टिकर्ता ब्रह्मदेव पंचत्वाला जातो म्हणजे पृथक् पृथक् पंचमहाभूतांत तो विलीन होतो. हरि म्हणजे भगवान् विष्णु देखील पंचमहाभूतांत विलीन होतात. "कीनाशः विनाशं भजति" म्हणजे यमाचाहि नाश होतो. यम हा लोकांचा निष्ठुरपणें नाश करीत असतो म्हणून त्यास 'कीनाश' असें म्हणतात. तात्पर्य, तो यमहि मरतो आणि धनद म्हणजे कुबेर तोहि निधन पावतो. " माहेन्द्री विततिः अपि संम्मीलितदृशा वितन्द्री भवति " चौदा भुवनांचे अधिपति चौदा इंद्र. त्यांना लोकपाल अथवा महेंद्र असें म्हणतात. या चौदा महेंद्रांचा समुदाय म्हणजे माहेन्द्री विततिं या शब्दांचा अर्थ झाला. या इंद्रांच्या समुदायालाहि कायमची तंद्री लागते. अर्थात् प्रलयकाळीं त्यांचेहि डोळे मिटतात, तेंहि मरतात. अशा या "महासंहारे" म्हणजे शेवटच्या कल्पांतकाळीं तुझे पति भगवान् सदाशिव हे तुझ्यासह आनंदानें विहार करीत असतात. इतरांप्रमाणें त्यांना मरण नाहीं, नाश नाहीं. हें त्यांचें अविनाशित्व हा तुझ्याच पातिव्रत्याचा प्रभाव होय.



यंत्र क्रमांक २४

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर काढून अमावास्येच्या दिवशीं अथवा सहा दिवस विधिपूर्वक पूजा करून गुळापायसाचा नैवेद्य दाखवावा. रोज एक हजार या श्लोकाचा जप करून यंत्र धारण करावें. फल सर्व कार्यसिद्धि व शत्रुजय.

जपो जल्पः शिल्पं सकलमपि मुद्राविरचना
गतिः प्रादक्षिण्य-क्रमणमशनाद्याहुति-विधिः ।
प्रणामः संवेशः सुखमखिलमात्मार्पणदृशा
सपर्या-पर्यायस्तव भवतु यन्मे विलसितम् ॥ २७ ॥

आई ! मी तुझी पूजा काय करणार ? निसर्गतः माझ्याकडून जें कांहीं होत असेल तें सर्व तुझी पूजाच आहे असें समज. अशा अभिप्रायानें आचार्य प्रार्थना करीत आहेत. आई ! लोक तुझ्या मंत्राचा जप करतात. माझ्या हातून तो कांहीं होत नाहीं. तेव्हां मी जें कांहीं व्यवहाराच्या निमित्तानें बोलत असेन तें माझें बोलणें हाच तुझा जप होय असें समज. व्यवहारांत वागतांना मला जे कांहीं हातानें अभिनय करावे लागतात त्या तुझ्या मुद्राच आहेत असें समज. तात्पर्य, " मे जल्पः ते जपः भवतु; मे शिल्पं ते मुद्राविरचना भवतु " माझी बडबड हीच तुझी स्तुति किंवा मंत्राचा जप होय. तसेंच शिल्प म्हणजे हातापायानें केले जाणारे व्यवहार अथवा कामें. मुद्रा म्हणजे उपासनेच्या वेळीं इष्ट देवतेला हातानें जे निरनिराळे आकार दाखविले जातात ते. शंखमुद्रा, योनिमुद्रा, धेनुमुद्रा, इत्यादि. श्रीविद्येच्या उपासनेमध्यें सर्वसंक्षोभिणी, सर्वविद्राविणी, सर्वाकर्षिणी इत्यादि मुद्रांचीं नांवें आहेत. जपानें इष्टदेवतेचें सान्निध्य लाभतें तर मुद्रा या इष्टदेवतेला संतुष्ट करीत असतात. मुदं म्हणजे संतोषाला रान्ति म्हणजे देतात त्या मुद्रा. " स्वाध्यायादिष्ट-देवता-सम्प्रयोगः " इष्ट देवतेचा जप करणें हाहि एक प्रकारचा स्वाध्यायच होय. संम्प्रयोगम्हणजे चांगल्या प्रकारें उत्कृष्ट सान्निध्याचा सहयोगाचा लाभ होणें. हें इष्टदेवतेचें उत्कृष्ट सान्निध्य मन लावून केल्या जाणाऱ्या जपानें मिळतें. " स्वाध्यायाद्योगमासीत योगात्स्वाध्याय-मामनेत्। स्वाध्याययोगसम्पत्त्या परमात्मा प्रकाशते " जपानें इष्टदेवतेचें सान्निध्य मिळवावें व इष्टदेवतेच्या सान्निध्यानें उपासनेचें बळ वाढवावें. उपासनेचें बळ आणि इष्टदेवतेचा अनुग्रह हींच परमेश्वराच्या साक्षात्काराचीं साधनें होत, असें स्मृतीत म्हटलेलें आहे. " श्रोतव्यः श्रुतिवाक्येभ्यः मन्तव्यश्चोपपत्तिभिः। मत्वा च सततं ध्येयः एते दर्शनहेतवः " ईश्वराच्या साक्षात्काराकरितां प्रथम श्रुति-वाक्यांनीं त्याचें श्रवण करावें, त्याचें स्वरूप जाणावें. तें जाणल्यानंतर साधक-बाधक प्रमाणांनीं त्याचा विचार करावा. विचारानें तें स्वरूप मनामध्यें ठसवावें.

मननानें मनांत ठसलेल्या स्वरूपाचा पुढें निदिध्यास ध्यावा. सतत त्याचें ध्यान करावें. हींच ईश्वराच्या साक्षात्काराचीं साधनें होत. आचार्य म्हणतात आई ! माझी बडबड हींच तुझी स्तुति किंवा हाच तुझा जप आणि हातांनीं होणाऱ्या निरनिराळ्या हालचाली ह्याच तुझ्या मुद्रा समज. "मुद्राविरचना" म्हणजे मुद्रा करणें.

आई ! माझ्या पायांची यदृच्छेनें होणारी हालचाल गति-गमन हेंच माझें तुला प्रदक्षिणा घालणें होय. प्रादक्षिण्यक्रमण म्हणजे प्रदक्षिणा घालण्याच्या उद्देशानें पावलें टाकणें. तसेंच " अशनादि आहुतिविधिः " म्हणजे मी जें कांहीं खातों-पितों तेंच तुझ्या उपासनेचें अंगभूत असलेलें हवनकर्म समज. आहुतिविधि म्हणजे होम-हवन करणें. त्याचप्रमाणें "संवेश" म्हणजे झोंपणें, सुखानें गादीवर लोळणें हाच माझा प्रणाम समज. " मे अखिलं विलसितं आत्मार्पणदृशा तव सपर्या-पर्यायः भवतु " माझा हा सर्व जीवनविलास म्हणजे आत्मार्पणदृष्टीनें केल्या जाणाऱ्या तुझ्या पूजेचाच प्रकार होवो. मी तुलाच आत्मा समजून हें सर्व कांहीं अर्पण करीत आहें. " आत्मा त्वं, गिरिजा मतिः, सहचराः प्राणाः, शरीरं गृहं ... यद्यत्कर्म करोमि तत्तदखिलं शम्भो तवाराधनम् " सुबोधस्तोत्रसंग्रह भाग १, पान १३ पहा.

" जपो जल्पः " या श्लोकांत आचार्यांनीं जो भाव व्यक्त केला आहे त्याला मानसपूजा असें म्हणतात. पूजेचे दोन प्रकार आहेत. एक अंतःपूजा व दुसरी बाह्य पूजा. अंतःपूजेलाच मानसपूजा असें म्हणतात. यालाच तंत्रशास्त्रांत "समयाचार" असें म्हटलेलें आहे. आपल्या इष्ट देवतेचें परब्रह्मस्वरूपानें सहस्रदल-कमलांत ध्यान करून आपला संपूर्ण जीवनव्यवहार ही इष्टदेवतेची पूजाच होय अशी भावना समयाचार पद्धतीत ठेवावी लागते तर कौलाचार पद्धतीत सर्व बाह्य-पूजेची साधनसामग्री संग्रहीत करून थाटामाटानें व शास्त्रोक्त पद्धतीनें पूजा करावी लागते. बाह्यपूजेपेक्षां अन्तःपूजा श्रेष्ठ आहे म्हणूनच आचार्यांनीं या श्लोकांत अन्तःपूजेचा निर्देश केला आहे.

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर अधोमुख त्रिकोण काढून त्याच्या तिन्ही कोनांना त्रिशूळाचा आकार दाखववा. मध्यभागीं ह्रीं हें बीज लिहावें. यंत्राची विधिपूर्वक पूजा करून पंचेचाळीस दिवस या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. नैवेद्य गूळ आणि पायस यांचा दाखवावा. याप्रमाणें यंत्र सिद्ध करून

धारण केल्यास मंत्रसिद्धि होते. देवीचें दर्शन घडतें आणि आत्मज्ञानाचाहि लाभ होतो. याचप्रमाणें यंत्र काढून याच पद्धतीनें चौतिसाव्या श्लोकानें आराधना केल्यास साधक अत्यंत बुद्धिमान् होतो. नैवेद्य फक्त मध.

सुधामप्यास्वाद्य प्रतिभय-जरा-मृत्युहरिणीं
विपद्यन्ते विश्वे विधि-शतमखाद्या दिविषदः ।
करालं यत्क्ष्वेलं कवलितवतः कालकलना
न शम्भोस्तन्मूलं तव जननि ताटङ्कमहिमा ॥ २८ ॥

इतर सर्व तत्त्वांचा व त्या तत्त्वांच्या अधिष्ठात्री असलेल्या देवतांचा सदाशिवतत्त्वांमध्यें लय होतो; पण सदाशिवतत्त्वाचा मात्र कधींच कोठें लय होत नाहीं. सदाशिवतत्त्व हें अखंड अविनाशी आहे. सदाशिवाला प्राप्त झालेलें हें अविनाशित्व श्रीत्रिपुरसुंदरीच्याच प्रभावानें प्राप्त झालेलें आहे. अशा अभिप्रायानें आचार्य वर्णन करीत आहेत. " विधिशतमखाद्याः विश्वे दिविषदः सुधां आस्वाद्य अपि विपद्यन्ते " विधि म्हणजे ब्रह्मदेव. शतमख म्हणजे इंद्र इत्यादि सर्व देव अमृताचा आस्वाद घेऊनहि – अमृत प्राशन करूनहि शेवटीं "विपद्यन्ते" म्हणजे मरतात. सुधा म्हणजे अमृत. तें प्राशन केलें असतां अत्यंत भयंकर असलेल्या जरा-मृत्यूचाहि नाश होतो; तथापि त्यालाहि कांहीं कालमर्यादा आहे. ती कालमर्यादा संपली कीं, जरा-मृत्यु यांचा नाश करणारें अमृत प्राशन करूनहि देवांना मृत्यु येतोच. देवांचें अजरत्व आणि अमरत्व हें अखेर कालाच्या उदरांत गडप होतच असतें. याच्या उलट भगवान् शंकर हे विष प्राशन करूनहि अविनाशी आहेत. वस्तुतः विष हें अत्यंत भयंकर आणि मारक असतें; तथापि तें शंकरांना मारक झालें नाहीं. कारण –

कराल म्हणजे अत्यंत जहाल भयंकर अशा विषाचेंहि शंकरानें प्राशन करून टाकलें होतें. म्हणूनच तर त्यांना नीलकंठ नांव पडलें. एवढें भयंकर विष प्राशन करूनहि त्यांना " कालकलना न " म्हणजे काळ कांहीं ग्रासुं शकला नाहीं ! हा काय त्या शंभुमहादेवाचा स्वतःसिद्ध प्रताप आहे ? छे, तो त्यांचा स्वतःसिद्ध महिमा नव्हे. मग त्याचें मूळ कशांत आहे ? असें विचारशील तर सांगतों. आई ! तो तुझ्या ताटंकाचा म्हणजे कानांत घालावयाच्या सौभाग्यालंकारांचा महिमा आहे ! जिचें कुंकू बळकट तिचा पति दीर्घायु हें प्रसिद्धच

आहे. याच न्यायानें जिचें सौभाग्यालंकार प्रभावी तिचा पति दीर्घायु असणें स्वाभाविकच आहे. तात्पर्य, आई ! शंकराचें अविनाशित्व हा तुझ्या कानांतील तारंकांचा म्हणजे कर्णभूषणांचा महिमा आहे !! जिच्या सौभाग्यालंकाराचा हा महिमा आहे, तिचा साक्षात् स्वतःचा महिमा केवढा असणार !

सोन्याच्या पत्र्यावर समभुज चतुष्कोन काढावा. चारी कोनांत मिळणाऱ्या रेषांची टोकें किंचित् पुढें करून त्यांना त्रिशुळाचा आकार द्यावा. चारी कोंपऱ्यांत आठ त्रिशूळ होतील. मध्यभागीं एकाखालीं एक ठं ठं ठं अशीं तीन बीजें लिहावींत. पंचेचाळीस दिवस विधिपूर्वक पूजा करून या श्लोकाचा रोज एक हजार वेळां जप करावा. दूध, पायस, गूळ, नारळ, केळें आणि तांबूल यांचा नैवेद्य दाखवावा. म्हणजे स्त्रियांचीं सर्व कार्यें सिद्ध होतील व पुरुषांचा अपमृत्यु टळेल.

किरीटं वैरञ्चं परिहर पुरः कैटभभिदः
कठोरे कोटीरे स्खलसि जहि जम्भारि-मकुटम् ।
प्रणम्रेष्वेतेषु प्रसभमुपयातस्य भवनं
भवस्याभ्युत्थाने तव परिजनोक्तिर्विजयते ॥ २९ ॥

आई त्रिपुरसुंदरी ! भगवान् शंकर हे जेव्हां तुझ्या मंदिरामध्यें येतात तेव्हां तुझी सेवा करण्याकरितां नियुक्त असलेल्या देवतांची काय धांदल उडते ! पहा. तुझ्या दर्शनाकरितां आलेले ब्रह्मदेव, विष्णु, इंद्र इत्यादि देव तुझ्या जवळ गर्दी करून उभे असतात. ते नम्र झालेले असतात. ते तुला साष्टांग प्रणिपात करीत असतात. भगवान् शंकर आल्यावरोवर तूं जेव्हां त्यांचें स्वागत करण्याकरितां सामोरी जातेस तेव्हां तुझा सेवकगण "वैरिञ्चं किरीटं परिहर" हा ब्रह्मदेवाचा मुकुट आहे त्याला बाजूला सारा. आणि हा कैटभजित् म्हणजे कैटभारि विष्णु त्यांच्या मुकुटाचें हे तीक्ष्ण टोंक आहे. ते लागेल पायाला. हा जंभारि म्हणजे इंद्र, त्याचा मुकुट आहे. "जहि" म्हणजे तो बाजूला टाका." आई ! याप्रमाणें सर्व देव तुझ्या चरणीं प्रणिपात करीत असतांना अकस्मात् जेव्हां शंकर येतात तेव्हां त्यांच्या स्वागताकरितां तूं उद्युक्त होतेस त्या वेळीं तुझे "परिजन" म्हणजे सेवक, त्यांच्या मुखांतून बाहेर पडणारे हे शब्द तुझा अपार महिमा सुचवीत आहेत. त्यांचा उत्कर्ष असो. त्यांचा विजय असो.

आई त्रिपुरसुंदरी ! सर्व देवांची तुझ्या चरणीं साष्टांग प्रणिपात करण्यासाठीं अलोट गर्दी होत असते. अशा वेळीं शंकराचें तूं सामोरे जाऊन स्वागत करतेस. यांत तुझ्या मनाचें औदार्य आणि तुझें पातिव्रत्य प्रकट होत आहे. हाहि तुझा महिमाच आहे. तूं शंकरांना हात दिला नसतास तर त्यांची संसारांत फटफजिति झाली असती. शंकरांना स्वतःला पांच तोंडें आहेत. एक मुलगा सहा तोंडांचा षडानन -- कार्तिकस्वामी, तर दुसरा मुलगा हत्तीच्या तोंडाचा -- गजानन लंबोदर. परिवार पहावा तर तो भूत, प्रेत, पिशाच !! आई त्रिपुरसुंदरी ! खरोखर तूं जर अन्नपूर्णा या रूपानें शंकरांना हात दिला नसतास तर त्यांना पोटभर खावयास मिळालेंहि नसतें ! तुझ्यावांचून शंकर हे मृततुल्य झाले असते ! (सौंदर्यलहरी श्लोक १ पहा). तात्पर्य, आई ! तुझा महिमा अपार आहे. या श्लोकांत श्रीमहात्रिपुरसुंदरीच्या समृद्धीचें वर्णन केलेलें असल्यामुळें हा श्लोक उदात्त अलंकाराचें उत्कृष्ट उदाहरण झाला आहे.

पान ६३५ यंत्रक्रमांक १४ प्रमाणें सोन्याच्या पत्र्यावर सहा त्रिकोण असलेलें यंत्र काढून मधल्या षट्कोनांत फक्त क्लीं हें एकच बीजाक्षर लिहावें. पंचेचाळीस दिवस विधिपूर्वक पूजा करून या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. नैवेद्याला मध आणि उडदाचे वडे असावेत. हें यंत्र धारण केल्यास दुष्ट आणि मूर्ख लोकांची दुर्बुद्धि नष्ट होऊन त्यांच्या मनांत आपल्याबद्दल सद्भावना निर्माण होईल व ते वश होतील.

स्वदेहोद्भूताभिर्घृणिभिरणिमाद्याभिरमितो
निषेव्ये नित्ये त्वामहमिति सदा भावयति यः ।
किमाश्चर्यं तस्य त्रिनयन-समृद्धिं तृणयतो
महासंवर्ताग्निर्विरचयति नीराजनविधिम् ॥ ३० ॥

तादात्म्यभावनेनें इष्टदेवतेची उपासना करणें याला अहंग्रहोपासना असें म्हणतात. ही इतर सर्व साधनांपेक्षां साधकाला सत्वर फलप्राप्ति करून देत असते. या दृष्टीनें या श्लोकांत आचार्य महात्रिपुरसुंदरीच्या तादात्म्यभावनेनें केल्या जाणाऱ्या उपासनेचा महिमा वर्णन करीत आहेत. आई त्रिपुरसुंदरी ! तूं नित्या म्हणजे आदि आणि अंत यांनीं रहित आहेस. त्याचप्रमाणें निषेव्या म्हणजे नित्य उपासना करण्यास योग्य आहेस. तुझ्या देहांतून अर्थात् चरणकमलापासून

प्रकट झालेल्या किरणांना देवताच म्हणतात. घृणि शब्दाचा अर्थ किरण असा आहे. त्या देवता किरणासारख्या प्रकाशमान असल्यामुळें त्यांना किरण असें म्हटलेलें आहे. या देवता श्रीत्रिपुरसुंदरीचा देहच असलेल्या श्रीचक्रामध्यें विराजमान झालेल्या आहेत. श्रीचक्रवर्णन पहा. तुझ्या भोंवतालीं विराजमान असलेल्या त्या देवता तुझी नित्य सेवा करीत आहेत. त्या सर्व देवतांसह सच्चिदानंदस्वरूप असलेली तूं; जो कोणी साधक तादात्म्यभावनेनें "सोहमस्मि" म्हणजे तो सच्चिदानंद आत्माच मी आहें. या भावनेप्रमाणें "त्वमहमस्मि" म्हणजे तूंच मी आहें अशा तादात्म्यभावनेनें तुझी उपासना करील तो पूर्ण समृद्ध होईल. त्रिनयन म्हणजे भगवान् सदाशिव. नयन म्हणजे मार्ग अर्थात् प्राप्तीचें साधन. सूर्य, चंद्र आणि अग्नि हीं शंकरांच्या प्राप्तीचीं तीन साधनें आहेत म्हणून शंकरांना त्रिनयन असें म्हणतात. अथवा इडा, पिंगला आणि सुषुम्ना या तीन मार्गांनींच योगी लोक सदाशिवतत्त्वाचा साक्षात्कार करून देत असतात. म्हणूनहि शंकरांना त्रिनयन असें म्हटलेलें आहे. अथवा सूर्य, चंद्र आणि अग्नि हे त्यांचे तीन नेत्र आहेत म्हणूनहि त्यांना त्रिनयन असें म्हणतात. त्रिनयन म्हणजे शंकर. त्यांची समृद्धि देखील तो साधक कस्पटाप्रमाणें तुच्छ मानतो. "महासंवर्ताग्नि" म्हणजे कल्पान्तकाळाचा प्रळयाग्नि त्याला नीरांजनविधि करतो. तो स्वतःलाच नीरांजनदीपाप्रमाणें त्याच्यावरून ओवाळून घेतो यांत आश्चर्य काय आहे ? तात्पर्य, हे आई ! अत्यंत भक्तवत्सल असलेल्या तुझी तादात्म्यभावनेनें उपासना केली असतां तो तुझ्या कृपेनें शंकरापेक्षांहि अधिक समृद्ध होतो ! प्रत्यक्ष तूंच तो होतो !



यंत्र क्रमांक २५

सोन्याच्या पत्र्यावर हें यंत्र काढून शहाण्णव दिवस त्याची आराधना करावी. रोज या श्लोकाचा एक हजार जप करावा. मध, गूळ, नारळ, केळें आणि तांबूल यांचा नैवेद्य दाखवावा. यंत्र धारण करावें. फल अणिमाद्यैश्वर्यासिद्धि परकायप्रवेश. अभिग्रस्तंभन.

चतुःषष्ट्या तन्त्रैः सकलमतिसन्धाय भुवनं
स्थितस्तत्तत्सिद्धि-प्रसव-परतन्त्रैः पशुपतिः ।

पुनस्त्वन्निर्बन्धादखिल-पुरुषार्थैक-घटना-
स्वतन्त्रं ते तन्त्रं क्षिति-तलमवातीतरदिदम् ॥ ३१ ॥

आई त्रिपुरसुंदरी ! तुझें भक्तवात्सल्य किती वर्णन करावें ? भक्तजनांचे सकल मनोरथ पूर्ण करण्याला समर्थ असें हें श्रीविद्यातंत्र शंकरांना प्रकट करावयास तूंच भाग पाडलेंस. शंकरांनींहि पण तुझ्या आग्रहास्तव तें प्रकट केलें, अशा अभिप्रायानें स्तुति करीत आहेत. " पशुपतिः चतुःषष्ट्या तन्त्रैः सकलं भुवनं अतिसन्धाय पुनः त्वन्निर्बन्धात् इदं ते तन्त्रं क्षितितलं अवातीतरत् " असा या श्लोकाचा मुख्य अन्वय आहे. शंकरांनीं चौसष्ट तंत्रांची रचना करून लोकांना सिद्धींच्या व काम्य फलांच्या नादी लावलें. केवळ मोक्ष प्रतिपादन करणारा वेदान्तहि सांगितला आणि ते स्वस्थ बसले. ज्या योगें धर्म, अर्थ आणि काम यांच्यासह परम पुरुषार्थांचा लाभ होईल, असें साधन प्रकट होणें आवश्यक होतें. आई जगज्जननी ! असें साधन प्रकट करण्याचा तुंच त्यांना आग्रह केलास तेव्हां त्यांनीं पुन्हां साधकांना सकल पुरुषार्थांचा प्रामुख्यानें लाभ होईल अशा योग्यतेचें तुझें एक स्वतंत्रच तंत्र या भूमंडलावर अवतरविलें, प्रकट केलें. असा या श्लोकाचा अन्वयानुसारी तात्पर्यार्थ आहे.

विशिष्ट प्रकारच्या निरनिराळ्या सिद्धि अथवा ऐहिक फलें सत्वर प्राप्त करून देणाऱ्या साधनांचा अथवा उपासनांचा मार्ग दाखविणाऱ्या शास्त्राला तंत्र असें म्हणतात. तंत्रशास्त्राचे आद्य प्रवर्तक भगवान् शंकरच आहेत. हीं तंत्रें बुद्धीमध्यें काम्य फलांविषयीं मोह निर्माण करतात. अद्भुत सिद्धि प्राप्त करून घेण्यासाठीं मनुष्य तंत्रविद्येच्या नादी लागतो. पण शेवटीं त्यांत त्याचा नाशच होतो. याकरितां शहाणे लोक सिद्धींचा अथवा ऐहिक फलांचा मोह विवेकानें जिंकतात व तंत्र विद्येपासून दूर रहातात. बहुतेक तंत्रविद्या या अवैदिक असल्यामुळेंहि विवेकी लोक त्यांची उपेक्षा करतात. एकंदर या तंत्रविद्या संख्येनें चौसष्ट आहेत. तंत्रविद्यांना शंबरतंत्र अथवा शंबरविद्या असेंहि म्हणतात. शंबर शब्दाचा अर्थ मायावी अथवा जादूगार असा आहे.

वाचकांना कल्पना यावी म्हणून आम्ही या ठिकाणीं कांहीं तंत्रविद्यांचा उल्लेख करीत आहोंत. १. महामायाशंबरतंत्र. या तंत्राच्या साधनानें साधक हा लोकांच्या डोळ्यांना घटाचा पट भासवितो तर पटाचा घट भासवितो. अक्षराला

घासलेटाचा वास भासवील तर घासलेटाला अत्तराचा वास भासवील. रडण्याच्या आवाजाला सुस्वराचा भास निर्माण करील तर सुस्वर गायनाला रडण्याचा भास दाखवील. काट्यांचीं टोंकें गादीप्रमाणें मऊ असल्याचें दाखवील तर पराची गादी कांट्याप्रमाणें टोंचत असल्याची प्रतीति आणून देईल इत्यादि. यालाच मोहनतंत्र असेंहि म्हणतात. २. योगिनीजालतंत्र. स्मशानांत अपरात्रीं बसणें, प्रेतें टकरणें इत्यादि वाममार्गानें या तंत्रांतील साधनांचें अनुष्ठान करावें लागतें. त्यानें योगिनी प्रसन्न होतात व वाटेल तें कार्य करतां येतें. ३. तत्त्वशंबर-तंत्र. यायोगें पृथ्वीचें जल आणि जलाची पृथ्वी याप्रमाणें भूततत्त्वांचें परिवर्तन करतां येतें. ४. सिद्धभैरवतंत्र. ५. बटुकभैरवतंत्र. ६. काळभैरवतंत्र ७. कालाग्निभैरवतंत्र. ८. योगिनीभैरवतंत्र. ९. महाभैरवतंत्र. १०. शक्तिभैरव तंत्र. या तंत्रांच्या साधकांना कापालिक असें म्हणतात. ११. बहुरूपाष्टक-तंत्र. यांत ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी इत्यादि देवतांचीं तंत्रें येतात. १२. यमलाष्टकतंत्र. यांत ब्रह्मयामल, विष्णुयामल, रुद्रयामल, लक्ष्मीयामल, उमायामल, स्कंदयामल, गणेशयामल आणि जयद्रथयामल अशीं आठ यामलें आहेत. १३. चंद्रज्ञानविद्यातंत्र. १४. मालिनीविद्यातंत्र. १५. महासंमोहनतंत्र. १६. वामजुष्टतंत्र. १७. महादेवतंत्र. १८. वातुलतंत्र. १९. वातुलोत्तरतंत्र. २०. कामिकतंत्र. २१. हृद्भेदतंत्र. २२. तंत्रभेदतंत्र. २३. गुह्यतंत्र. २४. कलावादतंत्र. २५. कलासारतंत्र. २६. कुंडिकातंत्र. २७. मतोत्तरतंत्र. २८. वीणातंत्र. २९. त्रोतलतंत्र. ३०. त्रोतलोत्तरतंत्र. ३१. पंचामृततंत्र. ३२. रूपभेदतंत्र इत्यादि. एकंदर तंत्रांची संख्या चौसष्टापेक्षांहि अधिक भरते. यांतील कांहीं तंत्रें अवैदिक आहेत तर कांहीं तंत्रें अंशतः वैदिक व अंशतः अवैदिक जाहेत. हीं सर्व तंत्रें राजस व तामस असल्यामुळें सात्त्विक सत्प्रवृत्तीच्या दृष्टीनें त्याज्यच आहेत.

यावर कोणी असें विचारील कीं, शंकरांनीं या तंत्रांचा उपदेश करून लोकवंचना कां केली ? यांत शंकरांचा दोष नाहीं का ? पण हा आक्षेप बरोबर नाहीं. समाजामध्यें अनेक स्वभावाचे लोक असतात. त्यांचे अधिकारहि भिन्न भिन्न असतात. अशा स्थितींत अधिकारभेदानें उपदेश करणें अपरिहार्य असतें. कांहीं उद्योग न करतां पशुतुल्य जीवन व्यतीत करण्यापेक्षां कांहीं उपासना करून सिद्धि मिळविणें, इष्ट सुखें संपादन करणें हें केव्हांहि योग्यच होय. अशा रीतीनें बहुजनसमाजाला उद्योगाचा मार्ग दाखविण्याच्या दृष्टीनें शंकरांकडून तंत्रांचा

उपदेश केला गेला. सिद्धींच्या आणि ऐहिक सुखाच्या लोभानें व मोहानें सात्त्विक आणि वैदिक मार्गानुयायी लोकहि जर त्या तंत्रमार्गानें जाण्यास प्रवृत्त झाले तर त्यांत शंकरांचा काय दोष आहे? दीपक, पाचक, रेचक, वामक, अवष्टंभक इत्यादि अनेक प्रकारचीं औषधें असतात. रोग्यानें आपल्या रोगाचा, प्रकृतीचा व अवस्थेचा विचार करून त्यांतील योग्य तें औषध घ्यावयाचें असतें. भलत्यानें भलतें औषध घेतल्यास त्याचा परिणाम अनिष्ट होणार हें निश्चित. यांत औषधिशास्त्राचा किंवा तें शास्त्र सांगणाऱ्याचा काय दोष आहे? ग्रंथालयांत अनेक विषयांचे ग्रंथ असतात. वाचकानें आपल्या अधिकाराप्रमाणें ग्रंथांची निवड करूनच ते वाचावयाचे असतात. भलत्यानें भलते ग्रंथ वाचून काळाचा अपव्यय केल्यास त्यांत ग्रंथालयाचा किंवा ग्रंथकाराचा काय दोष आहे? भोजनामध्यें राजशाही थाटाच्या विविध प्रकारच्या चटण्या, कोशिंबिरी, भाज्या, कुर्डया, पापड, वडे, भजीं, कढी, आमटी, वरण, पांढरा भात, केशरी भात, मसाले भात, साजूक तूप, पुरणपोळी, खीर, बासुंदी, श्रीखंड, पुरी, लाडू, इत्यादि अनेक प्रकारचे पदार्थ असतात. खाणाऱ्यानें आपली शक्ति पाहूनच ते सेवन करावयाचे असतात. मोहाला आणि जिह्वालौल्याला बळी पडून एखाद्यानें न सोसणारे पदार्थ खाल्ले आणि ते बाधले तर त्यांत भोजन घालणाऱ्याचा काय दोष आहे? याच न्यायानें तंत्रमार्गाचा उपदेश शंकरांनीं करण्यांत त्यांनीं लोक-वंचना केली असें म्हणतां येत नाहीं. ते तर परम दयाळु आहेत. अवैदिक मार्ग आणि वैदिक आणि अवैदिक असा मिश्र मार्ग सुजनांनीं सोडून द्यावा, असें स्वतः शंकरांनींच सांगितलेलें आहे. "मिश्रकं कौलमार्गं च परित्याज्यं हि शांकरि" शंकर म्हणतात, हे पार्वती! अवैदिक आणि वैदिक व अवैदिक अशा मिश्र स्वरूपाचा हा वाममार्ग – तंत्रमार्ग अखेर त्याज्यच आहे.

तंत्रवाङ्मयांत शुभागमतंत्र नांवाचा एक भेद आहे. शुभागमतंत्रांतील सर्व अंगें हीं वेदमार्गानुसारी आहेत. वसिष्ठ, शुक, सनक, सनंदन आणि सनत्कुमार हे या तंत्रमार्गाचे पुरस्कर्ते आहेत. वासिष्ठसंहिता, सनकसंहिता, शुकसंहिता, इत्यादि त्यांचीं नांवें आहेत. या पांच संहितांना शुभागमपंचक असेंच म्हणतात. या सर्व ग्रंथांत श्रीचक्राधिष्ठित श्रीविद्येचाच पुरस्कार केलेला आहे. यालाच नित्याषोडशिकातंत्र अथवा महात्रिपुरसुंदरीतंत्र असें म्हणतात. याचेंहि मुख्य उपदेशक लोकहिततत्पर भगवान् श्रीसदाशिवच आहेत. तात्पर्य, पशुपति म्हणजे

भगवान् शंकर यांनीं "तत्तत्सिद्धि-प्रसव-परतन्त्रैः" म्हणजे भिन्नभिन्न सिद्धींच्या प्राप्तीसाठीं रचली गेलेलीं अशीं चौसष्ट तंत्रें लोकांना उपदेशिलीं. या तंत्राच्या योगानें सर्व लोकांना सिद्धींच्या व काम्यफलांच्या नादी लावून (अतिसंधाय) ते स्वस्थ बसले. तेव्हां हे आई त्रिपुरसुंदरी ! तूंच त्यांना निर्बंध म्हणजे आग्रह केलास. तुझ्याच आग्रहावरून त्यांनीं चारी पुरुषार्थांची प्रामुख्यानें प्राप्ति करून देण्यांत स्वतंत्र असलेलें तुझें हें तंत्र या भूतलावर प्रकट केलें. या तंत्रालाच महात्रिपुरसुंदरीतंत्र अथवा श्रीविद्यातंत्र असें म्हणतात. तेंच तंत्र या सौंदर्यलहरीचा विषय आहे.

श्रीचक्र हेंच या श्लोकाचें यंत्र होय. या श्लोकांतील व बाविसाव्या श्लोकांतील श्रीयंत्रांत मध्यवर्ति त्रिकोणांत असलेला बिंदु हा त्या त्रिकोणाच्या वरच्याच बाजूस असलेल्या बारक्या चतुष्कोणांत दाखविलेला आहे. श्रीचक्रलेखनांतहि कौलचक्र आणि समयचक्र असे दोन भेद आहेत. कौलचक्रांत बिंदु हा मध्यवर्ती त्रिकोणांत असतो तर समयचक्रांत तो त्रिकोणाच्यावर असलेल्या चतुष्कोणांत दाखवितात.

हें श्रीयंत्र सोन्याच्या पत्र्यावर काढून त्याची पंचेचाळीस दिवस समाराधना करावी. यंत्र हातावर ठेवून या श्लोकाचा रोज एक हजार वेळां जप करावा. दुधाचा आणि मधाचा नैवेद्य दाखवावा. सिद्ध यंत्र धारण करावें. यानें सर्व लोक आणि राजेहि वश होतील.

शिवः शक्तिः कामः क्षितिरथ रविः शीतकिरणः
स्मरो हंसः शक्रस्तदनु च परामारहरयः ।
अमी हृल्लेखाभिस्तिसृभिरवसानेषु घटिता
भजन्ते वर्णास्ते तव जननि नामावयवताम् ॥ २२ ॥

देवता ही मंत्रमय असल्यामुळें तंत्रशास्त्रांत मंत्रालाच प्राधान्य असतें. मागील श्लोकांत श्रीमहात्रिपुरसुंदरी देवीच्याच आग्रहावरून लोककल्याणाकरितां शंकरांनीं हें सर्व तंत्रांमध्यें श्रेष्ठ असलेलें महात्रिपुरसुंदरीतंत्र अथवा श्रीविद्यातंत्र भूतलावर प्रकट केलें असें सांगितलें. आतां त्या तंत्रांतील प्रधान अंग असलेल्या मंत्रालाच या श्लोकामध्यें निर्दिष्ट करीत आहेत. मंत्र हा अत्यंत गोपनीय असल्यामुळें प्रत्यक्ष अक्षरांनीं मंत्राचा निर्देश न करतां तो परोक्षपद्धतीनेंच

केला जात आहे. व्यवहारामध्यें देखील पुष्कळांना प्रत्यक्ष नांवानेंच केलेला व्यवहार रुचत नाहीं. दादासाहेब, बाबासाहेब असें म्हटलें म्हणजे बरे वाटतें. हाच देवांचाहि स्वभाव आहे. "परोक्षप्रिया इव हि वै देवाः" हें श्रुतिवचन प्रसिद्धच आहे. परोक्षपद्धतीनें व्यवहार केल्यास मुख्य नांवाची गुप्तताहि राखली जाते व देवतांचाहि संतोष होतो. अशा अभिप्रायानें आचार्य मोठ्या युक्तीनें या श्लोकांत श्रीविद्येचा निर्देश करीत आहेत.

पंचदशीविद्या, षोडशीविद्या, कादिविद्या, हादिविद्या असे श्रीविद्यामंत्राचे संप्रदायभेदानें अनेक भेद आहेत. आपआपल्या संप्रदायाप्रमाणें आपल्याला अभीष्ट असलेल्या मंत्राचा उद्धार अनेक विद्वानांनीं या श्लोकांतून केलेला आहे. मंत्रांतील अक्षरांची आनुपूर्वी ही प्रत्यक्ष गुरुमुखांतूनच अवगत करून घ्यावयाची असते. अधिकारी गुरूंच्या मुखांतून प्राप्त झालेल्या मंत्राक्षरांत एक प्रकारचा अनिर्वचनीय प्रभाव असतो यांत शंकाच नाहीं. भगवत्पूज्यपाद श्रीमान् आद्य शंकराचार्य हें आपलें श्रीविद्यातंत्राचे गुरूच आहेत असें आपण समजूं या. जगाचेंच गुरु आहेत ते. आणि आपण तर त्यांच्याच शब्दांच्या आधारें श्रीमहात्रिपुरसुंदरीचें स्वरूप पहात आहोंत. आतां आपण आपल्या इष्टदेवतेचें मंत्रमय स्वरूप त्यांच्याच शब्दांनीं पाहूं.

या श्लोकांत "शिवः शक्तिः" इत्यादि शब्दांनीं श्रीविद्येंतील एका एका अक्षरांचा उल्लेख केलेला आहे. हे शब्द शास्त्रीय परिभाषेनें क्वचित् साक्षात्, क्वचित् लक्षणेनें तर क्वचित् लक्षितलक्षणेनें मंत्रांतील घटक अक्षरांचा बोध करून देतात. जशा चंद्राच्या कला सोळा आहेत त्याचप्रमाणें श्रीविद्येच्या देखील सोळा कला आहेत. याच अभिप्रायानें श्रीविद्यातंत्राला चंद्रकलाविद्यातंत्र असेंहि नांव आहे. या सोळा कलांपैकीं "दर्शा" नांवाची पहिली कला, तिची अधिष्ठात्री देवता त्रिपुरसुंदरीच आहे. ती कला शिवतत्त्वात्मक असल्यामुळें प्रकृत स्थळीं शिव शब्दाचा अर्थ ती "दर्शा" नांवाची कला असा करतात. दर्शा-कलेचें प्रकृतिभूत अक्षर क आहे म्हणून श्लोकांतील शिव शब्दानें क हेंच अक्षर समजावें. त्याचप्रमाणें शक्ति हा शब्द "दृष्टा" नांवाच्या दुसऱ्या कलेचा वाचक आहे. दृष्टाकला ही शक्तितत्त्वात्मक असल्यामुळें शक्तितत्त्वाचें प्रकृतिभूत अक्षर ए आहे. तेंच श्रीविद्यामंत्रातील दुसरें अक्षर होय. काम शब्द हा "दर्शता" नांवाच्या तिसऱ्या कलेचा वाचक आहे. या तिसऱ्या कलेची देवता कामच आहे.

दर्शविलेलें बीजभूत अक्षर ईं असल्यामुळें तेंच या मंत्रांतील तिसरें अक्षर होय. क्षिति शब्दाचा अर्थ पृथ्वी असा आहे. पृथ्वीतत्त्वाचें बीज ल हें प्रसिद्धच आहे. तेंच प्रस्तुत मंत्रांतील चौथें अक्षर होय. अथ शब्द हा मागील चार अक्षरांचा एक खंड पूर्ण झाल्याचें सुचवीत आहे. प्रत्येक खंडाच्या शेवटीं ह्रीं बीज असतेंच. ह्रीं बीजासह चार अक्षरांच्या या खंडाला अग्निखंड असें म्हणतात. या खंडांत ह्रीं या बीजासह पांच अक्षरें होतात. या पांच अक्षरांच्या समूहाला वाग्भवकूट असें म्हणतात.

श्लोकांतील अथ शब्दानंतर दुसऱ्या खंडाला आरंभ होतो. दुसऱ्या खंडांतील पहिला शब्द रवि आहे. दुसरें खंड सूर्यतत्त्वाचें आहे. याला सूर्यखंड असेंच म्हणतात. ज्याप्रमाणें श्रीचक्र हें "सोमसूर्यानलात्मकं" या वचनाप्रमाणें त्रिखंड म्हणजे सोम, सूर्य आणि अग्नि या तीन तत्त्वांचें आहे. त्याचप्रमाणें श्रीमंत्र देखील त्रिखंड अर्थात् अग्नि, सूर्य आणि सोम या तीन तत्त्वांचा आहे. रवि शब्दानें सूचित होणारें सूर्यतत्त्वाचें 'ह' हें अक्षर या मंत्रांतील सहावें अक्षर होय. "शीतकिरण" या शब्दाचा अर्थ चंद्र असा आहे. "सकारश्चन्द्रबीजं" असा शास्त्रसंकेत आहे. या संकेताप्रमाणें शीतकिरण या शब्दाचा अर्थ स हें अक्षर समजावें. सकार हा या मंत्रातील सातवें अक्षर होय. स्मर म्हणजे कामदेव. कामराजाचें प्रकृतिभूत अक्षर क आहे. तेंच या मंत्रांतील आठवें अक्षर होय. "हंस" म्हणजे सूर्य तो ह या अक्षराचा अधिपति आहे म्हणून श्लोकातील हंस शब्दानें हकार समजावा. हकार हा या मंत्रांतील नववें अक्षर होय. त्याचप्रमाणें शक्र म्हणजे इंद्र. "लकार इन्द्रबीजं" या शास्त्रीय संकेताप्रमाणें शक्र शब्दाचा अर्थ ल असा झाला. लकार हा श्रीमंत्रांतील दहावें अक्षर होय. याला पहिल्या खंडाप्रमाणें ह्रीं हें बीजाक्षर जोडलें म्हणजे दुसरा खंड पूर्ण होतो. दुसऱ्या खंडांत सहा अक्षरें आहेत. या दुसऱ्या खंडाला कामराजकूट असें म्हणतात.

"तदनु च" म्हणजे आणि त्यानंतर. "परा-मार-हरयः" परा शब्दाचा अर्थ या ठिकाणीं चंद्रकला असा आहे. चंद्राचें बीजभूत अक्षर सकार आहे. स हें अक्षर आपल्या उपास्यदेवतेच्या पंचदशाक्षरी मंत्रांतील बारावें अक्षर होय. त्याचप्रमाणें "मार" म्हणजे कामदेव. तो सर्वांना मारतो अथवा त्याच्यापायीं सर्व मरतात म्हणून त्याला 'मार' असें नांव दिलेलें आहे. कामराजाचें प्रकृतिभूत अक्षर क आहे. तें या मंत्रांतील तेरावें अक्षर होय. तसेंच हरि या शब्दाचा

अर्थ इंद्र असा आहे. इंद्राचें बीजभूत अक्षर ल आहे. तेंच आपल्या या मंत्रातील चौदावें अक्षर होय. त्याच्या पुढें ह्रीं हें बीज जोडलें म्हणजे मंत्राचा तिसरा खंड पूर्ण होतो. या खंडाला सोमखंड अथवा चंद्रखंड असें म्हणतात. या तिसऱ्या खंडाला शक्तिकूट असेंहि म्हणतात. शेवटच्या ह्रीं या बीजासह एकंदर पंधरा अक्षरें होतात. " अवसानेषु तिसृभिः हृल्लेखाभिः घटिताः ते अमी वर्णाः हे जननि तव नामावयवतां भजन्ते " वर सांगितल्याप्रमाणें पहिल्या खंडांत चार अक्षरें व शेवटीं ह्रीं हें बीज आहे. दुसऱ्या खंडांत पांच अक्षरें व शेवटीं ह्रीं हें बीज आहे आणि तिसऱ्या खंडांत तीन अक्षरें व शेवटीं ह्रीं हें बीज आहे. "अवसानेषु" म्हणजे प्रत्येक खंडाच्या शेवटीं 'हृल्लेखाभिः' म्हणजे ह्रीं या बीजांनीं, "घटिताः" म्हणजे युक्त असलेले, " ते अमी वर्णाः " म्हणजे ते हे वर्ण अर्थात् ह्रीं अक्षरें, "जननि" हे मातोश्री ! तुझ्या मंत्रात्मक नामाच्या अवयवांचें रूप धारण करीत आहेत. असा या श्लोकाचा सरळ अन्वयानुसारी अक्षरार्थ आहे.

ह्रीं हें बीज मंत्रशास्त्रांत फार महत्त्वाचें मानलेलें आहे. हें बीज सर्व-मंत्रांची जणुं कांहीं प्राणशक्ति आहे. ह्रीं हें बीज मंत्राच्या सामर्थ्याचें उद्बोधन करीत असतें. ह्रीं या बीजानें मंत्रामध्यें चैतन्य निर्माण होत असतें ! ह्रीं हें बीज नसेल तर मंत्रराशि निर्जीव होतो. हृदयामध्यें जशी प्राणांची ज्योत विलसत असते, त्याचप्रमाणें ह्रीं हें बीज मंत्रांतील प्राणज्योतच आहें. आकाशांत जशी विद्युल्लेखा चमकते त्याचप्रमाणें ह्रीं हें बीज साधकाच्या हृदयांत प्रकाश देणारें आहे म्हणूनच ह्रीं या बीजाला हृल्लेखा असें म्हणतात.

" हृदि लेखेव जागर्ति प्राणशक्तिरियं परा ।
हृल्लेखा कथ्यते तस्मान्मायैवाचिन्त्यवैभवा ॥
अनया रहिताः सर्वे निर्जीवा मन्त्रराशयः ।
अतस्तु सर्वमन्त्राणामियमुद्बोधनी मता ॥ "

असें मंत्रशास्त्रांत ह्रीं या बीजाचें वर्णन केलेलें आहे. विश्वाची उत्पत्ति, स्थिति आणि संहार या तिन्ही अवस्था ह्रीं बीजांत सामावलेल्या आहेत. त्याचें प्रामुख्यानें कर्तृत्व श्रीत्रिपुरसुंदरीकडेच असल्यामुळें तिला ह्रींकारी असें म्हटलेलें आहे. " ह्रींकारी ह्रींमती हृद्या " ह्रीं तिचीं नांवेंच आहेत. फार काय सांगावें, ह्रीं हें तिचेंच स्वरूप होय. याच अभिप्रायानें तिला त्रिशतीमध्यें " ह्रीं

ह्रींशरीरिणी " असें म्हटलेलें आहे. श्रीत्रिपुरसुंदरी ही माया अथवा महामाया-स्वरूप असल्यामुळें ह्रीं या बीजाला मायाबीज असें म्हणतात. त्रिपुरसुंदरी ही सर्व भुवनांची अधिष्ठात्री असल्यामुळें तिला भुवनेश्वरी असेंहि म्हणतात. आणि याच अभिप्रायानें ह्रीं या बीजाला भुवनेश्वरीबीज असेंहि म्हटलेलें आहे. असें हें ह्रीं बीज अत्यंत महत्त्वाचें असल्यामुळें या मंत्रांतील तिन्ही खंडांच्या शेवटीं ह्रीं या बीजाचा प्रयोग झालेला आहे.

या पंचदशाक्षरी श्रीविद्यामंत्रांतील पहिलीं चार अक्षरें अग्निखंड म्हणून मानलीं जातात. त्यानंतर ह्रीं हें बीज आहे. त्याच्यापुढील पांच अक्षरें सौरखंड म्हणून ओळखलीं जातात. सूर्य हा त्यांचा अधिष्ठाता आहे. अग्निखंड आणि सूर्यखंड यांच्यामध्यें असलेल्या ह्रीं या बीजाला रुद्रग्रंथि असें म्हणतात. दुसऱ्या खंडाच्या शेवटींहि ह्रीं बीज आहेच. या ह्रीं बीजापुढील तीन अक्षरें हा या मंत्रांतील तिसरा खंड होय. या तिसऱ्या खंडाला सौम्यखंड अथवा चांद्रखंड असें म्हणतात. सौरखंड आणि चांद्रखंड यांच्यामध्यें असलेल्या ह्रीं बीजाला विष्णुग्रंथि असें म्हणतात. तिसऱ्या खंडापुढें असलेल्या ह्रीं बीजानंतर आणखी एक अक्षर आहे. तें फारच महत्त्वाचें आहे, तें गुरुमुखानेंच जाणावें असें सांगितलेलें आहे. त्या अक्षरासह आपल्या उपास्यदेवतेचा— श्रीत्रिपुरसुंदरीचा मंत्र हा सोळा अक्षरांचा होतो. म्हणूनच या मंत्राला षोडशी-विद्या असें म्हणतात. हें अक्षरहि स्वतंत्र मंत्रस्वरूप आहे. या अक्षराचा अंतर्भाव न करतां राहिलेल्या पंधरा अक्षरांच्या मंत्राला पंचदशीविद्या असें म्हणतात. षोडशीविद्येंतील सोळाव्या अक्षराला चंद्रकलाखंड असें म्हणतात. सौम्यखंड आणि चंद्रकलाखंड यांच्यामध्यें असलेल्या ह्रीं बीजाला ब्रह्मग्रंथि असें म्हणतात. याप्रमाणें " त्रिखण्डो मातृकामन्त्रः सोमसूर्यानलात्मकः " मातृका म्हणजे माता त्रिपुरसुंदरी, तिचा हा मंत्र त्रिखंड म्हणजे चंद्र, सूर्य आणि अग्नि या तीन तत्त्वांचा आहे ही गोष्ट लक्षांत घ्यावी. त्रिखंड या विशेषणानें आणखी एक विशेष सूचित केला जात आहे. तो म्हणजे ज्ञानशक्ति, इच्छाशक्ति आणि क्रियाशक्ति. त्याचप्रमाणें जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति. तसेंच विश्व, तैजस आणि प्राज्ञ या चैतन्याच्या तीन अवस्था. तमोगुण, रजोगुण आणि सत्त्वगुण. त्याचप्रमाणें स्थूल सूक्ष्म आणि कारण अशा विविधरूपानें श्रीयंत्राचें व श्रीमंत्राचें त्रिखंडत्व पहातां येतें.

वर चौथें खंड म्हणून चंद्रकलाखंडाचा उल्लेख केलेला आहे. हें खंड तिन्ही खंडांच्या पलीकडचें आहे. तें सर्वातीत आहे. अवस्थात्रयातीत, गुणत्रयातीत, देहत्रयातीत, कूटत्रयातीत खण्डत्रयातीत इत्यादि शब्दांनीं त्याचें वर्णन करतात. वस्तुतः तें वर्णनातीत आहे. " सत्यं ज्ञानमनन्तं ", " नित्यं विज्ञानमानन्दं " अशा शब्दांनीं उपनिषदें ज्याचें वर्णन करतात तेंच तें श्रीविद्येचें चतुर्थ खंड होय. त्याला तुरीयखंड असें म्हणतात. हें शुद्धचित्स्वरूप असल्यामुळें याला 'चिदेकरस' असेंहि म्हटलेलें आहे. तिला पराकला असें म्हणतात. परा म्हणजे सर्वश्रेष्ठ आणि कला म्हणजे तत्त्व. चन्द् धातूचा अर्थ आनंद देणें किंवा प्रकाशणें असा आहे. " चन्दयति अथवा चन्दति इति चन्द्रा " जी सर्वांना आनंद देते, प्रकाश देते अथवा आपल्या स्वतःसिद्ध प्रकाशानें प्रकाशते ती चन्द्रा. " चंद्रा चासौ कला च चन्द्रकला. " तात्पर्य, सर्वांना आनंद देणारें, प्रकाश देणारें आणि स्वतःसिद्ध प्रकाशानें प्रकाशित असलेलें असें जें अनिर्वचनीय तत्त्व तेंच चंद्रकला या शब्दाचा अर्थ होय. या चंद्रकलेलाच महात्रिपुरसुन्दरी असें म्हटलेलें आहे. श्रीसूक्तामध्यें तर चंद्रा हेंच नांव श्रीमहात्रिपुरसुंदरीला दिलेलें आहे. " चन्द्रां हिरण्मयीं लक्ष्मीं " " चन्द्रां प्रभासां यशसा ज्वलन्तीं " इत्यादि. असो.

चंद्र जसा सोळा कलांनीं पूर्ण असतो त्याचप्रमाणें श्रीललितामहात्रिपुरसुंदरी ही सोळा कलांनीं पूर्ण आहे. त्रिपुरसुंदरीकला, कामेश्वरीकला, भगमालिनीकला इत्यादि पंधरा कलांची पंधरा नांवें आहेत. सोळावी कला ही स्वतः श्रीमहात्रिपुरसुंदरीच होय. ज्योतिःशास्त्रामध्यें चंद्राच्या पहिल्या कलेला प्रतिपदा हें नांव दिलेलें आहे. दुसऱ्या कलेला द्वितीया व तिसऱ्या कलेला तृतीया याप्रमाणें सर्व तिथींचीं नावें ही चंद्राच्या कलांचींच नांवें होत. या तिथि एकंदर सोळा आहेत. पंधराव्या तिथीला पौर्णिमा आणि सोळाव्या तिथीला अमावास्या असें म्हणतात. प्रतिपदेपासून पूर्णिमेपर्यंत चंद्राची एक एक कला रोज वाढत असते व पूर्णिमेच्या दिवशीं आपल्याला पूर्ण चंद्राचें दर्शन घडतें. सोळावी कला त्यांतच सामावलेली असल्यामुळें सोळा कलांचा पूर्णचंद्र पूर्णिमेला दृग्गोचर होत असतो. त्यानंतर क्रमाक्रमानें रोज एक एक कला ह्रास पावते. सोळावी कला ही कधींच ह्रास पावत नसते. कारण ती नित्य आणि सच्चिदानन्दस्वरूप आहे. " दर्शाद्याः पूर्णिमान्ताश्च कलाः पञ्चदशैव तु । षोडशी तु कला ज्ञेया सच्चिदानन्दरूपिणी । " (सुभगोदयतन्त्र).

वस्तुस्थिति अशी आहे कीं, चंद्राच्या कला किंवा चंद्र हा ऱ्हासहि पावत नाहीं आणि वृद्धिंगतहि होत नाहीं. चंद्र हा तत्त्वतः सदासर्वकाळ परिपूर्ण स्वरूपांतच असतो. महात्रिपुरसुंदरीचें अधिष्ठान असलेल्या मूर्धस्थानच्या सहस्र-दलकमलांतील चंद्रमंडलाचें स्वरूपहि असेंच मानलेलें आहे. यावर कोणी असें विचारील कीं, चंद्र जर सदासर्वकाळ पूर्णरूप आहे तर मग त्याच्या कलांची वृद्धि आणि ऱ्हास का दिसतात ? यावर उत्तर असें कीं, चंद्रमंडल हें आप्य म्हणजे जलीय आहे. सूर्यमंडल हें तेजोमय आहे. सूर्यमंडल आणि चंद्रमंडल हीं दोन्ही मंडलें एका नक्षत्रामध्यें आलीं म्हणजे चंद्रमंडल आपल्याला दिसत नाहीं. कारण तें आपल्या दृष्टीनें सूर्यमंडलाच्या आड गेलेलें असतें. अर्थात् आपली दृष्टि आणि चंद्रमंडल यांच्यामध्यें समरेषेंत सूर्यमंडल मध्येंच आलेलें असतें. त्यामुळें चंद्रमंडल आपल्याला दिसत नाहीं. त्या काळाला आपण अमावास्या असें म्हणतों. अमा म्हणजे एकत्र, सह, बरोबर. आणि वास्या म्हणजे रहाणें. अर्थात् सूर्य आणि चंद्र यांचें ज्या काळीं एकत्र रहाणें घडतें त्या काळाला अमावास्या असें म्हणतात तें अगदीं बरोबर आहे. यालाच ज्योतिषशास्त्रांत दर्श असें म्हणतात.

दर्शाच्या दिवशीं आपली दृष्टि आणि चंद्रबिंब यांच्यामध्यें सूर्यमंडल आलेलें असल्यामुळें आपल्या दृष्टीला चंद्रबिंब दिसत नाहीं. आपल्या दृष्टीला तें दिसलें नाहीं म्हणून तें नाहीं असें कसें म्हणतां येईल ? मोठ्या पर्वताच्या पलीकडे सम-रेषेंत असलेला छोटा पर्वत आपल्याला दिसला नाहीं. म्हणून तो नाहीं असें म्हणतां येत नाहीं. तो त्या मोठ्या पर्वताच्या आड असतोच. चंद्राला एका नक्षत्रांतून दुसऱ्या नक्षत्रामध्यें जाण्यास साठ घटकांचा अवधि लागतो, तर सूर्याला एका नक्षत्रांतून दुसऱ्या नक्षत्रामध्यें जाण्यास तेरा दिवस लागतात. प्रतिपदेपासून सूर्यमंडल रोज थोडें थोडें बाजूला होत असतें. रोज सूर्यमंडलाचा पंधरावा हिस्सा बाजूला होत असतो. पंधरावा हिस्सा म्हणजेच एक कला. सूर्याचा जेवढा भाग बाजूला होत असतो तेवढाच तो चंद्रबिंबामध्यें प्रतिबिंबित होत असतो. तींच आपण शुक्लपक्षामध्यें प्रतिपदेच्या दिवशीं अथवा द्वितीयेच्या दिवशीं चंद्राची कोर म्हणून पहातों. याप्रमाणें सूर्याची रोज एक एक कला चंद्रबिंबामध्यें प्रतिबिंबित होत असते व कलेकलेनें चंद्र वाढला असें आपण म्हणत असतों. पूर्णिमेच्या दिवशीं चंद्रमंडल आणि सूर्यमंडल यांच्यामध्यें पूर्ण व्यवधान

असल्यामुळें आपल्याला पूर्णचंद्र पहावयास सांपडतों. अशा रीतीनें आपल्या दृष्टीच्या आड येणाऱ्या सूर्यमंडलाच्या गतीचा हा खेळ आहे. तात्पर्य, चंद्रबिंब हें नेहमींच पूर्ण असतें, तथापि वर सांगितलेल्या कारणामुळें कलांची वृद्धि आणि ऱ्हास हे औपचारिक स्वरूपानें मानले जातात. चंद्राची सोळावी कला ही नेहमींच सर्व कलांमधून अनुस्यूत असतेच. लाक्षणिकदृष्ट्याहि तिला वृद्धि-ऱ्हासांचा संपर्क नाहीं म्हणून ती कला नित्य मानली जाते.

प्रतिपदा, द्वितीया इत्यादि तिथिक्रमानें १ दर्शा, २ दृष्टा, ३ दर्शता, ४ विश्वरूपा, ५ सुदर्शना, ६ आप्यायमाना, ७ आप्यायमाना, ८ आप्याया, ९ सृनृता, १० इरा, ११ आपूर्यमाणा, १२ आपूर्यमाणा, १३ पूरयन्ती, १४ पूर्णा, १५ पूर्णमासी अशीं सर्व तिथींचीं वेदामध्यें नांवें दिलेलीं आहेत. श्रीमहात्रिपुर-सुंदरीच्याहि पण सोळा कला आहेत. त्रिपुरसुंदरी, कामेश्वरी, भगमालिनी, नित्यक्लिन्ना, भेरूण्डा, वह्निवासिनी, महावज्रेश्वरी, शिवदूती, त्वरिता, कुलसुंदरी, नीलपताका, विजया, सर्वमंगला, ज्वाला, मालिनी अशीं त्यांचीं क्रमशः नावें आहेत. सोळावी कला नामरूपातीत आहे. म्हणूनच तिला "सच्चिदानन्दरूपिणी" असें म्हटलेलें आहे. तथापि उपासकांच्या कल्याणाकरितां तिचाहि एकाक्षरी बीजभूत मंत्र तन्त्रशास्त्रामध्यें निर्दिष्ट केलेला आहेच. तो मंत्र गुरुमुखानेंच जाणावा. शकार, रेफ, ईकार आणि बिन्दु यांचें क्रमशः समुचित स्वरूप म्हणजेच तो मंत्र होय. याच बीजाला श्रीविद्या असें म्हणतात. हें बीज आणि पंचदशाक्षरी श्रीविद्येंतील तीन खंड मिळून हा मंत्र चार खंडांचा मानला जातो.

"त्रिखण्डो मातृकामन्त्रः" या ठिकाणीं मातृका शब्दाचा अर्थ वर्णमाला अथवा मूळाक्षरें असाहि करतात. त्रिपुरसुंदरीमंत्र हा पंधरा आणि सोळा अक्षरांचा आहे. संपूर्ण मंत्र त्रिपुरसुंदरीचें स्वरूप असल्यामुळें हीं सोळा अक्षरें त्रिपुरसुंदरीच्या सोळा कलाच मानल्या जातात. प्रत्येक कला देवता-स्वरूप आहे. त्यांचीं नांवें वर दिलींच आहेत. या मंत्रांतील सोळा अक्षरांतच संपूर्ण वाक्प्रपंचाला कारणीभूत असलेलीं मूळाक्षरें समाविष्ट झालेलीं आहेत. या मंत्रांतील पहिलें अक्षर क आणि तिसऱ्या खंडातील शेवटचें अक्षर ल मिळून कला हा प्रत्याहार तयार होतो. प्रत्याहार म्हणजे अनेकांचा थोड्यांत संग्रह करणें. कला शब्दानें क-पासून ळ-पर्यंतची सर्व व्यंजनें संगृहीत होतात. व्यंजनें

हीं परतंत्र असतात. स्वरावांचून त्यांचा उच्चार होत नाहीं. तेव्हां व्यंजनांचे पूर्ण उच्चार होण्यासाठीं स्वरहि उपलब्ध व्हावेत म्हणून या मंत्रांतील दुसऱ्या अक्षराच्या मागें असलेला अ आणि तृतीय खंडातील शेवटचा ल मिळून "अल्" प्रत्याहार मानतात. व्याकरणशास्त्राच्या दृष्टीनें अल् प्रत्याहारांत अ-पासून ह-पर्यंतचे सर्व वर्ण येतात. शंकरांच्या डमरूंतून प्रकट झालेल्या "अइउण्" इत्यादि सूत्रांत पहिलें अक्षर अ आहे तर शेवटचें अक्षर ल् हें व्यंजन आहे. या अल् प्रत्याहारामध्यें अ-पासून ह-पर्यंत सर्व वर्ण समाविष्ट होतात ही एक प्रकारें वर्णमालाच तयार होते. या वर्णमालेचा मेरुमणि क्ष असल्यामुळें या वर्णमालेला अक्षमाला असें म्हणतात. असा हा त्रिखंडमंत्र संपूर्ण मातृका म्हणजे वर्णप्रपंचाचें अधिष्ठान आहे. या त्रिखंडांत नाद, बिंदु आणि कला यांचाहि समावेश करतात.

अ-पासून ह-पर्यंतच्या सर्व वर्णांना पृथक् पृथक् अधिष्ठात्री देवता आहेत व हे वर्ण नामरूपानें नटलेल्या विश्वप्रपंचाला कारणीभूत असलेलीं जीं तत्त्वें आहेत त्या तत्त्वांचें बीजभूत वर्ण म्हणून मानले जातात. या दृष्टीनें ह्या सर्व वर्णांचा षोडशकलात्मक श्रीमहात्रिपुरसुंदरीच्या स्वरूपांतच अन्तर्भाव होतो. " षोडशेन्दोः कला भानोर्द्वादश दशानले । ताः पंचाशत्कला ज्ञेया मातृकाचक्ररूपिणी ॥ " कला म्हणजे वर्ण किंवा अक्षर. श्रीविद्येंतील पंधरा अक्षरें ज्याप्रमाणें सोम, सूर्य आणि अग्नि या तीन तत्त्वांत विभागलीं आहेत त्याचप्रमाणें संपूर्ण मुळाक्षरें देखील या तीन तत्त्वांत विभागलीं गेलीं आहेत. सोळा अक्षरें चंद्राचीं आहेत तर चोवीस अक्षरें सूर्याचीं आहेत. अग्नितत्त्वाचीं दहा अक्षरें आहेत. हीं सर्व श्रीचक्रांत दाखविलेलीं आहेत. याप्रमाणें आपली श्रीत्रिपुरसुंदरी देवता ही "मातृकाचक्ररूपिणी" म्हणजे वर्णसमूहस्वरूप आहे. अशा रीतीनें मंत्र, मातृका, श्रीचक्र, देहांतील चक्रें, पिंड आणि ब्रह्मांड यांच्यांतील शब्द-प्रपंचाच्या व अर्थप्रपंचाच्या दृष्टीनें असलेली एकरूपता लक्षांत घ्यावी. त्याच-प्रमाणें सर्वांच तत्त्वस्वरूप असलेल्या श्रीमहात्रिपुरसुंदरीचेंहि पण स्वरूप लक्षांत घ्यावें आणि गुरुमुखानें प्राप्त झालेल्या श्रीमंत्राच्या मननानें साधकानें सर्व दुःखांतून मुक्त व्हावें आणि आपलें जीवन धन्य करावें. अर्थमननाचें सामर्थ्य नसलें तरी साधकानें केवळ मंत्रजपानेंहि सिद्ध व्हावें, धन्य व्हावें, कृतार्थ व्हावें असें सामर्थ्य या अक्षरांतहि आहे. श्रीविद्येच्याच कृपेनें श्रीविद्येच्या तत्त्वाचा

साक्षात्कार व्हावयाचा असतो व ही कृपा अनन्यशरणागतीवरच अवलंबून असते. "यस्य वा पश्चिमं जन्म यदि वा शंकरः स्वयम्। तेनैव लभ्यते विद्या श्रीमत्पञ्चदशाक्षरी" ज्याची जन्ममरणपरंपरा शेवटाला येऊन पोहोंचली असेल अथवा जो स्वयं शंकर असेल त्यालाच ही पंचदशाक्षरी श्रीविद्या प्राप्त होऊं शकते. असा या मंत्राचा महिमा आगमतंत्रांत गाइलेला आहे. आम्ही स्थालीपुलाकन्यायानें वाचकांना या विषयाचें दिग्दर्शन मात्र केलेलें आहे.



यंत्र क्रमांक २५

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर काढून पंचेचाळीस दिवस पूजा करावी. रोज या श्लोकाचा एक हजार जप करावा. नैवेद्य दहींभात आणि उडदाचे वडे. हें सिद्धयंत्र धारण केल्यास सर्व विद्या सिद्ध होतात. रसायनेंहि सिद्ध होतात.

स्मरं योनिं लक्ष्मीं त्रितयमिदमादौ तव मनोः
निधायैके नित्ये निरवधि-महाभोग-रसिकाः।
भजन्ति त्वां चिन्तामणि-गुण-निबद्धाक्ष-वलयाः
शिवाग्नौ जुह्वन्तः सुरभि-घृत-धाराहुति-शतैः॥ ३३॥

"हे नित्ये निरवधिमहाभोगरसिकाः एके तव मनोः आदौ स्मरं योनिं लक्ष्मीं इदं त्रितयं निधाय चिन्तामणिगुणनिबद्धाक्षवलयाः शिवाग्नौ सुरभिघृतधाराहुतिशतैः जुह्वन्तः त्वां भजन्ति" असा या श्लोकाचा अन्वय आहे. आई जगज्जननी! तूं अनादि आणि अनंत असल्यामुळें तुला नित्या असें म्हणतात. तुझे कांहीं भक्त निरवधि म्हणजे निःसीम, अनंत आणि अपरिच्छिन्न असा "महाभोग" म्हणजे निरतिशय आनंद, ज्याच्या शतांशानें ब्रह्मदेवाच्याहि आनंदाची तुलना करतां येणार नाहीं असा महान् आनंद, त्या आनंदाचा रसास्वाद घेण्यांत रसिक म्हणजे तत्पर असलेले तुझे ज्ञानी भक्त तुझ्या पंचदशाक्षरी मंत्राच्या आरंभीं "स्मर" म्हणजे काम अर्थात् कामबीज ऐं अथवा क्लीं हें अक्षर तसेंच "योनि" म्हणजे भुवनेश्वरी बीज अर्थात् ह्रीं हें अक्षर आणि लक्ष्मी म्हणजे

श्रीं हें बीज अशा तीन बीजांचें पल्लव जोडतात. अर्थात् हीं तीन बीजाक्षरें त्या मंत्राच्या आरंभीं योजून तुझा जप करीत असतात. हा जप करतांना त्यांनीं चिंतामणिरत्नाच्या मण्यांची तयार केलेली माळ आपल्या हातांत धारण केलेली असते. आपल्या हृत्कमलरूपी वेदीवर स्थापन केलेल्या शिवशक्तिस्वरूप अग्नीमध्यें मंत्ररूपी कामधेनूच्या तुपाच्या धारा-शेंकडों हजारों धारा आहुति म्हणून अर्पण करीत करीत ते "त्वां भजन्ति" म्हणजे तुझी उपासना करीत असतात. असा या श्लोकाचा अन्वयानुसारी अर्थ आहे.

नागील श्लोकांत श्रीविद्येमध्यें घटक असलेल्या पंधरा अक्षरांचा निर्देश केला. या पंधरा अक्षरांत ककार हें पहिलें अक्षर असल्यामुळें या मंत्राला कादि-विद्या म्हणतात हेंहि सांगितलें. त्याचप्रमाणें हीं अक्षरें सर्व अक्षरप्रपंचाचें व सर्व तत्त्वांचें मूळ असल्याचा निर्देश केला. अक्षरप्रपंचांतून आणि तत्वप्रपंचांतून सर्व नामरूपात्मक विश्वप्रपंच निर्माण होत असल्यामुळें हीं अक्षरें सर्व विश्वाचीं मूलभूत अक्षरें होत, हेंहि आपण पाहिलें. हीं पंधरा अक्षरें षोडशकलात्मक श्रीमहात्रिपुर-सुंदरीचेंच रूप असल्याचेंहि आपण पाहिलें. श्रीमंत्र, श्रीयंत्र, मातृकाप्रपंच, तत्त्व-प्रपंच, शब्दप्रपंच, विश्वप्रपंच, पिंड आणि ब्रह्मांड या सर्वांचा परस्परसंबंध, साम्य आणि ऐक्य या सर्व गोष्टींचा विचार केला. असा हा विश्वव्यापी मूलमंत्राचा महिमा लक्षांत घेतल्यानंतर त्या मंत्राच्या जपाचें फल निर्दिष्ट करणें हें क्रमप्राप्तच आहे. प्रस्तुत श्लोकाच्या मिषानें मूल विद्येचाच फलनिर्देश केला जात आहे.

यावर कोणी असें विचारील कीं, या श्लोकात पल्लवित मंत्रांचा निर्देश आहे. मूलमंत्राचा फलनिर्देश यात नाहीं. पण ही शंका बरोबर नाहीं. पल्लवित मंत्राच्या फलनिर्देशांतच मूलमंत्राचाहि फलनिर्देश सामावलेला आहे. मूळमंत्रा-मध्यें घटक असलेल्या केवळ हीं या बीजमंत्राच्या किंवा त्या बीजमंत्रांतहि घटक असलेल्या केवळ "ई" या बीजमंत्राच्या जपानेंहि सर्व ऐश्वर्यांचीं सुखें ज्याच्यावरून ओवाळून टाकावीत अशा नित्यनिरतिशय आनंदाचा लाभ होतो असें सांगितलें आहे. तेथें मूलपंचदशाक्षरी मंत्राचें फळ काय निराळें सांगावयास पाहिजे? तें तर कैमुतिकन्यायानेंच सिद्ध होत आहे. यावर प्रश्न असा येईल कीं, जर निरवधिक सौख्याचा लाभ मूलपंचदशाक्षरी कादिविद्येनेंच प्राप्त होत असेल तर मग या श्लोकांत कांहीं लोक तीन बीजांचें पल्लव जोडून

या मंत्राचा जप करतात असें वर्णन का केलें ? यावर "रुचिवैचित्र्य" हेंच उत्तर आहे. "भिन्नरुचिर्हि लोकः" हा लोकस्वभाव प्रसिद्धच आहे. ब्रह्मा, विष्णु, महेश, इंद्र, चंद्र, कुबेर, सूर्य, यमदेव, कामदेव, कार्तिकस्वामी, दुर्वास, मनु अगस्ति आणि अगस्तिऋषींची पत्नी श्रीलोपामुद्रा त्याचप्रमाणें नंदिराज या सर्वांनीं श्रीविद्येच्या मूलमंत्रानेंच आपले मनोरथ सिद्ध करून घेतलेले आहेत. हे सर्व श्रीविद्येचे द्रष्टे मानले जातात. आचार्यपुरस्कृत कादिविद्येचें द्रष्टृत्व श्रीदक्षिणामूर्तिदेवाकडे आहे. या सर्व देवांच्या व ऋषिमुनींच्या वैभवावरून त्यांनीं पुरस्कारिलेल्या मंत्राचें व अनुष्ठिलेल्या जपाचें माहात्म्य लक्षांत घ्यावें. याप्रमाणें प्रस्तुत मूल मंत्रांत संपूर्ण फल देण्याचें सामर्थ्य असतांना पल्लव, संपुट इत्यादि कल्पना केवळ रुचिवैचित्र्यमूलक आहेत असेंच म्हणावें लागतें.

कांहीं लोक मागील श्लोकांत लोपामुद्रापुरस्कृत हादिविद्या सांगितली आहे व या श्लोकांत कामदेवपुरस्कृत कादिविद्या सांगितली आहे असें वर्णन करतात. हादिमंत्र आणि कादिमंत्र हे दोन्ही मंत्र पंचदशाक्षरीच आहेत. हादिमंत्र हा मोक्षफलदायी आहे तर कादिमंत्र हा भोगफलदायी आहे असा फलभेदहि ते कल्पितात. आमच्या मतें श्रीललितामहात्रिपुरसुंदरीचा कोणताहि मंत्र उपासकाला अभीष्ट फल देण्याला समर्थ आहे. भोग किंवा मोक्ष हा फलभेद उपासकाच्या इच्छेवर अवलंबून आहे. याच अभिप्रायानें सप्तशतीमध्यें "आराधिता सैव नृणां भोगस्वर्गापवर्गदा" असें म्हटलेलें आहे. आराधना करणाऱ्याच्या इच्छेप्रमाणें भोग म्हणजे ऐहिक सुखें, स्वर्ग म्हणजे पारलौकिक सुखें आणि मोक्ष म्हणजे दुःखाचा जेथें लेशहि स्पर्श करूं शकत नाहीं असें नित्य आणि निरतिशय सुख, हें सर्व कांहीं ती जगन्माता देवी भवानी आपल्या भक्ताला देते असें वर्णन केलेलें आहे. राजा सुरथ आणि समाधि नांवाचा वैश्य दोघांनींहि देवीमाहात्म्य ऐकिलें, एकच अनुष्ठान केलें पण दोघांनाहि फलें मात्र निरनिराळीं मिळालीं. प्रसन्न झालेल्या देवीनें वर मागा असें म्हटल्याबरोबर समाधिवैश्यानें अध्यात्मज्ञान वरलें व तो मुक्त झाला. सुरथ राजानें मात्र चित्तांत वैराग्य नसल्यामुळें राज्यच मागितलें. मरेपर्यंत राज्य भोगलें आणि मेल्यानंतरहि तो पुन्हां सावर्णि नांवाचा मनु राजाच झाला ! तात्पर्य, मंत्र आणि देवता समर्थ असली तरी फलभेद हा उपासकाच्या अधीनच असतो. याच न्यायानें महात्रिपुरसुंदरीस्वरूप असलेली कादिविद्या ही

फक्त भोगैश्वर्यच देते आणि हादिविद्या ही मोक्ष देते असा फलभेद मानणें हें शास्त्रसंगत आणि युक्तिसंगत होऊं शकत नाहीं, ही गोष्ट लक्षांत घ्यावी.

मागील श्लोकांत हादिविद्या सांगितली आहे असें म्हणणाऱ्यांच्या मतानें मागील श्लोकांतील शिव शब्दाचा अर्थ ह, शक्ति शब्दाचा अर्थ स आणि काम शब्दाचा अर्थ क असा आहे. बाकीची सर्व अक्षरें मागील श्लोकांत सांगितल्याप्रमाणेंच समजावींत. याप्रमाणें पंधरा अक्षरांचा हादि मंत्र तयार होतो. चालू श्लोकांत स्मर शब्दानें क, योनि शब्दानें ए आणि लक्ष्मी शब्दाने ई अशीं हीं तीन अक्षरें घ्यावींत व हादिविद्येंतील पहिलीं तीन अक्षरें काढून त्यांच्या जागीं तीं योजावींत म्हणजे या श्लोकानें कादिविद्येचाच निर्देश केला असें म्हणतां येतें.

"निरवधि-महा-भोग-रसिकाः" आचार्यांनीं साधकांना हें जें विशेषण दिलेलें आहे तें मोठें मार्मिक आहे. "भुज्यते इति भोगः" या व्युत्पत्तीप्रमाणें भोग शब्दाचा अर्थ सुख आणि दुःख असा होतो. दुःख हा कधींच इच्छेचा व मिळविण्याचा विषय होऊं शकत नाहीं. तें अनपेक्षित रीतीनें पुढें येतें व भोगावें लागतें. घटपटादि इष्ट पदार्थ हे जरी इच्छेचा आणि मिळविण्याचा विषय होत असले तरी अंततः सुख हाच इच्छेचा व मिळविण्याच्या प्रयत्नाचा विषय मानावा लागतो. या दृष्टीनें प्रकृतस्थलीं भोग शब्दाचा अर्थ सुख असाच करावा लागतो. भोगाला निरवधि आणि महा हीं दोन विशेषणें दिलेलीं असल्यामुळें या ठिकाणीं निरवधि-महाभोग शब्दानें नित्यनिरतिशय निजानंदरूपी सुखच घ्यावें लागतें. सामान्य मानवाच्या आनंदापासून तों ब्रह्मदेवाच्या आनंदापर्यंत विषयजन्य सर्व सुखें हीं निरवधि आणि महा या विशेषणांना पात्र होत नाहींत. कारण तीं सर्व सुखें विषयजन्य असल्यामुळें नाशिवंत असतात व नित्य आणि निरतिशय सुख त्यांच्यापेक्षां निराळेंच असतें. त्याच सुखाला अपवर्ग म्हणतात. "अपवृज्यन्ते सांसारिकदुःखानि यत्र स अपवर्गः" जेथें सर्व सांसारिक दुःखें निराळीं होतात, सुटतात, मावळतात तीं अवस्था म्हणजेच अपवर्ग होय. तात्पर्य, निरवधि-महाभोग शब्दाचा अर्थ अपवर्ग म्हणजे मोक्ष असाच होतो. या अपवर्गसुखाचे रसिक म्हणजे उत्कंठेनें आस्वाद घेणारे भक्त असा हा निरवधि-महाभोग – रसिक या शब्दाचा अर्थ झाला. हे भक्त परम विरक्त असल्यामुळें

कोणत्याहि विषयवैभवाची अपेक्षा न करतां कादिविद्येनें श्रीललिता महात्रिपुर-सुंदरीची उपासना करीत असतात.

" चिन्तामणि-गुण-निबद्धाक्ष-वलयाः " चिंतामणि रत्नाप्रमाणें इष्ट फल देणाऱ्या, त्याचप्रमाणें गुणनिबद्ध म्हणजे रेशमाच्या दोऱ्यांत गोवलेल्या अथवा सोनें, चांदी, तांबें इत्यादि निर्मल धातूंच्या तारेंत गांठलेल्या, अक्ष म्हणजे मण्यांची, वलय म्हणजे माला त्यांनीं आपल्या हातांत धारण केलेली असते. अक्षमाला या शब्दाचा एक निराळा अर्थ अभिप्रेत आहे. अक्ष म्हणजे अ-पासून क्ष-पर्यंतचे सर्व वर्ण. यांत क्ष हा माळेंतल्या मेरूच्या मण्याप्रमाणें सर्वांच्या वर ठेवून अ-पासून ळ-पर्यंत पन्नास वर्ण उलट्या आणि सुलट्या क्रमानें योजले म्हणजे शंभर संख्येची अक्षमालाच तयार होते. स्फटिक, विद्रुम (पोवळें), मौक्तिक, रुद्राक्ष, पद्माक्ष अथवा पुत्रवंती यांच्या मण्यांची माळ केल्यानंतर त्या माळेंतील मण्यांवर अक्षमालेंतील वर्णांची स्थापना करावयाची असते. याला मालासंस्कार असें म्हणतात. अशी ही संस्कारसंपन्न माला जपाचें फल त्वरित प्राप्त करून देणारी असते. अशा तऱ्हेची अक्षमाला ज्यांनीं आपल्या हातांत धारण केलेली आहे असे भक्त असा याचा अर्थ झाला.

आई त्रिपुरसुंदरी ! तुझे हे भक्त आपल्या संवित्कमलामध्यें अन्तर्हृदया-वकाशामध्यें मंगलमय वेदिका अथवा स्थंडिल निर्माण करून तेथें तुझें आवाहन करतात. मूर्धस्थानीं असलेल्या सहस्रदलकमलांतील पूर्णचंद्रबिंबामध्यें तूं विराजमान झालेली असतेस. तेथून तुला ते आपल्या हृत्कमलामध्यें आणतात. तेथें तुझी स्थापना करतात. त्यांची इष्ट व उपास्य देवता तूं, तुलाच ते अग्नि कल्पून सन्निरोधन अवकुंठन त्याचप्रमाणें जातकर्मादि संस्कारहि ते तुझ्या ठिकाणीं करीत असतात. यापमाणें संस्कारसंपन्न उपास्यदेवतारूपी अग्नीमध्यें कामधेनूच्या दुधापासून तयार केलेल्या मंत्ररूपी पवित्र घृताच्या शेंकडो आहुति ते अर्पण करीत असतात. या त्यांच्या मानसउपासनेमध्यें " ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् " असा सर्व यागाचा थाट असतो. याला तंत्रशास्त्रांत "अन्तर्याग" असेंच नांव दिलेलें आहे. यापमाणें उपास्यदेवतेशीं सर्वस्वीं समरस झालेले ते शेवटीं उपास्यदेवतारूपच होतात. श्रीललितामहात्रिपुरसुंदरीस्वरूपच ते होतात. ही अवस्था निरवधिमहाभोगस्वरूप असल्यामुळें त्यांतच ते तन्मय होऊन रहातात. आई ! तुझ्या जपाचा हा केवढा महिमा आहे !

पहिल्या श्लोकांतील यंत्राप्रमाणेंच या श्लोकाचें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर काढावें. त्यांत क्लीं या बीजाऐवजीं श्रीं हें बीज लिहावें. पंचेचाळीस दिवस पूजा करावी. मुगाची खिचडी मुगदळ आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. सिद्धयंत्र धारण करावें. विपुल धनाचा लाभ हें याचें फळ सांगितलेलें आहे.

शरीरं त्वं शम्भोः शशि-मिहिर-वक्षोरुह-युगं
तवात्मानं मन्ये भगवति नवात्मानमनघम् ।
अतः शेषः शेषीत्ययमुभय-साधारणतया
स्थितः सम्बन्धो वां समरस-परानन्द-परयोः ॥ ३४ ॥

"हे भगवति त्वं सम्भोः शशिमिहिरवक्षोरुहयुगं शरीरं असि, अहं तव आत्मानं अनघं नवात्मानं मन्ये; अतः समरसपरानन्दपरयोः वां शेषः शेषी इति अयं सम्बन्धः उभयसाधारणतया स्थितः अस्ति." भगवती हें त्रिपुरसुंदरीचें विशेषण आहे. समग्र ऐश्वर्य, समग्र धर्म, समग्र यश, समग्र श्री, पूर्ण ज्ञान आणि पूर्ण वैराग्य या सहांच्या समुच्चयाला भग असें म्हणतात. या सहांचा समुच्चय जेथें पूर्णत्वानें विराजतो त्या व्यक्तीला भगवान् किंवा भगवती असें म्हणतात. अथवा सर्व विश्वाची उत्पत्ति, प्रलय, प्राणिमात्रांची उत्पत्तिं कोठून व कशी होते, सर्व प्राण्यांचा शेवट कसा व कोठें होतो, विद्या म्हणजे काय आणि अविद्या म्हणजे काय, हें सर्व साकल्यानें जो जाणतो त्याला भगवान् असें म्हणतात. त्या देवतेला भगवती असें म्हणतात. "ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः । ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भग इतीङ्गना ॥" "उत्पत्तिं प्रलयं चैव भूतानामागतिं गतिम् । वेत्ति विद्यामविद्यां च स वाच्यो भगवानिति ॥" अशा या भग आणि भगवान् या शब्दांच्या दोन व्याख्या प्रसिद्धच आहेत. श्रीमहात्रिपुरसुंदरीच्या ठिकाणीं या दोन्ही व्याख्या पूर्णपणें सार्थ होत असल्यामुळें तिला भगवती हें विशेषण दिलेलें आहे तें सर्वस्वी योग्य आहे. हे सर्वैश्वर्यादिगुणसंपन्न माते जगज्जननी ! तूं भगवान् शंकर यांचेंच शरीर म्हणजे मूर्तस्वरूप आहेस. या शिवशक्तीच्या मूर्तस्वरूपांत सूर्य आणि चंद्र हे स्तनाप्रमाणें शोभत आहेत. शशी म्हणजे चंद्र आणि मिहिर म्हणजे सूर्य. आई ! शिवस्वरूपाशीं समरस झालेला तुझा देह

"अनघ" म्हणजे अत्यंत शुद्ध, निर्दोष असून तो जेव्हां पहावें तेव्हां "नवात्मा" म्हणजे नव्या स्वरूपाचाच दिसत असतो. तारुण्याच्या तेजानें तो मुसमुसत असतो. आई जगज्जननी ! तुझ्याशीं समरस झालेले परानंद म्हणजे भगवान् शंकर आणि त्यांच्याशीं समरस झालेली "परा" म्हणजे परात्पर शक्तिस्वरूप तूं; या तुम्हां दोघांमध्यें परस्परांशीं परस्परांचें एवढें तादात्म्य आहे कीं, त्यामुळें तुमचा तो तादात्म्यसंबंध तुम्हां दोघांकडेहि सारखाच दिसतो. तुमच्या तादात्म्यांत अणुमात्रहि भेद दिसत नसल्यामुळें तुम्हां दोघांमध्यें कोण मुख्य आणि कोण गौण, कोण प्रधान आणि कोण अंग हें कळतच नाहीं. एकदां भगवान् शंकर प्रधान आहेत तर तूं अंगभूत म्हणजे गौण आहेस. एकदां तूं मुख्य आहेस तर भगवान् सदाशिव हे अंगभूत आहेत. असें हें तुझें स्वरूप मोठें अनिर्वचनीय आहे.

या श्लोकांमध्यें "नवात्मानं" या शब्दांत श्लेष आहे. एकाच शब्दांत अनेक अर्थ विवक्षित असणें याला श्लेष असें म्हणतात. काव्यशास्त्रांत हा एक अलंकार मानला जातो. नवात्मा याचा एक अर्थ आपण वर पाहिलाच आहे. आतां दुसरा अर्थ आपण पाहूं. नवात्मा या शब्दांतील नव शब्द नऊ या संख्येचा वाचक आहे. आत्मा म्हणजे स्वरूप. ज्याचें स्वरूप नऊ संख्येनें विभागलें गेलेलें आहे तो नवात्मा. नवात्मा म्हणजे भगवान् सदाशिव. ज्यांचा निर्देश पहिल्या चरणांत शंभु या शब्दानें केलेला आहे. त्यांनाच महाभैरव अथवा आनंदभैरव असें म्हणतात. या आनंदभैरवालाच नवात्मा असेंहि तंत्रशास्त्रांत म्हटलेलें आहे. कारण तंत्रशास्त्रांत आनंदभैरवाचीं नऊ रूपें मानलेलीं आहेत. " कालव्यूहः कुलव्यूहो नामव्यूहस्तथैव च। ज्ञानव्यूहस्तथा चित्तव्यूहः स्यात्तदनन्तरम्। नादव्यूहस्तथा बिन्दुव्यूहः स्यात्तदनन्तरम्। कलाव्यूहस्तथा जीवव्यूहः स्यादिति ते नव ॥ " व्यूह शब्दाचा अर्थ शरीर किंवा मूर्ति असा आहे. कालव्यूह, कुलव्यूह, नामव्यूह, ज्ञानव्यूह, चित्तव्यूह, नादव्यूह, बिंदुव्यूह, कलाव्यूह आणि जीवव्यूह, अशीं महाभैरवाचीं नऊ रूपें आहेत.

कालव्यूह म्हणजे चंद्र, सूर्य आणि त्यांच्या निमित्तानें होणारे कालखंड. क्षण, लव, घटका, मुहूर्त, दिन, पक्ष, मास, ऋतु, अयन आणि संवत्सर यांपासून कल्पान्तकालापर्यंतचा सर्व काल महाभैरवाचेंच स्वरूप होय. नामव्यूह

म्हणजे संज्ञास्कन्ध. व्यूहालाच स्कंध असा पर्याय आहे. संज्ञास्कंध म्हणजे पदार्थांची सामान्यनामें आणि विशेषनामें. हेंहि एक भैरवाचेंच रूप आहे. ज्ञान-व्यूह म्हणजे विज्ञानस्कंध. सविकल्पक ज्ञान, निर्विकल्पक ज्ञान इत्यादि सर्व ज्ञानांचे प्रकार यांत अंतर्भूत होतात. हेंहि आनंदभैरवाचेंच रूप होय. चित्तव्यूहामध्यें मन, बुद्धि, चित्त, अहंकार आणि महत्तत्व यांचा अंतर्भाव होतो. नादव्यूहा-मध्यें परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरीरूप, संपूर्ण अक्षरराशी अंतर्भूत होतो. बिंदुव्यूह म्हणजे षट्चक्रांचा समुदाय. कलाव्यूह म्हणजे मूळ मातृकासमूह अर्थात् अ पासून क्ष-पर्यंतचे सर्व वर्ण. जीवव्यूह म्हणजे सुखदुःखांचे भोक्ते जीवात्मे. हे नऊहि व्यूह आनंदभैरवाचेंच देह मानले जातात. नामरूपात्मक, विश्वप्रपंच या नऊ व्यूहांचाच असल्यामुळें संपूर्ण विश्व हें आनंदभैरव भगवान् सदाशिव यांचाच देह होय ही गोष्ट सिद्ध झाली. याच अभिप्रायानें शंकरांना "नवात्मा" असें म्हटलेलें आहे. जसे भगवान् शंकर नवात्मा आहेत त्याचप्रमाणें भगवती त्रिपुरसुंदरी ही देखील नवात्माच आहे. पस्तिसाव्या श्लोकांत हा सिद्धान्त स्पष्टच मांडला आहे. श्रीचक्र हें नव-खंडात्मक आहे हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे. त्रिपुरसुंदरी ही श्रीचक्रस्वरूप आहे म्हणून तीहि नवात्मा झालीच. संपूर्ण वर्णसमूह हें त्रिपुरसुंदरीचेंच रूप आहे. तोहि नऊ खंडांनीं विभागला जातो. अवर्ग, कवर्ग, चवर्ग, टवर्ग, तवर्ग, पवर्ग, यवर्ग, शवर्ग आणि या सर्वांच्या मूर्धस्थानीं मेरूप्रमाणें असलेला क्ष असे हे वर्णराशीचे नऊ विभाग आहेत. याहि अभिप्रायानें त्रिपुरसुंदरीला नवात्मा असें म्हटलें जातें इत्यादि पुष्कळ सूक्ष्म विचार नवात्मा या शब्दांत अंतर्भूत आहे.

तात्पर्य, भगवान् शंकर हे जसे नवात्मा आहेत तसेंच त्रिपुरसुंदरीहि पण नवात्मा आहे. याच अभिप्रायानें शंकर शंकरी, भैरव भैरवी, महाभैरव महा-भैरवी, आनंदभैरव आनंदभैरवी इत्यादि नामसादृश्यहि या दोघांमध्यें असल्याचें दृष्टीस पडतें. अशा रीतीनें नामदृष्ट्या आणि, रूपदृष्ट्या एकमेकांशीं पूर्णपणें समरस असल्यामुळें परानंद म्हणजे भगवान् शंकर आणि परा म्हणजे श्रीत्रिपुर-सुंदरी यांच्यांतील गौण मुख्य भाव हा संबंध दोघांकडेहि सारखाच आहे. आई ! तुम्हां दोघांपैकीं कोणाला मुख्य म्हणूं ? आणि कोणाला गौण म्हणूं ? तुम्हां दोघांनाहि मी भक्तिपूर्वक प्रणाम करतों. या श्लोकाची यंत्रपूजापद्धति श्लोक सत्तावीसमध्यें दिली आहे.

मनस्त्वं व्योम त्वं मरुदसि मरुत्सारथिरसि
त्वमापस्त्वं भूमिस्त्वयि परिणतायां न हि परम् ।
त्वमेव स्वात्मानं परिणमयितुं विश्ववपुषा
चिदानन्दाकारं शिवयुवति भावेन बिभृषे ॥ ३५ ॥

हे आई जगज्जननी ! भ्रूमध्यप्रदेशीं असलेल्या आज्ञाचक्रांतील मनस्तत्त्व म्हणजे मन तूंच आहेस. कंठस्थानीं असलेल्या विशुद्धिचक्रांतील आकाशतत्त्वहि तूंच आहेस. हृदयाच्या जवळ असलेल्या अनाहत नांवाच्या संविच्चक्रांतील "मरुत" म्हणजे वायुतत्त्वहि तूंच आहेस आणि उपस्थाच्या सान्निध्यांत असलेल्या स्वाधिष्ठानचक्रातील "मरुत्सारथि" म्हणजे अग्नितत्त्वहि पण तूंच आहेस. वायु हा अग्नीचा मित्र असल्यामुळें त्याला मरुत्सारथि असें म्हटलेलें आहे. मरुत म्हणजे वायु आणि सारथि म्हणजे साहाय्य करणारा. वायूचें साहाय्य असल्याशिवाय अग्नि प्रदीप्त होत नाहीं, हें तर प्रसिद्धच आहे. आई ! नाभिस्थानीं असलेल्या मणिपूरचक्रांतील आप म्हणजे जलतत्त्वहि तूंच आहेस आणि मूलाधारचक्रांत असलेलें पृथ्वीतत्त्वहि पण तूंच आहेस. मूलाधारचक्र हें गुदस्थानीं असल्याचें पूर्वी सांगितलेलेंच आहे. तात्पर्य, पृथ्वी, जल, तेज, वायु आणि आकाश हीं पंचमहाभूतें तूंच आहेस, " एवं त्वयि परिणतायां " याप्रमाणें पंचमहाभूतांच्या रूपानें तूं परिणाम पावली असतां " न हि परं " तुझ्यापेक्षां या जगांत निराळें असें कांहींच नाहीं.

"हे शिवयुवति ! त्वं एव स्वात्मानं विश्ववपुषा परिणमयितुं भावेन चिदानन्दाकारं बिभृषे " हे पार्वती ! तूंच स्वतःच्या रूपाला विश्वरूपानें परिणत करण्याकरितां अगदीं मनांतून मोठ्या हौसेनें चिदानन्दाकाराला "बिभृषे" म्हणजे धारण करतेस. चित् म्हणजे शक्तितत्त्व आणि आनंद म्हणजे शिवतत्त्व-या दोन्ही तत्त्वांच्या रूपानें तूंच नटतेस. अर्थात् शक्तीहि तूंच आहेस आणि शिवहि पण तूंच आहेस. सर्व कांहीं तूंच आहेस. कार्यहि तूंच आहेस आणि कारणहि तूंच आहेस. त्याचप्रमाणें सर्व कार्यांचें व कारणांचें अधिष्ठानहि तूंच आहेस. प्रकृतिरूपानें तूंच परिणत होतेस आणि अधिष्ठानरूपानें तूं निर्विकार रहातेस. आई ! तुला मी नमस्कार करतों.



यंत्र क्रमांक २६

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर लिहून पंचेचाळीस दिवस पूजा करावी. दूध पायस आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. या श्लोकाचा रोज एक हजार जप करून हें यंत्र धारण करावें. रोज एक हिरडा अभिमंत्रून सेवन करावा. यानें क्षयरोग जातो.

तवाज्ञाचक्रस्थं तपन-शशि-कोटि-द्युति-धरं
परं शम्भुं वन्दे परिमिलित-पार्श्वं परचिता ।
यमाराध्यन्भक्त्या रवि-शशि-शुचीनामविषये
निरालोकेऽलोके निवसति हि भालोकभुवने ॥ ३६ ॥

छत्तीस श्लोकांपासून एक्केचाळीस श्लोकांपर्यंत आपल्या शरीरांतील मूलाधारादि षट्चक्रांमध्यें शिवशक्तिस्वरूप श्रीत्रिपुरसुंदरीचें निरनिराळ्या रूपानें वास्तव्य असल्याचें वर्णन केलेलें आहे. हीं सहा चक्रें म्हणजे शरीरांतर्गत एक श्रीचक्रच होय अशा भावनेनेंहि त्यांची उपासना केली जाते. या श्लोकांचें कांहीं विद्वानांनीं पुष्कळ विस्तृत विवेचन केलेलें आहे. आम्ही मात्र ग्रंथविस्तारभयास्तव संक्षेपानें आवश्यक तोच अर्थ देत आहों. यांत एक विशेष लक्षांत घेण्यासारखा आहे तो असा : भूमध्यप्रदेशांतील द्विदल आज्ञाचक्र हें मनस्तत्त्वाचें आहे. येथील मनस्तत्त्व हें आत्मतत्त्वस्वरूप मानलेलें आहे. " तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः सम्भूतः आकाशाद्वायुः " या श्रुतिवचनाप्रमाणें क्रमशः उत्पन्न झालेलीं पंचमहाभूततत्त्वें हीं खालच्या चक्रांत सांगितलेलीं आहेत. त्यांत उपनिषदांतील उत्पत्तिक्रम आणि लयक्रम सोडून मणिपूरचक्रांत जलतत्त्वाचा व स्वाधिष्ठानचक्रांत अग्नितत्त्वाचा निर्देश केला आहे तो केवळ योगप्रक्रियेला आणि तांत्रिक प्रक्रियेला अनुलक्षून केलेला आहे. याच दृष्टीनें नवव्या श्लोकांतहि चक्रांचा क्रम बदललेला दिसेल. ही विसंगति टाळण्याकरितां कांहीं विद्वान् मणिपूरचक्राचें ठिकाण उपस्थाच्या मुळाशीं मानतात व स्वाधिष्ठानचक्राचें ठिकाण नाभिस्थानाजवळ

मानतात. पण हा स्थानविपर्यय बहुसंख्य योग्यांना व तांत्रिकांनाहि मान्य असल्याचें दिसत नाहीं. आतां आपण क्रमानें या साही श्लोकांचा अर्थ पाहूं.

हे आई जगज्जननी ! माझ्या शरीरांत जीं मूलाधारादि सहा चक्रें आहेत त्यांची अधिष्ठात्री तत्त्वतः तूंच आहेस म्हणून तीं सर्व चक्रें तुझींच आहेत (श्लोक ९ पहा). त्यांतील माझ्या भ्रूमध्यस्थानीं असलेलें तुझें जें द्विदल आज्ञाचक्र आहे त्यामध्यें भगवान् शंभुनाथ हे तुझ्यासह विराजमान झालेले आहेत. त्यांना परशंभुनाथ अथवा महाशंभुनाथ असेंहि म्हणतात. आणि तुला त्या ठिकाणीं चित्परांबा अथवा परचिदंबा असेंहि म्हणतात. तेथें ते शंभुनाथ इतके तेजस्वी आहेत कीं, त्यांना पाहून तपन म्हणजे सूर्य आणि शशी म्हणजे चंद्र हे कोट्यवधि संख्येनें एकत्र झाले असतां जो प्रकाश आणि जो आह्लाद प्रतीतीस येईल तो प्रकाश आणि तो आह्लाद त्यांच्याकडे पाहून प्रतीतीस येतो. असें तेज त्यांनीं धारण केलेलें आहे. परात्पर चित् शक्तिस्वरूप असलेल्या तुझ्या स्वरूपाशीं त्यांच्या देहाचा वामभाग संमिलित झालेला आहे. भक्तियुक्त अंतःकरणानें त्यांची आराधना केली असतां तो भक्त अशा उत्तम लोकाला प्राप्त होतो कीं, त्या ठिकाणीं चंद्र, सूर्य आणि अग्नि याच्याहि प्रकाशाला प्रवेश नाहीं. तेथें शुद्ध चित्तत्त्वाशिवाय दुसरा कोणताच प्रकाश नाहीं. त्याच्याच प्रकाशामुळें सर्व कांहीं प्रकाशत आहे. "न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं, नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः। तमेव भान्तमनुभाति सर्वं तस्य भासा सर्वमिदं विभाति ॥" असें त्याचें मुंडकोपनिषदांत वर्णन केलेलें आहे. याच अभिप्रायानें त्याला "निरालोक" असें म्हटलेलें आहे. तसेंच तो लोक "अलोक" म्हणजे विजन अर्थात् पूर्ण एकान्त स्वरूपाचा आहे. तेथें पोहोंचणारा हजारों लाखों लोकांमध्यें एखादा विरळाच असतो. आई ! तुझा भक्त तुझ्याच कृपेनें त्या "भालोकभुवने" म्हणजे प्रकाश आणि आनंद यांचें स्थान असलेल्या अनिर्वचनीय आह्लाददायक अशा स्थानांत तो सदासर्वकाळ विराजमान होऊन रहातो. तात्पर्य, आज्ञाचक्रांत अभिन्न शिव-शक्तिस्वरूप असलेल्या परशंभुनाथ आणि श्रीचित्परांबा देवी त्रिपुरसुंदरी यांच्या उपासनेचा केवढा हा प्रभाव आहे !

गंगा आणि यमुनास्वरूप असलेल्या इडा आणि पिंगला या दोन नाड्या मूलाधारचक्रापासून उगम पावतात आणि आज्ञाचक्रांत त्यांचा संगम होतो म्हणून या ठिकाणाला प्रयागराज असें म्हणतात. तेथून पुढें वरणा आणि असि या दोन

नाड्या उगम पावून सहस्रदल कमलाकडे जावयास निघतात. वरणा आणि असि या दोन नाड्यांच्या मध्यभागीं असलेल्या प्रदेशास वाराणसी असें म्हणतात. वाराणसी म्हणजेच काशी. या काशीक्षेत्राची अधिष्ठात्री देवता भगवान् विश्वनाथच आहेत. त्यांनाच शंभुनाथ असें म्हणतात. त्यांच्या अर्धांगीं चित्शक्तिरूप परांबा विराजमान झालेली आहे. प्राणप्रयाणसमयीं जे कोणी भ्रूमध्यप्रदेशांत या शिवशक्तीचें स्मरण करतात त्यांना भगवान् शंकर तारकमंत्राचा उपदेश करतात. मृत्यूनंतर त्यांना या श्लोकाच्या उत्तरार्धांत सांगितलेल्या शिवलोकाची प्राप्ति होते. असाहि एक अभिप्राय या श्लोकाचा लक्षांत घेण्यासारखा आहे.

सोन्याच्या पत्र्यावर वर्तुळ काढून त्या वर्तुळांत एकाखालीं एक दुं दुं दुं अशीं तीन बीजें लिहावींत. त्या तिन्ही बीजांच्या पुढें क्रमानें ठ, प आणि श अशीं अक्षरें लिहावींत. पंचेचाळीस दिवस पूजा करावी. उडदाचे वडे आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. रोज एक हजार या श्लोकाचा जप करावा. तें यंत्र धारण करावें अथवा पाणी मंत्रून प्यावयास द्यावें. नाना प्रकारचे कठीण रोग दूर होतील.

विशुद्धौ ते शुद्ध-स्फटिक-विशदं व्योमजनकं
शिवं सेवे देवीमपि शिव-समान-व्यवसिताम् ।
ययोः कान्त्या यान्त्याः शशि-किरण-सारूप्यसरणे-
र्विधूतान्तर्ध्वान्ता विलसति चकोरीव जगती ॥ ३७ ॥

आई जगज्जननी ! कंठस्थानीं असलेल्या या षोडशदलात्मक विशुद्धि-चक्राची अधिष्ठात्री देवता तूंच आहेस. तुझ्या या विशुद्धिचक्रामध्यें शुद्ध स्फटिका-प्रमाणें स्वच्छ असलेले भगवान् सदाशिव हे व्योमतत्त्वाचे जनक आहेत. व्योम म्हणजे आकाश. आकाशतत्त्व हें आत्मतत्त्वापासून अभिव्यक्त झालेले आहे. भगवान् सदाशिव हे आत्मतत्त्वस्वरूपच आहेत. विशुद्धिचक्रामध्यें त्यांना व्योमेश्वर असें म्हणतात. आई ! मी त्यांची सेवा करीत आहें. त्याचप्रमाणें " शिवसमान-व्यवसितां त्वां देवीं अपि सेवे " विश्वाची उत्पत्ति, स्थिति, प्रलय, निग्रह आणि अनुग्रह इत्यादि सर्व कार्यें श्रीशंकराप्रमाणेंच तूं आपल्याकडेहि घेतलेलीं आहेस. तूं या विशुद्धिचक्रांतील देवी आहेस. मी तुझीहि पण उपासना करीत आहें.

आई ! या विशुद्धिचक्रांत व्योमेश्वराच्या सान्निध्यांत विराजमान असलेली तूं व्योमेश्वरी आहेस. चंद्राच्या किरणाप्रमाणें आह्लाद आणि प्रकाश देण्याचें

जिचें सामर्थ्य आणि स्वभाव आहे तो तुम्हां दोघांची कांति भक्तांच्या अन्तः-करणांत प्रसरण पावूं लागली असतां भक्तांचे जग हें अंतःकरणानें अधिक निर्मळ होतें. त्यांच्या अंतःकरणांतील अज्ञान-रूपी तिमिर पार मावळून जातो. आणि चकोर पक्ष्याची स्त्री ज्याप्रमाणें चंद्राच्या प्रकाशाकडे पाहून आनंदित होते त्याचप्रमाणें तुझे भक्तहि विशुद्धिचक्रामध्यें शिवशक्तिस्वरूपानें विराजमान असलेल्या तुम्हां दोघांकडे पाहून आनंदित होत असतात. आई ! मी तुम्हां दोघांनाहि अनन्य-चित्तानें भजत आहें.



यंत्र क्रमांक २७

चांदीच्या पत्र्यावर हें यंत्र काढून पूजा करावी. गूळ, नारळ आणि केळें यांचा नैवेद्य दाखवावा. पांच हजार या श्लोकाचा जप करून यंत्र धारण करावें अथवा पाणी अभिमंत्रून प्यावें. ब्रह्मराक्षसाची बाधा निवृत्त होईल.

समुन्मीलत्संवित्कमल-मकरन्दैक-रसिकं
भजे हंसद्वन्द्वं किमपि महतां मानस-चरम् ।
यदालापादष्टादश-गुणित-विद्या-परिणति-
र्यदादत्ते दोषाद् गुणमखिलमद्भ्यः पय इव ॥ ३८ ॥

आई जगज्जननी ! हें माझ्या हृदयाच्या सान्निध्यांत असलेलें अनाहत-चक्र हें तुझेंच आहे. यालाच संवित्कमल असें म्हणतात. कांहीं विद्वान् संवित्कमल शब्दानें वक्षस्थलामध्यें असलेलें निराळेंच अष्टदलकमल घेतात; पण तें बरोबर नव्हें. क्रमानें षट्चक्रांचें वर्णन चालू असतां क्रमप्राप्त अनाहतचक्र सोडून मध्येंच दुसऱ्या चक्राचा निर्देश आचार्य करणार नाहींत. हें कमल बारा पाकळ्यांचें आहे. याच्या प्रत्येक दलांत एक एक आदित्यदेवता विराजमान झालेली आहे. द्वादश आदित्यांचा प्रकाश या ठिकाणीं सदैव विलसत असतो. ज्ञानाचें – आत्मज्ञानाचेंहि तेंच स्थान असल्यामुळें त्याला संवित्कमल असें म्हणतात. "समुन्मीलत्" म्हणजे उत्तम रीतीनें विकसित होणाऱ्या या संवित्कमलांतील मकरंदाचा – पुष्परसाचा प्रामुख्यानें आस्वाद घेण्यामध्यें

रसिक म्हणजे तत्पर असलेले असे दोन हंस तेथें आहेत. एक हंस आणि एक हंसी. मानससरोवरामध्यें जसे राजहंस असावेत त्याचप्रमाणें योगीजनांच्या अथवा भक्तजनांच्या मानस म्हणजे अंतःकरणरूपी सरोवरामध्यें संचार करणारे ते असे कांहीं हंसच आहेत. हे दोन हंस म्हणजे एक साक्षात् भगवान् सदाशिव आणि दुसरी प्रत्यक्ष तूंच आदिमाया महाशक्ति. तुम्हां दोघांना या अनाहत-चक्रामध्यें हंसेश्वर आणि हंसेश्वरी असें म्हणतात. त्यांचें स्वरूप 'किमपि' म्हणजे अनिर्वचनीय आहे. त्या राजहंसांच्या एकमेकांशीं होणाऱ्या संवादांतूनच अठरा विद्यांची परिणति म्हणजे विकास झालेला आहे. या अठरा विद्या म्हणजे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद. त्याचप्रमाणें या चारी वेदांचे चार उपवेद. आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद आणि स्थापत्यवेद म्हणजे शिल्पशास्त्र. तसेंच शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, ज्योतिष आणि छन्दःशास्त्र हीं सहा वेदांचीं अंगें आणि पूर्वोत्तर मीमांसाशास्त्र (मीमांसा आणि वेदान्त), न्यायशास्त्र, पुराण आणि धर्मशास्त्र. चौसष्ट कला आणि तंत्रशास्त्र वगैरे इतर विद्या या सर्वांचा या अठरा विद्यांतच अंतर्भाव होतो. राजहंस ज्याप्रमाणें एकत्र मिसळलेलें दूध आणि पाणी यांचें पृथक्करण करतात त्याचप्रमाणें आई ! राजहंसस्वरूप असलेले तुम्ही दोघें देखील भक्तजनांच्या गुणदोषांचें पृथक्करण करून दोष बाजूला सारतां आणि गुणांचें ग्रहण करतां ! शंकरांनीं लोकांना ताप देणारें विष कंठांत घातलें आणि आह्लाद देणारा चंद्र मस्तकावर धारण केला ! आई, मी तुम्हां दोघांना मनःपूर्वक भजत आहें.

कांहीं लोक या संवित्कमलामध्यें असलेल्या परमेश्वराला तो अग्नीच्या ज्वालेप्रमाणें असल्यामुळें ज्वालेश्वरमहादेव असें म्हणतात, तर त्यांच्या अर्धांगीं विराजमान असलेल्या परमेश्वरीला ज्वालेश्वरीदेवी असें म्हणतात. नारायणोपनिषदांतहि या अभिप्रायानें वर्णन केलेलें आहे. " तस्य मध्ये वह्निशिखा अणीयोर्ध्वा व्यवस्थिता। नीलतोयदमध्यस्था विद्युल्लेखेव भास्वरा ॥ " कंठस्थानाच्या खालीं वीतभर आणि नाभिप्रदेशाच्या ऊर्ध्वभागीं हृत्कमलाचा निर्देश केलेला आहे. त्याच्यामध्यें वह्निशिखा म्हणजे अग्नीची ज्वाला दिसते. या ठिकाणीं वह्निशिखा शब्दानें सुषुम्ना नाडी विवक्षित आहे. ती अग्नीच्या ज्वालेप्रमाणेंच दिसत असते. अत्यंत सूक्ष्म असते. उभी असते. पाण्यानें भरलेल्या ढगांत जशी वीज चमकावी त्याप्रमाणें ती भास्वर म्हणजे तेजस्वी दिसते. त्याच

ठिकाणीं साधकाला आत्मतत्त्वाचा साक्षात्कार होत असतो. " ज्वालमालाकुलं भाति विश्वस्यायतनं महत् " तें आत्मतत्त्व चोहोंकडून प्रकाशसमूहानें व्यापलेलें दिसतें. विश्वाचें म्हणजे ब्रह्मांडाचें आयतन म्हणजे आधारभूत आहे. त्यालाच 'महत्' म्हणजे परब्रह्म असें म्हणतात. संवित्कमलामध्यें असलेल्या प्रकाशपुंजांत अग्निज्वालेप्रमाणें दिसणारी जी अत्यंत सूक्ष्म सुषुम्ना नाडी आहे तिच्यांतच परमात्मतत्त्वाचा साक्षात्कार होत असतो. कारण तो तेथेंच प्रकटरूपानें आहे. " तस्याः शिखाया मध्ये परमात्मा व्यवस्थितः " असें त्याचें वर्णन केलेलें आहे. त्यालाच नारायण असेंहि म्हटलेलें आहे. " नारायणः परं ब्रह्म तत्त्वं नारायणः परः । नारायणः परं ज्योतिरात्मा नारायणः परः " " स ब्रह्मा स शिवः सेन्द्रः सोक्षरः परमः स्वराट् " अशीं त्याला अनेक नांवें दिलेलीं आहेत. त्यालाच प्रकृतस्थलीं हंस असें म्हटलेलें आहे. तो परमात्मा आपल्या शक्तीसह तेथें विराजमान असल्यामुळें त्याच्या शक्तीला हंसी असें म्हटलेलें आहे. याप्रमाणें हृत्कमल, संवित्कमल आणि अनाहतचक्र हीं तिन्ही कमलें वक्षःस्थलींच असल्यामुळें त्यांचा व त्यांतील तत्त्वांचा एकरूपानें निर्देश केला गेला आहे. तात्पर्य, हंस आणि हंसी या रूपानें प्राणिमात्रांच्या हृदयांत शिवशक्तितत्त्व हें विराजमान झालेलें आहे, ही गोष्ट निर्विवाद होय. याच अभिप्रायानें योगानुशासनांतहि या हंसाच्या जोडीचें मोठें सुंदर वर्णन केलेलें आहे—

" अनुपममनुभूति-स्वात्मसंवेद्यमाद्यं
विततं-सकल-विद्यालापमन्योन्यमुख्यम् ।
सकल-निगम-सारं सोऽहमोंकार-गम्यं
हृदय-कमल-मध्ये हंसयुग्मं नमामि ॥ "

भूतमात्रांच्या हृत्कमलामध्यें विराजमान असलेल्या हंसाच्या जोडीला मी नमस्कार करतों. ती हंसाची जोडी मोठी अनुपम आहे. तिला उपमा देण्यासारखें या जगांत दुसरें कोणीच नाहीं. केवळ स्वतःच्या अनुभवानें स्वतःच जाणतां येतें. तें हंसाचें जोडपें सर्व विश्वाच्या अगोदरचें आहे. त्यांचे एकमेकांशीं होत असलेले आलाप म्हणजे संभाषण हेंच सर्व विद्यांच्या रूपानें परिणत झालेलें आहे. त्या दोघां मध्यें कोण मुख्य आणि कोण गौण हें सांगतां येत नाहीं. दोघेंहि एकरूप असल्यामुळें त्यांचा अंगांगीभाव हा अनिर्वचनीय झालेला आहे. ते सर्व वेदांचे सारभूत

आहेत. "सोऽहं" हें त्यांचें स्वरूप आहे. सोऽहं यांतील सकार शक्तिस्वरूप आहे, तर हकार हा शिवस्वरूप आहे. या शिवशक्तीच्या तादात्म्याचेंच दुसरें रूप "हंसः" असें आहे. अशा रीतीनें सोऽहं आणि हंसः हीं दोन्ही एकरूपच आहेत. सोऽहं यांतच अभिव्यक्त होणारा ॐकार हाच त्या हंसांची ओळख करून देऊं शकतो. माते जगज्जननी ! ही हंसाची जोडी म्हणजे तादात्म्यभावापन्न शिवशक्तिस्वरूप तूंच आहेस. हृत्कमलवर्ती हंस आणि हंसेश्वरीरूप तुम्हां दोघांना मी भक्तिभावानें भजत आहें. मी तुमच्या आश्रय करीत आहें. मी तुमच्या चरणीं प्रेमपूर्वक प्रणाम करीत आहें.

सोन्याच्या पत्र्यावर वर्तुळ काढून त्यांत कं हें बीज लिहावें. पंचेचाळीस दिवस पूजा करावी. या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. अकरा उडदाचे वडे, तांबूल, नारळ, आणि केळें यांचा नैवेद्य दाखवावा. तें यंत्र धारण करण्यास द्यावें. अथवा जल अभिमंत्रून प्रोक्षण करावें. लहान मुलांची सर्व अरिष्टें टळतील.

तव स्वाधिष्ठाने हुतवहमधिष्ठाय निरतं
तमीडे संवर्तं जननि महतीं तां च समयाम् ।
यदालोके लोकान् दहति महति क्रोधकलिते
दयार्द्रा या दृष्टिः शिशिरमुपचारं रचयति ॥ ३९ ॥

हे आई जगज्जननी ! माझ्या देहांतील स्वाधिष्ठानचक्र हें तुझेंच आहे. कारण त्याची तूं अधिष्ठात्री देवता आहेस. आई ! त्या तुझ्या स्वाधिष्ठानचक्रामध्यें असलेल्या अग्नितत्त्वाच्या ठिकाणीं संवर्ताग्नीच्या रूपानें भगवान् सदाशिव निरंतर तन्मयतेनें वास्तव्य करतात. त्यांना तेथें संवर्तेश्वर असें म्हणतात. त्यांच्या वाममार्गी सर्वश्रेष्ठ अशी तूं समया, समयांबा अथवा समयादेवी या नांवानें विराजमान झालेली आहेस. मी तुम्हा दोघांचीहि "ईडे" म्हणजे स्तुति करीत आहें. आई ! संवर्ताग्नीच्या रूपानें स्वाधिष्ठानचक्रातील अग्नितत्त्वाच्या ठिकाणीं ज्या वेळेला भगवान् शंकर हे प्रलयाग्नीच्या रूपानें अधिष्ठित होतात त्या वेळीं त्यांचा आलोक म्हणजे प्रकाश किंवा ज्वाला क्रोधानें वाढूं लागतात. भगवान् शंकर हे त्या वेळेला संहाराच्या अवस्थेंत असतात. म्हणून त्यांचा प्रक्षोभ होत असतो. प्रक्षुब्ध झालेल्या सदाशिवस्वरूप संवर्ताग्नीच्या ज्वाळा लोकांचा जेव्हां दाह करूं लागतात त्याच वेळेला आई ! तुझी दयार्द्र दृष्टि भक्तजनांना शीतोपचार करीत

असते. तुझ्या कृपापूर्ण दृष्टीनें होणाऱ्या शीतल उपचारामुळें तुझ्या भक्तांना प्रलयाग्नीच्या ज्वालाहि थंडीच्या दिवसांत अग्नीजवळ बसून शेकावें त्याप्रमाणें सुखदायक वाटतात. तात्पर्य, स्वाधिष्ठानचक्रामध्यें विराजमान असलेल्या संवर्तेश्वररूपी भगवान् सदाशिवांशीं सर्वस्वीं अभिन्न – एकरूप असलेली तूं समयांबा पराशक्ति, मी तुझें स्वाधिष्ठान चक्रांत ध्यान करीत आहें. मी तुझें भक्तिपूर्वक स्तवन करीत आहें.

श्लोक तेरामप्रमाणें सोन्याच्या पत्र्यावर चतुष्कोण काढावा. त्यांत बरच्या ओळींत ठं पं पः हीं अक्षरें लिहावींत. खालच्या ओळींत दोन दोन अक्षरांच्या खालीं पं आणि सं हीं अक्षरें लिहावींत. बारा दिवस यंत्राची पूजा करावी. रोज एकशेआठ वेळां या श्लोकाचा जप करावा. दूध, पायस आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. हें यंत्र धारण केल्यास वाईट स्वप्नें पडण्याचें थांबतें व दुःस्वप्न-दोष टळतो.

तटित्वन्तं भक्त्या तिमिर-परिपन्थि-स्फुरणया
स्फुरन्नानारत्नाभरण-परिणद्धेन्द्रधनुषम् ।
तव श्यामं मेघं कमपि मणिपूरैक-शरणं
निषेवे वर्षन्तं हर-मिहिर-तप्तं त्रिभुवनम् ॥ ४० ॥

हे आई जगज्जननी ! माझ्या देहांतील मणिपूरचक्र हें तुझेंच चक्र आहे. तुझ्या या मणिपूरचक्रांत भगवान् सदाशिव हे मेघेश्वररूपानें वास्तव्य करीत आहेत. कोणी त्यांना अमृतेश्वर असेंहि म्हणतात. तेथें त्यांच्या वामभागीं तूं अमृतेश्वरी या रूपानें अथवा सौदामनीदेवी या रूपानें विराजमान झालेली आहेस. तुझ्यासह त्या मणिपूरचक्रांत विराजमान असलेल्या अमृतेश्वराची मी भक्तिपूर्वक उपासना करीत आहें. ते मेघेश्वर महादेव हे 'तटित्वान्' आहेत. तटित् म्हणजे विद्युल्लता. मेघामध्यें जशी विद्युल्लता शोभावी तशी तूं सौदामनीदेवी अमृतेश्वराच्या सान्निध्यांत शोभत आहेस. तूं त्यांची शक्तिच आहेस. विद्युल्लतेनें युक्त असलेला मेघ हा वृष्टि करण्यास उद्युक्त असतो हें प्रसिद्धच आहे. विद्युल्लतेचें स्फुरण म्हणजे प्रकाश हा 'तिमिरपरिपन्थि' म्हणजे अंधकाराचा नाश करीत असतो. विद्युत् ही क्षणभरच प्रकाशत असते, पण तूं मात्र अमृतेश्वराच्या सान्निध्यांत नित्य स्थिररूपानें विराजमान झालेली आहेस. तामिसलोकस्वरूप

असलेल्या मणिपूरचक्रांतील तिमिराचा नाश तुझ्याचमुळें होत असतो. तूं आपल्या अंगावर धारण केलेल्या अनेक रत्नजडित अलंकारांतील रत्नांच्या कांतीनें अमृतेश्वररूपी मेघामध्यें जणुं कांही इंद्रधनुष्यच निर्माण झालेलें आहे असें वाटतें. ढगांमध्यें दिसणारें इंद्रधनुष्य हें देखील वृष्टीचें द्योतक असतेंच. आई! तुझ्या सान्निध्यांत असलेले मेघनाथ हे श्याम म्हणजे कृष्णवर्ण आहेत. मेघाचा कृष्णवर्ण देखील मेघ वृष्ट्युन्मुख असल्याचेंच सूचित करीत असतो. तुझें मणिपूरचक्र हें एक त्या अमृतेश्वराचें मुख्य मंदिर आहे. असें हे तुझ्याच सामर्थ्यामुळें समर्थ असलेले श्रीमेघनाथ हे हर म्हणजे अग्नि आणि मिहिर म्हणजे सूर्य यांच्या योगानें प्रतप्त झालेल्या त्रिभुवनाला अमृताची—जलाची वृष्टि करून शांत करीत आहेत. तात्पर्य, आई! प्रलयकालीन अग्नि-सूर्याच्या तापानें तप्त झालेल्या त्रिभुवनाला शांत करणारे भगवान् अमृतेश्वर हे तुझ्याच सामर्थ्यानें संपन्न असून ते तुझ्याच मणिपूरचक्रांत तुझ्यासह वास्तव्य करीत आहेत. मी तुम्हां उभयतांची नक्तिभावानें उपासना करीत आहे.

सोन्याच्या पत्र्यावर श्लोक तीनप्रमाणें यंत्र काढून त्यांत श्रींच्या जागीं ठं हें बीज लिहावें. पंचेचाळीस दिवस पूजा करावी. मध, दूध, पायस आणि तांबूल यांचा नैवेद्य दाखवावा. या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. तें यंत्र उशींत घालून झोपावें. इष्ट वस्तूचें स्वप्नांत दर्शन घडेल.

तवाधारे मूले सह समयया लास्य परया
नवात्मानं मन्ये नव-रस-महा-ताण्डवनटम् ।
उभाभ्यामेताभ्यामुदयविधिमुद्दिश्य दयया
सनाथाभ्यां जज्ञे जनक-जननीमज्जगदिदम् ॥ ४१ ॥

आई जगज्जननी! माझ्या शरीरांतील मूलाधारचक्राचीहि अधिष्ठात्री तूंच आहेस. माझ्या देहांतील मूलाधारचक्र हें तुझेंच आहे. आई! तुझ्या या मूलाधारचक्रामध्यें नवात्मा भगवान् महाभैरव हे शृंगार, वीर, करुणा इत्यादि नऊ रसांनीं युक्त असें अद्भुत तांडवनृत्य करीत आहेत. तांडवनृत्य करणारे नटच आहेत ते. पुरुषांकडून केल्या जाणाऱ्या नृत्याला तांडवनृत्य असें म्हणतात; तर स्त्रियांकडून केल्या जाणाऱ्या नृत्याला लास्य असें म्हणतात. शंकरांच्या नृत्यालाहि तांडवनृत्य हें नांव प्रसिद्धच आहे. पार्वतीच्या नृत्यालाहि लास्य असें म्हणतात.

म्हणूनच पार्वतीचें नांव महालास्या (म्हाळसा) असें प्रसिद्धच आहे. आई ! तांडवनृत्य करीत असलेल्या शंकरांबरोबर तूंहि पण आपलें लास्यनृत्य करीत असतेसच. तेथें तुला समयादेवी, भैरवी, महाभैरवी अथवा आनंदभैरवी असें म्हणतात. तात्पर्य, मूलाधारचक्रामध्यें तुम्ही दोघेंहि नृत्य करण्यामध्यें तत्पर झालेले दिसत आहां. तुम्हां दोघांचेंहि नृत्य जगाच्या उपकाराकरितांच आहे. विश्वाची उत्पत्ति-अवस्था लक्षांत घेऊन मोठ्या दयेनें, प्रलयकाळीं दग्ध झालेल्या लोकांचें पुनरुज्जीवन करण्याचें कार्य तुम्हीं पत्करलें. तुम्हीच या सृष्टीचे माता आणि पिता झालांत. तुमच्यामुळेंच ही सृष्टि सनाथ झाली. आई यास्तव मूलाधारचक्रांत शिवाभिन्न शक्तिस्वरूप असलेल्या तुझ्या चरणीं मी भक्तिभावानें प्रणाम करीत आहें. सौंदर्यलहरीचा पूर्वार्ध येथें संपला.

सोन्याच्या पत्र्यावर चतुष्कोण काढून त्यांत एकाखालीं एक यं आणि ह्रीं बीजें लिहावींत. तीस दिवस पूजा करावी. मधाचा नैवेद्य दाखवावा. रोज चार हजार वेळां या श्लोकाचा जप करावा. हें यंत्र धारण केल्यानें सर्व उदररोग निवृत्त होतात.

गतैर्माणिक्यत्वं गगनमणिभिः सान्द्रघटितं
किरीटं ते हैमं हिमगिरिसुते कीर्तयति यः ।
स नीडेयच्छायाच्छुरणशबलं चन्द्रशकलं
धनुः शौनासीरं किमिति न निबध्नाति धिषणाम् ॥ ४२ ॥

आई जगज्जननी ! तुझ्या किरीटाचें मी काय वर्णन करूं ? आकाशांतील बारा आदित्य म्हणजे सूर्य हे रत्नस्वरूपाला प्राप्त झाले आणि ते मुकुटावर दाटीवाटीनें जडविले गेले आहेत. तो तुझा मुकुट शुद्ध सोन्याचा आहे. आई, नगाधिराजतनये त्रिपुरसुंदरी ! जो कोणी तुझ्या या मुकुटाचें वर्णन करावयास प्रवृत्त होईल तो तुझ्या मुकुटावर दिसणाऱ्या धनुष्याकार चंद्रकोरीकडे पाहून हें इंद्रधनुष्य आहे अशी कां बरें कल्पना करणार नाहीं ? हें इंद्रधनुष्य आहे अशीच त्याला बुद्धि होईल. कारण "नीडेय" म्हणजे मुकुटाच्या वर्तुळांत बसविलेलीं रत्नें. तीं विविध जातीचीं असल्यामुळें त्यांच्या नील, पीत, हरित इत्यादि विविध वर्णांच्या छटा त्या धनुराकार चंद्रामध्यें प्रतिबिंबित झालेल्या आहेत. त्यामुळें ती तुझ्या मुकुटावरील चंद्राची कोर विविध रंगांनीं विलसत असलेलें जणुं कांहीं हें इंद्रधनुष्यच आहे कीं काय ? असें त्या मुकुटाचें वर्णन करावयास प्रवृत्त झालेल्या

कवीला वाटूं लागतें ! उत्प्रेक्षा, अपह्नव, संदेह अतिशयोक्ति इत्यादि विविध अलंकारांच्या छटा या श्लोकांत पहावयास सांपडतात.

सोन्याच्या पत्र्यावर लिसाऱ्या श्लोकांतील यंत्राप्रमाणें यंत्र काढून त्यांत पहिल्या ओळींत रं रं व खालच्या ओळींत रीं रीं हीं बीजें लिहावींत. पंचेचाळीस दिवस पूजा करावी. साखरेचा नैवेद्य दाखवावा. रोज या श्लोकाचा एक हजार जप करावा. हें यंत्र धारण केल्यानें जलोदरादि सर्व प्रकारचें उदरव्याधि नष्ट होतात.

धुनोतु ध्वान्तं नस्तुलित-दलितेन्दीवर-वनं
घन-स्निग्ध-श्लक्ष्णं चिकुर-निकुरुम्बं तव शिवे ।
यदीयं सौरभ्यं सहजमुपलब्धुं सुमनसो
वसन्त्यस्मिन्मन्ये वल-मथन-वाटी-विटपिनाम् ॥ ४६ ॥

आई जगत्कल्याणकारिणी ! तुझा हा "चिकुरनिकुरुम्ब" म्हणजे केशपाश मोठा, दाट, स्नेहयुक्त आणि मृदु आहे. विकसित झालेल्या नीलकमलांच्या वनाचीच त्याला उपमा देतां येईल, असा तो सुंदर आहे. तो तुझा कृष्णवर्ण केशपाश आमच्या अंतःकरणांतील अज्ञानरूपी तिमिराचा निरास करो, हीच माझी प्रार्थना आहे. आचार्यांनीं आपल्याबरोबर आपले शिष्य आणि अनेक भक्तजन गृहीत धरलेले असल्यामुळें स्वतःला उद्देशून "नः" या बहुवचनाचा प्रयोग केलेला आहे. एकवचनी प्रयोग हा न्यूनत्वाचा अथवा तुच्छत्वाचा द्योतक असला, तरी प्रकृतस्थलीं अत्यंत लडिवाळपणानें तो मातेला उद्देशून केला जात असल्यामुळें नितान्त प्रेमाचा द्योतक आहे. आईशीं बोलतांना आपण "तूं" "तुला" इत्यादि एकवचनीच प्रयोग करीत असतों. तथापि तेथें अनादराचा लेशहि नसतो ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. आई ! तुझ्या केशपाशाचें स्वाभाविक सौगन्ध्य इतकें उत्कृष्ट आहे कीं, त्याचा लाभ घेण्याकरितां 'वलमथन' म्हणजे इंद्र, त्याच्या उपवनांतील कल्पवृक्षांचीं फुलें जणुं कांहीं येथे वेणीच्या रूपानें एकत्र येऊन वसलेलीं आहेत असें वाटतें ! किती सुंदर उत्प्रेक्षा आहे ही !

सहाव्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें सोन्याच्या पत्र्यावर यंत्र काढून त्याच्या मध्यभागीं फक्त श्रीं हे बीज लिहावें. चाळीस दिवस पूजा करावी. मधाचा नैवेद्य दाखवावा. या श्लोकाचा रोज तीन हजार जप करावा. अंगठी अथवा ताईत करून यंत्र धारण करावें. सर्व लोक वश होतील.

तनोतु क्षेमं नस्तव वदन-सौन्दर्यलहरी-
परीवाहः स्रोतःसरणिरिव सीमन्तसरणिः ।
वहन्ती सिन्दूरं प्रबल-कबरी-भार-तिमिर-
द्विषां वृन्दैर्बन्दीकृतमिव नवीनार्ककिरणम् ॥ ४४ ॥

आई जगज्जननी ! तुझ्या मस्तकावरील भांग हा जणुं कांहीं तुझ्या मुख-कमलाच्या सौंदर्याचा तरंगयुक्त प्रवाह वहात रहाण्याचा एक तयार केलेला प्रवाह-मार्ग म्हणजे पाटच आहे असें वाटतें. "सीमन्तसरणि" म्हणजे केस विंचरून तयार केलेल्या भांगाचें स्वरूप, भांगामध्यें सौभाग्यलंकार म्हणून स्त्रिया शेंदूर धारण करीत असतात. आचार्य, श्रीत्रिपुरसुंदरीच्या भांगांत भरलेल्या शेंदराच्या चूर्णावर उत्प्रेक्षा करीत आहेत. आई ! शेंदरानें भरलेला तुझा भांग पाहिला म्हणजे उदयाला येणाऱ्या बालरवीच्या किरणांचा जणुं कांहींसमूहच तेथें बंदिस्त करून ठेवला आहे असें वाटतें !

तुझा घनदाट केशभार हा अंधकारासारखा काळामोर आहे. सूर्य उदयाला आला कीं सूर्याचे किरण अंधकाराचा नाश करतात. त्यामुळें सूर्याच्या किरणांकडे तो केशसमूह शत्रुबुद्धीनें पहातो. उदयाला येणाऱ्या सूर्याचीं आरक्त किरणें आपल्याला अंधकार समजून आपला नाश करतील या भावनेनें जणुं कांहीं तो सूर्यकिरणांचा शत्रु बनला. तुझ्या मस्तकावरील घनदाट अंधकाराप्रमाणें कृष्ण-वर्ण असलेल्या केशसमूहरूपी शत्रुवृंदांनीं – शत्रुसमूहांनीं – आरक्तवर्ण असलेल्या त्या सूर्यकिरणांना दोहो बाजूंनीं बंदिस्त करून ठेवलें आहे असें वाटतें. तात्पर्य, श्रीत्रिपुरसुंदरीच्या भांगात भरलेला शेंदूर उदयाला येणाऱ्या सूर्याच्या किरणासारखा आरक्त असून तो भक्तजनांच्या मनाला आकृष्ट करीत आहे. आई ! तुझा तो भांग "नः क्षेमं तनोतु" आमचें कल्याण करो.

श्लोक ४३ प्रमाणें यंत्र लिहून मध्यें क्लीं हें बीज लिहावें. बारा दिवस यथासांग पूजा करावी. गूळ आणि पायस यांचा नैवेद्य दाखवावा. रोज एक हजार वेळां या श्लोकाचा जप करावा. यंत्र धारण करावें. अथवा कुंकू, हळद किंवा केशर अभिमंत्रून त्याचा तिलक धारण करावा. यानें सर्व लोक वश होतील. सर्व बाधा निवृत्त होतील.

अरालैः स्वाभाव्यादलि-कलभ-सश्रीभिरलकैः
परीतं ते वक्त्रं परिहसति पङ्केरुहरुचिम् ।
दरस्मेरे यस्मिन्दशनरुचिकिञ्जल्करुचिरे
सुगन्धौ माद्यन्ति स्मर-दहन-चक्षुर्मधुलिहः ॥ ४५ ॥

आई त्रिपुरसुंदरी ! तुझ्या मस्तकावरील केश स्वभावतःच अराल म्हणजे कुटिल अर्थात् कुरळे आहेत. त्यांची शोभा बाल्यावस्थेंतील भ्रमरांच्या शोभेप्रमाणें दिसत आहे. काळ्याभोर कुरळ्या केसांनीं व्यापलेलें तुझें मुख, कमलाच्या शोभेलाहि तिरस्कृत करीत आहे. अर्थात् तुझें मुखकमल निसर्गांतील कमलापेक्षांहि अत्यंत सुंदर दिसत आहे. तूं स्मितहास्य करूं लागली असतांना तुझें मुखकमल किंचित् विकसित होतें तेव्हां तुझ्या दंतपंक्तीची कांति ही त्या कमलांतील केसराप्रमाणें दिसते. दंतकांतिरूपी केसरांनीं तुझें मुखकमल अत्यंत सुंदर दिसतें. स्मरदहन म्हणजे भगवान् शंकर यांचें नेत्र हेच कोणी भ्रमर, ते त्या कमलांतील सौगंध्य सेवन करून अत्यंत आनंदित होतात. आई ! तुझें तें मुखकमल आमचें कल्याण करो. या श्लोकांत पूर्वार्धांत उपमा आणि उत्तरार्धांत रूपक असें अलंकार आहेत.

वरीलप्रमाणें यंत्र काढून मध्यभागीं एकाखालीं एक सं सं सं अशीं तीन बीजें लिहावींत. गूळ, नारळ, केळें आणि मध यांचा नैवेद्य दाखवून ४० दिवस समाराधना करावी. या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. यंत्र धारण करावें. यानें वाक्सिद्धि प्राप्त होतें.

ललाटं लावण्य-द्युति-विमलभाभाति तव यद्-
द्वितीयं तन्मन्ये मुकुटघटितं चन्द्रशकलम् ।
विपर्यासन्यासाद्उभयमपि सम्भूय च मिथः
सुधालेप-स्यूतिः परिणमति राका-हिमकरः ॥ ४६ ॥

आई जगज्जननी ! मोत्यांच्या ठिकाणीं जें एक तरल तेज चमकत असतें त्याला लावण्य असें म्हणतात. तारुण्यांत अथवा उत्तम लक्षणांनीं संपन्न असलेल्या शरीरांतहि जें एक अशा प्रकारचें तेज चमकत असतें त्यालाहि पण लावण्यच म्हणतात. आई ! लावण्याच्या प्रकाशानें प्रकाशित झालेला तुझा जो

भालप्रदेश आहे तो जणुं कांहीं तुझ्या मुकुटांतील अर्ध्या चंद्राचा दुसरा अर्धा भागच आहे असें मला वाटतें. मुकुटावरील चंद्राचीं टोकें ऊर्ध्व दिशेला आहेत तर भालस्वरूपी चंद्राचीं टोकें खालच्या दिशेला आहेत. या दोन्ही चंद्रशकलांचीं टोकें – अर्ध्या अर्ध्या चंद्राचीं टोकें उलटी करून एकमेकांवर ठेवलीं आणि एकमेकांना मिळवून जर "सुधालेपस्यूति" सुधा म्हणजे चुना. सुधा शब्दाचा दुसरा अर्थ अमृत किंवा पाणी असाहि आहे. चुना आणि पाणी कालवून त्यांत कस्तूरी, गुग्गुळ आदि द्रव्यांचें मिश्रण करून जर सर्व बाजूंनीं लेप दिला तर तोच पूर्णिमेचा पूर्णचंद्र या रूपानें परिणत होतो. तोच आकाशांत दिसतो. तुझ्या मुकुटावरील अर्धा चंद्र आणि भालप्रदेशरूपी अर्धा चंद्र हीं दोन्ही चंद्राचीं शकलें जर एक केलीं नाहींत तर हा आकाशांतील पूर्णिमेचा पूर्ण चंद्र कसा दिसूं शकेल ? तात्पर्य, तुझें ललाट भक्तजनांच्या चित्ताला चंद्राप्रमाणें आल्हाददायक वाटत आहे. आई कृपा कर.

सोळाव्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें त्रिकोण काढून मध्यें हीं हें बीज लिहावें. दुधाचा पायस आणि मधाचा नैवेद्य दाखवून पंचेचाळीस दिवस पूजा करावी. रोज एक हजार वेळां या श्लोकाचा जप करावा. हें यंत्र स्त्रियांनीं धारण केल्यास भर्तृसमागम आणि गर्भधारणा होईल.

भ्रुवौ भुग्ने किञ्चिद्भुवनभयभङ्गव्यसनिनि
त्वदीये नेत्राभ्यां मधुकररुचिभ्यां धृतगुणम् ।
धनुर्मन्ये सव्येतरकरगृहीतं रतिपतेः
प्रकोष्ठे मुष्टौ च स्थगयति निगूढान्तरमुमे ॥४७॥

हे आई जगज्जननी ! त्रैलोक्याचें भय सतत दूर करण्याचा तुला सतत छंदच आहे ! तुझ्या भुवयांचा प्रभाव मी काय वर्णन करूं ? त्या थोड्या जरी तूं वांकड्या केल्यास तरी त्यांना पाहून, जगाला आपल्या धाकांत ठेवूं पहाणारे प्रचंड दैत्य, राक्षसहि घाबरतात, देवहि पण घाबरतात. "भीषास्माद्वातः पवते भीषोदेति सूर्यः" हें वेदवाक्य प्रसिद्धच आहे. आई ! तुझ्या त्या भुवया अत्यंत सुंदर आहेत. त्यांना उपमा देण्याइतकें जगांत सुंदर असें दुसरें कांहींच नाहीं. तुझ्या त्या किंचित् वांकड्या असलेल्या दोन भुवया हें मदनाचें धनुष्यच आहे असें मी समजतों. मदनाचें धनुष्य फुलांचें आहे. त्यानें तो

सर्व जग जिंकतो, पण शंकरांना जिंकावयास तें धनुष्य उपयोगाला येईना. म्हणूनच कीं काय, तुझ्या भ्रुकुटींना त्यानें आपलें धनुष्य केलें. त्याच्या धनुष्याची दोरी ही भ्रमरांची असते म्हणून. त्यानें तुझ्या डोळ्यांनाच भ्रमर असें समजून त्यांची दोरी केली ! डोळे हे भ्रमराप्रमाणेंच कृष्णवर्ण आणि चंचल दिसतात. गुण शब्दाचा अर्थ या ठिकाणीं धनुष्याची दोरी असा आहे. तात्पर्य, मदनानें शंकरांना जिंकण्याकरितां आपल्या डाव्या हातानें तें धनुष्यच धारण केलेलें आहे असें वाटतें. सव्य म्हणजे उजवा आणि सव्येतर म्हणजे डावा. धनुष्य सज्ज करण्याकरितां प्रायः डाव्या हातानें तें धारण केलें जातें हें प्रसिद्धच आहे. मदनानें तें धनुष्य आपल्या डाव्या हातानें धारण केलें असतांना त्या धनुष्याचा मध्यभाग मदनाच्या मुठीनें झांकला जातो आणि दोरीचाहि मध्यभाग कोपर आणि मनगट यांच्या मधल्या भागानें झांकला जातो. मुष्टि म्हणजे मूठ आणि प्रकोष्ठ म्हणजे कोपर आणि मनगट यांच्यामधला भाग. हे दोन्ही मदनाच्या मुठीमुळें व हातानें झांकले गेल्यामुळें त्यांचें अंतर म्हणजे मध्यभाग लोकांना दिसत नाहीं. आई ! तूं उमा आहेस. उ म्हणजे भगवान् शंकर आणि त्यांची मा म्हणजे प्रत्यक्ष मूर्तिमंत लक्ष्मीच तूं ! म्हणूनच तुझ्या साहाय्यानें कामदेव शंकरांना जिंकण्याचा प्रयत्न करतो. तात्पर्य, तुझ्या भुवया, तुझे डोळे आणि नासिका यांचें सौंदर्य अवर्णनीय आहे. आई, माझ्यावर कृपा कर.

सोन्याच्या पत्र्यावर समभुज चतुष्कोण काढून त्याच्या मधोमध एकाखालीं एक ह्रीं ह्रीं ह्रीं अशीं तीन बीजें लिहावीं. पंचवीस दिवस पूजा करून या श्लोकाचा रोज सात हजार जप करावा. तें यंत्र धारण करावें. अथवा भस्म अभिमंत्रून धारण करावें. मध, नारळ आणि केळें यांचा नैवेद्य दाखवावा. यानें देवता वश होईल. सर्व लोक वश होतील.

अहः सूते सव्यं तव नयनमर्कात्मकतया
त्रियामां वामं ते सृजति रजनी-नायकतया ।
तृतीया ते दृष्टिर्दर-दलित-हेमाम्बुज-रुचिः
समाधत्ते सन्ध्यां दिवसनिशयोरन्तरचरीम् ॥ ४८ ॥

आई त्रिपुरसुंदरी ! तुझा उजवा नेत्र हा सूर्यस्वरूप असल्यामुळें तो दिवस निर्माण करतो. त्याचप्रमाणें डावा डोळा हा चंद्रस्वरूप असल्यामुळें तो

रात्र निर्माण करतो. किंचित् विकसित झालेल्या सुवर्णकमलाप्रमाणें – रक्तकमलाप्रमाणें आरक्तवर्ण दिसणारा तुझा तिसरा नेत्र प्रत्यक्ष अग्निस्वरूप असल्यामुळें तो रात्र आणि दिवस, तसेंच दिवस आणि रात्र यांच्या संधिकालांत संध्याकाळ निर्माण करतो. आई ! तुझ्या नेत्रांचा महिमा मी काय वर्णन करूं ! एक सूर्याच्या रूपानें सर्व विश्वाला प्रकाश देतो व आपआपल्या कार्याकडे प्रवृत्त करतो. दुसरा चंद्राच्या रूपानें सर्व विश्वाला आल्हाद देतो, तर तिसरा अग्नीच्या रूपानें यज्ञयागादि कर्मांचें आणि जगाच्या जीवनव्यवहाराचें साधन बनला आहे. वैश्वानराच्या रूपानें प्राणिमात्राच्या देहांत तो रहातो. तूं आणि विश्वेश्वर दोघेहि त्रिनेत्र असल्यामुळें तुम्ही दोघेंहि एकरूपच आहां. आई ! तुला मी नमस्कार करतों. कालाचा परिच्छेद करणारें सूर्यचंद्र हे तुमचे नेत्र असल्यामुळें तुम्ही कालातीत आहां असाहि ध्वन्यर्थ या स्तुतींत आहेच.

वु	शु	च
गु	र	कु
रा	ञ	के

यंत्र क्रमांक २८

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर लिहून एकोणीस दिवस त्याची पूजा करावी. खिचडी, केळें आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. रोज या श्लोकाचा एक हजार जप करावा. हें यंत्र धारण केल्यानें नवग्रहांची पीडा टळते.

विशाला कल्याणी स्फुटरुचिरयोध्या कुलवधैः
कृपाधाराधारा किमपि मधुराभोगवतिका ।
अवन्ती दृष्टिस्ते बहु-नगर-विस्तार-विजया
ध्रुवं तत्तन्नाम-व्यवहरण-योग्या विजयते ॥ ४९ ॥

आई जगज्जननी ! तुझी दृष्टि म्हणजे अवलोकन करण्याची पद्धति ही आठ प्रकारची आहे. विशाला, कल्याणी, अयोध्या, धारा, मधुरा, भोगवती, अवन्ती आणि विजया अशीं हीं त्या आठ दृष्टींचीं नांवें आहेत. नांवाप्रमाणेंच त्यांचे अर्थहि आहेत. विशाला दृष्टि ही नित्य अंतर्विकसित स्वरूपाची असते. म्हणूनच तिला विकसिता असेंहि म्हणतात. कल्याणी दृष्टि ही असूयादि दोषरहित

असून नित्य प्रसन्न असते. भक्तजनांचें कल्याण करते. हिलाच विस्मिता असें म्हणतात. अयोध्या शब्दाचा अर्थ युद्ध करण्यास, सामना करण्यास कठीण असा आहे. अयोध्यादृष्टीची कांति ही अत्यंत स्पष्ट असते. कुवलय म्हणजे नीलकमल, त्यांनाहि तिचा पराभव करतां येत नाहीं. अर्थात् नीलकमलापेक्षांहि ती अत्यंत मनोहर असते. स्मेरकनीनिका असेंहि हिला म्हणतात. कारण यांत डोळ्यांतील बाहुल्या प्रफुल्लित अथवा विकसित झालेल्या असतात. धारादृष्टि ही जणुं कांहीं कृपेचा आधारच असते. ती नित्य करुणापूर्ण असते. करुणेचा वर्षाव तिच्यांतून होत असतो. हिला अलसा असेंहि म्हणतात. 'किमपि मधुरा' म्हणजे अनिर्वचनीय माधुर्यानें युक्त. हिला वलिता अथवा विलसिता असेंहि म्हणतात. भोगवतिका म्हणजे सुख-साक्षात्काराची सूचक. कांहीं लोक या ठिकाणीं आभोगवतिका असेंहि पद काढतात व दीर्घ असा त्याचा अर्थ करतात. हिला स्निग्धा असें म्हटलें जातें. अवंती म्हणजे भक्तजनांचें रक्षण करणारी. हिलाच मुग्धा असें म्हणतात. आणि 'बहुनगरविस्तारविजया' म्हणजे अनेक नगरांच्या विस्तार-वैभवावर मात करणारी, विजयशील. हिलाच आकेकरा असें म्हणतात. अर्धोन्मीलित कटाक्षयुक्त अशी या दृष्टीची अवस्था असते. आई! अशी तुझी दृष्टि "ध्रुवं" म्हणजे खरोखर, त्या त्या नांवांनीं व्यवहार करण्याला अत्यंत योग्य असून मोठी सर्वोत्कृष्ट आहे.

या आठ नांवांनीं प्रसिद्ध असलेल्या आठ नगरी ह्या जणुं कांही श्रीत्रिपुर-सुंदरीच्या दृष्टीची विशिष्ट अवस्थाच सूचित करीत आहेत. विशाला म्हणजे बदरीनाथनगरी हिमालयांत आहे. कल्याणी — कल्याणनगरी मुंबईजवळ. अयोध्या-दक्षिण प्रदेश. धारा — धारनगरी, माळवा. मधुरा — मथुरा, आग्र्याजवळ. अथवा मदुरा असेंहि कांहीं लोक मानतात. भोगवतिका, अमरावती. अवंती म्हणजे उज्जैन आणि विजया म्हणजे विजयनगर अथवा विजापूर इत्यादि. अशी या दृष्टीच्या आसपास कल्पना योजिली आहे. मंत्रशास्त्रामध्यें या दृष्टींची भिन्न भिन्न कार्यें वर्णन केलेली आहेत. संक्षोभण, आकर्षण, द्रावण, उन्मादन, वशीकरण, स्तंभन, विद्वेषण आणि मारण अशीं त्यांचीं नांवें आहेत. आई! तुझी दृष्टि अवलोकनीय आहे. ती माझ्यावर सदा प्रसन्न असो.



यंत्र क्रमांक २९

हें यंत्र हळकुंडावर लिहून पंचवीस दिवस त्याची पूजा करावी. शिजविलेले मूग आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा, रोज या श्लोकाचा एक हजार जप करावा. नंतर तें हळकुंड विस्तवावर भाजावें. तिळाच्या तेलांत खलावें. मांजराप्रमाणें डोळे असलेल्या पंधरा वर्षांच्या मुलाच्या हातानें डोळ्यांत अंजन करावें. याच्या योगानें भूमिगत धन दिसेल.

कवीनां संदर्भ-स्तवक-मकरन्दैक-रसिकं
कटाक्ष-व्याक्षेप-भ्रमर-कलभौ कर्ण-युगलम् ।
अमुञ्चन्तौ दृष्ट्वा तव नवरसास्वादतरला-
वसूयासंसर्गादलिक-नयनं किञ्चिदरुणम् ॥ ५० ॥

आई जगज्जननी ! तुझ्या भालप्रदेशीं असलेला तृतीय नेत्र हा अरुणवर्ण आहे. त्याचें कारण मला असें वाटतें कीं, व्यास, वाल्मीकि अथवा शिव, विष्णु इत्यादि कवींनीं (कवि शब्दाचा अर्थ त्रिकालज्ञ तत्त्ववेत्ता असाहि आहे) केलेले रसभरित काव्यग्रंथ हेच कोणी पुष्पगुच्छ. त्यांतील पुष्परस प्रामुख्यानें सेवन करण्यांत तत्पर असलेल्या तुझ्या दोन्ही कानांची संगति तुझे नेत्र कधींच सोडीत नाहींत. तुझ्या कानांवरोवर तुझे दोन्ही नेत्र देखील जणुं कांहीं "नवरसास्वादतरलौ" नवरसांचा – शृंगारादि नऊ रसांचा अथवा ताज्या रसाचा आस्वाद घेण्यास अत्यंत उत्सुक झालेले दिसत आहेत. नेत्र कसले ? जणुं कांहीं कटाक्षांच्या मिषानें दोन छोटेसे भ्रमरच आहेत ते. भ्रमर म्हणजे भुंगा. कलभ म्हणजे छावा. लहान भ्रमर असा या ठिकाणीं अर्थ करावा. नेत्रकटाक्षहि भ्रमराप्रमाणें कृष्णवर्ण आणि चंचल दिसतात. ते भ्रमर तुझ्या कानांची संगति सोडीतच नाहीत. तेहि कानांवरोवर सदासर्वकाळ तुझें गुणवर्णन करणाऱ्या उत्तम कवींच्या काव्यांचा रसास्वाद लुटित आहेत. तो आपल्याला मात्र मिळत नाहीं असें पाहून त्यांच्याबद्दल असूया निर्माण झाल्यामुळेंच कीं काय हा "अलिकनयन" म्हणजे भालप्रदेशीं असलेला तृतीय नेत्र रागावला आहे आणि

त्यामुळें तें किंचित् अरुणवर्ण दिसत आहे. तात्पर्य, आई तुझे नेत्र कानांपर्यंत पसरलेले विशाल आणि दीर्घ आहेत. सामुद्रिकशास्त्रदृष्ट्या हें मोठें भाग्याचें लक्षण आहे. तूं सर्वैश्वर्यसंपन्न आहेस. मी तुझ्या चरणीं अनन्य, भावानें प्रणाम करतों. प्रसन्न हो.



यंत्र क्रमांक ३०

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर लिहून त्याची चार दिवस पूजा करावी. साखर, खडीसाखर, गूळ, केळें, मध आणि नारळ यांचा नैवेद्य दाखवावा. रोज एक हजार वेळ या श्लोकाचा जप करावा. तें यंत्र धारण करावें. अथवा पाणी अभिमंत्रून प्यावें. याच्या योगानें देवी येणार नाहींत.

शिवे शृङ्गाराद्रौ तदितरजने कुत्सनपरा
सरोषा गङ्गायां गिरिशचरिते विस्मयवती ।
हराहिभ्यो भीता सरसिरुहसौभाग्यजननी
सखीषु स्मेरा ते मयि जननि दृष्टिः सकरुणा ॥ ५१ ॥

आई जगज्जननी ! तुझ्या दृष्टीमध्यें नऊहि रस परिपूर्ण भरलेले आहेत. भगवान् सदाशिव यांच्याकडे तूं पहातेस तेव्हां तुझी दृष्टि ही शृंगाररसानें आर्द्र झालेली असते. श्रीशंकरांहून भिन्न असलेल्या इतर देवतांकडे तसेंच इतर जनांकडे तू तुच्छबुद्धीनें पहातेस. ते परकीय आहेत या भावनेनें तूं त्यांचा तिरस्कार करतेस. त्यांच्याविषयी तुझी दृष्टि "कुत्सनपरा" म्हणजे बीभत्सरसानें युक्त असते. बीभत्सरसाचा स्थायीभाव म्हणजेच कुत्सा, तिरस्कार होय. तूं गंगेकडे पहातेस तेव्हां तुझी दृष्टि क्रोधाविष्ट असते. क्रोध हा रौद्ररसाचा स्थायी-भाव आहे. आई, तुझी दृष्टि शंकरांचें चरित्र पाहून विस्मयानें, आश्चर्यानें युक्त झालेली आहे. शंकरांच्या चरित्राकडे पाहिलें म्हणजे सारेंच चमत्कारिक दिसतें. स्मशानांत रहाणें. अंगावर वीटभर विभूति नाहीं. दिगंबर ! चिताभस्माचें लेपन. हें सर्व असूनहि पुन्हां ते विश्वनाथ, विश्वेश्वर, शिव म्हणजे मंगलमय, शंकर

म्हणजे कल्याणकर अशाहि नांवांनीं व्यवहारिले जातात. शंकरांच्या जीवनांत अद्भुतता आहे. अद्भुतरसाचा स्थायीभाव म्हणजे विस्मय, आश्चर्य. तें तुझ्या दृष्टीमध्यें स्पष्ट दिसत आहे. आई त्रिपुरसुंदरी, शंकरांच्या गळ्यांत, मस्तकावर, दंडांत, मनगटांत, पायांत आणि कमरेभोंवतीं सापांचीं वेटोळीं पाहून तुझ्या दृष्टींत भीतीहि पण दिसत आहे. भीति वाटणें हा भयानकरसाचा स्थायीभाव आहे. सरसीरुह म्हणजे कमळें. त्यांची शोभा, सौंदर्य तूं आपल्या दृष्टीनें जिंकलें आहेस. विजय हा वीररसाचा स्थायीभाव आहे. तूं आपल्या सखीजनांकडे जेव्हां पहातेस तेव्हां आनंदानें प्रफुल्लित होतेस. मुखविकास आणि दृष्टिविकास हा हास्यरसाचा स्थायीभाव आहे. स्मेरा शब्दाचा अर्थ प्रफुल्लित अथवा स्मितयुक्त असा आहे. आई! माझ्याकडे अथवा माझ्यासारखे जे भक्तजन असतील त्यांच्याकडे तूं कृपापूर्ण दृष्टीनें पहातेस. कृपा हा करुणरसाचा स्थायीभाव आहे. शांतरस हा निरुपाधिक निजानंदस्वरूप अनिर्वचनीय आहे. तो तर तुझ्या ठिकाणीं स्वतःसिद्धच आहे!! तेंच तुझें स्वरूप आहे.

सोन्याच्या पत्र्यावर अरुंद उभा चतुष्कोण काढून त्यामध्यें एकाखालीं एक क्लीं क्लीं क्लीं अशीं तीन बीजें लिहावींत. पंचेचाळीस दिवस पूजा करून रोज या श्लोकाचा एक हजार जप करावा. यंत्र धारण करावें. सर्व लोक वश होतील. चंदनावर हें यंत्र कोरून वरीलप्रमाणें अनुष्ठान करावें. त्या चंदनाचा तिलक धारण केल्यानेंहि वर सांगितलेलें फळ मिळते. नैवेद्य उडदाचे वडे आणि मध.

गते कर्णाभ्यर्णं गरुत इव पक्ष्माणि दधती
पुरां भेत्तुश्चित्त-प्रशम-रस-विद्रावण-फले ।
इमे नेत्रे गोत्रा-धर-पति-कुलोत्तंस-कलिके
तवाकर्णाकृष्ट-स्मर-शर-विलासं कलयतः ॥ ५२ ॥

हे जगज्जननी माते! तूं पर्वतराज हिमाचलाच्या वंशाचें शिरोभूषण असलेल्या तुऱ्यांतील एक पुष्पकलिकाच आहेस! गोत्रा म्हणजे पृथ्वी. ती गाईचें अथवा जलाचें रक्षण करते. म्हणून तिला गोत्रा असें म्हणतात. तिला "धर" म्हणजे धारण करणारे पर्वत, त्यांचा पति म्हणजे राजा, अर्थात् गोत्राधरपति या शब्दाचा अर्थ हिमालयपर्वत असा झाला. त्याचें कुल म्हणजे वंश. त्या वंशाचा उत्तंस म्हणजे शिरोभूषण असलेला तुरा. त्यांतील कलिका म्हणजे कळी.

असा या विशेषणाचा शब्दार्थ आहे. तुझे कानांच्या जवळ जाऊन पोहोंचलेले विशाल व दीर्घ नेत्र हे जणुं कांहीं मदनाचे दोन बाणच आहेत असें वाटतें. बाणाला गति मिळावी म्हणून मागच्या बाजूस पिसें जोडलेलीं असतात. तुझ्या पापण्या हींच जणुं कांहीं पिसें या बाणांनीं धारण केलेलीं आहेत. बाणाला पातें म्हणजे लोखंडाचें तीक्ष्ण धारेचें टोंकदार पान बसविलेलें असतें व लक्ष्याचा भेद करणें हें त्याचें कार्य असतें. आई ! तुझे कटाक्ष हे बाणाच्या टोंकाप्रमाणें तीक्ष्ण असून ते त्रिपुरासुराचा वध करणारे भगवान् श्रीशंकर यांच्या वैराग्यमूलक शांतरसाचा भेद करणारे आहेत. सृष्टीच्या प्रारंभीं परब्रह्मस्वरूप अत्यंत विरक्त आणि शांत असलेल्या श्रीसदाशिवाच्या अंतःकरणांत सृष्टीच्या उत्पत्तीला अनुरूप अशा संकल्पाचें स्फुरण तुझ्या कटाक्षामुळेंच होत असतें. तात्पर्य, हे त्रिपुरसुंदरी ! तुझे हे दोन्ही नेत्र जणुं कांहीं शरसंधान करण्याकरितां कामदेवानें कानांपर्यंत ताणून धरलेल्या बाणांचाच खेळ खेळत आहेत, असें वाटतें.

सोन्याच्या पत्र्यावर चतुष्कोण काढून त्याच्या मध्यभागीं रं हें बीज लिहावें. पंचेचाळीस दिवस यंत्राची समाराधना करावी. या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. तीळ-तांदुळ यांची खिचडी व क्षीरपायसाचा नैवेद्य दाखवावा. हें यंत्र धारण केल्यानें कानाचे व डोळ्याचे विकार नाहींसे होतात.

विभक्त-त्रैवर्ण्यं व्यतिकरित-लीलाञ्जनतया
विभाति त्वन्नेत्र-त्रितयमिदमीशान-दयिते ।
पुनः स्रष्टुं देवान्द्रुहिण-हरि-रुद्रानुपरतान्
रजः सत्त्वं बिभ्रत्तम इति गुणानां त्रयमिव ॥ ५३ ॥

हे आई जगज्जननी ! ईशान म्हणजे भगवान् सदाशिव यांची तूं अत्यंत दयिता म्हणजे प्रिय आहेस. म्हणून तुला ईशानदयिता असें म्हटलें जातें. आई ! तुझे हे तीन नेत्र, ज्यांच्यांतील तीन वर्ण शुक्ल रक्त आणि नील हे अगदी सुस्पष्ट दिसत आहेत. त्यांतच लीलेनें अंजन धारण केलेलें असल्यामुळें ते फारच सुंदर दिसत आहेत. शुक्ल, रक्त आणि नील हे तीन वर्ण तीन गुणांचे द्योतक आहेत. ते तीन गुण म्हणजे सत्त्वगुण, रजोगुण आणि तमोगुण. शुक्लवर्ण हा सत्त्वगुणाचा द्योतक आहे तर रक्तवर्ण हा रजोगुणाचा द्योतक आहे. नील शब्द हा संस्कृतमध्यें नील आणि कृष्ण या दोन्ही

अर्थानें उपयोगांत आणतात. तो नीलवर्ण तमोगुणाचा द्योतक आहे. त्रिपुरसुंदरीचे तीन नेत्र हे सूर्य, चंद्र आणि अग्निस्वरूप असल्यामुळें सूर्याची श्वेतता, चंद्राची श्यामलता आणि अग्नीची आरक्तता तिच्या तिन्ही नेत्रांत प्रतीतीस येत असते. प्रत्येक नेत्रांतहि शुक्ल, रक्त आणि कृष्ण हे तीन वर्ण असतातच. डोळ्यांतील शुक्लमंडळ आणि कृष्णमंडळ हें प्रसिद्धच आहे. त्याचप्रमाणें नेत्रामध्यें रक्तवर्णाच्या छटा किंवा रेषा असणें हें सामुद्रिकशास्त्रदृष्ट्या मोठ्या भाग्याचें लक्षण समजलें जातें. तें त्रिपुरसुंदरीच्या नेत्रांमध्यें असणें स्वाभाविकच आहे. आई ! तुझ्या नेत्रांनीं सृष्टिकाली ब्रह्मदेवाला, विष्णूला आणि रुद्राला जन्म देण्याकरितां जणुं कांहीं सत्त्व, रज आणि तम हे तीन गुणच धारण केलेलें आहेत असें वाटतें. ब्रह्मदेव, विष्णु आणि रुद्र हे प्रलयकालीं परब्रह्मस्वरूप ईशान तत्त्वामध्यें लीन झालेले असतात. म्हणून त्यांना 'उपरतान्' असें विशेषण दिलेलें आहे. द्रुहिण म्हणजे ब्रह्मदेव हे रजोगुणापासून उत्पन्न झालेले आहेत. हरि म्हणजे विष्णु हे सत्वगुणापासून उत्पन्न झालेले आहेत. रुद्र म्हणजे शंकर हे तमोगुणापासून उत्पन्न झालेले आहेत, असा शास्त्रसिद्धान्त आहे. सहस्रदलकमलामध्यें ज्या सदाशिव-तत्त्वाशीं श्रीमहात्रिपुरसुंदरीचें सामरस्य सांगितलें गेलें आहे तें सदाशिवतत्त्व या शंकरांहून निराळें आहे, हें अर्थातच सिद्ध झालें. आई ! तुझ्या नेत्रांचा केवढा हा महिमा आहे ! "हे ईशानदयिते, त्वन्नेत्रत्रितयं देवान् स्रष्टुं रजः सत्वं तमः इति गुणानां त्रयं बिभ्रत् इव भाति" असा या श्लोकांतील मुख्य अन्वय आहे.

सोन्याच्या पत्र्यावर अधोमुख त्रिकोण काढून त्या मध्यें हा हें अक्षर लिहावें. दिवा लावून पंचेचाळीस दिवस पूजा करावी. या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. गूळ, पुऱ्या, वडा यांचा नैवेद्य दाखवावा. कांहीं लोक या श्लोकाचा तीन हजार जप करावा असें सांगतात. दिवा जर उज्ज्वल होत राहील तर कार्यसिद्धीला काल अनुकूल आहे असें समजावें. दिवा जर मंदावत राहील तर कार्यसिद्धीला काल प्रतिकूल आहे असें समजावें.

पवित्रीकर्तुं नः पशुपति-पराधीन-हृदये
दयामित्रैर्नेत्रैररुण-धवल-श्याम-रुचिभिः ।
नदः शोणो गङ्गा तपन-तनयेति ध्रुवममुं
त्रयाणां तीर्थानामुपनयसि सम्भेदमनघम् ॥ ५४ ॥

आई जगज्जननी ! पशुपति म्हणजे सर्व जीवांचे स्वामी भगवान् सदाशिव. तूं आपलें चित्त त्यांच्या स्वाधीन केलेलें आहेस. अर्थात् त्यांच्याशीं समरस होऊन सर्व जीवांचें तूंच दयापूर्ण दृष्टीनें संरक्षण करतेस. तुझे नेत्र नेहमीं दया-मित्र म्हणजे दयेनें पूर्ण भरलेले आहेत. दया ही मित्राप्रमाणे त्या नेत्रांच्या नित्य सान्निध्यांत आहे. त्या नेत्रांची कांति अरुण म्हणजे आरक्त, धवल म्हणजे शुभ्र आणि श्याम म्हणजे नील अथवा कृष्णवर्ण आहे. जणुं कांहीं आम्हांला पवित्र करण्याकरितां तुझ्या मुखकमलीं हा त्रिवेणीसंगमच विराजमान झालेला आहे. प्रसिद्ध त्रिवेणीसंगमांत गंगा, यमुना आणि सरस्वती असतात, तर या त्रिवेणीसंगमांत गंगा, यमुना आणि शोणभद्र या तिघांचा संगम असल्याचें दिसत आहे. गंगा ही श्वेतवर्ण सत्त्वगुणाची द्योतक आहे, तर यमुना ही नीलवर्ण तमोगुणाची द्योतक आहे. शोणनद हा रक्तवर्ण रजोगुणाचा द्योतक मानला जातो. तात्पर्य, आई या तिन्ही पवित्र तीर्थांचा संगम भक्तजनांच्या कल्याणा-साठीं तूं आपल्या मुखकमलीं नेत्ररूपानें धारण केलेला आहेस. भक्तजन केवल त्यांच्या दर्शनानें सर्व पापांतून मुक्त होतात. संभेद शब्दाचा अर्थ संगम असा आहे.



यंत्र क्रमांक ३१

सोन्याच्या पत्र्यावर हें यंत्र लिहून पंचेचाळीस दिवस पूजा करावी. रोज एक हजार वेळ या श्लोकाचा जप करावा. गूळ, पायसाचा नैवेद्य दाखवावा. सिद्धयंत्र धारण करावें. यानें सर्व योनिरोग नाहींसे होतात.

निमेषोन्मेषाभ्यां प्रलयमुदयं याति जगती
तवेत्याहुः सन्तो धरणिधर-राजन्य-तनये ।
त्वदुन्मेषाज्जातं जगदिदमशेषं प्रलयतः
परित्रातुं शङ्के परिहृत-निमेषास्तव दृशः ॥ ५५ ॥

आई जगज्जननी ! डोळ्यांच्या पापण्या झांकणें आणि उघडणें यांना उन्मेष आणि निमेष असें म्हणतात. तूं डोळ्यांच्या पापण्या झांकल्यास कीं जगाचा

प्रलय होतो आणि त्या उघडल्या म्हणजे जगाची उत्पत्ति होते, असें सज्जन तत्त्ववेत्ते म्हणतात. हे नगाधिराजतनये माते पार्वती, तुझ्या उन्मेषापासून हें सर्व जग उत्पन्न झालेलें आहे. याचा प्रलय होतां कामा नये. याचें संरक्षण केलें पाहिजे अशा भावनेनेंच कीं काय, मला असें वाटतें कीं, या जगाचें संरक्षण करण्याकरितां तुझ्या दृष्टीनें निमेष करण्याचें अर्थात् पापण्या मिटविण्याचें कार्य सोडून दिलेलें आहे. देव हे स्वभावतःच अनिमेष असतात. त्रिपुरसुंदरी तर देवांचीहि देव आहे. म्हणून सृष्टिकाळीं तिच्या दृष्टीनें जगाचा प्रलय होऊं नये म्हणून तिनें निमेषक्रिया सोडून दिलेली आहे असें वाटतें. असो. आचार्यांनीं वस्तुस्थितीला धरून मोठें सुंदर वर्णन केलेलें आहे. आई, तुझ्या दृष्टीचा महिमा अपूर्व आहे ! तूं माझ्यावर अनुग्रह कर, हीच माझी प्रार्थना आहे.

श्लोक सहामध्यें सांगितल्याप्रमाणें सोन्याच्या पत्र्यावर यंत्र काढून त्यांत मध्यभागीं फक्त ह्रूं ह्रूं हीं दोन अक्षरें लिहावींत. कांहीं ठिकाणीं " वंला संला " अशीं हीं अक्षरें आढळतात. पंचेचाळीस दिवस पूजा करावी. रोज या श्लोकाचा एक हजार वेळ जप करावा. केळें, दूध, पायस, मध आणि तांबूल यांचा नैवेद्य दाखवावा. यंत्र धारण करावें. यानें वृषणव्याधि निरस्त होतील.

तवापर्णे कर्णेजप-नयन-पैशून्य-चकिता
निलीयन्ते तोये नियतमनिमेषाः शफरिकाः ।
इयं च श्रीर्बद्ध-च्छद-पुट-कवाटं कुवलयं
जहाति प्रत्यूषे निशि च विघटय्य प्रविशति ॥ ५६ ॥

श्री म्हणजे सौंदर्य, आह्लादकत्व इत्यादि धर्म हे कमलाच्या ठिकाणीं असतात. हे सर्व धर्म डोळ्यांच्या ठिकाणीं असणें हें सामुद्रिकशास्त्रदृष्ट्या उत्तम भाग्याचें लक्षण समजलें जातें. श्रीत्रिपुरसुंदरीच्या नेत्रांमध्यें हे सर्व गुण पराकोटीचे आहेत. आचार्य या श्लोकांत त्यांचें वर्णन मोठ्या गमतीनें करीत आहेत. आई, तुझ्या भजनानें भक्त ऋणमुक्त होतात. म्हणून तुला 'अपर्णा' असें म्हटलेलें आहे. " अपगतं ऋणं यया सा अपर्णा " जिच्यामुळें अर्थात् जिच्या कृपेनें ऋण नाहींसें होतें ती अपर्णा. ईश्वरानें आपल्याला हा देह दिलेला आहे तो आत्मस्वरूपाचा यथार्थ साक्षात्कार करून घेऊन कृतार्थ होण्यासाठीं दिलेला आहे. ईश्वराचें आपल्यावर हें मोठें ऋण आहे. जे लोक मनुष्यदेह मिळूनहि कृतार्थ होत

नाहींत, धन्य होत नाहींत ते ईश्वराच्या क्षणांतच रहातात. जे श्रीललितामहा-त्रिपुरसुंदरीच्या चरणीं शरण जातात ते कृतार्थ होतात, म्हणूनच श्रीत्रिपुरसुंदरीला अपर्णा असें म्हणतात. आई, तुझे डोळे विशाल, दीर्घ, तरळ आणि सुंदर आहेत. ते कानांपर्यंत पसरलेले आहेत. जणुं कांहीं ते "आपल्या ठिकाणचें तरलत्व, दीर्घत्व इत्यादि गुण माशांनीं चोरून नेले. नीलकमलांनीं आपलें सौंदर्य चोरून नेलें." अशा रीतीनें तुझ्या कानांशीं लागून कांहीं तरी आपल्याबद्दल चहाडी करीत आहेत असें माशांना आणि नीलकमलांना वाटतें. त्यामुळें तुझा राग सहन करावा लागेल या भीतीनें मासे पाण्यांत जाऊन लपले. ते डोळ्यांची उघडझांपहि करीत नाहींत आणि ही नीलकमलांतली श्री म्हणजे शोभा "प्रत्यूषे" म्हणजे उषःकालीं, सूर्योदयाच्या वेळीं त्या नीलकमलांना सोडून जाते म्हणूनच दिवसा नीलकमलांची दलरूपी कवाडें बंद असतात. आई! दिवसा ती शोभा तुझ्या नेत्रांच्या ठिकाणीं येऊन वास्तव्य करते आणि रात्र झाली कीं त्या नीलकमलांचीं दारें उघडून नीलकमलांत प्रवेश करून बसते! रात्रीच्या वेळीं नीलकमलें विकसित होत असतात. तात्पर्य, तुझे नेत्र माशाप्रमाणें तरल आणि दीर्घ आहेत तर नीलकमलांप्रमाणें ते अत्यंत सुंदर आहेत. या श्लोकांतील पूर्वार्धांत उत्प्रेक्षा आणि उत्तरार्धांत अतिशयोक्ति हे अलंकार आहेत.



यंत्र क्रमांक ३२

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर काढून पंचेचाळीस दिवस समाराधना करावी. सुसरीच्या अथवा माशाच्या दांतांवरहि हें यंत्र कोरून त्याची समाराधना करतात. रोज वीस हजार वेळ या श्लोकाचा जप करावा. मधाचा नैवेद्य दाखवावा. हें यंत्र धारण करावें. सेवक वश होतील. अधिकारीहि वश होतील. कारागारांतून मुक्तता होईल. हें यंत्र धारण करणाऱ्यानें प्रार्थना केल्यास पाऊसहि पडेल.

दृशा द्राघीयस्या दर-दलित-नीलोत्पलरुचा
दवीयांसं दीनं स्नपय कृपया मामपि शिवे।
अनेनायं धन्यो भवति न च ते हानिरियता
वने वा हर्म्ये वा सम-करनिपातो हिमकरः॥ ५७॥

आई जगज्जननी ! तुझें स्वरूप मंगलमय आहे. तूं आपल्या किंचित् विकसित झालेल्या, नीलकमलाप्रमाणें सुंदर असलेल्या, अत्यंत दीर्घ आणि विशाल अशा नेत्रानें तुझ्यापासुन दूर असलेल्या दीनजनांकडे आणि माझ्याकडेहि कृपेनें पहा. तूं आपल्या कृपापूर्णदृष्टीनें आम्हांला स्नान घाल. तूं आपल्या कृपादृष्टीची पाखर आमच्यावर पडूं दे. अयं म्हणजे हा दीनजन अर्थात् आम्ही भक्त. तूं आमच्याकडे केवळ कृपादृष्टीनें पाहिलेंस तरी आम्ही धन्य होऊं आणि आमच्याकडे नुसत्या कृपादृष्टीनें पहाणें एवढ्यानें तुझी कांहींच हानि नाहीं. त्यांत कांहीं तुझें गाठोडें खर्च होत नाहीं. सर्वभूतांठायीं तुझी दृष्टि सम असल्यामुळें आम्हां दीनजनांवर कृपा करणें हें तुला भूषणावहच आहे. चंद्र हा कधीं "ही श्रीमंताची हवेली आहे, हिला चांदण्यानें भूषवावें आणि हें ओसाड अरण्य आहे किंवा ही गरिबाची झोंपडी आहे हिच्यावरील चांदणें आवरावें" असा विचार करतो कां ? तो आपलें चांदणें सर्वांवर सारखेच पसरतो. चौथ्या चरणांत अर्थांतरन्यास अलंकार आहे.

सोन्याच्या पत्र्यावर लंबचतुष्कोण काढून त्याच्या पोटांत एकाखालीं एक श्रीं श्रीं अशीं दोन बीजाक्षरें लिहावींत. सहा दिवस आराधना करावी. रोज एक हजार वेळ या श्लोकाचा जप करावा. कांहीं ग्रंथांतून रोज पंचवीस हजार वेळ या श्लोकाचा जप करावा असाहि निर्देश केलेला आहे. दुधाचा पायस आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. हें सिद्ध यंत्र धारण केल्यास साधक मोठा भाग्यवान होईल.

अरालं ते पालीयुगलमग-राजन्य-तनये
न केषामाधत्ते कुसुम-शर-कोदण्ड-कुतुकम् ।
तिरश्चीनो यत्र श्रवणपथमुल्लङ्घ्य विलस-
न्नपाङ्गव्यासङ्गो दिशति शरसंधान-धिषणाम् ॥ ५८ ॥

हे आई जगज्जननी ! "अग" म्हणजे पर्वत. त्यांच्यांत "राजन्य" म्हणजे श्रेष्ठ असलेला, अर्थात् नगाधिराज हिमालय, त्याची तूं तनया म्हणजे कन्या आहेस. "अराल" म्हणजे कुटिल अर्थात् धनुष्याकार वांकड्या असलेल्या या तुझ्या कानांच्या पाळ्या देखील कोणाच्या बरें अंतःकरणांत, हें जणुं कांहीं मदनाचें धनुष्य आहे, असें कुतूहल निर्माण करणार नाहींत ? त्या धनुराकार नम्र

कानांच्या पाळ्या पाहून कोणालाहि हें कामदेवाचें धनुष्य आहे असें त्याच्याबद्दल कौतुक वाटेल. "अपाङ्गव्यासङ्ग" म्हणजे तुझ्या कटाक्षांचा तो दीर्घपणा किंचित् वांकडा आणि कानांच्या मार्गाचें उल्लंघन करून उठावदारपणें दिसणारा जणुं कांहीं तो मदनानें धनुष्याला जोडलेला बाणच आहे कीं काय, असा भास निर्माण करीत आहे. तात्पर्य, तुझ्या कर्णपाळी आणि तुझे कटाक्ष हे अत्यंत सुंदर आहेत. ते आमचें कल्याण करोत.

श्लोक ३ मध्यें दिलेल्या यंत्र क्रमांक ९ प्रमाणें सोन्याच्या पत्र्यावर ऊर्ध्वमुख व अधोमुख असे एकमेकांना छेद करणारे दोन त्रिकोण काढावेत. प्रत्येक टोंकास त्रिशूलाचें चिन्ह काढावें. मधल्या षट्कोणांत श्रीं हें बीज लिहावें. सभोंवारच्या साही त्रिकोणांत क्लीं हीं बीजाक्षरें लिहावींत. पंचेचाळीस दिवस आराधना करावी. मधाचा नैवेद्य दाखवावा. रोज एक हजार वेळ या श्लोकाचा जप करावा. कांहीं ठिकाणीं पांच हजार वेळ जप करावयाचें सांगितलें आहे. हें यंत्र धारण केल्यानें लोकप्रियता, राजवशता आणि सर्व व्याधि विनिर्मुक्ति हीं फळें मिळतील. हेंच यंत्र कुंकवावर काढून वर सांगितल्याप्रमाणें आराधना करावी व तें कुंकू कपाळीं लावावें. वर सांगितल्याप्रमाणें सर्व फळें मिळतील.

स्फुरद्गण्डाभोग प्रतिफलित-ताटङ्क-युगलं
चतुश्चक्रं मन्ये तव मुखमिदं मन्मथरथम् ।
यमारुह्य द्रुह्यत्यवनिरथमर्केन्दु-चरणं
महावीरो मारः प्रमथपतये सज्जितवते ॥ ५९ ॥

आई जगज्जननी ! तुझ्या कानांमध्ये वर्तुळाकार असलेलीं हीं दोन कर्णभूषणें तुझ्या देदीप्यमान असलेल्या दोन्ही गंडस्थलामध्ये — गालांमध्ये प्रतिबिंबित झालेलीं आहेत. त्यामुळें तुझें मुखकमल हें जणुं कांहीं चार चाकें असलेला कामदेवाचा रथच आहे कीं काय असें मला वाटतें.

"महावीर" म्हणजे महापराक्रमी असलेला हा "मार" म्हणजे कामदेव या रथामध्यें बसून शंकरांशीं युद्ध करीत आहे. प्रमथगणांचे अधिपति भगवान शंकर यांनीं देखील सूर्य आणि चंद्र हीं दोन चाकें ज्याला जोडलेलीं आहेत असा पृथ्वीरूपी रथ सज्ज केलेला आहे. शंकर हे प्रमथगणांचे अधिपति आहेत. पृथ्वी हा त्यांचा रथ आहे. सूर्य आणि चंद्र हे त्या रथांचीं चाकें आहेत. असें

सामर्थ्य शंकरांचें असूनहि कामदेव केवळ श्रीत्रिपुरसुंदरीदेवीच्या मुखकमलाचा आश्रय घेऊन युद्ध करीत आहे. यावरून त्रिपुरसुंदरीच्या मुखकमलाचें सौंदर्य हें अवर्णनीय आहे हीच गोष्ट सिद्ध होते.

श्लोक ५७ मध्यें सांगितल्याप्रमाणें सोन्याच्या पत्र्यावर चतुष्कोण यंत्र काढून त्यांत मध्यभागीं एकाखालीं एक ऐं क्लीं सौः अशीं तीन अक्षरें लिहावींत. पंचेचाळीस दिवस आराधना करावी. रोज एक हजार वेळ या श्लोकाचा जप करावा. गूळ-भात आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. हें यंत्र धारण करावें. यानें सकल लोक वश होतील.

सरस्वत्याः सूक्तामृत-लहरी-कौशल-हरीः
पिबन्त्याः शर्वाणि श्रवणचुलुकाभ्यामविरलम् ।
चमत्कार-श्लाघा-चलित-शिरसः कुण्डलगणो
झणत्कारैस्तारैः प्रतिवचनमाचष्ट इव ते ॥ ६० ॥

आई जगज्जननी ! शर्व म्हणजे भगवान् शंकर त्यांची तूं अर्धांगी आहेस. तुझ्या संभाषणांतील शब्द इतके गोड असतात कीं, ते भरतें आलेल्या अमृताच्या कल्लोळाच्या माधुर्यालाहि मागें सारतील. अशा तऱ्हेचे तुझ्या संभाषणांतील मधुर शब्द प्रत्यक्ष सरस्वतीदेवी आपल्या दोन्ही कानांच्या चुळा करून निरंतर अमृताप्रमाणें प्राशन करीत असते. ती प्राशन करीत असतांना तिला जेव्हां आनंद आणि आश्चर्य वाटत असतें तेव्हां ती वाहवा करीत मान हलविते. ती मान हलवूं लागली म्हणजे तिच्या कानांतील कर्णभूषणांचा समूह एकमेकांवर आदळत असल्यामुळें त्यांचा जो मोठा झणत्कार होतो तो झणत्कार म्हणजे जणुं कांहीं तुझ्या शब्दांना तें अनुमोदनच दिलें जात आहे असें वाटतें. तात्पर्य, आई ! तुझे शब्द इतके गोड आहेत कीं, ते अमृतालाहि मागें सारतात आणि सरस्वतीलाहि मान डोलावयास लावतात. आई ! तूं माझें कल्याण कर.

सोन्याच्या पत्र्यावर अधोमुख त्रिकोण काढावा. त्याच्या तिन्ही टोंकांस त्रिशूलाचा आकार द्यावा. मध्यभागीं श्रीं हें बीज लिहावें. पंचेचाळीस दिवस आराधना करावी. रोज एक हजारवेळ या श्लोकाचा जप करावा. दुधाचा पायस आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. यंत्र धारण करावें. यानें सर्व विद्यांचा लाभ होईल.

अमौ नामावंशस्तुहिन-गिरि-वंश-ध्वजपटि
त्वदीयो नेदीयः फलतु फलमस्माकमुचितम् ।
वहत्यन्तर्मुक्ताः शिशिरकर-निश्वास-गलितं
समृद्ध्या यत्तामां बहिरपि च मुक्तामणिधरः ॥ ६१ ॥

हे माते जगज्जननी ! तुहिनगिरी म्हणजे हिमालय पर्वत. त्याच्या वंशाची तूं मूर्तिमंत पताका आहेस. हा तुझा नासावंश म्हणजे सरळ असलेला नासादंड अर्थात् नाक आम्हांला अत्यंत जवळचें, अत्यंत योग्य आणि अपेक्षित असलेलें आत्मसाक्षात्काररूपी फल 'फलतु' म्हणजे प्राप्त करून देवो. वंश शब्दाचे कुल आणि कळक असे दोनहि अर्थ आहेत. वंशामध्यें मोती असतात असे कोणी म्हणेल, तर आई ! तुझ्या या नासादंडरूपी वंशामध्येंहि आंत आणि बाहेर मोती आहेत. आंत जर मोती नसते तर हा "शिशिरकरनिश्वासगलित" म्हणजे डाव्या नाकपुडीतून वाहणारा चंद्र अर्थात् इडा नाडी, त्या नाडींतून वाहणाऱ्या वायूच्या साहाय्यानें बाहेर आलेला मोती दिसलाच नसता. या नासादंडानें आंतहि मौक्तिकें धारण केलेलीं आहेत आणि बाहेरूनहि पण तो मौक्तिक अर्थात् मौक्तिकालंकार धारण करणारा आहेच. तात्पर्य, आई ! तुझा हा सरळ नासावंश मोठा भाग्याचा सूचक आहे. त्यांतील मौक्तिकालंकाराची शोभा अद्वितीय आहे. तो आमचे कल्याण करो.

वरील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें यंत्र तयार करून त्याच्या मध्यभागीं ह्रीं बीज लिहावें. त्याची आठ दिवस पूजा करावी. रोज या श्लोकाचा वीस हजार जप करावा. नारळ, केळें आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. हें यंत्र स्त्रियांच्या अलंकारांत ठेवलें असतां सकल पुरुष वश होतील.

प्रकृत्या रक्तायास्तव सुदति दन्तच्छद-रुचेः
प्रवक्ष्ये सादृश्यं जनयतु फलं विद्रुमलता ।
न बिम्बं तद्बिम्ब-प्रतिफलन- रागादरुणितं
तुलामध्यारोढुं कथमिव विलज्जेत कलया ॥ ६२ ॥

हे आई जगज्जननी ! तुझी दंतपंक्ति फारच सुंदर असल्यामुळें तुला "सुदती" असें म्हणतात. हे सुदती माते ! अधर आणि ओष्ठ हे दातांचे

आच्छादन करीत असल्यामुळें त्यांना "दंतच्छद" असें म्हणतात. रुचि म्हणजे कांति. तुझ्या अधरोष्ठांची कांति ही स्वभावतःच आरक्त आहे. तिला मी कोणाची उपमा देऊं ? तिला उपमा द्यावयाची झाली तर पोवळ्याच्या वेलीला फळ लागलें पाहिजे. प्रवाळांची वेल ही आरक्तवर्ण असते. पोवळ्यांचे अंकुरहि आरक्त असतात. त्यांना जर फळ लागेल तर तें फारच फार आरक्तवर्ण दिसेल. पण पोवळ्यांच्या वेलींना कधीं फळ लागत नाहीं आणि तुझ्या ओठांना तर उपमा द्यावयास जगांत दुसरा पदार्थ नाहीं. कोणी म्हणेल कीं, अहो, या पिकलेल्या तोंडलीच्या फळांची नाहीं का उपमा देतां येणार ? आचार्य म्हणतात, छे, त्यांची कशी उपमा द्यावी ? " न बिम्बं " बिंब म्हणजे तोंडलीचें फळ. त्याच्याशीं श्रीत्रिपुरसुंदरीच्या अधरोष्ठांची तुलना करतां येणार नाहीं. कारण तें स्वतःच त्रिपुरसुंदरीच्या ओठांचा लालिमा संक्रमित झाल्यामुळें आरक्तवर्ण दिसतात. अशा स्थितींत ज्यांनीं स्वतःचाच रक्तिमा श्रीत्रिपुरसुंदरीच्या ओठांकडून मिळविला ते तिच्या ओठांशीं तुलना करण्याकरितां, कसें बरें तिच्यापुढें उभे रहातील ? अंशतः तरी तुलना करतां येईल का ? त्या तोंडलीच्या फळांना त्याची लाज नाहीं का वाटणार ? तात्पर्य, माते त्रिपुरसुंदरी, तुझ्या ओठांशीं ज्याची तुलना करावी असा जगांत एकहि पदार्थ नाहीं. अरुणवर्ण असलेल्या विश्वांतील सर्व पदार्थांचा अरुणिमा हा तुझ्यामुळेंच त्यांना प्राप्त झालेला असल्यामुळें ते कोणीहि तुझ्या ओठांशीं तुलना करण्याकरितां पुढे येऊं शकत नाहींत. असा हा तुझ्या ओठांचा अरुणवर्ण अवर्णनीय आहे. आई, तो आमचें कल्याण करो.

सोन्याच्या पत्र्यावर दीर्घ चतुष्कोण काढून त्यामध्यें एकाखालीं एक मं मं मं अशीं तीन बीजाक्षरें लिहावींत. आठ दिवस यंत्राची विधिपूर्वक पूजा करून मधाचा आणि उडदाच्या वड्याचा नैवेद्य दाखवावा. रोज या श्लोकाचा आठ हजार वेळ जप करावा. हे यंत्र उशाशीं ठेवून झोपल्यास निद्रानाश हा विकार नाहींसा होईल व सुखानें झोंप लागेल.

स्मितज्योत्स्नाजालं तव वदनचन्द्रस्य पिबतां
चकोराणामासीदतिरसतया चञ्चुजडिमा ।
अतस्ते शीतांशोरमृतलहरीमाम्लरुचयः
पिबन्ति स्वच्छन्दं निशि निशि भृशं काञ्जिकधिया ॥६३

आई जगज्जननी ! तुझें स्मितहास्य म्हणजे हें एक तुझ्या मुखचंद्राचें चांदणेंच होय. त्या चांदण्यांच्या समूहाचें हे चकोरपक्षी नित्य प्राशन करीत असतात. ते तुझ्या मुखचंद्राचें चांदणें अत्यंत मधुर असल्यानें त्याच्या अतिसेवनानें त्या चकोरपक्ष्यांच्या मुखांमध्यें जडता निर्माण होते. "चञ्चुजडिमा" – चोंचीचा जडपणा. अर्थात् त्यांची जीभ मधुररसानें जड होते. कशावरून तुम्ही जाणलें ? असें कोणी विचारल्यास आचार्य सांगतात, त्यांची जीभ जड होते म्हणूनच त्यांना कांहीं तरी आंबट खावेंसें वाटतें. आई, ते चकोरपक्षी आकाशांतील चंद्राच्या अमृतलहरींचें – चांदण्याचें रोजच्या रोज रात्रीं जणुं कांहीं ही अम्लरसाची कांजी आहे अशा बुद्धीनें स्वच्छंदपणें खूप प्राशन करीत असतात. मधुर रस हा पृथ्वीजलभुयिष्ठ असल्यामुळें त्याचें अतिसेवन झाल्यास गौरव, जाड्य, मुखावलेप, अग्निमांद्य इत्यादि विकार निर्माण होतात. अम्लरस हा अग्निजलभूयिष्ठ असल्यामुळें जठराग्नि प्रदीप्तकरणें, अन्नपचन करणें, मुखशुद्धि करणें इत्यादि त्याचे धर्म आहेत. अतिमधुर रस सेवन करून ज्यांचें मुख जड झालेलें असतें, त्यांना आम्लकांजी सेवन करावीशी वाटणें स्वाभाविक आहे. तात्पर्य, आकाशांतील चंद्रापेक्षांहि तुझ्या मुखचंद्राचें माधुर्य अत्युत्कट आहे. तें आमचें कल्याण करो.

सोन्याच्या पत्र्यावर लंबचतुष्कोण काढून त्यांत ह्रीं हें बीज लिहावें. तीस दिवस आराधना करावी. या श्लोकाचा रोज तीस हजार जप करावा. नारळाचा नैवेद्य दाखवावा. हें यंत्र धारण करावें. यायोगें साधकाचा शब्द कोणी मोडणार नाहीं. त्याची आज्ञा सर्व मानतील.

अविश्रान्तं पत्युर्गुणगण-कथाम्रेडण-जपा
जपापुष्पच्छाया तव जननि जिह्वा जयति सा ।
यदग्रासीनायाः स्फटिक-दृषदच्छच्छविमयी
सरस्वत्या मूर्तिः परिणमति माणिक्यवपुषा ॥ ६४ ॥

आई जगज्जननी ! तुझी जिह्वा अहोरात्र आपले पति भगवान् सदाशिव यांचे गुणगण पुनः पुन्हां वर्णन करणें हाच जप करीत आहे. तुझ्या जिह्वेची कांति जास्वंदीच्या फुलांप्रमाणें आरक्तवर्ण आहे. तिचा महिमा मी काय वर्णन करूं ! तिचा उत्कर्ष असो. जयजयकार असो.

आई ! तुझ्या जिह्वेच्या अग्रभागीं स्फटिकाच्या मण्याप्रमाणें कांतीनें अत्यंत स्वच्छ आणि शुभ्र असलेली प्रत्यक्ष सरस्वतीची मूर्ति जिह्वेच्या रक्तवर्णामुळें माणकाच्या मूर्तीप्रमाणें परिणत झालेली दिसत आहे. माणकाच्या मूर्तीप्रमाणें तीहि आरक्तवर्ण दिसत आहे. तात्पर्य, आई, तुझ्या ओठांप्रमाणेंच जिह्वेचाहि रक्तिमा अवर्णनीय आहे आणि तुझ्या जिह्वाग्रीं श्रीसरस्वतीदेवी नित्य वास्तव्य करीत आहे. धन्य आहेस तूं. मी तुला भक्तिभावें नमस्कार करतों.

तिसऱ्या श्लोकांतील यंत्र क्रमांक ९ प्रमाणें सोन्याच्या पत्र्यावर यंत्र काढून मधल्या षट्कोणांत क्लीं हें बीज लिहावें. सभोंवारच्या सहा त्रिकोणांत श्रीं श्रीं ह्रीं बीजें लिहावींत. आठ दिवस समाराधना करावी. गूळ, पायस आणि मधाचा नैवेद्य दाखवावा. या श्लोकाचा रोज दहा हजार जप करावा. यंत्र धारण केल्यास सकल लोक वश होतील, स्त्रियांच्या सर्व व्याधि दूर होतील असेंहि याचें फल कांहीं ठिकाणीं सांगितलेलें आहे. हेंच यंत्र कुंकवावर काढून वर सांगितल्याप्रमाणें सिद्ध करावें व तें कुंकू कपाळीं लावावें. वर सांगितल्याप्रमाणेंच फल मिळेल.

रणे जित्वा दैत्यानपहृतशिरस्त्रैः कवचिभि-
र्निवृत्तैश्चण्डांश-त्रिपुरहर-निर्माल्य-विमुखैः ।
विशाखेन्द्रोपेन्द्रैः शशि-विशद-कर्पूर-शकला
विलीयन्ते मातस्तव वदन-ताम्बूल-कवलाः ॥ ६५ ॥

आई जगज्जननी ! समरभूमीवर युद्धामध्यें दैत्यांना जिंकून त्यांचे मुकुट तुला अर्पण करण्याकरितां ज्यांनीं अपहृत केलेले आहेत, अथवा विजय संपादन करून तुला नमस्कार करण्याकरितां आले असतां ज्यांनीं आपले मुकुट मस्तकापासून दूर केलेले आहेत (राजे-महाराजे यांना अथवा देवांना नमस्कार करतांना शिरस्त्राण खालीं ठेवून दोन्ही गुडघे व मस्तक जमिनीवर ठेवून नमस्कार करण्याची पद्धति आहे.) त्या विजयी देवांनीं आपल्या अंगांत चिलखतें घातलेलीं असतात. युद्धांतून परत फिरल्यानंतर ते देवाच्या प्रसादाची अपेक्षा करीत असतात, पण ते शंकरांकडे जात नाहींत. कारण शंकरांनीं स्वीकारून उरलेल्या वस्तु, निर्माल्य हा चंडेश्वराचा अंश असतो. तो इतरांनीं स्वीकारूं नये असा शास्त्राचा आदेश आहे. त्यामुळें ते शिवनिर्माल्याला – प्रसादाला विमुख झालेले असतात. अखेर ते

तुझ्याकडे येतात. ते षडानन, इंद्र, विष्णु इत्यादि देव तुझ्या मुखकमलांतील तांबूलाचे घांस—ज्यांमधील कर्पूरखंड चंद्राप्रमाणें स्वच्छ दिसत आहेत, ते तांबूल-कवल त्या देवांकडून सेविले जात आहेत. तात्पर्य, इंद्रादि देव शंकरांचीहि उपेक्षा करतात व तुझा तांबूल सेवन करून स्वतःला धन्य मानतात. केवढा तुझा हा महिमा आहे !



यंत्र क्रमांक २३

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर काढावें. त्याला गुग्गुळाचा धूप द्यावा. कण्हेर, जास्वंदी इत्यादि तांबडीं फुलें वाहून श्रीचक्राप्रमाणें त्याची पंचेचाळीस दिवस समाराधना करावी. या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. मधाचा नैवेद्य दाखवावा. हें यंत्र धारण केल्यानें सर्व वश होतील. यंत्रांत वरच्या बाजूस डावीकडे दोन त्रिकोणांच्या जागीं क्लींच्या ऐवजीं ह्रीं हें बीज लिहावें.

विपञ्च्या गायन्ती विविधमपदानं पशुपते-
स्त्वयारब्धे वक्तुं चलितशिरसा साधुवचने ।
तदीयैर्माधुर्यैरपलपितन्त्रीकलरवां
निजां वीणां वाणी निचुलयति चोलेन निभृतम् ॥६६॥

आई जगज्जननी ! प्रत्यक्ष सरस्वतीदेवी ही तंबोऱ्याच्या स्वरांवर भगवान् पशुपति महादेव यांच्या त्रिपुरविजय, दक्षयज्ञविध्वंस, लोककल्याणास्तव हालाहल विषाचें प्राशन इत्यादि विविध गुणांचें गौरव गात असतांना, ज्या वेळेला तूं मान डोलावतेस, तिला शाबासकी देतेस, त्या वेळेला तुझ्या त्या गोड गोड शब्दांच्या माधुर्यापुढें सरस्वतीच्या तंबोऱ्याच्या स्वरांचेंहि माधुर्य कमी पडतें. कारण तंबोऱ्यापेक्षांहि तुझें शब्द अत्यंत मधुर असतात. तुझ्या शब्दाच्या माधुर्यापुढें आपल्या तंबोऱ्याची गोडी कमी पडली अशा भावनेनें वाणी म्हणजे सरस्वती-देवी ही आपला तंबोरा झांकून ठेवण्याकरितां तंबोऱ्याला गवसणी घालते. तात्पर्य,

तुझे शब्द तंबोऱ्यापेक्षांहि अत्यंत मधुर आहेत. तूं आमचें रक्षण कर.



यंत्र क्रमांक ३४

सोन्याच्या पत्र्यावर हें यंत्र लिहून पंचेचाळीस दिवस त्याची समाराधना करावी. या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. गूळ, पायस, आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. हें यंत्र धारण केलें असतां साधक संगीत विद्येमध्यें निपुण होईल.

कराग्रेण स्पृष्टं तुहिनगिरिणा वत्सलतया
गिरीशेनोदस्तं मुहुरधरपानाकुलतया ।
करग्राह्यं शंभोर्मुखमुकुरवृन्तं गिरिसुते
कथंकारं ब्रूमस्तव चुबुकमौपम्यरहितम् ॥ ६७ ॥

आई जगज्जननी ! तुझ्या हनुवटीचें मी काय वर्णन करणार ? कारण त्याला उपमा द्यावी असें या जगांत दुसरें कांहींच नाहीं. "औपम्यरहितं" ती निरुपम आहे. हे गिरिसुते – नगाधिराजकन्ये, तूं लहान होतीस त्या वेळेला पुत्रवात्सल्यानें नगाधिराज हिमालय पर्वतानें तें आपल्या हातानें पुनः पुन्हां स्पर्शिलेलें आहे. लहान मुलांच्या हनुवटीस आपण प्रेमानें स्पर्श करीत असतों हें सुप्रसिद्धच आहे. अधरपानार्थ उत्सुक झालेल्या परमेश्वरानें – विश्वनाथानें तें आपल्या हातांनीं वरचेवर उचलून घेतलेलें आहे. भगवान् महादेव सर्व विश्वाचें अथवा विश्वरूपानें तेच नटलेले असल्यामुळें आपलें स्वतःचें प्रतिबिंब अवलोकन करण्याकरितां तुझें मुखकमल हाच कोणी आरसा आपल्या हातांत घेतात तेव्हां तुझी हनुवटी ही त्या आरशाची मूठ अथवा आधारदंड असल्याप्रमाणें दिसते. एवढे भाग्य जगांत कोणालाच लाभलेलें नसल्यामुळें तुझें "चुबुक" म्हणजे हनुवटी ही निरुपमच राहिली आहे. ती आमचें कल्याण करो.



यंत्र क्रमांक ३५

सोन्याच्या पत्र्यावर हें यंत्र लिहून पत्नीसह पंचेचाळीस दिवस समाराधना करावी. या श्लोकाचा रोज एक हजार वेळ

जप करावा. दूध, पायस, तांबूल आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. यंत्र धारण करावें. श्री अनुकूल होईल. सकल कामना पूर्ण होतील.

भुजाश्लेषान्नित्यं पुरदमयितुः कण्टकवती
तव ग्रीवा धत्ते मुखकमलनालश्रियमियम् ।
स्वतः श्वेता कालागुरु-बहुल-जम्बाल-मलिना
मृणाली-लालित्यं वहति यदधो हारलतिका ॥ ६८ ॥

आई जगज्जननी ! " इयं तव ग्रीवा " म्हणजे हा तुझा कंठ तुझ्या मुखकमलाचा जणुं कांहीं नाळच आहे. अर्थात् कमळाच्या खालीं जसा त्याचा देंठ असावा त्याचप्रमाणें तुझ्या मुखकमलाच्या खालीं असलेल्या कंठाची शोभा दिसत आहे. पुरदैत्याचें निर्दालन करणारे भगवान् श्रीशंकर यांनीं प्रेमानें नित्य आपल्या बाहूंनीं तुला आलिंगन दिलेलें असल्यामुळें त्या कंठावर उभे राहिलेले रोमांच हे जणुं कांहीं तुझ्या मुखकमलरूपी नालाचे कांटेच आहेत असें वाटतें. कमलनालालाहि बारीक लव असते हें प्रसिद्धच आहे. तुझ्या कंठांत असलेलें मोत्यांचे सर स्वतः पांढरे शुभ्र असूनहि किंचित् श्यामवर्ण दिसतात. कारण तूं आपल्या अंगाला लावलेल्या अगरुकाष्ठाच्या दाट उटण्याचा कल्क म्हणजे गंध त्या मोत्यांच्या सरांना लागलेला असतो. त्यामुळें ते मोत्यांचे सर कमलिनीप्रमाणें शोभत आहेत. त्यांनी जणुं कांहीं कमलिनीचें लालित्य म्हणजे सौंदर्य धारण केलें आहे असें दिसतें ! तात्पर्य, तुझ्या गळ्यांतील मोत्यांचे हार तुझा कंठ आणि तुझें मुखकमल यांची शोभा मोठी अपूर्व आहे. ते माझे मनोरथ पूर्ण करोत.

श्लोक एकसष्टमध्यें सांगितलेलें यंत्र कुंकवावर लिहावें. पंचेचाळीस दिवस त्याची आराधना करावी. या श्लोकाचा रोज एक हजार वेळां जप करावा. मधाचा आणि तांबूलाचा नैवेद्य दाखवावा. त्या कुंकुमाचा तिलक धारण केला असतां राजेलोक वश होतील.

गले रेखास्तिस्रो गति-गमक-गीतैक-निपुणे
विवाह-व्यानद्ध-प्रगुण-गुण-संख्या-प्रतिभुवः ।
विराजन्ते नानाविध-मधुर-रागाकरभुवां
त्रयाणां ग्रामाणां स्थिति-नियम-सीमान इव ते ॥ ६९ ॥

आई:जगज्जननी! सामुद्रिकशास्त्रदृष्ट्या तुझ्या देहावरील रेखा फारच मोठ्या भाग्याच्या द्योतक आहेत. त्या तुझ्या अनंत वैभवाच्या द्योतक आहेत. त्यांचें मी काय वर्णन करूं? मानवांचे देहहि रेखांकित असतात. हातांवर, पायांवर, उदरावर, कंठावर, मनगटांवर आणि भालप्रदेशावर असलेल्या रेषा मानवाच्या सुखदुःखाच्या जणुं कांहीं साक्षीदार असतात. कांहीं रेषा आरोग्य, आयुष्य आणि महाभाग्य यांच्या सूचक असतात. तर कांहीं याच्या-उलट दुःख, दारिद्र्य, कष्ट आणि अल्पायुष्य यांच्याहि द्योतक असतात. समुद्र नांवाच्या महापंडितानें या गोष्टींचा खोल अभ्यास करून शरीरावर दिसणाऱ्या रेषा आणि त्यांची फलें यांचा सूक्ष्म विचार केलेला आहे. म्हणूनच या शास्त्राला सामुद्रिकशास्त्र असें म्हणतात. या शास्त्राच्या दृष्टीनें श्रीललितामहात्रिपुरसुंदरीच्या कंठस्थानीं ज्या मृदु, गंभीर आणि आरक्तवर्ण अशा आडव्या तीन रेषा दिसत आहेत त्यांचें वर्णन आचार्य या श्लोकानें करीत आहेत. श्रीत्रिपुरसुंदरीच्या कंठस्थानीं वळ्यांच्या आकारानें ज्या तीन रेषा दिसत आहेत त्या भाग्यरेखाच होत. "ललाटे च गले चैव मध्ये चापि वलित्रयम्। स्त्रीपुंसयोरिदं ज्ञेयं महासौभाग्यसूचकम्॥" कपाळावर, गळ्यावर आणि नाभीच्या वरच्या भागावर अखंड तीन वळ्या असणें हें त्या स्त्रीच्या अथवा पुरुषाच्या मोठ्या भाग्याचें लक्षण होय. असें सामुद्रिकशास्त्र सांगत आहे. श्रीत्रिपुरसुंदरीदेवी ही तर सर्व ऐश्वर्यांचें अधिष्ठान असल्यामुळें तिच्या ठिकाणीं या महाभाग्याच्या सूचक रेखा असणें हें स्वभाविकच आहे.

आई त्रिपुरसुंदरी! "गति-गमक-गीतैक-निपुणे" गति म्हणजे संगीतांतले अवांतर प्रकार. "मार्गदेशीविभागेन संगीतं द्विविधं स्मृतम्" एक मार्गसंगीत व दुसरें देशी संगीत. मार्गसंगीत म्हणजे ब्रह्मदेवानें वेदांतून शोधून काढलेलें भरतादि शिष्यांच्याद्वारां शुद्ध परंपरेनें चालू ठेवलेलें, देवांच्या उपासनेकरितांच उपयोगांत आणलें जाणारें संगीत. तसेंच देशी संगीत म्हणजे भिन्नभिन्न देशांतील रीति-भातींना अनुसरून लोकरंजनाच्या उद्देशानें गाइलें जाणारें संगीत. शुद्ध संगीत आणि मिश्र संगीत असेंहि संगीताचे दोन प्रकार आहेत. शास्त्रीय संगीत आणि लौकिक संगीत असेंहि पण म्हटलें जातें. तात्पर्य, ध्रुपद, धमार, ख्याल, टप्पा, ठुमरी, गजल इत्यादि संगीतांतल्या पद्धतींना गति असें म्हणतात.

'गमक' म्हणजे स्वरांचा विशिष्ट प्रकारानें होणारा कंप. तो पांच प्रकारचा असल्याचें नाट्यशास्त्रांत वर्णन केलेलें आहे. त्याचप्रमाणें गीत म्हणजे गायन. गायन

हे शंकरांना अत्यंत प्रिय आहे. श्रीललितामहात्रिपुरसुंदरी ही सदाशिवाची अर्धांगी असल्यानुळें ती शंकरांची संगीतानें सेवा करीत असते. संगीताचा आद्य आविष्कार शंकरांनींच केलेला आहे. संसारतापानें तप्त झालेल्या उत्तम भक्तांचीं सांसारिक दुःखें दूर करण्याकरितांच प्रभु भगवान् शंकर यांनीं गीतवाद्यें यांचा आविष्कार केलेला असल्याचें स्पष्टच सांगितलें आहे. " संसारदुःखदग्धानामुत्तमानामनुग्रहात् । प्रभुणा शंकरेणात्र गीतवाद्यं प्रकाशितम् ॥ " गायनानें सर्व दुःखांची विस्मृति होते. अत्यंत आनंद वाटतो. इष्ट फलांचा लाभ होतो. राजेमहाराजे व इष्ट देवता गायनानें प्रसन्न होतात. वश होतात. सर्व जनांचें चित्त आकृष्ट होतें. फार काय सांगावें, गायन हें एक उत्कृष्ट मोक्षाचें – आत्यंतिक दुःखनिवृत्तीचें व नित्य निरतिशय आनंदाच्या प्राप्तीचें साधन आहे. " परमानन्दविवर्धनमभिमत-फलं वशीकरणम् । सकलजनचित्तहरणं विमुक्तिबीजं परं गीतम् ॥ " उपासनेमध्यें जपाला प्राधान्य आहे. जपापेक्षांहि कोटिपटीनें ध्यान श्रेष्ठ आहे. ध्यानापेक्षांहि कोटिपटीनें लय म्हणजे समाधि अर्थात् चित्ताची एकाग्रता ही श्रेष्ठ आहे, तर समाधीपेक्षांहि कोटिपटीनें गायन श्रेष्ठ आहे. गायनापेक्षां श्रेष्ठ कांहींच नाहीं. " जपकोटिगुणं ध्यानं ध्यानकोटिगुणो लयः । लयकोटिगुणं गानं गानात्परतरं न हि ॥ " हा गायनाचा महिमा लक्षांत घेऊनच समर्थांनीं देखील " धन्य ती गायनी कला " असें संगीताबद्दल धन्योद्गार काढलेले आहेत.

गायन हा श्रीत्रिपुरसुंदरीचाहि अत्यंत आवडता विषय आहे. आई जगज्जननी ! तूं गति, गमक आणि गीत अर्थात् संगीतांतले प्रकार, स्वरभेद आणि गायन यांमध्यें अत्यंत निपुण आहेस. संगीतशास्त्रांत सांगितलेल्या गायनाच्या विविध प्रकारांमध्यें तूं "एकनिपुणा" म्हणजे प्रामुख्यानें निपुण आहेस. यांतील अभिप्राय असा आहे कीं, वास्तविकदृष्ट्या श्रीमहात्रिपुरसुंदरी ही स्वतः नादरूप आहे. " नागयणी नादरूपा " असें तिचें ललितासहस्रनामामध्यें वर्णन केलेलें आहे. नादब्रह्मामध्येंच तिच्या स्वरूपाचा साक्षात्कार होत असतो. अथवा ती स्वयं नादब्रह्मस्वरूपच आहे. म्हणूनच तिला "नादब्रह्मरूपा" असें म्हणतात. अर्थात् ती नादप्रियहि आहेच. नादांतून श्रुतींचा, श्रुतींतून स्वरांचा व स्वरांतून संगीताचा आविर्भाव होत असतो. नादातून अभिव्यक्त होणाऱ्या श्रुतींचें स्वरूप अत्यंत सूक्ष्म असल्यामुळें त्यांचें पार्थक्यानें ग्रहण होत नाहीं. ध्वनींच्या रूपानें त्यांचें फक्त कानानें ग्रहण होत असल्यामुळें त्यांना श्रुति असें म्हणतात. त्याच श्रुति

संकलित झाल्या म्हणजे त्यांना स्वरांचें स्वरूप येते. " श्रवणेन्द्रियग्राह्यत्वाद् ध्वनिरेव श्रुतिर्भवेत् " श्रवणेंद्रियाला गोचर होणारा स्वरांचा घटक असलेला सूक्ष्म ध्वनि म्हणजेच श्रुति असें विश्वावसूनें श्रुतीचें लक्षण केलेलें आहे.

श्रुति ह्या स्वरांचे अवयव होत. तीव्रा, कुमुद्वती, मंदा, छन्दोवती, दयावती, रंजनी इत्यादि त्यांचीं नांवें आहेत. कांहींच्या मतें मंदा, अतिमंदा, घोरा, घोरतरा इत्यादि नांवें आहेत. एकंदर श्रुति बावीस आहेत. कांहींच्या मतें त्या सहासष्ट आहेत. तर कांहींच्या मतें त्या अनंत आहेत. सर्वसामान्यपणें षड्जाच्या चार श्रुति मानतात. ऋषभाच्या तीन श्रुति आहेत. गांधाराच्या दोन आहेत. मध्यमाच्या चार श्रुति आहेत. पंचमाच्या चार श्रुति आहेत. धैवताच्या तीन आहेत, तर निषादाच्या दोन आहेत. " चतुश्चतुश्चतुश्चैव षड्जमध्यम-पञ्चमाः । द्वे द्वे निषादगान्धारौ त्रिस्त्रिर्ऋषभधैवतौ ॥ " एका स्वरापासून दुसऱ्या स्वरापर्यंत पोहोंचतांना मध्यें स्थूलमानानें अभिव्यक्त होणाऱ्या ध्वनींची अर्थात् श्रुतींची ही संख्या सांगितलेली आहे. या श्रुतींतून अभिव्यक्त होणारे स्वर सात आहेत. " श्रुत्यन्तर भावी यः स्निग्धोऽनुरणनात्मकः । स्वतो रञ्जयति श्रोतृचित्तं स स्वर उच्यते " (संगीत रत्नाकर) ध्वनिस्वरूप श्रुतीनंतर स्निग्ध म्हणजे कानाला गोड लागणारा, अनुरणनात्मक म्हणजे सतत प्रवाहशील असा ध्वनि त्याला स्वर असे म्हणतात. तो आपल्या स्वरूपानेंच श्रोत्यांच्या चित्ताला रमवित असतो. " स्वतो रञ्जयति " अथवा " स्वतो राजते इति स्वरः " अशी स्वर शब्दाची व्युत्पत्ति आहे.

संगीतामध्यें स्वर सात आहेत. षड्ज, ऋषभ, गांधार, मध्यम, पंचम धैवत आणि निषाद अशीं त्यांची नांवें आहेत. या नांवांतील आद्य अक्षरांवरूनच व्यवहारामध्यें ते सा, रे, ग, म, प, ध, नी या अक्षरांनीं गाइले जातात. षड्ज यांतील ष चा सा आणि ऋषभ यांतील ऋ चा रे हें अपभ्रष्ट रूप होय. शुक्लयजु र्वेदाच्या माध्यंदिन शाखेंतहि ऋचा उच्चार रे असाच करतात. आपल्या शरीरांतील मूलाधारादि सप्तचक्रांचाहि या सप्तस्वरांशीं निकट संबंध असल्याचें सांगितलें जातें. सर्व स्वरांत षड्ज हा स्वर मुख्य आहे. मंद्रसप्तकांतील षड्जाला खर्ज असें म्हणतात. षचा उच्चार ख असा होत असतो व डचा उच्चार र असा होत असतो. पहांटेच्या वेळेला तंबोरा लावून खर्ज धरल्यास अर्थात् खर्ज लावून बसल्यास

कंठांतील स्वरतंतु शुद्ध होतात. स्वर अत्यंत मधुर होतो. श्वास, दमा, खोकला हे विकार टळतात. फुप्फुसें बलवान होतात. अद्वितीय नादब्रह्माचा आनंद लुटतां येतो. असा हा खर्जाचा षड्जाचा महिमा आहे. या षड्जापासूनच स्वरांच्या गायनाला आरंभ होत असतो. षड्ज हा शरीरांतील सहा स्थानांतून उत्पन्न होत असल्यामुळें त्याला षड्ज असें म्हणतात. "षड्भ्यः स्थानेभ्यः जायते इति षड्जः" अशी त्याची व्युत्पत्ति आहे. नासा, कंठ, वक्षःस्थल, तालु, जिव्हा आणि दंत हींच तीं सहा स्थानें होत. ऋषभादि सहा स्वर षड्जांतूनच उत्पन्न होत असल्यामुळेंहि त्याला षड्ज असें म्हणतात. "षड् जन्यन्ते अनेन इति षड्जः" ऋषभ शब्दाचा अर्थ बैल असा आहे. बैलाच्या डरकाळीप्रमाणें दुसऱ्या स्वराचें स्वरूप असल्यामुळें त्याला ऋषभ असें नांव पडलें. ऋषभ शब्दाचा अर्थ श्रेष्ठ असाहि आहे. हा स्वर सर्व स्वरांत श्रेष्ठ मानला जातो. हा स्वर शीघ्र हृदयगामी असल्यामुळेंहि याला ऋषभ असें म्हणतात. तिसरा स्वर गंधर्वांना फार आवडतो म्हणून त्याला गांधार असें म्हणातत. किंवा "गां धारयति इति गान्धारः" गायनात्मक वाणीचा तो आधार असल्यामुळेंहि त्याला गांधार असें म्हणतात. गांधारालाच क्वचित् गंधार असेंहि म्हणतात. म या स्वराच्या खालीं गा रे सा आणि वर प ध नी असे तीन तीन स्वर असून म हा त्यांच्यामध्यें आहे. म्हणून त्याला मध्यम असें अन्वर्थ नांव दिलें. प हा स्वर पांचवा असल्यामुळें त्याला पंचम असें म्हणतात. धीवत् या शब्दावरून धैवत शब्द बनला. धीवत् म्हणजे बुद्धिमान्. बुद्धिमान् लोकच या धैवताचें स्वरूप जाणूं शकतात, सांगूं शकतात व गाऊं शकतात. म्हणून त्याला धैवत असें म्हणतात. निषाद हा सर्वांतला शेवटचा स्वर आहे. सर्व स्वर त्याच्यांत समाविष्ट होतात, त्याच्यांत विलीन होतात, म्हणूनच त्याला निषाद असें नांव पडलें. "निषीदन्ति स्वराः सर्वे निषादस्तेन कथ्यते."

या सांत स्वरांत षड्ज आणि पंचम हे दोन स्वर अविकृत स्वरूपाचे आहेत. त्यांच्यांत कधीं बदल होत नाहीं. बाकीचे पांच स्वर कोमल आणि तीव्र या स्वरूपांत बदलतात. शुद्ध, कोमल आणि तीव्र मिळून बारा स्वर होतात. या बारा स्वरांतूनच भिन्नभिन्न रागांची निष्पत्ति होत असते. "रञ्जयति इति रागः" श्रोत्यांच्या व सज्जनांच्या चित्ताला रमविणारा असा स्वरवर्णसमुच्चयात्मक विशिष्ट ध्वनि म्हणजेच राग होय. असें रागाचें वर्णन मतंगमुनींनी केलेलें आहे.

" योसौ ध्वनिविशेषस्तु स्वरवर्णविभूषितः । रञ्जको जनचित्तानां स रागः कथितो बुधैः ॥ " अथवा " रज्यते येन सञ्चित्तं स रागः सम्मतः सताम् ! "

औडव, षाडव आणि संपूर्ण असे रागांचे तीन प्रकार आहेत. ज्या रागांत पांचच स्वरांचा उपयोग होतो त्याला औडव राग असें म्हणतात. उदाहरणार्थ, सारंग, भूप, हिंडोल, दुर्गा, मालकंस पहा. ज्या रागांत सहा स्वरांचा उपयोग होतो त्यांना षाडव असें म्हणतात. उदाहरणार्थ, ललत, मारवा, केदार इत्यादि. ज्या रागांत सातहि स्वर उपयोगांत आणले जातात त्यांना संपूर्ण राग असें म्हणतात. उदाहरणार्थ, भैरव, भैरवी, यमन, खमाज इत्यादि. मुख्य राग आणि उपराग अथवा रागिणी पुष्कळच आहेत. " शिवशक्तिसमायोगाद्रागाणां-सम्भवो भवेत् " शिवशक्तीपासूनच सर्व रागांची उत्पत्ति झालेली आहे, असें संगीतदर्पणकारांनीं सांगितलेलें आहे. सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष आणि ईशान अशीं शंकरांचीं पांच मुखें आहेत. त्यांतून क्रमशः श्रीराग, वसंत-राग भैरवराग, पंचमराग आणि मेघराग असे पांच राग उत्पन्न झालेले आहेत. सहावा राग नट्ट नारायण हा श्रीललितामहाशक्तीच्या मुखांतून प्रकट झालेला आहे.

गमक म्हणजे श्रोत्यांच्या चित्ताला सुखावह वाटणारें विशिष्ट प्रकारें होणारें स्वरांचें कंपन. " स्वरस्य कम्पो गमकः श्रोतृचित्तसुखावहः " असें गमकाचें लक्षण केलेलें आहे. हे कंप अनेक प्रकारचे आहेत. स्फुरित, कंपित, आंदोलित अशीं त्यांचीं नांवें आहेत. हे कंप विविध रसांचे परिपोषण करीत असतात. सप्तस्वरांच्या समूहालाच ग्राम असें म्हणतात. ज्याप्रमाणें अनेक कुटुंबांच्या संकलित वसतीला ग्राम असें म्हटले जातें त्याचप्रमाणें अनेक स्वरांच्या संकलित समूहालाहि ग्रामच म्हटलेलें आहे. " यथा कुटुम्बिनः सर्वेऽप्येकीभूता भवन्ति हि । तथा स्वराणां सन्दोहो ग्राम इत्यभिधीयते ॥ " तात्पर्य, ग्राम म्हणजे संकलित स्वरसमूह. तो रागभेदानें भिन्नभिन्न स्वरूपांचा असणें स्वाभाविक आहे. ग्राम तीन प्रकारचे आहेत. षड्जग्राम, मध्यमग्राम आणि गान्धारग्राम. पैकीं पहिले दोन ग्राम हे भूलोकीं गाइले जातात व गांधारग्राम हा देवलोकीं गाइला जातो असें शास्त्रज्ञ सांगतात. या स्वरसमूहालाच क्वचित् सप्तक असेंहि म्हणतात. हीं सप्तकें तीन आहेत. मंदसप्तक, मध्यसप्तक आणि तारसप्तक अशीं त्यांचीं नांवें आहेत. हीं सप्तकें आपण आरोह व अवरोह या क्रमानें गाऊं लागलों म्हणजे त्यांना मूर्च्छनांचें स्वरूप येतें. " आरोहणावरोण-क्रमेण स्वरसप्तकम् । मूर्च्छनाशब्दवाच्यं हि

विराजन्ते " आई ! तुझ्या गळ्यावर दिसणाऱ्या या तीन रेषा खरोखर अनेक प्रकारच्या मधुर, मनोहर रागांच्या जणुं कांहीं जन्मभूमीच असलेल्या षड्जग्राम, मध्यमग्राम, आणि गांधारग्राम या तीन ग्रामांच्या म्हणजे स्वर-समूहांच्या त्या सीमा दाखविणाऱ्या अथवा तीन ग्रामांच्या स्थितीचें नियमन करणाऱ्या सीमारेषाच होत. अशा रीतीनें तुझ्या गळ्यावरील रेषा शोभत आहेत. आई ! तूं माझें कल्याण कर.



यंत्र क्रमांक ३६

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर काढून त्याची पंचेचाळीस दिवस पूजा करावी. या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. मधाचा नैवेद्य दाखवावा. हें यंत्र धारण केलें असतां जें मनीं धरावें तें सिद्धीस जातें.

मृणालीमृद्वीनां तव भुजलतानां चतसृणां
चतुर्भिः सौन्दर्यं सरसिज-भवः स्तौति वदनैः ।
नखेभ्यः संत्रस्यन्प्रथम-मथनादन्धकरिपो-
श्चतुर्णां शीर्षाणां सममभय-हस्तार्पण-धिया ॥ ७० ॥

आई जगज्जननी ! तुझ्या या चार बाहुलता अर्थात् भुजा कमलिनीपेक्षांहि अत्यंत कोमल आणि सुंदर आहेत. सरसिज-भव म्हणजे कमळांतून जन्माला आलेले भगवान् ब्रह्मदेव हे आपल्या चारी मुखानीं तुझ्या चारी भुजांचें स्तवन करीत असतात. यांत त्यांचा अभिप्राय असा आहे कीं, पूर्वी शंकरांप्रमाणेंच ब्रह्म देवालाहि पांच मुखें होतीं. सर्व वाजूंनीं आपलीं कार्यें पार पाडण्याकरितां तीं पांच मुखें होतीं. पण ब्रह्मदेवाला शंकराप्रमाणें आपणहि पंचमुखी आहोंत असा अहंकार मात्र वाटूं लागला ! त्या अहंकारामुळें त्यांचें अंगीकृत कार्य व्यवस्थितपणें पार पडेना. तेव्हां शंकरांनीं त्यांचे पांचवें मस्तक नखानें उडविलें ! अशा रीतीनें "प्रथममथनात्" म्हणजे शंकरांनीं प्रथमच आपलें पाचवें मस्तक उडविल्यामुळें ब्रह्मदेवाला "अंधकरिपु" म्हणजे भगवान् शंकर यांच्या नखाची मोठी भीति वाटत होती. त्या भयानें संत्रस्त होऊन यापुढें तरी शिल्लक राहिलेल्या आपल्या चारी मुखांना सारखें संरक्षण मिळावें म्हणून हे आई जगज्जननी ! ते भगवान् ब्रह्मदेव, तूं चारी हातांनीं अभय समर्पण

करावेस, आपल्याला चारी हातांनीं तूं अभयदान द्यावेंस म्हणूनच तुझ्या बाहुलतांचे ते चारी मुखांनीं स्तवन करीत आहेत. असा हा तुझ्या भुजलतांचा महिमा आहे ! तुझ्यावांचून दुसरा कोण परित्राण करणार ? आई, तूंच आमचें रक्षण कर.

सोन्याच्या पत्र्यावर पहिल्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें यंत्र काढून त्याच्या मध्यभागीं एकाखालीं एक क्लीं आणि श्रीं अशीं दोन बीजें लिहावींत. पंचेचाळीस दिवस पूजा करावी. या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. नारळाचा आणि मधाचा नैवेद्य दाखवावा. सिद्धयंत्र धारण करावें. सकल लोक वश होतील.

नखानामुद्योतैर्नव-नलिन-रागं विहसतां
कराणां ते कान्तिं कथय कथयामः कथमुमे ।
कदाचिद्वा साम्यं भजतु कलया हन्त कमलं
यदि क्रीडल्लक्ष्मीचरणतल-लाक्षारसचणम् ॥ ७१ ॥

हे उमे जगज्जननी पार्वती माते ! तुझ्या नखांचे "उद्योत" म्हणजे किरण अथवा प्रभापटल इतकें आरक्तवर्ण आहे कीं, त्यांच्या त्या आरक्तवर्णामुळें तुझे हात सूर्योदयाच्या वेळीं विकसित होणाऱ्या ताज्या टवटवीत कमलाच्या रक्तवर्णालाहि जणुं कांहीं हंसत आहेत असें वाटतें. कमलांचा आरक्तवर्णहि त्यांच्यापुढें फिका पडत आहे. अशा तुझ्या हातांची कांति म्हणजे शोभा आम्ही काय वर्णन करणार ? कसें वर्णन करणार ? "कथय" तूंच सांग. लक्ष्मी क्रीडा करीत असतांना तिच्या पायाचा लाक्षारस म्हणजे अळिता (लाखेचा तांबडा रंग) ज्याला लागलेला आहे असें कमलच कदाचित् "कथाचित् कलया" म्हणजे एखाद्या लेशानें तरी साम्य करील कीं नाहीं याचा मला संशयच वाटतो. तात्पर्य, तुझ्या हाताची कांति अपूर्व आहे. तुझे ते करकमल आमचें कल्याण करोत.



यंत्र क्रमांक ३७

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर काढून त्याची पंचेचाळीस दिवस पूजा करावी. वडाच्या झाडाखालीं बसून या श्लोकाचा

रोज बारा हजार जप करावा. मधाचा नैवेद्य दाखवावा. याप्रमाणें हें यंत्र सिद्ध करुन धारण केल्यास यक्षिणी वश होईल.

ममं देवि स्कन्दद्विपवदनपीतं स्तनयुगं
तवेदं नः खेदं हरतु सततं प्रस्नुतमुखम् ।
यदालोक्याशङ्काकुलित-हृदयो हास-जनकः
स्वकुम्भौ हेरम्बः परिमृशति हस्तेन झडिति ॥ ७२ ॥

आई जगज्जननीदेवी ! "स्कन्द" म्हणजे कार्तिकस्वामी आणि द्विपवदन म्हणजे गजानन हे दोघेहि तुझे चिरंजीव तुझें स्तनपान करतात. त्यामुळें तीं स्तनें सतत प्रस्नुतमुख म्हणजे क्षीरस्रावी अर्थात् दूध स्रवणारे आहेत. आई ! तुझे ते दुग्धपूर्ण स्तन आमचें सर्व दुःख हरण करोत.

हेरंब म्हणजे गणपति. हे तुझे चिरंजीव मोठे विनोदी आहेत. तुझ्या स्तनाकडे पाहून त्यांच्या अंतःकरणाला अशी शंका येते कीं, माझ्या मस्तकावरील गंडस्थलेंच आईनें काढून घेतलीं आहेत कीं काय ! आणि या शंकेनें ते झटकन् आपल्या हातानें आपल्या गंडस्थलांना स्पर्श करीत आहेत. त्यांचा हा बाल-पणांतला विनोद पाहून भगवान् शंकर आणि देवी पार्वती हे उभयतांहि हंसतात. कार्तिकस्वामीहि हंसतात. असे हे मोठे हास्यजनक विनोदी चिरंजीव आहेत. असो. आई, तूं त्यांच्याप्रमाणें आमचेंहि कल्याण कर.

सोळाव्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें सोन्याच्या पत्र्यावर अधोमुख त्रिकोण काढावा. त्याच्या तिन्ही टोंकास तीन त्रिशूल दाखवावेत. त्रिकोणामध्यें पहिल्या ओळींत "समंदेवि" हीं चार अक्षरें लिहावींत. त्यांच्याखालीं क्लीं हें बीज लिहावें त्याच्याहि खालीं ह्रीं हें बीज लिहावें. पंचेचाळीस दिवस पूजा करावी. रोज या श्लोकाचा एक हजार जप करावा. मधाचा नैवेद्य दाखवावा. हें सिद्ध-यंत्र धारण करावें. यायोगें रात्रीं अपरात्रीं साप, विंचु, भूत, पिशाच वगैरे कशाचीहि भीति रहाणार नाहीं.

अमू ते वक्षोजावमृत-रस-माणिक्य-कुतुपौ
न सन्देहस्पन्दो नगपतिपताके मनसि नः ।

पिबन्तौ तौ यस्मादविदित-वधू-सङ्ग-रसिकौ
कुमारावद्यापि द्विरदवदन-क्रौञ्चदलनौ ॥ ७३ ॥

हे आई जगज्जननी ! "नगपतिपताके" नगपति म्हणजे हिमालय. त्याच्या वंशाची तूं कीर्तिपताकाच आहेस. तुझे हें वक्षोज म्हणजे स्तन हे अमृतरसानें भरलेलें जणुं कांहीं माणकाचे कुतुप म्हणजे बुधलेच आहेत. ते नेहमीं अमृत-रसानें परिपूर्ण आहेत यांत आम्हांला तिळमात्रहि संशय नाहीं. कारण ते अमृत-पूर्ण आहेत म्हणूनच "द्विरदवदन" म्हणजे गणपति आणि क्रौञ्चदलन म्हणजे कार्तिकस्वामी हे दोघेहि विवाह न करतां, संसारांत न पडतां अर्थात् स्त्रीसंग-विमुख होऊन अद्यापि कुमारच राहिले आहेत आणि तुझें स्तनपान करीत आहेत ! यद्यपि देवसेना ही कार्तिकस्वामींची पत्नी आहे व ऋद्धिसिद्धि या गणपतींच्या पत्नी आहेत. तथापि देवसेना ही सैन्यस्वरूप असल्यामुळें व ऋद्धिसिद्धि या वैभवस्वरूप असल्यामुळें तें केवळ रूपकमात्र आहे. गणपति आणि कार्तिकस्वामी हे कुमारच आहेत. आई ! तूं जसें त्यांना तृप्त केलेंस त्याचप्रमाणें आम्हांलाहि तृप्त कर.

सोन्याच्या पत्र्यावर चतुष्कोण काढून त्यामध्यें हां हें बीज लिहावें. सात दिवस पूजा करावी. या श्लोकाचा रोज एक हजार वेळां जप करावा. मध आणि दूध यांचा नैवेद्य दाखवावा. हें यंत्र धारण केलें असतां स्त्रियांना भरपूर दूध येईल. गाय, म्हैस यांचें दूध जर कोणी आटविलें असेल तर त्यांनाहि भरपूर दूध येईल.

वहत्यम्ब स्तम्बेरम-दनुज-कुम्भ-प्रकृतिभिः
समारब्धां मुक्तामणिभिरमलां हारलतिकाम् ।
कुचाभोगो बिम्बाधररुचिभिरन्तः शबलितां
प्रतापव्यामिश्रां पुरदमयितुः कीर्तिमिव ते ॥ ७४ ॥

हे अंब जगज्जननी ! तुझ्या गळ्यांतील मोत्यांचा हार किती मनोरम दिसत आहे. "स्तम्बेरम" म्हणजे हत्ती. दनुज म्हणजे दानव. अर्थात् स्तम्बेरम-दनुज म्हणजे गजासुर. त्याच्या गंडस्थलांत निर्माण झालेले मुक्तामणि म्हणजे मोतीं. त्या मोत्यांनीं तयार केलेली, अमला म्हणजे निर्दोष – स्वच्छ – सुंदर अशी ही "हारलतिका" म्हणजे माला तूं आपल्या वक्षस्थलीं धारण केलेली आहेस. मोतीं

कोठें कोठ निर्माण होतात याचा विचार करतांना रत्नशास्त्रवेत्त्यांनीं मोत्यांच्या उत्पत्तीचीं सहा स्थानें मानलेलीं आहेत. (१) हत्तींचीं गंडस्थलें, (२) कळक, (३) नागांचीं फणा, (४) दृग, (५) शिंप आणि (६) ऊंस. हींच तीं सहा स्थानें होत. हत्तीच्या गंडस्थलांत निर्माण होणारें मोतीं हे कर्बुर म्हणजे चित्रविचित्र वर्णांचे असतात तर वांसामध्यें असलेलें मोतीं श्वेतरक्त अशा मिश्र वर्णांचे असतात. नागांच्या फणांमधलें मोतीं हें नीलवर्ण असतात तर दृगांतलें मोतीं हें दीपज्योतीच्या वर्णांचें असतात. शुक्तिकेंतील मोतीं श्वेतवर्णांचें असतात तर इक्षुदंडांतील मोतीं हें पीतवर्णांचें असतात. असें सर्वज्ञसोमेश्वरानें मोत्यांचें वर्णन केलेलें आहे.

"गजकुम्भेषु वंशेषु फणासु जलदेषु च। शुक्तिकायामिक्षुदण्डे षोढा मौक्तिकसम्भवः॥ गजकुम्भे कर्बुराभाः वंशे रक्तसिताः स्मृताः फणासु वासुकेरेव नीलवर्णाः प्रकीर्तिताः॥ ज्योतिर्वर्णास्तु जलदे शुक्तिकायां सिताः स्मृताः। इक्षुदण्डे पीतवर्णा मणयो मौक्तिकाः स्मृताः॥"

गजासुराच्या गंडस्थलांतील मोतीं हें अधिकच कर्बुर वर्णांचें असणें स्वाभाविकच आहे. अशा मोत्यांनीं गुंफलेली माळ तूं आपल्या गळ्यामध्यें धारण केलेली आहेस. त्याच्यावर तुझ्या तोंडलीच्या फळाप्रमाणें रक्तवर्ण असलेल्या ओष्ठांच्या कांतीची छटा पसरलेली आहे. तात्पर्य, विविध वर्णांनीं युक्त असलेल्या मौक्तिकांचा हा तुझ्या गळ्यांतील हार म्हणजे त्रिपुरासुराचा वध करणाऱ्या भगवान् शंकर यांचा मूर्तिमंत प्रताप आणि कीर्तिच आहे कीं काय अशा थाटांत शोभत आहे !

कविसंकेतामध्यें प्रतापाचा वर्ण रक्त आणि कीर्तीचा वर्ण श्वेत मानला जातो. श्रीत्रिपुरसुंदरीच्या गळ्यांतील मौक्तिकांच्या हारामध्यें असलेल्या रक्तछटा आणि श्वेतछटा या शंकरांच्या प्रतापाच्या व कीर्तीच्या द्योतक आहेत. तात्पर्य, शंकरांचा प्रताप आणि कीर्तीच आई ! तूं आपल्या गळ्यांत धारण केलेली आहेस किंवा महादेवाच्या प्रतापानें व कीर्तीनें तुझ्या वक्षस्थलाचा जणुं कांहीं आश्रय केलेला आहे. केवढा तुझा हा महिमा आहे ? तो आमचें कल्याण करो.

सोन्याच्या पत्र्यावर अधोमुख त्रिकोण काढून त्यामध्यें एकाखालीं एक ऐं क्लीं सौः अशीं अक्षरें लिहावींत. देवीच्या सान्निध्यांत पंचेचाळीस दिवस समा-

राधना करावी. या श्लोकाचा रोज एकशेंआठ वेळां जप करावा. दुधाचा पायस आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. हें यंत्र धारण केल्यानें साधकाला कीर्तीचा लाभ होतो.

तव स्तन्यं मन्ये धरणिधर-कन्ये हृदयतः
पयःपारावारः परिवहति सारस्वतमिव ।
दयावत्या दत्तं द्रविडशिशुरास्वाद्य तव यत्
कवीनां प्रौढानामजनि कमनीयः कवयिता ॥ ७५ ॥

धरणीधर म्हणजे पर्वत. श्रीललितामहात्रिपुरसुंदरीदेवी ही पर्वतराज हिमालयाची कन्या असल्यामुळें तिला धरणीधरकन्या असें म्हटलेलें आहे. हे धरणीधरकन्ये माते जगज्जननी ! तुझें स्तन्य म्हणजे खरोखर हृदयापासून आविर्भूत झालेला तो मूर्तिमंत क्षीरसागरच आहे. पारावार म्हणजे समुद्र. अथवा "सुधाधारासारः" असा पाठ घेतल्यास अमृताच्या धारांचा तो मूर्तिमंत प्रवाह अथवा वर्षावच आहे असा अर्थ करावा. तें जणुं कांहीं मूर्तिमंत "सारस्वत" म्हणजे वाङ्मयच वहात आहे असें वाटतें. 'मन्ये' म्हणजे मी समजतों.

तूं पूर्णपणें दयायुक्त होऊन अर्पण केलेल्या त्या सारस्वतरूपी स्तन्याचा आस्वाद घेऊन हा तुझ्यापुढें स्तवन करीत असलेला 'द्रविडशिशु' म्हणजे द्रविड जातींत जन्माला आलेला बाळ अर्थात् मी शंकर तुझ्या कृपेनें खरोखर " प्रौढानां कवीनां " म्हणजे मोठमोठ्या कविलोकांमध्यें अर्थात् उत्तम काव्य करणाऱ्या विद्वानांमध्यें अथवा " कविः क्रान्तदर्शी " या अभिप्रायानें पहातां त्रिकालज्ञ तत्त्ववेत्त्यांमध्यें " कमनीयः कवयिता " म्हणजे अत्यंत रमणीय काव्यकर्ता अथवा सत्यतत्त्वाचा पुरस्कर्ता व प्रतिपादक "अजनि" म्हणजे झाला. आई जगज्जननी ! या बालकाला जें येवढें उत्तम काव्य स्फुरलें अथवा जें एवढें उत्तम तत्त्वज्ञान प्रतिपादन करण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें तें केवळ तूं दयेनें त्याला पाजलेल्या स्तन्याचाच हा प्रभाव होय.

या ठिकाणीं द्रविडशिशु शब्दाचा अर्थ द्रविड राजाचा मुलगा "प्रवरसेन" असा एका टीकाकारानें केलेला आहे तर दुसऱ्या एका गृहस्थानें कांची प्रदेशांतील "संबन्धस्वामी" असा अर्थ केलेला आहे; पण बहुसंख्य विद्वानांना व विद्वत्परंपरेला

तो अर्थ मान्य असल्याचें दिसत नाहीं. आम्हींहि पण या बाबतींत अनेक विद्वानांशीं चर्चा करून आणि स्वतःहि शांत चित्तानें सूक्ष्म विचार करून निर्णीत केलेला अर्थ वर निर्दिष्ट केला आहे.



यंत्र क्रमांक ३८

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर काढून तीन दिवस त्याची समाराधना करावी. या श्लोकाचा रोज बारा हजार वेळां जप करावा. कांहीं ठिकाणीं एक हजार वेळां करावा असेंहि सांगितलें आहे. केळांचा आणि मधाचा नैवेद्य दाखवावा. सिद्धयंत्र धारण करावें. यानें कवित्वशक्तीचा लाभ होतो.

हर-क्रोध-ज्वालावलिभिरवलीढेन वपुषा
गभीरे ते नाभीसरसि कृतसङ्गो मनसिजः ।
समुत्तस्थौ तस्मादचल-तनये धूमलतिका
जनस्तां जानीते तव जननि रोमावलिरिति ॥ ७६ ॥

हे अचलतनये पर्वतराजकन्ये पार्वती ! शंकरांच्या भडकलेल्या क्रोधाग्नीच्या ज्वालांनीं लपेटलेल्या शरीरानें हा मनसिज म्हणजे कामदेव आपल्या शरीराला लागलेली आग शमविण्याकरितां तुझ्या गंभीर असलेल्या नाभिरूपी सरोवरामध्यें आश्रय करून राहिलेला आहे. तेथें तो निमग्न झालेला आहे. शंकरांच्या क्रोधाग्नीनें आपल्या शरीराला लागलेली आग तेथें त्यानें शमविलेली आहे असें दिसतें. म्हणूनच तर हे आई ! तेथून ही धूमलतिका म्हणजे धूमराजी निघालेली दिसत आहे. लोक त्या धूमराजीलाच तुझ्या नाभिस्थानावरील रोमराजी आहे असें समजतात. तात्पर्य, तुझी नाभी आणि त्यावर दिसणारी रोमराजी ही अत्यंत मनोहर आहे. ती आमचें कल्याण करो.

पुढें दिलेलें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर काढून त्याची आठ दिवस पूजा करावी. या श्लोकाचा रोज बारा हजार जप करावा. नारळ, केळें, दहिभात आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा, हें सिद्धयंत्र धारण केल्यानें सर्व लोक वश होतील.



यंत्र क्रमांक ३९

यदेतत्कालिन्दी-तनुतर-तरङ्गाकृति शिवे
कृशे मध्ये किञ्चिज्जननि तव यद्भाति सुधियाम् ।
विमर्दादन्योन्यं कुचकलशयोरन्तरगतं
तनूभूतं व्योम प्रविशदिव नाभीं कुहरिणीम् ॥ ७७ ॥

हे आई जगत्कल्याणकारिणी ! हें जें कांहीं तुझ्या कृश उदराच्या ठिकाणीं थोडेसें यमुनेच्या अत्यंत सूक्ष्म तरंगाच्या आकाराचें रोमराजीच्या रूपानें दिसत आहे तें बुद्धिमान् लोकांना असें वाटतें कीं, तुझ्या वक्षस्थलीं विराजमान असलेल्या स्तनांच्या अभिवृद्धीमुळें एकमेकांच्या संघर्षानें आतां येथें आपल्याला जागा मिळणार नाहीं असा विचार करीत तेथील अवकाशरूप आकाशच अत्यंत सूक्ष्म होऊन आपल्याला निराबाध आश्रय मिळावा म्हणून तुझ्या गंभीर नाभिकुहरामध्यें सूक्ष्म रोमराजीच्या रूपानें जणुं कांहीं प्रवेश करीत असल्यासारखें दिसत आहे ! आकाश हें नीलवर्ण आणि मूर्तस्वरूप आहे असा कवि लोकांचा संकेत आहे. त्याला अनुलक्षूनच आचार्यांनीं हें वर्णन केलेलें आहे. तात्पर्य, आई ! तुझी ती मनोहर नाभी आणि तिच्यावरील रोमराजी आमचें कल्याण करो.

रक्तकमलाची राख कपिला गाईच्या तुपांत कालवून त्यावर अधोमुख त्रिकोण काढावा. तिन्ही कोणांस त्रिशूलाचा आकार द्यावा. मध्यभागीं क्लीं हें अक्षर लिहावें. दहा दिवस पूजा करावी. केळें आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. या श्लोकाचा रोज दोन हजार वेळां जप करावा. अनुष्ठानसमाप्तीनंतर त्याचा तिलक धारण करावा. यानें राजलोक वश होतात.

स्थिरो गङ्गावर्तः स्तन-मुकुल-रोमावलि-लता
कलावालं कुण्डं कुसुम-शरतेजो-हुतभुजः ।
रतेर्लीलागारं किमपि तव नाभिर्गिरिसुते
बिलद्वारं सिद्धेर्गिरिश-नयनानां विजयते ॥ ७८ ॥

हे गिरिसुते पार्वतीमाते ! तुझ्या नाभिस्थानाचें मी काय वर्णन करूं ? तो खरोखर गंगाप्रवाहांतील पाण्याचा भोवराच दिसत आहे. गंगेच्या प्रवाहांतील भोवरा चल, अस्थिर व क्षणिक असतो तर हा भोवरा नित्य अविनाशी स्थिर स्वरूपाचा आहे. अथवा तें एक वेलीचें आळेंच आहे कीं काय असें वाटतें. "स्तन-मुकुल-रोमावलि-लता-कलावालं" स्तनरूपी दोन कळ्यांनीं युक्त असलेली रोमावलिरूपी लता हीच कोणी कला म्हणजे रेखा, त्या लतारेखेचें—लताप्रतानाचें मूळ असलेलें जणुं कांहीं तें आळेंच आहे असें तुझें नाभिस्थान दिसत आहे. अथवा कुसुमशर म्हणजे कामदेव, त्याचें तेज हाच कोणी अग्नि, त्या अग्नीचें तें जणुं कांहीं वर्तुलाकार कुंडच आहे कीं काय ? अशा रीतीनें तुझें नाभिस्थान शोभत आहे. कांहीं लोक तर कामदेवाची पत्नी असलेल्या रतीचें तें क्रीडास्थान आहे अशीच कल्पना करतात. हे जगज्जननी ! खरोखर तुझें नाभिस्थान अतिशय सुंदर आहे. तें "किमपि" म्हणजे अनिर्वचनीयच आहे. भगवान् शंकर यांच्या नेत्रांच्या साफल्यसिद्धीचें तें निवासस्थान आहे. आई, त्याचा विजय असो. तें आमचें कल्याण करो.

गुलाबजल किंवा केवडाजल यांमध्यें रक्तचंदन उगाळावें. त्यांत कस्तूरी मिसळावी. त्यावर अधोमुख त्रिकोण काढावा. तिन्ही कोणांस त्रिशूळाचा आकार द्यावा. मध्यभागीं ह्रीं हें अक्षर लिहावें. या यंत्राची चव्वेचाळीस दिवस पूजा करावी. उडदाचा वडा आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. या श्लोकाचा रोज

२०८ वेळां जप करावा. समाराधनेनंतर याचा टिळा कपाळीं धारण करावा. यानें राजेलोक वश होतील.

निसर्ग-क्षीणस्य स्तनतटभरेण क्लमजुषो
नमन्मूर्तेर्नारीतिलक शनकैस्त्रुटयत इव ।
चिरं ते मध्यस्य त्रुटित-तटिनी-तीरतरुणा
समावस्थास्थेम्नो भवतु कुशलं शैलतनये ॥ ७९ ॥

हे शैलतनये माते पार्वती ! तूं सर्व स्त्रियांमध्यें अत्यंत श्रेष्ठ आहेस म्हणून तुला मी नारीतिलक या शब्दानें संबोधित आहें. आई ! स्वभावतःच क्षीण असलेला तुझ्या देहाचा मध्यभाग पर्वतप्राय स्तनांच्या उंचवट्याच्या भारानें अधिकच थकलेला (क्लमजुष्) असा दिसत आहे. त्यामुळें तुझा देह कमरेजवळ किंचित् वांकलेलाहि दिसत आहे. तो मोडेल कीं काय अशी मला भीति वाटतें ! कारण तसाच तो दिसत आहे. "त्रुटित-तटिनी-तीर-तरुणा-समावस्थास्थेम्नः" म्हणजे अर्ध्दी तुटलेल्या ढासळूं पहात असलेल्या नदीच्या कांठावरील एखाद्या वृक्षाची जशी अवस्था असावी तशाच अवस्थेंत येऊन पोहोंचल्याप्रमाणें तो तुझ्या देहाचा मध्यभाग दिसत आहे. आई ! तो तुटूं नये, मोडूं नये, त्याचें कुशल असावें अशी मी मनापासून इच्छा करीत आहें. तात्पर्य, श्रीमहात्रिपुरसुंदरीचा कमरेचा भाग अत्यंत कृश आणि मनोहर दिसत आहे. तिच्या कृपेनें आमचें कुशल होवो.



यंत्र क्रमांक ४०

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर काढून पंचेचाळीस दिवस त्याची पूजा करावी. दुधाचा पायस आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. या श्लोकाचा रोज एक हजार वेळां जप करावा. हें यंत्र धारण केलें असतां साधक इंद्रजालविद्येमध्यें निपुण होईल.

कुचौ सद्यःस्विद्यत्तट-घटित-कूर्पास-भिदुरौ
कषन्तौ दोर्मूले कनक-कलशाभौ कलयता ।
तव त्रातुं भङ्गादलमिति वलग्नं तनुभुवा
त्रिधा नद्धं देवि त्रिवलि लवलीवल्लिभिरिव ॥ ८० ॥

हे आई जगज्जननी ! तूं आपल्या प्रकाशानें त्रैलोक्याला प्रकाशित करतेस म्हणून तुला देवी म्हणतात. दिव् धातूचा अर्थ प्रकाशणें असा आहे. दिव् धातूचा अर्थ खेळणें असा घेतल्यास या सर्व विश्वाची घडामोड ही तुझी क्रीडाच आहे म्हणूनहि तुला देवी असें म्हणतात. हे देवी ! भगवान् शंकर यांच्या स्वरूपाचें तूं निरंतर चिंतन करीत असल्यामुळें तुझ्या ठिकाणीं जो सात्विक भाव निर्माण होतो त्यामुळें तुझ्या अंगाला घाम सुटतो. इष्ट विषयाचें अथवा उपास्य देवतेचें चिंतन करीत असतांना अंगाला घाम सुटणें हें अष्टविध सात्विक भावांतले एक लक्षण आहे. तत्काल निर्माण होणाऱ्या घामानें ज्यांचे पार्श्वभाग अथवा वरचे भाग आर्द्र झालेले आहेत असे तुझे स्तन तूं परिधान केलेल्या कूर्पासाला म्हणजे कंचुकीला अर्थात् कंचुकीच्या बंधनाला तोडूं पहात आहेत. तुझ्या बाहुमूलाच्या ठिकाणीं ते सारखे घासले जात आहेत. तसेंच ते सुवर्णकलशाप्रमाणें शोभत आहेत. अशाच तऱ्हेच्या या स्तनांना निर्माण करणाऱ्या "तनुभुवा" म्हणजे कामदेवानें तुझा कृश असलेला मध्यदेह (पोट आणि कंबर) भग्न होऊं नये म्हणून त्याचें संरक्षण करण्याकरितां, त्यांना आधार मिळण्याकरितां एवढें बंधन पुरें होईल अशा भावनेनें तुझ्या पोटावर असलेल्या तीन वळ्यांच्या रूपानें जणुं कांहीं लवलीवल्लीच्या तीन वेढ्यांनीं गुंडाळून तुझें उदर बांधूनच ठेवलें आहे कीं काय असें वाटतें. तात्पर्य, त्रिवलयांकित तुझा मध्यदेह अत्यंत कृश असल्यामुळें फारच सुंदर दिसत आहे. तो आमचें कल्याण करो.



यंत्र क्रमांक ४१

या यंत्राचें साधन आणि फल वरच्या श्लोकाप्रमाणेंच समजावें.

गुरुत्वं विस्तारं क्षितिधरपतिः पार्वति निजा-
नितम्बादाच्छिद्य त्वयि हरणरूपेण निदधे ।
अतस्ते विस्तीर्णो गुरुरयमशेषां वसुमतीं
नितम्बप्राग्भारः स्थगयति लघुत्वं नयति च ॥ ८१ ॥

हे माते पार्वती ! क्षितिधरपति म्हणजे पर्वतराज हिमालय यानें आपल्या नितंबांपासून अर्थात् पायथ्यांच्या पर्वतांपासून आणि दऱ्याखोऱ्यांच्या भागांतून गुरुत्व आणि विस्तार अर्थात् मोठेपणा आणि वैपुल्य हे दोन्ही गुण गोळा केले व ते तुझ्या ठिकाणीं "हरण" म्हणजे लग्नाच्या वेळीं दिलें जाणारें अंदणद्रव्य म्हणून अर्पण केलेले – ठेवलेले – दितत आहेत. लग्नाच्या वेळीं वधूला माता-पिता आणि आप्तजन यांच्याकडून अग्नीच्या सान्निध्यांत जें द्रव्य मिळतें तें आणि पहिल्या प्रथम सासरीं वाटेस लावतांना जें धन मिळतें तें सर्व स्त्रीधन मानलें जातें. त्याला संस्कृत भाषेंत "हरण" असें म्हणतात. आई जगज्जननी, पर्वतराजानें ही देणगी दिल्यामुळेंच तुझा "नितम्बप्राग्भार" म्हणजे कटिपश्चात् भागाचा विस्तार आणि गुरुत्व हे दोन्ही गुण साऱ्या पृथ्वीला झांकून टाकीत आहेत आणि एक प्रकारें लघुत्व म्हणजे न्यूनताहि आणित आहेत. तात्पर्य तुझें सौंदर्य अपूर्व आहे. गुरुत्व आणि विशालता हे दोन धर्म एका ठिकाणीं असणें हा पृथ्वीचा विशेष गुण होय. हिमालय हा सर्व भूधरांचा – पर्वतांचा राजा असल्यामुळें त्याच्याकडे पृथ्वीकडून हा विशेष गुण सहजच आला. पार्वती ही पर्वतराजाची कन्या असल्या-मुळें तिलाहि पण या गुणाचा लाभ झाला. असाहि भाव या वर्णनांत व्यक्त होत आहे.



यंत्र क्रमांक ४२

हें यंत्र सोन्याच्या पत्र्यावर लिहून आग्नेय दिशेला तोंड करून सोळा दिवस पूजा करावी. या श्लोकाचा रोज एक हजार वेळां जप करावा. गूळ, पायस, मध आणि उडदाचा वडा यांचा नैवेद्य दाखवावा. सिद्धयंत्र धारण करावें. यानें अग्निस्तंभन होतें. अग्नीनें भाजणार नाहीं. अग्नीनें होणारा दाह शमेल.

करीन्द्राणां शुण्डान्कनक-कदली-काण्ड-पटली-
मुभाभ्यामूरुभ्यामुभयमपि निर्जित्य भवति ।
सुवृत्ताभ्यां पत्युः प्रणति-कठिनाभ्यां गिरिसुते
विधिज्ञे जानुभ्यां विबुध-करिकुम्भ-द्वयमसि ॥ ८२ ॥

हे गिरिसुते पार्वती ! तूं आपल्या दोन्ही मांड्यांनीं मोठमोठ्या हत्तींच्या शुंडादंडांना जिंकलेलें आहेस. तात्पर्य, हत्तींच्या सोंडांपेक्षांहि तुझ्या मांड्या लांब आणि सरळ आहेत. तसेंच त्यांनीं सोन्याच्या केळींच्या खांबांच्या समूहालाहि पण जिंकलेलें आहे. तात्पर्य केळींच्या खांबांपेक्षांहि तुझ्या मांड्या अत्यंत सरस आणि सुकुमार आहेत. याप्रमाणें हत्तींच्या सोंडा आणि केळींचे खांब या दोघांनाहि तुझ्या मांड्यांनीं जिंकलेलें आहे. तसेंच आई! तूं विधिज्ञा आहेस. सर्व वेदार्थाला जाणणारी आहेस आणि वेदांत सांगितल्याप्रमाणें वागणारी आहेस. यद्यपि वेद हे तुझेच रूप आहे. "स्वाहा स्वधा मतिर्मेधा श्रुतिस्मृति-रनुत्तमा" याप्रमाणें ललितासहस्रनामांत श्रीत्रिपुरसुंदरी ही श्रुतिस्वरूप असल्याचें सांगितलेलें आहे. तथापि "यद्यदाचरति श्रेष्ठः" या न्यायानें लोकसंग्रहाकरितां तूं स्वतः देखील वेदांत सांगितलेल्या विधीप्रमाणें वागतेस. भगवान् शंकर यांना यद्यपि तुझ्यामुळेंच मोठेपणा आलेला आहे. तथापि वेदविहित म्हणून पति या बुद्धीनें रोज तूं त्यांना भुडवे टेकवून नमस्कार करतेस. म्हणून तुला विधिज्ञा असें म्हटलेलें आहे.

हे विधिज्ञे पार्वती ! तूं आपल्या सुंदर वर्तुलाकार गुडघ्यांनीं अर्थात् गुडघे पृथ्वीवर टेकवून आपल्या पतिराजांना नमस्कार करतेस त्यामुळें तुझे दोन्ही गुडघे कठीण झालेले आहेत. त्या दोन्ही गुडघ्यांनीं आपल्या काठिन्यानें देवांच्या हत्तींच्या दोन्ही गंडस्थलांनाहि जिंकलेलें आहे. अर्थात् तुझे दोन्ही गुडघे ऐरावताच्या गंड-स्थलांप्रमाणें अत्यंत सुंदर वर्तुलाकार आणि कठीण म्हणजे सुदृढ आहेत. आई ! तुला नमस्कार असो.



यंत्र क्रमांक ४३

हें यंत्र भूर्जपत्रावर लिहून पादुकांवर ठेवावें. चव्वेचाळीस दिवस पूजा करावी. या श्लोकाचा रोज एक हजार वेळां जप करावा. नारळ, केळें आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. अनुष्ठानानंतर त्या पादुका धारण कराव्यात. याच्या योगानें साधक पाण्यावर चालूं शकेल (पाण्यांत बुडण्याची भीति राहाणार नाहीं).

पराजेतुं रुद्रं द्विगुणशरगर्भौ गिरिसुते
निषङ्गौ जङ्घे ते विषमविशिखौ वाढमकृत ।
यदग्रे दृश्यन्ते दश-शर-फलाः पादयुगली-
नखाग्रच्छद्मानः सुर-मकुट-शाणैक-निशिताः ॥ ८३ ॥

हे गिरिसुते पार्वतीमाते ! तुझ्या या दोन जंघा म्हणजे पिंढऱ्या इतक्या सुंदर आहेत कीं, जणुं कांहीं ते शंकरांचा पराभव करण्याकरितां कामदेवानें भातेच केलेले आहेत असें वाटतें. "विषमविशिख" म्हणजे पंचबाण अर्थात् कामदेव. उन्मादन, तापन, शोषण, स्तंभन आणि संमोहन हे मदनाचे पांच बाण असल्यामुळें त्याला पंचबाण असें म्हणतात. पांच ही संख्या विषम असल्यामुळें आणि विशिख शब्दाचा अर्थ बाण असल्यामुळें "विषमविशिख" या शब्दाचा अर्थ पंचशर म्हणजे कामदेव असा आहे. या कामदेवानें श्रीत्रिपुरसुंदरीच्या पिंढऱ्यांना खरोखर निषंग म्हणजे भातेच बनविले आहेत असें वाटतें. कामदेवाचें बाण पांच आहेत, पण या भात्यांत ते दुप्पट म्हणजे दहा बाण ठेवलेले दिसत आहेत. कारण त्या भात्यांच्या अग्रभागीं दहा बाणांचीं दहा पातीं दोन्ही पायांच्या नखाग्रांच्या मिषानें स्पष्टच दिसून येत आहेत. फल म्हणजे बाणांचें पातें. आई त्रिपुरसुंदरी ! तुझ्या चरणीं नमस्कार करण्याकरितां येणाऱ्या इंद्रादि देवांच्या मस्तकावरील मुकुट हेच कोणी "शाण" म्हणजे शस्त्र पाजळण्याचे पाषाण, त्या पाषाणांवर "निशिताः" म्हणजे धार लावून तीक्ष्ण केलेलीं हीं दहा बाणांचीं पातीं तुझ्या पायांच्या दहा बोटांच्या दहा नखांच्या मिषानें स्पष्टच दिसत आहेत. आचार्यांची कल्पना मोठी गमतीची दिसून येत आहे. तात्पर्य, आई ! तुझ्या पायांचीं हीं निर्मल नखें आमचें कल्याण करोत.

सोन्याच्या पत्र्यावर पहिल्या श्लोकांतील यंत्राप्रमाणें यंत्र काढून त्यामध्यें एकाखालीं एक ॐ सुं ॐ अशीं अक्षरें लिहावींत. जास्वंदीचीं फुलें वाहून बारा दिवस पूजा करावी. या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. गूळ, पायस आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. यानें शत्रुसैन्याचें स्तंभन होईल.

श्रुतीनां मूर्धानो दधति तव यौ शेखरतया
ममाप्येतौ मातः शिरसि दयया धेहि चरणौ ।
ययोः पाद्यं पाथः पशुपति-जटाजूट-तटिनी
ययोर्लाक्षा-लक्ष्मीरुणहरिचूडामणिरुचिः ॥ ८४ ॥

आई ! तुझ्या चरणकमलांचा महिमा मी काय वर्णन करूं ! वेदांची मस्तकें अर्थात् उपनिषदें – वेदान्तभाग तुझ्या चरणकमलांना शिरोभूषण म्हणून धारण करीत आहेत. तुझे चरणकमल म्हणजे मूर्तिमंत वेदान्तांचे सिद्धान्तच आहेत. " नमो देव्यै महालक्ष्म्यै श्रियै सिद्धयै नमो नमः । ब्रह्मविष्णुमहेशानवेदकैः पूजिताङ्घ्रये ॥ " देवी, महालक्ष्मी, श्री, सिद्धि हीं सर्व देवीचींच रूपें आहेत. त्यांना माझा नमस्कार असो. ब्रह्मदेव, विष्णु आणि महेश्वर त्याचप्रमाणें "वेदक" म्हणजे वेदांचा मूर्धभाग असलेलीं उपनिषदें यांनीं जिच्या चरणकमलांची पूजा केलेली आहे, आदरपूर्वक स्तवन केलेलें आहे त्या त्रिपुरसुंदरीला माझा नमस्कार असो. असें वसिष्ठसंहितेंत वर्णन केलेलें आहे.

आई ! तुझे ते चरणकमल तूं माझ्या मस्तकावर कृपा करून धारण कर.

तुझ्या चरणकमलांचें प्रक्षालन केलेलें हें जल, भगवान् शंकर यांच्या जटाजूटांतील साक्षात गंगाच होय. तसेंच "लाक्षालक्ष्मी" म्हणजे तुझ्या तळ-पायाला लावलेल्या लाक्षारसाची कांति – अळित्याचा रक्तवर्ण – हा श्रीहरीच्या गळ्यांत असलेल्या कौस्तुभ रत्नाची किंवा मस्तकावरील मुकुटांत जडविलेल्या उत्तम रत्नाचीच शोभा धारण करीत आहे. किंबहुना तुझ्या चरणीं मस्तक ठेवून नमस्कार करीत असतांना श्रीहरीच्या मुकुटावरील रत्नाला तुझ्या पायाचा लाक्षारस लागल्यामुळेंच तो चूडामणि तांबडालाल दिसत आहे. आई ! खरोखर तुझ्या चरणकमलाचा महिमा मोठा अपूर्व आहे. ते तुझे चरण-कमल माझ्या हृदयांत नेहमीं विराजमान राहोत.



यंत्र क्रमांक ४४

हें यंत्र सोन्याच्या पत्र्या-वर काढून एक वर्षभर त्याची समाराधना करावी. दुधाचा पायस, खिचडी आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा.

या श्लोकाचा रोज एक हजार वेळां जप करावा. याप्रमाणें यंत्र सिद्ध करून धारण केलें असतां साधकाला परकायाप्रवेश करण्याचें सामर्थ्य प्राप्त होईल.

नमोवाकं ब्रूमो नयन-रमणीयाय पदयो-
स्तवास्मै द्वन्द्वाय स्फुट-रुचि-रसालक्तकवते ।
असूयत्यत्यन्तं यदभिहननाय स्पृहयते
पशूनामीशानः प्रमदवनकङ्केलितरवे ॥ ८५ ॥

हे आई जगज्जननी ! नयनरम्य अशा तुझ्या या दोन्ही चरणकमलांना आम्ही नमस्कार करीत आहों. तुझ्या चरणकमलांना ओला लाक्षारस लावलेला असल्यामुळें ते अत्यंत सुंदर रक्तवर्ण दिसत आहेत. प्रमदवन म्हणजे राजस्त्रियांचे क्रीडोद्यान. त्या उद्यानांतील "कंकेलितरु" म्हणजे अशोकवृक्ष. तो आपल्याला नवपल्लवांचा व फुलाफळांचा बहर यावा म्हणून तुझ्या पायाच्या आघाताची स्पृहा करीत असतो. तरुण स्त्रीच्या पायाचा आघात झाला म्हणजे अशोकवृक्षाला पालवी फुटते व अकालीहि फुलाफळांचा बहर येतो अशी प्रसिद्धि आहे. अशोकवृक्ष त्रिपुरसुंदरीच्या पायाला आघात व्हावा अशी स्पृहा करीत असतांना पशूंचे, सर्व जीवांचे अधिपति असलेले अथवा वृषभवाहन भगवान् शंकर हे मात्र त्या अशोकावर अत्यंत असूया करतात, ईर्षा करतात. आई ! तुझ्या चरण कमलांचा महिमा अगाध आहे. मी तुझ्या चरणीं नमस्कार करतों.

सोन्याच्या पत्र्यावर चतुष्कोण यंत्र काढून त्यांत रं रं अशा दोन दोन अक्षरांच्या एकावळी एक अशा तीन ओळी लिहाव्यात. तांबडी फुलें वाहून बारा दिवस पूजा करावी. या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. दुधाचा पायस, गुळाचें पाणी आणि केळें यांचा नैवेद्य दाखवावा. हें सिद्धयंत्र धारण केलें असतां भूतबाधा निवृत्त होते.

मृषा कृत्वा गोत्रस्खलनमथ वैलक्ष्यनमितं
ललाटे भर्तारं चरणकमले ताडयति ते ।
चिरादन्तःशल्यं दहनकृतमुन्मूलितवता
तुलाकोटिक्वाणैः किलिकिलितमीशानरिपुणा ॥ ८६ ॥

आई जगज्जननी ! तुझ्या चरणकमलाचा आघातहि मोठा स्पृहणीय आहे. शंकर देवांनी त्याची मनामध्यें स्पृहा ठेवून कांहीं तरी निमित्तानें तुला खिजवितात. तूं रागावलीस म्हणजे त्यांना बरें वाटतें. एकदा भगवान् शंकर हे त्रिपुरसुंदरीचे गुण वर्णन करीत असतांना मध्येंच त्यांना प्रिय असलेल्या गंगेचें नांव ते उच्चारून गेले ! अशा अवस्थेला साहित्यशास्त्रांत गोत्रस्खलन असें म्हणतात. एखाद्या नायिकेविषयीं अनुराग प्रकट करीत असतांना तिच्या जवळ नकळत चुकून अंतःकरणांत असलेल्या दुसऱ्या नायिकेचें नांव घेतलें जाणें म्हणजेच गोत्रस्खलन होय असा साहित्यिकांचा संकेत आहे. शंकरांच्या हातून एकदां असें झालें, पण शंकरांना लागलीच त्याचा पश्चात्ताप झाला. आपण चुकलों असें त्यांना वाटलें व त्यांनीं आपलें डोकें त्रिपुरसुंदरीच्या पायावर टेकविण्याकरितां नमविलें. इतक्यांत – आचार्य म्हणतात, आई ! तुझ्या चरणकमलाचा त्यांच्या कपाळीं अघात झाला. तो अघात होत असतांना तुझ्या चरणांतील नूपुरांच्या घुंगरांचा जो आवाज झाला त्या आवाजाबरोबर कामदेवाला मोठा आनंद झाला. कारण त्याच्या मनांत फार दिवसांपासून एक शल्य डाचत होतें तें म्हणजे शंकरांनीं आपला दाह केलेला आहे. "बरें झालें, त्यांच्या कपाळीं श्री-ललितामहात्रिपुरसुंदरीदेवीची चांगली लाथ बसली !" असें म्हणून तो आपल्या मनांतील शल्याचें उन्मूलन करतो. आणि आपण विजयी झालों असें समजून तो विजयाचा द्योतक असा तुझ्या नूपुराच्या आवाजाच्या मिषानें जणुं कांहीं किल-किल ध्वनि करीत आहे असें वाटतें ! तात्पर्य, आई ! भगवान् शंकर यांनींहि तुझा अनुनय करावा असा तुझा महिमा आहे !!

सोन्याच्या पत्र्यावर आठवें चतुष्कोण यंत्र काढून त्यांत मधोमध एका-खाली एक यं यं यं अशीं तीन अक्षरें लिहावींत. एकवीस दिवस पूजा करावी. रोज या श्लोकाचा एक हजार जप करावा. दुधाचा पायस, नारळ, केळें आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. तें यंत्र धारण केलें असतां अथवा कलशोदक अभिमंत्रून सिंचन केलें असतां समस्त पिशाचबाधा निवृत्त होतील.

हिमानीहन्तव्यं हिमगिरिनिवासैकचतुरौ
निशायां निद्राणं निशि चरमभागे च विशदौ ।

दरं लक्ष्मीपात्रं श्रियमतिसृजन्तौ समयिनां
सरोजं त्वत्पादौ जननि जयतश्चित्रमिह किम् ॥ ८७ ॥

आई जगज्जननी ! तुझे चरणकमल नैसर्गिक कमलांपेक्षां अत्यंत श्रेष्ठ आहेत. कारण निसर्गांतील कमल हें बर्फाच्या समूहांत नाश पावतें. त्याला बर्फ अथवा अधिक थंडी सहन होत नाहीं. तुझे चरणकमल मात्र बर्फाळ प्रदेशांत हिमालयांत निवास करण्यांमध्यें अत्यंत चतुर आहेत, समर्थ आहेत. हिमालयांतच ते रहातात. निसर्गांतील कमल हें रात्र झाली कीं मिटतें. तुझे चरणकमल रात्रीं पहांटे आणि दिवसा देखील प्रसन्न असतात. प्रफुल्लित असतात. कमल हें लक्ष्मीला अभीष्ट वाटत असतें. लक्ष्मी तेथें वास्तव्य करते. तुझे चरणकमल तर केवल लक्ष्मीचें अधिष्ठानच आहेत असें नसून ते "समयिनाम्" म्हणजे अंतःकरणपूर्वक मनानें तन्मय होऊन उपासना करणाऱ्यांना कल्पनातीत श्री म्हणजे लक्ष्मी अर्थात् अतिस्पृहणीय निजानंदरूपी ऐश्वर्यहि समर्पण करतात. तें सामर्थ्य नैसर्गिक कमलांमध्यें नाहीं. अशा रीतीनें हे आई ! तुझे दोन्ही चरणकमल नैसर्गिक कमलाला पराभूत करीत आहेत. पण यांत आश्चर्य मानण्यासारखें काय आहे ? तुझ्या चरणकमलाचा महिमा अपूर्वच आहे. त्याची तुलना कोणाशीं करतां येईल ? तुझ्या चरणकमलाची तुलना करण्यास या जगांत कोणीहि योग्य नाहीं.

या श्लोकांत "समयिनां" हें पद मोठें मार्मिक आहे. शाक्त संप्रदायांत समयाचार आणि कालाचार असे दोन मार्ग आहेत. कौलाचारामध्यें बाह्यपुजेला प्राधान्य असतें तर समयाचारामध्यें अंतःपूजेला—मानसपूजेला प्राधान्य असतें. बाह्यपूजेपेक्षां मानसपूजा ही निर्विवाद श्रेष्ठ आहे. पण ही मानसपूजा कशी असावी ? अपरोक्षानुभवामध्यें या दृष्टीनें केलेलें वर्णन लक्षांत घेण्यासारखें आहे. "आविर्भवत्पुलकसन्ततिभिः शरीरैर्निःस्यन्दमान-सलिलैर्नयनैश्च नित्यम् । वाग्भिश्च गद्गदपदाभिरुपासते ये पादौ तवाम्ब भुवनेषु त एव धन्याः ॥" नित्य निरतिशय आनंदरूप असलेल्या श्रीललितामहात्रिपुरसुंदरीच्या स्वरूपाचें आणि चरणारविंदांचें चिंतन करतां करतां सर्व शरीरावर आनंदाचे रोमांच उभे राहिले पाहिजेत. तिचें परिपूर्ण दयालुत्व, भक्तवत्सल्य, अद्भुत चरित्र आणि अलौकिक सामर्थ्य लक्षांत घेऊन नेत्र आनंदाश्रूंनीं भरून आले पाहिजेत. तिच्या गुणांचें शक्त्यनुसार वर्णन करीत असतांना कंठ

सद्गदित झाला पाहिजे. आई ! तुझ्या चरणकमलाची अशा रीतीनें जे उपासना करतात तेच खरोखर त्रिभुवनामध्यें धन्य होत. अशा रीतीची मानसपूजा करणारे तेच प्रकृत श्लोकामध्यें आचार्यांनीं "समयिनां" या पदानें उल्लिखित केलेले आहेत.

स्मशानांतील भस्मावर अधोमुख त्रिकोण काढावा. तिन्ही टोंकांस त्रिशूलाचा आकार द्यावा. मध्यभागीं सर्प सर्प ह्रीं अक्षरें लिहावींत. त्या अक्षरांच्या वरच्या बाजूस ह्रीं व खालच्या बाजूस म हें अक्षर लिहावें. दहा दिवस आराधना करावी. या श्लोकाचा रोज एक हजार वेळां जप करावा. दुधाचा पायस, मध, केळें आणि नारळ यांचा नैवेद्य दाखवावा. साधक सर्प पकडण्यांत व सर्पांवर नियंत्रण ठेवण्यांत समर्थ होईल.

पदं ते कीर्तीनां प्रपदमपदं देवि विपदां
कथं नीतं सद्भिः कठिन-कमठी-कर्परतुलाम् ।
कथं वा बाहुभ्यामुपयमन-काले पुरभिदा
यदादाय न्यस्तं दृषदि दृषमानेन मनसा ॥ ८८ ॥

हे आई जगज्जननीदेवी ! " ते प्रपदं " म्हणजे तुझ्या पायाचा अग्रभाग हा खरोखर " कीर्तीनां पदं " म्हणजे कीर्तीचें अग्रस्थान आहे. तसेंच " विपदां अपदं " म्हणजे या संसारांत भोगाव्या लागणाऱ्या ज्या आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक विपत्ति, आपदा, संकटें, त्यांचें तें "अपदं" म्हणजे कधींहि स्थान होऊं शकत नाहीं. जे या स्थानाचा आश्रय करतात ते सर्व संकटांतून मुक्त होतात.

आई ! तुझ्या या पायांच्या अग्रभागाला कवि लोकांनीं कासवाच्या पाठीवरील कठीण कवचाची उपमा दिली आहे. कोठें तें कासवाच्या पाठीचें कठीण कवच आणि कोठें तुझ्या पायांचा अत्यंत कोमल असा हा अग्रभाग ? कशी या भल्या लोकांनीं तुलना केली कोणास माहीत ? मला तर ती अत्यंत अनुचित वाटते.

त्याचप्रमाणें श्रीत्रिपुरारि भगवान् शंकर यांनीं विवाहाच्या वेळीं लाजाहोमाच्या प्रसंगीं तुझें पाऊल आपल्या दोन्ही हातांनीं उचलून " दृषदि न्यस्तम् " दगडाच्या पाट्यावर ठेवलें ! त्यांचें मन तर अत्यंत दयाळु होतें. मग त्यांनीं

हें निर्दयपणाचें कार्य कां केलें ? मला तर तें उचित वाटत नाहीं. "आतिष्ठेमम-इमानमद्रमेव त्वं स्थिरा भव" हा मंत्र म्हणत तुझें पाऊल आपल्या दोन्ही हातांनीं उचलून पाट्यावर ठेवण्यांत शंकरांचा हा अभिप्राय स्पष्टच दिसत आहे कीं, ज्याप्रमाणें हा दगड घन आहे, दृढ आहे, स्थिर आहे त्याचप्रमाणें तूं माझ्या संसारांत स्थिर रहा, दृढ रहा. मी विश्वकुटुंबी आहें. विश्वाच्या भरण-पोषणाची जबाबदारी आतां तूंच पार पाडली पाहिजेस. आतां तुझ्या जिवावर मी संसारांत निश्चिंत राहीन. हाच अभिप्राय व्यक्त करण्याकरितां त्यांनीं तुझा हा अत्यंत सुकुमार पाय कठीण पाषाणावर ठेवला. विश्वाच्या भरणपोषणाची जबाबदारी पार पाडण्यास तूं समर्थ आहेस, हें पाहूनच त्यांनीं तुझ्यावर हें कार्य सोपविलें आहे. यांत त्यांच्या अंतःकरणांतील विश्वाविषयींचा दयाभावच व्यक्त होत आहे. धन्य आहे आई तुझें चरणकमल. तें माझें कल्याण करो.

सोन्याच्या अथवा चांदीच्या पत्र्यावर अधोमुख त्रिकोण काढावा. तिन्ही कोणांस त्रिशूलाचें चिन्ह काढावें. मध्यभागीं ह्रीं ह्रीं ह्रीं दोन अक्षरें पहिल्या ओळींत लिहावींत. दुसऱ्या ओळींत त्या दोन्ही अक्षरांच्या खालीं ह्रीं हें एक अक्षर लिहावें. पंधरा दिवस पूजा करावी. या श्लोकाचा रोज एक हजार वेळां जप करावा. गूळ, पायस, नारळ आणि केळें यांचा नैवेद्य दाखवावा. हें यंत्र धारण केल्यानें साधक वाघ, सिंह, हत्ती इत्यादि पशूंवर नियंत्रण ठेवण्यास समर्थ होतो.

नखैर्नाकस्त्रीणां करकमलसंकोचशशिभि-
स्तरूणां दिव्यानां हसत इव ते चण्डि चरणौ ।
फलानि स्वस्थेभ्यः किसलय-कराग्रेण ददतां
दरिद्रेभ्यो भद्रां श्रियमनिशमह्नाय ददतौ ॥ ८९ ॥

आई जगज्जननी ! चंड, मुंड, शुंभ, निशुंभ, महिषासुर इत्यादि लोक-कंटक दैत्यांचा युद्धांत वध करतानां तूं भयंकर रूप धारण केलेंस, रागावलीस, म्हणून तुला चंडी असें नांव पडलें ! तुझ्या चरणकलांचीं नखें चंद्राप्रमाणें आह्लाददायक आणि स्वच्छ आहेत. जणुं कांहीं चंद्रच आहेत ते. "नाकस्त्री" म्हणजे स्वर्गांतील स्त्रिया, देवांगना ज्या वेळेला तुझ्या चरणीं नमस्कार करतात त्या वेळेला तुझ्या नखचंद्रांच्या किरणांचा स्पर्श झाल्यामुळेंच कीं काय त्यांचीं करकमलें मुकुलित होतात. कमलांना चंद्रकिरणांचा स्पर्श झाला कीं तीं मिटतात

सद्गदित झाला पाहिजे. आई ! तुझ्या चरणकमलाची अशा रीतीनें जे उपासना करतात तेच खरोखर त्रिभुवनामध्यें धन्य होत. अशा रीतीची मानसपूजा करणारे तेच प्रकृत श्लोकामध्यें आचार्यांनी "समयिनां" या पदानें उल्लिखित केलेले आहेत.

स्मशानांतील भस्मावर अधोमुख त्रिकोण काढावा. तिन्ही टोकांस त्रिशूलाचा आकार द्यावा. मध्यभागीं सर्प सर्प ह्रीं अक्षरें लिहावींत. त्या अक्षरांच्या वरच्या बाजूस ह्रीं व खालच्या बाजूस म हें अक्षर लिहावें. दहा दिवस आराधना करावी. या श्लोकाचा रोज एक हजार वेळां जप करावा. दुधाचा पायस, मध, केळें आणि नारळ यांचा नैवेद्य दाखवावा. साधक सर्प पकडण्यांत व सर्पावर नियंत्रण ठेवण्यांत समर्थ होईल.

पदं ते कीर्तीनां प्रपदमपदं देवि विपदां
कथं नीतं सद्भिः कठिन-कमठी-कर्परतुलाम् ।
कथं वा बाहुभ्यामुपयमन-काले पुरभिदा
यदादाय न्यस्तं दृषदि दयमानेन मनसा ॥ ८८ ॥

हे आई जगज्जननीदेवी ! " ते प्रपदं " म्हणजे तुझ्या पायाचा अग्रभाग हा खरोखर " कीर्तीनां पदं " म्हणजे कीर्तीचें अग्रस्थान आहे. तसेंच " विपदां अपदं " म्हणजे या संसारांत भोगाव्या लागणाऱ्या ज्या आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक विपत्ति, आपदा, संकटें, त्यांचें तें "अपदं" म्हणजे कधींहि स्थान होऊं शकत नाहीं. जे या स्थानाचा आश्रय करतात ते सर्व संकटांतून मुक्त होतात.

आई ! तुझ्या या पायांच्या अग्रभागाला कवि लोकांनीं कासवाच्या पाठीवरील कठीण कवचाची उपमा दिली आहे. कोठें तें कासवाच्या पाठीचें कठीण कवच आणि कोठें तुझ्या पायांचा अत्यंत कोमल असा हा अग्रभाग ? कशी या मल्या लोकांनीं तुलना केली कोणास माहीत ? मला तर ती अत्यंत अनुचित वाटते.

त्याचप्रमाणें श्रीत्रिपुरारि भगवान् शंकर यांनीं विवाहाच्या वेळीं लाजाहोमाच्या प्रसंगीं तुझें पाऊल आपल्या दोन्ही हातांनीं उचलून " दृषदि न्यस्तम् " दगडाच्या पाट्यावर ठेवलें ! त्यांचें मन तर अत्यंत दयाळु होतें. मग त्यांनीं

हें निर्दयपणाचें कार्य कां केलें ? मला तर तें उचित वाटत नाहीं. "आतिष्ठेमम-द्मानमद्मेव त्वं स्थिरा भव" हा मंत्र म्हणत तुझें पाऊल आपल्या दोन्ही हातांनीं उचलून पाठ्यावर ठेवण्यांत शंकरांचा हा अभिप्राय स्पष्टच दिसत आहे कीं, ज्याप्रमाणें हा दगड: घन आहे, दृढ आहे, स्थिर आहे त्याचप्रमाणें तूं माझ्या संसारांत स्थिर रहा, दृढ रहा. मी विश्वकुटुंबी आहें. विश्वाच्या भरण-पोषणाची जबाबदारी आतां तूंच पार पाडली पाहिजेस. आतां तुझ्या जिवावर मी संसारांत निश्चिंत राहीन. हाच अभिप्राय व्यक्त करण्याकरितां त्यांनीं तुझा हा अत्यंत सुकुमार पाय कठीण पाषाणावर ठेवला. विश्वाच्या भरणपोषणाची जबाबदारी पार पाडण्यास तूं समर्थ आहेस, हें पाहूनच त्यांनीं तुझ्यावर हें कार्य सोपविलें आहे. यांत त्यांच्या अंत:करणांतील विश्वाविषयींचा दयाभावच व्यक्त होत आहे. धन्य आहे आई तुझें चरणकमल. तें माझें कल्याण करो.

सोन्याच्या अथवा चांदीच्या पत्र्यावर अधोमुख त्रिकोण काढावा. तिन्ही कोणांस त्रिशूलाचें चिन्ह काढावें. मध्यभागीं ह्रीं ह्रीं ह्रीं दोन अक्षरें पहिल्या ओळींत लिहावींत. दुसऱ्या ओळींत त्या दोन्ही अक्षरांच्या खालीं ह्रीं हें एक अक्षर लिहावें. पंधरा दिवस पूजा करावी. या श्लोकाचा रोज एक हजार वेळां जप करावा. गूळ, पायस, नारळ आणि केळें यांचा नैवेद्य दाखवावा. हें यंत्र धारण केल्यानें साधक वाघ, सिंह, हत्ती इत्यादि पशूंवर नियंत्रण ठेवण्यास समर्थ होतो.

नखैर्नाकस्त्रीणां करकमलसंकोचशशिभि-
स्तरूणां दिव्यानां हसत इव ते चण्डि चरणौ ।
फलानि स्वस्थेभ्यः किसलय-कराग्रेण ददतां
दरिद्रेभ्यो भद्रां श्रियमनिशमह्नाय ददतौ ॥ ८९ ॥

आई जगज्जननी ! चंड, मुंड, शुंभ, निशुंभ, महिषासुर इत्यादि लोक-कंटक दैत्यांचा युद्धांत वध करतानां तूं भयंकर रूप धारण केलेंस, रागावलीस, म्हणून तुला चंडी असें नांव पडलें ! तुझ्या चरणकलांचीं नखें चंद्राप्रमाणें आह्लादायक आणि स्वच्छ आहेत. जणुं कांहीं चंद्रच आहेत ते. "नाकस्त्री" म्हणजे स्वर्गांतील स्त्रिया, देवांगना ज्या वेळेला तुझ्या चरणीं नमस्कार करतात त्या वेळेला तुझ्या नखचंद्रांच्या किरणांचा स्पर्श झाल्यामुळेंच कीं काय त्यांचीं करकमलें मुकुलित होतात. कमलांना चंद्रकिरणांचा स्पर्श झाला कीं तीं मिटतात

हा निसर्ग आहे. प्रफुल्लस्थिति श्रीत्रिपुरसुंदरीच्या चरणीं नमस्कार करतांना देवांगना हात जोडतात त्यांवर आचार्यांनीं केलेली ही उत्प्रेक्षा मोठी गमतीची आहे.

आई ! तुझे दोन्ही चरणकमल आपल्या निर्मल नखकांतीच्या मिषानें स्वर्गांतील कल्पवृक्षांना जणुं कांहीं हंसत आहेत असें वाटतें. हंसण्याचें कारण असें कीं, कल्पवृक्ष हे नवपल्लवरूपी कराग्रानें फक्त स्वर्गांतील देवांनाच अभीष्ट फलें देतात. आम्ही तर भूलोकांतील दरिद्री लोकांना देखील रात्रंदिवस सत्वर " मद्रां श्रियं " म्हणजे मंगलमय विपुल ऐश्वर्य समर्पण करीत असतों. कल्पवृक्षांमध्यें पक्षपात आहे, आमच्यामध्यें तो नाहीं. तात्पर्य, श्रीत्रिपुरसुंदरीच्या चरणकमलाची नखकांति ही अत्यंत निर्मल आहे आणि ती भक्तजनांचे मनोरथ पूर्ण करते. ती आमचेहि मनोरथ पूर्ण करो.

सोन्याच्या पत्र्यावर अधोमुख त्रिकोण काढून त्यांत मध्यभागीं ह्रीं हें बीज लिहावें. तीस दिवस पूजा करावी. या श्लोकाचा रोज एक हजार वेळां जप करावा. गूळ, पायस आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. हें यंत्र धारण केल्यास सर्व रोगांचा निरास होतो.

ददाने दीनेभ्यः श्रियमनिशमाशानुसदृशीं-
ममन्दं सौन्दर्यप्रकरमकरन्दं विकिरति ।
तवास्मिन्मन्दारस्तबकसुभगे यातु चरणे
निमज्जन्मज्जीवः करण-चरणः षट्चरणताम् ॥ ९० ॥

" हे मातः ! दीनेभ्यः आशानुसदृशीं श्रियं अनिशं ददाने, अमन्दं सौन्दर्यप्रकरमकरन्दं विकिरति, मन्दारस्तबकसुभगे, अस्मिन् तव चरणे करणचरणः मज्जीवः निमज्जन् षट्चरणतां यातु " आई जगज्जननी ! दीन जनांना त्यांच्या अपेक्षेप्रमाणें वैभवाचें निरंतर दान करणारे तुझे चरणकमल भक्तजनांना "अमन्द" म्हणजे विपुल अशा सौंदर्यसमूहरूपी मकरंदाचें ते वितरण करीत असतात. आपल्या सौंदर्यसमूहाचें चोहोंकडे प्रक्षेपण करीत असलेले तुझे हे चरणकमल मोठे कल्पवृक्षाच्या पुष्पगुच्छाप्रमाणें अत्यंत सुभग म्हणजे सुंदर दिसत आहेत. मनासह पंच ज्ञानेंद्रियें – अर्थात् सहा इंद्रियें हेच ज्याचे चरण आहेत असा हा माझा जीवात्मा तुझ्या चरणकमलामध्यें नित्य निमग्न होऊन

राहो. जसा कमळांमध्यें भ्रमर असावा तसा माझा जीव तुझ्या चरणकमळांतला भ्रमर व्हावा हींच माझी इच्छा आहे. आई ! माझे सकल मनोरथ पूर्ण कर.

सोन्याच्या पत्र्यावर दीर्घ चतुष्कोण काढून त्याच्यामध्यें पहिल्या ओळींत क्षां क्षां हीं अक्षरें मोकळीं लिहावींत. त्यांच्या खालीं दुसऱ्या ओळींत क्षीय क्षीय अशीं अक्षरें लिहावींत. तिसऱ्या ओळींत मध्यभागीं हीं हें अक्षर लिहावें. पंधरा दिवस पूजा करावी. या श्लोकाचा रोज एक हजार वेळां जप करावा. दूध, पायस आणि मध यांचा नैवेद्य दाखवावा. हें यंत्र धारण केल्यानें सर्व क्षुद्रबाधा निवृत्त होतात.

पदन्यासक्रीडापरिचयमिवारब्धुमनसः
स्खलन्तस्ते खेलं भवन-कलहंसा न जहति ।
अतस्तेषां शिक्षां सुभगमणिमञ्जीररणित-
च्छलादाचक्षाणं चरणकमलं चारुचरिते ॥ ९१ ॥

हे आई चारुचरिते ! तुझें चरित्र अत्यंत सुंदर आहे. वर्णनातीत आहे. तुझी चालण्याची पद्धति अशी आहे कीं, राजहंसांनीं देखील तिचा अभ्यास करावा. "पदन्यासक्रीडा" म्हणजे पावलें कशीं टाकावींत ? चालण्यांतील क्रीडा-विनोद कसा करावा ? याचा तुझ्या पावलांकडे पाहून अभ्यास करावा, अभ्यासाला आरंभ करावा असें तुझ्या भवनांतील राजहंसांनीं मनांत आणलें. ते त्याप्रमाणें अभ्यास करूं लागले. पण ते "स्खलन्तः" म्हणजे चुकूं लागले. तरी पण ते तुझ्या चालण्याचा खेळ कांहीं सोडीनात. ही त्यांची चिकाटी पाहून त्यांना चालण्याचें शिक्षण देण्याकरितां तुझीं पावलें, सुंदर रत्नखचित नूपुरांच्या — घुंगरांच्या आवाजाचें मिष करून धडा देत आहेत. ते आपल्या नूपुरांच्या मंजुळ आवाजानें जणुं कांहीं "कसें चालावें ?" या विषयाचा पाठ देत आहेत असें वाटतें. तात्पर्य, आई, तुझें चालणें अत्यंत सुंदर आणि पैंजणांचा व वाळ्यांचा आवाजहि अत्यंत मधुर आहे. तूं आमचें कल्याण कर.

सोन्याच्या पत्र्यावर अधोमुख त्रिकोण आणि हा श्लोक लिहावा. त्रिकोणा-मध्यें पहिल्या ओळींत ॐ हीं हीं अक्षरें लिहावींत. दुसऱ्या ओळींत त्यांच्याच खालीं हीं हीं हीं अक्षरें लिहावींत. पंचवीस दिवस पूजा करावी. या श्लोकाचा

रोज एक हजार जप करावा. दूधाच्या पायसाचा नैवेद्य दाखवावा. हें सिद्धयंत्र धारण केल्यानें साधकास भूमिलाभ आणि धनलाभ होईल.

गतास्ते मञ्चत्वं द्रुहिण-हरि-रुद्रेश्वरभृतः
शिवः स्वच्छ-च्छाया-घटित-कपट-प्रच्छद-पटः ।
त्वदीयानां भासां प्रतिफलन-रागारुणतया
शरीरी शृङ्गारो रस इव दृशां दोग्धि कुतुकम् ॥ ९२ ॥

आई जगज्जननी ! ब्रह्मा, विष्णु, रुद्र आणि ईश्वर महेश्वरतत्त्वामध्यें अंतर्भूत असलेल्या या चार देवता पृथ्वी, जल, तेज आणि वायु यांच्या त्या अधिष्ठात्री देवता आहेत. त्या सर्व देवतांनीं तुझें दास्य पत्करलेलें आहे. "भृत" म्हणजे भृत्य अर्थात् सेवक. तुझी सेवा करण्यासाठींच ते "मञ्चत्वं गताः" आपल्या इच्छेला येईल त्याप्रमाणें रूप धारण करण्यास समर्थ असल्यामुळें त्यांनीं तुझ्या मंचाचें – पर्यंकाचें रूप धारण केलेलें आहे. अर्थात् हे चारी देव तुझ्या पर्यंकाचे चार पाय बनलेले आहेत. शिव म्हणजे महेश्वरतत्त्व अर्थात् आकाशाची अधिष्ठात्री देवता भगवान् सदाशिव हे स्वच्छ कांतीच्या मिषानें जणुं कांहीं त्या पर्यंकाचें आच्छादन – वस्त्र – चादर – बनलेले आहेत. आई ! तुझ्या पर्यंकावरील गादी आणि गादीवरील वस्त्र हीं दोन्ही रूपें सदाशिवानें धारण केलेलीं आहेत. पर्यंकावर शिवाभिन्नशक्तिरूपानें – शिवशक्तिरूपानें परिपूर्ण आनंदरूप अशी तूं विराजमान झालेली आहेस. "ब्रह्मा विष्णुश्च रुद्रश्च ईश्वरश्च सदाशिवः । एते पञ्च महाप्रेता भूताधिपतयो मताः ॥ चत्वारो मञ्चचरणाः पञ्चमः प्रच्छदः पटः । साक्षी प्रकाशरूपेण शिवेनाभिन्नविग्रहः ॥ तत्रासने समासीना निर्भरानन्द-रूपिणी ।" असें रुद्रयामलामध्यें वर्णन केलेलें आहे.

स्फटिकाप्रमाणें स्वच्छ असलेल्या परम शिवस्वरूप आच्छादनामध्यें तुझा रक्तवर्ण प्रतिबिंबित झाल्यामुळें चोहोंकडे अरुण कांति पसरलेली दिसत आहे. जणुं कांहीं मूर्तिमंत शृंगाररसच आविर्भूत झाला असून तो डोळ्यांना आनंद देत आहे. "कुतुकं दोग्धि" म्हणजे आनंदाचा आविष्कार करीत आहे.

सोन्याच्या पत्र्यावर त्रिकोण काढून त्याच्या तिन्ही कोणांस त्रिशूलाचा आकार दाखवावा. मध्यभागीं पहिल्या ओळींत ॐ ह्रीं ह्रीं दोन अक्षरें लिहावींत. त्यांच्या खालीं मध्यरेखेंत एकाखालीं एक ह्रीं ह्रीं ह्रीं दोन अक्षरें लिहावींत.

पंचवीस दिवस पूजा करावी. या श्लोकाचा रोज एक हजार वेळां जप करावा. खिचडी, दूध, पायस आणि तांबूल यांचा नैवेद्य दाखवावा. हें सिद्धयंत्र धारण करावें. यानें राज्यलाभ होईल.

अराला केशेषु प्रकृतिसरला मन्दहसिते
शिरीषाभा चित्ते दृशदुपलशोभा कुचतटे ।
भृशं तन्वी मध्ये पृथुरुरसिजारोहविषये
जगत्त्रातुं शम्भोर्जयति करुणा काचिदरुणा ॥ ९३ ॥

आई जगज्जननी! तूं शंकरांची अरुणवर्ण अशी अथवा अरुणा या नांवानें प्रसिद्ध अशी मूर्तिमंत करुणाच आहेस. आई! तुझें मी काय वर्णन करूं! तुझ्याजवळ कुटिलता जर कोठें असेल तर ती फक्त केसांच्या ठिकाणींच आहे. तुझे केश कुटिल आहेत. पण तूं मात्र "प्रकृतिसरला" स्वभावानें अत्यंत सरळ आहेस. हें तुझ्या मंदस्मितावरूनच प्रकट होत आहे. "केशेषु अराला मन्दहसिते प्रकृतिसरला" असा अन्वय समजावा. आई तूं चित्तानें अत्यंत कोमल आहेस. जणुं कांहीं शिरीष वृक्षाचें फूल. शिरसाचें फूल अत्यंत नाजुक असतें हें प्रसिद्धच आहें. "चित्ते" याऐवजीं कोठें कोठें "गात्रे" असा पाठ आढळतो. तुझे सर्व अवयव शिरसाच्या फुलासारखे नाजुक आहेत असा त्याचा अर्थ करावा. साऱ्या विश्वाचें भरणपोषण करणाऱ्या स्तन्यानें भरलेले तुझे स्तन शिलाग्रंथीप्रमाणें घनस्वरूपांत शोभत आहेत. तूं देहाच्या मध्यभागीं अत्यंत तन्वी म्हणजे कृश दिसत आहेस; पण वक्षस्थल आणि नितंबप्रदेश मात्र पृथु म्हणजे स्थूल आणि विशाल दिसत आहेत. शरीरसौष्ठवाच्या दृष्टीनें हीं सर्व लक्षणें उत्तम समजलीं जातात. आई! सर्व जगाचें संरक्षण करण्याकरितां नटलेली अरुणवर्ण अशी श्रीशंभुमहादेवांची तूं अनिर्वचनीय, मूर्तिमंत करुणाच आहेस. माझा तुला भक्तिभावानें नमस्कार असो. तुझा विजय असो.

पत्नीविषयक प्रेमाप्रमाणेंच ईश्वरविषयक नितान्त प्रेमालाहि शृंगार असें म्हटलें जातें. शृंगाराचा स्थायीभाव आनंद आहे. आनंदाची पूर्णता ईश्वरसाक्षात्कारांत होऊं शकते. ईश्वराशीं समरस होणें व नित्यनिरतिशय आनंदाचा अनुभव घेणें हेंच खऱ्या शुद्ध सात्त्विक शृंगाररसाचें फळ होय. आई! तुझा स्वरूपमहिमा अपूर्व आहे. कृपा कर. तुझ्या स्वरूपाचा साक्षात्कार मला होऊं दे.

श्लोक ध्यानावधध्ये सांगितल्याप्रमाणें यांहि श्लोकांतील यंत्राचें विधिविधान व साधन करावें. मधाचा नैवेद्य दाखवावा, या श्लोकाचा रोज एक हजार वेळां जप करावा. यंत्र धारण करावें. यानें सकलाभीष्ट सिद्धि होईल.

कलङ्कः कस्तूरी रजनिकर-बिम्बं जलमयं
कलाभिः कर्पूरैर्मरकत-करण्डं निबिडितम् ।
अतस्त्वद्भोगेन प्रतिदिनमिदं रिक्तकुहरं
विधिर्भूयो भूयो निबिडयति नूनं तव कृते ॥ ९४ ॥

आई जगज्जननी ! हें आकाशांत दिसणारें चंद्रबिंब हा जणुं कांहीं तुझा पाचूचा करंडा आहे. यांत तूं कस्तूरी, कापूर, गुलाबजल इत्यादि तुझ्या नित्य उपयोगांत आणल्या जाणाऱ्या सुवासिक वस्तु ठेवलेल्या आहेत. काळा डाग हा चंद्रावरचा कलंक नसून ती तुझी अंगाला, कपाळाला लावण्याची कस्तूरी आहे. त्याचप्रमाणें हें चंद्राचें बिंब, यांतील जो जलांश दिसत आहे तें जल म्हणजे तुझें गुलाबजल आहे. येथें जल शब्दाचाच अर्थ "पन्नीर" म्हणजे गुलाबजळ, केवडा-जल असा केलेला आहे. चंद्रामध्यें जो शुक्लवर्णाचा कलांचा भाग दिसत आहे तो कापूर आहे. अशा रीतीनें कापूर, कस्तूरी, गुलाबजल इत्यादि वस्तूंनी तुझा हा पाचूचा करंडक पूर्ण भरलेला आहे. याच्यांतील वस्तु रोज तूं उपयोगाला आणतेस, त्यामुळें त्या कमी कमी होतात. हाच चंद्राचा क्षय समजला जातो. हा "रिक्तकुहरं" म्हणजे रोजच्या रोज रिकामा होणारा करंडक ब्रह्मदेव तुझ्याकरितां पुन्हां पुन्हां भरून काढतो. यालाच लोक शुक्लपक्षांतील चंद्राच्या कलांची वृद्धि असें समजतात. आई ! तूं माझें कल्याण कर. या श्लोकांत उत्प्रेक्षा, अतिशयोक्ति, अपह्नव इत्यादि अनेक अलंकार आहेत.

याहि श्लोकांतील यंत्राचें विधिविधान वरच्याप्रमाणेंच समजावें. मुगदळाचा अथवा मुगाच्या खिचडीचा नैवेद्य दाखवावा. या श्लोकाचा रोज एक हजार जप करावा. यंत्र धारण करावें. यानें इष्टार्थ सिद्धि प्राप्त होईल.

पुरारातेरन्तःपुरमसि ततस्त्वच्चरणयोः
सपर्यामर्यादा तरल-करणानामसुलभा ।

तथा ह्येते नीताः-शतमख-मुखाः-सिद्धिमतुलां
तव द्वारोपान्त-स्थितिभिरणिमाद्याभिरमराः ॥ ९५ ॥

हे आई जगज्जननी ! तूं "पुरारातिं" म्हणजे त्रिपुरासुराचा वध करणारें भगवान् शंकर यांची "अन्तःपुरं" म्हणजे पट्टमहिषी आहेस. त्यांची तूं महाराणी आहेस. म्हणूनच तुझ्या चरणकमलाच्या पूजेची मर्यादा – पूजेचा प्रकार – "तरलकरणानां" ज्यांचीं इंद्रियें चंचल आहेत अशा इंद्रादि देवांनाहि "असुलभा" म्हणजे अवघड आहे. "तथाहि" म्हणजे ही गोष्ट प्रसिद्धच आहे. शतमख म्हणजे इंद्र ज्यांच्यामध्यें प्रमुख आहे असे मोठे मोठे अधिकारी देव हे तुझ्या मंदिराच्या – श्रीचक्राच्या बाहेरच्या दाराजवळ उभ्या असलेल्या अणिमा, महिमा इत्यादि दहा प्रकारच्या सिद्धि, त्यांच्याकडूनच कृतार्थ केले जातात. तुझ्या दारावरील द्वारपाल असलेल्या सिद्धीच त्यांना अपरिमित सिद्धि अर्पण करून कृतार्थ करतात. तात्पर्य, तुझ्या द्वारपालांचा जर एवढा महिमा आहे तर मग तुझा किती असणार ? आई ! धन्य आहेस तूं. तूं मला कृतार्थ कर.

सोन्याच्या पत्र्यावर साधा अधोमुख त्रिकोण काढून त्यांत एकाखालीं एक ॐ ह्रीं ह्रीं अक्षरें लिहावींत. शुद्ध तिळाच्या तेलांत हें यंत्र ठेवून तीन दिवस पूजा करावी. या श्लोकाचा रोज एकशेंआठ वेळां जप करावा. तिळाची खिचडी आणि गूळ यांचा नैवेद्य दाखवावा. तें तेल व्रणाला लावावें. व्रण लौकर भरून येईल.

कलत्रं वैधात्रं कति कति भजन्ते न कवयः
श्रियो देव्याः को वा न भवति पतिः कैरपि धनैः ।
महादेवं हित्वा तव सति सतीनामचरमे
कुचाभ्यामासङ्गः कुरवकतरोरप्यसुलभः ॥ ९६ ॥

हे आई जगज्जननी ! ब्रह्मदेवाचें "कलत्र" म्हणजे पत्नी. पत्नी ही आपल्या पतीचें कश्मलापासून – पापापासून, नरकापासून – संरक्षण करते म्हणून तिला कलत्र असें म्हणतात. "कश्मलात् त्रायते इति कलत्रं" अशी कलत्र शब्दाची व्युत्पत्ति आहे. ब्रह्मदेवाची पत्नी सरस्वतीदेवी, तिची भक्ति कोण कोण कवि म्हणजे विद्वान् लोक करीत नाहींत ? सर्वच विद्वान् लोक सरस्वतीची भक्ति करतात तिच्या कृपेनें ते वाक्पति – बृहस्पति बनतात. ते सरस्वतीवल्लभ समजले जातातच

मंत्र, जप, पुरश्चरण, पूजापाठ, होमहवन करून पुष्कळ लोक श्रीदेवीची-लक्ष्मीची आराधना करतात आणि तिच्या कृपेनें कोणत्याहि प्रकारचें धन मिळवून ते धनपति बनतात. लक्ष्मीपति म्हणविले जातात. कोण बरें अशा प्रकारें लक्ष्मीपति बनत नाहींत ? सर्वच बनतात. पण हे सतीमाते त्रिपुरसुंदरी ! तूं मात्र "सतीनां" म्हणजे पतिव्रता स्त्रियांमध्ये "अचरमा" म्हणजे अत्यंत श्रेष्ठ आहेस. तुझ्यापेक्षां पातिव्रत्यांत दुसरें कोणीच श्रेष्ठ नाहीं. म्हणूनच तुझ्या वक्षस्थलाचा स्पर्श देवाधिदेव श्रीमहादेव यांना सोडून दुसऱ्या कोणालाच होत नाहीं. तो कुरबक वृक्षाला सुद्धा सुलभ नाहीं. कुरबक म्हणजे सोनेरी अथवा तांबडी कोरांटी. कोरांटीच्या झाडाचा असा स्वभाव आहे कीं, त्याला तरुण स्त्रियांनीं आलिंगन दिलें कीं फुलांचा बहर येतो. फुलाफळांची समृद्धि होण्याकरितां वृक्षांना किंवा गर्भाची अभिवृद्धि होण्याकरितां स्त्रियांना जे विशिष्ट उपचार केले जातात त्यांना "दोहद" असें म्हणतात. अशोक वृक्षाला तरुण स्त्रीनें पादाघात करणें किंवा कोरांटीच्या झाडाला आलिंगन देणें हे त्या वृक्षांचे दोहद-संस्कारच होत.

आई त्रिपुरसुंदरी ! तुझा स्पर्श पुरुषवाचक नामांनीं युक्त असलेल्या अशोक, कुरबक इत्यादि वृक्षांनाहि दुर्लभ आहे; मग इतर पुरुषांना तो कसा सुलभ असेल ? तात्पर्य, लोक उपासनाबलानें वाक्पति, लक्ष्मीपति बनतात पण पार्वतीपति बनण्याचें भाग्य मात्र महादेवालाच लाभलें आहे. हे सती ! तुझें पातिव्रत्य असाधारण आहे. धन्य आहेस तूं. तूं माझें कल्याण कर.

पांढऱ्या रुईच्या (मांदाराच्या) चिकानें भूर्जपत्रावर अधोमुख त्रिकोण काढावा. त्यामध्यें एकाखालीं एक क्लीं क्लीं क्लीं अशीं तीन अक्षरें लिहावींत. आठ दिवस पूजा करावी. मध आणि दुधाचा पायस यांचा नैवेद्य दाखवावा. या श्लोकाचा रोज एक हजार वेळ जप करावा. हें यंत्र धारण केल्यानें साधक विद्यासंपन्न होईल.

गिरामाहुर्देवीं द्रुहिण-गृहिणीमागमविदो
हरेः पत्नीं पद्मां हरसहचरीमद्रितनयाम् ।
तुरीया कापि त्वं दुरधिगम-निःसीम-महिमा
महामाया विश्वं भ्रमयसि परब्रह्ममहिषि ॥ ९७ ॥

महासरस्वती, महालक्ष्मी आणि महाकाली ही तत्त्वतः श्रीमहात्रिपुरसुंदरीचींच रूपें आहेत. महात्रिपुरसुंदरीच या रूपांनीं नटलेली आहे. ती स्वतः या तिन्ही रूपांच्या पलीकडे अनिर्वचनीय सच्चिदानंदरूपानें विराजमान आहे. तिलाच महाशक्ति, महामाया असें म्हणतात. या अभिप्रायानें आचार्य वर्णन करीत आहेत.

हे आई जगज्जननी ! तूं परब्रह्ममहिषी आहेस. परब्रह्म म्हणजे परात्पर सदाशिवतत्त्व भगवान् शंकर यांची तूं महिषी म्हणजे पट्टराणी आहेस. आगमवेत्ते अर्थात वेदरहस्य जाणणारे लोक तुलाच ब्रह्मदेवाची गृहिणी, वाणीची अधिष्ठात्री देवता महासरस्वती असें म्हणतात. श्रीविष्णूची पत्नी पद्मा महालक्ष्मी असेंहि तुलाच म्हणतात. आणि रुद्राची सहचारिणी अदितनया पार्वती असेंहि पण तुला म्हणतात. पण तूं या तिन्ही देवतांच्या पलीकडे असलेली तुरीया म्हणजे चौथी "काऽपि" म्हणजे अनिर्वचनीय आहेस. तुझा महिमा निःसीम आहे. त्याला अंत नाहीं आणि पारहि नाहीं. तो "दुरधिगम" म्हणजे आकलन करण्यास कठीण आहे. तुला महाशक्ति महामाया असें म्हणतात. तूं आपल्या सामर्थ्यानें सर्व विश्वाचें संचलन करीत आहेस.

"ह्रीश्च ते लक्ष्मीश्च पत्न्यौ" असें पुरुषसूक्तामध्यें परम पुरुषाचें परमब्रह्माचें वर्णन केलेलें आहे. ह्री म्हणजे भुवनेश्वरी आणि लक्ष्मी म्हणजे श्रीविद्या या दोन्ही हे पुरुषोत्तमा ! परात्पर परब्रह्मरूपा परमेश्वरा ! तुझ्या पत्नी आहेत. यामध्यें श्रीविद्येला प्राधान्य आहे. तंत्रशास्त्रांत श्रीभुवनेश्वरी देवीचा श्रीविद्येमध्येंच अंतर्भाव केलेला आहे. म्हणून श्रीविद्या ही सर्वश्रेष्ठ आहे. आई त्रिपुरसुंदरी ! तीच तूं आहेस. तूं माझ्यावर कृपा कर.

श्लोक ९७, ९८ आणि ९९ या तिन्ही यंत्रांची आकृति एकच आहे. अधोमुख त्रिशूलयुक्त त्रिकोण आणि मध्यभागीं ह्रीं हें अक्षर. शंभराव्या श्लोकाचेंहि यंत्र असेंच आहे. त्यांत ॐ ह्रीं अक्षरें लिहावींत. यंत्र सोन्याच्या अथवा तांब्याच्या पत्र्यावर लिहावें. सोळा दिवस पूजा. एक हजार वेळां जप. पायसाचा आणि मधाचा नैवेद्य. ९७ व्या श्लोकानें साधकाचा देह दृढ होईल. ९८ व्या श्लोकानें स्त्रियांना गर्भधारणा व पुरुषांना वीर्यवृद्धि. ९९ व्या श्लोकानें शौर्य, पराक्रम आणि १०० व्या श्लोकानें सकल कार्यसिद्धि होईल.

कदा काले मातः कथय कलितालक्तक-रसं
पिबेयं विद्यार्थी तव चरण-निर्णेजन-जलम् ।
प्रकृत्या मूकानामपि च कवितोकारणनया
कदा धत्ते वाणी-मुखकमल-ताम्बूलरसताम् ॥ ९८ ॥

आई जगज्जननी ! तुझ्या चरणकमलांचें तीर्थ मला सेवन करण्याचें भाग्य केव्हां लाभेल ? अशा आशयानें आचार्य प्रार्थना करीत आहेत. आई ! मी विद्यार्थी आहें. तुझें चरणोदक प्राशन केल्याशिवाय मला पूर्ण विद्या कशी प्राप्त होणार ? पूर्ण विद्या प्राप्त होण्यासाठीं मला तुझें चरणोदक केव्हां मिळेल ? ज्याला "अलक्तकरस" म्हणजे अळिता अर्थात् लाक्षारस लावलेला आहे अशा तुझ्या चरणकमलांचें प्रक्षालन करून तें तीर्थ मी या जन्मांत कोणत्या काळीं प्राशन करूं शकेन ? सांग. तुझें चरणोदक स्वभावतः मूक असलेल्या अर्थात् जन्मापासून ज्यांना बोलतां येत नाहीं अशा जन्मजात मुक्या लोकांनाहि कविता करण्याचें सामर्थ्य प्राप्त करून देणारें आहे. मुक्यांना, वेड्यांना व न शिकलेल्या लोकांनाहि तें कवित्वशक्ति किंवा विद्वत्ता प्राप्त करून देणारें आहे. तें माझ्या मुखामध्यें सरस्वतीदेवीच्या मुखकमलांतील तांबूलरसाचें रूप केव्हां धारण करील ? तात्पर्य, हे माते ! तुझ्या चरणकमलाचें तीर्थ लाक्षारसामुळें सरस्वतीदेवीच्या मुखकमलांतील तांबूलरसाप्रमाणें रक्तवर्ण आहे व तें प्राशन करणारा प्रत्यक्ष सरस्वतीरूपच होतो, असा तुझ्या चरणकमलाचा प्रभाव आहे.

सरस्वत्या लक्ष्म्या विधिहरिसपत्नो विहरते
रतेः पातिव्रत्यं शिथिलयति रम्येण वपुषा ।
चिरंजीवन्नेव क्षपित-पशु-पाश-व्यतिकरः
परानन्दाभिख्यं रसयति रसं त्वद्भजनवान् ॥ ९९ ॥

आई जगज्जननी ! " त्वद्भजनवान् परानन्दाभिख्यं रसं रसयति " अनन्य चित्तानें भक्ति करणारा तुझा भक्त परानंदसंज्ञक रसाचा अर्थात् नित्य निरतिशय अशा आनंदाचा आस्वाद घेत असतो. तुझ्या उपासनेमुळें त्याला सरस्वतीचा आणि लक्ष्मीचाहि लाभ झालेला असतो. तो सरस्वतीचा प्रिय बनल्यामुळें ब्रह्मदेव त्याचा मत्सर करतात. तो लक्ष्मीपति बनल्यामुळें विष्णूहि पण त्याचा मत्सर

करतात. याप्रमाणें तो "विधिहरिसपत्न" बनतो. विधि म्हणजे ब्रह्मदेव आणि हरि म्हणजे विष्णु हे दोघेहि त्याच्याकडे शत्रुबुद्धीनें पहातात. तो मात्र " सरस्वत्या लक्ष्म्या च सह विहरते " म्हणजे सरस्वतीसह आणि लक्ष्मीसह आनंदानें विहरत असतो. तात्पर्य, तुझी उपासना करणारा सरस्वतीच्या प्राप्तीनें विद्वान् होऊन समाजांत लौकिक मिळवतो आणि लक्ष्मीच्या प्राप्तीनें श्रीमान् म्हणून मोठ्या डौलानें मिरवत असतो. तसेंच तुझ्या उपासनेमुळें त्याला उत्कृष्ट शरीरसौष्ठवाचा लाभ होतो. तो मदनासारखा सुंदर बनतो. त्याच्या देहाची कांति रतीच्या अंतःकरणांत मदनाची भ्रांति निर्माण करते. तो आपल्या रम्य शरीरानें कामदेवाची पत्नी जी रति तिच्या पातिव्रत्यधर्मालाहि शिथिल करून टाकतो. तात्पर्य, रतीलाहि स्पृहणीय वाटावें इतकें त्याचें शरीर तेजस्वी आणि सुंदर बनतें. असें हें श्रीविद्येच्या उपासनेचें इहलोकीं अलौकिक फळ मिळतें.

आई श्रीविद्ये, तुझ्या उपासनेनें प्राप्त होणाऱ्या पारमार्थिक फलाचें मी काय वर्णन करूं ? तें अवर्णनीय आहे. सामयिक संप्रदायाप्रमाणें अनन्यचित्तानें श्रीविद्येची उपासना करणारा हा कपिल मुनि, मार्कंडेय मुनि यांच्याप्रमाणें "चिरंजीवन्" म्हणजे चिरंजीव बनतो. "क्षपित-पशुपाश-व्यतिकरः" पशु म्हणजे जीव. " इन्द्रियैः प्रपञ्चं पश्यति इति पशुः " अशी पशु शब्दाची व्युत्पत्ति आहे. चक्षुरादि इंद्रियांच्या द्वारां शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या विषयांचा प्रपंच तो नेहमीं पहात असतो, अनुभवित असतो म्हणून त्याला पशु असें म्हणतात. पाश म्हणजे अविद्या. अविद्येमुळेंच जीव संसारात बांधला जातो म्हणून अविद्येला पाश असें म्हणतात. पशु आणि पाश अर्थात् जीवभाव आणि अज्ञान यांचा "व्यतिकर" म्हणजे संबंध हा त्याचा पूर्णपणें "क्षपित" म्हणजे नाहींसा झालेला असतो. जीवभाव आणि अज्ञान मावळल्यामुळें तुझा भक्त जीवन्मुक्त होऊन चिरकाल निजानंदाचा आस्वाद घेत रहातो. आई ! असा हा तुझ्या उपासनेचा प्रभाव आहे. तूं मलाहि संसारपाशांतून मुक्त कर. मी तुझ्या चरणीं नमस्कार करतों.

अविद्येच्या पाशातून मुक्त व्हावें म्हणून वेदांतहि श्रीविद्येची आणि श्रीशंकरांची प्रार्थना केलेली आहे. " अदितिः पाशं प्रमुमोक्त्वेतन्नमः पशुभ्यः पशुपतये करोमि " (तैत्तिरीय ब्राह्मण) अदिति म्हणजे आदित्यमंडलांतर्गत बिंदुस्थानापन्न श्रीविद्या महाशक्ति. ती मला संसारपाशांतून मुक्त करो. मी तिला

नमस्कार करतों. पशुपति म्हणजे भगवान् सदाशिव, त्यांनाहि मी पशुत्वनिवृत्ती-करितां अर्थात् जीवभावाचा निरास होण्याकरितां हा नमस्कार करीत आहें. पोट दुखण्याचें औषध याचा अर्थ पोट दुखणें थांबण्याचें औषध असा करतात त्याचप्रमाणें "पशुभ्यः" याचा अर्थ पशुत्वनिवृत्तीकरितां असा समजावा. पशुपाशनिवृत्तीनंतर श्रीविद्येचा उपासक हा चिरकाल जिवंत राहून आनंदाचा अनुभव घेत असतो. ही त्याची जिवन्मुक्तावस्था होय. शरीराचा नाश होणें हें कालक्रमानें प्राप्त असतांनाहि कपिल मुनि, मार्कंडेय मुनि इत्यादि तत्त्ववेत्ते, भगवद्भक्त व योगी यांची शरीरें नित्यत्वाच्या कोटींत प्रविष्ट झालेलीं असतात. याचें कारण त्यांचें प्रारब्धकर्म, योगसामर्थ्य अथवा भगवत्कृपा हेंच होय. प्रारब्धकर्म भोगून क्षीण झाल्यानंतर तत्त्ववेत्त्यांचा देह पडतो. योगबलानें निर्माण केलेल्या अथवा धारण केलेल्या शरीरानें अपेक्षित सुखें भोगून झाल्यानंतर अथवा विरक्त झाल्यानंतर आत्मसाक्षात्कारी असलेल्या योग्याचा देह पडतो. भगवत्कृपेनें प्राप्त झालेलें चिरंजीवित्व शेवटीं भगवंताच्या इच्छेनेंच परिसमाप्त होतें व भगवद्भक्ताचा देह सुटतो. अशी ही जीवन्मुक्तांच्या नित्य जीवनाची व्यवस्था आहे.

आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर तत्त्ववेत्त्यांचीं पाठीमागचीं अनंतजन्मींचीं पापपुण्यें जळून भस्म होतात. पण प्रारब्धकर्म मात्र बलवत्तर असल्यामुळें तें भोगावेंच लागतें. प्रारब्धकर्म भोगल्याशिवाय क्षीण होत नाहीं. प्रारब्धकर्म भोगून पूर्ण झाल्यानंतरच तत्त्ववेत्त्याचें जीवनकार्य परिसमाप्त होत असतें. याच प्रारब्धकर्माला शास्त्रामध्यें "संस्कार" असें म्हटलेलें आहे. कार्य संपलेलें असलें तरी तत्त्ववेत्त्यांच्या शरीराचा व्यवहार, प्राक्तन संस्कारबलानें दीर्घकाल चालू असतात. " सम्यग्ज्ञानाधिगमाद्धर्मादीनामकारणप्राप्तौ । तिष्ठति संस्कारवशाच्चक्रभ्रमवद्धृतशरीरः ॥ " (षष्टितन्त्र). पुण्य आणि पाप यांचीं फलें सुखदुःखांच्या रूपानें भोगणें हें जीवनाचें कार्य आहे. पुण्य आणि पाप हीं धर्माधर्ममूलक असतात. सुखदुःखांच्या रूपानें मनुष्य पुण्यपाप भोगीत असतांना त्याच शरीरांत तो पुन्हां धर्म आणि अधर्म यांचें आचरण करीत असतोच. अशा रीतीनें धर्म आणि अधर्म, पुण्य आणि पाप व सुख आणि दुःख व तीं भोगण्याकरितां शरीर यांचें चक्र हें अखंड चालू असतें. त्याची परिसमाप्ति ही आत्मसाक्षात्कारानेंच होऊं शकतें. आत्म-साक्षात्कार उपासनाबलानें प्राप्त होणाऱ्या ईश्वरकृपेवर अवलंबून आहे. " ईश्वरेच्छा

बलीयसी" ईश्वराच्या इच्छेनेंहि भक्तांचा जीवन-व्यवहार हा चिरकाल राहूं शकतो. कुंभाराच्या चाकावरील शेवटचें मडकें काढून घेतलें तरी कांही वेळ चाक फिरतच असतें. विजेचा पंखा बंद करण्याकरितां स्विच् बंद केलें तरी पंखा कांही काळ फिरतच असतो. असा संस्कारांचा प्रभाव आहे. ईश्वरेच्छा तर त्याहिपेक्षां अधिक प्रभावी आहे. ईश्वरेच्छेचें आनुकूल्य संपादन करण्याकरितां ईश्वरोपासना करणें आवश्यक आहे. प्रकृतग्रंथांत श्रीललितामहात्रिपुरसुंदरी हीच "सर्वेश्वरी सर्वमयी" असल्यामुळें ईश्वरभावनेनें तिचीच उपासना करणें विवक्षित आहे; कारण ती सर्वज्ञ आहे, सर्व शक्तींनी संपन्न आहे, सर्वांचें मंगल करणारी आहे, उत्तम गति देणारी आहे. सर्व अपराधांची क्षमा करणारी आहे. तिच्यापेक्षां या विश्वांत श्रेष्ठ तर कोणी नाहींच; पण तिच्याशीं साम्य दाखवितां येईल असेंहि कोणी नाहीं. ती अत्यंत दयाळु आहे. "सर्वज्ञा सान्द्रकरुणा समानाधिकवर्जिता। सर्वशक्तिमयी सर्व-मङ्गला सद्गतिप्रदा॥ सर्वेश्वरी सर्वमयी" इत्यादि नामांनीं ललितासहस्रनामांत तिच्या स्वभावाचें व स्वरूपाचें वर्णन केलेलें आहे. "संसारपङ्कनिर्मग्नसमुद्धरण-पण्डिता।" "जन्म-मृत्यु-जरा-तप्त-जन-विश्रान्ति-दायिनी॥" संसारपंकामध्यें रुतलेल्या भक्तजनांचा उद्धार करण्यांत ती मोठी कुशल आहे. जन्म, मृत्यु, वार्धक्य इत्यादि दुर्धर दुःखांच्या तापांनीं तप्त झालेल्या जनतेच्या चित्ताला विश्रांति देणारी तीच एक या जगांत आहे. असें तिचें स्वरूप आहे. मग तिला सोडून दुसऱ्या कोणाला शरण जाणार?

श्रीमहात्रिपुरसुंदरीची उपासना कशी करावी? याचा आपण आतां थोडक्यांत विचार करूं. पहांटेंच उठावें. शुचिर्भूतपणें पवित्र आसनावर विराजमान व्हावें. शांत चित्तानें उपास्यदेवता श्रीविद्या-त्रिपुरसुंदरी हिच्या स्वरूपाचें चिंतन करावें. श्रीविद्यास्वरूप श्रीत्रिपुरसुंदरी ही विश्वरूपानें नटलेली असून सर्व विश्वाची माताहि पण तीच आहे. याच दृष्टीनें तिला "आब्रह्मकीटजननी", "विश्वरूपा", "परात्परा" "अनन्तकोटिब्रह्माण्डजननी दिव्यविग्रहा" अशीं नांवें दिलेलीं आहेत. हें तिचें स्वरूप लक्षांत घ्यावें. सौंदर्य-लहरीतील पहिल्या एकेचाळीस श्लोकांनीं वर्णन केलेलें तिचें तात्त्विक स्वरूप लक्षांत घ्यावें. पुढच्या श्लोकांनीं वर्णिलेलें तिचें सगुण स्वरूपहि लक्षांत घ्यावें. तिच्या तात्त्विक स्वरूपाचें व सगुण स्वरूपाचें मनानें चिंतन करावें. श्रीचक्र हें तिचें मंदिर आहे व ती स्वतःहि श्रीचक्रस्वरूप आहे. श्रीचक्राचें स्वरूप मागें

वर्णिलेलेंच आहे. तें आपल्या मनश्चक्षूपुढें ठेवावें. चतुर्दशभुवनात्मक ब्रह्माण्ड हें श्रीचक्रस्वरूप आहे अशी भावना करावी. अनाद्यनन्तकाल हाहि श्रीचक्रस्वरूपच आहे आणि आपला देह हाहि पण श्रीचक्रस्वरूपच आहे. हें सर्व सूक्ष्म तत्त्व सूक्ष्म विचारांनीं व गुरुकृपेनें लक्षांत घ्यावें. आपल्या देहांतील षट्चक्रें व सहस्रदल-कमल हें श्रीचक्रस्वरूपच आहे. तीं सर्व चक्रें श्रीविद्येचीं अधिष्ठानें आहेत. तेथें श्रीविद्याहि सांगोपांग विराजमान झालेली आहे. तेथें तिची उपासना केली असतां उपासकाला पंचविध मुक्तींचा लाभ होतो. शरीरांतील षट्चक्रांपैकीं मूलाधारचक्र आणि स्वाधिष्ठानचक्र हीं दोन्ही चक्रें अंधतामिस्रस्वरूप असल्यामुळें उपासनेला अयोग्य मानलेलीं आहेत. मणिपूरचक्र, अनाहतचक्र, विशुद्धिचक्र, अज्ञाचक्र आणि सहस्रदलकमल हीं पांच चक्रें श्रीत्रिपुरसुंदरीचीं पूजास्थानें मानलेलीं आहेत. नाभि-स्थानीं असलेल्या मणिपूरचक्रांत तिची पूजा-समाराधना केली असतां साधकाला सार्ष्टिमुक्तीचा लाभ होतो. उपास्यदेवतेशीं समान असलेल्या ऐश्वर्याचा लाभ होणें याला "सार्ष्टि" असें म्हणतात. उपास्यदेवतेच्या नगराजवळ दुसरें नगर निर्माण करून तो तें ऐश्वर्य भोगीत असतो. हृदयस्थानीं असलेल्या संवित्कमलामध्यें श्रीविद्येचें ध्यान केलें असतां सालोक्यमुक्ति मिळते. सालोक्यमुक्तीमध्यें श्रीत्रिपुरसुंदरीच्याच नगरामध्यें वास्तव्य करण्याचें भाग्य लाभतें. कंठस्थानीं असलेल्या विशुद्धिचक्रांत तिचें ध्यान केलें असतां साधकाला सार्मीप्यमुक्ति प्राप्त होते. सामीप्यमुक्तीमध्यें साक्षात् इष्टदेवतेच्या अंगस्पर्शाचा आनंद मिळतो. पादसंवाहन, हस्तसंवाहन इत्यादि स्वरूपाच्या सेवेचें भाग्य लाभतें. आज्ञाचक्रामध्यें उपासना केली अस-तांना सारूप्यमुक्ति मिळते. उपास्यदेवतेच्या रूपासारखें रूप उपासकालाहि प्राप्त होतें. हा उपासकाचा मोठाच उत्कर्ष होय. सायुज्यमुक्तीमध्यें उपास्यदेवतेशीं पूर्ण तादात्म्य असतें तर सारूप्यमुक्तीमध्यें उपास्यदेवतेच्या देहासारखा देह लाभत असतो हा फरक आहे. या चारी अवस्थांना मुक्ति म्हटलें जात असलें तरी हें खरें मुक्तीचें स्वरूप नव्हे. बाह्य दुःखांतून बऱ्याच अधिक प्रमाणांत साधकाची सुटका होत असल्यामुळें त्यांना मुक्ति म्हटलें जातें. त्या ठिकाणीं मुक्ति शब्द हा औपचारिक आहे. कांही झालें तरी सारूप्यामध्यें द्वैतभाव आहेच. "भयं वै द्वितीयाद्भवति" या न्यायानें सारूप्यमुक्तीमध्यें संपूर्ण भयाची निवृत्ति होत नसते. त्यामुळें निरतिशय आनंदाचा साक्षात्कार होत नाहीं. तो सायुज्यमुक्ती-मध्यें होतो. तीच खरी मुक्ति होय. सहस्रदलकमलामध्यें श्रीविद्येची उपासना

केली असतां सायुज्यमुक्तीचा लाभ होतो. याच अभिप्रायानें आचार्यांनीं श्लोकाच्या चौथ्या चरणांत "परानन्दाभिख्यं रसयति रसं त्वद्भजनवान्" असें मुक्त झालेल्या भक्ताचें वर्णन केलेलें आहे.

आतां आपल्या देहांतील मूलाधारादि चक्रांचें श्रीचक्राशीं तादात्म्य कसें आहे तें आपण पाहूं. श्रीचक्रामध्यें शिवचक्रें आणि शक्तिचक्रें हीं अन्योन्य संलग्न असल्यामुळें श्रीचक्र हें शिवशक्तितादात्म्यस्वरूप मानलें जातें. या तादात्म्यालाच नाद आणि बिंदु यांचें तादात्म्य असें म्हणतात. शिव हा नादस्वरूप आहे तर शक्ति ही बिंदुस्वरूप आहे. "बिन्दुर्नाम जगदुत्पत्तिलयहेतुः शिवस्य शक्तिविशेषः" असें श्रीलक्ष्मीधरांनीं म्हटलेलें आहे. या नादबिंदूंचें ऐक्य हेंच श्रीचक्राचें स्वरूप आहे. श्रीचक्रामध्यें असलेल्या (१) त्रिकोण, (२) अष्टकोण, (३) अंतर्दशारचक्र, (४) बहिर्दशारचक्र, (५) चतुर्दशारचक्र आणि (६) अष्टदल, षोडशदलादिरूप शिवचक्र यांचें आपल्या देहांतील (१) मूलाधार, (२) स्वाधिष्ठान, (३), मणिपूर, (४) अनाहत, (५) विशुद्धि आणि (६) आज्ञाचक्र. यांच्याशीं क्रमशः तादाम्य समजावें. याप्रमाणें नाद म्हणजे श्रीचक्र आणि बिंदु म्हणजे शरीरांतील षट्चक्रांचा समूह. अशा रीतीनें नादबिंदूंचें ऐक्य आपल्या शरीरांत असल्याचें लक्षांत घ्यावें. मूलाधारचक्र हें चतुर्दलात्मक आहे. त्याची कर्णिका म्हणजे मधला कोश हा त्रिकोणात्मक आहे. तोच श्रीचक्रांतील मुख्य त्रिकोण समजावा. स्वाधिष्ठानचक्र हें सहा दलांचें आहे. त्याची कर्णिका हें श्रीचक्रांतील अष्टकोणचक्र समजावें. याच्याच पोटांत मुख्य त्रिकोण आहे. नाभिस्थानचें मणिपूरचक्र हें दहा दलांचें आहे. त्याची कर्णिका ही श्रीचक्रांतील अंतर्दशारचक्रस्वरूप समजावी. अनाहतचक्र हें बारा दलांचें आहे. त्याची कर्णिका हें श्रीचक्रांतील बहिर्दशारचक्र समजावें. कंठस्थानीं असलेलें विशुद्धिचक्र हें सोळा दलांच्या कमलाप्रमाणें आहे. त्याची कर्णिका हें श्रीचक्रांतील चौदा त्रिकोण असलेलें चक्र समजावें. याप्रमाणें मूलाधारापासून विशुद्धिचक्रापर्यंत श्रीचक्रांतील शक्तिचक्रांचें ऐक्य लक्षांत घ्यावें. आज्ञाचक्र हें दोन दलांचें आहे. त्याच्यांतील एकदल हें श्रीचक्रांतील शिवचक्रांतर्गत अष्टदलकमल समजावें. आणि दुसरें दल हें श्रीचक्रांतील षोडशदल कमल समजावें. आपल्या शरीरांतील षट्चक्रांत तीन ग्रंथी आहेत. स्वाधिष्ठानचक्राच्या शेवटीं असलेल्या ग्रंथीला रुद्रग्रंथि म्हणतात. अनाहतचक्राच्या शेवटीं असलेल्या ग्रंथीला विष्णुग्रंथी

म्हणतात तर आज्ञाचक्राच्या अंती असलेल्या ग्रंथीला ब्रह्मग्रंथी असें म्हणतात. त्या ग्रंथी अग्नि, सूर्य आणि चंद्रस्वरूप आहेत असें समजावें. या तीन ग्रंथींचें श्रीचक्रांतील तीन वर्तुळांशीं तादात्म्य समजावें. यानंतर श्रीचक्रांतील चार चार दारांनीं युक्त असलेलें तीन रेषांचे चतुष्कोण हीं मूर्ध-स्थानीं विराजमान असलेल्या सहस्रदलकमलाची कर्णिकाच होय असें समजावें. अर्थात् मूर्धस्थानीं असलेलें सहस्रदलकमल हें श्रीचक्रांतील चार दारांनीं युक्त असलेलें तीन रेषांचें चतुष्कोणाकृति भूपुरच होय अशी भावना करावी. आपण शीर्षासनाची कल्पना केली कीं सहस्रदलकमलाच्या कर्णिकारूप भूपुरामध्यें सारें श्रीचक्र मेरुपृष्ठाप्रमाणें अधिष्ठित असलेलें दिसेल. श्रीचक्रांतील त्रिकोणांत बिंदुस्थानीं श्रीत्रिपुरसुंदरी विराजमान झालेली आहे तर मूलाधारचक्रांतील त्रिकोणांतहि कुंडलिनीच्या रूपानें श्रीत्रिपुरसुंदरी विराजत आहेच. असा हा श्रीचक्र आणि षट्चक्रें यांच्या तादात्म्योपासनेचा सूक्ष्म विचार आहे. श्रीचक्रांतील प्रत्येक त्रिकोणांत, अष्टदलांत व षोडशदलांत त्याचप्रमाणें भूपुरांतील दारांत पूर्वी वर्णन केलेल्या सर्व देवता आणि स्वरव्यंजनात्मक मातृका तसेच त्या त्या बीजांत अभिप्रेत असलेलीं तत्त्वें, पंचमहाभूतें, पंचतन्मात्रा, पंचज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें, मन इत्यादि सर्व तत्त्वप्रपंच यांचाहि अंतर्भाव असलेला, तो शरीरांतील षट्चक्रांच्या प्रत्येक दलांतहि यथायोग्य स्थानीं शास्त्रोक्त पद्धतीनें कल्पावा. असें हें श्रीललितामहात्रिपुरसुंदरीच्या मानसोपासनेचें स्वरूप आहे. आम्हीं त्याचें येथें दिग्दर्शन मात्र केलेलें आहे. हृत्कमलांत, आज्ञाचक्रांत अथवा सहस्रदलकमलांत श्रीविद्यास्वरूप उपास्यदेवतेचें ध्यान करून गुरूंनीं सांगितलेल्या पद्धतीनें पंचदशी अथवा षोडशी मंत्राचा विधिपूर्वक जप करणें हीहि एक उपासनापद्धति आहेच. कोणत्याहि मार्गानें गेलें तरी साध्य एकच असल्यामुळें साधक शेवटीं तेथेंच जाऊन पोहोंचतो.

श्रीचक्राचें लक्षण पुढीलप्रमाणें सांगितलेलें आहे.

" बिन्दु-त्रिकोण-वसुकोण-दशारयुग्म-मन्वश्र-नागदल-संयुत-षोडशारम् ।
वृत्तत्रयं च धरणीसदनत्रयं च श्रीचक्रमेतदुदितं परदेवतायाः ॥ "

बाह्य भागाकडून अंतर्भागाकडे श्रीचक्राचें क्रमशः स्वरूप पुढीलप्रमाणें सांगतां येईल :—



श्रीचक्र

श्रीचक्राच्या चारहि मर्यादा अथवा बहिर्भाग हा तिहेरी रेषांनीं द्वारयुक्त भूपुराकृति दाखविलेला असतो. यालाच "धरणीसदन" असें म्हटलेलें आहे. या चारहि बाजू सम असतात. म्हणजेच समभुज चौकोनांच्या साहाय्यानें (अर्थात् थोडा बदल करून) हें धरणीसदन दाखवितां येतें.

या भूपुराच्या आत भूपुराचे दोन्ही कर्ण एकमेकांस जेथें छेदतात तो मध्यबिंदु कल्पून तीन वर्तुळें काढलेलीं आहेत. ही वर्तुळें एकमेकांपासून जवळ जवळच आहेत. यांना वृत्तत्रय असें म्हटलें आहे. या वृत्तत्रयाच्या आंत षोडशदल कमल दाखविलें आहे. बहुतेक आकृतीमध्ये भूपुराच्या आंत व षोडशदलकमलाच्या बाहेर तीनऐवजीं चार वर्तुळें दिसतात. त्यांतील एक सर्वांत आंतील वर्तुळ हें षोडशदलकमलाची मर्यादा दाखविणारें आहे. आकृतींत हें दाखविलेंच पाहिजे असें नाहीं. षोडशदलकमलाच्या आंत अष्टदलकमल आहे. या षोडशदलकमलाची

आंतील मर्यादा दाखविणारें एक वर्तुळ आहे. तेंच अष्टदलकमलाची बहिर्मर्यादा दाखविणारें वर्तुळ होय. अष्टदलकमलाचीहि अंतर्मर्यादा दाखविणारें वर्तुळ आकृतींत दिसतें. पण कमलांचीं मर्यादा दाखविणारें कोणतेंहि वर्तुळ हा यंत्रांतील आवश्यक भाग नाहीं. या वर्तुळांमुळें आकृति सुबक होण्यास मदत होते. मर्यादादर्शक वर्तुळें न दाखवितां मध्यबिंदूपर्यंत संपूर्ण कमलदलें दाखविलेलींहि आकृति पाहण्यांत आहे.

या अष्टदलकमलाच्या आंत नऊ त्रिकोण असे काढलेले आहेत कीं, त्यामुळें एकूण त्रिकोणांची संख्या त्रेचाळीस होते. या नऊ त्रिकोणांपैकीं पांच त्रिकोण अधोमुखी असून चार त्रिकोण ऊर्ध्वमुखी आहेत.

ऊर्ध्वमुखी त्रिकोण – △ कस्का, △ चछज, △ टठड आणि △ तथद.

अधोमुखी त्रिकोण – ▽ पफब, ▽ यरल, ▽ धभम, ▽ यरल आणि ▽ शषद.

एकूण त्रेचाळीस त्रिकोणांची पांच विभागांत विभागणी होते. सर्वांत बाह्य बाजूस चौदा त्रिकोण होतात. या चौदा त्रिकोणांच्या बाह्य कोनांनीं चतुर्दशारचक्र होतें.

या चतुर्दशारचक्राच्या आंत दहा त्रिकोणांचा दुसरा विभाग आहे. या दहा त्रिकोणांच्या बाह्य कोनांनीं दशकोणचक्र किंवा दशारचक्र होतें. या दशकोण-चक्राच्या आंत आणखी एक दहा त्रिकोणांचा विभाग असून त्या दहा त्रिकोणांच्या बाह्य कोनांनीं आणखी एक दशकोणचक्र होतें.

याच्या आंत आठ त्रिकोणांचा चौथा विभाग असून यांच्या आठ बाह्य कोनांनीं अष्टकोणचक्र होतें.

पांचवा विभाग एकाच मध्यवर्ती त्रिकोणाचा असून या त्रिकोणांत एक बिंदु आहे. कांहीं श्रीचक्रांमध्यें हा बिंदु या मध्यवर्ती त्रिकोणांत न दाखवितां स्याच्या वरील चतुष्कोणांत दाखविलेला आहे.

वर वर्णन केलेलींच माहिती श्रीशंकराचार्य पुढील श्लोकांत सांगतात –

चतुर्भिः श्रीकण्ठैः शिवयुवतिभिः पञ्चभिरपि
प्रभिन्नाभिः शम्भोर्नवभिरपि मूलप्रकृतिभिः ।
चतुश्चत्वारिंशद्वसुदलकलाश्रत्रिवलय-
त्रिरेखाभिः सार्धं तव शरणकोणाः परिणताः ॥ (सौ.ल.श्लो.११

या श्रीचक्राची विविध प्रतीकात्मकता प्रतिपादिली गेली आहे. उदाहरणार्थ, सोमात्मकत्व, सूर्यात्मकत्व, अनलात्मकत्व इत्यादि.

प्रदीपज्वालाभिर्दिवसकर-नीराजनविधिः
सुधासूतेश्चन्द्रोपल-जल-लवैरर्घ्यरचना ।
स्वकीयैरम्भोभिः सलिल-निधि-सौहित्य-करणं
त्वदीयाभिर्वाग्भिस्तव जननि वाचां स्तुतिरियम् ॥१००॥

आई जगज्जननी ! मी तुझी किती स्तुति करणार ? तुझा महिमा अपार आहे. मी कितीहि स्तुति केली तरी ती तुझ्या अनंत आणि अपार महिम्यापुढें अपुरीच पडणार. माझा हा प्रयत्न म्हणजे गंगेच्याच प्रवाहांतील पळीभर पाणी घेऊन गंगेला अर्घ्य अर्पण करण्यासारखें आहे. प्रदीप्त अग्निनारायणापुढें छोटासा दिवा किंवा सूर्यनारायणापुढें काडवात लावण्यासारखेंच आहे. अशा अभिप्रायानें आचार्य स्तुति करीत आहेत.

आई त्रिपुरसुंदरी ! तूं समस्त वाक्प्रपंचाची जननी आहेस. तुझ्याच दोन शब्दांनीं मी तुझी ही स्तुति केलेली आहे. ही स्तुति म्हणजे "प्रदीपज्वालाभिः यथा दिवसकर-नीराजन-विधिः" नीरांजनांत लावलेल्या वातींनीं ज्याप्रमाणें सूर्यनारायणाला ओवाळावें तसाच हा प्रकार आहे. "सुधासूतेः चन्द्रोपललवैः यथा अर्घ्यरचना" सुधासूति म्हणजे अमृताला स्रवणारा अमृताचा निधि अर्थात् चंद्र. त्याला चंद्राच्याच किरणांच्या संपर्कानें द्रवलेल्या चंद्रकांत रत्नाच्या जलकणांनीं अर्घ्य अर्पण करण्याप्रमाणें आहे. "स्वकीयैः अम्भोभिः सलिल-निधि-सौहित्य करणं" समुद्राला त्याच्या स्वतःच्याच जलांनीं तर्पण करण्यासारखें आहे. सौहित्य शब्दाचा अर्थ तृप्ति, तर्पण असा आहे. "हे वाचां जननि ! त्वदीयाभिः वाग्भिः इयं तव स्तुतिः अस्ति" हे वाग्जननी ! शब्दप्रपंचाच्या रूपानें नटलेली तूं, शब्दप्रपंचाची जननी आहेस. तुझ्याच शब्दांनीं मी तुझी ही स्तुति केलेली आहे. या माझ्या अल्प-स्वल्प स्तुतीचा तूं प्रेमानें अंगीकार कर.

■ ■ ■

योगतारावली

[आपलें जीवन आनंदमय बनविण्याच्या दृष्टीनें योगतारावलि हें स्तोत्र अथवा प्रकरण फारच फार उपयुक्त आहे. या स्तोत्राची रचना करून आचार्यांनी खरोखर सामान्य मानवांवर फारच मोठे उपकार केलेले आहेत. व्युत्पन्न आणि बुद्धिमान् असलेले लोक ग्रन्थानवय वाचतील, त्यावरील भाष्यें वाचतील, शास्त्र-ग्रंथ वाचतील आणि आत्मकल्याणाचा मार्ग शोधून काढतील; पण ज्यांना शास्त्र-व्युत्पत्ति नाहीं असे सामान्य मानव आत्मकल्याणाचें यथार्थ मार्गदर्शन न झाल्यामुळें आत्मकल्याणाला मुकतील आणि हातीं आलेला बहुमोलाचा मानव देह आपण व्यर्थ दवडला असा पश्चात्ताप करण्याची त्यांच्यावर पाळी येईल. असा त्यांच्यावर प्रसंग येऊं नये म्हणून भगवत्पूज्यपाद आचार्य या योगतारावली स्तोत्रांत अज्ञ जनांना आत्मकल्याणाचें मोठ्या दयाई बुद्धीनें सक्रिय मार्गदर्शन करीत आहेत.

भक्ति, ज्ञान, आणि वैराग्य हीं सर्व आत्मकल्याणाची सामग्री खरी, पण ती वाटते तितकी सोपी नाहीं. शेकडों जन्माचें पूर्वपुण्य पदरीं असेल तरच भक्तीचा लाभ होतो. ज्ञान मिळविणें ही काय सोपी गोष्ट आहे ! साधें व्यावहारिक ज्ञान देखील सहजासहजीं मिळत नाहीं, मग पारमार्थिक ज्ञानाच्या दुर्मिळतेबद्दल काय सांगावें ! वैराग्य हें तर फारच दुर्लभ असतें. वैराग्याच्या गोष्टी सोप्या, पण तें अंगीं बाणणें अत्यंत कठीण. वैराग्यामध्यें इंद्रियनिग्रहाला आणि मनो-निग्रहाला प्राधान्य असतें आणि येवढी तीच गोष्ट अत्यंत अवघड असल्याचें आपल्या प्रतीतीस येईल. बड्या बड्या ज्ञान्यांची जेथें फटफजीति होतें तेथें सामान्य मानवांची कथा काय ! योगाभ्यासाचें खतपाणी घातल्याशिवाय भक्ति, ज्ञान आणि वैराग्य यांचीं बीजें अंतःकरणांत चांगली रुजत नाहींत. भक्ति, ज्ञान, वैराग्य आणि योग या चार पायांच्या चौरंगावर विराजमान झालेला जीवात्माच निजानंदाचा अनुभव घेऊं शकतो. तात्पर्य, भक्ति, ज्ञान आणि वैराग्य यांच्या जोडीला योग हा अत्यंत आवश्यक आहे यांत संशयच नाहीं.

यावर कोणी विचारील कीं, नित्यनिरतिशय आनंदाच्या प्राप्तीकरितां आवश्यक असलेल्या चतुर्विध सामग्रीपैकीं भक्ति, ज्ञान आणि वैराग्य हीं साधनें जर दुर्लभ आहेत, तर योग तरी कोठें सुलभ आहे ! योगाभ्यासांतहि कष्ट आहेतच. यावर उत्तर असें कीं, खरें आहे. योगाभ्यासहि कष्टसाध्य आहे ही



योगाभ्यासासाठी योग्य असे निसर्गरम्य स्थान.

गोष्ट खरी आहे; पण तो अभ्यासानें सुलभ आहे यांत संशय नाहीं. योगाभ्यास क्लिष्ट आहे या भावनेनें त्याची उपेक्षा करण्यापेक्षां तो हळूहळू अभ्यासिला तर कोणालाहि सिद्ध करून घेतां येईल इतका तो सोपा आहे. मात्र हळूहळू नित्य-नियमानें योगाचा अभ्यास केला पाहिजे. " केल्यानें होत आहे रे आधीं केलेंच पाहिजे । यत्न तो देव जाणावा अंतरीं धरितां चरें ॥ " ही समर्थांची उक्ति लक्षांत ठेवून प्रत्येकानें योगाचा अभ्यास अवश्य करावा इतका तो लौकिक दृष्टीनें व पारमार्थिक दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा विषय आहे.

आपल्याला सुख – नित्य सुख पाहिजे आहे ना ? आपल्याला समाधान पाहिजे आहे ना ? तर मग आपलें मन शांत होणें अत्यंत आवश्यक आहे. जोंपर्यंत मन शांत नाहीं तोंपर्यंत आनंद कसा लाभेल ? मनाच्या शांतीसाठीं ब्रह्मात्मैक्यभावना होणें आवश्यक आहे. " सर्वं खल्विदं ब्रह्म, ब्रह्मैवाहमस्मि. अहं ब्रह्मैवाऽस्मि हंसः सोऽहं, शिवोऽहम् " या भावनेला ब्रह्मात्मैक्यभावना असें म्हणतात. बुद्धि निर्मळ असल्याशिवाय ही भावना बुद्धींत खऱ्या अर्थानें ठसत नाहीं. अर्थज्ञानावांचून शब्द हा निरर्थकच असतो. याच अभिप्रायानें व्याकरण-महाभाष्यकार देखील " एकः शब्दः सम्यग्ज्ञातः सुप्रयुक्तः स्वर्गे लोके काम-धुग्भवति " या वाक्यानें अर्थज्ञानपूर्वक शब्दप्रयोगाचेंच महत्त्व प्रतिपादन करीत आहेत. अर्थज्ञानाबरोबरच क्रियानुष्ठानहि ओघानेंच आलें पाहिजे. " क्रियेवीण शब्दज्ञान । तेंवि श्वानाचें वमन " हा समर्थांचा इशारा विसरून भागणार नाहीं. " जनीं होत पंडीत सांडीत गेले, अहंतागुणें ब्रह्मराक्षेस झाले " असा हा भावनाविरहि केवल पांडित्याचा दुष्परिणाम अटळ असतो. श्रीतुकाराम महाराजांनीं देखील " नाश केला शब्दज्ञानें " या वचनानें केवल शब्दज्ञानाची निरर्थकता दर्शाविलेलीच आहे. तात्पर्य, ब्रह्मात्मैक्यभावना ही खऱ्या अर्थानें बुद्धींत प्रतिबिंबित होणें आवश्यक आहे. त्यासाठीं बुद्धि निर्मळ होणें आवश्यक आहे बुद्धि निर्मल होण्यासाठीं योगाभ्यासाची आवश्यकता आहे. याच अभिप्रायानें गीतेंतहि श्रीकृष्णप्रभूंनीं " नास्ति बुद्धिरयुक्तस्य नचायुक्तस्य भावना नचाभावयतः शान्तिरशान्तस्य कुतः सुखम् ?" (गी. २–६६) असा आपला अभिप्राय व्यक्त केलेला आहे. याच अभिप्रायानें आचार्यांनीं देखील साधकाचें ज्ञान, भक्ति आणि वैराग्य यांना योगाभ्यासाचें अधिष्ठान लाभावें म्हणून या योगतारावलींत योगप्रक्रियेचें दिग्दर्शन केलेलें आहे.

योगतारावलीचा मुख्य विषय नादानुसंधान आहे. मन एकाग्र झाल्याशिवाय खऱ्या आनंदाचा अनुभव येत नाही. मनाला एकाग्र करण्याकरितां नादानुसंधान हेंच एक उत्कृष्ट साधन आहे. तें इतर सर्व साधनांपेक्षां अत्यंत श्रेष्ठ आहे. आचार्यांनी स्वतः अनुभवानें ही गोष्ट पडताळून पाहिलेली आहे. योगतारावली आचार्यांच्या स्वानुभवाचा विषय आहे. आचार्य येथें केवळ शास्त्रार्थांचा विचार करीत नाहींत, तर शास्त्रामध्यें सांगितलेला सिद्धान्त आणि त्या सिद्धान्ताचा साक्षात्कार करून घेण्याचीं साधनें यांचा कार्यकारण भाव योगतारावलींत निर्दिष्ट केलेल्या पद्धतीनें ते स्वतः चोखाळून पहात आहेत आणि आपल्याला आलेला अनुभव आपल्याप्रमाणें इतरांना येतां यावा, या अनुभवानें प्राप्त होणारी शांति, समाधान आणि अनिर्वचनीय असा नित्यनिरतिशय आनंद आपल्याप्रमाणें इतरांनाहि लुटतां यावा याच हेतूनें आचार्यांनी या योगतारावलीच्या रूपानें स्वात्मानुभवाचे बोलच लिहून ठेवलेले आहेत.

यावर कोणी असें विचारील कीं, "तमेव विदित्वा अतिमृत्युमेति" "ज्ञानादेवतु कैवल्यम्" इत्यादि वचनांवरून ज्ञानानेंच मानव सर्व संसारबंधनांतून मुक्त होतो व ज्ञानानेंच कैवल्यसुखाचा अनुभव घेऊं शकतो ही गोष्ट सिद्ध होत आहे, त्याला योगाभ्यासाची जोड कशाला पाहिजे ? खरें आहे. सांसारिक बंधनें व दुःखें ही अज्ञान मूलक असल्यामुळें अज्ञानाचा निरास झाल्याशिवाय सांसारिक बंधनांचा निरास होणार नाहीं. सांसारिक बंधनें निरस्त झाल्याशिवाय सर्व दुःखांतून सुटका होणार नाहीं व ती झाल्याशिवाय खऱ्या सुखाचा अनुभवहि मिळणार नाहीं. अज्ञानाचा निरास ज्ञानानेंच होत असल्यामुळें ज्ञान हेंच मोक्षसुखाचें अंतिम साधन होय यांत संशय नाहीं. तथापि केवळ ज्ञानानें अज्ञानाचा निरास होत नसतो ही गोष्ट लक्षांत घ्यावी. ज्या ज्ञानानें अज्ञानाचा निरास व्हावयाचा असतो तें ज्ञान निःसंदिग्ध असावें लागतें, तें ज्ञान दृढ असावें लागतें. ज्ञानाला निःसंदिग्धता आणि दृढता प्राप्त होण्याकरितांच योगाभ्यासाची आवश्यकता आहे. भोजनानें क्षुधानिवृत्ति होते हा कार्यकारणभाव कळल्यानें क्षुधा निवृत्त होत नसते. क्षुधानिवृत्तीसाठी प्रयत्नानें पाकनिष्पत्ति करून भोजन करावें लागतें. प्रकाशानें अंधकाराचा नाश होत असतो एवढें कळाल्यानें अंधकार नाहींसा होत नाहीं. तो नाहींसा करण्याकरितां प्रयत्नानें प्रकाश निर्माण करावा लागतो. त्याचप्रमाणें अज्ञानाचा निरास करणारें आत्मज्ञान हें केवळ शब्दज्ञानानें प्राप्त होत नाहीं.

स्याच्या प्राप्तीकरितां कांहीं प्रक्रियेची – अभ्यासाची आवश्यकता आहे. त्याच प्रक्रियेला अथवा अभ्यासाला योग असें म्हणतात. या योगाची जोड असल्याशिवाय खऱ्या अर्थानें ज्ञानाचा लाभ होत नाहीं.

ज्ञानी होण्याकरितां योगी होणें हें अत्यंत आवश्यक आहे. ज्ञानाला योगाची जोड नसेल तर तें ज्ञान योगसाधनेच्या अभावीं संदिग्ध आणि शिथिल असल्यामुळें मोक्ष प्राप्त करून देण्याला समर्थ असूं शकत नाहीं. योगाभ्यासालाहि पण आत्मज्ञानाची जोड असल्याशिवाय तो योगाभ्यास मोक्षसुखाला कारणीभूत होऊं शकत नाहीं. " योगहीनं कथं ज्ञानं मोक्षदं भवति ध्रुवम् । योगो हि ज्ञान-हीनस्तु न क्षमो मोक्षकर्मणि ॥ " " तस्माज्ज्ञानं च योगं च मुमुक्षुर्दृढमभ्यसेत् " असें योगतत्त्वोपनिषदांत सांगितलेलें आहे.

शास्त्रप्रचीति, गुरुप्रचीति व आत्मप्रचीति या तिन्ही प्रचीतींच्या त्रिवेणी संगमावर येऊन पोहोंचल्याशिवाय खऱ्या आनंदांत – आत्मानंदांत अवगाहन केल्याचें समाधान लाभणार नाहीं. शास्त्रांत सांगितलेलीं प्रमेयें आगोदर धुंडाळा-वींत, तीं गुरूंच्या अनुभवानें पढताळावींत आणि नंतर स्वतः प्रयत्नांची पराकाष्ठा करून त्या अनुभवापर्यंत पोहोंचावें. उंसाची लागवड कशी करावी ? तो कसा वाढवावा ? गुऱ्हाळें कशी चालवावींत ? उंसाच्या रसाची खडीसाखर कशी करावी ? या सर्व विषयांचें अगोदर वाचन करावें लागतें, ते विषय ऐकावें लागतात. ती सर्व कृति प्रत्यक्ष पहावी लागते व नंतर स्वतः ती करावी लागते. याप्रमाणें खडीसाखर बनवून ती स्वतः चाखण्यांत जें समाधान आहे तें अनिर्वचनीय आहे. हिमालयाचीं वर्णनें वाचावींत, ऐकावींत आणि स्वतः पायीं तीर्थयात्रा करून हिमालयाच्या भव्य स्वरूपाचें दर्शन घ्यावें, त्यांतच खरा आनंद आहे. तीच स्थिति स्वानुभवानें आत्मानंदाचा साक्षात्कार करून घेण्यांत असते.

योग हा ज्ञानदीप उज्ज्वल करण्याचें एक उत्कृष्ट साधन आहे. काष्ठांत असलेला अग्नि काष्ठांचें मंथन अथवा घर्षण केल्याशिवाय प्रकट होत नाहीं त्याचप्रमाणें योगाभ्यासावांचून बुद्धीमध्यें ज्ञानदीपहि प्रज्ज्वलित होणार नाहीं. " यथाग्निर्दारुमध्यस्थो नोत्तिष्ठेन्मथनं विना । विना चाभ्यासयोगेन ज्ञानदीपस्तथा नहि ॥ " हें वचन योगकुंडल्युपनिषदांतील असल्यामुळें यांतील अभ्यासयोग शब्दाचा अर्थ योगाभ्यास असाच करणें उचित आहे. स्वभावतःच चंचल असलेलें मन योगाभ्यासाशिवाय निश्चल होऊं शकणार नाहीं. मन आत्मस्वरूपीं

निश्चल – स्थिर – अर्थात् एकाग्र झाल्याशिवाय आत्मस्वरूपाचा साक्षात्कारहि होणार नाही. याच अभिप्रायानें " विद्वान्मनो धारयेदप्रमत्तः " शहाण्या माणसानें अत्यंत सावधपणानें योगाभ्यासानें मनाची धारणा म्हणजे एकाग्रता संपादन करावी असा श्वेताश्वतरोपनिषदानें आत्मतत्त्वाचें विवेचन करतां करतां योगाभ्यासाचा मोठा मार्मिक इशारा देऊन ठेवलेला आहे.

अध्यात्मज्ञानाला जशी योगाभ्यासाची बैठक आवश्यक आहे त्याचप्रमाणें योगाभ्यासालाहि अध्यात्मज्ञानाचा आधार आवश्यक आहे. योगाभ्यासाला अध्यात्मज्ञानाचें साहचर्य नसेल तर तो अध्यात्मज्ञानविरहित योगाभ्यास हा एक सर्कशीतला खेळच ठरेल. पक्वान्न उत्तम आहे, पण त्याला साखर नाही. खिचडी उत्तम आहे, पण तिला मीठ नाही. त्याचप्रमाणें योगाभ्यास उत्तम आहे पण त्याच्या जोडीला अध्यात्मज्ञान नसेल तर तो योगाभ्यास साखर नसलेल्या पक्वान्नाप्रमाणें अथवा मीठ नसलेल्या खिचडीप्रमाणें अगदीं निरस ठरेल.

योगाभ्यासाच्या जोडीला अध्यात्मज्ञान नसेल तर त्या योगाभ्यासाला योग हें नांवच देतां येणार नाहीं. आत्मसाक्षात्काराची अपेक्षा अंतःकरणांत ठेवून ती पूर्ण करण्याकरितां जे प्रयत्न केले जातात, त्या प्रयत्नांनीं मनाची जी एक विशिष्ट अवस्था संपादिली जाते, मनाला अंतर्मुख करून परब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीं जें स्थिर केलें जातें त्या स्थितीलाच योग असें म्हणतात. अशी अग्निपुराणांत योगाची व्याख्या केलेली आहे. " आत्मप्रयत्नसापेक्षा विशिष्टा या मनोगतिः। तस्या ब्रह्मणि संयोगो योग इत्यभिधीयते ॥ " यद्यपि " योगश्चित्तवृत्तिनिरोधः " चित्तवृत्तींचा निरोध म्हणजे योग. अशी पतंजलीनीं योगाची व्याख्या केलेली आहे. तथापि त्यांनाहि चित्त आत्मप्रवण असणें हें अभिप्रेत आहेच. व्यवहारदशेंत चित्त हें निर्विषय कधींच असूं शकत नाहीं. अशा स्थितींत त्याचा निरोध करणें म्हणजेच चित्ताला इतर विषयांपासून परावृत्त करून परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं स्थिर करणें हें ओघानेंच आलें. यालाच योग असें म्हणतात. तात्पर्य योगाच्या जोडीला अध्यात्मविचार आणि अध्यात्मविचाराच्या जोडीला योगाभ्यास हा असलाच पाहिजे.

योग म्हटलें कीं, सर्वसामान्य लोकांना हा विषय आपला नव्हे असें वाटतें. घरदार सर्व कांहीं सोडून गिरिकंदरांत अथवा निर्जन अरण्यांत किंवा नदीच्या कांठी झोंपडी बांधून एकांतांत रहाणाऱ्या लोकांनींच योगाभ्यास करावा

अशी सर्वसाधारण लोकांची समजूत असते. पण ती सर्वस्वी स्वर्गी नव्हे. जीवांना दुःखांतून सोडविणें हें योगाचें ध्येय. अर्थात् ज्यांना ज्यांना आपण दुःखांतून मुक्त व्हावें अशी इच्छा असेल ते सर्व योगाभ्यासाचे अधिकारी आहेत. स्त्रीपुरुष बालवृद्ध, तरुण आणि प्रौढ, दरिद्री आणि श्रीमंत, अशिक्षित आणि विद्वान हे सर्वच योगाभ्यासांचे अधिकारी आहेत. योगाभ्यासाला जातपात कांहीं आड येत नाहीं.

आचार्यांनीं या प्रकरणाला योगतारावली हें नांव दिलेलें असल्यामुळें या प्रकरणाचा विषय योग आहे ही गोष्ट निर्विवाद होय. आचार्यांच्या योगतारावलींतला योग हा राजयोग आहे. याच अभिप्रायानें योगतारावलीच्या १४, १५ आणि १६ या तिन्ही श्लोकांत राजयोग या शब्दाचा प्रयोग केलेला आहे. "राजासौ गच्छति इत्युक्ते सपरिवारस्य राज्ञो गमनं प्रतीयते" राजेसाहेबांची स्वारी चालली आहे असें म्हटलें कीं, राजेसाहेबांच्या बरोबर त्यांचा लवाजमाहि असल्याचें लक्षांत येतें. त्याचप्रमाणें राजयोगाचा उल्लेख केल्याबरोबर राजयोगाचीं अंगें व उपांगें हींहि विवक्षित असतातच हें निराळें सांगणें नको. याच अभिप्रायानें आम्ही योगतारावलीच्या आधारें राजयोगाचें वर्णन करतांना राजयोगाच्या अंगांचें व उपांगांचेंहि अत्यंत संक्षेपानें विवेचन करण्याचें योजिलें आहे. आपआपल्या परिस्थितीप्रमाणें ज्यांना ज्यांना जेवढें शक्य असेल त्यांनीं तेवढा अभ्यास अवश्य करावा. सर्व परिस्थिति अनुकूल नसली तरी उद्विग्न अथवा उदास न होतां यथाशक्ति कांहीं न कांहीं तरी योगाभ्यास अवश्य करावा. हा अभ्यास वायां जाणार नाहीं. यानें आरोग्य लाभेल, आयुष्य वाढेल, मन प्रसन्न आणि शांत राहील. शेवटीं नित्य आणि निरतिशय आनंदाचा साक्षात्कार होऊन आपण पूर्ण सुखी व्हाल.

इतर स्तोत्रांप्रमाणेंच आचार्यांनीं योगतारावलीचीहि रचना अत्यंत सुंदर, प्रसन्न आणि गोड शब्दांनीं केलेली आहे. इतर स्तोत्रांप्रमाणेंच हें प्रकरणहि नित्य पाठांत ठेवावें अशी याची योग्यता आहे. नक्षत्रें ज्याप्रमाणें आकाशांत प्रकाशत असतात आणि मार्गदर्शनहि करीत असतात त्याचप्रमाणें योगाच्या व आत्मज्ञानाच्या क्षेत्रांत हे श्लोक मार्गदर्शनाचें कार्य करीत आहेत. योगमार्गांतील ही नक्षत्रपंक्तिच असल्यामुळें या प्रकरणाला योगतारावली असें अन्वर्थ नांव दिलेलें आहे. अभिजित नक्षत्रासह नक्षत्रें अठ्ठावीस आहेत. योगतारावलींतील

श्लोकांची संख्याहि पण अठ्ठावीसच आहे. एकोणतिसाव्या श्लोकामध्य योगाभ्यास-पूर्वक अध्यात्मविचारांनी आत्मतत्त्वाचा साक्षात्कार झाला म्हणजे आत्मा हा विभु म्हणजे विश्वव्यापी असून तो निरंजन अर्थात् देहादि उपाधींच्या गुणदोषांपासून सर्वस्वी अलिप्त आहे ही गोष्ट बुद्धीला पटते व तो योगी ज्ञानी होऊन जीवन्मुक्त अवस्थेंत विराजमान होतो. असा योगाभ्यासाचा व ज्ञानाचा महिमा वर्णन केलेला आहे. योगतारावलीतील आरंभापासून सत्तावीसपर्यंतचे श्लोक इंद्रवज्रा आणि उपेंद्रवज्रा वृत्तांतले आहेत. अठ्ठाविसाव्या श्लोकाचा छंद वसंततिलका आहे. त्याचप्रमाणें एकोणतिसावा श्लोक मालिनी वृत्तांतला आहे. आतां आपण प्रत्यक्ष योगतारावलीचा विचार करूं.]

वन्दे गुरूणां चरणारविन्दे
संदर्शित-स्वात्म-सुखावबोधे
जनस्य ये जाङ्गलिकायमाने
संसार-हालाहल-मोह-शान्त्यै ॥ १ ॥

स्वात्मसुखाचा साक्षात्कार ज्यांनीं दाखवून दिला, जे संसाररूपी हालाहल विषानें प्राप्त होणाऱ्या मूर्च्छेचा निरास करण्याकरितां अज्ञजनांना जडीबुटी देऊन विष उतरविणाऱ्या विषवैद्यांचें कार्य करीत आहेत, त्या श्रीगुरूंच्या चरणारविंदांना मी नमस्कार करीत आहें. असा या श्लोकाचा सरळ अन्वयानुसारी अर्थ आहे.

सत्तावीस-अठ्ठावीस श्लोकांचें योगतारावली प्रकरण दिसण्यांत अतिशय लहान आहे, पण साधकाला इष्ट फल प्राप्त करून घेण्याचा मार्ग दाखविण्यांत तें अतिशय महान् आहे यांत शंकाच नाहीं. त्याचें हें महत्त्व लक्षांत घेऊनच आचार्यांनीं या प्रकरणाच्या आरंभीं पहिल्या श्लोकानें मंगलाचरण केलेलें आहे. संकल्पित कार्य निर्विघ्नपणें परिसमाप्त व्हावें हा मंगलाचरणाचा उद्देश असतो. याच उद्देशानें विद्वान् तत्त्ववेत्ते आपल्या ग्रंथाच्या आरंभीं मंगलाचरण करीत असतात. कांहीं विद्वान् मनांतल्या मनांतच इष्ट देवतेचें स्मरण करून ग्रंथाला आरंभ करतात, तर कांहीं विद्वान् श्लोकाच्या रूपानें अथवा वाक्याच्या रूपानेंहि मंगलाचरण करीत असतात. त्यांत आपल्याप्रमाणें इतरांनींहि मंगलाचरण-पूर्वकच कोणत्याहि सत्कार्याला आरंभ करावा असें सुचविण्याचा त्यांचा हेतु गर्भित असतोच. मंगलाचरणानें भगवत्कृपेनें संभाव्य विघ्नेंहि दूर होत असतात.

या प्रकरणाच्या मंगलाचरणांत आचार्य आपल्या गुरूंच्याच चरणारविंदीं वंदन करीत आहेत. आयुष्याला योग्य तें वळण लावून आयुष्याची सफलता प्राप्त करून देणें आणि जीवाला पूर्ण समाधान व शांति प्राप्त करून देणें, जीवाला पूर्ण सुखी करणें हें थोर कार्य गुरूंकडूनच होत असल्यामुळें गुरूंबद्दल जितकी कृतज्ञता व्यक्त करावी तितकी ती थोडीच होईल.

साधु, संत, महात्मे, ऋषि, मुनि, तत्त्ववेत्ते त्याचप्रमाणें पुराणें, उपनिषदें आणि वेद हे सर्वच गुरूंचा महिमा मुक्तकंठानें गात आहेत. कबिरांनीं गुरु आणि गोविंद म्हणजे परमात्मा हे दोघेहि आपल्यापुढें उभे असतांना परमेश्वरापेक्षां गुरूंनाच धन्यवाद दिलेले आहेत. "गुरु गोविंद दोऊ खडे काके लागूं पाय। बलिहारी गुरु आपने गोविंद दियो बताय॥" भागवतकारांनीं तर गुरूंना कर्णधार मानलेलें आहे. आचार्यांना तर साऱ्या त्रिभुवनांत सद्गुरूंना कोणाची उपमा द्यावी हें सुचलेंच नाहीं. "दृष्टान्तो नैव दृष्टस्त्रिभुवनजठरे सद्गुरोर्ज्ञानदातुः" असें त्यांनीं शतश्लोकींत स्पष्टच म्हटलेलें आहे. छांदोग्योपनिषदाच्या सहाव्या अध्यायांतहि "आचार्यवान् पुरुषोवेद" सद्गुरूंनीं मार्गदर्शन केल्याशिवाय आत्मकल्याणाचा ठेवा हातीं लागणार नाहीं. ज्यांना सद्गुरु भेटेल त्यांनाच आत्मकल्याणाचा मार्ग दिसेल असा आपला अभिप्राय स्पष्टच दिलेला आहे.

"यस्य देवे पराभक्तिः यथा देवे तथा गुरौ। तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः" ज्याची ईश्वराच्या ठिकाणीं दृढभक्ति आहे, पराकोटीचें प्रेम आहे, जसे ईश्वराच्या ठिकाणीं तसेंच ते गुरूंच्या ठिकाणींहि पण आहे, त्यालाच नामरूपात्मक, विश्वप्रपंचाचें अनित्यत्व, देहाचें, धनाचें व वैभवाचें अशाश्वतत्व तसेंच पुत्र, मित्र, कलत्र, आप्त, बांधव आणि शत्रु यांच्यासंबंधांचें क्षणिकत्व हें कळेल. त्याचप्रमाणें आत्म्याचें अजरत्व, निर्विकारत्व, निराकारत्व, निरंजनत्व, निर्गुणत्व तसेंच सच्चिदानन्दरूपत्व हें सर्व कांहीं कळूं शकेल. हा सर्व गुरूंचा महिमा लक्षांत घेऊनच "गुरुभक्तिं सदा कुर्यात् श्रेयसे भूयसे नरः। गुरुरेव हरिः साक्षान्नान्यमित्यब्रवीच्छ्रुतिः" असा वेदांचा आदेश आहे. हा सर्व अभिप्राय लक्षांत घेऊन आम्हीहि पण "गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः। गुरुः साक्षात्परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः" या शब्दांनीं श्रीगुरुंच्या चरणीं वंदन करीत आहों.

"संदर्शितस्वात्मसुखब्बोधे" स्वात्मसुखाच्या साक्षात्काराचा मार्ग गुरूंनीच

दाखविलेला असतो. "गृणाति उपदिशति इति गुरुः" जे आत्मकल्याणाचा अचूक मार्ग दाखवितात, त्यांनाच गुरु असें म्हणतात. "गीर्यते स्तूयते इति गुरुः" अशी गुरुशब्दाची दुसरी व्युत्पत्ति आहे. वेदशास्त्रें देखील ज्यांचा महिमा गातात त्यांना गुरु असें म्हणतात. "गिरति अज्ञानं इति गुरुः" अशी ही एक गुरु शब्दाची व्युत्पत्ति आहे. जे शिष्याचें अज्ञान गिळून टाकतात अर्थात् निरस्त करतात त्यांना गुरु असें म्हणतात. याप्रमाणें अज्ञानाचा निरास आणि आत्मज्ञानाचा प्रकाश गुरुंच्याच कृपेनें प्राप्त होत असल्यामुळें त्यांचे अज्ञ जीवांवर फार मोठे उपकार असतात. यावर कोणी असें विचारील कीं, परमार्थमार्गांत गुरुंची काय आवश्यकता आहे ? शास्त्रें वाचावींत, संतांचे ग्रंथ वाचावेत, म्हणजे अज्ञानाचा निरास होईल, आत्मज्ञानाचा प्रकाश मिळेल. त्याला गुरु कशाला पाहिजे ? भोळ्याभाबड्या लोकांनीं गुरुंचें स्तोम माजविलें आणि धूर्त लबाड लोकांनीं गुरु या नात्यानें लोकांना फसविलें तेव्हां परमार्थाच्या मार्गांत कोणीहि गुरु करूं नये. पण ही शंका बरोबर नाहीं. चोर लुबाडतात म्हणून कोणी धन मिळवावयाचें सोडलें आहे का ? वैरी अथवा गुंड घरें जाळतात म्हणून घर बांधावयाचें कोणी सोडलें आहे का ? नाहीं. मग धूर्त लोक गुरुंचें सोंग घेऊन फसवितात म्हणून सद्गुरूंकडून आत्मसुखाच्या साक्षात्काराचा मार्ग समजावून घेणें कां सोडावें ? एऽक रे एऽक, दोऽन रे दोन हें शिकण्याकरितां गुरु लागतो. नवीन गांवीं अपेक्षित असलेलें ठिकाण शोधून काढण्याकरितां गुरु लागतो, तर मग आत्मसुखाच्या साक्षात्काराचा मार्ग शोधण्यासाठीं गुरु कां नको ? तो आपल्या बुद्धीनें कळेल असें जर कोणी म्हणेल तर ती कल्पना चुकीची आहे. कठोपनिषदामध्यें यमानें नचिकेताला स्पष्टच सांगितलें आहे कीं, बाबा रे ! तूं माझा अत्यंत आवडता आहेस म्हणून सांगतों, आत्मसाक्षात्काराचा लाभ हा केवळ तर्कानें होणार नाहीं. तो केवळ ग्रंथ वाचून होणार नाहीं. अनुभवी तज्ज्ञ गुरूनें सांगितलें तरच तो सुलभ रीतीनें होऊं शकेल. अभ्यास क्रमांतील एखाद्या विषयाच्या पुस्तकाची गर्दी असली आणि गाईडहि असलें तरी देखील तो विषय तज्ज्ञाच्या मुखातून ऐकल्या शिवाय उलगडत नाहीं. मग आत्मसाक्षात्काराविषयीं काय सांगावें ? पोहणें शिकावयास गुरु लागतो. उत्तम गायन शिकावयास गुरु लागतो. मलखांबावरील उड्या व कुस्तींतील डावपेंच शिकावयास गुरु लागतो. माका, ब्राह्मी गुळवेल इत्यादि वनस्पतींचें ज्ञान करून घेण्यास गुरु

लागतो तर मग आध्यात्मज्ञानालाहि गुरु लागेल यांत नवल काय ? ज्वर आला म्हणजे मनुष्य वैद्याकडे धांव घेतो. सर्पदंश झाला म्हणजे मांत्रिकाकडे धांव घेतो. त्याचप्रमाणें संसारतापानें पोळलेला मानव योग्य अधिकारी गुरूंकडे धांवला तर त्यांत वावगें काय आहे ; याच अभिप्रायानें आचार्य या श्लोकाच्या उत्तरार्धांत गुरूंचें महत्त्व वर्णन करीत आहेत.

" संसारहालाहलमोहशान्त्यै जनस्य ये जाङ्गलिकायमाने भवन्तः " संसाररूपी हालाहल विषानें प्राप्त झालेल्या मूर्च्छेच्या शांतीकरितां जे अज्ञ जनांना विषवैद्याप्रमाणें उपयोगाला येतात, अशा त्या गुरूंच्या चरणारविंदांना मी नमस्कार करतों असा पहिल्या चरणाशीं संबंध जोडून अर्थ लावावा. " संसरति अनेन इति संसारः " अशी संसार शब्दाची व्युत्पत्ति आहे. ज्याच्यामुळें जीव हा पुनः पुन्हां जन्म घेतो, मरतो, या दुःखदायक मृत्युलोकांत भटकतो त्याला संसार असें म्हणतात. अज्ञान अथवा अज्ञानजन्य वासना याच जन्म, मृत्यु आणि दुःख या सर्वांना कारण असल्यामुळें अज्ञान किंवा अज्ञानजन्य वासना हाच संसार शब्दाचा अर्थ झाला. अथवा " संसरति अस्मिन् इति संसारः " या व्युत्पत्तीप्रमाणें विचार केल्यास संसार या शब्दाचा अर्थ मृत्युलोक असाहि होतो. अदृष्टाच्या अधीन होऊन जेथें वरचेवर जन्म घ्यावा लागतो व मरावें लागतें त्या मृत्युलोकाला संसार असें म्हणतात. " पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननी जठरे शयनम् " असें हें संसारचक्राचें रहाटगाडगें सारखें चालूं असतें.

संसार हा अत्यंत कष्टप्रद आहे असें शास्त्रें सांगतात. संतमहात्मे त्याला अनुमोदन देतात. आपल्या अनुभवानेंहि या सिद्धान्ताला पुष्टिच मिळते. या संसाराला कोणी गहन अरण्याची उपमा देतात, तर कोणी त्याला दुस्तर सागर म्हणतात. आचार्यांनीं ऐतरेयोपनिषदाच्या द्वितीय खंडांत या संसारसागराचें मोठें रसभरित पण यथार्थ स्वरूपाचें वर्णन केलेलें आहे. " अस्मिन् संसारार्णवे अविद्या-काम-कर्म-प्रभव-दुःखोदके, अनन्ते अपारे, निरालम्बे, विषयेन्द्रिय-जनित-सुख-लव-लक्षण-विश्रामे, पञ्चेन्द्रियार्थ-तृष्णारुत-विक्षोभोत्थितानर्थ-शत-महोर्मौ, महारौरवाद्यनेक-निरय-गत-हाहेत्यादि-कूजिताक्रोशनोद्भूत-महारवे, सत्य-आर्जव-दान-दया-अहिंसा-शम-दम-धृत्यादि-आत्मगुण-पाथेय-पूर्ण-ज्ञानोडुपे, सत्सङ्ग-सर्वत्याग-मार्गे, मोक्ष-तीरे, अग्न्यादयो देवताः पतितवत्यः " अग्निवरुण, कुबेर, इंद्र इत्यादि मोठे मोठे देव देखील या संसारसागरांत गटांगळ्या खात आहेत. अज्ञानमूलक

संकल्प आणि संकल्पमूलक वर्गवाईट कर्मे यांच्यापासून प्राप्त होणारी दुःखे हेच या संसारसागरांतील अथांग जल होय. अनेक प्रकारच्या दुर्धरव्याधि, जरा-आणि मृत्यु, हे या संसारसागरांतील महाभयंकर जलचर आहेत. हा संसार-सागर अनादि अनंत आणि अपार आहे. यांत सांपडलेल्या जीवांना कशाचाहि आधार नाही. स्त्री-पुत्र, वित्तवैभव इत्यादि विषयांपासून होणारें क्षणिक सुख हाच या संसारसागरांतील विसांवा वाटतो. विसांवा कसला तो ? आभास मात्र आहे. शब्दस्पर्शादि पंचज्ञानेंद्रियांच्या अनुकूल विषयांबद्दल असलेली अनावर तृष्णा हेंच कोणी वादळ-तुफान यांत, या तुफान वाऱ्यामुळें या संसारसागरावर शेकडों अनर्थांच्या प्रचंड लाटा उसळत आहेत. महारौरवादि अनेक यातनांमध्यें खितपत पडलेल्या लोकांचें हाहाकार कल्पांत आणि आक्रोश हीच या संसारसागराची सतत गर्जना चालू असते. काहो ! अशा या भयंकर संसारसागराला तरून जाण्याला कांहीं साधन आहे का ? कांहीं मार्ग आहे का ? आणि या सागराचें पैल तीर तरी कोणतें ? याचें उत्तर देतात – सत्य, आर्जव, दान, दया, अहिंसा, शम, दम, धृति इत्यादि आत्मगुण; गीतेच्या सोळाव्या अध्यायाच्या आरंभीं सांगितलेली दैवी संपत्ति अथवा योगाभ्यासांतील प्राथमिक अंग म्हणून सांगित-लेलें यमनियम इत्यादि शिक्षासामग्रीनें पूर्ण भरलेलें ज्ञानरूपी जहाज हेंच या संसारसागराला तरून जाण्याचें उत्कृष्ट साधन होय. सत्संग आणि सर्वत्याग अर्थात कर्मफलांची निरपेक्षता हाच या संसारसागराला तरून जाण्याचा मार्ग होय. तसेंच मोक्ष अर्थात् सर्व-दुःख-विनिर्मुक्ति हेंच या संसारसागराचें पैल तीर आहे. असा आहे हा संसारसागर.

आचार्यांनीं प्रकृतस्थली संसाराला हालाहल म्हटलेलें आहे. हालाहल हें एक महाभयंकर विष आहे. यालाच कालकूट असें म्हणतात. समुद्रमंथनाच्या वेळीं पहिल्या प्रथम हें निर्माण झालें तेव्हां त्रैलोक्याची त्रेधा उडाली ! आदिगुरु भगवान् शंकर यांनींच त्रैलोक्याला या संकटांतून सोडविलें. प्रकृतस्थलीं सामान्य अज्ञ जन हे या संसाररूपी हालाहल विषाच्या बाधेनें मूर्च्छित झालेले आहेत. त्यांची विषबाधा दूर होणें आवश्यक आहे. विषबाधा दूर करणाऱ्याला जांगलिक असें म्हणतात. जंगलांतील जडीबुटींचें त्याला चांगलें ज्ञान असतें. जडीबुटींच्या साहाय्यानें विषबाधेवर उपचार करण्यांत तो निपुण असतो. प्रकृतस्थलीं जांगलिकाचे – विषवैद्याचें काम सद्गुरूच करूं शकतात. त्यांच्याशिवाय या

संसारविषाची बाधा दूर करण्याला दुसरें कोण समर्थ आहे ? अशा या गुरूंच्या चरणारविंदी आचार्य म्हणतात, मी नमस्कार करतों.

सदाशिवोक्तानि सपादलक्ष-
लयावधानानि वसन्ति लोके ।
नादानुसन्धानसमाधिमेकं
मन्यामहे मान्यतमं लयानाम् ॥ २ ॥

पहिल्या श्लोकांत गुरुवंदनरूप मंगलचरण केल्यानंतर आतां या दुसऱ्या श्लोकांत लयाचें अर्थात चित्ताच्या पूर्ण एकाग्रतेचें परमात्मस्वरूपीं चित्तानें समरस होऊन राहण्याचें स्वतः अनुभवलेलें असें सर्वोत्कृष्ट साधन निर्दिष्ट करीत आहेत. " सदाशिवोक्तानि सपादलक्षलयावधानानि लोके वसन्ति, (परं) लयानां मध्ये नादानुसन्धानसमाधिं एकं मान्यतमं मन्यामहे । " शंकरांनीं मनाचा लय करून घेण्याची सव्वा लाख साधनें सांगितलेलीं आहेत. त्या सर्व साधनांनीं प्राप्त होणाऱ्या समाधीपेक्षां नादानुसंधानानें प्राप्त होणारी समाधि हीच आम्हांला अत्यंत मान्य आहे असें आम्ही समजतों. असा या श्लोकाचा सरळ अन्वयानुसारी अर्थ आहे.

लय लागला, लय लागला असें आपण नेहमी म्हणतों, पण लय म्हणजे काय याचा आपण विचार केलेला नसतो. सामान्यपणें आपलें चित्त एखाद्या विषयामध्यें तल्लीन झालें, एकाग्र झालें म्हणजे लय लागला असें आपण समजतों. यावरून चित्ताची एकाग्रता म्हणजे लय असा प्रकृतस्थलीं लय शब्दाचा अर्थ आहे. वस्तुतः कोणत्या तरी विषयांत चित्तानें एकाग्र होणें हा खरा लय नव्हे. बगळाहि एकाग्रतेनें ध्यान करित असतो, पण त्याच्या एकाग्रतेला कोणी लय म्हणणार नाहीं. कारण त्याच्या ध्यानाचा विषय मासा असतो. कामिनी आणि कांचन हा विषय डोळ्यांपुढें ठेवून कित्येक लोक तन्मय होतात; पण त्यांच्या या तन्मयतेला लय म्हणतां येणार नाहीं. " लयो विषयविस्मृतिः " असें लयाचें लक्षण हठयोगप्रदीपिकेंत केलेलें आहे तें अत्यंत सनर्पक आहे. कोणत्याहि विषयाचें चित्तांत स्मरण न होणें, कोणत्याहि विषयाकडे चित्तानें न जाणें अथवा कोणतीहि वृत्ति चित्तांत निर्माण न होणें यालाच खरा लय म्हणतात. विषयांची स्मृति ही वासनामूलक असते. मनांतील वासना जागृत झाल्या कीं विषयांची आठवण होत असते. याकरितां चित्ताचा लय

असा व्हावयास पाहिजे की, पुन्हां चित्तामध्यें विषयवासनांची उत्पत्ति होतां कामा नये. यालाच लय असें म्हणतात. तात्पर्य, " अपुनर्वासनोत्थानाल्लयो विषयविस्मृतिः " हेंच लयाचें यथार्थ लक्षण होय. यालाच समाधि असें दुसरें नांव आहे. ही समाधि दोन प्रकारची असते. एक सबीज समाधि व दुसरी निर्बीज समाधि. सबीज समाधीलाच संप्रज्ञात समाधि असें म्हणतात, तर निर्बीज समाधीला असंप्रज्ञात समाधि असें म्हणतात. यांना सविकल्प समाधि व निर्विकल्प समाधि अशीहि नांवें आहेत.

निर्विकल्प समाधि ही ध्येयभूत असल्यामुळें ती फलस्वरूप आहे तर सविकल्प समाधि ही निर्विकल्प समाधीचें अगदीं जवळचें अंग होय, म्हणून ती साधनस्वरूप आहे. सविकल्प समाधीमध्यें इतर सर्व विषय मनांतून गेलेले असले तरी मी इष्ट देवतेचें ध्यान करीत आहें, ही वृत्ति मनांत डोकावीत असतेच. त्यामुळें ध्याता, ध्यान आणि ध्येय या वृत्तींचा सविकल्प समाधीमध्यें निरास झालेला नसतो. या अवस्थेंत मन सर्वस्वी वृत्तिशून्य होत नाहीं म्हणूनच या अवस्थेला संप्रज्ञात समाधि असें योग शास्त्रांत नांव दिलेलें आहे. ज्या वेळेला मनांतून याहि वृत्ति मावळतात, कोणतीहि वृत्ति मनांत उदयाला येत नाहीं त्या वेळेला त्या समाधीस निर्विकल्प समाधि असें म्हटलें जातें. त्याच समाधीला शास्त्रकारांनी असंप्रज्ञात समाधि अथवा निर्बीज समाधि असें नांव दिलेलें आहे. " तस्यापि निरोधे सर्वनिरोधान्निर्बीजः समाधिः " असें पतंजलींनी या समाधीचें वर्णन केलेलें आहे. या अवस्थेंत जीव हा स्वस्वरूपीं विराजमान होऊन रहात असतो. अनिर्वचनीय आनंदाचा अनुभव घेत असतो. फार काय सांगावें ? तो आनंदरूपच होतो. हाच निर्देश " तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम् " या सूत्रांत पतंजलींनी स्पष्ट केलेला आहे. ही अवस्था प्राप्त होणें हाच खरा लय होय.

अव उपसर्गपूर्वक धा धातूचा अर्थ मन लावणें, लक्ष देणें असा आहे. या धातूपासूनच अवधान शब्द निष्पन्न झालेला आहे. अवधान म्हणजे चित्ताची एकाग्रता. चित्ताची एकाग्रता साधण्याची जीं साधनें आहेत त्यांनाहि पण अवधान असेंच म्हणतात. अवधानामध्यें ध्यानाचा उत्कर्ष असतो. ध्यानाच्या उत्कर्षातूनच समाधिअवस्थेचा लाभ होत असतो. अवधान याच्या उलट अर्थानें अनवधान अथवा व्यवधान हे शब्द उपयोगांत आणले जातात. अनवधान याच अर्थानें संस्कृतमध्यें, प्रमाद हा शब्द आहे. अमरकोषांत "प्रमादोऽनवधानता" असा

पर्याय दिलेला आहे. रोगसाधन असणें किंवा चुकीच्या मार्गानें प्रवृत्त होणें याला प्रमाद असें म्हणतात. ज्या वेळेला जे करावयास पाहिजे तें न करणें आणि जें करावयास नको आहे तें करीत बसणें हें प्रमादाचें स्वरूप आहे. " अनवधानतायाः अभावः अवधानम् " असले प्रमाद होऊं न देणें हेंच अवधानाचें लक्षण होय. सर्व प्रकारच्या सांसारिक दुःखांची निवृत्ति परमेश्वराच्या कृपेनेंच होऊं शकते. " अज्ञान मूलक सांसारिक दुःखांचा निरास हा तत्त्वज्ञानानेंच होतो. " ही गोष्ट खरी असली तरी तें तत्त्वज्ञान ईश्वरकृपेशिवाय प्राप्त होणार नाही. ईश्वर परम दयाळु आणि पूर्ण समर्थ आहे. तो सच्चिदानंद रूप आहे. त्याचें आपण सतत चिंतन केलें पाहिजे. त्याच्या व्यतिरिक्त इतर कोणतीहि वृत्ति चित्तांत निर्माण होतां कामा नये. अशा रीतीनें ईशचिंतनांत तन्मय होणें, तन्मय होण्याचा प्रयत्न करणें हेंच प्रकृतस्थली "अवधान" या शब्दानें अभिप्रेत आहे.

चित्ताची तन्मयता घडवून आणण्याची जी जी सामग्री असेल किंवा जीं साधनें असतील त्या सर्वांनाहि "अवधान" असेंच म्हणतात. " अन्न हें जीवन आहे असें आपण म्हणतों. जीवन शब्दाचा तत्त्वतः जगणें हा अर्थ आहे; पण असें असूनहि जगण्याचें साधन असलेल्या अन्नालाहि जीवन हा शब्द लावला जातोच. त्याचप्रमाणें अवधान शब्दाचा अर्थ लय अथवा चित्ताची एकाग्रता असा असूनहि प्रकृतस्थलीं लयाच्या साधनांना उद्देशून अवधान शब्द योजलेला आहे. अशीं अवधानें अर्थात् चित्ताच्या एकाग्रतेचीं साधनें असंख्य आहेत. तीं सर्व साधनें आदिनाथ भगवान् शंकर यांनीं वर्णन करून सांगितलेलीं आहेत. ते अखिल विश्वाचे गुरु आहेत. विश्वाच्या कल्याणासाठी जें जें आवश्यक तें सर्व त्यांनीं उपदेशिलेलें आहे. मनाचा लय घडवून आणण्याला अत्यंत उपयुक्त असलेल्या या योगविद्येचेहि तेच गुरु आहेत. नाथ म्हणजे स्वामी – संरक्षण करणारा. जीवाची शिवाशीं गांठ घालून या जीवाला मृत्यूच्या भयापासून व संसाराच्या दुःखांपासून सोडविणारा जर कोणी असेल तर तो एक गुरुच होय. भगवान् शंकर हे जगाचे आद्य गुरु आहेत म्हणूनच त्यांना आदिनाथ असें म्हणतात. आदिनाथापासून पुढें मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, जालंधरनाथ, कानिफनाथ, गहिनीनाथ अशा परंपरेनें ही विद्या चालत आलेली आहे.

आदिनाथ भगवान् सदाशिव यांनीं सांगितलेलीं लयावधानें अर्थात् चित्तलयाचीं साधनें "सपादलक्ष" म्हणजे सव्वा लाख आहेत. या ठिकाणीं

सव्वा लाख या शब्दाचा अर्थ असंख्य एवढाच समजावा. हठयोगप्रदीपिकाकारांनीं तर सव्वाकोटि संख्येचा उल्लेख केलेला आहे. श्रवण, नामसंकीर्तन, गुणसंकीर्तन, इष्टदेवतेचें स्मरण, अर्चन, वंदन, इत्यादि भक्तियोग हे सर्व मनाचा लय करण्याचीच साधनें होत. धारणा, ध्यान इत्यादि योगांचीं अंतरंग साधनें हीं देखील मनाच्या लयाचींच साधनें होत. रूपानुसंधान, स्वरूपानुसंधान, नादानुसंधान, वह्निशिखानुसंधान, दीपशिखानुसंधान त्राटककिया, शांभवीमुद्रा, खेचरीमुद्रा, उन्मनीमुद्रा, मंत्रजप आणि विविध उपासना इत्यादि असंख्य मनोलयाचीं साधनें आहेत. साध्य एकच असलें तरी अधिकारभेदानें व रुचिभेदानें अनेक साधनांचा निर्देश केलेला आहे. याप्रमाणें लयाची म्हणजे समाधीचीं अनेक साधनें लोकांमध्यें प्रसिद्ध आहेत. कांहीं पुस्तकांतून " वसन्ति लोके " या ऐवजीं " लसन्तु भूमौ " असा पाठभेद आढळतो. भूमंडलावर मनाचा लय करून घेण्याचीं अनेक साधनें विराजत आहेत. विराजोत विचारीं. असा त्याचा अर्थ करावा.

चित्तलयाच्या असंख्य साधनांत नादानुसंधान हें फारच उच्च कोटीचें उत्कृष्ट साधन होय. अर्थात् नादानुसंधानानें घडून येणारा चित्ताचा लय हा इतर साधनांनीं होणाऱ्या चित्ताच्या लयापेक्षां अत्यंत उत्कृष्ट कोटीचा असतो. मनाला तिळमात्रहि त्रास होऊं न देतां मनाचें रंजन करीतच नाद हा मनाला आपल्याशीं समरस करून घेत असतो. नाद हा परब्रह्मस्वरूप असल्यामुळें नादाशीं समरस झालेलें मन सहजच ब्रह्मस्वरूपीं एकरूप होऊन जातें. तेथें मनाचें मनपण निराळें रहात नाहीं. तें पूर्णपणें मावळून जातें. यालाच उन्मनीभाव असें म्हणतात. या उन्मनीभावामध्यें पूर्ण आनंदाचा साक्षात्कार होत असतो. अशा रीतीनें नादानुसंधानानें घडून येणारा चित्ताचा लय हा सहज अनायासानें पूर्ण आनंदाचा साक्षात्कार करून देणारा असल्यामुळें इतर सर्व लयापेक्षां तो अत्यंत श्रेष्ठ होय यांत शंकाच नाहीं. याच अभिप्रायानें आचार्य या श्लोकाच्या उत्तरार्धांत नादानुसंधानानें प्राप्त होणाऱ्या समाधीचें श्रेष्ठत्व वर्णन करीत आहेत. " नादानुसंधानसमाधिमेकं मन्यामहे मान्यतमं लयानाम् । " इतर कोणत्याहि साधनानें प्राप्त होणाऱ्या समाधीपेक्षां नादानुसंधानानें प्राप्त होणारी समाधि हीच एक अत्यंत श्रेष्ठ होय. हें केवळ शास्त्र नसून आमचा अनुभवहि पण याचप्रमाणें ग्वाही देत आहे. याच अभिप्रायानें आचार्यांनीं "मन्यामहे" या क्रियापदाची योजना केलेली आहे प्रबोध सुधाकर नांवाच्या प्रकरणांतहि आचार्यांनी हाच अभिप्राय स्पष्ट केलेला

आहे. "परमानन्दानुभवान् सुचिरं नादानुसंधानात। श्रेष्ठश्चित्तलयोऽयं सत्स्वन्यलयेष्वनेकेषु॥" नादाच्याच अनुसंधानानें नादाशीं समरस असलेलें नादांतर्गत तेज, ब्रह्मचैतन्यस्वरूप आत्मप्रकाश, या प्रकाशाचाहि साक्षात्कार होत असतो. आत्मस्वरूप असलेल्या या नादांत आणि या रूपांत साधकाचें मन चिरकाल तल्लीन होऊन राहिलें तर पुन्हां त्याला संसाराचें बंधन प्राप्त होणार नाहीं. "नादाभ्यन्तर्वर्ति ज्योतिर्यद्वर्तते हि चिरम। तत्र मनो लीनं चेन्न पुनः संसारबन्धाय॥" असा हा नादानुसंधानाचा अगाध महिमा या दुसऱ्या श्लोकानें वर्णिलेला आहे. "राजयोगपदं प्राप्तुं सुखोपायोल्पचेतसाम्। सद्यः प्रत्ययसंधायी जायते नादजो लयः॥" अनाहतनादाच्या अनुसंधानानें सिद्ध होणारा चित्तलय हा ताबडतोब आत्मस्वरूपाचा साक्षात्कार करून देणारा आहे. अज्ञ जनांना ब्रह्मपदीं लीन होण्याचें तें एक अत्यंत सोपें साधन आहे असें स्वात्मारामयोगी यांनीं हठयोगप्रदीपिकेंतहि वर्णन केलेलें आहे. म्हणूनच सर्व लयांमध्यें नादानुसंधानानें प्राप्त होणारा लय हा अत्यंत श्रेष्ठ होय.

सरेचपूरैरनिलस्य कुम्भैः
सर्वासु नाडीषु विशोधितासु।
अनाहताख्यो बहुभिः प्रकारै-
रन्तः प्रवर्तेत सदा निनादः॥ ३॥

"सरेचपूरैः अनिलस्य कुम्भैः सर्वासु नाडीषु विशोधितासु (सतीषु) बहुभिः प्रकारैः अनाहताख्यः अन्तः निनादः सदा प्रवर्तेत।" रेचक आणि पूरक यांच्यासहवर्तमान प्राणवायूचा वरचेवर कुंभक केल्यामुळें देहांतील सर्व नाड्या शुद्ध झाल्या असतां अनेक प्रकारांनीं अनाहत नांवाचा अंतर्नाद नेहमीं प्रवृत्त होईल, वरचेवर तो ऐकूं येईल. असा या तिसऱ्या श्लोकाचा सरळ अन्वय आणि त्याचा अर्थ आहे.

मागील श्लोकांत नादानुसंधानानें प्राप्त होणारी समाधि ही सर्व समाधींमध्यें अत्यंत श्रेष्ठ आहे असें सांगितलें. त्यावर स्वाभाविकच नाद म्हणजे काय? तो कसा निर्माण होतो? तो केव्हां निर्माण होतो? त्याचे प्रकार किती आहेत? अनुसंधान म्हणजे काय आणि तें कसें करावें? इत्यादि प्रश्न निर्माण होतात. या सर्व प्रश्नांच्या उत्तरांचें सोपपत्तिक दिग्दर्शन आचार्यांनीं या तिसऱ्या श्लोकांत

केलेलें आहे. किंबहुना नादोत्पत्ति-प्रक्रियाच येथें सांगणें विवक्षित आहे. श्लोकाच्या पूर्वार्धांत याच प्रक्रियेचा निर्देश केलेला आहे. नेमकां आपण आतां त्याचाच विचार करूं.

'नद, शब्द करणें, दुमदुमणें, गरजणें' या धातूवरून नाद शब्द निष्पन्न झालेला आहे. जो दुमदुमतो, गरजतो अथवा शब्दरूपानें व्यक्त होतो त्याला नाद असें म्हणतात. नाद आणि निनाद हे एकाच अर्थाचे शब्द आहेत. नाद या शब्दाचा अर्थहि पण शब्दच आहे. "शब्दे निनाद-निनद-ध्वनि-ध्वान-रव-स्वनाः" अशा रीतीनें अमरकोशांत शब्दाचे जे पर्याय दिलेले आहेत त्यांत नाद शब्दहि आहेच. "नद्यते इति नादः" अशी मतंगमुनींनीं नाद शब्दाची व्युत्पत्ति दिलेली आहे. नाद शब्दांतील नकार हा प्राणवायूचा द्योतक असून दकार हा देहामध्यें असलेल्या कायाग्नीचा वाचक आहे. अग्नि आणि वायु यांच्या परस्पर संयोगांतून नादतत्त्वाचा आविर्भाव होत असतो. "यदुक्तं ब्रह्मणः स्थानं ब्रह्मग्रन्थिश्च यः स्मृतः। तन्मध्ये संस्थितः प्राणः प्राणाद्वह्निसमुद्भवः॥ वह्निमारुतसंयोगान्नादः समुपजायते।" "नकारं प्राण इत्याहुर्दकारश्चानलो मतः। जातः प्राणाग्निसंयोगात्तेन नादोऽभिधीयते" असें मतंगमुनि आणि शार्ङ्गदेव यांनीं म्हटलेलें आहे.

संस्कारांच्या प्राबल्यानें प्रथम आत्म्याच्या ठिकाणीं संकल्पाचें स्फुरण होतें. नंतर मनाला प्रेरणा मिळते. मनाचा कायाग्नीवर आघात होतो. तो कायाग्नि मूलाधारचक्रांत ब्रह्मग्रंथीच्या आश्रयानें असलेल्या वायूवर आघात करतो. कायाग्नीच्या आघातानें संचलित झालेला प्राणवायु हा तेथून शरीरांत ऊर्ध्वगामी होतो. वायूच्या आघातानें मूलाधार, स्वाधिष्ठान आणि मणिपूर या चक्रांतील दलांच्या ठिकाणींहि स्पंदन सुरू होतें. त्या स्पंदनांतच नादतत्त्व अभिव्यक्त होण्याचें बीज असतें. सूक्ष्म नादलहरींना बरोबर घेऊन तो प्राणवायु ज्या वेळीं हृदयाच्या आसमंतात् संचार करतो त्या वेळीं त्या नादांना सुस्पष्ट स्वरूप प्राप्त होतें. हृदयस्थानीं असलेल्या अनाहतचक्रांत या नादाला सुस्पष्ट स्वरूप आलेलें असलें तरी हा नाद सर्वांना ग्रहण करतां येत नाहीं. गुरुकृपा, ईशकृपा आणि पूर्वजन्मींच्या अथवा इहजन्मींच्या योगाभ्यासाचें पाठबळ ज्यांना असेल तेच हा नाद ऐकूं शकतात.

प्रकृतस्थलीं नादाला अनाहत असें जें म्हटलें आहे, तीं एक पारिभाषिक संज्ञा आहे. तत्त्वतः नाद हा ब्रह्मस्वरूप असल्यामुळे त्याला उत्पत्ति नाहीं व विनाशहि नाहीं. विश्वांत व्यापून असलेले तेजस्तत्त्व हें जसें दोन काष्टांच्या संघर्षणानें अग्निरूपानें अभिव्यक्त होतें, इंधनाच्याच आकारानें तें प्रतीतीला येतें व इंधनरूपी उपाधि संपला कीं, तें आपल्या मूळ स्वरूपांत विलीन होतें त्याचप्रमाणें नादतत्त्व देखील ब्रह्मग्रंथि किंवा ब्रह्मस्थान म्हणून समजल्या जाणाऱ्या आधारकंदांत प्राणवायु आणि कायाग्नि यांच्या संघर्षांतून अभिव्यक्त होत असतें. परा आणि पश्यन्ती या दोन अवस्थेंतून वर अनाहतचक्राच्या ठिकाणीं आल्यानंतर त्याचें स्वरूप अधिक स्पष्ट होत असतें. तथापि सामान्य जनांना त्याचें ग्रहण होत नाहीं. तो नाद तसाच ऊर्ध्वगामी होत होत शेवटीं मूर्धस्थानीं असलेल्या सहस्रदलकमलांतील महाकाशांत लीन होऊन जातो. अशा रीतीनें हा नाद आंतल्या आंतच अभिव्यक्त होतो व लीन होतो. याच अभिप्रायानें या नादाला अनाहत नाद असें म्हटलेलें आहे. "आहतोऽनाहत-श्चेति द्विधा नादो निगद्यते।"

नादलहरींनीं संवलित असलेला प्राणवायु हा विशुद्धिचक्रानजवळ कंठस्थानीं आला म्हणजे त्याला अस्पष्ट वैखरीचें स्वरूप येतें आणि तेथून पुढें तो कंठ, तालु, मूर्धा, दंत आणि ओष्ठ या उपाधींचें साहाय्य घेऊन जेव्हां प्रकट होतो तेव्हां त्याला आहत नाद असें म्हटलें जातें, या आहत नादालाच उपाधिभेदानें भिन्न-भिन्न वर्णांचे स्वरूप येतें. या वर्णांच्या विशिष्ट समूहालाच शब्द किंवा पद असें म्हटलें जातें व "पदसमूहो वाक्यं" या लक्षणाप्रमाणें पदांच्या समूहाला वाक्याचें स्वरूप येतें. हीं वाक्यें अथवा ही भाषाच सर्व वाग्व्यवहाराचें साधन होय. "नादेन व्यज्यते वर्णः पदं वर्णात् पदाद्वचः। वचसो व्यवहारोऽयं नादाधीनमतो जगत्॥" (संगीतरत्नाकर).

अंतर्नादासंबंधानें आणखी एक विचार. तंबोऱ्यांत चारच तारा आणि दोनच स्वर असतात. ते म्हणजे षड्ज आणि पंचम. तंबोरा उभा धरून आपण वाजवूं लागलों कीं, उजवीकडील शेवटची तार मध्यसप्तकांतील षड्ज दाखविते. डावीकडील पहिली तार मध्यसप्तकांतील पंचम दाखविते तर मधल्या दोन तारा ज्यांना जोड अशी संज्ञा आहे त्या तारसप्तकांतील षड्ज दाखवितात. या तारा लयबद्ध पद्धतीनें आपण छेडूं लागलों कीं, षड्ज आणि पंचम हे दोन स्वर स्पष्टच

श्रुतिगोचर होतात. दोन्ही स्वर व्यक्त होतांना तारांवर बोटांचा आघात होत असल्यामुळें हे स्वर आघातजन्य आहत असें म्हणावें लागतें. यांनाच आहत ध्वनि असें दुसरें नांव देतां येईल. षड्ज आणि पंचम या दोन्ही संवादी स्वरांचें अगदीं बरोबर संमीलन झालें कीं, त्यांतूनच अगदीं स्पष्टपणें ऋषभ, गंधार, मध्यम, धैवत आणि निषाद याहि स्वरांचा आविर्भाव होत असल्याचें ऐकूं येतें. हे जे इतर स्वरांचे ध्वनि ऐकूं येतात त्या ध्वनींना व्यक्त करणाऱ्या तारा तंबोऱ्यांत नसतात. अर्थात् षड्ज आणि पंचम सोडून बाकीचे ऐकून प्रतीतीस येणारे स्वर अथवा ध्वनि त्यांनाहि तंबोऱ्यांतील अनाहत ध्वनि असेंच म्हणावें लागेल.

षड्ज आणि पंचम या आहत ध्वनींपेक्षां ऋषभ, गंधार इत्यादि अनाहत ध्वनि जे तंबोऱ्यांतून व्यक्त होतात ते मनाला फारच आकर्षक वाटतात. बाह्य ध्वनींपेक्षां या अन्तर्नाद अंतर्ध्वनींमध्यें मनाचा चटकन लय होतो. मन तेथें तल्लीन होऊन जातें. मनाला अपूर्व आनंद वाटतो. याच न्यायानें देहांतर्गत अनाहत ध्वनींचें स्वरूप समजावें. तंबोऱ्यांत अविभक्त होणाऱ्या अनाहत स्वरांना अभिव्यक्त करणाऱ्या तारा तंबोऱ्यांत नसतात व त्यांच्या आघाताचा प्रश्नहि उपस्थित होत नाहीं. मग हे स्वर किंवा हे अनाहत ध्वनि आले कोठून ? असा प्रश्न पुढें येतोच. याला उत्तर असें कीं, ध्वनींचें मूळ स्पंदनांत आहे. षड्ज आणि पंचम दाखविणाऱ्या तारांच्या ठिकाणीं आघातानें स्पंदन सुरू झालें कीं, ह्या स्पंदनक्रियेनें निर्माण होणाऱ्या नादलहरींचेंहि परस्परामध्यें संवलन हें होतच असतें. स्पंदन हें तारांच्या ठिकाणीं होत असतें, पण त्याच्या लहरी आकाशभर पसरत असतात. त्या स्पंदनांच्या लहरींतच अवांतर स्वरांचीं अधिष्ठानें असतात. त्या स्पंदनलहरी विशिष्ट मर्यादेंत येऊन पोहोंचल्या कीं तेथें निराळ्या ध्वनीचा अथवा विशिष्ट स्वरांचा आविर्भाव होत रहातो. हाच अनाहत ध्वनि अथवा अनाहत स्वर होय.

आपल्या देहांतहि मूलाधारचक्रापासून स्पंदनाला आरंभ होतो. त्या स्पंदनांच्या लहरी शरीरांतील विविध चक्रांच्या विविध दलांतून लहरतात. लहरींतून लहरी अशा असंख्य लहरींच्या परंपरा निर्माण होतात. त्याच लहरी अथवा तींच स्पंदनें विशिष्ट संख्येनें विशिष्ट अवस्थेला येऊन पोहोंचलीं म्हणजे त्यांतून अनाहत स्वरूपाचे विविध ध्वनि कानाच्या आंतील पडद्यावर येऊन आदळतात व आपल्याला अंत-र्ध्वनीचा – अंतर्नादाचा अथवा अनाहत ध्वनीचा किंवा अनाहत नादाचा साक्षात्कार होत असतो. तेथें मनाचा लय झाला म्हणजे अनिर्वचनीय आनंदाचा अनुभव येतो.

कांहीं लोक अनाहत नाद आणि त्यांचें श्रवण यांचा हा लौकिक कार्य-कारणभाव मानीत नाहींत. अनाहतध्वनि हा अलौकिक आहे व त्याचें श्रवणहि पण अलौकिक श्रवणेंद्रियानेंच होत असतें असें ते म्हणतात. ज्याप्रमाणें परमेश्वराचें दिव्य रूप अथवा दिव्य ऐश्वर्य अवलोकन करण्याकरितां दिव्य दृष्टीची गरज असते त्याचप्रमाणें परमात्मस्वरूप अनाहतनाद श्रवण करण्याकरितांहि दिव्य श्रवणेंद्रियांची गरज असते. परमेश्वराच्या कृपेनेंच या दिव्य श्रवणेंद्रियांचा लाभ होऊन साधकाला अनाहतनादाचें श्रवण घडतें असें त्यांचें म्हणणें आहे.

नाद हा विषयच असा आहे कीं, तेथें मनानें रमलेंच पाहिजे. भेरी, मृदंग, शंख, बांसरी इत्यादि वाद्यांचे नुसते नाद जरी कानांवर आले तरी देखील मन त्या नादांत रमून जातें, तन्मय होतें. कलकरयांत एकदां गवई लोकांची मैफल होती. बडे बडे गवई आपला रंग जमवीत होते. त्या सभेंत सवाई गंधर्वहि होते. त्यांच्यावर गाण्याची पाळी आली. फक्त दोन तंबोरे. ते इतरांनीं लाविले, पण सवाई गंधर्वांचें समाधान झालें नाहीं. ते त्यांनीं स्वतः जुळविले. ते इतके तंतोतंत जुळले कीं, तीन मिनिटें सभा केवळ तंबोऱ्यांच्या नादानेंच नागा-प्रमाणें डोलूं लागली ! सर्वांच्या चित्तवृत्तींचा तंबोऱ्याच्या नादाशीं लय लागला ! अवर्णनीय आनंदाच्या भरांत सभेनें टाळ्यांचा कडकडाट केला ! तात्पर्य, बाह्य नादहि-आहतनादहि चित्ताला इतका रमवितो, तर मग अंतर्नाद अथवा अनाहतध्वनि चित्ताला किती रमवील याची कल्पना करावी. याच अभिप्रायानें आचार्यांनीं " भेरी-मृदङ्ग-शङ्खाद्याहत-नादे मनः क्षणं रमते । किं पुनरनाहतेऽस्मिन् मधु-मधुरेऽखण्डिते स्वच्छे ॥ " असे प्रबोधसुधाकरांत अनाहतनादासंबंधानें प्रशंसोद्गार काढलेलेले आहेत.

अनाहतनाद हे अनेक प्रकारचे आहेत. अभ्यासाच्या प्रारंभीं हा नाद समुद्राच्या गर्जनेप्रमाणें ऐकूं येतो. पुळ्याच्या गणपतीजवळ पूर्णिमेच्या रात्रीं निवांतपणें स्वस्थ बसावें. पुढे पसरलेल्या विशाल सागरावरील तरंग जणुं कांहीं अहमहमिकेनें गणपतीच्या चरणीं विलीन होण्याकरितां धांव घेत आहेत. त्या नीरव वातावरणांत फक्त त्या तरंगांचेच शब्द कानांवर येऊन आदळतात. हुबेहूब त्याच स्वरूपाचा अंतर्नाद क्वचित्प्रसंगीं नादानुसंधानाच्या अभ्यासकालांत पहिल्या प्रथम आपल्या कानीं येईल. क्वचित्प्रसंगीं गंभीर घनगर्जना चालू असल्याची प्रतीति येईल. क्वचित्प्रसंगीं एखादा मोठा नगारा वाजत आहे असा

प्रत्यय येईल. एखाद्या वेळीं झांगड (भाकरीच्या आकाराची मोठी झांज) वाजत असल्याचें ऐकूं येईल. प्राणवायु आज्ञाचक्राला ओलांडून ब्रह्मरंध्राकडे जावयास निघतो त्या वेळीं अनाहतनादाला किंचित सूक्ष्मता येते. डमरू, मृदंग, तबला, कुडबुडें इत्यादि वाद्यांप्रमाणें अनाहतनादाचें स्वरूप ऐकूं येतें. क्वचित शंख किंवा कर्णा वाजल्याप्रमाणें आवाज येईल, तर क्वचित घंटानाद होत असल्याची प्रतीति येईल. त्यानंतर तोच नादलहरींनीं संवलित असलेला प्राणवायु सहस्रदलकमलांतील महाकाशांत स्थिरावला म्हणजे अनाहतध्वनीचें स्वरूप आणखी अधिक सूक्ष्म होत जातें. शेवटीं शेवटीं हा अनाहतनाद किनरी, वीणा, बांसरी किंवा बारक्या घुंगरांप्रमाणें ऐकूं येऊं लागतो. क्वचित्प्रसंगीं तो भ्रमरांच्या गुंजारवाप्रमाणेंहि ऐकूं येतो. असे हे अंतर्नादाचे विविध प्रकार लक्षांत घेऊनच आचार्य म्हणतात, "अनाहताख्यो बहुभिः प्रकारैरन्तः प्रवर्तेत सदा निनादः।".

अनाहतनाद अनेक प्रकारचे असले तरी समाधिअवस्थेच्या दृष्टीनें त्यांचे पांच प्रकार केलेले आहेत—(१) सगर्भक, (२) निगर्भक, (३) निरंजन, (४) चिद्बोधक आणि (५) सदानंदित अशीं त्यांचीं नावें आहेत. त्या नादोपासनेनें साधकाच्या बुद्धीवर होणारे परिणाम निपुणमति, स्थिरमति, शुभमति इत्यादि नांवांनीं व्यक्त केलेले आहेत. जनवात्सल्य व्याधिविलय इत्यादि नादोपासनेचीं फलें, तसेंच शरीरांतील त्वचा, रक्त, मांस इत्यादि धातूंशीं नादांचे संबंध आणि त्या त्या ठिकाणीं केल्या जाणाऱ्या नादानुसंधानानें प्राप्त होणाऱ्या दूरश्रवण, दूरावलोकन, वचनसिद्धि, वज्रकायत्व इत्यादि सिद्धि, पृथ्वीतत्त्व, जलतत्त्व इत्यादि तत्त्वांचा नादांशीं संबंध, नादांचीं वलयें, नादांच्या साहचर्यानें प्रतीतीला येणारे पीत, शुक्ल, रक्त, नील इत्यादि वर्ण, अशा अनेक विषयांचे अनाहतनादांशीं असलेले संबंध शास्त्रज्ञांनीं वर्णिलेले आहेत.

अनेकांच्या मनांत येथें एक अशी शंका येते कीं, अनाहतनाद ही एक केवल कल्पना आहे, तो भ्रम आहे. असे अनाहतध्वनि ऐकूं येणें शक्य नाहीं. पण ही शंका बरोबर नाहीं. कोणतें ज्ञान प्रमात्मक आहे व कोणतें ज्ञान भ्रमात्मक आहे, हें पहाण्याचीं शास्त्रज्ञांचीं कांहीं कसोटी आहे. एकजण म्हणतो, शंख पांढरा आहे तर एकजण म्हणतो, शंख पिंवळा आहे. खरोखर शंख पांढरा आहे का पिंवळा आहे हें कसें ठरवावयाचें? शंख पांढरा आहे असे म्हणणारे किती आहेत व शंख पिंवळा आहे असे म्हणणारे किती आहेत? हे प्रथम पहावयाचे. त्यानंतर त्यांचे

प्रकृतिधर्म, स्वभावधर्म यांचेंहि निरीक्षण, परीक्षण करावयाचें. त्यांची योग्यता, हेतु व प्रामाणिकपणा यांचाहि विचार करावयाचा असें बहुसंख्यलोक ज्या विषयाबद्दल आपलें जें मत व्यक्त करीत असतील त्या विषयाचें तेंच स्वरूप यथार्थ समजावयाचें असतें. ज्यांचा स्वभाव सदोष आहे, हेतु सदोष आहे, योग्यता आणि प्रामाणिकपणा यांची जेथें न्यूनता आहे, शारीरिक प्रकृति ज्यांची निर्दोष नाही, ज्यांचीं वातवह, पित्तवह आणि कफवह स्रोतसें सदोष आहेत, धातुवह स्रोतसें ज्यांचीं सदोष आहेत, वात, पित्त आणि कफ ज्यांचे विकृत आहेत. संज्ञावह स्रोतसें आणि मनोवह स्रोतसें ज्यांचीं विकृत आहेत. प्राणवह स्रोतसेंहि पण ज्यांचीं शुद्ध नाहींत अशा लोकांनीं एखाद्या विषयाबद्दल व्यक्त केलेलें मत हें यथार्थ स्वरूपाचें असूं शकणार नाहीं. शंख पिंवळा आहे असें म्हणणाऱ्याचें पित्त विकृत झालेलें असतें. त्याच्या डोळ्यांना कामला – कावीळ हा विकार झालेला असतो. आणि म्हणूनच शंख पिंवळा आहे असें त्याचें म्हणणें यथार्थ स्वरूपाचें आहे असें कोणी मानीत नाहीं. याच न्यायानें अनाहतनाद हा भ्रम आहे असें म्हणणाऱ्याचें म्हणणें हें सत्य आहे असें मानतां येत नाहीं. कारण तो स्वतःच अज्ञानी, अनभ्यासी, अननुभवी आणि मनोवह स्रोतसें व संवेदनावह स्रोतसें दूषित असलेला असा असल्यामुळें भ्रांत आहे, हींच गोष्ट सिद्ध होते. साधु, संत, महात्मे, ऋषि, मुनि, तत्त्ववेत्ते योगी, आणि ज्ञानी हे सर्व एकमुखानें अनाहतनादाचें वर्णन करीत आहेत. श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज, निवृत्तिनाथ, चांगदेव, कबीर, मीराबाई, संत एकनाथ, श्रीसमर्थ, इत्यादि संतवाङ्मयांत अनाहतनादाचीं विपुल वर्णनें आहेत. तशींच तीं पुराणें व उपनिषदें इत्यादि ग्रंथांतूनहि आहेत. तेव्हां अनाहतनादाबद्दल शंकाच घेणें नको.

अनाहतनाद किंवा अनुहतध्वनीसंबंधीं संतांचे आनंदोद्गार

तंत आणि वितंत, त्यामाजीं मथित ।
नाद उमटत स्वानंदाचा ॥ – निवृत्तिनाथ
निवृत्तीनें मन ठेविलें चरणीं ।
नादाची निशाणी अखंडित ॥ – निवृत्तिनाथ
नासिकेचा प्राण कोणें मार्गी येत ।
नाद घुमदुमित अनुहतीं ॥ – ज्ञानेश्वर

सहस्रदळांमधून अनुहात ध्वनि उठीं ।
नामाचेनि गजरें पातकें रिघालीं कपाटीं ॥ – नामदेव

जयजय झनकून जयजय झनकून ।
अनुहात जंगट नाद [illegible] ॥
परतल्या श्रुति म्हणती नेति ।
त्याही नादाअंतीं स्थिर राहती ॥ – गोरा कुंभार

अनुहात घंटा श्रवणीं ।
ऐकुनि विस्मय जाहली जनी ॥ – जनाबाई

त्रिवेणीचा ओघ तेथें अंग धुतलें ।
अनुहात झणझणाट नाद ऐकिले ।
गुणातीत डाहाळीं पाळणा लाविला ।
तेथें सुत पहुडला मुक्ताईचा ।
निजीं निज बाळा न करीं पै आळी ।
अनुहात टाळी वाजविते ॥ – मुक्ताबाई

पांडूरंगें सत्य केला अनुग्रह ।
निरसूनि संदेह देह बुद्धि ॥
जीवशिवा सेज रचिली आनंदें ।
आऊटाविये पदीं आरोहण ॥
निजीं निजरूपीं निजविला तुका ।
अनुहत बाळका हल्लरु गाती ॥ – तुकाराम

अनुहातीं गुंतला नेणें बाह्यरंग ।
वृत्ति येतां मग बळ लागें ॥
मदें माते तया नाहीं देहभाव ।
आपुले अवयव आवरीतां ॥ – तुकाराम

सतरावियेचें स्तन्य देसी । अनुहताचा हल्लरु गासी ।
समाधिबोधें निजविसी । बुझावुनी ॥ – ज्ञानेश्वर

हें असो ते कुंडलिनी बाळी । हृदया आंतु आली ।
तंव अनुहताची बोली । चावळे ते ॥

तया अनाहताचेनि मेघें । आकाश दुमदुमो लागे ।
तंव ब्रह्मस्थानीचें बेगें । सहज फिटे ॥ – ज्ञानेश्वर

कशि मोहनी घातली गुरुनं ।
मशि बेडचि गेलें भरून ॥ ध्रु. ॥
श्रवणांत पेरणी केली । ती नयनीं उजेडा आली ।
मनपवन चित्त एक करून ॥ १ ॥
ऐकतां गजर मुल पडली । विज आकाशांत कडकडली ।
मनपवनचित्त दृढ धरून ॥ २ ॥ – महिपति

रुणझुण रुणझुण किंनरी वाजे ।
घणेचि आनंद त्रिभुवन गाजे ॥
चांगा वटेश्वर नादीं निमाला ।
ब्रम्ह पाहतां ब्रम्हचि जाहला ॥ – चांगदेव

धिं धिं तुरे वाजती । अनुहत ध्वनि गर्जति ॥ – नामदेव

अनुहातध्वनि करित निशिदिनीं ।
मन लुब्धुनि गेलें तया ॥
अखंड हे खेळे जपे सर्वकाळीं ।
हृदय कमळी आनंदला ॥ – नरहरी सोनार

आतां आपल्याला हा अनाहतनाद ऐकूं येईल का ? याच प्रश्नाचें उत्तर देण्याकरितां आचार्यांनीं या तिसऱ्या श्लोकाचा पूर्वार्ध लिहिला आहे. तुम्ही रेचक, पूरक यांच्यासह कुंभक प्राणायामाचा अभ्यास करा म्हणजे तुमच्या शरीरांतील सर्व नाड्या अर्थात् त्वचा, रस, रक्त मेद इत्यादि धातूंना वाहून नेणारीं स्रोतसें, मलमूत्र आणि स्वेद यांना वहाणारीं स्रोतसें, वातपित्तादि दोषवह स्रोतसें, मनोवह स्रोतसें आणि संवेदनावह स्रोतसें ही सर्व स्रोतसें शुद्ध होतील. आणि हीं स्रोतसें शुद्ध झालीं कीं शरीरामध्यें विविध प्रकारचें अन्तर्नाद उमटूं लागतील. अनाहतनाद ऐकूं येण्याकरितां मनोवह स्रोतसांची व संज्ञावह स्रोतसांची शुद्धि होणें आवश्यक आहे. या दोन्ही प्रकारच्या स्रोतसांच्या शुद्धीकरितां दोषवह स्रोतसांची व धातुवह स्रोतसांची शुद्धि होणें आवश्यक आहे. आणि त्या शुद्धीकरितां प्राणायामांची आवश्यकता आहे. असा हा प्राणायाम आणि

नाडीशुद्धि, तसेंच नाडीशुद्धि आणि अनाहत ध्वनि यांचा कार्यकारणभाव आचार्यांनीं दाखविलेला आहे.

नाडीशुद्धिकरितां प्राणायामाचा अभ्यास करावयाचें म्हटलें कीं प्राणायामाबरोबर यम, नियम आणि आसनें हीं योगाचीं तीन अंगें प्राणायामाची पूर्वपीठिका म्हणून ओघांच येतात. यमनियमपूर्वक आवश्यक त्या आसनांचा अभ्यास करून प्राणायामाने शरीरांतील नाड्यांची शुद्धि केल्यानंतर शरीरांत अभिव्यक्त होणाऱ्या अंतर्नादाच्या ठिकाणीं सर्व इंद्रियांना विषयांपासून पराङ्मुख करून, मनाला संलग्न करणें यांनच अष्टांगयोगांतील प्रत्याहार आणि धारणा या दोन अंगांचा अंतर्भाव होतो. अनाहतनादाचें अनुसंधान म्हणजे अखंड चिंतन. यालाच ध्यान असें म्हणतात ध्यानाचीच परिपक्वावस्था म्हणजे सविकल्प समाधि होय. या सविकल्प समाधींत ध्याता, ध्यान आणि ध्येय या वृत्तींचा सूक्ष्म स्वरूपांत का होईना पण उदय होत असतोच. पुढें पुढें याहि वृत्ति मावळतात व साधकाला निर्विकल्प समाधीची अवस्था प्राप्त होते. इंधन संपलें कीं अग्नि जसा जागच्या जागीं शांत होतो त्याचप्रमाणें या अवस्थेंत अंतःकरणांतील सर्व वृत्ति निमाल्या कीं मन आपोआपच ब्रह्मस्वरूपीं लीन होतें. अशा रीतीनें नादोपासनेंत साधकाला अष्टांगयोगाचें अनुष्ठान सहजच घडतें. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि सविकल्प समाधि हींच योगाचीं आठ अंगें होत. या आठ अंगांनीं संपादली जाणारी निर्विकल्प समाधि हेंच योगाचें अंतिम लक्ष्य आहे. तेंच अध्यात्मज्ञानाचेंहि अंतिम लक्ष्य आहे आणि तेंच फलरूप भक्तीचेंहि पण अंतिम स्वरूप आहे.

अनन्यभावानें हरिभक्तीच्या क्षेत्रांत पदार्पण करणाऱ्या भक्तालाहि अष्टांगयोगाचा सहजच लाभ होतो. श्री. ग. वि. तुळपुळे यांनीं प्रकाशित केलेल्या योगतारावलीच्या प्रस्तावनेतील श्री संत गुलाबराव महाराज यांचा एक मार्मिक अभंग आम्ही वाचकांना सादर करीत आहों.

योगाचें अष्टांग नामींच मिळती । नाम तें वेदान्तीं मिश्रीत कीं ॥ १ ॥
नाम घेतां वाचे इंद्रिय विस्मृति । या नांव बोलती यम भक्त ॥ २ ॥
नामाप्रघ्यें शुद्धि तोष आणि दया । हरिभक्तराया नियम हा ॥ ३ ॥
नाम घेतां देहू स्तब्धहि होऊन । भक्तासी आसन हेंचि नित्य ॥ ४ ॥

नाम घेतां कंठ होतसे सद्गद । श्वास तोही बंद पडे तेव्हां ॥ ५ ॥
हेंचि हरिभक्ता प्राणसंयमन । कुंभकादि जाण एका काठीं ॥ ६ ॥
नाम घेतां वाचे मनासी आकळ । प्रत्याहारबळ हरिभक्ता ॥ ७ ॥
नाम घेतां वाणी मनानें एकाग्र । भक्तासी प्रकार धारणा हा ॥ ८ ॥
नामें श्रीहरीचा होय आविर्भाव । हरिभक्ता ठाव हेंचि ध्यान ॥ ९ ॥
हरिसंग पडे सकळ विसर । समाधि साचार संप्रह्लात ॥ १० ॥
गुरुकृपें हरी सांगाते खेळणें । सर्वत्र पाहणें गुरुभक्ति ॥ ११ ॥
गुरुहरीमाजी नाहीं कांहीं भेद । स्वयें झाला सिद्ध गुरुभक्ति ॥ १२ ॥
शिष्य तोचि हरी गुरु तोचि नंद । प्रेमांत प्रसिद्ध गोपिरूप ॥ १३ ॥
हाचि निर्विकल्प समाधीचा ठेवा । परी तीव्र व्हावा नामवेग ॥ १४ ॥
नव्हे हें रूपक नव्हे संनिवेश । पहातां प्रत्यक्ष प्रतीति हे ॥ १५ ॥
योगाचें हें गुह्य ज्ञानेश्वर पाय । तेथें भक्ति माय नेवो आम्हां ॥ १६ ॥

नादाचें अनुसंधान करण्याच्याच दृष्टीनें नव्हे तर सर्व साधारणपणें व्यवहाराच्या दृष्टीनेंहि आपल्या जीवनांत अष्टांगयोगाचा फारच मोठा उपयोग होत असतो. ऐहिक व आमुष्मिक अथवा व्यावहारिक आणि आध्यात्मिक उभयविध जीवनामध्यें अष्टांगयोगाच्याच अभ्यासानें पराकोटीचें समाधान मिळवितां येतें. हें अष्टांगयोगाचें महत्त्व लक्षांत घेऊन आम्ही या ठिकाणीं नादानुसंधानाच्या व नाडीशुद्धीच्या विषयसंदर्भानें अत्यंत संक्षेपानें अष्टांगयोगाची माहिती देत आहोंत.

यमनियम हा योगमंदिराचा पाया आहे, तर आसनांचा अभ्यास हें योगमंदिराचें जोतें आहे. प्राणायाम हा या मंदिराच्या सर्व बाजूंनी उभ्या असलेल्या भिंती होत तर प्रत्याहार, धारणा आणि ध्यान हीं सर्व या योगमंदिराचें चढतें वाढतें शिखर होय. समाधिअवस्था ही तर या योगमंदिराचा कळसच होय. सच्चिदानंद परब्रह्म हें या मंदिराच्या आंत-बाहेर सर्वत्र व्यापलेलें असून साधकाच्य इष्ट रूपानें तें या मंदिरांत मूर्तरूपानें विराजमान झालेलें आहे. असा या मंदिराचा थाट आहे. यमनियम हे सर्वसामान्य मानवजीवनांतील व्यवहार मानवी जीवनाला उज्ज्वल करणारे आहेत. यांच्या अभ्यासानें मानव हा खऱ्या अर्थानें मानव बनतो. सध्या अपेक्षित असलेल्या मानवतावादाचें हेंच ध्येय आहे.

"अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं क्षमा धृतिः। दयार्जवं मिताहारः शौचं चैव यमा दश॥" आपल्या हातून कोणालाहि कोणत्याहि प्रकारें दुःख होऊं न देण्याची दक्षता घेणें याला अहिंसा म्हणतात. ज्याच्या योगें सर्वांचें हित होईल असेंच भाषण करणें, असेंच लेख लिहिणें आणि असेंच वागणें याला सत्य असें म्हणतात. हाच खरा वास्तववाद होय. अलीकडे कांहीं साहित्यिक वास्तववाद या गोंडस नांवाखालीं जें लिहीत आहेत आणि जें बोलत आहेत तें सर्व मानवी जीवनाला विनाशाकडे नेणारें आहे. परकीय धनाचा, घरदार वित्तवैभव आणि कांता इत्यादिकांचा अपहार न करणें याला अस्तेय असें म्हणतात. उपस्थेंद्रियाचा संयम करणें हें ब्रह्मचर्याचें लक्षण होय. सिनेतारकांचीं चित्रें डोळ्यापुढें ठेवणें, पहाणें अथवा मनांतहि आणणें हें जीवनस्वास्थ्याला विघातक आहे. प्रतिकार करण्याचें अंगीं सामर्थ्य असूनहि व्यक्तिशः आपल्यावर अपकार करणाऱ्याला शासन न करणें, याला क्षमा असें म्हणतात. या ठिकाणीं हें लक्षांत ठेवावें कीं, हाच अपकारकर्ता समानकंटक बनून समाजाला छळीत असेल, तर त्याला योग्य तें शासन करणें हें कर्तव्यच ठरतें. उत्कर्षाच्या आणि अपकर्षाच्या काळांत अथवा सुखाच्या आणि दुःखाच्या काळांत चित्ताची समता राखणें याला धृति असें म्हणतात. दुसऱ्याचे क्लेश यथाशक्ति दूर करण्याचा प्रयत्न करणें याला दया असें म्हणतात. मनांत एक बाहेर एक अशी वृत्ति न ठेवतां सर्वांशीं सरळ वागणें याला "आर्जव" असें म्हणतात. आर्जव म्हणजे हांजी हांजी वृत्ति नव्हे. आहारहि परिमित असावा. तो अधिक नसावा व कमीहि नसावा. तसेंच तो सात्विक असावा. काळजीपूर्वक शरीराची आंतून बाहेरून स्वच्छता राखणें तसेंच मनहि शुद्ध राखणें यालाच "शौच" असें म्हणतात. हे सर्व आचार जीवनांत अत्यंत आवश्यक आहेत.

"तपः संतोषमास्तिक्यं दानमीश्वरपूजनम्। सिद्धान्तवाक्यश्रवणं ह्रीर्मतिश्च जपो हुतम्॥ नियमा दश सम्प्रोक्ताः" शीतोष्णादि द्वंद्वांची सहिष्णुता वाढविण्यासाठी आणि इंद्रियांना ताब्यांत ठेवण्यासाठीं जीं व्रतें पाळलीं जातात त्यांना तप असें म्हणतात. न्याय्य प्रयत्नानें आपल्याला जेवढें मिळेल तेवढ्यांतच निर्वाह करणें व त्यांतच समाधानानें असणें हें संतोषाचें लक्षण होय. धर्माविषयीं आस्था असणें, अधर्माचें व पापाचें भय वाटणें याला आस्तिक्य असें म्हणतात. आस्तिक्याचेंच दुसरें नांव श्रद्धा असें आहे. माता, पिता, गुरु, संत, महात्मे आणि

शास्त्रें यांच्या वचनांवर विश्वास असणें व त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करणें हेंच श्रद्धेचें लक्षण होय. कोणत्याहि फलाची अपेक्षा न ठेवतां, मानमान्यता किंवा कीर्तीचीहि इच्छा न करतां योग्य व्यक्तीला किंवा संस्थेला अपेक्षित असलेले पदार्थ अर्पण करणें हें खऱ्या सात्त्विक दानाचें स्वरूप होय. "ईश्वरः सर्व भूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति" या वचनाप्रमाणें अथवा "जें जें भेटेल भूत । तें तें मानिजे भगवंत ॥" या संतांच्या उक्तीप्रमाणें सर्व प्राणी परमात्मस्वरूप आहेत असें समजून त्यांना यथाशक्ति संतोषवीत राहाणें ही ईश्वरपूजाच होय. ती आपल्या हातून सतत घडावी, संतांचे उपदेश, वेदान्तचर्चा आणि श्रीहरीचीं चरित्रें नेहमीं ऐकावींत. यालाच स्वाध्याय असें म्हणतात. ह्री म्हणजे लज्जा. कोणतेंहि निंद्य कार्य करतांना, वस्तूची वाजवीपेक्षां अधिक किंमत घेतांना, लांचलुचपत खातांना, पागडी मागतांना, कामचुकारपणा करतांना मनाला लाज वाटली पाहिजे. हें एक विवेकाचें, वैराग्याचें अथवा अंतःकरणशुद्धीचें उत्तम लक्षण होय. अंतःकरणांत नेहमीं सत्संकल्प असणें यालाच मति असें म्हणतात. त्याचप्रमाणें गुरूंनीं उपदेशिलेल्या मंत्राचा विधिपूर्वक जप करणें आणि अग्नीला आहुति अर्पण करणें यांचाहि पण नियमांतच अंतर्भाव होतो. असे हे दहा प्रकारचे नियम आहेत. या यमनियमांचा मानवी जीवनाची पातळी खऱ्या अर्थानें उंचविण्यासाठीं केवढा उपयोग आहे हें निराळें सांगणें नको.

जाणिवेनें व अभ्यासानें यमनियमांचें वळण अंगीं बाणल्यानंतर खरी योगाभ्यासाची पात्रता येते. अनाहतनादाच्या साक्षात्काराकरितां आवश्यक असलेल्या नाडीशुद्धीसाठीं प्राणायामाचा अभ्यास करण्यापूर्वी कांहीं आसनांचा अभ्यास करणें आवश्यक आहे. आसनांचा अभ्यास आरोग्य संपादन करणें किंवा तें सुरक्षित ठेवणें या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त आहे. प्राणायाम, धारणा, ध्यान आणि समाधि यांचा अभ्यास करीत असतांना कांहीं विघ्नें आड येतात. त्यांमध्यें शरीरांत व्याधि असणें हें एक मोठें विघ्न आहे. मन न लागणें, मनांत उत्साह नसणें हें दुसरें विघ्न होय. मन संशयग्रस्त असणें हें तिसरें विघ्न होय. जें करावयाला पाहिजे तें न करणें आणि जें करावयाला नको तें करीत राहाणें याला प्रमाद असें म्हणतात. प्रमाद हा योगमार्गांतील चौथें विघ्न होय. ज्यांचें पचन होणें अवघड असे गोड आणि जड पदार्थ खाणें, अधिक खाणें, तळकट, तिखट, खारट, आंबट आणि मसालेदार खमंग पदार्थ खाणें यायोगें शरीरांत जडता येते आणि मनांत

तमोगुण वाढतो त्यामुळें आळस येतो. हा आळस योगाभ्यासांतील पांचवें विघ्न होय. अशीं आणखी कांहीं विघ्नें आहेत. या विघ्नांचें निरसन करण्याकरितां विशेषतः व्याधि, अनुत्साह आणि आळस यांना घालविण्याकरितां आसनांचा निश्चित उपयोग होतो.

"स्थिरसुखमासनम्" कांहीं कष्ट न होतां शरीरानें बराच वेळ एका अवस्थेंत स्थिर रहाणें याला आसन म्हणतात. घट स्थिर राहिला कीं घटांतील पाणीहि स्थिर रहातें. त्याचप्रमाणें शरीररूपी घट स्थिर राहिला कीं त्यांतील चित्तरूपी जल हेंहि स्थिर राहील. या दृष्टीनें शरीराचें स्थैर्य साधण्यासाठीं आसनांचा अभ्यास करणें उपयुक्त आहे. आसनें बरींच आहेत. तथापि त्यांतल्या त्यांत अत्यंत उपयुक्त अशा कांहि थोड्या आसनांचा या ठिकाणीं परिचय दिला आहे. वाचकांनीं यथाशक्ति व यथावकाश त्यांचा अभ्यास अवश्य करावा.

घोंगडीची, शक्य असल्यास पांढऱ्या घोंगडीची चारपदरी घडी अंथरावी. त्यावर त्याच आकाराची पांढऱ्या शुभ्र धूतवस्त्राची घडी अंथरावी. तात्पर्य, आसनांच्या अभ्यासाला मृदु आस्तरण असावें. त्यावर रोज सकाळीं सूर्योदयानंतर दोन घटिकांपर्यंत अथवा सूर्यास्ताच्या सुमारास आसनांचा अभ्यास करावा. शक्यतों आसनांच्या व प्राणायामाच्या अभ्यासाकरितां स्वच्छ, पवित्र आणि प्रसन्न अशी जागा योजावी. एकान्त असावा.

(१) सिद्धासन :— प्रथम डावी मांडी घालावी. गुदस्थान आणि उपस्थ यांच्यामध्यें असलेली उभी शीर, तिला सीवनी असें म्हणतात. सीवनीच्या मधोमध डाव्या पायाची टाच पक्की बसवावी. नंतर उजवी मांडी घालून उजव्या पायाचीटाच उपस्थाच्यावर आणि नाभिस्थानाच्या खालीं बसवावी. नंतर वक्षस्थलाच्यावर आणि गळ्याच्या खालीं हनुवटी दृढ बसवावी. मन एकाग्र करावें. दृष्टि स्थिर करून दोन्ही भुवयांच्या मध्यें लावावी. दोन्ही हात सरळ गुडघ्यावर ठेवावेत. अंगुष्ठ आणि तर्जनी या दोन बोटांचीं टोकें ज्ञानमुद्रेप्रमाणें एकमेकांना जुळवावींत आणि बाकीचीं तीन बोटें एकमेकांना जुळवून सरळ ठेवावींत. सर्व आसनांत हें सिद्धासन अत्यंत श्रेष्ठ आहे. "एतन्मोक्षकपाटभेदजनकं" या आसनानें मोक्षाचीं कवाडें उघडीं होतात. यानें शरीरांतील नाड्या शुद्ध होतात. कुंडलिनी जागृत होते. या एकाच आसनांत मूलबंध, उड्डियाणबंध आणि जालंधरबंध, हे तिन्ही बंध सिद्ध होतात. याच आसनाला वज्रासन, मुक्तासन आणि गुप्तासन अशींहि नांवें आहेत. कांहीं लोक

या आसनांत थोडाबहुत फरकहि मानतात. गृहस्थाश्रम्यांनीं या आसनाचा अभ्यास फार वेळ करूं नये अशी योगी लोकांची सूचना आहे.

(२) स्वस्तिकासन :— प्रथम सरळ मांडी घालावी. नंतर उजवा तळपाय आणि बोटें डाव्या मांडीच्या आणि पोटरीच्या मध्यें घालावींत. डावा तळपाय व बोटें उजव्या मांडीच्या आणि पोटरीच्या मध्यें घ्यावींत. दोन्ही हात सरळ गुडघ्यावर ठेवावेत. श्रीकृष्णांनीं सांगितल्याप्रमाणें शरीर "समं कायशिरोग्रीवं" अशा स्वरूपांत सरळ ठेवावें. दृष्टि नाकाच्या शेंड्यावर स्थिर ठेवावी. मनानें ईशचिंतन करावें. हें आसन अत्यंत सोपें असून फार महत्त्वाचें आहे. तें कोणीहि केव्हांहि आणि कितीहि वेळ करावें. यानें कांहींहि अपाय होणार नाहीं. हें अत्यंत कल्याण-कारक असल्यामुळें याला स्वस्तिकासन असें म्हणतात. स्वस्ति शब्दाचा अर्थ कल्याण असा आहे. याच आसनावर बसून प्राणायाम, प्रत्याहार-धारणा, ध्यान-समाधि मंत्रजप व पुरश्चरण इत्यादि सर्व गोष्टी केल्या जातात. या आसनानें शरीरहि निरोगी रहातें.

(३) पद्मासन :— डाव्या मांडीवर उजवा पाय ठेवावा. त्याचप्रमाणें उजव्या मांडीवर डावा पाय ठेवावा. दोन्ही टांचा ओटीपोटाच्या जवळ कराव्यात. तळहात उताणे करून डाव्या हातावर उजवा हात ठेवावा. ते दोन्ही हात टांचेवर ठेवावेत. जीभ पडजिभेच्या बाजूला जितकी वर वळविता येईल तितकी वळवून धरावी. वक्षस्थलाच्या वरच्या बाजूस ऊर्ध्वजत्रूंच्या मध्यावर हनुवटी पक्की बसवावी. दृष्टि नासाग्रावर स्थिर करावी. याच आसनामध्यें गुदस्थानाचा संकोच करून अपानवायूला वर खेंचलें म्हणजे मूलबंधहि सिद्ध होतो. मूलबंधानें अपान वायु वर खेंचला जातो. जिह्वाबंधनानें व जालंधरबंधानें प्राणवायु खालीं ढकलला जातो. अपान आणि प्राण या दोहोंचा नाभिस्थानाजवळ संगम होतो. याच अवस्थेला उद्देशून गीतेमध्यें " अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथाऽपरे । " असें वर्णन केलेलें आहे. नाभिस्थानाचाहि संकोच करून नाभीला पृष्ठवंशाकडे खेचले की ओढियाण बंधाची क्रिया घडते. त्यामुळें आधार कंदावर असलेल्या कुंडलिनीला धक्का बसून ती जागृत होते. तिच्या जागृतीमुळें सुषुम्नेचें द्वार खुलें होतें. मनासह प्राणवायु सुषुम्नेंत प्रविष्ट होतो. इंद्रियें अंतर्मुख होतात. मन एकाग्र होतें. विवेकदीप उजळतो. त्याच्या प्रकाशांत साधकाला आत्मतत्त्वाचा साक्षात्कार होतो. असें हें पद्मासन फार महत्त्वाचें आहे. " सर्वव्याधिविनाशनं "

हें या आसनाचें फळ आहे. हें मत्स्येंद्रनाथांचें अत्यंत आवडतें आसन होय. श्रीगोरक्षबुद्ध आणि ज्ञानेश्वर महाराज याच आसनावर नेहमी बसत.

(४) बद्धपद्मासन :— वर सांगितलेल्या पद्धतीनें पद्मासन केल्यानंतर डाव्या हातानें पाठीला वळसा घालून डाव्या पायाचा अंगठा धरावा आणि त्याचप्रमाणें उजव्या हातानें पाठीला वळसा घालून उजव्या पायाचा अंगठा धरावा. कांहीं वेळ शांत बसावें. " एतद्व्याधिविनाशकारि यमिनां " हें आसन साधकाच्या देहांतील सर्व व्याधींचा निरास करतें. कांहीं लोक पद्मासन आणि बद्धपद्मासन हें एकच मानतात.

(५) वीरासन :— डाव्या मांडीवर उजवा पाय ठेवावा. डाव्या-पायावर उजवी मांडी ठेवावी. उजव्या गुडघ्याला दोन्ही तळहातांची मिठी द्यावी. हनुवटी नाकाच्या शेंड्यावर लावून ताठ बसावें. त्याचप्रमाणें उजव्या मांडीवर डावा पाय ठेवून उजव्या पायावर डावी मांडी ठेवावी. डाव्या गुडघ्याला दोन्ही तळहातांची मिठी द्यावी. दृष्टि नासाग्रांवर स्थिर करून सरळ रेषेंत ताठ बसावें. " एकं पादं तथैकस्मिन् विन्यसेदुरुणि स्थिरम् । इतरस्मिंस्तथापूर्वं वीरासनमितीरितम् ॥ " (हठयोगप्रदीपिका). याच आसनावर गुदद्वाराचा संकोच करून अपानवायूस वर खेंचावें, पोट खपाटी करावें आणि हनुवटी छातीच्या वरच्या हाडांच्या मध्यभागीं दाबून बसवावी म्हणजे मूलबंध, उड्डियानबंध आणि जालंधरबंध हे तिन्ही बंध साधले जातात. कांहीं पुस्तकांतून वीरासनाच्या आकृति चुकीच्या दिलेल्या आढळतात. वर दिलेल्या पद्धतीप्रमाणेंच वीरासन करावें. तें सोपें असून उपयोगाच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे.

(६) पश्चिमोत्तानासन :— दोन्ही पाय जुळवून जमिनीवर दंडासारखे ताठ पसरावेत. दोन्ही हातांची तर्जनी किंचित् वाकडी करून तर्जनी आणि आंगठा यांच्या साहाय्यानें दोन्ही हातांनीं दोन्ही पायांचे आंगठे धरावेत. हळू-हळू कपाळ गुडघ्यावर ठेवण्याचा प्रयत्न करावा. गुडघ्यावर डोकें ठेवीत असतांना गुडघे जमिनीपासून वर उचलले न जातील अशी खबरदारी घ्यावी. यालाच पश्चिमोत्तानासन असें म्हणतात. शिवसंहितेंत याला उग्रासन असें म्हटलेलें आहे. हें आसन फार महत्त्वाचें आणि अत्यंत उपकारक आहे. यानें सुषुम्नामार्ग खुला होतो आणि प्राणवायु सुषुम्नामार्गानें वाहूं लागतो. यानें

मंद वाहत नाही. पोट सुटत नाही. जठराग्नि प्रदीप्त होतो. भूक चांगली लागते. शरीरांतील सर्व नाड्या शुद्ध होतात. रस, रक्त इत्यादि धातूंचें अभिसरण चांगलें होतें. धात्वग्नि आणि दोषाग्नि हेहि प्रदीप्त होतात. दोष आणि धातु यांचें साम्य राखलें जातें. शरीरांत वातादि दोषांचा आणि धातूंचा प्रकोप होत नाही. अशा रीतीनें हें आसन आरोग्यफलदायी आहे.

(७) पूर्वोत्तानासन :— पाय ताठ करून उताणें निजावें. जुळविलेले दोन्ही पाय हळूहळू वर उचलून डोक्याच्या पाठीमागें टेकवावेत. पायाच्या विरुद्ध दिशेनें दोन्ही हात जमिनीवर सरळ रेषेंत पसरून ठेवावेत अथवा दोन्ही हात पायांकडे नेऊन पश्चिमोत्तानाप्रमाणेंच पायांचे आंगठे धरावेत. हें सर्व करीत असतांना गुडघ्यांत वांक न येईल अशी खबरदारी घ्यावी. हेंहि आसन अत्यंत उपयुक्त आहे.

(८) सर्वांगासन :— पूर्वोत्तानासन झाल्यानंतर तसेच ते, जुळविलेले पाय आकाशांत सरळ उचलून धरावेत. पहिल्या प्रथम कमरेला दोन्ही हातांचा आधार द्यावा. शरीराचा सर्व भार खांद्यावर ठेवावा. दोन्ही हात सरळ जमिनीवर पसरून हें आसन करतां येईल इतका याचा अभ्यास करावा. हें आसन करतांना आकाशांत पद्मासनाप्रमाणें मांडीहि घालावी. हा सर्व व्यायाम नाडीशुद्धीला अत्यंत उपयुक्त आहे.

(९) धनुरासन :— उजव्या पायावर डावा पाय ठेवून दोन्ही पाय पसरावेत. नंतर डाव्या हाताचा आंगठा व तर्जनी आणि मध्यमा यांच्या चिमटीनें उजव्या पायाचा आंगठा धरावा. त्यानंतर याच पद्धतीनें उजव्या हातानें डाव्या पायाचा आंगठा धरून तो उजव्या कानापर्यंत आणावा. दृष्टि उजव्या पायाच्या आंगठ्यावर स्थिर करावी. धनुष्याच्या दोरीला बाण लावून ती कानापर्यंत ओढली असतां जसा आकार दिसावा तसाच आकार या आकृतीचा दिसतो म्हणून याला धनुरासन असें म्हणतात. कांहीं लोक याला आकर्ण धनुरासन असेंहि म्हणतात. ही पद्धति हठयोगप्रदीपिकाकारांनीं सांगितलेली आहे. घेरंडसंहिताकारांची पद्धति मात्र निराळी आहे. जमिनीवर सरळ पालथें पडावें. गुडघ्यापासून पाय वळवून पाठीकडे आणावेत. उजव्या हातानें उजव्या पायाचें व डाव्या हातानें डाव्या पायाचें मणगट धरून छाती जितकी वर उचलतां

येईल तितकी वर उचलावी. यानें शरीराला धनुष्याच्या आकाराचें वळण येतें. धनुरासनाच्या या दोन पद्धति हितावहच आहेत.

(१०) भुजंगासन :– प्रथम सरळ पालथें निजावें. पायाच्या आंगठ्यापासून नाभीपर्यंतचा भाग जमिनीस (आसनावर) टेकलेला असावा. दोन्ही तळहात नाभिस्थानाजवळ खालीं टेकवून नाभीपासून डोक्यापर्यंतचा भाग वर उचलून धरावा. दृष्टि अगदीं समोर ठेवावी. भुजंगासारखा आकार दिसतो म्हणून याला भुजंगासन असें म्हणतात. या आसनानें जठराग्नि प्रदीप्त होतो. सर्व रोग नाहींसे होतात. कुंडलिनीशक्तीहि जागृत होते.

(११) मत्स्यासन :– बद्धपद्मासन घालून उताणें निजावें. डोक्याला दोन्ही हातांचा वेढा घालून उजव्या हातानें डावा दंड आणि डाव्या हातानें डावा दंड धरावा. हें आसन फार उपयुक्त आहे. यानें पोट साफ रहातें. पोटांत वात धरीत नाहीं. वात धरण्याची संवय असल्यास ती कमी होते. भूकहि चांगली लागते पोट दुखत नाहीं. स्त्रियांची मासिकपाळीहि साफ होते.

(१२) शीर्षासन :– हें आसन प्रसिद्ध आहे. पहिल्या प्रथम भिंतीच्या शेजारीं प्रशस्त मऊ आसन घालून त्यावर एक चांगली जाड धोतराची घडी अथवा चुंबळ ठेवावी. तिच्यावर डोकें ठेवावें. डोक्याच्या मागच्या बाजूस दोन्ही हाताच्या मिठीचा पक्का आधार द्यावा. सर्व शक्ति एकवटून पाय हळूहळू वर उचलावेत आणि भिंतीस लावावेत. पुढें हळूहळू ते सरळ वर उचलावेत. मांड्या, पोटऱ्या अगदी ताठ कराव्यात. आरंभीं आरंभीं हें आसन अगदीं थोडा वेळ करावें. पुढें अभ्यास वाढला म्हणजे भिंतीचा आधार घेण्याची आवश्यकता रहाणार नाहीं. आपली प्रकृति लक्षांत घेऊनच या आसनाचा अभ्यास वाढवावा. मानवत नसेल तर तें अधिक वेळ करूं नये. हें आसन मानवलें तर फारच हितावह आहे. तें शरीराला रसायनासारखें आहे. याच आसनाला विपरीतकरणीमुद्रा अथवा कपालासन असेंहि नांव दिलेलें आढळतें. याच आसनांत मांड्या वळवून पद्मासन घातलें कीं ऊर्ध्वपद्मासन तयार होतें गुडघ्यापासून पाय पाठीकडे वळतें ठेवलें कीं, अर्ध वृक्षासन तयार होईल. दोन्ही पाय परस्पर विरुद्ध दिशेला पसरवून ते इकडें तिकडे फिरविलें कीं शरीरांतील सर्व स्नायूंना योग्य तो व्यायाम मिळतो आणि सर्व नाड्या शुद्ध होतात. अशा रीतीनें हें आसन मोठें उपयुक्त आहे.

श्रीस्वामी दत्तात्रेयानंदजी यांनी केलेल्या योगासनांची छायाचित्रे



भुजंगासन



पश्चिमोत्तानासन



मत्स्यासन



पूर्वोत्तानासन अथवा हलासन



शवासन



मयूरासन



ऊर्ध्वपद्मासन



गोरक्षासन (पूर्वोत्तर वाचू)



गोरक्षासन (मागील बाजू)



शीर्षासन



गर्भासन



मत्स्येंद्रपीठ (पुढील बाजू)



पद्मासन



मत्स्येंद्रपीठ (मागील बाजू)



उत्थानपद्मासन



सर्वांगासन



बद्धपद्मासन



सिद्धासन

वरील योगासनांची छायाचित्रे श्रीमान आर्सेनिक शाहवाज (फ्रेंच) यांच्याकडून मिळालीं आहेत.



सिंहासन



उड्यासन



धनुरासन



नवली

(१३) वृक्षासन :— सरळ उभे रहावें. डाव्या मांडीच्या मुळाशीं उजव्या पायाची टांच लावावी. दोन्ही हात जोडून दृष्टि नासाग्रीं स्थिर करावी. वृक्षासारखें ताठ असावें. उलट सुलट दोन्ही बाजूंनीं हें आसन करावें.

(१४) मयूरासन :— प्रथम जमिनीवर दोन्ही गुडघे टेकून बसावें. नंतर गुडघ्यांच्या पुढें दोन्ही हात जमिनीवर टेकवावेत. हातांचीं बोटें गुडघ्याकडे करावींत. कांहीं लोक तीं सरळ पुढें ठेवतात. नंतर नाभिस्थानाच्या दोन्ही बाजूंना हातांच्या कोपरांचा आधार द्यावा. शरीराचा तोल नीट संभाळून पाय सरळ मागें पसरावेत. ते किंचित् वरच्या बाजूसहि तोलून धरले जातील असा प्रयत्न करावा. मोरासारखा आकार दिसत असल्यामुळें यास मयूरासन असें म्हणतात. आरोग्याच्या दृष्टीनें हें आसन फारच उपयुक्त आहे. " हरति सकलरोगानाशु गुल्मोदरादीनभिभवति च दोषानासनं श्रीमयूरम् " गुल्म, मूत्रकृच्छ्र, अष्टीला — पोटांत वात धरणें, पोट दुखणें, एवढेंच काय, पण जलोदरासारखे दुर्धर विकारहि या आसनानें निरस्त होतात. वात, पित्त आणि कफ या तिन्ही दोषांचा तें प्रकोप होऊं देत नाहीं. यामुळें आरोग्य चांगलें रहातें व भूकहि उत्तम लागते.

(१५) मत्स्येन्द्रपीठ :— प्रथम सरळ मांडी घालून बसावें नंतर उजव्या पायाची टांच डाव्या मांडीच्या मुळाशीं डाव्या ओटीपोटाला दाबून बसवावी. डावा पाय उजव्या गुडघ्याच्या पलीकडे जमिनीस टांच लावून ठेवावा. उजवा हात डाव्या गुडघ्याच्या बाहेरून घेऊन त्यानें डाव्या पायाचा आंगठा धरावा. डाव्या हातानें पाठीला वळसा घालून उजव्या पायाची टांच धरावी. डाव्या खांद्याकडे तोंड वळवून दृष्टि नासाग्रीं ठेवावी. यास मत्स्येंद्रासन म्हणतात. मत्स्येंद्रनाथांनीं याचा पुरस्कार केलेला आहे. मयूरासनाप्रमाणेंच हेंहि आरोग्य-दृष्ट्या उपयुक्त असून यानें कुंडलिनी जागृत होते व मूर्धस्थानीं सहस्रदलकमलांत असलेल्या चंद्रमंडलालाहि स्थिरता येते, असें याचें वर्णन केलेलें आहे. हें आसन उलट-सुलट दोन्ही बाजूंनीं करण्याचा प्रयत्न करावा.

(१६) शवासन :— सर्व आसनें करून झाल्यानंतर शेवटीं कोणत्याहि स्नायूला ताण न देतां शवासारखें स्वस्थ उताणें पडून रहावें. यानें सर्व श्रमांचा परिहार होतो व चित्तालाहि विश्रांति मिळते.

आहार हा नेहमीं परिमित आणि सात्त्विक असावा. गहूं, उच्च जातीचे तांदूळ, जव, साठीसाळ म्हणजे दोन महिन्यांत तयार होणारें भात, मुगाची डाळ,

दूध, तूप, लोणी, साखर, खडीसाखर, मध, ताजें मधुर ताक, सैंधवमीठ, मिरपूड, सुंठ, आलें. भाज्यांपैकीं परवर, पडवळ, दोडका, घोसाळें, भेंडी, दुध्या भोपळा इत्यादि पदार्थ सेवन करावेत. पाणी स्वच्छ, सुंदर आणि गाळलेलें असावें. कडू, आंबट, तिखट, खारट, तेलकट आणि मसालेदार पदार्थ खातांना बरें वाटलें तरी ते शरीराला अपायकारक असतात. ते शक्यतों टाळावेत. शरीरांत आळस किंवा जडता निर्माण होणार नाहीं असाच आहारविहार असावा. प्रकृतिस्वास्थ्य सुरक्षित असावें.

आतां नाडीशुद्धीला प्रत्यक्ष कारणीभूत असलेल्या प्राणायामाचा आपण विचार करूं. आपलें शरीर नखशिखान्त लहानमोठ्या नाड्यांनीं व्यापलेलें आहे. योगी आणि तत्त्ववेत्ते शरीरांतील नाड्या बहात्तर हजार असल्याचें सांगतात. या नाड्या आंतून सुषिर म्हणजे पोकळ असतात. त्यांच्यांतून रसरक्तादि धातु, वात, पित्त आणि कफ तसेंच स्वेदमूत्र इत्यादि मल सारखे वहात असतात. यांतच कांहीं स्रोतसें इंद्रियवह, मनोवह आणि संवेदनावहहि आहेत. ते प्राकृत अवस्थेंत शरीराला आरोग्य देतात, भूषित करतात, तर विकृत अवस्थेंत दूषित करीत असतात. याकरितां शरीरांतील सर्व नाड्यांना शुद्ध ठेवून दोष, धातु आणि मल यांना निर्दोष राखणें आणि त्यांच्या गतीला कोठेंहि अडथळा निर्माण होऊं न देणें आवश्यक असतें. आसनांच्या व प्राणायामाच्या अभ्यासानें ही गोष्ट साधतां येते. पोकळ नळ्यांतून अडकून बसलेला केर-कचरा ज्याप्रमाणें आपण फुंकून साफ करतों त्याचप्रमाणें रेचक, पूरक आणि कुंभक या प्राणायामानीं शरीरांतील पोकळ नाड्यांनाहि साफ स्वच्छ ठेवलें पाहिजे.

प्राणायाम कसा करावा याची माहिती सुबोधस्तोत्रसंग्रह, भाग पहिला, पान २९७ व ९८ पहा. "प्राणः स्वदेहजो वायुः" आपल्या शरीरांत असणाऱ्या वायूला प्राण असें म्हणतात. "शरीरान्तः सञ्चारी वायुः प्राणः" शरीरामध्यें संचार करणाऱ्या वायुला प्राण ही संज्ञा आहे. "आयामस्तन्निरोधनम्" शरीरांत प्राणवायूची जी स्वाभाविक गति श्वासोच्छ्वासाच्या रूपानें चाललेली असते, त्या गतीचा निरोध करणें या क्रियेला प्राणायाम असें म्हणतात. "तस्मिन् सति श्वासप्रश्वासयोः गतिविच्छेदः प्राणायामः" अशी पतंजलीनीं प्राणायामाची व्याख्या केलेली आहे. तस्मिन् सति म्हणजे आसनक्रियेचा चांगला अभ्यास झाल्यानंतर श्वास म्हणजे बाहेरचा वायु नाकानें शरीरांत घेणें आणि प्रश्वास म्हणजे शरीरांतील वायु नाकानें बाहेर सोडणें. या स्वाभाविकपणें चालू असलेल्या वायूच्या

गतीचा विच्छेद म्हणजे निरोध करणें हेंच प्राणायामाचें सामान्य स्वरूप होय. पूरक, रेचक आणि कुंभक असे प्राणायामाचे तीन प्रकार आहेत. बाहेरचा वायु शरीरांत घेणें यास पूरक असें म्हणतात, तर शरीरांत घेतलेल्या वायुला बाहेर सोडणें याला रेचक असें म्हणतात. बाहेर सोडलेल्या वायूला कांहीं काळ बाहेरच स्थिर ठेवणें अथवा शरीरांत घेतलेल्या वायूला कांहीं काळ शरीरांत स्थिर ठेवणें या क्रियेला कुंभक असें म्हणतात. यांपैकीं पहिल्या क्रियेला बहिःकुंभक असें म्हणतात, तर दुसऱ्या क्रियेला अंतःकुंभक असें म्हणतात. आणखी निराळ्या दृष्टीनें कुंभकाचे दोन प्रकार आहेत. एक सहित कुंभक व दुसरा केवल कुंभक. पूरक आणि रेचक यांच्यासह केल्या जाणाऱ्या कुंभकाला सहित कुंभक असें म्हणतात. तर पूरक आणि रेचक या क्रिया न करतां स्वाभाविकरीत्या सुखानें वायु धारण करणें या क्रियेला केवल कुंभक असें म्हणतात. सहित कुंभकाचेहि सूर्यभेदन, उज्जायी, सीत्कारी, सीतली, भस्त्रिका, भ्रामरी, मूर्च्छा आणि प्लाविनी असे आठ प्रकार आहेतच. या सर्व कुंभकांत केवल कुंभक हा अत्यंत श्रेष्ठ आहे. आचार्यांनी योगतारावलींत सहा श्लोकांतून या केवल कुंभकाचा मोठा गौरवपूर्वक उल्लेख केलेला आहे.

पूरक, रेचक आणि कुंभक हे तिन्ही मिळून एक प्राणायाम पूर्ण समजला जातो. डाव्या नाकपुडीवर उजव्या हाताची करंगळी आणि अनामिका ठेवून डावी नाकपुडी दाबून धरावी. उजव्या नाकपुडीनें हळूहळू श्वास वर घ्यावा. नंतर उजव्या हाताच्या आंगठ्यानें उजवी नाकपुडी दाबून धरावी. तर्जनी आणि मध्यमा ही दोन बोटें मोकळींच ठेवावींत. अशा रीतीनें शरीरांत घेतलेला प्राणवायु शरीरांत कोंडून ठेवावा. नंतर डाव्या नाकपुडीवरचीं बोटें किंचित् सैल करून कोंडलेल्या प्राणवायूला डाव्या नाकपुडीवाटें अगदीं हळूहळू बाहेर सोडावें. जितक्या मात्रांनीं पूरक केला असेल त्यांच्या चौपट मात्रांनीं कुंभक करावा आणि दुप्पट मात्रांनीं रेचक करावा. याप्रमाणें उलट-सुलट पद्धतीनें प्राणायामाचा अभ्यास करावा. प्राणायामाच्या वेळीं प्रणव, गायत्री-मंत्र अथवा कोणत्याहि इष्ट देवतेचा मंत्र त्याच्या अर्थाकडे लक्ष देऊन उपयोगांत आणावा. त्यायोगें मनाला स्थिर व शांत करण्याला अधिकच साहाय्य होईल. याप्रमाणें प्राणायामांचा अभ्यास केल्यानें शरीरांतील सर्व नाड्या अत्यंत शुद्ध होतात. सुषुम्ना नाडीचें मुख मोकळें होतें. प्राणवायूचा सुषुम्ना नाडींत

प्रवेश होतो. प्राणावरोबर मनहि प्रविष्ट होतें. मनाचा सुषुम्नानाडींत प्रवेश होणें हाच खरी एकाग्रता होय. याच एकाग्रतेनें अनाहतनादाचें श्रवण होऊं शकतें. " विधिवत्प्राणसंयामैर्नाडीचक्रे विशोधिते । सुषुम्नावदनं भित्त्वा सुखाद्विशति मारुतः ॥ " " नादाभिव्यक्तिरंगानां जायते नाडिशोधनात् " (हठयोगप्रदीपिका). श्रीयाज्ञवल्क्यमुनींनीं देखील नाडीशुद्धीचीं जीं अनेक लक्षणें सांगितलीं आहेत त्यांत अनाहतनाद प्रकट होणें हेंहि एक लक्षण सांगितलेलें आहे. " नादाभिव्यक्तिरित्येतच्चिह्नं तत्सिद्धिसूचकम् ".

सुषुम्नानाडीलाच ब्रह्मनाडी, ब्रह्मस्थान, ब्रह्ममार्ग इत्यादि नांवें दिलेलीं आहेत. चित्तानें या नाडींत प्रवेश केल्याशिवाय जीवाला ब्रह्मभाव प्राप्त होत नाहीं. मन सुषुम्नानाडींत प्रविष्ट झाल्याशिवाय त्याला नादब्रह्माचा अथवा स्वस्वरूपाचा साक्षात्कार होत नाहीं. प्राणासमवेत मनानें सुषुम्नानाडींत क्षणभर प्रवेश केला कीं स्वरूपपरिचिंतनाचरोबरच आपल्या उजव्या कानांत आपल्याला अनाहतनाद ऐकूं येईल, असें आचार्यांनीं 'प्रबोधसुधाकरांत' म्हटलेलें आहे. " यावत्क्षणं क्षणार्धं स्वरूपपरिचिन्तनं क्रियते । तावद्दक्षिणकर्णे त्वनाहतः श्रूयते नादः ॥ " हृत्कमल, आज्ञाचक्र अथवा सहस्रदलकमल यांच्या आंत आत्मस्वरूपीं अथवा परमात्मस्वरूपीं अन्तःकरणवृत्ति ठेवून सिद्धासनावर निश्चल बसावें. दृष्टि निमेषोन्मेषरहित अर्धोन्मीलित स्वरूपांत ठेवावी. अशा रीतीनें इष्ट देवतेशीं समरस होणें याला योगशास्त्रांत शांभवीमुद्रा असें म्हणतात. या शांभवीमुद्रेनेंहि सुषुम्ना नाडींत होणाऱ्या अनाहतनादाचें उजव्या कानानें आपण श्रवण करूं शकतों. " मुक्तासने स्थितो योगी मुद्रां सन्धाय शाम्भवीम् । शृणुयादक्षिणे कर्णे नादमन्तःस्थमेकधीः ॥ " (हठयोगप्रदीपिका). तात्पर्य, यमनियमपूर्वक आसनें आणि प्राणायाम यांच्या अभ्यासानें शरीरांतील सर्व नाड्या पूर्णपणें शुद्ध झाल्यानंतर अनाहतनाद श्रवण करण्याची योग्यता येते. हाच अभिप्राय आचार्यांनीं या तिसऱ्या श्लोकांत प्रकट केलेला आहे. पराङ्मुखीमुद्रेनेंहि अनाहतनादाचें श्रवण होऊं शकतें. सिद्धासन अथवा स्वस्तिकासन घालून शांतपणें बसावें. दोन्ही हाताचे आंगठे दोन्ही कानांत दृढ बसवावेत. दोन्ही डोळे मिटवून आंगठ्याजवळचीं बोटें पापण्यांवर ठेवावींत. मधल्या दोन्ही नाकपुड्या दाबून धरल्यात. अनामिका आणि कनिष्ठिका या दोन बोटांनीं ओठांचा वरचा आणि खालचा भाग झांकावा. मुख मिटलेलें असावें. ही मुद्रा सर्व इंद्रियांना विषयांपासून

पराङ्मुख करणारी असल्यामुळें हिला पराङ्मुखी मुद्रा असें म्हणतात. कोणी हिला षण्मुखीमुद्रा असेंहि म्हणतात. या मुद्रेनेंहि सुषुम्नामार्गात होणारा अनाहतनाद ऐकूं येतो. मात्र सुषुम्नामार्ग हा आसनें आणि प्राणायाम यांच्या योगानें शुद्ध केलेला असावा. " श्रवणपुट-नयन-युगल-घ्राणमुखानां निरोधनं कार्यम् । शुद्धे सुषुम्नासरणौ स्फुटममलः श्रूयते नादः ॥ " (हठयोगप्रदीपिका). अनाहतनादाच्या सिद्धीसाठीं आवश्यक असलेल्या यम, नियम, आसन आणि प्राणायाम या चार योगांगांचें संक्षिप्त स्वरूप आम्हीं वाचकांच्यापुढें ठेवलें. आतां नादानुसंधानाच्या अनुषंगानें प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि या अंगांचें संक्षिप्त विवेचन चौथ्या श्लोकांत आपण पाहूं.

नादानुसंधान नमोऽस्तु तुभ्यं
त्वां साधनं तत्त्वपदस्य जाने ।
भवत्प्रसादात्पवनेन साकं
विलीयते विष्णुपदे मनो मे ॥ ४ ॥

" हे नादानुसंधान तुभ्यं नमः अस्तु; अहं त्वां तत्त्वपदस्य साधनं जाने; मे मनः भवत्प्रसादात् पवनेन साकं विष्णुपदे विलीयते । " हे नादानुसंधाना ! तुला माझा नमस्कार असो. तूं ब्रह्मपदाच्या प्राप्तीचें साधन आहेस असें मी समजतों. तुझ्या कृपेनें माझें मन प्राणवायूसह विष्णुपदीं अर्थात् विश्वव्यापक असलेल्या ब्रह्मस्वरूपीं लीन होत आहे. असा या श्लोकाचा अन्वय आणि त्याचा अर्थ आहे.

परब्रह्मस्वरूपीं मनानें पूर्णपणें लीन होऊन रहाणें यालाच समाधि असें म्हणतात. ही अवस्था प्राप्त होणें यांतच मानवी जीवनाची सफलता आहे. परमार्थाच्या मार्गानें प्रवृत्त झालेले साधक हीच अवस्था प्राप्त करून घेण्यासाठीं सतत प्रयत्न करीत असतात. ज्यांना परब्रह्माच्या निर्गुण स्वरूपांत आपल्या मनाचा लय घडवून आणतां येत नाहीं ते त्या परब्रह्माच्या सगुण स्वरूपांत आपल्या मनाचा लय करून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. सगुण स्वरूपीं मन लीन झालें तरी तें निर्गुण स्वरूपीं लीन झाल्यासारखेंच आहे. सोन्याचे अलंकार हातीं आले तरी तें सोनेंच हातीं आल्यासारखें असतें. बाजारांत साखर नाहीं मिळाली तरी बत्तासे, साखरेचीं चित्रें किंवा गांठ्या मिळाल्या तरी साखर मिळाल्यासारखेंच

होतें. याच न्यायानें सगुण स्वरूपीं मन तन्मय झालें तरी तें निर्गुण स्वरूपीं रमल्यासारखेंच आहे.

यावर कोणी असें विचारील कीं, अहो ! जें निर्गुण आहे तें सगुण कसें असूं शकेल ? जें सगुण आहे तें निर्गुण कसें असूं शकेल ? यावर श्रीतुलसीदासांनीं मोठें मार्मिक उत्तर दिलेलें आहे. " जो गुणरहित सगुणसो कैसे ? जल हिम उपल विलग नहिं जैसे । जुले कमल सोह सर कैसे ? निर्गुण ब्रह्म सगुण भये जैसे ॥" बर्फाचे खडे किंवा आकाशांतून पडलेल्या गारा ह्या पाण्याहून निराळ्या नाहींत. तूप थिजलें तरी तें वितळलेल्या तुपाहून निराळें नसतें. कमळ विकसलें तरी तें मिटलेल्या कमळाहून निराळें होत नाहीं. त्याचप्रमाणें परमात्मतत्त्व सगुण रूपानें साकारलें तरी तें निर्गुण रूपाहून निराळें नाहीं. विकसित झालेल्या कमलांनीं सरोवराची शोभा जशी अपूर्व दिसावी त्याचप्रमाणें निर्गुण ब्रह्म नामरूपानें नटलें, सगुण रूपानें साकारलें तर त्याची शोभा कांहीं अपूर्वच दिसतें ! याच अभिप्रायानें भगवद्भक्त आपल्या मनाचा लय परमेश्वराच्या सगुण स्वरूपांतच करीत असतात. पतंजलिमहर्षीनीं देखील "ईश्वरप्रणिधानाद्वा" या सूत्रानें, अनन्यचित्तानें केली जाणारी ईश्वरोपासना ही देखील निर्विकल्प समाधीचें साधन असल्याचें सांगितलेंच आहे. ईश्वराची रूपें अनंत असल्यामुळें त्याच्या उपासनेचे प्रकारहि असंख्य आहेत. हे सर्व प्रकार मनाच्या लयाचीं साधनेंच होत. अशा रीतीनें मनाच्या लयाचीं साधनें असंख्य असलीं तरी आचार्य प्रकृतस्थलीं नादानुसंधान हेंच मनाच्या लयाचें – निर्विकल्प समाधीचें सर्वोत्कृष्ट साधन असल्याचें स्वानुभवानें सांगत आहेत.

" त्वां साधनं तत्त्वपदस्य जाने " या श्लोकांत "तत्त्वपद" आणि "विष्णुपद" असे दोन शब्द आचार्यांनीं योजलेले आहेत. या दोन्ही शब्दांचा अर्थ एकच आहे. "ॐ तदब्रह्म । ॐ तद्वायुः । ॐ तदात्मा । ॐ तत्सर्वम् ।" इत्यादि महानारायणीयोपनिषदांतील वाक्यांनीं तत् शब्दाचा अर्थ ब्रह्म किंवा आत्मा असा सांगितलेला आहे. तस्य भावः तत्त्वं अशी तत्त्व शब्दाची व्युत्पत्ति आहे. भाव शब्दाचा अर्थ स्वरूप असा आहे. प्रकृतस्थलीं तत्त्व शब्दाचाहि अर्थ ब्रह्माचें स्वरूप अर्थात् ब्रह्म असाच होतो. " तत्त्वं ब्रह्मणि याथार्थ्ये " या कोशांतहि तत्त्व शब्द हा ब्रह्माचा वाचक असल्याचें सांगितलें आहे. " पद्यते गम्यते इति पदं " या व्युत्पत्तीनें पद शब्दाचा अर्थ ज्ञान असा होतो. " सत्यं ज्ञानमनन्तं

ब्रह्म " या तैत्तिरीय श्रुतिवचनाप्रमाणें ज्ञान शब्दाचा अर्थ ब्रह्म असाच आहे. तात्पर्य, तत्त्वपद म्हणजे सच्चिदानंदरूप परब्रह्म. अनाहत नादाचें अनुसंधान म्हणजे अखंड चिंतन हेंच सच्चिदानंदरूप परब्रह्माच्या साक्षात्काराचें सर्वोत्कृष्ट साधन होय. असा हा " त्वां साधनं तत्त्वपदस्य जाने " या दुसऱ्या चरणाचा अभिप्राय आहे.

अगदीं सहज रीतीनें आपल्या मनाचा सच्चिदानंदरूपीं लय करून घेण्याचें नादानुसंधान हें एक सर्वोत्कृष्ट साधन असल्यामुळें आचार्यांनीं या श्लोकाच्या पहिल्याच चरणांत नादानुसंधानाबद्दल अत्यंत आदर व्यक्त करीत नादानुसंधानाला नमस्कार केलेला आहे. ब्रह्मस्वरूपीं मन समरस करण्यास नादानुसंधानाचा कसा उपयोग होतो हें तत्त्व या श्लोकाच्या उत्तरार्धांत स्पष्ट केलेलें आहे. तें आतां आपण पहूं.

" भवत्प्रसादात् पवनेन साकं विलीयते विष्णुपदे मनो मे " हे नादानुसंधाना ! तुझ्या कृपेनें माझें मन अगदीं सहज रीतीनें प्राणवायूसह ब्रह्मस्वरूपीं लीन होत आहे. मागील श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें आसनें आणि प्राणायाम यांच्या अभ्यासानें देहांतील सर्व नाड्यांचें शुद्धीकरण झालें कीं यमनियमांच्या पाठबळानें विवेकी बनलेलें मन विषयांपासून विरक्त होऊन आत्मप्रवण होऊं लागतें. मनाला विषयांपासून परावृत्त करतांना इतर इंद्रियांना देखील आपआपल्या विषयापासून परावृत्त करावेंच लागतें. यालाच योगशास्त्रांत "प्रत्याहार" असें म्हटलेलें आहे. इंद्रियें हीं स्वभावतःच विषयोन्मुख असतात. विषय दिसला कीं तिकडे तीं धांव घेत असतात. इंद्रियांच्या पाठोपाठ मनहि धांवत असतें आणि मनाच्या पाठोपाठ शरीराचीहि हालचाल सुरू असतेच. यांच्यांतूनच अस्वस्थता निर्माण होते. याकरितां साधकांना विवेकाच्या बळानें वैराग्य धारण करून इंद्रियांना आपआपल्या विषयांपासून परावृत्त करावें लागतें. हेंच प्रत्याहाराचें स्वरूप होय. " इंद्रियाणां विचरतां विषयेषु स्वभावतः । बलादाहरणं तेषां प्रत्याहारः स उच्यते ॥ " असें योगयाज्ञवल्क्यांत प्रत्याहाराचें लक्षण दिलेलें आहे.

प्रत्याहाराचा अभ्यास करतांना इंद्रियांना जसें विषयांपासून आवरावें लागतें तसेंच मनालाहि पण विषयांपासून आवरावें लागतेंच. इंद्रियांना आणि मनाला बाह्य विषयांपासून आवरणें यालाच अंतर्मुख होणें असें म्हणतात.

मनाचा स्वभाव असा आहे की, तें सर्वस्वी निर्विषय कधीं राहूंच शकत नाहीं. बाह्य विषयांपासून त्याला आवरलें तें स्वभाविकच अंतर्विषयाकडे वळणार. मनानें अंतर्विषयाकडे वळणें यालाच आत्मप्रवण होणें असें म्हणतात. मन आत्मप्रवण झालें की इंद्रियांचा विषयांशीं संबंध आपोआपच सुटतो. याच अवस्थेला प्रत्याहार असें म्हणतात. मन ब्रह्मचिंतनाकडे प्रवृत्त झालें की बहिरिंद्रियांच्या वृत्तीहि ब्रह्मचिंतनाला अनुरूप अशाच निर्माण होत रहातात. साधक हा अंतरिंद्रियानें व बहिरिंद्रियांनींहि प्रत्याहारकाळीं आत्मप्रवणच होत असतो. याच अभिप्रायानें " शब्दादिषु विषयभावनामुत्सृज्य ब्रह्मभावनं तत्प्रत्याहारः " अशीहि एका विद्वानानें प्रत्याहाराची व्याख्या केलेली आहे, ती योग्यच आहे. पतंजलींनीं देखील याच अभिप्रायानें " स्वविषयासम्प्रयोगे चित्तस्वरूपानुकार इवेन्द्रियाणां प्रत्याहारः " आपल्या विषयाशीं संबंध सुटल्यानंतर इंद्रियांनीं अंतर्मुख झालेल्या चित्ताचें अनुकरण करणें हेंच प्रत्याहाराचें स्वरूप होय, अशीच प्रत्याहाराची व्याख्या केलेली आहे.

प्रकृतस्थलीं अन्तर्मुख झालेलें मन हें अनाहतनादाचें अनुसंधान म्हणजे चिंतन करूं लागलें की साधकाचे कानहि अनाहतनादाचें श्रवण करण्याकरितां उत्सुक झालेले असतात. नेत्रांनाहि तेथें कांहीं तरी अलौकिक रूप दिसतेंच. तें दिव्य रूप पहाण्याकरितां नेत्रहि उत्कंठित झालेले असतात. " ज्वालमालाकुलं भाति विश्वस्यायतनं महत् " अशा शब्दांनीं वेदांनींहि त्या रूपाचें वर्णन केलेलें आहे. रसनेंद्रियालाहि तेथील अलौकिक रसाचा आस्वाद घ्यावयास सांपडतो. घ्राणेंद्रियाला तेथें दिव्य गंधाची उपलब्धि होतच असते. त्या तत्त्वाचा स्पर्शहि कांहीं अनिर्वचनीयच असतो. त्या अनिर्वचनीय दिव्य तत्त्वाला स्पर्श करण्यासाठी साधकाचें त्वगिंद्रियहि पण आतुरलेलें असतें. तात्पर्य, मन नादानुसंधानाला उन्मुख झालें की, इतर इंद्रियेंहि त्या मनाला अनुसरतात. याच अवस्थेला प्रत्याहार असें म्हटलें जातें. हें योगाचें पांचवें अंग आहे.

मधुरनादाच्या ठिकाणीं मनाला आकृष्ट करण्याचें सामर्थ्य हें स्वाभाविकच असतें. श्रीकृष्णप्रभृत्या मुरलीचा मधुर नाद ऐकून वृक्षलतादि स्थावर जीवहि मुग्ध होत होते, मग पशु, पक्षी, गाई-वांसरें, गोप गोपी आणि इतर जन मुग्ध होत असतील यांत नवल काय? बाह्य नादहि इतका आकर्षक असतो तर अंतर्नाद किती आकर्षक असेल याची कल्पना करावी. सूक्ष्म अन्तर्नाद

अभिव्यक्त होण्याचें स्थान सुषुम्ना नाडी होय. प्राणासह सुषुम्ना नाडींत प्रविष्ट झालेलें मन अन्तर्नादाशीं संलग्न होतें. मनामध्यें नादाकार वृत्तिप्रवाह निर्माण होणें हेंच नादाचें अनुसंधान होय. " अनाहतस्य शब्दस्य ध्वनिर्य उपलभ्यते । ध्वनेरन्तर्गतं ज्ञेयं ज्ञेयस्यान्तर्गतं मनः ॥ मनस्तत्र लयं याति तद्विष्णोः परमं पदम् ॥" नादाचें अनुसंधान करणें हें आत्मानुसंधानच होय. नादामध्येंच ज्ञेयतत्त्व समावलेलें आहे. किंबहुना नादतत्त्व आणि ज्ञेयरूप ब्रह्मतत्त्व हीं दोन्ही एकच आहेत. " नादो ज्योतिर्मयः शिवः " असें नादबिंदूपनिषदांत म्हटलेलें आहे. ज्योति किंवा शिव या दोन्ही शब्दांनी ब्रह्मच विवक्षित आहे. अशा रीतीनें अंतर्नादाशीं संलग्न झालेलें मन हें ब्रह्मस्वरूपींच संलग्न झालेलें असतें. याच अवस्थेला योगशास्त्रांत "धारणा" असें म्हणतात. " यमादिगुणयुक्तस्य मनसः स्थितिरात्मनि । धारणेत्युच्यते सद्भिः शास्त्रतात्पर्यवेदिभिः ॥ " पतंजलीनीं देखील " देशबन्धश्चित्तस्य धारणा " अशी धारणेची व्याख्या केलेली आहे. ब्रह्मस्वरूप अनाहतनादरूपीं देशाच्या ठिकाणीं चित्ताला स्थिर करणें असा त्याचा अर्थ आहे. हें योगाचें सहावें अंग होय. देश शब्दानें कोणताहि ध्येयविषय घेतां येत असला तरी प्रकृतस्थलीं अनाहतनाद हाच आचार्यांना विवक्षित असल्यामुळें त्याचा उल्लेख केला आहे. आपल्या शरीरांतील मणिपूरचक्र, अनाहतचक्र, आज्ञा चक्र इत्यादि चक्रेंहि देश शब्दानें विवक्षित असून त्या त्या ठिकाणीं आपल्या इष्टदेवतेच्या स्वरूपांत मनाला स्थिर करणें हेंहि धारणेचेंच स्वरूप होय.

धारणेचीच पुढची पायरी म्हणजे ध्यान होय. " तत्र प्रत्ययैकतानता ध्यानम् " अशी ध्यानाची व्याख्या आहे. धारणेमध्यें ज्या विषयाच्या ठिकाणीं चित्ताला स्थिर केलें असेल त्याच विषयाचा दीर्घकाळ, तैलधारा जशी अखंड असते त्याचप्रमाणें चित्तवृत्तीचा अविच्छिन्न प्रवाह चालू असणें याला ध्यान असें म्हणतात. सगुण अथवा निर्गुण या रूपानें ध्यान दोन प्रकारचें असलें तरी सर्वत्र ध्यानामध्यें साधकानें ध्येय तत्त्वाशीं आपलें तादात्म्य चिंतावें लागतें हा धारणेपेक्षां ध्यानाचा विशेष आहे. " सोऽहमस्मीति या बुद्धिः सा च ध्याने प्रशस्यते " असें याज्ञवल्क्यांनी म्हटलेलें आहे. ध्येयतत्त्व हें निर्गुण असो अथवा सगुण असो, तेंच मी आहें. मी त्याहून निराळा नाहीं अशी भावना ध्यानामध्यें अनुस्यूत असते. नादानुसंधान या शब्दांतील अनुसंधान शब्दाचा अर्थ सतत—अविच्छिन्न चिंतन असाच आहे. नादामध्यें ॐचें अथवा सोऽहंचें चिंतन सहजच

करतां येतें. याप्रमाणें नादानुसंधान हें नादब्रह्माचें ध्यानच होय. ध्यान हें योगाच्या आठ अंगांपैकीं सातवें अंग होय.

नादाच्या अनुसंधानानेंच अंतःकरणामध्यें सोऽहं तत्त्वाचाहि ज्ञानदीप उजळतो. अज्ञानमूलक मोहांधकाराचा नाश होतो. अखंड प्रवाहरूपानें चाललेल्या एकाग्र ध्यानानें आत्मप्रकाश फांकतो. त्या प्रकाशांतच होणाऱ्या आत्मस्वरूपाच्या साक्षात्कारानें मन आत्मस्वरूपाशीं इतकें समरस होऊन जातें कीं, त्या वेळीं त्याला अंतर्बाह्य विश्वाचें कांहीं भान उरत नाहीं. हीच मनाची समाधिअवस्था होय. यालाच स्वस्वरूपीं मनाचा लय झाला असें म्हणतात. लयाची पराकाष्ठा म्हणजे मनानें ध्येयतत्त्वाशीं एकरूप होऊन जाणें हीच आहे. ध्येयभूत जो सच्चिदानंदरूप परमात्मा, त्याच्या व्यतिरिक्त दुसरी कोणतीच वृत्ति मनामध्यें उदयाला येत नसल्यामुळें समाधिअवस्थेंत दुसरा कोणताच अर्थ भासत नाहीं. या वेळीं साधकाचें मन स्वरूपशून्यच झालेलें असतें. फक्त परमात्मतत्त्वच त्या वेळीं उर्वरित असतें. तें स्वयंप्रकाश असल्यामुळें आपल्या प्रकाशानेंच प्रकाशत असतें. याच अवस्थेचें "तदेव अर्थमात्रनिर्भासं स्वरूपशून्यमिव समाधिः" या सूत्रानें पतंजलींनीं वर्णन केलेलें आहे. अशा रीतीनें ध्येयाशीं मनाचें पूर्णपणें तादात्म्य प्राप्त होणें यालाच निर्विकल्प समाधि असें म्हणतात. ही निर्विकल्प समाधि फलरूप असल्यामुळें ती 'अंगी' अर्थात् मुख्य होय. या निर्विकल्पसमाधीच्याच पूर्वावस्थेला सविकल्प समाधि असें म्हणतात. सविकल्प समाधि ही अष्टांग योगांतील आठवें अंग होय. तात्पर्य, योगाभ्यासबलानें सुषुम्ना नाडीचें मुख खुलें होऊन प्राणवायूसह मन सुषुम्ना नाडींत प्रविष्ट होतें. तेथें त्याला नादतत्त्वाचा साक्षात्कार होतो. या नादतत्त्वालाच अनाहतनाद असें म्हणतात. या नादाचें अनुसंधान करीत मन प्राणवायूसह सहस्रदलकमलांतर्गत महाकाशांत विलीन होतें. या महाकाशालाच प्रकृतस्थली "विष्णुपद" असें म्हटलेलें आहे. "वियद् विष्णुपदं वाऽपि" असा पर्याय देऊन अमरकोशकारानेंहि विष्णुपद हा शब्द आकाशाचा वाचक असल्याचें सांगितलें आहे. विष्णु म्हणजे व्यापनशील परब्रह्मतत्त्व. मूर्धस्थानीं असलेल्या सहस्रदलकमलांतील आकाशांत योगी लोकांना त्याचा साक्षात्कार होत असल्यामुळें त्या स्थानाला विष्णुपद हें अन्वर्थ नांव आहे. हा सर्व लाभ नादानुसंधानानेंच सहज सुलभरीतीनें घडून येत असल्यामुळें आचार्यांनी या श्लोकाच्या उत्तरार्धांत "भवत्प्रसादात् पवनेन साकं-

विलीयते विष्णुपदे मनो मे " अशा शब्दांनीं नादानुसंधानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केलेली आहे.

जालन्धरोड्याणन-मूलबन्धा-
ञ्जल्पन्ति कण्ठोदर-पायु-मूलान् ।
बन्ध-त्रयेऽस्मिन्परिचीयमाने
बन्धः कुतो दारुण-काल-पाशात् ॥ ५ ॥

" जालन्धरोड्याणमूलबन्धान् कण्ठोदरपायुमूलान् जल्पन्ति; अस्मिन बन्ध-त्रये परिचीयमाने सति दारुणकालपाशात् बन्धः कुतः ? " जालंधरबंध, ओड्याणबंध आणि मूलबंध असे हे तीन बंध क्रमशः कंठ, उदर आणि गुदस्थान यांच्या मुळांशीं त्यांच्या आधारानेंच होत असतात असें योगी लोक एकमुखानें प्रतिपादन करीत आहेत. त्यांत मतभेद नाहीं. या तीन बंधांचा अभ्यास करीत असतांना कालपाश हा कितीहि भयंकर असला तरी योग्याला त्या कालपाशाचें बंधन कोठून असणार ? अर्थात् या तीन बंधांचा अभ्यास करणारा योगी भयंकर अशा कालपाशांतूनहि मुक्त होतो. असा या श्लोकाचा अन्वय आणि अन्वयानुसारी सरळ अर्थ आहे.

मागील श्लोकांत नादानुसंधान हें ब्रह्मपदाच्या प्राप्तीचें सुलभ आणि सर्वोत्कृष्ट साधन असल्याचें सांगितलें. त्याच्याहि मागच्या श्लोकांत प्राणायामाच्या अभ्यासानें नाडीशुद्धि झाल्यानंतर आपल्या देहामध्यें अनाहतनाद अभिव्यक्त होऊं शकतो असें सांगितलें. या अनाहतनादाच्या, विशेषतः सूक्ष्म अशा अनाहत ध्वनींच्या अभिव्यक्तीचें स्थान सुषुम्ना नाडी आहे. ती स्वभावतःच 'सु सु' असा ध्वनि करीतच असते म्हणूनच तिला सुषुम्ना असें नांव पडलें आहे. "सु सु इति अव्यक्तशब्दं म्नायति इति सुषुम्ना " अशी सुषुम्ना या शब्दाची व्युत्पत्ति आहे. या सुषुम्ना नाडींतच सूक्ष्म नादाचा साक्षात्कार होत असतो. तो साक्षात्कार होण्यासाठीं प्रथम कुंडलिनीच्या मुखानें आच्छादित असलेलें सुषुम्ना नाडीचें द्वार मोकळें होणें आवश्यक आहे. तें मोकळें झाल्याशिवाय प्राणवायु सुषुम्नाडींत प्रवेश करूं शकणार नाहीं. प्राणाचा प्रवेश झाल्याशिवाय मनाचा तेथें प्रवेश होणार नाहीं. प्राणाचा आणि मनाचा प्रवेश झाल्याशिवाय अनाहतनादाचें श्रवणहि होणार नाहीं. अनाहतनादाचें श्रवणच जर झालें नाहीं, तर मग त्या

नादाचें अनुसंधान कसें करतां येईल ? हा सर्व विचार लक्षांत घेऊन आचार्य या श्लोकांत सुषुम्ना नाडीचें द्वार मोकळें करण्याकरितां अत्यंत उपयुक्त असलेल्या योग-प्रक्रियेंतील तीन बंधांचा उल्लेख करून त्यांच्या स्वरूपाचाहि निर्देश करीत आहेत.

" जालन्धरोड्याणनमूलबन्धाः कल्पन्ति कण्ठोदरपायुमूलान् " जालंधरबंध, उड्डियानबंध आणि मूलबंध हे तिन्ही बंध शरीरामध्यें प्राणवायूचें बंधन करतात, प्राणवायूला आवरून धरतात म्हणून यांना बंध असें नांव दिलेलें आहे. " बध्नाति प्राणवायुं इति बन्धः " अशी बंध शब्दाची व्युत्पत्ति आहे.

(१) जालंधरबंध :– कंठाचा संकोच करून हनुवटीला छातीच्या वरच्या बाजूस कंठाजवळ असलेल्या आडव्या दोन्ही हाडांच्या – जत्रूंच्या मध्यभागीं दाबून धरावें म्हणजे जालंधरबंध होतो. हा सिद्धासन, स्वस्तिकासन अथवा पद्मासन घालून करावा. या बंधानें कंठस्थानीं असलेलें शिरांचें जाळें बांधलें जातें, म्हणूनच या बंधाला जालंधरबंध असें म्हणतात. जालंधर या नांवांत आणखी एक सूक्ष्म विचार असा आहे कीं, आपल्या मूर्धस्थानीं असलेल्या पूर्णचंद्रांतून अमृत स्रवत असतें. तें अमृत देहाच्या मध्यभागीं आलें कीं जाठराग्नीच्या उष्म्यानें शुष्क होऊन जातें. याच कारणानें देह लवकर जीर्ण होतो. जालंधरबंधाच्या अभ्यासानें तें अमृत सरळ पचनमार्गांत न उतरतां सर्व शरीरभर पसरतें व त्यामुळें योग्याचा देह लवकर जीर्ण होत नाहीं. संस्कृत भाषेमध्यें जलाचा पर्यायवाचक शब्द अमृत आहे. " जलानां समूहो जालं " जाल म्हणजे अमृताचा समूह. या समूहाला हा बंध आवरून धरतो म्हणूनच याला जालंधर असें म्हणतात. " जालं धरतीति जालन्धरः " अशी जालंधर शब्दाची व्युत्पत्ति आहे. जालंधरबंधानें कपालकुहरातून स्रवणारें अमृत जठराग्नी-कडे न जातां सर्व शरीराला त्याचा लाभ होतो आणि त्यामुळें शरीराला जरा-वस्था लौकर प्राप्त होत नाहीं. याच अभिप्रायानें " बन्धो जालन्धराख्योऽयं जरामृत्युविनाशकः " असें म्हटलेलें आहे. हा जालन्धरबंध "कण्ठदुःखौघनाशनः" कंठस्थानांतील सर्व रोगांचा नाश करणारा आहे. यानें गलगंड, गंडमाला इत्यादि विकार होणार नाहींत, यानें क्षयाचाहि प्रतिबंध होईल. असा हा जालंधरबंध उपकारक आहे.

(२) उड्डियानबंध :– वर सांगितलेल्या तिन्ही आसनांपैकीं कोणतेंहि एक आसन घालून उड्डियानबंधाचा अभ्यास करावा. हा बंध उदरस्थानीं करावयाचा

असतो. नाभिस्थानच्या खालचा भाग आणि वरचा भाग अशा या दोन्ही भागांचा संकोच करून पोटाला पृष्ठवंशाकडे खेंचून घ्यावें. पाठीला पोक येऊं न देतां सर्व शरीर ताठ ठेवावें. यालाच उड्डियानबंध असें म्हणतात. या बंधानें प्राणवायु हा सुषुम्ना नाडीमध्यें वर उड्डाण करतो म्हणूनच याला ओड्याण अथवा उड्डियानबंध असें म्हणतात. या उड्डियानबंधाचा अभ्यास आरोग्याच्या दृष्टीनेंहि फार महत्वाचा आहे. याला "मृत्युमातंगकेसरी" असें म्हटलेलें आहे. मृत्युरूपी उन्मत्त हत्तीचा नाश करणारा हा प्रत्यक्ष सिंहच आहे. या बंधानें पोट नेहमीं साफ राहतें. पोट साफ रहाण्यावरच बरेंचसें आरोग्य अवलंबून असतें. ज्याचें पोट साफ त्याचें आरोग्य उत्तम. पोट बिघडलें कीं आरोग्यहि बिघडलेंच म्हणून समजावें. उड्डियान-बंधाच्या अभ्यासानें नाभिस्थानचा समान वायूहि कधीं बिघडत नाहीं. अन्नरसाच्या व मलमूत्र आणि स्वेद इत्यादिकांच्या विभजनाचें व प्रेरणेचें त्याचें प्राकृतिक कार्य सुव्यवस्थित चालू असतें. सर्व शरीरभर पसरलेल्या लहानमोठ्या सर्व शिरांतून रसरक्तादि धातूंचें अभिसरण हें व्यानवायूमुळें होत असतें. ज्याच्या समानवायूचें आणि व्यानवायूचें कार्य उत्तम चालतें त्याच्या देहाचें पोषणहि उत्तम होत असतें. उड्डियानबंधाच्या अभ्यासानें जठराग्निहि चांगला प्रदीप्त होतो. भूक उत्तम लागते, शक्ति वाढते व आयुष्यहि वाढतें. याच्या अभ्यासानें "वृद्धोऽपि तरुणायते" वृद्धहि तरुण होतो असें याचें वर्णन केलेलें आहे. उड्डियानबंधानें प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान या पांचहि वायूंचीं प्राकृतिक कार्यें सुव्यवस्थित होत अस-ल्यामुळें शरीराचें सर्वांगीण आरोग्य सुरक्षित रहातें. याच अभिप्रायानें "सर्वेषामेव बन्धानामुत्तमो ह्युड्डियानकः" असें योगशास्त्रांत या बंधाचें वर्णन केलेलें आहे. पूरक प्राणायामाच्या शेवटीं व कुंभक प्राणायामाच्या आरंभीं जालंधरबंध केल्यास ही क्रिया सोपी जाते. तसेंच कुंभक प्राणायामाच्या अंतीं व रेचक प्राणायामाच्या आरंभीं उड्डियानबंध केल्यास हीहि क्रिया सोपी जाते. ही गोष्ट या दोन्ही बंधांचा अभ्यास करतांना अवश्य लक्षांत ठेवावी.

"पूरकान्ते तु कर्तव्यो बन्धो जालन्धराभिधः ।
कुम्भकान्ते रेचकादौ कर्तव्यस्त्वुड्डियानकः ॥"

— हठयोगप्रदीपिका

मूलबंध :— सिद्धासनांत सांगितल्याप्रमाणें डाव्या पायाची टाच सीवनीच्या मध्यमागीं दाबून बसावी. गुदद्वाराचें अधिकांत अधिक आकुंचन करून अपान-

वायूला वर खेंचावें. शरीर ताठ ठेवावें. दृष्टि नासाग्रीं असावी. हेंच मूलबंधाचें स्वरूप होय. सिद्धासनांतच गुदद्वाराचा संकोच आणि अपान वायूचें ऊर्ध्वाकर्षण या दोन क्रिया अधिक केल्या कीं मूलबंधाचें स्वरूप सिद्ध होतें. कांहीं योगी लोक डाव्या पायाची टाच गुदद्वाराशीं लावूनहि हा मूलबंध करीत असतात. अनाहत-ध्वनि अभिव्यक्त होण्याला मूलबंधाचा चांगलाच उपयोग होत असतो. मूलबंधानें अपान वायु हा उर्ध्वगामी होत असतो. जालंधरबंधाच्या पूर्वक्षणीं केल्या जाणाऱ्या पूरकानें व जालंधरबंधाच्या वेळीं होणाऱ्या कुंभकानें प्राणवायु हा अधोगामी होतो. अपान आणि प्राण यांचा नाभिस्थानाच्या अधोभागीं संगम होतो. त्यांच्या समागमानें स्वाधिष्ठानचक्रांतील आणि मणिपूरचक्रांतील अग्नि प्रदीप्त होतो. प्रदीप्त झालेल्या त्या अग्निज्वाळेंत अंतर्ध्यानानें कित्येकांना आत्मज्योतीचा साक्षात्कारहि होत असतो.

प्राण आणि अपान यांच्या संयोगानें प्रदीप्त झालेल्या अग्नीच्या तापानें स्वाधिष्ठानचक्राच्या ठिकाणीं असलेली कुंडलिनी जागृत होते. तिच्या जागृतीनें सुषुम्नानाडीचें मुख मोकळें झाल्याबरोबर कुंडलिनीसह प्राणवायूचा सुषुम्नानाडींत प्रवेश होतो. अशा रीतीनें प्राणवायूचा बाह्य मार्ग हळूहळू सुटत जातो व सुषुम्ना-मार्गानें ऊर्ध्वगामी होतो. प्राण हा नादस्वरूप आणि अपान हा बिंदुस्वरूप असल्या-मुळें मूलबंधानें त्या दोहोंचें एकीकरण झाल्यानंतर सुषुम्नानाडीमध्यें प्राण हा अनाहतध्वनीच्या रूपानें व अपान हा अनुस्वाराच्या रूपानें प्रतीतीस येतो. अशा रीतीनें सुषुम्ना नाडींत पूर्णपणें अभिव्यक्त झालेल्या नादाशीं प्राणाबरोबर प्रविष्ट झालेलें मनहि संलग्न होऊन जातें. शेवटीं नादाशीं संलग्न झालेलें मन नादाबरोबरच मूर्धस्थानीं असलेल्या विष्णुपदीं लीन होऊन जातें. हीच साधकाची समाधिअवस्था होय. अशा रीतीनें साधक हा समाधिअवस्थेंत पोहोंचल्यावर मग त्याला कालपाश हा कितीहि दारुण असला तरी त्याचें भय कोठून असणार ? जोंपर्यंत मन ब्रह्मपदीं लीन होत नाहीं तोंपर्यंतच मृत्यूचें भय असूं शकतें. मन ब्रह्मपदीं लीन झाल्यानंतर तो साधक काळाचाहि काळ बनतो, मग त्याला मृत्युपाशाचें भय कसें असणार ? तो सर्वबंधविनिर्मुक्त होतो. याच अभिप्रायानें आचार्यांनीं या श्लोकाच्या उत्तरार्धांत " बन्धत्रयेऽस्मिन्परिचीयमाने बन्धः कुतो दारुणकालपाशात् " अशा शब्दांनीं या तिन्ही बंधांची फलश्रुति वर्णन केलेली आहे. असा हा जालंधरबंध, उड्डियाणबंध आणि मूलबंध या तिन्ही बंधांचा महिमा आहे.

ओड्डयाण-जालन्धर-मूलबन्धै-
र्ब्रह्मद्विषाप्युरगाङ्गनायाम् ।
प्रत्यङ्मुखत्वात्प्रविशन्सुषुम्नां
गमागमौ मुञ्चति गन्धवाहः ॥ ६ ॥

उड्डियानबंध, जालंधरबंध आणि मूलबंध या तिन्ही बंधांच्या अभ्यासानें "उरगांगना" म्हणजे स्वाधिष्ठानचक्राच्या कर्णिकेवर खालीं मुख करून प्रसुप्त असलेली सर्पाकार कुंडलिनी ही जागी झाली असतां प्राणवायु हा अंतर्मुख होऊन सुषुम्नानाडींत प्रवेश करूं लागतो. तो त्या ठिकाणीं प्रवेश करीत असतांना इडा आणि पिंगला यांच्या द्वारां शरीराच्या बाहेर जाणें आणि बाहेरून शरीरांत प्रवेश करणें या दोन्ही क्रिया तो सोडून देतो. असा या श्लोकाचा सरळ अन्वयानुसारी अर्थ आहे.

मागील श्लोकांत जालंधर, उड्डियान आणि मूल या तिन्ही बंधांचा अभ्यास कसा करावा हें सांगितलें. त्याचप्रमाणें या तिन्ही बंधांच्या अभ्यासानें साधक हा दारुण कालपाशाच्या बंधनांतून मुक्त होतो हेंहि सांगितलें; पण या बंधत्रयाच्या अभ्यासानें साधकाची सर्व दुःखांतून अथवा दारुण कालपाशांतून सुटका कशी होणार ? हा प्रश्न रहातोच. प्रस्तुत श्लोकांत आचार्य याच प्रश्नाचें उत्तर देत अहेत. या तिन्ही बंधांची रचना, त्यांचे शरीरावर होणारे परिणाम आणि फलश्रुति हें आपण मागील श्लोकांत पाहिलेंच आहे. आतां या बंधांचा आणि दारुण कालपाशांतून होणाऱ्या सुटकेचा कार्यकारणभाव कसा हें आपण आचार्यांच्या शब्दांतून पाहूं. जालंधर या शब्दाची व्युत्पत्ति मागील श्लोकांत आम्हीं सांगितलीच आहे. कांहीं लोक जालंधर या शब्दाऐवजीं जालंदर असा शब्द योजतात, तोहि योग्यच आहे. जाल शब्दाचा दुःखजाल, अज्ञानजाल, दुर्वासनाजाल किंवा संसारजाल, असा अर्थ होतो. माशांना ज्याप्रमाणें जाळें अडवितें, दुःख देतें व शेवटीं तें त्यांचा घातहि करतें त्याचप्रमाणें अज्ञान, दुर्वासना आणि संसार यांचीं जाळीं ही जीवांना जन्मभर ताप देतात व शेवटीं घातहि करतात. अशा या जालांचें जालंधरबंध विदारण करतो म्हणून त्याला जालंदर असें नांव देणें योग्यच आहे. दृ विदारण करणें या धातूपासून हा शब्द बनला आहे. "जालं दारयति अथवा दृणाति इति जालंदरः" अशी जालंदर या शब्दाची व्युत्पत्ति आहे.

या तिन्ही बंधांच्या अभ्यासानें शरीरांतील कुंडलिनी जागृत होते. येथें ही एक मोठ्ठ लक्षांत ठेवावी कीं, आसनें आणि प्राणायाम यांचा अभ्यास ज्याप्रमाणें यमनियमांच्या भूमिकेवरून करावयाचा असतो त्याचप्रमाणें या तिन्ही बंधांच्या अभ्यासालाहि यमनियमांची भूमिका ही दृढ असावयास पाहिजेच. नाहीं तर या बंधांच्या अभ्यासाला केवळ बाह्य व्यायामाचें स्वरूप राहून त्याचा आरोग्यादि फळें मिळतील, पण कुंडलिनीची जागृति होऊन तिचा सुषुम्ना नाडींत प्रवेश होणें, मनाचा बाह्यानुसंधानानें ब्रह्मस्वरूपांत लय होणें, ब्रह्मस्वरूपाचा साक्षात्कार होणें या गोष्टी घडून येणार नाहींत. आणि या गोष्टी घडून आल्याशिवाय जीवाची अज्ञानातून, दुर्वासनांच्या जालांतून आणि संसारबंधनांतून सुटकाहि होणार नाहीं.

यमनियमांच्या दृढ भूमिकेवरून आसनें आणि प्राणायाम यांच्या अभ्यासानें सर्व नाड्यांची शुद्धि झाल्यानंतर बंधत्रयांचा अभ्यास करावा म्हणजे कुंडलिनी जागृत होते, असें योगशास्त्र व योगी लोक सांगतात. तें आपण अनुभवून पहावयाचें आहे. याकरितां कुंडलिनी म्हणजे काय याचा आपण अगोदर विचार करूं.

कुंडलिनी हें एक आपल्या शरीरांतील मोठें गूढ तत्त्व आहे. अनेक ऋषि, मुनि, तत्त्ववेत्ते, साधु, संत, महात्मे व ग्रंथकार यांनीं कुंडलिनीचें अनेक प्रकारें वर्णन केलेलें आहे. त्या सर्व वर्णनांत पूर्णपणें एकवाक्यता दिसून येत नाहीं. ज्यांना ज्यांना या तत्त्वाचा जसा अनुभव आला तसें त्यांनीं वर्णन करून ठेवलेलें आहे. त्यांच्या वर्णनांचीं स्वरूपें भिन्न भिन्न असलीं तरी कुंडलिनी ही एक आपल्या शरीरांतील अनिर्वचनीय शक्ति आहे याविषयीं कोणाचाच मतभेद नाहीं. "शक्तिः कुण्डलिनी नाम बिसतन्तुनिभा शुभा" कुंडलिनी ही एक शक्ति असून ती कमळांतील तंतूप्रमाणें अत्यंत सूक्ष्म व नाजूक आहे असें योगकुंडल्युपनिषदांत तिचें वर्णन केलेलें आहे. "मूलाधारगता शक्तिः स्वाधारे बिन्दुरूपिणी। तस्यामुत्पद्यते नादः सूक्ष्मबीजाद्विवाङ्कुरः॥" मूलाधारचक्रांत रहाणारी कुंडलिनी ही एक शक्ति असून ती जीवतत्त्वाचा आधार आहे. सूक्ष्म वटबीजांतून जसा अंकुर निर्माण व्हावा त्याचप्रमाणें या शक्तीतूनच नाद उत्पन्न होत असतो असें योगशिखोपनिषदांत हिचें वर्णन केलेलें आहे. "पराशक्तिः कुण्डलिनी बिसतन्तुतनीयसी" असें लक्ष्मीसहस्रनामांत कुंडलिनीचें वर्णन केलेलें आहे. "कन्दोर्ध्वे कुण्डली शक्तिः सुप्ता मोक्षाय योगिनाम्" चतुर्दल मूलाधारकंदाच्या ऊर्ध्वभागीं कुंडलिनी नांवाची शक्ति असून ती मोहमयी होऊन झोपलेली असते. योगी लोक योगा-

या तिन्ही बंधांच्या अभ्यासानें शरीरांतील कुंडलिनी जागृत होते. येथें ही एक गोष्ट लक्षांत ध्यावी कीं, आसनें आणि प्राणायाम यांचा अभ्यास ज्याप्रमाणें यमनियमांच्या भूमिकेवरून करावयाचा असतो त्याचप्रमाणें या तिन्ही बंधांच्या अभ्यासालाहि यमनियमांची भूमिका ही दृढ असावयास पाहिजेच. नाहीं तर या बंधांच्या अभ्यासाला केवळ बाह्य व्यायामाचें स्वरूप राहून त्यांचीं आरोग्यादि फळें मिळतील, पण कुंडलिनीची जागृति होऊन तिचा सुषुम्ना नाडींत प्रवेश होणें, मनाचा नादानुसंधानानें ब्रह्मस्वरूपांत लय होणें, ब्रह्मस्वरूपाचा साक्षात्कार होणें या गोष्टी घडून येणार नाहींत. आणि या गोष्टी घडून आल्याशिवाय जीवाची अज्ञानातून, दुर्वासनांच्या जालांतून आणि संसारबंधनांतून सुटकाहि होणार नाहीं.

यमनियमांच्या दृढ भूमिकेवरून आसनें आणि प्राणायाम यांच्या अभ्यासानें सर्व नाड्यांची शुद्धि झाल्यानंतर बंधत्रयांचा अभ्यास करावा म्हणजे कुंडलिनी जागृत होते, असें योगशास्त्र व योगी लोक सांगतात. तें आपण अनुभवून पहावयाचें आहे. याकरितां कुंडलिनी म्हणजे काय याचा आपण अगोदर विचार करूं.

कुंडलिनी हें एक आपल्या शरीरांतील मोठें गूढ तत्त्व आहे. अनेक ऋषि, मुनि, तत्त्ववेत्ते, साधु, संत, महात्मे व ग्रंथकार यांनीं कुंडलिनीचें अनेक प्रकारें वर्णन केलेलें आहे. त्या सर्व वर्णनांत पूर्णपणें एकवाक्यता दिसून येत नाहीं. ज्यांना ज्यांना या तत्त्वाचा जसा अनुभव आला तसें त्यांनीं वर्णन करून ठेवलेलें आहे. त्यांच्या वर्णनाचीं स्वरूपें भिन्न भिन्न असलीं तरी कुंडलिनी ही एक आपल्या शरीरांतील अनिर्वचनीय शक्ति आहे याविषयीं कोणाचाच मतभेद नाहीं. "शक्तिः कुण्डलिनी नाम बिसतन्तुनिभा शुभा" कुंडलिनी ही एक शक्ति असून ती कमळांतील तंतूप्रमाणें अत्यंत सूक्ष्म व नाजूक आहे असें योगकुंडल्युपनिषदांत तिचें वर्णन केलेलें आहे. "मूलाधारगता शक्तिः स्वाधारा बिन्दुरूपिणी। तस्यामुत्पद्यते नादः सूक्ष्मबीजादिवाङ्कुरः॥" मूलाधारचक्रांत राहणारी कुंडलिनी ही एक शक्ति असून ती जीवतत्त्वाचा आधार आहे. सूक्ष्म वटबीजांतून जसा अंकुर निर्माण व्हावा त्याचप्रमाणें या शक्तीतूनच नाद उत्पन्न होत असतो असें योगशिखोपनिषदांत हिचें वर्णन केलेलें आहे. "पराशक्तिः कुण्डलिनी बिसतन्तुतनीयसी" असें ललितासहस्रनामांत कुंडलिनीचें वर्णन केलेलें आहे. "कन्दोर्ध्वे कुण्डली शक्तिः सुप्ता मोक्षाय योगिनाम्" चतुर्दल मूलाधारकंदाच्या ऊर्ध्वभागीं कुंडलिनी नांवाची शक्ति असून ती मोहमयी झोंपलेली असते. योगी लोक योगा-



(सौंदर्यलहरी श्लोक ९ पहा)

भ्यासानें तिला जागृत करतात तेव्हां ती त्यांना मोक्षसुख देते. याप्रमाणें हठयोग-प्रदीपिकेंत तिचें वर्णन केलेलें आहे. "मूलाधारे आत्मशक्तिः कुण्डली परदेवता" कुंडलिनी ही मूलाधारचक्रांत रहात असून ती एक आत्मशक्तिस्वरूप श्रेष्ठ देवता आहे असें घेरंडसंहिताकार म्हणतात. तात्पर्य, कुंडलिनी ही एक आपल्या शरीरांतील अद्भुत व अलौकिक अशी दिव्य शक्ति आहे यांत संशय नाहीं.

थोड्याशा दूर अंतरावर एखाद्या ठिकाणीं अखंड धुमरेखा जमिनीपासून आकाशांत वर जात असलेली पाहून आपण त्या ठिकाणी अग्नि आहे असा तर्क करतों. नंतर तेथें जाऊन पाहिल्यावर त्या ठिकाणीं अग्नि असल्याचें आपल्या दृष्टोत्पत्तीसहि येतें. धूम हा अग्नीचें कार्य आहे. अग्नीवाचून धूम निर्माण होत नाहीं हें आपणांस माहीत असतें. म्हणूनच धूमावरून अग्नीविषयी केलेला तर्क खरा ठरतो व त्याप्रमाणें आपल्याला अग्नि उपलब्धहि होतो. याच न्यायानें आपल्या शरीरांत कुंडलिनीच्या जागृतीचीं कांहीं कार्यें उपलब्ध होतात. त्याच कार्यावरून आपण कुंडलिनीचा शोध केल्यास कुंडलिनी-शक्तीचाहि आपल्याला साक्षात्कार होऊं शकेल.

मार्ग चालतां चालतां तहान लागल्यानंतर आपण एखाद्या वांटसरूला पाणी कोठें भेटेल, असा प्रश्न करतों. तो आपल्याला एखादी दिशा दाखवून या दिशेनें जा. दोन-तीन फर्लांगांच्या अंतरावर डाव्या अथवा उजव्या हाताला नजर टाका. तुम्हांला विहीर दिसेल असें तो सांगतो. त्याच्या शब्दांवर विश्वास ठेऊन आपण त्याप्रमाणें प्रयत्न करतों. आपल्याला विहीर सांपडते. पाणी भेटतें. आपण तहान भागवतों. याच न्यायानें शास्त्र, साधु-संत व महात्मे यांच्या वचनांवर विश्वास ठेवून त्याप्रमाणें प्रयत्न केल्यास आपल्यालाहि कुंडलिनी-तत्त्वाचा साक्षात्कार होईल हें निश्चित समजावें.

कुंडलिनी जागृत झाली कीं, इंद्रियें हीं अधिकच अंतर्मुख होतात. मन आत्मप्रवण होतें. सुषुम्ना नाडीचें द्वार मोकळें होतें. प्राणवायु सुषुम्ना नाडींत प्रवेश करतो. प्राणाबरोबर मनहि सुषुम्ना नाडींत प्रविष्ट होतें. अंतरीं अनाहत-नाद उमटूं लागतो. अद्भुत आणि दिव्य ज्योतीचें दर्शन घडतें. अनेक प्रकारच्या अनिर्वचनीय सिद्धि फलरूप होतात. देहकांति दिव्य होते. शरीराभोंवतीं सुगंध दरवळतो. सभोवारचें वातावरण शांत होतें.

कुंडलिनीसह प्राणवायु षट्चक्रांचा भेद करीत विष्णुपदी लीन होण्याला उन्मुक्त झालेला असतो. श्वासोच्छ्वासाच्या रूपानें नाकावाटें होणाऱ्या प्राणवायूच्या स्थूल क्रिया मंदावतात. प्राणावरोबर नाद व नादावरोबर मन हेंहि आत्मस्वरूपीं लीन होत असतें. जिकडे तिकडे आनंदाचाच आविर्भाव होत असतो. अशी ही कुंडलिनीच्या जागृतीचीं कार्यें अनेक रूपांनीं दिसूं लागतात. या सर्व कार्यांचें मूळ मूलाधाराच्या ठिकाणीं असलेली कुंडलिनी-शक्ति हेंच होय. सर्व द्वैताभास मावळवून पिंडब्रह्मांडीं आनंदाला ओसंडविणारी ही कुंडलिनी-शक्ति म्हणजे प्रत्यक्ष जगदंबाच होय. तिचा महिमा श्रीज्ञानेश्वर महाराजांच्याच शब्दांत पहा—

"ते कुंडलिनी जगदंबा। जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा।
जिया विश्वबीजाचिया कोंभा। साउली केली॥"

छायाकारांच्या मापेंत कुंडलिनीचें स्वरूप पहा —

जी शून्य ब्रह्माची मूर्ति साकार। परमात्म शिवाचा आधार।
ॐकाराची साचार। जन्मभूमि॥"

— गी. अ. ६ श्लोक १४

कशी आहे ती कुंडलिनी ? हें श्रीज्ञानेश्वर महाराजांच्याच शब्दांत पहा —

नागिणीचें पिलें। कुंकुमें नाहलें।
वळण घेऊनि आलें। सेजे जैसें॥
तैसी ते कुंडलिनी। मोटकी औट वळणी।
अधोमुख सर्पिणी। निदैली असे॥
विद्युल्लतेची विडी। वन्हिज्वाळांची घडी।
पंधरेयाची चोरवडी। घोंटीव जैशी॥
तैसी सुबंध आटली। पुटीं होती दाटली।
ते वज्रासनें चिमुटली। सावधु होय॥

— गीता, अ. ६ श्लोक १४

कुंडलिनी ही नुकत्याच जन्मलेल्या नागिणीच्या पिलाप्रमाणें अत्यंत कोमल — सुकुमार असते. जणुं कांहीं तें नागिणीचें पिलूं केशर-कुंकवानें न्हाऊन निघालेलें आहे. शिवपिंडाकृति मूलाधारकंदाला तिनें साडेतीन वेटोळीं घातलेलीं असून तिनें आपलें पुच्छ मुखामध्यें धरलेलें आहे. मूलाधारचक्राच्या कर्णिकेंत मध्य-

भागी असलेल्या सूक्ष्म सुषुम्ना नाडीचें द्वार तिनें आपल्या फणेनें अवरुद्ध करून टाकलेलें असून ती त्या ठिकाणीं सुप्तावस्थेंत आहे. वर्तुलाकार विद्युल्लतेचे वेढे (वळें) जसे असावे तसाच तिचा आकार दिसतो. अथवा संकलित केलेल्या वह्निज्वाळांची ती वडीच असावी असें वाटतें. तावूनसुलाखून शुद्ध-स्वच्छ केलेल्या शंभर नंबरी सोन्याची घासली-पुसलेली तार जशी लकाकत असावी तशीच ती दिसते. " तडिल्लेखासमरुचिः ", " विद्युल्लेखेव भास्वरा ", " तडिल्लेखातन्वी तपन-शशि-वैश्वानरमयी " उदयाला येणाऱ्या सूर्यमंडलाप्रमाणें, चंद्रबिंबाप्रमाणें अथवा अग्निज्वालेप्रमाणें ती अत्यंत देदीप्यमान दिसते. असें तिचें संस्कृत-भाषेंतहि वर्णन केलेलें दिसतें.

कुंडलिनीच्या साडेतीन वेटोळ्यावद्दल कांहीं लोक प्रणवांतील अकार, उकार, मकार आणि अर्धमात्र यांची कल्पना करतात, तर कांहीं लोक जागृति, स्वप्न, सुषुप्ति आणि तुरीया या तीन अवस्थांची कल्पना करतात. तें कांहीं असो; कुंडलिनीचीं वलयें साडेतीन आहेत ही गोष्ट खरी. कुंडल शब्दाचा अर्थ वेटोळें असा आहे. मूलाधाराच्या ठिकाणीं ती साडेतीन वेटोळीं घालून बसलेली असल्यामुळें तिला कुंडलिनी असें म्हटलेलें आहे. कुंडली शब्दाचा अर्थ सर्प असा आहे. ती सर्पाप्रमाणें वेटाळीं घालून बसलेली असते म्हणूनहि तिला कुंडलिनी असें म्हणतात.

कुंडलिनी जागृत करण्याकरितां आचार्यांनीं योगतारावलींत जीं साधनें सांगितलीं आहेत तींच श्रीज्ञानेश्वर महाराजांनींहि गीतेच्या सहाव्या अध्यायांत सांगितलेलीं आहेत, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. तीं साधनें म्हणजे मूलबंध, जालंधरबंध आणि उड्डियानबंध हींच होत. या तीन बंधांच्या अभ्यासानें कुंडलिनी जागृत होते ही गोष्ट निश्चित. याच अभिप्रायानें आचार्यांनीं या श्लोकाचा पूर्वार्ध लिहिलेला आहे. उरगांगना म्हणजे नागीण. सर्पांना पाय नसतात. छातीनेंच ते सरकत असल्यामुळें त्यांना उरग असें म्हणतात. त्यांची स्त्री म्हणून नागिणींना उरगांगना म्हटलें जातें. अंगना शब्द योजण्यांत आणखी एक अभिप्राय असा आहे कीं, अंगना शब्दाचा अर्थ कोमलांगी अथवा शुभांगी असा आहे. " कल्याणानि शोभनानि सन्ति अङ्गानि अस्याः इति अङ्गना " जिचे अवयव कोमल – नाजूक असतात तिलाच अंगना असें म्हणतात. कुंडलिनीचा कोमलपणा हा वर आपण पाहिलाच आहे. अशी उरगांगना म्हणजे कुंडलिनी

या श्लोकाच्या पहिल्या चरणांत सांगितलेल्या बंधत्रयांच्या अभ्यासानें जागृत झाल्यानंतर काय परिणाम होतात हेंहि आपण वर पाहिलेलेंच आहे.

" प्रत्यङ्मुखत्वात्प्रविशन् सुषुम्नां गमागमौ मुञ्चति गन्धवाहः " साधकाच्या देहांतील प्राणवायु हा कुंडलिनीच्या जागृतीनें " प्रत्यङ्मुख म्हणजे अंतर्मुख होतो. श्वासोच्छ्वासांच्या रूपानें चालू असलेल्या त्याच्या स्थूल क्रिया मंदावतात. शरीराबाहेर बारा अंगुलांनीं प्रतीतीस येणारा श्वास हळूहळू कमी होऊं लागतो. श्वास आणि प्रश्वास यांची गति इतकी मंदावते कीं, गीतेच्या भाषेंत "नासाभ्यन्तरचारिणौ" या विशेषणाला ते पात्र होतात. श्वास आणि प्रश्वास यांनाच उद्देशून गीतेंत "प्राणापानौ" असे शब्द योजलेले आहेत. प्राणाची क्रिया पूरकाच्या रूपानें शरीरांत प्रवेश करण्याची असते तर अपानाची क्रिया रेचकाच्या रूपानें शरीराच्या बाहेर पडण्याची असते. ही गोष्ट येथें विशेषरूपानें लक्षांत घ्यावी म्हणजे अपान हा शब्द गुदस्थानीं असलेल्या वायूला उद्देशून योजतात.

कुंडलिनीच्या जागृतीनें सुषुम्ना नाडीचें द्वार मोकळें झाल्यामुळें प्रत्यंगमुख झालेला – अंतर्मुख झालेला प्राणवायु हा सुषुम्ना नाडींत प्रवेश करतो. प्राणवायूनें सुषुम्ना नाडींत प्रवेश केला कीं त्याची बाहेरची गति ही अधिकच मंदावते व शेवटीं आचार्य म्हणतात त्याप्रमाणें " गमागमौ मुञ्चति गन्धवाहः " अशी प्राणवायूची अवस्था होते. गन्धवाह शब्दाचा अर्थ प्राणवायु असा आहे. कारण जीवांना त्यांनीं केलेल्या बऱ्यावाईट कर्मांचीं फळें देण्याकरितां कारणीभूत असलेल्या वासनांचें जाळें हा प्राणवायूच वहात असतो. " गन्धान् वहति इति गन्धवाहः " अशी गंधवाह शब्दाची व्युत्पत्ति आहे. गंध म्हणजे चित्ताच्या ठिकाणीं असलेलें वासनाजाल. त्याला धारण करण्याचें, वाहण्याचें कार्य प्राणवायु करीत असतो म्हणून त्याला गंधवाह असें म्हणतात.

प्राणवायु हा सर्व शरीरभर संचार करीत असला आणि शरीराच्या भरण पोषणाला अनुरूप अशा सर्व क्रिया त्याच्याकडूनच होत असल्या. तरी श्वासोच्छ्वासाच्या रूपानें शरीरांत प्रवेश करणें आणि शरीरांतून बाहेर पडणें या त्याच्या मुख्य क्रिया आहेत. श्वासोच्छ्वासाच्या क्रिया या इडा आणि पिंगला या दोन नाड्यांच्या द्वारा होत असतात. या दोन्ही नाड्या मूलाधारचक्रातूनच उत्पन्न झालेल्या आहेत. मूलाधारचक्राच्या डाव्या बाजूस इडा नाडी उगम पावते तर उजव्या बाजूस पिंगला ही नाडी उगम पावते. या दोन्ही नाड्या सरळ

भ्रूमध्यापर्यंत जाऊन पोहोंचलेल्या आहेत. यांतील इडा नाडी ही गंगास्वरूप आहे तर पिंगला ही यमुनास्वरूप आहे. इडानाडीला चंद्र आणि पिंगला नाडीला सूर्य असेंहि म्हटलेलें आहे. हे प्राणवायूचे दक्षिणमार्ग व वाममार्ग समजले जातात. या दोन्ही नाड्यांच्या मध्यभागीं मूलाधारचक्रांतच सुषुम्ना नाडीचा उगम झालेला आहे. ही नाडी अग्निस्वरूप आहे. हिला प्राणवायूचा मध्यममार्ग असें म्हणतात. हिच्याच द्वारां प्राणवायु हा ब्रह्मपदीं लीन होत असल्यामुळें हिला ब्रह्मनाडी अथवा ब्रह्ममार्ग असेंहि म्हणतात. प्राणवायु हा जसा जसा ब्रह्ममार्गानें ऊर्ध्वगामी होईल तशा तशा इडा आणि पिंगला या मार्गानें श्वासोच्छ्वासाच्या रूपानें होणाऱ्या त्याच्या क्रिया या अधिकच मंदावतात. शेवटीं प्राणवायु हा इडा आणि पिंगला यांची मर्यादा ओलांडून ऊर्ध्वगामी झाला, आज्ञाचक्राचा भेद करून तो वर निघाला कीं इडा आणि पिंगला यांची कार्यें तेथेंच थांबतात. अर्थात् नाकावाटें श्वासोच्छ्वासाच्या रूपानें शरीराच्या बाहेर जाण्यायेण्याचें प्राणवायूचें कार्य आपोआप सुटतें. याच अवस्थेला अनुलक्षून आचार्य म्हणतात, "गमागमौ सुश्रति गन्धवाहः" प्राणवायु हा श्वासोच्छ्वासाच्या क्रिया सोडून देतो. गमागम म्हणजे जाणें-येणें. प्राणवायु या दोन्ही क्रिया सोडून देतो व साधकाच्या मूर्धस्थानीं असलेल्या सहस्रदलकमलांतील अंतराकाशांत विष्णुपदीं तो मनासह लीन होतो हीच साधकाची सर्वानंदमय समाधिअवस्था होय.

उत्थापिताधार-हुताशनोल्कै-
राकुञ्चनैः शश्वदपान-वायोः ।
सन्तापिताच्चन्द्रमसः पतन्तीं
पीयूषधारां पिबतीह धन्यः ॥ ७ ॥

मागील श्लोकांत बंधत्रयाच्या अभ्यासानें कुंडलिनी जागृत होते. ती सुषुम्ना नाडींत प्रवेश करते. तिच्यावरोबरच प्राणवायु हाहि मनासह प्रवेश करतो. षट्चक्रांचा भेद करीत करीत सहस्रदलकमलांत ते सर्व एकरूप होऊन स्थिर होतात हेंहि सांगितलें. ही साधकाची समाधिअवस्था होय. या अवस्थेंत खाणें, पिणें, श्वासोच्छ्वास व रस-रक्तादि धातूंचें अभिसरण हीं कोणतींच कार्यें होत नसतात. अशा स्थितींत साधकाच्या देहाचें भरण-पोषण कसें होतें ! या प्रश्नाचें उत्तर देऊन आचार्य साधकाला धन्यवाद देत आहेत.

" अपानवायोः शश्वत् आकुञ्चनैः उत्थापिताधार-हुताशनोल्कैः संतापितात् चन्द्रमसः पतन्तीं पीयूषधारां यः पिबति सः इह धन्यः । " मूलबंधाचा अभ्यास करतांना अपानवायूच्या निरंतर आकुंचनांनीं अर्थात् गुदस्थानाचा संकोच करून अपानवायूला वर प्रवृत्त केल्यामुळें मूलाधारचक्रांत असलेला अग्नि देखील प्रज्वलित होतो. अग्नीला येथें हुताशन म्हटलेलें आहे. कारण तो अर्पण केलेल्या भक्ष्य, भोज्य, चोष्य आणि लेह्यरूपी चतुर्विध अन्नाचें संवन करीत असतो. तें अन्न आहुतिरूपच आहे. म्हणूनच तर नामस्मरणपूर्वक केल्या जाणाऱ्या भोजनक्रियेला उद्देशून " उदरभरण नोहे जाणिजें यज्ञकर्म " असें म्हटलेलें आहे. तात्पर्य, हा अग्नि अन्नरूपी हविर्द्रव्याचें पचन करीत असल्यामुळें याला हुताशन असें म्हटलेलें आहे. हुताशन म्हणजे अग्नि. शरीरांतील या अग्नीला वैश्वानर असें म्हणतात. या अग्नीच्या ज्वालांनीं मूर्धस्थानीं असलेलें चंद्रमंडल हें संतप्त होतें. संतप्त झालेल्या चंद्रमंडलांतून अमृताचा स्राव सुरू होतो. त्या अमृतानेंच समाधिकालांत योग्याच्या देहाचें पोषण होत असतें. अशा रीतीनें चंद्रमंडलांतून स्रवणाऱ्या अमृतधारेचें जो योगी प्राशन करतो, या अमृतधारेचें जो पान करतो तो खरोखरच इह-लोकीं धन्य होय.

ज्वाला, कीला इत्यादि शब्द क्वचित् अकारान्तहि असतात त्याचप्रमाणें उल्का शब्द देखील अकारान्त गृहीत धरून आम्हीं वर अन्वय दिलेला आहे. उल्का शब्द आकारान्तच आहे असा आग्रह असेल तर " उत्थापिताधारहुताशनोल्कैः " हें पद आकुञ्चनैः याचें विशेषण करून अन्वय लावावा. अर्थप्रक्रियेंत कांहीं फरक नाहीं.

बन्धत्रयाभ्यास-विपाकजातां
विवर्जितां रेचक-पूरकाभ्याम् ।
विशोषयन्तीं विषय-प्रवाहं
विद्यां भजे केवल-कुम्भरूपाम् ॥ ८ ॥

" बन्धत्रयाभ्यासविपाकजातां रेचक-पूरकाभ्यां विवर्जितां विषय-प्रवाहं विशोषयन्तीं केवलकुम्भरूपां विद्यां (अहं) भजे । " सहाव्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें जालंधरबंध उड्डियानबंध, आणि मूलबंध या तिन्ही बंधांचा अभ्यास करीत असतांना त्या अभ्यासाच्या परिपाकानें कुंडलिनीची जागृति होऊन

तिनें सुषुम्ना नाडींत प्रवेश केल्यानंतर तिच्या पाठोपाठ प्राण आणि मन हेहि सुषुम्ना नाडींत प्रविष्ट होतात, प्राणानें सुषुम्ना नाडींत प्रवेश केल्यानंतर हळूहळू श्वासोच्छ्वासाची क्रिया मंदावते व पुढें तीहि बंद पडते. इडा व पिंगला यांच्याद्वारां होणाऱ्या प्राणवायूच्या रेचकाच्या व पूरकाच्या क्रिया संपल्या कीं मूर्धस्थानीं प्राणवायु हा स्तंभित होऊन रहातो. या अवस्थेला केवलकुंभक असें म्हणतात. या अवस्थेंत विषयप्रवाह हे कुंठित होत असतात. केवलकुंभकाच्या अवस्थेंत असलेल्या प्राणवायूमध्येंच साधकाचें मनहि विलीन झालेलें असल्यामुळें इंद्रियांच्या प्रवृत्ति विषयोन्मुख होत नाहींत. पुत्र, मित्र, कलत्र, वित्त, वैभव इत्यादि विषय स्वाभाविकच इंद्रियांना, मनाला व जीवाला आपल्याकडे खेंचून घेत असतात. म्हणूनच त्यांना विषय असें म्हणतात. " विशेषेण पिण्वन्ति बध्नन्ति जीवान् इति विषयाः " अशी विषय शब्दाची व्युत्पत्ति आहे. जोंपर्यंत मन अथवा जीव ब्रह्मस्वरूपीं समरस होत नाहीं तोपर्यंत त्याला विषयसुखांत आनंद वाटतो पण तें मन ब्रह्मपदीं लीन झालें कीं त्या ब्रह्मानंदापुढें विषयानंद त्याला तुच्छ वाटूं लागतात. याप्रमाणें मन विषयापासून मुरडलें कीं इंद्रियेंहि आपोआप मुरडतात. अशी अवस्था केवल कुंभकाच्या वेळीं – अर्थात् प्राणवायु हा सुषुम्नाद्वारां मनासह सहस्रदलकमलांत विष्णुपदीं लीन झाला असतां निर्माण होत असतें. म्हणूनच केवलकुंभकाला तो विषयप्रवाहाचें शोषण करणारा आहे असें म्हटलें आहे. प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि या अवस्थांतून जात असतां मन उत्तरोत्तर आत्मप्रवण होत रहातें व शेवटीं त्याला आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होऊन आत्मस्वरूपाशीं तें समरस होऊन जातें. हें सर्व केवलकुंभकाच्या अवस्थेंत घडून येत असल्यामुळें केवलकुंभकाला या श्लोकांत विद्या असें म्हटलेलें आहे. " विद्यते ज्ञायते आत्मतत्त्वं अनया इति विद्या " अशी विद्या शब्दाची व्युत्पत्ति आहे. इंद्रियांना आणि मनाला विषयांपासून परावृत्त करून जीवाला आत्मतत्त्वाचा साक्षात्कार करून देणारी ही केवलकुंभकरूपी विद्या खरोखरच अत्यंत श्रेष्ठ होय. नाहीं तर भाराभर विद्या शिकला आणि पदव्या मिळविल्या, अधिकाराच्या जागा मिळविल्या आणि पैसाहि मिळविला, पण चित्ताला शांति मात्र मिळाली नाहीं. मग काय त्या विद्येचा उपयोग ! चित्ताला शांति केवलकुंभकानें मिळूं शकते म्हणूनच आचार्य म्हणतात, " विद्यां भजे केवलकुम्भरूपाम् " मी केवलकुंभकरूपी विद्येचाच आश्रय करीत आहें मी केवलकुंभकाची उपासना करीत आहें अथवा अभ्यास करीत आहें.

अनाहते चेतसि सावधानै-
रभ्यासशूरैरनुभूयमाना ।
संस्तम्भितश्वास-मनःप्रचारा
सा मृग्यते केवल-कुम्भकश्रीः ॥ ९ ॥

नादानुसंधानाच्या अनुरोधानें बंधत्रयाचा अभ्यास करीत असतांना सुषुम्ना नाडीचें मुख मोकळें होऊन कुंडलिनीसह प्राणवायु सुषुम्ना नाडींत प्रविष्ट होतो. मनहि त्याच्याबरोबर प्रविष्ट होतें. उत्तरोत्तर अभ्यास अधिक वाढत चालला म्हणजे प्राणवायु हा अधिक अंतःप्रविष्ट होतो व त्याच्या पूरक आणि रेचक या रूपानें चालणाऱ्या बाह्य क्रिया थांबतात. सहस्रदलकमलाच्या अंतराकाशांत प्राणवायु स्थिरावला म्हणजे त्याला केवलकुंभकाची अवस्था प्राप्त होते, पण हें केव्हां घडतें ? याच प्रश्नाचें उत्तर आचार्य या श्लोकांत देत आहेत. " चेतसि अनाहते सति सावधानैः अभ्यासशूरैः अनुभूयमाना " केवलकुंभकाचें वैभव आपल्या प्रतीतीला येण्याकरितां चित्ताची शुद्धि, सावधानता आणि अभ्यासाची दृढता अथवा चिकाटी या सर्व गोष्टी असतील तरच केवलकुंभकाचें वैभव अनुभवतां येईल.

साधकाचें चेतस् म्हणजे अंतःकरण हें विषयांनी अनाहत म्हणजे पराभूत न झालेलें असावें. अर्थात् अंतःकरण हें अत्यंत शुद्ध असावें. याचाच अर्थ यमनियमांची भूमिका दृढ असावी. मन शुद्ध असावें, प्रसन्न असावें, एकाग्र असावें. इंद्रियें आपल्या ताब्यांत असावींत. चित्तामध्यें शोक, दुःख आणि दैन्यहि नसावें. कामक्रोधादि विकारहि नसावेत. जे सुखी असतील त्यांच्याविषयीं हे सुखी आहेत, ही मोठी समाधानाची व आनंदाची गोष्ट आहे, अशी मित्रत्वाची भावना ठेवावी. कधींहि त्यांच्याविषयीं ईर्ष्या किंवा मत्सर नसावा. जें दुःखी असतील त्यांच्याविषयीं करुणावृत्ति ठेवावी. हे दुःखी आहेत, यांच्या दुःखाचा निरास कसा बरें होईल ? मला यांचें दुःख घालविण्याकरितां काय बरें करतां येईल ? याप्रमाणें विचार करून यथाशक्ति आपण त्यांच्या उपयोगास यावें. जें पुण्यवान् असतील त्यांच्याबद्दल चित्तांत आनंद मानावा. त्यांचा द्वेष करूं नये. जें पापी असतील त्यांची उपेक्षा करावी. त्यांच्या नादीं लागूं नये व त्यांचा द्वेषहि करूं नये. याप्रमाणें वागल्यास चित्त नेहमीं प्रसन्न रहातें. " मैत्री-करुणा-

मुक्तिनोपेक्षाणां भावनातश्चित्त-प्रसादनम्" (योगसूत्र १–३३). प्रकृतस्थलीं चित्ताच्या या अवस्थेलाच "अनाहत" असें म्हटलेलें आहे. ही चित्ताची अनाहतता समाधीला अर्थात् केवलकुंभकाला अत्यंत उपयुक्त आहे. ही ज्यांना लाभेल त्यांनाच केवलकुंभक साधेल.

केवलकुंभकाकरितां दुसरा आवश्यक गुण म्हणजे सावधानता हा आहे. कोणत्याहि प्रकारें बुद्धीचा प्रमाद होऊं न देणें हें सावधपणाचें लक्षण होय. अथवा सावधानता म्हणजे चित्ताची एकाग्रता. ही साधकाला अत्यंत आवश्यक असते. केवलकुंभक साधण्याकरितां चित्ताची एकाग्रता अत्यंत उपयुक्त आहे. तिसरा गुण अभ्यासशूरता. अभ्यासाची चिकाटी ही साधकाला अत्यंक आवश्यक आहे. मन कितीहि चंचल असलें तरी अभ्यासानें त्याचा निग्रह करतां येतो. "अभ्यास-वैराग्याभ्यां तन्निरोधः", "अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते" इत्यादि शास्त्रवचनें प्रसिद्धच आहेत. तात्पर्य, मनाची शुद्धि, चित्ताची एकाग्रता आणि अभ्यासाचें दार्ढ्य यांच्या साहाय्यानें केवलकुंभकाचें वैभव प्रतीतीस येतें. केवलकुंभकामध्यें पूर्वी सांगितल्याप्रमाणें श्वासोच्छ्वासाच्या क्रिया स्तंभित होतात आणि मनाचेंहि इकडे तिकडे भटकणें थांबतें. मन स्थिरावलें कीं तेथें निजानंदाचा साक्षात्कार होतो. अशा रीतीनें साधकाच्या ठिकाणीं तें केवलकुंभकाचें वैभव "जृम्भते" म्हणजे वाढत रहातें, प्रकाशत रहातें.

महस्रशः सन्तु हठेषु कुम्भाः
सम्भाव्यते केवलकुम्भ एव ।
कुम्भोत्तमे यत्र तु रेचपूरौ
प्राणस्य न प्राकृत-वैकृतास्यौ ॥ १० ॥

केवलकुंभकाच्या वैभवाचें वर्णन करावें तेवढें थोडें आहे. कारण नादानुसंधानादि द्वारां निष्पन्न होणाऱ्या केवलकुंभकानेंच जीवाला स्वत्वाच्या निजानंदाचा साक्षात्कार होऊं शकतो. हठयोगांत कुंभकांत हजारों प्रकार सांगितलेले असले, तरी त्या सर्व कुंभकांत केवलकुंभक हाच "संभाव्यते" म्हणजे अत्यंत श्रेष्ठ म्हणून गणला जातो. या सर्वश्रेष्ठ कुंभकांत प्राणवायूच्या प्राकृत अथवा वैकृत स्वरूपाच्या पूरक आणि रेचक या क्रिया होत नसतात. असा या श्लोकाचा अन्वयानुरोधी सरळ अर्थ आहे.

हठयोग या शब्दाचा अपभ्रंश करून लोक हटयोग असा शब्द उच्चारतात व या योगाचा हट्टाशी व दुराग्रहाशी संबंध असल्याचें भासवितात, पण तें खरें नव्हे. हठयोग हाच खरा शब्द आहे. "हश्च ठश्च हठौ, हठयोः योगः हठयोगः" अशी हठयोग या शब्दाची व्युत्पत्ति आहे. ह म्हणजे सूर्य आणि ठ म्हणजे चंद्र. अर्थात् प्राणवायु आणि अपानवायु यांचा योग म्हणजे संयोग त्यांच्या स्वाभाविक गतीचा निरोध करून त्यांना एकत्र आणणें, यालाच हठयोग असें म्हणतात. "अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथा परे", "प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ" इत्यादि गीतावचनांतहि हाच हठयोग सांगितलेला आहे. हठयोग, मंत्रयोग, लययोग आणि राजयोग असे योगाचे चार प्रकार आहेत. ते एकमेकांना उपकारकच आहेत. त्यांत राजयोग हा सर्वश्रेष्ठ मानला जातो.

हठयोगामध्यें अनेक प्रकारच्या कुंभकांचें वर्णन केलेलें आहे. त्या सर्वांत केवलकुंभक हाच अत्यंत श्रेष्ठ आहे. तो साध्यस्वरूप आहे. इतर कुंभक हे गौण आहेत. त्यांचा केवलकुंभक सिद्ध करण्याकरितां उपयोग होऊं शकतो. ज्याची ज्याची जशी प्रकृति असेल त्यानें त्यानें आपल्या प्रकृतीला सुखावह होतील त्याच हठयोगांतील प्रक्रिया अभ्यासाव्यात व केवलकुंभक सिद्ध करावा. याच अभिप्रायानें "हठयोगामध्यें हजारों कुंभक सांगितलेले आहेत, ते खुशाल असूं द्या. त्या सर्वांमध्यें केवलकुंभक हाच श्रेष्ठ आहे व तो सर्वमान्य आहे," असें आचार्यांनीं म्हटलेलें आहे.

सहितकुंभक आणि केवलकुंभक असे कुंभकाचे दोन प्रकार पूर्वी सांगितलेलेच आहेत. त्यांत सहितकुंभकांमध्यें प्राणवायूची पूरक आणि रेचक ही क्रिया आवश्यक असते. केवलकुंभकामध्यें पूरक आणि रेचक या क्रिया होत नसतात. याच अभिप्रायानें श्लोकाच्या उत्तरार्धांत "यत्र तु कुम्भोत्तमे प्राणस्य प्राकृतवैकृताख्यौ रेचपूरौ न, स एव केवलकुम्भकः" ज्या कुंभकांत प्राणवायूचे नैसर्गिक किंवा शास्त्रोक्त पद्धतीनें निर्दिष्ट केलेले पूरक आणि रेचक हे प्रकार घडत नाहींत, त्याच कुंभकाला केवलकुंभक असें म्हणतात; आणि तो सर्व कुंभकांत श्रेष्ठ आहे असें आचार्यांनीं वर्णन केलेलें आहे.

आपण जें नेहमीं स्वाभाविकपणें श्वासोच्छ्वास करीत असतों त्यांत बाहेरचा वायु शरीरांत घेणें या क्रियेला श्वास म्हणतात आणि शरीरांतील वायूला नाकावाटें बाहेर सोडणें या क्रियेला उच्छ्वास किंवा प्रश्वास असें म्हणतात. बाहेरचा वायु शरीरांत घेणें याला पूरकक्रिया असें म्हणतात, तर शरीरांतील वायु

बाहेर सोडणें याला रेचकक्रिया असें म्हणतात. या दोन्ही प्रकारच्या क्रिया स्वाभाविकपणेंच चाललेल्या असल्यामुळें त्यांना "प्राकृत" असें म्हटलेलें आहे. प्राणायामाचा अभ्यास करीत असतांना अंतःकुंभकाच्या वेळीं अगोदर पूरक केला जातो व कुंभकानंतर रेचक केला जातो. त्याचप्रमाणें बहिःकुंभकाच्या वेळीं अगोदर रेचक केला जातो व कुंभकानंतर पूरक केला जातो. याप्रमाणें कुंभकाच्या अगोदर आणि नंतर जे पूरक आणि रेचक होत असतात त्यांनाच प्रकृतस्थली "वैकृत" असें म्हटलेलें आहे. केवलकुंभकाच्या वेळीं हे प्राकृत किंवा वैकृत या नांवांनीं ओळखले जाणारे अर्थात् स्वाभाविक आणि कृत्रिम अशा स्वरूपाचे पूरक आणि रेचक हे प्राणायाम होत नसतात. म्हणूनच या कुंभकाला केवलकुंभक असें म्हणतात. हा ब्रह्मानंदाचा अनुभव देत असल्यामुळें सर्व कुंभकांत श्रेष्ठ होय.

त्रिकूटनाम्नि स्तिमितेऽन्तरङ्गे
स्वे स्तम्भिते केवल-कुम्भकेन ।
प्राणानिलो भानु-शशाङ्क-नाडयौ
विहाय सद्यो विलयं प्रयाति ॥ ११ ॥

"स्तिमिते अन्तरङ्गे त्रिकूटनाम्नि स्वे केवलकुम्भकेन स्तम्भिते सति प्राणानिलः भानुशशाङ्कनाड्यौ विहाय सद्यः विलयं प्रयाति" असा या श्लोकाचा अन्वय आहे. मनाला अंतरंग म्हणतात. अंग म्हणजे देहाचे घटक अवयव. यांत लिंगदेह – सूक्ष्मदेह देखील येतो. या सूक्ष्म देहांत अन्तः म्हणजे शेवटीं प्रधान म्हणून मनच असतें. या अभिप्रायानें मनाला अंतरंग म्हटलें जातें. मन हें स्वभावतः अत्यंत चंचल असतें. सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण मनामध्यें घटक म्हणून प्रविष्ट झालेले असतात. विवेकाच्या अभावीं सर्वसाधारणपणें मनांत रजोगुणाचें व तमोगुणाचेंच प्राबल्य असतें. रजोगुणानें चंचलता आणि तमोगुणानें अज्ञान व मोह यांचा प्रकर्ष होत असतो. अज्ञानानें व मोहानें मन विषयांकडे सैरावैरा धांवत असतें. विवेकानें, वैराग्यानें व अभ्यासानें त्याला आवरावें लागतें. रजोगुणानें तमोगुणाला व सत्त्वगुणानें रजोगुणाला जिंकून सत्त्वगुणाच्या प्रकर्षानें मनाला एकाग्र करावें लागतें. तसें तें योगाभ्यासानें एकाग्र करतां येतें. एकाग्रतेचीच पराकाष्ठा म्हणजे मनाची निरुद्ध अवस्था होय. या निरुद्ध अवस्थेलाच समाधि असें म्हणतात. आचार्य या श्लोकांत याच अवस्थेचें वर्णन करीत आहेत.

अष्टांगयोगाचा अभ्यास करतां करतां प्रत्याहार, धारणा आणि ध्यान यांच्या अभ्यासानें, ईश्वरकृपेनें अथवा गुरुकृपेनें "स्तिमित" म्हणजे निश्चल झालेलें "अंतरंग" म्हणजे मन हें वरील तीन श्लोकांत सांगितलेल्या केवलकुंभकानें त्रिकूट नांवाच्या "खे" म्हणजे आकाशामध्यें अर्थात् मूर्धस्थानीं असलेल्या सहस्रदल-कमलांतील अंतराकाशांत "स्तम्भिते" म्हणजे स्थिर केलें असतां प्राणवायु हा सूर्यनाडी व चंद्रनाडी अर्थात् इडा व पिंगला या नाड्यांना सोडून "सद्यः" म्हणजे तात्काळ "विलयं प्रयाति" म्हणजे विष्णुपदीं लीन होतो. ब्रह्मस्वरूपीं लीन होतो.

मूर्धस्थानीं कपालकुहरांत असलेल्या आकाशाला त्रिकूट असें नांव दिलेलें आहे. तीन कपालास्थींचा समागम त्या ठिकाणीं होत असल्यामुळें त्याला त्रिकूट असें म्हणतात. अथवा इडा, पिंगला आणि सुषुम्ना या तीन नाड्यांचा संगम कपालकुलहरांत होत असल्यामुळेंहि त्याला त्रिकूट असें म्हटलें जातें. इडा आणि पिंगला या नाड्या चंद्र व सूर्यस्वरूप असून सुषुम्ना नाडी ही अग्निस्वरूप आहे. सूर्य, चंद्र आणि अग्नि या तिघांचें कूट कपालकुहरांत असल्यामुळें त्याला त्रिकूट असें म्हणतात. त्या ठिकाणीं असलेल्या आकाशालाहि लक्षणेनें त्रिकूट असेंच म्हणतात. या त्रिकूटसंज्ञक आकाशांत केवलकुंभकानें प्राणवायु स्थिर झाला कीं मनहि स्थिर होतें. मनाच्या स्थैर्यावर प्राणवायूचेंहि स्थैर्य अवलंबून आहेच. "मनःस्थैर्ये स्थिरो वायुः" असा सिद्धान्तच आहे.

वासना आणि प्राणवायु ही दोन चित्तप्रवृत्तीचीं कारणें आहेत. यापैकीं कोणाहि एकाचा क्षय झाला कीं बाकी उरलेल्या दोघांचा क्षय होतोच. वासना क्षीण झाल्या म्हणजे प्राणवायु आणि चित्त हे दोघेहि क्षीण होतात. प्राणवायु क्षीण झाला म्हणजे चित्त आणि वासना क्षीण होतात. चित्त क्षीण झालें कीं प्राणवायु आणि वासना क्षीण होतात. प्रकृतम्यलीं प्राणवायूचा आणि चित्ताचा क्षय होणें यालाच लय असें म्हणतात. या लयालाच समाधि अथवा अद्वैतभाव असें म्हटलेलें आहे. "यदा संक्षीयते प्राणः मानसं च प्रलीयते। तदा समरसत्वं च समाधिरभिधीयते॥" अशी समाधीची व्याख्या आहे. या प्रमाणें प्राणाचा आणि मनाचा लय झाला म्हणजे सारे चित्तानंद मावळतात आणि अनिर्वचनीय चिदानंदाचा उदय होतो! जीव धन्य होतो! जन्म सफल होतो! ज्योतीस भेटावयास गेलेला कापूर स्वतःच ज्योतीरूप होतो. समुद्रस्नानाला गेलेली सैंधवाची बाहुली स्वतःच समुद्राशीं समरस होते. याच अवस्थेला उन्मनी, मनोन्मनी, सहजावस्था, अमनस्क-

मुद्रा, अजाड्यनिद्रा, योगनिद्रा, निर्विकल्प समाधि, निर्बीज समाधि, असंप्रज्ञात समाधि इत्यादि अनेक नांवें आहेत ! ही अवस्था केवलकुंभकानें प्राप्त होते. केवलकुंभक हा नादानुसंधानानें सिद्ध होतो. अशी ही कार्यकारणभावाची परंपरा मोठी रमणीय आहे. ज्याला भाग्यानें हा समाधिक्षण लाभला तो खरोखर मोठा धन्य होय.

प्रत्याहृतः केवल-कुम्भकेन
प्रबुद्ध-कुण्डल्युपभुक्त-शेषः ।
प्राणः प्रतीचीन-पथेन मन्दं
विलीयते विष्णु-पदान्तराले ॥ १२ ॥

शरीरामध्यें संचार करणाऱ्या वायूला प्राण असें म्हणतात. तोंच शरीरामध्यें मुख्यत्वानें कार्य करीत असतो. त्याची व्याप्ति सर्व शरीरभर आहे. स्थानभेदानें व कार्यभेदानें त्यालाच अपान, व्यान, उदान आणि समान अशीं नांवें मिळतात. अवांतर कार्यभेदानें त्यालाच नाग, कूर्म, कृकल, देवदत्त आणि धनंजय असेंहि म्हणतात. तेव्हां प्राणवायु हा तर अति विस्तृत आहे आणि सुषुम्ना नाडी ही तर अति सूक्ष्म आहे. तेव्हां सुषुम्ना नाडीच्या विवरांत प्राणवायूचा प्रवेश कसा होणार ? या शंकेचे समाधान प्रस्तुत श्लोकानें करीत आहेत. केवलकुंभकाच्या प्राथमिक प्रयत्नानें इतर मार्गांपासून प्राणवायूला परावृत्त केलें जातें. नंतर मूलबंधानें व ओड्डियाणबंधानें त्याला आधारचक्राजवळ कोंडलेंजातें. तेथें कोंडलेला प्राणवायु हा आधारचक्रांतील अग्नीलाहि प्रदीप्त करतो. त्या अग्नीच्या ऊष्म्यानें व वायूच्या आघातानें साधकाची कुंडलिनी जागृत होते. कुंडलिनी ही नागीण आहे. नाग हे वायुभक्षक असतात. "पन्नगः पवनाशनः" अशी नागाचीं नांवें आहेत. ती भुकेलेली नागीण प्राणवायूलाच खाते. अशा रीतीनें प्राणवायु क्षीण होऊं लागतो. त्यामुळें वरच्या शंकेला अवसर उरत नाहीं.

"प्रबुद्धकुण्डल्युपभुक्तशेषः" जागृत झालेल्या कुंडलीनें खाऊन शिल्लक राहिलेला प्राणवायु, तेथें जवळच असलेल्या सुषुम्ना नाडीचें मुख मोकळें झालेलें असल्यामुळें त्या मुखानें सुषुम्ना नाडीच्या विवरांत तो प्रवेश करतो. या सुषुम्ना नाडीलाच प्रतीचीनपथ असें म्हटलेलें आहे. प्रतीचीनपथ म्हणजे पश्चिम मार्ग. शरीरांतील इडा आणि पिंगला हे प्राणवायूचे दक्षिणोत्तर मार्ग आहेत, तर सुषुम्ना

नाडी हा पश्चिम मार्ग आहे. प्रतीचीन शब्दाचा अर्थ अंतर्मुख असाहि आहे. सुषुम्नामार्ग हा साधकाला अंतर्मुख करणारा मार्ग असल्यामुळें त्याला प्रतीचीनपथ असें म्हणतात. अथवा प्रत्यक् म्हणजे अंतर्यामी परमात्मा. त्याच्या प्राप्तीला हा मार्ग अनुकूल असल्यामुळें या मार्गाला प्रतीचीनपथ असें म्हटलेलें आहे. आत्म-प्राप्तिच्या या अत्यंत सूक्ष्म मार्गानें हळूहळू प्राणवायु हा प्रविष्ट होऊन विष्णुपदाच्या अंतरालामध्यें विलीन होतो. विष्णु म्हणजे विश्वाला व्यापून असलेलें व विश्वरूपानें नटलेलें ब्रह्म. त्याचें पद म्हणजे स्वरूप. यालाच चिदाकाश असें म्हणतात. या चिदाकाशांत मनासह प्राणवायु विलीन होऊन जातो. "न स पुनरावर्तते" कर्मपाशांनीं बद्ध होऊन अज्ञ जीवाप्रमाणें पुन्हां तो संसाराकडे खेंचला जात नाहीं. अंतराल शब्दाचा अर्थ अवकाश, आकाश असा आहे.

निरङ्कुशानां श्वसनोद्गमानां
निरोधनैः केवलकुम्भकाख्यैः ।
उदेति सर्वेन्द्रिय-वृत्ति-शून्यो
मनोलयः कोऽपि महामतीनाम् ॥ १३ ॥

साधक हा केवलकुंभकाचा अभ्यास करूं लागला म्हणजे त्याचे निरंकुश-पणानें – स्वैरस्वरूपानें चाललेलें श्वासोच्छ्वास निरुद्ध होतात. त्याच्या स्वाभाविक श्वासोच्छ्वास-क्रियांना प्रतिबंध होतो. या प्रतिबंधांतूनच त्याचा केवलकुंभक अधिक सिद्ध होत जातो. या कुंभकांतूनच प्राणवायूचा लय उदयाला येतो. प्राणवायूचा लय अनिर्वचनीय आहे. कारण यांत सर्व इंद्रियांच्या, मनाच्या, ज्ञानेंद्रियांच्या व कर्मेंद्रियांच्याहि वृत्ति म्हणजे प्रवृत्ति अथवा व्यवहार पार मावळलेले असतात. आकाशांत रिकामा केलेला घडा जसा आंतून आणि बाहेरून शून्यांत निमग्न झालेला असतो, त्याच्या आंत-बाहेर कांहींच नसतें त्याचप्रमाणें केवलकुंभकानें ज्याच्या प्राणाचा लय झाला, त्याच्या अंतःकरणांत परिपूर्ण परब्रह्माव्यतिरिक्त कांहींच नसल्यामुळें तो आंत-बाहेर शून्य स्वरूप होतो. एकमेवाद्वितीय असाच तो होतो. अथवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास, समुद्रांत बुडविलेला घट जसा आंत आणि बाहेर जलानें परिपूर्ण असतो त्याचप्रमाणें तो साधकहि आंत-बाहेर परिपूर्ण परब्रह्मानें व्यापलेला अर्थात् परब्रह्मस्वरूपाशीं समरस झालेला असाच असतो. "अन्तः शून्यो बहिः शून्यः शून्यः कुम्भ इवाम्बरे । अन्तः पूर्णो

बहिः पूर्णः पूर्णः कुम्भ इवार्णवे ॥" असें हठयोगप्रदीपिकेंत त्याचें वर्णन केलेलें आहे. अशा साधकांना आचार्यांनी महामति म्हणजे अत्यंत बुद्धिमान् असें जे म्हटलें आहे तें अगदीं योग्यच आहे.

न दृष्टिलक्ष्याणि न चित्तबन्धो
न देशकालौ न च वायुरोधः ।
न धारणा-ध्यान-परिश्रमो वा
समेधमाने सति राजयोगे ॥ १४ ॥

आत्तांपर्यंत वर्णन केलेल्या केवलकुंभकानें साधकाच्या प्राणवायूचा व मनाचा ब्रह्मरंध्रांत विष्णुपदीं लय झाल्यानंतर साधकाला जी अवस्था प्राप्त होते त्याच अवस्थेला प्रकृतस्थली राजयोग असें म्हटलेलें आहे. राजयोग म्हणजे अष्टांगयोगाच्या अभ्यासानें प्राप्त होणारी निर्विकल्प समाधि. निर्विकल्प समाधि हा सर्व योगांमध्यें श्रेष्ठ योग असल्यामुळें याला राजयोग असें म्हणतात. "योगानां राजा राजयोगः" अशी राजयोग शब्दाची व्युत्पत्ति आहे. जीवात्मा आणि परमात्मा परब्रह्म यांच्या तादात्म्यसंबंधाला योग असें म्हणतात. जीवात्मा हा प्रत्येक शरीरांत विराजत असल्यामुळें राजाच आहे व परमात्माहि विश्वरूपानें विराजत असल्यामुळें राजाच आहे. या दोन्ही राजांचें अर्थात् जीवशिवाचें तादात्म्य घडून येणें हाच खरा राजयोग होय. या अर्थानें "राजा च राजा च राजानौ, राज्ञोः योगः राजयोगः" असा राजयोग शब्दाचा विग्रह करावा. असा हा राजयोग साधकाच्या ठिकाणीं केवलकुंभकाच्या अभ्यासानें "समेधमान" म्हणजे उत्तम रीतीनें अविच्छिन्न—अखंड वृद्धिंगत होऊं लागला असतां साधक हा ध्येयतत्त्वाशीं अभिन्न होतो, शिवस्वरूप होतो. ब्रह्मस्वरूप होतो. त्याच्या दृष्टीपुढें कोणत्याहि लक्ष्याची गरज उरत नाहीं. धारणेप्रमाणें त्याला चित्त कोठेंहि ध्येयवस्तूच्या ठिकाणीं लावावें लागत नाहीं. चित्त ब्रह्मस्वरूपीं समरस झालें असल्यामुळें त्याला देशाचें अथवा काळाचें भान उरत नाहीं. त्याला सर्व दिशा मंगलमय भासतात व सर्वच काळ शुभस्वरूप वाटतो. त्याची चित्तवृत्ति ब्रह्मस्वरूप झाल्यामुळें सर्व देश आणि सर्व काळ त्याला मंगलमयच असतात. त्याला प्राणायाम करावे लागत नाहींत व धारणा आणि ध्यान यांचेहि कष्ट घ्यावे लागत नाहींत. असा हा या राजयोगाचा महिमा आहे.

अशेष-दृश्योज्झित-दृङ्मयाना-
मवस्थितानामिह राजयोगे ।
न जागरो नापि सुषुप्तिभावो
न जीवितं नो मरणं विचित्रम् ॥ १५ ॥

मागील श्लोकांत राजयोग बुद्धिगत होत असतांना साधकाच्या सर्व वृत्ति मावळतात असें सांगितलें; पण हें कसें शक्य आहे ? ज्ञान्याच्या ठिकाणीं देखील जागृति, स्वप्न, सुषुप्ति, खाणेंपिणें, चालणें, बोलणें इत्यादि सर्व व्यवहार दिसतातच. या शंकेचें समाधान करण्याकरितां आचार्यांनी हा श्लोक लिहिला आहे. पूर्वीच्या श्लोकांत वर्णन केलेल्या या राजयोगामध्यें समाधिकाळीं तर सर्व व्यवहार बंदच असतात, पण लोकदृष्ट्या व्युत्थानदशेमध्यें देखील राजयोगानें सिद्ध झालेले महात्मे केवळ ब्रह्मस्वरूपच असतात. शुद्ध चित्स्वरूप ब्रह्माच्या ठिकाणीं अशेष दृश्यप्रपंचाचा तत्त्वतः कांहीं संबंध नसल्यामुळें संपूर्ण दृश्यप्रपंच हा तत्त्ववेत्त्याच्या दृष्टीनें मावळलेलाच असतो. दृश्यप्रपंचाचा निरास झाल्यामुळें ते केवळ "दृक्" म्हणजे ज्ञानस्वरूपच असतात. जेथें, देह, प्राण, मन, बुद्धि इत्यादिकांचें भानच नाहीं तेथें त्यांच्या दृष्टीनें व्यवहार कसला ? तात्पर्य, " सर्वं खल्विदं ब्रह्म ", " आत्मैवेदं सर्वम् " अशीच अवस्था असल्यामुळें त्या सिद्ध महात्म्यांकडून अशेष दृश्यपदार्थांचा त्यागच झालेला असतो. ते केवळ दृश्य म्हणजे ज्ञानस्वरूप, ब्रह्मस्वरूपच असतात. सामान्य लोक त्यांच्या बाबतींत जागृति, स्वप्न, सुषुप्ति, जीवन, मरण इत्यादि व्यवहाराची कल्पना करीत असले, तरी त्या सिद्ध पुरुषांना जागृति नाहीं, स्वप्न नाहीं, सुषुप्ति नाहीं, जीवन नाहीं, मरण नाहीं, कांहीं नाहीं. केवढें हें आश्चर्य आहे !

अहं-ममत्वाद्यपहाय सर्वं
श्रीराजयोगे स्थिरमानसानाम् ।
न द्रष्टृता नास्ति च दृश्यभावः
सा जृम्भते केवलसंविदेव ॥ १६ ॥

जेथे तेथें मी मी मी अशा तऱ्हेची मी वृत्ति व्यक्त केली जाते त्या वृत्तीला अहंता असें म्हणतात. यालाच प्रौढी मिरविणें किंवा गर्व करणें असें आपण म्हणतों. त्याचप्रमाणें आपल्याजवळ असलेल्या प्रत्येक पदार्थाविषयीं हें

माझें तें माझें अशी भावना ठेवणें याला ममता असें म्हणतात. तात्पर्य, मोहमूलक आत्मीयत्वाची भावना म्हणजे ममता होय. अहंता आणि ममता या दोन्ही वृत्ति अंतीं जीवाला तापदायक असतात. ममता शब्दाचा मराठीमध्यें माया किंवा प्रेम असाहि अर्थ करतात. हें प्रेमहि मोहमूलक असेल तर तें तापदायकच ठरतें. या करितां विवेकी लोक अहंता आणि ममता यांचा त्याग करीत असतात. ज्यांनी अहंता आणि ममता या सर्वांचा त्याग करून आपलें मन सर्वस्वीं स्पृहणीय आणि सुंदर अस्तेल्या राजयोगाच्या ठिकाणीं स्थिर केलेलें आहे त्यांच्या ठिकाणी मी द्रष्टा आहें, हें सर्व दृश्य आहे, मी भोक्ता आहें, हें सर्व माझें भोग्य आहे, असा कोणताच भाव म्हणजे वृत्ति, कल्पना किंवा विचार शिल्लक रहात नाहीं. सर्व द्वैतभाव मावळलेला असतो. मग शिल्लक काय उरतें ? या प्रश्नाचें उत्तर असे : " सा जृम्भते केवलसंविदेव " सा म्हणजे पूर्वी सांगितलेली किंवा शास्त्रांत प्रसिद्ध असलेली. केवलसंवित् म्हणजे अखंड, अनंत, स्वगत-सजातीय-विजातीय-भेदरहित परिपूर्ण परब्रह्मच शिल्लक असतें.

अहंता म्हणजे अनात्मस्वरूप असलेल्या देहेंद्रियादिकांच्याविषयीं आत्मत्व-भावना आणि ममत्व म्हणजे तत्त्वतः आत्म्याशीं ज्यांचा कांहीं संबंध नाहीं अशा घरदार, वित्तवैभव आणि पुत्र, मित्र इत्यादिकांच्या ठिकाणीं असलेली आत्मीय-त्वाची भावना. या दोन्ही भावना अज्ञानाचेंच स्वरूप होय असें योगशास्त्र सांगत आहे. अनित्य पदार्थांना नित्य समजणें, अपवित्र पदार्थांना पवित्र मानणें, दुःखदायक असलेल्या पदार्थांना सुखकर समजणें आणि अनात्मस्वरूप असलेल्या पदार्थांना आत्मस्वरूप समजणें हें सर्व अज्ञानाचें लक्षण होय. " अनित्याशुचिदुःखानात्मसु नित्य-शुचि-सुखात्म-ख्यातिरविद्या " (साधनपाद योग सूत्र ५) असाहि अहंता आणि ममता या शब्दांचा अर्थ करतात. विवेकानें व श्रवण, मनन आणि निदिध्यासन यांच्या योगानें सर्व अज्ञानांचा निरास करून साधक हे राजयोगाच्या ठिकाणीं विराजत असतात. श्री म्हणजे ब्रह्म. " मुमुक्षुभिः श्रीयते इति श्रीः " अशी श्री शब्दाची व्युत्पत्ति आहे. श्रीराजयोग म्हणजे ब्रह्मस्वरूपच असलेला राजयोग असा अर्थ होतो. राजयोग हा ब्रह्मस्वरूपच आहे. " स्वस्वरूपेण राजते इति राजा, राज्ञा योगः राजयोगः " स्वस्वरूपानें विराजमान असलेलें स्वयंप्रकाश परिपूर्ण परब्रह्म हाच खरा राजा शब्दाचा अर्थ होय. या परब्रह्माशीं योग म्हणजे तादात्म्य-भाव प्राप्त होणें हाच राजयोग शब्दाचा अर्थ होय. या राजयोगाच्या ठिकाणीं

भाग्यानें ज्यांचें मन स्थिर झालें, एकरूप झालें, त्यांचा सर्व द्वैतभाव मावळतो आणि केवळ संवित् म्हणजे शुद्ध निरुपाधिक आत्मचैतन्य हेंच "शुम्भते" म्हणजे प्रकाशत रहातें !

नेत्रे पयोन्मेष-निमेष-शून्ये
वायुर्यया वर्जित-रेचक-पूरः ।
मनश्च सङ्कल्प-विकल्प-शून्यं
मनोन्मनी मा मयि सन्निधत्ताम् ॥ १७ ॥

वरच्या श्लोकांत राजयोगामध्यें विराजमान झालेल्या साधकाच्या सर्व वृत्ति – इंद्रियवृत्ति, मनोवृत्ति आणि प्राणवृत्तीहि मावळतात असें सांगितलें. याच अवस्थेला मनोन्मनी अवस्था असें म्हणतात. प्रस्तुत श्लोकांत आचार्य या मनोन्मनी अवस्थेचें वर्णन करीत आहेत. उन्मनी अवस्थेमध्यें सर्व वृत्तींचा निरोध झालेला असतो. डोळ्यांचे उन्मेष आणि निमेष देखील होत नसतात. उन्मेष म्हणजे डोळे उघडणें आणि निमेष म्हणजे डोळे झांकणें. उन्मनी अवस्थेंत या क्रिया देखील होत नसतात; कारण आपण अमुक पहावें किंवा अमुक पाहूं नये अशी वृत्तीच निर्माण होत नसते. या ठिकाणी डोळा हें एक उदाहरणमात्र आहे. डोळ्यांप्रमाणेंच उन्मनी अवस्थेंत इतर इंद्रियांचेंहि व्यापार बंद पडलेले असतात. केवलकुंभकाच्या परिपक्व अवस्थेमुळें प्राणवायूचीं श्वासोच्छ्वासाच्या रूपानें होणारीं पूरक आणि रेचक हीं कर्मेंहि बंद पडतात. त्याबरोबरच शरीराची हालचालहि बंद पडलेली असते.

सौषुप्त अवस्थेंत मन पुरीतत् नांवाच्या नाडींत प्रविष्ट झालेलें असतें आणि कुंडलिनी – शक्तीहि पण स्वस्थानीं प्रसुप्तच असते म्हणून देहाचा तोल संभाळला जात नाहीं. मनुष्य पेंगतो, बसल्या जागीं डुलक्या घेतो व शेवटीं तो आडवाहि होतो; पण चित्ताचा ब्रह्मस्वरूपीं लय झाल्यानंतर समाधिकाळांत साधकाचें मन सुषुम्नानाडीच्या मार्गानें सहस्रदलकमलांतील विष्णुपदांत लीन झालेलें असतें व साधकाची कुंडलिनीशक्तिहि जागृत असते म्हणूनच साधकाचा देह समाधिपूर्वकाळांत सिद्धासन, स्वस्तिकासन अथवा पद्मासन यांपैकी ज्या आसनावर स्थिर झालेला असेल त्याच आसनावर तो तसाच निश्चल रहातो. याच कारणानें सुषुप्ति अवस्थेप्रमाणें समाधिअवस्थेंत साधकाचा देह आडवा होत नाहीं.

या मनोन्मनी अवस्थेंत साधकाचें मन संकल्प आणि विकल्प यांनीं शून्य झालेलें असतें. अशी ही मनोन्मनीची अर्थात् निर्विकल्प समाधीची अवस्था असते. हिलाच परिपूर्णब्रह्मावस्था असें म्हणतात. सा म्हणजे ती, मुमुक्षु लोकांना अपेक्षित असलेली आणि ब्रह्मवेत्त्यामध्यें प्रसिद्ध असलेली मनोन्मनी अवस्था आचार्य म्हणतात माझ्या सांनिध्याला यावी, ती मला प्राप्त व्हावी. ही अवस्था म्हणजे आनंदाची पराकाष्ठा होय. साधकानें देखील हठयोग अर्थात् प्राण आणि अपान यांच्या समीकरणानें कुंडलिनी-शक्तीला जागृत करण्याची क्रिया हेंच क्षेत्र समजून त्यांत आपलें चित्तरूपी बी पेरावें. त्याला विवेकयुक्त निःसीम वैराग्याचें जल शिंपडावें. अर्थात् विवेकयुक्त वैराग्याचें मुबलक पाणी घालावें म्हणजे चित्तबीज अंकुरित होऊन तेथें कल्पलता उदयास येईल. हीच कल्पलता नित्यनिरतिशय आनंदाचें फळ देऊन साधकाचे सर्व मनोरथ पूर्ण करील.

संस्कृत भाषेमध्यें पृषत् + उदर यांचा समास ज्याप्रमाणें पृषोदर होतो त्याचप्रमाणें मनस् + उन्मनी यांचाहि समास मनोन्मनी असा होत असल्यामुळें मनोन्मनी हा शब्द अशुद्ध आहे अशी शंका घेण्याचें कांहीं कारण नाहीं.

चित्तेन्द्रियाणां चिरनिग्रहेण
श्वासप्रचारे शमिते यमीन्द्राः ।
निवात-दीपा इव निश्चलाङ्गा
मनोन्मनीमग्नधियो भवन्ति ॥ १८ ॥

यमीन्द्राः म्हणजे इंद्रियनिग्रह, मनोनिग्रह करण्यांत निष्णात असलेले मोठे मोठे योगी, श्रेष्ठयोगी, चिरकाल मनाचा आणि इंद्रियांचा निग्रह केल्यामुळें ज्यांचीं इन्द्रियें आणि मन अंतर्मुख झालेलें आहे, त्याचप्रमाणें अंतःकुंभकाच्या अभ्यासामुळें श्वासोच्छ्वासाच्या गति ज्यांच्या शांत झालेल्या आहेत, अर्थात् प्राणवायूचा सुषुम्नानाडींत प्रवेश झालेला असल्यामुळें इडा आणि पिंगला या नाड्यांच्या द्वारां होणारी श्वासोच्छ्वासाची गति ज्यांची शांत झालेली आहे. ज्यांचे अवयव अगदी वाऱ्याचा संपर्क नसलेल्या खोलींत ठेवलेल्या दिव्याप्रमाणें निश्चल झालेले आहेत, असेच ते दिसत असतात. मनोन्मनी अवस्थेमध्यें त्यांचें चित्त निमग्न झालेलें असतें.

उन्मनी म्हणजे मनाच्या पलीकडे असलेली अवस्था. ज्या अवस्थेंत मनाचा मनपणा शिल्लक राहिलेला नसतो, त्या अवस्थेला उन्मनी असें म्हणतात. अथवा मनोन्मनी या शब्दांतील मन शब्दाचा अर्थ ब्रह्म असाहि करतात. "मन्यते ज्ञायते अनेन इति मनं" अशी मन शब्दाची व्युत्पत्ति आहे. मन शब्द जसा नकारान्त आहे तसाच तो अकारान्तहि आहे. ब्रह्म हें स्वयंप्रकाश असून सर्वप्रकाशक आहे. त्याच्याच योगानें सर्व कांहीं जाणलें जातें. "यद्भासा सर्वमिदं विभाति" हें श्रुतिवाक्य प्रसिद्धच आहे. तात्पर्य, मनोन्मनी म्हणजे ब्रह्मस्वरूप अवस्था. या अवस्थेंत त्या थोर संयमी पुरुषांची बुद्धि निमग्न झालेली असते. संतांच्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास "मन रामीं रंगलें, अवघें रामचि राम झालें!" अशीच त्यांची अवस्था झालेली असते.

उन्मन्यवस्थाधिगमाय विद्व-
न्नुपायमेकं तव निर्दिशामः ।
पश्यन्नुदासीनतया प्रपञ्चं
सङ्कल्पमुन्मूलय सावधानः ॥ १९ ॥

मागील श्लोकांत उन्मनी अवस्था ही ब्रह्मानंदस्वरूप आहे असा अभिप्राय व्यक्त केल्यानंतर साहजिकच प्रश्न असा येतो कीं, ही उन्मनी अवस्था आपल्याला कशी प्राप्त करून घेतां येईल? याच प्रश्नाचें उत्तर आचार्य या श्लोकांत देत आहेत. हे विद्वन् म्हणजे हे शहाण्या माणसा! ब्रह्मानंदाची अवस्था आपण प्राप्त करून घ्यावी अशी उत्कट बुद्धि ज्याला झाली तो खरोखर शहाणाच होय. नाहीं तर पुष्कळ शहाणपण आहे, पण संसारबंधनांतून मुक्त होण्याची इच्छा नाहीं, मग त्या शहाणपणाचा काय उपयोग? याच अभिप्रायानें आचार्यांनीं प्रश्न करणाऱ्याला उद्देशून "विद्वन्" हें संबोधन योजिलें आहे. हे शहाण्या माणसा! उन्मनी अवस्था प्राप्त करून घेण्याकरितां आम्ही तुला एक उपाय सांगतों. ऐक. या विश्वप्रपंचाकडे तूं उदासीन बुद्धीनें म्हणजे साक्षी या भावनेनें पहा. या प्रपंचांत आसक्त होऊन रहाण्यासारखें कांहीं नाहीं. या प्रपंचाचा माझ्याशीं अर्थात् आत्म्याशीं तत्त्वतः तिळमात्रहि संबंध नाहीं. मी या विश्वप्रपंचाचा केवळ साक्षी आहे. याच भावनेनें वाग. प्रपंचांतील कोणत्याहि वस्तूवर आसक्त न होतां प्रपंचांतील कामें केवळ कर्तव्यबुद्धीनें करीत

"तथाविधमनोविलयां" म्हणजे योगतारावलींत आतापर्यंत वर्णन केलेल्या पद्धतीप्रमाणें, ज्या अवस्थेंत मनाचा पूर्णपणें लय होऊन गेलेला आहे अशी स्वरूपावस्थारूप सिद्धि जिला तुर्यातीत अवस्था म्हणतात, ती मला केव्हां बरें प्राप्त होईल ? श्रीशैल पर्वताच्या शिखरांवरील गुहांतून मी समाधि लावून बसलों आहे. माझा जीवात्मा परमात्मस्वरूपाशीं एकरूप झालेला आहे. मनांतील संकल्प-विकल्परूपी विकार सगळे मावळलेले आहेत. मन निर्विकार झालेलें आहे. इंद्रियांचे सर्व व्यापार शांत झालेले आहेत. सर्व विषयांचें विस्मरण होऊन अंतःकरण ब्रह्मस्वरूपाशीं अगदीं तदाकार झालेलें आहे. अशा तऱ्हेच्या समाधिअवस्थेंत मी केव्हां बरें प्रविष्ट होईन ?

" निर्विकारतया वृत्त्या ब्रह्माकारतया पुनः ।
वृत्तिविस्मरणं सम्यक् समाधिरभिधीयते ॥ "

अशा स्वरूपाच्या समाधिअवस्थेचा मला केव्हां बरें लाभ होईल ? समाधिअवस्थेंत शरीर निश्चल झाल्यामुळें माझ्या देहाला लता, वेली सर्व बाजूंनीं वेष्टित आहेत अशी अवस्था मला केव्हां बरें प्राप्त होईल ? त्याचप्रमाणें माझ्या कानांमध्यें पक्षी निर्भयपणानें घरटीं बांधीत आहेत अशी अवस्था मला केव्हां बरें येईल ? तात्पर्य, या अवस्थेला पोहोंचलेले महात्मे धन्य होत.

कांहीं लोक श्रीशैल शब्दाचा अर्थ मूर्धस्थानीं असलेलें सहस्रदल कमल असा करतात. " गीपर्वतः शिरःस्थाने " असा तंत्रशास्त्रांतील संकेतहि आहे. गात्र शब्दानें विराट् देहाची कल्पना करून भूतभौतिक विश्वप्रपंचाला लतास्थानीं कल्पितात. खग शब्दाचा अर्थ आकाशांत संचार करणारे चंद्र, सूर्य, ग्रह, नक्षत्रें असा करून नीड शब्दाचा अर्थ त्यांचीं स्थानें असा करतात. तात्पर्य, मला विराट् स्वरूपाची अवस्था केव्हां बरें प्राप्त होईल ? " प्रज्ञेनात्मना सम्परिष्वक्तो न बाह्यं किञ्चन वेद नान्तरम् " इत्यादि वाक्यांनीं बृहदारण्यकांत वर्णन केलेली अवस्था मला केव्हां बरें प्राप्त होईल ? असाहि या श्लोकाचा अभिप्राय असल्याचें प्रतिपादन केलें जातें. वस्तुतः योगतारावली येथें समाप्त झाली. कांहीं पोथ्यांतून खालीं दिलेला श्लोक अधिक आढळतो.

विधरतु मतिरेषा निर्विकल्पे समाधौ
कुचकलशयुगे वा कृष्णसारेक्षणानाम् ।

राहतेच. " असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् " मन हें अत्यंत चंचल आहे, त्याचा निग्रह करणें हें अत्यंत कठीण आहे. हीं गोष्ट श्रीकृष्णालाहि मान्य करावी लागली आहे. आचार्य या श्लोकांत मनाला कसें जिंकावें, मनांतील संकल्प कसे घालवावेत, यांची कल्पना देत आहेत. " सङ्कल्पपरंपराणां प्रसभं सम्भेदने सन्तत-सावधानं चेतः आलम्बनाशात् अपचीयमानं सत् शनैः शनैः शान्तिं उपैति । " मनामध्यें निर्माण होणाऱ्या ज्या संकल्पांच्या परंपरा अर्थात अविच्छिन्न संकल्प, त्यांना असभ्य म्हणजे बळेंच "संभेदने" म्हणजे मोडून काढण्याविषयीं मनानें सतत म्हणजे निरंतर सावधान म्हणजे एकाग्रतेनें तत्पर राहावयास पाहिजे. वैराग्य आणि अभ्यास यांच्या बळावर हळूहळू मनांतील संकल्पांचें निर्मूलन करावें. विवेकानें विषयांचे दोष लक्षांत घेतले म्हणजे विषयांमध्यें दुःखच आहे ही गोष्ट प्रतीतीस येईल. मग हळूहळू मन विषयांपासून परावृत्त होईल. मन विषयांपासून परावृत्त झालें की त्याला सहजच शांतीचा लाभ होतो.

मनांतील संकल्पांचें निर्मूलन करणें ही गोष्ट कांहीं साधी सोपी नव्हे. याच अभिप्रायानें आचार्यांनीं मागील श्लोकांत विहन् आणि सावधान या शब्दांचा प्रयोग केलेला आहे. याहि श्लोकांत "सन्ततसावधानं" हा पदप्रयोग केलेलाच आहे. हा त्यांचा साधकाला सावधानतेचा इशाराच आहे. मनांतील संकल्पांचें निर्मूलन करणें हें अवघड असलें तरी अशक्य मात्र नाहीं. अवघड वाटणाऱ्या गोष्टी देखील हळूहळू केल्या जाणाऱ्या अभ्यासानें साध्य होत असतात. खडक कितीहि कठीण असला तरी त्यावरून सतत वाहाणाऱ्या पाण्याच्या ओघानेंहि खडकाला ओघाचा आकार येतो. विहीरीवर बांधलेल्या पारोळ्याच्या तोंडाशीं जी शिळा बसविलेली असते तिच्यावरून मोटेच्या दोराचें सारखें घर्षण होत असतें. त्या घर्षणानें शिळेलाहि व्रण पडतात. जें विष इतरांना डोळ्यांनीं पहावतहि नाहीं तें तोळ्या तोळ्यानें भक्षण करणारे लोक असतातच. हा कशाचा परिणाम ? हा हळूहळू केल्या जाणाऱ्या अभ्यासाचाच परिणाम होय. याच अभिप्रायानें आचार्यांनीं चौथ्या चरणांत " शनैः शनैः " हा पदप्रयोग केलेला आहे. अभ्यासानें मनांतील संकल्पांचें उन्मूलन करीत असतांना मन हळूहळू शांत होत राहातें. अग्नीचें इंधन संपलें कीं अग्नि जसा जागच्या जागीं शांत होतो त्याचप्रमाणें मनांतील संकल्प मावळले कीं मनहि जागच्या जागीं शांत होतें. संकल्प हेंच मनाचें आलंबन असल्यामुळें जसा जसा आलंबनाचा नाश होत

जातो तसें तसें मन क्षीण होत जातें व शेवटी तें आत्मस्वरूपांत लीन होऊन जातें. हें सर्व सिद्ध होण्याकरितां साधकाला अभ्यासकाळांत यमनियमांचें अनुष्ठान, आसनें आणि प्राणायाम, बंध आणि मुद्रा, कुंडलिनी-शक्तीची जागृति, प्राणवायूचा सुषुम्नानाडींत प्रवेश, अनाहतनादाचें अनुसंधान, केवलकुंभक आणि मनाचा लय याच मार्गानीं जावें लागतें. हाच शांतीचा राजमार्ग आहे.

निश्वासलोपैर्निभृतैः शरीरै-
र्नेत्राम्बुजैरर्धनिमीलितैश्च ।
आविर्भवन्नीममनस्कमुद्रा-
मालोकयाम्बो मुनिपुङ्गवानाम् ॥ २१ ॥

वर सांगितलेल्या मार्गानें अभ्यास करणारे ते खरोखर मुनिपुंगव म्हणजे श्रेष्ठ मुनिच होत. केवल कुंभकामुळें इडा आणि पिंगला या नाड्यांच्या द्वारां होणाऱ्या त्यांच्या श्वासोच्छ्वास-क्रिया विराम पावलेल्या असतात. त्यामुळें त्यांचीं शरीरें निश्चल झालेलीं असतात. त्यांचीं नेत्रकमलेंहि अर्धोन्मीलित अवस्थेंत असतात. मनांतील संकल्प-विकल्पहि मावळलेले असतात. अशी ही त्या श्रेष्ठ मुनींची एक प्रकारची अमनस्कमुद्राच प्रकट होत असलेली आम्ही पहात आहोंत. मुद्रा म्हणजे शरीराची एक प्रकारची विशिष्ट अवस्था. ज्या अवस्थेंत हालचाल नाहीं, इंद्रियांचे व्यापार नाहींत, श्वासोच्छ्वास नाहींत, संकल्प-विकल्प नाहींत, पण ही अवस्था म्हणजे मरण मात्र नव्हे. मरणामध्यें प्राणवायु देहाला सोडून गेलेला असतो, तर या अवस्थेंत तो सुषुम्ना नाडीच्या द्वारा ब्रह्मरंध्रांत प्रविष्ट झालेला असतो, मरणामध्यें देह जमिनीवर अस्ताव्यस्त पडलेला असतो, तर या अवस्थेंत तो " समं कायशिरोग्रीवं " या थाटांत आपल्या आसनावर विराजमान असतो. मरणामध्यें जीव हा आपल्या सूक्ष्म शरीराला बरोबर घेऊन कर्मांच्या अनुरोधानें इकडे तिकडे भटकत असतो तर, या अवस्थेंत तो निजानंदांत तल्लीन झालेला असतो. म्हणूनच या अवस्थेला अमनस्कमुद्रा असें म्हणतात. " मुदं राति इति मुद्रा " ही अवस्था एक प्रकारचा आनंद देते म्हणून तिला मुद्रा असें म्हटलेलें आहे. " मोदयति अपरोक्षज्ञानेन इति मुद्रा " असाहि मुद्रा शब्दाचा विग्रह करतात. आत्मस्वरूपाचा अपरोक्ष साक्षात्कार करून देऊन जीवाला ती आनंद देते म्हणून तिला मुद्रा असें म्हटलेलें आहे. या अवस्थेंत

मन हें उन्मनीभावाला गेलेलें असतें म्हणूनच हिला अमनस्कमुद्रा असें म्हटलें जातें. भगवान् श्रीमहाविष्णु अथवा भगवान् शंभुनाथ यांना ही मुद्रा प्रिय असल्यामुळें अथवा तेहि या मुद्रेमध्यें विराजमान होत असल्यामुळें या मुद्रेला वैष्णवी मुद्रा अथवा शांभवी मुद्रा असेंहि म्हणतात. ही अमनस्कमुद्रा ज्यांना लाभली ते मुनिपुंगव खरोखर धन्य होत. "यमिपुङ्गवालाम्" असाहि पाठभेद आढळतो. श्रेष्ठ योगी असा त्याचा अर्थ करावा.

अमी यमीन्द्राः सहजामनस्का –
दृढंममत्वे शिथिलायमाने ।
मनोऽलिंगं मारुतवृत्ति-शून्यं
गच्छन्ति भावं गगनावशेषम् ॥ २२ ॥

"अमी" म्हणजे हे वरच्या श्लोकांत निर्दिष्ट केलेले 'यमीन्द्राः' म्हणजे बडे बडे योगी. त्यांना त्यांच्या योगाभ्यासामुळें आणि विवेकयुक्त वैराग्यामुळें "सहजामनस्कभाव" म्हणजे ब्रह्मरूपता प्राप्त झालेली असते. अर्थात् सहज म्हणजे अकृत्रिम अमनस्क म्हणजे ब्रह्मभाव. क म्हणजे ब्रह्म. "कं ब्रह्म खं ब्रह्म" हें श्रुतिवचन प्रसिद्धच आहे. अमनस् म्हणजे मनोनिर्मित संकल्प-विकल्परहित अथवा मनाच्या पलीकडचें. "न तत्र मनो गच्छति न वाक्" अशा वाक्यांनीं वेदानें ब्रह्माचें वर्णन केलेलेंच आहे. म्हणूनच ब्रह्माला अमनस्क असें म्हणतात. तात्पर्य, अकृत्रिम कल्पनातीत असें जें अखंड, अनंत ब्रह्म तेंच सहजामनस्क शब्दानें या ठिकाणीं विवक्षित आहे. अशा ब्रह्मावस्थेला तें प्राप्त झालेलें असल्यामुळें त्यांची अहंता आणि ममता शिथिल झालेली असते, मावळलेली असते. ते अशा भावाला म्हणजे अवस्थेला प्राप्त झालेले असतात कीं, त्या ठिकाणीं प्राणवायूच्या वृत्ति म्हणजे श्वासोच्छ्वासाचे व्यापार शून्य झालेलें असतात. मनाच्याहि पलीकडची ती अवस्था असते. गगन म्हणजे चैतन्याकाश हेंच त्या अवस्थेंत शिल्लक उरलेलें असतें. तात्पर्य, ते ब्रह्मरूप होतात.

निवर्तयन्तीं निखिलेन्द्रियाणि
प्रवर्तयन्तीं परमात्मयोगम् ।
संविन्मयीं तां सहजामनस्कां
कदा गमिष्यामि गतान्यभावः ॥ २३ ॥

वर वर्णन केलेली सहज अमनस्क अवस्था अत्यंत स्पृहणीय असल्यामुळें तिचा मला केव्हां लाभ होईल अशी उत्कंठा या श्लोकांत आचार्य व्यक्त करीत आहेत. सर्व इंद्रियांना आपआपल्या विषयांपासून परावृत्त करणारी आणि परं म्हणजे अत्यंत श्रेष्ठ, असंभावना, विपरीत भावना इत्यादि प्रतिकूल वृत्तींनीं रहित अर्थात् अत्यंत शुद्ध अशा आत्मयोगाकडे -- आत्मसाक्षात्काराकडे प्रवृत्त करणारी, परमात्मयोग असें एकच पद कल्पिल्यास परमात्मतत्त्वाच्या साक्षात्काराकडे प्रवृत्त करणारी, असा अर्थ करावा. "संविन्मयी" म्हणजे केवळ-ज्ञानस्वरूप असलेली, अपरोक्ष ब्रह्मानंदाला प्राप्त करून देणारी वरील श्लोकांत वर्णन केलेली सहज आणि अमनस्क अशी जी अवस्था त्या अवस्थेला 'गतान्य-भावः' म्हणजे ज्याचा द्वैतभाव मावळलेला आहे अशा भूमिकेवर येऊन मी केव्हां बरें प्राप्त होईन ?

कांहीं लोक "गतान्यभावाम्" असा पाठ मानून सहज-अमनस्कमुद्देचें तें विशेषण करतात. अमनस्कअवस्थेमध्ये सर्व भेदभाव मावळतो हें आपण वर पाहिलेलेंच आहे.

प्रत्यग्विमर्शातिशयेन पुंसां
प्राचीनगन्धेषु पलायितेषु ।
प्रादुर्भवेत्काचिदजाड्यनिद्रा
प्रपञ्चचिन्तां परिवर्जयन्ती ॥ २४ ॥

शास्त्रांत सांगितलेलें व गुरूंनीं उपदेशिलेलें आत्मस्वरूप लक्षांत घेऊन त्याचें अखंड चिंतन केल्यानेंच आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होऊं शकतो. हींच गोष्ट आचार्य या श्लोकानें सांगत आहेत. "प्रत्यग्विमर्शातिशयेन" प्रत्यक् म्हणजे अन्तर्यामी आत्मा. अंतर्यामामध्यें राहून विश्वाला भुलवितो, चालवितो म्हणून अंतरात्म्याला प्रत्यक् असें म्हणतात. अंतर्मुख झालेल्या लोकांनाच त्याचा साक्षात्कार होऊं शकतो. म्हणूनहि त्याला प्रत्यक् असें म्हणतात. " प्रातिलोम्येन अञ्चति इति प्रत्यक् " अशी प्रत्यक् शब्दाची व्युत्पति आहे. प्रत्यक् म्हणजे अंतरात्मा. त्याचा विमर्श म्हणजे सूक्ष्म विचार. देह आत्मा नव्हे, इंद्रियें आत्मा नव्हेत, मन आत्मा नव्हे. हे सर्व नाशिवंत आहेत. आत्मा हा अविनाशी व आनंदमय आहे. अशा प्रकारच्या सूक्ष्म विचाराला विमर्श असें म्हणतात. या विचारांचा

अतिशय म्हणजे पराकाष्ठा. या आत्मविषयक सूक्ष्म विचारांच्या पराकाष्ठेनें प्राचीनबंध म्हणजे पुरातन संस्कार पार पडून जातात, नाहींसे होतात. अशा रीतीनें निरंतर होणाऱ्या आत्मचिंतनानें प्राचीन संस्कार गाबळल्यानंतर साधकाच्या ठिकाणीं एक प्रकारची अनिर्वचनीय "अजाड्यनिद्रा" म्हणजे सर्व इंद्रियांच्या वृत्ति जेथें निमाल्या आहेत अशा प्रकारची चिदानंदस्वरूप सहजावस्था प्रकट होते. त्या अवस्थेंत प्रपंचाची चिंता तिळमात्रहि उरत नाहीं.

विच्छिन्न-संकल्प-विकल्प-मूले
निःशेष-निर्मूलित-कर्म-जाले ।
निरन्तराभ्यासनितान्तभद्रा
सा जृम्भते योगिनि योगनिद्रा ॥ २५ ॥

निरभ्यासयोगें प्रपंचाच्या विचारांचे अंकुर पार निरस्त होऊन जातात अशा स्वरूपाची वरच्या श्लोकांत वर्णन केलेली जी "अजाड्यनिद्रा" म्हणजे केवल चिदानंदरूप परिपूर्ण ब्रह्मावस्था, तिलाच या श्लोकांत "योगनिद्रा" असें नांव दिलेलें आहे. ज्या भाग्यवान् योग्याला या योगनिद्रेचा लाभ होतो तो योगी संकल्प-विकल्परहित असतो. संकल्प म्हणजे आपाततः रमणीय वाटणाऱ्या विषयांविषयीं अन्तःकरणांत निर्माण होणाऱ्या वृत्ति, आणि विकल्प म्हणजे शशशृंग, वन्ध्यापुत्र, आकाशकमल इत्यादि शब्द श्रवण केल्यानंतर निर्माण होणारी वृत्ति. त्या वृत्तीला विषय वस्तुतः नसतो. "शब्दज्ञानानुपाती वस्तुशून्यो विकल्पः" अशी योगसूत्रकारांनी विकल्पाची व्याख्या केलेली आहे. अज्ञान हेंच या संकल्प-विकल्पांचें मूळ आहे. तें अज्ञान ज्यांचें विच्छिन्न म्हणजे निरस्त झालेलें आहे, त्याचप्रमाणें ज्याच्या कर्ममालाचेंहि निःशेष निर्मूलन झालेलें आहे असा तो योगी अनंत जन्मांच्या कर्मसमूहांतून मुक्त झालेला असतो. ज्ञानाग्नीनें त्याची सर्व कर्में भस्म झालेली असतात. निरंतर आत्मस्वरूपाच्या अभ्यासानें म्हणजे चिंतनानें त्या योगी पुरुषाच्या ठिकाणीं प्रकट झालेली योगनिद्रा ही "नितान्तभद्रा" म्हणजे अत्यंत आनंदस्वरूप असते. आपल्या दैनंदिन जीवनांतील निद्रेहून ही निद्रा निराळी आहे, म्हणूनच या निद्रेला योगनिद्रा असें म्हटलेलें आहे. योग म्हणजे ब्रह्मज्ञान. "युज्यते अनेन इति योगः" ब्रह्मज्ञानानेंच जीवात्मा हा परमात्मस्वरूपाशीं संलग्न होतो, एकरूप होतो म्हणूनच ब्रह्मज्ञानाच्या परिपाकावस्थेंत सर्व

इंद्रियांच्या व्यापारांचा उपशम होतो. सर्व इंद्रियांचे व्यापार थांबतात म्हणूनच या अवस्थेला निद्रा असें नांव दिलें आहे. अशी ही योगनिद्रा योग्याच्या ठिकाणी "जृम्भते" म्हणजे प्रकाशत रहाते.

विश्रान्तिमासाद्य तुरीयतल्पे
विश्वाद्यवस्था-त्रितयोपरिस्थे ।
संविन्मयीं कामपि सर्वकालं
निद्रां सखे निर्विश निर्विकल्पाम् ॥ २६ ॥

मागील श्लोकांत अजाड्यनिद्रा, योगनिद्रा इत्यादि शब्दांनीं ज्या अवस्थेचें वर्णन केलें त्याच अवस्थेला या श्लोकांत निर्विकल्प चिन्मयनिद्रा असें नांव देऊन साधकाला मोठ्या प्रेमानें ही अवस्था प्राप्त करून घेण्याचा आचार्य आग्रह करीत आहेत. सखे हें संबोधन साधकाविषयीं आचार्यांच्या अंतःकरणांत असलेल्या नितान्त प्रेमाचें द्योतक आहे. हे मित्रा, असा त्या संबोधनाचा अर्थ आहे. हे सद्गृहस्था! अनादिकालापासून अत्यंत गहन असलेल्या या संसाररूपी अरण्यांत तूं भटकत आहेस. आतां विश्रांति घे, विश्व तैजस आणि प्राज्ञ या तीन अवस्थांच्याहि पलीकडे असलेली तुरीयावस्था ही-तुझ्याकरितां उत्तम सुखशय्या आहे. तल्प म्हणजे शय्या किंवा अंथरूण. जाग्रदवस्थेचा अभिमानी असलेला जो जीव त्याला विश्व असें म्हणतात. तोच जीव स्वप्नदशेंत प्रविष्ट झाला कीं त्याला तैजस असें नांव मिळतें. तोच सौषुप्तअवस्थेंत गेला कीं त्याला प्राज्ञ असें म्हटलें जातें. हीं सर्व जीवाला अवस्थाभेदानें प्राप्त झालेलीं पारिभाषिक नांवें आहेत. जागृति स्वप्न आणि सुषुप्ति, या तिन्ही अवस्थांच्या पलीकडची जी अवस्था आहे तिला तुर्या अथवा तुरीया असें म्हणतात. या तुरीयावस्थेचें अधिष्ठान असलेल्या चैतन्याला सर्वसाक्षी असें नांव दिलेलें आहे. आचार्य म्हणतात, बाबा रे, या तिन्ही अवस्थांच्या वर असलेल्या तुरीय अवस्थारूपी शय्येवर विश्रांति घेऊन "निर्विकल्पां" म्हणजे वृत्तिशून्य असलेली " काम् अपि " म्हणजे अनिर्वचनीय अशी जी संविन्मयी म्हणजे शुद्ध चैतन्यरूप अथवा नित्य निरतिशय आनंदरूप अवस्था, त्याच अवस्थेंत सर्वकाळ प्रविष्ट होऊन रहा. तात्पर्य, तूंहि चिदानंद ब्रह्मस्वरूप हो, मुक्त हो.

प्रकाशमाने परमात्मभानौ
नश्यत्यविद्या-तिमिरे समस्ते ।

अहो बुधा.निर्मल-दृष्टयोऽपि
किञ्चिन्न पश्यन्ति, जगत्समग्रम् ॥ २७ ॥

ब्रह्मसाक्षात्काराचा आनंद अनिर्वचनीय आहे. त्यांत तन्मय झालेल्याला दुसरें कांहीं दिसत नाहीं व सुचतहि नाहीं. अशा अभिप्रायानें ब्रह्मपदीं तन्मय झालेल्या योगी लोकांची अवस्था वर्णन करीत आहेत. " परमात्ममानौ प्रकाशमाने सति " आत्मा म्हणजे शुद्धचैतन्य. तें चैतन्य सर्व विश्वाला व्यापून असतें, विश्वरूपानें नटलेलें असतें व अंतीं सर्व विश्वाला आपल्या स्वरूपांत लीन करून घेत असतें म्हणून त्याला आत्मा असें म्हणतात. " अतति, अत्ति अथवा आदत्ते इति आत्मा " अशी आत्मशब्दाची व्युत्पत्ति आहे. तो आत्मा या जगांत सर्वापेक्षां श्रेष्ठ आहे. त्याच्याहून श्रेष्ठ असें या जगांत दुसरें कांहींच नाहीं म्हणून त्याला परम हें विशेषण दिलें जातें. शास्त्रें व तत्त्ववेत्ते त्याला परमात्मा असें म्हणतात. परमात्मा हाच कोणी भानु म्हणजे सूर्य. " भाति स्वयंप्रकाशते इति भानुः " दृश्य जगतांत सूर्य हा स्वयंप्रकाश असल्यामुळें त्याला भानु असें म्हणतात. तत्त्वतः परब्रह्म हेंच स्वयंप्रकाश असल्यामुळें खऱ्या अर्थानें भानु हा शब्द परब्रह्मालाच लागू पडतो. असा हा परमात्मभानु हृदयामध्यें प्रकाशूं लागला असतां, सूर्योदय झाल्याबरोबर जसा अंधकार मावळतो त्याचप्रमाणें परब्रह्मरूपी सूर्याचा हृदयांत प्रकाश पडल्याबरोबर अज्ञानरूपी समस्त तिमिर पार मावळतें. तो साधक स्वतःच स्वयंप्रकाश परब्रह्मस्वरूपी सूर्य बनतो !

" मावळतीत विश्वासु । नवल उदेला चंडांशु ।
अद्वयादिजनीविकासु । वंदूं आतां ॥
जो अविद्यारातीं कुसौनिया । गिळी ज्ञानाज्ञानचांदणियां ।
जो सुदिनु करी ज्ञानियां । स्वबोधाचा ॥

— ज्ञानेश्वरी अध्याय १६ ओ. १—२

अशा शब्दांत या अवस्थेचें श्रीज्ञानेश्वर महाराजांनी मोठ्या बहारीनें वर्णन केलेलें आहे. या ठिकाणीं नश्यति हें क्रियापद नसून अविद्यातिमिराचें तें वर्तमानकालवाचक धातुसाधित विशेषण आहे. परब्रह्मस्वरूपाच्या अपरोक्ष साक्षात्कारानें अंतःकरणांतील समस्त अविद्यारूपी तिमिराचा नाश झाला असतां ते साधक " निर्मलदृष्टि " होतात. " निर्मला दृष्टिर्येषां ते निर्मलदृष्टयः " दृष्टि म्हणजे

अपरोक्ष ज्ञान तें त्यांचें अत्यंत निर्मळ असतें. त्यांत दोषाचा – भ्रांतीचा लेशहि उरलेला नसतो. आतां खऱ्या अर्थानें ते "बुध" म्हणजे पंडित झालेले असतात. "बुध्यन्ते आत्मतया ब्रह्म इति बुधाः" अशी बुध शब्दाची व्याख्या आहे. "अयमात्मा ब्रह्म" असें ते खऱ्या अर्थानें जाणत असतात. म्हणून आचार्यांनी त्यांना बुध असें म्हटलेलें आहे. पंडित या शब्दांत घटक असलेल्या पंडाः या शब्दाचाहि अर्थ आत्मविषयक-बुद्धि असाच आहे. ढोंग म्हणून नव्हे तर खऱ्या अर्थानें सर्वत्र आत्मबुद्धीनें जे पहातात तेच खरे पंडित होत. त्यांनाच प्रकृत-स्थलीं बुध असें म्हटलेलें आहे. असे हे बुध म्हणजे ब्रह्मसाक्षात्कारी मुक्त झालेले लोक. त्यांच्या पुढें हें समग्र म्हणजे संपूर्ण अफाट जग विराजत असूनहि, आणि त्यांची दृष्टि निर्मल झालेली असूनहि ते या जगाकडे किंचित् म्हणजे तिळमात्र पहात नाहींत. आत्मस्वरूपाहून व्यतिरिक्त असें या जगांत त्यांना कांहींच दिसत नाहीं. काय हें आश्चर्य आहे! अशा थोर महात्म्यांच्या संगतींत शुद्धबुद्धीनें जे जातात तेहि तेच होतात! "आपणासारिखे करिती तात्काळ। नाहीं काळ वेळ तया लागी॥" अशा महात्म्यांचें काय वर्णन करावें?

"ब्रह्मानन्द-रसाऽऽढ्यो ब्रह्मानन्दैक-चिद्घनः।
ब्रह्मानन्द-रसोद्वाहो ब्रह्मानन्दरसम्भरः॥
ब्रह्मानन्दजनैर्युक्तो ब्रह्मानन्दात्मनि स्थितः।
आत्मरूपमिदं सर्वं; आत्मनोऽन्यं न किंचन॥"

ब्रह्मानंदाच्या रसांत ते स्वयं निमग्न झालेले असतात. ते स्वतःच केवळ चैतन्यघन ब्रह्मानंदरूपच बनलेलें असतात. ते जनतेवर निरंतर ब्रह्मानंदरसाचा वर्षाव करीत असतात. ब्रह्मानंदाच्या रसानें भरलेले ते मूर्तिमंत मेघच असतात. ते ब्रह्मानंदरूपी जलाचे सागर असतात. ब्रह्मानंदस्वरूप आत्म्याच्या ठिकाणीं तें निश्चल झालेले असतात. हें सर्व आत्मस्वरूपच आहे. आत्म्याहून निराळें असें कांहींच नाहीं. अशीच त्यांची अवस्था झालेली असते.

सिद्धिं तथाविध-मनो-विलयां समाधौ
श्रीशैल-शृङ्ग-कुहरेषु कदोपलप्स्ये।
गात्रं यदा मम लताः परिवेष्टयन्ति
कर्णे यदा विरचयन्ति खगाश्च नीडान्॥ २८॥

"तथाविधमनोविलयां" म्हणजे योगतारावलीत आतापर्यंत वर्णन केलेल्या पद्धतीप्रमाणें, ज्या अवस्थेंत मनाचा पूर्णपणें लय होऊन गेलेला आहे अशी ब्रह्मसाक्षात्काररूप सिद्धि जिला तुर्यातीत अवस्था म्हणतात, ती मला केव्हां बरें प्राप्त होईल ? श्रीशैल पर्वताच्या शिखरांवरील गुहांतून मी समाधि लावून बसलों आहे. माझा जीवात्मा परमात्मस्वरूपाशीं एकरूप झालेला आहे. मनांतील संकल्प-विकल्परूपी विकार सगळे मावळलेले आहेत. मन निर्विकार झालेलें आहे. इंद्रियांचे सर्व व्यापार शांत झालेले आहेत. सर्व विषयांचें विस्मरण होऊन अंतःकरण ब्रह्मस्वरूपाशीं अगदीं तदाकार झालेलें आहे. अशा उच्चतम समाधिअवस्थेंत मी केव्हां बरें प्रविष्ट होईन ?

"निर्विकारतया वृत्त्या ब्रह्माकारतया पुनः।
वृत्तिविस्मरणं सम्यक् समाधिरभिधीयते ॥"

अशा स्वरूपाच्या समाधिअवस्थेचा मला केव्हां बरें लाभ होईल ? समाधिअवस्थेंत शरीर निश्चल झाल्यामुळें माझ्या देहाला लता, वेली सर्व बाजूंनीं वेष्टित आहेत अशी अवस्था मला केव्हां बरें प्राप्त होईल ? त्याचप्रमाणें माझ्या कानांमध्यें पक्षी निर्भयपणानें घरटीं बांधीत आहेत अशी अवस्था मला केव्हां बरें येईल ? तात्पर्य, या अवस्थेला पोहोंचलेले महात्मे धन्य होत.

कांहीं लोक श्रीशैल शब्दाचा अर्थ मूर्धस्थानीं असलेलें सहस्रदल कमल असा करतात. "श्रीपर्वतः शिरःस्थाने" असा मंत्रशास्त्रांतील संकेतहि आहे. मात्र शब्दानें विराट् देहाची कल्पना करून भूतभौतिक विश्वप्रपंचाला लतास्थानीं कल्पितात. खग शब्दाचा अर्थ आकाशांत संचार करणारे चंद्र, सूर्य, ग्रह, नक्षत्रें असा करून नीड शब्दाचा अर्थ त्यांचीं स्थानें असा करतात. तात्पर्य, मला विराट् स्वरूपाची अवस्था केव्हां बरें प्राप्त होईल? "प्रज्ञेनात्मना सम्परिष्वक्तो न बाह्यं किञ्चन वेद नान्तरम्" इत्यादि वाक्यांनीं बृहदारण्यकांत वर्णन केलेली अवस्था मला केव्हां बरें प्राप्त होईल? असाहि या श्लोकाचा अभिप्राय असल्याचें प्रतिपादन केलें जातें. वस्तुतः योगतारावली येथें समाप्त झाली. कांहीं पोथ्यांतून खाली दिलेला श्लोक अधिक आढळतो.

विधरतु मतिरेषा निर्विकल्पे समाधौ
कुचकलशयुगे वा कृष्णसारेक्षणानाम्।

चरतु जडमते वा सज्जनानां मते वा
मतिकृतगुणदोषा मां विभुं न स्पृशन्ति ॥ २९ ॥

माझी ही बुद्धि निर्विकल्पसमाधीमध्ये स्थिर राहो अथवा मृगांगनेप्रमाणें विलोलदृष्टि असलेल्या तरुण स्त्रियांच्या कुचकलशयुगलावर संचार करो, ती सज्जनांच्या मतांत संचार करो अथवा जडवाद्याच्या मतांमध्यें संचार करो. बुद्धीच्या गुणदोषांचा माझ्याशीं कांहीं संबंध नाहीं. बुद्धि ही भौतिक आहे, तर मी भूतातीत आहें. मी सर्वातीत निर्गुण, निराकार, निर्विकार परिपूर्ण परब्रह्मस्वरूप आहें.

आत्मसाक्षात्कारी असलेल्या यथार्थ तत्त्ववेत्त्याच्या दृष्टीनें सर्व विश्व आणि विश्वांतील व्यवहार त्याचप्रमाणें स्वतःचा देह, इंद्रियें आणि त्यांच्याकडून होणारे व्यवहार हे सर्वच ब्रह्मरूप झालेले असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं ब्रह्मव्यतिरिक्त भावनाच नसते. अशा स्थितींत त्याच्या व्यवहाराकडे इतरांनीं व्यवहारबुद्धीनें पाहिलें, तरी त्याच्या दृष्टीनें खरोखरच भेदबुद्धि मावळलेली असेल, तर आचार्यांनीं सांगितल्याप्रमाणें त्याची बुद्धि कोठेंहि संचार करो, त्याला त्याचा कांहीं दोष नाहीं. लोकांनीं त्याला नांवें ठेवलीं तरी ते ठेवोत बिचारे ! जीवन्मुक्ताला त्याचें काय सुखदुःख ? तांबड्यालाल गुंजांचा ढीग पाहून एखाद्यानें त्या ठिकाणीं रखरखित निखारे आहेत अशी जरी कल्पना केली,तरी गुंजांचा ढीग हा कांहीं निखारे होऊं शकत नाहीं. जीवन्मुक्तांच्या व्यवहारांकडे इतरांनीं व्यवहारबुद्धीनें पाहिलें, तरी ते व्यवहार व्यवहार होऊं शकत नाहींत. तत्त्ववेत्ता आणि त्याचे व्यवहार सर्व ब्रह्मस्वरूपच असतात.

काशीच्या तैलंगबाबांना ते नागडे उघडे शहरांत फिरतात म्हणून लोकांच्या सांगण्यावरून पोलिसांनीं पकडलें. न्यायाधीशापुढें उभें केलें. अधिक विचारा-करितां आठ दिवसांची मुदत मागून घेतली. तुरुंगाच्या कोठडींत कोंडून ठेवलें. कडेकोट बंदोबस्त होताच. दुसऱ्या दिवशीं सकाळीं कोठडींत पहातात, तर बाबा नाहींत ! कोठेंहि भिंतीला भगदाड नाहीं. छताला छिद्र नाहीं. दाराला मणगटासारखे गज आणि त्यांना शोभणारें तसेंच जाड कुलूप. हें सर्व जेथल्या तेथें सुव्यवस्थित होतें ! "अरे ! बाबा गये ! देखो. दौडो. पकडो." धांवपळ सुरू झाली ! पहातात तर बाबा आपले पंचगंगा घाटावर मुलावाळांच्या घोळक्यांत रमलेले आहेत ! पुन्हां पकडलें. मॅजिस्ट्रेटपुढें उभें केलें. आठ दिवसांची मुदत मागून घेतली. कोठडींत त्यांना

कोंडून ठेवलें. दुसऱ्या दिवशीं पहातात, तर पुन्हां तोच प्रकार ! शेवटीं न्यायाधीशानें सांगितलें कीं, यांच्यावर खटला भरून यांना काय शिक्षा देणार ? कायद्यांत फक्त सश्रम कारावासाची तरतूद आहे. आज आठ दिवस तुम्ही त्यांना कोंडून ठेवीत आहां, त्याचा काय उपयोग झाला ! मग मी यांना शिक्षा सुनावली तरी त्याचा काय उपयोग ! मी यांना सोडून देतों. ही गोष्ट सांगण्याचा हेतु एवढाच कीं, जीवन्मुक्तांच्या व्यवहाराकडे कोणी कितीहि सदोष बुद्धीनें पाहिलें तरी त्यांचे व्यवहार सर्वस्वीं निर्दोषच असतात. सर्व व्यवहारांकडे ते ब्रह्मबुद्धीनेंच पहात असतात.

वस्तुस्थिति अशी आहे कीं, आचार्यांनीं योतारावलींत वर्णन केल्याप्रमाणें साधक हा क्रमाक्रमानें यमनियमादिकांचा अभ्यास करीत विवेकानें व वैराग्यानें आसनें व प्राणायाम यांच्या साहाय्यानें नाडीशुद्धि करून घेतो. बंधत्रयाच्या अभ्यासानें कुंडलिनी-शक्ति जागृत करून सुषुम्नानाडीद्वारां प्राणवायूला मनासह षट्चक्रांचा भेद करीत अनाहतनादाचें अनुसंधान करीत रहातो. शेवटीं त्याची कुंडलिनी, नाद, प्राणवायु आणि मन हीं सर्व सहस्रदलकमलांतील चिदाकाशांत लीन होतात. शेवटीं तो साधक उन्मनी, मनोन्मनी भावाला प्राप्त होतो. त्याची मुद्रा सहज अमनस्क स्वरूपाची बनलेली असते. अशा या अवस्थेंत – जीवन्मुक्त दशेंत प्राप्त झाल्यानंतर त्याची बुद्धि मलिन आणि तुच्छ विषयांत कशी रमेल ? त्याची बुद्धि जडवादी नास्तिकांच्या मनांत कशी रमेल ? जीवन्मुक्त अवस्थेंत येईपर्यंत त्याच्या देहाला, इंद्रियांना व मनाला जें विवेकाचें व वैराग्याचें वळण लागलेलें असतें, त्याचा देह इंद्रियें आणि मन यांच्यावर जे चांगले संस्कार सतत अभ्यासानें दृढ झालेले असतात तेच संस्कार त्याचें देहभान हरपलें तरी तसेंच प्रकट होत रहातात. "पडिलें वळण इंद्रियां सकळां, भाव तो निराळा नाहीं दूजा." असा हा वर्षानुवर्षे निरंतर केल्या जाणाऱ्या अभ्यासाच्या संस्काराचा परिणाम अटळ असतो. कित्येक वेळेला आपली बुद्धि नसली तरी देहेंद्रियादिकांचे व्यवहार हे संस्कारा-प्रमाणेंच नकळत होत रहातात. अशा स्थितींत साधक ज्या उत्तम अभ्यासांनी सिद्धावस्थेला पोहोंचलेला असतो ते त्याचे उत्तम अभ्यासानें झालेले उत्तम संस्कार तो सिद्ध झाला तरी कायमच रहातात. साधकअवस्थेंतील सत्प्रवृत्तीच्या रूपानें होणारें इंद्रियादिकांचे व्यवहार हे साधनरूप असतात, तर सिद्धअवस्थेंत पोहोंचल्या-नंतर तेच सत्प्रवृत्तीचे व्यवहार स्वाभाविक रूपानेंच होत रहातात. तात्पर्य, सिद्ध अथवा जीवन्मुक्त झालेल्यांच्या हातून सहसा विपरीत आचार होणार नाहींत हें

लक्षांत घ्यावें. त्याच्या हातून विपरीत आचरण घडत असेल तर तो जीवन्मुक्त तत्त्ववेत्ता नव्हेच. ज्ञानामृतानें तृप्त आणि कृतकृत्य झालेल्या योग्याला आपण विषयांमध्यें रमावें अशी वासनाच उत्पन्न होणें शक्य नाहीं. विषय संपादण्याचें अथवा भोगण्याचें त्याला कांहीं कर्तव्यहि उरत नाहीं. तसें कांहीं असेल तर तो तत्त्ववेत्ताच नव्हे. " ज्ञानामृतेन तृप्तस्य कृतकृत्यस्य योगिनः । नैवास्ति किञ्चित् कर्तव्यमस्तिचेन्न स तत्त्ववित् " असा तत्त्ववेत्त्यांचा स्पष्ट अभिप्राय आहे. ब्रह्मज्ञानी होऊनहि चित्तवृत्ति विषयासक्त होत असेल तर " निष्फलं ब्रह्मदर्शनम " असाहि इशारा तत्त्ववेत्त्यांनीं दिलेला आहे. अर्थवाद आणि वस्तुस्थिति यांतील अंतर लक्षांत घेणें आवश्यक आहे.

■ ■ ■

दशश्लोकी

[भक्ति, ज्ञान, वैराग्य, उपासना, योग, याग, जप, तप, पूजा, अनुष्ठान इत्यादि सर्व साधनें हीं आत्मस्वरूपाच्या यथार्थ साक्षात्कारासाठीं आहेत. आत्मस्वरूपाचा यथार्थ साक्षात्कार झाल्याशिवाय जिवाची सर्व दुःखांतून सुटका होत नाहीं आणि सर्व दुःखांतून सुटका झाल्याशिवाय जिवाला आत्यंतिक समाधानहि लाभत नाहीं. हाच अभिप्राय लक्षांत घेऊन जिवाची सर्व दुःखांतून सुटका व्हावी व त्यांना पूर्ण समाधान लाभावें म्हणून आचार्यांनीं या दशश्लोकीची रचना केलेली आहे. या दशश्लोकीलाच कोणी निर्वाणदशक असेंहि म्हणतात. निर्वाण शब्दाचा अर्थ शांति, समाधान, सुख किंवा आनंद असा आहे. या दहा श्लोकांच्या मननानें आत्म्याचें खरें स्वरूप लक्षांत येऊन मनाला शांति मिळते, समाधान वाटतें, आनंद होतो. म्हणूनच या दहा श्लोकांना निर्वाणदशक असें नांव देण्यांत आलेलें आहे.

असें सांगतात कीं, भगवत्पूज्यपाद श्रीमत् आद्य शंकराचार्य हे गुरूचा शोध करीत नर्मदेच्या कांठीं हिंडत होते. अखेर त्यांना एका गुहेंत परम विरक्त श्रेष्ठ योगी आणि ज्ञानी असलेले भगवत्पूज्यपाद श्रीगोविंदयति यांचें दर्शन झालें. आचार्य साष्टांग प्रणिपात करून पुढें उभे राहिले. त्या वेळेला गोविंदयतींनीं

आचार्यांना विचारलें कीं, बाळ कोण आहेस तूं ? त्यांचा हा प्रश्न ऐकून आचार्यांनी जें उत्तर दिलें तेंच या दशश्लोकीच्या रूपानें ग्रथित केलें आहे. आत्म्याच्या यथार्थ स्वरूपाची प्रतीति येईल अशीच रचना या श्लोकांची आहे. हे दहा श्लोक पाठ करून वाचकांनीं त्यांच्या अर्थाचें अवश्य मनन करावें.]

न भूमिर्न तोयं न तेजो न वायु-
र्न खं नेन्द्रियं वा न तेषां समूहः ।
अनैकान्तिकत्वात् सुषुप्त्येकसिद्ध-
स्तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम् ॥ १ ॥

या श्लोकाचा अर्थ पहाण्यापूर्वी आपण जरा याच्या पूर्वपीठिकेचा विचार करूं. साधकांना आत्मज्ञान व्हावें आणि त्यांची सर्व दुःखांतून मुक्तता व्हावी म्हणून या श्लोकांची रचना आहे. यावर कोणी असें विचारील कीं, आत्म्याचें ज्ञान सर्वांनाच असतें, पण कोणी दुःखांतून मुक्त झालेला दिसत नाहीं. जगांतील सर्व पदार्थांचा उल्लेख तो, ती, तें किंवा हा, ही, हें या शब्दांनीं आपण करीत असतों. या उल्लेखावरून जग हें आपल्याहून निराळें आहे व आपण जगाहून निराळें आहोंत हें आपल्या प्रतीतीला आलेलेंच असतें. जग दृश्य आहे तर आपण द्रष्टे आहोंत. जग भोग्य आहे तर आपण भोक्ते आहोंत. हें तुम्हा-आम्हांला सर्वांनाच कळत असतें. यावरून आपल्याला आत्मज्ञान असतें, पण आपली दुःखांतून मुक्तता झालेली नसतें, ही गोष्ट उघड आहे. अशा स्थितींत जें आपल्याला कळलेलें आहे आणि ज्याचा कांहीं उपयोग नाहीं तेंच जर ही दशश्लोकी सांगत असेल तर ही निरर्थक दशश्लोकी आचार्यांनीं कां लिहिली ?

वरवर पहातां हा आक्षेप बरोबर आहे असें वाटत असलें, तरी सूक्ष्म विचाराअंतीं या आक्षेपांत कांहीं अर्थ नाहीं असेंच दिसून येईल. एखाद्या अज्ञानी मूर्खापासून तों महापंडितापर्यंत सर्वांना आत्मज्ञान असतें. सर्वच मी मी अशा शब्दानें व्यवहार करीत असतात; पण एवढ्यावरून ते आत्मज्ञानी असतात असें मात्र म्हणतां येत नाहीं. तें खरें आत्मज्ञान नव्हेच; आणि म्हणूनच त्या आत्मज्ञानानें दुःखांचाहि निरास होत नाहीं. उलट भ्रांत स्वरूपांतलें तें आत्मज्ञान अधिकच दुःखाला कारणीभूत असतें. आचार्यांच्या दशश्लोकीचें स्वरूप मात्र असें आहे कीं, या दशश्लोकीच्या मननानें शुद्ध आत्मस्वरूपाचें यथार्थ ज्ञान होऊन

सर्व दुःखांचाहि निरास होतो. म्हणूनच हे दहा श्लोक जिज्ञासू जनांना अत्यंत उपयुक्त आहेत यांत शंकाच नाही.

मी मी असा आपण नेहमीच व्यवहार करीत असतो, पण हा मी कोण आहे ? याचें यथार्थ स्वरूप काय आहे ? हें आपणाला खऱ्या अर्थानें कळलेलेंच नसतें. त्या मीचें खरें ज्ञान "तत्त्वमसि" "अहं ब्रह्मास्मि" "अयमात्मा ब्रह्म" "प्रज्ञानं ब्रह्म" या वेदांतील प्रसिद्ध असलेल्या महावाक्यांनींच व्हावयाचें असतें. सद्गुरु, संत आणि महात्मे हे देखील याच वाक्यांच्या आधारें आपल्याला मीची अर्थात यथार्थ आत्मस्वरूपाचीच ओळख करून देत असतात. वाक्यार्थज्ञानाला वाक्यांत घटक असलेल्या शब्दांच्या अर्थांचेंहि ज्ञान आवश्यक असतें. वेद-वाक्यांतील शब्दांचें यथार्थ ज्ञान हे वेदांच्या अथवा शास्त्रांच्या साहाय्यानें करून घ्यावयाचें असतें. तें स्वतःच्या बुद्धीनेंच कोणी करून घेऊं म्हणेल तर तें नेहमी बरोबरच होईल असा नियम नाहीं. याच अभिप्रायानें "नैषा तर्केण मतिरापनेया" हें ज्ञान केवल तर्कानेंच मिळवितां येईल असें नाहीं, हें कठोपनिषदानें स्पष्टच सांगितलेलें आहे.

शब्दाचे अर्थ दोन प्रकारचे असतात. एक वाच्यार्थ आणि एक लक्ष्यार्थ. जेथें वाच्यार्थानें वाक्याचा अर्थ बरोबर लागत नसेल त्या ठिकाणीं लक्ष्यार्थ घेऊन वाक्याचा अर्थ करतात. "हिमालय आला" असें आपण म्हणतों. हिमालय शब्दाचा वाच्यार्थ हिमालय पर्वत असा आहे. हिमालय पर्वत हा कोठें जात नाहीं व येत नाहीं. तेव्हां हिमालय शब्दाचा अर्थ हिमालय पर्वत असा केल्यास वाक्याचा अर्थ बरोबर होत नाहीं. म्हणून हिमालय या शब्दाचा हिमालय पर्वत असा अर्थ न करतां लक्षणेनें हिमालय पर्वतावर रहाणारे लोक असा अर्थ केला जातो. "हिमालय आला" याचा अर्थ हिमालयांत रहाणारे अथवा हिमालयांत प्रवास करणारे लोक आले असा केला जातो व तोच अर्थ बरोबर असतो. या रीतीनें "तत्त्वमसि" "अहं ब्रह्माऽस्मि" इत्यादि महावाक्यांच्या अर्थांचा विचार करावा लागतो.

"तत्त्वमसि" या वाक्यांत तत्, त्वं आणि असि असे तीन शब्द आहेत. यांतील तत् शब्दाचा अर्थ जगत्कर्ता म्हणून प्रसिद्ध असलेला ईश्वर असा आहे. त्वं शब्दाचा अर्थ देहांत नांदणारा, ज्याला आपण मी म्हणतों, तो आहे. असि शब्द हा त्या दोघांचें ऐक्य सांगत आहे. आतां जगाचा कर्ता ईश्वर हा सर्वज्ञ

आणि सर्वशक्तिमान् आहे. देहांत राहणारा जीवात्मा मी हा तर अल्पज्ञ आणि अल्पशक्तिमान् आहे. या दोघांचें ऐक्य कसें संभवणार ? सर्वज्ञत्व आणि अल्पज्ञत्व तसेंच सर्वशक्तिमत्त्व आणि अल्पशक्तिमत्त्व हे दोन्ही धर्म परस्पर विरुद्ध आहेत. त्यांचें ऐक्य कसें असूं शकणार ? अशा रीतीनें तत् शब्दाचा आणि त्वं शब्दाचा केवळ वाच्यार्थ घेऊन "तत्त्वमसि" या वाक्याचा अर्थ बरोबर लागत नाही. याकरितां "सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म" या श्रुतिवाक्यानें सांगितलेलें शुद्धचैतन्य हाच तत् आणि त्वं या दोन्ही शब्दांचा लक्ष्यार्थ येथें घेतला जातो. अशा रीतीनें जीवात्मा आणि परमात्मा या देहोंमधील आत्मा हा एकच असल्यामुळें आणि या शब्दानें त्यांचें जें ऐक्य सांगितलें आहे तें योग्यच आहे. तात्पर्य, जीवात्मा आणि परमात्मा यांच्यामध्यें केवळ उपाधीमुळें भेद निर्माण झालेला आहे. विवेकानें तो उपाधि बाजूला केला कीं, तुझ्यांत आणि त्याच्यांत तत्त्वतः कांहीं भेद नाहीं. तोच तूं आहेस आणि तूंच तो आहे. तो आणि तूं दोघें एकरूप आहां, हा "तत्त्वमसि" या महावाक्याचा अर्थ होतो व तोच बरोबर आहे. यालाच शास्त्रामध्यें अखंड वाक्यार्थबोध असें म्हणतात. (लक्षणाविचार सु. श्लो. संग्रह, भाग १, पान २५० ते २५३ पहा.)

आतां यावर कोणी अशी शंका घेईल कीं, "तत्त्वमसि" "अहं ब्रह्मास्मि" इत्यादि महावाक्यांचा शास्त्रोक्त अर्थ कळला म्हणजे आपल्याला आत्मज्ञान होतच असतें. मग आत्मज्ञानाकरितां पुन्हां मनन, निदिध्यासन अथवा या श्लोकांचा विचार करण्याची काय आवश्यकता आहे ? शास्त्रें ही प्रमाणभूत असल्यामुळें त्यांच्या साहाय्यानें होणारें ज्ञान हें यथार्थच असणार. मग या यथार्थ आत्मज्ञानानें आमचीं सर्व दुःखें निवृत्त कां होत नाहींत ? यावर उत्तर असें कीं, महावाक्यांच्या अर्थाचें यथार्थ ज्ञान झालें तरी तेवढ्यानें तें ज्ञान चित्तामध्यें दृढ ठसत नसतें. आपल्या बुद्धीवर अनंत जन्मांतले मलिन संस्कार अगदीं पक्के ठसलेले असतात. त्यांचें निरसन लवकर होत नसतें. त्यामुळें आपल्याला झालेल्या ज्ञानाच्या विरुद्ध कांहीं कोठें वाचलें अथवा ऐकलें कीं लगालीच मनांत संशय निर्माण होतात. मननाच्या अभावीं ते संशय बळावतात. मनामध्यें असंभावना आणि विपरीत भावना यांचें काहूर निर्माण होतें व त्यामुळें आपल्याला झालेलें आत्मज्ञान निष्फळ ठरतें. म्हणूनच त्या आत्मज्ञानानें आपल्या दुःखांचा निरास होत नाहीं व मनाचें समाधानहि होत नाहीं. याकरितां

महावाक्यांनीं आत्मस्वरूपाचें यथार्थ ज्ञान झालें तरी त्यानंतर मननाची अत्यंत आवश्यकता असतें. तें मननच या दशश्लोकीनें होत असल्यामुळें दशश्लोकीच्या अर्थाचा पुनः पुन्हां विचार करणें अत्यंत आवश्यक आहे.

आत्मस्वरूपाचा अपरोक्ष साक्षात्कार हा मननानेंच व्हावयाचा असतो. अपरोक्ष साक्षात्काराशिवाय सर्व दुःखांची निवृत्ति होत नसते. मननाच्या पूर्वकालीं असलेलें आत्मज्ञान हें परोक्ष स्वरूपाचें असल्यामुळें त्याच्या योगानें मनाला पूर्ण समाधान लाभत नाहीं. सातारचे पेढे, आग्र्याचा पेठा, काशीची रबडी आणि कलकत्त्याचे रसगुल्ले हे उत्तम असतात असें आपल्याला कळलें. हे न्या पदार्थांचें परोक्ष ज्ञान होय. या परोक्ष ज्ञानानें कोणाचेंहि समाधान होत नसतें. ते पदार्थ प्रत्यक्ष पोटभर खावयास मिळाले म्हणजेच आनंद वाटतो. याच ज्ञानाला त्या पदार्थांचें अपरोक्ष ज्ञान असें म्हणतात. याच न्यायानें आत्मतत्त्व हें अजर आहे, अमर आहे, निराकार आहे, निर्विकार आहे, तें कधीं गळत नाहीं, बुडत नाहीं, सडत नाहीं, तुटत नाहीं, फुटत नाहीं. तें सर्वत्र ओतप्रोत भरलेलें आहे, अखंड आहे, अनंत आहे. तें आनंदमय आहे. हें सर्व उपनिषदांतील वाक्यांवरून कळतें, पण हें सारें परोक्ष ज्ञान आहे. यानें कधींच समाधान होत नाहीं. युक्तिप्रयुक्तीनें अथवा साधक-बाधक प्रमाणांनीं त्यांचा वरचेवर विचार केल्यानंतरच अर्थात् दीर्घकाल केलेल्या मननानेंच तें तत्त्व मनावर ठसतें. तेव्हां आपल्याला अत्यंत आनंद वाटतो. समाधान वाटतें. हेंच आत्म्याच्या अपरोक्ष ज्ञानाचें स्वरूप होय. आत्मस्वरूपाचा अपरोक्ष साक्षात्कार ज्याला झाला त्याला मरणाचें भय उरत नाहीं. तो संकटांना डरत नाहीं. मनोविकारांना हार जात नाहीं. कधीं कोणाचा मत्सर करीत नाहीं. तो सदासर्वकाळ आनंदांत असतो.

व्यवहारामध्यें आपल्याला मी या शब्दानें जें आत्म्याचें ज्ञान झालेलें असतें तें खरें आत्मज्ञान नव्हे. अनात्मस्वरूप असलेल्या देह, इंद्रियें, प्राण, मन आणि बुद्धि यांपैकीं कोणाला तरी उद्देशून आपण मी या शब्दाचा प्रयोग करीत असतों. चांगले चांगले शास्त्रज्ञहि मीच्या स्वरूपाचा विचार करतांना भ्रमले आहेत, तेथें आपली कथा काय ? पृथ्वी, जल, तेज आणि वायु या चार महाभूतांचा विशिष्ट परिणाम म्हणजेच मी, आत्मा अथवा जीव होय, असें चार्वाक म्हणतात. कांहीं शास्त्रज्ञ इंद्रियात्मवादी आहेत. त्यांच्या मतें कान, नाक, डोळा इत्यादि इंद्रियें हीं आत्माच होत. अर्थात् एका देहांत अनेक आत्म्यांचें

अस्तित्वहि ते मानतात. कांही लोक सर्व इंद्रियांचा मिळून एकच अत्मा मानतात. सर्व इंद्रियांचा राजा असलेलें मन हाच आत्मा होय असें कांही म्हणतात, तर कांही लोक प्राणालाच आत्मा म्हणजे मी असें समजतात. कांही बौद्ध क्षणिक विज्ञानाला आत्मा मानतात, तर कांही बौद्ध शून्यात्मवादी आहेत. ते शून्यालाच आत्मा म्हणजे मी असें समजतात. आत्मा हा देह आणि इंद्रियें यांच्याहून निराळा असून तो देहाच्या आकाराप्रमाणें परिणत होणारा आहे. तथापि तो देहाप्रमाणें विनाशी नाहीं म्हणून त्याला परिणामिनित्य असें म्हणतात, असें जैनांचें मत आहे. आत्मा हा या शरीरांत राहून सर्व कर्मे करतो म्हणून त्याला कर्ता असें म्हणतात. सुखदुःखांच्या रूपानें कर्मांचीं फळें भोगतो म्हणून त्याला भोक्ता असेंहि म्हणतात. तो द्रव्यस्वरूप आहे. ज्ञान हा त्याचा एक गुण आहे म्हणूनहि त्याला जड म्हणतात. तो जगांतील सर्व मूर्त द्रव्यांशीं – वृक्ष, लता, वेली, नद्या, सागर, डोंगर, घरेंदारें, घट, पट इत्यादि सर्व पदार्थांशीं संयुक्त असतो म्हणून त्याला विभु म्हणजे व्यापक असें म्हणतात. असें वैशेषिकांचें, नैयायिकांचें आणि प्राभाकरांचें मत आहे. कुमारिलभट्टांच्या संप्रदायांतील मीमांसक हे तर आत्मा जडहि आहे व ज्ञानस्वरूपहि आहे असें मानतात. ज्ञानाचा तो विषय होत असल्यामुळें विषयांशानें आत्म्याला ते जड मानतात व ज्ञानाचा आश्रयहि तोच असल्यामुळें आश्रयांशानें ते आत्म्याला बोधरूपहि मानतात. नैयायिक किंवा वैशेषिक यांच्या मताप्रमाणें ज्ञान हा आत्म्याचा गुण नसून, तो एक आत्म्याचाच अंश होय असें मीमांसकांचें म्हणणें आहे. सांख्य-तत्त्ववेत्ते आणि योग-तत्त्ववेत्ते हे आत्म्याला वेदान्त्याप्रमाणें केवल ज्ञानस्वरूप मानतात, पण तो सुखदुःखादिकांचा भोक्ताहि आहे असें मानतात. वेदान्ती मात्र आत्म्याला भोक्ता मानीत नाहींत. त्यांच्या मतें केवळ अविद्येमुळें आत्म्याच्या ठिकाणीं कर्तृत्व आणि भोक्तृत्व भासतें. तत्त्वतः ते त्याच्या ठिकाणीं नाहींत. आत्म्याच्या ठिकाणीं सुखदुःख, इच्छा, द्वेष, धर्म, अधर्म, कर्तृत्व आणि भोक्तृत्व इत्यादि कोणतेहि धर्म तत्त्वतः नाहींत. तो नित्य-निरतिशय आनंदरूप आहे. तो परमानंदरूप आहे असें अद्वैत वेदान्त्यांचें म्हणणें आहे. हाच आचार्यांचा सिद्धान्तपक्ष आहे. हाच उपनिषदांचाहि सिद्धान्त आहे.

उपनिषदांत प्रतिपादन केलेल्या आत्म्याच्या यथार्थ स्वरूपाचा साक्षात्कार होण्याकरितां वर वर्णन केलेल्या विरुद्ध मतांचें निरसन होणें अत्यंत आवश्यक

आहे. याच अभिप्रायानें आचार्य विरुद्ध मतांचें सयुक्तिक तार्किक पद्धतीनें खंडण करण्याकरितांच या दशश्लोकीला आरंभ करीत आहेत. "न भूमिर्न तोयं न तेजो न वायुः" इत्यादि. "तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम्" अहं म्हणजे मी. अर्थात् मी या शब्दानें प्रतीतीला येणारें तत्त्व एक म्हणजे अद्वितीय आहे. "अवशिष्ट" म्हणजे सर्व द्वैत प्रतीतींचा बाध झाल्यानंतर शिल्लक राहिलेला, ज्याचा कधींहि बाध होत नाहीं असा जो कोणी तोच मी आहें. "शिव" म्हणजे मंगलमय परमानन्दरूप मी आहें. "केवल" म्हणजे शुद्ध सकल संसार-धर्म-रहित. तात्पर्य, सर्वांचा नाश झाला तरी शिल्लक रहाणारा, एकमेव अद्वितीय शुद्ध मंगलमय आनंदरूप असा जो कोणी आहें तोच मी आहें. असा या दशश्लोकींतील प्रत्येक श्लोकाच्या चौथ्या चरणाचा अर्थ आहे.

पहिल्या चरणानें चार्वाकांचें व बौद्धांचें खंडण करीत आहेत. चार्वाकांनीं पृथ्वी, जल, तेज आणि वायु हीं चारच तत्त्वें मानलेलीं आहेत. गूळ आणि दहीं एकत्र केलें कीं त्या ठिकाणीं जशी मादकता निर्माण होते, त्याचप्रमाणें वरील चार भूतें एकत्र झालीं म्हणजे त्यांचा जो विशिष्ट परिणाम दृग्गोचर होतो त्यालाच आपण आत्मा किंवा मी असें म्हणतों, असें चार्वाक म्हणतात. पण हें त्यांचें म्हणणें बरोबर नाहीं. काय, पृथ्वी म्हणजे मी ? का, जल म्हणजे मी ? का, तेज म्हणजे मी ? का, वायु म्हणजे मी ? कोण मी ? मी पृथ्वी नव्हे. मी जल नव्हे. मी तेज नव्हे आणि मी वायूहि पण नव्हे. मी यांतील कोणीच नाहीं. आणि मी जो कोणी आहें ते हे नव्हेत. त्यांचें आणि माझें परस्पर तादात्म्य असें कांहींच नाहीं.

यावर कोणी असें म्हणेल कीं, चार्वाक हे पृथ्वी, जल, तेज आणि वायु या प्रत्येकाला आत्मा म्हणत नाहींत तर ते चारी मिळून आत्मा बनतात, असें त्यांचें म्हणणें आहे. पण हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण या चारींतील प्रत्येक आत्मा होऊं शकत नाहीं तर मग चारी मिळून तरी आत्मा कसें होऊं शकतील ? यावर चार्वाक असें म्हणतील की अहो ! गूळ आणि दहीं यांपैकीं कोणांतहि मादकता नाहीं पण ते दोन्ही एकत्र केले कीं, तेथें मादकता निर्माण होते. त्याच-प्रमाणें पृथ्वी, जल, तेज आणि वायु या चारी भूतांमध्यें चैतन्यशक्ति नाहीं पण तीं चारी भूतें एकत्र केलीं कीं तेथें चैतन्यशक्ति निर्माण होतें असें आमचें म्हणणें आहे. यावर आचार्य म्हणतात, हें म्हणणें बरोबर नाहीं. चारी भूतें एकत्र

झाली म्हणजे जी चैतन्यशक्ति निर्माण होते असें तुम्ही म्हणतां, ती चैतन्यशक्ति त्या चारी भूतांहून निराळी आहे का ? त्या चारी भूतांशीं एकरूप आहे ? जर चैतन्यशक्ति ही चारी भूतांहून निराळी असेल तर मग या जगांत चारच तत्त्वें आहेत आणि तीं म्हणजे पृथ्वी, जल, तेज आणि वायु. हें तुमचें म्हणणें चुकलें ! जगांत चारच भूतें आहेत हा तुमचा सिद्धान्त चुकला ! बरें, चैतन्यशक्ति ही पृथ्वी, जल, तेज आणि वायु या चारी भूतांशीं एकरूप आहे असें म्हणाल, तर तेंहि म्हणणें बरोबर होणार नाहीं. कारण पृथ्वी, जल, तेज आणि वायु हे जड-स्वरूप आहेत तर चैतन्यशक्ति ही चित्स्वरूप आहे. तेव्हां जड आणि चित् यांचें तादात्म्य कसें असूं शकेल ? म्हणूनच आम्ही म्हणतों, "न भूमिर्न तोयं न तेजो न वायुः" मी पृथ्वी नव्हे, मी जल नव्हे, मी तेज नव्हे आणि मी वायूहि नव्हे. यापैकीं कोणीहि मी नव्हे, तर मग या चारींचा समुदाय तो तरा 'मी कसा असूं शकेन ? तात्पर्य, चार्वाकांच्या म्हणण्यांत कांहीं तथ्य नाहीं.

यावर चार्वाक असें विचारतो कीं, अहो ! मी गोरा आहें, मी काळा आहें, मी कृश आहें अथवा मी स्थूल आहें असें आपण म्हणत असतों. काळा गोरा, कृश किंवा स्थूल देहच असतो. यावरून देहच मी आहें असेंच सिद्ध होतें. पण हेंहि म्हणणें बरोबर नाहीं. आचार्य म्हणतात, देह हा कशाचा बनला आहे ? याचा विचार करा. देह हा तुमच्या मतें चार भूतांचा, पण जेथें चारहि भूतें आत्म-स्वरूप नाहींत तेथें चारी भूतांचा बनलेला देह तरी कसा आत्मा असूं शकेल ? आत्म्याच्या ठिकाणीं मी काळा आहें मी गोरा आहें अशी प्रतीति येणें हा भ्रम होय. यावर चार्वाक असें म्हणतो कीं, अहो ! देहाला अनुकूल उपचार असले म्हणजे सुख वाटतें. झोंपावयास पराच्या किंवा सांवरीच्या कापसाच्या मृदु गाद्या असाव्यात. डांस, विसवा यांच्यापासून संरक्षण करण्यास पांढरी शुभ्र सुंदर मच्छरदाणी असावी. अंगाला लावावयास सुगंधी तेलें व अत्तरें असावींत. स्नानाला सुखकर उष्णोदक असावें. जेवावयास मिष्टान्न असावें. बसावयास किनखाबी कापडानें मढविलेले आणि मऊ स्पंजानें भरलेल्या स्प्रिंगचे कोच असावेत. हात-पाय. चेपावयास अनुकूल स्त्री असावी. हें सर्व कांहीं असलें म्हणजे आपण मी सुखी आहें असें म्हणतों याच्या उलट परिस्थिति असल्यास मी दुःखी आहें असें म्हणतों. यावरून देहच आत्मा आहे असेंच नाहीं का सिद्ध होत ? यावर आचार्य म्हणतात, हें सर्व कांहीं असलें म्हणजे आपण सुखी असतोंच असा नियम नाहीं व हें सर्व नसलें

म्हणजे आपण दुःखी असतों असेंहि म्हणतां येत नाहीं. सर्व वैभव असूनहि राजे-महाराजे दुःखी असतात. सर्व वैभवांचा त्याग करून गिरिकंदरांत रहाणारे कंद, फळें, मुळें खाणारे योगी तपस्वीहि सुखी असतात. विवेकी असलेलें दरिद्री माणसांचें कुटुंब झोंपडींत राहूनहि सुखी असतें. तात्पर्य, तुमच्या सुख-दुःखांच्या कल्पना चुकीच्या आहेत. उन्हाच्या वेळीं वाळवंटांत पडलेला शिंपला चांदीसारखा दिसला तरी शिंपला चांदी होऊं शकत नाहीं त्याचप्रमाणें वैभवानें देहाला उद्देशून मी सुखी आहे अशी प्रतीति आली, तरी नेवड्यानें देह सुखी होऊं शकत नाहीं. देहांत नांदणारा व स्वतःला सुखी समजणारा कोणी तरी देहाहून निराळाच आहे हें निश्चित. म्हणून देहाला आत्मा म्हणतां येत नाहीं.

देहाला आत्मा मानलें तर प्रश्न असा येतो कीं, देहांतील घटक असलेले हात, पाय, कान, नाक, डोळा इत्यादि अवयवांना आत्मा म्हणतां ? का या सर्व अवयवांच्या समुदायाला आत्मा म्हणतां ? अवयवांना आत्मा म्हणत असाल तर ते बरोबर नाहीं. कांहीं विशिष्ट रोगामुळें हात किंवा पाय काढून टाकावा लागला तरी मी शिल्लक असतोच. नाक कापलें, कान कापलें, डोळा काढला तरी मी शिल्लक असतोच. यावरून हे सर्व अवयव म्हणजे मी नव्हे. जेथें प्रत्येक अवयव मी होऊं शकत नाहीं तेथें अवयवांचा समुदाय तरी मी कसा असूं शकेल ? तात्पर्य, देहाचे अवयव किंवा अवयवाचा समुदाय हा मी नव्हे. अशा रीतीनें चार्वाकांचा देहात्मवाद हा अर्थशून्य आहे ही गोष्ट सिद्ध झाली. हाच अभिप्राय " न भूमिर्न तोयं न तेजो न वायुः " या श्लोकाच्या पहिल्या चरणानें सिद्ध केला आहे.

" न खं नेन्द्रियं वा न तेषां समूहः " या दुसऱ्या चरणांतील 'खं' शब्दाचा अर्थ आकाश असा आहे. पंचमहाभूतांपैकीं आकाश हें एक महाभूत आहे. ज्याप्रमाणें पृथ्वी, जल, तेज आणि वायु हे आत्मा होऊं शकत नाहींत त्याचप्रमाणें आकाशहि आत्मा होऊं शकत नाहीं. म्हणून आकाशाच्या आत्मत्वाबद्दल कोणी शंका घेऊं नये. याकरितां आचार्यांनीं " न खं " असें म्हणून आकाशाच्या आत्मत्वाचेंहि खंडण करून टाकलें. आकाश हा आत्मा होऊं शकत नाहीं. कारण तें पृथ्वी, जल, तेज आणि वायु यांच्याप्रमाणेंच जड स्वरूप आहे. कोणी कोणी तर आकाशाला अभावस्वरूपच मानतात. याप्रमाणें जडस्वरूप अथवा अभावस्वरूप असलेलें आकाश हा आत्मा कसा होऊं शकेल ? शिवाय आकाशतत्त्व हें आत्म्यापासून उत्पन्न झालेलें आहे.

" तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः सम्भूतः " असें श्रुतिवचन आहे. उत्पन्न झालेला भावपदार्थ कालांतरानें नाशहि पावत असतो. आत्मा तर अविनाशी आहे. " अविनाशी वा अरे अयमात्मा अनुच्छित्तिधर्मा " असें बृहदारण्यकांत आत्म्याचें वर्णन केलेलें आहे. " न जायते म्रियते वा कदाचित् " याप्रमाणें भगवद्गीताहि आत्म्याचें वर्णन करीत आहे. याप्रमाणें आकाश हा उत्पत्ति-विनाशशाली जड पदार्थ असल्यामुळें आत्मा होऊं शकत नाहीं.

खं शब्दाचा दुसरा अर्थ शून्य अभा आहे. मी स्व-स्वरूप नव्हे असें सांगून आचार्य शून्यवादाचेंहि खंडण करीत आहेत. जें शून्य आहे तें मी नव्हे. जो मी आहे तें शून्य नव्हे. कांहीं बौद्ध शून्याला आत्मा असें म्हणतात. पण विचाऱ्यांना आत्मा हा शून्यस्वरूप आहे असें म्हणतांना आपण " वदतो व्याघात " या दोषाला कवटाळीत आहोंत याचें भानहि नसतें. एखाद्यानें माझी आई वंध्या आहे आणि वडील हे तर आजन्म नैष्ठिक ब्रह्मचारी आहेत हें म्हणणें जितकें हास्यास्पद आहे, तितकेंच आत्मा म्हणजे मी शून्यस्वरूप आहें असें म्हणणें हें हास्यास्पद होय. आत्मा जर शून्यस्वरूप असेल तर 'शून्योऽहम्' अशी प्रतीति येऊं लागेल. कोणी स्वतःला मी शून्य आहें असें कधीं म्हणतो का? आणि मी शून्य आहें असें जर कोणी म्हणेल तर तें त्याचें म्हणणेंच तो शून्यस्वरूप नाहीं असें सिद्ध होण्याला कारणीभूत होईल. " मी अगदीं गाढ झोपलों आहें हो " असें जर कोणी म्हणेल तर तें त्याच्याच म्हणण्याचा खोटेपणा ठरविण्याला कारणीभूत हो असतें.

आत्मा शून्य आहे असें म्हणणाऱ्या बौद्धांना आम्ही असें विचारतों कीं, तुमच्या शून्य शब्दाचा अर्थ काय? शून्य म्हणजे कांहीं नाहीं. कांहीं नाहीं म्हणजे अभाव. आत्मा जर अभावस्वरूप आहे असें मानलें तर मग " मी सुखी, मी दुःखी, मी कर्ता, मी भोक्ता, मी जाणलें, मला कळलें " अशी प्रतीति किंवा हा व्यवहार होणार नाहीं. पण आपण असा व्यवहार नेहमीं करीत असतों. यावरून आत्मा शून्यस्वरूप आहे असें म्हणतां येत नाहीं. शून्याला कर्तृत्व, भोक्तृत्व किंवा सुख, दुःख हें काय असणार? तात्पर्य, शून्यवादी बौद्धांचा शून्यवाद हाहि युक्तिशून्य आहे. हाच अभिप्राय लक्षांत घेऊन आचार्यांनीं या श्लोकाच्या दुसऱ्या चरणांत " न खं " या शब्दांनीं शून्यवादाचें निरसन केलेलें आहे.

आतां कांहीं लोक इंद्रियांनाच आत्मा मानीत असतात. मी ऐकतों असें आपण म्हणत असतों पहाणें ही क्रिया चक्षुरिंद्रियाची आहे. ऐकणें ही क्रिया श्रवणेंद्रियाची आहे, यावरून चक्षुरिंद्रिय हाच आत्मा होय. त्याचप्रमाणें श्रवणेंद्रियहि पण आत्माच होय. याच न्यायानें इतर इंद्रियांनाहि ते आत्माच मानतात. एकाच देहांत अनेक इंद्रियें रहात असल्यामुळें एकाच देहांत अनेक आत्मेहि ते मानतात. पण हा इंद्रियात्मवादहि युक्तिसंगत नाहीं. एक इंद्रिय नष्ट झालें तर आत्माच नष्ट झाला असें म्हणण्याची पाळी येईल. एकाच देहांत अनेक आत्मे मानणें हेंहि ठीक नव्हे. त्यांच्यांत मतभेद निर्माण झाला की देहाची सर्व व्यवस्था विस्कळित होईल. दुसरी गोष्ट अशी की, इंद्रियें ही नष्ट होतात. आत्मा तर अविनाशी आहे, मग इंद्रियें आत्मा कशी होऊं शकतील ? तसेंच इंद्रियें ही भौतिक आहेत आणि आत्मा हा तर पंचमहाभूतांच्या पलीकडचा आहे. तो पंचमहाभूतांचा जनक आहे. मग इंद्रियांना आत्मा कसें म्हणावें ? याच न्यायानें प्रत्येक इंद्रिय जर आत्मा होऊं शकत नाहीं, तर इंद्रियांचा समुदाय हा तरी कसा आत्मा होऊं शकेल ? अशा रीतीनें इंद्रियात्मवाद हाहि तर्काच्या किंवा प्रमाणांच्या कसोटीवर टिकत नाहीं.

कांहीं लोक मनालाच आत्मा मानतात. मी संकल्प केला. मला इच्छा झाली. मला भीति वाटली. असा आपण व्यवहार करीत असतों. या व्यवहारांत संकल्प, इच्छा, भीति इत्यादि धर्म आत्म्याच्या ठिकाणी प्रतीतीला येतात. हे सर्व धर्म तर मनाचे आहेत. " कामः सङ्कल्पो विचिकित्सा श्रद्धाश्रद्धा धृतिरधृतिर्ह्रीर्धीर्भीरित्येतत्सर्वं मन एव " (बृहदारण्यक १।५।३). या बृहदारण्यक श्रुतीमध्यें हे सर्व धर्म मनाचे आहेत. एवढेंच नव्हे तर ते मनःस्वरूपच आहेत, असें वर्णन केलेलें आहे. यावरून मन हाच आत्मा होय असें मानावयास काय हरकत आहे ? पण हेंहि म्हणणें बरोबर नाहीं. मनाला आत्मा म्हणतां येत नाहीं. कारण मन हेंहि देहाप्रमाणेंच पांचभौतिक आहे. तें अन्नमय आहे असें छांदोग्यांत त्याचें वर्णन केलेलें आहे. मन हे त्रिगुणात्मक आहे. नाशिवंत आहे. आत्मा हा भौतिक नाहीं, अन्नमय नाहीं, त्रिगुणात्मक नाहीं व नाशिवंतहि नाहीं. मग मनाला आत्मा कसें म्हणतां येईल ? शिवाय मन जर आत्मा असेल तर, " माझें मन शांत आहे, माझें मन अस्वस्थ आहे. मन अंतर्मुख करावें. मनाचा आत्मस्वरूपीं लय करावा. " इत्यादि वाक्यांना कांहीं अर्थच उरणार नाहीं. आत्मा हा नेहमींच

शांत आहे. तो कधींच अन्यरूप असत नाही. आत्मा हा परब्रह्मस्वरूप असल्यामुळें त्याला अंतर्मुख काय करणार ? सर्वांचा लय ज्याच्यांत होतो त्याचा लय कशांत करणार ? आणि तो संभवणार तरी कसा ? या सर्व विचारांवरून मन आत्मा होऊं शकत नाही ही गोष्ट लक्षांत येते.

" मला भूक लागली, मला तहान लागली, मी श्वासोच्छ्वास करतों, " असें आपण म्हणत असतों. तहान, भूक किंवा श्वासोच्छ्वास इत्यादि क्रिया प्राणाच्या आहेत. यावरून कांहीं लोक प्राणालाच आत्मा म्हणत असतात. पण हेंहि म्हणणें बरोबर नाही. कारण प्राण हा वायुस्वरूप आहे. शरीरामध्यें संचार करणाऱ्या वायूलाच प्राण असें म्हणतात. वायु हा पंचमहाभूतांपैकी एक आहे. पंचमहाभूतें ही आत्म्यापासून उत्पन्न झालेलीं असल्यामुळें आणि तीं त्रिगुणात्मक व जड असल्यामुळें आत्मस्वरूप होऊं शकत नाहींत. म्हणून वायु किंवा वायुस्वरूप असलेला प्राण हाहि आत्मा होऊं शकत नाहीं.

कांहीं बौद्ध क्षणिक विज्ञान हें आत्म्याचें स्वरूप मानतात. " विज्ञायते अनेन इति विज्ञानं " या व्युत्पत्तीप्रमाणें पहातां विज्ञान शब्दाचा अर्थ मन किंवा बुद्धि असा होतो. या दोहोंना मिळून अंतःकरण हें एकच नांव आहे. या अंतःकरणाच्या वृत्तींनाच क्षणिक विज्ञान असें म्हणतात. अंतःकरण हें पांचभौतिक असल्यामुळें आत्मा होऊं शकत नाहीं. जेथें अन्तःकरणच आत्मा होऊं शकत नाहीं तेथें अंतःकरणवृत्ति या आत्मस्वरूप कशा होऊं शकतील ? शिवाय क्षणिक विज्ञान हें नांवाप्रमाणेंच क्षणिक असल्यामुळें ज्या क्षणीं एखाद्या विषयाचा अनुभव घ्यावा किंवा एखादें सत्कर्म करावें त्याच्या उत्तरक्षणीं तो अनुभव घेणारा किंवा सत्कर्म करणारा क्षणिक विज्ञानस्वरूप आत्मा शिल्लक रहात नाहीं. ज्यानें विषय अनुभविले तो पुढच्या क्षणीं शिल्लक नाहीं पुढच्या क्षणीं जो उदयाला येतो त्याला मागच्या विषयाचा अनुभव नसतो. अशा स्थितींत आपल्याला कोणत्याहि विषयाचें कधीं स्मरणच होणार नाहीं. कारण अनुभव एकाला व स्मरण भलत्यालाच असें कधीं असूं शकत नाहीं. ज्यानें सत्कर्म केलें तो पुढच्या क्षणीं शिल्लक रहात नसल्यामुळें त्यानें केलेलें सत्कर्म वायां गेलें असेंहि म्हणावें लागेल. त्याचप्रमाणें ज्या क्षणीं आपण जीं सुखदुःखें भोगतों तीं आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या दुसऱ्या कोणाच्या तरी कर्मांचीं फळें आपण भोगतों असेंच म्हणावें लागेल. यालाच शास्त्रामध्यें कृतनाश आणि अकृताभ्यागम असें म्हणतात. या दोषांचा परिहार

करावयाचा असेल तर आत्मा हा क्षणिक विज्ञानस्वरूप आहे असें म्हणून मागणार नाहीं.

जैन हे आत्म्याला देहाकार नित्यपरिणामी असें मानतात, पण हेंहि त्यांचें म्हणणें बरोबर नाहीं. आत्मा जर परिणामी असेल तर कूटस्थ, अचल, निराकार, निर्विकार, सच्चिदानंद अशा शब्दांनीं त्याचें वर्णन करतांच आलें नसतें. वेद तर त्याचें या शब्दांनीं वर्णन करीत आहेत म्हणून जैनांचा आत्मवादहि बरोबर नाहीं.

नैयायिक, वैशेषिक इत्यादि दार्शनिकांनीं आत्मा हा जड, द्रव्यस्वरूप आणि सुखदुःखादि गुणांनीं युक्त असा मानलेला आहे. हेंहि त्यांचें म्हणणें श्रुति आणि युक्ति यांच्याशीं विसंगत असल्यामुळें बरोबर आहे असें मानतां येत नाहीं. जें जें जड असतें तें तें नाशिवंत असतें. उदाहरणार्थ, घट-पटादि पदार्थ. आत्माहि जड मानला तर तो नाशिवंत मानावा लागेल. "सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म", "अविनाशी वा अरे अयमात्मा", "नैनं छिन्दन्ति शस्त्राणि" इत्यादि श्रुतिस्मृतिवचनें निरर्थक ठरतील. म्हणून आत्मा हा जड द्रव्यस्वरूप आहे हेंहि म्हणणें मानतां येत नाहीं. आत्मा हा नित्य, शुद्ध, बुद्ध व मुक्तस्वरूप असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं कर्तृत्व, भोक्तृत्व इत्यादि कोणत्याहि धर्मांचा तत्त्वतः कांहीं संबंध नाहीं. त्यामुळें मीमांसकांचा, सांख्यदर्शनकारांचा किंवा पातंजलदर्शनकारांचाहि – आत्मा हा कर्ता किंवा भोक्ता आहे अशा स्वरूपाचा पक्ष स्वीकारतां येत नाहीं. शिवाय हे सर्व दर्शनकार अखेर द्वैतात्मवादी आहेत. त्यांच्या मतें आत्मे अनंत आहेत. एकात्मवाद त्यांना मान्य नाहीं. वेदांनीं तर जेथें तेथें एकात्मवादाचा एकमुखानें – मुक्तकंठानें उद्घोष केलेला आहे. जोपर्यंत द्वैतभाव बुद्धीतून पूर्णपणें मावळत नाहीं तोपर्यंत पूर्ण सुखाचा साक्षात्कारहि होणें शक्य नाहीं. तसेंच भयाचा पूर्णपणें निरासहि होणें शक्य नाहीं. आत्मज्ञानी हा तर पूर्ण निर्भय, आनंदमय, शांत आणि समाहित असतो, हाच अद्वैताचा सिद्धान्त आहे. याच अभिप्रायानें आचार्य म्हणतात, आत्मस्वरूपाच्या बाबतींत इतर कोणत्याहि तत्त्वंदरयाचा सिद्धान्त सत्य मानतां येत नाहीं.

आचार्यांना कदाचित् कोणी असें विचारील कीं, अद्वैत सिद्धांताच्या बाबतींत केवढा तुमचा हा अभिनिवेश आहे! यावर आचार्य म्हणतात, छेः! माझा मुळींच अभिनिवेश नाहीं. अगदीं तावून-सुलाखून शंभर नंबरी सोनें जसें सिद्ध करावें आणि परिसास लावून पारखावें तसा हा उपनिषदांतील अद्वैत आत्म-

वाद्यांचा सिद्धान्त मी पारखून घेतलेला आहे. अरे ! हें अभिनिवेशाचें पिशाच माझ्या नव्हे तर तें तुमच्याच पाठीशीं लागलेलें आहे. एकदां झाडा त्यालो. आम्हीं सांगितलेल्या आत्मस्वरूपाव्यतिरिक्त इतर कोणत्याहि पदार्थाला आत्मा म्हणतां येत नाहीं. कारण "अनैकान्तिकत्वात्" तिसऱ्या चरणांतील पहिला शब्द पहा. यथार्थ आत्मस्वरूपाला सोडून या जगांतील जो जो पदार्थ तुम्ही आत्मा समजतां तो तो पदार्थ आत्मा होऊं शकत नाहीं. कारण ते सर्व पदार्थ अनैकान्तिक आहेत. ते अनित्य आहेत. ते नाशिवंत आहेत. या विश्वांत अनाद्यनंतकाल विराजमान होऊन रहाण्याचें सामर्थ्य त्यांच्यामध्यें नाहीं. आत्मा हीं सदासर्वकाळ "ऐकान्तिक" म्हणजे नित्य खात्रीचा, निश्चयाचा पूर्ण आनंदमय आहे तर त्याव्यतिरिक्त सर्व हें अनैकान्तिक म्हणजे बेभरवशाचें नाशिवंत आणि दुःखास्पद आहे.

आत्मा हा देशपरिच्छिन्न नाहीं व कालपरिच्छिन्नहि नाहीं. जे पदार्थ देशकाल यांनीं परिच्छिन्न आहेत ते आत्मा होऊं शकत नाहींत. उदाहरणार्थ, घटपटादि पदार्थ पहा. आत्म्याला कधीं प्रागभाव नाहीं. तो आज आहे आणि पूर्वी नव्हता असें म्हणतां येत नाहीं. कारण तो अनादिसिद्ध आहे. तो आज आहे आणि उद्यां नाहींसा होईल असेंहि म्हणतां येत नाहीं. त्याचा कधीं ध्वंसच होत नाहीं म्हणून त्याला अनंत असें म्हणतात. घट आहे, पट आहे, हत्ती आहे, गाय आहे, घोडा आहे, नद्या आहेत, सागर आहेत, पृथ्वी आहे, पर्वत आहेत, सूर्य आहे, चंद्र आहे, आकाश आहे. याप्रमाणें आहे आहे ही प्रतीति सर्वत्र येत असल्यामुळें अस्तित्व अर्थात् सत्ता ही सर्वत्र ओतप्रोत भरलेली आहे. तेंच आत्म्याचें स्वरूप आहे. केवल नास्ति या शब्दानें कोठेंहि आत्म्याच्या अभावाची प्रतीति येणार नाहीं. 'घटो नास्ति, पटो नास्ति' असें म्हणतां येतें, पण केवल "नास्ति" असा शब्दप्रयोग होऊंच शकत नाहीं. यामुळें आत्म्याचा कोठें अत्यंताभावहि पहावयास सांपडत नाहीं. अशा रीतीनें प्रागभाव, प्रध्वंसाभाव आणि अत्यंताभाव या तिन्ही अभावांचा आत्म्याशीं संबंध येत नाहीं. आतां राहिला अन्योन्याभाव म्हणजे भेद, तोहि आत्म्याच्या वास्तवीत दृष्टीस पडत नाहीं. "आत्मैवेदं सर्वम्" असा सिद्धान्त असल्यामुळें हें सर्व जग आत्मस्वरूपच आहे. जगांतील प्रत्येक पदार्थ आत्मस्वरूप आहे. घट म्हणजे पट नव्हे, पट म्हणजे घट नव्हे, हत्ती म्हणजे घोडा व घोडा म्हणजे हत्ती नव्हे, असें आपल्याला म्हणतां येतें. पण घट म्हणजे आत्मा नव्हे, पट म्हणजे आत्मा नव्हे, असें मात्र आपल्याला

म्हणतां येत नाहीं. आत्माच प्रत्येक पदार्थाच्या रूपानें नटलेला आहे. आत्माच विश्वरूपानें नटलेला आहे. म्हणूनच तर "एकेन विज्ञातेन सर्वमिदं विज्ञातं भवति" ही वेदांतांतील प्रतिज्ञा सत्य ठरते.

यावर कोणी असें विचारील की, अहो! जर घट-पटादि सर्व पदार्थ आत्मस्वरूप आहेत तर मग मी घट आहें, मी पट आहें अशी आपल्याला प्रतीति कां येत नाहीं? यावर उत्तर: तुम्ही म्हणतां तें बरोबर आहे. जोंपर्यंत आपल्याला विश्वव्यापी व विश्वरूपी आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होत नाहीं तोंपर्यंत मी घट आहें, मी पट आहें अशी प्रतीति येणार नाहीं. ती न येणें हें स्वाभाविक आहे. कारण सर्वत्र आत्मदर्शन झालेलें नाहीं. आत्मस्वरूपाचा साक्षात्कार झाल्यानंतर मात्र "मी सर्वस्वरूप आहें" असें सहजच उद्गार त्या तत्त्ववेत्त्याच्या मुखांतून बाहेर पडतात. "अहं मनुरभवं सूर्यश्च" इत्यादि उद्गार वामदेवाच्या मुखीं तत्त्वज्ञानाच्या उत्तरक्षणीं प्रकट झालेले उपनिषदांत पहावयास सांपडतात. "अहमन्नमहमन्नम्" "अहमन्नादोऽहमन्नादः" हें सर्व अन्न मीच आहें आणि या अन्नाला भक्षण करणाराहि पण मीच आहें, असे उद्गार काढीत तैत्तिरीयोपनिषदांतील ऋषि आनंदाच्या भरांत नाचत असल्याचें दिसत आहे. तात्पर्य, आत्मसाक्षात्काराच्या उत्तरकालांत मी सर्वस्वरूप आहें अशी प्रतीति तत्त्ववेत्त्याला येत असते. "घटोऽहं पटोऽहम्" ही प्रतीति देखील त्याच प्रतीतीचें प्रतीक आहे. अहो! "घटोऽहम्, पटोऽहम्" असें म्हणत जर कोणी नाचूं लागला तर लोक त्याला वेडा म्हणतील. म्हणोत बिचारे. पण त्याचें तें वेड विवेकी मुमुक्षु जनांना स्पृहणीय आहे यांत शंकाच नाहीं.

अहो! हें सर्व आत्माच आहे तर मग आपल्याला सापा-विंचवांची आणि चोराचिलटांची भीति कां वाटते? अज्ञान किंवा अज्ञानाचे संस्कार हेंच त्याचें उत्तर आहे. शुकाचार्यांनीं परीक्षित् राजाला भागवतामध्यें सांग्या विश्वाचा सोपपत्तिक इतिहास सांगितला. त्याच्या ऐहिक व पारलौकिक शंकांचें निरसन केलें. अध्यात्मज्ञानदीप त्याच्या चित्तांत उजळला आणि नंतर सांगितलें, राजा! पहा आतां. कोणताहि मृत्यु तुझा नाश करण्याला समर्थ होणार नाहीं. तूं आतां मृत्यूचा मृत्यु झालास. तूं ईश्वर आहेस. ब्रह्मस्वरूप आहेस. तो तक्षक निभाळ्या चाटीत आणि फूत्कार टाकीत फणा काढून तुझ्या पायाला दंश करूं लागला तरी तो तुला आतां दिसणार नाहीं. आपलें शरीर, हें विश्व आणि आत्मा यांतील भेद मावळल्यामुळें तूं आत्म्याहून पृथक् असें कांहींच पाहूं शकणार

नाहींस. तूं आतां निर्भय ब्रह्मरूप झालास. " मृत्यवो नोपधक्ष्यन्ति मृत्यूनां मृत्युमीश्वरम् । दशन्तं तक्षकं पादे लेलिहानं विषाननैः ॥ न द्रक्ष्यामि शरीरं च विश्वं च पृथगात्मनः । " आत्मज्ञानानें ब्रह्मरूप झालेल्या राजा परीक्षितानें देखील यावर याच थाटाचें समाधान व्यक्त केलेलें आहे. राजा म्हणतो, महाराज ! मी धन्य झालों. मला आतां तक्षक वगैरेसारख्या कोणत्याहि मृत्यूच्या कारणाचें भय उरलेलें नाहीं. आपल्या कृपेनें मी ब्रह्मरूप झालों. आपण मला अभयाचा मार्ग दाखविला. " भयं वै द्वितीयाद्भवति " द्वैतच मावळलें तेथें भय कसलें उरणार ? " भगवंस्तक्षकादिभ्यो मृत्युभ्यो न बिभेम्यहम् । प्रविष्टो ब्रह्म निर्वाणमभयं दर्शितं त्वया ॥ "

अहो ! आत्मा जर एकच आहे तर मग कोणी तरी एक ज्ञानी झाला, मुक्त झाला तर सर्वच ज्ञानी मुक्त का होत नाहींत ? यावर उत्तर असें कीं, कल्पना करा. एक आरसेमहाल आहे. लहानमोठे हजारों आरसे लावलेले आहेत. त्यांत एक मोठा दिवा लावलेला आहे. दिवा एकच पण त्याचीं हजारों प्रतिबिंबें प्रकट झालेलीं आहेत. उपाधीमुळेंच बिंबाला प्रतिबिंबता आली. प्रतिबिंबांना तात्त्विक सत्यता नाहीं, तरी पण आरशांच्या असंख्यत्वामुळें प्रतिबिंबें असंख्य झालीं. त्यांतील एक आरसा काढून घेतला अथवा पडला, फुटला. एक प्रतिबिंब मावळलें. त्याच्यावरोबर बाकीचीं का मावळत नाहींत ? अहो ! बाकीचे आरसे शिल्लक आहेत म्हणून बाकीचीं प्रतिबिंबें दिसतात, तर मग त्याचप्रमाणें ब्रह्मज्ञानानें एखादा ज्ञानी मुक्त झाला तरी दुसऱ्यांचे अज्ञानरूपी उपाधि अथवा देहेंद्रियादि समुदायरूपी उपाधि शिल्लक असतातच. त्यामुळें एकाच्या मुक्तीनें सर्व मुक्त होण्याची पाळी येत नाहीं. याच न्यायानें एकाच्या सुखानें सर्व सुखी किंवा एकाच्या दुःखानें सर्व दुःखी मानण्याचीहि पाळी येत नाहीं. उपाधिभेदानें सर्व सुखदुःखादि भेदांची उपपत्ति लागते.

अहो ! एकमेवाद्वितीय आत्माच जर सत्य आहे. दुसरें कांहींच नाहीं तर मग हे उपाधि तरी आले कोठून ? याला उत्तर अविद्या आणि माया. मायेनें खेळ रचला आणि अविद्येनें जीवभावानें आत्मा त्यांत गुरफटला. अविद्या आणि माया एकाच तत्त्वाचीं हीं दोन रूपें आहेत. एकाच तत्त्वाला ईश्वराच्या संपर्कानें माया आणि जीवाच्या संपर्कानें अविद्या असें नांव मिळालें. अहो ! ही माया किंवा अविद्या आली कोठून ! उत्तर :— ती अनादिसिद्ध आहे. तर मग ती अनंतहि असेल ! छे. ती अनंत नाहीं. आत्मसाक्षात्कारानें तिचा निरास होतो. शास्त्र-

श्रवणानें, मननानें व निदिध्यासानें अविद्या हळूहळू विरळते व आत्मसाक्षात्कारानें ती पूर्ण नाहींशी होते.

यावर कोणी अशी शंका घेईल की, अज्ञानामुळें सर्व जग आत्म्याच्या ठिकाणीं भासतें म्हणून ते खोटें आहे असें म्हटलें तर भ्रमांत भासणारी वस्तु अन्यत्र कोठें तरी सत्य स्वरूपांत असते. दोरीवर भासलेला सर्प खोटा असला तरी तो वारुळांत सत्य स्वरूपानें असतो; पण ही शंका बरोबर नाहीं. आत्मा हा सर्वव्यापी असल्यामुळें आत्म्याला सोडून दुसरीकडे जगाची सत्य स्वरूपानें प्रतीति येणेंच शक्य नाहीं. भ्रमांत भासणारे पदार्थ दुसरीकडे सत्य स्वरूपांत असलेंच पाहिजेत असाहि नियम नाहीं. एखाद्या वेळेला एखाद्याला असें विचित्र स्वप्न पडतें कीं, स्वप्नांत तो 'तीन तोंडांचा, नऊ सोंडांचा, बारा दांत असलेला व आठ पाय असलेला हत्ती आपण पाहिला' असें सांगतो. स्वप्नांत त्याला भासलेला हा हत्ती जगांत कोठें तरी सत्य स्वरूपांत असलेला त्यानें पाहिला होता का? नाहीं. त्याचप्रमाणें पूर्वी कधीं न पाहिलेले व सत्य स्वरूपांत नसलेलेहि पदार्थ भ्रमामध्यें भासूं शकतात. कोणी असें विचारील कीं, भ्रमांत भासणारे पदार्थ ज्या अधिष्ठानावर भासतात त्या अधिष्ठानामध्यें आणि त्या पदार्थांमध्यें कांहीं तरी साधर्म्य अर्थात् साम्य असतें. पण हाहि आक्षेप बरोबर नाहीं. स्वप्नांत भासणाऱ्या पदार्थांचें अधिष्ठानाशीं कोणत्याहि प्रकारचें साधर्म्य नसलें, तरी पण ते पदार्थ स्वप्नांत भासतच असतात. याच न्यायानें नामरूपातीत असलेल्या आत्म्याचें व नामरूपात्मक विश्वप्रपंचाचें कांहीं साधर्म्य नसलें तरी आत्म्याच्या ठिकाणीं अविद्येनें विश्वप्रपंचाचा भास होऊं शकतो.

अहो! आत्मा तेवढा सत्य आणि त्याव्यतिरिक्त बाकी सर्व खोटें असें म्हटलें, तर शास्त्रेंहि खोटी, गुरुहि खोटे आणि ईश्वरहि खोटा असें म्हणावें लागेल. यावर उत्तर असें कीं, ईश्वर आणि गुरु हे आत्मस्वरूप असल्यामुळें सत्य आहेत. शास्त्रें हीं श्रवण आणि मनन यांच्या द्वारां आत्मसाक्षात्काराला उपयोगी असल्यामुळें आत्मसाक्षात्कार होईपर्यंत व्यवहार दृष्ट्या सत्यच आहेत. आत्मसाक्षात्कारानंतर मात्र त्यांचा बाध होत असल्यामुळें तीं मिथ्या ठरतात. अहो! शास्त्रें जर मिथ्या आहेत तर त्यांचें जतन कशाकरितां करावयाचें? ज्ञानी लोकांच्या दृष्टीनें ते स्वतः कृतार्थ झालेले असल्यामुळें शास्त्रांचा उपयोग नसला तरी अज्ञानी जनांना त्यांचा फार उपयोग होतो म्हणून अज्ञानी जनांच्या

उपयोगाकरितां शास्त्रांचें जतन करणें अत्यंत आवश्यक आहे. आत्मसाक्षात्कार नाहीं तोंपर्यंत गुरूंनीं सांगितलेल्या मार्गानेंच शास्त्रांच्या साह्याच्यानें आत्म-साक्षात्कार करून घ्यावयाचा असतो. अनन्यभक्तीनें ईश्वरकृपा संपादन करणेंहि अत्यंत आवश्यक असतें. ईश्वरकृपेनें व गुरुकृपेनें श्रवण, मनन, निदिध्यासन करून अविद्येचा निरास झाला कीं, अविद्येनें भासणाऱ्या सर्व द्वैतप्रपंचाचा बाध होईल. द्वैतप्रपंच मावळला कीं त्या द्वैतप्रपंचाच्या आभासाचें अधिष्ठान म्हणून जो शिल्लक राहील तोच "तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम्" शिल्लक उरलेला एकमेव अद्वितीय मंगलमय आनंदस्वरूप शुद्ध सच्चिदानंदघन परमात्मा, तो मीच आहें, असें निःसंदिग्ध कळणें यालाच साक्षात्कार असें म्हणतात.

आतां कोणी अशी शंका घेईल कीं, घट-पटादि वस्तूंचा अभाव सिद्ध होतो म्हणून घट-पटादि वस्तु अनित्य आहेत त्याचप्रमाणें गाढ झोंपेमध्यें आत्म्याचीहि प्रतीती येत नसल्यामुळें सुषुप्तिकाळीं आत्म्याचाहि अभाव आहे. मग आत्मा नित्य कसा ? शिवाय तुम्ही, आत्मा हा ज्ञानस्वरूप – बोधस्वरूप आहे असें म्हणतां. सुषुप्तिकाळांत बोध आहे कोठें ? मग आत्मा हा बोधस्वरूप कसा ? पहिल्या प्रश्नाचें उत्तर असें कीं, सुषुप्तिकालांत मी आहें किंवा मी झोंपलों आहें अशी प्रतीति येत नाहीं ही गोष्ट खरी आहे, पण एवढ्यावरून सुषुप्तिकाळांत आत्मा नाहीं असें कसें म्हणतां येईल. सुषुप्तिकाळांत आत्मा नसेल तर झोंप लागते कोणाला ? झोंपेंतून उठल्याबरोबर 'मी झोंपलों होतों. मला चांगली गाढ झोंप लागली' असें आपण म्हणतों. यावरून झोंपेमध्यें झोंप घेणारा मी म्हणजे आत्मा आहे ही गोष्ट सिद्ध होत नाहीं का ? मग झोंपेंत मी नाहीं असें कसें म्हणतां येईल ? मी आणि आत्मा एकरूप आहेत. आत्मा हा तर ज्ञानरूप आहे. "स नित्योपलब्धिस्वरूपोहमात्मा" असें हस्तामलकस्तोत्रांत आपण पाहिलेंच आहे. झोंपेंत जर आत्मा आहे तर बोधहि आहेच. तेव्हां झोंपेंत बोध नाहीं असें म्हणतां येत नाहीं. शिवाय झोंपेंतून उठल्याबरोबर "सुखमस्वाप्सम्" मी आत्तांपर्यंत सुखानें झोपलों होतों असें आपण म्हणतों. मी झोंपलों असल्यामुळें मला कांहीं कळलें नाहीं असेंहि आपण म्हणत असतों. झोंपेंतून उठल्याबरोबर आपल्याला होणारें ज्ञान स्मरणात्मक आहे. स्मरण हें अनुभवावांचून होत नसतें. अर्थात् सौषुप्तकाळांत सुखाचा व अज्ञानाचा अनुभव मानलाच पाहिजे. अशा स्थितींत सौषुप्त अवस्थेंत बोध नाहीं हें म्हणणेंहि युक्तिसंगत नाहीं. सौषुप्त अवस्थेंत

बोध मानला की त्या बोधाचा साक्षी आत्मा हाहि सिद्ध होतोच. तो साक्षी आत्मा बोधस्वरूपच असल्यामुळें वरील दुसरा प्रश्नहि शिल्लक रहात नाहीं. अशा रीतीनें सौषुप्त अवस्था ही आत्म्याची बाधक नसून उलट ती आत्म्याची साधक आहे. सौषुप्त काळांत सुषुप्तीचा साक्षी म्हणून आत्मा हा असतोच. याच अभिप्रायानें आचार्यांनीं श्लोकाच्या तिसऱ्या चरणांत "सुषुप्त्येकसिद्धः" असें अहंला विशेषण दिलेलें आहे.

यावर कोणी असें विचारील कीं, सुषुप्तीचा साक्षी म्हणून सिद्ध होणारा आत्मा हा तर कूटस्थ, निर्विकार, शुद्धसच्चिदानंदरूप आहे. मग मी दीन, मी दुःखी, मी दरिद्री, मी रोगी अशी आपल्याला प्रतीति कां येते? याला कारण केवळ अज्ञान, अविद्या. या अविद्येनेंच आत्मा हा नित्यसच्चिदानंदरूप असूनहि त्याला दीन, दरिद्री, दुःखी, कष्टी व रोगी असें बनवून दुःखमय संसाराच्या खड्ड्यांत ढाकलें आहे. अहो! "सर्वं खल्विदं ब्रह्म" असें तुम्ही म्हणतां मग ही अविद्या देखील ब्रह्मस्वरूपच नाहीं का? ती जर ब्रह्मस्वरूप आहे तर दुःखकारक कशी? उत्तर :— चांगला प्रश्न केला. तत्त्वतः अविद्या देखील ब्रह्मस्वरूपच आहे. पण अविद्यारूपानें ती जेव्हां पृथक् अभिव्यक्त होते, तेव्हांच ती दुःख देते. विवेकानें ती वितळली, ब्रह्मरूप झाली म्हणजे तिचें दुःख देण्याचें कार्यहि संपलें.

अहो ही एवढी मोठी अनर्थकारक अविद्या आली कोठून? बाबा रे कांहीं सांगतां येत नाहीं. म्हणूनच आम्ही तिला अनादि म्हणतों. ती कोठून आली याचा विचार करीत बसण्यापेक्षां तिचा निरास कसा होईल याचाच विचार करणें श्रेयस्कर होय. घराला आग लागल्यानंतर ती कोठून लागली, कशी लागली, याचा विचार करण्यांत काळ घालविण्यापेक्षां चटकन् पाण्याचा मारा करून ती शमविणें हेंच शहाणपणाचें लक्षण होय. प्रकृतस्थली शास्त्रोक्त पद्धतीनें गुरूंनीं उपदेशिलेल्या आत्मस्वरूपाचा विचार केल्यानेंच आत्म्याचा यथार्थ साक्षात्कार होऊन आपल्या सर्व दुःखांचा निरास होईल. विवेकानें जसा जसा अविद्येचा निरास होईल तसा तसा भासमान विश्वाचा आभासहि निरस्त होईल आणि सर्व द्वैतप्रपंचाच्या सत्यत्वाचा बाध होऊन अखेर जें शिल्लक राहील तेंच शिल्लक राहिलेलें निराबाध, एकमेव अद्वितीय, मंगलमय, नित्य, शुद्ध आणि सच्चिदानंद परमात्मतत्त्व तेंच मी आहें. हाच अर्थ "तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहं" या प्रस्तुत श्लोकाच्या चौथ्या चरणांत सांगितलेला आहे.

न वर्णा न वर्णाश्रमाचार-धर्मा
न मे धारणा-ध्यान-योगादयोऽपि ।
अनात्माश्रयाहंममाध्यास-हानात्
तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोहम् ॥ ७ ॥

मी वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांपैकी कोणी नाहीं. त्याचप्रमाणें भिन्न भिन्न वर्णांतील भाविक जनांचे जे भिन्न भिन्न आचारधर्म आहेत ते सर्व देहाचेच धर्म होत. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, आणि संन्यास यांचा माझ्याशीं कांहीं संबंध नाहीं. तसेंच आश्रमधर्म व आचारधर्म यांचा माझ्याशीं कांहीं संबंध नाहीं. हे सर्व धर्म जडस्वरूप असलेल्या देहेंद्रियादि समुदायाचे आहेत. मी त्या समुदायाहून निराळा आहें. शुद्ध चित्स्वरूप आहें. त्या धर्मांचा माझ्याशीं कांहीं संबंध नाहीं. प्रत्याहार हा इंद्रियांचा धर्म आहे. धारणा, ध्यान आणि समाधि हे सर्व मनाचे धर्म आहेत. इंद्रियें आणि मन मी नव्हे. म्हणून यांचा माझ्याशीं कांहीं संबंध नाहीं. "योगादयः" यांतील आदि शब्दानें श्रवण, मनन आणि निदिध्यासन समजावें. हें सर्व ज्ञानप्राप्तीकरितां ज्ञानपूर्वकालांत उपयुक्त असलें तरी ज्ञानोत्तरकाळीं त्यांच्या सत्यत्वाचा बाध होत असल्यामुळें त्यांचा आत्म्याशीं कांहीं संबंध उरत नाहीं.

मी ब्राह्मण आहें, मी क्षत्रिय आहें, मी ब्रह्मचारी आहें, मी संन्याशी आहें. असें जरी आपण म्हणत असलों, तरी तें सर्व अविद्यामूलक, अहंता आणि ममता असेपर्यंतच प्रतीतीला येत असतें. ईशकृपेनें अविद्या मावळली कीं अहंभाव आणि ममत्व यांचाहि भ्रम नाहींसा होतो आणि मग " अहं ब्रह्मैवास्मि " हीच प्रतीति येते. हीं गोष्ट आचार्य श्लोकाच्या उत्तरार्धांत सांगत आहेत. "अनात्माश्रयाहं-ममाध्यासहानात्" अनात्मा म्हणजे आत्मविरोधिनी अविद्या. त्या अविद्येमुळें उत्पन्न होणारा जो अहंकार आणि ममकार या स्वरूपाचा अध्यास म्हणजे भ्रम, त्याचें हान म्हणजे निरसन झाल्यामुळें आत्म्याव्यतिरिक्त प्रतीतीला येणाऱ्या सर्व पदार्थांची कल्पना मावळते आणि मग त्या कल्पनांचे अधिष्ठान असलेला आत्माच तेवढा शिल्लक रहातो. तो एकमेव अद्वितीय मंगलमय शुद्धसच्चिदानंद परब्रह्म-स्वरूप आहे. तोच अहं या शब्दाचा अर्थ होय. तोच मी आहें.

न माता पिता वा न देवा न लोका
न वेदा न यज्ञा न तीर्थं ब्रुवन्ति ।
सुषुप्तौ निरस्तातिशून्यात्मकत्वात्
तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम् ॥ ३ ॥

मागील श्लोकांत वर्णाश्रमादि सर्व व्यवहार हे अविद्यामूलक आहेत असें सांगितलें. अविद्या असेल तरच वर्णाश्रमादि व्यवहार होत असतो. अशी ही अविद्या आणि सर्व व्यवहार यांची सांगड आहे. याला शास्त्रांत अन्वयव्याप्ति असें म्हणतात. ज्या अवस्थेंत हा सर्व व्यवहार मावळतो, त्या अवस्थेंत अविद्याहि पण नसते. याला व्यतिरेकव्याप्ति असें म्हणतात. अथवा जेथें अविद्या नसते तेथें हा व्यवहारहि नसतो, असेंहि मानलें जातें. तात्पर्य, अविद्या असल्यास हा सर्व वर्णाश्रमादि भेदव्यवहार असतो, अविद्या नसेल तर तो नसतो म्हणून तो अविद्यामूलक आहे. आणि अविद्यामूलक आहे म्हणूनच तो मिथ्या आहे. अशा अभिप्रायानें आचार्य वर्णन करीत आहेत. " सुषुप्तौ न माता पिता वा... ब्रुवन्ति " सौषुप्त अवस्थेंत ही माझी आई आहे, हे माझे वडील आहेत, हे देव आहेत, हे स्वर्गादि लोक आहेत, हे वेद आहेत किंवा हीं यज्ञयागादि कर्मे आहेत, अथवा हें तीर्थ क्षेत्र आहे असें कोणी म्हणत नसतात. त्याचप्रमाणें आत्मसाक्षात्कारदशेंतहि हा सर्व व्यवहार मावळलेला असतो. अहो ! आत्मसाक्षात्कारदशेंत हा सर्व व्यवहार मावळत असेल तर मग कांहींच शिलक न राहिल्यामुळें ती अवस्था अति शून्यस्वरूप झाली, असें म्हणण्याची पाळी येईल. छे. आत्मस्वरूपावस्था ही अति शून्यस्वरूप आहे असेंहि म्हणतां येत नाहीं. सौषुप्त काळांत तो सुषुप्तीचा साक्षी म्हणून सिद्ध असल्यानें आत्म्याचें अतिशून्यात्मकत्वहि निरस्त होत आहे. तो अतिशून्यस्वरूप मानतां येत नाहीं. तात्पर्य, अविद्याकल्पित विश्वप्रपंचाचा भेद मावळला, तरी अविद्येचें व अविद्याकल्पित जगाचें अधिष्ठान असलेलें स्वयंप्रकाश, शुद्ध सच्चिदानंदघन, एकमेव अद्वितीय, मंगलमय परब्रह्मतत्त्व शिलक रहातेंच. तोच आत्मा होय आणि तोच मी आहें.

न सांख्यं न शैवं न तत्पाञ्चरात्रं
न जैनं न मीमांसकादेर्मतं वा ।

विशिष्टानुभूत्या विशुद्धात्मकत्वात्
तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम् ॥ ४ ॥

"तत्त्वमसि, अहं ब्रह्मास्मि" इत्यादि महावाक्यांतील त्वं पदाचा अथवा अहं पदाचा अर्थ करतांना पुढें आलेल्या सर्व मतभेदांचें निरसन करून अहं पदाचा अर्थ शुद्ध सच्चिदानंदघन परब्रह्म हाच आहे हें आपण पाहिलें. आतां तत्पदाचा अर्थ करतांनाहि मतभेद आहेत. त्यांचेंहि निरसन करून तत् शब्दाचाहि विवक्षित अर्थ सच्चिदानंदघन परिपूर्ण परब्रह्मच आहे हा गोष्ट आचार्य या श्लोकानें सिद्ध करीत आहेत.

तत् शब्दाचा अर्थ जगाचें कारण असलेलें ब्रह्म असा आहे. पण सांख्य शास्त्रज्ञांना हा अर्थ मान्य नाहीं. ते म्हणतात जगाचें कारण मूलप्रकृति आहे. योगदर्शनकार पतंजलि म्हणतात, सर्वसामान्य जीवापेक्षां विलक्षण शक्ति असलेला, क्लेश, कर्म, विपाक वगैरे ज्याच्या ठिकाणीं कांहीं नाहीं असा एक विलक्षण पुरुष, ज्याला ईश्वर म्हणतात तोच या जगाचें कारण आहे. शैव म्हणतात, या जगाचें कारण पशुपति आहे. पांचरात्रतंत्रकार म्हणतात, भगवान् वासुदेव हाच सर्व जगाचें कारण आहे. जैन हे नित्य परिणामी ज्याला अर्हत् म्हणतात तोच ईश्वर आणि जगाचें कारण होय असें म्हणतात. मीमांसक म्हणतात, वेदांनी सांगितलेलीं विहित आणि निषिद्ध कर्में हींच जीवांना सुखदुःखात्मक फळ देण्यासाठीं जग निर्माण करतात. नैयायिक म्हणतात, ज्ञान, इच्छा आणि कृति हे गुण ज्याच्या ठिकाणीं नित्य आहेत असा एक सर्वज्ञ ईश्वर हाच जगाचें कारण आहे. वैशेषिक म्हणतात, पृथ्वी, जल, तेज आणि वायु यांचे परमाणूच जगाचें कारण आहेत. तात्पर्य, सर्वज्ञ सर्वशक्तिशालि परब्रह्म हें जगाचें कारण असल्याचें कोणी मानीत नाहींत. आचार्य म्हणतात, वर सांगितलेले सर्व पक्ष हे युक्ति-विसंगत आणि श्रुतिविरुद्ध असल्यामुळें सत्य मानतां येत नाहींत.

अद्वितीय परमानंदरूप परब्रह्म हेंच जगाचें कारण आहे. तेंच परब्रह्म या जीवाचें वास्तविक रूप होय. तें आपल्या अनादि अनिर्वचनीय मायाशक्तीनें सर्वज्ञ आणि सर्वशक्तिशाली बनून या जगाचें उपादानकारण आणि निमित्तकारणहि बनतें. जगाचें उपादानकारण पंचमहाभूतें होत. पंचमहाभूतांच्या रूपानें तेंच नटतें आणि निमित्तकारण म्हणजे जगाचा कर्ता परमात्मा ईश्वर, त्याच्या रूपानेंहि तेंच नटतें.

त्याची माया मोठी विलक्षण आणि अनिर्वचनीय आहे. ज्याची मनानें कल्पनाहि करतां येणार नाहीं तें सर्व कांहीं ही माया त्याच्या आश्रयानें करीत असते. अथवा मायेचा आश्रय घेऊन तो सर्व कांहीं करीत असतो. असा हा उपनिषदांनीं सांगितलेला सिद्धान्तच खरा आहे. हेंच या चौथ्या श्लोकानें आचार्य सांगत आहेत.

"न सांख्यं न शैवं न तत्पाञ्चरात्रं" सांख्यांच्या मतांत मान्य असलेलें जगाचें कारण तें मी नव्हे. सांख्यांची मूलप्रकृति किंवा प्रधानतत्त्व हें जड अचेतन आहे. जगाचें मूलकारण असलेल्या तत्त्वाच्या ठिकाणी ईक्षण आणि संकल्प असल्याचें वर्णन केलेलें आहे. जड अचेतन असलेल्या प्रकृतितत्त्वाच्या ठिकाणीं ईक्षण आणि संकल्प कसा असूं शकेल? अचेतनाला जगाचें कारण मानणें हें युक्ति आणि श्रुति यांच्याशीं विसंगत आहे. जैनमत, पाशुपतमत आणि पांचरात्र-सिद्धान्त (वैष्णवमत) हींहि मतें श्रुति आणि युक्तीशीं विसंगत असल्यामुळें मानतां येत नाहींत. या तिन्ही मतांत ईश्वर आणि जीव यांच्यामध्यें द्वैतभाव हा सत्यस्वरूपाचा असल्याचें प्रतिपादन केलेलें आहे. ईश्वर, चेतन आणि जीव हे जड असल्याचेंहि ते प्रतिपादन करतात. जीवाला जड मानणें हें अनुभवविरुद्ध आहे. श्रुति मुक्तकंठानें जीवात्मा आणि परमात्मा यांच्यामध्यें अभेद प्रतिपादन करीत आहे. वेद हा सर्व प्रमाणांचा राजा आहे. वेदविरुद्ध असल्यामुळें हीं मतें मानणें श्रेयस्कर होणार नाहीं. मीमांसकांचें कर्म देखील स्वभावतः अचेतन असल्यानुळें जगाचें कारण मानतां येत नाहीं. शिवाय मीमांसकांचा द्वैतवादहि वेदविरुद्धच आहे. वैशेषिकांचा जडवाद हाहि श्रुतिविरुद्धच आहे. नैयायिकांचा परमात्मा आणि जीवात्मा हे परस्पर भिन्न आहेत. जीवात्मे देखील प्रत्येक शरीरांत भिन्न भिन्न आहेत. त्यांच्यांतील भेद सत्य आहे. ईश्वर हा सगुण आणि जडद्रव्यस्वरूप आहे. नैयायिकांचे हे सर्व सिद्धान्त श्रुतिविरुद्ध असल्यामुळें त्याज्य आहेत. याच अभिप्रायानें श्लोकाच्या दुसऱ्या चरणांत "न जैनं न मीमांसकादेर्मतं वा" असें आचार्यांनीं म्हटलेलें आहे. "अहं" या प्रतीतीचा विषय असलेला मी म्हणजे आत्मा हा तर "विशुद्धात्मक" म्हणजे निर्विकल्पक अद्वितीय शुद्ध-चैतन्यरूप आहे. कशावरून? असें कोणी विचारल्यास "विशिष्टानुभूत्या" हें त्याचें उत्तर आहे. विशिष्ट प्रकारच्या अनुभवावरून अर्थात् "तत्त्वमसि, अहं ब्रह्मास्मि, अयमात्मा ब्रह्म" इत्याकारक महावाक्यांच्या अर्थाच्या मननानें व निदिध्यासानें जी अखंड एकाकार चित्तवृत्ति निर्माण होते त्यांतून एक प्रकारचा

जो " अहं ब्रह्मास्मि " अशा तत्त्वेचा विशिष्ट अनुभव उदयाला येतो त्या अनुभवानें हें सर्व द्वैत बाधित होऊन जें तत्त्व शिल्लक रहातें तेंच नित्य निरतिशय आनंदरूप परिपूर्णपरब्रह्म होय आणि तेंच मी आहें.

न चोर्ध्वं न चाधो न चान्तर्न बाह्यं
न मध्यं न तिर्यङ् न पूर्वापरा दिक् ।
विपद्व्यापकत्वादखण्डैकरूप-
स्तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम् ॥ ५ ॥

आत्मतत्त्व हें अखंड आणि अनंत आहे. त्याला देशभेद नाहीं आणि कालभेदहि नाहीं. तें अमुक ठिकाणीं नाहीं असें ठिकाण नाहीं व अमुक काळीं नाहीं असा काळहि नाहीं. हींच त्याची अखंडता या श्लोकानें सांगत आहेत. मला बरखालीं, आंतबाहेर असें कांहीं नाहीं. कारण मी सर्वत्र आहें. त्याचप्रमाणें मला उद्देशून मध्यें आहे, आडवा आहे, पूर्वेकडे आहे, पश्चिमेकडे आहे असा कांहीं व्यवहार होत नाहीं. असा व्यवहार ज्यांना उद्देशून होऊं शकतो, तो मी नव्हे. मी सर्व दिशांना व्यापून असल्यामुळें मला पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर इत्यादि दिग्विभाग नाहीं. मी आकाशासारखा व्यापक आहें. अथवा मी आकाशालाहि व्यापलेलें आहें. मी आकाशापेक्षांहि व्यापक आहें. मी सदासर्वकाळ सर्वत्र सर्व रूपानें विराजमान असल्यामुळें अखंड एकरूप आहें. दिग्भेद हे माझ्या ठिकाणीं अज्ञानानें कल्पिलेलें आहेत. ईश्वरकृपेनें व गुरुकृपेनें तें अज्ञान मावळलें म्हणजे अध्यासाचें अधिष्ठान म्हणून जें शिल्लक रहातें तो मीच आहें. मी एकमेव अद्वितीय शुद्ध मंगलमय आनंदरूप आहें.

न शुक्लं न कृष्णं न रक्तं न पीतं
न कुब्जं न पीनं न ह्रस्वं न दीर्घम् ।
अरूपं तथा ज्योतिराकारकत्वात्
तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम् ॥ ६ ॥

अशी एक शंका येण्याचा संभव आहे कीं, जीवात्मा आणि परब्रह्म यांच्यामध्यें जर ऐक्य मानलें तर जीवात्मा दुःखी, कष्टी व संसारी असल्यामुळें परब्रह्म देखील जीवाप्रमाणें दुःखी कष्टी आणि संसारी होईल. तेव्हां हा अभेदवाद काय

कामाचा ? पण ही शंका बरोबर नाहीं. अधिष्ठानाच्या ठिकाणीं अध्यासानें भासलेले पदार्थ अध्यास मावळल्यानंतर अध्यस्तरूपानें शिल्लक रहात नाहींत. तेथें केवळ अधिष्ठानच शिल्लक रहात असतें. याच दृष्टीनें अध्यासकाळीं प्रतीतीला येणारे पदार्थ हे तत्त्वतः अधिष्ठानस्वरूप आहेत असें म्हटलें जातें. याच न्यायानें प्रकृतस्थळीं शुद्ध चित्स्वरूपाच्या ठिकाणीं अविद्येनें प्रतीतीला येणारा जीवसमूह आणि भूतभौतिक विश्व हें अविद्येचा निरास झाल्यानंतर बाधित होत असतें. अधिष्ठान मात्र शिल्लक रहातें. तें अनाद्यनंत, स्वतःसिद्ध, स्वयंप्रकाश असल्यामुळें त्याचा कधींच बाध होऊं शकत नाहीं. अध्यासकाळांत भासणारें भूतभौतिक जग आणि जीवसमुदाय हा तत्त्वतः अधिष्ठानाहून निराळा नाहीं. म्हणूनच जीवांचा ब्रह्मस्वरूपाशीं तादात्म्य व्यवहार होतो. जेथें भेद नाहीं तेथें अभेद तरी कसला ; हेंच लक्षांत घेण्यासाठीं आचार्य हा श्लोक लिहीत आहेत. आपल्या प्रतीतीला येणारीं विविध रूपें शुक्ल, कृष्ण, रक्त आणि पीत त्याचप्रमाणें हरित, कपिश आणि चित्र इत्यादि विविध रूपें मी नव्हे; किंवा या स्वरूपांनीं विशिष्ट असाहि कोणी मी नव्हे. मी पीन म्हणजे भरपुष्ट, स्थूल अथवा महान नव्हे. त्याचप्रमाणें मी कुब्ज म्हणजे कृश अथवा सूक्ष्महि पण नव्हे. कुब्ज शब्दाचा ठेंगणा, वाकडा असा प्रसिद्ध अर्थ घेतला तरी तोहि कोणी मी नव्हे. मी ह्रस्व नाहीं व दीर्घहि नाहीं. अर्थात् भूतभौतिक रूपानें प्रतीतीला येणारा कोणताहि पदार्थ देह किंवा जीव मी नव्हे. "रूप्यते अवलोक्यते इति रूपं" या व्युत्पत्तीप्रमाणें रूप शब्दाचा अर्थ स्थूल, सूक्ष्म, पदार्थमात्र असा होतो. त्यालाच शास्त्रांत प्रमेय असें म्हणतात. "अरूपं" म्हणजे मी प्रमेयस्वरूप नव्हे. मी पूर्ण स्वयंप्रकाश ज्योतिस्वरूप आहें. सर्वांचा बाध होऊन शिल्लक रहाणारें एकमेव अद्वितीय मंगलमय आनंदरूप परब्रह्मतत्त्व तें मीच आहें. अध्यस्ताचें धर्म हे अधिष्ठानाच्या ठिकाणीं येत नसतात. दोरीवर सांप भासला तरी सापाचा विषारीपणा दोरीमध्यें येत नसतो. त्याचप्रमाणें जीवाच्या ठिकाणीं भासणारें कर्तृत्व, भोक्तृत्व हें परब्रह्माच्या ठिकाणीं येत नाहीं. अशा रीतीनें कोणत्याहि आक्षेपाला अवसर उरत नाहीं.

न शास्ता न शास्त्रं न शिष्यो न शिक्षा
न च त्वं न चाहं न चायं प्रपञ्चः ।

स्वरूपावबोधो विकल्पासहिष्णु-
स्तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम् ॥ ७ ॥

पूर्वपक्षकार वेदांत्यांना विचारतात, अहो ! तुम्ही हें ब्रह्मज्ञान कोणाला सांगतां ? ज्याला सांगतां तो ब्रह्मस्वरूप आहे का ब्रह्माहून निराळा आहे ? ब्रह्माहून निराळा आहे असें म्हणाल तर तें म्हणणें बरोबर नाहीं. कारण तुमच्या मतानें " ब्रह्मैवेदं सर्वं " ब्रह्माहून निराळें असें कांहींच नाहीं. बरें, ब्रह्मालाच ब्रह्मज्ञान सांगतों असें म्हणाल तर तें निरर्थक आहे. जें ब्रह्मच आहे त्याला ब्रह्मज्ञान काय सांगतां ? तेव्हां हा तुमचा उपदेश निरर्थक आहे. यावर आचार्य " न शास्ता न शास्त्रं " या श्लोकानें उत्तर देत आहेत. आचार्य म्हणतात, जीवाचा ब्रह्मभाव हा स्वतःसिद्ध आहे, पण अविद्येमुळें निराळेपणा प्रतीतीला येतो. ब्रह्म निराळें व मी निराळा असें वाटूं लागतें त्या अविद्येचा निरास करण्याकरितांच ब्रह्मज्ञानाचा उपदेश करणें उपयुक्त आहे. यावर शंका अशी कीं, ब्रह्मज्ञानानें अविद्येचा निरास होतो. तो अविद्येचा निरास ब्रह्मरूप आहे का ब्रह्माहून निराळा आहे ? तो ब्रह्माहून निराळा असेल तर ब्रह्म हें एक सत्य आणि अविद्यानिरास हें दुसरें सत्य. अशीं दोन सत्यें तत्त्वें जगांत विराजत असल्यामुळें तुमचें अद्वैततत्त्व गाहिलें कोठें ? बरें अविद्यानिरास हा ब्रह्मरूप आहे असें म्हणाल तर ब्रह्म हें स्वतःसिद्ध असल्यामुळें अविद्यानिरासहि स्वतःसिद्धच झाला ! मग त्याच्याकरितां उपदेशाची काय आवश्यकता आहे ? यावर आचार्य म्हणतात, तुम्हीं फार चांगला प्रश्न केला. अविद्यानिरास हा ब्रह्मस्वरूप असल्यामुळें आणि ब्रह्म हें स्वतःसिद्ध असल्यामुळें अविद्यानिरासाकरितां ब्रह्मज्ञानाच्या उपदेशाची आवश्यकता नाहीं हें तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. पण बाबांनो ! तुम्ही आत्मसाक्षात्काराच्या भूमिकेवरून हा प्रश्न केला आहे ? का आत्मस्वरूपाचा यथार्थ साक्षात्कार होण्याच्या पूर्वकाळांतला हा प्रश्न आहे ? तो जर आत्मसाक्षात्काराच्या भूमिकेवरून केला असेल, तर मग उपदेश करण्याची कांहीं आवश्यकता नाहीं हें आम्हींहि मान्य करतों. " न शास्ता न शास्त्रं न शिष्यो न शिक्षा न च त्वं न चाहं न चाऽयं प्रपञ्चः । " " ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति " या श्रुतिसिद्धान्तप्रमाणें आत्मस्वरूपाचा यथार्थ साक्षात्कार झाल्यानंतर सर्व द्वैतभाव मावळतो व सर्वसाक्षी आत्मचैतन्याशिवाय दुसरें कांहींच शिल्लक उरत नाहीं. मग शास्ता म्हणजे उपदेश करणारा गुरु किंवा शिष्य,

म्हणजे ज्याला उपदेश करावयाचा आहे तो, अथवा शिक्षा म्हणजे प्रत्यक्ष उपदेश करणें, हें कांहींच शिल्लक उरत नाहीं. त्या वेळेला त्वं म्हणजे तूं अर्थात् उपदेश श्रवण करणारा आणि अहं म्हणजे मी अर्थात् वक्ता हें कांहींच शिल्लक उरत नाहीं. तसेंच अज्ञानकाळांत अनर्थावह वाटणारा हा विश्वप्रपंच हाहि पण तत्त्वतः शिल्लक उरत नाहीं. याप्रमाणें आत्मसाक्षात्काराच्या काळांत ब्रह्मज्ञानोपदेश व्यर्थ आहे या म्हणण्याला कांहींच अर्थ उरत नाहीं. कारण ती वैय्यर्थ्यापत्ति ही इष्टापत्तीच होय.

आत्मसाक्षात्कार होण्याच्या पूर्वकाळांतला हा प्रश्न असेल तर भल्या गृहस्था, आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होण्यासाठीं ब्रह्मज्ञानाचा उपदेश हा तर अत्यंत आवश्यक आहे. ही गोष्ट निर्विवाद आहे. "स्वरूपावबोधः" म्हणजे स्वरूपाचा साक्षात्कार. अज्ञानदशेंत हें ब्रह्मज्ञानाच्या उपदेशाचें फळ होय. स्वरूपसाक्षात्कार हा "विकल्पासहिष्णु" म्हणजे मी, तूं, माझें, तुझें, गुरु, शिष्य इत्यादि विकल्पांना म्हणजे भेदांना सहन करीत नाहीं. भूतभौतिक विश्वप्रपंचाचें द्वैतहि त्याला सहन होत नाहीं. " यत्र तु सर्वमस्यात्मैवाभूत्तत्र किं केन पश्येत् ? किं केन विजानीयात् ?' अशी अवस्था होऊन जाते. त्या अवस्थेंत द्रष्टा, दृश्य आणि दर्शन किंवा ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान हा सर्वच भेदभाव मावळतो. याच दृष्टीनें स्वरूपसाक्षात्काराला "विकल्पासहिष्णु" असें विशेषण दिलेलें आहे. तात्पर्य, सर्वांच्या अंतीं शिल्लक रहाणारा एकमेवाद्वितीय मंगलमय परिपूर्णपरब्रह्म परमात्मा सच्चिदानंद, तोच मी आहें.

न जाग्रन्न मे स्वप्नको वा सुषुप्ति-
र्न विश्वो न वा तैजसः प्राज्ञको वा ।
अविद्यात्मकत्वात्त्रयाणां तुरीय-
स्तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम् ॥ ८ ॥

प्रश्न असा येतो कीं, जीव हा जर परब्रह्मस्वरूप आहे तर परब्रह्म हें स्वयंप्रकाश चैतन्यस्वरूप असल्यामुळें जीव देखील स्वयंप्रकाश चैतन्यस्वरूपच झाला. जीव हा सदासर्वकाळ स्वयंप्रकाश चैतन्यस्वरूप असल्यामुळें त्याला जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति असा अवस्थाभेद कां होतो ? ज्या अर्थीं जीवाच्या पाठीमागें या अवस्था आहेत त्या अर्थीं जीव हा स्वयंप्रकाश चैतन्यस्वरूप नाहीं असें म्हणावें लागतें. बरें, जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति हा सर्व भ्रम आहे असें म्हणाल, तर सगळें जगच भ्रम आहे असें म्हणावें लागेल. यावर आचार्य म्हण-

तात. आत्मस्वरूपाच्या यथार्थ साक्षात्कारानंतर सर्व जग भ्रमस्वरूप ठरले तर आम्हांला त्यांत कांहीं आपत्ति नाहीं. तीहि इष्टापत्तीच होय. पण आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होण्यापूर्वी अज्ञानदशेंत विश्वाची उत्पत्ति, स्थिति आणि प्रलय तसेंच जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति; जन्म आणि मृत्यु, बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य; पाप, पुण्य, सुखदुःख, स्वर्ग, नरक इत्यादि सर्व गोष्टींची सुव्यवस्थित उपपत्ति लागते. अनुपपन्न असें कांहीं नाहीं. (सु. स्तो. संग्रह, भाग १ ला, यांतील दक्षिणामूर्तिस्तोत्रांतला चौथा श्लोक पहा. त्याचप्रमाणें आमचें योगवासिष्ठाचें हृदत यांतील जगाची उत्पत्ति, स्थिति आणि लय हें प्रकरण पहावें.)

वेदान्तविचारानें अविद्या मावळली आणि आत्मस्वरूपाचा साक्षात्कार झाला कीं मला म्हणजे या आत्म्याला, जागृति नाहीं, स्वप्न नाहीं व सुषुप्तीहि पण नाहीं. तसेंच जागृत अवस्थेचा अभिमानी, ज्याला विश्व हें पारिभाषिक नांव आहे तो मी नव्हे. स्वप्नदशेचा अभिमानी आत्मा, ज्याला तैजस असें पारिभाषिक नांव आहे तो मी नव्हे. त्याचप्रमाणें सुषुप्त अवस्थेचा अभिमानी ज्याला शास्त्रज्ञ प्राज्ञ असें म्हणतात, तो मी नव्हे. "अविद्यात्मकत्वात्त्रयाणां" जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति, तसेंच विश्व, तैजस आणि प्राज्ञ हे सर्व अविद्याकल्पित आहेत. मी त्यांच्याहि पलीकडचा तुरीय म्हणजे चौथा अर्थात् अनिर्वचनीय ब्रह्मस्वरूप आहें. तात्पर्य, अज्ञानदशेंत सर्व शास्त्रीय व्यवहार आणि लौकिक व्यवहार हे व्यवस्थित रीतीनें उपपन्न होत असले तरी ज्ञानदशेमध्यें या सर्व पदार्थांचें सत्यत्व बाधित होतें. शेवटीं विश्वाच्या अध्यासाचें अधिष्ठान म्हणून जो शिल्लक उरतो तोच एकमेव अद्वितीय मंगलमय शुद्धसच्चिदानंद परिपूर्णपरब्रह्म परमात्मा होय; आणि तोच अहं म्हणजे मी आत्मा होय.

अपि व्यापकत्वाद्धितत्व-प्रयोगात्
स्वतःसिद्धभावादनन्याश्रयत्वात् ।
जगच्चुच्छमेकं समस्तं तदन्यत्
तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम् ॥ ९ ॥

मागील श्लोकांत जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तीन अवस्थांचा माझ्याशीं कांहीं संबंध नसून या तिन्ही अवस्थांचा अभिमानी जो आत्मा विश्व, तैजस आणि प्राज्ञ तो मी नव्हे, ते सर्व मिथ्या आहेत असें सांगितल्यानंतर

अशी शंका येते की, या सर्वांचा साक्षी असलेला आत्मा "अहं" तो तरी सत्य आहे कशावरून ? तोहि यांच्याप्रमाणें मिथ्या नाहीं कशावरून ? या शंकेचें समाधान आचार्य या नवव्या श्लोकानें करीत आहेत.

"अपि व्यापकत्वात" सर्वसाक्षी आत्मा हा व्यापक म्हणजे अपरिच्छिन्न आहे. त्याच्या व्यतिरिक्त प्रतीतीला येणारें विश्वांतील सर्व कांहीं परिच्छिन्न परिमित असल्यामुळें तुच्छ आहे, मिथ्या आहे. साक्षी आत्मा मात्र अपरिच्छिन्न असल्यामुळें मिथ्या होऊं शकत नाहीं. कोणत्याहि वस्तूच्या ठिकाणीं परिच्छेद हा तीन प्रकारानें पहातां येतो. उदाहरणार्थ, घट घ्या. तो येथें आहे, तेथें नाहीं, असें आपण म्हणूं शकतों. हा त्याचा देशपरिच्छेद झाला. तो पूर्वी नव्हता, आतां आहे, पुढें नाहींसा होईल, असें आपण म्हणूं शकतों. हा त्याचा काल-परिच्छेद होय. घट हा घटच आहे, तो पट नव्हे किंवा तो मठ नव्हे, असें आपण म्हणूं शकतों. हा त्या घटाचा वस्तुपरिच्छेद झाला. यामाणें जगांतील सर्व पदार्थांच्या ठिकाणीं तिन्ही प्रकारचा परिच्छेद असतो म्हणून ते पदार्थ परिच्छिन्न म्हटले जातात. आणि परिच्छिन्न असल्यामुळेंच ते मिथ्या म्हणजे नाशिवंत असतात. साक्षी आत्मा हा त्रिविध परिच्छेदशून्य, आहे. तो अपरिच्छिन्न आहे; आणि म्हणूनच तो मिथ्या म्हणजे नाशिवंत होऊं शकत नाहीं. आत्मा हा सर्वसाक्षी आहे. त्याचा साक्षी दुसरा कोण असणार ? सूर्याच्या प्रकाशानें सर्व पदार्थ पहातां येतात. पण सूर्याला पहाण्याकरितां कोणता प्रकाश उपयोगाला येणार ? सूर्याला प्रकाशित करण्याला सूर्याशिवाय दुसरा कोणीच नाहीं म्हणून व्यवहारांत आपण सूर्याला स्वयंप्रकाश म्हणतों. त्याचप्रमाणें साक्षीचैतन्यानें जगांतील सर्व पदार्थांचें ज्ञान होऊं शकतें. पण सर्वसाक्षी असलेल्या आत्म्याचें – चित्तत्त्वाचें ज्ञान दुसऱ्या कोणत्या साधनानें होणार ? त्याचा प्रकाशक त्याच्यावांचून दुसरा कोणीच नाहीं. म्हणून साक्षी आत्मा हा स्वयंप्रकाश मानला जातो. या जगांत तत्त्वतः तोच स्वयंप्रकाश आहे, म्हणून त्याला मिथ्या म्हणतां येत नाहीं.

भूतभौतिक विश्वप्रपंचाचें अधिष्ठान असलेला तो आत्मा, त्याचें अधिष्ठान या जगांत त्याच्याशिवाय दुसरें कोणीच नाहीं म्हणून त्याला "स्वप्रतिष्ठित" असें म्हणतात. "स्वे महिम्नि प्रतिष्ठितः" असें त्याचें उपनिषदांत वर्णन केलेलें आहे. तो स्वप्रतिष्ठित आहे म्हणूनच पूर्ण सत्य आहे. आत्मा जसा सर्व विश्वाचा साक्षी आहे, तसाच तो सर्व विश्वाचा बाध म्हणजे निरासहि पहात असतो.

त्याचा कधींच बाध होत नाहीं. "नाहं" म्हणजे मी नाहीं अशी कधींच कोणाला प्रतीति येत नसते. म्हणूनच आत्म्याचा अभाव कधींच सिद्ध होत नाहीं. म्हणूनहि आत्मा सदासर्वकाळ नित्यच आहे, असें म्हणावें लागतें. यावर कोणी विचारील की, अहो ! मी आतां मरणार, अशी प्रतीति पुष्कळांना येत असते, मग आत्मा नित्य आहे असें कसें म्हणतां ? यावर उत्तर असें आहे की, "मी आतां मरणार" ही प्रतीति अज्ञानी लोकांनाच येत असते, ज्ञानी लोकांना अशी प्रतीति कधीं येत नाहीं. अज्ञानी लोकांची ही प्रतीति भ्रमात्मक असल्यामुळें ती प्रमाण कधींच होऊं शकत नाहीं. अहो ! मरणाची भीति आपल्याला वाटते ना ? छे. अज्ञान हेंच मरणाच्या भीतीचें कारण आहे. ज्ञानी लोकांना कधींच मरणाची भीति वाटत नाहीं. त्यांच्या दृष्टीनें मरणच नाहीं, मग भीति कशाची वाटणार ? तात्पर्य, आत्मा नित्य आहे ही गोष्ट निर्विवाद होय.

"हितत्वप्रयोगात्" आत्मा हा सर्वांचा प्रिय आहे. तो निरपेक्ष प्रेमाचें अधिष्ठान आहे. आत्म्यावरचें अनन्यप्रेम हें लौकिक व्यवहारानेंहि सिद्ध होतें. "मा न भूवं हि भूयासमिति प्रेमात्मनीक्ष्यते" मी नसावें असें कधींच कोणाला वाटत नाहीं. मी असावें असेंच सर्वांना वाटत असतें. हें आत्म्याविषयीं असलेल्या निरपेक्ष प्रेमाचेंच द्योतक होय. तो प्रियस्वरूप आहे म्हणूनच आनंदरूप आहे. "हित" म्हणजे सुख, आनंद. आत्मा हा आनंदस्वरूप असल्याबद्दल उपनिषदांतून ठिकठिकाणीं उपदेश केलेला आहे. आत्मा हा सुखस्वरूप – आनंदरूप असल्याचा उपनिषदांतील अनेक वाक्यांतून प्रयोग केलेला आहे. अशा रीतीनें श्रुतिप्रमाणावरूनहि आत्मा नित्य आनंदस्वरूप असल्याचें सिद्ध होते.

"स्वतःसिद्धभावात्" विश्वांतील सर्व पदार्थांची सिद्धि ही आत्म्यावर अवलंबून आहे; पण आत्म्याची सिद्धि ही कोणावरहि अवलंबून नाहीं. म्हणून आत्मा हा स्वतःसिद्ध आहे. स्वतःसिद्ध आहे म्हणूनच तो नित्य आहे. "अनन्याश्रयत्वात्" आत्मा हा कोणाच्याच आश्रयानें रहात नाहीं. उलट त्याच्याच आश्रयानें सर्व कांहीं रहात आहे. म्हणूनहि आत्मा हा नित्यच आहे. "तदन्यत् एतत् समस्तं जगत् तुच्छम्" आत्म्याहून व्यतिरिक्त म्हणून प्रतीतीला येणारें हें सर्व जग तुच्छ म्हणजे निरर्थक आहे. सर्वांचा नाश झाला तरी शेवटीं सर्वसाक्षी म्हणून जो शिल्लक रहातो तोच एकमेव अद्वितीय मंगलमय शुद्ध सच्चिदानंदघन परमात्मा होय. आणि तोच मी आहें.

न चैकं तदन्यद् द्वितीयं कुतः स्यात्
न वा केवलत्वं न चाकेवलत्वम् ।
न शून्यं न चाशून्यमद्वैतकत्वात्
कथं सर्ववेदान्तसिद्धं ब्रवीमि ॥ १० ॥

अहो, हें सर्व जग तुच्छ आहे असें म्हणून तुम्ही या जगाचा निषेध कसा करतां ? जग नाहीं आणि आत्माच तेवढा सत्य आहे असें तुम्हांला कसें म्हणतां येईल ? ज्या वस्तूबद्दल आपण नाहीं असा उल्लेख करीत असतों ती वस्तु दुसरीकडे कोठें तरी असते व ती आपल्याला माहीतहि असते. वंध्यापुत्र नाहीं, सशाचें शृंग नाहीं असें कधीं कोणी म्हटलें आहे काय ? नाहींतच ते पदार्थ. मग त्यांचा निषेध काय करणार ? तुम्ही जगाचा "तुच्छ" म्हणून निषेध करीत आहां. अर्थात् जग हें सत्य म्हणून केव्हां तरी कोठें तरी प्रतीतीला येत असलें पाहिजे. मग अद्वैत कसें सिद्ध होणार ? याचें उत्तर — जग हें तत्त्वतः नाहींच. पण केवळ अविद्येनें तें प्रतीतीला येतें, म्हणूनच " नेति नेति " " नेह नानास्ति किंचन " इत्यादि वाक्यांनीं आत्म्याव्यतिरिक्त प्रतीतीला येणाऱ्या वस्तूंचा निषेध केला जातो. अविद्या संपली कीं निषेधहि संपला. मग केवळ एकच एक आत्मतत्त्वच शिल्लक उरतें व ते स्वप्रकाशानें तळपत रहातें. " न चैकं तदन्यद् द्वितीयं कुतःस्यात् ? " जेथें एक हाच शब्द लागू पडत नाहीं तेथें त्याच्याहून निराळें दुसरें तिसरें हा तरी व्यवहार कसा होणार ? केवलत्व म्हणजे एकत्व आणि अकेवलत्व म्हणजे अनेकत्व हेहि धर्म त्याच्या ठिकाणीं नाहींत. तें शब्दातीत व सर्व धर्मातीत आहे. तें शब्दानें वर्णन करतांच येत नाहीं. अहो ! तर मग बौद्धाप्रमाणें तें शून्य आहे असें म्हणा. छे. तें शून्य आहे असें म्हणतां येत नाहीं. मग अशून्य म्हणजे शून्याभावस्वरूप आहे असें म्हणा. छे. तेंहि म्हणणें बरोबर होणार नाहीं. कारण अशून्य किंवा शून्याभाव हे शब्द शून्य-सापेक्ष आहेत. शून्यच नाहीं तेथें अशून्य हा शब्द तरी कसा लागू पडेल ? सूर्याला जसा दिवस नाहीं आणि रात्रहि नाहीं. उदय नाहीं आणि अस्तहि नाहीं. पूर्व नाहीं आणि पश्चिमहि नाहीं. सूर्य जसा स्वप्रकाशानें तळपत असतो त्याचप्रमाणें स्वयंप्रकाश आत्मचैतन्य हें स्वतःसिद्ध स्वप्रकाशानें नित्य विराजमान आहे. अहो ! तें आहे असें तुम्ही म्हणतां, पण त्याला कांहीं प्रमाण दाखवीत

नाहीं. मग तें कसें मानावें ? अरे ! प्रमाण काय विचारतोस ? " सर्ववेदान्तसिद्धं " वेदान्त म्हणजे उपनिषदें. त्यांतहि " सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म " " नित्यं विज्ञानमानन्दं ब्रह्म " " अयमात्मा ब्रह्म " " सर्वं खल्विदं ब्रह्म " " आत्मैवेदं सर्वं " अशा तऱ्हेचीं आत्मस्वरूपाचें प्रतिपादन करणारीं वाक्यें. वेदांचा खरा अंत म्हणजे शेवट अर्थात पर्यवसान ज्या तत्त्वांत होतें त्या तत्त्वाचें प्रतिपादन करणारीं वाक्यें हाच खरा वेदान्त होय. या वेदान्तानें दंडी पिटून सांगावें त्याप्रमाणें जागोजाग आत्मतत्त्वाचें प्रतिपादन केलेलें आहे. अशा तऱ्हेनें आत्मतत्त्व हें सर्व वेदान्तसिद्ध आहे. अहो ! कसें आहे तें आत्मतत्त्व हें आम्हांला वर्णन करून सांगतां का ? आचार्य म्हणतात, सांगतां येत नाहीं. " कथं ब्रवीमि " मी कसें सांगूं ? अहो ! सांगतां येत नाहीं तर तें तत्त्व नाहीं असें म्हणा. छे. नाहीं कसें म्हणावें ? तें प्रत्यक्ष कळतें आहे. कळतें आहे तर मग वर्णन करून सांगा. अरे बाबा ! वर्णन करतां येत नाहीं म्हणून तें कळत नाहीं असें का म्हणावयाचें ? हा दरभंग्याचा लंगडा आंबा खा. कसा आहे ? गोड आहे. हा रत्नागिरीचा हापूस आंबा खा. कसा आहे ? गोड आहे. हा अलाहाबादचा पेरू खा. कसा आहे ? गोड आहे. आणि हीं काबुलचीं गोस्तनी द्राक्षें. कशीं आहेत ? गोड आहेत. अरे ! गाईचें धारोष्ण दूध घे. सांग कसें आहे ? गोड आहे. अरे ! या सर्वांची गोडी सारखीच आहे का रे ? नाहीं. मग त्यांत कांहीं भेद आहे का ? होय. त्या प्रत्येक गोडींत फरक आहे. मग तो फरक वर्णन करून सांग ना ? छे. तें सांगतां येत नाहीं. मग त्या गोडींत कांहीं फरकच नाहीं असें म्हण. छे. तसें कसें म्हणूं ? तो फरक प्रत्यक्ष मला कळतो आहे. मग भल्या गृहस्था साध्या फळाफळांतल्या गोडींतला फरक तुला कळत असूनहि सांगतां येत नाहीं, तर मग " कथं सर्ववेदान्तसिद्धं ब्रवीमि ! " निष्कल, निरंजन, अखंड, अनंत, शुद्ध, मंगलमय, सद्घन, चिद्घन, आनंदघन परिपूर्ण परब्रह्मतत्त्वाचें, त्या वेदान्तसिद्ध असलेल्या आत्मतत्त्वाचें मी तरी काय वर्णन करणार ! त्याचा तूंच स्वतः अनुभव घेऊन पहा.

स मा प्त